THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL
LIBRARY
OU_196082
UNIVERSAL
LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY
Call No. M294.12/P29V Accession No. M4659
Author पाठक, श्रीधर शास्त्री - अनु.
Title वेदप्रकाश. 1864 sake
This book should be returned on or before the date last marked below.

यशोदा-चिंतामणि-ट्रस्ट पुरस्कृत ग्रंथमाला

क्रमांक १२

वर्ष १९४२

मनोहर-ग्रंथमाला प्रकाशन २५ वें

—पुणें यशोदा-चिंतामणि ट्रस्टकडून पुरस्कृत—

वेदप्रकाश

शुक्लयजुर्वेदांतर्गत माध्यन्दिन वाजसनेयि संहितेचा मराठी-अनुवाद

अनुवादक—वेदान्तवागीश महामहोपाध्याय

श्रीधरशास्त्री पाठक



शके १८६४ याज्ञवल्क्यजयन्ती

मूल्य १० रुपये.

प्रकाशक—
म. म. केळकर,
मनोहर ग्रंथमाला, पुणें २.

Publisher :—
M. M. Kelkar,
Manohar Granth-Mala,
Poona 2.

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

All rights are reserved by the Author.

मुद्रक—
विठ्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर,
पुणें ४.

Printer :—
V. H. Barve,
Aryabhushan Press,
915/1 Shiwaji Nagar,
Poona 4.

अनुक्रमणिका

१	प्रस्तावना	...	...	१–२०
२	याज्ञवल्क्यचरित	...	...	२१–३०
३	अध्यायानुक्रमणिका	...	...	३१–३२
४	भाषांतर	...	...	१–५७०
५	अकारादि मंत्रसूचि	...	...	५७१–६०७

महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठककृत ग्रंथ व लेख

मराठी ग्रंथ

(१) **वेदप्रकाश**–(शुक्लयजुर्वेदीय माध्यन्दिन संहितेचें मराठी भाषांतर) (मनोहर ग्रंथमाला, पुणें.)

(२) **पारस्कर गृह्यसूत्राचें मराठी भाषांतर** (पाटील निधि, पुणें.)

(३) **नित्यब्रह्मकर्मसमुच्चय**–सार्थ व सकृतिक–(पाटील निधि, पुणें)

(४) **अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ**–(धर्मशास्त्र ग्रंथ) (आत्माराम छापखाना– धुळें)

(५) **नैष्कर्म्य सिद्धि**–(वेदान्त ग्रंथ–) मराठी भाषांतर–(तत्त्वज्ञानमंदिर, अमळनेर)

(६) **वेदांतपरिचय**–(अमुद्रित)

(७) **जीवन्मुक्तिविवेकाचें मराठी भाषांतर.**
(८) **सिद्धान्ततत्त्वबिन्दूचें मराठी भाषांतर.** } अमुद्रित.

संस्कृत लेख

(१) **धर्मशास्त्रीयव्याख्यानानि**–(Annals–Bhandarkar Oriental Research, Poona).

(२) **केनोपनिषत्**–पदवाक्यभाष्ययोः कर्तृविमर्शः (Oriental Conference, Poona 1919).

इंग्रजी लेख

No Sankhya Karika Missing–Indian Antiquary. London–December 1923.

मराठी लेख

(१) **ज्ञानेश्वरांची पितृतः शुद्धि व धर्मशास्त्र.** (ज्ञानेश्वरदर्शन—अहमदनगर).



॥ श्रीशिवः शरणम् ॥

*प्रस्तावना



' वेद ' शब्दाचा अर्थ

वेद या शब्दांत विद्–ज्ञाने–जाणणें या अर्थाचा धातु आहे. ज्यामुळें जाणलें जातें, त्या ग्रंथसमुदायास ' वेद ' असें म्हणतात. ह्या धात्वर्थाला लक्षांत घेऊन सर्व प्रसिद्ध अशी एक अभियुक्तोक्ति आहे—

प्रत्यक्षेणानुमित्या वा यस्तूपायो न बुद्ध्यते ।
एनं विदन्ति वेदेन तस्माद्वेदस्य वेदता ॥

या अभियुक्तोक्तीवरून असें सिद्ध होतें कीं, प्रत्यक्ष व अनुमान ह्या प्रमाणांनीं अज्ञेय असलेल्या गोष्टी, उ०–' अग्निष्टोमेन स्वर्गकामो यजेत ' इत्यादि ऐहिक कर्में व पारलौकिक फल यांचा संबंध दाखविणारें ज्ञान वेदानेंच कळतें. म्हणजे इतर कोणत्याही ज्ञानापेक्षां वेदजन्य ज्ञान श्रेष्ठ आहे असें सिद्ध झालें.

वेद एक कीं अनेक ?

" एक एव पुरा वेदः प्रणवः सर्ववाङ्मयः । "

या वर्णनावरूनही प्राचीन काळीं वेद एकच होता, ह्या अनुमानास पुष्टी मिळते. ' ऐहिक कर्में ' व ' पारलौकिक फल ' यांचा संबंध दाखविणारें ज्ञान ज्या महा-ग्रंथांतून प्राप्त झालें; त्या ग्रंथाचा जो प्रतिपाद्य विषय त्यालाच वेद ही संज्ञा प्राप्त झाली; हा सिद्धांत तर्कशुद्ध मानावयास हरकत नाहीं.

वेदचतुष्टय व त्याचें माहात्म्य

पूर्वी एकच असलेला वेद बुद्धिमांद्यामुळें एकाला अध्ययन करणें अशक्य झाल्यानें बादरायण व्यासानें पैल, वैशंपायन, सुमन्तु व जैमिनि ह्या चार शिष्यांना त्याचे

---

* युद्धजन्य परिस्थितीमुळें सविस्तर सांगोपांग प्रस्तावना तयार असतांही बाजूला ठेवून सामान्यविषयक संक्षिप्त प्रस्तावना लिहिली आहे. परमेश्वरकृपेनें युद्धशांति झाल्यावर महाप्रस्तावना अन्यत्र छापण्याचा योग येईल.

चार भाग करून शिकविले व वेदाचें रक्षण केलें. त्या चार वेदांचीं नांवें (१) ऋग्वेद (२) यजुर्वेद (३) सामवेद व (४) अथर्ववेद अशीं होत. ऋग्वेदांत प्राधान्येंकरून विज्ञान प्रतिपाद्य आहे. यजुर्वेदांत नानाविध यज्ञकर्मे प्रतिपाद्य आहेत. सामवेदांत उपासना व अथर्ववेदांत ब्रह्मात्मसाक्षात्कार प्रतिपाद्य आहे; असें ठोकळ मानानें म्हणतां येतें. वेद चार भागात्मक आहे याचें प्रतिपादन यजुःसंहिता अध्यायं ३१ मंत्र ७ व्या मध्यें व बृहदारण्यकोपनिषदांत २।४।१० आहे. जैमिनि महर्षीनीं ऋग्वेदादि तीन वेदांचीं लक्षणें[3] लिहिलीं आहेत. (यज्ञांत प्रत्यक्ष उपयुक्त नसल्यानें अथर्ववेदाचें त्रयीविद्येंत ग्रहण होत नाहीं.) एवं च सर्व वेदांनीं कर्मोपासनाद्वारा परमेश्वराचें ज्ञान वेदसाध्य आहे; ही गोष्ट ' सर्व वेदांनीं मीच ज्ञेय आहे ', व म्हणून लोकांतें आणि वेदांत मी पुरुषोत्तम ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्या वेदांच्या पुष्कळ शाखा झाल्या. त्याचें वर्णन पातंजल महाभाष्यांत–ऋग्वेदाच्या शाखा २१,

---

१. तस्माद्यज्ञात्सर्वहुत ऋचः सामानि जज्ञिरे ।
छन्दाꣳसि जज्ञिरे तस्माद्यजुस्तस्मादजायत ॥ यजु. सं. अध्याय ३१ मं. ७.

२. अस्य महतो भूतस्य निःश्वसितमेतद्यद् ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्वाङ्गिरस ॥
बृह. उ.–२।४।१०.

३. (अ) तेषामृग्यत्रार्थवशेन पादव्यवस्था । २।१।३५
अभियुक्तानां वचसा यत्रार्थवशेन वृत्तवशेन च पादव्यवस्था सा ऋक् ।
अर्थ—शिष्टांच्या वाक्यानें केलेली अर्थाच्या व वृत्ताच्या धोरणानें पादांची (चरणांची) व्यवस्था जेथें होते; तिला 'ऋक्' (ऋग्वेद) असें म्हणतात.
(आ) गीतिषु सामाख्या ? । २।१।३६
अम्लं दधि, मधुरो गुड इतिवदभियुक्तोक्त्या गीतिविशिष्टं साम ।
अर्थ—आंबट दहीं, गोड गूळ असें विशेषण असल्याप्रमाणें गायनात्मक असें विशेषणयुक्त ऋग्वेदाचें जें स्वरूप, त्याचें नांव साम.
(इ) शेषे यजुःशब्दः । २।१।३७
या न गीतिर्न पादबद्धं तत्प्रश्लिष्टपठितं यजुरिति ।
अर्थ—ज्यांत गायन नाहीं; व पादव्यवस्था नाहीं; असें एक वाक्यात्मक जें त्याचें नांव यजुर्वेद.

४. वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यः । भगवद्गीता अ. १५।१५.

५. अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः । भग. अ. १५।१८

६. एकविंशतिधा बाह्वृच्यमेकशतमध्वर्युशाखाः ।
सहस्रधा सामवेदो नवधाऽथर्वणो वेदः ॥ पातंजल महाभाष्ये १।१।१

यजुर्वेदाच्या १०१, सामवेदाच्या १००० व अथर्ववेदाच्या ९, ह्याप्रमाणें आहेत. असेंच वर्णन कूर्मपुराणांतही आहे. त्यांत यजुर्वेदाचे शुक्ल व कृष्ण असे दोन भेद आहेत. त्यांपैकीं कृष्णयजुर्वेदांत ८६ शाखा व शुक्लयजुर्वेदाच्या १५ शाखा आहेत.

वेद ब्राह्मणांनीं अवश्य अध्ययन केला पाहिजे व अर्थज्ञानपूर्वक त्याचें अनुष्ठानही केलें पाहिजे; ही गोष्ट शतपथ[1]-ब्राह्मणांत व पातंजल[2]-महाभाष्यांत सांगितली आहे. तसेंच मनुस्मृतींत[3] वेदाध्ययनाच्या अभावीं पातित्य सांगितलें आहे. याज्ञवल्क्यस्मृतींत[4] ब्रह्मयज्ञसमयीं सर्व वेदांचें व ब्राह्मणांचें अध्ययन करण्याचें माहात्म्य वर्णिलें आहे. तसेंच त्याच स्मृतींत वेद हे ज्ञानाला व धर्माला हेतुभूत आहेत असें

---

१. स्वाध्यायोऽध्येतव्यः । शतपथब्राह्मणे.

२. ब्राह्मणेन निष्कारणं षडङ्गो वेदोऽध्येयो ज्ञेयश्च । पातञ्जलमहाभाष्ये १।१।१.

३. योऽनधीत्य द्विजो वेदमन्यत्र कुरुते श्रमम् ।
स जीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वयः ॥ म. स्मृ. अ. २–१६८

४. याज्ञवल्क्यस्मृतौ–अ० १– प्र०–२–४१ ते ४६.

मधुना पयसा चैव स देवांस्तर्पयेद्द्विजः ।
पितॄन्मधुघृताभ्यां च ऋचोऽधीते च योऽन्वहम् ॥ ४१ ॥

यजूंषि शक्तितोऽधीते योऽन्वहं स घृतामृतैः ।
प्रीणाति देवानाज्येन मधुना च पितॄंस्तथा ॥ ४२ ॥

स तु सोमघृतैर्देवांस्तर्पयेद्योऽन्वहं पठेत् ।
सामानि तृप्तिं कुर्याच्च पितॄणां मधुसर्पिषा ॥ ४३ ॥

मेदसा तर्पयेद्देवानथर्वाङ्गिरस पठन् ।
पितॄंश्च मधुसर्पिर्भ्यामन्वहं शक्तितो द्विजः ॥ ४४ ॥

वाकोवाक्यं पुराणं च नाराशंसीश्च गाथिकाः ।
इतिहासांस्तथा विद्याः शक्त्याधीते हि योऽन्वहम् ॥ ४५ ॥

मांसक्षीरौदनमधुतर्पणं स दिवौकसाम् ।
करोति तृप्तिं कुर्याच्च पितॄणां मधुसर्पिषा ॥ ४६ ॥

५. पुराणन्यायमीमांसाधर्मशास्त्राङ्गमिश्रिताः ।
वेदाः स्थानानि विद्यानां धर्मस्य च चतुर्दश ॥ याज्ञवल्क्यस्मृतौ–अ. १।३.

सांगितलें आहे. वेदांतील प्रत्येक मंत्राच्या देवता, छन्द व ऋषि यांच्या ज्ञानाची आवश्यकता आहे. एतज्ज्ञानरहित मंत्र म्हणणाऱ्याला दोष सांगितला आहे.

शुक्लयजुर्वेद–माध्यन्दिन संहिता

पूर्वी आम्ही बादरायण व्यासांनीं चार शिष्यांना चार वेद शिकविले, असे सांगितलें. त्यांत वैशंपायनाला यजुर्वेद शिकविला असल्याचा उल्लेख केला. ही व्यासापर्यंतची परंपरा ' ब्रह्मपरंपरा ' आहे. कारण ब्रह्मदेवापासून प्रथम वशिष्ठ, पुढें शक्ति, नंतर पराशर व त्यानंतर व्यास अशी असल्यामुळें हिला ब्रह्मपरंपरा म्हणतात. श्रीमद्याज्ञवल्क्य वैशंपायनाजवळ अध्ययन करीत होते. पुढें त्यांचा गुरूशीं विवाद झाला व आदित्यापासून त्यांनीं वेदग्रहण केलें; इत्यादि गोष्टी श्रीमद्याज्ञवल्क्य-चरितावरून वाचकांस कळून येतील. आतां आदित्याकडून श्रीमद्याज्ञवल्क्यांना मिळालेले चारी वेद व त्यांच्या शाखा ह्या सर्वांना ' आदित्यपरंपरा ' म्हणणें क्रम-प्राप्तच आहे. ह्या आदित्यपरंपरेतील शुक्लयजुर्वेदाच्या पंधरा शाखा खालीं लिहिल्या-प्रमाणें आहेतः—

---

१. एतान्यविदित्वा योऽधीतेऽनुब्रूते जपति जुहोति यजते याजयते तस्य ब्रह्म निर्वीर्यं यातयामं भवत्यथान्तराश्वगर्तं वापद्यते स्थाणुं वर्च्छति प्रवामीयते पापीयान्भवति । कात्यायनसूत्रे–अनुक्रम–१।१.

अर्थ—देवता, छंद व ऋषि यांना न जाणतांना जो अध्ययन करितो, अध्यापन करितो, जप करितो, होम करितो, यज्ञ करितो, यज्ञ करवितो, त्याचा वेद वीर्यरहित व शिळा होतो. नंतर घोड्याच्या खड्ड्यांत पडतो, स्थावर जन्माला जातो, किंवा मरतो आणि अधिक पापी होतो.

विज्ञायैतानि योऽधीते तस्य वीर्यवदथ योऽर्थवित्तस्य वीर्यवत्तरं भवति जपित्वा हुत्वेष्ट्वा तत्फलेन युज्यते । कात्या. सूत्रे १।१.

अर्थ—उलट ह्या छंदरूपी देवतांचें ज्ञान करून जो अध्ययन करितो, त्याचें ते अध्ययन सवीर्य होतें. जो अर्थज्ञानपूर्वक म्हणतो त्याचें अध्ययन अधिक सवीर्य होतें; अशा तऱ्हेनें जप, याग व होम केला असतां त्याचें फळ प्राप्त होतें.

२. तत्त्वनिरूपणे–यजुर्वेदमहाकल्पतरोरेकोत्तरं शतम् ।

शाखास्तत्र शिखाकारा दश पञ्चाथ शुक्लगाः ।
तत्रापि मुख्या विज्ञेया शाखा माध्यन्दिनी यजुरिति ॥
पूर्वोत्तराङ्गसहित ब्राह्मविद्यासुबोधकम् ।
बुद्धिनैर्मल्यहेतुर्यत्तद्यजुः शुक्लमीर्यते ॥

(१) जाबाल. (२) बौधेय. (३) काण्व. (४) माध्यन्दिन. (५) शापेय. (६) स्थापायनीय. (७) कपोल. (८) पांडरवत्स. (९) आवटिक. (१०) परमावटिक. (११) पाराशर. (१२) वैणेय. (१३) वैधेय. (१४) वैनतेय. (१५) वैजव.

ह्यांपैकीं माध्यन्दिन शाखेचा अनुवाद प्रस्तुत पुस्तकांत असल्यासुळें त्या शाखेच्या संहितेचा परिचय आतां देतों. देवीभागवतांत सूर्यापासून श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं प्राप्त यजुर्वेदांना "अयातयाम" असें म्हटलें आहे. माध्यन्दिन संहितेंत ४० अध्याय आहेत. त्यांत कांहीं 'प्रकृतियाग' व कांहीं 'विकृतियाग' आहेत. ज्यांत प्रधानविधि, इतिकर्तव्यता व अंगसमुदाय यांचें वर्णन असतें; त्यास 'प्रकृतियाग'[२] म्हणतात; आणि ज्यांत केवळ अंगांचेंच विधान असतें; त्यास 'विकृतियाग'[३] म्हणतात. उदाहरणार्थ–'दर्शपौर्णमास' हा प्रकृतियाग आहे व 'पावमानेष्टि' हा विकृतियाग आहे.

ह्यांची संक्षिप्त अनुक्रमणिका अध्यायवार आम्हीं दिलेली आहे. परंतु अगदीं प्रत्येक मंत्रवार संहितेची माहिती करून घेणाऱ्या वाचकांस आम्ही असें सुचवितों कीं, ह्या पुस्तकाच्या मराठी अनुवादांत प्रत्येक मंत्राच्या वर 'विनियोग' म्हणून लिहिला आहे. तो कात्यायनसूत्राच्या धोरणानें लिहिला आहे. त्या सर्व विनियोग भागांची आवृत्ति केली असतां संहितेंतील साद्यंत विषय सविस्तर वाचकाचे ध्यानांत येईल. आतां आम्ही माध्यन्दिन संहितेचे अध्यायवारी मंत्र देतों. त्यापूर्वी एक अभियुक्तोक्ति[४] अशा अर्थाची आहे कीं, १०० कमी २००० मंत्र वाजसनेयिमाध्यन्दिन संहितेंत आहेत. ही अभियुक्तोक्ति ठोकळमानानें आहे. अध्यायांचा व मंत्रांचा क्रम पाहिला असतां एकूण १९७५ मंत्र आहेत; हें खालील तक्त्यावरून निदर्शनास येईल व शतोक्त मंत्र या नांवानें १९ प्रत्येक शतकाच्या आरंभीचे मंत्र आहेत, तें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल.

---

१. अयातयामानि तु भानुगुप्तान्यन्यानि जातान्यतिनीरसानि ।
यजूंषि तेषामथ याज्ञवल्क्यो ह्ययातयामानि रवेरवाप ॥ देवीभागवते–

२. प्रकृतियाग.—प्रधानदेवताया इतिकर्तव्यताया अङ्गानां च यत्र साकल्येन विधानं सा प्रकृति ।

३. विकृतियाग.—यत्र केवलाङ्गानामुपदेशः सा विकृतिः । विकृतावन्यत्सर्वं प्रकृतेर्ग्राह्यम् । प्रकृतिवद्विकृतिः कर्तव्येति मीमांसासिद्धान्त. ।

४. द्वे सहस्रे शतन्यूने मन्त्रा वाजसनेयके ॥

वाजसनेयि–माध्यन्दिन–संहितेंतील अध्याय व प्रत्येक अध्यायांतील मंत्र याचा सूचक तक्ता

अध्याय	मंत्र संख्या	अध्याय	मंत्र संख्या	अध्याय	मंत्र संख्या	अध्याय	मंत्र संख्या
१	३१		५१३		१२७२		१६७९
२	३४	१२	११७	२२	३४	३२	१६
३	६३	१३	५८	२३	६५	३३	९७
४	३७	१४	३१	२४	४०	३४	५८
५	४३	१५	६५	२५	४७	३५	२२
६	३७	१६	६६	२६	२६	३६	२४
७	४८	१७	९९	२७	४५	३७	२१
८	६३	१८	७७	२८	४६	३८	२८
९	४०	१९	९५	२९	६०	३९	१३
१०	३४	२०	९०	३०	२२	४०	१७
११	८३	२१	६१	३१	२२	...	...
	५१३		१२७२		१६७९		१९७५

हल्लीं माध्यन्दिनीय ब्राह्मणांत घनपाठी व ब्राह्मणपाठी असे अध्ययन करणारांचे वर्ग निरनिराळ्या क्षेत्रांत आढळून येतात. त्यासंबंधीं थोडा विचार करूं. संहिता ही प्रकृति व तिच्या आठ विकृति आहेत. त्यांचा हेतु एकच पद पुनः पुनः म्हणण्यांत आणून पाठभेद होऊं नये; अशा सद्धेतूनें ही रचना झाली आहे. म्हणून भाग्याची गोष्ट कीं, भारत, रामायण, भागवत वगैरे ग्रंथांत जसे पाठभेद निरनिराळ्या देशांत आढळून येतात; तसे काशी–रामेश्वरापर्यंतच्या कोणत्याही देशांतील ब्राह्मणांनीं म्हटलेल्या वेदांत पाठभेद आढळून येत नाहीं. त्यामुळें हा वेदवृक्ष मूळ स्थितीत अबाधित असा आजही आढळूत येत आहे. हा ह्या विकृतीकारांचा जगावर मोठा उपकार आहे. ह्या सर्व विकृति व्याडी पंडितानें 'जटापटल' नामक ग्रंथांत सलक्षण व सोदाहरण दाखविल्या आहेत. त्यांचीं नांवें:—

" जटा माला शिखा रेखा ध्वजो दण्डो रथो घनः ।
अष्टौ विकृतयः प्रोक्ताः क्रमपूर्वा महर्षिभिः ॥ "

यांचें विशेष विवरण जटापटलांतून वाचकांनीं पहावें. घनविकृतींचें अध्ययन होईपर्यंत बुद्धीच्या धोरणानें दहा बारा वर्षे सहज लागतात. तेव्हां घनपाठी लोकांना ब्राह्मण अनभ्यस्त असतो. त्यावेळीं विचारी लोकांनीं ब्राह्मण–ग्रंथाच्या अध्ययनाचा लोप होऊं नये म्हणून केवळ विकृति न म्हणतां केवळ संहिता व ब्राह्मण यांचेंच अध्ययन सुरू ठेविलें. त्यांना ' ब्राह्मणपाठी ' म्हणतात. अशातऱ्हेनें संहिता पाठभेद-रहित व ब्राह्मणांचें संपूर्ण अध्ययन चालू राहिलें. अशी योजना स्वीकारल्याबद्दल आपण या विचारी लोकांचे ऋणी आहोंत. ह्या अष्टविकृतींच्या पूर्वी पदें व क्रम, सर्व-शाखीय ब्राह्मणांप्रमाणें ह्याही शाखेचे लोक अध्ययन करितात. घनाची चाल शुक्ल-यजुर्वेदीयांतच आहे. परंतु कांहीं बुद्धिमान् ऋग्वेदीयांनींही ह्या चालीचा अवलंब केला आहे व असे घनपाठी विरळ दृष्टीस पडूं लागले आहेत. वेदाध्ययन पूर्ण होण्यास शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छन्द व ज्योतिष ह्या सहा अंगांचीही अर्थज्ञानदृष्ट्या आवश्यकता आहे. कित्येक वेदपाठी अंगांकडे दुर्लक्ष करितात. त्यांनीं तसें करूं नये अशी प्रार्थना करणें क्रमप्राप्त आहे.

ईशावास्योपनिषद्

या संहितेचा ४० वा अध्याय ' ईशावास्यमिदꣳ सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत् ' ह्या मंत्रानें आरंभ होत आहे. कर्म व उपासना यांचें प्रतिपादन झाल्यावर सर्वव्यापी जे ब्रह्म त्याचें विवरण क्रमप्राप्तच आलें. म्हणून संहितेंतच ह्या उपनिषदास आरंभ झाला. ब्रह्मज्ञान–प्रतिपादक जीं मुख्य १० उपनिषदें; त्यांचा प्रतिपादक श्लोक मुक्तिकोपनिषदांत असा आहेः—

" ईशकेनकठप्रश्नमुण्डमाण्डूक्यतित्तिरिः ।
ऐतरेयं च छान्दोग्यं बृहदारण्यकं तथा ॥ "

ह्या श्लोकांत आरंभीं ईशावास्योपनिषदाचाच उल्लेख आहे व तो सयुक्तिक आहे; कारण एवढेंच संहितोक्त उपनिषद् आहे. बाकीचीं सर्व उपनिषदें त्या त्या वेदांतील ब्राह्मणांच्या आरण्यक भागांत आहेत. या ईशावास्योपनिषदांत परमात्मा सर्वव्यापी व तद्रूपी सर्व हें ज्ञान, सर्व मुमुक्षूंचें ध्येय म्हणून प्रतिपादिलें आहे व तें प्राप्त झाल्यावर कोणताही शोक व मोह राहात नाहीं असें प्रतिपादन केलें. तें प्राप्त न झाल्यास कर्मे यावज्जीव करावींत. तत्पूर्वी चित्तशुद्धि झाल्यास आदित्यादि उपासना करावी; असें सर्व उपनिषदांचें तात्पर्य आहे.

" शतपथ ब्राह्मण "

श्रीमद्याज्ञवल्क्यांच्या १५ शिष्यांनीं प्रवृत्त केलेल्या १५ संहितांचा टीकात्मक ग्रंथ म्हणजे ब्राह्मण. ह्या सर्व ब्राह्मणग्रंथांस 'शतपथ ब्राह्मण' असें म्हणतात. शतपथ म्हणण्यावें कारण त्यांत १०० अध्याय अगर प्रपाठक आहेत. ब्राह्मण हा व्याख्यानग्रंथ आहे; असें तैत्तिरीयसंहिताभाष्यांत भट्टभास्करानें व कण्वसंहिताभाष्यांत सायणाचार्यानें लिहिलें आहे. माध्यन्दिन शाखेच्या शतपथ ब्राह्मणांत सूर्योपस्थान-प्रकरणांत गायत्री शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणें केला आहे; त्यावरून वरील गोष्ट सिद्ध होते.

" प्राणा वै गयास्तत्प्राणांस्तत्रे तद्गयांस्तत्रे तस्माद्गायत्री नाम। "

श. ब्रा. १।८।१५।७.

(गय हा शब्द प्राणवाचक आहे. प्राणांचें रक्षण करिती झाली; म्हणून तिचें नांव गायत्री असें आहे.) ही टीका मूळाच्या योग्यतेची आहे. म्हणून निरनिराळ्या कात्यायन, आपस्तंब वगैरे सूत्रांत ब्राह्मणांला वेदत्वाचा अतिदेश केला आहे. ' संहिताब्राह्मणयोर्वेदनामधेयम् " इति. दशग्रंथांच्या यादींत " संहिता प्रथमो ग्रंथो ब्राह्मणं च द्वितीयकम् " असें आहे. म्हणून संहितेच्या बरोबरीचा मान ब्राह्मणाला दिला आहे. ह्या टीकेंत कोणताही विषय सोदाहरण समजावून सांगून व वाचकांच्या मनावर बिंबवून सांगण्याची हातोटी अलौकिक आहे.

" चक्षुर्वै सत्यं चक्षुर्हि वै सत्यं तस्मायदिदानीं द्वौ विवदमानावेयाताहमद्राक्षमहमश्रौषमिति यऽएवं ब्रूयादहमद्राक्षमिति तस्माऽएव श्रद्दध्याम। " श. ब्रा. १।८।१५।५.

सत्य म्हणजे चक्षु, कारण सत्याचें ज्ञान होण्यास नेत्रच कारण आहे; कसें म्हणाल तर, जर आतां दोघे एका वस्तूच्या स्वरूपाविषयीं वाद घेऊन आपले समीप आले; त्यापैकीं एक म्हणेल मी ती वस्तु अशा गुणांनीं युक्त असलेली डोळ्यानें पाहिली म्हणून माझें खरें; दुसरा म्हणेल कीं, ती वस्तु ह्या गुणांनीं विशिष्ट आहे, असें मीं ऐकलें म्हणून माझें खरें; तर आमच्यापैकीं कोणीही डोळ्यानें पाहिली म्हणणारावरच श्रद्धा ठेवील व त्याचें वाक्य खरें मानील.

---

१. ब्राह्मणं नाम कर्मणस्तन्मंत्राणां च व्याख्यानग्रन्थः। तै. सं. १।५।१

२. तत्र शतपथब्राह्मणस्य मंत्रव्याख्यानरूपत्वाद् व्याख्येयमंत्रप्रतिपादकः संहिताग्रन्थः पूर्वभावित्वात्प्रथमो भवति। कण्वसंहितायाम्

आतां विवरण सिद्ध करण्याकरितां कोठें कोठें ब्राह्मणांतच आख्यायिकाही दिल्या आहेत. तशीच आख्यायिका सूर्योपस्थान ब्राह्मणांतून आम्ही उदाहरणादाखल देतों.

" जनको वैदेहो बुडिलमाश्वतराश्विमुवाच-यन्नु होतद्गायत्रीविद्-ब्रूथाऽअथ कथꣳ हस्तीभूतो वहसीति, मुखꣳह्यस्याः सम्राण्ण विदांचकरेति होवाच ॥ " श. ब्रा. १।८।१५।११.

" तस्याऽअग्निरेव मुखम् । " श. ब्रा. १।८।१५।१२.

विदेह देशाचा राजा जनक अश्वतराश्वाचा मुलगा जो बुडिल ऋषि, त्याला म्हणाला कीं, (बुडिल हा ऋषी गायत्रीवेत्ता असून जनकाच्या हत्तीशाळेंत हत्ती बनला होता. त्याचा व जनकाचा हा संवाद आहे.) " तूं आपणास गायत्रीचा उपासक म्हणवून घेत होतास; आतां तर हत्ती होऊन भारवहन कसा करतोस ? " त्यावर ऋषीनें उत्तर दिलें कीं, " हे राजा, गायत्रीचें मुख मला माहिती नव्हतें. " त्यावर राजा म्हणाला, " हे ऋषे, अग्नि हेंच गायत्रीचें मुख आहे. "

ग्रंथवाचक ब्राह्मण शब्द नपुंसकलिंगी आहे. जातिवाचक ब्राह्मणशब्द पुल्लिंगी आहे हें निरनिराळ्या प्रयोगांवरून वाचकांचे ध्यानांत येईल. लिङ्लोट्तव्य इत्यादि प्रत्ययांनीं " विनियोजकवाक्यं ब्राह्मणम् " म्हणजे विनियोग दाखविणारें म्हणजेच विधायक असें जें वाक्य; त्यास ब्राह्मण म्हणतात. उदाहरणार्थः—' अहरहः संध्यामुपासीत '; ' स्वाध्यायोऽध्येतव्यः '; ' सुरा न पेया '; ' ब्राह्मणो न हन्तव्यः '; इत्यादि. जैमिनीनें ब्राह्मणग्रंथाचें लक्षणद्योतक जें सूत्र केलें, तें " शेषे ब्राह्मणशब्दः " २।१।३३ हें होय. मंत्रलक्षणानंतर अवशिष्ट जें वाक्य त्यास ब्राह्मण असें म्हणतात. त्याचें सविस्तर विवरण टीपेंत पहावें.

---

१. शेषे ब्राह्मणशब्द. । २।१।३३

अथ किंलक्षणं ब्राह्मणं, मन्त्राश्च ब्राह्मणं च वेद । तत्र मन्त्रलक्षणमुक्तं परिशेषसिद्धत्वाद् ब्राह्मणलक्षणमवचनीयम् ।

वृत्तिकारस्तु शिष्यहितार्थं प्रपञ्चितवान् । इतिकरणबहुलम् । इत्याहोपनिबद्धमाख्यायिकास्वरूपम् । हेतु-भूर्पण जुहोति तेन ह्यन्नं क्रियते । निर्वचनं-तद्ध्नो दाधित्वम् । नीता उपवीता वा अस्याग्नयः । प्रशंसा-वायुर्वैक्षेपिष्ठा देवता । संशयः-होतव्यं गार्हपत्ये न होतव्यम् । विधिः-यजमानसमितौदुम्बरी भवति । परकृतिः- माषान्मे पचत इति । पुराकल्पः-उत्सुकैर्ह स्म पूर्वे समाजग्मुरिति । व्यवधारणकल्पना-यावतोऽश्वान् प्रतिगृह्णीयात् । एकपुरुषकर्तृकमुपाख्यानं परकृति । बहुकर्तृकं पुरेष्टयः ।

(पुढील पानावर चालू)

शतपथ-ब्राह्मणाचीं चौदा कांडें आहेत. ब्राह्मण संहिताक्रमानें व्याख्यान करणारा ग्रंथ असतो. तसाच हाही आहे. परंतु 'इषे त्वा' हा पहिला मंत्र १।६।४ या ठिकाणीं व्याख्यान केला गेला आहे. त्यापूर्वी व्रतग्रहणाचा म्हणून 'व्रतमुपैष्यन्' यानें आरंभ करून 'अग्ने व्रतपते' या मंत्राचें व्याख्यान आलें आहे. पुढें मात्र बहुतेक क्रमशः वर्णन झालेलें आहे. आतां १४ कांडांचीं नांवें व त्यांतील विषय खालीं दिलेले आहेत:--

कांडांचीं नांवें	विषय
१ हविर्यज्ञ.	दर्शपूर्णमासेष्टि.
२ एकपादिका.	आधान, पुनराधान, अग्निहोत्र, उपस्थान, प्रवत्स्यदुपस्थान, आगतोपस्थानादि, पिंडपितृयज्ञ, आग्रयण, दाक्षायणयज्ञ, चातुर्मास्ययाग.
३ अध्वर.	सोमयाग, दीक्षाभिषवपर्यंत.
४ ग्रह.	सोमयाग, सवनत्रयगतकर्म, षोडशीप्रभृति सोमसंस्था, द्वादशाहयण, त्रिरात्राहिनदक्षणा, सत्रधर्म.
५ सव.	वाजपेय, राजसूय.

(टीप मागील पानावरून चालू)

यत्रान्यथार्थ· प्रतिभातः पौर्वापर्यालोचनेन व्यवधार्यान्यथा कल्प्यते। सा व्यवधारण-कल्पना तद्यथा प्रतिगृह्णीयादिति श्रुतं प्रतिग्राहयेदिति कल्पयिष्यते। (विधिलक्षणं-ब्राह्मणलक्षणम्)

हेतुर्निर्वचनं निन्दा प्रशंसा संशयो विधि·।
परक्रिया पुराकल्पो व्यवधारणकल्पना।
उपमानं दशैते तु विधयो ब्राह्मणस्य तु॥

एतत्स्यात्सर्ववेदेषु नियतं विधिलक्षणम्। (विधिः-ब्राह्मणग्रन्थः।) एतदपि प्रायिकम्। इतिकरण-बहुलो मंत्रोऽपि कश्चित्। इति वा इति मे मन इति। इत्याहोपनिबद्धश्च भंगभक्षीत्याह। आख्यायिका स्वरूपं च। उग्रो ह भुज्युमिति। हेतुः-इन्द्रवो वामुशन्ति हि। निर्वचनं तस्मादापो नु स्थ न इति। निन्दा मोघमन्नं विन्दते अप्रचेता इति। प्रशंसा-अग्निर्मूर्धा। संशयः-अधः स्विदासीदुपरि स्विदासीत्। विधिः-गृणीयाज्ञाधमानात्। परक्रातिः-सहस्रमयुता ददत्। पुराकल्पः-यज्ञेन यज्ञमयजन्त देवा इति।

कांडांचीं नांवें	विषय
६ उखासंभरण.	उखासंभरण, विष्णुक्रम, वात्सप्रोपस्थान, वनीवाहन, (प्रवास)
७ हस्तिघट.	चयन, गार्हपत्यचयन, निर्ऋतिचयन, अग्निक्षेत्रसंस्कार, दर्भस्तंबादि, अपस्यासादनपर्यंत.
८ चिति.	प्रानभृदादि चयनसमाप्ति.
९ संचिति.	शतरुद्रीय होमादि, धिष्ण्यचयन, पुनश्चिति, चित्युपस्थान.
१० अग्निरहस्य.	चितिसंपत्ति, चयनयागस्तुति, चित्यपक्ष पुच्छविचार, सप्तविध प्रभृति एकशतविधपर्यंत चित्याग्नि वेदिमान, सप्तविधादि एकशतविधसंपत्ति, चयनकालादि विचार, चित्याग्नीची छंदांनीं अवयवसंपत्ति, संवत्सरादि मुहूर्तपर्यंत चयनसंपत्ति, यजुष्मती लोकपृणा इत्यादिकांची संख्या, उपनिषद्रूपानें अग्नीची उपासना, मनःसृष्टि, लोकादिरूपानें अग्नीची उपासना, अग्नीचें सर्वतोमुखत्व, संप्रदायप्रवर्तक ऋषिवंशकथन, अग्निरहस्य.
११ अष्टाध्यायी.	आधानकाल, दर्शपूर्णमास व दाक्षायण यज्ञ यांच्या अनुष्ठानाचा अवधिकाल, दाक्षायणयज्ञ, पथिकृदिष्टि, अभ्युदितेष्टि, दर्शपूर्णमाससंबंधीं अर्थवाद, प्रयाजानुयाजानुमंत्रण, इडा-स्विष्टकृत्-सूक्तवाक्-शंयुवाक-पत्नी-संयाज-वेदालंभ-समिष्टयजु-प्रधानयाग, यांचेसंबंधीं अर्थवाद, अग्निहोत्रविषयक अर्थवाद, ब्रह्मचारिकर्तव्य, मित्रविंदेष्टि, हविःसमृद्धि, चातुर्मास्यविषयक अर्थवाद, पंचमहायज्ञ, स्वाध्यायप्रशंसा, प्रायश्चित्त, अंशु व अदाभ्य ग्रह, अध्यात्मविद्या, पशुबंधप्रशंसा, हवियज्ञविध व सवविध यांचें लक्षण, षड्होतार होम.
१२ मध्यम.	दीक्षाक्रम, सत्र, पृष्ठ्याभिप्लव, स्वरसाम, विषुवन्महाव्रतप्रभृतीचें निरूपण, गवामयन, अग्निहोत्रप्रायश्चित्त, मृत्तिकाग्निहोत्र, मृतकदाह.
१३ अश्वमेध.	अश्वमेध, तद्व्रतप्रायश्चित्त, पुरुषमेध, सर्वमेध, दशरात्र, पितृमेध.
१४ बृहदारण्यक.	प्रवर्ग्य महावीर, प्रवर्ग्योत्सादन, प्रवर्ग्यकर्तृक नियम, बृहदारण्यक, (ब्रह्मविद्या) काण्यश्रीमंथ, पुत्रमंथ, वंशब्राह्मण.

ब्राह्मणांमध्यें निरनिराळ्या शब्दांच्या लौकिक पद्धतीनें व्युत्पत्त्या दिलेल्या असतात; व अर्थ प्रतिपादन केला जातो. सर्व ब्राह्मणांप्रमाणें ह्याही ब्राह्मणांत प्रथम विनियोजक असें विधिवाक्य, तदनंतर इतिकर्तव्यता म्हणजे विधि पार पाडण्याची रीत आणि त्यासंबंधीं स्तुतिनिन्दात्मक अर्थवादवाक्य.

" नाहि स्तुतिः स्तुत्यं स्तोतुं प्रवर्तते किन्तु तदितरं निन्दितुम् ।
नाहि निन्दा निन्द्यं निन्दितुं प्रवर्तते किन्तु तदितरं स्तोतुम् । "

(स्तुति स्तुत्य पदार्थाच्या स्तुतीला प्रवृत्त होत नाहीं तर त्याहून वेगळ्याची निंदा करण्यास प्रवृत्त होते. तसेंच निंदा निंद्य पदार्थाची निंदा करण्यास प्रवृत्त होत नाहीं तर त्याहून वेगळ्याची स्तुति करण्यास प्रवृत्त होते.) ह्या मीमांसा-सिद्धान्ताप्रमाणें पुष्कळ ठिकाणीं आख्यायिका (स्तुतिनिंदात्मक गोष्टी) आलेल्या आहेत.

ऐतरेय ब्राह्मणांत पुष्कळ ठिकाणीं ' तत्तन्नाद्रियम् ' (इतर शाखीय ब्राह्मणाचें म्हणणें ऐकूं नये) असे जसें; त्याप्रमाणें इतर शाखामतखंडन शतपथ ब्राह्मणांतही आहे. उदाहरणार्थ-संहिता अ. १।१. " इषे त्वोर्जे त्वा वायवस्थ देवो वः " ह्याप्रमाणें तैत्तिरीयसंहितेचा पहिला मंत्र "इषे त्वोर्जे त्वा वायवस्थोपायवस्थ" असा पाठभेदानें आहे. त्याचें खंडन शतपथ ब्राह्मणांत १।७।१।१ ह्या ठिकाणीं पुढीलप्रमाणे आहेः—

" तस्मादाह वायवस्थेत्युपायवस्थेत्युहैक आहुरुपहि द्वितीयोऽयतीति तदुत्तथा न ब्रूयात् इति " अर्थ—कांहींच्या शाखेंत ' वायवस्थोपायवस्थ ' असें आहे, तसें म्हणूं नये; असें ह्या वाक्यांत सकारण प्रतिपादन केलें आहे. एवंच एका ब्राह्मणग्रंथांत अन्य ब्राह्मणग्रंथांचें खंडन असतें.

बृहदारण्यकोपनिषद्

संहितेंत ४० वा अध्याय ' ईशावास्योपनिषद् ' हा आहे; असें वर वर्णन गेलें आहे. ब्राह्मणभागांत ह्या अध्यायाची टीका म्हणून ' बृहदारण्यक ' हें मोठें उपनिषद् आलेलें आहे तें ब्राह्मणाच्या १४ व्या कांडांत आहे. ह्या उपनिषदाचे काण्वपाठ व माध्यंदिन पाठ आहेत; ही गोष्ट गृहीत धरून बादरायण ब्रह्मसूत्रकारानें सूत्रप्रणयन केलेलें आहे. त्या उपनिषदाला फार महत्त्व आहे कारण यजुर्वेदाचें महावाक्य[१] जें

१. चार वेदांचीं चार महावाक्यें आहेतः-(१) ऋग्वेदाचें ' प्रज्ञानं ब्रह्म '; (२) यजुर्वेदाचें 'अहं ब्रह्मास्मि'; (३) सामवेदाचें 'तत्त्वमसि' व (४) अथर्ववेदाचें 'अयमात्मा ब्रह्म'. ह्या महावाक्यचतुष्टयांचा संन्यासाश्रमांत उपदेश केला जातो.

'अहं ब्रह्मास्मि'; तें ह्या उपनिषदांतच आहे. बृहदारण्यकाचे सहा अध्याय आहेत. अर्थतः व ग्रंथानें मोठें, ब्रह्मविद्येचें विस्तारपूर्वक वर्णन करणारें व अरण्यांत पठन करण्यास योग्य म्हणून ह्याला 'बृहदारण्यक' असें म्हणतात.

कात्यायन–श्रौतसूत्र

सूत्रांचे प्रकार तीन– (१) श्रौतसूत्र (२) गृह्यसूत्र व (३) धर्मसूत्र. वेदाचा जो विधिरूपी भाग आहे; त्याचे चार अवयव आहेत– (१) उत्पत्तिविधि (२) विनियोगविधि (३) अधिकारविधि आणि (४) प्रयोगविधि. यांतील प्रयोगविधीचा जो विस्तार तींच हीं सूत्रें होत. विधीयत इति विधिः, प्रयोगाणां विधिः प्रयोगविधिः। प्रकृष्टा युक्तिः योजनं, योगः प्रयोगः या विग्रहावरून कोणत्याही प्रकारच्या चांगल्या योजनेला प्रयोग, प्रयुक्ति, प्रयोजन हे शब्द लावतात; त्याप्रमाणें याही सूत्रांना प्रयोगशास्त्र म्हणजे चांगल्या योजनेचें शास्त्र म्हणतात. ह्या प्रयोगविधीला किंचित् भेदानें 'कल्प' आणि 'सूत्र' ह्या दोन्ही संज्ञा आहेत. हीं कल्प अगर सूत्रें वेदाचे अवयव आहेत; हें पाणिनीय[1]–शिक्षेवरून ज्ञात होईल. कल्प व सूत्रें यांतील भेद कुमारिलभट्टानें तंत्रवार्तिक २।३।६ मध्यें पुढीलप्रमाणे दाखविला आहे.

कल्पसूत्राधिकरणे

आह। के पुनःकल्पाः कानि सूत्राणीति। उच्यते।
सिद्धरूपः प्रयोगो यैः कर्मणामनुगम्यते।
ते कल्पा लक्षणार्थानि सूत्राणीति प्रचक्षते॥
कल्पनाद्धि प्रयोगाणां कल्पोऽनुष्ठानसाधनम्।
सूत्रं तु सूचनात्तेषां स्वयं कल्प्यप्रयोगकम्॥
कल्पाः पठितसिद्धा हि प्रयोगानां प्रतिक्रतु।
बौधायनीयवाराहमाशकादि प्रबन्धवत्॥
स्वसंज्ञापरिभाषाभिर्यवुत्सर्गापवादनम्।
हेतुदृष्टान्तवत्सूत्रं तल्लक्ष्यव्यापि लक्षणम्॥
आश्वलायनकं सत्रं बैजावापिकृतं तथा।
ब्राह्यायणीयलाटीयकात्यायनकृतानि च॥

---

१. शिक्षा घ्राणं तु वेदस्य मुखं व्याकरणं स्मृतम्।
छन्दः पादौ तु वेदस्य हस्तौ कल्पोऽथ पठ्यते॥ पाणिनीयशिक्षायाम्॥

अर्थ—कुमारिल भट्ट म्हणतात, "कल्प कोणतें व सूत्रें कोणतीं? ह्या प्रश्नास उत्तर–ज्यावरून सिद्धप्रयोगाचें ज्ञान होतें ते कल्प व लक्षणप्रदर्शक जीं तीं सूत्रें. सिद्धप्रयोगबोधक म्हणून कल्प हा अनुष्ठानाचें साधन आहे. सूत्रांत प्रयोगाची सूचना असते व त्यांत प्रयोगाची कल्पना करावी लागते. कल्प हे पठितसिद्ध म्हणजे जसें पठन केलें आहे तसेंच प्रयोगाचें अनुष्ठान प्रत्येक यज्ञांत करावें. उदाहरणार्थः– बौधायनीय, वाराह,, माशक वगैरे सूत्रें. सूत्रांचें सर्व उदाहरणांस लागूं पडणारें लक्षण असें कीं, त्या त्या सूत्रकारांनीं स्वतःच्या संज्ञा परिभाषाद्वारां उत्सर्गापवाद सांगावयाच्या व हेतु आणि दृष्टांतही सांगावयाचे. सूत्रांचीं उदाहरणेंः–(१) आश्वलायनीय. (२) बैजवापीय. (३) द्राह्यायणीय. (४) लाट्यायनीय. (५) कात्यायनीय.

ब्राह्मणग्रंथापेक्षां कल्प व सूत्रें यांचें वैशिष्ट्य 'भवस्वामिभाष्यांत' पुढीलप्रमाणें आहे. भवस्वामिभाष्ये–"ब्राह्मणानां बहुत्वात्, एकैकस्यां शाखायामपरिसमाप्तत्वात्, अर्थस्य च दुर्बोधत्वात्, असर्वजनीनत्वाच्च संहृत्य विवरणार्थं सुखं बुध्द्वा कर्माण्यनुष्ठाय फलानि सर्वे प्राप्नुयुरिति कल्प आरब्ध आचार्येण ॥" ह्याचें तात्पर्य, ब्राह्मणे पुष्कळ असल्यामुळें, एकेका शाखेंत सर्व कर्मांचें वर्णन संपत नाहीं, त्यांचा अर्थ दुर्बोध आहे, आणि सर्व शाखीयांना सर्व कर्मांना तीं उपयोगी नाहींत म्हणून विवरणाकरितां सर्व ब्राह्मणांचें एकीकरण करून कात्यायनादि आचार्यांनीं सूत्रें निर्माण केलीं. त्यायोगें सहजज्ञानपूर्वक सर्व कर्मांचें अनुष्ठान होऊन सगळे फलभागी होतील.

थोडक्यांत असें म्हटलें असतां हरकत नाहीं कीं, अर्थवाद वगैरेनीं सहित तें ब्राह्मण व अर्थवादादिरहित तें सूत्र. उदाहरणार्थः—

"अग्निहोत्रप्रतिपादकं ब्राह्मणम् ॥" शतपथब्राह्मणम् २।२।४।१८

ते हुत्वा देवाः। इमां प्रजातिं प्राजायन्त यैषामियं प्रजातिरिमां विजितिं व्यजयन्त येयमेषां विजितिरिममेव लोकमग्निरजयदन्तरिक्षं वायुर्दिवमेव सूर्यः स यो हैवं विद्वानग्निहोत्रं जुहोत्येतां॒ हैव प्रजातिं प्रजायते यामेतऽएतत्प्राजायन्तैतां विजितिं विजयते यामेतऽएतद्व्यजयन्तैतेरु हैव स लोको भवति य एवं विद्वानग्निहोत्रं जुहोति तस्माद्वाऽअग्निहोत्रꣳ॒ होतव्यम् ॥ १८ ॥

"अग्निहोत्रप्रतिपादकं कात्यायनश्रौत्रसूत्रम्।"

उद्धरेति यजमानो ब्रूयात्सायं प्रातरग्निहोत्रे २९७ प्रत्यङ्मुखो वा सायं निदध्यात् तस्मित्सायं प्रातर्होममेके २९८ नित्यो दक्षिणाग्निः २९९ सर्वे गतश्रियः ३००

सदा वा हरणम् ३०१ एकेषामुपवसथे ३०२ न वावसिते वा ३०३ तस्मिन्पचेयुरमाꣳ सम् ३०४.

या उदाहरणांवरून ब्राह्मणांत अर्थवाद आख्यायिका असतात व सूत्रांत त्या नसतात हें ठरलें. कांहीं अपवादात्मक सूत्रांतील उतारे असेही सांपडतील कीं, त्यांवरून सूत्रग्रंथांतही अर्थवाद आहेत तथापि ब्राह्मणग्रंथांत अर्थवादादि भाग निश्चयेंकरून सर्व ठिकाणीं असतातच व सूत्रांत क्वचित् ठिकाणीं असतात एवढाच अर्थ समजावयाचा.

एवंच ब्राह्मणोक्त संहितामंत्रघटित व गार्हपत्य, आहवनीय आणि दक्षिणाग्नि ह्यांनीं साध्य जीं कर्मे; त्यांचा अनुष्ठानक्रम दाखविणारे ग्रंथ म्हणजे श्रौतसूत्रें होत. त्या श्रौतसूत्रांत सर्व यज्ञ सांगितले आहेत. श्रीमद्याज्ञवल्क्यांचा पुत्र कात्यायन यानें हें श्रौतसूत्र केलें असल्यामुळें ह्याला 'कात्यायन–श्रौतसूत्र' असें म्हणतात.

ह्या श्रौतसूत्राचे पांच प्रकार आहेत ते असेः—(१) अधिकारसूत्र. (२) परिभाषासूत्र. (३) उत्सर्गसूत्र. (४) अपवादसूत्र व (५) उदाहरणसूत्र. ह्या सूत्रांची रचना विशेषेंकरून सर्वज्ञकल्प पुरुषप्रणीत असल्यामुळें प्रकृतिभूत कर्माची इतिकर्तव्यता प्रयोगाला सुकर अशी क्रमाक्रमानें सांगून नंतर विकृतिभूत कर्माची इतिकर्तव्यता सांगितली आहे; म्हणजे दर्शपूर्णमास, आधान, अग्निहोत्र, प्रायश्चित्त, पशुकल्प आणि सोमयाग असा क्रम सूत्रकारांनीं अंगिकारिला आहे. पूर्वी सांगितल्याप्रमाणें अर्थवादरहित अशीं स्वशाखीय ब्राह्मणांतील कर्मे सांग होण्याला ज्या परशाखीय मंत्रांची अपेक्षा होती; ते मंत्र तेथून संपूर्ण घेऊन स्वशाखीय मंत्रांचीं प्रतीकें मात्र घेऊन कल्पसूत्रांत कर्मांची रचना केली आहे. ज्या शाखेचीं यांत प्रतीकें घेतलीं त्या शाखेचें हें सूत्र आहे, हें कळण्यास यावरून सुलभ जाईल. कात्यायन श्रौतसूत्राचे एकंदर २६ अध्याय आहेत. त्यांचे विषय, कंडिका व सूत्रें या सर्वांचा दर्शक असा तक्ता पुढीलप्रमाणें आहेः—

---

१. ह्या श्रौतयज्ञांमध्यें ज्या १८ व्यक्तींची विशेषेंकरून आवश्यकता आहे त्यांचीं नांवें:—
(१) यजमान, (२) यजमानपत्नी, (३) ब्रह्मा, (४) होता, (५) अध्वर्यु, (६) उद्गाता, (७) प्रतिप्रस्थाता, (८) ब्राह्मणाच्छंसि, (९) मैत्रावरुण, (१०) प्रस्तोता, (११) नेष्टा, (१२) आग्नीध्र, (१३) आच्छावाक, (१४) प्रतिहर्ता, (१५) उन्नेता, (१६) पोता, (१७) ग्रावस्तुत् व (१८) सुब्रह्मण्य. ह्याशिवाय सदस्य, चमसाध्वर्यु वगैरेही ऋत्विज कारणपरत्वें उपयोगी पडतात.

२. कात्यायनसुतं प्राप्य वेदसूत्रस्य कारकम् ॥ स्कंधपुराणे नागरखंडेऽध्यायः १२९–७१.

अध्यायवार विषयानुक्रम, कंडिका व सूत्रें यांचा दर्शक तक्ता

अध्याय	विषय	कंडिका	सूत्रें
१	पुढील सर्व अध्यायांत सांगितलेल्या पदार्थांचा सुलभ रीतीनें बोध होण्याकरितां विविध परिभाषा सांगितल्या आहेत.	१०	२५७
२	दशपूर्णमासयाग सांगोपांग.	८	२३९
३	,,	८	१८४
४	पिंडपितृयज्ञ, दर्शशेष, वत्सापाकरणादि पदार्थ, विकृतींचे ठिकाणीं दर्शपूर्णमास धर्माचे अतिदेश, दाक्षायणयज्ञ, आग्रयणेष्टि, अन्वारंभणीयेष्टि, अग्न्याधान, पुनराधान, अग्निहोत्र.	१५	३९४
५	चातुर्मास्ययाग (पर्वचतुष्टयात्मक), मित्रविंदेष्टि.	१३	३२४
६	प्रतिवार्षिक निरूढ पशुबंधयाग.	१०	२५१
७	सांगोपांग सोमयाग.	९	२५४
८	,,	९	२७६
९	,,	१४	३३४
१०	,,	९	२१८
११	,,	१	२८
१२	द्वादशसुत्यात्मक द्वादशाह नांवाचें सत्र.	६	१५९
१३	गवामयन नांवाचें सत्र.	४	९७
१४	वाजपेययाग.	५	१३६
१५	राजसूययाग.	१०	३०८
१६	महाभिचयनयाग.	८	२५५
१७	,,	१२	२६३
१८	,,	६	१२१
१९	सौत्रामणियाग.	७	१८३
२०	अश्वमेध.	८	२१६
२१	पुरुषमेध, सर्वमेध व पितृमेध.	४	९४४
२२	एकाह नांवाचे याग.	११	३४३
२३	द्विरात्रप्रभृति एकादशरात्रपर्यंत अहीनसंज्ञकयाग.	५	१०८
२४	निरनिराळीं सत्रें.	७	२६७
२५	निरनिराळीं प्रायश्चित्तें, मृताग्निहोत्रादि कर्म.	१४	४१०
२६	प्रवर्ग्य.	७	१९८
२६		२२०	६६६७

श्रौतसूत्रांत कात्यायन महर्षींनीं पंधराही शाखांचा उपयोग केलेला आहे. म्हणून हें सूत्र पंधराही शाखांना उपयोगी पडतें. त्यांतल्या त्यांत कण्व माध्यन्दिन ह्या दोन शाखांना ह्या सूत्रकारानें प्राधान्य दिलें आहे; ही गोष्ट कर्कोपाध्यायांच्या खालील लेखावरून स्पष्ट होतें. कर्कभाष्य, कात्यायन श्रौतसूत्र २।१।३.

" स्मरन्ति हि पञ्चदशशाखोपनिबन्धनं कृतमाचार्येणेति ।
तस्मान्नास्ति प्रत्यक्षकृतो विशेषः । उच्यते ।
शाखाद्वयमधिकृत्य तात्पर्येणानुप्रवृत्त आचार्यः । "

तात्पर्य, विद्वानांचें मत असें कीं, कात्यायनाचार्यांनीं शुक्लयजुर्वेदाच्या पंधराही शाखांसंबंधीं हें सूत्र केले. म्हणून भिन्नशाखीय निरनिराळे मंत्र येथें प्रत्यक्ष दिसत नाहींत. याचें उत्तर—कण्व व माध्यंदिन ह्या दोन शाखांना धरून विशेषतः तात्पर्यानें कात्यायनाचार्याची प्रवृत्ति आहे. एवंच शुक्लयजुर्वेदाच्या पंधराही शाखांना सामान्यतः आणि कण्व व माध्यंदिन ह्या दोन शाखांना विशेषतः हें सूत्र लागूं पडतें.

—वेदप्रकाश—

आतां आम्ही प्रस्तुत अनुवाद (मराठी भाषांतर) ' वेदप्रकाश ' याकडे वळतों. अर्थज्ञानाशिवाय वेदाचा उपयोग नाहीं; वगैरे गोष्टी सुगृहीत असल्यामुळें त्याची सिद्धि करण्याची आवश्यकता नाहीं. केवळ अर्थज्ञान होणे हाच अनुवादाचा हेतु नसून वैदिक धर्मप्रवृत्ति व्हावी हाही आहे. कारण बौद्धादि धर्मीयांनीं आपल्या धर्मप्रवृत्तीकरितां जे ग्रंथ निर्माण केले; ते लोकांत प्रसिद्ध असलेल्या भाषेंत केले. त्यामुळें वैदिक धर्मातून त्यांच्या धर्माकडे जाणारांचा प्रवाह फार वाढला. परिस्थिति अशी होती कीं, वैदिक धर्म प्राचीन संस्कृत भाषेंत लिहिलेला, त्याचें ज्ञान करून देणारे लोक दुर्मिळ, बौद्धादि धर्म मात्र सर्वविदित भाषेंत सर्वांस अवगत होण्यासारखा होता. तेव्हांच्या विद्वानांनीं जर वैदिक ग्रंथांविषयीं ही अनुवाद करण्याची दृष्टि धारण केली असती; तर त्या धर्मांच्या प्रवृत्तीला अडथळा झाला असता व महाविद्वानांना त्याच्या (बौद्धधर्माच्या) खंडनाचे जे श्रम करावे लागले, ते वांचले असते. असो.

ह्यानंतर तरी सर्व भाषेंतून वैदिक ग्रंथांचें ज्ञान प्रसृत झाल्यास वरील आपत्ति टळेल, अशी संभावना ज्यांची झाली त्यांनीं ह्याप्रकारचे प्रयत्न केले. आजपावेतों

संस्कृत टीकाखेरीज प्राकृत भाषेंत वेदाविषयीं झालेले प्रयत्न, सर्वांत प्रथम म्हणजे पं. ज्वालाप्रसाद, मुरादाबादनिवासी, ह्यांनीं ह्या संहितेचें भाषांतर हिंदी भाषेंत केलें. त्याच समयाला मागेंपुढें महर्षि दयानंदांनींही चार वेदांच्या भाषांतराचे प्रयत्न केलेत. त्यांचें मोठें कृत्य असूनही बऱ्याच लोकांना हे आर्यधर्मीय म्हणून मान्य नव्हते. त्याकरितां त्यांचे प्रयत्नासही मतभेदाची आडकाठी उत्पन्न झाली. इंग्रजी भाषेंतही याचे अनुवादाचे प्रयत्न झाले. त्या पाश्चात्य विद्वानांना यज्ञादिक कर्मांची सांगोपांग माहिती नसल्यामुळें व सांप्रदायिक दृष्टि नसल्यामुळें व्हावा तसा सर्वजनसाधारण उपयोग झाला नाहीं. वेदाचें ज्ञान होईल तितकें देशी भाषेंत करावें म्हणजे वैदिक ज्ञान प्रसृत होईल; ह्या हेतूनें इतर पंडितांप्रमाणें आम्हीही प्रवृत्त झालों. मराठी भाषेमध्यें 'शुक्ल-यजुर्वेदीय-माध्यंदिन संहिते'चें भाषांतर एकादे झालें आहे; तें आमच्या नजरेस पडलें आहे. परंतु तें भाषांतरही केवळ शब्दशः असल्यानें कर्मांचा व मंत्रांचा संबंध वाचकांचे ध्यानांत येत नाहीं.

विनियोग—आम्हीं ह्या भाषांतरांत अशी पद्धत अवलंबिली आहे कीं, मंत्राचे आरंभीं विनियोग द्यावयाचा. विनियोग म्हणजे शतपथ ब्राह्मण व तदनुयायी कात्यायन-श्रौत-सूत्र ह्यांनीं हा मंत्र अथवा ह्या मंत्रांतील कांहीं भाग कोणत्या कर्मात उपयोगांत आणावा, म्हणून सांगितलें आहे; तो सविस्तर पूर्वी दिला आहे. ह्या तऱ्हेचा विनियोग वाचकांनीं वाचला म्हणजे त्याला हा मंत्र कोणत्या यज्ञांत, कोणत्या ऋत्विजाच्या कोणत्या कार्यांत म्हटला जातो ह्याचें सांगोपांग ज्ञान होतें.

मंत्रपाठ—मंत्रपाठ सस्वर दिला आहे. आजपावेतों सस्वर संहिता पुष्कळ ठिकाणीं छापल्या गेल्या, त्यांत शुद्धतेविषयीं प्रयत्न केलेला आहे; तथापि दोष राहून गेले. ते शक्य तितके टाळून अगदीं प्राचीन पुस्तक, ज्यावरून कित्येक वर्षे अध्ययन व अध्यापन चालूं आहे; त्यावरून ही प्रत लिहून काढिली. त्यानंतर वेदाध्ययन करणें हें निरपेक्षरीतीनें जे स्वकर्तव्य समजले, अशा वैदिकांकडून ते तपासविले; म्हणजे आमच्या शक्तीप्रमाणें शुद्ध पाठाकरितां फार खटपट केली. त्यांतही एकादें अशुद्ध राहाणें असंभवनीय नाहीं. तथापि प्रयत्नांत कसूर झाली नाहीं; हें सूज्ञ वाचक कबूल करतील.

अर्थ—यज्ञ-प्रकरणाला धरून पं. उवट व महीधर ह्या प्राचीन संस्कृत टीकाकारांच्या धोरणानें शब्दशः अर्थाकडे दुर्लक्ष्य न करितां वाचकांना सहज ज्ञेय व्हावा

म्हणून भावार्थ दिला आहे. तात्पर्य, शतपथब्राह्मण व कात्यायन श्रौतसूत्र यांच्या विनियोगाप्रमाणें; पं. उवट व महीधर यांच्या निर्विवाद अर्थाच्या धोरणानें प्रत्येक मंत्राचा भावार्थ आम्हीं दिलेला आहे.

पं. उवट व महीधर यांचा व आमचा कांहीं गोष्टींत जो मतभेद झाला, तो स्थलासह खालीं निर्दिष्ट करतों.

(१) कांहीं मंत्रांचे एकापेक्षां अधिक अर्थ पं. महीधरांनीं केले आहेत त्यांतील पहिलाच अर्थ प्रकरणानुसारी म्हणून आम्हीं घेतला आहे.

उदाहरणार्थः—अध्याय १० मंत्र १९ व अध्याय ३३ मंत्र ७४.

(२) कांहीं ठिकाणीं पं. उवट व पं. महीधर या दोघांचा परस्परांत विरोध आहे. त्याठिकाणीं ज्यांचा आम्हांला प्रकरणघटित व युक्तियुक्त अर्थ वाटला त्यांचाच घेतला. म्हणजे हा अनुवाद केवळ उवटानुयायी अगर महीधरानुयायी असा नाहीं.

उदाहरणार्थः–अध्याय १० मंत्र १०; अध्याय ११ मंत्र ३३.

(३) एकाद्या मंत्रांत प्रत्येक वाक्याचा निरनिराळा अर्थ देण्यांत पुनरुक्तीचा संभव होता; म्हणून ती टाळण्याकरितां आम्हीं एकदम भावार्थ दिला आहे.

उदाहरणार्थः—अध्याय २ मंत्र २५.

(४) कांहीं ठिकाणीं वाचकांच्या सोयीकरितां शब्दार्थ न देतां भावार्थच दिला आहे.

उदाहरणार्थः–अध्याय ८ मंत्र ५४ व ५५.

(५) पारिभाषिक वगैरे शब्द अनुवादांत जेव्हां उपयोजावे लागले; तेव्हां त्यांचा अर्थ प्रथम देऊन नंतरच त्यांचा उपयोग केला आहे. त्यायोगें कठीण शब्दांचा अर्थ पाहाण्याची तेथेंच सोय होते. अशी सोय केली असल्यामुळें वेगळा शब्दकोश अनुपयोगी म्हणून आम्हीं दिला नाहीं.

उदाहरणार्थः–अध्याय १५ मंत्र १६, १७ व १८.

(६) पं. महीधरांच्या टीकेंत मंत्रांतील कांहीं शब्द सोडलेले दिसतात. लेखक-भ्रम समजल्यास तेंही बरोबर नाहीं; कारण असे सुटलेले शब्द पुष्कळ आहेत.

उदाहरणार्थः–अध्याय १५ मंत्र ३१, ३२ व ३३.

(७) 'चत्वारि शृंगा' अ. १७ मं. ९१–ह्या मंत्राचा अर्थ प्रकरणास धरून असलेलाच अनुवादांत दिला आहे. इतर अर्थ पातंजल महाभाष्यांत वगैरे निर्दिष्ट केलेले पं. महीधरांनीं दिले आहेत. परंतु ते प्रकरणाशीं असंबद्ध म्हणून आम्हीं दिले नाहींत.

अशा रीतीनें संहिता, शतपथब्राह्मण, कात्यायन श्रौतसूत्र व वेदप्रकाशसंज्ञक अनुवाद ह्यांची माहिती' संक्षेपानें वाचकांस निवेदन केली. युद्धजन्य परिस्थिति नष्ट झाल्यावर फार सविस्तर उपोद्घात लिहिण्याचा प्रसंग यावा, अशी श्रीमहादेवाचे चरणीं प्रार्थना आहे. त्याचे कृपेनें तो योग आल्यास पुनः वाचकांची सेवा हातून घडावी अशी इच्छा आहे. या पुस्तकाच्या संपादनार्थ पुष्कळ विद्वानांचें साहाय्य घ्यावें लागलें; तें त्यांनीं कृपाळूपणें दिलें; याबद्दल सर्वांचें वंदन करून हें प्रास्ताविक कार्य संपवितों.

धूलिनगरम् ।
जे. शु. १० याज्ञवल्क्यजयन्ती
शके १८६४

अनुवादकर्ता.

श्रीमद्याज्ञवल्क्याय नमः ।

श्रीमद्योगीश्वर महर्षि याज्ञवल्क्य यांचें संक्षिप्त चरित्र.

प्रत्यग्रवेदेन गिरां मलं यो विधूय योगेन च चित्तजातम् ।
ज्ञानेन तत्त्वंपदलक्षमाप तं याज्ञवल्क्यं प्रणतोऽस्मि नित्यम् ॥

आह्निकसूत्रावल्याम् ।

श्रीमद्-याज्ञवल्क्य हे 'शुक्लयजुर्वेदीय-माध्यन्दिन-वाजसनेय' शाखेचे मूळ प्रवर्तक होत. हे ब्रह्मरातांचे पुत्र व सुप्रसिद्ध महर्षि वैशंपायन यांचे भाचे व शिष्य होत. यांच्या जन्मकालाचा पत्ता बृहदारण्यकाच्या प्रणयनकालापासून होईल कारण त्यांनीं बृहदारण्यकाचे प्रणयन केलें आहे. यांची रहावयाची जागा मिथिला[1] नगरी होती. विद्वद्वर्य श्रीधरशास्त्री वारे, नाशिक, यांनीं वर्धमानपुर (हल्लींचें वढवाण) हें त्यांचें निवासस्थान वगैरे लिहिलें आहे. तें विद्वानांनीं वाचून त्याचा विचार करावा. आमच्या मतें मिथिला हेंच त्यांचें निवासस्थान व तेथें नेपाळांत त्यांचा आश्रम आहे; अशाबद्दल आधुनिक संशोधक विद्वानांचें मत[2] खालीं टीपेंत दिलें आहे.

---

(१) याज्ञवल्क्यस्तु तत्राभूद्ब्रह्मरातसुतो द्विज । शिष्यः परमधर्मज्ञो गुरुवृत्ति-परस्सदा ॥ विष्णुपुराणे ३।५।२

(२) मिथिलास्थ स योगीन्द्रः क्षणं ध्यात्वा ब्रवीन्मुनीन् । याज्ञवल्क्यस्मृतौ-अ०-१।२.

(३) (i) "Like Yajnavalkya, Dr. Ganganath Jha hails from Mithila and like Yajnavalkya, he is an Advaitin." In Commemoration volume of Dr. Ganganath Jha, on page 265, by R. D. Ranade, M. A.

(ii) In the same book, page 359, Mr. P. V. Kane, says:— "From the days of the Yajnavalkya-Smriti down to the modern times, the land of Mithila has produced writers whose names are illustrious." (History of Dharmashastra, page 363).

(iii) In the same book, on page 387; -*Mithila*- by late Rai Bahadur Lala Sitaram, B. A. Mithila, the home of the learned:—

The first and the foremost of them, whose name has already been mentioned is Yajnavalkya. 'A large banian tree at Jagban, near the Kamatoul Station of the B. N. W. R. is adored as his hermitage.'

महर्षि वैशंपायन हे महर्षि व्यासांचे शिष्य होत. वैशंपायनांनीं यजुर्वेदाच्या २७ शाखा केल्या. ब्रह्मांडपुराणांत यजुर्वेदाच्या ८६ शाखा सांगितल्या आहेत. यावरून महर्षि वैशंपायनांजवळ कांहीं शाखा नव्हत्या ही गोष्ट सिद्ध होते. त्या वैशंपायनांनीं श्रीमद्याज्ञवल्क्यांना यजुर्वेद शिकविला.

एकदां श्रीमद्याज्ञवल्क्यांना गुरु वैशंपायनांपासून शिकलेल्या त्या यजुर्वेदाचा त्याग करण्याचें कारण घडलें तें असें:-एके वेळीं सर्व ऋषींनीं कांहींतरी कारणास्तव मेरुपर्वतावर ठराविक वेळीं जाण्याचें ठरविलें आणि त्यावेळीं जो वेळेवर येणार नाहीं, त्यास ब्रह्महत्येचें पातक लागेल असा नियम केला. त्याप्रमाणें सर्व ऋषि त्याठिकाणीं एकत्र जमले. परंतु त्यादिवशीं सकाळीं पहाटेस महर्षि वैशंपायन हे स्नानास निघाले असतांना, घरामध्यें एका कोपऱ्यांत निजलेल्या स्वतःच्या बहिणीच्या लहान मुलावर त्यांचा पाय पडून तो मुलगा तत्काळ गतप्राण झाला. त्यामुळें वैशंपायनांचें चित्त शोकाकुल होऊन त्यादिवशीं त्याठिकाणीं व त्यावेळीं ते जाऊं शकले नाहींत. ह्या कारणास्तव त्यांना ब्रह्महत्येचा दोष तर लागलाच; पण उलट बालहत्येचें पातकही पण घडलें. त्या ब्रह्महत्येच्या दोषाचें क्षालन व्हावें म्हणून त्यांनीं सर्व शिष्यांना बोलावून स्वतःला प्रायश्चित्त देण्याविषयीं सांगितलें. त्यावेळीं सर्व शिष्यांमध्यें स्वतःला श्रेष्ठ समजणाऱ्या, हुषार, आचारसंपन्न व तरुण अशा श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं "गुरूला प्रायश्चित्त कसें करावें म्हणून दुःखी झालेल्या व अल्पबुद्धीच्या अशा ह्या सगळ्या शिष्यांची काय जरूर? मी एकटाच प्रायश्चित्त करितों;" असें आत्मप्रत्ययद्योतक वाक्य उच्चारल्यामुळें वैशंपायनांना राग आला व त्यांनीं श्रीमद्याज्ञवल्क्यांना स्वतःपासून शिकलेला वेद परत करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं उलटीच्या रूपानें रुधिरयुक्त अशा त्यांच्यापासून (गुरूपासून) घेतलेल्या वेदविद्येचा त्याग केला; व तडक तेथून निघून गेले!! पुढें श्रीमद्याज्ञवल्क्यव्यतिरिक्त शिष्यांनीं त्या त्याग केलेल्या वेदविद्येचें तित्तिर-

---

(१) यजुर्वेदतरोश्शाखास्सप्तविंशन्महामुनिः। वैशंपाययनामासौ व्यासशिष्यश्चकार वै॥ विष्णुपुराणे ३।५।१.

(२) विष्णुपुराणे तृतीयांशे पंचमाध्याये-इत्युक्तो रुधिराक्तानि सरूपाणि यजूंषि सः। छर्दयित्वा ददौ तस्मै ययौ स स्वेच्छया मुनिः॥ १२॥

ब्रह्माण्डपुराणे-पू. भा. अनुषंगपादे-२।३५-एवमुक्तः सरूपाणि यजूंषि गुरवे ददौ। रुधिरेण तथाक्तानि च्छर्दित्वा ब्रह्मवित्तमाः॥

पक्ष्यांचें रूप धारण करून प्राशन केलें. त्यामुळेंच त्या वेदाचें अध्ययन करणारे "तैत्तिरीय किंवा कृष्णयजुर्वेदीय" ह्या नांवानें प्रसिद्ध झाले. दुसरें ह्या गोष्टीवरून श्रीमद्याज्ञवल्क्य हे अत्यंत निर्भीड व त्यागी वृत्तीचे होते; असेंही म्हणावयास हरकत नाहीं. पुढें महर्षि याज्ञवल्क्यांनीं श्रीसूर्यनारायणाची उपासना केली. त्यावेळीं श्रीसूर्यनारायण प्रसन्न झाले. त्यांचेपासून श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं सर्व वेदांचें अध्ययन व ग्रंथ करण्याची शक्ति प्राप्त करून घेतली. श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं सूर्यापासून वेद स्वीकारतांना घोड्याचें रूप घेतलें होतें; म्हणून वेदाला व शिष्याला 'वाजिन्' असें म्हणतात. हीच गोष्ट वायुपुराणांतही सांगितली आहे. इतरत्र श्रीमद्याज्ञवल्क्यांना वेद देतांना श्रीसूर्यनारायणानें घोड्याचें रूप घेतलें असल्याचें वर्णन आहे. असेंच वर्णन भागवतांतील १२ व्या स्कंधाच्या ६ व्या अध्यायाच्या ७३ व्या श्लोकांत आहे. आतां एक विशिष्ट गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे, ती ही कीं, श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं सूर्यापासून 'अयातयामसंज्ञक' जो वेद घेतला, तो प्रत्यक्ष त्यांचे गुरु जे महर्षि वैशंपायन त्यांना मुद्धां अवगत नव्हता. ही गोष्ट टीपेंत दिलेल्या दोन ग्रंथांच्या आधारावरून स्पष्ट दिसून येते.

त्यानंतर आतांपर्यंत आपण जे विष्णुपुराण, ब्रह्मांडपुराण, श्रीमद्भागवत व वायुपुराण हे ग्रंथ पाहिले त्यांत दोन गोष्टींचें मुख्यतः ऐक्य असल्याचें दिसून येतें.

---

(१) विष्णुपुराणे–३।५।१३–यजूंष्यथ विसृष्टानि याज्ञवल्क्येन वै द्विज। जग्मुर्ह्यस्तित्तिरा भूत्वा 'तैत्तिरीयास्तु' ते तत ॥

(२) अश्वरूपाय मार्तण्डो याज्ञवल्क्याय धीमते। यजूंष्यधीयते तानि ब्राह्मणा येन केनचित् ॥ २५ ॥
अश्वरूपाय दत्तानि ततस्ते वाजिनोऽभवन् ॥ ब्रह्माण्डपुराणे पूर्वभागस्य अनुषंगपादे–अध्यायः ३५–२५।२६.

(३) इत्येवमादिभिस्तेन स्तूयमानस्स वै रविः। वाजिरूपधरः प्राह ब्रियतामिति वाञ्छितम् ॥ विष्णुपुराणे तृतीयोऽध्यायः ५–२६.

(४) याज्ञवल्क्यस्तदा प्राह प्रणिपत्य दिवाकरम्। यजूंषि तानि मे देहि यानि सन्ति न मे गुरौ ॥ एवमुक्तो ददौ तस्मै यजूंषि भगवान्रविः। 'अयातयामसंज्ञानि' यानि वेत्ति न तद्गुरुः ॥ वि. पु. अंश ३ अध्याय ५–२७।२८.

तथा–याज्ञवल्क्यस्ततो ब्रह्मन्छन्दांस्यधिगवेषयन्। गुरोरविद्यमानानि सूपतस्थेऽर्कमीश्वरम् ॥
"अयातयामयजुः कामोऽ"पसरामिति ॥
भागवते स्कंध. १२ अ. ६–६६.

त्या दोन गोष्टी म्हणजे एक तर महर्षि वैशंपायन हेच श्रीमद्याज्ञवल्क्यांचे गुरु होत व दुसरे त्यांनीं (श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं) सूर्यापासून 'अयातयामसंज्ञक' यजुर्वेदच फक्त घेतला. परंतु स्कन्धपुराण व आत्मपुराण ह्या दोन ग्रंथांत ह्यासंबंधीं थोडासा निराळा कथाभाग आहे त्याकडे वळूं.

ह्यापैकीं स्कन्धपुराणांत श्रीमद्याज्ञवल्क्यांचे गुरु महर्षि 'शाकल्य' नांवाचे होत, असा निर्देश केला आहे. भार्गव कुळांत जन्मास आलेले, पुष्कळ शिष्यांचा परिवार असलेले व वेदांगांत पारंगत असलेले असे हे शाकल्य महर्षि वर्धमान नांवाच्या नगरांत राहात होते. त्या नगरांत सूर्यवंशांत उत्पन्न झालेल्या सुप्रिय नांवाच्या राजाचे ते पौरोहित्यकर्म करीत होते. एकदां गुरु शाकल्यांच्या सांगण्यावरून श्रीमद्याज्ञवल्क्य हे पौरोहित्यकर्म करण्याकरितां त्या राजाच्या घरीं गेले. तेथें शांतिकर्म झाल्यावर जपाच्या शेवटीं शान्त्युदक हातांत घेऊन आशीर्वाद देण्याच्या वेळीं राजा कुठें आहे असें त्यांनीं विचारिलें. त्यावेळीं मदानें धुंद झालेला, अपवित्र असा राजा त्याठिकाणीं आला व श्रीमद्याज्ञवल्क्यांना पाहून त्यानें त्यांची निर्भर्त्सना केली. शेवटीं तें शांत्युदक त्यांना जवळच असलेल्या खांबावर टाकण्यास सांगितलें. त्यावेळीं राजाचे सांगण्याप्रमाणें त्यांनीं केले. त्या खांबावर आशीर्वादाचे पाणी पडतांक्षणींच त्याला सुंदर पालवी फुटली, तें दृश्य पाहून राजाला फार आश्चर्य वाटलें; व त्यानें पुन्हां त्या आशीर्जलाची त्यांचेजवळ याचना केली. त्यावेळीं श्रीयाज्ञवल्क्यांनीं, "तूं माझें आशीर्जल घेण्यास अनर्ह आहेस. तेव्हां आतां मी माझ्या गुरूकडे जातों." असें सांगितलें. तेव्हां राजानें "तुम्हांला वाहनें, वस्त्रें, संपत्ति वगैरे देतों परंतु कसेंही करून आशीर्वादोदक द्या;" अशी पुष्कळ विनवणी केली. परंतु श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं त्याच्या त्या प्रार्थनेकडे लक्ष्य न देतां गुरूच्या आश्रमाची वाट धरिली. दुसरे दिवशीं शाकल्य महर्षि राजाकडे गेले असतां, त्यांनीं सर्व कालची घडलेली हकीकत ऐकली. राजानें पुन्हां कालच्याच शिष्याला पाठवून द्या असें सांगितलें. त्यानंतर महर्षि शाकल्य आश्रमांत परत आल्यानंतर त्यांनीं श्रीमद्याज्ञवल्क्यांना दुसरे दिवशीं राजाकडे शांतिकर्म करण्याकरितां जाण्यास सांगितलें. परंतु ती गोष्ट श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं नाकारली. म्हणून श्रीमद्याज्ञवल्क्याव्यतिरिक्त निरनिराळे शिष्य शाकल्यांनीं राजाकडे एकेका दिवशीं पाठविले. परंतु श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं दाखविलेला चमत्कार, गेलेल्या शिष्यांपैकीं एकालाही करून दाखवितां आला नाहीं. त्यामुळें पुन्हां महर्षि याज्ञवल्क्यांवर पाळी आली. शाकल्यांनीं श्रीमद्याज्ञवल्क्यांना, "तूं राजाचा अपमान

करूं नकोस. आपल्या सारख्यांनीं सर्व गोष्टींना तोंड देऊन राजाची मर्जी सांभाळली पाहिजे. तेव्हां तुझा झालेला अपमान सहन करून राजाकडे जा. इतकेंच नव्हे तर माझी सुद्धां आज्ञा उल्लंघन करितां कामा नये. गुरूची आज्ञा शिष्यानें कधींही उल्लंघन करूं नये, असा बऱ्याच कालापासून चालत आलेला धर्म आहे;" वगैरे पुष्कळ सांगून पाहिलें. त्यावेळीं श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं "अशा गुरूचा सर्वतोपरी त्याग केला पाहिजे" असें सडेतोडपणाचें उत्तर दिले. त्यामुळें शाकल्य महर्षि अत्यंत क्रोधाविष्ट होऊन त्यांनीं श्रीमद्याज्ञवल्क्यांची अतिशय निंदा केली आणि "माझ्यापासून शिकलेली विद्या परत कर नाहींतर शाप देईन" असें म्हणून आथर्वण मंत्रांनीं मंत्रित पाणी श्रीमद्याज्ञवल्क्यांना पिण्यास दिलें. त्यांनीं त्या जलाचें प्राशन करून महर्षि शाकल्यांची विद्या उलटीच्या रूपानें टाकून दिली. नंतर श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं हाटकेश्वर क्षेत्रीं जाऊन तेथें श्रीसूर्यनारायणाची प्रतिमा स्थापून आराधना करण्यास सुरवात केली. पुढें आदित्यनारायण प्रसन्न होऊन त्यांनीं श्रीमद्याज्ञवल्क्यांना सरस्वतीचें पाणी पिण्यास सांगितलें कीं, ज्याच्या (पाण्याच्या) प्राशनानें श्रीमद्याज्ञवल्क्य हे सर्वविद् होतील. परंतु ह्याही पुढें एक पायरी जाऊन "मी मानव गुरु करणार नाहीं; तेव्हां तुम्ही स्वतः मला वेद शिकवा." अशी श्रीसूर्यनारायणाजवळ त्यांनीं प्रार्थना केली. तेव्हां सूर्यानें त्यांना घोड्याच्या कानांत बसवून सर्व वेद शिकविले. नंतर त्यांनीं उपनिषदांचें ज्ञान मिळवून मिथिलानायक जनक राजाला ज्ञानाचा उपदेश केला. असेंच वर्णन पुढें ह्याच पुराणांत अध्याय २७८ मध्ये आहे. फक्त त्या ठिकाणीं राजाचें नांव 'आनर्त' असें दिलें आहे.

ह्या गोष्टींत एक महत्त्वाची बाब लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे, ती ही कीं, श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं सूर्यनारायणापासून केवळ यजुर्वेदाचें अध्ययन केलें नसून चारही वेदांचें अध्ययन केलें. पुढें महर्षि याज्ञवल्क्य गुरुदक्षिणा देण्याकरितां शाकल्य महर्षीकडे आले व गुरुदक्षिणा मागण्याविषयीं विनंति केली. त्यावेळीं शाकल्यांनीं, "सूर्या-

---

(१) गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानत । उत्पथे वर्तमानस्य परित्यागो विधीयते ॥ स्कं. पु. नागरखण्डस्याध्याये १२९–४२.

(२) एकमप्यक्षरं यत्र गुरुः शिष्ये निवेदयेत् । पृथिव्यां नास्ति तद्द्रव्यं यद्दत्त्वा ह्यनृणी भवेत् ॥ ४४ ॥

तस्माद्गच्छ द्रुतं दत्त्वा मदध्ययनमालयम् । त्यक्त्वा विद्यां मया दत्तां नो चेच्छस्याम्यहं तव ॥ ४५ ॥

पासून शिकलेले सर्व वेद मला शिकव. हींच माझी गुरुदक्षिणा होय;" असें उत्तर दिलें. त्याप्रमाणें श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं कबूल करून चारी वेद जाणणारा असा बराच शिष्यगण तयार केला. त्या शिष्यगणालाही श्रीमद्याज्ञवल्क्यांना गुरुदक्षिणा देण्याची इच्छा झाली असतांना त्यांनीं " मी शिकविलेल्या ह्या चारही वेदांची तुम्ही शिकविण्यानें प्रसिद्धि करा; " असें सांगितलें. एवंच श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं सूर्यनारायणापासून चारही वेदांचें अध्ययन केलें ही गोष्ट सिद्ध होते. असेंच वर्णनें (चारही वेद शिकल्याबद्दलचें) आत्मपुराणांतही आहे. श्रीमद्याज्ञवल्क्य हे सूर्याकडे गेल्यानंतर ज्याप्रमाणें पूर्वी अंभिणी नांवाच्या कोण्या एका स्त्रीनें सूर्यापासून चारही वेदांचें अध्ययन केलें; तसेंच चारही वेदांची षडंगसहित प्राप्ति श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं सूर्यापासून करून घेतली. बृहदारण्यकोपनिषद्[1] ३।१।२ यांत देखील श्रीमद्याज्ञवल्क्य चतुर्वेदाध्यायी असून त्यांनीं आपल्या शिष्यांना चारही वेद सांगितले असल्याचा उल्लेख आहे. टीपेंत सांगितलेल्या ह्याच सामश्रवस् नांवाच्या शिष्याला श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं देवराति जनकाच्या घरीं अश्वमेध यज्ञाच्या वेळीं वादविवाद झाला असतांना संपत्ति घेऊन जाण्याबद्दल आज्ञा केली. (आनंदाश्रम प्रत शांकरभाष्य पान ३९१) त्या वादविवादाच्या प्रसंगीं महर्षि शाकल्य यांना मृत्यु पत्करावा लागला. तो प्रसंग ब्रह्मांडपुराणांत अनुषंगपादांत अध्याय २·३४ मध्यें कथन केला आहे. तो थोडक्यांत पुढीलप्रमाणें होयः–एकदां जनकानें अश्वमेध यज्ञ आरंभिला. तो यज्ञ पाहण्याकरितां तेथें शाकल्य कहोड इत्यादि महर्षि आले होते. त्या सर्व जमलेल्या महर्षींना पाहून ह्यांच्यामध्यें कोण श्रेष्ठ असावा हें पाहण्याची त्याला सहजच उत्कंठा निर्माण झाली. त्यावेळीं एक हजार गाई, पुष्कळ सोनें, रत्नें, दासदासी, गांवें इ० पुढें ठेवून त्या सर्वांना तो नम्रपणानें म्हणाला कीं, " तुमच्यांत जो कोणी

---

(१) इत्युक्तो भगवान्सूर्यो याज्ञवल्क्यं महामुनिं। वेदान्षडंगसहितान् रहस्यादि समन्वितान् ॥ चतुरोऽध्यापयामास स्थापयित्वा रथे निजे ॥ ३९ ॥

अंभिणी यद्वदेतस्य शिष्याऽभूत्सवितुः पुरा। तथैव याज्ञवल्क्योऽपि शिष्योऽभूत्प्रीतिवर्धनः ॥ ४० ॥ आत्मपुराणे–सप्तमाध्याये ३९।४०

(२) अथ ह याज्ञवल्क्यः स्वमेव ब्रह्मचारिणमुवाचैताः सोम्योदज सामश्रवा ३ इति ता होदांचकार।

अथ ह याज्ञवल्क्यः स्वमात्मीयमेव ब्रह्मचारिणमन्तेवासिनमुवाचैता गा हे सोम्योद्जोद्गमयास्मद्गृहानत्प्रति हे सामश्रवः सामविधिं हि शृणोत्यतोऽर्थाच्चतुर्वेदो याज्ञवल्क्यः ॥ आनंदाश्रम प्रत शांकरभाष्य पान ३९२

श्रेष्ठ असेल त्यानें ही संपत्ति घेऊन जावी." अर्थात् ती घेण्याकरितां श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं आपल्या एका शिष्यास सांगितलें; (ब्रह्मांडपुराणांत शिष्याच्या नांवाचा उल्लेख केला नाहीं.) आणि म्हणाले[1] "सर्वांशीं वाद करण्यास मीच एकटा समर्थ आहे. माझ्यासारखा दुसरा कोणीही वेदवेत्ता नाहीं. तेव्हां ज्याला ही गोष्ट रुचत नसेल त्या विद्वानानें मला वादविवादाकरितां आव्हान करावें." ह्याप्रमाणें पंडितांना आह्वान दिल्यावर बऱ्याच विद्वानांच्या प्रश्नांची श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं बरोबर उत्तरें दिलीं. त्यानंतर त्यांनीं महर्षि शाकल्यांना "स्वस्थ काय बसलांत? बोला." असें म्हटल्यावर शाकल्य महर्षि रागावले व सर्व मुनींच्या समक्ष म्हणाले, "तूं आम्हांला व एथें आलेल्या सर्व महर्षींना तुच्छ समजून हें धन काय म्हणून घेऊन जातोस?" त्यावर श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं "ब्राह्मणांचें बल म्हणजे विद्या व तत्त्वज्ञान ह्यांतील कुशलता होय. तेव्हां तुम्ही मला जे प्रश्न कराल त्यांचीं उत्तरे देण्यास मी तयार आहें. जो कोणी वादांत जय मिळवील, त्यानें हें धन न्यावयाचे असा राजानें पण केला आहे. अर्थातच मी एकटा ही सर्व संपत्ति घेऊन जाणार" ह्या गोष्टीमुळें शाकल्य महर्षि अत्यंत रागावले व त्यांनीं श्रीमद्याज्ञवल्क्यांना हजार प्रश्न केले. त्यांचीं यथायोग्य उत्तरें दिल्यानंतर "आतां माझ्या एकाच प्रश्नाचें आपण उत्तर द्या नाहींतर मृत्यु पत्करा." असें याज्ञवल्क्यांनीं म्हणून त्यांना एकच प्रश्न विचारिला. त्या प्रश्नाचें उत्तर महर्षि शाकल्यांना न देतां आल्यामुळे देवमित्र शाकल्यांनीं प्राणत्याग केला. इतकेंच काय त्यांच्या अस्थीसुद्धां शिष्यांना मिळाल्या नाहींत; असें वर्णन बृहदारण्यकोपनिषदांत दिलें आहे. असो.

त्यानंतर (ह्या वादविवादानंतर) महर्षि याज्ञवल्क्य यांनीं संन्यास घेतला. हा त्यांचा संन्यास "विविदिशा" संन्यास नसून "विद्वत्संन्यास" होता. (विविदिषा

---

(१) ब्रह्माण्डपुराणे–शिष्यं ब्रह्मविदां श्रेष्ठं धनमेतद्गृहाण वै । नयस्व च गृहं वत्स ममैतन्नात्र संशयः ॥ ४६ ॥

सर्ववादेष्वहं वक्ता नान्यः कश्चित्तु मत्समः । यो वा न प्रियते विद्वान् समाह्वयतु मा चिरम् ॥ ४७ ॥

(२) सुसूक्ष्मज्ञानसंयुक्तं सांख्यं योगमथापि वा । अध्यात्मस्य गतिं मुख्यां ध्यानमार्गमथापि वा ॥ ६५ ॥

(३) तꣳह न मेने शाकल्यस्तस्य ह मूर्धा विपपातापि हास्य परिमोषिणोऽस्थीन्यपेजह्रुरन्यन्मन्यमानाः ॥ बृ. आ.–३।९।२६.

संन्यास म्हणजे परब्रह्म ज्ञानाच्या इच्छेनें कर्मांचा संन्यास. विद्वत्संन्यास म्हणजे ज्ञानानंतर केलेला संन्यास.) संन्यास घेतेवेळीं आपल्या दोन भार्या मैत्रेयी व कात्यायनी या दोघांना आपलें द्रव्य वांटून द्यावें म्हणून त्यांना जवळ बोलाविलें. मैत्रेयी अधिकारिणी असल्यामुळें तिनें द्रव्याचें ग्रहण केलें नाहीं व सर्व द्रव्य कात्यायनीस दिलें. कात्यायनीपासून श्रीमद्याज्ञवल्क्यांना कात्यायन नांवाचा मुलगा झाला; तोच सूत्रकार होय., मैत्रेयीची अधिकारित्वाची योग्यता पाहून महर्षीनीं तिला आत्मज्ञानाचा उपदेश केला. या वैदिक आख्यायिकेवरून अधिकारिणी स्त्रियांना ब्रह्मज्ञानापर्यंत अधिकार आहे ही गोष्ट सिद्ध होते.

पुढें श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं सूर्यापासून मिळविलेल्या शेंकडों अशा यजुर्वेदमंत्रांच्या साहाय्यानें १५ शाखा तयार केल्या. त्या वाजसनी शाखांचा अभ्यास पुढें कण्व, माध्यंदिन वगैरेनीं केला. पुढें ह्या पंधरा शाखांचे प्रवचनरूपानें पंधरा ब्राह्मण श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं तयार केले; ही गोष्ट निरुक्तांतील अध्याय १ खंड ५ वा यांतील पहिल्या सूत्रावरून सिद्ध होते. श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकीं मुख्यत्वेंकरून चार ग्रंथ जास्त प्रसिद्ध आहेतः—

---

(१) (i) अथ ह याज्ञवल्क्यस्य द्वे भार्ये बभूवतुर्मैत्रेयी कात्यायनी च तयोर्ह मैत्रेयी ब्रह्मवादिनी बभूव। स्त्रीप्रज्ञैव तर्हि कात्यायनी।

बृ. आ. उ.-४।५।१.

स्कंधपुराण-नागरखंड अ. १३०-२।३

(ii) तस्य भार्याद्वयं श्रेष्ठमासीत्सर्वगुणान्वितम्। एका गुणवती तस्य मैत्रेयीति प्रकीर्तिता ॥ २ ॥

ज्येष्ठा चान्याथ कल्याणी ख्याता कात्यायनीति च। यस्या कात्यायनः पुत्रो वेदार्थानां प्रजल्पकः ॥ ३ ॥

(२) "प्रव्राजिष्यन् वा अरेऽहमस्मात्स्थानादस्मि हन्त तेऽनया कात्यायन्याऽन्तं ते करवाणि" इ० बृ. आ.-४।५।२.

(३) स्कन्धपुराण नागरखंड अध्याय १२९-७१

कात्यायनं सुतं प्राप्य वेदसूत्रस्य कारकम् ॥ ७१ ॥

(४) श्रीमद्भागवते द्वादशस्कन्धस्य षष्ठाध्याये-यजुर्भिरकरोच्छाखा दशपंचशतेर्विभुः। जगृहुर्वाजसन्यस्ता काण्वमाध्यन्दिनादयः ॥ ७५ ॥

(५) "वायुर्वा त्वा मनुर्वा त्वेति।" आनंदाश्रममुद्रितग्रन्थे ४४ पत्रम्।

निरुक्त-अ. १ खं. ५ सू. १

(१) **याज्ञवल्क्यशिक्षा**–यांत माध्यन्दिनवाजसनेयांनीं स्वतःच्या वेदाचें अध्ययन व अध्यापन कसें करावें याचें निरूपण आहे.

(२) **प्रतिज्ञासूत्र**–यांत मंत्राचे स्वर कसे जाणावे याची माहिती आहे.

(३) **याज्ञवल्क्यस्मृति**–ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अनुलोम, प्रतिलोम इ. ज्या जाति, यांनीं कसें वागावें ? यांचा व्यवहार कसा असावा ? न्यायदानाची पद्धति कशी असावी ? व विविध प्रायश्चित्तें अशा तऱ्हेच्या धर्मशास्त्रांसंबंधीं निर्णय दिला आहे.

(४) **शतपथ ब्राह्मण**–यांत मागें सांगितलेल्या पंधरा शाखांची विभाग–चिकित्सा आहे.

ह्याशिवाय याज्ञवल्क्यस्मृतींत एका श्लोकामध्यें श्रीमद्याज्ञवल्क्यांनीं योगशास्त्र रचले असें सांगितलें आहे. उपनिषद् केल्याबद्दलचा विशेष उल्लेख स्कंधपुराणाच्या नागरखंडांतील १२९ अध्यायाच्या ७० व्या श्लोकांत आहे. ही गोष्ट सुविद्य सद्गृहस्थ म. म. श्रीयुत पांडुरंग वामन काणे, एम्. ए., एल्एल्. एम्. यांना संमत नसावी असें दिसतें. कारण ज्या अर्थी त्यांनीं आपल्या 'धर्मशास्त्राचा इतिहास' या पुस्तकांत १६९ व्या पानावर ८ वी ओळ अशी लिहिली आहे कीं, "श्रद्धाळु विद्वान् (orthodox) लोक बृहदारण्यकोपनिषद् व स्मृति यांचें एककर्तृकत्व कबूल करीत नाहींत."

वरील वर्णनावरून श्रीमद्याज्ञवल्क्यांच्या चरित्राची सर्व महर्षिगणांमध्यें फार मोठी योग्यता आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. एक तर त्यांच्या नांवावरूनच त्यांची थोरवी कळून येते. या नांवाची व्युत्पत्ति[3] बृहदारण्यकोपनिषदाच्या शांकरभाष्यांत लिहिलेली आहे. दुसरे जनकासारख्या[4] राजासही यांच्याच योग-

---

(१) याज्ञवल्क्यस्मृतौ–प्रायश्चित्ताध्याये–यतिधर्मप्रकरणे–
ज्ञेयं चारण्यकमहं यदादित्यादवाप्तवान् । योगशास्त्रं च मत्प्रोक्तं ज्ञेयं योगमभीप्सता ॥ ११० ॥

(२) एवं सिद्धिसमापन्नो याज्ञवल्क्यो द्विजोत्तमाः । कृत्वोपनिषदं चारु वेदार्थैः सकलैर्युतम् ॥ ७० ॥

(३) "यज्ञस्य वल्को वक्ता यज्ञवल्कस्तस्यापत्यं याज्ञवल्क्य ।" बृ. आ. १।४।३. शांकरभाष्य. आनंदाश्रमप्रत पान १०४.

(४) "अभयं वै जनकः प्राप्तो स्मीति होवाच याज्ञवल्क्यः ।" बृ. आ. ४।२।४.

विद्येनें विदेही अवस्था प्राप्त झाली म्हणून त्यांना प्राप्त झालेलें 'योगीन्द्र किंवा योगीश्वर' हें उपपदही त्यांच्या योग्यतेस पुष्टीच देत आहे. तिसरे त्यांनीं केलेले ग्रंथ हेही पण त्यांच्या उत्कृष्ट दर्जाची साक्ष देत आहेत. सर्व द्विजांना नित्य ब्रह्मकृत्य म्हणून संध्योपासनेप्रमाणें ब्रह्मयज्ञरूपी वेदशास्त्राध्ययनाचीही आवश्यकता आहे. त्यांत 'स्मृति' म्हणून सर्व शाखीयांनीं 'याज्ञवल्क्य–स्मृतीचेंच' अध्ययन करावें असें सर्वशाखीय प्रयोगांत "योगीश्वरं याज्ञवल्क्यं" असा याज्ञवल्क्यस्मृतीचा आरंभ दिल्यावरून वाचकांचें ध्यानांत येईल. सर्व स्मृतींमध्यें अध्ययनार्ह 'याज्ञवल्क्यस्मृतीच' आहे; असा सर्व प्रयोगकारांचा अभिप्राय दिसतो. असा विशिष्ट ग्रंथ करून जगदुपकार करणारे महर्षि म्हणून श्रीमद्याज्ञवल्क्यांचें वैशिष्ट्य आहे.

अशा रीतीनें माध्यन्दिन शाखेचें महत्कार्य करणाऱ्या व बराचसा शिष्यसंप्रदाय असणाऱ्या ह्या महर्षि श्रीमद्याज्ञवल्क्यांची महति वर्णिली जाईल तेवढी अपुरीच होणार आहे. कारण पुष्कळ पुराणांतून व विद्वान् लोकांच्या ग्रंथांतून त्यांच्या चरित्राचें सविस्तर वर्णन केलें गेलें आहे. तथापि ह्या 'वेदप्रकाशांत' त्यांच्या चरित्राचें सप्रमाण व संक्षेपानें वर्णन यावें ही गोष्ट अत्यावश्यक असल्यामुळें यथामति लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. तेव्हां अशा थोर महात्म्यांची स्मृति चिरकाल राहावी असें ज्या ज्या व्यक्तीस वाटत असेल त्या त्या व्यक्तीनें त्यांनीं केलेल्या ग्रंथांचें पठन, पाठन व मनन हीं केल्यानेंच त्यांस राहील, असें आम्हांस विश्वसनीयरीत्या वाटतें. म्हणून प्रत्येक व्यक्तीनें वर सांगितलेल्या तीनही क्रिया आपलीं मुख्य कर्तव्येंच आहेत असें समजून त्याप्रमाणें वागण्याविषयीं कळकळ बाळगावी अशी आग्रहाची विनंति करून योगीन्द्र महर्षि श्रीमद्याज्ञवल्क्य यांचें संक्षिप्त चरित्र त्यांचे चरणीं समर्पण करितों.

अनुवादक.

शतपथब्राह्मण व कात्यायन सूत्र यांतील विनियोगानुसार संहितेंतील विषयांची अनुक्रमणिका.

आम्हीं प्रत्येक अध्यायवार विषयसूची दिली आहे. सविस्तर विषयांची माहिती पाहिजे असल्यास वाचकांनी अनुवादांतील प्रत्येक मंत्राच्या वर दिलेला विनियोग वाचावा; म्हणजे सर्व कार्य होईल:—

अध्याय	विषय.
१.	दर्श व पौर्णमास इष्टींच्या संबंधीं मंत्र.
२.	दर्श-पौर्णमासेष्टि कर्माचे मंत्र.
३.	अग्न्याधान, अग्न्युपस्थान व चातुर्मास्य इतक्या ठिकाणचे मंत्र.
४.	अग्निष्टोमयज्ञांत ऋत्विग् व यजमान ह्यांच्या शालाप्रवेशापासून विकत घेतलेल्या सोमाचे शालाप्रवेशापर्यंतचे मंत्र.
५.	यूपनिर्माणाचे मंत्र.
६.	यूपसंस्कारापासून सोमकंडणापर्यंतचे मंत्र.
७.	प्रातर व माध्यंदिन ह्या दोन्ही सवनांतील दक्षिणादानापर्यंतचे मंत्र.
८.	तृतीयसवनांतील मंत्र.
९.	वाजपेय व राजसूय यज्ञासंबंधीं मंत्र.
१०.	राजसूयाङ्गभूत चरक सौत्रामणि मंत्र.
११.	अग्निचयनांतील मंत्र.
१२.	उखाधारणादि मंत्र.
१३.	चित्यादि उपधान मंत्र.
१४.	द्वितीय-तृतीय-चतुर्थ चितींचे मंत्र.
१५.	पञ्चम चितीचे व चयनाचे मंत्र.
१६.	शतरुद्रिय संज्ञक होम मंत्र.
१७.	चित्याग्नीच्या अभिषेकाचे व जपपर्यंत मंत्र.
१८.	वसोर्धारादिकाचे मंत्र.

अध्याय	विषय
१९.	सौत्रामणींतील इन्द्राभिषेकापर्यंतचे मंत्र.
२०.	हौत्रापर्यंतचे मंत्र.
२१.	याज्यादि प्रेषणाचे मंत्र.
२२.	अश्वमेधांतील मंत्र.
२३.	अश्वमेधाहुतींचे मंत्र.
२४.	अश्वमेधांतील पशूंच्या देवतांचा संबंध सांगणारे मंत्र.
२५.	अश्वांग व देवता यांचे होम मंत्र.
२६.	खिलसंज्ञक मंत्र.
२७.	पञ्चचितिक अग्नीसंबंधीं मंत्र.
२८.	सौत्रामणीचे अंगभूत जे पशु तत्संबंधीं प्रयाजानुयाज व प्रैष.
२९.	अश्वमेधसंबंधीं मंत्र.
३०.	पुरुषमेधसंबंधीं मंत्र.
३१.	पुरुषसूक्ताचा अध्याय.
३२.	सर्वमेधसंबंधीं मंत्र.
३३.	सर्वमेधांतील सतरा पुरोऋचा.
३४.	शिवसंकल्प प्रभृति मंत्र.
३५.	पितृमेधसंबंधीं मंत्र.
३६.	शांतिपाठाचे मंत्र.
३७.	अभ्र्यादि रौहिणान्त मंत्र.
३८.	महावीर–घर्मधुग्दोह प्रभृति कर्मे.
३९.	प्रवर्ग्यामध्यें धर्मभेद झाला असतां प्रायश्चित्त.
४०.	ईषावास्योपनिषद्.

ॐ

॥ नमः श्रीमहर्षियाज्ञवल्क्याय ॥

वाजसनेयि-माध्यन्दिन-शुक्ल

यजुर्वेद-संहिता

प्रथमोऽध्यायः ।

हरिः ॐ । इषे त्वोर्जे त्वा वायव स्थ देवो वः÷ सविता प्रार्पयतु श्रेष्ठतमाय कर्मणऽआप्यायध्वमघ्न्या इन्द्राय भागं प्रजावतीरनमीवाऽअयक्ष्मा मा वस्तेन ईशत माघशꣳसो ध्रुवाऽअस्मिन्गोपतौ स्यात बह्वीर्यजमानस्य पशून्पाहि ॥ १ ॥

माता यस्य सरस्वती भुवि सतीमूर्धन्यभूषामणिः ।
तातस्त्र्यम्बकपादपूजनरतः श्रीत्र्यम्बकाख्यः सुधीः ।
लब्धं येन जनुश्च पाठककुले शाण्डिल्यगोत्रे मुदा
तेन श्रीधरशर्मणा शिवपदं टीकासुमेनार्च्यते ॥ १ ॥

विनियोग—' इषे त्वा ' या मंत्रानें पळसाची किंवा शमीची फांदी तोडावी. ' वायवः स्थ ' या मंत्रानें वत्साला फादीचा स्पर्श करावा. गाईपैकी एकीला वेगळी करून ' देवो वः ' या मत्रानें शाखेचा स्पर्श करावा. ' यजमानस्य पशून् ' या मंत्रानें दोन अग्निगृहांपैकी एका अग्निगृहाच्या पुढें एक फांदी उभी रोवावी.

अर्थ—हे शाखे, धान्याच्या उत्पत्तीकरितां मी तुला तोडतो व वृष्टिरूपी रसाकरितां तुला सारखी करतो (सारखी करणें म्हणजे उंच नीच भाग तासून काढणें). हे वत्सांनो, तुम्ही आयांपासून दूर जा. हे गाईनो, प्रेरक व प्रकाशमान परमेश्वर तुम्हांला यज्ञकर्मात उपयोगी पडण्याकरितां पुष्कळ गवत असलेल्या रानांत जाण्याची प्रेरणा करो. हे अवध्य अशा गाईनो, तुम्ही इंद्राच्या उद्देशानें पुष्कळ दूध वाढवावें.

चोर व तुमची हिंसा करणारा वाघ तुम्हांस मारण्यास समर्थ न होवो. तुम्ही पुष्कळ संततियुक्त व (सामान्य) व्याधिरहित आणि प्रबलरोगरहित व्हा आणि या यजमानाच्या घरीं पुष्कळ दिवसपर्यंत टिकून रहा व संततीनें वाढा. हे शाखे, तूं यजमानाच्या पशूंचें रक्षण कर. ॥ १ ॥

विनियोग—'वसोः पवित्रम्' या मंत्रानें फांदीला पवित्र बांधावें. 'द्यौरसि' या मंत्रानें स्थाली घेऊन 'मातरिश्वनः' या मंत्रानें तीच स्थाली निखाऱ्यावर शिजण्यास ठेवावी.

वसोः॒ पवित्रमसि द्यौरसि पृथिव्यसि मातरिश्वनो घर्मोऽसि विश्वधा असि। परमेण धाम्ना दृꣳहस्व मा ह्वार्मा ते यज्ञपतिर्ह्वार्षीत् ॥ २ ॥

अर्थ—हे दर्भमय पवित्रा, इंद्राचें निवासस्थान जें दुग्ध त्याला तूं पवित्र करणारें आहेस. हे स्थालि, मृत्तिका व जल यांनी निर्माण झालेली अशी तूं वृष्टिदायी द्युलोकस्वरूपी आहेस. पृथ्वींतून खणून काढलेल्या मातीनें बनलेली असल्यामुळें तूं पृथ्वीरूपी आहेस. हे उखे, तूं वायूचा प्रदीपक जो अंतरिक्षलोक तद्रूपी आहेस. हे स्थालि, तूंही द्युलोक, पृथ्वीलोक व अंतरिक्षलोक यांचे धारण करणारी असल्यामुळें सर्व धारणसमर्थ आहेस आणि हे उखे, उत्तम तेजानें (बहुदुग्धधारणरूपी तेजानें) तूं दृढ हो. तुझ्यांतील दुग्ध गळूं देऊं नकोस, आणि हे उखे, तूं कुटिल होऊं नकोस व त्यायोगें यजमानालाही कुटिलत्व म्हणजे यज्ञविघ्न न होवो ॥ २ ॥

विनियोग—प्रागग्र अगर उदगग्र पवित्र 'वसोः पवित्रम्' या मंत्रानें स्थालीवर ठेवावें. दूध काढलें जात असतां 'देवस्त्वा' या मंत्राचा जप करावा. एका गाईचें दूध काढल्यावर अध्वर्यूनें 'तूं कोणत्या गाईचें दूध काढलेंस' असें दूध काढणाऱ्यास विचारावें.

वसोः॒ पवित्रमसि शतधारं वसोः॒ पवित्रमसि सहस्रधारम्। देवस्त्वा सविता पुनातु वसोः॒ पवित्रेण शतधारेण सुप्वा कामधुक्षः॒ ॥ ३ ॥

अर्थ—हे शाखापवित्रा, तूं इंद्रनिवासभूत जें दुग्ध त्यास शुद्ध करणारें आहेस. (दूध गाळीत असतां त्या पवित्राच्या भोंकांतून शेंकडों व हजारो धारा पडून दूध गाळलें जातें) हे दुग्धा, सवितृदेव शंभर धारायुक्त अशा उत्तम संशोधक पवित्रानें तुला निर्दोष करो. (एका गाईचें दोहन झाल्यावर अध्वर्यु दोहन करणाऱ्याला विचारितो)—हे दोग्ध्या, ह्या गाईपैकीं कोणत्या गाईचें तूं दूध काढलेंस ॥ ३ ॥

विनियोग—दूध काढणारानें, या गाईचे दूध काढलें असें म्हटल्यावर अध्वर्यूनें, "सा विश्वायुः" असें म्हणावें. अशींच प्रश्नोत्तरें दुसऱ्या दोन गाईंबद्दलही समजावीं. उकळलेलें दूध अग्नीवरून खालीं काढून तें थोडें निवल्यावर त्यांत सकाळच्या होमाचें राहिलेलें दही विरजण म्हणून 'इन्द्रस्य त्वा' या मंत्रानें घालावें. त्यावर 'विष्णो हव्यम्' ह्या मंत्रानें झांकण घालावें.

सा विश्वायु÷ सा विश्वकर्मा सा विश्वधायाऽ। इन्द्रस्य त्वा भागꣳ सोमेनातनच्मि विष्णो हव्यꣳ रक्ष ॥ ४ ॥

अर्थ—मी विचारिलेली ती गाय 'विश्वायु' नांवाची आहे. त्याचप्रमाणें दुसरी गाय विश्वकर्मा नावाची व तिसरी विश्वधाया नांवाची आहे. (विश्वायु म्हणजे संपूर्ण आयुष्य देणारी. विश्वकर्मा म्हणजे सपूर्ण कार्यसामर्थ्य देणारी. विश्वधाया म्हणजे सर्व देवांचें पोषण करणारी) हे दुग्धा, तू इंद्राचा भाग आहेस. सोमरसासारख्या दह्यानें मी तुझ्यात विरजण घालतो. हे विष्णो, या माझ्या दुग्धरूपी हविर्द्रव्याचें रक्षण कर. ॥ ४ ॥

विनियोग—'अग्ने व्रतपते' या मत्रानें व्रतग्रहण करावें.

अग्ने व्रतपते व्रतं चरिष्यामि तच्छकेयं तन्मे राध्यताम्। इदमहमनृतात्सत्यमुपैमि ॥ ५ ॥

अर्थ—हे कर्मपालका अग्ने, तुझ्या आज्ञेनें मी कर्म करीन व तें करण्यास समर्थ होईन. तुझ्या प्रसादानें माझें तें कर्म सफल होवो. मी यजमान अनृतभाषणांतून दूर जाऊन सत्य भाषण करीन. (कर्मकाली सत्य भाषण करावें म्हणजे कर्म सांग होतें.) ॥ ५ ॥

विनियोग—"कस्त्वा युनक्ति" या मंत्रानें अध्वर्यूनें प्रश्नोत्तररूपी वाक्यांनीं आपलें कर्तृत्व दूर करून प्रजापतीचे कर्तृत्व प्रकट करावें. 'कर्मणे वाम्' या मंत्रानें शूर्प व अग्निहोत्रहवणीपात्र यांचें ग्रहण करावें.

कस्त्वा युनक्ति स त्वा युनक्ति कस्मै त्वा युनक्ति तस्मै त्वा युनक्ति। कर्मणे वां वेषाय वाम् ॥ ६ ॥

अर्थ—हे जलधारक पात्रा, आहवनीयाच्या उत्तरभागीं तुझी स्थापना कोण करतो? सर्व वेदप्रसिद्ध जो प्रजापति तो तुझी स्थापना करितो. तो कशाकरितां स्थापना

करतो ? तो प्रजापतीच्या संतोषाकरितां स्थापना करतो हे अग्निहोत्रहवणी व हे शूर्पा, कर्माकरितां व कर्मामध्यें गढून राहण्याकरितां मी तुमचें ग्रहण करतों ॥६॥

विनियोग—' प्रत्युष्टम् ' आणि ' निष्टप्तम् ' या मंत्रांनीं अग्निहोत्रहवणी व शूर्प तापवावें. ' उर्वन्तरिक्षम् ' या मंत्रानें गमन करावें.

**प्रत्युष्टꣳ रक्षः प्रत्युष्टाऽअरातयो निष्टप्तꣳ रक्षो निष्टप्ताऽअरातयः ।
उर्वन्तरिक्षमन्वेमि ॥ ७ ॥**

अर्थ—ही अग्निहोत्रहवणी व हें शूर्प तापविल्यानें ह्यांत असलेले राक्षस व सर्व प्रतिबंधक शत्रू जळाले. तसेंच ह्यांत गुप्त राहिलेले राक्षस व प्रतिबंधक शत्रू पूर्ण तऱ्हेनें जळाले. मी आतां विस्तीर्ण अशा स्थलांत गमन करतों. ॥ ७ ॥

विनियोग—' धूरसि ' या मंत्रानें गाडीच्या जोकडाला स्पर्श करावा. ' देवानाम् ' या मंत्रानें दांड्याच्या शेवटीं असलेला जो गाडीचा खुंटा त्याला स्पर्श करावा.

**धूरसि धूर्व धूर्वन्तं धूर्व तं योऽस्मान्धूर्वति तं धूर्वयं वयं धूर्वामः ।
देवानामसि वह्नितमꣳ सस्नितमं पप्रितमं जुष्टतमं देवहूतमम् ॥ ८ ॥**

अर्थ— हे अग्ने, तूं हिंसक आहेस म्हणून हिंसा करणाऱ्या पापाचा नाश कर; आणि जे राक्षस वगैरे यज्ञविघ्न करून आमची हिंसा करावयाला उद्युक्त झाले त्यांचा नाश कर. आम्ही यज्ञ करणारे आलस्य वगैरे ज्या शत्रूंचा नाश करण्यास उद्युक्त झालों त्या शत्रूंचा तूं नाश कर. हे शकटा, तूं अग्नीचा हविर्भाग उत्तम तऱ्हेनें नेणारा आहेस व तूं दृढ असावास म्हणून तुझ्याभोंवतीं चर्म गुंडाळलें आहे. व्रीहि भरलेला असा तूं देवांना अतिशय आवडतोस व देवांना बोलाविणारा असा आहेस (व्रीहीनें भरलेला शकट पाहून बोलाविल्याप्रमाणें देव धांवत येतात.) ॥ ८ ॥

विनियोग—' विष्णुस्त्वा ' या मंत्रानें शकटावर आरोहण करावें. 'उरु वाताय' या मंत्रानें शकटाकडे पहावें. ' अपहतम् ' या मंत्रानें गाडीवरील गवत वगैरे दूर करावें. ' यच्छन्ताम् ' या मंत्रानें गाडींतील व्रीहींना स्पर्श करावा.

अहुतमसि हविर्धानं दृꣳहस्व मा ह्वार्मातें यज्ञपतिर्ह्वार्षीत् । विष्णुस्त्वाक्रमतामुरु वाताया पहतꣳरक्षो यच्छन्तां पञ्च ॥ ९ ॥

अर्थ—हे शकटा, तूं अकुटिल असून व्रीहीरूपी हवीचें धारण करणारा आहेस म्हणून तूं दृढ हो, कुटिल होऊं नकोस व त्या योगें यजमानाला पाप लागूं नये. हे शकटा, व्यापक जो यज्ञ तो तुझ्यावर आरोहण करो. तसेंच तूं आपल्यावरील धान्यांत

वायूचा संचार व्हावा म्हणून विस्तीर्ण हो. यज्ञविघातक तृणादिरूपी राक्षस दूर केले. ह्या पांच अंगुली व्रीहीरूपी हवीला नियमित करोत. (पांचही बोटांनीं धान्य ग्रहण करावें.) ॥ ९ ॥

विनियोग—' देवस्य त्वा ' या मंत्रानें चार मुष्टी व्रीहींचें ग्रहण करावें.

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम् । अग्नये जुष्टं गृह्णाम्यग्नीषोमाभ्यां जुष्टं गृह्णामि ॥ १० ॥

अर्थ—हे हविर्द्रव्या, प्रेरक अशा सवितृदेवतेच्या प्रेरणेनें मी अग्निप्रिय अशा अग्नीषोमांना आवडणाऱ्या तुझें अश्विनीकुमारांच्या दोन बाहूंनीं व पूषा देवतेच्या दोन हातांनीं ग्रहण करितों ॥ १० ॥

विनियोग—' भूताय त्वा ' या मंत्रानें अवशिष्ट व्रीहीला स्पर्श करावा. 'स्वर्' या मंत्रानें पूर्वेकडे पहावें. ' दृꣳहन्ताम् ' या मंत्रानें गाडीवरून खालीं उतरावें. ' पृथिव्यास्त्वा ' या मंत्रानें हविर्द्रव्य भूमीवर ठेवावें.

भूताय त्वा नारातये स्वरभिविख्येषं दृꣳहन्तां दुर्याः पृथिव्याम् । उर्वन्तरिक्षमन्वेमि पृथिव्यास्त्वा नाभौ सादयाम्यदित्या उपस्थेऽग्ने हव्यꣳ रक्ष ॥ ११ ॥

अर्थ—हे शकटांतील अवशिष्ट व्रीहीभागा, तुला मी अन्य यागाकरितां व ब्राह्मणभोजनाकरितां शिल्लक ठेवतो. दान न देण्याकरितां नाही, तर दान देण्याकरितांच शिल्लक ठेवतों. मी यज्ञांना पाहीन. पृथ्वींत असलेलीं गृहें दृढ होवोत. विस्तीर्ण अशा आकाशाप्रत मी गमन करितों. हे हविर्द्रव्या, अदितीची जी मांडी म्हणजे पृथ्वीचा मध्यभाग त्यावर तुला मी स्थापन करतों. हे अग्ने, तुझ्याजवळ ठेवलेल्या या हविर्भागाचें तूं रक्षण कर ॥ ११ ॥

विनियोग—' पवित्रे स्थः ' या मंत्रानें दोन कुशांना तीन कुशांनीं तोडावें. ' सवितुर्वः ' या मंत्रानें हविर्ग्रहणींत पाणी ओतून दोन दर्भांनीं त्यांतील कचरा काढावा. डाव्या हातावर अग्निहोत्रहवणी घेऊन ' देवीरापः ' हा मंत्र म्हणून उजव्या हातानें वर उचलावी.

पवित्रे स्थो वैष्णव्यौ सवितुर्वः प्रसव उत्पुनाम्यच्छिद्रेण पवित्रेण सूर्यस्य रश्मिभिः । देवीरापोऽअग्रेगुवोऽअग्रेपुवोऽग्र इममद्य यज्ञं नयताग्रे यज्ञपतिꣳ सुधातुं यज्ञपतिं देवयुवम् ॥ १२ ॥

अर्थ—हे दोन कुश पवित्रांनो, तुम्ही यज्ञसंबंधीं आहांत. हे जलांनो, प्रेरक देवाच्या प्रेरणेनें छिद्ररहित पवित्रानें व सूर्यकिरणांनीं तुमचें मी शोधन करतों. हे प्रकाशात्मक जलांनो, तुम्ही आज आरंभिलेल्या यज्ञांना निर्विघ्न रीतीनें संपवा. हे जलांनो, तुम्ही सखल जमिनीवर प्रवाह पावणारे व पहिल्यानें सर्वशोधक आहांत म्हणून या यजमानाला फलोपभोगाची प्रेरणा करा. हा यजमान दक्षिणा देऊन यज्ञ वाढविणारा, यज्ञाचें पालन करणारा व देवांना यज्ञादि हविर्भाग देणारा आहे. ॥१२॥

विनियोग—' प्रोक्षिता स्थ ' या मंत्रानें जलांचे प्रोक्षण करावें. ' अग्नये त्वा ' इत्यादि मंत्रांनीं त्या त्या देवतांच्या उद्देशानें ठेवलेल्या हविर्द्रव्याचें प्रोक्षण करावें. ' दैव्याय त्वा ' या मंत्रानें पात्रप्रोक्षण करावें.

युष्मा इन्द्रोऽवृणीत वृत्रतूर्ये यूयमिन्द्रमवृणीध्वं वृत्रतूर्ये प्रोक्षिताः स्थ। अग्नये त्वा जुष्टं प्रोक्षाम्यग्नीषोमाभ्यां त्वा जुष्टं प्रोक्षामि। दैव्याय कर्मणे शुन्धध्वं देवयज्यायै यद्वोऽशुद्धाः पराजघ्नुरिदं वस्तच्छुन्धामि ॥ १३ ॥

अर्थ—हे जलांनो, इंद्रानें वृत्रवधाच्या निमित्तानें साहाय्याकरितां तुमची प्रार्थना केली व तुम्हीही साहाय्याकरितां वृत्रवधाच्या निमित्तानें इंद्राची प्रार्थना केली. हे जलांनो, तुम्ही सिंचित केलेले आहांत. अग्नीला व अग्नीषोमांना आवडत्या अशा पात्रांचें मी प्रोक्षण करतों. हे यज्ञपात्रांनो, तुम्ही दर्शादिक अग्न्यादिदेवसंबंधीं जीं कर्में त्याकरितां शुद्ध व्हा. नीच जातीच्या सुतारांनीं तयार करतांना तुमचें (यज्ञपात्रांचें) अंग हस्तस्पर्शानें अशुद्ध केलें आहे. तें मी जलप्रोक्षणानें शुद्ध करतो. ॥१३॥

विनियोग—' शर्मासि ' या मंत्रानें कृष्णाजिन ग्रहण करावें. ' अवधूतम् ' या मंत्रानें कृष्णाजिन झटकावें. ' आदित्यास्त्वक् ' या मंत्रानें पश्चिमेकडे शिर येईल अशा पद्धतीनें अंथरावें. डाव्या हातानें कृष्णाजिनावर ' अद्रिरसि ' अगर ' ग्रावासि ' या मंत्रानें उलूखल स्थापन करावें.

शर्मास्यवधूतꣳ रक्षोऽवधूताऽअरातयोऽदित्यास्त्वगसि प्रति त्वादितिर्वेत्तु। अद्रिरसि वानस्पत्यो ग्रावासि पृथुबुध्नꣳ प्रति त्वादित्यास्त्वग्वेत्तु ॥१४॥

अर्थ—हे कृष्णाजिना, तूं उखळ धारण करण्याकरितां सुखरूपी आहेस. ह्या कृष्णाजिनावर असलेला राक्षस दूर केला गेला. (त्यावरील धूळ दूर केली गेली.) तसेंच प्रतिबंधक शत्रूही जमिनीवर कंपित झाले. हे कृष्णाजिना, तूं भूमिदेवतेची त्वचा आहेस. भूमि तुला आपली त्वचा समजो. हे उखळा, तूं जरी लांकडाचे आहेस

तथापि पाषाणासारखें आहेस. तुझें मूल (खालचा भाग) मोठा आहे. अशा तऱ्हेनें तूं पाषाणासारखें आहेस. पृथ्वीची त्वचा म्हणजे खालीं असलेलें मृगचर्म तुला आपलेपणानें ओळखो (हें उलूखल माझा भाग आहे असें तें समजो) ॥ १४ ॥

विनियोग—' अग्नेस्तनूः ' ह्या मंत्रानें उखळांत हविर्द्रव्य वैरावें. ' बृहद्ग्रावा ' या मंत्रानें मुसळ हातांत घ्यावें. ' स इदम् ' या मंत्रानें त्याचें धारण करावें. ' हविष्कृदेहि या मंत्रानें तीन वेळां कांडणाऱ्यांस बोलवावें.

अग्नेस्तनूरसि वाचो विसर्जनं देववीतये त्वा गृह्णामि बृहद्ग्रावासि वानस्पत्यः सऽइदं देवेभ्यो हविः शमीष्व सुशमि शमीष्व । हविष्कृदेहि हविष्कृदेहि ॥ १५ ॥

अर्थ—हे हविर्द्रव्या, तूं आहवनीय अग्नीचें शरीर आहेस व यजमानाच्या वाणीचें विसर्जनस्थान आहेस. म्हणजे हविर्दानाच्या वेळीं यजमानानें वाग्विसर्जन म्हणजे मौन धारण करावें. म्हणून देवांच्या संतोषाकरितां तुला मी वैरतों. हे मुसळा, तूं जरी लांकडाचें आहेस तथापि दृढत्वानें दगडासारखें आहेस व मोठें आहेस. अग्न्यादिक देवांवर उपकार करण्याकरितां तूं या हविर्द्रव्यांतील तुष वगैरे बाजूला कर. तें तुष अतिशय दूर होईल असें कर. हे हविर्द्रव्य करणाऱ्या, इकडे ये. हे हविर्द्रव्य करणाऱ्या, इकडे ये. (असेंच तिसरे वेळींही म्हणावें) ॥ १५ ॥

विनियोग :—' कुक्कुटोसि ' या मंत्रानें पाटयावर वरवंटयाचा अग्नीध्रानें आघात करावा. ' वर्षवृद्धम् ' या मंत्रानें सूप हातांत घ्यावें. ' प्रति त्वा ' या मंत्रानें सुपात हवी ओतावें. ' परापूतम् ' या मंत्राने त्यांतील खडे वगैरे पाखडावे. ' अपहतम् ' या मंत्रानें तुष बाहेर टाकावेत. ' वायुर्वः ' या मंत्रानें लहानमोठे कण वेगळे करावे. ' देवो वः ' या मंत्राने भांड्यांत तांदूळ ओतावे व त्यांचें अभिमंत्रण करावें.

कुक्कुटोऽसि मधुजिह्वऽइषमूर्जमावद त्वया वयꣳसंघातꣳसंघातं जेष्म वर्षवृद्धमसि प्रति त्वा वर्षवृद्धं वेत्तु परापूतꣳ रक्षः परापूताऽअरातयः । अपहतꣳरक्षो वायुर्वो विविनक्तु देवो वः सविता हिरण्यपाणिः प्रतिगृभ्णात्वच्छिद्रेण पाणिना ॥ १६ ॥

अर्थ :—हे शम्यासंज्ञक यज्ञायुधा, तूं राक्षसांचा कुक्कुट आहेस. (असुराः क्व क्व राक्षस कोठें आहेत. राक्षस कोठें आहेत असा शोध करून त्यांना मारण्याकरितां जो सर्वत्र गमन करितो त्याला कुक्कुट असें म्हणावें.) तसेंच तूं देवांचा मधुजिह्व नांवाचा

भृत्य आहेस. (मधुर भाषण करणारी ज्याची जिह्वा आहे त्याला मधुजिह्व असें म्हणावें.) अशा हे यज्ञपात्रा, तूं राक्षसांचा पराजय कर व असा शब्द कर कीं ज्यायोगें यजमानाला अन्न आणि रस प्राप्त होईल, नंतर तुझ्या साहाय्यानें आम्ही राक्षसाबरोबर युद्ध करून सर्व युद्धांत जय मिळवूं. हे शूर्पा, तूं वृष्टिजन्य जलानें वाढलेला आहेस. हे हवि, वृष्टिजन्य जलानें वाढलेल्या तुला शूर्प आपलेपणानें ओळखो. (व्रीहि व शूर्प दोन्हीही वृष्टिजलानें वाढले असल्यामुळें परस्परसंबंधी आहेत.) सुपानें व्रीही घोळल्यानंतर त्यांतील राक्षसरूपी व शत्रुरूपी हविप्रतिकूल भाग दूर केला गेला. सुपांतून लांब उडून पडलेले तुषरूपी राक्षस लांब उडून गेले. हे तांदुळांनो, सुपाचा वारा तुम्हांला सूक्ष्मपणापासून दूर करो. आणि सोन्याच्या आंगठ्या वगैरे दागिने घातलेला प्रेरक देव तुम्हांला छिद्ररहित हस्तानें म्हणजे बोटें जुळविलेल्या हातानें ग्रहण करो. (अशाकरितां की तांदूळ वैरतांना ते खालीं पडूं नयेत.) ॥ १६ ॥

विनियोग :—पळसाच्या फांदीच्या मुळाशीं तोडलेला जो काष्ठाचा भाग त्याला उपवेष म्हणतात. त्याचें ' धृष्टिरसि ' या मंत्रानें ग्रहण करावें. ' अपाग्ने ' या मंत्रानें पूर्वेकडील निखारे लांब सारावे. ' आदेवयजम् ' या मंत्रानें अंगारांना जवळ घेऊन ' ध्रुवमसि ' या मंत्रानें त्यावर कपाल पालथें घालावें.

धृष्टिरस्यपाग्नेऽअग्निमामादं जहि निष्क्रव्यादꣳसेधा देवयजं वह । ध्रुवमसि पृथिवीं दृꣳह ब्रह्मवनिं त्वा क्षत्रवनिं सजातवन्युपदधामि भ्रातृव्यस्य वधाय ॥ १७ ॥

अर्थ :—हे उपवेषा, तूं प्रगल्भ आहेस. आमात् (अपक्व पदार्थ भक्षण करणारा लौकिक अग्नि) क्रव्यात् (प्रेतमांस भक्षण करणारा चिताग्नि) व तिसरा यागयोग्य अग्नि असे अग्नीचे तीन भाग आहेत. हे गार्हपत्य अग्ने, तू आमात् अग्नीला टाक व क्रव्यात् अग्नीला दूर कर. आणि तिसरा जो यज्ञयोग्य अग्नि त्याला जवळ घे. हे कपाला; तूं स्थिर आहेस म्हणून पृथ्वीला स्थिर कर. ब्राह्मण क्षत्रिय व यजमान कुलांतले लोक पुरोडाशनिष्पत्तीकरितां ज्याचा स्वीकार करितात अशा हे कपाला, तुला मी अंगारावर ठेवितों. त्यायोगें माझ्या शत्रूचा वध होवो ॥ १७ ॥

विनियोग—' अग्ने ब्रह्म ' या मंत्रानें शून्य जागीं निखारे ठेवावे. पूर्वी ठेवलेल्या कपालाच्या पश्चिमेकडे ' धरुणम् ' या मंत्रानें दुसरे कपाल ठेवावें. ' धर्त्रम् ' या मंत्रानें पूर्वेकडे तिसरे कपाल ठेवावें. ' विश्वाभ्यः ' या मंत्रानें चवथें

कपाल ठेवावें. ' चितस्थ ' या मंत्रानें दोन दक्षिणेकडे व दोन उत्तरेकडे कपालें ठेवावींत. ' भृगूणाम् ' या मंत्रानें कपालावर निखारे ठेवावेत.

अग्ने ब्रह्म गृभ्णीष्व धरुणमस्यन्तरिक्षं दृꣳह ब्रह्मवनिं त्वा क्षत्रवनिं सजातवन्युपदधामि भ्रातृव्यस्य वधाय । धर्त्रमसि दिवं दृꣳह ब्रह्मवनिं त्वा क्षत्रवनिं सजातवन्युपदधामि भ्रातृव्यस्य वधाय । विश्वाभ्यस्त्वाशाभ्य उपदधामि चितः स्थोर्ध्वचितो भृगूणामङ्गिरसां तपसा तप्यध्वम् ॥ १८ ॥

अर्थ—हे अग्ने, आम्हीं केलेल्या उत्तम कर्माचा तूं स्वीकार कर. हे द्वितीय कपाला, पुरोडाशाचा तूं धारक आहेस म्हणून अंतरिक्षाला दृढ कर. ब्राह्मण क्षत्रिय व यजमानकुलोत्पन्न पुरुष पुरोडाश उत्पन्न करण्याकरितां ज्याचा स्वीकार करितात अशा तुला मी शत्रुवधाकरितां अंगारावर ठेवितों. हे तृतीय कपाला, तूं धारण करणारे आहेस म्हणून द्युलोकाला दृढ कर. क्षत्रिय व यजमानकुलोत्पन्न पुरुष पुरोडाशाच्या उत्पत्तीकरितां ज्याचा स्वीकार करितात अशा तुला मी शत्रुवधाकरितां अंगारावर ठेवितों. हे चतुर्थ कपाला, सर्व दिशांच्या दार्ढ्याकरितां तुझें मी अंगारावर स्थापन करितों. हे कपालांनो, तुम्ही जवळ व ऊर्ध्वभागाकडून एकत्र केले गेलेले आहांत. तुम्ही भृगुसंज्ञक व आंगिरससंज्ञक देवऋषींच्या तपोरूपी अशा ह्या अग्नीने तप्त व्हा. ॥१८॥

विनियोग—पूर्वीप्रमाणे ' शर्मासि ' या मंत्रानें कृष्णाजिनाचे ग्रहण करावें. त्यावर ' धिषणासि ' या मंत्राने शिला स्थापन करावी. नंतर ' दिवः ' या मंत्रानें शिलेच्या पश्चात् भागीं शम्येचे स्थापन करावे. ' धिषणासि ' या मंत्रानें पाटयांवर वरवंटा ठेवावा.

शर्मास्यवधूतꣳरक्षोऽवधूताऽअरातयोदित्यास्त्वगसि प्रति त्वादितिर्वेत्तु । धिषणासि पर्वती प्रति त्वादित्यास्त्वग्वेत्तु दिवः स्कम्भनीरसि धिषणासि पार्वतेयी प्रति त्वा पर्वती वेत्तु ॥ १९ ॥

अर्थ—हे कृष्णाजिना, तूं शिला (पाटा) धारण करण्याकरितां सुखरूपी आहेस. ह्या कृष्णाजिनावर असलेला राक्षस दूर केला गेला. तसेंच प्रतिबंधक शत्रूही जमिनीवर कंपित झाले. हे कृष्णाजिना, तूं भूमिदेवतेची त्वचा आहेस. तुला भूमि आपली त्वचा समजो. हे शिले, तूं पर्वतावर उत्पन्न झालेली व पर्वताप्रमाणें हे पेषणकर्म धारण करणारी आहेस व भूमीची कृष्णाजिनरूपी त्वचा तुला आपलेपणानें ओळखो. हे शम्ये, तूं द्युलोकाचें स्तंभन करणारी आहेस. व हे उपले (वरवंटा), तूं पेषणकर्माला धारण

करणारी आहेस. तूं पाटयापेक्षां लहान स्वरूपाची असल्यामुळें पाट्याची मुलगी शोभतेस. करितां पाट्याचा पाषाण तुला आपली कन्या म्हणून ओळखो. ॥ १९ ॥

विनियोगः—'धान्यमसि' या मंत्रानें तांदूळ वैरावे व 'प्राणाय त्वा' इत्यादि मंत्रानें पुनः पुनः कुटावेत. 'दीर्घाम्' या मंत्रानें कृष्णाजिनावर पीठ ठेवावें. 'चक्षुषे त्वा' या मंत्रानें त्याकडे पहावें. 'महीनाम्' या मंत्राने त्यांत घृत ओतावे.

धान्यमसि धिनुहि देवान्प्राणाय त्वोदानाय त्वा व्यानाय त्वा। दीर्घामनु प्रसितिमायुषे धां देवो वः सविता हिरण्यपाणिः प्रतिगृभ्णात्वच्छिद्रेण पाणिना चक्षुषे त्वा महीनां पयोऽसि ॥ २० ॥

अर्थः—हे हविर्द्रव्या, तूं धान्य म्हणजे संतोष करणारे आहेस. म्हणून देवांना संतुष्ट कर. हे तांदुळा, प्राण म्हणजे श्वसन वायु, उदान म्हणजे उत्क्रांति वायु व व्यान म्हणजे व्यापक वायु यांचें दान करण्याकरितां तुला मी वाटून पीठ करतों. हे हविर्द्रव्या, तुला मी आयुष्यवृद्धीकरितां दीर्घकर्मसंततीच्या धोरणाने कृष्णाजिनावर स्थापन करितों. प्रेरक व सुवर्णाच्या आंगठ्या हातांत घालणारा देव ज्यांचीं बोटें छिद्ररहित आहेत अशा हातानें तुझें ग्रहण करो. हे हविर्द्रव्या, यजमानाच्या नेत्राची शक्ति वाढण्याकरितां मी तुजकडे पहातों. हे आज्या, तूं गाईच्या दुधापासून उत्पन्न झालेलें असल्यामुळें दुग्धरूपी आहेस. ॥ २० ॥

विनियोग—'देवस्य त्वा' या मंत्रानें पात्रीमध्यें पिष्ट ओतावें. पिठांत ओतावयाचें पाणी अग्नीध्रानें आणावें व अध्वर्यूने 'समापः' या मंत्रानें पवित्रांनीं त्याचें ग्रहण करावें.

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम्। संवपामि समापोऽओषधीभिः समोषधयो रसेन। सꣳरेवतीर्जगतीभिः पृच्यन्ताꣳ संमधुमतीर्मधुमतीभिः पृच्यन्ताम् ॥ २१ ॥

अर्थ—प्रेरक अशा देवाच्या प्रेरणेनें अश्विनीकुमारांच्या दोन बाहूंनीं व पूषा देवतेच्या दोन हातांनीं मी भांड्यामध्यें पीठ चांगलें ठेवतों. उपसर्जनीरूपी जलें पिष्टरूप औषधीशीं युक्त होवोत. व पिष्टरूपी औषधी उपसर्जनीरूप जलानें युक्त होवोत. गोड असें तें उपसर्जनीरूप उदक मधुर अशा पिष्टौषधीनें युक्त होवो म्हणजे जल व पिष्ट यांचा उत्तम संसर्ग होवो ॥ २१ ॥

विनियोग—' जनयत्यै त्वा ' या मंत्रानें पीठ व पाणी एकत्र करावें. पाण्यांत मिसळलेल्या पिठाचे दोन गोळे करून ' इदमग्नेः ' या मंत्रानें पहिल्या गोळ्याला व ' इदमग्नीषोमयोः ' या मंत्रानें दुसऱ्या गोळ्याला स्पर्श करावा. ' इषे त्वा ' या मंत्रानें घृत पातळ करावें. ' घर्मोसि ' या मंत्रानें पुरोडाश अग्नीवर शिजवावा. ' उरुप्रथा ' या मंत्रानें पुरोडाश पसरावा. ' अग्निष्टे ' या मंत्रानें त्यास जलाचा स्पर्श करावा. ' देवस्त्वा ' या मंत्राने पुरोडाश शिजवावा.

जनयत्यै त्वा संयौमीदमग्नेरिदमग्नीषोमयोरिषे त्वा घर्मोऽसि विश्वायुरुरुप्रथाऽउरु प्रथस्वोरु ते यज्ञपतिः प्रथतामग्निष्टे त्वचं मा हिꣳसीद्देवस्त्वा सविता श्रपयतु वर्षिष्ठेऽधि नाके ॥ २२ ॥

अर्थ—हे जलपिष्टरूपी दोन पदार्थांनो, यजमानाला संतति व्हावी म्हणून मी तुम्हांला संयुक्त करतो. (नंतर पाण्यांत मिसळलेल्या पिठांचे दोन पिंड वेगवेगळे ठेवावे. व) हा अग्नीचा पिंड असें म्हणून पहिल्या पिंडाला स्पर्श करावा व हा अग्नीषोमाचा पिंड असें म्हणून दुसऱ्या पिंडाला स्पर्श करावा. हे घृता, वृष्टीकरितां तुला मी अग्नीवर ठेवतों. हे पुरोडाशा, तूं दीप्यमान प्रवर्ग्यरूपी व संपूर्ण आयुष्य देणारा आहेस. हे पुरोडाशा, तूं स्वभावतःच पसरणारा आहेस म्हणून तूं विस्तृत हो. व हा यजमान–पुत्र–पशूंच्या योगाने प्रसिद्ध होवो. व हे पुरोडाशा, शिजविण्याच्या वेळीं अग्नि तुझा त्वचेसारखा जो वरचा भाग त्याला न जाळो. हे पुरोडाशा, सवितादेव अत्यंत वाढलेल्या द्युलोकांत राहणाऱ्या नाक नांवाच्या अग्नीमध्यें तुला परिपक्व करो ॥ २२ ॥

विनियोग—' मा भेः ' या मंत्रानें पुरोडाशाला स्पर्श करावा. नंतर तो शिजल्यावर ' अतमेरुः ' या मंत्रानें भस्मानें, वेदाने (दर्भमुष्टि) व उपवेषानें तो झाकावा. ' त्रिताय त्वा ' इत्यादि प्रत्येक मंत्राने यागदेवतेच्या उद्देशानें पात्री विसळलेल्या व अंगुलीच्या प्रक्षालनाचे उदकाचा त्याग करावा.

मा भेर्मा संविक्थाऽअतमेरुर्यज्ञोऽतमेरुर्यजमानस्य प्रजा भूयात् । त्रिताय त्वा द्वितायं त्वैकतायं त्वा ॥ २३ ॥

अर्थ—हे पुरोडाशा, तूं भिऊं नकोस व ठकूं नकोस. यागहेतुभूत जो पुरोडाश तो ग्लानिरहित होवो. व यजमानाची प्रजा ग्लानिरहित होवो. हे पाल्यंगुलिप्रक्षाल-

नोदका, (पात्री विसळलेल्या अंगुली धुतलेल्या जला) त्रित नांवाच्या देवाकडे व द्वित आणि एकत नांवाच्या देवाकडे तुला मी नेतों ॥ २३ ॥

विनियोग—' देवस्य त्वा ' या मंत्रानें स्फ्य हातांत घ्यावा. व तो डाव्या हातांत घेऊन उजव्या हातानें त्याला स्पर्श करून ' इंद्रस्य बाहुः ' या मंत्राचा जप करावा.

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम् । आददेऽध्वरकृतं देवेभ्य इन्द्रस्य बाहुरसि दक्षिणः सहस्रभृष्टिः शततेजा वायुरसि तिग्मतेजा द्विषतो वधः ॥ २४ ॥

अर्थ—हे स्फ्य, प्रेरक देवाच्या प्रेरणेने अश्विनीकुमारांच्या बाहूंनीं व पूषा देवतेच्या हातांनीं मी, देवोपकाराकरितां (देवोपकारार्थ) यज्ञ करणाऱ्या अशा तुझें ग्रहण करतों. तूं इंद्राचा उजवा हात असून हजारों शत्रूंना मारणारा आहेस व अत्यंत प्रकाशमान असा तूं वायूसारखा आहेस म्हणून तीक्ष्ण तेज धारण करणारा आणि कर्मद्वेष्ट्या शत्रूंना मारणारा आहेस ॥ २४ ॥

विनियोग—' पृथिवि देवयजनि ' या मंत्रानें तृण जमिनीवर ठेवून स्फ्यानें प्रहार करावा. तेथील माती ' व्रजं गच्छ ' या मंत्राने हातांत घ्यावी. ' वर्षतु ते ' या मंत्रानें वेदीकडे पहावें. ' बधान ' या मंत्रानें हातांत घेतलेली माती उत्करावर टाकावी.

पृथिवि देवयजन्योषध्यास्ते मूलं मा हिंसिषं व्रजं गच्छ गोष्ठानं वर्षतु ते द्यौर्बधान देव सवितः परमस्यां पृथिव्याꣳशतेन पाशैर्योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मस्तमतो मा मौक् ॥ २५ ॥

अर्थ—हे देवयागसाधनभूते पृथ्वि, तुझी ओषधी जें तृण त्याचें मूल मी नष्ट करणार नाहीं. हे पुरीष, (स्फ्य प्रहारानें निघालेली जी माती तिला पुरीष म्हणतात.) तूं गाई राहतात अशा ठिकाणीं जा. हे वेदी, तुझ्याकरितां द्युलोकाभिमानी देव वृष्टि करोत. हे सवितृ देवा, जो आमचा द्वेष करितो व ज्याचा आम्ही द्वेष करितों त्या शत्रूला सीमेवरील पृथ्वीवर शंभर रज्जुपाशांनीं बांध व अंधतामिस्र नरकापासून त्याला केव्हांहि मुक्त होऊं देऊं नकोस ॥ २५ ॥

विनियोग—' अपारुषम् ' या मंत्रानें दुसऱ्या वेळीं स्फ्यचा प्रहार करावा. ' अररो दिवम् ' या मंत्रानें अग्नीध्रानें मृत्तिका उत्करावर टाकावी. ' द्रप्सस्ते ' या मंत्रानें तिसऱ्यांदा प्रहार करावा.

अपारुं पृथिव्यै देवयजनाद्व्यासं व्रजं गच्छ गोष्ठानं वर्षतु ते द्यौर्बधान देव सवितः परमस्यां पृथिव्याꣳ शतेन पाशैर्योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मस्तमतो मा मौक् । अररो दिवं मा पप्तो द्रप्सस्ते द्यां मा स्कन् व्रजं गच्छ गोष्ठानं वर्षतु ते द्यौर्बधान देव सवितः परमस्यां पृथिव्याꣳ शतेन पाशैर्योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मस्तमतो मा मौक् ॥ २६ ॥

अर्थ—देवयागसाधनभूत पृथ्वीवरील म्हणजे वेदीवरील जें राक्षससंज्ञक अशुद्ध द्रव्य त्याला मी दूर करितों. हे अशुद्ध द्रव्या, तूं गाई वसतात अशा ठिकाणीं जा. हे वेदी, तुझ्याकरितां द्युलोकाभिमानी देव वृष्टि करो. हे सवितृ देवा, जो आमचा द्वेष करितो व ज्याचा आम्ही द्वेष करितो त्या शत्रूला सीमेवरील पृथ्वीवर शंभर रज्जुपाशांनीं बांध व अंधतामिस्र नरकापासून त्याला केव्हांही मुक्त होऊं देऊं नकोस. हे असुर, (अशुद्ध द्रव्या), तूं यागफलरूपी द्युलोकांत जाऊं नकोस. हे पृथ्वि, हे वेदिदेवते, तुझा जो उपजीव्य रस आहे तो द्युलोकाला जाऊं नये. हे असुर, (अशुद्ध द्रव्या), तूं गाई वसतात त्या ठिकाणीं जा. हे वेदि, तुझ्याकरितां द्युलोकाभिमानी देव वृष्टि करो. हे सवितृ देवा, जो आमचा द्वेष करतो व ज्याचा आम्ही द्वेष करतों त्या शत्रूला सीमेवरील पृथ्वीवर शंभर रज्जुपाशांनी बांध, व अंधतामिस्र नरकापासून त्याला केव्हांही मुक्त होऊं देऊं नकोस ॥ २६ ॥

विनियोग—' गायत्रेण ' इत्यादि प्रत्येक मंत्रानें वेदीची इयत्ता निश्चित करण्याकरितां दक्षिण, पश्चिम व उत्तर या तीन दिशेस स्फ्याने रेघा ओढाव्यात. हा पूर्व परिग्रह झाल्यावर ' सुक्ष्मा ' इत्यादि तीन मंत्रांनीं उत्तर परिग्रह करावा.

गायत्रेण त्वा छन्दसा परिगृह्णामि त्रैष्टुभेन त्वा छन्दसा परिगृह्णामि जागतेन त्वा छन्दसा परिगृह्णामि । सुक्ष्मा चासि शिवा चासि स्योना चासि सुषदा चास्यूर्जस्वती चासि पयस्वती च ॥ २७ ॥

अर्थ—हे विष्णो, गायत्र, त्रैष्टुभ् व जागत ह्या तीन छंदस् संस्कारांनीं युक्त अशा स्फ्याच्या योगानें गायत्रानें दक्षिण दिशेला, त्रैष्टुभाने पश्चिम दिशेला व जागतानें उत्तर दिशेला मी तुझें ग्रहण करितों. हे वेदे, तुझी जमीन चांगली आहे म्हणजे खणून साफ केली आहे. राक्षस घालवून दिल्यानें तूं शान्त व सुखरूपी आहेस. तसेंच तू बसण्याला योग्य आहेस, तुझे ठायीं अन्न व दहीं वगैरे ठेविलें आहे ॥२७॥

विनियोग—'पुरा क्रूरस्य' या मंत्रानें अनुमार्जन (समीकरण–भूमी सारखी करणें) करावें. 'द्विषतो वधः' या मंत्रानें उत्तरेकडे स्फ्याचा प्रहार करावा.

पुरा क्रूरस्य विसृपो विरप्शिन्नुदादाय पृथिवीं जीवदानुम्। यामैरयꣳश्चन्द्रमसि स्वधाभिस्तासु धीरासोऽअनुदिश्य यजन्ते। प्रोक्षणीरासादय द्विषतो वधोऽसि॥ २८॥

अर्थ—हे वेदत्रयरूपी शब्द करणाऱ्या वेदिरूपी विष्णो, पृथ्वीवर मोठें युद्ध होणार होतें त्या वेळीं तिचा सारभूत भाग काढून वेदांसहवर्तमान देवांनीं तो भाग चंद्रामध्यें नेऊन ठेविला. त्याच भागावर बुद्धिमान् लोक याग करितात. तीच भूमि म्हणजे ही वेदी. हे अग्नीध्रा, तूं प्रोक्षणीजल वेदीवर ठेव. हे स्फ्या, तूं शत्रूंचा हिंसक आहेस॥ २८॥

विनियोग—शूर्प व अग्निहोत्र हवणीप्रमाणें स्रुव्याचेंही 'प्रत्युष्टम्' या मंत्रानें प्रतपन करावें. 'अनिशित' या मंत्राने संमार्जन करावें. 'अनिशिता' या मंत्रानें जुहू, उपभृत्, ध्रुवा या तीन स्रुचांचें संमार्जन करून 'प्रत्युष्टम्' या मंत्रानें तापवून वेदीवर ठेवण्याकरितां त्या स्रुचा अध्वर्यूला द्याव्यात.

प्रत्युष्टꣳरक्षः प्रत्युष्टाऽअरातयो निष्टप्तꣳरक्षो निष्टप्ताऽअरातयः। अनिशितोऽसि सपत्नक्षिद्वाजिनं त्वा वाजेध्यायै संमार्ज्मि। प्रत्युष्टꣳरक्षः प्रत्युष्टाऽअरातयो निष्टप्तꣳरक्षो निष्टप्ताऽअरातयः। अनिशितासि सपत्नक्षिद्वाजिनीं त्वा वाजेध्यायै संमार्ज्मि॥ २९॥

अर्थः—अग्नीवर स्रुव्याचें प्रतपन करावें. हा स्रुवा तापविल्यानें ह्यांत असलेले राक्षस व प्रतिबंधक सर्व शत्रू जळाले. तसेंच ह्यांत गुप्त असलेले राक्षस व प्रतिबंधक शत्रू पूर्ण तऱ्हेनें जळाले. हे स्रुव्या, तूं आमच्यावर अत्यंत तीक्ष्ण होत नाहींस. तूं शत्रुनाशक आहेस म्हणून मी तुला ध्रुवून शुद्ध करितों. तूं यज्ञद्वारां अन्नोत्पादक आहेस. यज्ञप्रकाशनाकरितां तुझी मी शुद्धि करितों. हा स्रुवा तापविल्यानें यांत असलेले राक्षस व प्रतिबंधक सर्व शत्रू जळाले. तसेंच ह्यांत गुप्त असलेले राक्षस व प्रतिबंधक शत्रु पूर्ण तऱ्हेनें जळाले. हे स्रुचे, आमच्यावर तीक्ष्ण होऊं नकोस. तूं शत्रूंची नाशक आहेस म्हणून मी तुला शुद्ध करितों. तूं यज्ञद्वारा अन्नोत्पादक आहेस म्हणून यज्ञप्रकाशनाकरितां तुझी मी शुद्धि करितों॥ २९॥

विनियोग—' अदित्यै रास्नासि ' या मंत्रानें गार्हपत्याच्या नैर्ऋत्येस बसलेल्या यजमानपत्नीच्या कमरेला मोळाच्या तीन दोऱ्यांनीं वळलेली रज्जू बांधावी. ' विष्णो-र्वेष्पः ' या मंत्रानें उजवीकडील दोरी डाव्या दोरींच्या फाशांत घालावी, वर गांठ देऊं नये. ' ऊर्जे त्वा ' या मंत्रानें तूप ओतावें. व ' अदग्धेन ' या मंत्रानें तुपांतील काडीकचरा पहाण्यास यजमानपत्नीस सांगावें.

अदित्यै रास्नासि विष्णोर्वेष्योऽस्यूर्जे त्वाऽदब्धेन त्वा चक्षुषावपश्यामि । अग्नेर्जिह्वासि सुहूर्देवेभ्यो धाम्ने धाम्ने मे भव यजुषे यजुषे ॥ ३० ॥

अर्थ—हे योक्त्र (यजमानपत्नीला मुंज गवतानें वनविलेल्या दोरीनें बंधन करितात त्या दोरीला योक्त्र म्हणतात), पृथ्वीचा तूं कंबरपट्टा आहेस. हे दक्षिणपाशा, तूं यज्ञाचा व्यापक आहेस. हे घृता, उत्तम रस प्राप्त होण्याकरितां तुला मी पातळ करितों. हे तुपा, मी उपद्रवरहित अशा डोळ्यांनीं खालीं मान घालून तुला पहातें. तूं अग्नीची जीभ आहेस व देवांचा तूं हविर्भाग आहेस म्हणून माझ्या निरनिराळ्या यागस्थानीं निरनिराळ्या यज्ञांच्या सिद्धीकरितां तूं प्राप्त हो ॥ ३० ॥

विनियोग—' सवितुस्त्वा ' या मंत्रानें आज्यांतील कचरा दूर करावा. पूर्वी-प्रमाणें प्रोक्षणींचा संस्कार करावा. व ' तेजोसि ' या मंत्रानें अध्वर्यूनें अगर यजमानानें घृताचें अवलोकन करावे. व स्रुव्यानें जुहूमध्यें ' धाम नाम ' या मंत्रानें चार वेळां आज्यग्रहण करावें.

सवितुस्त्वा प्रसव उत्पुनाम्यच्छिद्रेण पवित्रेण सूर्यस्य रश्मिभिः । सवितुर्वः÷प्रसव उत्पुनाम्यच्छिद्रेण पवित्रेण वसोः÷ सूर्यस्य रश्मिभिः । तेजोऽसि शुक्रमस्यमृतमसि धाम नामासि प्रियं देवानामनाधृष्टं देव-यजनमसि ॥ ३१ ॥

अर्थ—हे आज्य, प्रेरक अशा सूर्याच्या प्रेरणेनें मी तुला छिद्ररहित पवित्रानें व सूर्याच्या किरणांनीं शुद्ध करितों. तसेंच हे प्रोक्षणी जलांनो, यज्ञनिवासस्थानभूत अशा सूर्याच्या किरणांनीं व छिद्ररहित पवित्रानें प्रेरक देवाच्या प्रेरणेनें मी तुम्हांला शुद्ध करितों. हे आज्या, तूं शरीरकांतीला हेतुभूत असें तेज आहेस व प्रकाशक आहेस आणि विनाशरहित आहेस, त्याचप्रमाणें हे आज्या, तूं सर्व देवांचें स्थानभूत व सर्वांना नमविणारें आहेस. आणि देवांनीं तुझा तिरस्कार केला नाहीं म्हणून तूं त्यांना

प्रिय आहेस, तसेंच देवाच्या यागाचें तूं साधन आहेस. ह्याकरितां तुझें मी ग्रहण करितों ॥ ३१ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**

माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

इति प्रथमोऽध्यायः समाप्तः ।



अथ द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

विनियोग :—इध्म, वेदि व बर्हि यांचें ' कृष्णोसि ' इत्यादि मंत्रानीं प्रोक्षण करावें.

कृष्णोऽस्याखरेष्ठोऽग्नये त्वा जुष्टं प्रोक्षामि वेदिरसि बर्हिषे त्वा जुष्टं प्रोक्षामि बर्हिरसि स्रुग्भ्यस्त्वा जुष्टं प्रोक्षामि ॥ १ ॥

अर्थ :—हे इध्मा, तूं कठीण वृक्षावर राहणारा असून कृष्णमृगरूपी यज्ञाचें साधन आहेस. म्हणून अग्नीला आवडणाऱ्या अशा तुझें मी जलानें सिचन करितों. हे वेदी, तूं देवांनीं असुराकडून प्राप्त केलेली अशी आहेस. म्हणून कुश धारण करणाराला उपयोगी आहेस म्हणून तुझें मी जलानें सिंचन करितो. हे दर्भा, तूं वेदिविस्ताराला समर्थ आहेस म्हणून स्रुचांना प्रिय अशा तुझें मी सिंचन करितों ॥ १ ॥

विनियोग :—प्रोक्षणांतील अवशिष्ट जल 'अदित्यै व्युंदनम्' या मंत्रानें दर्भावर सिञ्चन करावें. ' विष्णोः ' या मंत्राने प्रस्तरग्रहण करावें. ' ऊर्णम्रदसम् ' या मंत्रानें वेदीवर दर्भ पसरावे.

अदित्यै व्युन्दनमसि विष्णो स्तुपोऽस्यूर्णम्रदसं त्वा स्तृणामि स्वासस्थां देवेभ्यो भुवपतये स्वाहा भुवनपतये स्वाहा भूतानां पतये स्वाहा ॥ २ ॥

अर्थ :—हे प्रोक्षणावशिष्ट जला, तूं पृथ्वीला भिजविणारे आहेस. हे दर्भमुष्टिरूपी प्रस्तरा, तूं यज्ञाच्या शिखेप्रमाणें आहेस. हे वेदे, ऊर्णावस्त्राप्रमाणें मऊ व देवांना सुखानें बसण्यास योग्य अशी तूं व्हावी म्हणून तुजवर मी दर्भ पसरतों. हविग्रहणांच्या वेळीं हविर्द्रव्याचा जो भाग परिधीच्या बाहेर पडतो तो अग्नीचे तीन भाऊ भुवपति, भुवनपति व भूतानां पति या तिघांना सुहुत होवो (ते तिघे अग्नीचे भाऊ परिधीरूपी झाले. त्यांवर पडलेला हविर्भाग त्या भावांना द्यावा अशी कथा वेदांत आहे) ॥ २ ॥

विनियोग :—' गंधर्वस्त्वा ' इत्यादि प्रत्येक मंत्रानें मध्यम दक्षिण व उत्तर बाजूंना परिधि ठेवावेत.

गन्धर्वस्त्वा विश्वावसुः परिदधातु विश्वस्यारिष्ट्यै यजमानस्य परिधिरस्यग्निरिडऽईडितऽइन्द्रस्य बाहुरसि दक्षिणो विश्वस्यारिष्ट्यै यज-

मानस्य परिधिरस्यग्निरिड ऽईड्डितः। मित्रावरुणौ त्वोत्तरतः परिधत्तां ध्रुवेण धर्मणा विश्वस्यारिष्टयै यजमानस्य परिधिरस्यग्निरिडऽईड्डितः ॥ ३ ॥

अर्थः—हे परिधे, विश्वावसु नांवाचा गंधर्व तुला आहवनीय अग्नीच्या पश्चात् सर्व बाजूंना स्थापना करो त्यायोगें जगाची हिंसा होणार नाहीं. तूं यजमानाचा परिधि आहेस आणि तूं आहवनीय असा भुवपति नांवाचा भाऊ आहेस म्हणून होता वगैरेनीं तुझी स्तुति केली. हे दक्षिण परिधे, तूं इंद्राचा उजवा हात आहेस. यजमानाचा परिधि आहेस आणि आहवनीयाचा दुसरा भाऊ भुवनपति नांवाचा आहेस. तुझी होत्यादिकांनीं स्तुति केली आहे. विश्वाच्या अहिंसेकरितां तुला तो इंद्र दक्षिणेकडे स्थापन करो. हे उत्तर परिधे, मित्रावरुण (वायु आणि आदित्य) स्थिर अशा धारणानें विश्वाच्या अहिंसेकरितां तुला उत्तर दिशेकडे स्थापन करोत. तूं यजमानाचा परिधि आहेस व भूतानां पति या नांवाचा आहवनीयाचा जो तिसरा भाऊ तो तूं आहेस. तुझी होत्यादिकांनीं स्तुति केली आहे ॥ ३ ॥

विनियोग—प्रथम परिधीला समिधेनें स्पर्श करून ' वीतिहोत्रम् ' या मंत्रानें आहवनीयांत इध्मकाष्ठ स्थापन करावें.

वीतिहोत्रं त्वा कवे द्युमन्तꣳ समिधीमहि। अग्ने बृहन्तमध्वरे ॥ ४ ॥

अर्थ—हे त्रिकालदर्शिन् अग्ने, समृद्धीकरिता ज्याचे हवन करितात असा प्रकाशक मोठा जो अग्नि त्या तुला आम्ही ह्या इध्मकाष्ठानें प्रकाशित करितों ॥ ४ ॥

विनियोग—' समिदसि ' या मंत्रानें परिधीला स्पर्श न करतांच द्वितीय काष्ठ अग्नीमध्यें स्थापन करावें. आहवनीयाकडे पाहून ' सूर्यस्य ' या मंत्राचा जप करावा. प्रस्तराकरितां दोन तृणें ' सवितुः ' या मंत्रानें वांकडी ठेवावीं. त्या दोन तृणांवर ' ऊर्णम्रदसम् ' या मंत्रानें प्रस्तर पसरावा. ' आ त्वा ' या मंत्रानें प्रस्तरावर दोन्ही हात ठेवावे.

समिदसि सूर्यस्त्वा पुरस्तात्पातु कस्याश्चिदभिशस्त्यै। सवितुर्बाहू स्थऽऊर्णम्रदसं त्वा स्तृणामि स्वासस्थं देवेभ्यऽआ त्वा वसवो रुद्रा आदित्याः सदन्तु ॥ ५ ॥

अर्थ—हे इध्मकाष्ठा, तूं अग्निप्रदीपक आहेस. हे आहवनीय अग्ने, कोणत्याही पापापासून सूर्य पूर्वेकडे तुझें रक्षण करो. हे दोन तृणांनो, तुम्ही सवितेचे दोन हात

आहांत; ऊर्णावस्त्राप्रमाणे मऊ अशा देवांचें सुखकारक आसन असा जो प्रस्तर त्याप्रत आम्ही पसरतों. सवनत्रयाच्या देवता, वसु, रुद्र आणि आदित्य ह्या तिघांनीं तुला सर्व बाजूंनीं पसरावें. ॥ ५ ॥

विनियोग—डावा हात प्रस्तरावर तसाच ठेवून उजव्या हातानें जुहू घ्यावी व ' घृताची ' या मंत्रानें प्रस्तरावर ठेवावी व दुसऱ्या दोन जुहू पुढील ' घृताची ' इत्यादि दोन मंत्रांनीं ठेवाव्या. नंतर ' प्रियेण धाम्ना ' या मंत्राने वेदीवर एकेक हविर्द्रव्य ठेवावें. तदनंतर ' ध्रुवा असदन् ' या मंत्राने सर्वांना स्पर्श करावा व 'पाहि' या मंत्रानें आपल्याला स्पर्श करावा.

घृताच्यसि जुहूर्नाम्ना सेदं प्रियेण धाम्ना प्रियꣳ सदऽआसीद घृताच्यस्युपभृन्नाम्ना सेदं प्रियेण धाम्ना प्रियꣳ सदऽआसीद घृताच्यसि ध्रुवा नाम्ना सेदं प्रियेण धाम्ना प्रियꣳ सदऽआसीद प्रियेण धाम्ना प्रियꣳ सदऽआसीद । ध्रुवाऽअसदन्नृतस्य योनौ ता विष्णो पाहि पाहि यज्ञं पाहि यज्ञपतिं पाहि मां यज्ञन्युम् ॥ ६ ॥

अर्थ—हे स्रुचे, तूं घृतपूर्ण आहेस. तुला जुहू असें म्हणतात. तूं देवांचे आवडतें गृह जें घृत त्यासहवर्तमान या प्रस्तारावर बैस. हे स्रुचे, तूं घृतपूर्ण आहेस. तुला उपभृत् असे म्हणतात. तूं देवांचे आवडतें गृह जें घृत त्यासहवर्तमान या प्रस्तरावर बैस. हे स्रुचे, तूं घृतपूर्ण आहेस. तुला ध्रुवा असें म्हणतात. देवांचें आवडतें गृह जें घृत त्यासहवर्तमान तूं या प्रस्तरावर बैस. हे हविर्द्रव्या, देवांचें प्रिय गृह जें आज्य त्यासहवर्तमान तूं आपल्या प्रिय स्थानावर बैस. सर्व हविर्द्रव्ये इच्छितफलदायी यज्ञाच्या जागी ध्रुव रीतीने स्थित झालीं. हे व्यापक यज्ञपुरुषा, त्या हविर्द्रव्याचें, यजमानाचें, यज्ञाचे आणि मज अध्वर्यूचे रक्षण कर. ॥ ६ ॥

विनियोग—' अग्ने वाजजित् ' या मंत्रानें अग्नीला तीन वेळां संमार्जन करावें, आहवनीयाच्या पश्चिमभागीं ' नमो देवेभ्यः ' या मंत्रानें नमस्कारांजलि करावेत (हात जोडावेत). तदनंतर ' स्वधा पितृभ्यः ' या मंत्रानें दक्षिणेकडे उत्तान अंजलि करावी, म्हणजे न मिटलेल्या ओंजळी पुढें कराव्या. ' सुयमे मे ' या मंत्रानें जुहू व उपभृत् पात्रांचें ग्रहण करावें.

अग्ने वाजजिद्वाजं त्वा सरिष्यन्तं वाजजितꣳ संमार्ज्मि । नमो देवेभ्यः स्वधा पितृभ्यः सुयमे मे भूयास्तम् ॥ ७ ॥

अर्थ—हे अन्नोत्पादक अग्ने, अन्नाच्या उद्देशाने गमन करणाऱ्या व जय मिळविणाऱ्या तुला मी जलानें शुद्ध करितों. कर्मावर अनुग्रह करणारे जे देव त्यांना नमस्कार. पालक जे पितर त्यांना हे हवि सुहुत असो. हे जुहू व उपभृत पात्रांनो, मजकरितां तुम्ही स्थिर व्हा. म्हणजे तुमच्यांत असलेलें घृत पडूं देऊं नका ॥ ७ ॥

विनियोग—'वसुमतीम्' या मंत्रानें अग्नीच्या जवळ सेवेकरितां उभें रहावें. 'इत इंद्रः' या मंत्रानें होम करावा.

अस्कन्नमय देवेभ्यऽआज्यꣳ संभ्रियासमङ्क्तेण विष्णो मा त्वावक्रमिषं वसुमतीमग्ने ते च्छायामुपस्थेषं विष्णौ स्थानमसीतऽइन्द्रो वीर्यमकृणोदूर्ध्वोऽध्वरऽआस्थात् ॥ ८ ॥

अर्थ—आज ह्या कर्माचे दिवशीं देवाकरितां तुमच्यांत (जुहू उपभृत् पात्रामध्यें) असलेलें जें घृत तें जमिनीवर सांडणार नाहीं असें मी धारण करावें. त्याला माझा पाय लागूं नये. हे अग्ने, छायेप्रमाणें तुझ्या समीप असणाऱ्या पृथ्वीचें मी सेवन करितों. हे वसुमति, तूं यज्ञाचें स्थान आहेस. हे अग्ने, तुझ्या धन देणाऱ्या वसुमति नांवाच्या छायेचें मी सेवन करितों. इंद्र ह्या देवयजन स्थानांतून ऊर्ध्व होऊनच शत्रुवधरूपी कर्म करिता झाला. म्हणून यज्ञ उंच झाला आहे ॥ ८ ॥

विनियोग—जुहूंतील घृत व ध्रुव्यांतील घृत 'संज्योतिषा' या मंत्रानें एकत्र करावें.

अग्ने वेर्होत्रं वेर्दूत्युमवतां त्वां द्यावापृथिवीऽअवत्वं द्यावापृथिवी स्विष्टकृद्देवेभ्यऽइन्द्र आज्येन हविषा भूत्स्वाहा संज्योतिषा ज्योतिः ॥ ९ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं होत्याचें व दूताचें कर्म जाणून घे. सूज्ञ अशा तुझें द्यावापृथिवीनें पालन करावें. हे अग्ने, तूंही द्यावापृथिवीचें पालन कर. अशा तऱ्हेनें परस्परांनीं परस्परांचें पालन केल्यावर इंद्रानें आज्यहवि देऊन देवांचा याग करावा. म्हणजे आम्ही जे यज्ञ करितों ते सर्व इंद्रामें परिपूर्ण करावे. हें इंद्राला दिलेलें हवि सुहुत असो. ध्रुवापात्रांतील व जुहूंतील घृतरूपी ज्योति एकत्र होवो ॥ ९ ॥

विनियोग—प्रधान यागानंतर होता आशीर्वाद देत असतां यजमानानें 'मयीदम्' या मंत्राचा जप करावा. 'उपहूता पृथिवी' या मंत्रानें पुरोडाशाचा एकेक भाग अग्नीध्रानें भक्षण करावा.

मयीदमिन्द्रऽइन्द्रियं दधात्वस्मान्रायो मघवानऽ सचन्ताम्। अस्माकऽसन्त्वाशिषः सत्या नः सन्त्वाशिषऽउपहूता पृथिवी मातोप मां पृथिवी माता ह्वयतामग्निराग्नीध्रात्स्वाहा ॥ १० ॥

अर्थ—परमेश्वर मला अभीष्ट असलेलें हें इंद्रियजन्य तेज माझे (यजमानाचे) ठायीं स्थापन करो. आणि दैव व मानुष अशा दोन्ही प्रकारचीं द्रव्यें आम्हां यजमानांकडे येवोत. आम्हीं पूर्वी मागितलेले वर परिपूर्ण होवोत. जगाची आई जी पृथ्वी तिला मीं अनुज्ञा दिली आहे. आम्हांला मातृसमान वाटणारी पृथ्वी मला हविःशेषभक्षणाची आज्ञा देवो. मीं अग्नीध्राचें काम केलें म्हणून मी अग्नि होऊन हें हवि भक्ष्य करितों. हे जाठराग्नीमध्ये सुहुत असो ॥ १० ॥

विनियोग—ब्रह्मयाने 'देवस्य त्वा' या मंत्रानें प्राशित्राचें ग्रहण करावें व 'अग्नेष्ट्वा' या मंत्रानें दांत न लावतां प्राशित्र भक्षण करावें.

उपहूतो द्यौष्पितोप मां द्यौष्पिता ह्वयतामग्निराग्नीध्रात्स्वाहा। देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्यां प्रतिगृह्णाम्यग्नेष्ट्वास्येन प्राश्नामि ॥ ११ ॥

अर्थ—मीं द्युलोकाला बोलावले आहे. तो द्युलोकरूपी पिता मला बोलावून द्वितीय हविर्भक्षणाची आज्ञा देवो. मीं हें अग्नीध्राचे काम केले म्हणून अग्निरूप होऊन हें हवि भक्षण करितो. तें जाठराग्नीमध्ये सुहुत असो. हे प्राशित्रा, प्रेरक परमेश्वराच्या प्रेरणेनें अश्विनीकुमारांच्या दोन बाहूंनीं व पूषा देवतेच्या दोन हातांनीं मी तुझें ग्रहण करितों व अग्नीच्या मुखाने मी तुझे भक्षण करितों. ॥ ११ ॥

विनियोग—समिधेच्या होमाची आज्ञा दे असें सांगितलें गेलेल्या ब्रह्मयानें 'एतं ते' पासून 'ॐ प्रतिष्ठ' पर्यंतच्या दोन मंत्रांनीं तसें करण्याची आज्ञा द्यावी.

एतं ते देव सवितर्यज्ञं प्राहुर्बृहस्पतये ब्रह्मणे। तेन यज्ञमव तेन यज्ञपतिं तेन मामव ॥ १२ ॥

अर्थ—हे दानगुणविशिष्ट प्रेरक परमेश्वरा, हा आतां केलेला यज्ञ तुजकरितां आहे असें यजमान म्हणतात व तुझ्या प्रेरणेने देवांच्या यज्ञांत ब्रह्मा झालेला जो बृहस्पति त्या कारणें आहे असेंही यजमान म्हणतात. म्हणून तूं ह्या तुझ्या यज्ञाचें व यजमानाचें व ब्रह्मा झालेल्या अशा माझें रक्षण कर. ॥ १२ ॥

मनो जूतिर्जुषतामाज्यस्य बृहस्पतिर्यज्ञमिमं तनोत्वरिष्टं यज्ञꣳसमिमं दधातु । विश्वेदेवासऽइह मादयन्तामोꣳ३प्रतिष्ठ ॥ १३ ॥

अर्थ—हे मना, तूं घृताचें सेवन कर. हे सवित्या, शीघ्रगामी असें तुझें मन यज्ञसंबंधीं घृतांत स्थापन कर. आणि बृहस्पति या यज्ञाला वाढवो. व हिंसारहित करून त्याचें धारण करो. सगळे देव या यज्ञकर्मांत संतुष्ट होवोत. अशा तऱ्हेनें प्रार्थिलेला सूर्य (ओम् प्रतिष्ठ) 'वरें आहे, प्रयाण कर' अशी आज्ञा देवो. ॥ १३ ॥

विनियोग—होत्यानें 'एषा ते' हा मंत्र म्हणावा. पूर्वी 'अग्ने वाजजित्' या मंत्रानें जसें परिक्रमण करून तीन तीनदां अग्निसंमार्जन केलें तसेंच येथें परिक्रमणरहित 'प्रस्तरांसम्' या मंत्रानें एकदां संमार्जन करावें.

एषा तेऽअग्ने समित्तया वर्धस्व चा च प्यायस्व । वर्धिषीमहि च वयमा च प्यासिषीमहि । अग्ने वाजजिद्वाजं त्वा सरिष्यन्तं वाजजितꣳ संमार्ज्मि ॥ १४ ॥

अर्थ—हे अग्ने, ही तुला प्रदीप्त करणारी समिधा आहे. तिच्या योगानें तूं वाढ. व आमची वृद्धि कर. तुझ्या अनुग्रहानें आम्ही वाढूं व आमच्या पुत्रपश्वादिकांना सर्व बाजूनें वृद्धिंगत करूं. हे अन्नोत्पादक अग्ने, अन्नाच्या उद्देशानें गमन करणाऱ्या व तें मिळविणाऱ्या अशा तुला मी जलानें शुद्ध करितो ॥ १४ ॥

विनियोग—'अग्नीषोमयोः' या मंत्रानें जुहू आणि उपभृत् यांचें व्यूहन करावें. (व्यूहन म्हणजे परस्परविरुद्ध ढकलणें. यजमानानें उपभृताने पूर्वेकडे जुहूला ढकलावें. व जुहूनें उपभृताला पश्चिमेकडे ढकलावें.)

अग्नीषोमयोरुज्जितिमनूज्जेषं वाजस्य मा प्रसवेन प्रोहामि । अग्नीषोमौ तमपनुदतां योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मो वाजस्यैनं प्रसवेनापोहामि । इन्द्राग्न्योरुज्जितिमनूज्जेषं वाजस्य मा प्रसवेन प्रोहामि । इन्द्राग्नी तमपनुदतां योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मो वाजस्यैनं प्रसवेनापोहामि ॥१५॥

अर्थ—अग्नीषोमरूपी पुरोडाश-देवतांच्या हविस्त्वीकाररूपी जयाप्रमाणें मीही उत्कृष्ट जय मिळविला. पुरोडाशाच्या आज्ञेनें जुहूरूपधारी यजमानाला मी उत्साहित करितों. जो आमचा द्वेष करितो व आम्ही ज्याचा द्वेष करितों अशा आलस्यादि शत्रूला अग्नीषोम दूर करोत. उपभृत्रूपी शत्रूला पुरोडाश देवतेच्या आज्ञेनें मी दूर

करितों. इंद्राग्नीरूपी पुरोडाश-देवतांच्या हविस्वीकाररूपी जयाप्रमाणें मींही उत्कृष्ट जय मिळविला. पुरोडाशरूपी अन्नाच्या आज्ञेनें मी उपभृत्धारी यजमानाला प्रोत्साहित करितों. जो आमचा द्वेष करितो व आम्ही ज्याचा द्वेष करितों अशा आलस्यादि शत्रूला इंद्राग्नी दूर करोत. जुहूरूपी शत्रूला पुरोडाश देवतेच्या आज्ञेनें मी दूर करितों ॥ १५ ॥

विनियोग—पूर्वीप्रमाणें 'वसुभ्यः' इत्यादि प्रत्येक मंत्रांनीं जुहूनें परिधीला घृत लावावें. 'संजानाथाम्' या मंत्रानें प्रस्तर ग्रहण करावें. 'व्यन्तु वयः' या मंत्रानें जुहूंत प्रस्तरावें अग्र, उपभृतांत मध्य व ध्रुवेंत मूल घृताने भिजवावें. 'मरुताम्' या मंत्रानें प्रस्तरातील एक काडी खालच्या भागानें काढून घेऊन अग्नींत टाकावी. 'चक्षुष्पा' या मंत्रानें आत्म्याला स्पर्श करावा.

वसुभ्यस्त्वा रुद्रेभ्यस्त्वाऽऽदित्येभ्यस्त्वा संजानाथां द्यावापृथिवी मित्रावरुणौ त्वा वृष्ट्यावताम्। व्यन्तु वयोऽक्तꣳ रिहाणा मरुतां पृषतीर्गच्छ वशा पृश्निर्भूत्वा दिवं गच्छ ततो नो वृष्टिमावह। चक्षुष्पा अग्नेऽसि चक्षुर्मे पाहि ॥ १६ ॥

अर्थ—हे मध्यम परिधे, वसुदेवतांच्या संतोषाकरितां हे दक्षिण परिधे, रुद्रदेवतांच्या संतोषाकरितां हे उत्तर परिधे, आदित्य देवतांच्या संतोषाकरितां मी तुला अंजन करितों. हे द्यावापृथ्वी देवतांनो, ह्या मीं घेतलेल्या प्रस्तरावें तुम्ही ज्ञान करून घ्या. हे प्रस्तरा, मित्रावरुण देव जलवृष्टीनें तुझें रक्षण करोत. घृतलिप्त प्रस्तराला चाटणारे पक्षीरूप धारण करणारे गायत्री वगैरे छंद प्रस्तराला घेऊन जावोत. हे प्रस्तरा, तूं मरुत् नामक देवाचीं चित्रविचित्र वर्णाचीं जीं वाहनें त्यांना प्राप्त हो. म्हणजे त्यांना घेऊन अंतरिक्षांत जा. स्वाधीन अशी अल्प शरीर धारण करणारी गाय होऊन तूं द्युलोकाला जा. नंतर तेथून आमच्याकरितां वृष्टि कर. हे अग्ने, तूं नेत्रांचें रक्षण करणारा आहेस म्हणून माझ्या नेत्रांचें रक्षण कर. ॥ १६ ॥

विनियोग—'यं परिधिम्' या मंत्रानें पहिल्या परिधीला अग्नींत टाकावें व 'अग्नेः प्रियम्' या मंत्रानें दक्षिण व उत्तर परिधीला एकदम अग्नींत टाकावें.

यं परिधिं पर्यधत्था अग्ने देव पणिभिर्गुह्यमानꣳ। तं तऽएतमनु जोषं भराम्येष नेत्त्वदपचेतयाताऽअग्नेऽ प्रियं पाथोऽपीतम् ॥ १७ ॥

अर्थ-- हे आहवनीय अग्ने, पणिनामक असुरांनीं तुला सर्व बाजूंनीं अडविल्यावर पश्चिम दिशेकडे ज्या परिधीचा तूं आश्रय केलास त्या तुझ्या आवडत्या परिधीला मी अग्नीत टाकतों. हा परिधी तुझ्यापासून दूर जाण्याची इच्छा कधींही न करो. हे दोन परिधींनो, तुम्ही अग्नीचें प्रिय असें अन्न व्हा. ॥ १७ ॥

विनियोग--' सꣳस्रवभागाः ' या मंत्रानें संस्रवांचा होम करावा.

सꣳस्रवभागा स्थेषा बृहन्तः÷ प्रस्तरेष्ठाः परिधेयाश्च देवाः। इमां वाचमभि विश्वे गृणन्तऽआसद्यास्मिन्बर्हिषि मादयध्वꣳ स्वाहा वाट्॥१८॥

अर्थ—हे विश्वेदेवांनो तुम्ही संस्रव भक्षण करणारे आहांत म्हणून पातळ अशा तुपाचें भक्षण करा. ह्या संस्रवरूपी अन्नानें तुम्ही मोठे व्हा. आणि प्रस्तरावर व परिधीवर राहणाऱ्या आणि ' हा यजमान चांगला याग करितो ' अशी माझी स्तुति करणाऱ्या अशा विश्वेदेवांनो, तुम्ही या यज्ञांत बसून तृप्त व्हा. हा हविर्भाग सर्व तऱ्हेनें तुम्हांला दिला आहे ॥ १८ ॥

विनियोग—' घृताची ' या मंत्राने जुहू व उपभृत् यांना गाड्याच्या जोकडावर ठेवावें. ' यज्ञ नमश्च ' या मंत्राने वेदीला स्पर्श करावा.

घृताची स्थो धुर्यौ पात सुम्ने स्थः÷ सुम्ने मा धत्तम्। यज्ञ नमश्च त उप च यज्ञस्य शिवे संतिष्ठस्व स्विष्टे मे संतिष्ठस्व ॥ १९ ॥

अर्थ—हे जुहू उपभृत् पात्रांनो, तुम्ही घृतपूर्ण आहांत. ह्या गाडीच्या बैलांचे रक्षण करा. तसेंच तुम्ही सुखरूपी आहांत म्हणून मला सुख द्या. हे यज्ञा, तुला नमस्कार. तुझी वृद्धि असो. हे नमस्कारा, तूं यज्ञांतील न्यूनातिरिक्त दोष दूर कर व माझा याग उत्तम कर व त्या यागांत स्थित हो ॥ १९ ॥

विनियोग—' अग्ने अदब्धाया ' या मंत्रानें स्रुक् व स्रुवा यांचें ग्रहण करावें. ' अग्नये ' व ' सरस्वत्यै ' या मंत्रांनीं दक्षिणाग्नीत होम करावा.

अग्नेऽदब्धायोऽशीतम पाहि मा दिद्योः पाहि प्रसित्यै पाहि दुरिष्ट्यै पाहि दुरद्मन्याऽअविꣳ नः÷ पितुं कृणु सुषदा योनौ स्वाहावाडग्नये संवेशपतये स्वाहा सरस्वत्यै यशोभगिन्यै स्वाहा ॥ २० ॥

अर्थ—हे उपासकाला अहिंसित आयुष्य देणाऱ्या व भोक्तृतम अशा गार्हपत्या, शत्रुप्रेरित वज्रापासून माझें रक्षण कर. तसेंच बंधनाला कारणीभूत असें जाल

(फास) अशास्त्रीय याग व दुर्भोजन ह्यांपासून माझें रक्षण कर. माझें अन्न निर्विष कर व चांगल्या तऱ्हेनें राहण्याला योग्य अशा घरांत माझी स्थापना कर. हें हवि सुहुत असो. (साभिलाष स्त्रीपुरुषांनीं जें एकत्र शयन करणें त्याला संवेश म्हणतात.) ह्या संवेशाचा अधिपति जो अग्नि व यशाची भगिनी जी वाणीरूपी सरस्वती तिला हें हवि सुहुत असो ॥ २० ॥

विनियोग—' वेदोसि ' या मंत्रानें यजमानपत्नीनें वेदकुशमुष्टि सोडावा. ' देवा गातुविदः ' या मंत्रानें ध्रुवेनें समिष्ट यजुःसंज्ञक होम करावा.

वेदोऽसि येन त्वं देव वेद देवेभ्यो वेदो भवस्तेन मह्यं वेदो भूयाꣳ । देवा गातुविदो गातुं वित्त्वा गातुमित । मनसस्पत इमं देव यज्ञꣳस्वाहा वातेधाꣳ ॥ २१ ॥

अर्थ—हे कुशमुष्टिनिर्मित वेदपदार्थी, तूं ऋग्वेदादिस्वरूपी आहेस. हे प्रकाशक वेदा, ज्या तऱ्हेने तूं देवांचा बोधक झालास त्या तऱ्हेनें माझा बोधक हो. हे यज्ञवेत्त्या देवांनो आमचा यज्ञ सुरू झाला असें समजल्याबरोबर तुम्ही यज्ञाला यावें. व आमच्या यज्ञानें संतुष्ट झाल्यावर आपल्या मार्गानें जावें. हे मनाच्या अधिपते चंद्ररूपी परमेश्वरा, मी केलेला हा यज्ञ तुझे स्वाधीन करितों. तूं तो वायुरूपी देवामध्यें स्थापन कर. ॥ २१ ॥

विनियोग—' संबर्हि ' या मंत्रानें बर्हीचा (दर्भांचा) होम करावा.

संबर्हिरङ्क्ताꣳ हविषा घृतेन समादित्यैर्वसुभिꣳ संमरुद्भिः । समिन्द्रो विश्वेदेवेभिरङ्क्तां दिव्यं नभो गच्छतु यत्स्वाहा ॥ २२ ॥

अर्थ—इंद्र संस्कारयुक्त घृतानें दर्भाला अंजन करो. तसेंच तो आदित्य, वसु, मरुत व विश्वेदेव यांसह दर्भाला अंजन करो. व ह्यांनीं अंजन केलेला तो दर्भ द्युलोकातील आदित्यरूपी ज्योतीला प्राप्त होवो. हें हवि सुहुत असो ॥ २२ ॥

विनियोग—आहवनीय अग्नीची प्रदक्षिणा करून वेदीवर ' कस्त्वा ' या मंत्रानें प्रणीता पात्राचें स्थापन करावें. ' रक्षसां ' या मंत्रानें पुरोडाश कपालावरील मृत्कण जमिनीवर टाकावेत.

कस्त्वा विमुञ्चति स त्वा विमुञ्चति कस्मै त्वा विमुञ्चति तस्मै त्वा विमुञ्चति । पोषाय रक्षसां भागोऽसि ॥ २३ ॥

अर्थ—हे प्रणीता पात्रा, तुला कोण सोडतो? तो प्रजापति परमेश्वर तुला सोडतो. तो तुला कशाकरितां सोडतो? तो आत्मसंतोषाकरितां तुला सोडतो. हे प्रणीतोदका, यजमानाला पुत्रादिक होवोत म्हणून मी तुला जमिनीवर सांडतों. हे कणसमूहा, तूं राक्षसांचा भाग आहेस ॥ २३ ॥

विनियोग—आहवनीयाला प्रदक्षिणा घालून पूर्णपात्राचें ग्रहण करावें. व 'संवर्चसा' या मंत्रानें मुखमार्जन करावें.

संवर्चसा पयसा संतनूभिरगन्महि मनसा सꣳशिवेन। त्वष्टा सुदत्रो विदधातु रायोऽनुमार्ष्टु तन्वो यद्विलिष्टम् ॥ २४ ॥

अर्थ—आम्ही ब्रह्मवर्चस तेज, क्षीरादि रस, अनुष्ठानयोग्य शरीराचे अवयव आणि शांत मन ह्यांनीं युक्त झालों आहोंत. उत्तम दान करणारा जो त्वष्टा तो मला संपत्ति देवो व माझ्या शरीरांतील जी न्यूनता ती दूर करून शरीराचें पोषण करो ॥ २४ ॥

विनियोग—'दिवि विष्णुः' इत्यादि प्रत्येक मंत्रांनी विष्णुक्रम करावें. विष्णुक्रम म्हणजे आपण पाय जमिनीवर ठेवतों ते विष्णूचे पाय आहेत असें समजणें. 'अस्मादन्नात्' या मंत्रानें आपल्या अंशाचें अवलोकन करावें. व 'अस्यै' या मंत्रानें भूमीचें अवलोकन करावें. व पूर्वदिशेकडे 'अगन्म' या मंत्रानें सूर्याचें व 'संज्योतिषा' या मंत्रानें आहवनीयाचें अवलोकन करावें.

दिवि विष्णुर्व्यक्रꣳस्त जागतेन छन्दसा ततो निर्भक्तो योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मोऽन्तरिक्षे विष्णुर्व्यक्रꣳस्त त्रैष्टुभेन छन्दसा ततो निर्भक्तो योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मः पृथिव्यां विष्णुर्व्यक्रꣳस्त गायत्रेण छन्दसा ततो निर्भक्तो योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मोऽस्मादन्नादस्यै प्रतिष्ठायाऽअगन्म स्वꣳ संज्योतिषाभूम ॥ २५ ॥

अर्थ—यज्ञपुरुष द्युलोकाप्रत जगतीच्छंदानें, अंतरिक्षलोकाप्रत त्रिष्टुप् छंदानें, व पृथ्वीलोकाप्रत गायत्रीच्छंदानें आक्रमण करिता झाला. व त्या तिन्ही लोकांतून जो शत्रु आमचा द्वेष करितो व आम्ही ज्याचा द्वेष करितो त्या शत्रूला घालविता झाला. व त्यापुढें असलेल्या यजमान भागापासून व पुढें असलेल्या या यज्ञभूमीपासून आम्हीं त्या शत्रूचें निवारण केलें. व यज्ञानुष्ठानानें आम्ही स्वर्गलोकाला प्राप्त झालों. तसेंच आहवनीयरूपी तेजानें युक्त झालों. ॥ २५ ॥

विनियोग—' स्वयंभूः ' या मंत्रानें सूर्याचें अवलोकन करावें व ' सूर्यस्य ' या मंत्रानें प्रदक्षिणा करावी.

स्वयंभूरसि श्रेष्ठो रश्मिर्वर्चोदाऽअसि वर्चो मे देहि । सूर्यस्यावृत-मन्वावर्ते ॥ २६ ॥

अर्थ—हे सूर्या तूं स्वयंसिद्ध प्रशस्त व रश्मिमंडल-शरीराभिमानी हिरण्यगर्भ नांवाचा आहेस. तूं तेज देणारा आहेस म्हणून मला ब्रह्मवर्चस तेज दे. सूर्याप्रमाणें मी प्रदक्षिणा करितों ॥ २६ ॥

विनियोग—' अग्ने गृहपते ' या मंत्राने गार्हपत्य अग्नीचें उपस्थान करावें. व ' सूर्यस्य ' या मंत्रानें प्रदक्षिणा करावी.

अग्ने गृहपते सुगृहपतिस्त्वयाग्नेऽहं गृहपतिना भूयासꣳ सुगृहपतिस्त्वं मयाग्ने गृहपतिना भूयाः । अस्थूरि णौ गार्हपत्यानि सन्तु शतꣳ हिमाः सूर्यस्यावृतमन्वावर्ते ॥ २७ ॥

अर्थ—हे गृहपालका अग्ने, तुझ्या प्रसादानें मी चांगला गृहपालक होईन. व माझ्या सेवेनें तूंही गृहाचा पालक हो. अशा तऱ्हेनें आमचीं पतिपत्नींचीं कम शंभर वर्षेपर्यंत निरंतर सावधानतेने होवोत. ज्याप्रमाणें दोन्ही बाजूंना बैल जोडलेला गाडा निरंतर चालतो त्याप्रमाणे आमचीं कर्मे प्रवृत्त होवोत. सूर्याप्रमाणें मी प्रदक्षिणा करितों ॥ २७ ॥

विनियोग—व्रतग्रहणाचे वेळीं दोन मंत्र सांगितले आहेत त्यांपैकी यजमानानें ज्या मंत्रानें व्रतग्रहण केलें असेल त्याच मंत्राने व्रतत्याग करावा.

अग्ने व्रतपते व्रतमचारिषं तदशकं तन्मे राध्यदमहं यऽएवास्मि सोऽस्मि ॥ २८ ॥

अर्थ—हे कर्मपालक अग्ने, मी सत्यभाषणादिव्रत केलें व तें करणे मला तुझ्या प्रसादानेच शक्य झाले. तूं माझें तें व्रत सिद्ध केलेस. हे अग्ने, हे व्रत मीं संपविलें. जसा मी पूर्वी मनुष्य होतों तसा आतांही आहे. म्हणजे व्रतसमाप्तीचें श्रेय तुजकडे आहे मला नाहीं ॥ २८ ॥

विनियोग—त्यानंतर सार तंदुल (सगळे तांदूळ) अपूर्ण (अर्धवट) शिजवून त्याचा तूप घालून ते स्थालींत काढून घेऊन त्याच्या ' अग्नये ' व ' सोमाय ' अशा

दोन आहुति विकंकतवृक्षाच्या मेक्षणाने द्याव्या. व ' अपहता ' या मंत्रानें दक्षिणेकडे रेखाकरण करावें.

अग्नये कव्यवाहनाय स्वाहा सोमाय पितृमते स्वाहा । अपहता असुरा रक्षाꣳसि वेदिषदः ॥ २९ ॥

अर्थ—(भूतकालीन कर्म पाहणारे जे पितृगण त्यांस कवि म्हणतात. व त्यांस दिलेलें जें हविर्द्रव्य त्यास कव्य म्हणतात.) कव्याचें धारण करणारा जो अग्नि त्याला हा हविर्भाग दिला आहे. पितृयुक्त सोमनामक जो देव त्याला हा हविर्भाग दिला आहे. वेदीवर राहणारे जे राक्षस व असुर ते वेदीपासून भ्रष्ट झाले. ॥ २९ ॥

विनियोग—' ये रूपाणि ' या मंत्रानें रेखेच्या पलीकडे उल्मूक ठेवावा.

ये रूपाणि प्रतिमुञ्चमाना ऽआसुराः सन्तः स्वधया चरन्ति । परापुरो निपुरो ये भरन्त्यग्निष्टाँल्लोकात्प्रणुदात्यस्मात् ॥ ३० ॥

अर्थ—पैतृक अन्न भक्षण करण्याकरितां स्वतःचे रूप टाकून पितृरूप धारण करणारे जे असुर ह्या पितृयज्ञस्थानांत जे संचार करितात, तसेंच जे असुर आपलें राक्षसत्व झांकण्याकरितां स्थूल सूक्ष्म शरीर धारण करितात त्या राक्षसांना हा उल्मूकरूपी अग्नि ह्या पितृयज्ञ स्थानापासून दूर करो ॥ ३० ॥

विनियोग—' अत्र पितरः ' या मंत्राने श्वास रोखला जाईपर्यंत उत्तरेकडे तोंड करून बसावें व ' अमीमदंत ' या मंत्राचा जप करावा.

अत्र पितरो मादयध्वं यथाभागमावृषायध्वम् । अमीमदन्त पितरो यथाभागमावृषायिषत ॥ ३१ ॥

अर्थ—हे पितरांनो, तुम्ही या दर्भावर संतुष्ट होऊन वसा. नंतर दुसऱ्याच्या भागाचें अतिक्रमण न करितां आपापल्याच भागाचा स्वीकार करा. ज्याप्रमाणें एखादा बैल आवडतें तृण यथेच्छ भक्षण करितो त्याप्रमाणें तुम्ही आपला भाग यथेच्छ खा. पूर्वोक्त पितर संतुष्ट होऊन बैल तृण खातो त्याप्रमाणें दुसऱ्याचे भागाचें अतिक्रमण न करितां आपापल्या भागाचें यथेच्छ भक्षण करिते झाले ॥ ३१ ॥

विनियोग—' नमो वः ' या मंत्रानें सहा उत्तान अञ्जलिरूपी नमस्कार करावे. ' एतद्वः ' या मंत्रानें प्रत्येक पिंडाला तीन सूत्रें किंवा ऊर्णा किंवा दशा समर्पण करावी व यजमानाचें वय पन्नास वर्षांच्या पुढें असेल तर त्याचे लोम (छातीवरील केश) पिंडावर वहावे.

नमो वः पितरो रसाय नमो वः पितरः शोषाय नमो वः पितरो जीवाय नमो वः पितरः स्वधायै नमो वः पितरो घोराय नमो वः पितरो मन्यवे नमो वः पितरः पितरो नमो वो गृहान्नः पितरो दत्त सतो वः पितरो देष्मैतद्वः पितरो वास आधत्त ॥ ३२ ॥

अर्थ—हे पितरांनो, रसरूपी वसंत, शुष्कतारूपी ग्रीष्म, जीवनहेतुभूत जलरूपी वर्षा, पित्रन्नस्वधारूपी शरद्, प्राण्यांना घोररूपी असणारा हेमंत आणि क्रोधरूपी शिशिर हीं तुमचीं स्वरूपें आहेत. अशा ऋतुस्वरूपी तुम्हांला सादर नमस्कार असो. हे पितरांनो तुम्ही आम्हाला भार्यापुत्रादिक द्या व आमच्याकडे असलेलें द्रव्य वगैरे आम्ही तुम्हांला देऊं. हे पितरांनो, हें वस्त्रसूत्र तुमचें परिधान असो. ॥ ३२ ॥

विनियोग—यजमानपत्नीला मुलगा व्हावा अशी इच्छा असल्यास तिनें 'आधत्त' या मंत्राने मध्यम पिंड भक्षण करावा.

आधत्त पितरो गर्भं कुमारं पुष्करस्रजम् । यथेह पुरुषोऽसत् ॥ ३३ ॥

अर्थ—हे पितरांनो तुम्ही ह्याच ऋतूंच्या ठायीं देव, पितृ, व मनुष्य यांच्या इच्छा पूर्ण करील असा पद्ममालाधारी अश्विनीकुमारतुल्य मुलाचा गर्भ द्या. ॥३३॥

विनियोग—'ऊर्जम्' या मंत्राने पिंडाच्या मूलप्रदेशीं जलसिंचन करावें.

ऊर्जं वहन्तीरमृतं घृतं पयः कीलालं परिस्रुतम् । स्वधास्थ तर्पयत मे पितॄन् ॥ ३४ ॥

अर्थ—हे जलांनो, तुम्ही अन्न, घृत व पय या तीन शब्दांनीं वाच्य असा फुलांतील सारभाग धारण करणारे आहांत. ऊर्ज, घृत आणि पय हीं मृत्युनाशक व बंधनिवारक आहेत. तुम्ही पितृहव्यस्वरूपी आहांत म्हणून माझ्या पितरांना संतुष्ट करा. ॥ ३४ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**
माध्यन्दिनीयवाजसनेयसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

इति द्वितीयोऽध्यायः समाप्तः ।



अथ तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥



विनियोग—पहिल्या व दुसऱ्या अध्यायांत दर्शपौर्णमास इष्टींचे मंत्र सांगितले. यापुढें या अध्यायाचे पहिले आठ मंत्र आधानासंबंधी आहेत. चार ऋत्विजांना पुरेसा भात शिजवून भांड्यांत काढून त्या भातांत तुपाकरितां आळें करून त्यांत तूप ओतावें व त्या तुपांत तीन समिधा भिजवून घेऊन त्यांचा पहिल्या तीन ऋचांनीं होम करावा.

सामेधाग्निं दुवस्यत घृतैर्बोधयतातिथिम् । आस्मिन्हव्या जुहोतन ॥१॥

अर्थ—हे ऋत्विजांनों तुम्ही काष्ठरूप समिधेनें अग्नीची सेवा करा. व आतिथ्य-कर्मानें पूज्य अशा अग्नीला पूर्णाहुतिसंबधीं घृताने प्रज्वलित करा. नंतर प्रज्वलित झालेल्या अग्नीमध्यें नानाप्रकारच्या हविर्द्रव्यांचा सर्व बाजूंनीं होम करा. ॥ १ ॥

सुसमिद्धाय शोचिषे घृतं तीव्रं जुहोतन । अग्नये जातवेदसे ॥ २ ॥

अर्थ—हे ऋत्विजांनो तुम्ही अग्नीमध्ये सुसंस्कृत घृताचा होम करा. तो अग्नि चांगला प्रदीप्त झालेला व प्रकाशमान आणि सर्व ज्ञानांचा उत्पादक आहे. ॥ २ ॥

तं त्वा समिद्भिरङ्गिरो घृतेन वर्धयामसि । बृहच्छोचा यविष्ठ्य ॥ ३ ॥

अर्थ—प्रत्येक यज्ञांत गमन करणाऱ्या व नेहमीं तरुण राहणाऱ्या हे अग्ने, तुला आम्ही समिधांनी व संस्कारयुक्त घृतानें वाढवितो. तू अतिशय प्रकाशित हो. ॥ ३ ॥

विनियोग—' उप त्वा ' या मंत्राचा जप करावा.

उप त्वाग्ने हविष्मतीर्घृताचीर्यन्तु हर्यत । जुषस्व समिधो मम ॥ ४ ॥

अर्थ--हे अग्ने हविर्युक्त व घृतांत बुडविलेल्या समिधा तुला प्राप्त होवोत. त्या समिधांची इच्छा करणारा तूं तुजकडे येणाऱ्या त्या माझ्या समिधांचें सेवन कर. ॥४॥

भूर्भुवः स्वर्द्यौरिव भूम्ना पृथिवीव वरिम्णा । तस्यास्ते पृथिवि देव-यजनि पृष्ठेऽग्निमन्नादमन्नाद्यायादधे ॥ ५ ॥

अर्थ—भूः, भुवः, स्वः या तीन व्याहृतीचा अर्थ ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य अथवा आत्मा, प्रजा आणि पशु असा आहे. या अर्थाच्या व्याहृतीनीं प्रार्थना करून अग्नीचें स्थापन करावें. तात्पर्य ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य अथवा आत्मा, प्रजा व पशु हे सर्व

माझ्या स्वाधीन होवोत. देवांच्या यज्ञाला साधनीभूत अशा हे पृथ्वी तुझ्या पृष्ठावर हुत अन्न भक्षण करणारा गार्हपत्यादि अग्नि मी स्थापन करितों. त्यायोगें मला भक्ष्य व भोज्य अन्न प्राप्त होवो. तुझ्या पृष्ठावर अग्नि स्थापन करून द्युलोक ज्याप्रमाणें नक्षत्रबहुत्वानें विशिष्ट आहे त्याप्रमाणें मी पुष्कळ पुत्र पशु वगैरेंनीं युक्त होवो. तसेंच विस्तृत असल्यानें पृथिवी जशी सर्व प्राण्यांना आश्रय देते त्याप्रमाणें मी सर्व प्राण्यांना आश्रय देणारा होवो. ॥ ५ ॥

विनियोग--' आयं गौः ' इत्यादि तीन मंत्रानीं आहवनीयाचें उपस्थान करावें व नंतर दक्षिणाग्नीचें आधान करावें.

आयं गौऽ पृश्निरक्रमीदसदन्मातरं पुरऽ । पितरं च प्रयन्त्स्वः ॥ ६ ॥

अर्थ--यज्ञसिद्धीकरितां निरनिराळ्या यजमानांच्या घरीं जाणारा, लोहित शुक्लवगैरे वर्णांच्या ज्वालांनीं युक्त असा हा अग्नि आहवनीय गार्हपत्य व दक्षिणाग्नि स्थानांवर आरोहण करिता झाला. व पूर्वदिशेकडे आहवनीयरूपानें पृथ्वीवर वसला. तसेंच आदित्यरूपानें स्वर्गात संचार करणारा हा पितृभूत अशा द्युलोकाप्रतही प्राप्त होता झाला. ॥ ६ ॥

अन्तश्चरति रोचनास्य प्राणादपानती । व्यख्यन्महिषो दिवम् ॥ ७ ॥

अर्थ--सर्व शरीरामध्यें प्राण व अपान वायूंना प्रेरणा करणारी ह्या अग्नीची ही वायु नांवाची एक अनिर्वचनीय शक्ति द्युलोक व पृथ्वीलोक यांमध्यें शरीरांत संचार करीत आहे. यजमानांना यागकर्तृत्व स्वरूप देणारा हा अग्नि त्यांना द्युलोकरूपी उपभोगस्थान प्रकाशित करता (दाखविता) झाला. ॥ ७ ॥

त्रिष्टुब्गायत्री छन्दऽ इन्द्रियं त्रिवृच्छिरो विराजो मध्यं पक्षौ त्र्यविः कायो बृहद्रथन्तरे पक्षौ पञ्चाविः पुच्छं छन्दाँसि वयाँसि ॥ ८ ॥

अर्थ—निरलस अशा यजमानांच्या अनुष्ठानानें आहवनीयादि अग्नींचें स्थान (शालागृह) महिन्यांतील तीसही दिवस विशेषेंकरून शोभतें (प्रकाशतें). एखादा पक्षी ज्याप्रमाणें एका स्थानापासून दुसऱ्या स्थानाप्रत जातो त्याप्रमाणें अग्निमुद्धां गार्हपत्यांतून आहवनीयामध्यें जातो. अशा तऱ्हेनें अग्नीची पक्षिरूपानें स्तुति केली जाते, आणि रोज प्रकाश पावतो म्हणूनही त्याची स्तुति केली जाते. ॥ ८ ॥

विनियोग—नऊ व दहा हे मंत्र अग्निहोत्र होमाचे आहेत. ब्रह्मवर्चसाची इच्छा करणाऱ्या अग्निहोत्र्यानें 'अग्निर्वर्चः' या मंत्रानें सायंकालीं व 'सूर्यो वर्चः' या मंत्रानें प्रातःकालीं होम करावा अथवा 'ज्योतिः सूर्यः' हाही प्रातःकालचा मंत्र आहे.

अग्निर्ज्योतिर्ज्योतिरग्निः स्वाहा सूर्यो ज्योतिर्ज्योतिः सूर्यः स्वाहा । अग्निर्वर्चो ज्योतिर्वर्चः स्वाहा सूर्यो वर्चो ज्योतिर्वर्चः स्वाहा । ज्योतिः सूर्यः सूर्यो ज्योतिः स्वाहा ॥ ९ ॥

अर्थ--जो हा अग्निदेव आहे तेंच दृश्यमान असें ज्वालेचें स्वरूप आहे व जें दृश्यमान ज्वालास्वरूपी आहे तोच अग्नि आहे. अग्नि आणि ज्वाला यांचा केव्हांही वियोग नसल्यामुळें त्यांचें एकत्व सांगितलें आहे. ज्योतिरूपी अग्नीला दिलेलें हवि सुहुत असो. (•सूर्यो ज्योतिः हा प्रातःकालचा होममंत्र आहे.) ज्योति व सूर्य एकच आहेत. म्हणून ज्योतिरूपी सूर्याला दिलेलें हें हवि सुहुत होवो. तसेंच वर्चस् (तेज) आणि अग्नि तसेंच वर्चस् आणि सूर्य एकच आहेत. ज्योति आणि वर्चस् हेही एकच आहेत. म्हणून त्या अग्नीला व सूर्याला दिलेलें हवि सुहुत असो. ज्योति आणि सूर्य एकच आहेत म्हणून दिलेलें हवि सुहुत असो. ॥ ९ ॥

विनियोग--अथवा सजूः ह्या मंत्रानें होम करावा.

सजूर्देवेन सवित्रा सजू रात्रेन्द्रवत्या जुषाणोऽअग्निर्वेतु स्वाहा । सजूर्देवेन सवित्रा सजूरुषसेन्द्रवत्या । जुषाणः सूर्यो वेतु स्वाहा ॥१०॥

अर्थ--प्रेरक अशा सवितृ परमेश्वरावर आणि इंद्रयुक्त रात्रीदेवतेवर सारखी प्रीति करणारा जो अग्नि तो आमच्यावर तशीच प्रीति करो. व आमच्या कर्मात येऊन आहुति भक्षण करो. हें अग्नीला दिलेलें द्रव्य सुहुत असो. (हा मंत्र रात्रीं म्हणावा व उत्तरार्ध सूर्याचा मंत्र आहे तो सकाळीं म्हणावा.) प्रेरक अशा सवितृ परमेश्वरावर आणि इंद्रयुक्त उषा देवतेवर सारखी प्रीति करणारा जो सूर्य तो आमच्यावर तशी प्रीति करो. व आमच्या कर्मांत येऊन आहुति भक्षण करो. हें सूर्याला दिलेलें द्रव्य सुहुत असो ॥ १० ॥

विनियोग--सायंकाळच्या आहुतीचा होम झाल्यावर या मंत्रापासून सदतिसाव्या मंत्रापर्यंतच्या मंत्रांनीं आहवनीय व गार्हपत्य अग्नीचें उपस्थान करावें.

उपप्रयन्तोऽअध्वरं मन्त्रं वोचेमाग्नये । आरेऽअस्मे च शृण्वते ॥११॥

अर्थ—यज्ञाप्रत प्राप्त होणारे आम्ही दुरून व जवळून ऐकणाऱ्या अशा अग्निकारणें मंत्र म्हणतों. ॥ ११ ॥

अग्निर्मूर्धा दिवः ककुत्पतिः पृथिव्याऽअयम् । अपाꣳरेताꣳसि जिन्वति ॥ १२ ॥

अर्थ--द्युलोकाचें मस्तक असलेला व बैलाच्या वशिंडाप्रमाणें आदित्यरूपानें सर्वोच्यावर राहणारा जगत्कारण व पृथ्वीपालन करणारा असा हा अग्नि वृष्टीच्या रूपानें पडणाऱ्या जलांचा परिणाम म्हणजे व्रीहि यवरूपी धान्य यांस वाढवितो. ॥ १२ ॥

उभा वामिन्द्राग्नीऽआहुवध्याऽउभा राधसऽसह मादयध्यै । उभा दातारावि षाᳬ रयीणामुभा वाजस्य सातये हुवे वाम् ॥ १३ ॥

अर्थ--हे इंद्राग्निदेवांनो, मी तुम्हांला बोलाविण्याची इच्छा करितों. व एका कर्मांत तुम्ही हा हविर्भाग ग्रहण करून संतुष्ट व्हा अशी इच्छा करितों. तुम्ही धन देणारे आहांत म्हणून धन देण्याकरितां तुम्हाला मी बोलावितों. ॥ १३ ॥

अयं ते योनिर्ऋत्वियो यतो जातोऽअरोचथाऽ । तं जानन्नग्नऽआरोहाथा नो वर्धया रयिम् ॥ १४ ॥

अर्थ—हे आहवनीय अग्ने, सायंप्रातःकालीं उत्पन्न होण्याला योग्य असा गार्हपत्य अग्नि तुझें उत्पत्तिस्थान आहे. तूं गार्हपत्यापासून उत्पन्न होऊन कर्मकालीं प्रकाशित झालास म्हणून हे अग्ने, तूं त्या गार्हपत्याला आपलें उत्पत्तिस्थान समजून कर्माचे शेवटीं त्यांत प्रवेश कर. आणि तदनंतर याग करण्याकरितां आमचें द्रव्य वाढीव. ॥ १४ ॥

अयमिह प्रथमो धायि धातृभिर्होता यजिष्ठोऽअध्वरेष्वीड्यः । यमप्नवानो भृगवो विरुरुचुर्वनेषु चित्रं विभ्वं विशेविशे ॥ १५ ॥

अर्थ—हा आहवनीय अग्नि ह्या स्थानामध्यें मुख्य असून आधान करणाऱ्या यजमानानें स्थापन केला आहे. हा अग्नि देवांचें आव्हान करणारा व सर्वोत्तम तऱ्हेनें याग करणारा आहे. यज्ञांत ऋत्विज त्याची स्तुति करितात. भृगुकुलोत्पन्न पुत्रवान् मुनी प्रत्येक यजमानाकरितां अरण्यामध्यें ह्या अग्नीला प्रदीप्त करिते झाले. हा अग्नि निरनिराळ्या कर्मांत उपयोगी पडणारा असल्यामुळें आश्चर्यकारक व व्यापक आहे. ॥ १५ ॥

अस्य प्रत्नामनु द्युतᳬ शुक्रं दुदुह्रेऽअह्रयः । पयः सहस्रसामृषिम् ॥१६॥

अर्थ—ह्या अग्नीची फार प्राचीन-कालापासून असलेली जी कांति तिचें अनुसरण करून म्हणजे अग्नीच्या दीप्तीकडे लक्ष देऊन दोहन करणारे लोक संकोचरहित होऊन जिचें दूध हजारों कामांत उपयोगी पडतें अशा गाईचें शुद्ध दूध काढते झाले. ॥१६॥

तनूपाऽअग्नेऽसि तन्वं मे पाह्यायुर्दाऽअग्नेस्यायुर्मे देहि वर्चोदाऽअग्नेऽसि वर्चो मे देहि । अग्ने यन्मे तन्वाऽऊनं तन्मऽआपृण ॥ १७ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं स्वभावतःच अग्निहोत्र्याच्या शरीराचें पालन करणारा आहेस म्हणून माझ्या शरीराचें पालन कर. तसेंच तूं आयुष्य व तेज देणारा आहेस म्हणून मला आयुष्य व तेज दे. आणि हे अग्ने, माझ्या शरीरेंद्रियांत जें न्यून असेल तें तूं पूर्ण कर. ॥ १७ ॥

इन्धानास्त्वा शतꣳ हिमा द्युमन्तꣳ समिधीमहि । वयस्वन्तो वयस्कृतꣳ सहस्वन्तꣳसहस्कृतम् । अग्ने सपत्नदम्भनमदब्धासोऽअदाभ्यम् । चित्रावसो स्वस्ति ते पारमशीय ॥ १८ ॥

अर्थ—हे अग्ने, शंभर वर्षेपर्यंत आम्ही तुला प्रकाशित करीत राहूं. तुझ्या कृपेनें आम्ही प्रकाशित होऊं. आम्हाला अन्न व बळ मिळेल. व कोणीही आमची हिंसा करणार नाहीं. कारण तूं प्रकाशमान, अन्नबल देणारा, शत्रूंचा नाश करणारा व कोणालाही अहिंस्य असा आहेस. चंद्रनक्षत्रादिक विविध पदार्थ धारण करणाऱ्या हे रात्री आम्ही कल्याणकारक रीतीनें तुझ्या समाप्तीला प्राप्त होऊं म्हणजे सर्व रात्रभर आम्हांला चोरांची व राक्षसांची पीडा न होवो. ॥ १८ ॥

विनियोग—उपस्थानाच्या वेळीं मागील मंत्रापर्यंत उभें रहावयाचें आहे. ' संत्वम् ' (३-१९) या मंत्रापासून बसून उपस्थान करावें.

सं त्वमग्ने सूर्यस्य वर्चसागथाꣳ समृषीणाꣳस्तुतेन । सं प्रियेण धाम्ना समहमायुषा सं वर्चसा सं प्रजया सꣳ रायस्पोषेण गमिषीय ॥ १९ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं रात्रीच्या वेळीं सूर्याच्या तेजानें युक्त झाला आहेस. तसेंच ऋषींच्या स्तोत्रांनीं व प्रिय आहुतींनीं युक्त झाला आहेस. ज्याप्रमाणें ह्या तीन वस्तूंनीं युक्त झालास त्याप्रमाणें मीही तुझ्या प्रसादानें आयुष्य, वैदिक तेज, पुत्रादिक प्रजा आणि धनवृद्धीनें युक्त व्हावें म्हणजे आयुष्यादि मला प्राप्त होवो. ॥ १९ ॥

विनियोग—' अंधस्थ ' व ' रेवती ' या दोन मंत्रांनीं गाईंच्या समीप गमन करावें.

अन्धस्थान्धो वो भक्षीय महस्थ महो वो भक्षीयोर्जस्थोर्जं वो भक्षीय रायस्पोषस्थ रायस्पोषं वो भक्षीय ॥ २० ॥

अर्थ—हे गाईनो, तुम्ही अन्नरूपी आहांत म्हणून तुमच्या प्रसादानें मी क्षीरादि अन्न भक्षण करीन. तसेंच तुम्ही पूज्य आहांत म्हणून तुमच्या प्रसादानें मला पूज्यत्व

प्राप्त होवो. तुम्ही बलरूपी आहांत म्हणून तुमच्या प्रसादानें मला बल प्राप्त होवो. तसेंच तुम्ही धनपोषण करणाऱ्या आहांत म्हणून तुमच्या प्रसादानें माझ्या धनाचें पोषण होवो. ॥ २० ॥

रेवती रमध्वमस्मिन्योनावस्मिन् गोष्ठेऽस्मिँल्लोकेऽस्मिन्क्षये। इहैव स्त मापगात ॥ २१ ॥

अर्थ—हे धनयुक्त गाईनो, ह्यापुढें असलेल्या अग्निहोत्र-हविर्द्रव्याच्या दोहन-स्थानामध्यें (दूध काढण्याचे जागीं) स्वस्थ चित्तानें रहा व दोहन झाल्यावर यजमानाच्या गुरचराईच्या जागीं सुखानें संचार करा. व रात्रीं यजमानाचे घरीं गोठ्यांत शांत रीतीनें रहा. दुसरीकडे जाऊं नका. ॥ २१ ॥

विनियोग—'सꣳहिता' या मंत्रानें गाईला स्पर्श करावा. 'उपत्वा' या मंत्रानें गार्हपत्यासमीप जाऊन उपस्थान करावें.

सꣳहितासि विश्वरूप्यूर्जामाविंश गौपत्येन। उप त्वाग्ने दिवेदिवे दोषावस्तर्धिया वयम्। नमो भरन्तऽएमसि ॥ २२ ॥

अर्थ—हे गाई, तूं यज्ञकर्मानें संयुक्त आहेस. शुक्लकृष्णादि बहुरूपानें युक्त अशी तूं क्षीरादि रस मला दे. व माझें स्वामित्व पतकर. रात्रींसुद्धां उपासकाच्या घरीं निवास करणाऱ्या म्हणजे रात्रंदिवस यज्ञ-शालेंत राहणाऱ्या हे अग्ने गार्हपत्या, प्रत्येक दिवशीं आम्ही यज्ञ करण्याकरितां श्रद्धायुक्त अंतःकरणानें तुजकडे प्राप्त होतों व तुला नमस्कार करतों. ॥ २२ ॥

राजन्तमध्वराणां गोपामृतस्य दीदिविम्। वर्धमानꣳ स्वे दमे ॥ २३ ॥

अर्थ—आम्ही प्रकाशमान, यज्ञाचें रक्षण करणारा आणि सत्यवचन प्रकाशित करणारा आमच्या घरामध्यें चातुर्मास्यादि यज्ञस्वरूपानें वाढणारा जो अग्नि त्याप्रत प्राप्त होऊं ॥ २३ ॥

स नः÷ पितेव सूनवेऽग्ने सूपायनो भव। सचस्वा नꣳ स्वस्तये ॥ २४ ॥

अर्थ—हे अग्ने गार्हपत्या, ज्याप्रमाणें बाप निर्भय रीतीनें मुलाकडे जातो त्याचप्रमाणें तो पूर्वोक्तगुण असा तूं आम्हाला सुखानें प्राप्त हो. आणि आमच्या कल्याणाकरितां तूं उत्तम कर्मानें युक्त हो. ॥ २४ ॥

अग्ने त्वं नोऽअन्तम उत त्राता शिवो भवा वरूथ्यु÷। वसुरग्निर्वसुश्रवाऽअच्छा नक्षि द्युमत्तमꣳ रयिं दा÷ ॥ २५ ॥

अर्थ--हे गार्हपत्य अग्ने, तूं सर्वदा आमच्याजवळ रहा. आमचें पालन कर. व शांत होऊन आमच्या पुत्रादिकांचें रक्षण कर. तूं सर्व लोकांचें आश्रयस्थान आहेस. आहवनीयादि रूपानें गमन करणारा व धनदाता म्हणून ज्याची कीर्ति आहे अशा हे अग्ने, तूं निर्मल स्वभावाचा होऊन आमच्या होमस्थानाप्रत ये. म्हणजे जेव्हां जेव्हां आम्ही होम करूं तेव्हां तेव्हां तूं होमशालेंत प्राप्त हो. आणि अत्यंत प्रकाशयुक्त द्रव्य आम्हाला दे ॥ २५ ॥

तं त्वा शोचिष्ठ दीदिवꣳ सुम्नाय नूनमीमहे सखिभ्यꣳ । स नो बोधि श्रुधी हवमुरुष्या णोऽअघायतः समस्मात् ॥ २६ ॥

अर्थ—ज्वालायुक्त व सर्व प्रकाशक अग्ने, पूर्वोक्त गुणविशिष्ट अशा तुजकडे आम्ही आमच्या मित्राच्या कल्याणाची निश्चयेंकरून याचना करितों. तो तूं आमचा अभिप्राय जाणून आमचें बोलावणें ऐक. व सर्व शत्रूंपासून आमचें रक्षण कर. ॥२६॥

विनियोग—'सोमानम्' या नऊ मंत्राचा आहवनीयाजवळ पूर्वाभिमुख उभे राहून जप करावा.

इडे पह्यदिति पाहि काम्याऽएतं । मयि वꣳ कामधरणं भूयात् ॥ २७ ॥

अर्थ—हे इडे (मनुदुहिते), हे अदिति (दयामाते), तुम्ही सर्व प्रार्थनीय आहांत. तुम्ही आमच्या होमस्थानाप्रत या. तुमचा अपेक्षित काम धारण करण्याचा जो धर्म तो माझे ठायीं असो. म्हणजे तुमच्या कृपेनें मीं अभीष्ट फल धारण करावें ॥ २७ ॥

विनियोग—'इडएहि' या मंत्रानें गाईचे समीप उभें राहावें व 'काम्याएत' या मंत्रानें तिला स्पर्श करावा.

सोमानꣳ स्वरणं कृणुहि ब्रह्मणस्पते । कक्षीवन्तं यऽऔशिजः ॥२८॥

अर्थ—हे ब्रह्मणस्पते वेदपालका, ज्याप्रमाणें तूं दीर्घतमस्संज्ञक पित्यापासून व उशिक्संज्ञक मातेपासून झालेला जो कक्षीवान् नांवाचा ऋषि त्याला तूं सोमयागयुक्त व स्तुतियुक्त करिता झालास त्याप्रमाणें मलाही तसा कर. ॥ २८ ॥

यो रेवान्योऽअमीवहा वसुवित् पुष्टिवर्धनः । स न॑ः सिषक्तु यस्तुरः ॥ २९ ॥

अर्थ—द्रव्यवान्, रोगनाशक, धन जाणणारा, पुष्ट करणारा व शीघ्र कार्य करणारा असा जो ब्रह्मणस्पति तो आमचें सेवन करो म्हणजे आम्हांप्रत प्राप्त होवो. ॥ २९ ॥

मा नः शꣳसोऽअरुषो धूर्तिः प्रणङ्मर्त्यस्य । रक्षा णो ब्रह्मणस्पते ॥ ३० ॥

अर्थ—केव्हांही हविर्दान न करणाऱ्या माणसाचें आमच्यासंबंधीं चालत असलेलें अनिष्ट चिंतन व हिंसा आमचा नाश न करो. हे ब्रह्मणस्पते वेदपालक अग्ने आमचें रक्षण कर. ॥ ३० ॥

महि त्रीणामवोस्तु द्युक्षं मित्रस्यार्यम्णः । दुराधर्षं वरुणस्य ॥ ३१ ॥

अर्थ—मित्र, अर्यमा आणि वरुण या तिघांनीं आमचें रक्षण करावें. तें रक्षणसामर्थ्य फार मोठें आहे व त्यांत सुवर्णादि द्रव्यें निवास करितात. व तें अन्याकडून तिरस्कार करण्याला अशक्य असो. ॥ ३१ ॥

नहि तेषामुमा चन नाध्वसु वारणेषु । ईशे रिपुरघशꣳसः ॥ ३२ ॥

अर्थ—घरामध्यें राहणाऱ्या तसेंच चोर व व्याघ्र यांच्या भयानें युक्त अशा मार्गामध्यें राहणाऱ्या यजमानांना उपद्रव देण्याला पापाची बढाई मारणारा शत्रु समर्थ होत नाहीं. कारण मित्र, अर्यमा व वरुण या तीन देवांनीं त्या यजमानाचें रक्षण केलें आहे ॥ ३२ ॥

ते हि पुत्रासोऽअदितेः प्रजीवसे मर्त्याय । ज्योतिर्यच्छन्त्यजस्रम् ॥३३॥

अर्थ—कारण कीं ते मित्र, अर्यमा व वरुण अखंडित-शक्ति अशा अदितीचे पुत्र आहेत. म्हणून ते यजमानाला पुष्कळ दिवस जिवंत राहण्याकरितां निरंतर तेज देतात. ॥ ३३ ॥

कदाचन स्तरीरसि नेन्द्र सश्चसि दाशुषे । उपोपेन्नु मघवन्भूयऽइन्नु ते दानं देवस्य पृच्यते ॥ ३४ ॥

अर्थ—हे इंद्रा, तूं केव्हांही नाश करणारा नाहींस. व हविर्दान करणाऱ्या यजमानाचें तूं सेवन करितोस म्हणजे त्याला प्राप्त होतोस. आणि धनवान् इंद्रा, प्रकाशमान अशा तुला दिलेलें पुष्कळ द्रव्य लवकरच त्या हविर्भाग देणाऱ्या यजमानाला प्राप्त होतें. ॥ ३४ ॥

तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् ॥ ३५ ॥ शतं १००

अर्थ—त्या प्रकाशक प्रेरक अशा आदित्यांतर्गत पुरुषरूपी ब्रह्माचें सर्वांनीं प्रार्थना करण्यास योग्य असें जें सर्व संसारनाशक तेज आहे त्याचें आम्ही ध्यान करितों. तो सविता आमच्या बुद्धीला सत्कर्मानुष्ठानाची प्रेरणा करो ॥ ३५ ॥

या (३६ व्या) मंत्रानंतर बृहदुपस्थान संपलें.

परिं ते दूडभो रथोऽस्मौं २ अश्नोतु विश्वतः । येन रक्षांसि दाशुषः ॥ ३६ ॥

अर्थ—हे अग्ने, ज्यायोगें तूं सर्व हविर्दान करणाऱ्या यजमानांचें रक्षण करितोस तो तुझा अविनाशी रथ आमचें (यजमानांचें) सर्वत्र रक्षण करो ॥ ३६ ॥

विनियोग—'भूःभुवः स्वः' या मंत्रानें गार्हपत्य व आहवनीय या दोन्ही अग्नींचें उपस्थान करावें. यजमान ज्या वेळीं ग्रामान्तराला जाण्याची इच्छा करितो त्यावेळीं त्यानें 'नर्य' इत्यादि मंत्रानें तिन्ही अग्नींचें उपस्थान करावें.

भूर्भुवः स्वः सुप्रजाः प्रजाभिः स्याꣳसुवीरो वीरैः सुपोषः पोषैः । नर्यं प्रजां मे पाहि शꣳस्यं पशून्मे पाह्यर्थर्यं पितुं मे पाहि ॥ ३७ ॥

अर्थ—हे अग्ने भूः भुवः स्वः या तीन व्याहृतिरूपी असा तूं आहेस. म्हणून तुझ्या प्रसादानें मी बंधुभृत्यादि प्रजेनें युक्त व अनुकूल प्रजावान् होईन. तसेंच शास्त्रमार्गवर्ती अशा पुत्रांनीं युक्त होईन. व हिरण्यादि द्रव्यानें पुष्टिमान् होईन. हे मनुष्यांचें हित करणाऱ्या गार्हपत्य अग्ने, माझ्या प्रजेचें रक्षण कर. अनुष्ठान करणाऱ्यांनीं स्तुति करण्यास योग्य अशा हे आहवनीय अग्ने, माझ्या प्रजेचें रक्षण कर. हे अथर्य म्हणजे सर्वदा राहणाऱ्या दक्षिणाग्ने, आमच्या अन्नाचें रक्षण कर ॥ ३७ ॥

विनियोग—प्रवासांतून आल्याबरोबर इतर कोणाचीही भेट न घेतां हातांत समिधा घेऊन अग्निशाळेंत जाऊन 'आगन्म' इत्यादि तीन मंत्रांनीं आहवनीयादि तीन अग्नींचें उपस्थान करावें.

आगन्म विश्ववेदसमस्मभ्यं वसुवित्तमम् । अग्ने सम्राडभि द्युम्नमभि सहऽआयच्छस्व ॥ ३८ ॥

अर्थ—हे सर्व प्रकाशमान आहवनीय अग्ने, आम्ही परगांवाहून तुझ्या हेतूनें आलों. तूं सर्वज्ञ व सर्व धनवान् आहेस. व आमच्याकरितां धन मिळविणारा आहेस. हे अग्ने, तूं आम्हाला कीर्ति व बल दे. ॥ ३८ ॥

अयमग्निर्गृहपतिर्गार्हपत्यꣳ प्रजायां वसुवित्तमꣳ। अग्ने गृहपतेऽभि द्युम्नमभि सहऽआयच्छस्व ॥ ३९ ॥

अर्थ—हा पुढें असलेला गार्हपत्य अग्नि घराचा पालक आहे व पुत्रपौत्रादिक प्रजेकरितां अतिशय द्रव्य मिळविणारा आहे. हे गार्हपत्य अग्ने, तूं आम्हांला यश व बल दे ॥ ३९ ॥

अयमग्निꣳपुरीष्यो रयिमान्पुष्टिवर्धनꣳ। अग्ने पुरीष्याभि द्युम्नमभि सहऽआयच्छस्व ॥ ४० ॥

अर्थ—हा दक्षिणाग्नि पशूंना हितकारक, धनवान् व पोषण करणारा आहे म्हणून हे पशुहित करणाऱ्या दक्षिणाग्ने, आम्हांला कीर्ति व बल दे ॥ ४० ॥

विनियोग—नंतर 'गृहामा' इत्यादि तीन मंत्र म्हणून आपल्या राहत्या घरांत यावें.

गृहा मा बिभीत मा वेपध्वमूर्जं बिभ्रतऽएमसि। ऊर्जं बिभ्रद्वꣳ सुमनाꣳ सुमेधा गृहानैमि मनसा मोदमानꣳ ॥ ४१ ॥

अर्थ—हे गृहांनो, पालक यजमान गांवीं गेला अशा समजुतीनें आतां तुम्ही भिऊं नका, व कोणी शत्रु येऊन तुमचा नाश करील म्हणून आपल्या अंगाचा थरकांप करून घेऊं नका. कारण आम्ही बळ धारण करणाऱ्या अशा तुम्हांप्रत प्राप्त झालों आहों. ज्याप्रमाणें तुम्ही बल धारण करितां त्याप्रमाणें मीही बल धारण करून उत्तम मनाचा व चांगल्या बुद्धीचा होऊन दुःखरहित अंतःकरणानें तुम्हाला प्राप्त होतों. ॥ ४१ ॥

येषामध्येति प्रवसन्येषु सौमनसो बहुः। गृहानुप ह्वयामहे ते नो जानन्तु जानतः ॥ ४२ ॥

अर्थ—देशांतरांत जात असतांना यजमान ज्या घराचें स्मरण करितो व ज्या घराविषयीं त्याला अतिशय प्रीति असते त्या घरांना आम्ही बोलावितों. तीं गृहें (त्या गृहदेवता) आम्हाला कृतज्ञ समजोत. म्हणजे आम्ही कृतघ्न होणार नाहीं असें गृहदेवतांनीं समजावें. ॥ ४२ ॥

'क्षेमाय वः' हा मंत्र म्हणून गृहांत प्रवेश करावा. येथें उपस्थान मंत्र संपले.

उपहूता इह गावऽउपहूताऽअजावयः÷। अथोऽअन्नस्य कीलालऽउपहूतो गृहेषु नः। क्षेमाय वः शान्त्यै प्रपद्ये शिवꣳ शग्मꣳ शंयोः शंयोः ॥ ४३ ॥

अर्थ—ह्या गृहामध्यें धेनु, बैल, बकऱ्या, मेंढ्या आमच्या अनुज्ञेनें सुखानें राहोत. तसेंच अन्नाचा विशेष रस आमच्या घरांत आमच्या अनुज्ञेनें समृद्ध असो. हे गृहांनो, तुम्हाला मी प्राप्त होतों. तुम्ही आमच्या द्रव्याचें रक्षण करा व आमच्या सर्व अनिष्टांची शान्ति करा. मी अत्यंत सुखाची इच्छा करणारा आहें म्हणून मला ऐहिक आणि पारलौकिक असें दोन्ही तऱ्हेचें सुख प्राप्त होवो. ॥ ४३ ॥

विनियोग—प्रतिप्रस्थात्यानें पत्नीला नेत असतां 'प्रघासिनः' हा मंत्र तिच्याकडून म्हणवावा.

प्रघासिनो हवामहे मरुतश्च रिशादसः । करम्भेण सजोषसः ॥ ४४ ॥

अर्थ—आम्ही मरुद्गणांना बोलावितों. ते मरुत्देव प्रघासी नामक आहेत. म्हणजे प्रघास नांवाचा विशेष हविर्भाग भक्षण करणारे आहेत. हे मरुत्गण शुक्र-ज्योति इत्यादि संज्ञक आहेत व ते हिंसा करणारांचे नाशक आहेत. त्याचप्रमाणें त्यांना करंभ नांवाचें यवमय हविर्द्रव्य आवडतें. ॥ ४४ ॥

विनियोग—यवपिष्टाचीं बनविलेलीं करंभपात्रें सुपांत घेऊन यजमानपत्नीनें अथवा यजमान व यजमान पत्नी ह्या दोघांनीं दक्षिणाग्नींत 'यद्ग्रामे' या मंत्रानें होम करावा.

यद्ग्रामे यदरण्ये यत्सभायां यदिंन्द्रिये । यदेनश्चकृमा वयमिदं तदवयजामहे स्वाहा ॥ ४५ ॥

अर्थ—गांवांत तसेंच रानांत रहात असतां व सभेंत बसलों असतां आणि इंद्रियांच्या प्रीतीनें आम्हीं जें पाप केलें तसेंच नोकरादिकांना मारण्यानें आम्हांला जें पाप घडलें त्या सर्व पापांचा ह्या आहुतीनें आम्ही नाश करूं. हें हविर्द्रव्य आम्हीं देवतेला दिलें असो ॥ ४५ ॥

विनियोग—यजमानानें 'मोषूणः' या मंत्राचा जप करावा.

मो षू ण इन्द्रात्र पृत्सु देवैरस्ति हि ष्मा ते शुष्मिन्नवयाः । महश्चिद्यस्य मीळ्हुषो यव्या हविष्मतो मरुतो वन्दते गीः ॥ ४६ ॥

अर्थ—हे इंद्रा, ह्या संग्रामामध्यें देवांसहवर्तमान असलेला तूं आमचा थोडाही नाश करूं नकोस. हे बलवान् इंद्रा, तुझा या यज्ञांत पृथक् भाग आहे. वृष्टि करून

जलसिंचन करणाऱ्या व हवियोग्य अशा तुझी यवमय करंभपात्रानें केलेली होमक्रिया तुझी पूजाच आहे. त्या पूजेनें युक्त होऊन तूं आमच्यावर कृपा कर. आमची स्तुतिरूपी वाणी मरुत्देवांना नमस्कार करिते. ॥ ४६ ॥

विनियोग—'अक्रन्कर्म' हा मंत्र यजमानपत्नीकडून म्हणवावा.

अक्रन्कर्म कर्मकृतः सह वाचा मयोभुवा । देवेभ्यः कर्म कृत्वास्तं प्रेत सचाभुवः ॥ ४७ ॥

अर्थ—वरुणप्रघास कर्म करणारे ऋत्विज् सुखकारक मंत्ररूप स्तुतीनें तें कर्म करिते झाले. यजमान व यजमानपत्नीसहवर्तमान असलेल्या हे ऋत्विजांनो, तुम्ही देवाकरितां वरुणप्रघास कर्म करून स्वगृहाप्रत जा. ॥ ४७ ॥

विनियोग—अवभृथ कर्मामध्यें 'अवभृथ' या मंत्रानें यजमान व यजमानपत्नींनीं जलांत स्नान करावें.

अवभृथ निचुम्पुण निचेरुरसि निचुम्पुणः । अव देवैर्देवकृतमेनोऽया-सिषमव मर्त्यैर्मर्त्यकृतं पुरुराव्णो देव रिषस्पाहि ॥ ४८ ॥

अर्थ—हे अवभृथ यज्ञा, (या यज्ञांत वरुणप्रघास कर्माचे शेवटीं पालथीं पात्रें पाण्यानें बुडविलीं जातात. म्हणून यांना अवभृथ असें म्हणतात. तसेंच ऋत्विज या यज्ञांतील कर्म मंदस्वरानें करितात म्हणून याला निचुंपुण म्हणतात.) जरी तूं अतिशय गमनशील आहेस तरीही मंदगमन करणारा हो. मी त्यायोगें आमच्या इंद्रियांनीं हविर्भागांचे स्वामी जे देव त्यांचे ठायीं केलेलें पाप पाण्यामध्यें बुडवितों. तसेंच आमचें साहाय्य करणारे जे ऋत्विज त्यांनीं यज्ञ पाहण्याकरितां येणाऱ्या लोकांची अवज्ञा करून जें पाप केलें तेंही मी पाण्यांत बुडवितों. हें आम्हीं टाकलेलें पाप तुला व्याप्त न करो म्हणून तूं हळू गमन कर. आणि हे अवभृथ यज्ञा, तुझ्या प्रसादानें पुष्कळ विरुद्ध फल देणारा आमचा वध न होवो म्हणजे आम्हांला विरुद्ध फल देणारें पाप न लागो ॥ ४८ ॥

विनियोग—'पूर्णादर्वि' या मंत्रानें दर्वीनें स्थालींतून ओदनाचें ग्रहण करावें. (हें साकमेधांतील कर्म आहे.)

पूर्णा दर्वि परापत सुपूर्णा पुनरापत । वस्नेव विक्रीणावहाऽइषमूर्जं शतक्रतो ॥ ४९ ॥

अर्थ—अन्नदान साधनभूत अशा हे काष्ठनिर्मित दर्वी (पळी), तूं स्थालींतून अन्न घेऊन पूर्ण हो. पूर्ण अशी तूं उचलल्यावर इंद्राप्रत जा. तेथें कर्मफलानें पूर्ण होऊन पुनः आमचेकडे ये. हे इंद्रा, तूं आणि मी असे दोघे किंमत देऊन एकमेकांकडून हविस्वरूपी अन्न व हविर्दान फलरूपी रस विकत घेऊं म्हणजे हे इंद्रा, मी तुला हवि देतों व तूं मला फल दे. अशा रीतीनें एकमेकांमध्यें देवघेव करूं. ॥ ४९ ॥

विनियोग—' देहिमे ' या मंत्रानें त्या ओदनाचा होम करावा.

दोहि मे ददामि ते नि मे धेहि नि ते दधे । निहारं च हरासि मे निहारं निहराणि ते स्वाहा ॥ ५० ॥

अर्थ—हे यजमाना, तूं मजकारणें (इंद्राकरणें) प्रथम हवि दे व मी (इंद्र) पुष्कळ अपेक्षित फल तुला देईन. हें इंद्रवाक्य ऐकल्यावर यजमान म्हणतो, किंमत देऊन विकत घेण्यासारखें फल हे इंद्रा, तूं मला दे–व मूल्यभूत हविर्द्रव्य मी तुला देतों. हें हवि सुहुत असो. ॥ ५० ॥

विनियोग—साकमेधांतील पितृयज्ञकर्मांमध्यें सर्वांनीं यज्ञोपवीती होऊन ' अक्षन्नमीमदंत ' इत्यादि दोन मंत्रांनीं आहवनीयाचें उपस्थान करावें.

अक्षन्नमीमदन्त ह्यव प्रिया अधूषत । अस्तोषत स्वभानवो विप्रा नविष्ठया मती योजा न्विन्द्र ते हरी ॥ ५१ ॥

अर्थ—पितृयज्ञ नांवाच्या कर्मांत जे पितर आहेत ते आम्हीं दिलेले हवि भक्षण करिते झाले. कारण ते संतुष्ट होऊन आमची भक्ति पाहून आपली मान संतोषानें हलविते झाले. आणि स्वयंप्रकाश युक्त ब्राह्मण धारणाशक्तीनें युक्त होऊन व नवीन बुद्धि धारण करून स्तुति करिते झाले. (अहो या यजमानानें पुष्कळ गोड अन्न आम्हांला दिलें. याची भक्ति स्तुत्य आहे.) म्हणून हे इंद्रा, हिरव्या वर्णाचे दोन घोडे तूं आपल्या रथाला लवकर जोड व तृप्त होऊन पितरांसहवर्तमान गमन कर ॥५१॥

सुसंदृशं त्वा वयं मघवन्वन्दिषीमहि । प्र नूनं पूर्णबन्धुरः स्तुतो याहि वशाँ२ऽअनु योजा न्विन्द्र ते हरी ॥ ५२ ॥

अर्थ—हे इंद्रा, सर्वांवर अनुग्रह करणाऱ्या अशा तुझी आम्ही स्तुति करतों. अशा तऱ्हेनें आम्हीं स्तुति केलेला तूं कामना करणाऱ्या यजमानाकडे अवश्य गमन

करितोस. व जातांना स्तोत्र्यांना द्यावयाचीं द्रव्यें आपल्या रथांत भरून नेतोस. हे इंद्रा, तूं आपले हरित वर्णाचे घोडे रथाला जोड. ॥ ५२ ॥

विनियोग—' मनो न्वाह्वामहे ' इत्यादि तीन मंत्रांनीं सर्वांनीं गार्हपत्याचें उपस्थान करावें.

मनो न्वाह्वामहे नाराशꣳ सेन स्तोमेन । पितॄणां च मन्मभिꣳ ॥ ५३ ॥

अर्थ—पितृयज्ञाच्या अनुष्ठानानें चित्त परलोकांत गेल्यासारखें होतें. म्हणून नाराशंस नांवाच्या स्तोत्रानें त्याला आम्ही बोलावितों. नाराशंस ह्याचा अर्थ—(मनुष्याची योग्य स्तुति तें नराशंस. तत्संबंधीं जें स्तोत्र तें नाराशंस. हें स्तोत्र दोन प्रकारचें आहे. दैव व मानुष. देवाची ज्यायोगे स्तुति करितात तें दैव. व ज्यायोगें मनुष्याची स्तुति करितात तें मानुष.) तसेंच आम्ही पितरांना मननीय अशा स्तोत्रांनींही पितृलोकगमनाचें आव्हान करितों. ॥ ५३ ॥

आ नऽएतु मनऽ पुनऽ क्रत्वे दक्षाय जीवसे । ज्योक्च सूर्यं दृशे ॥५४॥

अर्थ—आमचें मन यज्ञाचा संकल्प करण्याकरितां व कर्मामध्यें उत्साह प्राप्त होण्याकरितां पुनः प्राप्त होवो. आणि पुष्कळ दिवस वांचण्याकरितां व चिरकाल सूर्याचें अवलोकन करण्याकरितां तें मन पुनः आम्हांला प्राप्त होवो. ॥ ५४ ॥

पुनर्नऽ पितरो मनो ददातु दैव्यो जनः । जीवं व्रातꣳ सचेमहि ॥५५॥

अर्थ—हे पितरांनो, तुमच्या आज्ञेनें दैवी पुरुष आमचें मन पुनः आम्हांला देवोत. त्यानंतर तुमच्या प्रसादानें जिवंत असा पुत्र व पशुसमुदाय आम्हांला प्राप्त होवो. ॥ ५५ ॥

विनियोग—' वयꣳसोम ' या सोमदेवताक गायत्री मंत्राचा जपांत विनियोग आहे.

वयꣳ सोम व्रते तव मनस्तनूषु बिभ्रतः । प्रजावन्तः सचेमहि ॥५६ ॥

अर्थ—हे सोमा, तुझें कर्म करणारे आम्ही तुझ्या शरीरामध्यें चित्त स्थापन करूं व तुझ्या प्रसादानें पुत्रपौत्रादि संपन्न होऊन सेव्य वस्तूंचें सेवन करूं. ॥ ५६ ॥

यापुढें साक्क मेधांतील त्र्यंबक हविसंबंधीं मंत्र आहेत त्यांत ' एषते ' या मंत्रानें अवदान होम करावा.

एष ते रुद्र भागꣳ सह स्वस्राऽम्बिकया तं जुषस्व स्वाहैष ते रुद्र भागऽआखुस्ते पशुः ॥ ५७ ॥

अर्थ—हे रुद्रा, तूं आपल्या अंबिका नांवाच्या बहिणीसह आम्हीं दिलेला पुरोडाश (हविर्द्रव्य) सेवन कर. आम्हीं दिलेले हवि सुहुत असोत. हे रुद्रा, हा आम्हीं दिलेला पुरोडाश तूं सेवन करावा. तसेंच मूषक नांवाचा पशु तुला आम्हीं समर्पण केला आहे. ॥ ५७ ॥

विनियोग—' अवरुद्रमदीमहि ' इत्यादि दोन मंत्रांचा जप करावा.

अव रुद्रमदीमवह्यव देवं त्र्यम्बकम् । यथा नो वस्यसस्करद्यथा नः श्रेयसस्करद्यथा नो व्यवसाययात् ॥ ५८ ॥

अर्थ—मनांत रुद्राचें व त्र्यंबकाचें ध्यान करून किंवा इतर देवतांहून वेगळें करून आम्ही रुद्राला अन्न खाऊं घालतों. तो रुद्र आम्हांला निवसनशील (राहणारे) व ज्ञातीमध्यें श्रेष्ठ करो. तसेंच त्यानें आम्हांला सर्व कार्यांमध्यें निश्चययुक्त करावें म्हणून आम्ही त्याचा जप करितों. ॥ ५८ ॥

भेषजमसि भेषजं गवेऽश्वाय पुरुषाय भेषजम् । सुखं मेषाय मेष्यै ॥५९॥

अर्थ—हे रुद्रा, तूं औषधाप्रमाणें सर्वोपद्रवनिवारक आहेस म्हणून आमच्या गाय, घोडा व नौकर यांना सर्वव्याधिनिवारक औषध दे व मेंढा आणि मेंढी यांच्या प्राणांना हितकारक असें औषध दे ॥ ५९ ॥

विनियोग—ज्याप्रमाणें पितृमेधांत तीन वेळां पुत्रादिकांनीं उलटी प्रदक्षिणा करावयाची असते व देवतापूजेच्या वेळीं तीन वेळां सुलटी प्रदक्षिणा करावयाची असते, त्याप्रमाणें येथें सर्वांनीं ' त्र्यंबकम् ' या मंत्रानें अग्नीला तीन उलट्या व तीन सुलट्या प्रदक्षिणा घालाव्या. त्याप्रमाणेंच यजमानाच्या घरच्या कुमारिकांनींही त्र्यंबकम् या उत्तरार्धांतील मंत्रानें अग्नीला तीन प्रदक्षिणा घालाव्या.

त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम् । उर्वारुकमिव बन्धनान्मृत्योर्मुक्षीय माऽमृतात् । त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पतिवेदनम् । उर्वारुकमिव बन्धनादितो मुक्षीय मामुतः ॥ ६० ॥

अर्थ—दिव्यगंधयुक्त, मरणरहित, धनधान्य वाढविणारा त्रिनेत्र जो रुद्र त्याची आम्ही पूजा करितों. त्यायोगें आम्ही अपमृत्यूपासून व संसारमृत्यूपासून मुक्त होऊं.

ज्याप्रमाणें काकडीचें फळ अतिशय पक्व झाल्यावर आपल्या देंठातून तुटतें त्याप्रमाणें आम्ही मृत्यूपासून सुटूं. अभ्युदय व निश्रेयसरूपी अमृतापासून मात्र आमचा संबंध सुटूं नये. (पुढील वाक्य कुमारिकांचें आहे) पति मिळवून देणारा सुगंधविशिष्ट त्रिनेत्र जो ईंद्र त्याची आम्ही पूजा करितों. कांकडीचें फळ पिकल्यावर देंठापासून सुटतें त्याप्रमाणें आम्ही आई, बाप, भाऊ वगैरे माहेरच्या मंडळीपासून, त्या कुलापासून व घरांपासून दूर जाऊं. मात्र आम्ही त्र्यंबकप्रसादानें पतीपासून दूर न जावें म्हणजे पतिगोत्रांतच राहावें. ॥ ६० ॥

विनियोग—व्रीहि व यव इत्यादिकांच्या गाठोळ्या बांधून बांबूच्या कावडीच्या दोन्ही शिक्यांत हविर्द्रव्याचे अवशिष्ट भाग घालून ती कावड उंच वृक्षावर, बांबूवर अथवा वारुळावर ' एतत्ते ' या मंत्रानें ठेवावी.

एतत्ते रुद्राऽवसं तेन परो मूजवतोऽतीहि । अवततधन्वा पिनाकावसः कृत्तिवासाऽअहिꣳ सन्नः शिवोऽतीहि ॥ ६१ ॥

अर्थ—हे रुद्रा, हें तुझें अवसनांवाचें हविःशेष भोज्य आहे (अवस म्हणजे प्रवासांत तळ्याजवळ वगैरे मुक्काम केला असतां खावयाचें भात वगैरे अन्न) त्यासहवर्तमान तूं धनुष्याची दोरी सोडून (एका टोकाची दोरी सोडून) मुंजवान् पर्वताच्या पलीकडे जा. (मुंजवान् नांवाचा पर्वत रुद्राची निवासभूमि आहे.) तसेंच प्रवासांत जातांना तूं तुझें पिनाक नांवाचें धनुष्य सर्व बाजूंनीं झांकून घे. म्हणजे प्राणी धनुष्य पाहून भिणार नाहींत. हे रुद्रा, तूं कातड्याचें वस्त्र पांघरून हिंसा न करितां आमच्या पूजेनें संतुष्ट होऊन मुंजवान् पर्वत ओलांडून जा ॥ ६१ ॥

विनियोग—यजमानानें ' त्र्यायुषम् ' या मंत्राचा जप करावा.

त्र्यायुषं जमदग्नेः कश्यपस्य त्र्यायुषम् । यद्देवेषु त्र्यायुषं तन्नोऽ अस्तु त्र्यायुषम् ॥ ६२ ॥

अर्थ—जमदग्नि व कश्यप आणि ईंद्रादि देव यांनीं बाल्य, तारुण्य व वार्धक्य यांमध्यें जशीं चांगलीं चरित्रें केलीं तशीं आमच्या हातून होवोत ॥ ६२ ॥

विनियोग—' शिवोनामासि ' या मंत्राने लोहक्षुराचें (वस्तऱ्याचें) ग्रहण करावें. व निवर्तयामि या मंत्रानें मुंडण करावें.

शिवो नामासि स्वधितिस्ते पिता नमस्तेऽ अस्तु मा मा हिꣳसीः। निर्वर्तयाम्यायुषेन्नाद्याय प्रजननाय रायस्पोषाय सुप्रजास्त्वाय सुवीर्याय ॥ ६३ ॥

अर्थ—हे क्षुरा (वस्तऱ्या), तूं शांत नांवाचा आहेस. तुझा पिता वज्र आहे. मी तुला नमस्कार करितों. हिंसा करूं नकोस. हे यजमाना, पुष्कळ दिवस वांचण्याकरितां, अन्नभक्षणाकरितां, संततीकरितां, द्रव्यवृद्धीकरितां व चांगलें अपत्य होण्याकरितां आणि उत्तम सामर्थ्य प्राप्त व्हावें म्हणून मी तुझें मुंडन करितों. ॥ ६३ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**

माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

इति तृतीयोऽध्यायः समाप्तः ।



॥ अथ चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥



विनियोग—तिसऱ्या अध्यायांत अग्निहोत्र, अग्न्युपस्थान व चातुर्मास्याचे मंत्र गेले. चतुर्थ अध्यायाच्या पहिल्या मंत्रापासून आठव्या अध्यायाच्या बत्तिसाव्या मंत्रापर्यंत अग्निष्टोमाचे मंत्र सांगितले आहेत. चतुर्थ अध्यायांत यजमानसंस्कारासंबंधीं व सोम विकत घेण्यासंबंधीं मंत्र सांगितले आहेत. प्रथम यजमानानें सोळा ऋत्विजांचें वरण करावें. (वरणी द्यावी). नंतर अग्निसमारोप करून होमशालेंत जावें. ' इमा आपः ' या मंत्रानें उजव्या बाजूचे केस पसरून भिजवावे. यूपच्छेदाच्या वेळेप्रमाणेंच येथेंही तृणाचें अंतर्धान करावें व क्षुऱ्याचें (वस्तऱ्याचें) स्थापन दोन मंत्रांनीं करावें.

एदमगन्म देवयजनं पृथिव्या यत्र देवासोऽअजुषन्त विश्वे । ऋक्सामाभ्याꣳ संतरन्तो यजुर्भी रायस्पोषेण समिषा मदेम । इमाऽआपꣳ शमु मे सन्तु देवीरोषधे त्रायस्व स्वधिते मैनꣳ हिꣳसीꣳ ॥ १ ॥

अर्थ—आम्ही पृथ्वीवरील देवयज्ञाचें आधारभूत असें जें स्थान त्याप्रत आलों आहों. त्या ठिकाणीं सर्व देव संतोषानेंच स्थित झाले आहेत. ऋग्यजुःसाम मंत्रांनीं सोमयज्ञ करणारे आम्ही धनाच्या पुष्टीनें व इच्छिलेल्या अन्नानें संतुष्ट होऊं. डोकें भिजविण्याकरितां त्यावर घातलेलीं हीं शुद्ध जलें मला (यजमानाला) सुखकर होवोत. हे कुशा, तूं वस्तऱ्यापासून यजमानाचें रक्षण कर. हे वस्तऱ्या, तूं या यजमानाचा नाश करूं नकोस ॥ १ ॥

विनियोग—' आपो अस्मान् ' या मंत्रानें स्नान करावें. ' उदिदाभ्यः ' या मंत्रानें पाण्यांतून बाहेर निघावें. ' दीक्षातपसोः ' या मंत्रानें रेशमी वस्त्र नेसावें.

आपोऽअस्मान्मातरः÷ शुन्धयन्तु घृतेन नो घृतप्वः÷ पुनन्तु । विश्वꣳहि रिप्रं प्रवहन्ति देवीरुदिदाभ्यꣳ शुचिरा पूतऽएमि । दीक्षातपसोस्तनूरसि तां त्वा शिवाꣳ शग्मां परिदधे भद्रं वर्ण पुष्यन् ॥ २ ॥

अर्थ—जगाचें निर्माण करणारीं व आईप्रमाणें त्याचें पालन करणारीं जलें क्षौर केलेल्या अशा आम्हां यजमानांना क्षौरासंबंधीं दोषापासून दूर करोत. तसेंच वाहणाऱ्या जलानें पवित्र करणाऱ्या जलदेवता आम्हांला वाहणाऱ्या जलानें पवित्र करोत. व

प्रकाशमान जलें आमचें सर्वच पाप दूर करोत. स्नानानें बाह्यतः शुद्ध व आचमनानें अंतःशुद्ध झालेल्यों मी जलाचे बाहेर पडतोंच. हे रेशमी वस्त्रा, तूं दीक्षणीय इष्टि व उपसद इष्टींचें शरीर आहेस. म्हणजे दीक्षा व तपोभिमानी देवतांना शरीराप्रमाणें तूं आवडणारें आहेस. तुझ्या नेसण्यानें उत्तम कांति वाढविणारा मी दीक्षा व तप यांचे देवतांस शरीराप्रमाणें प्रिय असलेल्या व कोमलत्वानें अत्यंत सुखकारक अशा तुला (वस्त्राला) धारण करितों. ॥ २ ॥

विनियोग—प्राचीनशालेंत पूर्वभागीं दर्भावर उभें राहून हातांत लोणी घेऊन तें ' महीनाम् पयोसि ' या मंत्रानें डोक्यापासून पायापावेतों सर्व शरीरास लावावें. ' वृतस्य ' या मंत्रानें त्रैककुत् पर्वतावरील काजळ डोळ्यांत घालावें. त्रैककुत् पर्वतावरचें काजळ न मिळाल्यास दुसरे कोणतेंही काजळ डोळ्यांत घालावें.

महीनां पयोऽसि वर्चोदाऽअसि वर्चो मे देहि। वृत्रस्यासि कनीनकश्चक्षुर्दाऽअसि चक्षुर्मे देहि ॥ ३ ॥

अर्थ—हे नवनीता, तूं गाईचे दुधापासून उत्पन्न झालेलें आहेस. तूं फार स्निग्ध असल्यानें कांतिप्रद आहेस म्हणून मला (यजमानाला) कांति दे. हे कज्जलदेवते, तूं वृत्रासुराच्या डोळ्यांतील काळें बुबुळ आहेस. (इंद्रानें वृत्रासुराला मारलें त्यावेळीं त्याचें बुबुळ गळून पडलें तेंच काजळ झालें असें तैत्तिरीय श्रुतींत आहे). तूं बुबुळ असल्यानें डोळ्याचें तेज वाढविणारे आहेस म्हणून माझी दृष्टि उत्तम कर. ॥ ३ ॥

विनियोग—' चित्पतिर्मा पुनातु ' इत्यादि सात सात अक्षरांनीं कुशपवित्रांनीं शुद्धि करावी म्हणजे पाणी शिंपडावें.

चित्पतिर्मा पुनातु वाक्पतिर्मा पुनातु देवो मा सविता पुनात्वच्छिद्रेण पवित्रेण सूर्यस्य रश्मिभिः। तस्य ते पवित्रपते पवित्रपूतस्य यत्कामः पुने तच्छकेयम् ॥ ४ ॥

अर्थ—मनाची अभिमानिनी ज्ञानाधिपति देवता, वाणीची अभिमानिनी बृहस्पति देवता व अंतर्यामी सविता देवता माझी (यजमानाची) शुद्धि करो. त्यांनीं ती शुद्धि छिद्ररहित अशा वायुरूपी अगर आदित्य मंडलरूपी पवित्रानें व सूर्य किरणांनीं करावी. हे पवित्रांनाही पवित्र करणाऱ्या देवा, पवित्रानें शुद्ध झालेल्या या यजमानाचें

अभीष्ट पूर्ण होवो. व मी अध्वर्यु ज्या सोमयागाच्या इच्छेनें आत्मशुद्धि करतों त्या सोमयागाचें अनुष्ठान करण्याचें सामर्थ्य मला प्राप्त होवो. ॥ ४ ॥

विनियोग—अध्वर्यूनें ' आवो देवासः ' हा मंत्र यजमानाकडून बोलवावा.

आ वो देवासऽईमहे वामं प्रयत्यध्वरे । आ वो देवास आशिषो यज्ञियासो हवामहे ॥ ५ ॥

अर्थ—हे देवांनो, आमचा यज्ञ प्रवृत्त झाल्यावर आम्ही तुम्हांकडे स्पृहणीय असें यज्ञफल मागतों. तसेंच हे देवांनो, यज्ञसंबंधी फलें देण्याकरितां आम्ही तुम्हांस बोलावतों. ॥ ५ ॥

विनियोग—' स्वाहा यज्ञम् ' वगैरे तीन मंत्रांनीं दोन्ही हाताच्या दोन कनिष्ठिका अंगुली मिटून घ्याव्या व ' स्वाहा वातान् ' या मंत्रानें दोन्ही हातांच्या मुठी वळाव्या.

स्वाहा यज्ञं मनसऽ स्वाहोरोरन्तरिक्षात्स्वाहा द्यावापृथिवीभ्या ँ स्वाहा वातादारभे स्वाहा ॥ ६ ॥

अर्थ—माझ्या चित्तानें मी यज्ञाशीं संलग्न होतों तो यज्ञ विस्तीर्ण अशा अंतरिक्षांत व द्युलोक आणि पृथ्वीलोकांत व्यापून राहिला आहे. वायुप्रसादानें मी यज्ञाचा आरंभ करितों. अशा प्रकारानें यज्ञ सिद्ध झाला आहे. ॥ ६ ॥

विनियोग—यापुढें औदुंबरण होमाचे सहा मंत्र आहेत.

आकूत्यै प्रयुजेऽग्नये स्वाहा मेधायै मनसेऽग्नये स्वाहा दीक्षायै तपसेऽग्नये स्वाहा सरस्वत्यै पूष्णेऽग्नये स्वाहा । आपोदेवीर्बृहतीर्विश्वशंभुवो द्यावापृथिवीऽउरो अन्तरिक्ष । बृहस्पतये हविषा विधेम स्वाहा ॥ ७ ॥

अर्थ—यज्ञ करावा अशी मानसिक इच्छा उत्पन्न करणाऱ्या अग्नीला हें हविर्द्रव्य दिलें जावो. धारणाशक्ति उत्पन्न करणाऱ्या मनाच्या अभिमानी देवतेला हें हविर्द्रव्य दिलें जावो. यज्ञदीक्षेचे नियम सिद्ध होण्याकरितां शरीरस्थ तपोभिमानी देवतेला हें हवि सुहुत असो. मंत्रोच्चारणशक्ति सिद्ध होण्याकरितां वागिंद्रिय–पोषक जो अग्नि त्याला हें हवि सुहुत असो. प्रकाशमान, पुष्कळ व जगाचें कल्याण करणाऱ्या हे जलांनो, हे द्यावा–पृथिवींनो, हे विस्तीर्ण अशा अंतरिक्षा, तुम्हां सर्वांना व बृहस्पतीला मी हवि देतों. तें सुहुत असो. ॥ ७ ॥

विनियोग—शर्मासि या मंत्रानें कृष्णाजिनाच्या दक्षिण जानूवर आरोहण करावें.

विश्वो देवस्य नेतुर्मर्तो वुरीत सख्यम् । विश्वो रायऽइषुध्यति द्युम्नं वृणीत पुष्यसे स्वाहा ॥ ८ ॥

अर्थ—सर्व मनुष्यें फलदायी व प्रकाशक अशा सवित्याच्या मैत्रीची इच्छा करितात व ते धनाकरितां आणि प्रजापालनानें अन्नाकरितां ज्याची प्रार्थना करितात, अशा त्या प्रेरक सूर्याला हें हवि सुहुत असो ॥ ८ ॥

विनियोग—नंतर 'ऋक्सामयोः' या मंत्रानें कृष्णाजिनाच्या काळ्या व पांढऱ्या रेघांना स्पर्श करावा.

ऋक्सामयोः शिल्पे स्थस्ते वामारभे ते मा पातमास्य यज्ञस्योदृचः । शर्मासि शर्म मे यच्छ नमस्तेऽअस्तु मा मा हिꣳसीः ॥ ९ ॥

अर्थ—हे कृष्णाजिनांवरील काळ्या व पांढऱ्या अशा रेखांनो, तुम्ही ऋग्वेद व सामवेदाच्या अभिमानी देवतांच्या चातुर्यरूपी आहां. तुम्हांला मी स्पर्श करितों. ह्या यज्ञाचा शेवटचा मंत्र संपेपर्यंत तुम्ही माझें रक्षण करा. हे कृष्णाजिना, तूं रक्षण करणारें आहेस म्हणून माझें रक्षण कर. मी तुला नमस्कार करितों. माझी हिंसा करूं नकोस. ॥ ९ ॥

विनियोग—नंतर 'ऊर्गसि' या मंत्रानें मेखलाबंधन करावें. तदनंतर 'सोमस्य नीविरसि' या मंत्रानें नीविबंधन करावें. यापुढें 'विष्णोः शर्म' या मंत्रानें डोक्याला वस्त्र गुंडाळावें. त्यापुढें कृष्णमृगाचें शृंग वस्त्राचे प्रांतभागीं बांधावें. यज्ञाचे वेळीं खाजवावयाचें झाल्यास या शृंगानेंच खाजवावें. नंतर 'सुसस्याः' या मंत्रानें शृंगानें भूमि खणावी. तदनंतर दंड द्यावा व उच्छ्रयस्व या मंत्रानें दंड उंच करावा.

ऊर्गस्याङ्गिरस्यूर्ण्मद्रदाऽ ऊर्जं मयि धेहि । सोमस्य नीविरसि विष्णोः शर्मासि शर्म यजमानस्येन्द्रस्य योनिरसि सुसस्याः कृषीस्कृधि । उच्छ्रयस्व वनस्पतऽऊर्ध्वो मा पाह्यꣳहसऽआस्य यज्ञस्योदृचः ॥ १० ॥

अर्थ—हे मेखले, तूं अन्नरूपिणी आंगिरस ऋषीशीं संबंध असलेली व उत्तम कांबळ्याप्रमाणें मऊ आहेस. मला अन्नरस दे. हे मेखले, तूं सोमदेवतेची आवडती ग्रंथी आहेस. हे वस्त्रा, तूं व्यापक अशा यज्ञास सुखकर आहेस म्हणून यजमानाला सुख दे. हे शृंगा, पूर्वी ज्याप्रमाणें तूं इंद्राचें उत्पत्तिस्थान झालास त्याप्रमाणें आतां

या यज्ञाचें उत्पत्तिस्थान हो. हे शृंगा, यजमानाच्या शेतजमिनी चांगल्या धान्यानें युक्त कर. हे वृक्षावयव दंडा, तूं उंच हो व तसा होऊन हा यज्ञाचा शेवटचा मंत्र म्हटला जाईपर्यंत पापापासून माझें रक्षण कर ॥ १० ॥

विनियोग—नंतर यजमानानें 'व्रतं कृणुत' हा मंत्र म्हटल्यावर मौन धारण करावें. 'दैवींधियं' या मंत्रानें आचमन करावें. 'ये देवा' या मंत्रानें व्रत-ग्रहण करावें.

व्रतं कृणुत व्रतं कृणुताग्निर्ब्रह्माग्निर्यज्ञो वनस्पतिर्यज्ञियः। दैवीं धियं मनामहे सुमृडीकामभिष्टये वर्चोधां यज्ञवाहसꣳ सुतीर्था नोऽ अस्तवेशे। ये देवा मनोजाता मनोयुजो दक्षक्रतवस्ते नोवन्तु ते नः पान्तु तेभ्यꣳ स्वाहा ॥ ११ ॥

अर्थ—हे सेवकांनो, गाईचें दूध काढा. हा श्रौत अग्नि वेदत्रयरूपी व यज्ञस्वरूपी आहे. खैराचा वृक्षही यज्ञाचें साधन असल्यानें यज्ञरूपीच आहे. आम्ही आगामी यज्ञाच्या सिद्धीकरितां तदनुष्ठानयोग्य व देवतोद्देशानें प्रवृत्त आणि चांगली सुखकारक तेजोयुक्त व यज्ञसंपादक अशी बुद्धि धारण करूं. अशी ती सुखानें प्राप्त होणारी बुद्धि नेहमीं आमच्या स्वाधीन असो. मनापासून उत्पन्न झालेलीं, मनाशीं युक्त, संकल्पित विषय सिद्ध करणारीं जीं चक्षुरादि इंद्रियें तीं आमच्या यज्ञांतील विघ्नें दूर करून आमचें पालन करोत. त्या इंद्रियदेवतांना हें हवि सुहुत असो. ॥ ११ ॥

विनियोग—'श्वात्राः पीता' या मंत्रानें नाभीला स्पर्श करावा.

श्वात्राः पीता भवत यूयमापो अस्माकमन्तरुदरे सुशेवाः। ताऽ अस्मभ्यमयक्ष्माऽ अनमीवा अनागसꣳ स्वदन्तु देवीरमृताऽऋतावृधः ॥ १२ ॥

अर्थ—हे क्षीररूपी, जलांनो आम्हीं पान केल्यावर तुम्ही शीघ्र जीर्ण व्हा. म्हणजे तुमचेमुळें आम्हांस अजीर्ण न होवो. व तुम्ही आमच्या उदरांत गेल्यावर आम्हांला सुख द्या. महान् व लघु अशा, रोगांनीं रहित, अपराध हरण करणाऱ्या, यज्ञवृद्धीला कारणीभूत, प्रकाशक व मरण निवृत्त करणारीं जलें आमच्या उपकाराकरितां स्वादिष्ट होवोत. ॥ १२ ॥

विनियोग—मूत्र करण्याचे पूर्वी 'इयं ते' या मंत्रानें भूमीवरून माती, गवत वगैरे उचलावें. 'पृथिव्या संभव' या मंत्रानें हातांत घेतलेल्या मातीच्या ढेंकळास मूत्रस्थानीं ठेवावें.

इयं ते यज्ञिया तनूरपो मुञ्चामि न प्रजाम्। अꣳहोमुचꣳ स्वाहाकृताꣳ पृथिवीमाविशत पृथिव्या संभव ॥ १३ ॥

अर्थ—हे यज्ञपुरुषा, हे भूमि, ही माती तुझें यज्ञयोग्य शरीर आहे. मी मूत्ररूपी जल टाकतों. प्रजोत्पत्तिनिमित्तभूत जें रेत त्याचा त्याग करीत नाहीं. पापाला दूर करणाऱ्या, पूर्वी पान केल्यानें मूत्ररूपी बनलेल्या हे जलांनो, तुम्ही पृथ्वींत प्रवेश करा. हे ढेंकळा, तूं पृथ्वींत मिळून जा. ॥ १३ ॥

विनियोग—'अग्ने त्वम्' हा मंत्र म्हणून शयन करावें.

अग्ने त्वꣳ सुजागृहि वयꣳ सुमन्दिषीमहि। रक्षाणोऽ अप्रयुच्छन्प्रबुधे नꣳ पुनस्कृधि ॥ १४ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं चांगल्या तऱ्हेनें जागा रहा. आम्ही यजमान सुखानें निजतों. तूं न चुकतां आमचें रक्षण कर व पुनः आम्हांला जागृत कर. ॥ १४ ॥

विनियोग—जागा झालेल्या यजमानाकडून 'पुनर्मनः' हा मंत्र म्हणवून घ्यावा.

पुनर्मनꣳ पुनरायुर्मऽआगन्पुनः÷ प्राणꣳ पुनरात्मा मऽआगन्पुनश्चक्षुꣳ पुनꣳ श्रोत्रं मऽआगन्। वैश्वानरोऽअदब्धस्तनूपाऽअग्निर्नः÷ पातु दुरितादवद्यात् ॥ १५ ॥

अर्थ—माझें (यजमानाचें) मन, आयुष्य, प्राण, जीव, नेत्र व कर्ण हीं सर्व झोपेंत लीन झालीं होतीं. तीं आतां शरीरांत प्राप्त झालीं. अशा रीतीनें सर्व इंद्रियें आल्यानंतर सर्वोपकारक अहिंस्य व आमचें शरीर रक्षण करणारा हा अग्नि अपकीर्तीपासून व पापापासून आमचें रक्षण करो ॥ १५ ॥

विनियोग—राग आल्यास अगर व्रतविरुद्ध भाषण केल्यास यजमानानें 'त्वमग्ने' हा मंत्र म्हणावा व यज्ञाचे वेळीं प्राप्त झालेल्या द्रव्याला स्पर्श करून 'रास्वेयत्' हा मंत्र म्हणावा.

त्वमग्ने व्रतपाऽअसि देवऽआ मर्त्येष्वा । त्वं यज्ञेष्वीड्यः÷ । रास्वेय-त्सोमाभूयो भर देवो न÷ सविता वसोर्दाता वस्वदात् ॥ १६ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं देवांत आणि मनुष्यांत व्रतांचें पालन करणारा आहेस. व यज्ञामध्यें स्तुत्य आहेस. हे सोमा, येवढें द्रव्य दे व आणखी आण. कारण यज्ञाची देवता असलेला व धन देणारा सवितादेव आम्हाला पूर्वीही धन देता झाला. ॥१६॥

विनियोग—' एषा ते ' या मंत्रानें ध्रुवापात्रांतील घृत जुहूंत चार वेळां घेऊन त्यांत दर्भांत बांधलेलें सोनें घालावें. ' धुरसि ' या मंत्रानें होम करावा.

एषा ते शुक्र तनूरेतद्वर्चस्तया संभव भ्राजं गच्छ । धूरसि धृता मनसा जुष्टा विष्णवे ॥ १७ ॥

अर्थ—हे प्रकाशमान अग्ने, हें घृत तुझें शरीर आहे व त्यांतील सुवर्ण हें तुझें तेज आहे, तर त्या शरीराशीं एक होऊन प्रकाशमान हो. मनानें धारण केलेल्या व यज्ञाला आवडणाऱ्या हे वाणी, तूं वेगयुक्त आहेस ॥ १७ ॥

विनियोग—' शुक्रमसि ' या मंत्रानें जुहूंतील सोनें वर काढून वेदीवर तृण ठेवावें.

तस्यास्ते सत्यसवसः प्रसवे तन्वो यन्त्रमशीय स्वाहा । शुक्रमसि चन्द्र-मस्यमृतमसि वैश्वदेवमसि ॥ १८ ॥

अर्थ—अशा त्या अमोघ वाणीच्या प्रेरणेनें मला शरीराची दृढता प्राप्त होवो. हें हविर्द्रव्य सुहुत असो. हे हिरण्या, तूं प्रकाशक, आल्हादक, अविनाशी व सर्वदेव-संबंधी आहेस ॥ १८ ॥

विनियोग—' चिदसि ' इत्यादि दोन मंत्रांनीं ' सोमक्रयणी ' संज्ञक (जी गाय किंमत म्हणून देऊन सोम विकत घेतात ती गाय) गाईचें अभिमंत्रण करावें.

चिदसि मनोसि धीरसि दक्षिणासि क्षत्रियासि यज्ञियास्यदितिरस्यु-भयतः शीर्ष्णी । सा नः सुप्राची सुप्रतीच्येधि मित्रस्त्वा पथि बध्नीतां पूषाध्वनस्पात्विन्द्रायाध्यक्षाय ॥ १९ ॥

अर्थ—हे सोमक्रयणी गाई, तूं अंतःकरणाच्या ज्या चित्त, मन व बुद्धि या तीन वृत्ती तद्रूपी आहेस. तसेंच तूं दक्षिणास्वरूपी आहेस. देवांत क्षत्रियरूपी जो सोम

तत्स्वरूपिणी यज्ञार्ह व देवमाता अदितिरूपिणी आहेस. आणि वाणीस्वरूपी असल्यामुळें तूं उभयतः शीर्ष्णी अर्थात् सर्वतोमुखी आहेस. अशा तन्हेची तूं पूर्वाभिमुख व पश्चिमाभिमुख हो. म्हणजे आम्ही सोम विकत घेण्यास जाऊं ते वेळीं पूर्वाभिमुख हो व सोम विकत घेऊन परत फिरल्यावर आमच्या मागें येत असतां तूं पश्चिमाभिमुख हो. आणि सूर्य तुझ्या उजव्या पायाचें बंधन करो. म्हणजे तूं चुकणार नाहींस व सूर्य यज्ञाचा अध्यक्ष जो इंद्र त्याच्या निमित्तानें मार्गापासून तुझें रक्षण करो. ॥ १९ ॥

अनु त्वा माता मन्यतामनु पितानु भ्राता सगर्भ्यो नु सखा सयूथ्यः । सा देवि देवमच्छेहीन्द्राय सोमꣳ रुद्रस्त्वावर्तयतु स्वस्ति सोमसखा पुनरेहि ॥ २० ॥

अर्थ--सोम आणण्याकरिता प्रवृत्त झालेल्या तुला तुझे आईबाप, सोदरभ्राता, तुझ्यांच कळपांत असलेला तुझा मित्र व वत्स हे आज्ञा देवोत. हे सोमक्रयणी देवी, तूं इंद्राकरितां सोम मिळविण्यास जा व सोम विकत घेतल्यावर उभ्या असलेल्या तुला रुद्र आमच्याकडे परत पाठवो. सोम जिचा मित्र आहे अशी तूं सोमासहवर्तमान पुनः आमचेकडे सुखानें ये. ॥ २० ॥

विनियोग--उत्तरेकडे जाणाऱ्या सोमक्रयणीची ' वस्व्यसि ' या मंत्रानें स्तुति करावी.

वस्व्यस्यदितिरस्यादित्यासि रुद्रासि चन्द्रासि । बृहस्पतिष्ट्वा सुम्ने रम्णातु रुद्रो वसुभिराचके ॥ २१ ॥

अर्थ--हे गाई, तूं वसु, अदिति, आदित्य, रुद्र व चंद्ररूपी आहेस. तुला बृहस्पति सुखानें खेळवो व रुद्र अष्ट वसूंसह तुझें रक्षण करण्याची इच्छा करो. ॥ २१ ॥

विनियोग--गाईच्या सातव्या पावलाच्या स्थलीं सुवर्ण ठेवून 'अदित्यास्त्वा ' या मंत्रानें होम करावा. स्फ्य घेऊन ' अस्मे रमस्व ' या मंत्रानें भूमीवर तीन रेघा ओढाव्या. ' अस्मे ते बंधु ' या मंत्रानें गोपद उचलून स्थालींत ठेवावें. ' त्वे रायः ' या मंत्रानें यजमानाला गोपद समर्पण करावें. 'मे रायः ' या मंत्रानें यजमानानें गोपद ग्रहण करावें. ' मा वयं ' या मंत्रानें अध्वर्यूनें आपल्या शरीराला स्पर्श करावा. नेष्टयानें ' तोतो रायः ' या मंत्रानें यजमानपत्नीला गोपद द्यावें.

अदित्यास्त्वा मूर्धन्नाजिघर्मि देवयजने पृथिव्याऽइडायास्पदमसि घृतवत्स्वाहा । अस्मे रमस्वास्मे ते बन्धुस्त्वे रायो मे रायो मा वयꣳ रायस्पोषेण वियौष्म तोतो रायः ॥ २२ ॥

अर्थ—हे आज्या, अखण्डित पृथ्वीच्या शिरोरूप देवयजनस्थानामध्यें मी तुझा होम करितों. हे स्थानविशेषा, गाईच्या पदानें चिन्हित असल्यानें तूं तद्रूपी आहेस. तें पद घृतयुक्त करण्याकरितां मी होम करितों. हे गाईच्या पावला, तूं आमच्यांत रममाण हो. हे गोपदा, आम्ही तुझे बंधु आहोंत. हे यजमाना, तुझ्या ठायीं धन अथवा पशु असोत. आम्ही धनवृद्धिरहित होऊं नये. यजमानपत्नीचे ठायीं गोपदरूपानें द्रव्य व पशु राहोत ॥ २२ ॥

विनियोग—सोमक्रयणी गाय जिच्याकडे पाहते अशा यजमानपत्नीकडून समाख्ये ' हा मंत्र म्हणवावा. यजमानपत्नी सोमक्रयणीपासून वर मागून घेते.

समाख्ये देव्या धिया संदक्षिणयोरुचक्षसा । मा मऽ आयुः प्रमोषीर्मोऽ अहं तव वीरं विदेय तव देवि संदृशि ॥ २३ ॥

अर्थ—हे सोमक्रयणि, प्रकाशमान, दक्षिणेस योग्य व विस्तीर्ण दर्शन करणारी अशा त्वां मजकडे बुद्धिपूर्वक पाहिलेंस. तूं माझें आयुष्य खण्डित करूं नकोस. मीही तुझें आयुष्य खण्डित करणार नाहीं आणखी हे देवि, तुझी कृपादृष्टि असल्यावर मला वीरपुत्र होईल ॥ २३ ॥

विनियोग—यजमानाकडून ' एष ते ' इत्यादि चार मंत्र म्हणवावेत. ' आस्माकोऽसि ' या मंत्रानें सोमाला स्पर्श करावा.

एष ते गायत्रो भागऽइति मे सोमाय ब्रूतादेष ते त्रैष्टुभो भागऽइति मे सोमाय ब्रूतादेष ते जागतो भाग इति मे सोमाय ब्रूताच्छन्दोनामानाꣳ साम्राज्यं गच्छेति मे सोमाय ब्रूतादास्माकोऽसि शुक्रस्ते ग्रहो विचितस्त्वा विचिन्वन्तु ॥ २४ ॥

अर्थ—हे अध्वर्यो, तूं सोमाला असें सांग कीं हे सोमा, तुझा अंश गायत्रीकरितां आहे, व्यर्थ नाश करण्याकरितां नाहीं. तसेंच हा दुसरा अंश त्रिष्टुप् छन्दाकरितां, तिसरा जगती छन्दाकरितां व चौथा उष्णिगादि छन्दांकरितां आहे. त्या सर्व छन्दांचें

आधिपत्य तूं प्राप्त कर. हे अध्वर्यो, हें सर्व तूं सोमाला सांग. हे सोमा, आम्हीं विकत घेतल्यानें तूं आमचा झालास. शुक्रपात्र तुझें स्थान आहे. विवेकपूर्वक ग्रहण करणारे सारासारविवेकपूर्वक तुझें ग्रहण करोत. ॥ २४ ॥

विनियोग—सोम बांधण्याकरितां दुहेरी व चोहेरी दोरी पसरावी. व त्यावर दहा वेळा ' अभित्यं ' या मंत्रानें सोम मोजून घ्यावा. ' प्रजाभ्यस्त्वा ' या मंत्रानें पागोट्यानें सोमाला बांधावें. नंतर पागोट्यानें बांधलेल्या सोमाचा श्वास बंद होऊं नये म्हणून ' प्रजास्त्वा ' या मंत्रानें सोमाच्या मध्यभागीं थोडी जागा अंगुलीनें मोकळी करावी. (थोडें छिद्र पाडावें.)

आभि त्यं देवꣳ सवितारमोण्योः कविक्रतुमर्चामि सत्यसवꣳ रत्नधा-मभि प्रियं मतिं कविम् । ऊर्ध्वा यस्या मतिर्भाऽ अदिद्युतत्सवीमनि हिरण्यपाणिरमिमीत सुक्रतुः÷ कृपा स्वः÷ । प्रजाभ्यस्त्वा प्रजास्त्वानुप्रा-णन्तु प्रजास्त्वमनुप्राणिहि ॥ २५ ॥

अर्थ—द्यावापृथिवींत असणारा, बुद्धिमत्तेचीं कार्यें करणारा, अमोघ प्रेरणा कर-णारा, रत्न देणारा, सर्वथा प्रेम ठेवण्यास योग्य, मनन करण्यास योग्य व पूर्वी घड-लेलें सर्व पाहणारा असा जो सविता देव त्याची मी पूजा करितों. ज्या सवित्याची अपरिमेय कांति गगनाभिमुख झाली असतां नक्षत्रविशिष्ट आकाशांतील सर्व वस्तूंना प्रकाशित करिते, सोन्याचे दागिने ज्याच्या हातांत आहेत व उत्तम संकल्प करणाऱ्या अशा त्या सूर्यानें कल्पनेनें सोमाला मोजलें. हे सोमा, प्रजांवर उपकाराकरितां मी तुला बांधतों. हे सोमा, तूं श्वासोच्छ्वास केल्यावर सर्व प्रजा श्वासोच्छ्वास करोत व प्रजेच्या श्वासोच्छ्वासानंतर तूं श्वास घे. तात्पर्य प्रजा व तूं एकमेकांच्या धोरणानें श्वासोच्छ्वास करा. ॥ २५ ॥

विनियोग—सुवर्णाला स्पर्श करून ' शुक्रं त्वा ' हा मंत्र म्हणवावा. सोनें घेऊन सोम विकणाऱ्याच्या हातांत पुनः पुनः सोनें देऊन काढून घ्यावें व ' सग्मे ते ' या मंत्रानें त्याला निराश करावा. ' अस्मे ते ' या मंत्रानें पुनः गाय सोम विकणाऱ्या पुढें ठेवावी. अजेला (मेंढीला) स्पर्श करून ' तपसस्तनूः ' हा मंत्र म्हणवावा.

शुक्रं त्वा शुक्रेण क्रीणामि चन्द्रं चन्द्रेणाऽमृतममृतेन । सग्मे ते गौरस्मे ते चन्द्राणि तपसस्तनूरसि प्रजापतेर्वर्णः÷ परमेण पशुना क्रीयसे सहस्र-पोषं पुषेयम् ॥ २६ ॥

अर्थ—हे सोमा, दीप्यमान, आल्हादक व अविनाशी अशा तुला मी दीप्यमान, आल्हादक व अविनाशी सुवर्णानें विकत घेतों. हे सोम विकणाऱ्या, सोमाचें मूल्य म्हणून दिलेली गाय यजमानाकडे परत येवो व हें सोनें मात्र तुजकडे राहो. हे सोम विकणाऱ्या, तूं गायच घे व आम्हीं दिलेलें सोनें आम्हांला परत दे. हे अजे, तूं तपाचें व प्रजापतीचें शरीर आहेस. हे सोमा, उत्तम अजासंज्ञक पशु देऊन मीं तुला विकत घेतलें आहे. तुझ्या प्रसादानें पुत्रपशु वगैरेनीं माझी सहस्रपटीनें वृद्धि होवो. ॥ २६ ॥

विनियोग—डाव्या हातानें अजा देऊन उजव्या हातानें सोम घेतांना ' मित्रो नः ' हा मंत्र म्हणावा. ' इन्द्रस्योरुम् ' या मंत्रानें यजमानाच्या उजव्या मांडीवर वस्त्र पसरून त्यावर सोम ठेवावा. सोम विकणाऱ्याकडे पाहून ' स्वान भ्राज ' हा मंत्र म्हणावा.

मित्रो नऽएहि सुमित्रधऽ इन्द्रस्योरुमाविश दक्षिणमुशन्नुशन्तꣳ स्योनꣳ स्योनम् । स्वान भ्राजाङ्गारे बम्भारे हस्त सुहस्त कृशानवेते वः सोमक्रयणास्तान्रक्षध्वं मा वो दभन् ॥ २७ ॥

अर्थ—हे सोमा, रविरूपी व उत्तम मित्र धारण करणारा असा तूं आम्हांकडे ये. हे सोमा, स्पृहणीय व सुखकारक असा तूं तुझी इच्छा करणाऱ्या व सुखकारक अशा यजमानाच्या उजव्या मांडीवर बैस. १ स्वान (शब्द करणारा) २ भ्राज (देदीप्यमान) ३ अङ्गारि (पापनाशक) ४ बम्भारि (विश्वपोषक) ५ हस्त (सर्वदा आनंदी) ६ सुहस्त (चांगल्या हाताचा) ७ कृशानु (दुर्बलांचा पोषक) हे सात सोमाचे रक्षण करणारे देव आहेत. हे स्वानादि सप्त देवांनों, सोम विकत घेण्याकरितां आणलेले सुवर्णादि पदार्थ तुमच्यापुढें ठेविले आहेत. त्यांचें रक्षण करा. वैरी तुमची हिंसा न करोत. ॥ २७ ॥

विनियोग—सोम घेतलेल्या यजमानाकडून ' परिमामे ' हा मंत्र म्हणवावा.

परि माग्ने दुश्चरिताद्बाधस्वा मा सुचरिते भज । उदायुषा स्वायुषोदस्थाममृताँ २॥ अनु ॥ २८ ॥

अर्थ—हे अग्ने, पापापासून माझें निवारण कर व पुण्यकर्मांत माझी स्थापना कर. पुण्यफळ व यागादियोग्य आयुष्य प्राप्त व्हावें म्हणून सोमादि देवांना अनुलक्षून मी उठलों आहें. ॥ २८ ॥

विनियोग—डोक्यावर सोम घेऊन 'प्रतिपन्थाम्' या मंत्रानें शकटाकडे जावें.

प्रति पन्थामपद्महि स्वस्तिगामनेहसम्। येन विश्वाः परि द्विषो वृणक्ति विन्दते वसु ॥ २९ ॥

अर्थ—आम्ही सुखानें प्राप्य, चोरादिरहित अशा व ज्या मार्गानें गेलेला मनुष्य सर्व चोरादिकांचा संबंध सोडतो व द्रव्य मिळवितो त्या मार्गाला प्राप्त झालों आहोंत. ॥ २९ ॥

विनियोग—शकटांत कृष्णमृगाजिन 'अदित्यास्त्वगसि' या मंत्रानें अंथरावें. 'अदित्यै सदः' या मंत्रानें कृष्णाजिनावर सोम ठेवावा. सोमाला स्पर्श करून 'अस्तभ्नात्' या मंत्राचा उच्चार करवावा.

अदित्यास्त्वगस्यदित्यै सदऽआसीद। अस्तभ्नाद्द्यां वृषभोऽअन्तरिक्षममिमीत वरिमाणं पृथिव्याः। आसीदद्विश्वा भुवनानि सम्राड्विश्वेत्तानि वरुणस्य व्रतानि ॥ ३० ॥

अर्थ—हे कृष्णाजिना, तूं अखण्डित अशा पृथिवीची त्वचा आहेस. हे सोमा, तूं पृथ्वीच्या या स्थानावर बैस. श्रेष्ठ वरुण द्युलोक व अन्तरिक्ष पडूं नये म्हणून अडवून ठेवता झाला व तो पृथ्वीचा मोठेपणा जाणतो. तसेंच उत्तम शोभणारा असा तो वरुण सर्वच भुवनांना व्याप्त करितो. द्युलोकस्तंभनादिक हीं सर्व वरुणाचीं नियमित कार्यें आहेत. ॥ ३० ॥

विनियोग—'वनेषु व्यन्तरिक्षं' या मंत्रानें वस्त्रानें सगळीकडून सोमास बांधावें.

वनेषु व्यन्तरिक्षं तनोति वाजमर्वत्सु पयऽउक्थ्येषु। हृत्सु क्रतुं वरुणो विक्ष्वग्निं दिवि सूर्यमदधात्सोममद्रौ ॥ ३१ ॥

अर्थ—वरुणानें वनांत झाडांवर आकाश पसरलें. तसेंच त्यानें घोड्यांत शक्ति, गाईंत दूध, हृदयांत संकल्पशक्तियुक्त मन, प्रजेंत जठराग्नि, द्युलोकांत सूर्य व पर्वतावर सोमवल्ली स्थापन केली ॥ ३१ ॥

विनियोग—सोमाचें चिन्ह म्हणून 'सूर्यस्य चक्षुः' या मंत्रानें कृष्णाजिन पुढें ठेवावें.

सूर्यस्य चक्षुरारोहाऽग्नेरक्ष्णः कनीनिकम्। यत्रैतशोभिरीयसे भ्राजमानो विपश्चिता ॥ ३२ ॥

अर्थ—हे कृष्णाजिना, तूं सूर्याच्या नेत्रावर व अग्नीच्या डोळ्याच्या बाहुलीवर आरोहण कर. ज्या स्थानामध्यें सर्वज्ञ अशा सूर्य व अग्नीनें प्रकाशित होऊन घोडयाकडून तूं वहन केला जाशील ॥ ३२ ॥

विनियोग—' उन्नावेतम् ' या मंत्रानें गाडीला दोन बैल जोडावे.

उन्नावेतं धूर्षाहौ युज्येथामनश्रूऽअवीरहणौ ब्रह्मचोदनौ । स्वस्ति यजमानस्य गृहान्गच्छतम् ॥ ३३ ॥

अर्थ—जोकड धारण करण्यास समर्थ, अश्रुरहित (उत्साही) रस्त्यांत शिशु वगैरेंची हिंसा न करणाऱ्या व ब्राह्मणांना यशाची प्रेरणा करणाऱ्या अशा हे दोन बैलांनो, तुम्ही या व स्वतः शकटाला जोडले जा आणि सुखानें यजमानाच्या घरीं जा ॥ ३३ ॥

विनियोग—' भद्रो मे ' असें यजमानाकडून म्हणवावें.

भद्रो मेऽसि प्रच्यवस्व भुवस्पते विश्वान्यभिधामानि । मा त्वा परिपरिणो विदन्मा त्वा परिपन्थिनो विदन्मा त्वा वृकाऽअघायवो विदन् ॥ श्येनो भूत्वा परापत यजमानस्य गृहान्गच्छ तन्नौ सं स्कृतम् ॥ ३४ ॥

अर्थ—हे सोमा, मज यजमानाच्या कल्याणाकरितां तूं कल्याणकारक रूप धारण केलेंस. हे अध्वर्यु वगैरेंच्या पालन करणाऱ्या पत्नीशाला, हविर्धान वगैरे सर्व स्थानांप्रत तूं गमन कर. सर्वत्र गमन करणारे व यज्ञांत विघ्न करणारे चोर आणि दुसऱ्याच्या वाईटावर असलेले रानांतील कुत्रे अगर दुर्जन तुला न जाणोत. म्हणजे त्यांचे टप्प्यांत तूं न येवो. आणखी तूं श्येनपक्ष्याप्रमाणें शीघ्रगामी होऊन यजमानाच्या घरीं जा. तेथें आपणाकरितां सर्व सामग्रीयुक्त स्थान तयार केलें आहे. ॥ ३४ ॥

विनियोग—यज्ञशालेच्या पूर्वभागीं प्रतिप्रस्थाता अग्निषोमीय पशु घेऊन उभा असतो. त्याला स्पर्श करून ' नमो मित्रस्य ' हा मंत्र म्हणवावा.

नमो मित्रस्य वरुणस्य चक्षसे महो देवाय तदृतꣳ सपर्यत । दूरेदृशे देवजाताय केतवे दिवस्पुत्राय सूर्याय शꣳसत ॥ ३५ ॥

अर्थ—सर्व जगाचा द्रष्टा, तेजोरूपी, प्रकाशक, सर्व जग ज्याला दुरूनच पहातें असा, देवांवर अनुग्रह करण्याकरितां उत्पन्न झालेला, विज्ञानघन, द्युलोकाला पुत्रासारखा आवडता असा जो सूर्य त्याला नमस्कार. हे ऋत्विजांनो, तुम्ही त्या सूर्याचें या यज्ञानुष्ठानानें सेवन करा व त्याची स्तुति करा ॥ ३५ ॥

विनियोग—गाडी उभी करण्याकरितां उपयोगीं पडणाऱ्या काष्ठावर 'वरुणस्योत्तम्भनम्' या मंत्रानें गाडी ठेवावी. 'वरुणस्य स्कम्भसर्जनी' या मंत्रानें शम्या (शिवळा) वर काढून घ्याव्या. उंबराच्या घडवंचीवर सोम ठेवावा व 'वरुणस्य ऋतसदन्यसि' या मंत्रानें तिला स्पर्श करावा. 'वरुणस्य ऋतसदनमसि' या मंत्रानें घडवंचीवर कृष्णाजिन पसरावें. नंतर त्यावर 'वरुणस्य ऋतसदनमासीद्' या मंत्रानें सोम ठेवावा.

वरुणस्योत्तम्भनमसि वरुणस्य स्कम्भसर्जनी स्थो वरुणस्यऽऋतसदन्यासि वरुणस्यऽऋतसदनमसि वरुणस्य ऋतसदनमासीद ॥ ३६ ॥

अर्थ—हे काष्ठा, तूं सोमाला उंच करणारें आहेस. हे शम्यांनो, तुम्ही वरुणांत बांधलेल्या सोमाला आडविणाऱ्या म्हणजे इकडे तिकडे जाऊं न देणाऱ्या आहां. हे आसंदि (घडवंची), तूं सोमाची यज्ञांतील बसण्याची जागा आहेस. हे कृष्णाजिना, तूं यज्ञांतील सोमाचें स्थान आहेस. हे सोमा, तूं यज्ञांतील तुझें आसन जें कृष्णाजिन त्यावर सुखानें बैस ॥ ३६ ॥

विनियोग—'या ते' हा मंत्र यजमानाकडून म्हणवावा.

या ते धामानि हविषा यजन्ति ता ते विश्वा परिभूरस्तु यज्ञम् । गयस्फानः प्रतरणः सुवीरो वीरघ्नो मोऽवीर्हा प्रचरा सोम दुर्यान् ॥ ३७ ॥

अर्थ—हे सोमा, तुझ्या प्रातःसवनादि स्थानांप्रत प्राप्त होऊन तुझ्या रसरूपी हविर्द्रव्यानें ऋत्विक् याग करतात. ऋत्विज् ज्या ज्या स्थानांवर याग करतील तेथें तेथें तूं प्राप्त हो. आणखी हे सोमा, गृह वाढविणारा, आपत्ति दूर करणारा, पुत्रपौत्र देणारा व त्यांचें पालन करणारा (नाश न करणारा) असा तूं गृहांप्रत प्राप्त हो ॥३७॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्याय श्रीधरशास्त्रिकृते**

माध्यन्दिनीय वाजसनेयि संहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

इति चतुर्थोऽध्यायः समाप्तः ।



अथ पञ्चमोऽध्यायः ॥ ५ ॥



विनियोग—चतुर्थ अध्यायांत ऋत्विजांसहवर्तमान यजमानाच्या शालाप्रवेशापासून सोम विकत घेऊन त्याचा शालेंत प्रवेश करीपर्यंतचे मंत्र सांगितले. आतां पांचव्या अध्यायांत आतिथ्येष्टींतील हविर्ग्रहणादिकांचे मंत्र सांगतात. आतिथ्येष्टींत 'अग्नेस्तनूः' इत्यादि पांच मंत्रांनीं पांच वेळां हविर्ग्रहण करावें.

अग्नेस्तनूरसि विष्णवे त्वा सोमस्य तनूरसि विष्णवे त्वातिथेरातिथ्यमसि विष्णवे त्वा श्येनाय त्वा सोमभृते विष्णवे त्वाग्नये त्वा रायस्पोषदे विष्णवे त्वा ॥ १ ॥

अर्थ—हे हविर्द्रव्या, तूं अग्नीचें शरीर आहेस. सर्व यज्ञव्यापी सोमाच्या संतोषाकरितां तुझें मी ग्रहण करितों. तूं सोम नांवाच्या सोमराजाच्या भृत्याचें शरीर आहेस. सर्व यज्ञव्यापी सोमाच्या संतोषाकरितां तुझें मी ग्रहण करतों. अतिथि नांवाचा जो सोमाचा सेवक त्याचे तूं आतिथ्य आहेस. सर्वव्यापी सोमाच्या संतोषाकरितां तुझें मी ग्रहण करितों. स्वर्गातून सोम आणणाऱ्या सर्वव्यापी श्येनसंज्ञक सोमाच्या तृप्तीकरितां तुझें मी ग्रहण करितों. राजांचें धन वाढविणाऱ्या अग्निसंज्ञक सोमसेवकाच्या संतोषाकरितां तुझें मी ग्रहण करितों. तूं सर्वव्यापी सोमाचे संतोषाकरितां आहेस. ॥ १ ॥

विनियोग—'अग्नेर्जनित्रं' या मंत्रानें अग्निमन्थनाचें शकल घेऊन वेदीवर ठेवावें. 'वृषणौ' या मंत्रानें दोन दर्भ शकलावर ठेवावे. 'उर्वश्यसि' या मंत्रानें दर्भावर अधरारणी ठेवावी. 'आयुरसि' या मंत्रानें उत्तरारणीनें आज्यस्थालीला स्पर्श करावा. 'पुरूरवा असि' या मंत्रानें अधरारणीवर उत्तरारणी स्थापन करावी. गायत्रेण इत्यादि तीन मंत्रांनीं अरणी-मंथन करावे.

अग्नेर्जनित्रमसि वृषणौ स्थऽउर्वश्यस्यायुरसि पुरूरवाऽआसि । गायत्रेण त्वा छन्दसा मन्थामि त्रैष्टुभेन त्वा छन्दसा मन्थामि जागतेन त्वा छन्दसा मन्थामि ॥ २ ॥

अर्थ—हे शकला, तूं अग्नीच्या उत्पत्तीचें आधारस्थान आहेस. हे दर्भांनो, तुम्ही अरणींत अग्नि उत्पन्न करण्यास समर्थ आहां. हे अधरारणे, तूं पुरूरव्याच्या उर्वशी-

प्रमाणें अधोभागीं रहाणारी आहेस. हे स्थालींतील घृता, तूं उत्पन्न होणाऱ्या अग्नीला आयुष्य देणारें आहेस. हे उत्तरारणे, तूं पुरूरव्याप्रमाणें अधरारणीच्या वर आहेस. हे अग्ने १ गायत्री, २ त्रिष्टुभ् व ३ जगती छंदाच्या अधिष्ठातृ देवतांच्या योगानें तुझें मी मंथन करितों. ॥ २ ॥

विनियोग--' भवतं नः ' या मंत्रानें मंथनोत्पन्न अग्नि आहवनीयांत स्थापन करावा.

भवतं नऽ समनसौ सचेतसावरेपसौ । मा यज्ञꣳ हिꣳसिष्टं मा यज्ञपतिं जातवेदसौ शिवौ भवतमद्य नः ॥ ३ ॥

अर्थ--हे निर्मथ्याहवनीयरूपी अग्निदेवतांनो, तुम्ही आमच्यावर एकचित्तानें अनुग्रह करा. तसेंच आम्हीं अपराध केला तरी तुम्ही आमच्यावर रागावूं नका. आमच्या यज्ञकर्माची व यजमानाची हिंसा करूं नका. तसेंच आज (अनुष्ठानदिवशीं) आमचें कल्याण करा. ॥ ३ ॥

विनियोग--' अग्नावग्निः ' या मंत्रानें स्थालींतून स्रुव्यानें होम करावा.

अग्नावग्निश्चरति प्रविष्टऽऋषीणां पुत्रोऽअभिशस्तिपावा । स नः स्योनः सुयजा यजेह देवेभ्यो हव्यꣳ सदमप्रयुच्छन्त्स्वाहा ॥ ४ ॥

अर्थ--*मथ्यमान अग्नि आहवनीयांत प्रविष्ट होऊन हविर्द्रव्य भक्षण करितो. तो* अग्नि ऋषितुल्य ऋत्विजांच्या पुत्रासारखा आहे. तसेंच तो यज्ञवैकल्यनिमित्त प्रत्यवायापासून रक्षण करणारा आहे. अशा हे अग्ने, तूं आमच्याकरितां सुखकर हो व देवाशीं उत्तम रीतीनें युक्त होऊन या यज्ञस्थानांत आम्हीं इंद्रादिकांना दिलेलें हविर्द्रव्य त्यांच्याकडे न चुकतां पोंचव. हें घृत तुला सुहुत असो. ॥ ४ ॥

विनियोग--*'आपतये त्वा' या मंत्रानें व्रतपात्रांत ध्रुवास्थ आज्य दोन वेळां* स्थालींतून स्रुव्यानें ग्रहण करावें.

आपतये त्वा परिपतये गृह्णामि तनूनप्त्रे शाक्वराय शक्वनऽओजिष्ठाय । अनाधृष्टमस्यनाधृष्यं देवानामोजोऽनभिशस्त्यभिशस्तिपाऽअनभिशस्तेन्यमक्षसा सत्यमुपगेषꣳ स्विते मा धाꣳ ॥ ५ ॥

अर्थ--*हे आज्या, तुला मी सर्वव्यापी वायूकरितां ग्रहण करितों. तो वायु सर्व*व्यापी विश्वोत्पादकाचा नातू आकाशाचा पुत्र सर्व करण्यास समर्थ व बलवान आहे. हे

आज्या, आतांपावेतों कोणी तुझा तिरस्कार केला नाहीं व पुढेंही कोणी करणार नाहीं. तूं देवांचें अनिंद्य तेज असून ऋत्विजांना परस्परनिंदेपासून परावृत्त करणारें व अनिंद्य अशा स्वर्गाप्रत नेणारें आहेस. हे आज्या, मी सरळ मनानें तुझी शपथ घेतों. तूं मला चांगल्या यज्ञकर्मांत स्थापन कर. ॥ ५ ॥

विनियोग—'अग्ने व्रतपा' या मंत्रानें आहवनीय अग्नींत समिधेचा होम करावा.

अग्ने व्रतपास्त्वे व्रतपा या तवं तनूरियꣳ सा मयि यो मम तनूरेषा सा त्वयि । सह नौ व्रतपते व्रतान्यनु मे दीक्षां दीक्षापतिर्मन्यतामनु तपस्तपस्पतिꣳ ॥ ६ ॥

अर्थ—हे व्रतपालन करणाऱ्या अग्ने, तूं माझ्या यज्ञाचा पालक आहेस. तुझें शरीर माझे ठायीं प्राप्त होवो व माझें शरीर तुझ्या शरीरांत प्रविष्ट होवो. असें झालें म्हणजे व्रतपालन करणाऱ्या हे अग्ने, आपणा दोघांचीं (अग्नियजमानांचीं) कार्ये एकदमच चालू होवोत. व्रतांविषयीं जितका माझा आदर आहे तितकाच तुझाही असो व दीक्षेचा पालक आणि तपाचा पालक जो सोम तो माझी दीक्षा व तप कबूल करो. ॥ ६ ॥

विनियोग—'अꣳशुः' या मंत्रानें सोमवृद्धि करावी. 'एष्टा रायः' या मंत्रानें सोम पाट्यावर ठेवून झांकावा.

अꣳ शुरꣳ शुष्टे देव सोमाप्यायतामिन्द्रायैकधनविदे । आ तुभ्यमिन्द्रꣳ प्यायतामा त्वमिन्द्राय प्यायस्व । आप्याययास्मान्त्सखीन्त्सन्या मेधया स्वस्ति ते देव सोम सुत्यामशीय । एष्टा रायꣳ प्रेषे भगायऽऋतमृतवादिभ्यो नमो द्यावापृथिवीभ्याम् ॥ ७ ॥

अर्थ—हे सोमा, तुझे सर्व अवयव सोमरूपी मुख्य धनाला जाणणाऱ्या इंद्राकरितां वाढोत. तुझ्या पानाकरितां इंद्र वाढो, व त्याच्या पानाकरितां तूंही वाढ. हे सोमा, तुझे मित्र जे आम्ही ऋत्विज त्यांना धन व बुद्धि देऊन वाढव. हे सोमा, तुझें कल्याण असो. तुझ्या कृपेनें आम्ही तुझें कंडण करूं. सर्व धनें आम्हांला इष्ट आहेत. हे सोमा, तूं पाठविलेल्या ऐश्वर्याकरितां आम्हांला द्रव्य मिळो. तूं सत्यवादी अग्निहोत्र्याकरितां अमोघ फलात्मक कर्म संपादन कर. द्यावापृथ्वींच्या अभिमानी देवतांना नमस्कार असो. ॥ ७ ॥

विनियोग—' या ते ' या मंत्रानें स्रुच्यानें उपसद्होम करावा.

या तेऽअग्नेयऽशया तनूर्वर्षिष्ठा गह्वरेष्ठा । उग्रं वचोऽअपावधीस्त्वेषं वचोऽअपावधीत्स्वाहा । या तेऽअग्ने रजऽशया तनूर्वर्षिष्ठा गह्वरेष्ठा । उग्रं वचोऽअपावधीस्त्वेषं वचोऽअपावधीत्स्वाहा । या तेऽअग्ने हरिशया तनूर्वर्षिष्ठा गह्वरेष्ठा । उग्रं वचोऽअपावधीस्त्वेषं वचोऽअपावधीत्स्वाहा ॥ ८ ॥

अर्थ—(लोहमय, रजतमय व सुवर्णमय अशीं तीन अग्नीचीं शरीरे आहेत.) हे अग्ने, देवांना आवडणाऱ्या फलांची वृष्टि करणारें व असुरांच्या विषम प्रदेशांत राहणारें जें तुझें लोहमय शरीर आहे त्या शरीरानें तीव्र व देवनिंदक राक्षसवाक्य नष्ट केलें. अशा लोहमय शरीराच्या अग्नीला हें हवि सुहुत असो. तसेंच हे अग्ने, पूर्वोक्त गुणांनीं विशिष्ट असें तुझें रजतमय व सुवर्णमय शरीर पूर्वोक्त तीव्र व उग्रवाक्य नष्ट करितें झालें त्या तुला हें हवि सुहुत असो ॥ ८ ॥

विनियोग—' तप्तायनी ' इत्यादि चार मंत्रांनीं स्फ्यानें चार रेघा चात्वालावर ओढाव्या. ' विदेदग्निः ' या मंत्रानें चात्वालावरील मृत्तिका खणावी. ' अग्ने अंगिरः' या मंत्रानें खणलेल्या मातीवर प्रहार करावा. ' योस्याम् ' या मंत्रानें उत्तर वेदीवर माती टाकावी. अशीच क्रिया पुनः दोन वेळां करावी. ' अनुत्वा ' या मंत्रानें चतुर्थ वेळीं आहरण-प्रक्षेपण करावें.

तप्तायनी मेऽसि वित्तायनी मेऽस्यवतान्मा नाथितादवतान्मा व्यथितात् । विदेदग्निर्नभो नामाग्नेऽअङ्गिरऽआयुना नाम्नेहि स्रुचोऽस्यां पृथिव्यामसि यत्ते नाधृष्टं नाम यज्ञियं तेन त्वादधे विदेदग्निर्नभो नामाग्नेऽअङ्गिरऽआयुना नाम्नेहि यो द्वितीयस्यां पृथिव्यामसि यत्तेऽनाधृष्टं नाम यज्ञियं तेन त्वादधे विदेदग्निर्नभो नामाग्नेऽअङ्गिरऽआयुना नाम्नेहि यस्तृतीयस्यां पृथिव्यामासि यत्तेऽनाधृष्टं नाम यज्ञियं तेन त्वादधे । अनु त्वा देववीतये ॥ ९ ॥

अर्थ—हे पृथ्वी, तूं माझ्यावर अनुग्रह करून क्षेत्र नसल्याबद्दलचा माझा शोक दूर कर. मला वित्त देणारी हो, व भिक्षेपासून आणि स्थानभ्रंशापासून माझें रक्षण कर. हे मृत्तिके, नभोनामक अग्नि तुला जाणो. हे गतिमान् अग्ने, तूं आयु या नांवानें संबोधिला गेल्यावर ये. हे अग्ने, तूं या पृथ्वीवर राहतोस. तुझें यज्ञयोग्य व अतिरस्कृत अग्नि असें जें नांव आहे त्यायोगें मी तुझें स्थापन करितों. हे मृत्तिके, नभोनामक अग्नि तुला जाणो. हे गतिमान् अग्ने, तूं आयु या नांवानें संबोधिला गेल्यावर ये.

हे अग्ने, तूं या अंतरिक्षावर राहतोस. तुझें यज्ञयोग्य व अतिरस्कृत अग्नि असें जें नांव आहे त्यायोगें मी तुझें स्थापन करितों. हे मृत्तिके, नभोनामक अग्नि तुला जाणो. हे अग्ने, तूं आयु नांवानें संबोधिला गेल्यावर ये. हे अग्ने, तूं द्युलोकावर राहतोस. तुझें यज्ञयोग्य व अतिरस्कृत अग्नि असें जें नांव आहे त्यायोगें मी तुझें स्थापन करितों. हे मृत्तिके, देवांचे संतोषाकरितां मी तुझें पूर्वीप्रमाणेंच आहरण करितों ॥ ९ ॥

विनियोग—'सिꣳह्यसि' ह्या मंत्रानें वेदीवरील माती सारखी करावी. 'सिꣳह्यसि' इत्यादि प्रत्येक मंत्रानें उत्तर वेदीवर जलसिञ्चन करून बारीक वालू पसरावी.

सिꣳह्यसि सपत्नसाही देवेभ्यः÷ कल्पस्व सिꣳह्यसि सपत्नसाही देवेभ्यः÷ शुन्धस्व सिꣳह्यसि सपत्नसाही देवेभ्यः÷ शुंभस्व ॥ १० ॥

अर्थ—हे उत्तरवेदे, तूं सिंहिणीसारखी होऊन शत्रूंचा पराजय करिती झालीस म्हणून देवावर उपकार करण्यास समर्थ हो. हे उत्तरवेदे, तूं सिंहिणीसारखी होऊन शत्रूंचा पराजय करिती झालीस म्हणून तूं देवांवर उपकार करण्याकरितां शुद्ध हो. हे उत्तरवेदे, तूं सिंहिणीसारखी होऊन शत्रूंचा पराजय करिती झालीस म्हणून वालूच्या पसरण्यानें सुशोभित हो. ॥ १० ॥

विनियोग—वेदीवर उभें राहून 'इंद्रघोषस्त्वा' या मंत्रानें प्रत्येक दिशेकडे जलसिञ्चन करावें. 'इदमहं' या मंत्रानें वेदीच्या बाहेर जलसिञ्चन करावें.

इन्द्रघोषस्त्वा वसुभिः पुरस्तात्पातु प्रचेतास्त्वा रुद्रैः पश्चात्पातु मनोजवास्त्वा पितृभिर्दक्षिणतः पातु विश्वकर्मा त्वादित्यैरुत्तरतः पात्विदमहं तमं वार्बाधिर्धा यज्ञाभिः संजामि ॥ ११ ॥

अर्थ—हे उत्तरवेदे, इंद्र शब्दानें बोलला जाणारा देव अष्टवसूंसह पूर्व दिशेकडे तुझें रक्षण करो. तसेंच प्रज्ञावान् वरुण एकादश रुद्रांसह पश्चिमेकडे, मनाप्रमाणें वेगवान् यम पितृगणांसह दक्षिणेकडे व द्वादशादित्यांसह विश्वकर्मा उत्तर दिशेकडे तुझें रक्षण करो. असुरनिवारक म्हणून तापलेलें हें अवशिष्ट जल यज्ञाचे बहिर्भागीं सिञ्चन करितों ॥ ११ ॥

विनियोग—जुहूंत पांच वेळां घृत घेऊन 'सिꣳह्यसि' या मंत्रांनीं होम करावा. 'भूतेभ्यस्त्वा' या मंत्रानें स्रुचा उचलावी.

सिꣳहꣳसि स्वाहा सिꣳहꣳस्यादित्यवानिꣳ स्वाहा सिꣳहꣳसि ब्रह्मवनिꣳ क्षत्रवानिꣳ स्वाहा सिꣳह्यसि सुप्रजावनी रायस्पोषवनिꣳ स्वाहा सिꣳह्यस्यावह देवान्यजमानाय स्वाहा भूतेभ्यस्त्वा ॥ १२ ॥

अर्थ—हे उत्तरवेदे, तूं सिंहसदृश आहेस. तुला हें हवि सुहुत असो. हे उत्तरवेदे, तूं आदित्यांना प्रसन्न करणारी सिंहसदृश आहेस, तुला हें हवि सुहुत असो व तूं ब्राह्मण जातीला आणि क्षत्रिय जातीला प्रसन्न करणारी सिंहसदृश आहेस, तुला हें हवि सुहुत असो व पुत्रपौत्रादि प्रजा आणि सुवर्णादि धन देणारी तूं सिंहसदृश आहेस, तुला हें हवि सुहुत असो. व तूं सिंहसदृश आहेस, या यजमानावर उपकार करण्याकरितां देवांना आण; तुला हें हवि सुहुत असो. जरायुज, अंडज, स्वेदज, व उद्भिज्ज, अशा चतुर्विध प्राण्यांचे हिताकरितां मी स्रुचा उचलतों ॥ १२ ॥

विनियोग—देवदारु वृक्षांच्या परिधींनीं 'ध्रुवोसि' वगैरे मंत्रांनीं उत्तर वेदीच्या मध्यभागाचें परिधान करावें. 'अग्नेः पुरीषम्' या मंत्रानें गुग्गुळ वगैरे द्रव्य वेदीच्या मध्यभागावर ठेवावें.

ध्रुवोऽसि पृथिवीं दृꣳह ध्रुवक्षिदस्यन्तरिक्षं दृꣳहाच्युतक्षिदसि दिवं दृꣳह ह्राग्नेꣳ पुरीषमसि ॥ १३ ॥

अर्थ—हे मध्यम-परिधि-देवते, तूं दृढ आहेस म्हणून पृथ्वीला दृढ कर. तसेंच हे दक्षिणपरिधिदेवते, तूं स्थिरयज्ञांत राहणारी आहेस म्हणून अंतरिक्षाला दृढ कर. हे उत्तरपरिधिदेवते, तूं अविनाशी यज्ञांत रहाणारी आहेस म्हणून द्युलोकाला दृढ कर. हे गुग्गुळ वगैरे वस्तुसामग्री, तूं अग्नीला पूर्ण करणारी आहेस ॥ १३ ॥

विनियोग—'युञ्जते' या मंत्रानें चार वेळां घेतलेल्या घृताचा होम करावा.

युञ्जते मनऽउत युञ्जते धियो विप्रा विप्रस्य बृहतो विपश्चितः । वि होत्रा दधे वयुनाविदेकऽइन्महीꣳ देवस्य सवितुꣳ परिष्टुतिꣳ स्वाहा ॥ १४ ॥

अर्थ—मोठ्या वेदवेत्त्या यजमानाचे होम करणारे ऋत्विज, आपल्या मनाची व इंद्रियांची यज्ञकर्मांतच स्थापना करितात व लौकिक विषयांतून त्यांना काढून घेतात. हें ऋत्विजांचें मनोनियमन एका सर्वसाक्षी परमात्म्यानेंच केलें. कारण कीं, त्या

अंतर्यामी ईश्वराची सर्वदा बोलली जाणारी ही मोठी स्तुति आहे. हें हवि सुहुत असो ॥ १४ ॥

विनियोग—शकटाच्या दक्षिणचक्राचे मार्गावर सोनें घालून 'इदं विष्णुः' या मंत्रानें होम करावा.

इदं विष्णुर्विचक्रमे त्रेधा निदधे पदम्। समूढमस्य पाꣳसुरे स्वाहा ॥१५॥

अर्थ—सर्वव्यापी देवानें वेगवेगळ्या तऱ्हेनें या जगाचें आक्रमण केलें, तें असें कीं त्यानें अग्नि, वायु व सूर्याच्या रूपानें भूमि, अंतरिक्ष व द्युलोक या तिघांवर क्रमानें आपलें पद ठेविले. (आक्रमण केलें). भूम्यादि लोकरूप रजःकण ज्यांत आहेत अशा विष्णूच्या पावलांत हें सर्व जग अंतर्भूत झाले आहे. त्याला हें हवि सुहुत असो ॥ १५ ॥

विनियोग—शकटाच्या उत्तर चक्राच्या मार्गावर प्रतिप्रस्थात्यानें 'इरावती' या मंत्रानें होम करावा.

इरावती धेनुमती हि भूतꣳसूयवसिनी मनवे दशस्था । व्यस्कभ्ना रोदसी विष्णवे ते दाधर्थ पृथिवीमभितो मयूखैꣳ स्वाहा ॥ १६ ॥

अर्थ--हे द्यावापृथिवीनो, तुम्ही अन्नयुक्त, बहुधेनुयुक्त, पुष्कळ भक्ष्य पदार्थांनीं युक्त, व यजमानाला यज्ञसाधनें पुरविणाऱ्या अशा व्हा. हे विष्णो, तूं या द्यावापृथिवींना अडवून धरले आहेस. व पृथिवीला स्वतेजानें सर्व बाजूंनीं धारण केलेंस; अशा तुज विष्णूप्रत हें हवि सुहुत असो. ॥ १६ ॥

विनियोग—प्रतिप्रस्थात्यानें यजमानपत्नीस बोलवून आणावें. नंतर तिनें अक्षाच्या (कण्याच्या) दोन्ही अग्र भागांना होमावशिष्ट आज्य माखावें. 'प्राची प्रेतं' इत्यादि यजमानाकडून बोलवावें. कण्याचा शब्द होत असतां 'स्वं गोष्ठम्' असें यजमानाकडून बोलवावें. 'अत्र रमेथाम्' मंत्रानें वेदीसमीपस्थ शकटांचें अभिमंत्रण करावें.

देवश्रुतौ देवेष्वाघोषतं प्राचीं प्रेतमध्वरं कल्पयन्तीऽऊर्ध्वं यज्ञं नयतं मा जिह्वरतम्। स्वं गोष्ठमावदतं देवि दुर्येऽआयुर्मा निर्वादिष्टं प्रजां मा निर्वादिष्टमत्र रमेथां वर्ष्मन्पृथिव्याः ॥ १७ ॥

अर्थ—देवसभेंत प्रसिद्ध असलेल्या अक्षधुरांनो, हा यजमान यज्ञ करणार आहे असें तुम्ही देवसभेंत जाऊन उंच स्वरानें कळवा. हे दोन शकटांनो, हें यज्ञकर्म करण्यास समर्थ असे तुम्ही पूर्व दिशेकडे जा. या यज्ञाला वर देवाकडे पोंचवा व तुम्ही चालतांना वांकडे होऊं नका. प्रकाशमान अशा गृहसदृश शकटरूपी देवतांनो, तुम्ही आपल्या शब्दानें या यजमानाचा गोठा पुष्कळ पशूंनीं युक्त होईल असें सांगा. ज्या योगें यजमानाच्या आयुष्याचें व प्रजेचें निराकरण होईल असा शब्द करूं नका. हे शकटांनों, भूमीचें शरीर असलेल्या अशा या देवयजनस्थलीं तुम्ही रममाण व्हा. ॥ १७ ॥

विनियोग—दक्षिणशकटाचा अग्रभाग धारण करण्याकरितां आधारभूत असें काष्ठ ' विष्णोर्नुकम् ' या मंत्रानें स्थापन करावें. ' विष्णवे त्वा ' या मंत्रानें काष्ठ जमिनींत रोवावें.

विष्णोर्नुकं वीर्याणि प्रवोचं यः पार्थिवानि विममे रजाꣳसि । योऽअस्कभायदुत्तरꣳ सधस्थं विचक्रमाणस्त्रेधोरुगायो विष्णवे त्वा ॥ १८ ॥

अर्थ—विष्णूचेच पराक्रम मी सांगतों. ज्या विष्णूनें पृथ्वी, अंतरिक्ष व द्युलोकस्थानें निर्माण केलीं, तसेंच ज्या विष्णूनें वर असलेलें द्युलोकरूपी देवाचें सहवासस्थान पडूं नये म्हणून अडवून धरलें, तो विष्णु तीन लोकांमध्यें अग्नि, वायु, सूर्यरूपानें तीन पावलें ठेविता झाला व महात्मे त्याची स्तुति करितात. हे काष्ठा, विष्णूच्या संतोषाकरितां तुला आम्ही जमिनींत पुरतों. ॥ १८ ॥

विनियोग—प्रतिप्रस्थात्यानें उत्तर शकटसंबंधी काष्ठ ' दिवो वा ' या मंत्रानें रोवावें.

दिवो वा विष्ण उत वा पृथिव्या महो वा विष्णऽउरोरन्तरिक्षात् । उभा हि हस्ता वसुना पृणस्वा प्रयच्छ दक्षिणादोत सव्याद्विष्णवे त्वा ॥ १९ ॥

अर्थ—हे विष्णो, द्युलोकांतून तसेंच भूलोकांतून व विस्तीर्ण अशा अंतरिक्ष लोकांतून आणलेल्या द्रव्यानें तूं आपले दोन्हीही हात पूर्ण कर (भरून घे.) नंतर तें डाव्या व उजव्या हातांतील द्रव्य आम्हांला दे. हे काष्ठा, विष्णूच्या संतोषाकरितां तुला आम्ही जमिनींत पुरतों. ॥ १९ ॥

विनियोग—मध्यमछदि (छप्परा) ला स्पर्श करून ' प्रतद्विष्णुः ' हा मंत्र म्हणवावा.

प्र तद्विष्णुः स्तवते वीर्येण मृगो न भीमः कुचरो गिरिष्ठाः । यस्योरुषु त्रिषु विक्रमणेष्वधिक्षियन्ति भुवनानि विश्वा ॥ २० ॥

अर्थ—तो प्रसिद्ध विष्णु पर्वतावरील प्राणिहिंसक अशा भयंकर सिंहाप्रमाणें शौर्य या गुणानें स्तुति केला जातो. ज्या विष्णूच्या विस्तीर्ण अशा तीन पादप्रक्षेप-स्थानीं सर्व भुवनें राहतात ॥ २० ॥

विनियोग—' विष्णोरराटम् ' इत्यादि दोन मंत्र म्हणवावे. मोठ्या दाभणांत घातलेल्या दोरीनें द्वारशाखा शिवाव्या. ' विष्णो ध्रुवोसि ' या मंत्रानें दोरीला गांठ बांधावी. ' वैष्णवमसि ' या मंत्रानें हविर्धान मंडपाला स्पर्श करावा.

विष्णोः रराटमसि विष्णोः श्नप्त्रे स्थो विष्णोः स्यूरसि विष्णोर्ध्रुवोऽसि वैष्णवमसि विष्णवे त्वा ॥ २१ ॥

अर्थ—हे दर्भमय मालाधारवंशा, तूं विष्णुमूर्तिभूत अशा हविर्धान मंडपाच्या ललाटस्थानीं आहेस. हे पूर्वद्वारस्थस्तंभानो, तुम्ही विष्णुसंज्ञक हविर्धान मंडपाचे ओष्ठ-संधि अहां. हे रज्जु, तूं विष्णुसंज्ञक हविर्धान मंडपाला शिवणारी आहेस. हे रज्जु-ग्रंथि, तूं हविर्धान मंडपाची दृढ अशी गांठ आहेस. हे हविर्धान मंडपा, तूं विष्णु-देवतासंबंधी आहेस म्हणून विष्णूप्रीत्यर्थ तुला मी स्पर्श करितों ॥ २१ ॥

विनियोग—यज्ञस्तंभाकरितां खड्गा करितात त्याप्रमाणें चार खड्डे करावे. ' देवस्य त्वा ' या मंत्रानें अश्रिसंज्ञक काष्ठनिर्मित खणण्याचें साधन ग्रहण करावें. ' इदमहम् ' या मंत्रानें खड्गावर रेघा ओढाव्या. रेघा ज्या क्रमानें ओढल्या त्याच क्रमानें खड्डे खणावे.

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम् । आददे नार्यसीदमहꣳ रक्षसां ग्रीवाऽअपि कृन्तामि । बृहन्नसि बृहद्रवा बृहतीमिन्द्राय वाचं वद ॥ २२ ॥

अर्थ—हे अभ्रे, सवितृदेवाच्या प्रेरणेनें अश्विनीकुमारांच्या बाहूंनीं व पुष्याच्या हस्तांनीं मी तुझें ग्रहण करितों. तूं कर्मोपयोगी असल्यानें यजमानांची संबंधिनी

आहेस. मी या खड्ग्यावर रेघा ओढतों. त्यायोगें मी यज्ञविघातक राक्षसांचा कंठच्छेद करितों. हे उपरवाल्य खड्ग्या, तूं मोठा आहेस व खणत असतां तुझ्यांतून मोठा शब्द निघतो. म्हणून तूं इंद्राच्या संतोषाकरितां प्रौढ, ध्वनियुक्त वाणी बोल ॥ २२ ॥

विनियोग—'इदमहम्' या मंत्रानें खणण्याच्या क्रमानें खड्ग्यांतून माती बाहेर काढावी. 'उत्कृत्यांकिरामि' या मंत्रानें चारही खड्ग्यांतून माती बाहेर काढावी.

रक्षोहणं वलगहनं वैष्णवीमिदमहं तं वलगमुत्किरामि यं मे निष्ट्यो यममात्यो निचखानेदमहं तं वलगमुत्किरामि यं मे समानो यमसमानो निचखानेदमहं तं वलगमुत्किरामि यं मे सबन्धुर्यमसबन्धुर्निचखानेदमहं तं वलगमुत्किरामि यं मे सजातो यमसजातो निचखानोत्कृत्यां किरामि ॥ २३ ॥

अर्थ—ती पूर्वोक्त वाणी राक्षसांचा नाश करणारी व वलगांचा नाश करणारी आहे (वलग म्हणजे कोणाला तरी मारण्याकरितां केलेले व जमिनींत पुरून ठेवलेले अस्थि, केश, नख वगैरे करणी पदार्थ.) तसेंच ती विष्णुसंबंधिनी वाणी आहे. कोणत्यातरी निमित्तानें रागावलेला पुत्र अगर अमात्य मला पीडा करण्याकरितां ज्या वलगाला (करणी पदार्थाला) खड्ग्यांत पुरता झाला त्याला मी बाहेर काढतों. तसेंच धनकुलादिकांनीं माझ्यासदृश अगर कमी अधिक असलेला असा पुरुष व माझा संबंधी अगर असंबंधी पुरुष आणि माझा सख्खा भाऊ अगर त्याहून वेगळा पुरुष माझ्या पीडेकरितां ज्या वलगाला म्हणजे करणी पदार्थाला खड्ग्यांत पुरता झाला त्याला मी बाहेर काढतों. माझ्या शत्रूंनीं जी करणी केली तिला आम्ही उचलून दूर टाकतों. ॥ २३ ॥

विनियोग—'स्वराडसि' इत्यादि चार मंत्रांनीं चारही खड्ग्यांमध्यें यजमानाचा हस्तस्पर्श करवावा.

स्वराडसि सपत्नहा सत्रराडस्यभिमातिहा जनराडसि रक्षोहा सर्व-राडस्यमित्रहा ॥ २४ ॥

अर्थः—हे प्रथम खड्ग्या, तूं स्वयं शोभमान असल्यामुळें शत्रुघाती हो. हे द्वितीय खड्ग्या, तूं द्वादशाहादि सत्रामध्यें शोभणारा असल्यामुळें शत्रुघाती हो. हे तृतीय खड्ग्या,

तूं यजमानाच्या ठिकाणीं शोभणारा असल्याळें राक्षसनाशक हो. हे चतुर्थ खड्या, तूं सर्वत्र शोभणारा असल्यामुळें शत्रुनाशक हो. ॥ २४ ॥

विनियोग—' रक्षोहणः ' या मंत्रानें चारही खड्यांवर जलसिञ्चन करावें. प्रत्येक खड्यांत राहिलेलें पाणी टाकावें. त्यावर दर्भ पसरावे. खड्यांवर सोमकंडणाचे पाटे ठेवावे व त्यांच्याभोंवतीं माती पसरून खड्यांचें छिद्र बुजवावें. नंतर दोन पाटयांवर एक लाल वर्णाचें चर्म ' वैष्णवमसि ' या मंत्रानें पसरावें. त्या चर्मावर पांच वरवंटे ' वैष्णवास्थ ' य मंत्रानें ठेवावें.

रक्षोहणो वो वलगहनꣳ प्रोक्षामि वैष्णवान् रक्षोहणो वो वलगहनोऽवनयामि वैष्णवान् रक्षोहणो वो वलगहनो वस्तृणामि वैष्णवान् रक्षोहणो वां वलगहनाऽउपदधामि वैष्णवी रक्षोहणी वां वलगहनौ पर्यूहामि वैष्णवी वैष्णवमसि वैष्णवाः स्थ ॥ २५ ॥

अर्थ—राक्षसनाशक, राक्षस व करणी यांचा नाश करणाऱ्या विष्णुदेवताक खड्यांनो, मी तुमच्यावर जलसिञ्चन करितों. हे पूर्वोक्त विशेषणयुक्त खड्यांनो, मी तुमच्यावर अवशिष्ट जलसिञ्चन करितों. हे पूर्वोक्त विशेषणयुक्त खड्यांनो, मी दर्भांनीं तुमचें आच्छादन करितों. जे पाटे राक्षस व करणी यांचे नाशक व विष्णुदेवताक आहेत, त्या दोघांना मी खड्यावर ठेवितों व पूर्वोक्त विशेषणयुक्त अशा तुम्हा दोघांच्या भोंवतीं माती पसरतों व झांकतों. हे चर्मा, तूं विष्णुसंबंधी आहेस. हे पाषाणांनो, तुम्ही विष्णुसंबंधी आहां ॥ २५ ॥

विनियोग—यानंतर उंबराची फांदी जमिनींत पुरावी. तिच्याकरितां खड्या खणण्यापासून दर्भ पसरण्यापर्यंतच्या क्रिया मंत्रांनींच कराव्या. ' देवस्य त्वा ' या मंत्रानें अध्रिसंज्ञक काष्ठ ग्रहण करावें. ' यवोसि ' या मंत्रानें पाण्यांत यव टाकावे. ' दिवे त्वा ' या मंत्रानें शाखेच्या अग्र, मध्य व मूल भागांवर जलसिञ्चन करावें. ' शुन्धन्ताम् ' या मंत्रानें अवशिष्ट जल खड्यांत ओतावें. ' पितृषदनमसि ' या मंत्रानें खड्यांवर दर्भ पसरावे.

देवस्य त्वा सवितुꣳ प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम् । आददे नार्यसीदमहꣳ रक्षसां ग्रीवाऽअपिकृन्तामि । यवोऽसि यवयास्मद्द्वेषो यवयारातीर्दिवे त्वान्तरिक्षाय त्वा पृथिव्यै त्वा शुन्धन्तां लोकाꣳ पितृषदनाꣳ पितृषदनमसि ॥ २६ ॥

अर्थ—हे अग्ने, सवितृदेवाच्या प्रेरणेनें, आश्विनीकुमारांच्या बाहूंनीं, व पूष्याच्या हस्तांनीं तुझें मी ग्रहण करतों. तूं कर्मोपयोगी असल्यानें यजमानाची संबंधिनी आहेस. मी या खड्ग्यावर रेघा ओढतों त्यायोगें राक्षसांचा कंठच्छेद करितों. हे धान्यविशेषा जवा, तूं पृथक् करणारा आहेस म्हणून आमचे शत्रू व अदान म्हणजे दान न देणें अर्थात् द्रव्य नसणें हीं आमच्यापासून दूर कर. हे उंबराच्या अग्रभागा, द्युलोकाच्या प्रीतीकरितां, हे मध्यभागा, अंतरिक्ष लोकांच्या प्रीतीकरितां व हे मूलभागा, पृथ्वीलोकाच्या प्रीतीकरितां तुजवर मी जलसिञ्चन करितों. पितृगण ज्यांत राहातात असे लोक या उदकसिञ्चनानें शुद्ध होवोत. हे दर्भांनो, तुमचे ठिकाणीं पितर राहातात म्हणून तुम्ही पितरांचें स्थान आहां. ॥ २६ ॥

विनियोग—'उद्दिवम्' या मंत्रानें उंबराची शाखा शेंडा वर करून धरावी. 'द्युतानः' या मंत्रानें उंबराची शाखा खड्ग्यांत ठेवावी. 'ब्रह्मवनि त्वा' या मंत्रानें चारही खड्ग्यांत बाजूंनीं माती लोटावी. 'ब्रह्मदृꣳह' या मंत्रानें शाखेला पक्की करावी.

उद्दिवꣳस्तम्भानान्तरिक्षं पृण दृꣳहस्व पृथिव्यां द्युतानस्त्वा मारुतो मिनोतु मित्रावरुणौ ध्रुवेण धर्मणा ब्रह्मवनिं त्वा क्षत्रवनिं रायस्पोषवनि पर्यूहामि । ब्रह्म दृꣳह क्षत्रं दृꣳहायुर्दृꣳह प्रजां दृꣳह ॥ २७ ॥

अर्थ—हे औदुंबर शाखे, तूं द्युलोकाला वर अडवून धर, अंतरिक्षलोकाला पूर्ण कर व पृथ्वीला दृढ कर. हे औदुंबरशाखे, प्रकाशमान असा वायु तुला खड्ग्यांत स्थिर रीतीनें धारण करो. तसेंच मित्रावरुण देव तुला स्थिर रीतीनें खड्ग्यांत ठेवोत. हे उंबराच्या शाखे, तुझ्याभोंवतीं मी माती लोटतों. तूं ब्राह्मण व क्षत्रिय जातींना प्रसन्न करणारी आहेस. तसेंच सुवर्ण देणारी आहेस. हे औदुंबरशाखे, तूं ब्राह्मण जातीला, क्षत्रिय जातीला, आयुष्याला व पुत्रादि प्रजांना दृढ कर. ॥ २७ ॥

विनियोग—औदुंबरशाखेला स्पर्श करून यजमानाकडून 'ध्रुवासि' हा मंत्र म्हणवावा. उंबराच्या विशाखामध्यें म्हणजे शाखेला जेथून दोन फांद्या फुटतात त्या ठिकाणीं 'घृतेन' या मंत्रानें स्रुच्यानें होम करावा. 'इंद्रस्य छदिः' या मंत्रानें सदो-नामक मंडपावर गवताची चटई पसरावी.

ध्रुवासि ध्रुवोऽयं यजमानोऽस्मिन्नायतने प्रजया पशुभिर्भूयात् । घृतेन द्यावापृथिवी पूर्येथामिन्द्रस्य छदिरसि विश्वजनस्य छाया ॥ २८ ॥

अर्थ—हे औदुंबरशाखे, तूं स्थिर आहेस म्हणून तुझ्याप्रमाणें हा यजमान आपल्या घरांत पुत्रादिकांसह व गाईं वगैरे पशूंसह स्थिर राहो. या होमलेल्या घृतानें द्यावापृथिवी पूर्ण होवोत. हे तृणमय कटा (चटई), तूं इंद्राचें आच्छादन आहेस. म्हणून सदोमंडपस्थ सर्व लोकांची छाया हो. ॥ २८ ॥

विनियोग—चारही बाजूंना 'परित्वा' या मंत्रानें भिंतीप्रमाणें आच्छादन करावें.

परि त्वा गिर्वणो गिरऽइमा भवन्तु विश्वतः÷ । वृद्धायुमनु वृद्धयो जुष्टा भवन्तु जुष्टयऽ ॥ २९ ॥

अर्थ—स्तुत्य अशा सदोभिमानी इंद्रा, स्तोत्रशस्त्ररूपी वाणी तुला सर्व बाजूंनीं कटरूपानें आच्छादन करोत. हे इंद्रा, तुझे यजमान मोठाले आहेत व तुझ्या स्तुति प्रातःसवन, माध्यन्दिनसवन व तृतीयसवन या क्रमानें वाढत जातात. म्हणजे उच्च स्वरयुक्त होतात. आमच्या सेवा तुला प्रिय होवोत. ॥ २९ ॥

विनियोग—नंतर 'इंद्रस्य' इत्यादि तीन इंद्र मंत्रांनीं पूर्वीप्रमाणें परिषीवण, ग्रंथीकरण व ग्रंथीस्पर्शन करावें. 'वैश्वदेवमसि' या मंत्रानें अग्नीध्रसंज्ञक अग्नि-स्थानाला स्पर्श करावा.

इन्द्रस्य स्यूरसीन्द्रस्य ध्रुवोऽसि । ऐन्द्रमसि वैश्वदेवमसि ॥ ३० ॥

अर्थ—हे रज्जु, तूं सदोभिमानी इंद्राची शिवणारी आहेस. हे रज्जुग्रंथि, तूं सदोमंडपाची दृढ अशी गांठ आहेस. हे सदोमंडपा, तूं इंद्रदेवतासंबंधी आहेस. हे अग्नीध्रा, तूं सर्वदेवसंबंधी आहेस. ॥ ३० ॥

विनियोग—यानंतर सोळा धिष्ण्यमंत्र आहेत. अग्नीकरितां केलेल्या मातीच्या लहान लहान ओट्यांना धिष्ण्य म्हणतात.

विभूरसि प्रवाहणो वह्निरसि हव्यवाहनऽ । श्वात्रोऽसि प्रचेतास्तुथोऽसि विश्ववेदाः ॥ ३१ ॥

अर्थ—विभु व प्रवाहण हीं अग्निधीय धिष्ण्याचीं नांवें आहेत. हे अग्निधीय धिष्ण्या, तूं पुष्कळ प्रकारानें होणारे व हविर्द्रव्याला सर्वत्र पसरविणारें आहेस. हे होतृधिष्ण्या, तूं यज्ञकर्म करणारे व देवांकडे हविर्द्रव्य नेणारें आहेस. हे मैत्रावरुण धिष्ण्या, तूं क्षिप्रगमनवान् मित्र व प्रज्ञावान् वरुण एतद्रूपी आहेस. हे ब्राह्मणाच्छंसि

धिष्ण्या, तूं तुथ म्हणजे देवांना दक्षिणा वांटून देणाऱ्या पुरुषस्वरूपी व सर्वज्ञ आहेस ॥ ३१ ॥

विनियोग—वेदीच्या दक्षिणभागीं मार्जालीय (पात्र धुण्याची जागा) करावें व तेथें यज्ञपात्रें धुवावीं. सदोद्वाराच्या पूर्वभागीं उभे राहून ' सम्राडसि ' इत्यादि ८ मंत्रांनीं क्रमेंकरून आहवनीयादिकांचा निर्देश करावा.

उशिगसि कविरङ्घारिरसि बम्भारिरवस्यूरसि दुवस्वाञ्छुन्ध्यूरसि मार्जालीय÷ सम्राडसि कृशानु÷परिषद्योऽसि पवमानो नभोऽसि प्रतक्वा मृष्टोऽसि हव्यसूदनऽऋतधामासि स्वर्ज्योतिः ॥ ३२ ॥

अर्थ—हे पोतृधिष्ण्या, तूं सुंदर व विद्वान आहेस. हे नेष्टृधिष्ण्या, तूं पापनाशक व सर्वधारक आहेस. हे अच्छावाकधिष्ण्या, तूं अन्नाची इच्छा करणारे व हविर्युक्त आहेस. हे मार्जालीयस्थाना, तूं शुद्ध करणारे व मार्जन करणारे आहेस. हे उत्तरवेदिगत आहवनीया, तूं उत्तम शोभणारा व पयोव्रतानें क्षीण झालेल्या यजमानाचें अनुसरण करणारा आहेस. हे बहिष्यमान देशा, तूं ऋत्विजांच्या सभेंत स्तुत्य व शुद्ध आहेस. हे चात्वाला, तूं छिद्ररूपी आहेस व तुझेभोंवतीं ऋत्विग् गमन करितात. हे शामित्रा, (पशुहननाच्या जागेला शामित्र म्हणतात) पशु मारणें यज्ञांत विहित असल्यानें तूं शुद्ध व हृदयादि हविर्द्रव्यांचें शिजविणारे आहेस. हे औदुम्बरशाखे, तूं सामगायनाचें स्थान व सूर्याप्रमाणें प्रकाशणारी आहेस ॥ ३२ ॥

विनियोग—पत्नीशालेच्या पश्चिमभागीं असलेला पूर्वीचा जो गार्हपत्य अग्नि त्याला प्राजहित म्हणतात. ' वागसि ' या मंत्रानें सदस्थानाला स्पर्श करावा. ' ऋतस्य ' या मंत्राने दोन सदोद्वारशाखांना स्पर्श करावा. ' अध्वनाम् ' या मंत्रानें सूर्याचें दर्शन करावें.

समुद्रोऽसि विश्वव्यचाऽअजोऽस्येकपादहिरसि बुध्न्यो वागस्यैन्द्रमसि सदोऽस्यृतस्य द्वारौ मा मा सन्ताप्तमध्वनामध्वपते प्र मा तिर स्वस्ति मेऽस्मिन्पथि देवयाने भूयात् ॥ ३३ ॥

अर्थ—हे ब्रह्मासना, तुझे ठायीं सर्व देव येतात व तूं कृत आणि अकृत कर्मांचें अवेक्षण करणारें आहेस. हे शाला-द्वारस्थ अग्ने, तूं आहवनीयरूपानें गमन करणारा व एकटाच सर्व जगाचें रक्षण करणारा आहेस. हे प्राजहिता, तूं नष्ट न होणारा व

मूळचा आहेस. हे सद्-स्थाना, तूं वाग्रूपी व इंद्रदेवताक आहेस. हे द्वारशाखांनो, तुम्हांला पीडा न होवो. हे मार्गपालका सूर्या, मार्गांत असलेल्या मला तूं वाढव. व देवयान मिळवून देणाऱ्या यज्ञमार्गांत माझें कल्याण होवो ॥ ३३ ॥

विनियोग—' मित्रस्य ' या मंत्रानें ऋत्विजांचें दर्शन करावें. ' अग्नयः ' या मंत्रानें धिष्ण्यांकडे पहावें.

मित्रस्य मा चक्षुषेक्षध्वमग्नयः सगराः सगरा स्थ सगरेण नाम्ना रौद्रेणानीकेन पात मांग्नयः पिपृत मांग्नयो गोपायत मा नमो वोऽस्तु मा मा हिꣳसिष्ट ॥ ३४ ॥

अर्थ—हे ऋत्विजांनो, मित्राचे डोळ्यानें म्हणजे स्नेहानें मजकडे पहा म्हणजे मला मित्र समजा. हे अग्निसंज्ञक व स्तुत्य धिष्ण्यांनो, तुम्ही अग्नि व धिष्ण्य या नांवांनीं स्तुत व्हा. तुम्ही उग्र अशा सैन्यानें माझें रक्षण करा. हे अग्नींनो, धनादिकांनीं मला पूर्ण करा. व माझें निरंतर रक्षण करा. तुम्हांला माझा नमस्कार असो. तुम्ही माझी हिंसा करूं नका ॥ ३४ ॥

विनियोग—दधिमिश्रित आज्य ' ज्योतिरसि ' या मंत्रानें पांच वेळ ग्रहण करावें. जुहूप्रमाणें होमाला उपयोगी पडणाऱ्या स्रुचेला प्रचरणी म्हणतात. ' त्वम् सोम ' या मंत्रानें प्रचरणीनें होम करावा. ' जुषाणो ' या मंत्रानें दुसरी आहुति द्यावी.

ज्योतिरसि विश्वरूपं विश्वेषां देवानाꣳ समित् । त्वꣳसोम तनूकृद्भ्यो द्वेषोभ्योऽन्यकृतेभ्यऽउरु यन्तासि वरूथꣳ स्वाहा जुषाणोऽअप्तुराज्यस्य वेतु स्वाहा ॥ ३५ ॥ शतं २००

अर्थ—हे आज्या, तूं प्रकाशक सर्वरूपी व सर्व देवांना प्रदीपक आहेस. हे सोमा, तूं शरीरनाशक राक्षस व अन्यकृत दुर्भाग्यरूपी पीडांचें नियमन करणारा आहेस म्हणून तूंच आमचें विस्तृत बल आहेस. तुला हें हवि सुहुत असो. शरीर प्राप्त करणारा व संतुष्ट होणारा असा सोम आज्य ग्रहण करो. त्याला हें हवि सुहुत असो. ॥ ३५ ॥

विनियोग—' अग्ने नय ' हा मंत्र यजमानाकडून म्हणवावा.

अग्ने नय सुपथा रायेऽअस्मान्विश्वानि देव वयुनानि विद्वान् । युयोध्यस्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठां ते नमऽउक्तिं विधेम ॥ ३६ ॥

अर्थ—सर्व ज्ञानांनीं युक्त असलेल्या हे प्रकाशक अग्ने, यज्ञफलप्राप्तीकरितां आम्हांला चांगल्या मार्गानें ने. कुटिल (इष्टकर्म प्रतिबंधक) असें आमचें पाप दूर कर. आम्ही पुष्कळ नमस्कारात्मक वाक्यें बोलूं. म्हणजे तुला नमस्कार असें पुष्कळ वेळां उच्चारूं व नमस्कार करूं. ॥ ३६ ॥

विनियोग—सदोमंडपाचे उत्तरेकडून शालामुखीय अग्नि व पाषाण, द्रोणकलश आणि सोमपात्र हीं नेऊन अग्नीध्र मंडपांत स्थापन करावींत. तेथील अग्नींत 'अयं नः' या मंत्रानें होम करावा.

अयं नोऽअग्निर्वरिवस्कृणोत्वयं मृधः पुरऽएतु प्रभिन्दन् । अयं वाजाञ्जयतु वाजसातावयꣳ शत्रूञ्जयतु जर्हृषाणꣳ स्वाहा ॥ ३७ ॥

अर्थ—हा अग्नि आम्हांला द्रव्य देवो व हाच संग्रामांचा नाश करून पुढें जावो. हाच अग्नि शत्रूंचीं अन्नें आम्हांला भक्षणाकरितां देवो. म्हणून अत्यंत आनंदित होणारा हा अग्नि आमच्या शत्रूंना जिंको. हे अग्ने, तुला हें हवि सुहुत असो. ॥ ३७ ॥

विनियोग—' उरु विष्णो ' या मंत्रानें आहवनीयांत होम करावा.

उरु विष्णो विक्रमस्वोरु क्षयाय नस्कृधि । घृतं घृतयोने पिब प्रप्र यज्ञपतिं तिर स्वाहा ॥ ३८ ॥

अर्थ—हे विश्वव्यापक आहवनीय अग्ने, तूं शत्रूंवर पुष्कळ पराक्रम कर. व ब्रह्मगृहांत राहण्याकरितां आम्हांला विस्तीर्ण कर. हे घृतोत्पन्न अग्ने, होमलेलें घृत पी व यजमानाची अतिशय वृद्धि कर. तुला हें हवि सुहुत असो ॥ ३८ ॥

विनियोग—शकटावर कृष्णाजिन पसरून त्यावर ' देव सवितः ' या मंत्रानें सोम ठेवावा. कृष्णाजिनावर बांधलेल्या सोमाला मोकळें करून ' एतत् त्वम् ' या मंत्रानें त्याचें उपस्थान करावें. ' स्वाहानिः ' या मंत्रानें हविर्धान मंडपाच्या बाहेर निघावें.

देव सवितरेष ते सोमस्तꣳ रक्षस्व मा त्वा दभन् । एतत्त्वं देव सोम देवो देवाँऽउपागाऽइदमहं मनुष्यान्त्सह रायस्पोषेण स्वाहा निर्वरुणस्य पाशान्मुच्ये ॥ ३९ ॥

अर्थ—हे प्रकाशक सवित्या, तुला हा सोम अर्पण केला त्याचें पालन कर. सोमरक्षण करणाऱ्या तुझी राक्षस हिंसा न करोत. हे सोमदेवा, तूं प्रकाशक होऊन तुझ्या

अनुयायी देवाकडे प्राप्त झाला आहेस. यजमान असा मीही आतां पशु वगैरे द्रव्यांसह माझ्या अनुयायांकडे प्राप्त झालों आहें. देवांना सोमरूप अन्न सुहुत असो. या सोम-प्रदानानें मीं वरुणपाशांतून मुक्त झालों आहें. ॥ ३९ ॥

विनियोग—'अग्ने व्रतपाः' या मंत्रानें आहवनीयांत समिधेचा होम करावा.

अग्ने व्रतपास्त्वे व्रतपा या तवं तनूर्मय्यभूदेषा सा त्वयि यो मम तनू-स्त्वय्यभूदियꣳसा मयि। यथायथं नौ व्रतपते व्रतान्यनु मे दीक्षां दीक्षा-पतिरमꣳ स्तानु तपस्तपस्यतिꣳ ॥ ४० ॥

अर्थ—हे अग्ने, तूं स्वतः सर्व व्रताचा पालक आहेस. म्हणून आतां माझ्या व्रतांचें पालन करणारा हो. हे अग्ने, व्रतप्रार्थनेच्या वेळीं तुझें जें शरीर मजमध्यें होतें तें तुजमध्यें होवो. माझें जें शरीर तुजमध्यें होतें तें मजकडे येवो. हे व्रतपालका अग्ने, आपापलीं कर्मे ज्याचीं त्याच्याकडे येवोत. म्हणजे अनुष्ठानाचें कर्म मजकडे येवो व पालनाचें कर्म तुजकडे असो. आणि दीक्षेचा व तपाचा पालक अग्नि माझे नियमाचा आणि तपाचा अंगिकार करिता झाला. ॥ ४० ॥

विनियोग—यूपाहुतीकरितां चार वेळां घृत घेऊन 'उरुविष्णो' या मंत्रानें आहवनीयांत होम करावा.

उरु विष्णो विक्रमस्वोरु क्षयाय नस्कृधि। घृतं घृतयोने पिब प्रप्र यज्ञपतिं तिर स्वाहा ॥ ४१ ॥

अर्थ—हे विश्वव्यापका आहवनीयाग्ने, तूं शत्रूवर पुष्कळ पराक्रम कर. व ब्रह्म-गृहांत राहण्याकरितां आम्हांला विस्तीर्ण कर. हे घृतोत्पन्न अग्ने, होमलेलें घृत पी. व यजमानाची अतिशय वृद्धि कर. तुला हें हवि सुहुत असो. ॥ ४१ ॥

विनियोग—यूपाहुतीचें अविशिष्ट आज्य बरोबर घेऊन यूप तोडण्याकरितां रानांत जावें व तेथें यूपवृक्षाला 'अत्यन्यान्' या मंत्रानें स्पर्श करावा. 'विष्णवेत्वा' या मंत्रानें स्रुव्यानें यूपाला स्पर्श करावा. 'ओषधे' मंत्रानें यूपवृक्षावर दर्भ ठेवावा. 'स्वधिते' या मंत्रानें कुऱ्हाडीचा प्रहार करावा.

अत्यन्याँ२ऽअगां नान्याँ२ऽउपागामर्वाक् त्वा परेभ्योऽविदं परोऽ-वरेभ्यꣳ। तं त्वा जुषामहे देव वनस्पते देवयज्यायै देवास्त्वा देवयज्यायै जुषन्तां विष्णवे त्वा। ओषधे त्रायस्व स्वधिते मैनꣳ हिꣳसीꣳ ॥ ४२ ॥

अर्थ—हे पुरोवर्ति यूपवृक्षा, यूपार्ह अशा कांहीं वृक्षांना ते सुलक्षणी नसल्यामुळें मी ओलांडून आलों व यूपानर्ह अशाही कांहीं वृक्षांना मी सोडून आलों. व लांब असलेल्या वृक्षांच्या अलीकडे असलेल्या तुला मी प्राप्त झालों. हे दीप्यमान वृक्षा, अशा तुझें देवयागाकरितां आम्ही सेवन करितों. तसेंच देव तुझें सेवन करोत. हे यूपवृक्षा, यज्ञाकरितां तुला आम्ही स्पर्श करितों. हे वृक्षा, परशूच्या भीतीपासून माझें रक्षण कर. हे परशो, या यूपाची हिंसा करूं नकोस ॥ ४२ ॥

विनियोग—यूपवृक्ष पडत असतां 'यांमालेखीः' हा मंत्र म्हणावा व त्याकडे पहावें. 'अयंहि' या मंत्रानें यूपाचें शोधन करावें.

यां मा लेखीरन्तरिक्षं मा हिꣳसीꣳ पृथिव्या सम्भव । अयꣳ हि त्वा स्वधितिस्तेतिजानꣳ प्रणिनाय महते सौभगाय । अतस्त्वं देव वनस्पते शतवल्शो विरोह सहस्रवल्शा वि वयꣳरुहेम ॥ ४३ ॥

अर्थ—हे यूपवृक्षा, तूं द्युलोकाची व अंतरिक्षलोकाची हिंसा करूं नकोस. पृथ्वीशीं एक हो. हे तोडलेल्या वृक्षा, अत्यंत तीक्ष्ण अशा कुऱ्हाडीनें मोठें सौभाग्य जें यज्ञ, त्याकरितां तुला आणलें, म्हणून तूं तोडण्याला भिऊं नकोस. हे प्रकाशमान वृक्षा, या तुझ्या बुंध्यापासून तुला शेकडों अंकुर उत्पन्न होऊन तूं वाढोस व आम्हीही पुत्रपौत्रादिकांनीं हजारों शाखायुक्त होऊन वाढूं. ॥ ४३ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**
माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** पञ्चमोऽध्यायः ॥ ५ ॥

इति पञ्चमोऽध्यायः समाप्तः ।



अथ षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥



विनियोग—ज्यांत सौमिकवेदी मुख्य आहेत अशा पांचव्या अध्यायांत आतिथ्येष्टीपासून यूपनिर्माणापर्यंतचे मंत्र सांगितले. ज्यांत अग्नीषोमीय पशू मुख्य आहेत अशा या सहाव्या अध्यायांत यूपसंस्कारापासून सोमकंडनापर्यंतचे मंत्र आले आहेत. ' देवस्य त्वा ' या मंत्रानें अभ्रि घेऊन यूपाच्या खड्ग्याच्या जागीं ' इदमहम् ' या मंत्रानें रेघा ओढाव्यात. ' यवोसि ' या मंत्रानें जलांत जव घालावे. ' दिवेत्वा ' या मंत्रानें जलसिञ्चन करावें. ' शुन्धन्ताम् ' या मंत्रभागानें अवशिष्ट जल खड्ग्यांत टाकावें. ' पितृषदनमसि ' या मंत्रभागानें खड्ग्यावर दर्भ पसरावेत.

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम् । आददे नार्षसीदमहꣳ रक्षसां ग्रीवाऽअपिकृन्तामि । यवोऽसि यवयास्मद्द्वेषो यवयारातीर्दिवे त्वान्तरिक्षाय त्वा पृथिव्यै त्वा शुन्धन्ताँलोकाः पितृषदनाः पितृषदनमसि ॥ १ ॥

अर्थ—हे अभ्रे, सवित्याच्या प्रेरणेनें अश्विनी कुमाराच्या बाहूंनीं व पूष्याच्या हस्तांनीं मी तुझे ग्रहण करितों. तूं कर्मोपयोगी असल्याने यजमानसंबंधी आहेस. मी या खड्ग्याचे जागीं रेघा ओढतों त्यायोगे राक्षसांचा कंठच्छेद करतों. हे धान्यविशेषा जवा, तूं पृथक् करणारा आहेस म्हणून आमचे शत्रु व अदान म्हणजे दान न देणें अर्थात् द्रव्य नसणें हीं आमच्यापासून दूर कर. हे अग्रभागा, द्युलोकाच्या प्रीतीकरितां, हे मध्यभागा, अंतरिक्षलोकाच्या प्रीतीकरितां व हे मूलभागा, पृथ्वीलोकाच्या प्रीतीकरितां तुजवर मी जलसिंचन करतों. पितृगण ज्यांत राहतात असे लोक या जलसिंचनानें शुद्ध होवोत. हे दर्भांनो, तुमचे ठिकाणीं पितर रहातात म्हणून तुम्ही पितरांचें स्थान आहां ॥ १ ॥

विनियोग—' अग्रेणीः ' या मंत्रभागानें प्रथम अवयव खड्ग्यांत ठेवावा. ' देवस्य त्वा ' या मंत्रभागानें यूपाला तूप लावावें. खालींवर तूप लावलेला यूपकटक चषाल ' सुपिप्पलाभ्यः ' या मंत्रभागानें यूपापुढें ठेवावा. ' द्यामग्रेण ' या मंत्रभागानें यूपाला उंच धरावा.

अग्रेणीरसि स्वावेशऽउन्नेतृणामेतस्य वित्तादधि त्वा स्थास्यति देवस्त्वा सविता मध्वानक्तु सुपिप्पलाभ्यस्त्वौषधीभ्यः । यामग्रेणास्पृक्षऽआन्तरिक्षं मध्येनाप्राः पृथिवीमुपरेणादृꣳहीः ॥ २ ॥

अर्थ—हे यूपशकला, तोडलेल्या यूपाचा तूं प्रथमावयव आहेस. यूप उचलणाऱ्या अध्वर्यूंना खड्यांत सहज शिरवितां येईल असा तूं आहेस. तूं हें जाण कीं, यूप तुझ्यावर आरोहण करणार आहे; हे यूपा, प्रकाशमान सविता मधुर अशा आज्यानें तुला मारवो. हे चषाला, सुफलयुक्त अशा व्रीह्यादि औषधींच्या उत्पत्तीकरितां तुला यूपाचे पुढें ठेवतों. हे यूप, तूं वरच्या भागानें द्युलोकाला स्पर्श करता झालास, मध्यभागानें अंतरिक्षलोकाला पूर्ण करता झालास व मूलभागानें पृथ्वीलोकाला दृढ करता झालास ॥ २ ॥

विनियोग—'या ते' या मंत्रभागानें यूप खड्यांत ठेवावा. 'ब्रह्मवनि त्वा' या मंत्रभागानें चारही बाजूंनीं खड्यांत माती लोटावी. 'ब्रह्मदꣳह' या मंत्रभागानें यूपाला खड्यांत पक्कें करावें.

या ते धामान्युश्मसि गमध्यै यत्र गावो भूरिशृङ्गाऽअयासः÷ । अत्राह तदुरुगायस्य विष्णोः÷ परमं पदमवभारि भूरि । ब्रह्मवनि त्वा क्षत्रवनि रायस्पोषवनि पर्यूहामि । ब्रह्म दृꣳह क्षत्रं दृꣳह आयुर्दृꣳह प्रजां दृꣳह ॥ ३ ॥

अर्थ—हे यूप, ज्या तुझ्या स्थानांवर जाण्याची आम्ही इच्छा करतों व ज्या स्थानांवर प्रकाशमान असे सर्व किरण गेले त्याच ठिकाणीं व महात्म्यांनीं स्तुत्य व व्यापक अशा विष्णूचें सूर्यमण्डलरूपी स्थान विशेषेंकरून शोभतें. हे यूपा, तूं ब्राह्मण व क्षत्रियजातींना प्रसन्न करणारा असा आहेस; तसेंच पुत्रपौत्रादि प्रजा आणि सुवर्ण देणारा आहेस. तूं ब्राह्मणजातीला, क्षत्रियजातीला, आयुष्याला व पुत्रादिप्रजांना दृढ कर ॥ ३ ॥

विनियोग—'विष्णोः कर्माणि' या मंत्रभागाचें यूपस्पर्श करणाऱ्या यजमानाकडून पठन करवावें.

विष्णोः कर्माणि पश्यत यतो व्रतानि पस्पशे । इन्द्रस्य युज्यः सखा ॥ ४ ॥

अर्थ—हे ऋत्विजांनो, ज्या कर्मांच्या योगानें यज्ञाधिष्ठाता जो विष्णु त्यानें लौकिक वैदिक कर्में निर्माण केलीं त्या विष्णूचीं सृष्टिसंहारादि कर्में तुम्ही अवलोकन करा. तो विष्णु वृत्रवधादिकर्मांमध्यें इंद्राचा योग्य असा मित्र आहे ॥ ४ ॥

विनियोग—चषालाकडे पाहणाऱ्या यजमानाकडून ' तद्विष्णोः ' हा मंत्र म्हणवावा.

तद्विष्णोः॒ पर॒मं प॒दꣳ सदा॑ पश्यन्ति सू॒रय॑ः । दि॒वीव॒ चक्षु॒रात॑तम् ॥ ५ ॥

अर्थ—वेदान्तज्ञानी विद्वान् आकाशांत व्याप्त असें सूर्यमण्डलरूपी तें विष्णूचें श्रेष्ठ स्थान पहातात ॥ ५ ॥

विनियोग—त्रिगुणित केलेली तीन वाव दर्भाची दोरी घेऊन तिने यूपाला ' परिवीः ' या मंत्रभागाने तीन वेढे द्यावे. ' दिवः सूनुः ' या मंत्रभागानें स्वरुनांवाचें यूपशकल दोरीत बांधावे, ' एष ते ' या मंत्रानें वारावा यूप जमिनीवर नुसता ठेवावा, पुरू नये.

प॒रि॒वी॒र॒सि॒ परि॑ त्वा दे॒वैर्वि॑शो व्ययन्तां परी॒मं यज॑मान॒ꣳ रायो॑ मनु॒ष्या॑णाम् । दि॒वः॒ सू॒नुर॑स्येष ते॑ पृथि॒व्यॉल्लो॑कऽआर॒ण्यस्ते॑ प॒शुः॑ ॥ ६ ॥

अर्थ—हे यूपा, तूं रज्जूनें वेष्टित झाला आहेस. देवांचे मरुद्गण तुझें वेष्टण करोत. सर्व मनुष्यांमध्यें याच यजमानाला द्रव्ये वेष्टण करोत म्हणजे यालाच द्रव्य मिळो. हे स्वरो, तूं द्युलोकाचा पुत्र आहेस. हे यूपा, या पृथिवीवरच तुझें आश्रयस्थान आहे. रानांत असलेला पशु तुझाच आहे ॥ ६ ॥

विनियोग—' उपावीरसि ' या मंत्रभागानें गवत घेऊन ' उपदेवान् ' या मंत्रभागानें पशूला स्पर्श करावा.

उ॒पा॒वी॒र॒स्युप॑ दे॒वान्दैवी॑र्विशः॒ प्रागु॑रुशि॒जो व॑ह्नि॒तमान्॑ । दे॒व॒ त्वष्ट॒र्वसु॑ रम ह॒व्या ते॑ स्वदन्ताम् ॥ ७ ॥

अर्थ—तृणा, तूं समीप गमन करणारा आहेस. देवसंबंधी पशु अग्नीष्टोमादि देवांप्रत गमन करोत. ते देव बुद्धिमान् व यजमानाला स्वर्ग देणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ

आहेत. हे प्रकाशमान त्वष्टया, तूं पशुरूपी द्रव्याला आनंदित कर. हे पशो, तुझे अवयवरूपी हविर्भाग देवांना आवडोत ॥ ७ ॥

विनियोग—द्विगुणित दोन वाव दर्भाच्या दोरीचा फास करून पशूला दोन शिंगांमध्यें उजव्या शिंगाजवळ 'ऋतस्य त्वा' या मंत्रभागानें बांधावें.

रेवतीः रमध्वं बृहस्पते धारया वसूनि । ऋतस्य त्वा देवहविः पाशेन प्रतिमुञ्चामि धर्षा मानुषः ॥ ८ ॥

अर्थ—हे क्षीरादिधनयुक्त पशूंनो, तुम्ही यजमानाचे घरीं आनन्दानें रहा. हे बृहस्पते, तूं पशूंना स्थिर कर. हे देवहविर्द्रव्या पशो, तुला मी यज्ञाच्या पाशानें बांधतों. (नंतर पशु हा मारणाराचे स्वाधीन करावा) हा पशु बांधला असल्यानें मारणारा पुरुष याला मारण्यास समर्थ होवो ॥ ८ ॥

विनियोग—'देवस्य त्वा' या मंत्रभागानें यूपाला पशु बांधावा. 'अभ्यस्त्वा' या मंत्रभागानें पशूवर जलसिंचन करावें.

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम् । अग्नीषोमाभ्यां जुष्टं नियुनज्मि । अद्भ्यस्त्वौषधीभ्योऽनु त्वा माता मन्यतामनु पितानुभ्राता सगर्भ्योऽनु सखा सयूथ्यः । अग्नीषोमाभ्यां त्वा जुष्टं प्रोक्षामि ॥ ९ ॥

अर्थ—हे पशो, प्रकाशक सवित्याच्या प्रेरणेनें अश्विनीकुमारांच्या बाहूंनीं व पूष्याच्या हातांनीं मी अग्नीषोमांना आवडणाऱ्या अशा तुला बांधतों. हे पशो, अग्नीषोमांना आवडणाऱ्या तुझें जलांनीं व दर्भादिक औषधींनीं सिंचन करतों. हे पशो, प्रोक्षित व अग्नीषोमांना आवडणाऱ्या अशा तुला पृथ्वी, द्युलोक व सोदर भ्राता व तुझ्या कळपांतील मित्र अनुमति देवोत ॥ ९ ॥

विनियोग—'अपां पेरुः' या मंत्रभागानें पशूच्या मुखांत प्रोक्षणी जल घालावें. 'आपो देवीः' या मंत्रभागानें पशूच्या हृदयावर जलसिंचन करावें. 'संते' इत्यादि तीन मंत्रभागांनीं जुहूमेंच पशूचे कपाळाला, खांद्यांना व मांड्यांना तूप लावावें.

अपां पेरुरस्यापो देवीः स्वदन्तु स्वाक्तं चित्सदेवहविः । सं ते प्राणो वातेन गच्छतां पृथ्सममङ्गानि यजत्रैः सं यज्ञपतिराशिषा ॥ १० ॥

अर्थ--हे पशो, तूं जलपानशील आहेस. (जलांचें पान करणें हा तुझा स्वभाव आहे) जलदेवता तुझें भक्षण करोत कारण कीं त्यांनीं भक्षण केल्यानें पशुरूपी हवि देवांच्या भक्षणाला योग्य होतें. हे पशो, तुझे प्राण वायूनें, तुझीं अंसादिक अंगें यागांनीं व यजमान यज्ञफलानें युक्त होवो ॥ १० ॥

विनियोग--विशसित्यानें (पशु मारणारानें) दिलेलें खड्ग हातांत घ्यावें व यूपावरून स्वरु काढून घ्यावा व त्या दोघांनाही तूप लावावें व त्यांनीं ' घृतेनाक्तौ ' या मंत्रभागानें पशूच्या कपाळाला स्पर्श करावा. ' रेवति यजमाने ' हा मंत्रभाग यजमानाकडून बोलवावा. ' वर्षो वर्षीयसि ' या मंत्रभागानें हातांतील दोन दर्भांपैकीं एक जमिनीवर ठेवावा. ' देवेभ्यः स्वाहा ' या मंत्रभागानें होम करावा.

घृतेनाक्तौ पशूँस्त्रायेथाम्रेवति यजमाने प्रियं धाआविंश । उरोरन्तरिक्षात्सजूर्देवेन वातेनास्य हविषस्त्मना यज समस्य तन्वा भव । वर्षो वर्षीयसि यज्ञे यज्ञपतिं धाः स्वाहा देवेभ्यो देवेभ्यः स्वाहा ॥ ११ ॥

अर्थ--हे स्वरुशस्त्रांनो, तुम्हांला तूप लावलें आहे. तुम्ही या पशूचें रक्षण करा. हे धनवति वाग्देवते, या यजमानाचें प्रिय कर व ज्ञानरूपानें यजमानांत प्रवेश कर आणखी हे वाग्देवते, प्रकाशक अशा वायूंबरोबर मैत्री करून विस्तीर्ण अशा अन्तरिक्षापासून या यजमानाचें रक्षण कर. या पशूच्या शरीररूपी हविर्द्रव्यानें याग कर. व त्याच्या शरीराशीं एक हो. हे वृष्टीपासून उत्पन्न होणाऱ्या तृणा (दर्भा), या विस्तीर्णतर यज्ञामध्यें यजमानाची स्थापना कर. पूर्वी व नंतर ज्यांचा होम होतो अशा दोन्ही प्रकारच्या देवांना हें हवि सुहुत असो ॥ ११ ॥

विनियोग—वपा ज्यांवर शिजवितात अशा दोन काष्ठांना वपाश्रपणी म्हणतात. त्या काष्ठांनीं पशूची दोरी द्विगुणित करून 'माहिर्भूः' या मंत्रभागानें चात्वालांत टाकावी. प्रतिप्रस्थात्यानें गार्हपत्यापासून पशुशोधनाकरितां पत्नीला न्यावें त्यावेळीं तिनें उदककलश हस्तांत धारण करावा व तिजकडून ' नमस्त आतान ' हा मंत्रभाग म्हणवावा.

माहिर्भूर्मा पृदाकुर्नमस्तऽआंतानानर्वा प्रेहि । घृतस्य कुल्याऽउपऽऋतस्य पथ्याऽअनु ॥ १२ ॥

अर्थ—हे रज्जो, तूं सर्पाच्या व अजगराच्या आकाराची होऊं नकोस हे विस्तृत यज्ञा, तुला नमस्कार असो. तूं शत्रुरहित होऊन समाप्त हो व यज्ञाच्या मार्गांत पुष्कळ घृताच्या नद्या येतील त्यांमागून जा. तात्पर्य या यज्ञांत पुष्कळ घृत होमलें जातें ॥ १२ ॥

विनियोग—अशा रीतीनें यज्ञाची स्तुति करून जलांची स्तुति ' देवीरापः ' या मंत्रानें केली आहे

देवीरापऽ शुद्धा वोद्वऽ सुपरिविष्टा देवेषु सुपरिविष्टा वयं परिवेष्टारो भूयास्म ॥ १३ ॥

अर्थ—हे प्रकाशक जलांनो, स्वतः शुद्ध व पात्रेजनीपात्रांत असलेल्या अशा तुम्ही हा पशु देवांकडे न्यावा. आम्हीही देवशरीरांत राहिलों आहों. त्यांचे संतोषानें आम्ही त्यांना वाढणारे होऊं ॥ १३ ॥

विनियोग—यजमानपत्नीनें पशूचे समीप बसावें व त्याच्या मुखादि आठ अवयवांना ' वाचं ते ' इत्यादि मंत्रभागांनीं जलाचा स्पर्श करावा.

वाचं ते शुन्धामि प्राणं ते शुन्धामि चक्षुस्ते शुन्धामि श्रोत्रं ते शुन्धामि नाभिं ते शुन्धामि मेढ्रं ते शुन्धामि पायुं ते शुन्धामि चरित्रांस्ते शुन्धामि ॥ १४ ॥

अर्थ—हे पशो, मी तुझें वागिन्द्रिय, प्राण, चक्षु, श्रोत्र, नाभि, लिंग, गुद व चार पाय यांना व त्याचप्रमाणें सर्व अवयवांना जलानें शुद्ध करित्यें ॥ १४ ॥

विनियोग—उदकपात्रांतील अवशिष्ट जलानें यजमान व अध्वर्यु या दोघांनीं पशूच्या शिरःप्रभृति अवयवांचें 'मनस्ते' इत्यादि मंत्रभागांनीं जलानें सिंचन करावें. नंतर 'यत्ते क्रूरम्' या मंत्रभागानें अवशिष्ट अंगांचें सिंचन करावें. तसेंच 'शमहोभ्यः' या मंत्रभागानें पशूच्या जघनभागावर जलसिंचन करावें. नंतर पशूला उताणा करून बेंबीच्या चार अंगुलें पलीकडे ' ओषधे ' या मंत्रभागानें दर्भ ठेवावा. नंतर ' स्वधिते ' इत्यादि मंत्रभाग म्हणून तूप लावलेल्या खड्गाचे धारेनें दर्भासह पशूच्या पोटाची त्वचा मंत्र न म्हणतां कापावी.

मनस्तऽआप्यायतां वाक्तऽआप्यायतां प्राणस्तऽआप्यायतां चक्षुस्तऽआप्यायताᳬ श्रोत्रं तऽआप्यायताम्। यत्ते क्रूरं यदास्थितं तत्तऽआप्यायतां

निष्ट्यायतां तत्ते शुध्यतु शमहोभ्यः। ओषधे त्रायस्व स्वधिते मैनꣳ हिꣳसीः॥ १५॥

अर्थ—हे पशो, तुझें मन, वाणी, प्राण, चक्षु, श्रोत्र हीं सर्व शांत होवोत. आम्हीं तुला बांधून वगैरे जें क्रूर कृत्य केलें व मारणाऱ्या पुरुषानें जें तुला कापलें वगैरे तें सर्व शांत होवो. तें सर्व यथायोग्य होवो व शुद्ध होवो. पुष्कळ दिवसपावेतों आमचें व पशूचें कल्याण होवो. हे दर्भा, पशूचें रक्षण कर. हे खड्गा, तूं याला मारूं नकोस॥ १५॥

विनियोग—पशूच्या नाभीवर ठेवलेला कापलेल्या दर्भाचा अग्रभाग डाव्या हातानें व मूलभाग उजव्या हातानें धरून त्याच्या अग्रभागाला व मुळाला 'रक्षसां' इत्यादि मंत्रभागानें पशूच्या रक्ताचा लेप करावा. 'निरस्तम्' या मंत्रभागानें नंतर तो उजव्या हातांतील दर्भ उत्करावर (उकरड्यावर) टाकावा. 'इदमहं' या मंत्रभागाने त्या दर्भावर यजमानानें उभें रहावें. पशूच्या पोटांतून वपा काढून ती 'घृतेन द्यावा पृथिवी' या मंत्रभागानें वपाश्रपणीसंज्ञक काष्ठावर पसरावी; नंतर डाव्या हातांत धरलेले दर्भाचें अग्र अध्वर्यूनें 'वायो वेः' या मंत्रभागानें आहवनीयांत टाकावें. नंतर 'अग्निराज्यस्य' या मत्रभागानें स्रुव्यानें वपेवर तूप घालावें. नंतर वपेचा होम करून 'स्वाहाकृते' या मंत्रभागानें वपाश्रपणी काष्ठांचा आहवनीयांत होम करावा.

रक्षसां भागोसि निरस्तꣳ रक्षऽइदमहꣳ रक्षोऽभितिष्ठामीदमहꣳ रक्षोऽवबाधऽइदमहꣳ रक्षोऽधमं तमो नयामि। घृतेन द्यावापृथिवी प्रोर्णु-वाथां वायो वे स्तोकानामग्निराज्यस्य वेतु स्वाहा स्वाहाकृतेऽऊर्ध्वनभसं मारुतं गच्छतम्॥ १६॥

अर्थ—हे रक्तानें माखलेल्या तृणा, तूं राक्षसांचा भाग आहेस. अध्वर्यूनें उत्करावर टाकलेले तृण राक्षसरूपी असल्यामुळें मी यजमान त्यावर पाय ठेऊन उभा राहतों; इतकेंच नव्हे तर पायाखालीं दाबून त्याचा नाश करतों. मी या राक्षसाला अत्यंत निकृष्ट अशा नरकांत पोंचवितों. हे द्यावापृथिवींनो, तुम्ही जलानें परस्परांचें आच्छादन करा. हे वायो, तूं वपेवरील थेंब जाण व पिऊन जा. आहवनीय अग्नि घृतपान करो. त्याला हें हवि सुहुत असो. स्वाहाकारानें आहुतिभावाला प्राप्त झालेल्या

हे वपाश्रपणी काष्ठांनो, तुम्ही वायूमध्यें गमन करा. त्या वायूवर यज्ञ स्थित आहे व तो आकाशांत राहतो ॥ १६ ॥

विनियोग—यजमानपत्नीसह सर्व ऋत्विजांनीं 'इदमापः' हा मंत्रभाग म्हणून चात्वालाचे समीप शरीराचें संमार्जन करावें.

इदमापꣳ प्रवहतावद्यं च मलं च यत् । यच्चाभिदुद्रोहानृतं यच्च शेपेऽअभीरुणम् । आपो मा तस्मादेनसꣳ पवमानश्च मुञ्चतु ॥ १७ ॥

अर्थ—हे जलांनो, तुम्ही पशु मारण्यानें व अशुद्ध बोलण्यानें उत्पन्न झालेलें पाप व शरीरांतील मल दूर करा. तसेंच आम्हीं खोटें बोलून लोकांचा जो द्रोह केला व अनपराध्याला वाईट बोललों, त्या पापांपासून हे जलांनो, आम्हांला दूर करा व वायुही आम्हांला त्या पापांपासून दूर करो ॥ १७ ॥

विनियोग—'सं ते मनः' या मंत्रभागानें जुहूस्थ पृषदाज्यानें पशूच्या हृदयावर अभिघार करावा. नंतर मंत्र न म्हणतां त्याचा सर्व अंगावर अभिघार करावा. नंतर 'रेडसि' या मंत्रभागानें वसा ग्रहण करून तिच्यावर दोन वेळां अभिघार करून 'प्रयुतं' या मंत्रभागानें तिच्यांत तूप मिसळावे.

सं ते मनो मनसा सं प्राणꣳ प्राणेन गच्छताम् । रेडस्यग्निष्ट्वा श्रीणात्वापस्त्वा समरिणन्वातस्य त्वा ध्राज्यै पूष्णो रꣳहयाऽऊष्मणो व्यथिषत्प्रयुतं द्वेषः ॥ १८ ॥

अर्थ—हे हृदया, तूं ज्या पशूचें आहेस त्याचें मन व प्राण देवाच्या मन व प्राणाशीं युक्त होवोत. हे वसे, तूं हिंसित झाल्यासारखी दिसतेस. तुला अग्नि शिजवोत व जलें वाढवोत. वायूची अंतरिक्षांत, सूर्याची द्युलोकांत गति व्हावी म्हणून त्या तुझें मी ग्रहण करतों. अन्तरिक्षरूपी उष्णता नष्ट होवो म्हणजे देवांना वसाभक्षणानें उष्णता न होवो. हे तुझ्यांत घृत मिसळल्यानें तुझ्यांतील दुष्ट पदार्थ दूर झाले ॥ १८ ॥

विनियोग—'घृतं घृतपावानः' या मंत्रभागानें वसेच्या एका भागाचा होम करावा. वाजिनाचे वेळीं सांगितलें त्याप्रमाणें वसाशेषानें दिशांचा व्याघार (सिंचन) करावा.

घृतं घृतपावानꣳ पिबत वसां वसापावानꣳ पिबतान्तरिक्षस्य हविरसि स्वाहा । दिशः÷ प्रदिशऽआदिशो विदिशऽउद्दिशो दिग्भ्यꣳस्वाहा ॥ १९ ॥

अर्थ—हे घृतपान करणाऱ्या देवांनो, तुम्ही घृत प्या व वसापान करणाऱ्यांनो, तुम्ही वसा प्या. हे वसे, तूं अंतरिक्षाचें हविर्द्रव्य आहेस. हें हविर्द्रव्य सुहुत असो. दिशा, प्रदिशा, आदिशा, विदिशा, उद्दिशा वगैरे सर्व दिशांना हें हवि सुहुत असो ॥ १९ ॥

विनियोग—' ऐन्द्रः प्राणः ' या मंत्रभागानें पशुरूपी हविर्द्रव्याला स्पर्श करावा.

ऐन्द्रꣳ प्राणोऽअङ्गेऽअङ्गे निदीध्यदैन्द्रऽउदानोऽअङ्गेऽअङ्गे निधीतꣳ । देव त्वष्टर्भूरि ते सꣳ समेतु सलक्ष्मा यद्विषुरूपं भवाति । देवत्रा यन्तमवसे सखायोऽनु त्वा माता पितरो मदन्तु ॥ २० ॥

अर्थ—आत्मसंबन्धी प्राणवायु व उदानवायु या पशूच्या सर्व अवयवांमध्यें स्थापन केला गेला आहे. हे प्रकाशक त्वष्टया, जे पशूचे अवयव पूर्वी एक होते; परंतु कापल्यानें वेगळे झाले ते तुझ्या कृपेनें पुनः चांगल्या तऱ्हेनें एकत्र होवोत. हे पशो, अशा रीतीनें प्राणांनीं व अवयवांनीं एकत्र होऊन देवाकडे सर्व कुलाच्या रक्षणाकरितां जाणाऱ्या तुला तुझे मित्रभूत इतर पशु व आईबाप अनुज्ञा देवोत ॥ २० ॥

विनियोग—' समुद्रं गच्छ ' वगैरे प्रत्येक मंत्रभागानें प्रतिप्रस्थात्यानें अनुयाज (होम) करावे. व प्रत्येक होमाच्या शेवटीं जलानें मुखस्पर्श करावा. नंतर ' दिवं ते ' इत्यादि मंत्रभागानें स्वरूचा होम करावा.

समुद्रं गच्छ स्वाहान्तरिक्षं गच्छ स्वाहा देवꣳ सवितारं गच्छ स्वाहा मित्रावरुणौ गच्छ स्वाहाहोरात्रे गच्छ स्वाहा छन्दाꣳसि गच्छ स्वाहा द्यावापृथिवी गच्छ स्वाहा यज्ञं गच्छ स्वाहा सोमं गच्छ स्वाहा दिव्यं नभो गच्छ स्वाहाग्निं वैश्वानरं गच्छ स्वाहा मनो मे हार्दि यच्छ दिवं ते धूमो गच्छतु स्वर्ज्योतिः÷ पृथिवीं भस्मनापृण स्वाहा ॥ २१ ॥

अर्थ—हे हविर्द्रव्या, तूं समुद्र, अन्तरिक्ष, सवितादेव, मित्रावरुण, अहोरात्र, छन्दस्, द्यावापृथिवी, यज्ञ, सोम, दिव्य नभ व वैश्वानर अग्नि या अकरा देवतांच्या संतोषाकरितां त्यांकडे जा. तूं सुहुत असो. हे समुद्रादि देवतांनो, माझें मन हृदयांत एकत्र करा म्हणजे निश्चयात्मक करा. हे स्वरो, तुझा धूप वृष्टीकरितां स्वर्लोकांत

जावो. तुझी ज्वाला अन्तरिक्षांत जावो व तूं आपल्या भस्मानें (राखेनें) पृथिवीला पूर्ण कर; अर्थात् तुझी राख पृथिवींत जावो. तूं सुहुत असो ॥ २१ ॥

विनियोग—मारलेल्या पशूचें हृदयमांस ज्यांवर ठेवलें होतें त्याला हृदयशूल म्हणतात. तो ओल्या व कोरड्या जमिनीच्या मध्यांत 'शुगसि' व 'मापो मौषधीः' या दोन मंत्रभागांनीं पुरावा. तदनंतर 'धाम्नो धाम्नः' व 'सुमित्रिया नः' या दोन मंत्रभागांनीं यजमानानें व सर्व ऋत्विजांनीं जलस्पर्श करावा.

मापो मौषधीर्हिꣳसीर्धाम्नो धाम्नो राजँस्ततो वरुण नो मुञ्च। यदाहुरघ्न्याऽइति वरुणेति शपामहे ततो वरुण नो मुञ्च। सुमित्रिया नऽआपऽओषधयꣳ सन्तु दुर्मित्रियास्तस्मै सन्तु योऽस्मान्द्वेष्टि यञ्च वयं द्विष्मः ॥ २२ ॥

अर्थ—हे हृदयशूला, तूं जल व ओषधींची हिंसा करूं नकोस. हे वरुणा, ज्या ज्या तुझ्या स्थानापासून आम्ही भितों त्यापासून आमचें रक्षण कर. तसेंच गाई अहिंस्य आहेत असें वेदादिकांत सांगितलें आहे. परंतु आम्हीं तर हिंसा केली तेव्हां आम्ही प्रार्थना करितों कीं, आम्हाला या हिंसादोषापासून मुक्त कर. जले व ओषधि आमच्याशीं चांगली मैत्री करोत. व जो आमचा द्वेष करतो व आम्ही ज्यांचा द्वेष करितों त्याच्याशीं जलें व ओषधि शत्रुत्व करोत ॥ २२ ॥

विनियोग—तें 'हविष्मती' या मंत्रानें करावें. त्या नंतर सोमकण्डनोपयोगी 'वसतीवरी' संज्ञक जीं जलें त्यांचें ग्रहण सांगतात. अग्नीषोमीय पशूसंबंधीं पूर्वोक्त कर्म संपल्यावर सूर्यास्त होण्याचे पूर्वी प्रवाहाचें पाणी भरून आणावें. या पाण्याला वसतीवरी म्हणतात.

हविष्मतीरिमाऽआपो हविष्माँ२ऽआविवासति। हविष्मान्देवोऽअध्वरो हविष्माँ२ऽअस्तु सूर्यः ॥ २३ ॥

अर्थ—हविर्द्रव्ययुक्त यजमान हविर्द्रव्ययुक्त या वसतीवरीसंज्ञक जलाची सेवा करतो. या जलांचे योगानें प्रकाशमान यज्ञही हविर्द्रव्ययुक्त होवो. व सूर्यदेवताही यजमानाला यज्ञाचें फल देण्याकरितां हविःसंपन्न होवो ॥ २३ ॥

विनियोग—'अग्नेर्वः' या मंत्रभागानें तें वसतीवरी जल नूतनगार्हपत्याच्या पश्चिमभागीं ठेवावें. नंतर तें दक्षिण दरवाजानें नेऊन उत्तरवेदीच्या दक्षिणश्रोणीवर

ठेवावें. नंतर पूर्वीप्रमाणेंच 'इन्द्राग्न्योः' हा मंत्रभाग म्हणून तें जल उत्तरवेदीच्या उत्तरश्रोणीवर ठेवावें. नंतर 'विश्वेषां देवानां' या मंत्रभागानें अग्नीध्र स्थानाच्या पश्चाद्भागीं तें जल ठेवावें.

अग्नेर्वोऽपन्नगृहस्य सदसि सादयामीन्द्राग्न्योर्भागधेयी स्थ मित्रावरुणयोर्भागधेयी स्थ विश्वेषां देवानां भागधेयी स्थ। अमूर्याऽउप सूर्ये याभिर्वा सूर्यः सह। ता नो हिन्वन्त्वध्वरम्॥ २४॥

अर्थ--हे वसतीवरी जलांनो, तुम्हाला ज्याचें घर अविनाशि आहे अशा अग्नीच्या जवळ स्थापन करतों. तुम्ही इंद्राग्नींचीं व मित्रावरुणांचीं भागरूपी आहां. तसेंच तुम्ही सर्व देवतांचीं भागरूपी आहां. जीं हीं जलें सूर्यसमीप आहेत व ज्यांचेबरोबर सूर्य गमन करतो तीं जलें आमच्या यज्ञाला संतुष्ट करोत॥ २४॥

विनियोग--सोम घेऊन हविर्धान मण्डपांत जावें व सोम मोकळा करून त्याचा अर्धा भाग पाटयांच्या स्थूल भागावर 'हृदे त्वा' या मंत्रभागाने ठेवावा.

हृदे त्वा मनसे त्वा दिवे त्वा सूर्याय त्वा। ऊर्ध्वमिममध्वरं दिवि देवेषु होत्रा यच्छ॥ २५॥

अर्थ—हे सोमा, निश्चयात्मक बुद्धि, संकल्पविकल्पात्मक मन, द्युलोक व सूर्यादि देवतांकरितां तुला मी पाट्यांवर ठेवतों. व अशा रीतीनें ठेवलेल्या व कांडलेल्या हे सोमा, या यज्ञाला तूं वर कर व द्युलोकस्थ देवांचें व पट्कार करणाऱ्या सप्तहोत्यांचें ऐक्य कर॥ २५॥

विनियोग—नंतर 'विश्वास्त्वां' या मंत्रभागानें सोम मोकळा करून पाट्यावर नीट ठेवावा, नंतर होत्यानें शस्त्र म्हटल्यावर अध्वर्यूनें 'शृणोत्वग्निः' या मंत्रभागानें प्रचरणीसंज्ञक स्रुचेनें आज्याचा होम करावा.

सोम राजन्विश्वास्त्वं प्रजाऽउपावरोह विश्वास्त्वां प्रजाऽउपावरोहन्तु। शृणोत्वग्निः समिधा हवं मे शृण्वन्त्वापो धिषणाश्च देवीः। श्रोता ग्रावाणो विदुषो न यज्ञꣳ शृणोतु देवः सविता हवं मे स्वाहा॥ २६॥

अर्थ—हे सोमराजा, सर्व प्रजांचें आधिपत्य कर. हे सोमा, सर्व प्रजा तुला अभ्युत्थान देवोत. समित्पूर्वक आहुतीच्या योगानें अग्नि व जलें आणि प्रकाशमान बुद्धियुक्त वाणी माझें बोलावणें ऐकोत. हे कण्डनाकरितां उपस्थित झालेल्या पाषा-

णांनो तुम्ही, ज्ञाते विद्वान् ज्याप्रमाणें यज्ञाला जाणतात व श्रवण करतात त्याप्रमाणें तुम्ही माझें बोलावणें ऐका. तसेंच प्रकाशमान् सूर्य माझें बोलावणें ऐको. हें हवि सुहुत असो ॥ २६ ॥

विनियोग—नंतर जलाजवळ जाऊन त्यांत घृताचा होम करावा.

देवीरापोऽअपां नपाद्यो वऽऊर्मिर्हविष्यऽइन्द्रियावान् मदिन्तमऽ। तं देवेभ्यो देवत्रा दत्तशुक्रपेभ्यो येषां भाग स्थ स्वाहा ॥ २७ ॥

अर्थ—हे प्रकाशक जलांनो, तुमचा अपांनपात् संज्ञक, हविर्द्रव्य योग्य, इंद्रिय-तेजोवर्धक, व अत्यंत हर्षकारी असा जो देवांकडे जाणारा लाटांचा समुदाय आहे तो ज्यांचे तुम्ही अंश आहां अशा सोमपान करणाऱ्या देवांना द्या. तुम्हांला हें हवि सुहुत असो ॥ २७ ॥

विनियोग—' कार्षिरसि ' या मंत्रभागानें जलांत होमलेला तुषाचा भाग मैत्रावरुण चमसानें बाजूस सारावा. व ' समुद्रस्य त्वा ' या मंत्रभागानें तडागांतलें जल ग्रहण करावें. तलावावरून परत आल्यावर चात्वालावर मैत्रावरुण चमसांतलें पाणी वसतीवरी जलांत ' समापहः ' या मंत्रभागानें एकत्र करावें.

कार्षिरसि समुद्रस्य त्वा क्षित्याऽउन्नयामि । समापोऽअद्भिरग्मत समोषधीभिरोषधीऽ ॥ २८ ॥

अर्थ—हे आज्या, देवतांनीं तुझें भक्षण केलें आहे. वसतीवरीजलरूपी समुद्र घटूं नये तर वाढावा म्हणून तुझें मी ग्रहण करतों. मैत्रावरुण चमसांतलीं जलें वसतीवरी-जलाशीं व मुद्गमसूरादिक औषधि व्रीहि यवादि औषधींशीं युक्त होवोत ॥ २८ ॥

विनियोग—' यमग्ने ' या मंत्रभागानें प्रचरणीपात्रस्थ आज्यशेषाचा होम करावा.

यमग्ने पृत्सु मर्त्यमवा वाजेषु यं जुनाऽ। स यन्ता शश्वतीरिषऽ स्वाहा ॥ २९ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं संग्रामांत ज्या पुरुषाचें रक्षण करतोस व हविर्भाग घेण्याकरितां ज्याकडे जातोस तो तुझ्या कृपेनें चिरकालपर्यंत धनांना प्राप्त होतो. हें हवि तुला सुहुत असो ॥ २९ ॥

विनियोग—' देवस्य त्वा ' या मंत्रभागानें वरवंटा हातांत घ्यावा व हिंकारापर्यंत मौन धारण करावें. सोम कांडतांना उपयोगीं पडणारें जें जल त्याला निग्राभ्या म्हणतात. (तीं जलें यजमानानें आपले छातीला लावावीं व ' निग्राभ्या स्थ ' हा मंत्रभाग म्हणावा.)

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम्। आददे रावासि गभीरमिममध्वरं कृधीन्द्राय सुषूतमम्। उत्तमेन पविनोर्जस्वन्तं मधुमन्तं पयस्वन्तं निग्राभ्या स्थ देवश्रुतस्तर्पयत मा ॥ ३० ॥

अर्थ—हे वरवंट्या, प्रकाशक सवित्याच्या प्रेरणेनें अश्विनीकुमारांच्या बाहूंनीं व पूष्याच्या हस्तांनीं मी तुझें ग्रहण करतों. हे पाषाणा, तूं आहुति देणारा आहेस म्हणून या माझ्या यज्ञाला मोठा कर. वज्रसदृश अशा तुझ्या योगानें मी या यज्ञाला इन्द्राकरितां ज्यांत उत्तम प्रकारें करून सोमरस काढला जातो व जो मधुर व दुधाप्रमाणें गोड रसानें युक्त आहे असा करतों. हे जलांनो, तुम्ही अत्यंत प्राह्य व देवलोकांत प्रसिद्ध आहांत म्हणून मला संतुष्ट करा ॥ ३० ॥

विनियोग—हें संक्षिप्त केलेलें वर्णन विस्तारानें करतात.

मनो मे तर्पयत वाचं मे तर्पयत प्राणं मे तर्पयत चक्षुर्मे तर्पयत श्रोत्रं मे तर्पयतात्मानं मे तर्पयत प्रजां मे तर्पयत पशून्मे तर्पयत गणान्मे तर्पयत गणा मे मा वितृषन् ॥ ३१ ॥

अर्थ—हे जलांनो, माझें मन, वाणी, प्राण, चक्षु, श्रोत्र, शरीर, प्रजा, पशु व मनुष्यसंघ यांना संतुष्ट करा. माझे मनुष्यसमुदाय मजविषयीं उदासीन न होवोत ॥ ३१ ॥

विनियोग—' इन्द्राय त्वा वसुमते ' इत्यादि पांच मंत्रभागांनीं पांच वेळां सोमाच्या मुष्टि पाषाणांवर कांडण्याकरितां घ्याव्या.

इन्द्राय त्वा वसुमते रुद्रवंतऽइन्द्राय त्वादित्यवंतऽइन्द्राय त्वाभिमातिघ्ने। श्येनाय त्वा सोमभृतेऽग्नये त्वा रायस्पोषदे ॥ ३२ ॥

अर्थ—हे सोमा, (१) धनवान् व रुद्रदेवतायुक्त, (२) आदित्यदेवतायुक्त, (३) शत्रुनाशक अशा इंद्राकरितां तुझें मी ग्रहण करतों. तसेंच (४) सोम हरण

करणाऱ्या श्येनपक्षीरूपी गायत्रीकरितां व (५) धनवृद्धिकारी अग्नीकरितां तुझें मी ग्रहण करतों ॥ ३२ ॥

विनियोग—' यत्ते ' या मंत्रभागानें पाव्यावर घेतलेल्या सोमाला स्पर्श करावा.

यत्ते सोम दिवि ज्योतिर्यत्पृथिव्यां यदुरावन्तरिक्षे । तेनास्मै यजमानायोरु राये कृधि दात्रे वोचः ॥ ३३ ॥

अर्थ—हे सोमा, द्युलोकांत, पृथ्वीवर व विस्तीर्ण अंतरिक्षांत तुझें जें शरीररूपी तेज आहे त्यायोगें या यजमानाचें शरीर ऋत्विजांना दक्षिणा देण्याकरितां विस्तीर्ण कर. व फल देणाऱ्या इंद्राला सांग कीं, हा यजमान अधिक होईल असें कर ॥३३॥

विनियोग—सोमावर ' श्वात्रा स्थ ' या मंत्रभागाने जले टाकावी.

श्वात्रा स्थ वृत्रतुरो राधोगूर्ताऽअमृतस्य पत्नीः । ता देवीर्देवत्रेमं यज्ञं नयतोपहूताः सोमस्य पिबत ॥ ३४ ॥

अर्थ—हे जलांनो, तुम्ही शीघ्रकार्य करणारीं, वृत्रासुराला मारणारीं व द्रव्यें देणारीं व्हा. हे प्रकाशक जलांनो, हा यज्ञ तुम्ही देवांकडे न्या व त्यांच्या आज्ञेनें सोमपान करा ॥ ३४ ॥

विनियोग—' मा भेः ' हा मंत्रभाग उपांशु स्वरानें म्हणून सोम कुटावा.

मा भेर्मा संविक्थाऽऊर्जं धत्स्व धिषणे वीड्वी सती वीडयेथामूर्जं दधाथाम् । पाप्मा हतो न सोमः ॥ ३५ ॥

अर्थ—हे सोमा, तूं भिऊं नकोस व कांपूं नकोस. देवांच्या संतोषाकरितां तुला मी कांडतों म्हणून रसधारण कर. हे द्यावापृथिवींनो, तुम्ही स्वतः दृढ आहांच तरी देखील या उचललेल्या पाषाणापासून आपल्या शरीराला दृढ करा. व या सोमांत रस धारण करा. या वरवंट्याच्या कांडण्यानें यजमानाचें पाप नष्ट झालें, मात्र सोमाचा नाश झाला नाहीं ॥ ३५ ॥

विनियोग—कुटतांना प्रत्येक वेळीं होतृचमसांत सोमाचा रस काढून घेऊन ' प्रागपात् ' इत्यादि दोन ऋचा यजमानाकडून म्हणवाव्या.

प्रागपागुदगधराक्सर्वतस्त्वा दिशऽआधावन्तु । अम्ब निष्पर समरीविदाम् ॥ ३६ ॥

अर्थ—हे सोमा, पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर व अधर या सर्व दिशा आपआपल्या स्थानापासून दूर न जावोत तर एकमेकींकडे धांवत येऊन म्हणोत कीं हे माते, तूं सर्व बाजूंनीं सोमाला पूर्ण कर व नाना दिग्वासी लोक आमचा सोमसमागम जाणोत ॥ ३६ ॥

त्वमङ्ग प्रशंसिषो देवः शविष्ठ मर्त्यम् । न त्वदन्यो मघवन्नस्ति मर्डितेन्द्र ब्रवीमि ते वचः ॥ ३७ ॥

अर्थ—हे अत्यंत बलवान् इन्द्रा, प्रकाशमान असा तूं 'हा यजमान चांगला आहे' अशी यजमानाची स्तुति करतोस. हे धनवान् इन्द्रा, तुझ्याशिवाय या यजमानाला सुख देणारा दुसरा कोणी नाहीं. म्हणून 'तूं सुख देणारा' हें तुझेंच वाक्य मी बोलतों ॥ ३७ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**
माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

इति षष्ठोऽध्यायः समाप्तः ।



॥ अथ सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥



विनियोग—सहाव्या अध्यायांत यूपसंस्कारापासून सोमकण्डनापर्यंतचे मंत्र सांगितले. सातव्या अध्यायांत सोमपात्रांच्या ग्रहणाचे मंत्र सांगतात. ' वाचस्पतये, देवो देवेभ्यः व मधुमतीः ' या तीन मंत्रांनीं उपांशुपात्र ग्रहण करावें.

वाचस्पतये पवस्व वृष्णोऽअꣳशुभ्यां गभस्तिपूतः । देवो देवेभ्यः पवस्व येषां भागोऽसि ॥ १ ॥

अर्थ—हे सोमा, वृष्टि करणाऱ्या आपल्या अंशूंनीं व हस्तांनीं पवित्र झालेला असा तूं प्राणाकारणें गमन कर. हे सोमा, तूं देवस्वरूपी होऊन ज्यांचा तूं भाग आहेस अशा देवाकडे जा ॥ १ ॥

विनियोग—स्वीकृत अंशु ' यत्ते ' या मंत्रभागानें सोमावर स्थापन करावें. ' स्वाहा ' असें उच्चारून ' उर्वन्तरिक्षं ' या मंत्रभागानें बाहेर पडावें.

मधुमतीर्नऽइषस्कृधि यत्ते सोमादाभ्यं नाम जागृवि तस्मै ते सोम सोमाय स्वाहा स्वाहोर्वन्तरिक्षमन्वेमि ॥ २ ॥

अर्थ—हे सोमा, तूं आमच्या अन्नांना रसवान् कर. हे सोमा, ज्या तुझें, सोम असें अहिंस्य व जागरणशील नांव आहे त्या तुला हें हवि सुहुत असो. विस्तीर्ण अशा अन्तरिक्षांत मी गमन करतों. तुला हें हवि सुहुत असो. ॥ २ ॥

विनियोग—' स्वांकृतः ' या मंत्रभागानें होम करून पात्र धुवावें. 'देवेभ्यस्त्वा' या मंत्रभागानें सोमरसानें माखलेला हात उताणा करून धुवावा. शत्रुवधाची इच्छा असल्यास वज्र वगैरेवर पडलेल्या सोमभागाचा होम करावा. ' प्राणाय त्वा ' या मंत्रभागानें पूर्वस्थलींच उपांशुपात्राचें स्थापन करावें. ज्यानें सोमाचा रस काढला तो दगड हातानें धुवून उत्तराभिमुख सोमपात्राचे समीप ठेवावा.

स्वाङ्कृतोऽसि विश्वेभ्योऽइन्द्रियेभ्यो दिव्येभ्यः पार्थिवेभ्यो मनस्त्वाष्टु स्वाहा त्वा सुभव सूर्याय देवेभ्यस्त्वा मरीचिपेभ्यो देवाꣳशो यस्मै त्वेडे तत्सत्यमुपरिप्रुता भङ्क्ष्येन हतोऽसौ फट् प्राणाय त्वा व्यानाय त्वा ॥ ३ ॥

अर्थ—हे प्राणरूपी उपांशुपात्रा, तूं सर्व इंद्रियें, सर्व देव व पृथ्वीस्थ सर्व प्राण्यांपासून स्वतः उत्पन्न झालें आहेस. स्वयंसिद्ध अशा तुला प्रजापति व्याप्त करो. हे उत्तमजन्मवान् पात्रा, सूर्याकरितां तुझा मी स्वाहाकारानें होम करतों. हे हातावर असलेल्या सोमलेपा, मरीचिपालक देवांकरितां मी तुला धुतों. हें सोमांशो, ज्याकरितां मी तुझी प्रार्थना करतों तें वधकर्म सत्यस्वरूपी होवो. त्या उपमर्दानें हा माझा देवदत्तादिसंज्ञक शत्रु मरून विगलित होवो. हे उपांशुपात्रा, प्राणदेवतेच्या संतोषाकरितां तुझें मी स्थापन करतों. हे उपांशुसवना, व्यानदेवतेच्या संतोषाकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ३ ॥

विनियोग—सूर्योदयानन्तर अन्तर्यामपात्राचें ग्रहण करावे

उपयामगृहीतोऽस्यन्तर्यैच्छ मघवन् पाहि सोमम् । उरुष्य रायऽएषो यजस्व ॥ ४ ॥

अर्थ—हे सोमरसा, मी उपयामपात्रानें तुझें ग्रहण केलें आहे. हे धनवान् इंद्रा, त्या रसाला तूं पात्रांत नियमित कर व सोमाचें आणि धनाचें रक्षण कर. आणि सर्व अन्नें दे. ॥ ४ ॥

अन्तस्ते द्यावापृथिवी दधाम्यन्तर्दधाम्युर्वन्तरिक्षम् । सजूर्देवेभिरवरैः परैश्चान्तर्यामे मघवन् मादयस्व ॥ ५ ॥

अर्थ—हे अन्तर्यामा, प्राणरूपापन्न अशा तुझ्या शरीरामध्यें मी द्यावापृथिवींना स्थापन करतों. व विस्तीर्ण असें अन्तरिक्ष द्यावापृथिवींच्यामध्यें स्थापन करतों. हे धनवान् इंद्रा, पृथिवीस्थ व द्युलोकस्थ देवांशीं स्नेहयुक्त असा होऊन तूं अन्तर्यामपात्रांमध्यें आनंदानें रहा ॥ ५ ॥

विनियोग—'स्वांकृतः' या मंत्रभागानें सगळ्या सोमरसाचा उभें राहून होम करावा. व 'देवेभ्यस्त्वा' या मंत्रभागानें हात धुवावा. 'उदानाय त्वा' या मंत्रभागानें पात्र स्थापन करावें.

स्वाङ्कृतोऽसि विश्वेभ्यऽइन्द्रियेभ्यो दिव्येभ्यः पार्थिवेभ्यो मनस्त्वाष्टु स्वाहा त्वा सुभव सूर्याय देवेभ्यस्त्वा मरीचिपेभ्यऽउदानाय त्वा ॥ ६ ॥

अर्थ—हे सोमा, तूं सर्व इंद्रियें, सर्व देव व पृथिवीस्थ सर्व प्राण्यांपासून स्वतः उत्पन्न झालास. स्वयंसिद्ध अशा तुला प्रजापति व्याप्त करो. हे उत्तम जन्म अस-

ज्येष्ठा! सूर्याकरितां स्वाहाकारानें तुझा मी होम करतों. मरीचिपालक देवाकरितां तुझा मी होम करतों. हे पात्रा, उदानदेवतेच्या संतोषाकरितां मी तुझें स्थापन करतों ॥६॥

विनियोग—'आवायो' या मंत्रानें ऐन्द्रवायव पात्राचें ग्रहण करावें.

आ वायो भूष शुचिपाऽउप नऽ सहस्रं ते नियुतो विश्ववार। उपो तेऽ अन्धो मद्यमयामि यस्य देव दधिषे पूर्वपेयं वायवे त्वा ॥ ७ ॥

अर्थ—हे पवित्र अशा सोमाचें प्रथम पान करणाऱ्या वायो, सर्वव्यापका, तुझे हजारों मृग वाहन आहेत, त्यांवर बसून तूं आमचे जवळ ये. महोत्पादक सोमरूपी अन्न मी तुजकडे पोंचवितों. हे प्रकाशमान वायो, त्या सोमाच्या प्रथम वषट्काररूपी पानाचा तूं धारक आहेस. हे सोमरसा, वायुदेवतेकरितां तुझें मी ग्रहण करतों ॥७॥

विनियोग—'इन्द्रवायू' या मंत्रानें पुनः ऐन्द्रवायवसंज्ञक पात्राचें ग्रहण करावें. पात्राच्या बाहेर आलेला सोम पुसून 'एष ते योनिः' या मंत्रभागानें पात्र स्थापन करावें.

इन्द्रवायूऽइमे सुताऽउप प्रयोभिरागतम्। इन्दवो वामुशन्ति हि। उपयामगृहीतोऽसि वायवऽइन्द्रवायुभ्यां त्वैष ते योनिः सजोषोभ्यां त्वा ॥ ८ ॥

अर्थ—हे इन्द्रवायूंनों, तुमच्याकरितां आम्हीं सोमरसाचें कण्डन केलें. सोमदेव तुमची इच्छा करितात म्हणून तुम्ही सोमरूपी अन्नासह या. हे सोमरसा, वायुदेवतेच्या संतोषाकरितां तुझें मीं उपयामसंज्ञक पात्रानें ग्रहण केलें आहे. हे सोमपात्रा, हें तुझें स्थान आहे म्हणून स्नेही अशा इन्द्रवायूंच्या संतोषाकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ८ ॥

विनियोग—'अयं वाम्' या मंत्रानें मैत्रावरुण पात्राचें ग्रहण करावें.

अयं वां मित्रावरुणा सुतः सोमऽऋतावृधा। ममेदिह श्रुतꣳहवम्। उपयामगृहीतोऽसि मित्रावरुणाभ्यां त्वा ॥ ९ ॥

अर्थ—हे यज्ञ वाढविणाऱ्या मित्रावरुणांनो, तुमच्याकरितां मीं सोमरसाचें कंडन केलें. इतर यजमानाचें न ऐकतां माझेंच बोलावणें तुम्ही ऐका. हे सोमरसा, मित्रावरुण देवतांच्या संतोषाकरितां मित्रावरुणसंज्ञक पात्रानें तुझें मी ग्रहण करतों ॥ ९ ॥

विनियोग—मैत्रावरुण पात्रावर दोन दर्भ ठेवावे व 'राया वयं' या मंत्रभागानें सोमरसांत दूध मिसळावें.

राया वयꣳ सस्वाभिस्सो मदेम हव्येन देवा यवसेन गावः। तां धेनुं मित्रावरुणा युवं नो विश्वाहा धत्तमनपस्फुरन्तीमेष ते योनिर्ऋतायुभ्यां त्वा ॥ १० ॥

अर्थ—देवांना जसा हविर्द्रव्याचे योगानें आनंद होतो व पशूंना जसा तृणानें आनन्द होतो तशी जी गाय घरांत असल्यानें आम्ही आनन्दी होऊं तें गोरूपी धन हे मित्रावरुणांनो, आम्हांला सर्वदा द्या. ती गाय दुसऱ्याकडे न जाणारी अशी असो. हे पात्रा, हें तुझें स्थान आहे. यज्ञाची इच्छा करणाऱ्या मित्रावरुणांकरितां तुला या स्थानीं मी ठेवतों. ॥ १० ॥

विनियोग—यजमानानें स्पर्श केल्यावर 'या वां' या मंत्रानें आश्विनपात्राचें ग्रहण करावें. 'एष ते' या मंत्रभागानें पात्र स्थापन करावें.

या वां कशा मधुमत्यश्विना सूनृतावती। तया यज्ञं मिमिक्षतम्। उपयामगृहीतोऽस्यश्विभ्यां त्वैष ते योनिर्माध्वीभ्यां त्वा ॥ ११ ॥

अर्थ—हे अश्विनीकुमारांनो, तुमची जी मधुब्राह्मणयुक्त, सत्यप्रिय व प्रकाशक वाणी आहे, तिचेयोगें आमचा यज्ञ संपन्न करा. हे सोमरसा, उपयामपात्रानें तुझें ग्रहण झालें आहे. तुझें मी अश्विनीकुमाराकरितां ग्रहण करितों. हे पात्रा, हें तुझें स्थान आहे यावर मी तुझें मधुब्राह्मणाचें अध्ययन करणाऱ्या अश्विनीकुमारांकरितां स्थापन करतों ॥ ११ ॥

विनियोग—'तं प्रत्नथा' या मंत्रभागानें शुक्रपात्राचें ग्रहण करावें. नंतर अध्वर्यु व प्रतिप्रस्थाता या दोघांनीं शुक्रामंथि या पात्राचें ग्रहण करून पुढील अनुष्ठान करावें. दोन प्रोक्षित व दोन अप्रोक्षित असे यूपशकल दोघांनीं घ्यावे व प्रोक्षित शकलांनीं पात्रें झांकून अप्रोक्षित शकलानें अपमार्जन करावें. नंतर 'देवास्त्वा' या मंत्रभागानें अध्वर्यु व प्रतिप्रस्थात्यांनीं हविर्धानमण्डपांतून बाहेर पडावें. तदनंतर त्या दोघांनीं वेदीच्या पश्चाद्भागीं जाऊन उत्तरवेदी श्रोणीवर 'अनाधृष्टा' या मंत्रभागानें अध्वर्यूनें शुक्रपात्राचें व प्रतिप्रस्थात्यानें मंथिपात्राचें स्थापन करावें.

तं प्रत्नथा पूर्वथा विश्वथेमथा ज्येष्ठतातिं बर्हिषदꣳ स्वर्विदम्। प्रतीचीनं वृजनं दोहसे धुनिमाशुं जयन्तमनु यासु वर्धसे। उपयामगृहीतोऽसि

शण्डाय त्वैष ते योनिर्वीरतां पाहयपमृष्टꣳ शण्डो देवास्त्वा शुक्रपाꣳ प्रणयन्त्वनाधृष्टासि ॥ १२ ॥

अर्थ—हे इन्द्रा, तूं पुनः पुनः सोमपान करून ज्या यज्ञांत वाढतोस व अत्यंत प्राचीन भृग्वादिक, साध्वादिक ऋषि व सर्व ऋषिपुत्र यांचे प्रमाणें हल्लींच्या यजमानांना यज्ञफल देतोस त्या तुझी आम्ही स्तुति करतों. तूं उत्तमप्रकारें कीर्तिसंपन्न, यज्ञांत राहणारा, द्युलोकाप्रत जाणणारा, माझे सन्मुख असणारा, शत्रूंना कापविणारा व जिंकण्यास योग्य अशा वस्तूंना जिंकणारा आहेस. हे सोमरसा, शुक्रपुत्र शण्डसंज्ञक राक्षसाकरितां तुझें उपयामपात्रानें ग्रहण केलें आहे. हे पात्रा, हें तुझें स्थान आहे. तूं यजमानाच्या शूरत्वाचें रक्षण कर. शुक्रपुत्र शण्डनामक असुर दूर केला गेला. हे शुक्रपात्रा, तुझ्यांत असलेला सोमरस पिणारे देव तुला यज्ञस्थानाप्रत नेवोत. हे उत्तरवेदिश्रोणे, तूं अहिंसित आहेस ॥ १२ ॥

विनियोग—' सुवीरः ' या मंत्रभागानें अध्वर्यूनें यूपदक्षिणभागीं गमन करावें. अध्वर्युप्रतिप्रस्थात्यांनीं अरत्निसंधान करावें. अध्वर्यूनें अप्रोक्षित अशा यूपशकलाला टाकावें. नंतर अध्वर्यूनें प्रोक्षित यूपशकल आहवनीयांत टाकावें.

सुवीरो वीरान् प्रजनयन् परीहि वभि रायस्पोषेण यजमानम् । सञ्जग्मानो दिवा पृथिव्या शुक्रः शुक्रशोचिषा निरस्तꣳ शण्डꣳ शुक्रस्याधिष्ठानमसि ॥ १३ ॥

अर्थ—हे शुक्रग्रहा, तूं वीर्यवान् होऊन यजमानाच्या बलशौर्यांना उत्पन्न करून धनवृद्धीकरितां यजमानाकडे ये. द्युलोक व पृथ्वीलोकाशीं युक्त होणारे हें शुक्रपात्र शुद्ध प्रकाशानें यूपाला धारण करतें. शुक्रपुत्र शण्डनामक असुर यज्ञांतून निरस्त केला. हे यूपशकला, तूं शुक्रपात्राचें अधिष्ठान आहेस ॥ १३ ॥

विनियोग—यजमानानें ' अच्छिन्नस्य ' इत्यादि मंत्रभागाचा जप करावा. नंतर अध्वर्युप्रतिप्रस्थात्यांनीं यूपाच्या दोन्ही बाजूंना उभें राहावें व पश्चिमेस तोंड करून शुक्र व मंथींचा होम करावा.

अच्छिन्नस्य ते देव सोम सुवीर्यस्य रायस्पोषस्य ददितारः स्याम । सा प्रथमा सँस्कृतिर्विश्ववारा स प्रथमो वरुणो मित्रोऽअग्निꣳ ॥ १४ ॥

अर्थ—हे प्रकाशमान सोमा, आम्ही अखण्डित आणि उत्तम सामर्थ्ययुक्त अशा तुझें व द्रव्यवृद्धीचें प्रदान करणारे होऊं. ऋत्विज् व अनृत्विज् या सर्वांना स्पृहणीय व मुख्य असा सोमाचा संस्कार ज्या इंद्राकरितां केला जातो. त्याचेच वरुण, अग्नि, मित्र वगैरे सर्व मुख्य असे सेवक आहेत ॥ १४ ॥

विनियोग—' तृप्यन्तु ' या मंत्रभागाचा यजमानानें जप करावा. अध्वर्यूनें ' अयाऽमीत् ' हा मंत्रभाग म्हणून होत्याजवळ पश्चिमाभिमुख असें उभें राहावें.

स प्रथमो बृहस्पतिश्चिकित्वाँस्तस्माऽइन्द्राय सुतमाजुहोत स्वाहा । तृम्पन्तु होत्रा मधवो याऽ स्विष्टा याऽ सुप्रीताऽ सुहुता यत्स्वाहायाऽ ड्गीत् ॥ १५ ॥

अर्थ—तो प्रसिद्ध व बुद्धिमान् बृहस्पति ज्या इंद्राचा मुख्य मंत्री आहे त्याच इंद्राकरितां हे ऋत्विजांनो, तुम्हीं कांडलेल्या सोमाचा (सोमरसाचा) होम करा. मधुरस्वादयुक्त सोमप्रिय याज्यामंत्र सोमाचे योगानें अत्यंत प्रसन्न झाले म्हणूनच होमामध्यें त्याच मंत्रांचा विनियोग केला आहे. अग्नीध्राने याग केला ॥ १५ ॥

विनियोग—' अयं वेनः ' या मंत्रभागानें मंथिपात्राचें ग्रहण करावें.

अयं वेनश्चोदयत्पृश्निगर्भा ज्योतिर्जरायू रजसो विमाने । इममपाऽ संङ्गमे सूर्यस्य शिशुं न विप्रा मतिभी रिहन्ति । उपयामगृहीतोऽसि मर्कीय त्वा ॥ १६ ॥

अर्थ—(प्रथम अधिदैवरूपानें सोमाची स्तुति) हा सुंदर चंद्र ग्रीष्मऋतूचे शेवटीं द्युलोकांतील जलांची वृष्टि करतो. त्या चंद्राचें विद्युद्रूपी गर्भवेष्टण आहे. (आतां अधियज्ञस्वरूपानें सोमाची स्तुति) एखाद्या वस्तूच्या प्राप्तीकरितां लोक ज्याप्रमाणें ती वस्तु धारण करणाऱ्या मुलाची स्तुति करतात त्याप्रमाणें सूर्य व जलें यांचे संगमाकरितां म्हणजे वृष्टिरूपी गर्भाकरितां बुद्धिमान् ब्राह्मण या सोमाची स्तोत्रशस्त्रांनीं मनःपूर्वक स्तुति करतात. अशा हे सोमा, उपयामपात्रांत शुक्रपुत्र जो मर्कासुर त्याकरितां तुझें मी ग्रहण करतों ॥ १६ ॥

विनियोग—या मंथपात्रांतील सोमांत ' मन्नो न येषु ' या मंत्रभागानें सातू मिसळावे. नंतर प्रतिप्रस्थात्यानें ' अपमृष्टो मर्कः ' या मंत्रभागानें प्रोक्षित यूपशकल

मंथिपात्रावर झांकण घालावें व अप्रोक्षित शकलानें तें पात्र धुवावें. नंतर ' देवास्त्वा ' या मंत्रभागाचा उच्चार करून प्रतिप्रस्थात्यानें हविर्धान मण्डपांतून बाहेर पडावें.

मनो न येषु हवनेषु तिग्मं विपः शच्या वनुथो द्रवन्ता । आ यः शर्याभिस्तुविनृम्णोऽअस्याश्रीणीतादिशं गभस्तावेष ते योनिः प्रजाः पाह्यप मृष्टो मर्को देवास्त्वा मन्थिपाः प्रणयन्त्वनाधृष्टासि ॥ १७ ॥

अर्थ—हवनकर्माकरितां संचार करणारे विद्वान् अध्वर्यु व प्रतिप्रस्थाता हे दोघे ऋत्विज् मोठ्या उत्साहानें यज्ञकर्मनिमित्त शुक्र व मंथिपात्रांना व्याप्त करते झाले. या दोघांपैकीं अध्वर्यूनें हातांत असलेल्या मंथिपात्रांतील सोमांत प्रत्येक दिशेंत म्हणजे सर्वभागांत सातूचें मिश्रण केलें, जो अध्वर्यू मोठ्या दक्षिणेनें युक्त आहे. हे मंथिपात्रा, हें तुझें स्थान आहे. या ठिकाणीं राहून यजमानाच्या प्रजांचें पालन कर. मर्क नांवाचा राक्षस दूर केला गेला. हे मंथिपात्रा, तुला पान करणारे देव तुला यागस्थानीं नेवोत. तूं अहिंसित आहेस ॥ १७ ॥

विनियोग—' सुप्रजा ' हा मंत्रभाग म्हणून प्रतिप्रस्थात्यानें यज्ञस्तंभाच्या उत्तरभागीं जावें. यूपाच्या पश्चिम दिशेकडे 'संजग्मानः' या मंत्रभागानें अरत्निसंधान करावें. नंतर प्रतिप्रस्थात्यानें ' निरस्तो मर्कः ' असें म्हणून अप्रोक्षित यूपशकल टाकून द्यावें व ' मन्थिन ' हा मंत्रभाग म्हणून प्रोक्षित यूपशकल आहवनीयांत होमावें.

सुप्रजाः प्रजाः प्रजनयन् परीह्यभि रायस्पोषेण यजमानम् । सञ्जग्मानो दिवा पृथिव्या मन्थी मन्थिशोचिषा निरस्तो मर्कः मन्थिनोऽधिष्ठानमसि ॥ १८ ॥

अर्थ—हे मंथिपात्रा, उत्तम प्रजाविशिष्ट असा तूं यजमानाला प्रजायुक्त करण्याकरितां धनवृद्धियुक्त होत्साता त्याचेकडे ये. द्युलोक व पृथ्वीलोकाशीं युक्त होणारें हें मंथिपात्र आपल्याच प्रकाशानें यूपाला धारण करतें. मर्क नांवाच्या राक्षसाचा निरास झाला. हे यूपशकला, तूं मंथिपात्राचें अधिष्ठान आहेस ॥ १८ ॥

विनियोग—दोन धारा गळतात अशा स्थितींत ' ये देवासः ' या मंत्रभागानें आग्रयण पात्राचें ग्रहण करावें.

ये देवासो दिव्येकादश स्थ पृथिव्यामध्येकादश स्थ । अप्सुक्षितो महिनैकादश स्थ ते देवासो यज्ञमिमं जुषध्वम् ॥ १९ ॥

अर्थ—हे देवांनो, तुम्ही आपआपल्या ऐश्वर्यानें द्युलोकांत, पृथ्वीवर व अन्तरिक्षांत एकादश संख्याक आहांत. या तीनही स्थानांतून येऊन आमच्या यज्ञार्ह अशा आग्रयणपात्रांचें सेवन करा ॥ १९ ॥

विनियोग—' उपयामगृहीतोऽसि ' हा मंत्रही आग्रयणपात्रग्रहणांतच विनियुक्त आहे.

उपयामगृहीतोऽस्याग्रयणोऽसि स्वाग्रयणꣳ पाहि यज्ञं पाहि यज्ञपतिं विष्णुस्त्वामिन्द्रियेण पातु विष्णुं त्वं पाह्यभि सवनानि पाहि ॥ २० ॥

अर्थ—हे आग्रयणा, तूं उपयामपात्रांत गृहीत आहेस. तुझें नांव आग्रयण असून तूं श्रेष्ठता प्राप्त करून देणारा आहेस, असा तूं यज्ञाचें व यजमानाचें रक्षण कर. यज्ञाधिष्ठाता विष्णु स्वसामर्थ्यानें तुझें रक्षण करो व तूंही तशा त्या विष्णूचें रक्षण कर व प्रातरादि सवनांचेंही सर्वप्रकारानें रक्षण कर ॥ २० ॥

विनियोग—हिंकारत्रयाचा उच्चार करून ' सोमः पवते ' या मंत्राचा जप करावा. ' एष ते ' या मंत्रानें आग्रयणपात्राचें स्थापन करावें:

सोम÷ पवते सोम÷ पवतेऽस्मै ब्रह्मणेऽस्मै क्षत्रायास्मै सुन्वते यजमानाय पवतऽइषऽऊर्जे पवतेऽद्भ्यऽओषधीभ्यꣳ पवते द्यावापृथिवीभ्यां पवते सुभूताय पवते विश्वेभ्यस्त्वा देवेभ्यऽएष ते योनिर्विश्वेभ्यस्त्वा देवेभ्य÷ ॥ २१ ॥

अर्थ—ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या संतोषाकरितां व सोमरस काढणाऱ्या या यजमानाच्या इच्छा पूर्ण करण्याकरितां तसेंच अन्न, अन्नरस, वृष्टि व औषधि यांच्या सिद्धीकरितां आणि द्यावापृथिवीकरितां तसेंच सर्वच गोष्टी चांगल्या करण्याकरितां सोम आपल्या यज्ञकर्मांत पुनः पुनः प्रवृत्त होतो. हे आग्रयणपात्रा, अशा तुला मी सर्व देवांकरितां ग्रहण करतों. हे पात्रा, हें तुझें स्थान आहे, त्यावर सर्व देवांच्या संतोषाकरितां तुला मी ठेवतों ॥ २१ ॥

विनियोग—त्या हविर्भागाचें ग्रहण करावें. ' उपयामगृहीतोऽसि ' या मंत्रानें उक्थ्यपात्र ग्रहण करावें. उक्थांतील सोमाचे प्रशास्तृ, ब्राह्मणाच्छंसि व अच्छावाक या तिघांच्या होमाकरितां ' देवेभ्यस्त्वां ' या मंत्रभागानें तीन विभाग करून

उपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा बृहद्वते वयस्वतऽउक्थाव्युं गृह्णामि । यत्तऽइन्द्र बृहद्वयस्तस्मै त्वा विष्णवे त्वैष ते योनिरुक्थेभ्यस्त्वा देवेभ्यस्त्वा देवाव्युं यज्ञस्यायुषे गृह्णामि ॥ २२ ॥

अर्थ--हे सोमा, तूं उपयामपात्रानें गृहीत आहेस. हे उक्थ्यपात्रा, इंद्रकारितां स्तुतिशस्त्रांच्या संरक्षक अशा तुझें मी ग्रहण करतों. तो इंद्र बृहत्सोमप्रिय, व सोमरूपी अन्नानें युक्त आहे: हे इन्द्रा, जें तुझें मोठें सोमरूपी अन्न आहे त्याचे पानाकरितां मी तुझी प्रार्थना करतों. हे सोमा, विष्णुदेवतेकरितां तुझे मी ग्रहण करतों. हे पात्रा, हें तुझे स्थान आहे. उक्थदेवतेकरितां तुझें मी ग्रहण करतों. हे सोमा, देवसंरक्षक अशा तुझें मी देवसंतोषार्थ निर्विघ्न यज्ञसमाप्तीपर्यंत धारण करतों ॥ २२ ॥

विनियोग—प्रशास्ता, ब्राह्मणाच्छंसि व अच्छावाक यांच्या करितां ' इंद्राग्निभ्यां त्वा, ' इंद्रावरुणाभ्यां त्वा, ' मित्रावरुणाभ्यां त्वा, ' या मंत्रांनीं पात्रग्रहण करावें.

मित्रावरुणाभ्यां त्वा देवाव्युं यज्ञस्यायुषे गृह्णामीन्द्राय त्वा देवाव्युं यज्ञस्यायुषे गृह्णामीन्द्राग्निभ्यां त्वा देवाव्युं यज्ञस्यायुषे गृह्णामीन्द्रावरुणाभ्यां त्वा देवाव्युं यज्ञस्यायुषे गृह्णामीन्द्राबृहस्पतिभ्यां त्वा देवाव्युं यज्ञस्यायुषे गृह्णामीन्द्राविष्णुभ्यां त्वा देवाव्युं यज्ञस्यायुषे गृह्णामि ॥२३॥

अर्थ—हे सोमा, देवांना संतुष्ट करणाऱ्या अशा तुझें मी यज्ञाची निर्विघ्न समाप्ति व्हावी म्हणून मित्रावरुण, इंद्र, इंद्राग्नि, इंद्रावरुण, इन्द्रावृहस्पति, इन्द्राविष्णु या देवतांकरितां ग्रहण करतों ॥ २३ ॥

विनियोग—' मूर्धानं दिवः ' या मंत्रभागानें ध्रुवपात्राचें ग्रहण करावें.

मूर्धानं दिवोऽअरतिं पृथिव्या वैश्वानरमृतऽआजातमग्निम् । कविꣳ सम्राजमतिथिं जनानामासन्नापात्रं जनयन्त देवाः ॥ २४ ॥

अर्थ—देवांनीं अग्नि उत्पन्न केला तो द्युलोकाच्या शिरोभागीं सूर्यरूपानें प्रकाशणारा, पृथ्वीवर केव्हांही शांत न होतां सर्वदा राहणारा, सर्व प्राण्यांचें हित करणारा, यज्ञाचे निमित्तानें अरणींतून उत्पन्न झालेला, भूतकालीन सर्व जाणणारा, ऐश्वर्ययुक्त, यजमानांकडून अतिथीप्रमाणें पूज्य, व चमसपात्राच्या मुखांत राहणारा असा आहे. ॥ २४ ॥

विनियोग—' उपयामगृहीतोऽसि ' या मंत्राचाही विनियोग ध्रुवपात्र ग्रहणांतच आहे. ' ध्रुवं ध्रुवेण ' या मंत्रानें ध्रुवपात्रांतील सर्व सोम होतृचमसांत ओतावा.

उपयामगृहीतोऽसि ध्रुवोऽसि ध्रुवक्षितिर्ध्रुवाणां ध्रुवतमोऽच्युतानामच्युतक्षित्तमऽएष ते योनिर्वैश्वानराय त्वा । ध्रुवं ध्रुवेण मनसा वाचा सोममवनयामि । अथा नऽइन्द्रऽइद्विशोऽसपत्नाऽ समनसस्करत् ॥ २५ ॥

अर्थ—हे सोम, तूं उपयामपात्रांत गृहीत असून ध्रुवसंज्ञक आहेस. तुझा निवास निश्चित असून आदित्यस्थाली वगैरे जीं निश्चित व क्षरणरहित पात्रें आहेत, त्यापेक्षां तूं निश्चित व क्षरणरहित आहेस. हे पात्रा, हें तुझें स्थान आहे त्यावर वैश्वानरदेवतेच्या संतोषाकरितां तुझें मी स्थापन करतों. मी एकाग्रमनानें व वाणीनें ध्रुवपात्रांतील सोम होतृचमसांत ओततों. इन्द्रच आमच्या प्रजांना शत्रुरहित व धैर्यसंपन्न करो ॥ २५ ॥

विनियोग—सोम कांडतांना व पात्रांत भरून घेतांना कांहीं सोमाचे थेंब जमिनीवर पडतात ते भरून घेणें शक्य नाहीं. तज्जन्य दोषनिरासाकरितां ' यस्ते ' या मंत्रभागानें घृताहुतीनीं होम करावा. एक दर्भ चात्वालांत टाकावा.

यस्ते द्रप्स स्कन्दति यस्तेऽअ ँशुर्ग्रावच्युतो धिषणयोरुपस्थात् । अध्वर्योर्वा परि वा यऽ पवित्रात्तं ते जुहोमि मनसा वषट्कृतꣳस्वाहा देवानामुत्क्रमणमसि ॥ २६ ॥

अर्थ—हे सोमा, तुझ्या रसाचे थेंब व कांहीं भाग वरवंट्यावरून अगर वरवंटा व पाटा या दोघांवरून, अध्वर्यूच्या हातून व पवित्रापासून अगर कशामुळें तरी जमिनीवर पडतो. त्या तुझ्या मनःसंकल्पित भागाचा मी स्वाहाकारानें होम करतों. हे चात्वाला, तूं देवांचें स्वर्गगमनस्थान आहेस. म्हणजे देव तुझ्यावरून स्वर्गावर जातात ॥ २६ ॥

विनियोग—' प्राणाय मे ' इत्यादि अवकाशसंज्ञक मंत्र यजमानांकडून म्हणवावे.

प्राणाय मे वर्चोदा वर्चसे पवस्व व्यानाय मे वर्चोदा वर्चसे पवस्वोदानाय मे वर्चोदा वर्चसे पवस्व वाचे मे वर्चोदा वर्चसे पवस्व ऋतूदक्षाभ्यां मे वर्चोदा वर्चसे पवस्व श्रोत्राय मे वर्चोदा वर्चसे पवस्व चक्षुर्भ्यां मे वर्चोदसौ वर्चसे पवेथाम् ॥ २७ ॥

अर्थ—हे उपांशुपात्रा, तूं स्वभावतःच तेज देणारें आहेस म्हणून माझ्या प्राणवायूला, हे उपांशुसवना सर्वशरीरगत व्यानवायूला, हे अन्तर्याम पात्रा कण्ठगतवायूला, हे ऐन्द्रवायवपात्रा वागिन्द्रियाला, हे मैत्रावरुणपात्रा इच्छा व समृद्धि यांना, हे आश्विनपात्रा श्रोत्रेन्द्रियाला व हे तेजस्वी शुक्रामन्थि पात्रांनों माझ्या चक्षुरिन्द्रियाला तेजस्वी करण्याकरितां तुम्ही प्रवृत्त व्हा ॥ २७ ॥

आत्मने मे वर्चोदा वर्चसे पवस्वौजसे मे वर्चोदा वर्चसे पवस्वायुषे मे वर्चोदा वर्चसे पवस्व विश्वाभ्यो मे प्रजाभ्यो वर्चोदसौ वर्चसे पवेथाम् ॥ २८ ॥

अर्थ—हें तेज देणाऱ्या आग्रयणपात्रा, माझ्या जीवाला तेज देण्याकरितां, हे उक्थ्यपात्रा, सर्वेन्द्रियसामर्थ्य देण्याकरितां, हे ध्रुवपात्रा, निर्दोष आयुष्यरूपी तेज देण्याकरितां, हे पूतभृत् व आहवनीयांनो, तेज देणारे तुम्ही सर्व माझ्या प्रजांना तेज देण्याकरितां कर्मांत प्रवृत्त व्हा ॥ २८ ॥

विनियोग—' कोऽसि ' या मंत्रभागानें द्रोणकलशाकडे पहावें. भूर्भुवस्वः हा मंत्रभाग यजमानानें जपावा.

कोऽसि कतमोऽसि कस्यासि को नामासि । यस्य ते नामामन्महि यं त्वा सोमेनातितृपाम । भूर्भुवꣳ स्वः ÷ सुप्रजाꣳ प्रजाभि÷ स्याꣳसुवीरो वीरैꣳ सुपोषꣳ पोषै÷ ॥ २९ ॥

अर्थ—हे द्रोणकलशा, तूं प्रजापतिरूपी आहेस. तुझें रूप अतिशयेंकरून प्रजापतिसदृश आहे. तूं प्रजापतिसंबंधी आहेस व तुझें नांवही प्रजापति हें आहे. ज्या तुझें नांव आम्ही जाणतों व सोमरसानें तुला संतुष्ट करतों अशा तूं आमच्या इच्छा पूर्ण कराव्या. हे अग्निवायुसूर्यांनो, मी उत्तम प्रजांनीं, चांगल्या पुत्रांनीं व धनवृद्धीनें युक्त होईन ॥ २९ ॥

विनियोग—अध्वर्यु व प्रतिप्रस्थात्यांनीं बारा ऋतुग्रहांचें ग्रहण करावें. या मंत्रांतील पहिला मंत्रभाग अध्वर्यूचा आहे व दुसरा प्रतिप्रस्थात्याचा आहे. इच्छा असल्यास तेराव्या पात्राचें ग्रहण करावें.

उपयामगृहीतोऽसि मधवे त्वोपयामगृहीतोऽसि माधवाय त्वोपयामगृहीतोऽसि शुक्राय त्वोपयामगृहीतोऽसि शुचये त्वोपयामगृहीतोऽसि

नभसे त्वोपयामगृहीतोऽसि नभस्याय त्वोपयामगृहीतोऽसीषे त्वोपयाम-गृहीतोऽस्यूर्जे त्वोपयामगृहीतोऽसि सहसे त्वोपयामगृहीतोऽसि सहस्याय त्वोपयामगृहीतोऽसि तपसे त्वोपयामगृहीतोऽसि तपस्याय त्वोपयामगृहीतोऽस्यꣳहसस्पतये त्वा ॥ ३० ॥

अर्थ—हे ऋतुपात्रा, तूं उपयामसंज्ञक पात्रांत गृहीत आहेस, चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, अश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ व फाल्गुन या द्वादश मास देवतांकरितां तुझें मीं ग्रहण केलें आहे. तसेंच हे पात्रा, सूर्याच्या गति-क्रमानें येणाऱ्या अधिकमासाचे देवतेकरितां तुझें मी ग्रहण केलें आहे ॥ ३० ॥

विनियोग—प्रतिप्रस्थात्यानें ऐन्द्राग्नसंज्ञक पात्राचें ग्रहण करावें.

इन्द्राग्नीऽआगतꣳ सुतं गीर्भिर्नभो वरेण्यम् । अस्य पातं धियेषिता । उपयामगृहीतोऽसीन्द्राग्निभ्यां त्वैष ते योनिरिन्द्राग्निभ्यां त्वा ॥ ३१ ॥

अर्थ—हे इंद्राग्नि देवतांनो, कांडलेल्या व सूर्याप्रमाणें तीनही वेदांनीं स्तविलेल्या अशा श्रेष्ठ सोमाजवळ या व यजमानानें प्रार्थित केलेले तुम्ही त्या सोमापैकीं आपापला भाग प्या. हे सोमा, उपयामपात्रांत इंद्राग्नि देवतांकरितां तुझें मी ग्रहण करतों. हे पात्रा, हें तुझें स्थान आहे त्यावर तुला मी इंद्राग्नीकरितां ठेवतों ॥ ३१ ॥

आ घा ये अग्निमिन्धते स्तृणन्ति बर्हिरानुषक् । येषामिन्द्रो युवा सखा । उपयामगृहीतोऽस्यग्नीन्द्राभ्यां त्वैष ते योनिरग्नीन्द्राभ्यां त्वा ॥ ३२ ॥

अर्थ—जे यजमान इष्टिपशुयाग वगैरे करून अग्नीला प्रदीप्त करतात व क्रमेंकरून दर्भ पसरतात व तरुण म्हणजे जरा मृत्युरहित असा इंद्र ज्यांचा मित्र आहे त्यांच्या यज्ञांत हे सोमा, तुझा मीं उपयामपात्रांत अग्नींद्र देवतांकरितां स्वीकार केला आहे. हे सोमा, हें तुझें स्थान आहे त्यावर अग्नींद्रदेवतेकरितां मी तुझें स्थापन करतों ॥ ३२ ॥

विनियोग—' ओमासः ' या मंत्रभागानें वैश्वदेवपात्राचें ग्रहण करावें.

ओमासश्चर्षणीधृतो विश्वे देवासऽआगत । दाश्वाꣳसो दाशुषः सुतम् । उपयामगृहीतोऽसि विश्वेभ्यस्त्वा देवेभ्यऽएष ते योनिर्विश्वेभ्यस्त्वा देवेभ्यः ॥ ३३ ॥

अर्थ—इष्टप्राप्ति व अनिष्टनिरसन यायोगें मनुष्यांचें रक्षण व धारण करणाऱ्या आणि सोमयाग करणाऱ्या यजमानाला फल देणाऱ्या विश्वेदेवांनो, तुम्हीं सोमपानाकरितां या. हे सोमा, विश्वेदेवांकरितां तुझें मी उपयामपात्रांत ग्रहण केलें आहे. हें तुझें स्थान आहे त्यावर विश्वेदेवांकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ३३ ॥

विश्वे देवासऽआगत शृणुता मऽइमꣳ हवम् । एदं बर्हिर्निषीदत । उपयामगृहीतोऽसि त्रिश्वेभ्यस्त्वा देवेभ्यऽएष ते योनिर्विश्वेभ्यस्त्वा देवेभ्यः ॥ ३४ ॥

अर्थ—हे विश्वेदेवांनो, आमच्या यज्ञांत या व आमचें आव्हान ऐका आणि या दर्भावर बसा. हे सोमा, तुझें मीं विश्वेदेवांकरितां उपयामपात्रांत ग्रहण केलें आहे. हें तुझें स्थान आहे. यावर विश्वेदेवांकरितां तुझे मी स्थापन करतों ॥ ३४ ॥

विनियोग—येथें प्रातःसवनगृह पूर्ण झालें यापुढें माध्यंदिन सवनगृह सांगतात. 'इन्द्र मरुत्व' या मंत्रभागानें प्रथम मरुत्वतीय ग्रहाचें ग्रहण करावें.

इन्द्र मरुत्वऽइह पाहि सोमं यथा शार्य्यातेऽअपिबꣳ सुतस्य । तव प्रणीती तव शूर शर्मन्नाविवासन्ति कवयः सुयज्ञाः । उपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा मरुत्वतऽएष ते योनिरिन्द्राय त्वा मरुत्वते ॥ ३५ ॥

अर्थ—हे देवसहित इंद्रा, जसें तूं शर्यातीच्या यज्ञांत कांडलेल्या सोमरसाचें पान केलेंस त्याप्रमाणें आमच्या यज्ञांत सोमपान कर. हे शूर इन्द्रा, तुझ्या आज्ञेनें उत्तम यज्ञ करणारे व भूतवस्तूचें ज्ञान असलेले ऋषि सुखप्राप्तीकरितां यज्ञगृहांत तुझी सेवा करतात. हे सोमा, देवांसहित इंद्राकरितां उपयामपात्रांत तुझें ग्रहण केलें आहे. हें तुझें स्थान आहे त्यावर देवसहित इंद्राकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ३५ ॥

विनियोग—'मरुत्वन्तं' या मंत्रभागानें द्वितीय मरुत्वतीय पात्राचें ग्रहण करावें. 'मरुतां त्वौजसे' या मंत्रभागानें तृतीय मरुत्वतीय पात्राचें ग्रहण करावें.

मरुत्वन्तं वृषभं वावृधानमकवारिं दिव्यꣳ शासमिन्द्रम् । विश्वासाहमवसे नूतनायोग्रꣳ सहोदामिह तꣳ हुवेम । उपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा मरुत्वतऽएष ते योनिरिन्द्राय त्वा मरुत्वते । उपयामगृहीतोऽसि मरुतां त्वौजसे ॥ ३६ ॥

अर्थ—या यज्ञांत आम्ही इंद्राचें आव्हान करतों. तो इंद्र मरुद्गणांनींयुक्त, जलाची

वृष्टि करणारा, इच्छा वाढविणारा, वाईट शत्रूंनीं रहित, द्युलोकस्थ, दुष्टांचा नाशक, विश्वपालनसमर्थ, स्वधर्मभ्रष्ट अशा सर्व जगाचा पराजय करणारा, या यजमानाच्या रक्षणाकरितां वज्र धारण करणारा, व बल देणारा असा आहे. हे सोमा, देवसहित इंद्राकरितां उपयामपात्रांत तुझें ग्रहण केलें आहे. हें तुझें स्थान आहे त्यावर देवसहित इंद्राकरितां तुझें मी स्थापन करतों. हे तृतीय मरुत्वतीय गृहा, देवांना बळ प्राप्त व्हावें म्हणून तुझें मी उपयामपात्रानें ग्रहण करतों ॥ ३६ ॥

विनियोग--'सजोषा इन्द्रः' व 'मरुत्वां२ ॥ इन्द्रा' या दोन्ही ऋचा मरुत्वतीय पात्रग्रहणांत विनियुक्त आहेत.

सजोषाऽइन्द्र सगणो मरुद्भि३ सोमं पिब वृत्रहा शूर विद्वान्। जहि शत्रूँ१ऽरप मृधो नुदस्वाथाभयं कृणुहि विश्वतो न३ ॥ ३७ ॥

उपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा मरुत्वतऽएष ते योनिरिन्द्राय त्वा मरुत्वते ॥ ३७ ॥

अर्थ—हे शूर इंद्रा, तूं सोमपान कर. तूं प्रीतिसंपन्न, सपरिवार, वृत्रासुराचा नाशक व सूज्ञ असा आहेस म्हणून सोमपान कर व वृत्रादि राक्षसांना मार. व राहिलेल्ले शत्रु संग्रामांत पळवून लाव. नंतर आम्हांला सर्व बाजूंनीं निर्भय कर. हे सोमा, देवसहित इंद्राकरितां उपयामपात्रांत तुझे मीं ग्रहण केलें आहे. हें तुझें स्थान आहे त्यावर देवसहित इंद्राकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ३७ ॥

मरुत्वाँ२ऽइन्द्र वृषभो रणाय पिबा सोममनुष्वधं मदाय। आसिञ्चस्व जठरे मध्वऽऊर्मिं त्व३ राजासि प्रतिपत्सुतानाम्। उपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा मरुत्वतऽएष ते योनिरिन्द्राय त्वा मरुत्वते ॥ ३८ ॥

अर्थ—हे इंद्रा, मदाकरितां (तृप्तीकरितां) व संग्रामाकरितां तूं पुरोडाशादि स्वधान्त कर्मांनीं युक्त अशा सोमरसाचें पान कर. तूं देवांनीं युक्त, जलवृष्टि करणारा असा आहेस. हे इंद्रा, मधुररस युक्त सोमाचे तरंग तूं पोटांत सांठव. हे इंद्रा, प्रतिपदादि तिथींस कांडलेल्या सोमरसाचा तूं अधिपति आहेस. हे सोमा, देवसहित इंद्राकरितां उपयामपात्रांत तुझें मीं ग्रहण केलें आहे. हें तुझें स्थान आहे त्यावर देवसहित इंद्राकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ३८ ॥

विनियोग--'महां २॥ इन्द्रः' या मंत्रभागानें माहेन्द्र ग्रहाचें ग्रहण करावें.

महाँ२ऽइन्द्रो नृवदा चर्षणिप्राऽउत द्विबर्हाऽअमिनः सहोभिः । अस्मद्र्यग्वावृधे वीर्यायोरुः पृथुः सुकृतः कर्तृभिर्भूत् । उपयामगृहीतोऽसि महेन्द्राय त्वैष ते योनिर्महेन्द्राय त्वा ॥ ३९ ॥

अर्थ—इंद्र वीर कर्माकरितां वृद्धिंगत होतो. तो इंद्र मोठा पराक्रमी, एखादा मनुष्य सेवकांच्या इच्छा पूर्ण करतो त्याप्रमाणें इच्छा पूर्ण करणारा, प्रकृति व विकृति या दोन्ही यागांत वृद्धि पावणारा, निरुपम बलवान्, बलानें अनुपहिंसित, आमच्या संमुख असा आहे. वाढणारा असा तो इंद्र यश व बलानें विस्तृत व यजमानांकडून उत्तम रीतीनें पूजित असा होवो. हे ग्रहा, उपयामसंज्ञक पात्रानें तूं महेन्द्र देवतेकरितां गृहीत आहेस. हें तुझें स्थान आहे, त्यावर महेन्द्र देवतेकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ३९ ॥

महाँ२ऽइन्द्रो यऽओजसा पर्जन्यो वृष्टिमाँ२ऽइव । स्तोमैर्वत्सस्य वावृधे । उपयामगृहीतोऽसि महेन्द्राय त्वैष ते योनिर्महेन्द्राय त्वा ॥ ४० ॥

अर्थ—महातेजानें युक्त, व मेघाप्रमाणें वृष्टि करणारा जो इंद्र, वत्साप्रमाणें असलेल्या या यजमानाच्या स्तोत्रानें वाढतो, हे ग्रहा, त्या महेंद्र देवतेकरितां उपयामसंज्ञक पात्रानें तुझें ग्रहण केलें आहे. हें तुझें स्थान आहे त्यावर महेंद्र देवतेकरितां तुझें मी स्थापन करतों. ॥ ४० ॥

विनियोग—वस्त्रबद्ध सुवर्ण जुहूंत ठेवून चतुर्गृहीत आज्यानें शालाद्वार्य अग्नींत होम करावा.

उदु त्यं जातवेदसं देवं वहन्ति केतवः । दृशे विश्वाय सूर्यꣳ स्वाहा ॥ ४१ ॥

अर्थ—किरणें, प्रसिद्ध अशा ज्ञानी सूर्यदेवाला विश्वाच्या अवलोकनाकरितां धारण करतात. हें हवि सूर्यदेवाला सुहुत असो ॥ ४१ ॥

विनियोग—' चित्रं देवानाम् ' या मंत्रभागानें पूर्वोक्त अग्नींत दुसऱ्या आहुतीचा होम करावा.

चित्रं देवानामुदगादनीकं चक्षुर्मित्रस्य वरुणस्याग्नेः । आप्रा द्यावापृथिवीऽअन्तरिक्षꣳ सूर्यऽआत्मा जगतस्तस्थुषश्च स्वाहा ॥ ४२ ॥

अर्थ—आश्चर्याची गोष्ट—सूर्य उदय पावतो व उदय झाल्याबरोबर रात्रिगत अंधकाराचा नाश करतो. तो सूर्यकिरणांचा आश्रयभूत, मित्र, वरुण व अग्नींचा प्रका-

शक असा आहे. त्याचा उदय झाल्याबरोबर त्यानें आपल्या तेजानें द्युलोक, पृथिवीलोक व अन्तरिक्ष लोकांना पूर्ण केलें. तो सूर्य स्थावर-जंगमात्मक वस्तूंचा अन्तर्यामी आत्मा आहे. त्याला हें हवि सुहुत असो ॥ ४२ ॥

विनियोग--'अग्ने नय,' व 'अयं नः' या दोन मंत्रांनीं आग्नीध्रीय अग्नींत होम करावा.

अग्ने॒ नय॑ सु॒पथा॑ रा॒येऽअ॒स्मान्वि॑श्वानि देव व॒युना॑नि वि॒द्वान्। यु॒यो॒ध्य॒स्मज्जु॑हु॒राण॑मेनो॒ भूयि॑ष्ठां ते॒ नम॑ऽउक्तिं विधेम॒ स्वाहा॑ ॥ ४३ ॥

अर्थ—सर्व ज्ञानांनीं युक्त असलेल्या हे प्रकाशक अग्ने, यज्ञफलप्राप्तीकरितां आम्हांला चांगल्या मार्गानें ने. इष्टकर्मप्रतिबन्धक असें आमचें कर्म दूर कर. आम्ही पुष्कळ नमस्कारात्मक वाक्यें बोलूं. म्हणजे तुला नमस्कार असो असें पुष्कळ वेळां उच्चारूं व तुला नमस्कार करूं. तुला हें हवि सुहुत असो. ॥ ४३ ॥

अ॒यं नो॑ऽअ॒ग्निर्व॑रिवस्कृणो॒त्व॒यं मृधः॑ पु॒रऽए॑तु प्रभि॒न्दन्। अ॒यं वाजा॑ञ्जयतु वाजसाता॒वय॒ꣳ शत्रू॑ञ्जयतु॒ जर्हृ॑षाण॒ꣳ स्वाहा॑ ॥ ४४ ॥

अर्थ--हा अग्नि आम्हांला द्रव्य देवो व हाच संग्रामांचा नाश करून पुढें जावो. हाच अग्नि अन्नदानाच्या निमित्तानें शत्रूंचीं अन्नें आम्हांला भक्षणाकरितां देवो. म्हणून अत्यंत आनंदित होणारा हा अग्नि आमच्या शत्रूंना जिंको. हे अग्ने, तुला हें हवि सुहुत असो ॥ ४४ ॥

विनियोग—'रूपेण वः' या मंत्रभागानें यजमानानें दक्षिणारूपी गाईचें अभिमंत्रण करावें, नंतर यजमानानें सदोमण्डपांत जावें व तेथें असलेल्या ऋत्विजांकडे "यतःस्व" या मंत्रभागानें पहावें.

रू॒पेण॑ वो रू॒पम॒भ्यागां॒ तुथो॑ वो॒ विश्व॑वेदा॒ वि भ॑जतु। ऋ॒तस्य॑ प॒था प्रेत च॒न्द्रद॑क्षिणा॒ वि स्व॒ꣳ पश्य॒ व्यु॒न्तरि॑क्षं॒ यत॑स्व स॒दस्यै॒ꣳ ॥ ४५ ॥

अर्थ—हे दक्षिणारूपी गाईनो, मी आपल्या स्वरूपानें तुमच्या स्वरूपाला प्राप्त झालों आहें. ब्रह्मरूपी सर्वज्ञ प्रजापति ऋत्विजांत योग्य रीतीनें तुमची वांटणी करो. सुवर्णरूपी दक्षिणा घेऊन तुम्ही यज्ञाच्या मार्गानें गमन करा. दक्षिणांनो, तुमच्या साहाय्यानें मी देवयानमार्ग व पितृयानमार्गाचें अवलोकन करीन. हे दक्षिणे, ऋत्विजांना धन पुरून उरेल असा तूं यत्न कर ॥ ४५ ॥

विनियोग—' ब्राह्मणमद्य ' या मंत्रभागानें यजमानानें अग्नीध्राकडे जावें व त्याजवळ बसून ' अस्मद्दाता ' या मंत्रभागानें त्याला सुवर्ण द्यावें.

ब्राह्मणमद्य विदेयं पितृमन्तं पैतृमत्यमृषिमार्षेयꣳ सुधातुदक्षिणम् । अस्मद्दाता देवत्रा गच्छत प्रदातारमाविशत ॥ ४६ ॥

अर्थ—मी आज उत्तम पित्यापासून जन्मलेला, ज्याचे पितामहादिपूर्वज जगन्मान्य आहेत असा, मंत्रव्याख्याता, व ऋषिश्रेष्ठ व सुवर्णदक्षिणायुक्त अशा ब्राह्मणाला प्राप्त करीन. हे दक्षिणांनो, आम्हीं दिल्यावर तुम्ही देवांकडे जा व त्यांची तृप्ति करून यज्ञफल देण्याकरितां पुनः यजमानाकडे या ॥ ४६ ॥

विनियोग—अध्वर्यु व प्रतिप्रस्थात्यांनीं ' अग्नये त्वा ' या मंत्रभागानें सुवर्णाचा, ' रुद्राय त्वा ' या मंत्रभागानें गाईचा ' बृहस्पतये त्वा ' या मंत्रभागानें वस्त्राचा व ' यमाय त्वा ' या मंत्रभागानें अश्वाचा प्रतिग्रह करावा.

अग्नये त्वा महꣳ वरुणो ददातु सोऽमृतत्त्वमꣳशीयायुर्दात्रऽएधि मयो महꣳ प्रतिग्रहीत्रे रुद्राय त्वा महꣳ वरुणो ददातु सोऽमृतत्त्वमꣳशीय प्राणो दात्र एधि वयो महꣳ प्रतिग्रहीत्रे बृहस्पतये त्वा महꣳ वरुणो ददातु सोऽमृतत्त्वमꣳशीय त्वग्दात्रऽएधि मयो महꣳ प्रतिग्रहीत्रे यमाय त्वा महꣳ वरुणो ददातु सोऽमृतत्त्वमꣳशीय हयो दात्रऽएधि वयो महꣳ प्रतिग्रहीत्रे ॥ ४७ ॥

अर्थ—हे हिरण्या, वरुणानें अग्निरूपी अशा मजकारणें तुझें दान द्यावें. मी अमृत प्राप्त करीन. तूं दात्याचें आयुष्य व प्रतिग्रहीत्याचें सुख वाढव. हे गाई, वरुणानें रुद्ररूपी अशा मजकारणें तुझें दान द्यावें. मी अमृत प्राप्त करीन. तूं या दात्याचे (यजमानाचे) प्राणांची आणि प्रतिग्रहीता जो मी त्याच्या अन्नाची वृद्धि कर. हे वस्त्रा, वरुणानें बृहस्पतिरूपी अशा मजकारणें तुझें दान द्यावें. मी अमृत प्राप्त करीन. तूं या दात्या यजमानाच्या त्वगिन्द्रियकांतीची व प्रतिग्रहीत्या माझे सुखाची वृद्धि कर. हे अश्वा, वरुणानें यमरूपी अशा मजकारणें तुझें दान द्यावें. मी अमृत प्राप्त करीन. तूं दात्या यजमानाकरितां संततिरूपानें वाढ व प्रतिग्रहीत्या अशा मला अन्न दे ॥ ४७ ॥

विनियोग—' कोऽदात् ' या मंत्रभागानें मंथौदन वगैरेंचा प्रतिग्रह करावा.

कोऽदात्कस्माऽअदात्कामोऽदात्कामायादात् । कामो दाता कामः प्रतिग्रहीता कामैतत्ते ॥ ४८ ॥

अर्थ—कोणीं दान दिलें ? व कोणाला दिलें ? (कोणीं प्रतिग्रह घेतला ?) कामानें दान दिलें व कामाला दिलें (कामानें प्रतिग्रह घेतला.) (तूं दाता नाहींस व मी प्रतिग्रहीता नाहीं. तर) कामच दाता व प्रतिग्रहीता आहे. हे कामा, हें द्रव्य तुझेंच आहे ॥ ४८ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्याय श्रीधरशास्त्रिकृते**

माध्यन्दिनीय वाजसनेयि संहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

इति सप्तमोऽध्यायः समाप्तः ।



अथ अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥



विनियोग—सातव्या अध्यायांत उपांशुग्रहादि सवनद्वयाचे मंत्र दक्षिणादानापर्यंतचे सांगितले. आठव्या अध्यायांत तृतीयसवनांतील आदित्यग्रहादि मंत्र सांगतात. 'उपयामगृहीतोऽसि' या मंत्रभागानें प्रतिप्रस्थात्यानें द्रोणकलशांतून आदित्यग्रहपात्रानें सोमाचें ग्रहण करावें. द्विदेवत्य होम झाल्यावर 'आदित्येभ्यस्त्वा' या मंत्रभागानें हुतशेष आदित्यस्थालींत टाकावें. नंतर 'उरुगाय' या मंत्रभागानें आदित्यपात्रानें स्थाली झांकावी.

उपयामगृहीतोऽस्यादित्येभ्यस्त्वा। विष्णऽउरुगायैष ते सोमस्तꣳ रक्षस्व मा त्वा दभन् ॥ १ ॥

अर्थ—हे सोमा, मीं उपयामपात्रानें तुझें ग्रहण केलें आहे. आदित्य देवांकरितां तुझें मी सिंचन करतों. हे बहुस्तुत यज्ञपुरुषा, हा सोम तुला समर्पण केला आहे, याचें रक्षण कर. हे सोमा, रक्षण करीत असतां राक्षस तुझी हिंसा न करोत ॥ १ ॥

विनियोग—'कदाचन' इत्यादि मंत्रभागानें होमशेषांतून आदित्यग्रहाचें ग्रहण करावें.

कदा चन स्तरीरसि नेन्द्र सश्चसि दाशुषे। उपोपेन्नु मघवन्भूयऽइन्नु ते दानं देवस्य पृच्यतऽआदित्येभ्यस्त्वा ॥ २ ॥

अर्थ—हे इंद्रा, तूं केव्हांही हिंसा करणारा नाहींस तर हवि देणाऱ्या यजमानाचे जवळ जाऊन त्याचें हविर्द्रव्य भक्षण करतोस. हे धनवन् इंद्रा, पुनः हविर्द्रव्याचा व प्रकाशक अशा तुझा मी संयोग करतों. यजमानानें दिलेलें हविर्द्रव्य तूं ग्रहण करावेंस. हे ग्रहा, आदित्य देवतांकरितां मी तुझें ग्रहण करतों ॥ २ ॥

विनियोग—'कदाचन' इत्यादि मंत्रभागानें द्वितीय आदित्यग्रहाचें ग्रहण करावें.

कदा चन प्रयुच्छस्युभे निपासि जन्मनी। तुरीयादित्य सवनं तऽइन्द्रियमातस्थावमृतं दिव्यादित्येभ्यस्त्वा ॥ ३ ॥

अर्थ—हे आदित्या, तूं कधींतरी प्रमाद अगर आळस करशील काय ? अर्थात् नाहींच करावयाचा. तूं देव व मनुष्य दोघांचेंही पालन करतोस. तुझें चतुर्थ मायातीत जगत्प्रेरक, अविनाशि व विज्ञानानन्दस्वरूपी जें वीर्य तें द्युलोकामध्यें सन्मुख स्थित आहे. हे आदित्यग्रहा, आदित्यदेवतांकरितां मी तुझे ग्रहण करतों ॥ ३ ॥

विनियोग—' यज्ञो देवानाम् ' या मंत्रभागानें आदित्यग्रहांत दहीं मिसळावें.

यज्ञो देवानां प्रत्येति सुम्नमादित्यासो भवता मृडयन्तः । आ वोऽर्वाची सुमतिर्ववृत्यादꣳ होश्चिया वरिवोवित्तरासदादित्येभ्यस्त्वा ॥ ४ ॥

अर्थ—यज्ञ आदित्यदेवांना सुख देण्याकरितां येतो. म्हणून हे आदित्यांनो, तुम्ही आम्हांला सुख देण्याकरितां या. तुमची अनुग्रह करणारी बुद्धि आमच्याकडे वळो व पापी पुरुषांचीही धन प्राप्त करणारी बुद्धि आम्हांकडे वळो. हे सोमा, आदित्यदेवतांकरितां मी तुझ्यांत दहीं मिसळतों ॥ ४ ॥

विनियोग—' विवस्वन्नादित्य ' या मंत्रभागानें उपांशुसवनाने दधि व सोम मिसळावे व ' श्रदस्मै ' या मंत्रभागानें यजमानपत्नीनें पूतभृताकडे पहावें.

विवस्वन्नादित्यैष ते सोमपीथस्तस्मिन् मत्स्व । श्रदस्मै नरो वचसे दधातन यदाशीर्दा दम्पती वाममश्नुतꣳ । पुमान् पुत्रो जायते विन्दते वस्वधा विश्वहारपऽएधते गृहे ॥ ५ ॥

अर्थ—हे आदित्या, हा पात्रांतील सोम तुला पिण्याकरितां आहे. त्यायोगें तूं तृप्त हो. हे ऋत्विजांनो, आशीर्वाद देणाऱ्या अशा तुम्ही आशीर्वचनावर श्रद्धा ठेवा. श्रद्धापूर्वक आशीर्वाद द्या. तो आशीर्वाद असा कीं, पत्नी व यजमानांना उत्तम यज्ञफल मिळो. त्यांस पुत्र होवो व त्या पुत्राला धन मिळो व तो सर्वदा शत्रुरहित होऊन आपले घरांत वाढो ॥ ५ ॥

विनियोग—' वाममद्य ' इत्यादि दोन मंत्रांनीं सावित्रग्रहाचें ग्रहण करावें.

वाममद्य सवितर्वाममु श्वो दिवे दिवे वाममस्मभ्यꣳ सावीः । वामस्य हि क्षयस्य देव भूरेरया धिया वामभाजः स्याम ॥ ६ ॥

अर्थ—हे सर्वप्रेरका सवितृदेवा, आज व उद्यांही आमच्याकरितां चांगलें कर्मफल पाठव. आम्ही श्रद्धायुक्त बुद्धीनें उत्तम स्वर्गांत चिरकाल निवासाकरितां चांगलें

यज्ञकर्म प्रत्येक दिवशीं करूं. हे देवा, तूं द्रव्यपूर्ण स्वर्गांत निवास दे. या सोमकर्माच्या योगानें आम्ही इष्ट फल भोगूं ॥ ६ ॥

उपयामगृहीतोऽसि सावित्रोऽसि चनोधाश्चनोधाऽअसि चनो मयि धेहि । जिन्व यज्ञं जिन्व यज्ञपतिं भगाय देवाय त्वा सवित्रे ॥ ७ ॥ शतं ३००

अर्थ—हे सोमा, तूं उपयामपात्रांत गृहीत आहेस. हे ग्रहा, सविता तुझी देवता आहे व तूं अन्नाचा धारण करणारा आहेस. तूं उत्तम प्रकारे करून अन्नधारण करणारा आहेस म्हणून मला अन्न दे. या यज्ञाचें व यजमानाचें रक्षण कर. ऐश्वर्ययुक्त व सर्व प्राणिप्रेरक अशा सवितृदेवाकरितां मी तुझें ग्रहण करतों ॥ ७ ॥

विनियोग—' उपयामगृहीतोऽसि ' या मंत्रानें महावैश्वदेवाचें ग्रहण करावें.

उपयामगृहीतोऽसि सुशर्मासि सुप्रतिष्ठानो बृहदुक्षाय नमः÷ । विश्वेभ्यस्त्वा देवेभ्यऽएष ते योनिर्विश्वेभ्यस्त्वा देवेभ्यः÷ ॥ ८ ॥

अर्थ—हे वैश्वदेवग्रहा, तूं उपयामसंज्ञक पात्रांत गृहीत आहेस. तूं उत्तम प्रकारच्या सुखाचा आश्रय असून चांगल्या पात्रांत तुझी स्थिति आहे. असा आहेस म्हणून जगदुत्पादक अशा प्रजापतीकारणें तूं अन्न हो. विश्वेदेवाकरितां तुझें मी ग्रहण करतों. हें तुझें स्थान आहे, त्यावर विश्वेदेवाकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ८ ॥

विनियोग—प्रतिप्रस्थात्यानें ' उपयामगृहीतो असि ' या मंत्रभागानें पात्नीव्रत ग्रहाचें ग्रहण करावें. ' अहं पुरस्तात् ' या मंत्रभागानें प्रचरणींत अवशिष्ट घृत त्यांत मिसळावें.

उपयामगृहीतोऽसि बृहस्पतिसुतस्य देव सोम तऽइन्दोरिन्द्रियावतः पत्नीवतो ग्रहाँ२ऽऋध्यासम् । अहं परस्तादहमवस्ताद्यदन्तरिक्षं तदु मे पिताभूत् । अहꣳ सूर्यमुभयतो ददर्शाहं देवानां परमं गुह्या यत् ॥ ९ ॥

अर्थ—हे प्रकाशमान सोमा, तुझें मीं उपयामपात्रांत ग्रहण केलें आहे. म्हणून या यज्ञाच्या अधिपतीनें (यजमानानें) काण्डलेल्या अशा, रसरूपी, इंद्रियशक्तिवर्धक आणि पत्नीसंयुक्त अशा तुझ्यासंबंधी दुसरे जे उपांशुप्रभृति ग्रह त्यांस मी सिद्ध करितों. मी सर्वव्यापी परमात्मस्वरूपी असल्यानें वर द्युलोकांत व अधोभागीं भूलोकांत राहतों. मध्यवर्ति अन्तरिक्ष लोक पित्याप्रमाणें माझें पालन करतो. मी सर्वव्यापी

होऊन वर व खालीं सूर्याला पहातों. अत्यंत गुप्त अशा हृदयामध्ये जें इंद्रादिकांचें श्रेष्ठ स्थान आहे तेंच मी आहें. ॥ ९ ॥

विनियोग—' अग्नाइ पत्नीवन् ' या मंत्रभागानें पात्नीवत ग्रहाचा होम करावा. नेष्ट्यानें यजमानपत्नीला उद्गात्याकडे पाहण्यास सांगावें व तिने ' प्रजापतिः ' या मंत्रभागानें त्याजकडे पहावें.

अग्ना३इ पत्नीवन्त्सजूर्देवेन त्वष्ट्रा सोमं पिब स्वाहा । प्रजापतिर्वृषासि रेतोधा रेतो मयि धेहि प्रजापतेस्ते वृष्णो रेतोधसो रेतोधामशीय ॥ १० ॥

अर्थ—हे पत्नीयुक्त अग्ने, त्वष्टृदेवाचा स्नेही होऊन तूं सोमपान कर. तुला हें हवि सुहुत असो. हे उद्गात्या, तूं प्रजापालक, रेतःसिञ्चन व रेतोधारण करणारा आहेस म्हणून माझे ठायीं रेतःस्थापन कर. नंतर वीर्यसिञ्चक वीर्यधारण करणाऱ्या प्रजापालक अशा तुझ्या अनुग्रहानें वीर्यवान् असा मुलगा मला प्राप्त होवो ॥ १० ॥

विनियोग—' उपयामगृहीतोऽसि ' इत्यादि मंत्रानें हारियोजनग्रहाचें ग्रहण करावें ' हर्योर्धानाः ' या मंत्रभागानें हारियोजनग्रहांत भाजलेले जव घालावे.

उपयामगृहीतोऽसि हरिरसि हारियोजनो हरिभ्यां त्वा । हर्योर्धाना स्थ सहसोमाऽइन्द्राय ॥ ११ ॥

अर्थ—हे हारियोजनग्रहा, तूं हरितवर्णाचा आहेस. तुझें मीं उपायामपात्रांत ग्रहण केलें आहे. अश्वसंयोजक इंद्रसंबंधी अशा तुझे मी ऋक्सामाकरितां ग्रहण करतों. हे भाजलेल्या यवांनो, सोमसहित असे तुम्ही इंद्राचे जे हिरव्या वर्णाचे घोडे तद्रूपी आहां ॥ ११ ॥

विनियोग—सर्व ऋत्विजांनीं भाजलेले जव घेऊन ' यस्ते अश्वसनिः ' या मंत्रभागाने अवघ्राण करून ते उत्तरवेदीवर टाकावे.

यस्तेऽअश्वसनिर्भक्षो यो गोसनिस्तस्य तऽइष्टयजुष स्तुतस्तोमस्य शस्तोक्थस्योपहूतस्योपहूतो भक्षयामि ॥ १२ ॥

अर्थ—हे धानासहित सोमद्रव्या, तुझें भक्षण अश्व देणारे आहे. जें तुझें भक्षण पशु देतें अशा, ज्याच्याकरितां यजुर्वेदानें होम केला आहे, स्तोत्रांनीं स्तुति केली आहे, होत्यांनीं ज्यांत शस्त्रें म्हटलीं आहेत अशा व ज्याचेविषयी आज्ञा झाली आहे अशा हे सोमा, आज्ञप्त होऊन तुझें मी भक्षण करतों. ॥ १२ ॥

विनियोग—' देवकृतस्य ' इत्यादि सहा मंत्रांनीं सहा यूपशकलांचा अग्नींत होम करावा.

देवकृतस्यैनसोऽवयजनमसि मनुष्यकृतस्यैनसोऽवयजनमसि पितृकृतस्यैनसोऽवयजनमस्यात्मकृतस्यैनसोऽवयजनमस्थेनसऽएनसोऽवयजनमसि। यच्चाहमेनो विद्वाँश्चकार यच्चाविद्वाँस्तस्य सर्वस्यैनसोऽवयजनमसि ॥ १३ ॥

अर्थ—हे शकला, देवांचा याग न केल्यानें, मनुष्यांचा द्रोह केल्यानें, पितरांचें श्राद्ध न केल्यानें व आत्मनिन्दा केल्यानें उत्पन्न झालेलें पाप व इतरही जीं सर्व पापें उत्पन्न झालीं त्यांचा नाश करणारे तूं आहेस. तसेंच बुद्धिपूर्वक व अबुद्धिपूर्वक जें मीं पाप केलें त्या सर्व पापांचा तूं नाश करणारे आहेस ॥ १३ ॥

विनियोग—' जलपूर्ण चमसावर ओले दर्भ ठेवून ' संवर्चसा ' या मंत्रभागानें त्या पात्रांना स्पर्श करावा.

सं वर्चसा पयसा सं तनूभिरगन्महि मनसा सꣳ शिवेन। त्वष्टा सुदत्रो विदधातु रायोऽनुमार्ष्टु तन्वो यद्विलिष्टम् ॥ १४ ॥

अर्थ—आम्ही ब्रह्मतेजानें, क्षीरादिरसानें, अनुष्ठानसमर्थ शरीरावयवांनी व उत्तम अशा कर्मश्रद्धायुक्त मनानें संयुक्त होऊं. व उत्तम दान करणारा त्वष्टा देव आम्हांला द्रव्यें देवो व तो शरीराची हीनता दूर करो ॥ १४ ॥

विनियोग—' समिन्द्रण ' इत्यादि नऊ मंत्रांनीं समिष्टयजुःसंज्ञक नऊ आहुतीचा होम करावा.

समिन्द्र णो मनसा नेषि गोभिꣳ स सूरिभिर्मघवन्त्सꣳ स्वस्त्या। सं ब्रह्मणा देवकृतं यदस्ति सं देवानाꣳ सुमतौ यज्ञियानाꣳ स्वाहा ॥ १५ ॥

अर्थ—हे धनवन् इन्द्रा, तूं आम्हांला अनुग्रहयुक्त मनानें, गाईंनीं, पण्डित अशा होत्रादिकांनीं व अर्थज्ञानसहित वेदानें युक्त करतोस. व देवांकरितां केलेल्या कर्मानें युक्त करून आमचे विषयीं यज्ञसंबंधी देवांची सद्बुद्धि उत्पन्न कर. पूर्वोक्तगुणविशिष्ट अशा तुला हें हवि सुहुत असो ॥ १५ ॥

सं वर्चसा पयसा सं तनूभिरगन्महि मनसा सꣳ शिवेन। त्वष्टा सुदत्रो विदधातु रायोऽनुमार्ष्टु तन्वो यद्विलिष्टम् ॥ १६ ॥

अर्थ—आम्ही ब्रह्मतेजानें, क्षीरादिरसानें, अनुष्ठानसमर्थ शरीरावयवांनीं, व उत्तम अशा कर्मश्रद्धायुक्त मनानें संयुक्त होऊं व उत्तम दान करणारा त्वष्टा देव आम्हांला द्रव्यें देवो व तो शरीराची हीनता दूर करो ॥ १६ ॥

धाता रातिꣳ सवितेदं जुषन्तां प्रजापतिर्निधिपा देवोऽअग्निः । त्वष्टा विष्णुः प्रजया स रराणा यजमानाय द्रविणं दधात स्वाहा ॥ १७ ॥

अर्थ—दान देणारा धाता, सविता, निधिपालक प्रजापति, प्रकाशमान अग्नि, त्वष्टा व विष्णु हे सहा देव आमचें हविर्द्रव्य सेवन करोत. हे सहा देव, यजमानाच्या प्रजेंत रममाण होऊन त्यास धन देवोत. यांना हें हवि सुहुत असो ॥ १७ ॥

सुगा वो देवाः सदनाऽअकर्म यऽआजग्मेदꣳ सवनं जुषाणाꣳ । भरमाणा वहमाना हवीꣳष्यस्मेधत्त वसवो वसूनि स्वाहा ॥ १८ ॥

अर्थ—हे देवांनो, तुम्ही या यज्ञाचें सेवन करण्याकरितां आलां आहां. आम्ही तुमचीं स्थानें जाण्यास सुलभ अशीं करून ठेवलीं आहेत व निवास करणाऱ्या, पोषण करणाऱ्या व रथांत हविर्भाग नेणाऱ्या हे देवांनो, आमच्यामध्यें द्रव्य स्थापन करा. तुम्हांला हें हवि सुहुत असो ॥ १८ ॥

याँ१ऽआवहऽउशतो देव देवाँस्तान् प्रेरय स्वेऽअग्ने सधस्थे । जक्षिवाꣳसः पपिवाꣳसश्च विश्वेऽसुं घर्मꣳ स्वरातिष्ठतानु स्वाहा ॥१९॥

अर्थ—हे प्रकाशमान अग्ने, हविर्द्रव्येच्छु अशा ज्या देवांना तूं बोलवून आणलेस त्यांना आपल्या निवासस्थानाकडे पाठव व त्यांना सांग कीं, हे देवांनो, तुम्हीं पुरोडाशादि हवि भक्षण केलें तसेंच सोमपान केलें. आतां तुम्ही सर्वजण वायुमण्डल, सूर्यमण्डल व द्युलोकांत जेथें तुमची जागा असेल तेथें जा. हे देवांनो, हे हवि तुम्हांला सुहुत असो ॥ १९ ॥

वयꣳ हि त्वा प्रयति यज्ञेऽअस्मिन्नग्ने होतारमवृणीमहीह । ऋधग्याऽ ऋधगुताशमिष्टाꣳ प्रजानन्यज्ञमुपयाहि विद्वान्त्स्वाहा ॥ २० ॥

अर्थ—हे अग्ने, यज्ञ चालू असतां या स्थानीं तुला देवांना बोलावणारा म्हणून आम्हीं नेमले म्हणून तूं यज्ञ संपन्न करून आमच्याकडून याग करविलास व समृद्ध होऊन तूं यज्ञविघ्न नाहींसें केलेंस म्हणून स्वाधिकारज्ञानसंपन्न असा तूं, यज्ञ संपला असें समजून आपल्या स्थानाप्रत जा. तुला हें हवि सुहुत असो ॥ २० ॥

देवा गातुविदो गातुं वित्त्वा गातुमित। मनसस्पतऽइमं देव यज्ञꣳ स्वाहा वाते धाः ॥ २१ ॥

अर्थ—हे यज्ञ जाणणाऱ्या देवांनो, आमचा यज्ञ संपला असें जाणून आपल्या मार्गानें जा. यागाकरितां आमच्या मनाच्या प्रेरका देवा, हा यज्ञ मी तुझ्या हातांत देतों. तूं त्याला वायुदेवाचे ठिकाणीं स्थापन कर. ॥ २१ ॥

यज्ञं यज्ञं गच्छ यज्ञपतिं गच्छ स्वां योनिं गच्छ स्वाहा। एष ते यज्ञो यज्ञपते सहसूक्तवाकः सर्ववीरस्तं जुषस्व स्वाहा ॥ २२ ॥

अर्थ—हे यज्ञा, तूं विष्णूकडे जा व यजमानाकडे जाऊन त्याला फल समर्पण कर. व तुझें उत्पत्तिस्थान असा जो वायु त्याकडे जा. तुला हें हवि सुहुत असो. हे यजमान, हा यज्ञ तुझा आहे. तसेंच सूक्तवाक् व पशुपुरोडाशसहित जो यज्ञ त्याचे तूं फल भोग, हें हवि तुला सुहुत असो ॥ २२ ॥

विनियोग—' माहिर्भूः ' या मंत्रभागानें कृष्णमृगाचें शृंग व मेखला चात्वालांत टाकावी. अध्वर्यूनें ' उरु ऴ हि ' हा मंत्र यजमानाकडून म्हणवावा. नंतर अवभृथ स्नानाकरितां पाण्यांत उतरून अध्वर्यूनें ' नमो वरुणाय ' हा मंत्र यजमानाकडून म्हणवावा.

माहिर्भूर्मा पृदाकुः। उरुꣳ हि राजा वरुणश्चकार सूर्याय पन्थामन्वेतवाऽउ। अपदे पादा प्रतिधातवेऽकरुतापवक्ता हृदयाविधश्चित्। नमो वरुणायाभिष्टितो वरुणस्य पाशः ॥ २३ ॥

अर्थ—हे रज्जो, तूं सर्प व अजगर होऊं नकोस. वरुणानेंच सूर्याला प्रतिदिवशीं जाण्याकरितां आकाशांत मार्ग निर्माण करून दिला म्हणून त्यानेंच निराधार अशा आकाशांत आम्हांला स्वर्गांत जाण्याचा मार्ग करून द्यावा. तो वरुण हृदयमर्मभेदक अशा चुगलखोराचाही तिरस्कार करणारा आहे. असा वरुण आम्हांला अवभृथ स्नानाला मार्ग देवो. वरुणाचा पाश आक्रांत झाला, आतां तो आम्हांला बांधण्यास समर्थ नाहीं अशा वरुणाला नमस्कार असो ॥ २३ ॥

विनियोग—जलांत समिधा टाकून ' अग्नेरनीकम् ' या मंत्रानें घृताचा होम करावा.

अग्नेरनीकमप्ऽआविवेशापां नपात् प्रतिरक्षन्नसुर्यम्। दमेदमे समिधं यक्ष्यग्ने प्रति ते जिह्वा घृतमुच्चरण्यत् स्वाहा॥ २४॥

अर्थ—हे गमनशील, ज्या तुझें अपांनपात् संज्ञक मुख उदकांत प्रविष्ट झालें तो तूं यज्ञाचें घरोघर राक्षसांनीं केलेलें यज्ञविघ्न दूर करून प्रदीपक तुपाशीं युक्त हो. नंतर तुझी ज्वाला घृताकरतां उद्युक्त असो. तुला हें हवि सुहुत असो॥ २४॥

विनियोग—सोमाचा कुच्चा ज्यांत भरला आहे असा कुंभ जलांत टाकावा.

समुद्रे ते हृदयमप्स्वन्तꣳ सं त्वा विशन्त्वोषधीरुतापः÷। यज्ञस्य त्वा यज्ञपते सूक्तोक्तौ नमोवाके विधेम यत् स्वाहा॥ २५॥

अर्थ—हे सोमा, जें तुझें हृदय समुद्रासारख्या पाण्यांत आहे तेथें तुला मी पोंचवितों. तेथें तुझ्याकडे ओषधि व जलें येवोत. हे यज्ञपालका सोमा, उत्तमवाक्योच्चारणांत व नमस्कारवचनांत आम्ही तुझें स्थापन करतों म्हणजे तुझी स्तुति करतों व तुला नमस्कार करतों. हें हवि तुला सुहुत असो॥ २५॥

विनियोग—'देवीरापः' या मंत्रभागानें उपस्थान करावे.

देवीरापऽएष वो गर्भस्तꣳ सुप्रीतꣳ सुभृतं बिभृत। देव सोमैष ते लोकस्तस्मिञ्छं च वक्ष्व परि च वक्ष्व॥ २६॥

अर्थ—हे प्रकाशक जलांनो, हा सोम तुमच्या गर्भस्थानीं आहे व सुप्रसन्न व सुपुष्ट अशा त्याचे धारण करा. हे प्रकाशमान सोमा, या जललोकांत राहून तूं आम्हांला सुख दे व आमच्या पीडा दूर कर॥ २६॥

विनियोग—'अवभृथ' हा मंत्र म्हणून जलकुंभ पाण्यांत बुडवावा. स्नानानंतर आहवनीयांत समिधेचा होम करावा. ज्या यज्ञांत पालथीं करून यज्ञपात्रें पाण्यानें भरलीं जातात त्या यज्ञाला अवभृथ म्हणतात.

अवभृथ निचुम्पुण निचेरुरसि निचुम्पुणꣳ। अवदेवैर्देवकृतमेनोऽयासिषमव मर्त्यैर्मर्त्यकृतं पुरुराव्णो देव रिषस्पाहि। देवानाꣳ सुमिदसि॥२७॥

अर्थ—हे अवभृथसंज्ञक यज्ञा, तूं अतिशय गतिमान् आहेस. तथापि आतां अत्यंत मन्द गमन कर. कारण कीं, आमच्या इंद्रियांनीं हविःस्वामी देवांविषयीं जें पाप केलें तें मीं या पाण्यांत टाकलें. तसेंच आमच्या ऋत्विजांनीं यज्ञ पहाण्याकरितां आलेल्या लोकांचा अपमान करून जें पाप केलें मीं तें या पाण्यांत टाकलें. हे प्रकाशक यज्ञा,

विरुद्ध फल देणाऱ्या वधापासून आमचें रक्षण कर. म्हणजे तुझ्या प्रसादानें आम्हाला विरुद्ध फल न मिळो. हे समिधे, तूं देवांचें इन्धन आहेस ॥ २७ ॥

विनियोग—अनुवन्ध्या गर्भिणी असेल तर 'एजतु' इत्यादि मंत्रभागानें गर्भाचें अभिमंत्रण करावें.

एजतु दशमास्यो गर्भो जरायुणा सह । यथायं वायुरेजति यथा समुद्रऽएजति । एवायं दशमास्योऽअस्त्रञ्जरायुणा सह ॥ २८ ॥

अर्थ—गर्भ दहा महिन्यांचा झाला असावा त्याप्रमाणें गर्भवेष्टनासह चलित होवो. वायु व समुद्र कंपित होतो त्याप्रमाणें हा गर्भ दहा महिन्यांच्या गर्भाप्रमाणें सर्वावयवांनीं युक्त होऊन गर्भवेष्टनासह कंपित होवो ॥ २८ ॥

विनियोग—वशावदानांचा होम करून 'यस्मै ते' या मंत्रभागानें गर्भरक्ताचा होम करावा.

यस्यै ते यज्ञियो गर्भो यस्यै योनिर्हिरण्ययी । अङ्गान्यहुता यस्य तं मात्रा समंजीगमꣳ स्वाहा ॥ २९ ॥

अर्थ—हे वशे, ज्या तुझा गर्भ यज्ञार्ह आहे व योनि रत्नमय आहे त्या तुझा व गर्भाचा मी संगम करतों व अखण्डित अवयवांचा गर्भ मी त्याच्या आईशीं एकत्र करतों. हें हवि सुहुत असो ॥ २९ ॥

विनियोग—स्विष्टकृत् होमानंतर प्रतिप्रस्थात्यानें 'पुरुदस्मे' या मंत्रभागानें सर्व गर्भरसाचा होम करावा.

पुरुदस्मो विषुरूपऽइन्दुरन्तर्महिमानञ्जधीरः । एकपदीं द्विपदीं त्रिपदीं चतुष्पदीमष्टापदीं भुवनानु प्रथन्ताꣳ स्वाहा ॥ ३० ॥

अर्थ—सोमासारखा पातळ गर्भरस मोठेपणाला व्यक्त करो. तो गर्भरस बहुदानयुक्त, बहुरूपी, पोटांत असणारा व बुद्धिमान् आहे. अशा माहात्म्यानें युक्त गर्भाच्या आईला भुवनांतील सर्व प्राणी प्रसिद्ध करोत. ती गर्भमाता वशा वासारूपाने एक पायाची, वपा व अंगांनीं दोन पायांची, उपयट् होमांनीं तीन पायांची, व स्वतः चार पायांची, गर्भाचे चार व तिचे चार मिळून आठ पायांची अशी आहे. हें हवि सुहुत असो ॥ ३० ॥

विनियोग—शामित्र अग्नीमध्येंच 'मरुतो यस्य' या मंत्रानें उष्णीषवेष्टित गर्भाचा होम करावा.

मरुतो यस्य हि क्षये पाथा दिवो विमहसः। स सुगोपातमो जनः॥ ३१॥

अर्थ—हे द्युलोकाची पूजा करणाऱ्या देवांनो, ज्या यजमानांच्या यज्ञशाळेंत तुम्ही सोमपान करतां तो निश्चयेंकरून तुमच्याकडून अत्यंत सुरक्षित होतो॥ ३१॥

विनियोग—शामित्रांत ठेवलेला गर्भ निखाऱ्यांनीं झाकावा.

मही द्यौः पृथिवी च नऽइमं यज्ञं मिमिक्षताम्। पिपृतां नो भरीमभिः॥ ३२॥

अर्थ—महान् अशा द्युलोक व पृथ्वीलोकांनीं आमचा यज्ञ आपल्या भागांनीं पूर्ण करावा व त्यांनीं आमचें घर हिरण्यपशुधान्यादिरूपी आपल्या भागांनीं पूर्ण करावें॥ ३२॥

विनियोग—'आतिष्ठ' व 'युक्ष्वादि' या दोघांपैकीं कोणताहि एक मंत्र म्हणून षोडशिग्रह ग्रहण करावें.

आतिष्ठ वृत्रहन्रथं युक्ता ते ब्रह्मणा हरी। अर्वाचीनꣳ सु ते मनो ग्रावा कृणोतु वग्नुना। उपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा षोडशिनऽएष ते योनिरिन्द्राय त्वा षोडशिने॥ ३३॥

अर्थ—हे इंद्रा, तुझे हरितवर्णाचे घोडे मंत्रानें रथाला जोडले गेले. तूं रथावर आरोहण कर व तूं मकंडनाचा दगड चांगला शब्द करून तुझें मन आमच्या यज्ञाकडे चांगल्या रीतीनें ओढून ने व हे सोमा, षोडशस्तोत्रविशिष्ट इंद्राकरितां तुझें मीं उपयामपात्रांत ग्रहण केलें आहे. हे ग्रहा, हें तुझें स्थान आहे. त्यावर षोडशस्तोत्रविशिष्ट इंद्राकरितां तुझें मी स्थापन करतों॥ ३३॥

युक्ष्वा हि केशिना हरी वृषणा कक्ष्यप्रा। अथा नऽइन्द्र सोमपा गिरामुपश्रुतिं चर। उपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा षोडशिनऽएष ते योनिरिन्द्राय त्वा षोडशिने॥ ३४॥

अर्थ—हे इंद्रा, हरितवर्णाचे, लांब केसाचे, वीर्यसिंचन करणारे, अश्वबन्धनरज्जूला भरून टाकणारे म्हणजे स्थूल अवयवांचे तुझे घोडे जरूर रथाला जोड. हे

इंद्रा, सोमपान करून ऋग्यजुःसामरूपी आमचें वाक्य श्रवण कर व आमचे घरीं ये. हे ग्रहा, षोडशीस्तोत्रविशिष्ट अशा इंद्राकरितां उपयामपात्रांत तुझें ग्रहण केलें आहे. हे ग्रहा, हें तुझें स्थान आहे. यावर षोडशस्तोत्रविशिष्ट इंद्राकरितां तुझें मी स्थापन करतों ॥३४॥

विनियोग--षोडशिग्रहाचा तिसरा वैकल्पिक मंत्र

इन्द्रमिद्धरी वहतो प्रतिधृष्टशवसम्। ऋषीणां च स्तुतीरुप यज्ञं च मानुषाणाम्। उपयामगृहीतो सीन्द्राय त्वा षोडशिनऽएष ते योनिरिन्द्राय त्वा षोडशिने ॥ ३५ ॥

अर्थ--हरितवर्णाचे घोडे इंद्रालाच ऋषींच्या व वसिष्ठादि मुनींच्या स्तुतिसमीप नेतात तसेंच त्याला मनुष्ययज्ञाचे समीपही नेतात. त्या इंद्राचे बलाचा कोणाला पराजय करतां येत नाहीं. हे ग्रहा, षोडशिस्तोत्रविशिष्ट अशा इंद्राकरितां उपयामपात्रांत तुझें ग्रहण केलें आहे. हे ग्रहा, हें तुझें स्थान आहे. यावर षोडशस्तोत्रविशिष्ट इंद्राकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ३५ ॥

विनियोग—' यस्मान्न जातः ' या मंत्रानें षोडशिग्रहाचें उपस्थान करावे.

यस्मान्न जातऽपरोऽअन्योऽअस्ति यऽआविवेश भुवनानि विश्वा। प्रजापतिः प्रजया सꣳरराणस्त्रीणि ज्योतींꣳषि सचते स षोडशी ॥ ३६॥

अर्थ—(षोडशीग्रहाची परब्रह्मरूपानें स्तुति करतात.) ज्याहून दुसरा कोणी मोठा जन्मला नाहीं व सर्व भुवनांत ज्यानें प्रवेश केला आहे. तो प्रजारूपाने रममाण होणारा व षोडशकलात्मक लिङ्गशरीरोपाधींनीं विशिष्ट प्रजापति अग्नि, वायु, सूर्यरूपी तेजांचें सेवन करतो ॥ ३६ ॥

विनियोग—' इन्द्रश्च सम्राट् ' या मंत्रानें षोडशिग्रहाचें भक्षण करावे.

इन्द्रश्च सम्राड् वरुणश्च राजा तौ ते भक्षं चक्रतुरग्रऽएतम्। तयोरहमनु भक्षं भक्षयामि वाग्देवी जुषाणा सोमस्य तृप्यतु सह प्राणेन स्वाहा ॥३७॥

अर्थ—हे षोडशिग्रहा, वाजपेययाजी इंद्र व राजसूययाजी वरुण हे दोघे प्रथम तुझ्या या सोमाचें भक्षण करते झाले. त्यांच्यानंतर मी हा सोमभक्षण करतों. माझ्या भक्षणाचें सेवन करणारी सरस्वती प्राणदेवतेसह सोमानें संतुष्ट होवो. हें हवि सुहुत असो ॥ ३७ ॥

विनियोग— पृष्ठ्यसंज्ञक षडहयज्ञाचें अनुष्ठान सहा दिवस चालतें. त्यांपैकीं पहिले तीन दिवशीं 'अग्ने पवस्व' वगैरे मंत्रांनीं अतिग्राह्य ग्रहांचें ग्रहण करावें व नंतर 'अग्ने वर्चस्विन्' या मंत्रांनीं त्या त्या ग्रहांच्या शेषाचें भक्षण करावें.

अग्ने पवस्व स्वपाऽअस्मे वर्चः सुवीर्यम् । दधद्रयिं मयि पोषम् । उपयामगृहीतोऽस्यग्नये त्वा वर्चसऽएष ते योनिरग्नये त्वा वर्चसे । अग्नेर्वर्चस्विन्वर्चस्वाँस्त्वं देवेष्वसि वर्चस्वानहं मनुष्येषु भूयासम् ॥ ३८ ॥

अर्थ—हे शोभनकर्मविशिष्ट अग्ने, तूं चांगले व वीर्यवत् असें ब्रह्मवर्चस आम्हांला दे. यजमान अशा माझ्या ठायीं द्रव्य स्थापन करून माझ्या पुत्रादिकांची वृद्धि कर. हे सोमा, उपयामपात्रांत तुझें ग्रहण केले आहे. हे ग्रहा, तेजस्वि अग्नीकरितां तुझें मी ग्रहण करतों. हे ग्रहा, हें तुझे स्थान आहे, त्यावर तुझे मी स्थापन करतों. हे विशिष्टतेजोयुक्त अग्ने, तूं देवांत अत्यंत दीप्तिमान् आहेस म्हणून तुझ्या कृपेनें मीहि मनुष्यांमध्यें ब्रह्मवर्चस्वी होईन ॥ ३८ ॥

उत्तिष्ठन्नोजसा सह पीत्वी शिप्रेऽअवेपयः । सोममिन्द्र चमू सुतम् । उपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वौजसऽएष ते योनिरिन्द्राय त्वौजसे । इन्द्रौजिष्ठौजिष्ठस्त्वं देवेष्वस्योजिष्ठोऽहं मनुष्येषु भूयासम् ॥ ३९ ॥

अर्थ—हे इंद्रा, मोठ्या उत्साहानें उठून अधिषव चर्मावर कांडलेला सोम पिऊन आनंदानें तूं आपली हनवटी हालविलीस, (मिटक्या मारल्यास). हे ग्रहा, बलवान् इंद्राकरितां उपयामपात्रांत मीं तुझें ग्रहण केलें आहे. हे ग्रहा, हें तुझें स्थान आहे. यावर बलवान् इंद्राकरितां तुझें मी स्थापन करतो. हे अत्यंत बलवान् इंद्रा, ज्याप्रमाणें तूं देवांत अत्यंत बलवान् आहेस त्याप्रमाणें मी मनुष्यांत बलवान् होईन ॥ ३९ ॥

अदृश्रमस्य केतवो वि रश्मयो जनाँऽअनु । भ्राजन्तोऽअग्नयो यथा । उपयामगृहीतोऽसि सूर्याय त्वा भ्राजायैष ते योनिः सूर्यायत्वा भ्राजाय । सूर्य भ्राजिष्ठ भ्राजिष्ठस्त्वं देवेष्वसि भ्राजिष्ठोऽहं मनुष्येषु भूयासम् ॥४०॥

अर्थ—प्रज्वलित अग्नींप्रमाणें सर्व पदार्थांचें ज्ञान करून देणारे या सूर्याचे किरण सर्व जनांत व्याप्त होऊन राहिलेले दिसतात. हे ग्रहा, प्रकाशमान सूर्याकरितां उपयामपात्रांत तुझें ग्रहण केलें आहे. हे ग्रहा, हे तुझें स्थान आहे. त्यावर प्रकाशमान सूर्याकरितां तुझें मी स्थापन करतों. हे अत्यंत दीप्तिमान् सूर्या, ज्याप्रमाणें तूं देवांत अत्यंत दीप्तिमान् आहेस त्याप्रमाणें मी मनुष्यांत होईन ॥ ४० ॥

विनियोग—' उदुत्यम् ' या मंत्रानें अतिग्राह्य ग्रहाचें ग्रहण करावें.

उदु त्यं जातवेदसं देवं वहन्ति केतवः। दृशे विश्वाय सूर्यम्। उपयामगृहीतोऽसि सूर्याय त्वा भ्राजायैष ते योनिः सूर्याय त्वा भ्राजाय ॥ ४१ ॥

अर्थ—किरणें प्रसिद्ध अशा ज्ञानी सूर्यदेवाला विश्वाच्या अवलोकनाकरितां धारण करतात. हे ग्रहा, 'दीप्तिमान् सूर्याकरितां उपयामपात्रांत मीं तुझें ग्रहण केलें आहे. हे ग्रहा, हें तुझें स्थान आहे. त्यावर दीप्तिमान् सूर्याकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ४१ ॥

विनियोग—अहीन त्रिसुत्यसंज्ञक यज्ञांत हजार गाई दक्षिणा आहे. त्यांत हजाराव्या लाल गाईला हविर्धान व अग्नीध्रांच्या मध्यभागीं उभी करून तिच्याकडून द्रोणकलशाचा वास घेववावा.

आजिघ्र कलशं मह्या त्वा विशन्त्विन्दवः। पुनरूर्जा निवर्तस्व सा नः सहस्रं धुक्ष्वोरुधारा पयस्वती पुनर्मा विशताद्रयिः ॥ ४२ ॥

अर्थ—हे धेनो, तूं द्रोणकलशाचा सर्व वाजूंनीं वास घे. हे धेनो, द्रोणकलशांतले सोम तुझ्यांत प्रविष्ट होवोत व तुझ्या दुग्धरूपी रसासह तूं आमचेकडे परत ये. अशा रीतीनें स्तुति केलेली तूं आम्हाला सहस्र धेनु दे. तसेंच पुष्कळ दुग्धयुक्त धेनु व द्रव्यही मजकडे पुनः येवो ॥ ४२ ॥

विनियोग—यजमानानें गाईच्या उजव्या कानांत 'इडे रन्ते' या मंत्राचा जप करावा.

इडे रन्ते हव्ये काम्ये चन्द्रे ज्योतेऽदिति सरस्वति महि विश्रुति। एता तेऽअघ्न्ये नामानि देवेभ्यो मा सुकृतं ब्रूतात् ॥ ४३ ॥

अर्थ—स्तुत्य, आनन्द देणारी, सर्वांकडून बोलावली जाणारी, आवडती, आनन्द देणारी, प्रकाशमान, अखण्डित, पुष्कळ दुग्धानें युक्त, मोठी, कीर्तिसंपन्न व अवध्य अशा हे धेनो, वरील नांवांनीं तुझी मी स्तुति करतों. हा यजमान पुण्यकर्में करणार आहे असें देवांना जाऊन सांग ॥ ४३ ॥

विनियोग—' विन इन्द्र ' या मंत्रानें महाव्रतीय ऐन्द्रग्रहाचें ग्रहण करावें.

वि नऽइन्द्र मृधो जहि नीचा यच्छ पृतन्यतः। योऽअस्माँ२ऽअभि-

दासत्यधरं गमया तमः÷ । उपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा विमृधऽएष ते योनिरिन्द्राय त्वा विमृधे ॥ ४४ ॥

अर्थ—हे इन्द्रा, आमच्या संग्रामांचा नाश कर व आमच्या शत्रूंना युद्धापासून परावृत्त कर. तसेंच जो आमचा क्षय करतो अशा शत्रूला अधोभागीं नरकांत पाठव. हे ग्रहा, विशिष्ट तऱ्हेनें संग्राम करणाऱ्या इंद्राकरितां उपयामपात्रांत तुझें ग्रहण केलें आहे. हे ग्रहा, हें तुझें स्थान आहे. त्यावर विशिष्ट तऱ्हेनें संग्राम करणाऱ्या इंद्राकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ४४ ॥

वाचस्पतिं विश्वकर्माणमूतये मनोजुवं वाजेऽअद्याहुवेम । स नो विश्वानि हवनानि जोषद्विश्वशम्भूरवसे साधुकर्मा । उपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा विश्वकर्मणऽएष ते योनिरिन्द्राय त्वा विश्वकर्मणे ॥ ४५ ॥

अर्थ—आज मी महाव्रतीय अन्न खाऊन रक्षण करण्याकरितां इंद्राला बोलावतों. तो इंद्र वाणीचा अधिपति, जगदुत्पत्त्यादि सर्व कर्मे करणारा व मनाप्रमाणें वेगवान् आहे. त्या जगत्कल्याणकारी उत्तम कर्मे करणाऱ्या इंद्राने आमचीं सर्व बोलावणीं अन्नवृद्धीकरितां प्रीतीनें स्वीकारावीं. हे ग्रहा, सर्वकर्मकर्त्या इंद्राकरितां उपयामपात्रांत तुझें मीं ग्रहण केले आहे. हे ग्रहा, हे तुझें स्थान आहे त्यावर सर्वकर्मकर्त्या इंद्राकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ४५ ॥

विश्वकर्मन्हविषा वर्धनेन त्रातारमिन्द्रमकृणोरवध्यम् । तस्मै विशः समनमन्त पूर्वीरयमुग्रो विहव्यो यथासत् । उपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा विश्वकर्मणऽएष ते योनिरिन्द्राय त्वा विश्वकर्मणे ॥ ४६ ॥

अर्थ—हे विश्वकर्म्या, वृद्धि करणाऱ्या हविर्द्रव्यानें तूं जगाच्या रक्षण करणाऱ्या इंद्राला अवध्य केलेंस. त्या इंद्राला पूर्वीच्या प्रजांनीं व वसिष्ठादिकांनीं नमन केलें. कारण कीं, हा इंद्र उग्र असून विविधकार्यात बोलाविला जातो. हे ग्रहा, सर्वकर्मकर्त्या इंद्राकरितां उपयामपात्रांत तुझें ग्रहण केलें आहे. हे ग्रहा, हें तुझें स्थान आहे. त्यावर सर्वकर्मकर्त्या इंद्राकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ४६ ॥

विनियोग—'अग्नये त्वा' इत्यादि मंत्रांनीं अदाभ्यग्रहाचें ग्रहण करावें.

उपयामगृहीतोऽस्यग्नये त्वा गायत्रछन्दसं गृह्णामीन्द्राय त्वा त्रिष्टुप्छन्दसं गृह्णामि विश्वेभ्यस्त्वा देवेभ्यो जगच्छन्दसं गृह्णाम्यनुष्टुभेभिगरꣳ ॥ ४७ ॥

अर्थ—हे सोमा, उपयामपात्रांत तुझें ग्रहण केलें आहे. हे ग्रहा, गायत्रछन्दोविशिष्ट अशा तुझें मी अग्नीच्या संतोषाकरितां ग्रहण करतों. त्रिष्टुप् छन्दोविशिष्ट अशा तुझें इन्द्राकरितां व जगतीच्छन्दोविशिष्ट अशा तुझें विश्वेदेवांकरितां मी ग्रहण करतों. हे ग्रहा, अनुष्टुप्छन्द तुझी स्तुति आहे ॥ ४७ ॥

विनियोग—' व्रेशीनां त्वा ' या मंत्रभागानें अदाभ्यग्रहांतील पाणी हालवावें.

व्रेशींनां त्वा पत्मन्नाधूनोमि कुकुननांनां त्वा पत्मन्नाधूनोमि भन्दनांनां त्वा पत्मन्नाधूनोमि मदिन्तमानां त्वा पत्मन्नाधूनोमि मधुन्तमानां त्वा पत्मन्नाधूनोमि शुक्रं त्वा शुक्रऽआधूनोम्यह्नो रूपे सूर्यस्य रश्मिषु ॥ ४८ ॥

अर्थ—हे सोमा, मेघांच्या उदरांत असलेल्या पाण्यांच्या वृष्टीकरितां मी तुला हालवितों. तें मेघोदरस्थ जल शब्द करीत खालीं येणारे, कल्याणकारक, अत्यंत मदोत्पादक, मधुररसविशिष्ट आहे. आणि हे सोमा, शुद्ध अशा तुला निग्राभ्यासंज्ञक जलांत व सूर्यकिरणांत कंपित करतों ॥ ४८ ॥

ककुभꣳ रूपं वृषभस्य रोचते बृहच्छुक्रꣳ शुक्रस्य पुरोगाꣳ सोमꣳ सोमस्य पुरोगाꣳ । यत्ते सोमादाभ्यं नाम जागृवि तस्मै त्वा गृह्णामि तस्मै ते सोम सोमाय स्वाहा ॥ ४९ ॥

अर्थ—हे सोमा, श्रेष्ठ अशा तुझें मोठें आदित्यात्मक रूप प्रकाश पावतें. मोठा व शुद्ध असा आदित्य शुद्ध अशा तुझ्या पुढें जाण्यास योग्य आहे. हे सोमा, तुझें नांव अनुपहिंसित (कोणाकडून न तोडला जाणारे) व जागरणशील आहे अशा तुझें मी ग्रहण करतों. हे सोमा, पूर्वोक्तगुणविशिष्ट अशा तुला हें हवि सुहुत असो. ॥४९॥

विनियोग—उखळांतील सोमभाग ' उशिक्त्वं ' या मंत्रभागानें पूर्वोक्त सोमांत घालावें.

उशिक् त्वं देव सोमाग्नेꣳ प्रियं पाथोऽपीहि वशी त्वं देव सोमेन्द्रस्य प्रियं पाथोऽपीह्यस्मत्सखा त्वं देव सोम विश्वेषां देवानां प्रियं पाथोऽपीहि ॥ ५० ॥

अर्थ—हे प्रकाशमान सोमा, आम्हांस प्रिय असा तूं अग्नीचें प्रिय अन्न भक्षण कर. तसेंच हे प्रिय सोमा, इंद्राच्या आवडत्या अन्नास प्राप्त हो. हे सोमा, तूं आमचा मित्र आहेस. सर्व देवांना प्रिय असें अन्न मिळव ॥ ५० ॥

विनियोग—आतांच्या गार्हपत्यांत ' इह रतिः ' या मंत्रभागानें घृताचा होम करावा.

इह रतिरिह रमध्वमिह धृतिरिह स्वधृतिꣳ स्वाहा । उपसृजन्धरुणं मात्रे धरुणो मातरं धयन् । रायस्पोषमस्मासु दीधरत् स्वाहा ॥ ५१ ॥

अर्थ—हे गाईनो, तुम्ही या यजमानांनच रममाण व्हा. यांनच तुम्हाला संतोष होवो. हें हवि सुहुत असो. धारण करणारा अग्नि आमच्या धनादिकांची वृद्धि करो. तो अग्नि पृथ्वीचा धारण करणारा व पृथ्वीवरील हविर्द्रव्यें भक्षण करणारा आहे त्याला हें हवि सुहुत असो ॥ ५१ ॥

विनियोग—सर्व ऋत्विज् वगैरेनीं सत्रर्धि सामाचें गायन करावें.

सत्रस्यऽऋद्धिरस्यगन्म ज्योतिरमृताऽअभूम । दिवं पृथिव्याऽअध्यारुहामाविदाम देवान्त्स्वर्ज्योतिः ॥ ५२ ॥

अर्थ—हे सोमा, तूं सत्राची समृद्धि आहेस म्हणून आम्ही यजमान आदित्यरूपी तेजाला प्राप्त होऊन अमर झालों. आम्ही पृथ्वीवरून द्युलोकांत गेलों व तेथें देवांना पहातें झालों व ज्योतिर्मयस्वर्गाला प्राप्त झालों. ॥ ५२ ॥

विनियोग—सर्वांनीं पूर्वेकडे तोंड करून बाहेर पडावें व ' भूर्भुवः ' हा मंत्र म्हणून मौन सोडावें.

युवं तमिन्द्रापर्वता पुरोयुधा यो नः पृतन्यादप तं तमिद्धतं वज्रेण तं तमिद्धतम् । दूरे चत्ताय छन्त्सद्गहनं यदिनक्षत् । अस्माकꣳ शत्रून् परि शूर विश्वतो दर्मा दर्षीष्ट विश्वतः । भूर्भुवꣳ स्वः सुप्रजाः प्रजाभिः स्याम सुवीरा वीरैः सुपोषाः पोषैः ॥ ५३ ॥

अर्थ—सन्मुख उभे राहून शत्रूंशीं युद्ध करणाऱ्या इंद्रपर्वतांनो, तुम्ही आमच्याशीं युद्ध करणाऱ्या सर्व शत्रूंचा नाश करा व त्या त्या शत्रूचा वज्रानें नाश कराच. हे शूर इन्द्रा, रानांत दूर गेलेल्या शत्रूला मारण्याची तुझी इच्छा असल्यास तुझें वज्र तेथेंही त्याला प्राप्त करील. तदनंतर विदारण करणारे वज्र सर्वत्र असलेल्या

आमच्या शत्रूंचा नाश करो. हे अग्निवायुसूर्यांनों, आम्ही प्रजा, पुत्र व धनांनीं वृद्धिंगत होऊं ॥ ५३ ॥

विनियोग--यानंतर चौतीस आहुतींचा होम सांगितला आहे.

परमेष्ठ्यभिधीतꣳ प्रजापतिर्वाचि व्याहृतायामन्धोऽ अच्छेतꣳ । सविता सन्यां विश्वकर्मा दीक्षायां पूषा सोमक्रयण्याम् ॥ ५४ ॥

अर्थ—मनानें ध्यान केल्यावर सोम प्राप्त न झाल्यास परिमेष्ठिने स्वाहा ही आहुति द्यावी. सोमयाग करीन असे शब्द उच्चारल्यावर प्रायश्चित्ताचा प्रसंग आल्यास 'प्रजापतये स्वाहा' ही आहुति द्यावी. सोमाजवळ गेल्यावर प्रायश्चित्तप्रसंग आल्यास 'अन्धसे स्वाहा' ही आहुति द्यावी. सोमविभागाचे वेळीं प्रायश्चित्त प्रसंग आल्यास 'सवित्रे स्वाहा' असा होम करावा. दीक्षा झाल्यावर प्रायश्चित्त प्रसंग आल्यास 'विश्वकर्मणे स्वाहा' या आहुतीचा होम करावा. सोमक्रयणी गाय आणल्यानंतर प्रायश्चित्तप्रसंग आल्यास 'पूष्णे स्वाहा' या आहुतीचा होम करावा. कारण त्या त्या वेळीं त्या त्या संज्ञा प्राप्त होतात ॥ ५४ ॥

इन्द्रश्च मरुतश्च क्रयायोपोत्थितोऽसुरꣳ पण्यमानो मित्रꣳ क्रीता विष्णुꣳ शिपिविष्टऽऊरावासन्नो विष्णुर्नरन्धिषꣳ ॥ ५५ ॥

अर्थ—सोम पुढें ठेवल्यावर 'इन्द्राय मरुद्भ्यश्च स्वाहा', सोम विकत घेत असतां 'असुराय स्वाहा', सोम विकत घेतल्यावर 'मित्राय स्वाहा', सोम मांडीवर घेतल्यावर 'विष्णवे शिपिविष्टाय स्वाहा', सोम गाडींत घालून नेत असतां 'विष्णवे नरन्धिषाय स्वाहा' ही प्रायश्चित्ताहुति आहे. कारण त्या त्या वेळीं त्यास त्या त्या संज्ञा प्राप्त होतात ॥ ५५ ॥

प्रोह्यमाणꣳ सोमऽआगतो वरुणऽआसन्यामासन्नोऽग्निराग्नीध्रऽइन्द्रो हविर्धानेऽथर्वोपावह्रियमाणः ॥ ५६ ॥

अर्थ--सोम गाडींतून खालीं काढल्यावर 'सोमाय स्वाहा,' सोम घडवंचीवर ठेवल्यावर 'वरुणाय स्वाहा,' सोम आग्नीध्र स्थानांत आल्यानंतर 'अग्नये स्वाहा,' सोम हविर्धान मण्डपांत आल्यानंतर 'इंद्राय स्वाहा' व सोम कांडण्याकरितां नेत असतां 'अथर्वणे स्वाहा' ही प्रायश्चित्ताहुति आहे. कारण त्या त्या वेळीं त्यास त्या त्या संज्ञा प्राप्त होतात ॥ ५६ ॥

विश्वे देवाऽअद्भ्युषु श्रुतो विष्णुराप्रीतपाऽआप्याय्यमानो यमऽसूयमानो विष्णु÷ सम्भ्रियमाणो वायुऽपूयमानꣳ शुक्रऽपूतऽशुक्रऽक्षीरश्रीर्मन्थी संक्तुश्रीऽ ॥ ५७ ॥

अर्थ—सोम त्याच्या तुकड्यांवर ठेवल्यानंतर 'विश्वेभ्यो देवेभ्यः स्वाहा,' सोम वृद्धिंगत झाल्यावर 'विष्णवे आप्रीतपाय स्वाहा,' सोमाचें क्रण्डन होत असतां 'यमाय स्वाहा', त्याची वृद्धि होत असतां 'विष्णवे स्वाहा', दशापवित्रानें तो गाळीत असतां 'वायवे स्वाहा', तो गाळल्यानंतर 'शुक्राय स्वाहा,' त्यांत दूध मिसळल्यानंतर 'शुक्राय स्वाहा,' त्यांत सातू मिसळल्यानंतर 'मंथिने स्वाहा' ही प्रायश्चित्ताहुति आहे. कारण त्या त्या वेळीं त्यास त्या त्या संज्ञा प्राप्त होतात ॥ ५७ ॥

विश्वे देवाश्चमसेषून्नीतो सुहोमायोद्यतो रुद्रो हूयमानो वातो भ्यावृत्तो नृचक्षाऽप्रतिख्यातो भक्षो भक्ष्यमाणꣳ पितरो नाराशꣳसाऽ ॥ ५८ ॥

अर्थ—सोम चवसांत घेतल्यावर 'विश्वेभ्यो देवेभ्यः स्वाहा,' होमाची तयारी झाल्यावर 'असवे स्वाहा,' होमाचे वेळीं 'रुद्राय स्वाहा,' सदोमण्डपांत भक्षणाकरितां आणल्यावर 'वाताय स्वाहा,' भक्षणाची आज्ञा विचारल्यावर 'नृचक्षसे स्वाहा,' त्याचें पान करीत असतां 'भक्षाय स्वाहा,' भक्षण करून खालीं ठेवल्यावर 'पितृभ्यो नाराशंसेभ्यः स्वाहा' ही प्रायश्चित्ताहुति द्यावी. कारण त्या त्या वेळीं त्यास त्या त्या संज्ञा प्राप्त होतात ॥ ५८ ॥

सन्नऽसिन्धुरवभृथायोद्यतꣳ समुद्रोऽभ्यवहियमाणꣳ सलिलऽप्रप्लुतो ययोरोजसा स्कभिता रजाꣳसि वीर्येभिर्विरितमा शविष्ठा । या पत्येतेऽअप्रतीता सहोभिर्विष्णूऽअगन्वरुणा पूर्वहुतौ ॥ ५९ ॥

अर्थ—अवभृथाची तयारी झाल्यावर 'सिन्धवे स्वाहा,' अवभृथाकरितां जलाकडे नेत असतां 'समुद्राय स्वाहा,' पाण्यांत बुडविल्यावर 'सलिलाय स्वाहा' ही प्रायश्चित्ताहुति द्यावी. कारण त्या त्या वेळीं त्यास त्या त्या संज्ञा प्राप्त होतात. ह्या आहुतींनीं सर्व देवांशीं यज्ञ जोडला जातो. ('ययोरोजसा' या मंत्रभागानें खालीं सांडलेल्या सोमावर पाणी शिंपडावें) ज्यांच्या बलानें हे सर्व लोक आडवून धरले जातात त्या विष्णु व वरुणाकडे हें गळालेलें हविर्द्रव्य प्रधान हवीचा होम होत असतां, गेलें. जे

विष्णु वरुण जगांचे स्वामी, बलानें अत्यंत वीर्यसंपन्न, बलांत ज्यांची कोणी बरोबरी करणार नाहीं असे व अविज्ञात असे आहेत ५९ ॥

विनियोग—सांडलेल्या सोमाला ' देवान् दिवम् ' या मंत्राभागानें स्पर्श करावा.

देवान् दिवमगन्यज्ञस्ततो मा द्रविणमष्टु मनुष्यानन्तरिक्षमगन्यज्ञस्ततो मा द्रविणमष्टु पितॄन् पृथिवीमगन्यज्ञस्ततो मा द्रविणमष्टु यं कं च लोकमगन्यज्ञस्ततो मे भद्रमभूत् ॥ ६० ॥

अर्थ—*हा यज्ञ वाय्वादि देवांना प्राप्त होऊन द्युलोकाप्रत गेला. त्या द्युलोकस्थ यज्ञाचें फल मला मिळो. (हा वर जाण्याचा क्रम सांगितला. आतां खालीं उतरण्याचा क्रम सांगतात.) यज्ञ द्युलोकांतून खालीं येतांना अन्तरिक्षलोकाला गेला तेथें असलेलें यज्ञफल मला मिळो. (दक्षिणायनांतलें जाणें येणें सांगतात) हा यज्ञ धूमादिमार्गानें पितृलोकाला जाऊन खालीं पृथ्वीवर आला. पितृलोकांतील यज्ञफल मला मिळो–विशेष काय सांगावें. ज्या ज्या लोकांत हा यज्ञ गेला तेथील फल मला मिळो ॥ ६० ॥*

चतुस्त्रिꣳ शत्तन्तवो ये वितन्निरे यऽइमं यज्ञꣳस्वधया ददन्ते । तेषां छिन्नꣳ सम्वेतद्दधामि स्वाहा घर्मोऽअप्येतु देवान् ॥ ६१ ॥

अर्थ—*पाप दूर करून यज्ञविस्तार करणारे जे ३४ देव माझ्या यज्ञाचा विस्तार करतात व अन्न धारण करतात. त्या देवांचें जें कमी झालें तें मी पूर्ण करतों. हें हवि सुहुत असो. धर्म महावीर सविता होऊन देवांप्रत गमन करो ॥ ६१ ॥*

विनियोग—' यज्ञस्य दोहः ' हा मंत्र यजमानाकडून म्हणवावा.

यज्ञस्य दोहो विततः पुरुत्रा सोऽअष्टधा दिवमन्वाततान । स यज्ञ धुक्ष्व महि मे प्रजायाꣳ रायस्पोषं विश्वमायुरशीय स्वाहा ॥ ६२ ॥

अर्थ—*ज्याच्या आहुतींचा परिणाम म्हणजे फल पुष्कळ विस्तृत होऊन अष्टदिग्भेदानें द्युलोकाला व्याप्त करतें झालें अशा हे यज्ञा, माझ्या संततीला ऐश्वर्य दे व तुझ्या प्रसादानें माझ्या द्रव्याची व संपूर्ण आयुष्याची वृद्धि होवो ॥ ६२ ॥*

विनियोग—पशु अगर सोमावर कावळा बसला असतां उद्गात्यानें ' आपवस्व ' या मंत्रानें यूपहोम करावा.

आपवस्व हिरण्यवदश्ववत्सोम वीरवत् । वाजं गोमन्तमाभर स्वाहा ॥ ६३ ॥

अर्थ—हे सोमा, तूं सुवर्ण, अश्व व वीर बरोबर घेऊन ये. व अन्न आणि गाई आम्हाला दे. हें हवि सुहुत असो. ॥ ६३ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोध्यपायश्रीधरशास्त्रिकृते**
माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

इति अष्टमोऽध्यायः समाप्तः ।



अथ नवमोऽध्यायः ॥ ९ ॥



विनियोग—चार ते आठ या पांच अध्यायांत अग्निष्टोमसंबंधीं व इतरही प्रासंगिक मंत्र सांगितले. नवव्या अध्यायांत ३४ व्या मंत्रापर्यंत वाजपेयाचे मंत्र आहेत. (' देव सवितः ' या मंत्रानें आज्याचा होम करावा)

देव सवितऽ प्रसुव यज्ञं प्रसुव यज्ञपतिं भगाय । दिव्यो गन्धर्वऽ केतपूऽ केतं नः पुनातु वाचस्पतिर्वाजं नऽ स्वदतु स्वाहा ॥ १ ॥

अर्थ—हे प्रकाशमान सर्वप्रेरक सवित्या, वाजपेययाग या यजमानाकडून ऐश्वर्य-प्राप्तीकरितां करून घे. तुझ्या प्रसादानें आकाशांत असलेला, रश्मीचें धारण करणारा व अन्नपावक सूर्यमण्डलरूपी देव आमचें अन्न शुद्ध करो. तसेंच तुझ्या कृपेनें प्रजापति आमचें हवि भक्षण करो. हें सुहुत असो ॥ १ ॥

विनियोग—प्रातःसवनांत आग्रयणानंतर तीन अतिग्राह्यांचें व षोडशीचें ग्रहण करून प्रत्येक मंत्रानें पांच इंद्रदेवत्य ग्रहांचें ग्रहण करावें.

ध्रुवसदं त्वा नृषदं मनऽ सदमुपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा जुष्टं गृह्णाम्येष ते योनिरिन्द्राय त्वा जुष्टतमम् । अप्सुषदं त्वा घृतसदं व्योमसदमुपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा जुष्टं गृह्णाम्येष ते योनिरिन्द्राय त्वा जुष्टतमम् । पृथिविसदं त्वाऽन्तरिक्षसदं दिविसदं देवसदं नाकसदमुपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा जुष्टं गृह्णाम्येष ते योनिरिन्द्राय त्वा जुष्टतमम् ॥२॥

अर्थ—हे सोमा, स्थिर लोकांत, मनुष्यांत व मनांत राहणाऱ्या व इंद्रप्रिय अशा तुझें मीं उपयामसंज्ञक पात्रांत ग्रहण केलें आहे. हे ग्रहा, हें तुझें स्थान आहे. यावर इंद्रास अत्यंत प्रिय अशा तुझें मी इंद्राकरितां स्थापन करतों. हे सोमा, उदकांत, घृतांत व आकाशांत राहणाऱ्या व इंद्रप्रिय अशा तुझें मीं उपयामसंज्ञक पात्रांत ग्रहण केलें आहे. हे ग्रहा, हें तुझें स्थान आहे यावर इंद्रास अत्यंत प्रिय अशा तुझें मी ग्रहण करतों. हे सोमा, पृथिवीवर, अन्तरिक्षांत, द्युलोकांत, देवांत व स्वर्गांत राहणाऱ्या व इंद्रप्रिय अशा तुझें मीं उपयामपात्रांत ग्रहण केलें आहे. हे ग्रहा, हें तुझें स्थान आहे. यावर इंद्रास अत्यंत प्रिय अशा तुझें मी इंद्राकरितां स्थापन करतों ॥ २ ॥

अपाꣳरसमुद्वयसꣳ सूर्ये सन्तꣳ समाहितम् । अपाꣳ रसस्य यो रसस्तं वो गृह्णाम्युत्तममुपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा जुष्टं गृह्णाम्येष ते योनिरिन्द्राय त्वा जुष्टतमम् ॥ ३ ॥

अर्थ--सूर्यात स्थापन केलेला जलाचा रस जो वायु त्याचें मी ग्रहण करतों. तो वायु अन्नोत्पादक आहे. जलरस वायूचा सारभूत जो उत्तम प्रजापति त्याचेंही मी तुमच्याकरितां ग्रहण करतों. हे सोमा, इंद्रप्रिय अशा तुझें मीं उपयामसंज्ञक पात्रांत ग्रहण केलें आहे. हे ग्रहा, हें तुझें स्थान आहे. यावर इंद्रास अत्यंत प्रिय अशा तुझें मी इंद्राकरितां स्थापन करतों. ॥ ३ ॥

ग्रहाऽऊर्जाहुतयो व्यन्तो विप्राय मतिम् । तेषां विशिप्रियाणां वोऽहमिषमूर्जꣳ समग्रभमुपयामगृहीतो सीन्द्राय त्वा जुष्टं गृह्णाम्येष ते योनिरिन्द्राय त्वा जुष्टतमम् । सम्पृचौ स्थꣳ सं मा भद्रेण पृङ्क्तं विपृचौ स्थो वि मा पाप्मना पृङ्क्तम् ॥ ४ ॥

अर्थ--अन्नरसाचें आव्हान करणाऱ्या व इंद्राची सद्बुद्धि प्राप्त करून देणाऱ्या ग्रहांनो, ज्यांत हनवटीचा व्यापार करावा लागत नाहीं म्हणजे तो चावावा लागत नाहीं. कारण कीं, तो उत्तम रीतीनें कांडलेला आहे, अशा तुमच्यांतील अन्नभूत रसाचें मी ग्रहण करतों. हे सोमा, इंद्रप्रिय अशा तुझें मीं उपयामसंज्ञक पात्रांत ग्रहण केलें आहे. हे ग्रहा, हें तुझें स्थान आहे. यावर इंद्रास अत्यंत प्रिय अशा तुझें मी इंद्राकरितां स्थापन करतों. हे सोमसुराग्रहांनो, तुम्ही एकत्र राहाणारे आहां म्हणून मला कल्याणयुक्त करा (' वितृचौ ' या मंत्रभागानें अध्वर्यु व नेष्टयानें आपले ग्रह (पात्रें) आपल्या जवळ आणावीं). हे ग्रहांनो, तुम्ही वियुक्त आहां म्हणून मला पापापासून वियुक्त करा ॥ ४ ॥

विनियोग--' इन्द्रस्य वज्रः ' या मंत्रभागानें शकटावरून रथ खालीं उतरावा. नंतर रथाचें जोकड धरून तो वेदीवर ठेवावा.

इन्द्रस्य वज्रोऽसि वाजसास्वयायं वाजꣳ सेत् । वाजस्य नु प्रसवे मातरं महीमदितिं नाम वचसा करामहे । यस्यामिदं विश्वं भुवनमाविवेश तस्यां नो देवः सविता धर्म सावीषत् ॥ ५ ॥

अर्थ--हे रथा, तूं इंद्राचें वज्र आहेस व अन्न देणारा आहेस. तुझ्या साहाय्यानें या यजमानाला अन्न मिळो. अन्नाच्या आश्रेतच राहणारे आम्ही ज्या जगन्निर्माण

करणाऱ्या, मोठ्या व अखण्डित अशा पृथिवीला या वेदवाक्यानें अनुकूल करून घेतों व जिच्यांत हें सर्व जग प्रविष्ट झालें त्या पृथिवीवरच राहण्याची प्रकाशमान सवित्यानें आम्हांस प्रेरणा करावी. ॥ ५ ॥

विनियोग—स्नानाकरितां नेत असतां 'अप्स्वन्तः,' व 'देवीरापः' या दोन मंत्रांनीं घोड्यांवर पाणी शिंपावें.

अप्स्वन्तरमृतमप्सु भेषजमपामुत प्रशस्तिष्वश्वा भवत वाजिनः ।
देवीरापो यो वऽऊर्मिः प्रतूर्तिः कुकुन्मान् वाजसास्तेनायं वाजꣳ सेत् ॥ ६ ॥

अर्थ—हे घोड्यांनो, जलांत अमृत व औषध आहे त्यामुळें तुम्ही अन्नवान् व्हा व त्यांतील उत्तम जागीं तुम्ही असा. हे प्रकाशमान जलांनो, तुमची जी वेगवान्, जलौघयुक्त व अन्नदात्री लाट (तरंग) आहे तिच्या योगें भिजलेला हा घोडा यजमानाला अन्न देवो ॥ ६ ॥

विनियोग—'वातो वा' या मंत्रभागानें घोडा उजवे बाजूकडे जुंपावा.

वातो वा मनो वा गन्धर्वाः सप्तविꣳशतिः । तेऽग्रेऽश्वमयुंञ्जँस्तेऽस्मिञ्जवमादधुः ॥ ७ ॥

अर्थ—वायु, मन, सत्तावीस नक्षत्रें हे सर्व पृथ्वीधारक आहेत. त्यांनीं प्रथम रथाला घोडा जुंपला व त्यांनींच त्याला वेग दिला ॥ ७ ॥

विनियोग—'वातारꣳहा' या मंत्रभागानें उत्तरेकडील घोडा जुंपावा.

वातरꣳहा भव वाजिन्युज्यमानऽइन्द्रस्येव दक्षिणः श्रियैधि । शुभ्रन्तु त्वा मरुतो विश्ववेदसऽआ ते त्वष्टा पत्सु जवं दधातु ॥ ८ ॥

अर्थ—हे वेगवान् अश्वा, रथांत जोडला जाणारा तूं वायूप्रमाणें वेगवान् हो. हे उजवेकडील घोड्या, तूं इंद्राच्या घोड्याप्रमाणें सुशोभित हो. हे अश्वा, सर्वज्ञदेव तुला रथाला जोडोत व प्रकाशमान त्वष्टा तुझ्या पायांत वेग उत्पन्न करो ॥ ८ ॥

विनियोग—'जवो यस्ते' या मंत्रभागानें तिसरा घोडा जुंपावा. 'वाजिनः' या मंत्रभागानें बार्हस्पत्य चरु घोड्यांना हुंगवावा.

जवो यस्ते वाजिन्निहितो गुहा यः श्येने परीत्तोऽअचरच्च वाते ।
तेन नो वाजिन् बलवान् बलेन वाजजिच्च भव समने च पारयिष्णुः ।
वाजिनो वाजजितो वाजꣳ सरिष्यन्तो बृहस्पतेर्भागमवजिघ्रत ॥ ९ ॥

अर्थ—हे अश्वा, जो तुझा वेग हृदयांत ठेवलेला आहे व तूंच दिलेला जो वेग श्येन पक्ष्यांत व वायूंत संचार करतो त्या तीन प्रकारच्या वेगरूपी बळानें युक्त होऊन आम्हांला अन्न मिळवून देणारा व संग्रामांत जय मिळवून देणारा हो. अन्न जिंकणाऱ्या व अन्नाकडे जाणाऱ्या घोडयांनो तुम्ही बृहस्पतिभाग जो चरु त्याचें अवघ्राण करा ॥ ९ ॥

विनियोग—' देवस्याहम् ' हा मंत्रभाग म्हणून ब्रह्मयानें रथचक्रावर आरोहण करावें. नंतर पुढील ' देवस्याहम् ' हा मंत्रभाग म्हणून ब्रह्मयानें रथचक्रावरून खालीं उतरावें.

देवस्याहꣳ सवितुꣳ सवे सत्यसवसो बृहस्पतेरुत्तमं नाकꣳ रुहेयम्। देवस्याहꣳ सवितुꣳ सवे सत्यसवसऽइन्द्रस्योत्तमं नाकꣳ रुहेयम्। देवस्याहꣳ सवितुꣳ सवे सत्यप्रसवसो बृहस्पतेरुत्तमं नाकमरुहम्। देवस्याहꣳ सवितुꣳ सवे सत्यप्रसवसऽइन्द्रस्योत्तमं नाकमरुहम् ॥ १० ॥

अर्थ—अनुज्ञा खरी असलेल्या सवितृदेवाच्या आज्ञेनें मी बृहस्पतीसंबंधीं व उत्तम अशा स्वर्गावर आरोहण करतों. (क्षत्रिय यजमानानें यज्ञ केला असल्यास) इंद्रसंबंधीं व उत्तम स्वर्गावर आरोहण करतों असें म्हणावें. अनुज्ञा उत्कृष्ट व खरी असलेल्या सवितृदेवाच्या आज्ञेनें मीं बृहस्पतीसंबंधीं व उत्तम अशा स्वर्गावर आरोहण केलें. (पूर्वीप्रमाणेंच क्षत्रिय यजमानानें यज्ञ केला असल्यास इंद्रसंबंधीं व उत्तम अशा स्वर्गावर आरोहण केलें असें म्हणावें) ॥ १० ॥

विनियोग—वेदीजवळ असलेल्या सतरा नगाऱ्यांपैकीं एक ' बृहस्पते वाजम् ' या मंत्रानें वाजवावा, बाकीचे वाजवितांना मंत्र म्हणूं नये. ' बृहस्पते वाजं ' हा मंत्र ब्राह्मणानें केलेल्या यागाकरितां आहे व ' इन्द्र वाजं ' हा मंत्र क्षत्रियानें केलेल्या यागाकरितां आहे.

बृहस्पते वाजं जय बृहस्पतये वाचं वदत बृहस्पतिं वाजं जापयत। इन्द्र वाजं जयेन्द्राय वाचं वदतेन्द्रं वाजं जापयत ॥ ११ ॥

अर्थ—हे दुन्दुभींनो, तुम्ही बृहस्पतीला जाऊन सांगा कीं, हे बृहस्पते, तूं अन्न जिंकून आण. आणखी हे दुन्दुभींनो, तुम्ही बृहस्पतीकडून अन्नाचा जय करवा. हे दुन्दुभींनो, तुम्ही इन्द्राला जाऊन सांगा कीं, हे इंद्रा, तूं अन्न जिंकून आण व हे दुन्दुभींनो, तुम्ही इंद्राकडून अन्नजय करवा ॥ ११ ॥

विनियोग—समंत्रक वाजविलेला नगारा 'एषा वः' या मंत्रभागानें खालीं उतरावा व बाकीचे अमंत्रकच खालीं उतरावे. दुसरा 'एषा वः' हा मंत्र क्षत्रियानें केलेल्या यागाकरितां आहे.

एषा व॒ सा स॒त्या स॑वाग॑भूयया बृह॒स्पति॑ वाज॒मजी॑जप॒ताजी॑जपत बृह॒स्पति॑ वाज॑ वन॒स्पत॒यो वि मु॑च्यध्वम्। एषा व॒ सा स॒त्या संवाग॑-भूययेन्द्र॑ वाज॒मजी॑ज॒पताजी॑जप॒तेन्द्र॑ वाज॑ वन॒स्पत॒यो वि मु॑च्यध्वम् ॥१२॥

अर्थ—हे दुन्दुभींनो, ज्या वाणीनें तुम्हीं बृहस्पतीकडून अन्नजय करविला ती वाणी फारच खरी ठरली. हे वनस्पतीपासून बनलेल्या दुन्दुभींनो, तुमचें काम संपलें. आतां तुम्ही बन्धनापासून मुक्त व्हा. (क्षत्रिययज्ञांतील मंत्राचा अर्थ) हे दुन्दुभींनो, ज्या वाणीनें तुम्हीं इंद्राकडून अन्नजय करविला ती वाणी फारच खरी ठरली. हे वनस्पतीपासून बनलेल्या दुन्दुभींनो, तुमचें काम संपलें. आतां तुम्ही बंधनापासून मुक्त व्हा ॥ १२ ॥

विनियोग—'देवस्याहम्' हा मंत्र म्हणून यजमानानें जोडलेल्या रथावर आरोहण करावें. 'वाजिनः' हा मंत्रभाग यजमानाकडून म्हणवावा.

देव॒स्याह॒ꣳ स॑वि॒तु॒ः स॑वे स॒त्यप्र॑सवसो बृह॒स्पते॑र्वा॒ज॒जि॒तो वाज॑ जेषम्। वाजि॑नो वाजजि॒तो व्व॑न स्कभ्नु॒वन्तो योज॒ना मि॑मा॒नाꣳ काष्ठां॑ गच्छत ॥ १३ ॥

अर्थ—अनुज्ञा खरी असलेल्या सवितृदेवाच्या आज्ञेनें मी अन्न जिंकणाऱ्या बृहस्पतीच्या संबंधीं अन्न जिंकेन. अन्न जिंकणाऱ्या, मार्ग अडविणाऱ्या व शीघ्रगमनानें योजनें मोजणाऱ्या हे अश्वांनो, मार्गाच्या शेवटपर्यंत जा ॥ १३ ॥

विनियोग—'एष स्य वाजी' इत्यादि दोन मंत्रांनीं आज्यहोम करावा.

एष स्य वा॒जी क्षि॒पणिं॑ तु॒रण्य॑ति ग्री॒वाया॑ ब॒द्धोऽअ॑पि॒कक्ष॒ऽआस॑नि। क्रतुं॑ दधि॒क्राऽअनु॑ स॒ꣳसनि॑ष्यद॒त्पथा॑मङ्का॒ꣳ स्यन्वा॑पनीफण॒त् स्वाहा॑ ॥१४॥

अर्थ—हा घोडा चाबूक मारल्यावर शीघ्र गमन करतो. या घोड्याचें मान, काखा व मुख या ठिकाणीं निरनिराळ्या रज्जूंनीं बंधन केलें आहे. हा घोडा मार्गांत आडव्या येणाऱ्या पाषाणादिकांना ओलांडणारा, बसणाऱ्याच्या इच्छेप्रमाणें चालणारा व मार्गा-तील उंचनीच जागीं शीघ्र गमन करणारा आहे. हें हवि सुहुत असो ॥ १४ ॥

उत स्मास्य द्रवतस्तुरण्यतः पर्णं न वेरनुवाति प्रगर्धिनः । श्येनस्येव ध्रजतोऽङ्कसं परि दधिक्राण्णः सहोर्जा तरित्रतः स्वाहा ॥ १५ ॥

अर्थ—आणखी, उडणाऱ्या पक्ष्याच्या पंखाप्रमाणें या घोड्याचे सर्व अंगावर असलेली झूल तो शीघ्र धांवत असतां वर उचलून जातांना दिसते. तो घोडा आपलें पोंचण्याचें स्थान शीघ्र येवो म्हणून इच्छा करतो. तसेंच श्येनपक्ष्याप्रमाणें शीघ्रवेगानें धावणाऱ्या व मार्गांतील पाषाणादिकांचें उल्लंघन करणाऱ्या, जोरानें मार्ग आक्रमण करणाऱ्या या घोड्याची झूल स्पष्ट दिसते. हें हवि सुहुत असो ॥ १५ ॥

विनियोग—' शं नो ' इत्यादि तीन मंत्रांनीं आज्यहोम करावा.

शं नो भवन्तु वाजिनो हवेषु देवताता मितद्रवः स्वर्काः । जम्भयन्तोऽहिं वृकꣳरक्षाꣳसि सनेम्यस्मद्युयवन्नमीवाः ॥ १६ ॥

अर्थ—यज्ञकर्मात बोलावणीं आलीं असतां घोडे आम्हांला सुखकर होवोत. ते घोडे परिमित गमन करणारे, उत्तम कांतिमान् व राक्षसांचा नाश करणारे असे आहेत, तसेंच ते आमच्या व्याधींना शीघ्र दूर करोत ॥ १६ ॥

ते नोऽअर्वन्तो हवनश्रुतो हवं विश्वे शृण्वन्तु वाजिनो मितद्रवः । सहस्रसा मेधसाता सनिष्यवो महो ये धनꣳ समिथेषु जभ्रिरे ॥ १७ ॥

अर्थ—ज्यांनीं संग्रामांतून पुष्कळ द्रव्य आणलें ते सर्व घोडे आमचें आव्हान ऐकोत. ते बोलावणें ऐकणारे यजमानाच्या इच्छेनें परिमित गमन करणारे, हजारों लोकांना संतुष्ट करणारे, अन्नराशि देणारे, व यज्ञशाला पूर्ण करणारे आहेत ॥ १७ ॥

वाजे वाजेऽवत वाजिनो नो धनेषु विप्राऽअमृताऽऋतज्ञाः । अस्य मध्वः पिबत मादयध्वं तृप्ता यात पथिभिर्देवयानैः ॥ १८ ॥

अर्थ—हे अश्वांनो, सर्व अन्नें व धनें प्राप्त झालीं असतां आमचें रक्षण करा. तुम्ही बुद्धिमान्, अविनाशी व यज्ञ जाणणारे आहां. हें गोड नीवारादि तृण खा व संतुष्ट व्हा व नंतर देव जातात त्या मार्गांनीं गमन करा ॥ १८ ॥

विनियोग—यजमानानें रथावरून उतरून 'आ मा वाजस्य' या मंत्रानें निवारचरूला स्पर्श करावा. नंतर घोड्याकडून त्या चरूचें अवघ्राण करवावें.

आ मा वाजस्य प्रसवो जगम्यादेमे द्यावापृथिवी विश्वरूपे । आ मा गन्तां पितरा मातरा चा मा सोमोऽअमृतत्वेन गम्यात् । वाजिनो वाजजितो वाजꣳ सरिष्यन्तो बृहस्पतेर्भागमवजिघ्रत निमृजानाः ॥ १९ ॥

अर्थ--अन्नाची उत्पत्ति, सर्वव्यापी द्युलोक व पितृलोक, आमचे आई, बाप आणि सोम हे मला देवजन्म प्राप्त करून देण्याकरितां मजकडे येवोत. हे अश्वांनो, तुम्ही बृहस्पतीसंबंधीं हविर्भागाचें अवघ्राण करा. तुम्ही अन्न जिंकणारे, तें जिंकण्याकरतां जाणारे व यजमानाला पवित्र करणारे आहांत ॥ १९ ॥

विनियोग--'आपये स्वाहा' वगैरे मंत्रांनीं स्रुव्यानें बारा आहुतींचा होम करावा.

आपये स्वाहा॑ स्वापये स्वाहाऽपिजाय स्वाहा॒ क्रतवे स्वाहा॒ वसवे स्वाहाऽहर्पतये स्वाहाऽहे॑ मुग्धाय स्वाहा॑ मुग्धाय वैन॒ꣳ शिनाय स्वाहा॑ विन॒ꣳ शिनऽआन्त्यायनाय स्वाहान्त्याय भौव॒नाय स्वाहा॒ भुवनस्य॒ पत॑ये स्वाहाधिपत॑ये स्वाहा॑ ॥ २० ॥

अर्थ—प्राप्त करणारा, उत्तम रीतीनें प्राप्त करणारा पुनः पुनः उत्पन्न होणारा, यज्ञरूपी, निवासाला कारण असलेला, दिवसांचा स्वामी, मोहक दिवस, विनाशकांत असणारा, मोहकस्वरूपी, अंत्यस्थानावरील विनाशशील, शेवटचा भुवनस्थ, जगत्पालक व सर्व लोकांचा अधिपति जो प्रजापति त्याला हें हवि सुहुत असो ॥ २० ॥

विनियोग—'आयुर्यज्ञेन' वगैरे सहा मंत्रभाग यजमानाकडून म्हणवावे. पत्नीनें व यजमानानें यूपारोहण करावें. 'स्वः' या मंत्रभागानें यजमानानें चषालाला स्पर्श करावा. व 'अमृताः' या मंत्रभागानें त्यानें आपलें डोकें यूपाचे वर करावें.

आयु॒र्यज्ञे॑न कल्पतां प्रा॒णो यज्ञे॑न कल्पतां चक्षु॒र्यज्ञे॑न कल्पता॒ꣳ श्रोत्रं॑ यज्ञे॑न कल्पतां पृ॒ष्ठं यज्ञे॑न कल्पतां य॒ज्ञो यज्ञे॑न कल्पताम्। प्र॒जाप॑तेꣳ प्र॒जाऽअभूम स्व॒र्देवाऽअगन्मामृताऽअभूम ॥ २१ ॥

अर्थ—माझें आयुष्य, पंचप्राण, चक्षु, श्रोत्र, पृष्ठभाग व माझा यज्ञ हीं वाजपेय यज्ञानें चांगलीं सामर्थ्ययुक्त बनोत. हे देवांनो, आम्ही प्रजापतीची प्रजा बनलों. हे देवांनो, आम्ही स्वर्गाप्रत प्राप्त झालों व आम्ही मरणरहित बनलों ॥ २१ ॥

विनियोग—यूपारोहण करून यजमानानें 'अस्मे' या मंत्रभागानें सर्व दिशांकडे पहावें. नंतर 'नमो मात्रे' या भागानें भूमीकडे पहावें. घडवंचीवर पशूचें चर्म आंथरावें. नंतर 'यन्तासि' या मंत्रभागानें यजमानाला घडवंचीवर बसवावें.

अस्मे वोऽअस्त्विन्द्रियमस्मे नृम्णमुत क्रतुरस्मे वर्चाꣳ सि सन्तु वऽ । नमो मात्रे पृथिव्यै नमो मात्रे पृथिव्याऽइयं ते राड्यन्तासि यमनो ध्रुवोऽसि धरुणः÷ । कृष्यै त्वा क्षेमाय त्वा रय्यै त्वा पोषाय त्वा ॥ २२ ॥

अर्थ—हे दिशांनो, तुमचें वीर्य, द्रव्य, कर्म, तेज हीं सर्व आमचे ठायीं असोत. मातृरूप पृथ्वीला पुष्कळ नमस्कार असोत. हे आसन्दि (घडवंची), हें तुझें राज्य आहे. हे यजमाना, तूं नियमन करणारा, आत्मनिग्रह करणारा, स्थिर व धारक असा आहेस. शेती, क्षेम (मिळालेल्या द्रव्याचें रक्षण), द्रव्य व पशुपुत्रादिकांच्या वृद्धीकरितां तुला मी या ठिकाणीं बसवितों ॥ २२ ॥

विनियोग—' वाजस्येमम् ' इत्यादि मंत्रभागांनीं सात आहुतींचा स्रुव्यानें होम करावा.

वाजस्येमं प्रसवꣳ सुषुवेऽग्रे सोमꣳ राजानमोषधीष्वप्सु । ताऽअस्मभ्यं मधुमतीर्भवन्तु वयꣳराष्ट्रे जागृयाम पुरोहिताः स्वाहा ॥ २३ ॥

अर्थ—अन्नोत्पादक प्रजापतीनें सृष्टीच्या आरंभीं ओषधींत व जलांत असलेल्या प्रकाशयुक्त अशा सोमवल्ली रसाला उत्पन्न केलें. त्या सोमोत्पादक ओषधि व तीं जलें आमच्याकरितां माधुर्ययुक्त होवोत म्हणजे त्या आम्हांला गोड लागोत. त्यांनीं अभिषिक्त केलेले आम्ही आपल्या राज्यांत सावधान राहूं व यागादि करण्यांत अग्रेसर होऊं. हें हवि सुहुत असो ॥ २३ ॥

वाजस्येमां प्रसवꣳ शिश्रिये दिवमिमा च विश्वा भुवनानि सम्राट् । अदितिस्नन्तं दापयति प्रजानन्न्स नो रयिꣳ सर्ववीरं नियच्छतु स्वाहा ॥२४॥

अर्थ—अन्नोत्पादक ईश्वर ही पृथ्वी, द्युलोक, सर्व भुवनें व सर्व प्राणी यांना आश्रित करून राहिला. सर्व भुवनांचा राजा असा तो मला हविर्दानाची इच्छा नाहीं असें जाणून मला सद्बुद्धि देऊन हविर्भाग देववितो. तो आम्हांला सर्व पुत्रभृत्यादिकांसह द्रव्य देवो ॥ २४ ॥

वाजस्य नु प्रसवऽआबभूवेमा च विश्वा भुवनानि सर्वत÷ । सनेमि राजा परियाति विद्वान् प्रजां पुष्टिं वर्धयमानोऽअस्मे स्वाहा ॥ २५ ॥

अर्थ—अन्नाचा उत्पादक प्रजापति सर्वत्र सर्व भुवनांना निर्माण करता झाला. चिरन्तन असा तो राजा प्रकाशित होऊन सर्वत्र गमन करतो. तो आपला अधिकार

जाणणारा व आमच्यांत पुत्रादिसंतति व द्रव्यवृद्धि करणारा आहे. हें हवि सुहुत असो ॥ २५ ॥

सोमꣳ राजानमवसेऽग्निमन्वारभामहे । आदित्यान्विष्णुꣳ सूर्यं ब्रह्माणं च बृहस्पतिꣳस्वाहा ॥ २६ ॥

अर्थ—संरक्षणाकरितां सोमराजा, अग्नि, आदित्य, विष्णु, सूर्य, ब्रह्मा व बृहस्पति यांचें आव्हान करतो हें हवि सुहुत असो ॥ २६ ॥

अर्यमणं बृहस्पतिमिन्द्रं दानाय चोदय । वाचं विष्णुꣳ सरस्वतीꣳ सवितारं च वाजिनꣳ स्वाहा ॥ २७ ॥

अर्थ—हे ईश्वरा, तूं अर्यमा, बृहस्पति, इन्द्र, वागधिष्ठात्री सरस्वती, विष्णु व अन्नवान् सविता यांस मला धन देण्याची प्रेरणा कर. हें हवि सुहुत असो ॥ २७ ॥

अग्नेऽअच्छावदेह नꣳ प्रति नꣳ सुमना भव । प्र नो यच्छ सहस्रजित्त्वꣳ हि धनदाऽअसिस्वाहा ॥ २८ ॥

अर्थ—हे अग्ने, या कर्मांत (आमच्याकडे ये) आम्हांस हितकारक असें बोल. व आमच्यावर दया करणारा हो. हे बहु द्रव्य जिंकणाऱ्या तूं स्वभावतःच धन देणारा आहेस म्हणून आम्हांला द्रव्य दे. हें हवि सुहुत असो ॥ २८ ॥

प्र नो यच्छत्वर्यमा प्र पूषा प्र बृहस्पतिः । प्र वाग्देवी ददातु नꣳ स्वाहा ॥ २९ ॥

अर्थ—अर्यमा, पूषा, बृहस्पति व सरस्वती देवी आम्हांला अभीष्ट देवो. हें हवि सुहुत असो ॥ २९ ॥

विनियोग—' देवस्य त्वा ' या मंत्रभागानें होमद्रव्याच्या अवशिष्ट भागानें यजमानास अभिषेक करावा.

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम् । सरस्वत्यै वाचो यन्तुर्यन्त्रियेंद्रस्य बृहस्पतेर्ष्ट्वा साम्राज्येनाभिषिञ्चाम्यसौ ॥ ३० ॥

अर्थ—सर्व प्रेरक सवित्याच्या प्रेरणेनें अश्विनीकुमारांच्या बाहूंनीं व पूष्याच्या हातांनीं नियमन करणाऱ्या सरस्वतीच्या नियमनरूपी ऐश्वर्यांत स्थापन करतों. या ठिकाणीं यजमानाचें नांव घ्यावें. हे अमुकसंज्ञक यजमाना, बृहस्पतीच्या साम्राज्यानें मी तुजवर अभिषेक करतों ॥ ३० ॥

विनियोग—' अग्निरेकाक्षरेण ' या अनुवाकाला उज्जितिसंज्ञक मंत्र म्हणतात. ते यजमानाइन बोलवावे.

अग्निरेकाक्षरेण प्राणमुदजयत् तमुज्जेषमश्विनौ द्व्यक्षरेण द्विपदो मनुष्यानुदजयतां तानुज्जेषं विष्णुस्त्र्यक्षरेण त्रीँल्लोकानुदजयत्तानुज्जेषꣳ सोमश्चतुरक्षरेण चतुष्पदः पशूनुदजयत्तानुज्जेषम् ॥ ३१ ॥

अर्थ—अग्नीनें एकाक्षरीच्छन्दानें प्राणाचा, अश्विनीकुमारांनीं द्व्यक्षरी छन्दानें मनुष्यादि द्विपाद प्राण्यांचा, विष्णूनें त्र्यक्षरी छन्दानें भूरादि तीन लोकांचा, व सोमानें चतुरक्षरी छन्दानें चतुष्पाद प्राण्यांचा, जय केला म्हणून मीहि एकाक्षर, द्व्यक्षर, त्र्यक्षर व चतुरक्षर छन्दांनीं, प्राण, मनुष्यें, भूरादिलोक व चतुष्पाद पशु यांचा जय करीन ॥ ३१ ॥

पूषा पञ्चाक्षरेण पञ्च दिशऽउदजयत्ताऽउज्जेषꣳ सविता षडक्षरेण षड्ऋतूनुदजयत्तानुज्जेषं मरुतः सप्ताक्षरेण सप्त ग्राम्यान् पशूनुदजयँस्तानुज्जेषं बृहस्पतिरष्टाक्षरेण गायत्रीमुदजयत्तामुज्जेषम् ॥ ३२ ॥

अर्थ—पूष्यानें पञ्चाक्षर छन्दानें पूर्वादि चार व एक अवान्तर दिशा अशा पांच दिशांचा, सवित्यानें षडक्षरी छन्दानें सहा ऋतूंचा, मरुत देवांनीं सप्ताक्षरी छन्दानें सात गांवठी पशूंचा व बृहस्पतीनें अष्टाक्षरी छन्दानें गायत्री छन्दोभिमानी देवतेचा जय केला म्हणून मीही त्या त्या छन्दांनीं त्या त्या पूर्वोक्त पदार्थांचा जय करीन ॥ ३२ ॥

मित्रो नवाक्षरेण त्रिवृतꣳस्तोममुदजयत् तमुज्जेषं वरुणो दशाक्षरेण विराजमुदजयत्तामुज्जेषमिन्द्रऽएकादशाक्षरेण त्रिष्टुभमुदयत्तामुज्जेषं विश्वे देवा द्वादशाक्षरेण जगतीमुदजयँस्तामुज्जेषम् ॥ ३३ ॥

अर्थ—मित्रदेवानें नवाक्षर छन्दानें त्रिवृत् स्तोमाचा, वरुणदेवानें दशाक्षर छन्दानें विराडभिमानी देवतेचा, इंद्रदेवानें एकादशाक्षरी छन्दानें त्रिष्टुप् छन्दोऽभिमानी देवतेचा व विश्वेदेवांनीं द्वादशाक्षरी छन्दानें जगत्यभिमानि देवतेचा जय केला म्हणून मीही त्या त्या छन्दानें त्या त्या पूर्वोक्त वस्तूंचा जय करीन ॥ ३३ ॥

वसवस्त्रयोदशाक्षरेण त्रयोदशꣳस्तोममुदजयँस्तमुज्जेषꣳ रुद्राश्चतुर्दशाक्षरेण चतुर्दशꣳस्तोममुदजयँस्तमुज्जेषमादित्याः पञ्चदशाक्षरेण पञ्चदश-

त्रयस्तोममुद्जयँस्तमुज्जेषमदितिꣳ षोडशाक्षरेण षोडशꣳस्तोममुद्जयꣳस्तमुज्जेषं प्रजापतिꣳ सप्तदशाक्षरेण सप्तदशꣳस्तोममुद्जयꣳस्तमुज्जेषम् ॥३४॥

अर्थ—वसूंनीं तेरा अक्षरी छन्दानें त्रयोदश स्तोमाचा, रुद्रदेवांनीं चतुर्दशाक्षरी छन्दानें चतुर्दश स्तोमाचा, आदित्यदेवांनीं पञ्चदशाक्षरी छन्दानें पञ्चदशस्तोमाचा, देवमाता अदितीनें षोडशाक्षरी छन्दानें षोडशस्तोमाचा व प्रजापतीनें सप्तदशाक्षरी छन्दानें सप्तदशस्तोमाचा जय केला म्हणून मीही त्या त्या छन्दानें त्या त्या पूर्वोक्त वस्तूंचा जय करीन ॥ ३४ ॥

[येथें वाजपेय यागाचे मंत्र संपले.] [यापुढें राजसूयाचे मंत्र सांगतात.]

विनियोग—' एष ते निर्ऋते ' या मंत्रभागानें उषरावर उल्मुकाग्नीचें स्थापन करून त्यांत तण्डुलपिष्टरूपी हविर्द्रव्याचा होम करावा. ' अग्निनेत्रेभ्यः ' इत्यादि मंत्रांनीं पांचही अग्नीत होम करावा.

एष ते निर्ऋते भागस्तं जुषस्व स्वाहाऽग्निनेत्रेभ्यो देवेभ्यः पुरꣳ सद्मभ्यꣳ स्वाहा यमनेत्रेभ्यो देवेभ्यो दक्षिणासद्मभ्यꣳ स्वाहा विश्वदेवनेत्रेभ्यो देवेभ्यः पश्चात्सद्मभ्यꣳ स्वाहा मित्रावरुणनेत्रेभ्यो वा मरुन्नेत्रेभ्यो वा देवेभ्यऽउत्तरासद्मभ्यꣳ स्वाहा सोमनेत्रेभ्यो देवेभ्यऽउपरिसद्मभ्यो दुवस्वद्मभ्यः स्वाहा ॥ ३५ ॥

अर्थ—हे निर्ऋते, पृथिवी हा पिष्टरूपी तुझा भाग आहे त्याचें तूं ग्रहण कर. हें हवि सुहुत असो. पूर्वेकडे ज्या अग्निप्रमुख देवता आहेत, त्यांना हें हवि सुहुत असो. दक्षिणेकडे ज्या यमप्रमुख देवता आहेत त्यांना हें हवि सुहुत असो. पश्चिमेकडे ज्या विश्वेदेवप्रमुख देवता आहेत त्यांना हें हवि सुहुत असो. उत्तरेकडे ज्या मित्रावरुणप्रमुख अथवा मरुत्प्रमुख देवता आहेत त्यांना हें हवि सुहुत असी. तसेंच ऊर्ध्वभागीं ज्या परिचर्यायुक्त अशा सोमप्रमुख देवता आहेत त्यांस हें हवि सुहुत असो. ॥ ३५ ॥

विनियोग—' ये देवाः ' या पांच मंत्रांनीं होम करावा.

ये देवाऽअग्निनेत्राꣳ पुरꣳ सदस्तेभ्यꣳ स्वाहा ये देवा यमनेत्रा दक्षिणासदस्तेभ्यꣳ स्वाहा ये देवा विश्वदेवनेत्राꣳ पश्चात्सदस्तेभ्यꣳ स्वाहा ये देवा मित्रावरुणनेत्रा वा मरुन्नेत्रा वोत्तरासदस्तेभ्यꣳ स्वाहा ये देवाः सोमनेत्राऽउपरिसदो दुवस्वन्तस्तेभ्यꣳ स्वाहा ॥ ३६ ॥

अर्थ—क्रमेंकरून पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर व ऊर्ध्वदिशांकडे जे अग्नि, यम, विश्वेदेव, मित्रावरुण अथवा मरुत्प्रमुख आणि परिचर्यावान् सोमप्रमुख देव आहेत त्यांना हें हवि सुहुत असो ॥ ३६ ॥

विनियोग—' अग्ने सहस्व ' या मंत्रभागानें अपामार्गतंदुलहोमाकरितां दक्षिणाग्नींतून उल्मुकग्रहण करावें.

अग्ने सहस्व पृतनाऽअभिमातिरपास्य । दुष्टरस्तरन्नरातीर्वर्चो धा यज्ञवाहसि ॥ ३७ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं शत्रुसेनांना सहन कर व शत्रूंना दूर कर. शत्रुनाश करणारा व कोणाकडूनही ज्याचा तिरस्कार होत नाहीं असा तूं आहेस. तूं यज्ञ करणाऱ्या या यजमानास अन्न दे ॥ ३७ ॥

विनियोग—' देवस्य त्वा ' या मंत्रभागानें स्रुव्यानें अपामार्गतण्डुलांचा होम करावा. ' रक्षसां त्वा ' या मंत्रभागानें त्या त्या दिशेकडे स्रुवा झटकावा. ' अवधिष्म ' हा मंत्रभाग म्हणून अध्वर्युप्रभृतीनीं मागें न पहातां देवयजनांत यावें.

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम् । उपाꣳशोर्वीर्येण जुहोमि हुतꣳ रक्षः स्वाहा रक्षसां त्वा वधायावधिष्म रक्षोऽवधिष्मामुमसौ हुतः ॥ ३८ ॥

अर्थ—सर्वप्रेरक सवित्याच्या प्रेरणेनें अश्विनीकुमारांच्या बाहूंनीं व पूष्याच्या हातांनीं उपांशुनामक प्रथम ग्रह आहे त्याचे वीर्यानें मी होम करतों. त्यायोगें राक्षसाचा नाश झाला. हें हवि सुहुत असो. राक्षसांच्या नाशाकरितां मी तुला झटकतों. राक्षसजातीला आम्हीं मारलें. या अमुक नांवाच्या शत्रूला मीं मारलें हा अमुक नांवाचा शत्रु मजकडून मारला गेला ॥ ३८ ॥

विनियोग—यजमानाचा उजवा बाहु हातांत घेऊन ' सविता त्वा ' या मंत्राचा जप करावा.

सविता त्वा सवानाꣳ सुवतामग्निर्गृहपतीनाꣳ सोमो वनस्पतीनाम् । बृहस्पतिर्वाचऽइन्द्रो ज्यैष्ठ्याय रुद्रः पशुभ्यो मित्रः सत्यो वरुणो धर्मपतीनाम् ॥ ३९ ॥

अर्थ—हे यजमाना, सविता तुला सर्वांना आज्ञा देण्याचा अधिकार देवो. अग्नि तुला घरांतील सर्व मंडळींचें आधिपत्य, सोम वनस्पतींचें स्वामित्व, बृहस्पति पांडित्य, इंद्र, ज्येष्ठत्व, रुद्र, पशु, मित्र, सत्यभाषण व वरुण धर्मशीलांचें आधिपत्य देवो ॥ ३९ ॥

इमं देवाऽअसपत्नꣳ सुवध्वं महते क्षत्राय महते ज्यैष्ठ्याय महते जानराज्यायेन्द्रस्येन्द्रियाय। इमममुष्य पुत्रममुष्यै पुत्रमस्यै विशऽएष वोऽमी राजा सोमोस्माकं ब्राह्मणानाꣳराजा ॥ ४० ॥

अर्थ—हे सवित्रादि देवांनो, या अमुक नांवाच्या यजमानाला शत्रुरहित करा. त्यायोगें तो मोठें क्षत्रियत्व, ज्येष्ठत्व, लोकांचें आधिपत्य व आत्मज्ञानसामर्थ्य मिळवील. हा यजमान अमुक पुरुषाचा व अमुक बाईचा मुलगा आहे (येथें यजमानाच्या पित्याचें व मातेचें नांव घ्यावें) (या ठिकाणीं जातीचें व देशाचें नांव घ्यावें) जसें हे कुरुपञ्चालदेशीय प्रजांनो, हा खदिरवर्मा तुमचा राजा असो. आम्ही ब्राह्मण असल्यानें वल्लीरूपी हा सोम आमचा राजा असो ॥ ४० ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**
माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

इति नवमोऽध्यायः समाप्तः ।



अथ दशमोऽध्यायः ॥ १० ॥



विनियोग—नवव्या अध्यायांत वाजपेय व राजसूयसंबंधीं कांहीं कर्मे सांगितलें. दहाव्या अध्यायांत राजसूयांतील अवशिष्ट कर्मे व चरक सौत्रामणी सांगतात.

'अपो देवाः' या मंत्रभागानें सरस्वतीनदीचें जल ग्रहण करावें.

अपो देवा मधुमतीरगृभ्णन्नूर्जस्वती राजस्वुश्चितानाꣳ । याभिर्मित्रावरुणावभ्यषिञ्चन्याभिरिन्द्रमनयन्नत्यरातीꣳ ॥ १ ॥

अर्थ—इंद्रादिक देवांनां मधुरस्वाद, व अन्नरस यांनीं युक्त, नृपोत्पादक, [विशिष्टज्ञानयुक्त अशा जलाचें ग्रहण केले. त्या पाण्यांनीं देवांनीं मित्रावरुणांना] अभिषेक केला व त्यांनी त्याच जलाने इंद्राकडून शत्रुजय करविला. अशा सरस्वती-जलाचें मी ग्रहण करतों ॥ १ ॥

विनियोग—'वृष्ण ऊर्मिः' इत्यादि मंत्रांनीं आज्याहुतीचा होम करावा.

वृष्णऽऊर्मिरसि राष्ट्रदा राष्ट्रं मे देहि स्वाहा वृष्णऽऊर्मिरसि राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै देहि वृषसेनोऽसि राष्ट्रदा राष्ट्रं मे देहि स्वाहा वृषसेनोऽसि राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै देहि ॥ २ ॥

अर्थ—हे कल्लोला, तूं वीर्यसेक करणाऱ्या पशूचा कल्लोल आहेस. तूं स्वभावतःच राष्ट्र देणारा आहेस म्हणून आम्हांला राष्ट्र दे. हे हवि सुहुत असो. तसेंच तूं या यजमानाला राष्ट्र दे. त्याप्रमाणेंच ज्याची सेना सेचनसमर्थ आहे व राष्ट्र देणारा असा तूं आहेस म्हणून मला व या यजमानाला राष्ट्र दे ॥ २ ॥

विनियोग—प्रवाहांतील जलग्रहण करावें.

अर्थेत स्थ राष्ट्रदा राष्ट्रं मे दत्त स्वाहार्थेत स्थ राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै दत्तौजस्वती स्थ राष्ट्रदा राष्ट्रं मे दत्त स्वाहौजस्वती स्थ राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै दत्तापः÷ परिवाहिणी स्थ राष्ट्रदा राष्ट्रं मे दत्त स्वाहापः÷ परिवाहिणी स्थ राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै दत्तापां पतिरसि राष्ट्रदा राष्ट्रं मे दोहि स्वाहापां पतिरसि राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै देह्यपां गर्भोऽसि राष्ट्रदा राष्ट्रं मे देहि स्वाहापां गर्भोऽसि राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै देहि ॥ ३ ॥

अर्थ—यज्ञकर्माच्या उद्देशानें प्रवाहापासून यज्ञमण्डपाकडे येणाऱ्या जलांनो, तुम्ही स्वभावतःच राष्ट्र देणाऱ्या आहां म्हणून मला राष्ट्र द्या. हें हवि सुहुत असो व या अमुक नांवाच्या यजमानालाही राष्ट्र द्या. हे जलांनो, तुम्ही तेजोयुक्त व सर्वत्र वाहणाऱ्या आहां. हे समुद्रा, तूं जलांचा अधिपति आहेस. हे भोंवऱ्या, तूं जलांचा गर्भ आहेस. तुम्ही सर्व स्वभावतःच राष्ट्र देणारे आहांत म्हणून मला व या अमुकनांवाच्या यजमानाला राष्ट्र द्या. ॥ ३ ॥

सूर्यत्वचस स्थ राष्ट्रदा राष्ट्रं मे दत्त स्वाहा सूर्यत्वचस स्थ राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै दत्त सूर्यवर्चस स्थ राष्ट्रदा राष्ट्रं मे दत्त स्वाहा सूर्यवर्चस स्थ राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै दत्त मान्दा स्थ राष्ट्रदा राष्ट्रं मे दत्त स्वाहा मान्दा स्थ राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै दत्त व्रजक्षित स्थ राष्ट्रदा राष्ट्रं मे दत्त स्वाहा व्रजक्षित स्थ राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै दत्त वाशा स्थ राष्ट्रदा राष्ट्रं मे दत्त स्वाहा वाशा स्थ राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै दत्त शविष्ठा स्थ राष्ट्रदा राष्ट्रं मे दत्त स्वाहा शविष्ठा स्थ राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै दत्त शक्वरी स्थ राष्ट्रदा राष्ट्रं मे दत्त स्वाहा शक्वरी स्थ राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै दत्त जनभृत स्थ राष्ट्रदा राष्ट्रं मे दत्त स्वाहा जनभृत स्थ राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै दत्त विश्वभृत स्थ राष्ट्रदा राष्ट्रं मे दत्त स्वाहा विश्वभृत स्थ राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै दत्तापः स्वराज स्थ राष्ट्रदा राष्ट्रममुष्मै दत्त। मधुमतीर्मधुमतीभिः पृच्यन्तां महि क्षत्रं क्षत्रियाय वन्वानाऽअनाधृष्टाः सीदत सहौजसो महि क्षत्रं क्षत्रियाय दधतीः ॥ ४ ॥ शतं ४००

अर्थ—हे जलांनो, तुमची त्वचा सूर्यासारखी आहे. तुम्ही स्वभावतः राष्ट्र देणाऱ्या आहांत म्हणून मला राष्ट्र द्या. हें हवि सुहुत असो. या अमुक नांवाच्या यजमानालाही राष्ट्र द्या. हे जलांनो, तुम्ही सूर्यासारख्या तेजस्वी आहां व प्राण्यांना आनंद देणाऱ्या, कूपांत आणि मेघांत राहणाऱ्या, सर्वांना स्पृहणीय, मधुरूपी, बलिष्ठ, जगदुद्धारसमर्थ, लोकांचें धारण करणाऱ्या, सर्व विश्वधारण करणाऱ्या व स्वयंशोभमान अशा आहां म्हणून मला व अमुक नांवाच्या या यजमानाला राष्ट्र द्या. हे मधुरजलांनो, तुम्ही यजमानाला पुष्कळ बल देणारीं आहां या मधुरसयुक्त जलाशीं युक्त

व्हा. हे जलांनो, तुम्ही राक्षसांकडून अजिंक्य, बलयुक्त व क्षत्रियाला मोठें बल देणारीं अशीं आहां. या स्थानीं तुम्ही रहा ॥ ४ ॥

विनियोग—' सोमस्य त्विषिः ' या मंत्रानें वाघाचें चर्म आंथरावें. ' अग्नये स्वाहा ' वगैरे सहा आहुति द्याव्या व पुढे ' इन्द्राय स्वाहा ' वगैरे सहा आहुति द्याव्या.

सोमस्य त्विषिरसि तवेव मे त्विषिर्भूयात् । अग्नये स्वाहा सोमाय स्वाहा सवित्रे स्वाहा सरस्वत्यै स्वाहा पूष्णे स्वाहा बृहस्पतये स्वाहेन्द्राय स्वाहा घोषाय स्वाहा श्लोकाय स्वाहाꣳशाय स्वाहा भगाय स्वाहार्यम्णे स्वाहा ॥ ५ ॥

अर्थ—हे चर्मा, तूं सोमाची कांति आहेस म्हणून तुझ्या प्रमाणे माझी कांति होवो. अग्नि, सोम, सविता, सरस्वती, पूषा, बृहस्पति, इंद्र, घोष (शब्द करणारा), श्लोक (लोकांकडून स्तुति केलेला), अंश (पुण्यपापांचा विभाग करणारा), भग (सर्व सेव्य) व अर्यमा याना हें हवि सुहुत असो ॥ ५ ॥

विनियोग—'पवित्रे स्थः' या मंत्रभागानें पवित्रांत सुवर्ण बांधावें. 'सवितुर्वः' या मंत्रानें वर जल फेकावें.

पवित्रे स्थो वैष्णव्यौ सवितुर्वः÷ प्रसवऽउत्पुनाम्यच्छिद्रेण पवित्रेण सूर्यस्य रश्मिभिः÷ । अनिभृष्टमसि वाचो बन्धुस्तपोजाः सोमस्य दात्र-मसि स्वाहा राजस्वः ॥ ६ ॥

अर्थ—हे कुशपवित्रांनो, तुम्ही यज्ञसंबंधी आहां. सर्वप्रेरक परमेश्वराच्या आज्ञेनें मी छिद्ररहित व उत्तम अशा पवित्राने व सूर्याच्या किरणांनीं हें जल वर फेकतों. हे जलांनो, तुम्ही राक्षसांकडून पराजित न होणारीं व वाणीचे मित्रभूत अशीं आहां व अग्नीपासून उत्पन्न होणारीं व सोमाचें दान करणारीं आहां. तुम्ही स्वाहाकारानें पवित्र होऊन लोकांना राजा देणारीं आहां. ॥ ६ ॥

विनियोग—अभिषेकाचें पाणी पालाशादि पात्रांत चार भाग करून ओतावें.

सधमादो द्युम्निनीरापऽएताऽअनाधृष्टाऽअपस्यो वसानाः । पस्त्यासु चक्रे वरुणः सधस्थमपाꣳशिशुर्मातृतमास्वन्तः÷ ॥ ७ ॥

अर्थ—हीं जलें एका पात्रांत आनन्द पावणारीं, वीर्ययुक्त, राक्षसांकडून अपराजेय, यज्ञकर्माहें, पात्रांचीं आच्छादक अशीं आहेत. त्या गृहस्वरूपी व अतिशयेंकरून

जगन्निर्माण करणाऱ्या जलांत वरुणानें एकत्र स्थान मिळविलें. तो वरुण जलांचा बालक आहे ॥ ७ ॥

विनियोग—' क्षत्रस्य ' इत्यादि मंत्रांनीं रेशमी वस्त्र वगैरे धारण करावें. ' द्दवासि ' इत्यादि मंत्रभागांनीं तीन बाण घ्यावे.

क्षत्रस्योल्बमसि क्षत्रस्य जरायवसि क्षत्रस्य योनिरसि क्षत्रस्य नाभिरसीन्द्रस्य वार्त्रघ्नमसि मित्रस्यासि वरुणस्यासि त्वयायं वृत्रं वधेत्। द्दवासि रुजासि क्षुमासि । पातेनं प्राच्यं पातेनं प्रत्यच्यं पातेनं तिर्यच्यं दिग्भ्यऽ पात ॥ ८ ॥

अर्थ—हे क्षौमवस्त्रा, तूं यजमानाचें उल्ब (गर्भोदक) आहेस. हे रक्तकंबला, तूं गर्भवेष्टनचर्म आहेस. हे कंचुका, तूं गर्भसंभवस्थान आहेस. हे पागोट्या, तूं गर्भाचें नाळ आहेस. हे धनुष्या, तूं इंद्राचें वृत्रनाशक धनुष्य आहेस. हे धनुष्याच्या उजवेकडील अग्रा, तूं मित्रसंबंधी आहेस. हे डावेकडील अग्रा, तूं वरुणसंबंधी आहेस. हे धनुष्या, हा यजमान तुझ्या साह्यानें शत्रूचा वध करो. हे प्रथम बाणा, तूं शत्रुनाशक, हे द्वितीय बाणा, तूं शत्रुभञ्जक, हे तृतीय बाणा, तूं शत्रूंस कापविणारा आहेस. हे बाणांनो, पूर्व व पश्चिम दिशांकडे अगर निरनिराळ्या भागांत असणाऱ्या या यजमानाचें तुम्ही पालन करा, व इतर दिशांत असतांनाही या यजमानाचें तुम्ही पालन करा ॥ ८ ॥

विनियोग—' आविर्मर्या ' इत्यादि सात मंत्र यजमानाकडून म्हणवावे.

आविर्मर्याऽआविर्त्तोऽअग्निर्गृहपतिराविर्त्त ऽइन्द्रो वृद्धश्रवा ऽआविर्त्तौ मित्रावरुणौ धृतव्रतावाविर्त्तऽ पूषा विश्ववेदाऽआविर्त्ते द्यावापृथिवी विश्वशम्भुवावाविर्त्तादितिरुरुशर्मा ॥ ९ ॥

अर्थ—हे ऋत्विजांनो, तुमच्या समक्ष सांगतों कीं, गृहपालक अग्नीकारणें, कीर्तिमान् अशा इंद्राकारणें, कर्म संपादन करणाऱ्या मित्रावरुणांकारणें, सर्वज्ञ पूष्याकारणें, सर्वांचें कल्याण करणाऱ्या द्यावापृथिवीकारणें व बहु सुखयुक्त अदितीकारणें या यजमानाचें ज्ञापन केलें. म्हणजे हा यजमान त्या त्या देवतांचा याग करणार आहे असें त्या त्या देवतांस सांगितलें ॥ ९ ॥

विनियोग—सदःस्थानासमीप असलेल्या दीर्घकेशयुक्त पुरुषाच्या तोंडांत ताम्र घालावें. यजमानाला प्रत्येक दिशेकडे चालवीत ' प्राचीमारोह ' वगैरे मंत्र म्हणावे.

अवेष्टा दन्दशूकाऽ प्राचीमारोह गायत्री त्वावतु रथन्तरꣳ साम त्रिवृत्स्तोमो वसन्तऽऋतुर्ब्रह्म द्रविणम् ॥ १० ॥

अर्थ—अत्यंत दंश करणारे सर्पासारखे यज्ञविघ्नकारी जे राक्षस त्यांचा नाश झाला. हे यजमाना, तूं पूर्वदिशेकडील जागेवर आरोहण कर. तेथें छन्दांपैकीं गायत्री-छन्द तुझें रक्षण करो. तसेंच सामांपैकीं रथन्तरसाम, स्तोमांपैकीं त्रिवृत्स्तोम, ऋतूंपैकीं वसंत व धनरूपा ब्राह्मणजाति तुझें रक्षण करो ॥ १० ॥

दक्षिणामारोह त्रिष्टुप् त्वावतु बृहत्साम पञ्चदश स्तोमो ग्रीष्मऽऋतुः क्षत्रं द्रविणम् ॥ ११ ॥

अर्थ—हे यजमाना, दक्षिण दिशेस आरोहण कर. तेथें त्रिष्टुप् छन्द, बृहत्साम, पञ्चदश स्तोम, ग्रीष्म ऋतु व धनभूत क्षत्रियजाति तुझें रक्षण करो ॥ ११ ॥

प्रतीचीमारोह जगती त्वावतु वैरूपꣳ साम सप्तदश स्तोमो वर्षाऽ ऋतुर्विड् द्रविणम् ॥ १२ ॥

अर्थ—हे यजमाना, तूं पश्चिम दिशेकडे आरोहण कर, तेथे जगती छन्द, वैरूप साम, सप्तदश स्तोम, वर्षाऋतु व द्रव्यरूपी वैश्यजाति तुझे रक्षण करो ॥ १२ ॥

उदीचीमारोहानुष्टुप् त्वावतु वैराजꣳ सामैकविꣳ शस्तोमः÷ शरदृतुः फलं द्रविणम् ॥ १३ ॥

अर्थ—हे यजमाना, उत्तरदिशेकडे आरोहण कर. तेथें अनुष्टुप् छन्द, वैराज साम, एकविंश स्तोम, शरदृतु, व यज्ञफलात्मक द्रव्य तुझें रक्षण करो ॥ १३ ॥

विनियोग—' प्रत्यस्तम् ' या मंत्रानें सिसें फेकावें.

ऊर्ध्वामारोह पङ्क्तिस्त्वावतु शाक्कररैवते सामनी त्रिणवत्रयस्त्रिꣳशौ स्तोमौ हेमन्तशिशिरावृतू वर्चो द्रविणं प्रत्यस्तं नमुचेः शिरः÷ ॥ १४ ॥

अर्थ—हे यजमाना, तूं ऊर्ध्वदिशेकडे आरोहण कर. तेथें पंक्ति छन्द, शाक्कर व रैवत साम, त्रिणव व त्रयस्त्रिंश स्तोम, हेमन्त व शिशिर ऋतु, व धनरूपी ब्रह्मतेज तुझें रक्षण करो. नमुचिराक्षसाचें डोकें फेकलें गेलें ॥ १४ ॥

विनियोग—' सोमस्य त्विषिः ' या मंत्रानें यजमानास व्याघ्रचर्मावर बसवावें.

व 'मृत्योः' या मंत्रभागानें त्याचे पायाखालीं सोनें ठेवावें. व 'ओजोऽसि' या मंत्रभागानें नवच्छिद्र सुवर्णालंकार त्याचे डोक्यावर ठेवावा.

सोमस्य त्विषिरसि तवेव मे त्विषिर्भूयात् । मृत्योष्ट्वाहृषोजोऽसि सहो स्यमृतमसि ॥ १५ ॥

अर्थ—तूं सोमाची कांति आहेस. तुझ्यासारखी माझी कांति होवो. हे सुवर्णा, मृत्यूपासून माझें रक्षण कर. तूं निश्चयात्मक मनःसामर्थ्यरूपी, शरीरसामर्थ्यरूपी व अविनाशी आहेस ॥ १५ ॥

विनियोग—'हिरण्यरूपा' या मंत्रानें यजमानाचे बाहू वर करावे.

हिरण्यरूपाऽउषसो विरोकऽउभाविन्द्राऽउदिथꣳ सूर्यश्च । आरोहतं वरुण मित्र गर्तं ततश्चक्षाथामदितिं दितिं च मित्रोऽसि वरुणोऽसि ॥१६॥

अर्थ—हे शत्रुनिवारक दक्षिण बाहो, व मित्रभूता वामबाहो, तुम्ही दोघे या यजमानावर आरोहण करा. तुम्ही सुवर्णाप्रमाणें प्रकाशमान, रात्रि संपल्यावर सूर्योदयीं आपआपल्या कार्यांत प्रवृत्त होणारे व इन्द्राप्रमाणें बलवान् आहांत. तुमचें कार्यसिद्ध करण्याकरितां सूर्य उदयास येतो. तुम्ही आपली सेना अखण्डित असलेली व शत्रुसेना खण्डित झालेली पहा ॥ १६ ॥

विनियोग—सुवर्णयुक्त व्याघ्रचर्मावर बसलेल्या राजावर पुरोहितादिकांनीं अभिषेक करावा.

सोमस्य त्वा द्युम्नेनाभिषिञ्चाम्यग्नेर्भ्राजसा सूर्यस्य वर्चसेन्द्रस्येन्द्रियेण । क्षत्राणां क्षत्रपतिरेध्यति दिद्यून् पाहि ॥ १७ ॥

अर्थ—हे यजमाना, सोमाच्या यशानें, अग्नीच्या दीप्तीनें, सूर्याच्या तेजानें व इंद्राच्या इंद्रियसामर्थ्यानें मी तुजवर अभिषेक करतों. तूं क्षत्रियांचा अधिपति हो. हे सोमा, शत्रूंनीं टाकलेले बाण दूर करून या यजमानाचें रक्षण कर ॥ १७ ॥

इमं देवाऽअसपत्नꣳ सुवध्वं महते क्षत्राय महते ज्यैष्ठ्याय महते जानराज्यायेन्द्रस्येन्द्रियाय । इमममुष्य पुत्रममुष्यै पुत्रमस्यै विशऽएष वोऽमी राजा सोमोऽस्माकं ब्राह्मणानाꣳ राजा ॥ १८ ॥

अर्थ—हे सवित्रादि देवांनो, या अमुक नांवाच्या यजमानाला शत्रुरहित करा. त्यायोगें तो मोठें क्षत्रियत्व, ज्येष्ठत्व, लोकांचें आधिपत्य व आत्मज्ञानसामर्थ्य

मिळवील. हा यजमान अमुक पुरुषाचा व अमुक बाईचा मुलगा आहे. (या ठिकाणीं जातीचें व देशाचें नांव घ्यावें) जसें हे कुरुपाञ्चालदेशीय प्रजांनो, हा खदिरवर्मा तुमचा राजा असो. आम्ही ब्राह्मण असल्यानें वल्लीरूपी हा सोम आमचा राजा असो ॥ १८ ॥

विनियोग—'प्र पर्वतस्य' या मंत्रानें यजमानानें अंगावर पडलेलें अभिषेकोदक सर्व अंगाला चोळावें. अध्वर्यूनें यजमानास तीन मंत्रांनीं तीन वेळां व्याघ्रचर्मावर पाय आदळावयास लावावा.

प्र पर्वतस्य वृषभस्य पृष्ठान्नावश्चरन्ति स्वसिचऽइयानाः । ताऽआव-वृत्रन्नधरागुदक्ताऽअहिं बुध्न्युमनु रीयमाणाः । विष्णोर्विक्रमणमसि विष्णोर्विक्रान्तमसि विष्णोः क्रान्तमसि ॥ १९ ॥

अर्थ—पौर्णमास्यादि पर्वविशिष्ट व कामनांची वृष्टि करणाऱ्या अग्नीच्या पाठीवरून निघून आलेलीं, सर्व विश्व भिजविणारीं, प्राप्त होणारीं व आहुति परिणामभूत अशीं हीं जलें, आदित्यमण्डलाप्रत जातात व वर गेलेल्या त्या तेथून आकाशांतील मेघाकडे जातात. हे माझ्या प्रथम पावला, तूं त्रिविक्रमावतार धारण करणाऱ्या विष्णूचें प्रथम आक्रमण आहेस व त्यायोगें जिंकलेल्या पृथ्वीस्वरूपी आहेस. हे द्वितीय पावला, तूं विष्णूनें द्वितीय पावलानें जिंकलेल्या अन्तरिक्षरूपी आहेस. हे तृतीय पावला, तूं विष्णूनें तृतीय पावलानें जिंकलेल्या त्रिविशिष्टरूपी आहेस ॥ १९ ॥

विनियोग—नंतर सदोमण्डपांतून होमशाळेंत आल्यावर ' प्रजापते ' या मंत्रानें होम करावा.

प्रजापते न त्वदेतान्यन्यो विश्वा रूपाणि परि ता बभूव । यत्कामास्ते जुहुमस्तन्नोऽअस्त्वयममुष्य पितासावस्य पिता वयꣳ स्याम पतयो रयीणाꣳ स्वाहा । रुद्र यत्ते क्रिवि परं नाम तस्मिन्नुतमस्यमेष्टमसि स्वाहा ॥ २० ॥

अर्थ—हे प्रजापते, तुझ्याहून अन्य कोणीही देव या सर्व विविध रूपांची उत्पत्ति व नाश करण्यास समर्थ झाला नाहीं. म्हणून आम्ही ज्या फलाच्या इच्छेनें तुझा होम करतों तें फल आम्हांस मिळो. हा पुत्र यजमानाचा पिता आहे व हा यजमान या पुत्राचा पिता आहे. सपुत्र असे आम्ही या द्रव्यांचे स्वामी होऊं. हे रुद्रा, तुझें

नांव कार्यकारी आहे. हे हविर्द्रव्या, त्या रुद्राच्या नांवांत तुझा होम केला. तूं माझ्या घरांत इष्ट असें द्रव्य स्थापन केलेंस. हें हवि सुहुत असो ॥ २० ॥

विनियोग—'इन्द्रस्य वज्रोऽसि' या मंत्रानें रथ त्याचे घरांतून बाहेर काढावा व वाजपेयाप्रमाणेंच त्याला घोडे जुंपावे. 'अव्यथायै' या मंत्रभागानें रथावर आरोहण करावें. 'मरुतां' या मंत्रभागानें सारथ्यानें उजवेकडील घोड्याला चाबूक मारावा. 'अपाम' या मंत्रभागानें गाईमध्यें रथ उभा करावा. व 'समिन्द्रियेण' या मंत्रभागानें धनुष्याच्या अग्रानें गाईला स्पर्श करावा.

इन्द्रस्य वज्रोऽसि मित्रावरुणयोस्त्वा प्रशास्त्योः प्रशिषा युनज्मि। अव्यथायै त्वा स्वधायै त्वारिष्टोऽअर्जुनो मरुतां प्रसवेन जयापाम मनसा समिन्द्रियेण ॥ २१ ॥

अर्थ—हे रथा, तूं इंद्राच्या वज्रासारखा आहेस तुला मी आज्ञा करणाऱ्या मित्रावरुणांच्या आज्ञेनें घोडे जोडतों. हे रथा, पीडा होऊं नये व अन्नरस प्राप्त व्हावा म्हणून मी तुजवर आरोहण करतों. हे अश्वा, देवांच्या आज्ञेनें शत्रुजय कर. आम्हीं आरंभलेलें कर्म मनानें प्राप्त केलें. आम्ही इंद्रियसामर्थ्यानें युक्त झालों ॥ २१ ॥

विनियोग—'मा ते' या मंत्रभागानें 'अन्तःपात्य' देशांत रथ उभा करावा.

मा तऽइन्द्र ते वयं तुराषाडयुक्तासोऽअब्रह्मता विदसाम। तिष्ठा रथमधि यं वज्रहस्ता रश्मीन्देव यमसे स्वश्वान् ॥ २२ ॥

अर्थ—हे वज्र हातांत धरणाऱ्या प्रकाशमान इंद्रा, ज्या रथांत तूं बसतोस त्याच्या उत्तम घोड्याचे लगाम हातांत धरतोस. हे शत्रुपराजय करणाऱ्या इंद्रा, त्या रथाला जोडलेले व तुझे संबंधी असलेले आम्ही त्या रथापासून ब्रह्मज्ञानाहून इतर वस्तूप्रमाणें नष्ट न होऊं म्हणजे ब्रह्मज्ञानच तेवढें अविनाशी आहे व तदितर वस्तु नष्ट होणारी आहे तसा आमचा नाश न होवो ॥ २२ ॥

विनियोग—रथविमोचनीयसंज्ञक चार आहुति 'अग्नये गृहपतये' वगैरे मंत्रांनीं होमाव्या. 'पृथिवि मातः' या मंत्रभागानें यजमानानें रथावरूनच भूमीकडे पहावें.

अग्नये गृहपतये स्वाहा सोमाय वनस्पतये स्वाहा मरुतामोजसे स्वाहेन्द्रस्येन्द्रियाय स्वाहा। पृथिवि मातर्मा मा हिꣳसीर्मोऽअहं त्वाम् ॥२३॥

अर्थ—गृहपालक अग्नीला, वनस्पतिरूपी सोमाला, इन्द्रसंबंधी इंद्रियाला व मरुत्संबंधी बलाला हें हवि सुहुत असो. हे जगन्निर्मात्रि पृथ्वि, तूं माझी हिंसा करूं नकोस व मीहि तुझी हिंसा करणार नाहीं ॥ २३ ॥

विनियोग—' ह२स ' या मंत्रानें यजमानानें रथावरून खालीं उतरावें.

ह६ सꣳ शुचिषद्वसुरन्तरिक्षसद्धोता वेदिषदतिथिर्दुरोणसत् । नृषद्वरसदृतसद्व्योमसदब्जा गोजाऽऋतजाऽअद्रिजाऽऋतं बृहत् ॥ २४ ॥

अर्थ—हे रथा, तूं पुढील विशेषणांनीं युक्त अशा सूर्याप्रमाणें आहेस. तुजवरून मी खालीं उतरतों. तो सूर्य अंधकाराचा नाशक, प्रकाशमान, सत्कर्मात मनुष्यांची प्रेरणा करणारा, वायुरूपानें अंतरिक्षांत राहणारा, देवांना बोलावणारा, अग्निरूपानें वेदीवर राहणारा, अतिथीप्रमाणें सर्वपूज्य, यज्ञगृहांत राहणारा, मनुष्यांत, उत्कृष्ट स्थानांत व यज्ञांत राहणारा आणि मंडलरूपानें आकाशांत राहणारा आहे. तसेंच तूं जलांत मत्स्यरूपानें, पृथ्वीवर जारज, अण्डज, स्वेदज व उद्भिज्ज स्वरूपानें, सत्यांत, मेघांत जलरूपानें अगर पाषाणांत अग्निरूपानें राहणारा असून सर्वव्यापी व महत् अशा परब्रह्मरूपी आहेस ॥ २४ ॥

विनियोग—नंतर रथाच्या उजव्या चाकांवर असलेल्या दोन सोन्याच्या मण्यांना ' इयदसि ' या मंत्रभागानें यजमानानें स्पर्श करावा. ते ब्रह्मदेवाला समर्पण करावे. नंतर ' ऊर्गसि ' या मंत्रभागानें उंबराच्या शाखेला स्पर्श करावा. नंतर ' इन्द्रस्य वाम् ' या मंत्रभागानें यजत्र भागानें अध्वर्यूनें यजमानाचे बाहु खालीं करावें.

इयदस्यायुरस्यायुर्मयि धेहि त्रयस्त्रिꣳसि वर्चोऽसि वर्चो मयि धेहि सूर्यस्यावृजं मयि धेहि । इन्द्रस्य वां वीर्यकृतो बाहूऽअभ्युपावहरामि ॥ २५ ॥

अर्थ—हे सुवर्णा, तूं शंभर रतीभार व आयुष्यरूपी आहेस म्हणून आम्हाला शंभर वर्षांचें आयुष्य दे. तसेंच तूं यज्ञसंभाराने युक्त व तेजस्वी आहेस म्हणून मला तेज दे. हे औदुम्बरशाखे, तूं अन्नरसरूपी आहेस म्हणून मला अन्न दे. ऐश्वर्ययुक्त यजमानाच्या वीर्यसंपन्न बाहूंनो, तुम्हाला मी खालीं करतों ॥ २५ ॥

विनियोग—खैराची घडवंची व्याघ्रचर्माजवळ ' स्योनासि ' या मंत्रभागानें ठेवावी. ' क्षत्रस्य योनिः ' या मंत्रभागानें घडवंचीवर वस्त्र पसरावें. ' स्योनामासीद ' या मंत्रानें घडवंचीवर यजमानाला बसवावें.

स्योनासि सुषदासि क्षत्रस्य योनिरसि। स्योनामासीद सुषदामासीद क्षत्रस्य योनिमासीद ॥ २६ ॥

अर्थ—हे आसन्दि, तूं सुखकारक व वर बसणारास सुख देणारी आहेस. हे वस्त्रा, तूं क्षत्रियाचें पोषक आहेस. हे यजमाना सुखकर, बसणाऱ्याला सुख देणाऱ्या व क्षत्रिय पोषक अशा घडवंचीवर बैस ॥ २६ ॥

विनियोग—'निषसाद' या मंत्रानें अध्वर्यूनें यजमानाच्या हृदयाला स्पर्श करावा.

निषसाद धृतव्रतो वरुणः पस्त्यास्वा। साम्राज्याय सुक्रतुः ॥ २७ ॥

अर्थ—हा यज्ञकर्म करणारा, अनिष्ट निवारक व बुद्धिमान् असा यजमान स्वामित्वानें प्रजेमध्यें साम्राज्य भोगण्याकरितां बसला ॥ २७ ॥

विनियोग—'अभिभूः' या मंत्रानें अध्वर्यूनें यजमानाच्या हातांत पांच फासे द्यावे. नंतर यजमानानें ब्रह्मयाला बोलवावें. नंतर अध्वर्यूनें यजमानाकडून सुमंगल नांवाच्या पुरुषाला बोलवावें. नंतर यजमानाला 'इन्द्रस्य वज्रः' या मंत्रानें अध्वर्यूनें 'स्फ्य' संज्ञक काष्ठशस्त्र द्यावें.

अभिभूरस्येतास्ते पञ्च दिशः कल्पन्तां ब्रह्मँस्त्वं ब्रह्मासि सवितासि सत्यप्रसवो वरुणोऽसि सत्यौजाऽइन्द्रोऽसि विशौजा रुद्रोऽसि सुशेवः। बहुकार श्रेयस्कर भूयस्करेन्द्रस्य वज्रोऽसि तेन मे रध्य ॥ २८ ॥

अर्थ—हे यजमाना, तूं पराजय करणारा आहेस. या पूर्वादि पांच दिशा तुझें कार्य करण्यास समर्थ होवोत. यानंतर ब्रह्मयाची व यजमानाचीं उत्तर-प्रत्युत्तरे आहेत. हे ब्रह्मया, असें यजमानानें म्हणावें. हे यजमाना, तूं मोठा व प्रेरक आहेस आणि तुझी प्रेरणा अमोघ आहे असें ब्रह्मयानें म्हणावें. यजमान-हे ब्रह्मन् ब्रह्मा-तूं अनिष्ट निवारक असून सत्य तेजानें युक्त आहेस. यज.-हे ब्रह्मन्. ब्रह्मा-तूं ऐश्वर्यसंपन्न असून प्रजेंत तुझें अतिशय तेज आहे. यज.-हे ब्रह्मन्. ब्रह्मा.-तूं शत्रूंना रडविणारा व सुखकारक आहेस. यज.-हे ब्रह्मन्. ब्रह्मा-तूं मोठा व प्रेरक आहेस आणि तुझी प्रेरणा अमोघ आहे. हे बहुमंगलकार्यकर्त्या, तुला मी बोलावतों. हे स्फ्या, तूं वज्ररूपी आहेस म्हणून माझ्या द्यूतभूमीवर रेघा ओढण्याचें कार्य कर ॥ २८ ॥

विनियोग—नंतर द्यूतभूमीवर सुवर्ण ठेऊन त्यावर 'अग्निः पृथुः' या मंत्र-

भागानें आज्याचा होम करावा. नंतर 'स्वाहाकृताः' या मंत्रभागानें पांच फासे जमिनीवर ठेवावे.

अग्निꣳ पृथुर्धर्मणस्पतिर्जुषाणोऽअग्निꣳ पृथुर्धर्मणस्पतिराज्यस्य वेतु स्वाहा स्वाहाकृताꣳ सूर्यस्य रश्मिभिर्यतध्वꣳ सजातानां मध्यमेष्ठ्यायाय॥२९॥

अर्थ—अग्नीनें घृतपान करावें. तो अग्नि विशाल, जगाचा पालक व स्नेह करणारा असा आहे. आदर दाखविण्याकरितां मंत्रांत तेच शब्द पुनः आले. हें हवि सुहुत असो. हे अक्षांनो, तुम्ही स्वाहापूर्वक आहुतीनीं संतुष्ट होऊन सूर्यकिरणांबरोबर स्पर्धा करा व हा यजमान आपल्या बंधुवर्गांत मध्यभागीं बसण्यास योग्य (सर्व क्षत्रिय-श्रेष्ठ) होईल असा यत्न करा ॥ २९ ॥

विनियोग—'सवित्रा' हा मंत्र म्हणून ऋत्विजांनीं सदोमण्डपांत गमन करावें.

सवित्रा प्रसवित्रा सरस्वत्या वाचा त्वष्ट्रा रूपैꣳ पूष्णा पशुभिरिन्द्रेणास्मे बृहस्पतिना ब्रह्मणा वरुणेनौजसाग्निना तेजसा सोमेन राज्ञा विष्णुना दशम्या देवतया प्रसूतꣳ प्रसर्पामि ॥ ३० ॥

अर्थ—पुढील दहा देवतांच्या आज्ञेवरून मी गमन करतों. त्या दहा देवता ह्या. १ प्रेरक सविता २ वायूपी सरस्वती ३ रूपवान् त्वष्टा ४ पशुयुक्त पूषा ५ हा इंद्र ६ देवयागांत ब्रह्मत्व करणारा बृहस्पति ७ ओजस्वी वरुण ८ तेजस्वी अग्नि ९ प्रकाशमान सोम व १० दहावा यज्ञाधिष्ठाता विष्णु ॥ ३० ॥ (येथें राजसूय यज्ञ संपला).

विनियोग—राजसूयाच्या शेवटीं असलेल्या सौत्रामणीयागाला चरकसौत्रामणी म्हणतात. तत्संबंधीं मंत्र यापुढें सांगितले आहेत. कोंब आलेले व कोंब न आलेले व्रीहि रेशमीवस्त्रांत बांधले आहेत. पैकीं कोंब न आलेल्यांचा भात शिजवावा. व त्यांत कोंब आलेले व्रीहि चुरून 'अश्विभ्यां पच्यस्व' या मंत्रानें मिसळावे. नंतर पशुवपामार्जनापर्यंत कर्म झाल्यावर दर्भानीं 'वायुः पूतः' या मंत्रभागानें सुरेतील कचरा दूर करावा.

अश्विभ्यां पच्यस्व सरस्वत्यै पच्यस्वेन्द्राय सुत्राम्णे पच्यस्व। वायुꣳ पूतꣳ पवित्रेण प्रत्यङ्क्सोमो अतिप्लुतꣳ। इन्द्रस्य युज्यꣳ सखा ॥ ३१ ॥

अर्थ—हे सुरे, अश्विनीकुमार, सरस्वती देवी व चांगलें रक्षण करणारा इंद्र यांचेकरितां तूं परिपक्व हो. वायूनें शुद्ध केलेला सोम दर्भमय पवित्रानें पवित्र होऊन अधोमुख होऊन गमन करता झाला. तो इन्द्राचा संगति करणारा मित्र आहे ॥ ३१ ॥

विनियोग—'कुविदङ्ग' इत्यादि मंत्रांनीं तीन सुराग्रहांचें ग्रहण करावें.

कुविदङ्ग यवमन्तो यवं चियथा दान्त्यनुपूर्वं वियूय । इहेहैषां कृणुहि भोजनानि ये बर्हिषो नमऽउक्तिं यजन्ति । उपयामगृहीतोऽस्यश्विभ्यां त्वा सरस्वत्यै त्वेन्द्राय त्वा सुत्राम्णे ॥ ३२ ॥

अर्थ—हे सोमा, ज्याप्रमाणें पुष्कळ धान्याचे स्वामी असे शेतकरी आपलें पुष्कळ धान्य वेगळें करून शीघ्र कापतात त्याप्रमाणें या यजमानाचे ठायीं जे यजमान दर्भावर बसून हविर्भागात्मक अन्नाचा याग करितात. अशा इतर यजमानांच्या उपभोग्य वस्तु स्थापन कर. तात्पर्य-यज्ञ करणाऱ्या इतरांचीं सर्व फलें या यजमानास मिळोत. हे सोमा, तूं उपयामानें गृहीत आहेस. अश्विनीकुमारांकरितां, सरस्वतीकरितां, व रक्षक इन्द्राकरितां तुझें मी ग्रहण करतों ॥ ३२ ॥

विनियोग—'युवꣳसुराणाम्' ही सुराग्रहाची याज्या आहे व 'पुत्रमिव' ही पुरोऽनुवाक्या आहे.

त्युवꣳ सुरामंमश्विना नमुचावासुरे सचा । विपिपाना शुभस्पतीऽइन्द्रं कर्मस्वावतम् ॥ ३३ ॥

अर्थ—हे अश्विनीकुमारांनो, तुम्ही कर्म करण्याकरितां या इंद्राचें पालन करा. तुम्ही नमुचिराक्षसांत असलेल्या अत्यंत रमणीय सोमाला एकत्र होऊन विशेषेंकरून पिणारे असे, व शुभकर्माचे अधिपति आहां ॥ ३३ ॥

पुत्रमिव पितरावश्विनोभेन्द्रावथुꣳ काव्यैर्दꣳ सनाभिꣳ । यत्सुरामं व्यपिबꣳ शचीभिꣳ सरस्वती त्वा मघवन्नभिष्णक् ॥ ३४ ॥

अर्थ—हे इंद्रा, आईबाप मुलांचें रक्षण करितात त्याप्रमाणें दोघाही अश्विनीकुमारांनीं मंत्रांनीं व कर्मांनीं तुझें रक्षण केलें. कारण कीं हे इंद्रा, तूं नमुचिराक्षसवधादि कर्मांनीं अत्यंत रमणीय असा सोम विशेषेंकरून प्यालास. आणखी दुसरें कारण असें कीं सरस्वती देवी तुझी सेवा करते. म्हणजे तूं सोमपान केलेंस म्हणून व सरस्वती तुझी सेवा करते म्हणून अश्विनीकुमारांनीं तुझें रक्षण केलें ॥ ३४ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**
माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** दशमोऽध्यायः ॥ १० ॥

इति दशमोऽध्यायः समाप्तः ।

अथ एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥



विनियोग—अकराव्या अध्यायापासून अठराव्या अध्यायापर्यंत अग्निचयनाचे मंत्र आहेत. ' युञ्जानः प्रथमम् ' इत्यादि आठ मंत्रांनीं आज्याचा होम करावा.

युञ्जान॒ प्रथ॒मं मन॑स्त॒त्त्वाय॑ सावि॒ता धिय॑ः । अग्नेर्ज्योति॑र्नि॒चाय्य॑ पृथि॒व्याऽअध्याभ॑रत् ॥ १ ॥

अर्थ—सर्वप्रेरक व प्रथम मनाची एकाग्रता करणारा प्रजापतिरूपी चयनअग्नीचें तेज पंचपशूंमध्ये प्रविष्ट झाले असें समजून व इष्टकादि विषयक ज्ञानें मनांत आणून व बुद्धीनें त्यांचा निश्चय करून तें चयनाग्नीचे तेज पृथ्वींतून बाहेर एकत्र करिता झाला म्हणजे इष्टका (विटा) करून त्यानें अग्निचयन केले ॥ १ ॥

युक्तेन॒ मन॑सा व॒यं दे॒वस्य॑ सावि॒तु॒ः सवे । स्व॒र्ग्या॒य॒ शक्त्या॑ ॥ २ ॥

अर्थ—प्रेरक असा प्रजापति देवाच्या आज्ञेनें आम्ही एकाग्र अंतःकरणानें स्वर्गोपादककर्म आपल्या शक्तीप्रमाणें करण्याचा प्रयत्न करितों. ॥ २ ॥

युक्त्वाय॑ सविता दे॒वान्त्स्व॒र्यतो॑ धि॒या दिव॑म् । बृ॒हज्ज्योति॑ः करिष्य॒तः॒ सावि॒ता प्र॑सु॒वाति॒ तान् ॥ ३ ॥

अर्थ—प्रेरक असा सविता तेजाने प्रकाशणाऱ्या, स्वर्गाप्रत जाणाऱ्या व मोठें असे आदित्यतेज आपलेसे करणाऱ्या देवांना अग्निकर्मात युक्त करून प्रेरणा करितो म्हणजे त्यांचेकडून अग्निकर्म करवितो. ॥ ३ ॥

यु॒ञ्जते॒ मन॑ऽउ॒त यु॑ञ्जते॒ धियो॒ विप्रा॒ विप्र॑स्य बृ॒हतो॒ वि॑प॒श्चित॑ः । वि होत्रा॑ दधे वयु॒नाविदे॑कऽइन्म॒ही दे॒वस्य॑ सवि॒तुः॒ परि॑ष्टुतिः॒ ॥ ४ ॥

अर्थ—मोठ्या वेदवेत्त्या यजमानाचे होम करणारे ऋत्विज आपल्या मनाची व इंद्रियांची स्थापना लौकिक विषयांतून काढून यज्ञकर्मातच करितात. हे ऋत्विज व यजमान एका सर्वसाक्षी परमात्म्यानेच केले. कारण त्या अंतर्यामी ईश्वराची सर्वदा बोलली जाणारी ही मोठी स्तुति आहे. ॥ ४ ॥

यु॒जे वां॒ ब्रह्म॑ पू॒र्व्यं नमो॑भि॒र्विश्लो॑कऽएतु प॒थ्ये॑व सू॒रेः॒ । शृ॒ण्वन्तु॒ विश्वेऽ अमृ॑तस्य पु॒त्राऽआ ये धामा॑नि दि॒व्यानि॑ त॒स्थुः॒ ॥ ५ ॥

अर्थ—हे पत्नीयजमानांनो, मी तुमच्याकरितां घृताहुतियुक्त अन्नानें व पूर्व-महर्षींनीं आचरलेलें अग्निचयनाख्य कर्म करितों. यज्ञांतील आहुति उभय लोकांना व्याप्त करिते त्याप्रमाणें या यजमानाची कीर्ति उभयलोकांत गमन करो. अमर अशा प्रजापतीचे दिव्य लोकांत गेलेले पुत्र या यजमानाची कीर्ति श्रवण करोत. ॥ ५ ॥

यस्य प्रयाणमन्वन्यऽइयुर्देवा देवस्य महिमानमोजसा । यꣳ पार्थिवानि विममे सऽएतशो रजाꣳसि देवꣳ सविता महित्वना ॥ ६ ॥

अर्थ—बाकीचे देव ज्यांचें प्रयाण झालें असतां अवश्य अनुगमन करितात व तेजानें ज्याच्या मोठेपणाचें अनुसरण करते झाले व जो पृथिव्यादि लोकांची गणना करितो तो सविता देव आपल्या मोठेपणानें हे स्थावर जंगमात्मक जग व्याप्त करितो ॥ ६ ॥

देव सवितः प्रसुव यज्ञं प्रसुव यज्ञपतिं भगाय । दिव्यो गन्धर्वः केतपूः केतं नः पुनातु वाचस्पतिर्वाचं नः स्वदतु ॥ ७ ॥

अर्थ—हे प्रकाशमान सर्वप्रेरक सवित्या, या यजमानाकडून ऐश्वर्यप्राप्तीकरितां चयनयाग करून घे. तुझ्या प्रसादाने आकाशांत असलेला दुसऱ्याच्या मनांतील हेतु ओळखणारा व वाणीचा पालक सूर्यमंडलस्थ देव आमचे चित्तांतील ज्ञान शुद्ध करो. तसेंच त्यास आमची वाणी आवडो. ॥ ७ ॥

इमं नो देव सवितर्यज्ञं प्रणय देवाव्युꣳ सखिविदꣳ सत्राजितं धन-जितꣳ स्वर्जितम् । ऋचा स्तोमꣳ समर्धय गायत्रेण रथान्तरं बृहद्गायत्र-वर्त्तनि स्वाहा ॥ ८ ॥

अर्थ—हे सवितृ देवा, आमचा यज्ञ स्वर्गलोकाला पोंचव. तो यज्ञ देवांचा संतोष करणारा, या यजमानाला मित्र समजणारा, द्वादशाहादि सत्रांना वश करितात असा, गोधन हें ज्याचें फल आहे व जो स्वर्ग प्राप्त करून देतो असा आहे आणि हे सवित्या, तूं साम ज्यावर अधिष्ठित आहे अशा ऋग्वेदासह त्रिवृदादिक सोमाला वाढीव. तसेंच गायत्र सामासह रथंतर साम आणि गायत्र सामच ज्याचा मार्ग आहे असें बृहत्साम वाढव. ॥ ८ ॥

विनियोग–'देवस्यत्वा' इत्यादि दोन ऋचांनीं अग्नि हातांत घेऊन 'हस्त आधाय' या अकराव्या मंत्रानें तिचें अभिमंत्रण करावें.

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम् । आददे गायत्रेण छन्दसाङ्गिरस्वत्पृथिव्याः सधस्थादग्निं पुरीष्युमङ्गिरस्वदाभर त्रैष्टुभेन छन्दसाङ्गिरस्वत् ॥ ९ ॥

अर्थ—हे अग्ने, पूर्वी अंगिरा ऋषीनें तुझें ग्रहण केलें त्याप्रमाणें सवितृदेवाच्या प्रेरणेनें गायत्रछन्दयुक्त होऊन मी अश्विनीकुमारांच्या बाहूंनीं व पूष्याच्या हातांनीं तुझें ग्रहण करतों. तूं अंगिरा ऋषीप्रमाणेच पृथ्वीच्या उत्संगावरून त्रिष्टुप् छन्दानें अग्नि आण. तो अग्नि पशूंचें हित करणारा आहे ॥ ९ ॥

अभ्रिरसि नार्यसि त्वया वयमाग्निꣳ शकेम खनितुꣳ सधस्थऽआ । जागतेन छन्दसाङ्गिरस्वत् ॥ १० ॥

अर्थ—तूं उखासाधनभूत अभ्रि आहेस. तुला शत्रु नाहीं म्हणजे खणत असतां दगड वगैरे तुला अडवीत नाहीं. तुझ्या साहाय्यानें अंगिरा ऋषीप्रमाणें आम्ही पृथिवीच्या उत्संगांत असलेल्या अग्नीचे जागत छन्दाने खनन करण्यास समर्थ होऊं ॥ १० ॥

हस्तऽआधाय सविता बिभ्रदभ्रिꣳ हिरण्मयीम् । अग्नेर्ज्योतिर्निचाय्य पृथिव्याऽअध्याभरदानुष्टुभेन छन्दसाङ्गिरस्वत् ॥ ११ ॥

अर्थ—सविता अंगिरा ऋषीप्रमाणे सोन्याची अभ्रि हातांत घेऊन तिच्या साहाय्यानें अग्नीचें तेज निश्चयानें पाहून आनुष्टुभ छन्दाने पृथ्वींतून काढता झाला ॥ ११ ॥

विनियोग—' प्रतूर्त ' इत्यादि तीन ऋचांनीं अश्व, गर्दभ व अजा यांचें अभिमंत्रण करावें.

प्रतूर्त्तं वाजिन्नाद्रव वरिष्ठामनु संवतम् । दिविं ते जन्म परममन्तरिक्षे तव नाभिः पृथिव्यामधि योनिरित् ॥ १२ ॥

अर्थ—हे शीघ्रगामी अश्वा, उत्कृष्ट अशा या भूमीवर शीघ्र ये. येथें येणाऱ्या अश्वरूपी तुझा आदित्यरूपानें द्युलोकांत जन्म होईल. अन्तरिक्षांत तुझें उदर व भूलोकावर तुझे पायच आहेत ॥ १२ ॥

युञ्जाथाꣳ रासभं युवमस्मिन् यामे वृषण्वसू । अग्निं भरन्तमस्मयुम् ॥ १३ ॥

अर्थ—ज्यांचें द्रव्य फलप्रद आहे अशा हे अध्वर्युयजमानांनो, या यज्ञकर्मांत तुम्ही गर्दभाला बांधा. तो गर्दभ अग्निधारण करण्यास समर्थ व आमचा हितेच्छु आहे ॥ १३ ॥

योगे-योगे तवस्तरं वाजे-वाजे हवामहे । सखाय इन्द्रमूतये ॥ १४ ॥

अर्थ—परस्परस्नेही बनलेले ऋत्विग् व यजमान असे आम्ही इंद्रियसामर्थ्य देणाऱ्या अजाला आमचें रक्षण करण्याकरितां देवमनुष्यांस निरनिराळीं अन्नें देण्याकरितां बोलावतों. तो अज निरनिराळ्या सर्वकर्मांत अतिशय बलिष्ठ आहे ॥ १४ ॥

विनियोग—' प्रतूर्वन् ' इत्यादि तीन मंत्रांनी अश्वादिकांना स्पर्श न करतां भय दाखवून पूर्वेकडे घालवावें.

प्रतूर्वन्नेहि हर्यश्वक्रामन्नशस्ती रुद्रस्य गाणपत्यं मयोभूरेहि । उर्वन्तरिक्षं वीहि स्वस्तिगव्यूतिरभयानि कृण्वन् पूष्णा सयुजा सह ॥ १५ ॥

अर्थ—हे अश्वा, तूं शत्रूंचा नाश करणारा व अपकीर्ति निवारण करणारा असा होत्साता येथें ये व येथें आम्हाला सुख देऊन रुद्राच्या गणांचे आधिपत्य प्राप्त कर. हे गर्दभा, ऋत्विग्यजमानांना अभय देणारा असा युक्त होणाऱ्या पृथ्वीसह विस्तीर्ण अशा अन्तरिक्षांत गमन कर. ज्याचा मार्ग कल्याणकारक आहे असा तूं हो ॥ १५ ॥

विनियोग—तीनही अग्नि प्रदीप्त झाल्यावर ब्रह्मा, यजमान व अध्वर्यु यांनीं ' अग्निम् पुरीष्यम् ' हा मंत्र म्हणून श्वभ्रस्थ मृत्तिकापिंडाजवळ जावें. दुसऱ्या ' अग्निं पुरीष्यम् ' या मंत्रानें अग्नीकडे पहावें.

पृथिव्याः सधस्थादग्निं पुरीष्युमङ्गिरस्वदाभराग्निं पुरीष्युमङ्गिरस्वदच्छेमोऽग्निं पुरीष्युमङ्गिरस्वद्धरिष्यामः ॥ १६ ॥

अर्थ—हे अग्ने, अंगिरा ऋषीप्रमाणें पृथिवीच्या उत्संगावरून पशूंना हितकर असा अग्नि आण. अंगिरा ऋषीप्रमाणे आम्ही पशूंना हितकारक अशा अग्नीच्या सन्मुख जातों व अंगिरा ऋषीप्रमाणें आम्ही पशुहितकारी अशा अग्नीचें संपादन करतों ॥ १६ ॥

विनियोग—' अन्वग्निः ' या मंत्रभागानें मृत्तिकेच्या गोळ्याकडे पहावें.

अन्वग्निरुषसामग्रमक्ख्यदन्वहानि प्रथमो जातवेदाः । अनु सूर्यस्य पुरुत्रा च रश्मीननु द्यावापृथिवी आततन्थ ॥ १७ ॥

अर्थ—अग्नि उषःकालांना प्रकाशित करता झाला. उत्पन्न झालेल्या प्रत्येक वस्तूचें ज्याला ज्ञान आहे असा तो अग्नि मुख्य होऊन दिवसांना प्रकाशित करता झाला, तसेंच तो सूर्याच्या किरणांना पुष्कळ प्रकारें प्रकाशित करता झाला व त्यानें द्यावापृथिवींना क्रमेंकरून व्याप्त केलें. असा जो सर्वप्रकाशक अग्नि त्यास आम्ही पहातों ॥ १७ ॥

विनियोग—' आगत्य ' इत्यादि मंत्रभागानें अश्वाचें अभिमंत्रण करावें.

आगत्य वाज्यध्वानꣳ सर्वा मृधो विधूनुते । अग्निꣳ सधस्थे महति चक्षुषा निचिकीषते ॥ १८ ॥

अर्थ—वेगवान् हा घोडा मार्गांत येऊन सर्व संग्राम व श्रम दूर करतो. नंतर श्रमरहित होऊन उत्कृष्ट अशा जवळच पृथ्वीवरील अग्न्युत्पत्तिस्थानाकडे पहातो ॥१८॥

विनियोग—' आक्रम्य ' या मंत्रानें घोडयाचा डावा पाय मातीच्या गोळ्यावर ठेववावा.

आक्रम्य वाजिन्पृथिवीमग्निमिच्छ रुचा त्वम् । भूम्या वृत्वाय नो ब्रहि यतꣳ खनेम तं वयम् ॥ १९ ॥

अर्थ—हे शीघ्रगामी अश्वा, पायानें पृथ्वीला स्पर्श करून दीप्तीनें अग्न्युत्पादक मृत्तिकेचा शोध कर. व तसा स्पर्श करून हा प्रदेश अग्न्युत्पादक मृत्तिकेस योग्य आहे असें आम्हास सांग म्हणजे आम्ही तेथें खणून अग्निसंपादन करूं ॥ १९ ॥

विनियोग—अश्वपृष्ठावर हात ठेवून अध्वर्यूनें ' द्यौस्ते ' हा मंत्र म्हणावा.

द्यौस्ते पृष्ठं पृथिवी सधस्थमात्मान्तरिक्षꣳ समुद्रो योनिः । विख्याय चक्षुषा त्वमभि तिष्ठ पृतन्यतः ॥ २० ॥

अर्थ—हे अश्वा, द्युलोक तुझें पृष्ठ आहे, पृथ्वीलोक पाय आहेत व अन्तरिक्षलोक तुझा आत्मा आहे व उदक तुझें उत्पत्तिस्थान आहे. अशा रीतीनें ज्याची स्तुति होते असा तूं उखायोग्य मृत्तिका आपल्या डोळ्यानें पहा व संग्रामेच्छु व मृत्तिकेंत लपून बसलेल्या राक्षसादिक शत्रूंवर पाय देऊन त्यांचा नाश कर ॥ २० ॥

विनियोग—' उत्क्राम ' या मंत्रानें मृत्तिकापिंडावरून अश्वाला बाजूला करावा.

उत्क्रामं महते सौभगायास्मादास्थानाद् द्रविणोदा वाजिन् । वयं स्याम सुमतौ पृथिव्याऽअग्निं खनन्तऽउपस्थेऽअस्याꣳ ॥ २१ ॥

अर्थ—हे वेगवान् अश्वा, माझी भाग्यवृद्धि व्हावी म्हणून या खनन प्रदेशावरून बाजूला हो. तूं द्रव्य देणारा आहेस. या पृथ्वीनें आमच्याविषयीं सद्बुद्धि धारण करावी; कारण तिच्या वरच्या भागची माती आम्ही खणतों ॥ २१ ॥

विनियोग—'उदक्रमीत्' या मंत्रानें खाली उतरलेल्या अश्वाचें अभिमंत्रण करावें.

उदक्रमीद् द्रविणोदा वाज्यर्वाकꣳ सुलोकꣳ सुकृतं पृथिव्याम् । ततः खनेम सुप्रतीकमग्निꣳस्वो रुहाणाऽअधि नाकमुत्तमम् ॥ २२ ॥

अर्थ—वेगवान् व द्रव्यदाता घोडा ज्या प्रदेशांतून उतरला त्या पृथिवीवरील चांगल्या स्थानाला त्यानें पुण्यवान् केलें. त्या प्रदेशांतून आम्ही उत्तममुख अशा अग्नीस हेतुभूत मृतिका खणतों व दुःखरहित आणि उत्तम अशा स्वर्गाच्या इच्छेनें आम्ही हें कर्म करतों ॥ २२ ॥

विनियोग—'आत्वा जिघर्मि' या मंत्रानें घोडयाच्या पावलाचे जागीं घृताचा होम करावा.

आ त्वा जिघर्मि मनसा घृतेन प्रतिक्षियन्तं भुवनानि विश्वा । पृथुं तिरश्चा वयसा बृहन्तं व्यचिष्ठमन्नै रभसं दृशानम् ॥ २३ ॥

अर्थ—हे अग्नि, मी श्रद्धायुक्त अंतःकरणानें तुझ्यांत घृताचा होम करून तुला प्रदीप्त करतों. तूं सर्व भूतांत निवास करणारा, तिर्यग्गमन करणाऱ्या तेजानें विस्तृत, धूरानें विस्तीर्ण, पुष्कळ जागा व्याप्त करणारा, घृतादिक अन्नांनीं उत्साहयुक्त व प्रत्यक्ष दृश्य असा आहेस. ॥ २३ ॥

आ विश्वतः प्रत्यञ्चं जिघर्म्यरक्षसा मनसा तज्जुषेत । मर्यश्री स्पृहयद्वर्णोऽअग्निर्नाभिमृशे तन्वा जभुराणꣳ ॥ २४ ॥

अर्थ—मी प्रत्यगात्मभूत अशा अग्नीला सर्व बाजूंनीं प्रदीप्त करतों. त्या अग्नीनें क्रूरतारहित अशा अंतःकरणानें घृताचें सेवन करावें. तो अग्नि मनुष्यांना सेव्य, स्पृहणीय रूपाचा व स्पर्श करण्यास कठीण अशा ज्वालात्मक शरीरानें सर्व बाजूंना गमन करणारा असा आहे ॥ २४ ॥

विनियोग—'परि वाजपतिः' या मंत्रानें अग्नीनें मृत्तिकापिंडावर तीन रेघा ओढाव्या.

परि वाजपतिꣳ कविरग्निर्हव्यान्यक्रमीत्। दधद्रत्नानि दाशुषे॥ २५॥

अर्थ—हा अग्नि निरनिराळीं हविर्द्रव्यें भक्षणाकरितां स्वीकारता झाला. तो अग्नि अन्नांचा स्वामी, भूतवस्तूंचें दर्शन करणारा व हविर्भाग देणाऱ्या यजमानाला धनें देणारा असा आहे॥ २५॥

परिं त्वाग्ने पुरं वयं विप्रꣳसहस्य धीमहि। धृषद्वर्णं दिवे-दिवे हन्तारं मङ्गुरावताम्॥ २६॥

अर्थ—मंथनापासून बलानें उत्पन्न होणाऱ्या हे अग्ने, आम्ही सर्व तन्हेनें तुझें ध्यान करतों. तूं आग्नेय्यादि नगरांचा रक्षक, बुद्धिमान्, असह्यरूपी व प्रत्येक दिवशीं राक्षसांचा नाशक असा आहेस॥ २६॥

त्वमग्ने युभिस्त्वमाशुशुक्षणिस्त्वमभ्यस्त्वमश्मनस्परि। त्वं वनेभ्यस्त्वमोषधीभ्यस्त्वं नृणां नृपते जायसे शुचिः॥ २७॥

अर्थ—हे मनुष्यपालका अग्ने, तूं प्रत्येक दिवशीं मंथनानें उत्पन्न होतोस व शीघ्र तमाचा नाशक आहेस. तसेंच वर्षधारांपासून विजेच्या रूपानें, पाषाणांत, अरणिकाष्ठांत, बांबूंच्या संघटनांत व यजमानांचे घरीं उत्पन्न होतोस आणि शुद्धिकारक आहेस॥ २७॥

विनियोग—अग्नीनें मातीचा गोळा फोडावा.

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम्। पृथिव्याꣳ सधस्थादग्निं पुरीष्युमङ्गिरस्वत् खनामि। ज्योतिष्मन्तं त्वाग्ने सुप्रतीकमजस्रेण भानुनादीधयतम्। शिवं प्रजाभ्योऽहिꣳसन्तं पृथिव्याꣳ सधस्थादग्निं पुरीष्युमङ्गिरस्वत्खनामसꣳ॥ २८॥

अर्थ—अंगिरा ऋषीप्रमाणें मी सवितृ देवाच्या प्रेरणेनें अश्विनीकुमारांच्या बाहूंनीं व पूष्याच्या हातांनीं पृथिवीच्या वरील प्रदेशावरून पशूंना हितकारक व ज्वालायुक्त अशा अग्नीचें खनन करतों. हे अग्ने, अंगिरा ऋषीप्रमाणें मी पुनः पृथ्वीच्यावरील प्रदेशावरून तुझें खनन करतों. तूं शोभनमुखाचा, निरंतर प्रकाशानें युक्त असा आहेस. हे अग्ने, अंगिरा ऋषीप्रमाणें पृथ्वीच्या वरील प्रदेशावरून पशूंना हितकारक अशा तुझें खनन करतों. तूं प्रजांचें कल्याण करणारा व हिंसा न करणारा असा आहेस॥२८॥

विनियोग—मृत्पिण्डाचे उत्तरभागीं कृष्णाजिन पसरावें त्यावर 'अपां पृष्ठं' या मंत्रभागानें कमलिनीपत्राचें आच्छादन करावें. 'दिवः' या मंत्रानें कमलिनी पत्र पसरावें.

अपां पृष्ठमसि योनिरग्नेꣳ समुद्रमभितꣳ पिन्वमानम्। वर्धमानो महाँ २ऽआ च पुष्करे दिवो मात्रया वरिम्णा प्रथस्व ॥ २९ ॥

अर्थ—हे पुष्करपर्णा, तूं जलाचें पृष्ठ आहेस व या अग्नीकरितां असणाऱ्या मृत्तिकापिंडाचें कारण आहेस. तसेंच सर्व बाजूंनीं वाहणाऱ्या या जलाची प्रीति करणारे आहेस व या जलांत पुष्कळ प्रकारे तूं वृद्धिंगत होतोस. हे पुष्करपर्णा, द्युलोकाच्या प्रमाणानें व मोठेपणानें तूं विस्तृत हो ॥ २९ ॥

विनियोग—'शर्मच' इत्यादि मंत्रानें कृष्णाजिन व पुष्करपर्ण या दोघांना स्पर्श करावा.

शर्म च स्थो वर्म च स्थोऽछिद्रे बहुलेऽउभे। व्यचस्वती संवसाथां भृतमग्निं पुरीष्युम् ॥ ३० ॥

अर्थ—हे कृष्णाजिनपुष्करपर्णांनो, तुम्ही अग्नीला सुखकारक आहांत व कवचाप्रमाणें त्याचें रक्षण करतां. तुम्ही दोघे छिद्ररहित, सर्वावयवविशिष्ट व अवकाशयुक्त आहां. तुम्ही पशूंना हितकारक अग्नीचें चांगले आच्छादन करा व त्याचें धारण करा ॥ ३० ॥

संवसाथाꣳ स्वविदा समीचीऽउरसात्मना। अग्निमन्तर्भरिष्यन्ती ज्योतिष्मन्तमजस्रमित् ॥ ३१ ॥

अर्थ—हे कृष्णाजिनपुष्करपर्णांनो, तेजस्वी अग्नीचे निरंतर उदरांत धारण करणाऱ्या तुम्ही विस्तृत अशा आपल्या शरीरानें अग्नीचें आच्छादन करा. तुम्ही स्वर्गलाभाचें साधन यज्ञ, सूर्य, देव अहर्वाच्य असून एकचित्तानें वागणारे आहां ॥ ३१ ॥

विनियोग—'पुरीष्योऽसि' या मंत्रानें मृत्तिकापिण्डाला स्पर्श करावा व तो 'त्वामग्ने' या मंत्रानें पुष्करपर्णावर ठेवावा.

पुरीष्योऽसि विश्वभराऽअथर्वा त्वा प्रथमो निरमन्थदग्ने ॥ त्वामग्ने पुष्करादध्यथर्वा निरमन्थत। मूर्ध्नो विश्वस्य वाघतः ॥ ३२ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं पशूंचें हित करणारा व सर्व जगाचा पोषक आहेस. हे अग्ने,

सर्वांत पूर्वी उत्पन्न झालेल्या अथर्व ऋषीनें तुझें मंथन केलें. हे अग्ने, अथर्व ऋषीनें उदकापासून तुझें मंथन केलें व सर्व जगांतील ऋत्विजांनीं अरणीच्या शीर्षांतून तुझें मंथन केलें ॥ ३२ ॥

तमु त्वा दध्यङ्ङृषिः पुत्रऽईधेऽअथर्वणः । वृत्रहणं पुरन्दरम् ॥३३॥

अर्थ—हे अग्ने, अथर्व ऋषीच्या दध्यङ् नामक पुत्रानें पूर्वोक्त गुणविशिष्ट अशाच तुला प्रज्वलित केलें. तूं वृत्रासुराचा व राक्षसांच्या नगरांचा नाशक आहेस ॥ ३३ ॥

तमु त्वा पाथ्यो वृषा समीधे दस्युहन्तमम् । धनञ्जयꣳ रणे-रणे ॥३४॥

अर्थ—हे अग्ने, सन्मार्गवर्ती व वीर्यसेचक मन तुला प्रदीप्त करतें. तूं अतिशयें करून शत्रुनाशक व प्रत्येक संग्रामांत धन जिंकणारा असा आहेस ॥ ३४ ॥

सीद होतः स्वऽउ लोके चिकित्वान्त्सादया यज्ञꣳसुकृतस्य योनौ । देवावीर्देवान्हविषा यजास्यग्ने बृहद्यजमाने वयो धाः ॥ ३५ ॥

अर्थ—हे देवांना बोलावणाऱ्या अग्ने, स्वतःचा अधिकार जाणणारा तूं आपल्याच कृष्णाजिनरूपी स्थानावर बैस व तूं चांगल्या केलेल्या यज्ञाच्या कृष्णाजिनरूपी स्थानावर यज्ञाचें स्थापन कर. हे अग्ने, तूं देवांना संतुष्ट करणारा व हविर्द्रव्यानें त्यांचें यजन करणारा आहेस म्हणून या यजमानाला पुष्कळ अन्न दे ॥ ३५ ॥

नि होता होतृषदने विदानस्त्वेषो दीदिवाँऽ असदत्सुदक्षः । अदब्ध-व्रतप्रमतिर्वसिष्ठः सहस्रम्भरः शुचिर्जिह्वोऽअग्निः ॥ ३६ ॥

अर्थ—होता बसतो त्या स्थानाला होतृषदन म्हणतात. देवांचें आव्हान करणारा अग्नि होतृसदनावर बसला. तो स्वतःचा अधिकार जाणणारा, दीप्तिमान्, होतृ-स्थानांत गेलेला शीघ्रकार्यकर्ता, अहिंस्यव्रत व सद्बुद्धि धारण करणारा, अतिशयें-करून स्वस्थानांत राहणारा, हजारो लोकांचा पोषक व ज्याची ज्वालारूपी जिव्हा शुद्ध आहे असा (तात्पर्य निरनिराळ्या देवांचीं हविर्द्रव्यें अग्नीच्या मुखांत उच्छिष्ट होत नाहींत) आहेस ॥ ३६ ॥

सꣳ सीदस्व महाँऽअसि शोचस्व देववीतमः । वि धूममग्नेऽअरुषं मियेध्य सृज प्रशस्त दर्शतम् ॥ ३७ ॥

अर्थ—हे यज्ञार्ह व प्रशस्त अग्ने, तूं या कमलपत्रावर चांगला बैस. तूं मोठा

आहेस याकरितां प्रकाशित हो. तसेंच तूं देवांना अतिशयेंकरून संतुष्ट करणारा आहेस. तूं दिसण्यांत उत्तम व अप्रकाशमान असा धूर सोड ॥ ३७ ॥

विनियोग—'अपो देवीः' या मंत्रानें मातीच्या गोळ्यांत खड्डा करून त्यांत पाणी ओतावें.

अपो देवीरुपसृज मधुमतीरयक्ष्माय प्रजाभ्यः। तासामास्थानादुज्जिहतामोषधयः सुपिप्पलाः ॥ ३८ ॥

अर्थ—हे अग्ने, या खनन प्रदेशावर प्रकाशमान, मधुररसयुक्त व आरोग्य देणारीं जलें प्रजांच्या आरोग्याकरितां शिंपड. या सिंचित स्थानांतून उत्तम फलयुक्त औषधि उत्पन्न होवोत ॥ ३८ ॥

विनियोग—'सं ते' या मंत्रानें वारा घालावा.

सं ते वायुर्मातरिश्वा दधातूत्तानाया हृदयं यद्विकस्तम्। यो देवानां चरसि प्राणथेन कस्मै देव वषडस्तु तुभ्यम् ॥ ३९ ॥

अर्थ—हे पृथिवि, ऊर्ध्वमुख असलेल्या अशा तुझें हृदयासारखें जें खननस्थान पिण्डगर्तरूपानें विकसित झालें त्या स्थानाप्रत आकाशांत संचार करणारा वायु जल टाकून पूर्वीप्रमाणें करो. हे प्रकाशयुक्त वायो, तूं देवांच्या प्राणस्वरूपानें संचार करतोस अशा प्रजापतिस्वरूपी तुला ही पृथिवी सुहुत असो ॥ ३९ ॥

विनियोग—'सुजातः' या मंत्रानें पसरलेल्या कृष्णाजिन व पुष्करपर्णाचे अग्रभाग वर करावे. 'वासो अग्ने' या मंत्रभागानें कृष्णाजिन व पुष्करपर्णाचे अग्रभाग मुंजाच्या दोरीनें बांधावे.

सुजातो ज्योतिषा सह शर्म वरूथमासदत्स्वः। वासोऽअग्ने विश्वरूपꣳ संव्ययस्व विभावसो ॥ ४० ॥

अर्थ—चांगला उत्पन्न झालेला हा अग्नि आपल्या तेजासह स्वर्गासारख्या स्पृहणीय गृह अशा या कृष्णाजिनरूपी स्थानावर सुखानें बसो. हे प्रकाशमान अग्ने, चित्रविचित्र असें कृष्णाजिनरूपी वस्त्र चांगल्या रीतीनें धारण कर ॥ ४० ॥

विनियोग—'उदु तिष्ठ' या मंत्रभागानें उठावें.

उदु तिष्ठ स्वध्वरावा नो देव्या धिया। दृशे च भासा बृहता सुशुक्रनिराग्ने याह्यसुशस्तिभिः ॥ ४१ ॥

अर्थ--हे यागसंपादक अग्ने, ऊठ व क्रीडापर अशा बुद्धीनें आमचें रक्षण कर. हे अग्ने, किरणांना पसरणारा असा तूं चांगल्या घोड्यावर बसून प्रौढ दीप्तीनें सर्व प्राण्यांना पहाण्याकरितां ये ॥ ४१ ॥

विनियोग--' ऊर्ध्व ऊषुणः ' या मंत्रभागानें हात लांब करून पूर्वेकडील गोळा उचलावा.

ऊर्ध्वऽऊ षुणऽऊतये तिष्ठा देवो न सविता । ऊर्ध्वो वाजस्य सनिता यदञ्जिभिर्वाघद्भिर्विह्वयामहे ॥ ४२ ॥

अर्थ--हे अग्ने, सवितृदेवाप्रमाणें वर चांगले प्रकारें उभा राहूनच आमचें रक्षण कर व आम्हाला अन्न दे. कारण कीं मंत्राभिव्यञ्जक व हविर्धारण करणाऱ्या ऋत्विजासह तुला आम्ही बोलावतों ॥ ४२ ॥

विनियोग--' स जात ' इत्यादि तीन मंत्रांनीं अश्व, गर्दभ व अज यांचें अभिमंत्रण करावें.

स जातो गर्भो ऽअसि रोदस्योरग्ने चारुर्विभृतऽओषधीषु । चित्रः शिशुः परि तमाꣳसि क्षतून्प्र मातृभ्योऽअधि कनिक्रदद्गाः ॥ ४३ ॥

अर्थ--हे अग्ने, द्यावापृथिवींचा गर्भ होऊन तो तूं जन्माला आलास. तूं पूज्य, पुरोडाशादि सर्व ओषधींत भरलेला, विचित्र स्वरूपाचा व स्तुत्य असा आहेस. तूं रात्रीचा अंधकार दूर करून मोठा शब्द करीत ओषधि-वनस्पतीपासून लवकर जा. ॥ ४३ ॥

स्थिरो भव वीड्वङ्गऽआशुर्भव वाज्यर्वन् । पृथुर्भव सुषदस्त्वमग्नेः पुरीषवाहणः ॥ ४४ ॥

अर्थ--हे गमनकुशल रासभा, तूं स्थिर व दृढ शरीराचा हो, तूं वेगवान् होऊन अन्न देणारा हो व विस्तीर्ण होऊन अग्नीला सुखानें बसतां येईल असा हो. तूं मृत्तिका अथवा तृण धारण करणारा आहेस. ॥ ४४ ॥

शिवो भव प्रजाभ्यो मानुषीभ्यस्त्वमङ्गिरः । मा द्यावापृथिवीऽअभि शोचीर्मान्तरिक्षं मा वनस्पतीन् ॥ ४५ ॥

अर्थ—हे अग्निरूपी अजा, तूं मनूपासून उत्पन्न झालेल्या प्रजांचें कल्याण कर. व द्यावापृथिवी, अन्तरिक्ष आणि वनस्पतींना ताप देऊं नकोस ॥ ४५ ॥

विनियोग—अश्वादिकांवर पिण्ड ठेवून त्यांना स्पर्श न करतां 'प्रैतु वाजी' वगैरे मंत्र म्हणावे. नंतर 'अग्न आयहि' हा मंत्र म्हणून रासभावरून पिण्ड काढून अजावर ठेवावा.

प्रैतु वाजी कनिक्रदद्भानंदद्रासभꣳ पत्वा । भरन्नग्निं पुरीष्यं मा पाया-युषꣳ पुरा । वृषाग्निं वृषणं भरन्नपां गर्भꣳ समुद्रियम् । अग्नऽआयाहि वीतये ॥ ४६ ॥

अर्थ—घोडा खिंकाळत गमन करो. तसेंच धावण्याचा स्वभाव ज्याचा आहे असा गर्दभ ओरडतच मृत्तिका, तृण आणण्याकरितां गमन करो. हा घोडा पशूंना हितकर अशा अग्नीला धारण करून कर्मसमाप्तीच्या पूर्वी न मरो. तसेंच वीर्यसिंचन करणारा हा रासभ अग्नीचें धारण करून गमन करो. तो अग्नि फलवृष्टि करणारा, जलांचा गर्भ म्हणजे वीजरूपी व समुद्रांत वडवाग्निरूपानें उत्पन्न झालेला असा आहे. हे अग्ने, हविर्द्रव्याचें भक्षण करण्यास ये ॥ ४६ ॥

विनियोग—अग्नि प्रज्वलित झाल्यावर अध्वर्यूनें 'अग्निं पुरीष्यम्' हा मंत्र म्हणून नास्तिक पुरुषाचें अवलोकन करावें. नंतर आहवनीयाच्या उत्तरभागीं पूर्वीच तयार केलेल्या आच्छादित व वाळू पसरलेल्या जागीं पिण्ड स्थापन करावें.

ऋतꣳ सत्यमृतꣳ सत्यमग्निं पुरीष्यमङ्गिरस्वद्धरामऽ । ओषधयऽ प्रतिमोदध्वमग्निमेतꣳ शिवमायन्तमभ्यत्र युष्माꣳ । व्यस्यन् विश्वाऽ-अनिराऽअमीवा निषीदन्नोऽअप दुर्मतिं जहि ॥ ४७ ॥

अर्थ—मी मोठ्या आदरानें ऋत व सत्यस्वरूपी अग्नीचें आनयन करतों. अंगिरा ऋषीप्रमाणें आम्ही पशुहितकर अशा अग्नीला आणतों, हे ओषधींनो, अभ्युत्थान वगैरेंनीं या अग्नीला तुम्ही आनंदित करा. तो अग्नि शांत व तुमच्या सन्मुख येणारा असा आहे. हे अग्ने, तूं येथें बसून, आमच्या सर्व अनावृष्ट्यादि पीडा व रोगांना दूर करून आमच्या दुर्बुद्धीचा नाश कर ॥ ४७ ॥

ओषधयऽ प्रतिगृभ्णीत पुष्पवतीऽ सुपिप्पलाꣳ । अयं वो गर्भऽऋत्वियः प्रत्नꣳ सधस्थमासदत् ॥ ४८ ॥

अर्थ—हे ओषधींनो, प्रशस्त पुष्पें व फलें धारण करणाऱ्या तुम्ही या अग्नीचा स्वीकार करा. हा अग्नि ऋतुकालीं तुमचा गर्भ होऊन तुमच्या पुरातन अशा गर्भ-स्थानाला प्राप्त होतो ॥ ४८ ॥

विनियोग—'विपाजसा' इत्यादि मंत्रभागानें कृष्णाजिनांतील पिंड मोकळा करून छागाचे केश ग्रहण करून अश्वादिकांना ईशान्य दिशेकडे घालवावें.

वि पाजसा पृथुना शोशुचानो बाधस्व द्विषो रक्षसोऽअमीवाः । सुशर्मणो बृहतः शर्मणि स्यामग्नेरहꣳ सुहवस्य प्रणीतौ ॥ ४९ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं शत्रु, राक्षस व व्याधि यांचा निरास कर. तूं विस्तीर्ण अशा सामर्थ्यानें प्रदीप्त होणारा आहेस. अग्नीची सेवा केली असतां मीं सुखी व्हावें. तो अग्नि चांगला सुखकर, प्रौढ व बोलावण्यास सुलभ असा आहे ॥ ४९ ॥

विनियोग—पळसाच्या सालीच्या काढ्यांत उकळलेलें पाणी 'आपो हिष्ठा' इत्यादि तीन ऋचांनीं पिंडावर घालावें.

आपो हि ष्ठा मयोभुवस्ता नऽऊर्जे दधातन । महे रणाय चक्षसे ॥५०॥

अर्थ—हे जलांनो, तुम्ही सुखकारक आहां म्हणून आम्हांला तुमचा रस उपभोगूं द्या व आम्हांला रमणीय ब्रह्माच्या साक्षात्काराला योग्य करा ॥ ५० ॥

यो वः ÷ शिवतमो रसस्तस्य भाजयतेह नः ÷ । उशतीरिव मातरः ÷ ॥ ५१ ॥

अर्थ—हे जलांनो, तुमचा जो अत्यंत कल्याणकारक रस आहे तो या लोकांत राहणाऱ्या आम्हांला प्रेमी आयांप्रमाणें मिळवून द्या. ॥ ५१ ॥

तस्माऽअरं गमाम वो यस्य क्षयाय जिन्वथ । आपो जनयथा च नः ॥ ५२ ॥

अर्थ—हे जलांनो, तुमच्या रसानें आमची तृप्ति होवो. तुम्ही त्या रसाचे अंशानें जगाला संतुष्ट करतां. आणखी हे जलांनो, आम्हांला त्या रसाचे भोक्ते करा. ॥५२॥

विनियोग—'मित्रः सꣳसृज्य' या मंत्रानें अजादिलोम पिण्डांत मिसळावे.

मित्रꣳ सꣳसृज्य पृथिवीं भूमिं च ज्योतिषा सह । सुजातं जातवेदसमयक्ष्मायं त्वा सꣳसृजामि प्रजाभ्यः ÷ ॥ ५३ ॥

अर्थ—आदित्य द्युलोकाला व या मृत्पिण्डरूपी पृथिवीला अजलोमांत मिसळून मी जो अध्वर्यु त्याकारणें देवो व मीहि चांगल्या रीतीनें उत्पन्न झालेल्या व प्रज्ञानयुक्त अजलोमाख्य अशा अग्निरूपी तुला प्रजा नीरोगी व्हावी म्हणून पिण्डांत मिसळतों ॥ ५३ ॥

विनियोग—'रुद्राः सꣳसृज्य' या मंत्रानें रेती वगैरे पदार्थ पिण्डांत मिसळावेत.

रुद्राꣳ सꣳसृज्य पृथिवीं बृहज्ज्योतिꣳ समीधिरे । तेषां भानुरजस्रऽइच्छुक्रो देवेषु रोचते ॥ ५४ ॥

अर्थ—जे रुद्र मृत्पिण्डाला रेती वगैरे पदार्थांनीं मिसळून अत्यंत प्रकाशमान अग्नीला प्रदीप्त करते झाले त्या रुद्रांची शुद्ध कांति क्षीण न होतांच देवांमध्यें प्रकाश पावते. ॥ ५४ ॥

विनियोग—' सꣳसृष्टाम् ' या तीन मंत्रभागांनीं मृत्तिकापिण्डांत सिनीवाली वगैरेचें मिश्रण करावें.

सꣳसृष्टां वसुभी रुद्रैर्धीरैꣳ कर्मण्युां मृदम् । हस्ताभ्यां मृद्वीं कृत्वा सिनीवाली कृणोतु ताम् ॥ ५५ ॥

अर्थ—चन्द्रकलायुक्त अमावास्येला सिनीवाली म्हणतात. त्या सिनीवालीची देवता हातांनीं मृत्तिकेला मऊ करून पुनः यज्ञकर्माला योग्य करो. ती मृत्तिका बुद्धिमान् अशा वसु व रुद्रांनीं सेवन केलेली अशी आहे ॥ ५५ ॥

सिनीवाली सुकपर्दा सुकुरीरा स्वौपशा । सा तुभ्यमदिते महयोखां दधातु हस्तयोꣳ ॥ ५६ ॥

अर्थ—हे देवमाते, व हे महति, वरच्या मंत्रांत सांगितलेली सिनीवाली तुमच्या हातांत उखा स्थापन करो. ती सिनीवाली उत्तम वेणी व मुकुट धारण करणारी आणि विलासांत चतुर अशा उत्तम अवयवांनीं युक्त आहे ॥ ५६ ॥

विनियोग—' मखस्य शिरः ' या मंत्रभागानें यजमानानें स्वतः पिण्डांतील मृत्तिकेची उखा करावी.

उखां कृणोतु शक्त्या बाहुभ्यामदितिर्धिया । माता पुत्रं यथोपस्थे साग्निं बिभर्तु गर्भऽआ । मखस्य शिरोऽसि ॥ ५७ ॥

अर्थ—देवमाता अदिति, सामर्थ्यानें, बुद्धीनें व हस्तांनीं उखेचें निर्माण करो. अशा रीतीनें निर्मिलेली उखा आई गर्भाचें धारण करते त्याप्रमाणें अग्नीचें धारण करो. हे मृत्पिण्डा, तूं यज्ञाचें शिर आहेस ॥ ५७ ॥

विनियोग—नंतर ' वसवस्त्वा ' या मंत्रानें मातीचा गोळा मोठा करावा. नंतर त्याचे कांठ उंच करून त्यांत पहिला मातीचा गोळा ' रुद्रास्त्वा ' या मंत्रभागानें

मिसळावा. तदनंतर 'आदित्यास्त्वा' या मंत्रानें दुसरा गोळा मिसळावा. नंतर 'विश्वेत्वा' या मंत्रानें सारखी करावी.

वसवस्त्वा कृण्वन्तु गायत्रेण छन्दसाङ्गिरस्वद्ध्रुवासिं पृथिव्युसि धारया मयिं प्रजाꣳ रायस्पोषं गौपत्यꣳ सुवीर्यꣳ सजातान्यजमानाय रुद्रास्त्वा कृण्वन्तु त्रैष्टुभेन छन्दसाङ्गिरस्वद्ध्रुवास्यन्तरिक्षमसि धारया मयिं प्रजाꣳ रायस्पोषं गौपत्यꣳ सुवीर्यꣳ सजातान्यजमानायादित्यास्त्वा कृण्वन्तु जागतेन छन्दसाङ्गिरस्वद्ध्रुवासि द्यौरसि धारया मयि प्रजाꣳ रायस्पोषं गौपत्यꣳ सुवीर्यꣳ सजातान्यजमानाय विश्वे त्वा देवा वैश्वानराꣳ कृण्वन्त्वानुष्टुभेन छन्दसाङ्गिरस्वद्ध्रुवासि दिशोऽसि धारया मयिं प्रजाꣳ रायस्पोषं गौपत्यꣳ सुवीर्यꣳ सजातान्यजमानाय ॥ ५८ ॥

अर्थ—हे उखे, वसुसंज्ञक देव अंगिरो ऋषीप्रमाणें गायत्रीछन्दानें तुझें निर्माण करोत. अशा रीतीनें निर्मित झालेली तूं स्थिर व पृथ्वीरूपी आहेस म्हणून तूं यजमान अशा माझे ठायीं पुत्रादिक प्रजा, धनाचें पोषण, गाईचे आधिपत्य, उत्तम पराक्रम आणि सोदरभ्राते स्थापन कर म्हणजे हें सर्व मला दे. तसेंच हे उखे, रुद्र त्रैष्टुभ छन्दानें, आदित्य जागत छन्दानें व वैश्वानर आनुष्टुभ छन्दानें तुला निर्माण करते झाले; अशी तूं क्रमेंकरून अन्तरिक्षरूपी, द्युरूपी व दिग्रूपी आहेस म्हणून माझेठायीं पुत्रादिक सर्व पूर्वोक्त पदार्थ स्थापन कर ॥ ५८ ॥

विनियोग—'अदित्यै रास्नासि' या मंत्रभागानें उखेच्या तिसऱ्या भागावरील रेघेवर मृत्तिकामेखला स्थापन करावी. नंतर उखेच्या मुखाला 'अदितिष्टे' या मंत्रानें स्पर्श करावा. नंतर ती 'कृत्वाय' या मंत्रभागानें भूमीवर ठेवावी.

अदित्यै रास्नास्यदितिष्टे बिलं गृभ्णातु । कृत्वाय सा महीमुखां मृन्मयीं योनिमग्नये । पुत्रेभ्यꣳ प्रायच्छददितिꣳ श्रपयानिति ॥ ५९ ॥

अर्थ—हे रेखे, तूं अदितिरूपी उखेची रास्ना म्हणजे कंबरपट्टा आहेस. हे उखे, देवमाता तुझ्या मध्याचें ग्रहण करो. ती देवमाता मोठी, मृत्तिकानिर्मित व अग्नीचें स्थानभूत अशा उखेचें निर्माण करून तिचे पुत्र जे देव त्यांना 'हे पुत्रांनो, या उखेचें श्रवण करा. (उखा शिजवा)' असें म्हणाली व नंतर तिनें त्या देवांना ती उखा दिली ॥ ५९ ॥

विनियोग—घोड्याचे सात वाळलेल्या लीदेचे गोळे घेऊन 'वसवस्त्वा' इत्यादि सात मंत्रांनीं उखा प्रदीप्त करावी.

वसवस्त्वा धूपयन्तु गायत्रेण छन्दसाङ्गिरस्वद्रुद्रास्त्वा धूपयन्तु त्रैष्टुभेन छन्दसाङ्गिरस्वदादित्यास्त्वा धूपयन्तु जागतेन छन्दसाङ्गिरस्वद्विश्वे त्वा देवा वैश्वानरा धूपयन्त्वानुष्टुभेन छन्दसाङ्गिरस्वदिन्द्रस्त्वा धूपयतु वरुणस्त्वा धूपयतु विष्णुस्त्वा धूपयतु ॥ ६० ॥

अर्थ—हे उखे, अंगिरो ऋषीप्रमाणें आठ वसु गायत्रीछन्दानें, एकादश रुद्र त्रैष्टुभ छन्दानें, द्वादश आदित्य 'जागत छन्दानें, सर्व मनुष्यांना हितकर असे विश्वदेव आनुष्टुभ छन्दानें तुला प्रदीप्त करो, तसेंच इंद्र, वरुण व विष्णु तुला प्रदीप्त करोत ॥६०॥

विनियोग—' अदितिष्ट्वा ' या मंत्रभागानें अग्नीनें चतुष्कोण खड्ड्यांचें खनन करावें. नंतर ' देवानां त्वा ' या मंत्रानें खड्ड्यांत उखा पालथी घालावी. तदनंतर ' धिषणास्त्वा ' या मंत्रानें उखा दक्षिणाग्नींतील वह्नीनें प्रदीप्त करावी. नंतर उखेकडे पहात ' वरुत्रीष्ट्वा ' या तीन मंत्रांचा जप करावा.

अदितिष्ट्वा देवी विश्वदेव्यावती पृथिव्याꣳ सधस्थेऽअङ्गिरस्वत् खनत्वव्वट देवानां त्वा पत्नीर्देवीर्विश्वदेव्यावतीꣳ पृथिव्याꣳ सधस्थेऽअङ्गिरस्वद्धूतूखे धिषणास्त्वा देवीर्विश्वदेव्यावतीꣳ पृथिव्याꣳ सधस्थेऽअङ्गिरस्वद्भीन्धतामुखे वरूत्रीष्ट्वा देवीर्विश्वदेव्यावतीꣳ पृथिव्याꣳ सधस्थेऽअङ्गिरस्वच्छ्रपयन्तूखे ग्नास्त्वा देवीर्विश्वदेव्यावतीꣳ पृथिव्याꣳ सधस्थेऽअङ्गिरस्वत्पचन्तूखे जनयस्त्वाछिन्नपत्रा देवीर्विश्वदेव्यावतीꣳ पृथिव्याꣳ सधस्थेऽअङ्गिरस्वत्पचन्तूखे ॥ ६१ ॥

अर्थ—हे गर्ता (खड्या), अंगिरोऋषीप्रमाणें अदितिदेवी तुझें खनन करो. ती अदिति सर्व देवयुक्त आहे. हे उखे, विश्वेदेवांसहवर्तमान असलेल्या देवपत्नी म्हणजे ओषधि अंगिरोऋषीप्रमाणें पृथ्वीच्या ऊर्ध्वभागावर तुझें स्थापन करोत. हे उखे, अंगिरोऋषीप्रमाणें विश्वेदेवांसहवर्तमान वागभिमानिनी देवता तुला सर्व बाजूंनीं प्रदीप्त करोत. हे उखे, अंगिरोऋषीप्रमाणें विश्वेदेवांसह अहोरात्राभिमानिनी देवता तुला पृथ्वीच्या ऊर्ध्वभागावर शिजण्याच्या दशेला प्राप्त करोत. हे उखे, अंगिरो ऋषीप्रमाणें विश्वेदेवांसह छन्दोऽभिमानिनी देवता पृथ्वीच्या ऊर्ध्वभागावर तुला पूर्ण रीतीनें शिजवोत. तसेंच हे उखे, अंगिरो ऋषीप्रमाणें विश्वेदेवांसह सर्वदा गमन करणाऱ्या नक्षत्रपंक्ति पृथ्वीच्या वरील भागावर तुला शिजवोत ॥ ६१ ॥

विनियोग—' मित्रस्य त्वा ' या मंत्रभागानें शिजलेलें अन्न पात्रांतून काढावें.

मित्रस्य चर्षणीधृतोऽवो देवस्य सानसि । द्युम्नं चित्रश्रवस्तमम् ॥६२॥

अर्थ—मनुष्यांचें धारण करणारा प्रकाशक जो आदित्य त्याच्या सनातन अशा रक्षणाची व चित्रविचित्र अशा अन्नाची आम्ही स्तुति करतों ॥ ६२ ॥

विनियोग—' देवस्त्वा ' या मंत्रभागानें उखेंतील जळका भाग बाजूला करावा. ' अव्यथमाना ' या मंत्रभागानें उखेला ऊर्ध्वमुख करावें.

देवस्त्वा सवितोद्वपतु सुपाणिः स्वङ्गुरिः सुबाहुरुत शक्त्या । अव्यथमाना पृथिव्यामाशा दिशऽआपृण ॥ ६३ ॥

अर्थ—हे उखे, चांगले हात, अंगुलि व बाहु असलेला सविता देव आपल्या सामर्थ्यानें व चांगल्या बुद्धीनेंही तुला प्रकाशित करो. हे उखे, सवितृप्रकाशित अशी तूं न ढळतां पृथ्वीवर राहून पृथिव्यादिदिशा व आग्नेयादि विदिशांना आहुतिरसानें पूर्ण कर ॥ ६३ ॥

विनियोग—'उत्थाय' या मंत्रभागानें उखा हातांत धरून अवटाबाहेर काढावी. ' मित्रैतां ' या मंत्रभागानें उखा उत्तरेकडील पात्रांत ठेवावी.

उत्थाय बृहती भवोद्धु तिष्ठ ध्रुवा त्वम् । मित्रैतां तऽउखां परिदद्म्यभित्याऽएषा मा भेदि ॥ ६४ ॥

अर्थ—हे उखे, तूं या अवटांतून उठून बाहेर ये व मोठी हो; नंतर स्वकर्मांत प्रवृत्त हो. कारण हीं स्वभावतः स्थिर आहेत. हे सर्वप्राणिहित करणाऱ्या मित्रदेवा, हिचें रक्षण व्हावें व ही फुटूं नये म्हणून ही उखा तुला मी देतों ॥ ६४ ॥

विनियोग—' वसवस्त्वा ' वगैरे चार मंत्रांनीं अजादुग्ध ओतावें.

वसवस्त्वाच्छन्दन्तु गायत्रेण छन्दसाङ्गिरस्वद्रुद्रास्त्वाच्छन्दन्तु त्रैष्टुभेन छन्दसाङ्गिरस्वदादित्यास्त्वाच्छन्दन्तु जागतेन छन्दसाङ्गिरस्वद्विश्वे त्वा देवा वैश्वानराऽआच्छन्दन्त्वानुष्टुभेन छन्दसाङ्गिरस्वत् ॥ ६५ ॥

अर्थ—हे उखे, अंगिरो ऋषीप्रमाणें वसु गायत्री छन्दानें, रुद्र त्रैष्टुभ् छन्दानें, आदित्य जागत छन्दानें व सर्वजनहित विश्वेदेव आनुष्टुभ छन्दानें तुझ्यावर सर्व बाजूनीं सिंचन करोत ॥ ६५ ॥

विनियोग—प्रकृतिभूत सोमयागाप्रमाणें पांच औद्भ्रभण होम करून 'आकूतिम्' इत्यादि सात मंत्रांनीं सात औद्भ्रभण होम करावे.

आकूतिमग्निं प्रयुजꣳ स्वाहा मनो मेधामग्निं प्रयुजꣳ स्वाहा चित्तं विज्ञातमग्निं प्रयुजꣳ स्वाहा वाचो विधृतिमग्निं प्रयुजꣳ स्वाहा प्रजापतये मनवे स्वाहाग्नये वैश्वानराय स्वाहा ॥ ६६ ॥

अर्थ—प्रेरक असा जो चयनसंकल्प तद्रूपी अग्नीला हें सुहुत असो. तसेंच मेधा व मन यांची, ज्ञानसाधन चित्त व तज्जन्य अनुष्ठान यांची, मंत्रपाठशक्ति व धारणाशक्ति यांची, प्रेरणा करणाऱ्या अग्नीला हें हवि सुहुत असो. त्याचप्रमाणें प्रजापति मनु आणि सर्वलोकानुग्राहक अग्नीला हें हवि सुहुत असो ॥ ६६ ॥

विश्वो देवस्य नेतुर्मर्तो वुरीत सख्यम् । विश्वो रायऽइषुध्यति द्युम्नं वृणीत पुष्यसे स्वाहा ॥ ६७ ॥

अर्थ—सगळे लोक फलदायी व प्रकाशक अशा सवित्याच्या मैत्रीची इच्छा करतात. व ते धन आणि स्वप्रजापालनोपयोगी अन्न यांकरितां ज्याची प्रार्थना करितात अशा त्या प्रेरक सूर्याला हें हवि सुहुत असो ॥ ६७ ॥

विनियोग—'मा सु भित्था' या दोन मंत्रांनीं उभें राहून यजमानानें अगर अध्वर्यूनें प्रदीप्त अशा आहवनीयावर उखा ठेवावी.

मा सु भित्था मा सु रिषोऽम्ब धृष्णु वीरयस्व सु । अग्निश्चेदं करिष्यथꣳ ॥ ६८ ॥

अर्थ—हे मातः उखे, तुझा थोडा भाग अगर सर्व भाग फुटूं नये. म्हणजे तुला तडे येऊं नयेत व तूं दुभंग होऊं नयेस. तसेंच तूं प्रौढ असें अग्निधारणात्मक वीरकृत्य कर. अग्नि व तूं या दोघांनीं माझें अग्निकार्य समाप्तीपर्यंत चालवावें ॥ ६८ ॥

दृꣳह स्व देवि पृथिवि स्वस्तयऽआसुरी माया स्वधया कृतासि । जुष्टं देवेभ्यऽइदमस्तु हव्यमरिष्टा त्वमुदिहि यज्ञेऽअस्मिन् ॥ ६९ ॥

अर्थ—उखा पृथ्वीचें कार्य आहे तरी लक्षणेनें उखेलाच पृथ्वी म्हणून वर्णन केलें आहे. हे पृथिवीस्वरूपिणी देवि उखे, तूं या यजमानाचें कल्याण करण्याकरितां दृढ हो. कारण आसुरी मायेप्रमाणें अन्नासाठीं तूंही स्तनादिविशिष्ट होऊन विचित्र अशी बनविली गेलीस. हें हविर्द्रव्य देवांना प्रिय असो. हा यज्ञ चालू असतां तूंही अखंडित होऊन वर ये ॥ ६९ ॥

विनियोग—'द्वन्नः' इत्यादि मंत्रांनीं तेरा समिधांचा होम करावा.

द्वेष्ठ सर्पिरासुतिꣳ प्रत्नो होता वरेण्यꣳ । सहसस्पुत्रोऽअद्भुतꣳ ॥ ७० ॥ शतं ५००

अर्थ—वृक्ष हेंच ज्याचें अन्न आहे, व घृत ज्याचें मद्य आहे, असा, पुरातन, देवांना बोलावणारा, श्रेष्ठ, सामर्थ्यानें मंथनांतून उत्पन्न होणारा व आश्चर्यरूपी असा अग्नि समिधेचें भक्षण करो ॥ ७० ॥

विनियोग—' परस्याः ' इत्यादि मंत्रभागानें विकंकत वृक्षाच्या समिधेचा होम करावा.

परस्याऽअधि संवतो वरा२ऽअभ्यातर । यत्राहमास्मि ताँ२ऽअव ॥७१॥

अर्थ—शत्रुसंबंधी संग्रामाच्या दुःखांतून आमच्या लोकांना तार. मी ज्या देशांत राहतों त्यालाही तार ॥ ७१ ॥

विनियोग—' परमस्याः ' या मंत्रभागानें उंबराच्या समिधेचें ग्रहण करावें.

परमस्याꣳ परावतो रोहिदश्वऽइहागहि । पुरीष्यꣳ÷ पुरुप्रियोऽग्ने त्वं तरा मृधꣳ÷ ॥ ७२ ॥

अर्थ—हे अग्ने, या यज्ञांत अत्यंत दूर देशांतून तूं येथें ये व आमच्या शत्रूंचा नाश कर. तूं रोहित्संज्ञक घोड्यांचा स्वामी, पशूंना हितकर व बहुजनप्रिय असा आहेस ॥ ७२ ॥

विनियोग—न तोडतां वायूनें वगैरे सहज पडलेल्या झाडाची समिधा ' यदग्ने ' या मंत्रानें होमावी.

यदग्ने कानि-कानि चिदा ते दारूणि दध्मसि । सर्वं तदस्तु ते घृतं तज्जुषस्व यविष्ठ्य ॥ ७३ ॥

अर्थ—हे अत्यंत तरुण अग्ने, ज्या कोणत्या काष्ठांचा तुझ्याकरितां मी होम करतों तीं सर्व काष्ठें तुला घृताप्रमाणें प्रिय असोत. त्यांचें तूं सेवन कर ॥ ७३ ॥

विनियोग—' यदस्ति ' या मंत्रानें भूमीवर पडलेल्या समिधेचा होम करावा.

यदस्युपजिह्विका यद्व्रश्चोऽअतिसर्पति । सर्वं तदस्तु ते घृतं तज्जुषस्व यविष्ठ्य ॥ ७४ ॥

अर्थ—हे तरुण अग्ने, मुंगीसारखा बारीक उपदीपिका नांवाचा प्राणी (उधई)

ज्याला खातो व वारुळांतील कीटक ज्याला व्याप्त करतो; तें काष्ठ तुला घृताप्रमाणें प्रिय असो. त्याचें सेवन कर ॥ ७४ ॥

विनियोग—'अहरहः' इत्यादि आठ मंत्रांनीं पळसाच्या आठ समिधांचा होम करावा.

अहरहरप्रयावं भरन्तोऽश्वायेव तिष्ठते घासमस्मै । रायस्पोषेण समिषा मदन्तोऽग्ने मा ते प्रतिवेशा रिषाम ॥ ७५ ॥

अर्थ—हे अग्ने, तुझ्या समीप राहणाऱ्या आमचा नाश होऊं नये. कारण कीं घोडशाळेंतील अश्वाला न चुकतां गवत घालतात त्याप्रमाणे रोज न चुकतां तुला समिद्रूपी अन्न देतों आणि धनाच्या पुष्टीनें व अन्नानें तुला हर्षित करतों ॥ ७५ ॥

नाभा पृथिव्याꣳ समिधानेऽअग्नौ रायस्पोषाय बृहते हवामहे । इडम्मदं बृहदुक्थं यजत्रं जेतारमग्निं पृतनासु सासहिम् ॥ ७६ ॥

अर्थ—पृथ्वीरूपी उखेंत प्रदीप्त असलेल्या आहवनीयांत आम्ही द्रव्यवृद्धीकरितां अग्निदेवाला बोलावतों. तो अग्नि अन्नानें तृप्त होणारा, मोठ्या उक्थस्तुतीनीं संपन्न, पूजनीय, संग्रामजयी व शत्रूंचा पराजय करणारा असा आहे ॥ ७६ ॥

याꣳ सेनाऽअभीत्वरीराव्याधिनीरुगणाऽउत । ये स्तेना ये च तस्करास्ताँस्तेऽअग्नेऽपिदधाम्यास्ये ॥ ७७ ॥

अर्थ—हे अग्ने, ज्या सेना आमच्यावर चाल करून येतात व ज्या सर्व बाजूंनीं आमचें ताडन करतात व ज्यांतील योद्धे आयुधें सज्ज करून उभे आहेत व जे चोर गुप्तरीतीनें व उघड चोरी करतात त्या सर्वांना मी तुझ्या मुखांत घालतों, त्यांचें भक्षण कर ॥ ७७ ॥

दꣳष्ट्राभ्यां मलिम्लूꣳश्चम्भ्यैस्तस्कराँऽउत । हनुभ्या स्तेनान् भगवस्ताँस्त्वं खाद सुखादितान् ॥ ७८ ॥

अर्थ—हे भगवन् अग्ने, मार्गांत चोरी करून पळून जाणारे व दरोडे घालणारे जे चोर त्या दुष्टांना दाढेंत दाबून तस्करांना बाहेर आलेल्या दातांनीं दाबून नाहींसे करून व स्तेनांना हनवटींत घालून खाऊन गिळून टाक ॥ ७८ ॥

ये जनेषु मलिम्लव स्तेनासस्तस्करा वने । ये कक्षेष्वघायवस्ताँस्ते दधामि जम्भयोः ॥ ७९ ॥

अर्थ--हे अग्ने गांवांत, रानांत उघड व गुप्त चोरी करणारे व नदी वगैरे स्थलीं लोकांचा घात करण्याची इच्छा करणारे या सर्वांना तूं खावें म्हणून मी तुझ्या दाढेखालीं घालतों ॥ ७९ ॥

योऽअस्मभ्यमरातीयाद्यश्च नो द्वेषते जनः । निन्दाद्योऽअस्मान्धिप्साच्च सर्वं तं मस्मसा कुरु ॥ ८० ॥

अर्थ--शत्रूंचे चार प्रकार आहेत १ देणें असलेलें द्रव्य न देणारा २ कार्यविघात करणारा ३ निन्दा करणारा ४ ठार मारण्याची इच्छा करणारा. हे अग्ने, या चारही प्रकारच्या शत्रूंना चावून गिळून टाक ॥ ८० ॥

सꣳ शितं मे ब्रह्म सꣳ शितं वीर्यं बलम् । सꣳ शितं क्षत्रं जिष्णु यस्याहमस्मि पुरोहितः ॥ ८१ ॥

अर्थ--माझें ब्राह्मण्य शास्त्रीय झालें, इंद्रियसामर्थ्य व शरीरसामर्थ्य हीं दोन्हीं तीक्ष्ण झालीं. तसेंच मी ज्या क्षत्रियांचा पुरोहित आहें ते क्षत्रिय जयशील होतील तसें मीं केलें ॥ ८१ ॥

उदेषां बाहूऽअतिरमुद्वर्चोऽअथो बलम् । क्षिणोमि ब्रह्मणामित्रानुन्नयामि स्वाँ२ऽअहम् ॥ ८२ ॥

अर्थ--या माझ्या ब्राह्मणक्षत्रियांचे हात मीं पराक्रमानें सर्वांपेक्षां उंच केले. तसेंच ब्राह्मतेज व क्षात्रबळ उंच केले. तसेंच मंत्रसामर्थ्यानें मी शत्रूंचा नाश करतों व स्वकीयांचा उत्कर्ष करतों ॥ ८२ ॥

विनियोग--यजमानानें उखेंतील अग्नींत समिधेचा होम करावा.

अन्नपतेऽन्नस्य नो देह्यनमीवस्य शुष्मिणः । प्र-प्र दातारं तारिषऽऊर्जं नो धेहि द्विपदे चतुष्पदे ॥ ८३ ॥

अर्थ--हे अन्नपालका अग्ने, आम्हांला रोगनाशक व बलप्रद असें अन्न दे. आमच्या अन्नदात्याची अतिशयेंकरून वृद्धि कर. आमच्या पुत्रादि मनुष्यांना व गाईवगैरे पशूंनाही अन्नरस दे ८३ ॥

इति श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते
माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे वेदप्रकाशाख्ये एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

इति एकादशोऽध्यायः समाप्तः ।

अथ द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥



विनियोग—अकराव्या अध्यायांत उखाभरणाचे मंत्र गेले. बारावे अध्यायांत उखाधारणाचे मंत्र सांगतात. ' हृशानो रुक्मः ' या मंत्रानें यजमानानें एक सोन्याचा अलंकार आपल्या गळ्यांत घालावा.

हृशानो रुक्मऽउर्व्या व्यद्यौद्दुर्मर्षमायुः श्रिये रुचानः । अग्निरमृतोऽअभवद्वयोभिर्यदेनं द्यौरजनयत्सुरेताः ॥ १ ॥

अर्थ—यजमानाच्या गळ्यांत दिसणारा सोन्याचा दागिना लोकांना लक्ष्मी देण्याकरितां अखण्ड आयुष्याची इच्छा करणारा अतिशय कांतीनें प्रकाशतो. तो सुवर्णरूपी अग्नि पशुपुरोडाशादि अन्नांनीं अविनाशी झाला. कारण कीं त्या द्युलोकानें या अग्नीला उत्पन्न केलें, ज्या द्युलोकांत हा अग्नि गर्भरूपानें राहिला ॥ १ ॥

विनियोग—' नक्तोषासा ' या मंत्रभागानें उखेचें ग्रहण करावें. नंतर ' द्यावा ' या मंत्रभागानें उखा आसंदीकडे न्यावी व ' देवाऽअग्निं ' या मंत्रानें आसंदीवर तिचें स्थापन करावें.

नक्तोषासा समनसा विरूपे धापयेते शिशुमेकꣳ समीची । द्यावाक्षामा रुक्मोऽअन्तर्विभाति देवाऽअग्निं धारयन्द्रविणोदाः ॥ २ ॥

अर्थ—आईबाप मुलाचें पोषण करतात त्याप्रमाणें रात्रि व दिवस या एका अग्नीचा सायंप्रातर्होमादिकांनीं संतोष करतात. त्या रात्रिदिवसांचें रूप विचित्र आहे तरी त्यांचें ऐक्यमत्य आहे. द्यावापृथिवींच्या मध्यभागीं अन्तरिक्षांत जो सुवर्णरूपी अग्नि प्रकाशतो त्याला मी नेतों. यागद्वारा धनरूप फल देणारे देव ज्या अग्नीला धारण करते झाले त्याला मी नेतों ॥ २ ॥

विनियोग—' विश्वा रूपाणि ' या मंत्रभागानें सहा दोऱ्यांचा फासा यजमानानें उखाग्नीचे कंठास बांधावा.

विश्वा रूपाणि प्रतिमुञ्चते कविꣳ प्राशावीद्भद्रं द्विपदे चतुष्पदे । वि नाकमख्यत्सविता वरेण्योऽनु प्रयाणमुषसो विराजति ॥ ३ ॥

अर्थ—भूतवस्तु जाणणारा, सर्वप्रेरक, श्रेष्ठ सवितृदेव सर्व रूपांना द्रव्यामध्यें बांधतो म्हणजे तो सर्व द्रव्यांचीं रूपें प्रकाशित करतो. जो मनुष्य पशु वगैरेंना आपआपल्या कर्मांतील सामर्थ्य देतो, व जो स्वर्गाला प्रकाशित करतो; तसेंच जो उषःकाल संपल्यावर प्रातःकालीं विशेषेंकरून प्रकाशतो अशा सूर्यानें हा फासा बांधावा ॥ ३ ॥

विनियोग—फासासहित उखेंतील अग्नि 'सुपर्णोऽसि' या मंत्रानें पूर्वेकडे वर धरावा.

सुपर्णोऽसि गरुत्माँस्त्रिवृत्ते शिरो गायत्रं चक्षुर्बृहद्रथन्तरे पक्षौ। स्तोमऽआत्मा छन्दाꣳस्यङ्गानि यजूꣳषि नाम। साम ते तनूर्वामदेव्यं यज्ञायज्ञियं पुच्छं धिष्ण्याः शफाः। सुपर्णोऽसि गरुत्मान्दिवं गच्छ स्वः पत ॥ ४ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं गरुडाप्रमाणें उत्तम पंखांचा आहेस. त्रिवृत् स्तोम तुझें मस्तक, गायत्रस्तोम तुझे चक्षु, बृहद्रथन्तरस्तोम तुझे पक्ष, पञ्चदशस्तोम तुझें अंतःकरण, गायत्र्यादि छन्द तुझे हृदयाद्यवयव, 'इषे त्वा' इत्यादि यजुर्मंत्र तुझीं नांवें, वामदेव्यसाम तुझें शरीर, यज्ञायज्ञिय साम तुझें पुच्छ व होत्रादि धिष्ण्यस्थ अग्नि तुझे खुर आहेत. असा तूं गरुडरूपी आहेस म्हणून हे अग्ने, तूं आकाशांत जा व तेथें स्वर्गलोकाप्रत प्राप्त हो ॥ ४ ॥

विनियोग—'विष्णोः क्रमोऽसि' इत्यादि मंत्रानें पादन्यास करावे म्हणजे चालावें. 'दिशोऽनुक्रमस्व' या मंत्रभागानें दिशांकडे पहावें.

विष्णोः क्रमोऽसि सपत्नहा गायत्रं छन्दऽआरोह पृथिवीमनु विक्रमस्व विष्णोः क्रमोऽस्यभिमातिहा त्रैष्टुभं छन्दऽआरोहान्तरिक्षमनु विक्रमस्व विष्णोः क्रमोऽस्यरातीयतो हन्ता जागतं छन्दऽआरोह दिवमनु विक्रमस्व विष्णोः क्रमोऽसि शत्रूयतो हन्तानुष्टुभं छन्दऽआरोह दिशोऽनु विक्रमस्व ॥ ५ ॥

अर्थ—हे प्रथम पावला, तूं अग्नीचा पादक्षेप असून शत्रुघातक आहेस म्हणून गायत्री छन्दावर आरोहण कर व पृथिवीदेवतारूपी या प्रदेशाला विशेषेंकरून प्राप्त हो. हे द्वितीय पावला, तूं अग्नीचा पादक्षेप असून पापनाशक आहेस म्हणून

त्रैष्टुभ छन्दावर आरोहण करून अन्तरिक्षदेवतारूपी या प्रदेशाला विशेषेंकरून प्राप्त हो. हे तृतीय पावला, तूं अग्नीचा पादन्यास आहेस व दान न देण्याची इच्छा करणाऱ्याचा नाशक आहेस म्हणून जागतछन्दावर आरोहण करून द्युलोकदेवता-रूपी या प्रदेशाला विशेषेंकरून प्राप्त हो. हे चतुर्थ पावला, तूं अग्नीचा पादक्षेप असून शत्रुत्वाची इच्छा करणाऱ्याचा घातक आहेस म्हणून आनुष्टुभ छन्दावर आरोहण कर. हे अग्ने, तूं पूर्वादि दिशांना व्याप्त कर. ॥ ५ ॥

विनियोग—'अक्रन्ददग्निः' या मंत्रानें ऊर्ध्वबाहु करून अग्नीचें ग्रहण करावे.

अक्रन्ददग्नि स्तनयन्निव द्यौः क्षमा रेरिहद्वीरुधः समञ्जन्। सद्यो जज्ञानो वि हीमिद्धोऽअख्यदा रोदसी भानुना भात्यन्तः ॥ ६ ॥

अर्थ—मेघाप्रमाणें शब्द करणारा, भूमीला व्याप्त करणारा व ज्वालांनीं ओषधीना व्याप्त करणारा अग्नि वृद्धिंगत होतो. उत्पन्न झाल्याबरोबर प्रदीप्त होतो म्हणून तो या सर्व विविध वस्तु प्रकाशित करतो. मेघ विद्युद्रूपानें द्यावापृथिवीमध्यें प्रकाशित होतो त्याप्रमाणें अग्नि रश्मींच्या योगानें द्यावापृथिवींच्या मध्यभागीं प्रकाशित होतो ॥ ६ ॥

विनियोग—'अग्नेऽभ्यावर्तिन्' इत्यादि चार ऋचांनीं उखास्थ अग्नीला आपल्याजवळ आणावें.

अग्नेऽभ्यावर्त्तिन्नभि मा निवर्त्तस्वायुषा वर्चसा प्रजया धनेन। सन्या मेधया रय्या पोषेण ॥ ७ ॥

अर्थ—ज्याचा स्वभाव आमच्याजवळ येण्याचा आहे अशा हे अग्ने, दीर्घजीवित, ब्रह्मवर्चस् तेज, पुत्रादिक प्रजा, धन, इष्टलाभ, धारणावती बुद्धि, सुवर्णालंकार व आयुष्यादिकांची वृद्धि यांसह आमच्याकडे ये ॥ ७ ॥

अग्नेऽअङ्गिरस्तमं शतं ते सन्त्वावृतः सहस्रं तऽउपावृतः। अधा पोषस्य पोषेण पुनर्नो नष्टमाकृधि पुनर्नो रयिमाकृधि ॥ ८ ॥

अर्थ—सौंदर्यानें युक्त अवयवांच्या हे अग्ने, तूं आमच्यावर कृपा करून शंभर वेळां आमचेकडे ये व तुझे पुरुष अगर यज्ञिय वस्तु हजार वेळां आमचेकडे येवोत, व यापेक्षांही जास्त वेळां म्हणजे दहाहजार अगर लक्ष वेळां तूं व तुझ्या पुरुषांनीं

येऊन आमची वृद्धि करावी व त्यायोगें आमचें नष्टद्रव्य आम्हांला परत दे; व पूर्वी प्राप्त न झालेलें द्रव्य आम्हाला मिळवून दे ॥ ८ ॥

पुनरूर्जा निवर्तस्व पुनरग्न इषायुषा । पुनर्नः पाह्यꣳहसः ॥ ९ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं क्षीरादिरस, अन्न व जीवन यांसह पुनः येथें ये व आम्हीं केलेल्या पापापासून आम्हाला दूर कर म्हणजे आमच्या पापाचा नाश कर ॥ ९ ॥

सह रय्या निवर्तस्वाग्ने पिन्वस्व धारया । विश्वप्स्न्या विश्वतस्परि ॥१०॥

अर्थ—हे अग्ने, धनासह परत ये व वृष्टिरूपी जलधारेनें सर्व तृणादिकांना आर्द्र कर. ती जलधारा सर्वांनीं उपभोग्य अशी आहे ॥ १० ॥

विनियोग—'आ त्वाहार्षम्' या मंत्रानें अग्नीचे नाभीच्या वरच्या जागीं अभिमंत्रण करावें.

आ त्वाहार्षमन्तरभूर्ध्रुवस्तिष्ठाविचाचलिः । विशस्त्वा सर्वा वाञ्छन्तु मा त्वद्राष्ट्रमधिभ्रशत् ॥ ११ ॥

अर्थ—हे अग्ने, मीं तुला आणलें. तूं उखेंत स्थित आहेस तेथें न ढळतां निश्चित रीतीनें स्थिर रहा. सर्व अन्नें तुजकडे येवोत. हें राष्ट्र तुझ्यापासून भ्रष्ट न होवो ॥११॥

विनियोग—' उदुत्तमं ' या मंत्रानें गळ्यांतील सुवर्णाचा दोरा व उखेचा फासा वरच्या मार्गानें काढावा.

उदुत्तमं वरुण पाशमस्मदवाधमं वि मध्यमꣳ श्रथाय । अथा वयमादित्य व्रते तवानागसोऽअदितेय स्याम ॥ १२ ॥

अर्थ—हे वरुणा, तुझ्या शिरांतील, मध्यभागांतील व अधःप्रदेशांतील (पायावरील) पाश (फासा) आमच्यापासून दूर करा व तोडा. नंतर हे अदितिपुत्रा वरुणा, निरपराधी असे आम्ही तुझें कर्म करीत असतां अखंडित होऊं ॥ १२ ॥

विनियोग—वर हात करून ' अग्ने बृहन् ' या मंत्रानें अग्नीला वर धरावें.

अग्ने बृहन्नुषसामूर्ध्वोऽअस्थान्निर्जगन्वान् तमसो ज्योतिषागात् । अग्निर्भानुना रुशता स्वङ्गऽआ जातो विश्वा समान्यप्राः ॥ १३ ॥

अर्थ—मोठा असा आदित्यात्मक अग्नि उषःकालांच्या अग्रभागीं म्हणजे प्रातःकालीं ऊर्ध्व स्थित झाला. जो रात्रीच्या अंधकारांतून निघून दिवसाच्या तेजानें

युक्त झाला त्या अग्नीनें जन्मल्याबरोबरच आपल्या सर्व ग्रहांना पूर्ण केलें. तो तमोनाशक अशा किरणानें युक्त व सुंदर शरीराचा आहे ॥ १३ ॥

विनियोग—'हꣳसः' या मंत्रभागानें खालीं ठेवून 'बृहत्' या मंत्रभागानें त्यास आसंदीवर ठेवावें.

हꣳ सꣳ शुचिषद्वसुरन्तरिक्षसद्धोता वेदिषदतिथिर्दुरोणसत्। नृषद्वरसदृतसद्व्योमसदब्जा गोजाऽऋतजाऽअद्रिजाऽऋतं बृहत् ॥ १४ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं पुढील विशेषणांनीं युक्त आहेस. तुला मी खालीं ठेवतों. तो सूर्य अंधकाराचा नाशक, प्रकाशमान, सत्कर्मांत मनुष्यांची प्रेरणा करणारा, वायुरूपानें अन्तरिक्षांत राहणारा, देवांना बोलावणारा, अग्निरूपानें वेदीवर राहणारा, अतिथीप्रमाणें सर्वपूज्य, यज्ञगृहांत राहणारा, मनुष्यांत, उत्कृष्ट स्थानांत व यज्ञांत राहणारा आणि मण्डलरूपानें आकाशांत राहणारा आहेस. तसेंच तूं जलांत मत्स्यरूपानें, पृथ्वीवर जारज, अण्डज, स्वेदज, व उद्भिज्जरूपानें, सत्यांत, मेघांत जलरूपानें अगर पाषाणांत अग्निरूपानें राहणारा असून सर्वव्यापी व महत् अशा परब्रह्मरूपी आहेस ॥ १४ ॥

विनियोग—'सीदत्वं' या मंत्रानें अग्नीचें उपस्थान करावें.

सीद त्वं मातुरस्याऽउपस्थे विश्वान्यग्ने वयुनानि विद्वान्। मैनां तपसा मार्चिषाभिशोचीरन्तरस्याꣳ शुक्रज्योतिर्विभाहि ॥ १५ ॥

अर्थ—हे अग्ने, सर्व पदार्थांचें ज्ञान असलेला असा तूं मातृसदृश अशा या उखेच्या उत्संगावर बैस व या उखेला उष्णतेनें व ज्वालेनें पीडा देऊं नकोस. आणि या उखेंत निर्मल प्रकाशानें प्रकाशित हो ॥ १५ ॥

अन्तरग्ने रुचा त्वमुखायाꣳ सदने स्वे। तस्यास्त्वꣳ हरसा तपञ्जातवेदꣳ शिवो भव ॥ १६ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं उखेच्या आंत आपल्या स्थानावर प्रदीप्त होऊन रहा. हे सर्वज्ञ अग्ने, प्रकाशानें तप्त होणारा असा तूं उखेचें कल्याण कर व शांत हो ॥ १६ ॥

शिवो भूत्वा मह्यमग्नेऽअथो सीद शिवस्त्वम्। शिवाꣳ कृत्वा दिशꣳ सर्वाꣳ स्वं योनिमिहासदꣳ ॥ १७ ॥

अर्थ—हे अग्ने, मजविषयीं शांति ठेव व सर्व तऱ्हेनें शांत होऊन या स्थानावर बैस. सर्व दिशांना शांत करून या उखेंतील आपल्या स्थानावर बैस ॥ १७ ॥

विनियोग—' दिवस्परि ' इत्यादि अकरा ऋचांच्या वात्सप्र अनुवाकानें अग्नीचें उपस्थान करावें.

दिवस्परि प्रथमं जज्ञेऽअग्निरस्मद्द्वितीयं परि जातवेदाः । तृतीयमप्सु नृमणाऽअजस्रमिन्धानऽएनं जरते स्वाधीः ॥ १८ ॥

अर्थ—अग्नि प्रथम द्युलोकापासून सूर्यरूपानें उत्पन्न झाला व दुसऱ्या वेळीं ब्रह्मयापासून अग्निरूपानें उत्पन्न झाला. नंतर मनुष्यांत ज्याचें लक्ष आहे अशा प्रजापतीनें त्याला तिसऱ्या वेळीं जलांत समुद्रांतील वडवानलस्वरूपानें उत्पन्न केलें. अशा या अग्नीला पुरोडाशानें प्रदीप्त करणारा, स्वाधीन चित्ताचा यजमान म्हातारपणापर्यंत निरंतर त्याची सेवा करतो ॥ १८ ॥

विश्वा तेऽअग्ने त्रेधा त्रयाणि विश्वा ते धाम विभृता पुरुत्रा । विश्वा ते नाम परमं गुहा यद्विश्वा तमुत्सं यतऽआजगन्थ ॥ १९ ॥

अर्थ—हे अग्ने, तीन लोकांतील तुझीं पूर्वोक्त तीन रूपें आम्हांस ठाऊक आहेत. तसेंच तुझीं निरनिराळ्या प्रदेशांत असलेलीं गार्हपत्यावहयीनादि स्थानेंही आम्हांला माहीत आहेत व तुझें गुह्य असें जें नांव तेंही आम्ही जाणतों. आणखी ज्या जलरूपी स्थानापासून तूं आलास तेंही आम्ही जाणतों ॥ १९ ॥

समुद्रे त्वा नृमणाऽअप्स्वन्तर्नृचक्षाऽईधे दिवो अग्नऽऊधन् । तृतीये त्वा रजसि तस्थिवाꣳ समपामुपस्थे महिषाऽअवर्धन् ॥ २० ॥

अर्थ—हे अग्ने, लोकांकडे लक्ष देऊन प्रजापतीनें समुद्रांत वडवानलरूपानें असलेल्या तुला प्रदीप्त केलें. मनुष्यें पठण करीत असतां स्पष्ट मंत्र म्हणणारा प्रजापति वृष्टिजलांत विद्युद्रूपानें राहणाऱ्या तुला प्रदीप्त करता झाला. तसेंच द्युलोकाचें दुग्धस्थान (कांस) अशा लाल तेजोमण्डलांत आदित्यरूपानें राहणाऱ्या तुला प्रजापतीनें प्रदीप्त केलें आणि मोठे प्राणनौकेंतील जलांत राहणाऱ्या तुला वाढविते झाले ॥ २० ॥

अक्रन्ददग्नि स्तनयन्निव द्यौः क्षामा रेरिहद्वीरुधः समञ्जन् । सद्यो जज्ञानो वि हीमिद्धोऽअरब्धयदा रोदसी भानुना भात्यन्तः ॥ २१ ॥

अर्थ—मेघाप्रमाणें गर्जना करणारा अग्नि वृद्धि पावतो. तसेंच तो मेघाप्रमाणें पृथ्वीला व्याप्त करून तिला चाटतो व स्वतः ज्वालांनीं वृक्षांनाही व्याप्त करतो. कारण कीं उत्पन्न होतांच तो प्रदीप्त होऊन सर्व वस्तूंना प्रकाशित करतो व पर्जन्याप्रमाणें द्यावापृथिवीच्या मध्यभागीं स्वतः सर्व बाजूंनीं प्रकाशित होतो ॥ २१ ॥

श्रेणासुदारो धरुणो रयीणां मनीषाणां प्रार्पणꣳ सोमगोपाꣳ । वसुः सूनुꣳ सहसोऽअप्सु राजा विभात्यग्रऽउषसामिधानꣳ ॥ २२ ॥

अर्थ—उत्कृष्ट गवाश्वादि संपत्ति देणारा, नानाविध द्रव्यें धारण करणारा, ईप्सित पदार्थ प्राप्त करून देणारा, सोमयज्ञाचें रक्षण करणारा, सर्वनिवासस्थान, बलपूर्वक मंथन केलें असतां उत्पन्न होणारा, जलांत वरुणरूपानें असलेला व प्रातःकालीं आदित्यस्वरूपानें असणारा, प्रकाशणारा अग्नि विशेषेंकरून प्रकाश पावतो ॥ २२ ॥

विश्वस्य केतुर्भुवनस्य गर्भऽआ रोदसीऽअपृणाज्जायमानꣳ । वीडुं चिदद्रिमभिनत् परायञ्जना यदग्निमयजन्त पञ्च ॥ २३ ॥

अर्थ—तो सूर्यरूपानें प्रकट होणारा अग्नि सर्वत्र तेजानें द्युलोक व पृथिवीलोकाला भरून काढतो. तो सर्व प्राण्यांचें अग्निरूपी ज्ञानसाधन, सर्व प्राणिसमुदायांचा वायुरूपी गर्भ आहे. तो चंद्ररूपानें पश्चिमेकडे जात असतां सुदृढ अशा मेघमण्डलाचाही भेद करतो व ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व निषाद असे पांचही वर्ण त्याची पूजा करतात ॥ २३ ॥

उशिक्पावकोऽअरतिः सुमेधा मर्त्येष्वग्निरमृतो निधायि । इयर्त्ति धूममरुषं भरिभ्रदुच्छुक्रेण शोचिषा यामिनक्षन् ॥ २४ ॥

अर्थ—देवांनीं जो अग्नि मनुष्यांमध्यें स्थापन केला आहे तो अग्नि सुंदर, पवित्र करणारा, सर्व पदार्थ पुरे असें ज्याचे बुद्धीस वाटतें, महाबुद्धिमान्, अमरणधर्मा, जगाचा पोषक असून डोळ्यांना वगैरे पीडा न करणारा असा धूर वर सोडतो व निर्मल तेजानें आकाशाला व्याप्त करणारा आहे ॥ २४ ॥

दृशानो रुक्मऽउर्व्या व्यद्यौदुर्मर्षमायुः श्रिये रुचानः । अग्निरमृतोऽ अभवद्वयोभिर्यदेनं द्यौरजनयत्सुरेताः ॥ २५ ॥

अर्थ—हा समोर दिसणारा सोन्याचा दागिना अधिक तेजानें प्रकाश पावतो. अग्निरूपी तो लोकांना संपत्ति देण्याकरितां त्यांना अतिरस्कार्य असें आयुष्य देण्याच्या

इच्छेनें पशुपुरोडाशरूपी अन्नांनीं अमृतस्वरूपी झाला. कारण शोभन, वीर्यवान् द्युलोकवासी देवगण या अग्नीला उत्पन्न करता झाला. ॥ २५ ॥

यस्तेऽअय कृणवद्भद्रशोचेऽपूपं देव घृतवन्तमग्ने । प्र तं नय प्रतरं वस्योऽअच्छाभि सुम्नं देवभक्तं यविष्ठ ॥ २६ ॥

अर्थ—हे शोभनदीप्ते अग्निदेवा, आज प्रतिपदेला जो पुरुष तुला व्रतमिश्रित पुरोडाश समर्पण करतो त्या यजमानाला हे तरुण अग्ने, तूं उत्तम लोकाला ने व सर्व तऱ्हेचें देवसेव्य सुख दे ॥ २६ ॥

आ तं भज सौश्रवसेष्वग्नऽउक्थऽउक्थऽआभज शस्यमाने । प्रियः सूर्ये प्रियोऽअग्ना भवात्युज्जातेन भिनदुज्जनित्वैः ॥ २७ ॥

अर्थ—हे अग्ने, ज्यांत उत्तम यशस्कर कर्में आहेत अशा यज्ञांत व प्रत्येक शस्त्राचे (स्तुतीचे) वेळीं या यजमानाला तूं प्रेरणा कर. अशा रीतीनें तूं प्रेरित केलेला तो यजमान सूर्याचा व अग्नीचा आवडता होवो व असलेल्या पुत्रानें त्याची वृद्धि होवो. तसेंच आणखी त्याला पुत्रपौत्र होऊन त्याची वृद्धि होवो ॥ २७ ॥

त्वामग्ने यजमानाऽअनु द्यून् विश्वा वसु दधिरे वार्याणि । त्वया सह द्रविणमिच्छमाना व्रजं गोमन्तमुशिजो विवव्रुः ॥ २८ ॥

अर्थ—हे अग्ने, तुझी सेवा करणारे यजमान अपेक्षित सर्व गाई वगैरे द्रव्यें प्राप्त करतात. तसेंच यज्ञफलाच्या इच्छेनें तुझी सेवा करून राहणारे ते यजमान ज्ञानी होऊन सूर्यमंडल भेदून देवमार्गानें गमन करते झाले ॥ २८ ॥

अस्तावि अग्निर्नराᳬसुशेवो वैश्वानरऽऋषिभिः सोमगोपाः । अद्वेषे द्यावापृथिवी हुवेम देवा धत्त रयिमस्मे सुवीरम् ॥ २९ ॥

अर्थ—यजमान व ऋत्विज यांनीं अग्नीची स्तुति केली–तो अग्नि मनुष्यांना सुख देणारा, सर्व मनुष्यांना हितकर, सोमाचें रक्षण करणारा असा आहे. अग्नीची स्तुति केली म्हणून आम्ही द्वेषरहित अशा द्यावापृथिवींना बोलावितों. हे अग्न्यादि देवतांनो, तुम्ही आम्हांला उत्तम पुत्रानें विशिष्ट असें द्रव्य द्या. ॥ २९ ॥

विनियोग—यजमानानें 'समिधाग्निं' या मंत्रानें 'उख्य' (उखेंतील) अग्नीमध्यें समिधेचा होम करावा.

समिधाग्निं दुवस्यत घृतैर्बोधयतातिथिम्। आस्मिन् हव्या जुहोतन ॥३०॥

अर्थ--हे ऋत्विग्यजमानांनो, समिधेनें तुम्ही अग्नीची परिचर्या करा व या अतिथि अग्नीला घृतांनीं जागृत करा आणि या अग्नीमध्यें संपूर्णपणें हविर्द्रव्याचा होम करा. ॥ ३० ॥

विनियोग—यजमानानें दक्षिणेस उभे राहून 'उदुत्वा' या मंत्रानें शकटावर 'उख्य' अग्नीचें स्थापन करावें.

उदु त्वा विश्वे देवाऽअग्ने भरन्तु चित्तिभिः। स नो भव शिवस्त्वꣳ सुप्रतीको विभावसुः ॥ ३१ ॥

अर्थ—हे अग्ने, सर्व प्राणरूपी देव उद्योगप्रवीण अशा वृत्तींनीं तुला वर उचलून धरोत. चांगल्या मुखाचा व प्रकाश हेंच आहे द्रव्य ज्यावें अशा हे अग्ने, वर धारण केल्यावर आमचें कल्याण करणारा हो. ॥ ३१ ॥

विनियोग--'प्रेदग्ने' या मंत्रानें पूर्व दिशेकडे जाऊन कार्य असलेल्या जागीं जावें.

प्रेदग्ने ज्योतिष्मान् याहि शिवेभिरर्चिभिष्ट्वम्। बृहद्भिर्भानुभिर्भासन्मा हिꣳसीस्तन्वा प्रजाः ॥ ३२ ॥

अर्थ—हे अग्ने, शांत ज्वालांनीं प्रकाशयुक्त असा तूं गमन कर आणि प्रौढ किरणांनीं जगाला प्रकाशित करणारा तूं आपल्या दाहक शरीराच्या योगानें माझ्या पुत्रादि प्रजांचा नाश करूं नकोस. ॥ ३२ ॥

विनियोग—आंखाचा (कण्याचा) शब्द होत असतां यजमानानें 'आक्रंददग्निः' हा मंत्र म्हणावा.

अक्रन्ददग्नि स्तनयन्निव द्यौः क्षामा रेरिहद्वीरुधः समञ्जन्। सद्यो जज्ञानो वि हीमिद्धोऽअख्यदा रोदसी भानुना भात्यन्तः ॥ ३३ ॥

अर्थ--मेघाप्रमाणें शब्द करणारा, भूमीला व्याप्त करणारा व ज्वालांनीं ओषधींना व्याप्त करणारा अग्नि वृद्धिंगत होतो. उत्पन्न झाल्याबरोबर प्रदीप्त होतो म्हणून तो या सर्व विविध वस्तू प्रकाशित करतो. मेघ विद्युद्रूपानें द्यावापृथिवीमध्यें प्रकाशित

होतो त्याप्रमाणें अग्नि रश्मींच्या योगानें द्यावापृथिवींच्या मध्यभागीं प्रकाशित होतो ॥ ३३ ॥

विनियोग—उत्तरदिशेकडे शकटावरून अग्नीला खालीं उतरावें आणि नंतर 'प्रप्रायं' या मंत्रानें अग्नींत समिधेचा होम करावा.

प्र-प्रायमग्निर्भरतस्य शृण्वे वि यत्सूर्यो न रोचते बृहद्भाः । अभि यः पूरुं पृतनासु तस्थौ दीदाय दैव्योऽअतिथिः शिवो नः ॥ ३४ ॥

अर्थ—हा अग्नि हविर्धारण करणाऱ्या यजमानाचें आव्हान ऐको. जो अग्नि सूर्याप्रमाणें प्रकाशित होऊन अत्यंत प्रदीप्त होतो व जो संग्रामामध्यें पुरू नांवाच्या राक्षसाच्या सन्मुख उभा राहतो तो देवसंबंधी अतिथि अग्नि आम्हांला मंगलप्रद असा प्रकाश पावतो ॥ ३४ ॥

विनियोग—'आपोदेवी' या मंत्रानें उखेंतील भस्म पाण्यांत टाकावें.

आपो देवीः प्रतिगृभ्णीत भस्मैतत्स्योने कृणुध्वꣳ सुरभाऽउ लोके । तस्मै नमन्तां जनयः सुपत्नीर्मातेव पुत्रं बिभृताप्स्वेनत् ॥ ३५ ॥

अर्थ—हे प्रकाशमान जलांनो, तुम्ही या भस्मावें ग्रहण करा, व सुखावह सुगंधि अशा स्थानांमध्यें हें भस्म ठेवा. वरुणरूपी उत्तम पति ज्यांना आहे अशा अग्न्युत्पादक तुम्ही या भस्मरूपी अग्नीला नमस्कार करा. हे जलांनो, आई मुलावें रक्षण करते त्याप्रमाणें तुम्ही या जलावें आपल्या शरीरांत रक्षण करा ॥ ३५ ॥

विनियोग—नंतर 'अप्स्वग्ने व गर्भो असि' या दोन मंत्रांनीं दुसऱ्यांदा भस्म जलामध्यें टाकावें.

अप्स्वग्ने सधिष्टव सौषधीरनु रुध्यसे । गर्भे सञ्जायसे पुनः ॥ ३६ ॥

अर्थ—हे अग्ने, जलांत तुझें स्थान आहे. तूं यवादि ओषधींचा जठराग्निरूपानें स्वीकार करतोस व तूं अरणीमध्यें पुनः पुनः जन्माला येतोस ॥ ३६ ॥

गर्भोऽअस्योषधीनां गर्भो वनस्पतीनाम् । गर्भो विश्वस्य भूतस्याग्ने गर्भोऽअपामसि ॥ ३७ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं ओषधींचा, वृक्षांचा, सर्व प्राणिसमुदायाचा व जलांचा गर्भ आहेस ॥ ३७ ॥

विनियोग—'प्रसह्य' इत्यादि चार ऋचांनीं जलांत टाकलेलें कांहीं भस्म अनामिकेनें ग्रहण करावें.

प्रसह्य भस्मना योनिमपश्च पृथिवीमग्ने । स꣡ सृज्यं मातृभिष्ट्वं ज्योतिष्मान् पुनरासदꣳ ॥ ३८ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं भस्माच्या योगानें तुझें उत्पत्तिस्थान असलेलें जें पृथ्वी आणि जल यांस प्राप्त होऊन व जलांत पूर्ण मिसळून तेजस्वी होत्साता पुनः आपल्या स्थानावर बैस ॥ ३८ ॥

पुनरासद्य सदनमपश्च पृथिवीमग्ने । शेषे मातुर्यथोपस्थेऽन्तरस्याꣳ शिवतमꣳ ॥ ३९ ॥

अर्थ—हे अग्ने, जलभूमीरूपी आपल्या स्थानाला प्राप्त होऊन पुनः आईच्या मांडीवर शिशु बसतो त्याप्रमाणें या उखेच्या मध्यभागीं कल्याणकारक असा तूं बसतोस ॥ ३९ ॥

पुनरूर्जा निवर्तस्व पुनरग्नऽइषायुषा । पुनर्नꣳ पाह्यꣳ हसꣳ ॥ ४० ॥

अर्थ—हे अग्ने, तूं क्षीरादि रस, अन्न व जीवन यांसह पुनः येथें ये व आम्हीं केलेल्या पापांपासून आम्हांला दूर कर म्हणजे आमच्या पापांचा नाश कर. ॥ ४० ॥

सह रय्या निवर्त्तस्वाग्ने पिन्वस्व धारया । विश्वप्स्न्या विश्वतस्परि ॥ ४१ ॥

अर्थ—हे अग्ने, धनासह निवृत्त हो व वृष्टिरूपी जलधारेनें सर्व तृणादिकांना आर्द्र कर. ती जलधारा सर्वांनीं उपभोग्य अशी आहे ॥ ४१ ॥

विनियोग—'बोधामे' इत्यादि दोन मंत्रांनीं उख्य अग्नीचें उपस्थान करावें.

बोधा मेऽअस्य वचसो यविष्ठ मꣳहिष्ठस्य प्रभृतस्य स्वधावꣳ । पीयति त्वोऽअनु त्वो गृणाति वन्दारुस्ते तन्वं वन्देऽअग्ने ॥ ४२ ॥

अर्थ—हे अन्नयुक्त व तरुणतम अशा अग्ने, माझ्या वाक्याच्या अभिप्रायाकडे लक्ष दे. तें वाक्य फार मोठें व तुला ऐकूं जाईल असें आदरानें उच्चारलेलें आहे. हे अग्ने, कोणी पुरुष तुझी निंदा करतो तर कोणी तुझी स्तुति करतो (निंदा स्तुति करणें हा लोकांचा स्वभाव आहे) हे अग्ने, मी तर तुझ्या शरीरास वंदन करतों व नमस्कार करतों कारण माझा स्वभाव वंदन करणें हा आहे ॥ ४२ ॥

विनियोग--' विश्वकर्मणे ' या मंत्रानें उख्य अग्नीमध्ये समिधेनें घेतलेल्या घृताचा होम करावा.

स बोधि सूरिर्मघवा वसुपते वसुदावन्। युयोध्यस्मद्द्वेषाꣳसि विश्वकर्मणे स्वाहा॥ ४३॥

अर्थ—हे धनपते, द्रव्य देणाऱ्या अग्ने, तूं आमचे तात्पर्य समज. तूं विद्वान् आणि धनवान आहेस. संतुष्ट होऊन आमचीं दौर्भाग्यें दूर कर. जगाची उत्पत्ति स्थिति वगैरे कर्में करणाऱ्या तुला हें हवि सुहुत असो॥ ४३॥

विनियोग—नंतर यजमानानें उभे राहून उख्य अग्नीमध्ये त्याच समिधेचा ' पुनस्त्वा ' या मंत्रानें होम करावा.

पुनस्त्वादित्या रुद्रा वसवः समिन्धतां पुनर्ब्रह्माणो वसुनीथ यज्ञैः। घृतेन त्वं तन्वं वर्धयस्व सत्याः सन्तु यजमानस्य कामाः॥ ४४॥

अर्थ—हे अग्ने, आदित्य, रुद्र व वसु तुला शांत रीतीनें प्रकाशित करोत. द्रव्यनिमित्त ज्याची स्तुति होते अशा हे अग्ने, ऋत्विग्यजमान यज्ञांनीं तुला प्रकाशित करो व तूं आपलें शरीर घृतानें वाढव व तुझे शरीराची वृद्धि झाल्यावर यजमानाच्या इच्छा पूर्ण होवोत॥ ४४॥

विनियोग—' अपेतवीत ' या मंत्रांतील प्रत्येक पादानें प्रत्येक दिशेकडील भूमीवर पडलेलें तृणादिक पलाशशाखेनें दूर करावें.

अपेत वीत वि च सर्पतातो येऽत्र स्थ पुराणा ये च नूतनाः। अदाद्यमोऽवसानं पृथिव्याऽअक्रन्निमं पितरो लोकमस्मै॥ ४५॥

अर्थ—हे यमभृत्यांनों, पूर्वी असलेले व आतांचे तुम्ही या स्थानावरून निघून जा व अतिशय दूर गमन करा, व वेगळे वेगळे व्हा. संघ करून राहूं नका. कारण कीं, पृथिवीचें हें स्थान यमदेवानें या यजमानाला दिलें आहे. तसेंच पितरांनींही हें स्थान यजमानाला दिलें आहे॥ ४५॥

विनियोग--' संज्ञानं ' या मंत्रानें उखा गार्हपत्य चितीचे जागीं स्थापन करावी. 'अग्नेर्भस्म' या मंत्रानें त्या ठिकाणीं बारीक रेती पसरावी. नंतर 'चितः स्थ' या मंत्रानें एकवीस परिश्रितांनीं गार्हपत्याच्या स्थानाचें वेष्टण करावे.

संज्ञानमसि कामधरणं मयि ते कामधरणं भूयात्। अग्नेर्भस्मास्यग्नेः पुरीषमसि चितं स्थ परिचितऽऊर्ध्वचितः श्रयध्वम्॥ ४६॥

अर्थ--हे ऊषस्वरूपा, तूं पशूंला उत्तम तऱ्हेनें ज्ञान करून देणारें व इच्छा पूर्ण करणारें आहेस म्हणून तुझें इच्छा पूर्ण करण्याचें सामर्थ्य माझे ठिकाणीं असो. हे सिकतास्वरूपा, तूं अग्नीचें प्रकाशक व पूरक आहेस. हे शर्करांनो, मी तुम्हांला जमिनींवर टाकतों व तुम्ही सर्वत्र स्थापित व्हा व उंच तऱ्हेनें स्थापन केल्या गेलेल्या तुम्ही या गार्हपत्य स्थानाचें सेवन करा ॥ ४६ ॥

विनियोग—अध्वर्यूनें मण्डलाच्या दक्षिणेकडे उत्तराभिमुख बसून मध्यभागीं चार इष्टका 'अयं सो' या चार ऋचांनीं स्थापन कराव्या.

अयꣳ सोऽअग्निर्यस्मिन्त्सोममिन्द्रः सुतं दधे जठरे वावशानः। सहस्रियं वाजमत्यं न सप्तिꣳ ससवान्त्सन्त्स्तूयसे जातवेदः ॥ ४७ ॥

अर्थ--हा गार्हपत्य अग्नि इष्टकांनीं चित केला जातो. या अग्नीचें चयन झाल्यावर इंद्र कांडलेल्या सोमरसाला उदरांत धारण करतो. तो इंद्र इच्छा करणारा आहे व सोमरस पुष्कळांची तृप्ति करणारा, खाल्ल्याबरोबर मद उत्पन्न करणारा, व तृप्ति करणारा असा अन्नस्वरूपी आहे. हे अग्ने, द्रव्योत्पादक असा तूं हविर्द्रव्याचा विभाग करणारा ऐसा होत्साता स्तुति केला जातोस ॥ ४७ ॥

अग्ने यत्ते दिवि वर्चः पृथिव्यां यदोषधीष्वप्स्वा यजत्र। येनान्तरिक्षमुर्वाततन्थ त्वेषः स भानुरर्णवो नृचक्षाः ॥ ४८ ॥

अर्थ—मर्यादेनें याग करण्यास योग्य अशा हे अग्ने, तुझें द्युलोकांत सूर्यरूपी व पृथ्वीवर अग्निरूपी जें तेज आहे व जें ओषधींत आणि जलांत स्थित आहे व ज्या तेजानें तूं विस्तीर्ण अंतरिक्षाला व्याप्त करतोस तें प्रदीप्त तेज सर्व विश्वाला प्रकाशित करतें. प्रसरणशील व शुभाशुभकर्मदर्शी अशा तुझ्या त्या दीप्तीचें मी इष्टका स्वरूपानें स्थापन करतों ॥ ४८ ॥

अग्ने दिवोऽअर्णमच्छा जिगास्यच्छा देवाँऽऊचिषे धिष्ण्या ये। या रोचने परस्तात् सूर्यस्य याश्चावस्तादुपतिष्ठन्तऽआपः ॥ ४९ ॥

अर्थ--हे अग्ने, द्युलोकसंबंधीं जलाच्या सन्मुख तूं गमन करतोस. ज्या देवांना बुद्धीन्द्रिय प्रेरक असें म्हणतात, त्या देवांच्या सन्मुखही तूं गमन करतोस व प्रकाशक मंडलामध्यें राहणाऱ्या सूर्याच्या पलीकडे व अलीकडे असलेल्या जलांच्या सन्मुखही तूं गमन करतोस ॥ ४९ ॥

पुरीष्यासोऽअग्नय÷ प्रावणेभि÷ सजोषसꣳ । जुषन्तां यज्ञमद्रुहोऽ नमीवाऽइषो महीः ॥ ५० ॥

अर्थ—हे इष्टकास्वरूपी अग्नि आमच्या यज्ञाचें सेवन करोत, व अग्नि क्षुधातृष्णा-निवारक व मोठ्या अशा अन्नभागांचें सेवन करोत. ते अग्नि पशूंना हितकर व प्रीति-युक्त मनाचे परस्पराचा द्वेष न करणारे असे आहेत ॥ ५० ॥

विनियोग—' इडामग्ने ' या दोन मंत्रांनीं दोन इष्टका स्थापन कराव्या.

इडामग्ने पुरुदꣳ सनिं गोः शश्वत्तमꣳ हवमानाय साध । स्यान्न÷ सूनुस्तनयो विजावाग्ने सा ते सुमतिर्भूत्वस्मे ॥ ५१ ॥

अर्थ—हे अग्ने देवाला बोलावणाऱ्या यजमानाला अन्न दे. तें अन्न पुष्कळ कर्मांना साधनभूत व चिरंतन व धेनुसंबंधीं असें आहे व आमच्या यजमानाला औरस पुत्र होवो व तो प्रजावान् असावा. हे अग्ने, तुझी अन्न-गो-पुत्र-दान विषयक सद्बुद्धि आमचे ठायीं होवो. ॥ ५१ ॥

अयं ते योनिर्ऋत्वियो यतो जातोऽअरोचथाः । तं जानन्नग्नऽआरोहाथा नो वर्धया रयिम् ॥ ५२ ॥

अर्थ—हे अग्ने, हें तुझें उत्पत्तिस्थान आहे. तूं सायंप्रातःकालीं उत्पत्तीला योग्य आहेस; कारण तूं गार्हपत्यांतून उत्पन्न होऊन प्रकाशित झालास. हे अग्ने, त्या आपल्या पित्याला ओळखून कर्माचे शेवटीं त्यांत प्रवेश कर व आमच्याकरितां धनवृद्धि कर ॥ ५२ ॥

विनियोग—' चिदसि ' या मंत्रानें उत्तरेकडे व ' परिचिदसि ' या मंत्रानें दक्षिणेकडे इष्टका स्थापन करावी.

चिदसि तया देवतयाङ्गिरस्वद् ध्रुवा सीद परिचिदसि तया देवतयाङ्गिरस्वद् ध्रुवा सीद ॥ ५३ ॥

अर्थ—हे इष्टके, तुझें स्थापन झालें आहे. तूं त्या वाणीरूपी देवतेच्या द्वारा स्थापित होऊन प्राणाप्रमाणें निश्चल रहा. हे द्वितीय इष्टके, तूं सर्व बाजूंनीं स्थापन केली गेली आहेस. तूं त्या वाणीरूपी देवतेच्या द्वारा स्थापित होऊन प्राणांप्रमाणें निश्चल रहा ॥ ५३ ॥

विनियोग—नंतर एकवीस इष्टका स्थापन कराव्या.

लोकं पृण छिद्रं पृणाथो सीद ध्रुवा त्वम् । इन्द्राग्नी त्वा बृहस्पतिरस्मिन् योनावसीषदन् ॥ ५४ ॥

अर्थ—हे लोकंपृणेष्टके, तूं गार्हपत्य-चयनस्थानीं रिकाम्या असलेल्या जागीं स्थित हो व चिकटून बैस. छिद्र दिसणार नाहीं अशा रीतीनें चिकटून बैस व दृढ रहा. इंद्र, अग्नि आणि बृहस्पति यांनीं तुला या स्थानीं स्थापन केलें ॥ ५४ ॥

विनियोग—'ता अस्य' या मंत्रानें सूद दोहस यासंबंधीं भाषण.

ताऽअस्य सूदंदोहसꣳ सोमꣳश्रीणन्ति पृश्नयः । जन्मन्देवानां विशस्त्रिष्वा रोचने दिवः ॥ ५५ ॥

अर्थ—द्युलोकसंबंधीं नानाप्रकारचीं जलें व अन्नें प्रत्येक वर्षीं तीनही सवनांमध्यें या यज्ञांतील सोमाला शिजवितात ॥ ५५ ॥

विनियोग—'इंद्रं विश्वा' या मंत्रानें गार्हपत्य चितीवर चात्वालावरील मृत्तिका स्थापन करावी.

इन्द्रं विश्वाऽअवीवृधन्त्समुद्रव्यचसं गिरः । रथीतमꣳ रथीनां वाजानाꣳ सत्पतिं पतिम् ॥ ५६ ॥

अर्थ—ऋग्यजुःसामरूपी सर्व स्तुती इन्द्राला वाढवितात. तो इन्द्र समुद्राप्रमाणें व्यापक, विविधगतिमान्, सर्व रथींत श्रेष्ठ, अन्नस्वामी व धर्मनिष्ठ लोकांचा पालक आहे ॥ ५६ ॥

विनियोग—'समितं' इत्यादि चार मंत्रांनीं उख्य अग्नीचें स्थापन करावें.

समितꣳ संकल्पेथाꣳ संप्रियौ रोचिष्णू सुमनस्यमानौ । इषमूर्जमभि संवसानौ ॥ ५७ ॥

अर्थ—हे चित्थ व उख्य अग्नी, तुम्ही दोघे मिळून या व एक विचारानें रहा. तुम्ही परस्पर-प्रीतियुक्त, प्रकाशमान, एकमेकांविषयीं सन्मत असलेले, अन्न व घृत भक्षण करणारे आहां ॥ ५७ ॥

सं वां मनाꣳसि सं व्रता समु चित्तान्याकरम् । अग्ने पुरीष्याधिपा भव त्वं नऽइषमूर्जे यजमानाय धेहि ॥ ५८ ॥

अर्थ—हे पूर्वोक्त अग्नींनो, तुमचें मन, बुद्धि, अहंकार व कर्में यांस मी एकत्र करतों व मनोगत संस्कारांनाही एकत्र करतों. हे पशुपालक अग्ने, तूं आमचें पालन कर व आमच्या यजमानाला अन्न व दधि घृत वगैरे दे ॥ ५८ ॥

अग्ने त्वं पुरीष्यो रयिमान् पुष्टिमाँऽआसि । शिवाऽ कृत्वा दिशꣳ सर्वाꣳ स्वं योनिमिहासदꣳ ॥ ५९ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं पशुहितकर, धनवान्, पुष्टियुक्त आहेस. म्हणून सर्व दिशांना शांत करून या चयन यागांत आपल्या स्थानांवर बैस ॥ ५९ ॥

भवतं नꣳ समनसौ सचेतसावरेपसौ । मा यज्ञꣳ हिꣳसिष्टं मा यज्ञपतिं जातवेदसौ शिवौ भवतमद्य नः ॥ ६० ॥

अर्थ—हे अग्नीनो, तुम्ही आमच्यावर एकचित्तानें अनुग्रह करा. तसेंच आम्हीं अपराध केला तरी तुम्ही आमच्यावर रागावूं नका. आमच्या यज्ञकर्माची व यजमानाची हिंसा करूं नका. तसेंच आज (अनुष्ठानदिवशीं) आमचें कल्याण करा ॥ ६० ॥

विनियोग—'मा ते व' या मंत्रानें उखेचा फास बाजूला करून गार्हपत्य चितीवर उभा स्थापन करून तिच्यांत दुग्धसिंचन करावें.

मातेव पुत्रं पृथिवी पुरीष्यमग्निꣳ स्वे योनावभारुखा । तां विश्वैर्देवैर्ऋतुभिः संविदानः प्रजापतिर्विश्वकर्मा विमुञ्चतु ॥ ६१ ॥

अर्थ—आई मुलाचें धारण करते त्याप्रमाणें ही पृथ्वीरूपी मृण्मय उखा पशुहितकर, अग्नीचें आपल्या गर्भस्थानीं धारण करिती झाली. प्रजापतीनें त्या उखेला पाशापासून मुक्त करावें. तो प्रजापति सर्व देव आणि ऋषि यांच्याबरोबर ऐकमत्य असलेला व सृष्ट्यादि सर्व कर्में करणारा आहे ॥ ६१ ॥

विनियोग—'असुन्वन्तं' इत्यादि तीन मंत्रांनीं तीन इष्टका स्थापन कराव्या.

असुन्वन्तमयजमानमिच्छ स्तेनस्येत्यामन्विहि तस्करस्य । अन्यमस्मदिच्छ सा तऽइत्या नमो देवि निर्ऋते तुभ्यमस्तु ॥ ६२ ॥

अर्थ—हे निर्ऋते, सोमयाग व इतर कोणताही याग न करणाऱ्याकडे तूं जा. तसेंच गुप्त चोर आणि प्रकट चोर जातात तिकडेही तूं जा. यज्ञ न करणाऱ्या अशा आमच्याहून दुसऱ्या कोणाचीही तूं इच्छा कर. आमची इच्छा करूं नको कारण

तुझें गमन म्हणजे दुष्टांची शिक्षा आहे. हे देवि निर्ऋते, अशा तुला नमस्कार असो ॥ ६२ ॥

नमऽ सु ते निर्ऋते तिग्मतेजोऽयस्मयं विचृता बन्धमेतम् । यमेन त्वं यम्या संविदानोत्तमे नाकेऽअधिरोहयैनम् ॥ ६३ ॥

अर्थ—हे तीक्ष्णतेजयुक्त निर्ऋते, तुला पुष्कळ नमस्कार असो. तूं लोहपाशाप्रमाणें दृढ अशा ह्या संसारबंधाला तोड व यम, अग्नि व पृथ्वी यांशीं ऐकमत्य करून उत्कृष्ट व सर्वसुखयुक्त स्वर्गामध्यें या यजमानाला ने ॥ ६३ ॥

यस्यास्ते घोरऽआसऽजुहोम्येषां बन्धानामवसर्जनाय । यां त्वा जनो भूमिरिति प्रमन्दते निर्ऋतिं त्वाहं परिवेद विश्वतऽ ॥ ६४ ॥

अर्थ—'हे क्रूर अशा निर्ऋति देवि,' यजमानाच्या स्वर्गप्राप्तिप्रतिबंधक पापांच्या निवृत्तीकरतां ज्या तुझ्या मुखांत मी होम करतों व ज्या तुला सामान्य अज्ञ लोक भूमि म्हणून समजतात त्या तुला मी सर्वतऱ्हेनें तूं खरोखर निर्ऋति आहेस असें जाणतों. निर्ऋति म्हणजे सर्व देव जिथें रहातात त्यापेक्षां वेगळ्या जागीं असणारी. ॥ ६४ ॥

विनियोग—'यं ते' ह्या मंत्रानें शिक्य, रुक्मपाश वगैरे पदार्थ निर्ऋति इष्टकेच्या पलीकडे अगर पश्चाद्भागीं टाकावे. नंतर आपल्या व निर्ऋति इष्टकांच्या मध्यें जलपूर्ण चमस ठेवावा व 'नमः' हा मंत्र म्हणून यांनीं उठावें.

यं ते देवी निर्ऋतिराबबन्ध पाशं ग्रीवास्वविचृत्यम् । तं ते विष्याम्यायुषो न मध्यादथैतं पितुमद्धि प्रसूतऽ । नमो भूत्यै येदं चकार ॥ ६५ ॥

अर्थ—हे यजमाना, निर्ऋति देवीनें तुझ्या गळ्याभोंवतीं अच्छेद्य असा जो पाश बांधला त्याला मी ह्या मंत्रानें सोडतों. तो पाश मी आतांच अग्नीच्या मध्यापासून दूर करतों. नंतर निर्ऋतीच्या आज्ञेमुळें अग्निरूपाचा आश्रय करून हे यजमाना, हें अन्न तूं भक्षण कर. ज्या देवीनें हें अग्निकर्म केलें त्या श्रीरूपिणी देवीला नमस्कार असो ॥ ६५ ॥

विनियोग—'निवेशनः' या मंत्रानें अध्वर्यूनें गार्हपत्यचितीरूप अग्नीचें उपस्थान करावें.

निवेशनꣳ सङ्गमनो वसूनां विश्वा रूपाभिचष्टे शचीभिꣳ । देवऽइव सविता सत्यधर्मेन्द्रो न तस्थौ समरे पथीनाम् ॥ ६६ ॥

अर्थ—सवितृदेवाप्रमाणें हा अग्नि आपापल्या कर्मांनीं युक्त अशीं आहवनीयादि सर्व रूपें पहातो. तो यजमानाला आपल्या घरांत ठेवणारा, धनें प्राप्त करून देणारा, अवश्यफलयुक्त धर्माचा स्वामी असा आहे. तसेंच तो अग्नि संग्रामामध्यें इंद्राप्रमाणें शत्रुसन्मुख उभा राहतो ॥ ६६ ॥

विनियोग—' सीरा युञ्जन्ति ' या दोन मंत्रांनीं अध्वर्यूनें उंबराच्या नांगरावें अभिमंत्रण करावें.

सीरा युञ्जन्ति कवयो युगा वितन्वते पृथक् । धीरा देवेषु सुम्नया ॥६७॥

अर्थ—बुद्धिमान् असे कृषिकर्माभिज्ञ पुरुष देवांना सुख देण्याकरितां नांगराला बैल जुंपतात व निरनिराळ्या तऱ्हेनें चालवितात ॥ ६७ ॥

युनक्त सीरा वि युगा तनुध्वं कृते योनौ वपतेह बीजम् । गिरा च श्रुष्टिꣳ सभरा असन्नो नेदीयऽइत्सृण्युꣳ पक्वमेयात् ॥ ६८ ॥

अर्थ—हे नांगरणाऱ्यांनों, नांगरांना जोडा व त्यांना शिवळा वगैरेनीं विस्तृत करा. नंतर नांगरलेल्या या स्थानावर तुम्ही व्रीहि वगैरे बीं वेदवणीनें पेरा व व्रीह्यादिक अन्नें फलवृद्धीनें पुष्ट होवोत. पक्व झालेलें धान्य कापणीनें (कापण्याचें साधन) कापल्यानंतर थोड्याच वेळांत आमच्या घरीं येवो. ॥ ६८ ॥

विनियोग—चितिस्थानावर ' शुनꣳसुफाला ' या चार मंत्रांनीं चार नांगराच्या रेघा ओढाव्या किंवा चार वेळां नांगर फिरवावा.

शुनꣳ सु फाला विकृषन्तु भूमिꣳ शुनं कीनाशाऽअभियन्तु वाहैꣳ । शुनासीरा हविषा तोशमाना सुपिप्पलाऽओषधीꣳ कर्तनास्मै ॥ ६९ ॥

अर्थ—चांगले फाळ ज्यांना आहेत असे नांगर सुखानें भूमि नांगरोत. तसेंच नांगरणारे लोक सुखानें बैलांसह गमन करोत. हे वारवादित्यांनो, तुम्ही आमच्या व्रीह्यादिक औषधी उत्तम फलानें युक्त करा. तुम्ही जलानें भूमीला भिजविणारे आहांत ॥ ६९ ॥

घृतेन सीता मधुना समज्यतां विश्वैर्देवैरनुमता मरुद्भिः । ऊर्जस्वती पयसा पिन्वमानास्मान्त्सीते पयसाभ्याववृत्स्व ॥ ७० ॥

अर्थ—नांगराची रेघ मधुर अशा उदकानें आर्द्र होवो. ती रेघ विश्वेदेवांनीं व मरुतांनीं अंगीकृत केली आहे. हे सीते, अन्नवती अशी तूं दूध दहीं वगैरेनीं दिशांना पूर्ण करून दुग्धादिकांसहवर्तमान आम्हांकडे परत ये ॥ ७० ॥

लाङ्गलं पवीरवत्सुशेवꣳ सोमपीत्सरु । तदुद्वपति गामविं प्रफर्व्यं च पीवरीं प्रस्थावद्रथवाहणम् ॥ ७१ ॥

अर्थ—हा नांगर अत्यंत वेगवती व पुष्ट अशी धेनू व असा छाग व रथवाहक, प्रयाणसमर्थ अश्वादिक यांना प्राप्त करून देतो. तो नांगर फाळानें युक्त, सुखकर सोमपायी यजमानाकरितां भूमि खणणारा आहे ॥ ७१ ॥

कामं कामदुघे धुक्ष्व मित्राय वरुणाय च । इन्द्राय अश्विभ्यां पूष्णे प्रजाभ्यऽओषधीभ्यः ॥ ७२ ॥

अर्थ—हे इच्छा परिपूर्ण करणाऱ्या लांगलपद्धते, मित्र, वरुण, इंद्र, अश्विनीकुमार व पूषा या देवतांकरितां व प्रजेकरितां आणि औषधि उत्पन्न होण्याकरितां मला अभीष्ट असा भोग्य पदार्थ दे ॥ ७२ ॥

विनियोग—'विमुच्यध्वम्' या मंत्रानें बैलांना नांगरापासून अध्वर्यूनें सोडावें.

विमुच्यध्वमघ्न्या देवयानाऽअगन्म तमसस्पारमस्य । ज्योतिरापाम ॥ ७३ ॥

अर्थ—हे देवतार्थ कर्म करणाऱ्या, अवध्य अशा बलीवर्दांनो, तुम्ही मुक्त व्हा. आम्ही क्षुत्पिपासानिमित्त अशा या दुःखाच्या पार गेलों व परमात्मलक्षण तेजाला प्राप्त झालों ॥ ७३ ॥

विनियोग—'सजूरब्दः' या मंत्रानें होम करावा.

सजूरब्दोऽअयवोभिः सजूरुषाऽअरुणीभिः । सजोषसाव॒श्विना दꣳसोभिः सजूः सूरऽएतशेन सजूर्वैश्वानरऽइडया घृतेन स्वाहा ॥ ७४ ॥

अर्थ—पक्षमास यांनीं युक्त संवत्सर, रक्तवर्ण गाईंनीं प्रीतियुक्त प्रातःकालाची अधिष्ठात्री देवता, चिकित्सादिकर्मांनीं संतुष्ट होणारे अश्विनीकुमार, या अश्वानें संतुष्ट होणारा सूर्य, या पृथ्वीवर प्रेम करणारा वैश्वानर, अग्नि, यांना हें घृतरूपी हवि सुहुत असो ॥ ७४ ॥

विनियोग--तीन ऋचांना तृच् म्हणतात. अशा पांच तृचांनीं म्हणजे 'या ओषधीः' इत्यादि पंधरा मंत्रांनीं सर्वौषधें नांगराच्या रेषांवर ओतावीं.

याऽओषधीꣳ पूर्वा जाता देवेभ्यस्त्रियुगं पुरा । मनै नु बभ्रूणामहꣳ शतं धामानि सप्त च ॥ ७५ ॥

अर्थ--सृष्टीच्या आरंभीं ज्या औषधी ऋतूंकरितां उत्पन्न झाल्या त्या जगत्पोषणसमर्थ औषधींच्या शंभर आणि सात स्थानांना मी जाणतोंच, म्हणजे औषधींच्या ग्राम्य व आरण्य अशा पुष्कळ जाती मला माहीत आहेत ॥ ७५ ॥

शतं वोऽअम्ब धामानि सहस्रमुत वो रुहः÷ । अधा शतक्रत्वो यूयमिमं मेऽअगदं कृत ॥ ७६ ॥

अर्थ--हे मातृस्थानरूपी ओषधींनो, तुमच्या शंभर जाती आहेत व तुमचे हजार अंकुर आहेत. आणि शंभर कार्यें करणाऱ्या हे ओषधींनो, तुम्ही या माझ्या यजमानाला क्षुत्पिपासादि रोगरहित करा ॥ ७६ ॥

ओषधीꣳ प्रतिमोदध्वं पुष्पवतीꣳ प्रसूवरीꣳ । अश्वाऽइव सजित्वरीर्वीरुधः÷ पारयिष्णुवः÷ ॥ ७७ ॥

अर्थ—हे ओषधींनो, तुम्ही पुष्पफलयुक्त होऊन आनंदित व्हा व तुम्ही अश्वाप्रमाणें जयशील आहांत. तशाच तुम्ही पुष्कळ वाढून बरेच दिवसपर्यंत फलोत्पत्त्यनंतरही राहणाऱ्या आहांत ॥ ७७ ॥

ओषधीरिति मातरस्तद्वो देवीरुपब्रुवे । सनेयमश्वं गां वासऽआत्मानं तव पूरुष ॥ ७८ ॥

अर्थ—जगन्निर्माण करणाऱ्या प्रकाशक अशा ओषधींनो, मी तुम्हांला माझा पुढीलप्रमाणें अभीष्ट वर मागतों तो हा कीं, हे यज्ञपुरुषा तुझ्या प्रसादानें मला घोडा, गाय, वस्त्र व उत्तम शरीर प्राप्त होवो. (मी यज्ञपुरुषाकडे मागतों तें तुम्ही कबूल करावें असें वरील म्हणण्याचें तात्पर्य.) ॥ ७८ ॥

अश्वत्थे वो निषदनं पर्णे वो वसतिष्कृता । गोभाजऽइत्किलासथ यत्सनवथ पूरुषम् ॥ ७९ ॥

अर्थ—हे ओषधींनो, अश्वत्थ खुचेमध्यें तुमचें स्थान आहे व तुम्हांला पळसाच्या जुहूमध्येंही जागा दिली आहे. हे हविर्भूत ओषधींनो, अर्पीत होम केलेल्या

तुम्ही आदित्याचें सेवन करणाऱ्या व्हा. तुम्ही यजमानाचें अन्नदानानें पोषण करतां म्हणून तुम्हांला वरील स्थानें दिलीं आहेत ॥ ७९ ॥

यत्रौषधीꣳ समग्मत राजानꣳ समितावि व । विप्रꣳ सऽउच्यते भिषग्रक्षोहामीवचातनꣳ ॥ ८० ॥

अर्थ—हे ओषधींनो, राजे युद्धांत शत्रूला जिंकण्याकरितां येतात त्याप्रमाणें तुम्ही या ब्राह्मणाचे ठिकाणीं रोग जिंकण्याकरिता या. तुमच्या आश्रयानें या ब्राह्मणाला वैद्य म्हणतात. तो पुरोडाशद्वारा राक्षसांचा नाश करणारा व औषधांनीं रोगांचा नाश करणारा आहे ॥ ८० ॥

अश्वावतीꣳ सोमावतीमूर्जयन्तीमुदोजसम् । आविꣳसि सर्वाऽओषधीरस्माऽअरिष्टतातये ॥ ८१ ॥

अर्थ—या यजमानाच्या अमंगलाचा नाश करण्याकरितां मी सर्व ओषधींना सर्व तऱ्हेनें जाणतों. त्यांतली एक औषधी अश्व मिळवून देणारी, दुसरी सोम मिळवून देणारी, तिसरी बळ देणारी व चौथी तेज देणारी आहे. (अशा प्रकारच्या नाना कार्यें करणाऱ्या सर्व औषधि मी जाणतों) ॥ ८१ ॥

उच्छुष्माऽओषधीनां गावो गोष्ठादिवेरते । धनꣳ सनिष्यन्तीनामात्मानं तव पूरुष ॥ ८२ ॥

अर्थ—हे यज्ञपुरुषा, धन देणाऱ्या ओषधींचीं सामर्थ्यें ज्याप्रमाणें गोठ्यांतील गाई अरण्यांत जातात त्याप्रमाणें तुझ्या शरीराकडे येतात. ॥ ८२ ॥

इष्कृतिर्नाम वो माताथो यूयꣳ स्थ निष्कृतीꣳ । सीराः पतत्रिणीः स्थन ष्वदामयति निष्कृथ ॥ ८३ ॥

अर्थ—हे ओषधीनो, तुमची इष्कृती नांवाची आई व्याधीचें निवारण करणारी आहे व तुम्हीही व्याधिनिराकरण करणाऱ्या आहांत. तशाच अन्न देणाऱ्या, प्रसरणशील, आहांत म्हणून या रोग्याच्या शरीरांतील रोगांचा नाश करा. ॥ ८३ ॥

अति विश्वाः परिष्ठा स्तेनऽइव व्रजमक्रमुꣳ । ओषधीꣳ प्राचुच्यवुर्यत्किं च तन्वो रपः ॥ ८४ ॥

अर्थ—रोगाला नष्ट करणाऱ्या सर्व ओषधि, चोर गोठ्यांत येतो त्याप्रमाणें देहाला

व्याप्त करतात व शरीरांत व्याप्त झाल्यावर जें कांहीं शिरोव्यथारूपी पापफल असतें त्याचा नाश करतात ॥ ८४ ॥

यदिमा वाजयन्नाहमोषधीर्हस्तेऽआदधे। आत्मा यक्ष्मस्य नश्यति पुरा जीवगृभो यथा॥ ८५॥

अर्थ—जिवंतपणीं ज्याला फांशी देण्याकरितां वधस्थानाकडे नेतात त्या पुरुषाला वधाच्या पूर्वीच असें वाटतें कीं मी मेलों आहें व त्याचें शरीर त्यावेळीं नष्टप्राय होतें; त्याप्रमाणें ज्यावेळीं ह्या ओषधि सन्मानपूर्वक मी हातांत धारण करतों, त्या वेळींच भक्षणाचे पूर्वीच रोगाचें शरीर नष्ट होतें म्हणजे खाण्याकरितां हातांत धरल्याबरोबर ओषधि रोग दूर करते. मग भक्षण केल्यावर करीलच करील. ॥ ८५ ॥

यस्यौषधीः प्रसर्पथाङ्गमङ्गं परुष्परुः। ततो यक्ष्मं विबाधध्वऽउग्रो मध्यमशीरिव ॥ ८६ ॥

अर्थ—हे ओषधींनो, ज्या रोग्याच्या सर्व अंगांत व ज्या ज्या प्रत्येक पेऱ्यांत तुम्ही गमन करतां तेथून तेथून रोगाला नष्ट करतां. याला दृष्टांतः—ज्याप्रमाणें मर्मघातक व उग्र क्षत्रिय शत्रूला नष्ट करतो त्याप्रमाणे रोग्याच्या शरीरांत शिरलेले व्याधि नष्ट करतां. ॥ ८६ ॥

साकं यक्ष्म प्रपत चाषेण किकिदीविना। साकं वातस्य ध्राज्या साकं नश्य निहाकया ॥ ८७ ॥ शतं ६००

अर्थ—हे यक्ष्मरोगा, तूं की की शब्द करणाऱ्या चाष पक्ष्यासहवर्तमान वाऱ्याच्या गतीनें पळून जा. तसेंच शरीरनाशक निर्ऋति सहवर्तमान नष्ट हो. ॥ ८७ ॥

अन्या वोऽन्यामवत्वन्यान्यस्याऽउपावत। ताः सर्वाः संविदानाऽइदं मे प्रावता वचः ॥ ८८ ॥

अर्थ—हे ओषधींनो, तुमच्यांमधील एक ओषधी दुसऱ्या औषधीचें रक्षण करो व अशा रीतीनें रक्षित झालेली औषधि तिसरीजवळ राहून तिचें रक्षण करो व त्या सर्व रक्षित झालेल्या तुम्ही परस्परांशीं ऐकमत्य पावून माझ्या प्रार्थनारूपी वाक्याचें रक्षण करा. ॥ ८८ ॥

याः फलिनीर्याऽअफलाऽअपुष्पा याश्च पुष्पिणीः। बृहस्पतिप्रसूतास्ता नो मुञ्चन्त्वꣳहसः ॥ ८९ ॥

अर्थ—ज्या ओषधी फलपुष्पयुक्त आहेत व तद्रहित आहेत त्या सर्व ओषधी बृहस्पतीच्या प्रेरणेनें आम्हांला रोगरूपी पापापासून मुक्त करोत. ॥ ८९ ॥

मुञ्चन्तु मा शपथ्यादथो वरुण्यादुत । अथो यमस्य पड्वीशात्सर्वस्माद्देवकिल्बिषात् ॥ ९० ॥

अर्थ—ओषधी मला शपथ घेतल्यामुळें व वरुणाचा अपराध केल्यामुळें व यमाच्या बंधनामुळें उत्पन्न झालेल्या पापापासून मुक्त करोत. तसेंच देवांचा अपराध केल्यामुळें उत्पन्न झालेल्या सर्वच पापांपासून आम्हांला मुक्त करोत. ॥ ९० ॥

अवपतन्तीरवदन्दिवऽओषधयस्परि । यं जीवमश्नवामहै न स रिष्याति पूरुषꣳ ॥ ९१ ॥

अर्थ—द्युलोकांतून भूमीवर येणाऱ्या औषधि परस्परांना बोलल्या कीं, ज्या जिवंत पुरुषाला आम्ही व्याप्त करतों तो नष्ट होत नाहीं. ९१ ॥

याऽओषधीꣳ सोमराज्ञीर्बह्वीꣳ शतविचक्षणाꣳ । तासामसि त्वमुत्तमारं कामाय शꣳ हृदे ॥ ९२ ॥

अर्थ—सोमप्रमुख अशा ज्या पुष्कळ प्रभूतवीर्यसंपन्न अशा औषधी उपलब्ध आहेत त्यांमधील, रे औषधे, तूं उत्तम आहेस म्हणून आमच्या कार्यसिद्धीला पुरेशी हो व हृदयाला सुखकर हो. ॥ ९२ ॥

याऽओषधीꣳ सोमराज्ञीर्विष्ठिताꣳ पृथिवीमनु । बृहस्पतिप्रसूताऽअस्यै संदत्त वीर्यम् ॥ ९३ ॥

अर्थ—सोमप्रमुख, पृथ्वीवर नानाप्रकारेकरून स्थित अशा ज्या औषधी त्या बृहस्पतीच्या प्रेरणेनें मीं घेतलेल्या औषधीला सामर्थ्य देवोत ॥ ९३ ॥

याश्चेदमुपशृण्वन्ति याश्च दूरं परागताꣳ । सर्वाꣳ संगत्य वीरुधो ऽस्यै संदत्त वीर्यम् ॥ ९४ ॥

अर्थ—माझी प्रार्थना जवळ असल्यामुळें पूर्णतःहेनें ज्या ऐकतात व ज्या दूर असल्यामुळें किंचित् ऐकतात अशा हे ओषधींनो, तुम्ही विविधरीतीनें वाढणाऱ्या अशा सर्व एकत्र होऊन मीं घेतलेल्या या औषधीला सामर्थ्य द्या. ॥ ९४ ॥

मा वो रिषत् खनिता यस्मै चाहं खनामि वः । द्विपाच्चतुष्पाद-स्माकꣳ सर्वमस्त्वनातुरम् ॥ ९५ ॥

अर्थ—हे ओषधींनो, चिकित्सा करण्याकरितां तुम्हांला मुळापासून उपटणारा पुरुष नष्ट न होवो व ज्याच्या चिकित्सेकरितां मी तुमचें मूळ उपटतों तोही नष्ट न होवो. आमचेसंबंधीं स्त्रीपुरुष, गाई वगैरे सर्व द्विपात् व चतुष्पात् प्राणी रोगरहित होवोत ॥ ९५ ॥

ओषधयः समवदन्त सोमेन सह राज्ञा । यस्मै कृणोति ब्राह्मणस्तꣳ राजन् पारयामसि ॥ ९६ ॥

अर्थ—सोमराजाबरोबर ओषधी भाषण करत्या झाल्या कीं, हे सोमा, ब्राह्मण ज्या रोग्याची चिकित्सा आमचे मूळ घेऊन करतो त्या रोग्याला आम्ही रोगाच्या पलीकडे नेतों. (रोगाचा नाश करतो) ॥ ९६ ॥

नाशयित्री बलासस्याशीसऽउपचितामसि । अथो शतस्य यक्ष्माणां पाकारोरसि नाशनी ॥ ९७ ॥

अर्थ—हे ओषधे, तूं क्षयव्याधीचा व मूळव्याधीचा आणि सूज वगैरे व्याधींचा नाश करणारी आहेस. तसेंच पुष्कळ व्याधि व तोंड येणें, व्रण वगैरे रोगांचा नाश करणारी आहेस ॥ ९७ ॥

त्वां गन्धर्वाऽअखनँस्त्वामिन्द्रस्त्वां बृहस्पतिः । त्वामोषधे सोमो राजा विद्वान् यक्ष्मादमुच्यत ॥ ९८ ॥

अर्थ—हे ओषधींनो, गंधर्व, इंद्र, बृहस्पति यांनीं तुमचें खनन केलें. हे ओषधे, सोमराजा तुमच्या सामर्थ्याचा ज्ञानपूर्वक उपयोग करून महाव्याधीपासून मुक्त झाला ॥ ९८ ॥

सहस्व मेऽअरातीꣳ सहस्व पृतनायतः । सहस्व सर्वं पाप्मानꣳ सहमानास्योषधे ॥ ९९ ॥

अर्थ—हे ओषधे, तूं शत्रूंचा पराजय करणारी आहेस म्हणून माझ्या दानरहित शत्रुसेनांचा पराजय कर व संग्रामेच्छु जे त्यांचाही नाश कर. तसेंच माझ्या सर्व अशुभ कृत्यांचा नाश कर ॥ ९९ ॥

दीर्घायुस्तऽओषधे खनिता यस्मै च त्वा खनाम्यहम्। अथो त्वं दीर्घायुर्भूत्वा शतवल्शा विरोहतात् ॥ १०० ॥

अर्थ--हे ओषधे, तुला उपटणारा व ज्या रोग्याकरितां तुला मी उपटतों ते दोघेही शतायु होवोत. व तूंही दीर्घायु होऊन शंभर अंकुरांनीं युक्त अशी वाढ. ॥ १०० ॥

त्वमुत्तमास्योषधे तव वृक्षाऽउपस्तयः। उपस्तिरस्तु सोऽस्माकं योऽअस्माँ२ऽअभिदासति ॥ १०१ ॥

अर्थ—हे ओषधे, तूं उत्कृष्ट आहेस, शालतमालादिक वृक्ष जवळ राहून उपद्रव निराकरण करून तुझी सेवा करोत. जो मनुष्य आम्हांला मारतो तोही समीप राहून आमचा उपासक होवो ॥ १०१ ॥

विनियोग—अध्वर्यूनें प्रत्येक दिशेला 'मा मा हिंसीद्' इत्यादि प्रत्येक ऋचेनें चार मृत्तिकेचे खंड स्थापन करावे.

मा मा हिꣳसीज्जनिता यः पृथिव्या यो वा दिवꣳसत्यधर्मा व्यानट्। यश्चापश्चन्द्राः प्रथमो जजान कस्मै देवाय हविषा विधेम ॥ १०२ ॥

अर्थ—जो प्रजापति पृथ्वीचा उत्पादक आहे व सत्याचा धारण करणारा, ज्यानें द्युलोकाला उत्पन्न केलें तसेंच अगोदर उत्पन्न होऊन ज्यानें आनंद देणाऱ्या जलाला उत्पन्न केलें तो प्रजापति माझी हिंसा न करो म्हणून मी प्रजापति देवाला हविर्भाग देतों ॥ १०२ ॥

विनियोग—इष्टकोपधान करावें.

अभ्यावर्तस्व पृथिवि यज्ञेन पयसा सह। वपां तेऽअग्निरिषितोऽअरोहत् ॥ १०३ ॥

अर्थ—हे पृथ्वी, आम्हांला करावयाचा यज्ञ व त्याचें फल जो दुग्धादि उपयोग त्यांसह आमचेकडे ये. प्रजापतीनें प्रेरित असा अग्नि तुझ्या वपेवर (वपासदृश प्रदेशावर) आरोहण करो. ॥ १०३ ॥

अग्ने यत्ते शुक्रं यच्चन्द्रं यत्पूतं यच्च यज्ञियम्। तद्देवेभ्यो भरामसि ॥ १०४ ॥

अर्थ--हे अग्ने, जें तुझें शुद्ध, आल्हादकारक, पवित्र आणि यज्ञार्ह अंग आहे तें सर्व आम्ही देवाकरितां संपादित करतों ॥ १०४ ॥

विनियोग—या मंत्राने इष्टकावरून वाळू खालीं पाडावी.

इषमूर्जमहमितऽआदमृतस्य योनिं महिषस्य धाराम् । आ मा गोषु विशत्वा तनूषु जहामि मेदिमनिराममीवाम् ॥ १०५ ॥

अर्थ—मी अन्न, दधि, सत्याचे स्थान अशा मोठ्या व इच्छा करणाऱ्या अग्नीच्या आहुतीप्रत या प्रदेशाच्या उत्तर दिशेकडून भक्षण करतो व हे सर्व इडादिक अन्न माझे शरीरांत व माझ्या पुत्रांच्या व पशूंच्या शरीरांत प्रवेश करो आणि अन्नरहित व व्याधिरहित अशी शरीराची क्षीणता मी टाकतों. (म्हणजे माझें शरीर क्षीण न होवो.) ॥ १०५ ॥

विनियोग—'अग्ने तव' इत्यादि सहा ऋचांनीं वाळू पसरावी व त्यायोगें पुच्छपक्षरहित शरीर झांकावें.

अग्ने तव श्रवो वयो महि भ्राजन्तेऽअर्चयो विभावसो । बृहद्भानो शवसा वाजमुक्थ्यं दधासि दाशुषे कवे ॥ १०६ ॥

अर्थ--प्रकाशरूपी द्रव्यवान् हे अग्ने, देवांना कर्मांचें ज्ञान करून देणारा तुझा मोठा धूम व ज्वाला प्रकाशित होतात. महाकिरणवान् भूतज्ञ हे अग्ने, हविर्द्रव्य देणाऱ्या यजमानाला यज्ञपर्याप्त अन्न बलांसह तूं देतोस. ॥ १०६ ॥

पावकवर्चाः शुक्रवर्चाऽअनूनवर्चाऽउदियर्षि भानुना । पुत्रो मातरा विचरन्नुपावसि पृणक्षि रोदसीऽउभे ॥ १०७ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं मोठ्या प्रकाशानें उत्कर्ष पावतोस. तुझी दीप्ति शक्ति पवित्र करणारी आहे. तुझें तेज निर्मल आहे व पूर्ण आहे. मुलगा म्हातारपणीं आईबापांचें रक्षण करतो त्याप्रमाणें हे अग्ने, तूं संचार करून देवमनुष्यसहित जगाचें रक्षण करतोस व हविर्द्रव्याने द्युलोकाला आणि पृथ्वीनें भूमीला पूर्ण करतोस. अशा तुझी मी स्तुति करतों ॥ १०७ ॥

ऊर्जो नपाज्जातवेदः सुशस्तिभिर्मन्दस्व धीतिभिर्हितः । त्वेऽइषः सन्दधुर्भूरिवर्पसश्चित्रोतयो वामजाताः ॥ १०८ ॥

अर्थ—अन्नाचा नाश न करणाऱ्या व प्रज्ञानवान् अशा हे अग्ने, कर्मनिमित्तानें स्थापन केलेला असा तूं चांगल्या स्तुतीनीं आनंदित हो; कारण कीं यजमान तुझ्या

ठिकाणीं हविर्द्रव्यरूपी अन्नांचा होम करतात. ते यजमान नानारूपी आहेत व नानातऱ्हेचीं त्यांचीं अन्नें आहेत व ते उत्तम जन्माला आलेले आहेत ॥ १०८ ॥

इरज्यन्नग्ने प्रथयस्व जन्तुभिरस्मे रायोऽअमर्त्य । स दर्शतस्य वपुषो विराजसि पृणक्षि सानसिं क्रतुम् ॥ १०९ ॥

अर्थ—हे अमरणधर्मन् अग्ने, आमच्या ठिकाणीं तूं द्रव्यांचा विस्तार कर. तूं अध्वर्यूप्रभृतीनीं दीप्यमान आहेस व दर्शनीय चित्याग्निरूपी शरीरामध्यें विशेषेंकरून शोभणारा आहेस. तसेंच तूं आमच्या पुष्कळ दिवसांच्या इच्छेला पूर्ण करतोस ॥ १०९ ॥

इष्कर्तारमध्वरस्य प्रचेतसं क्षयन्तꣳ राधसो महꣳ । रातिं वामस्य सुभगां महीमिषं दधासि सानसिꣳ रयिम् ॥ ११० ॥

अर्थ—हे अग्ने, यज्ञाचा उत्पादक, चांगल्या चित्तानें युक्त, विशिष्ट स्थानीं राहणाऱ्या यजमानाला तूं पुष्कळ द्रव्य देतोस व स्पृहणीय असें पुष्कळ धन व प्राचीन द्रव्य देतोस ॥ ११० ॥

क्रतावानं महिषं विश्वदर्शतमग्निꣳ सुम्नाय दधिरे पुरो जनाऽ । श्रुत्कर्णꣳ सप्रथस्तमं त्वा गिरा दैव्यं मानुषा युगा ॥ १११ ॥

अर्थ—हे अग्ने, ऋत्विग् व यजमान दर्शपौर्णमासादि कालीं यज्ञाकरितां वेदवाणीनें तुझी अग्रभागीं स्थापना करतात. तूं सत्ययुक्त, मोठा, सर्वांत सुंदर, ऐकलेलें सत्य करणारा, अत्यंत कीर्तिमान् व देवांचा हितकर्ता आहेस ॥ १११ ॥

विनियोग—'आप्यायस्व' इत्यादि दोन मंत्रांनीं पसरलेल्या वाळूला स्पर्श करावा.

आप्यायस्व समेतु ते विश्वतः÷ सोम वृष्ण्यम् । भवा वाजस्य सङ्गथे ॥ ११२ ॥

अर्थ—हे सोमा, सर्व बाजूंनीं तुझेकडे सर्व प्राण्यांची उत्पत्ति करणारें सामर्थ्य येवो. त्यायोगें तूं सर्वतऱ्हेनें वाढ व आम्हाला अन्नाची संगति करणारा हो ॥ ११२ ॥

सं ते पयाꣳसि समु यन्तु वाजाऽ सं वृष्ण्यान्यभिमातिषाहः÷ । आप्यायमानोऽअमृताय सोम दिवि श्रवाꣳस्युत्तमानि धिष्व ॥ ११३ ॥

अर्थ--हे सोमा, पेयरस, अन्नें व वीर्यें शत्रुनाशक अशा तुझ्याशीं एकत्र होवोत. हे सोमा, पय वगैरेंनीं वाढणारा तूं यजमानाला मरणरहित पुत्रादि प्रजा दे व द्युलोकांत उत्तम अन्नांचें धारण करणारा हो ॥ ११३ ॥

आप्यायस्व मदिन्तम सोम विश्वेभिरꣳ शुभि÷। भवा नऽ सप्रथस्तमऽ सखा वृधे ॥ ११४ ॥

अर्थ--अतिशयेंकरून संतुष्ट करणाऱ्या अशा हे सोमा, सर्व सूक्ष्मांशांनीं तूं वृद्धि पाव व तसा तूं आमच्या वृद्धीचा साहायक हो. तूं अत्यंत कीर्तिमान् आहेस ॥ ११४ ॥

विनियोग—अग्नि नेले जात असतां होत्यानें 'आ ते' इत्यादि तीन ऋचा म्हणाव्या.

आ ते वत्सो मनो यमत्परमाच्चित्सधस्थात्। अग्ने त्वाꣳकामया गिरा ॥ ११५ ॥

अर्थ--हे अग्ने, मुलाप्रमाणें तुला आवडणारा हा यजमान उत्कृष्ट अशाही देवयुक्त अशा द्युलोकांतून तुझ्या स्तुतीच्या इच्छेनें विशिष्ट अशा वेदवाणीनें आवरून मनाचा निग्रह करतो ॥ ११५ ॥

तुभ्यं ताऽ अङ्गिरस्तम विश्वाऽ सुक्षितयऽ पृथक्। अग्ने कामाय येमिरे ॥ ११६ ॥

अर्थ—अतिशयेंकरून अन्न भक्षण करणाऱ्या हे अग्ने, यजमान इच्छापूर्तीकरतां स्वर्गादि शुभस्थानें देणाऱ्या अशा निरनिराळ्या तुझ्या स्तुति करतात ॥ ११६ ॥

अग्निꣳ प्रियेषु धामसु कामो भूतस्य भव्यस्य। सम्राजेको विराजति ॥ ११७ ॥

अर्थ--अग्नि एकटाच आपल्या आवडत्या स्थानांवर विशेष प्रकाशतो. तो अग्नि उत्पन्न झालेल्या व भविष्यकालीन जनांच्या इच्छा पूर्ण करणारा व उत्तम शोभणारा आहे ॥ ११७ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे वेदप्रकाशाख्ये** द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

इति द्वादशोऽध्यायः समाप्तः।

अथ त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥



बाराव्या अध्यायांत उखाधारणादिकांचे मंत्र सांगितले. तेरावे अध्यायांत पुष्करपर्णादिकांचे उपधान मंत्र सांगतात.

विनियोग--उत्तरवेदीच्या पश्चिमेकडे उभें राहून यजमानानें 'मयि गृह्णामि' या मंत्राचा जप करावा.

मयि गृह्णाम्यग्रेऽअग्निꣳ रायस्पोषाय सुप्रजास्त्वाय सुवीर्याय। मामु देवतां÷ सचन्ताम् ॥ १ ॥

अर्थ—मी प्रथम आपल्या शरीरावर द्रव्यवृद्धि, उत्तम प्रजा व उत्तम वीर्यप्राप्तीकरितां अग्नि स्थापन करतों. देवताहि मजशींच एकत्र होवोत ॥ १ ॥

विनियोग--उखासंभरणाप्रमाणें अध्वर्यूनें कुशस्तंबावर कमलिनीपत्र स्थापन करावें.

अपां पृष्ठमसि योनिरग्नेꣳ समुद्रमभितꣳ पिन्वमानम्। वर्धमानो महाँ २ऽआ च पुष्करे दिवो मात्रया वरिम्णा प्रथस्व ॥ २ ॥

अर्थ—हे पुष्करपर्णा, तूं जलाचें पृष्ठ आहेस व या मृत्तिकापिंडाचें कारण आहेस. तसेंच सर्वबाजूंनीं वाहणाऱ्या या जलाची प्रीति करणारे आहेस व या कमलांत पुष्कळ प्रकारे तूं वृद्धिंगत होतेस. हे पुष्करपर्णा, द्युलोकाच्या प्रमाणानें व मोठेपणानें तूं विस्तृत हो. ॥ २ ॥

विनियोग—त्या पुष्करपर्णावर 'ब्रह्मजज्ञानम्' या मंत्रानें गळ्यांतील सुवर्णालंकार ठेवावा.

ब्रह्म जज्ञानं प्रथमं पुरस्ताद्वि सीमतꣳ सुरुचो वेनऽआवꣳ। स बुध्न्याऽ उपमाऽअस्य विष्ठाꣳ सतश्च योनिमसतश्च विवः÷ ॥ ३ ॥

अर्थ--हा मोठा सुवर्णरूपी आदित्य प्रथम पूर्वेकडे उदय पावला नंतर भूमर्यादेच्या पलीकडे प्रकाशमान असलेल्या लोकांना त्यानें आपल्या प्रकाशानें विस्तृत केलें. तो मेधावी सूर्य अन्तरिक्षांतील सर्व विस्तृत आणि जगाचे स्थानभूत अशा दिशा

व घटपटादिमूर्त वस्तूंचें व वाखादिक अमूर्तवस्तूंचें जें उत्पत्तिस्थान त्यांस प्रकाशित करतो ॥ ३ ॥

विनियोग--त्या सुवर्णावर दुसरी सुवर्णाची पुरुषप्रतिमा 'हिरण्यगर्भः' या दोन मंत्रांनीं स्थापन करावी.

हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेकऽआसीत् । स दाधार पृथिवीं द्यामुतेमां कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ४ ॥

अर्थ—हिरण्यपुरुषरूपी ब्रह्माण्डांत गर्भरूपानें असणारा प्रजापति सर्व प्राणिसमुदायाच्या पूर्वी शरीरधारण करता झाला. तो एकटाच पुढें उत्पन्न होणाऱ्या जगाचा स्वामी होता तोच ह्या भूलोक, अन्तरिक्षलोक व द्युलोकाला धारण करता झाला. त्या प्रजापति देवाला आम्ही हवि देतो ॥ ४ ॥

द्रप्सश्चस्कन्द पृथिवीमनु द्यामिमं च योनिमनु यश्च पूर्वः÷ । समानं योनिमनु संचरन्तं द्रप्सं जुहोम्यनु सप्त होत्राः ॥ ५ ॥

अर्थ--मुख्य आदित्य अन्तरिक्षलोक, द्युलोक व भूलोक यांप्रत गमन करतो अशा रीतीनें सर्वांचें एकच उत्पत्तिस्थान तीनही लोकांत गमन करणाऱ्या आदित्याचें मी सर्व दिशांत स्थापन करतों ॥ ५ ॥

विनियोग--हिरण्यपुरुषाकडे पाहून यजमानानें 'नमोऽस्तु' इत्यादि तीन ऋचा म्हणाव्या.

नमोऽस्तु सर्पेभ्यो ये के च पृथिवीमनु । येऽअन्तरिक्षे ये दिवि तेभ्यः÷ सर्पेभ्यो नमः÷ ॥ ६ ॥

अर्थ—पृथ्वीवर, अन्तरिक्षांत व द्युलोकांत जे लोक आहेत त्या सर्वांना नमस्कार असो ॥ ६ ॥

याऽइषवो यातुधानानां ये वा वनस्पतीँरनु । ये वावटेषु शेरते तेभ्यः÷ सर्पेभ्यो नमः÷ ॥ ७ ॥

अर्थ--दुःख देणाऱ्या राक्षसरूपानें राहणाऱ्या, बाणरूपानें राहणाऱ्या, चन्दनादिवृक्षांना वेष्टन करणाऱ्या व बिळांत शयन करणाऱ्या ज्या सर्पजाति त्यांना नमस्कार असो ॥ ७ ॥

ये वामी रोचने दिवो ये वा सूर्यस्य रश्मिषु । येषामप्सु सदस्कृतं तेभ्यः÷ सर्पेभ्यो नमः÷ ॥ ८ ॥

अर्थ—द्युलोकाच्या दीप्तिस्थानांत असणारे आम्हांला न दिसणारे व सूर्यकिरणांत राहणारे आणि जलांत ज्यांचें स्थान आहे अशा सर्पांना नमस्कार असो ॥ ८ ॥

विनियोग—' कृणुष्वपाजः ' या पांच मंत्रांनीं प्रत्येक दिशेकडे जाऊन पुरुषावर पांच आहुती द्याव्या.

कृणुष्व पाजः प्रसितिं न पृथ्वीं याहि राजेवामवाँ२ऽ इभेन । तृष्वीमनु प्रसितिं द्रूणानोऽस्तासि विध्य रक्षसस्तपिष्ठैः ॥ ९ ॥

अर्थ—हे अग्ने, पक्षी पकडण्याकरितां पसरलेल्या जाळ्याप्रमाणें शत्रूंना पकडण्याकरितां तूं आपलें सामर्थ्य पसर. नंतर राजाप्रमाणें ससहाय होऊन हत्तीवर बसून शत्रूंप्रत गमन कर. हे अग्ने, तूं शत्रूंचा नाशक आहेस म्हणून ताप देणाऱ्या आयुधांनीं राक्षसांना ताडन कर. तूं क्षिप्रकारी जाळ्यानें शत्रूचा नाश करणारा आहेस ॥ ९ ॥

तव भ्रमासऽआशुया पतन्त्यनुस्पृश धृषता शोशुचानः । तपूंष्यग्ने जुह्वा पतङ्गानसन्दितो विसृज विष्वगुल्काः ॥ १० ॥

अर्थ—हे अग्ने, तुझ्या ज्या शीघ्रगमन करणाऱ्या व वाऱ्यानें हलणाऱ्या ज्वाला आहेत त्यायोगें ताप देणाऱ्या राक्षसांना व उड्या मारीत गमन करणाऱ्या पिशाचांना जाळ. तूं प्रौढ अशा ज्वालासमुदायानें अत्यंत प्रकाशमान, सुचेनें होम केला जाणारा व अखण्डित असा होऊन ऊर्ध्वभागीं, अधोभागीं व आडव्या तिडव्या आपल्या ज्वालांना राक्षसांच्या नाशाकरितां पसर ॥ १० ॥

प्रति स्पशो विसृज तूर्णितमो भवा पायुर्विशोऽअस्याऽअदब्धः । यो नो दूरेऽअघशꣳसो योऽअन्त्यग्ने मा किष्टे व्यथिरादधर्षीत् ॥ ११ ॥

अर्थ—हे अग्ने, जो आमचा द्वेषी दूर राहतो व जवळ राहतो त्याला बांधण्याकरितां गुप्त दूत पाठव. या आमच्या प्रजेचें रक्षण कर. तूं अत्यंत वेगवान् व अहिंसित आहेस. हे अग्ने, अशा रीतीनें मजवर अनुग्रह करण्यास प्रवृत्त झालेल्या तुला कोणताही शत्रु पीडा न करो ॥ ११ ॥

उदग्ने तिष्ठ प्रत्यातनुष्व न्यमित्राँ२ऽओषतात्तिग्महेते । यो नोऽअरातिꣳ समिधान चक्रे नीचा तं धक्ष्यतसं न शुष्कम् ॥ १२ ॥

अर्थ--हे अग्ने, तूं ऊठ व ज्वाला पसर. हे तीक्ष्ण आयुधें धारण करणाऱ्या तूं विशेषेंकरून शत्रूंना जाळ. हे दीप्यमान अग्ने, आम्हांला दान देत असतां जो निषेध करतो त्याला शुष्कवृक्षाप्रमाणें तूं जाळ ॥ १२ ॥

विनियोग—' अग्नेष्ट्वा ' या मंत्रानें व ' अग्निर्मूर्धा ' या मंत्रानें सूचा ठेवावी.

ऊर्ध्वो भव प्रतिविध्याध्यस्मदाविष्कृणुष्व दैव्यान्यग्ने । अव स्थिरा तनुहि यातुजूनां जामिमजामिं प्रमृणीहि शत्रून् । अग्नेष्ट्वा तेजसा सादयामि ॥ १३ ॥

अर्थ--हे अग्ने, तूं उद्युक्त होऊन आमच्यावर तावा चालविणाऱ्या शत्रूंना ताडन कर व देवसंबंधीं कर्मे प्रकट कर. शत्रूंच्या स्थिर धनुष्यांना खालीं ठेवव. एकदां अथवा पुनः पुनः मारून शत्रूंचा नाश कर. हे सूचे, अग्नीसंबंधीं तेजानें तुझें मी स्थापन करतों ॥ १३ ॥

विनियोग—' इन्द्रस्य त्वा ' या मंत्रानें औदुंबर सूचेचें स्थापन करावें.

अग्निर्मूर्धा दिवः ककुत्पतिः÷ पृथिव्याऽअयम् । अपाꣳ रेताꣳसि जिन्वति । इन्द्रस्य त्वौजसा सादयामि ॥ १४ ॥

अर्थ--हा अग्नि द्युलोकांतून पडणाऱ्या जलांचे व्रीहियवादिरूपी सारभाग वाढवितो. तो अग्नि द्युलोकाचें मस्तक व वर्शिंड असून पृथ्वीचा पालक आहे. हे सूचे, इंद्राच्या तेजानें तुझें मी स्थापन करतों ॥ १४ ॥

भुवो यज्ञस्य रजसश्च नेता यत्रा नियुद्भिः सचसे शिवाभिः÷ । दिवि मूर्धानं दधिषे स्वर्षां जिह्वामग्ने चकृषे हव्यवाहम् ॥ १५ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं ज्यावेळीं हविर्द्रव्याची वहन करणारी ज्वाला पसरतोस त्यावेळीं द्रव्यदेवतायुक्त यागाचा व यज्ञपरिणामरूपी उदकाचा नेणारा होतोस. त्या स्थानामध्यें मंगलरूपी अश्वांनीं व अश्वस्त्रियांनीं तूं संबद्ध होतोस व द्युलोकांत स्वर्ग देणाऱ्या सूर्याला धारण करतोस. ज्या तुझें हें सर्व कृत्य आहे त्या तुला सूचेच्यारूपानें स्थापन करतों. ॥ १५ ॥

विनियोग—' ध्रुवासि ' या मंत्रानें 'स्वयमातृण्णा' संज्ञक इष्टकेचें स्थापन करावें.

ध्रुवासि धरुणास्तृता विश्वकर्मणा । मा त्वा समुद्रऽउदधीन्मा सुपर्णोऽ शमन्नद्यः पृथिवीं दृꣳह ॥ १६ ॥

अर्थ—हे स्वयमातृष्णे, तूं भूमिरूपानें विश्वाला धारण करणारीं सर्व कर्में करणाऱ्या अशा प्रजापतीनें स्थापन केलेली आहेस. रुक्म व पुरुष तुझा नाश न करोत. तूं चलित न होतां ह्या पृथ्वीला दृढ कर. ॥ १६ ॥

प्रजापतिष्ट्वा सादयन्त्वपां पृष्ठे समुद्रस्येमन् । व्यचस्वतीं प्रथस्वतीं प्रथस्व पृथिव्यसि.॥ १७ ॥

अर्थ—हे स्वयमातृष्णे, प्रजापति ह्या जलांच्या पृष्ठभागीं व जलसंघाच्या स्थानामध्यें तुझें स्थापन करो. तूं अभिव्यक्तीनें सहित विस्तारयुक्त अशी आहेस. तूं प्रजापतीनें स्थापित केलेली अशी होऊन ह्या चितीचा विस्तार कर. कारण तूं पृथ्वीस्वरूपी आहेस ॥ १७ ॥

भूरसि भूमिरस्यदितिरसि विश्वधाया विश्वस्य भुवनस्य धर्त्री । पृथिवीं यच्छ पृथिवीं दृꣳह पृथिवीं मा हिꣳसीः ॥ १८ ॥

अर्थ—हे स्वयमातृष्णे, तूं सुखांना प्राप्त करून देणारी व पृथ्वीरूपी आहेस. तूं देवमाता असून विश्व धारण करणारी आहेस. सर्व भूतसमुदायांना धारण करणारी अशी तूं पृथ्वीला नियमित कर व तिला दृढ कर आणि तिची हिंसा करूं नकोस ॥ १८ ॥

विश्वस्मै प्राणायापानाय व्यानायोदानाय प्रतिष्ठायै चरित्राय । अग्निष्ट्वाभिपातु महता स्वस्त्या छर्दिषा शन्तमेन तया देवतयाङ्गिरस्वद्ध्रुवा सीद ॥ १९ ॥

अर्थ—हे स्वयमातृष्णे, सर्व प्राणापानव्यानोदानाख्य वृत्तिलाभ, कीर्ति व शास्त्रीय आचरण ह्या सर्वांकरितां मी तुझें स्थापन करतों व मोठ्या कल्याणानें व अत्यंत सुखकारक गृह देऊन अग्नि सर्वतऱ्हेनें तुझें रक्षण करो. त्या अग्निदेवाच्या अनुग्रहानें तूं स्थिर होऊन अङ्गिरो ऋषीच्या अनुष्ठानाप्रमाणें ह्या यज्ञांत स्थिर अशी स्थित हो ॥ १९ ॥

विनियोग—'काण्डात् काण्डात्' या दोन मंत्रांनीं मूल व अग्रसहित दूर्वा स्वयमातृष्णासंज्ञक इष्टकेवर स्थापन करावी.

काण्डात्काण्डात्प्ररोहन्ती परुषः परुषस्परि । एवा नो दूर्वे प्रतनु सहस्रेण शतेन च ॥ २० ॥

अर्थ—हे दूर्वेष्टके, प्रत्येक काण्डांतून व प्रत्येक पेऱ्यांतून ज्याप्रमाणें तूं अंकुरयुक्त होऊन वाढतेस त्याप्रमाणें शतसहस्रसंख्याक पुत्रपौत्र देऊन आम्हांला वाढव ॥२०॥

या शतेन प्रतनोषि सहस्रेण विरोहसि। तस्यास्ते देवीष्टके विधेम हविषा वयम् ॥ २१ ॥

अर्थ—हे प्रकाशक इष्टके, ज्या शंभर काण्डांनीं तूं विस्तार पावतेस व सहस्र अंकुरांनीं तूं विविध रीतीनें वाढतेस त्या तुझ्या स्थानाची आम्ही हविर्द्रव्यानें परिचर्या करूं ॥ २१ ॥

विनियोग—'यास्ते' इत्यादि दोन ऋचांनीं पद्यानामक इष्टकेचें स्थापन करावें.

यास्तेऽअग्ने सूर्ये रुचो दिवमातन्वन्ति रश्मिभिः÷। ताभिर्नोऽअद्य सर्वाभी रुचे जनाय नस्कृधि ॥ २२ ॥

अर्थ—हे अग्ने, ज्या तुझ्या कांती सूर्यमंडलांत राहून आपल्या किरणांनीं द्युलोकाला प्रकाशित करतात त्या सर्वांच्या योगानें आज आमची शोभा वाढव व शोभायुक्त म्हणजे प्रसिद्ध असे पौत्रादिक आम्हांला दे ॥ २२ ॥

या वो देवाऽ सूर्ये रुचो गोष्वश्वेषु या रुचः÷। इन्द्राग्नी ताभिऽ सर्वाभी रुचं नो धत्त बृहस्पते ॥ २३ ॥

अर्थ—हे देवांनो, हे इंद्राग्नींनो, हे बृहस्पते, तुमच्यासंबंधीं ज्या कांती सूर्यमंडलांत व गो, अश्व यांत आहेत त्या सर्वांच्या योगानें आम्हांला कांति द्या ॥२३॥

विनियोग—'विराट् स्वराट्' या मंत्रांनीं दोन रेतःसिच् नांवाच्या दोन पद्येष्टकांचें स्थापन करावें. 'प्रजापति' या मंत्रानें विश्वज्योतिषसंज्ञक इष्टकेचें स्थापन करावें.

विराड्ज्योतिरधारयत्स्वराड्ज्योतिरधारयत्। प्रजापतिष्ट्वा सादयतु पृष्ठे पृथिव्या ज्योतिष्मतीम्। विश्वस्मै प्राणायापानाय व्यानाय विश्वं ज्योतिर्यच्छा अग्निष्टेऽधिपतिस्तया देवतयाङ्गिरस्वद्ध्रुवा सीद ॥ २४ ॥

अर्थ—विशेषेंकरून शोभणारा हा भूलोक अग्निरूपी तेजाला धारण करतो व स्वयंप्रकाशवान् असा हा स्वर्गलोक आदित्यरूपी तेजाला धारण करतो. प्रजापति पृथ्वीच्या ऊर्ध्वभागीं ज्योतिष्मतीसंज्ञक तुज इष्टकेला सर्व प्राणादिसंपत्तीकरितां स्थापन

करो. हे इष्टके, तूं सर्व तेजाला नियमित कर. तुझा स्वामी अग्नि आहे. त्या देवतेसह वर्तमान अङ्गिरोऋषीच्या यज्ञाप्रमाणें या यज्ञांतही स्थिर होऊन बैस ॥ २४ ॥

विनियोग—' मधुश्च माधवश्च ' या मंत्रानें ऋतव्यसंज्ञक दोन इष्टकांचें स्थापन करावें.

मधुश्च माधवश्च वासन्तिकावृतूऽअग्नेरन्तश्श्लेषोऽसि कल्पेतां द्यावापृथिवी कल्पन्तामापऽओषधयश्श कल्पन्तामग्नयश्श पृथङ्मम ज्यैष्ठ्याय सव्रताश्श । येऽअग्नयश्श समनसोऽन्तरा द्यावापृथिवीऽइमे । वासन्तिकावृतूऽअभिकल्पमानाऽइन्द्रमिवदेवाऽअभिसंविशन्तु तया देवतयाङ्गिरस्वद्ध्रुवे सीदतम् ॥ २५ ॥

अर्थ—चैत्र, वैशाख हे दोन्ही वसंतसंबंधीं अवयव आहेत. हे वसंतऋतो, तूं या अग्नीच्या आंत राहून जोडणारा आहेस. म्हणून द्यावापृथिवींनीं अग्निचयन करणाऱ्या माझें (यजमानाचें) ज्येष्ठत्व प्राप्त करण्याकरितां योग्य उपकार करावा. जल व ओषधी आणि एकाच चयन यज्ञामध्यें कार्य करणारे निरनिराळे इष्टकारूपी अग्नि तुला ज्येष्ठत्व देण्याला समर्थ होवोत. ह्या द्यावापृथिवी व त्यांत असणारे एक चित्ताचे अग्नि तेही वासंतिक संपत्ति मिळवून या कर्माचा आश्रय करोत. यास दृष्टान्तः—ज्याप्रमाणें देव इन्द्राच्या सेवेकरितां येतात त्याप्रमाणें अन्य इष्टका वसंताच्या सेवेकरितां येवोत. हे ऋतव्य इष्टकांनो, त्या देवतेनें स्थापित केलेल्या तुम्ही अङ्गिरस् ऋषीच्या यज्ञाप्रमाणें या यज्ञांत येऊन स्थिर होऊन रहा ॥ २५ ॥

विनियोग—अषाढासंज्ञक इष्टका ' अषाढासी ' या मंत्रानें स्थापन करावी.

अषाढासि सहमाना सहस्वारातीश्श सहस्व पृतनायतश्श । सहस्रबीर्यासि सा मा जिन्व ॥ २६ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं शत्रूंना सहन करणारी नाहींस व स्वभावतः शत्रूंचा पराजय करणारी आहेस, म्हणून माझ्या दानस्वभावरहित प्रजेचा पराभव कर व संग्रामाची इच्छा करणाऱ्या शत्रूंचाही पराजय कर. अशा बहु सामर्थ्यानें युक्त अशी तूं मला संतुष्ट कर ॥ २६ ॥

विनियोग—दहीं, मध व तूप यांचें मिश्रण करून ' मधुवाता ' ह्या तीन ऋचांनीं कालताच्या अंगास लावावें.

मधु वाताऽऋतायते मधु क्षरन्ति सिन्धवः। माध्वीर्नः सन्त्वोषधीः॥ २७॥

अर्थ—यज्ञाची इच्छा करणाऱ्या यजमानाकरितां मधुररसयुक्त वारे वाहोत, तशाच वाहणाऱ्या नद्या व समुद्र मधुर जलानें वाहोत व आमच्या ओषधि मधुररसयुक्त होवोत. ॥ २७ ॥

मधु नक्तमुतोषसो मधुमत्पार्थिवꣳ रजः। मधु द्यौरस्तु नः पिता॥ २८॥

अर्थ—आमच्या रात्री व दिवस हीं मधुररसयुक्त होवोत. मातृभूत पृथ्वीलोक व पितृभूत द्युलोक हा मधुररसानें युक्त असो ॥ २८ ॥

मधुमान्नो वनस्पतिर्मधुमाँ२ऽअस्तु सूर्यः। माध्वीर्गावो भवन्तु नः॥ २९॥

अर्थ—आमचा अश्वत्थादि वृक्ष मधुररसयुक्त असो व सूर्य यज्ञसाधनभूतरश्मि आमच्याकरितां मधुररसांनीं युक्त होवोत ॥ २९ ॥

विनियोग—'अपां गम्भन्' ह्या तीन मंत्रांनीं कासवाचें स्थापन करावें.

अपां गम्भन्त्सीद मा त्वा सूर्योऽभितापसीन्माग्निर्वैश्वानरः। अच्छिन्नपत्राः प्रजाऽअनुवीक्षस्वानु त्वा दिव्या वृष्टिः सचताम्॥ ३०॥

अर्थ—हे प्रजापते, जलांचें गंभीरस्थान जें रविमंडल त्यांत तूं बैस. तेथें बसलेल्या तुला सूर्य व वैश्वानर अग्नि संतप्त न करोत. तूं येथें राहून अखंडित अवयवांच्या इष्टकांना निरंतर पहा व द्युलोकांतील वृष्टि निरंतर तुझें सेवन करो. ॥ ३० ॥

विनियोग—'त्रीन् समुद्रान्' या ऋचेनें हातांतील कासवाला थोडें हलवावें.

त्रीन्त्समुद्रान्त्समसृपत् स्वर्गानपां पतिर्वृषभऽइष्टकानाम्। पुरीषं वसानꣳ सुकृतस्य लोके तत्र गच्छ यत्र पूर्वे परेताः॥ ३१॥

अर्थ—हे कासवा, तूं उपभोगसाधन अशा तीन लोकांना प्राप्त होतोस. तूं जलांचा स्वामी व इष्टकावर सिंचन करणारा असा आहेस. तूं होमलेल्या पशूंचें आच्छादन करून ज्या ठिकाणीं पूर्वीचें कासव अग्निचयनाचे वेळीं गेलें त्या उत्तमचयन अग्नीच्या स्थानामध्यें तूं गमन कर ॥ ३१ ॥

महि द्यौः पृथिवी च नऽइमं यज्ञं मिमिक्षताम्। पिपृतां नो भरीमभिः ॥ ३२ ॥

अर्थ—महान् अशा द्युलोक व पृथ्वी लोकांनीं आमचा यज्ञ आपआपल्या भागांनीं पूर्ण करावा, व त्यांनीं आमचें घर हिरण्य पशुधान्यादिरूपी आपल्या भागांनीं पूर्ण करावें ॥ ३२ ॥

विनियोग—' विष्णोः कर्माणि ' या मंत्रानें उखळ व मुसळ ह्या दोघांचें एकदम स्थापन करावें.

विष्णोः कर्माणि पश्यत यतो व्रतानि पस्पशे। इन्द्रस्य युज्यः सखा ॥ ३३ ॥

अर्थ—हे ऋत्विजांनो, यज्ञाधिष्ठाता जो विष्णु त्याचीं सृष्टिसंहारादि कर्में अवलोकन करा. ज्या योगें त्यानें लौकिक वैदिक कर्में निर्माण केलीं; तो विष्णु वृत्रवधारि कर्मांमध्यें इंद्राचा योग्य असा मित्र आहे ॥ ३३ ॥

विनियोग—' ध्रुवासि ' या मंत्रानें उखेचें स्थापन करावें.

ध्रुवासि धरुणेतो यज्ञे प्रथममेभ्यो योनिभ्योऽधि जातवेदाः। स गायत्र्या त्रिष्टुभानुष्टुभा च देवेभ्यो हव्यं वहतु प्रजानन् ॥ ३४ ॥

अर्थ—हे उखे, तूं जगाचें धारण करणारी व स्थिर अशी आहेस. जो अग्नि पहिल्यानें प्रज्ञानयुक्त होऊन ह्या उखेपासून उत्पन्न झाला, नंतर अरणि वगैरे स्थानांतून झाला; तो आपला अधिकार ओळखून गायत्री, त्रिष्टुप् व अनुष्टुप् या छंदांनीं देवाकरितां हवि धारण करो ॥ ३४ ॥

इषे राये रमस्व सहसे युन्नऽऊर्जेऽअपत्याय। सम्राडसि स्वराडसि सारस्वतौ त्वोत्सौ प्रावताम् ॥ ३५ ॥

अर्थ—हे उखे, तूं अन्न, धन, बल, यश, दूध, दहीं वगैरे स्निग्ध पदार्थ व पुत्रपौत्र देण्याकरितां येथें रममाण हो. तूं चांगल्या रीतीनें शोभणारी व स्वयं प्रकाशमान आहेस. अशा तुझें सरस्वतीसंबंधीं कूप (ऋग्वेदसामवेद) पालन करोत. ॥ ३५ ॥

विनियोग—अग्ने, युक्ष्वादि ' ह्या दोन मंत्रांनीं उखेमध्यें दोन आहुतींचा होम करावा.

अग्ने युक्ष्वा हि ये तवाश्वासो देव साधवः। अरं वहन्ति मन्यवे ॥ ३६ ॥

अर्थ—हे प्रकाशमान अग्ने, जे तुझे सुशिक्षित घोडे यज्ञाकरितां देवांना वाहून नेण्यास समर्थ आहेत तेच घोडे रथाला जोड ॥ ३६ ॥

युक्ष्वा हि देवहूतमाँ२ऽअश्वाँ२ऽअग्ने रथीरिव। नि होता पूर्व्यः सद ॥ ३७ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं रथस्वामीप्रमाणें देवांचें अतिशयेंकरून आह्वान करणारे घोडे रथाला जोड. तूं पूर्वीचा होता आहेस. ह्या यागांत होतृषदनस्थानावर बैस ॥ ३७ ॥

विनियोग—'सम्यक् स्रवन्ति' इत्यादि मंत्रानें एक एक सुवर्णशकल पंच पशूंच्या मुखांत घालावें.

सम्यक् स्रवन्ति सरितो न धेनाऽअन्तर्हृदा मनसा पूयमानाः। घृतस्य धाराऽअभिचाकशीमि हिरण्ययो वेतसो मध्येऽअग्नेः ॥ ३८ ॥

अर्थ—नद्या समुद्रांत जातात त्याप्रमाणें जो हिरण्मय पुरुष अग्नीमध्यें निहित आहे; त्या हिरण्मय पुरुषाप्रत हविर्द्रव्यें गमन करतात. तीं हविर्द्रव्यें निश्चयात्मक व श्रद्धायुक्त अंतःकरणानें पवित्र केलीं गेलीं आहेत. तसेंच त्या पुरुषाकडे घृताच्या धाराही गमन करतात व तीं हविर्द्रव्यें व त्या धारा मी पाहतों ॥ ३८ ॥

विनियोग—'ऋचे त्वा' ह्या मंत्रानें दोन नासिकांत सुवर्णशकल ठेवावे. तसेंच 'भासे त्वा' या मंत्रानें दोन नेत्रांत व 'अभूत्' या मंत्रानें दोन कर्णांत सुवर्णशकल ठेवावे.

ऋचे त्वा रुचे त्वा भासे त्वा ज्योतिषे त्वा। अभूर्विदं विश्वस्य भुवनस्य वाजिनमग्नेर्वैश्वानरस्य च ॥ ३९ ॥

अर्थ—हे हिरण्यशकला, ऋग्वेद हौत्रसिद्धि, दीप्ति, कांति, तेज यांकरितां तुझें मी स्थापन करतों. हे श्रोत्रेंद्रिय, सर्व प्राणिसमुदाय व सर्व मनुष्यांना हितकारक जो अग्नि त्याला जाणणारे आहेत म्हणून त्या श्रोत्रेंद्रियांत मी सुवर्णप्रक्षेप करतों ॥ ३९ ॥

विनियोग—'सहस्रदा' या मंत्रानें पुरुषाचें मस्तक घेऊन उखेमध्यें ठेवावें.

अग्निर्ज्योतिषा ज्योतिष्मान् रुक्मो वर्चसा वर्चस्वान्। सहस्रदाऽअसि सहस्राय त्वा ॥ ४० ॥

अर्थ—हा अग्नि पशूच्या कर्णीतील सुवर्ण तेजानें तेजस्वी असो. प्रकाशमान अग्नि सुवर्णकांतिमान् असो. हे पुरुषा, तूं सहस्रसंख्य द्रव्य देणारा आहेस म्हणून सहस्रसंख्याक द्रव्य मिळविण्याकरितां तुला मी उचलून ठेवतों ॥ ४० ॥

विनियोग—'आदित्यं गर्भम्' या पांच मंत्रांनीं पांच शिरांचें स्थापन करावें.

आदित्यं गर्भं पयसा समङ्धि सहस्रस्य प्रतिमां विश्वरूपम् । परिवृङ्धि हरसा माभिमंस्थाः शतायुषं कृणुहि चीयमानः ॥ ४१ ॥

अर्थ—हे पुरुषशिरा, तूं आदित्यरूपी चित्याग्नीवर पय ओत. तो आदित्य पशूंना गर्भ प्राप्त करून देणारा, पुष्कळ देणारा, सर्वरूपप्रकाशक असा आहे. तसेंच तूं सर्ववीर्यापहारी ज्योतीनें, तेजानें, यजमानाला दूर कर म्हणजे तें तेज त्यावर घालूं नकोस. तसेंच त्या यजमानाची हिंसा करूं नकोस. इष्टकाचयन झाल्यावर इष्टकाचयनाच्या योगें तूं यजमानाला शतायुषी कर. ॥ ४१ ॥

वातस्य जूतिं वरुणस्य नाभिमश्वं जज्ञानꣳ सरिरस्य मध्ये । शिशुं नदीनाꣳ हरिमद्रिबुध्नमग्ने मा हिꣳसीः परमे व्योमन् ॥ ४२ ॥

अर्थ—हे चित्य अग्ने, तूं या अश्वाची हिंसा करूं नकोस. तो अश्व वायूप्रमाणें शीघ्र गमन करणारा, वायूचा आवडता, म्हणजे वरुणाच्या नाभीप्रमाणें रक्षणीय असा आहे. समुद्रांत उत्पन्न होणारा असल्यामुळें तो नद्यांचा बालक आहे व तो हरितवर्ण असून पर्वत त्याचें मूल कारण आहे व विस्तृत अशा या लोकामध्यें तो राहतो ॥ ४२ ॥

अजस्रमिन्दुमरुषं भुरण्युमग्निमीडे पूर्वचित्तिं नमोभिः । स पर्वभिर्ऋतुशः कल्पमानो गां मा हिꣳसीरदितिं विराजम् ॥ ४३ ॥

अर्थ—मी सर्वदा क्षीण न होणाऱ्या अशा अग्नीची स्तुति करतों. तो अग्नि रोषरहित व महर्षीनीं सेव्य व अन्नानें सर्वांचें पोषण करणारा आहे. अशा हे अग्ने, प्रत्येक अमावास्यादि पर्वावर व प्रत्येक ऋतूंत कर्म संपादन करणारा तूं या स्थापन केलेल्या गाईची हिंसा करूं नकोस. ती गाय अखण्डित व दुग्धदानानें विशेष शोभणारी आहे ॥ ४३ ॥

वरुत्रीं त्वष्टुर्वरुणस्य नाभिमविं जज्ञानाꣳ रजसः परस्मात् । महीꣳसाहस्रीमसुरस्य मायामग्ने मा हिꣳसीः परमे व्योमन् ॥ ४४ ॥

अर्थ—हे अग्ने, उत्कृष्ट अशा या लोकामध्यें स्थापन केलेल्या या बकरीची हिंसा करूं नकोस. ही बकरी त्वष्टयाच्या कृपेनें कांबळा देऊन सर्व लोकांचें रक्षण करणारी व वरुणाला नाभीप्रमाणें रक्षणीय, प्रजापतीच्या रजोगुणापासून उत्पन्न झालेली, मोठी, हजारों तऱ्हांनीं उपकार करण्यास समर्थ व सर्व प्राण्यांना बुद्धि देणारी अशी आहे ॥ ४४ ॥

योऽअग्निरग्नेरध्यजायत शोकात्पृथिव्याऽउत वा दिवस्परि । येन प्रजा विश्वकर्मा जजान तमग्ने हेडऽ परि ते वृणक्तु ॥ ४५ ॥

अर्थ—जो अग्निरूपी अज प्रजापतीच्या संतापापासून उत्पन्न झाला व द्युलोक, पृथिवीलोक यांच्याही शोकापासून उत्पन्न झाला व विश्वकर्मा प्रजापतिच ज्या वाग्रूपी अजाच्या योगानें प्रजा उत्पन्न करिता झाला. हे चित्य अग्ने, त्या अजावर (मेंढ्यावर) तूं रागावूं नकोस ॥ ४५ ॥

विनियोग—' चित्रं देवानाम् ' या दोन अर्ध्या ऋचांनीं पुरुषाच्या शिरावर दोन आहुतीचा होम करावा.

चित्रं देवानामुदगादनीकं चक्षुर्मित्रस्य वरुणस्याग्नेः । आप्रा द्यावा-पृथिवीऽअन्तरिक्षꣳ सूर्यऽआत्मा जगतस्तस्थुषश्च ॥ ४६ ॥

अर्थ—आश्चर्याची गोष्टः—सूर्य उदय पावतो व उदय झाल्याबरोबर रात्रिगत अंधकाराचा नाश करतो. तो सूर्य किरणांचा आश्रयभूत मित्र वरुण व अग्नींचा प्रकाशक असा आहे. त्याचा उदय झाल्याबरोबर त्यानें आपल्या तेजानें द्युलोक, पृथ्वीलोक व अंतरिक्ष लोकांना पूर्ण केलें, तो सूर्य स्थावर जंगमात्मक वस्तूंचा अंतर्यामी आत्मा आहे. ॥ ४६ ॥

विनियोग—अध्वर्यूनें ' इमं मा ' इत्यादि पांच मंत्रांनीं पुरुषादिकांच्या पांच शिरांचें उपस्थान करावें.

इमं मा हिꣳसीर्द्विपादं पशुꣳ सहस्राक्षो मेधाय चीयमानꣳ । मयुं पशुं मेधमग्ने जुषस्व तेन चिन्वानस्तन्वो निषीद । मयुं ते शुगृच्छतु यं द्विष्मस्तं ते शुगृच्छतु ॥ ४७ ॥

अर्थ—हे अग्ने, हिरण्यशकलरूपी सहस्रनेत्राचा असा तूं यज्ञाकरितां चयनसंस्कारविशिष्ट होऊन या पुरुषरूपी पशूची हिंसा करूं नकोस. जर तुला भक्षणाची इच्छा

असेल तर शुद्ध अशा किंपुरुष (अश्वमुखी गंधर्व) रूपी पशूचें भक्षण कर, त्या योगें तूं ज्वालारूपी शरीरांना पुष्ट करून या स्थानावर बैस. तुझा संताप अश्वमुख गंधर्वाकडे जावो व ज्याचा आम्ही द्वेष करतों त्याकडेही जावो (म्हणजे तुझ्या संतापानें अश्वमुख किंनर व आमचा द्वेषी नष्ट होवो) ॥ ४७ ॥

इमं मा हिꣳसीरेकशफं पशुं कनिक्रदं वाजिनं वाजिनेषु । गौरमारण्यमनु ते दिशामि तेन चिन्वानस्तन्वो निषीद । गौरं ते शुगृच्छतु यं द्विष्मस्तं ते शुगृच्छतु ॥ ४८ ॥

अर्थ—हे अग्ने, या एक खुराच्या अश्वाची हिंसा करूं नकोस. तो अतिशय खेंकाळणारा व इतर वेगवान् घोड्यांपेक्षां अधिक वेगवान् आहे. तुला मी रानांतील गौरवर्णाचा पशू देतों, त्यायोगें तूं ज्वालारूपी शरीरांना पुष्ट करून या स्थानावर बैस. तुझा संताप गौरमृगाकडे जावो व ज्याचा आम्ही द्वेष करतों त्याकडेही जावो (म्हणजे तुझ्या संतापानें गौरवर्णमृग व आमचा द्वेषी नष्ट होवो) ॥ ४८ ॥

इमꣳ साहस्रꣳ शतधारमुत्सं व्यच्यमानꣳ सरिरस्य मध्ये । घृतं दुहानामदितिं जनायाग्ने मा हिꣳसीः परमे व्योमन् । गवयमारण्यमनु ते दिशामि तेन चिन्वानस्तन्वो निषीद । गवयं ते शुगृच्छतु यं द्विष्मस्तं ते शुगृच्छतु ॥ ४९ ॥

अर्थ—हे अग्ने, या उत्कृष्ट स्थानावर स्थित अशा गोरूपी पशूची तूं हिंसा करूं नकोस. तो गोरूपी पशु हजारों तऱ्हेनें उपकार करणारा, शेंकडों क्षीरधारांनीं युक्त व कूपाप्रमाणें पुष्कळ प्रवाहांनीं युक्त व या लोकामध्यें लोकांची उपजीविका करून देणारा, सर्व लोकांकरितां दूध देणारा, अखंडित असा आहे. तुला मी रानांतील गवय नांवाचा पशू देतों, त्यायोगें तूं ज्वालारूपी शरीरांना पुष्ट करून या स्थानावर बैस. तुझा संताप त्या गवय पशूकडे आणि आम्ही ज्याचा द्वेष करतों त्याचेकडेही जावो ॥ ४९ ॥

इममूर्णायुं वरुणस्य नाभिं त्वचं पशूनां द्विपदां चतुष्पदाम् । त्वष्टुः प्रजानां प्रथमं जनित्रमग्ने मा हिꣳसीः परमे व्योमन् । उष्ट्रमारण्यमनु ते दिशामि तेन चिन्वानस्तन्वो निषीद । उष्ट्रं ते शुगृच्छतु यं द्विष्मस्तं ते शुगृच्छतु ॥ ५० ॥

अर्थ—हे अग्ने, या लोकामध्यें स्थित अशा या बकरीची हिंसा करूं नकोस. ही बकरी कंबलाला साधनभूत, नाभीप्रमाणें वरुणाची रक्षणीय वस्तू व मनुष्य-पश्वादिकांच्या शरीराचें रक्षण करणारी व प्रजापतीच्या सृष्टींत पहिल्यानें उत्पन्न झालेली अशी आहे. मी तुला रानांत उत्पन्न होणारा उष्ट्र देतो त्यायोगें तूं ज्वालारूपी शरीरांना पुष्ट करून या स्थानावर बैस. तुझा संताप उष्ट्राकडे व आम्ही ज्याचा द्वेष करतों त्याचेकडे जावो ॥ ५० ॥

अजो ह्यग्नेरजनिष्ट शोकात्सोऽअपश्यज्जनितारमग्रे। तेन देवा देवतामग्रमायँस्तेन रोहमायन्नुप मेध्यासꣳ। शरभमारण्यमनु ते दिशामि तेन चिन्वानस्तन्वो निषीद। शरभं ते शुगृच्छतु यं द्विष्मस्तं ते शुगृच्छतु ॥५१॥

अर्थ—तो अज प्रजापतीच्या संतापापासून उत्पन्न झाला व पहिल्यानें आपल्या उत्पन्न करणाऱ्या प्रजापतीला अवलोकन केलें अशा अत्तम अजाच्या साहाय्यानें देवांनीं पूर्वजन्मीं कर्म करून देवत्व मिळविलें. त्या अजाच्या साहाय्यानें हे यज्ञयोग्य यजमान स्वर्गास गमन करतात. मी तुला अरण्यांतला गेंडा देतों. त्या योगें तूं ज्वालारूपी शरीरांना पुष्ट करून या स्थानावर बैस. तुझा संताप गेंड्याकडे व आम्ही ज्याचा द्वेष करतों त्याकडे जावो ॥ ५१ ॥

विनियोग—' त्वं यविष्ठ ' या मंत्रानें चित्याग्नीचें उपस्थान करावें.

त्वं यविष्ठ दाशुषो नॄँः पाहि शृणुधी गिरः। रक्षा तोकमुत त्मना ॥ ५२ ॥

अर्थ—हे तरुणतम अग्ने, आमच्या स्तुतिवाक्यांचें श्रवण कर व हविर्द्रव्यें देणाऱ्या यजमानांचें रक्षण कर व तूं स्वतः यजमानापत्याचेंही रक्षण कर. ॥५२॥

विनियोग—' अपां त्वेमन् ' इत्यादि पांच मंत्रांनीं पांच अपस्यासंज्ञक इष्टकांचें स्थापन करावें.

अपां त्वेमन्त्सादयाम्यपां त्वोक्षन्त्सादयाम्यपां त्वा भस्मन्त्सादयाम्यपां त्वा ज्योतिषि सादयाम्यपां त्वायने सादयाम्यर्णवे त्वा सदने सादयामि समुद्रे त्वा सदने सादयामि सरिरे त्वा सदने सादयाम्यपां त्वा क्षये सादयाम्यपां त्वा सधिषि सादयाम्यपां त्वा सदने सादयाम्यपां त्वा सधस्थे सादयाम्यपां त्वा योनौ सादयाम्यपां त्वा पुरीषे सादयाम्यपां त्वा पाथसि

सादयामि गायत्रेण त्वा छन्दसा सादयामि त्रैष्टुभेन त्वा छन्दसा सादयामि जागतेन त्वा छन्दसा सादयाम्यानुष्टुभेन त्वा छन्दसा सादयामि पाङ्क्तेन त्वा छन्दसा सादयामि ॥ ५३ ॥

अर्थ—हे अपस्यसंज्ञक इष्टके, वायूमध्यें, ओषधीमध्यें, भस्मांत, विजेंत व भूमींत तसेंच प्राणरूपी, वाणीरूपी, चक्षुरूपी, श्रोत्ररूपी, द्युलोकरूपी, अन्तरिक्षरूपी जलांच्या स्थानांत आणि समुद्रांत, वाळूवर व अन्नांत तुझें स्थापन करतों. त्याचप्रमाणें गायत्र, त्रैष्टुभ, जागत, आनुष्टुभ व पांक्त छन्दानें तुझें स्थापन करतों ॥ ५३ ॥

विनियोग—' अयं पुरः ' इत्यादि दहा दहा मंत्रांनीं प्राणभृत्संज्ञक दहा इष्टकांचें स्थापन करावें.

अयं पुरो भुवस्तस्य प्राणो भौवायनो वसन्तऽ प्राणायनो गायत्री वासन्ती गायत्र्यै गायत्रं गायत्राद्रुपाꣳशुरुपाꣳशोस्त्रिवृत् त्रिवृतो रथन्तरं वसिष्ठऽऋषिः÷ प्रजापतिगृहीतया त्वया प्राणं गृह्णामि प्रजाभ्यः÷ ॥५४॥

अर्थ—हे इष्टके, तूं पुरोभुव (पूर्वी स्थापन केला जाणारा) अग्नि आहेस. म्हणून त्या अग्निस्वरूपी तुझें मी स्थापन करतों. प्राण हा पुरोभुव अग्नीचें अपत्य आहे. वसंताचें अपत्य गायत्री छंद आहे. त्या गायत्रीपासून गायत्र साम उत्पन्न झालें. गायत्रसामापासून उपांशु ग्रह उत्पन्न झाले. उपांशु ग्रहापासून त्रिवृत् स्तोम उत्पन्न झाला. त्रिवृत् स्तोमापासून रथंतर पृष्ठ निर्माण झालें व सर्वाधार व सर्वज्ञ जो प्राण या सर्वस्वरूपी इष्टकांचें मी स्थापन करतों. प्रजापतीनें निर्माण केलेल्या इष्टकांचें स्थापन करून मी सर्व प्रजेकरितां प्राणांचें ग्रहण करतों म्हणजे प्रजांच्या प्राणांच्या सिद्धीकरितां हे इष्टके, तुझें मी स्थापन करतों. ॥ ५४ ॥

विनियोग—' अयं दक्षिणा ' वगैरे मंत्रांनीं दहा इष्टका स्थापन कराव्या.

अयं दक्षिणा विश्वकर्मा तस्य मनो वैश्वकर्मणं ग्रीष्मो मानसान्नि-ष्टुग्ग्रैष्मी त्रिष्टुभः÷ स्वारꣳस्वारादन्तर्यामोऽन्तर्यामात्पञ्चदशऽ पञ्चदशाद् बृहद् भरद्वाजऽऋषिः÷ प्रजापतिगृहीतया त्वया मनो गृह्णामि प्रजाभ्यः÷ ॥ ५५ ॥

अर्थ—हा विश्वोत्पादक वायु आर्यावर्ताच्या दक्षिण दिशेकडे विशेषेंकरून वाहतो. त्यावें अपत्य मन हें आहे व मनाचें अपत्य ग्रीष्म ऋतु आहे. ग्रीष्मापासून त्रिष्टुप्

छंद उत्पन्न झाला. त्रिष्टुपापासून स्वारसाम उत्पन्न झालें आणि स्वारसामापासून अंतर्याम ग्रह उत्पन्न झाले व अंतर्याम ग्रहांपासून पंचदश स्तोम व पंचदश स्तोमापासून बृहत्पृष्ठ निर्माण झालें. अन्नाचें धारण करणारा भरद्वाज ऋषि आहे. या सर्वस्वरूपी इष्टकांचें मी स्थापन करतों. प्रजापतीनें निर्माण केलेल्या इष्टकेचें स्थापन करून मी सर्व प्रजेकरितां मनाचें ग्रहण करतों म्हणजे प्रजांच्या मनाच्या सिद्धीकरितां हे इष्टके, तुझें मी स्थापन करतों. ॥ ५५ ॥

विनियोग—' अयं पश्चात् ' इत्यादि मंत्रांनीं दहा इष्टकांचें स्थापन करावें.

अयं पश्चाद्विश्वव्यचास्तस्य चक्षुर्वैश्वव्यचसं वर्षाश्चाक्षुण्यो जगती वार्षी जगत्याऽऋक्सममृक्समाच्छुक्रꣳ शुक्रात्सप्तदशꣳ सप्तदशाद्वैरूपं जमदग्नि र्ऋषिः÷ प्रजापतिगृहीतया त्वया चक्षुर्गृह्णामि प्रजाभ्यः÷ ॥ ५६ ॥

अर्थ—पश्चिमेकडे जाणारा, सर्व विश्वाला प्रकाशित करणारा हा आदित्य आहे. त्यापासून नेत्र उत्पन्न झाले व नेत्रापासून वर्षाऋतु उत्पन्न झाला, वर्षाऋतूपासून जगती छंद, जगतीछंदापासून ऋक्समसंज्ञ साम, त्यापासून शुक्र ग्रह, त्यापासून सप्तदश स्तोम, त्यापासून वैरूप पृष्ठ व जगाकडे पहात गमन करणारा जमदग्नि ऋषि या सर्वस्वरूपी इष्टकांचें मी स्थापन करतों. प्रजापतीनें निर्माण केलेल्या इष्टकेचें स्थापन करून मी सर्व प्रजेकरितां चक्षूंचें ग्रहण करतों म्हणजे प्रजांच्या चक्षूंचे सिद्धीकरितां हे इष्टके, तुझें मी स्थापन करतों. ॥ ५६ ॥

विनियोग—' इदमुत्तरात् ' इत्यादि दहा मंत्रांनीं इष्टकांचें स्थापन करावें.

इदमुत्तरात् स्वस्तस्य श्रोत्रꣳ सौवꣳ शरच्छ्रौत्र्यनुष्टुप् शारयनुष्टुभऽ ऐडमैडान्मन्थी मन्थिनऽएकविꣳशऽएकविꣳ शाद्वैराजं विश्वामित्रऽऋषिः÷ प्रजापतिगृहीतया त्वया श्रोत्रं गृह्णामि प्रजाभ्यः÷ ॥ ५७ ॥

अर्थ—सर्वांच्या उत्तरेकडे स्वर्ग लोक आहे. त्या स्वर्गाचें श्रोत्र हें अपत्य आहे. श्रोत्रेंद्रियापासून शरद्ऋतु उत्पन्न झाला. त्यापासून अनुष्टुप छंद, त्यापासून ऐडसाम, त्यापासून मंथीग्रह, त्यापासून एकविंश स्तोम व त्यापासून वैराजपृष्ठ उत्पन्न झालें. सर्व जगाचा मित्र जो ऋषि तद्रूपी श्रोत्रेंद्रिय झालें. या सर्वस्वरूपी इष्टकेचें मी स्थापन करतों. प्रजापतीनें निर्माण केलेल्या इष्टकेचें स्थापन करून मी सर्व प्रजेकरितां श्रोत्रेंद्रियाचें ग्रहण करतों ॥ ५७ ॥

विनियोग—' इयमुपरि ' इत्यादि दहा मंत्रांनीं दहा इष्टकांचें स्थापन करावें. आणि स्वयमातृण्णा इष्टकेवर ' इंद्रं ' या मंत्रानें मृत्तिका घालावी.

इयमुपरि मतिस्तस्यै वाङ्मात्या हेमन्तो वाच्यऽ पङ्क्तिर्हेमन्ती पङ्क्त्यै निधनवन्निधनवतऽआग्रयणऽआग्रयणात् त्रिणवत्रयस्त्रिᳬशौ त्रिणवत्रयस्त्रिᳬशाभ्यांᳬ शाक्वररैवते विश्वकर्मऽऋषिः÷ प्रजापतिगृहीतया त्वया वाचं गृह्णामि' प्रजाभ्यो लोकं ताऽइन्द्रम् ॥ ५८ ॥

अर्थ—वर असलेला चंद्र ही ज्ञापक अशी वाणीच आहे. म्हणजे वाणीच चंद्र होऊन ऊर्ध्वप्रदेशांत राहते. त्या चंद्रापासून ही वाणी उत्पन्न झाली. तिच्यापासून हेमंत ऋतु, त्यापासून पङ्क्तिछंद, त्यापासून निधनवत्साम, त्यापासून आग्रयण ग्रह, त्यापासून त्रिणव व त्रयस्त्रिंश असे दोन स्तोम, त्यापासून शाक्कर व रैवत अशीं दोन पृष्ठें व सर्व कर्म करणारा ऋषि या सर्वस्वरूपी इष्टकांचें मी स्थापन करतों. प्रजापतीनें निर्माण केलेल्या इष्टकेचें स्थापन करून मी सर्व प्रजेकरितां प्राणांचें ग्रहण करतों. (यापुढें तीन ऋचांचीं तीन प्रतीकें आहेत. ' लोकम् ' १२–५४, ' ताः ' १२:५५, ' इन्द्रम् ' १२–५६) ॥ ५८ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**

माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥



अथ चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

विनियोग—तेराव्या अध्यायांत भूलोकस्वरूपी प्रथम चिति सांगितली. चौदाव्या अध्यायांत द्वितीया, तृतीया व चतुर्थी अशा तीन चिती सांगतात.

' ध्रुवक्षितिः ' इत्यादि पांच मंत्रांनीं पांच इष्टका स्थापन कराव्या.

ध्रुवक्षितिर्ध्रुवयोनिर्ध्रुवासि ध्रुवं योनिमासीद साधुया । उख्यस्य केतुं प्रथमं जुषाणाश्विनाध्वर्यू सादयतामिह त्वा ॥ १ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं स्थिर आहेस म्हणून या स्थिर व श्रेष्ठ अशा स्थानावर बैस. तूं निश्चल निवास करणारी व अचल कारण असलेली उख्य अग्नीच्या पहिल्या स्थानाला सेवन करणारी अशी आहेस. हे इष्टके, देवांचे अध्वर्यु जे अश्विनीकुमार ते तुला या स्थानावर स्थापन करोत ॥ १ ॥

कुलायिनी घृतवती पुरन्धिः स्योने सीद सदने पृथिव्याः । अभि त्वा रुद्रा वसवो गृणन्त्विमा ब्रह्म पीपिहि सौभगायाधिनाध्वर्यू सादयतामिह त्वा ॥ २ ॥

अर्थ—हे इष्टके, पृथ्वीच्या सुखस्वरूपी प्रथमचिति स्थानावर तूं बैस. तूं घराच्या आकाराची आहेस. घृतानें युक्त, पुष्कळ इष्टकांना धारण करणारी अशी आहेस. रुद्र, वसु प्रभृति सर्व देव तुझी स्तुती करोत. आणि ऐश्वर्यप्राप्तीकरितां या मंत्रांना तूं प्राप्त हो. देवांचे अध्वर्यू अश्विनीकुमार तुला या स्थानावर स्थापन करोत ॥ २ ॥

स्वैर्दक्षैर्दक्षपितेह सीद देवानाꣳ सुम्ने बृहते रणाय । पितेवैधि सूनवऽआ सुशेवा स्वावेशा तन्वा संविशस्वाश्विनाध्वर्यू सादयतामिह त्वा ॥ ३ ॥

अर्थ—हे इष्टके, वीर्य पालन करणारी अशी तूं आपल्या सामर्थ्यासह रमणीय व मोठ्या सुखाच्या निमित्तानें या दुसऱ्या चितीवर बैस. बाप मुलाला सुख देतो त्याप्रमाणें तूं सर्व तऱ्हेनें सर्वदा सुख देणारी हो. सुखप्रवेशयुक्त अशा शरीरानें येथें स्थिति कर. देवांचे अध्वर्यु अश्विनीकुमार तुला या स्थानावर स्थापन करोत ॥३॥

पृथिव्याꣳ पुरीषमस्यप्सो नाम ता ं त्वा विश्वेऽअभिगृणन्तु देवाꣳ। स्तोमपृष्ठा घृतवतीह सीद प्रजावदस्मे द्रविणायजस्वाश्विनाध्वर्यू सादयतामिह त्वा ॥ ४ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं पृथ्वीच्या म्हणजे प्रथम चितीचें पूर्ण करणारें द्रव्य आहेस. व जलाला कारणीभूत अशा रसरूपी आहेस. सर्व देव सर्व तऱ्हेनें तुझी स्तुति करोत. तुझ्या स्थापनाच्या वेळीं त्रिवृदादिस्तोम आणि रथंतरादि पृष्ठें बोलली जातात. तूं घृतयुक्त आहेस म्हणून पुत्रपौत्रादियुक्त धन या यजमानाला दे. देवांचे अध्वर्यु जे अश्विनीकुमार ते तुला या स्थानावर स्थापन करोत. ॥ ४ ॥

अदित्यास्त्वा पृष्ठे सादयाम्यन्तरिक्षस्य धर्त्रीं विष्टम्भनीं दिशामधिपत्नीं भुवनानाम्। ऊर्मिर्द्रप्सोऽअपामसि विश्वकर्मा तऽऋषिरश्विनाध्वर्यू सादयतामिह त्वा ॥ ५ ॥

अर्थ—हे इष्टके, प्रथम चितिरूप पृथ्वीवर, तुझें स्थापन करतों. तूं भूवर्लोकाची धारण करणारी, पूर्वादि दिशांना स्तंभन करणारी, सर्व प्राणिसमुदायांची स्वामिनी अशी आहेस. रसरूपी ऊर्मि म्हणजे जलांची लाट ही तूं आहेस. विश्वकर्मा प्रजापति तुझा द्रष्टा आहे. देवांचे अध्वर्यु आश्विनीकुमार तुला या स्थानावर स्थापन करोत ॥ ५ ॥

विनियोग—'शुक्रस्य शुचिश्च' या मंत्रानें दोन कृतव्य इष्टकांचें स्थापन करावें.

शुक्रश्च शुचिश्च ग्रैष्मावृतूऽअग्नेरन्तऽश्लेषोऽसि कल्पेतां द्यावापृथिवी कल्पन्तामापऽओषधयऽ कल्पन्तामग्नयऽ पृथङ् मम ज्यैष्ठ्याय सन्त्वंताऽ। वेऽअग्नयऽ समनसोऽन्तरा द्यावापृथिवीऽइमे। ग्रैष्मावृतूऽअभिकल्पमानाऽइन्द्रमिव देवाऽअभिसंविशन्तु तया देवतयाङ्गिरस्वद्ध्रुवे सीदतम् ॥ ६ ॥

अर्थ—ज्येष्ठ व आषाढ हे ग्रीष्म ऋतूचे अवयव आहेत. हे ग्रीष्मऋतो, तूं या अग्नीच्या आंत राहून जोडणारा आहेस म्हणून द्यावापृथिवींनीं अग्निचयन करणाऱ्या माझें (यजमानाचें) ज्येष्ठत्व प्राप्त करण्याकरितां योग्य उपकार करावा. जल व ओषधी आणि एकाच चयनयज्ञामध्यें कार्य करणारे निरनिराळे इष्टकारूपी अग्नि तुला ज्येष्ठत्व देण्याला समर्थ होवोत. या द्यावापृथिवी व त्यांत असणारे एक

चित्ताचे अग्नी तेही ग्रीष्मसंपत्ति मिळवून या कर्माचा आश्रय करोत. यास दृष्टान्तः— ज्याप्रमाणें देव इंद्राच्या सेवेकरितां येतात. त्याप्रमाणें अन्य इष्टका ग्रीष्माच्या सेवेकरितां येवोत. हे ऋतव्य इष्टकांनो, त्या देवतेनें स्थापित केलेल्या तुम्ही अंगिरस् ऋषीच्या यज्ञाप्रमाणें या यज्ञांत येऊन स्थिर होऊन रहा. ॥ ६ ॥

विनियोग—' सजूर्ऋतुभिः ' इत्यादि पांच मंत्रांनीं पांच वैश्वदेवी इष्टकांचें स्थापन करावें.

सजूर्ऋतुभि÷ सजूर्विधाभि÷ सजूर्देवै꣡ सजूर्देवैर्वयोना꣡धैरग्नये त्वा वैश्वान꣡रायाश्विनाध्व꣡र्यू सादयतामि꣡ह त्वा सजूर्ऋतुभि÷ सजूर्विधाभि÷ सजूर्वसु꣡भि꣡ सजूर्देवैर्वयोना꣡धैरग्नये त्वा वैश्वान꣡रायाश्विनाध्व꣡र्यू सादयतामि꣡ह त्वा सजूर्ऋतुभि÷ सजूर्विधाभि÷ सजू रु꣡द्रै꣡ सजूर्देवैर्वयोना꣡धैरग्नये त्वा वैश्वान꣡रायाश्विनाध्व꣡र्यू सादयतामि꣡ह त्वा सजूर्ऋतुभि÷ सजूर्विधाभि÷ सजूरादि꣡त्यै꣡ सजूर्देवैर्वयोना꣡धैरग्नये त्वा वैश्वान꣡रायाश्विनाध्व꣡र्यू सादयतामि꣡ह त्वा सजूर्ऋतुभि÷ सजूर्विधाभि÷ सजूर्वि꣡श्वैर्देवै꣡ सजूर्देवैर्वयोना꣡धैरग्नये त्वा वैश्वान꣡रायाश्विनाध्व꣡र्यू सादयतामि꣡ह त्वा ॥ ७ ॥

अर्थ—हे इष्टके, देवांचे अध्वर्यु अश्विनीकुमार या द्वितीय चितिस्थानावर सर्वलोकहितकारी अग्नीच्या तृप्तीकरितां तुझें स्थापन करते झाले. तूं वसंतादिऋतूंनीं, जलांनीं, इंद्रादिदेवांनीं व बाल्यादिवयांशीं युक्त होणाऱ्या प्राणांनीं संतुष्ट होणारी आहेस. मी तुझें स्थापन करतों. हे इष्टके, देवांचे अध्वर्यु अश्विनीकुमार या तृतीय चितिस्थानावर सर्व लोकहितकारी अग्नीच्या तृप्तीकरितां तुझें स्थापन करते झाले. तूं वसंतादिऋतूंनीं, जलांनीं, अष्टवसूंनीं, इंद्रादिदेवांनीं व बाल्यादिवयाशीं युक्त होणाऱ्या प्राणांनीं संतुष्ट होणारी आहेस. मी तुझें स्थापन करतों. हे इष्टके, देवांचे अध्वर्यू अश्विनीकुमार या चतुर्थचितिस्थानावर सर्वलोकहितकारी अग्नीचे तृप्तीकरितां तुझें स्थापन करते झाले. तूं वसंतादिऋतूंनीं, जलांनीं, रुद्रांनीं, इंद्रादिदेवांनीं व बाल्यादिवयाशीं युक्त होणाऱ्या प्राणांनीं संतुष्ट होणारी आहेस. मीं तुझें स्थापन करतों. हे इष्टके, देवांचे अध्वर्यू अश्विनीकुमार तुझें या पंचमचितिस्थानावर सर्व लोकहितकारी अग्नीच्या तृप्तीकरितां तुझें स्थापन करते झाले. तूं वसंतादिऋतूंनीं, जलांनीं, आदित्यांनीं, इंद्रादिदेवांनीं व बाल्यादिवयाशीं युक्त होणाऱ्या प्राणांनीं संतुष्ट होणारी आहेस. मी तुझें स्थापन करतों. हे इष्टके, देवांचे अध्वर्यू अश्विनीकुमार या

पष्ठचितिस्थानावर सर्वलोकहितकारी अग्नीच्या तृप्तीकरितां तुझें स्थापन करते झाले. तूं वसंतादिऋतूंनीं, जलांनीं, विश्वेदेवांनीं, इंद्रादिदेवांनीं व बाल्यादि वयांशीं युक्त होणाऱ्या प्राणांनीं संतुष्ट होणारी आहेस. मी तुझें स्थापन करतों ॥ ७ ॥

विनियोग—'प्राणं मे' या पांच मंत्रभागांनीं प्राणभृत्संज्ञक पांच इष्टकांचें स्थापन करावें. 'अपः पिन्व' या पांच मंत्रांनीं अपस्यासंज्ञक पांच इष्टकांचें स्थापन करावें.

प्राणं मे पाह्यपानं मे पाहि मे व्यानं मे पाहि चक्षुर्मऽउर्व्या विभाहि श्रोत्रं मे श्लोकय। अपऽपिन्वौषधीर्जिन्व द्विपादव चतुष्पात् पाहि दिवो वृष्टिमेरय ॥ ८ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं माझ्या प्राण, अपान, व्यान वायूंचें रक्षण कर व विस्तीर्ण दृष्टींनीं माझ्या नेत्रांला प्रकाशित कर व माझे कान पुष्कळ श्रवण करण्यास समर्थ कर. हे इष्टके, तूं जलसिंचन कर, ओषधींना संतुष्ट कर. मनुष्यशरीरांचें व पशुशरीरांचें रक्षण कर व द्युलोकांतून वृष्टीला प्रवृत्त कर ॥ ८ ॥

विनियोग—'मूर्धा वयः' इत्यादिमंत्रांनीं वयस्यासंज्ञक इष्टकांचें स्थापन करावें.

मूर्धा वयः÷ प्रजापतिश्छन्दः÷ क्षत्रं वयो मयन्दं छन्दो विष्टम्भो वयोऽधिपतिश्छन्दो विश्वकर्मा वयः÷ परमेष्ठी छन्दो बस्तो वयो विवलं छन्दो वृष्णिर्वयो विश्वालं छन्दऽ पुरुषो वयस्तन्द्रं छन्दो व्याघ्रो वयोऽनाधृष्टं छन्दः÷ सिꣳहो वयश्छदिश्छन्दः÷ पष्ठवाड्वयो बृहती छन्दऽउक्षा वयः÷ ककुप् छन्दऽऋषभो वयः÷ सतोबृहती छन्दः÷ ॥ ९ ॥

अर्थ—[पूर्वी सृष्टिसमयीं प्रजापति गडबडींत असतां त्यानें उत्पन्न केलेले पशू छन्दांचें रूप धारण करून तेथून निघून गेले. त्यावेळीं प्रजापतीनेंही गायत्रीछन्दाचें रूप धारण केलें व वयाच्या निरनिराळ्या अवस्थेंत त्यानें त्या त्या पशूच्या स्वरूपांत प्रवेश केला ही गोष्ट या मंत्रांत सांगितली आहे.] मूर्धप्रधान प्रजापति गायत्रीछन्दरूपी होऊन त्या त्या वयाच्या अवस्थेनें पशूंत प्रवेश करता झाला. तसेंच प्रजापति नाशापासून संरक्षण करणाऱ्या शरीरावस्थेंत सुख देणाऱ्या मयन्द नांवाच्या छन्दाचें रूप धारण करता झाला. तसेंच पालक व जगाचा प्रतिबंध करणारा प्रजापति त्या वयोवस्थेचा छन्द बनला. तसेंच परमपदांत राहणारा सर्वस्रष्टा प्रजापति त्या वयो-

वस्थेचा छन्द बनला. याप्रमाणें प्रजापतीनें सर्व छन्दांचें मूलभूत असें गायत्रीछन्दाचें रूप धारण केलें. नंतर त्या प्रजापतीनें त्या त्या वयोवस्थेनें दुसऱ्या पंधरा पशूंवर अनुग्रह केला. त्यानें उत्कृष्ट अशा एकपदछन्दानें अजावर, द्विपदा गायत्रीछन्दानें सेचनसमर्थ मेषावर, पंक्तिछन्द होऊन पुरुषपशूवर, विराट्छन्द होऊन व्याघ्रावर, अतिछन्दाछन्द होऊन सिंहावर, बृहतीछन्द होऊन पांच वर्षें वयाच्या पशूवर, ककुप्-छन्द होऊन वीर्यसेचनसमर्थ पशूवर व सत्तोबृहती छन्द होऊन ऋषभपशूवर अनुग्रह केला ॥ ९ ॥

अनड्वान्वयं÷ पङ्क्तिश्छन्दो धेनुर्वयो जगती छन्दस्त्र्यविर्वयस्त्रिष्टुप् छन्दो दित्यवाड्वयो विराट्छन्दऽ पञ्चाविर्वयो गायत्रीछन्दस्त्रिवत्सो वयऽउष्णिक् छन्दस्तुर्यवाड्वयोऽनुष्टुप् छन्दो लोकं ताऽइन्द्रम् ॥ १० ॥

अर्थ—त्यानें पंक्तिछन्द होऊन बलीवर्दावर, जगतीछन्द होऊन धेनूवर, त्रिष्टुप् छन्द होऊन अठरा महिन्यांच्या पशूवर, विराट् छन्द होऊन दोन वर्षांच्या पशूवर, गायत्री छन्द होऊन अडीच वर्षांच्या पशूवर, उष्णिक् छन्द होऊन तीन वर्षांच्या पशूवर व अनुष्टुप् छन्द होऊन चार वर्षांच्या पशूवर अनुग्रह केला. या सर्व इष्टकांचें मी स्थापन करतों. अध्याय १२ मं. ५४।५५।५६ या तीन मंत्रांचीं प्रतीकें क्रमेंकरून 'लोकम्', 'ताः', 'इन्द्रम्' हीं आहेत ॥ १० ॥

विनियोग—तिसऱ्या चितीवर स्वयमातृण्णा या इष्टकेचें 'इंद्राग्नी' या मंत्रानें स्थापन करावें.

इन्द्राग्नीऽअव्यथमानामिष्टकां दृꣳ हतं ध्रुवम्। पृष्ठेन द्यावापृथिवीऽअन्तरिक्षं च विबाधसे ॥ ११ ॥

अर्थ—हे इंद्राग्नींनों, तुम्ही न ढळणाऱ्या स्वयमातृण्णा नांवाच्या इष्टकेला दृढ करा. हे स्वयमातृण्णे, आपल्या पृष्ठानें द्यावापृथिवी व अंतरिक्ष या तीनही लोकांचें तूं आक्रमण करतेस ॥ ११ ॥

विश्वकर्मा त्वा सादयत्वन्तरिक्षस्य पृष्ठे व्यचस्वतीं प्रथस्वतीमस्तरिक्षं यच्छान्तरिक्षं दृꣳ हान्तरिक्षं मा हिꣳसीः। विश्वस्मै प्राणायापानाय व्यानायोदानाय प्रतिष्ठायै चरित्राय। वायुष्ट्वाभिपातु मह्या स्वस्त्या छर्दिषा शन्तमेन तया देवतयाङ्गिरस्वद्ध्रुवा सीद ॥ १२ ॥

अर्थ—हे स्वयमातृण्णे, विश्वकर्मा प्रजापति अंतरिक्षाच्या पृष्ठभागीं तुझें स्थापन करो. तूं अभिव्यक्तियुक्त व विस्तारयुक्त आहेस. तूं अंतरिक्षाचें नियमन कर व त्याला दृढ कर. सर्व प्राणादिकांची वृत्ति, स्वगृहस्थिति व शास्त्रीय आचरण यांकरितां त्या अंतरिक्षाची हिंसा करूं नकोस. मोठ्या योगक्षेमकर अत्यंत शुभकारी तेजोविशेषानें वायु तुझें सर्व बाजूनें रक्षण करो. अंगिरोऋषींच्या यज्ञाप्रमाणें या यज्ञांत तुझ्या अधिष्ठात्री देवतेच्या अनुग्रहानें तूं स्थिर हो ॥ १२ ॥

विनियोग—' राश्यसि ' वगैरे पांच मंत्रांनीं पांच दिशा नांवाच्या इष्टका स्थापन कराव्या.

राड्यसि प्राची दिग्विराडसि दक्षिणा दिक् सम्राडसि प्रतीची दिक् स्वराडस्युदीची दिगधिपत्न्यसि बृहती दिक् ॥ १३ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं शोभणारी, अशी पूर्व दिशा गायत्रीरूपी आहेस. तूं विशेषेंकरून शोभणारी दक्षिण दिशा त्रिष्टुब्रूपी आहेस. चांगल्या तऱ्हेनें शोभणारी पश्चिम दिशा जगतीछंदरूपी आहेस. स्वयंशोभमान अशी उत्तर दिशा अनुष्टुभ् छंदरूपी आहेस. अधिक परिपालन करणारी मोठी ऊर्ध्व दिशा पङ्क्ति-छंदरूपी आहेस. अशा तऱ्हेनें दिशा व छंद स्वरूपिणी तुझें मी स्थापन करतों ॥ १३ ॥

विनियोग—' विश्वकर्मा ' या मंत्रानें विश्वज्योतिस् संज्ञक इष्टकेचे स्थापन करावें.

विश्वकर्मा त्वा सादयत्वन्तरिक्षस्य पृष्ठे ज्योतिष्मतीम् । विश्वस्मै प्राणायापानाय व्यानाय विश्वं ज्योतिर्यच्छ । वायुष्टेऽधिपतिस्तया देवतयाङ्गिरस्वद्ध्रुवा सीद ॥ १४ ॥

अर्थ—हे इष्टके, वायुरूपी तुला विश्वकर्मा अंतरिक्षाचे पृष्ठभागीं स्थापन करो. सर्व प्राणापानव्यान वृत्तींच्या लाभाकरितां तूं मला सर्व तेज दे. वायु तुझा अधिपति आहे. तुझ्या अधिष्ठात्री देवतेनें अनुगृहीत झालेली अशी तूं अंगिरोऋषीच्या यज्ञाप्रमाणें या यज्ञांत स्थिर होऊन रहा. ॥ १४ ॥

विनियोग—' नभश्च नभस्यश्च ' या मंत्रानें दोन ऋतव्य इष्टकांचें स्थापन करावें.

नभश्च नभस्यश्च वार्षिकावृतूऽअग्नेरन्तश्श्लेषोऽसि कल्पेतां द्यावापृथिवी कल्पन्तामापऽओषधयश्च कल्पन्तामग्नयश्च पृथङ् मम ज्यैष्ठ्याय सव्रताश्च। येऽअग्नयश्च समनसोऽन्तरा द्यावापृथिवीऽइमे। वार्षिकावृतूऽअभिकल्पमानाऽइन्द्रमिव देवाऽअभिसंविशन्तु तया देवतयाङ्गिरस्वद्ध्रुवे सीदतम्॥ १५॥

अर्थ—श्रावण व भाद्रपद वर्षाऋतूंतील महिने आहेत. हे वर्षाऋतो, तूं या अग्नीच्या आंत राहून जोडणारा आहेस म्हणून अग्निचयन करणाऱ्या माझें (यजमानाचें) ज्येष्ठत्व प्राप्त करण्याकरितां योग्य उपकार करावा. जल व ओषधी आणि एकाच चयन यज्ञामध्यें कार्य करणारे निरनिराळे इष्टकारूपी अग्नि तुला ज्येष्ठत्व देण्याला समर्थ होवोत. या द्यावापृथिवी व त्यांत असणारे एक चित्ताचे अग्नि व तेही वर्षाऋतूंतील संपत्ति मिळवून या कर्माचा आश्रय करोत. यास दृष्टांतः-ज्याप्रमाणें देव इंद्राच्या सेवेकरितां येतात; त्याप्रमाणें अन्य इष्टका वर्षाऋतूच्या सेवेकरितां येवोत. हे ऋतव्य इष्टकांनो, त्या देवतेनें स्थापित केलेल्या तुम्ही अंगिरस् ऋषीच्या यज्ञाप्रमाणें या यज्ञांत येऊन स्थिर होऊन रहा. ॥ १५ ॥

इषश्चोर्जश्च शारदावृतूऽअग्नेरन्तश्श्लेषोऽसि कल्पेतां द्यावापृथिवी कल्पन्तामापऽओषधयश्च कल्पन्तामग्नयश्च पृथङ् मम ज्यैष्ठ्याय सव्रताश्च। येऽअग्नयश्च समनसोऽन्तरा द्यावापृथिवीऽइमे। शारदावृतूऽअभिकल्पमानाऽइन्द्रमिव देवाऽअभिसंविशन्तु तया देवतयाङ्गिरस्वद्ध्रुवे सीदतम्॥ १६॥

अर्थ—आश्विन व कार्तिक हे दोन्ही शरदृतूचे अवयव आहेत. हे शरदृतो, तूं या अग्नीच्या आंत राहून जोडणारा आहेस म्हणून द्यावापृथिवींनीं अग्निचयन करणाऱ्या माझें (यजमानाचें) ज्येष्ठत्व प्राप्त करण्याकरितां योग्य उपकार करावा. जल व ओषधि आणि एकाच चयनयज्ञामध्यें कार्य करणारे इष्टकारूपी अग्नि तुला ज्येष्ठत्व देण्याला समर्थ होवोत. या द्यावापृथिवी व त्यांत असणारे एक चित्ताचे अग्नि व तेही शरदृतूंतील संपत्ति मिळवून या कर्माचा आश्रय करोत. यास दृष्टांतः-ज्याप्रमाणें देव इन्द्राच्या सेवेकरितां येतात; त्याप्रमाणें अन्वइष्टका शरद् ऋतूच्या सेवेकरितां येवोत. हे ऋतव्य इष्टकांनो, त्या देवतेनें स्थापित केलेल्या तुम्ही अंगिरस् ऋषीच्या यज्ञाप्रमाणें या यज्ञांत येऊन स्थिर होऊन रहा. ॥ १६ ॥

विनियोग—' आयुर्मे ' इत्यादि दहा मंत्रांनीं दहा प्राणभृत्-संज्ञक इष्टकांचें स्थापन करावें.

आयुर्मे पाहि प्राणं मे पाह्यपानं मे पाहि व्यानं मे पाहि चक्षुर्मे पाहि श्रोत्रं मे पाहि वाचं मे पिन्व मनो मे जिन्वात्मानं मे पाहि ज्योतिर्मे यच्छ ॥ १७ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं माझें आयुष्य, प्राण, अपान, व्यान, चक्षु, श्रोत्र यांचें रक्षण कर. माझी वाणी इच्छांनीं पूर्ण कर. मन संतुष्ट कर. माझ्या जिवाचें रक्षण कर व तेज दे ॥ १७ ॥

विनियोग—' मा छंदः ' या मंत्रानें छंदस्या संज्ञक बारा बारा इष्टका स्थापन कराव्या.

मा छन्दः प्रमा छन्दः प्रतिमा छन्दोऽअस्त्रीवयश्छन्दः पङ्क्तिश्छन्दऽउष्णिक् छन्दोऽबृहती छन्दोऽनुष्टुप् छन्दो गायत्री छन्दस्त्रिष्टुप् छन्दो जगती छन्दः ॥ १८ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं पृथिवीलोक, अंतरिक्षलोक, द्युलोक व त्रिलोक, पङ्क्ति, उष्णिक्, बृहती, अनुष्टुभ्, विराट् गायत्री, त्रिष्टुभ् व जगती छंद एतत्स्वरूपी आहेस. ॥ १८ ॥

पृथिवी छन्दोऽन्तरिक्षं छन्दो द्यौश्छन्दऽसमाश्छन्दो नक्षत्राणि छन्दो वाक् छन्दो मनश्छन्दः कृषिश्छन्दो हिरण्यं छन्दो गौश्छन्दोऽजाश्छन्दोऽश्वश्छन्दः ॥ १९ ॥

अर्थ—हे इष्टके, पृथ्वी, अंतरिक्ष, द्यौः, समा, नक्षत्र, वाणी, मन, कृषि, सुवर्ण, गो, अजा आणि अश्व या देवतांच्या छंदरूपी तूं आहेस. ॥ १९ ॥

अग्निर्देवता वातो देवता सूर्यो देवता चन्द्रमा देवता वसवो देवता रुद्रा देवतादित्या देवता मरुतो देवता विश्वे देवा देवता बृहस्पतिर्देवतेन्द्रो देवता वरुणो देवता ॥ २० ॥

अर्थ—हे इष्टके, तूं अग्नि, वात, सूर्य, चंद्रमा, वसु, रुद्र, आदित्य, मरुत्, विश्वेदेव, बृहस्पति, इंद्र व वरुणदेवता एतद्रूपी आहेस. ॥ २० ॥

विनियोग—' मूर्धासि ' इत्यादि सात मंत्रांनीं व ' यंत्री ' इत्यादि सात मंत्रांनीं वालखिल्या संज्ञक इष्टकांचें स्थापन करावें.

मूर्धासि राड् ध्रुवासि धरुणा धर्त्र्यसि धरणी । आयुषे त्वा वर्चसे त्वा कृष्यै त्वा क्षेमाय त्वा ॥ २१ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं मस्तकाप्रमाणें उत्तम व शोभणारी आहेस. हे इष्टके, तूं स्थिर व धारण करणारी आहेस. हे इष्टके, तूं धारण करणारी व भूमिरूपी आहेस. तुला मी आयुष्याची वृद्धि, कांति, धान्याची उत्पत्ति व मिळविलेल्या धनाचें रक्षण याकरितां स्थापन करतों. ॥ २१ ॥

विनियोग—प्रथमचितीप्रमाणे लोकंपृणा इष्टकांचें स्थापन करावें.

यन्त्री राड् यन्त्र्यसि यमनी ध्रुवासि धरित्री । इषे त्वोर्जे त्वा रय्यै त्वा पोषाय त्वा लोकं ताऽइन्द्रम् ॥ २२ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं नियमानें युक्त व शोभणारी आहेस व स्वतः नियमित होऊन सर्वांचें नियमन करणारी आहेस व स्थिर होऊन भूमिस्वरूपी आहेस. हे इष्टके, अन्न, बल व धनवृद्धि यांकरितां तुझे मी स्थापन करतों. अ. १२–मं. ५४,५५,५६ या मंत्रांचीं प्रतीकें क्रमेंकरून ' लोकम् '–' ताः ' आणि ' इंद्रम् '–हीं आहेत. ॥२२॥

विनियोग—आशुस्त्रिवृत् इत्यादि मंत्रांनीं चतुर्थी चिति करावी.

आशुस्त्रिवृद्भान्तऽ पञ्चदशो व्योमा सप्तदशो धरुणऽएकविꣳशऽ प्रतूर्तिरष्टादशस्तपो नवदशोऽभीवर्त्तऽ सविꣳशो वर्चो द्वाविꣳशऽ सम्भरणस्त्रयोविꣳशो योनिश्चतुर्विꣳशो गर्भाऽ पञ्चविꣳशऽओजस्त्रिणवऽ क्रतुरेकात्रिꣳशऽ प्रतिष्ठा त्रयस्त्रिꣳशो ब्रध्नस्य विष्टपं चतुस्त्रिꣳशो नाकऽ षट्त्रिꣳशो विवर्त्तोऽष्टाचत्वारिꣳशो धर्त्रं चतुष्टोमऽ ॥ २३ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं त्रिवृत्स्तोमरूपी व व्यापक अशी आहेस. हे इष्टके, तूं वज्ररूपी पंचदशस्तोम आहेस. हे इष्टके, तूं विशेषेंकरून रक्षण करणारा प्रजापति व सप्तदशस्तोमरूपी आहेस. हे इष्टके, तूं प्रतिष्ठाभूत व एकविंशति स्वरूपिणी आहेस. हे इष्टके, तूं त्वरावान् व अष्टादशस्तोमरूपिणी आहेस. हे इष्टके, तूं तपोरूपी नवदशस्तोमरूपिणी आहेस. हे इष्टके, तूं समावृत्ति, सविंशस्तोमरूपिणी आहेस. हे इष्टके, तूं बलप्रद तेज व द्वाविंशस्तोमरूपिणी आहेस. हे इष्टके, तूं उत्तम पोषण करणारी

त्रयोविंशस्तोमरूपिणी आहेस. हे इष्टके, तूं प्रजोत्पादक व चतुर्विंशस्तोमरूपिणी आहेस. हे इष्टके, तूं सामगर्भ व पंचविंशस्तोमरूपिणी आहेस. हे इष्टके, तूं तेजोरूप व त्रिणवस्तोमस्वरूपिणी आहेस. हे इष्टके, तूं यज्ञोपयोगी व एकत्रिंशस्तोमस्वरूपिणी आहेस. हे इष्टके, तूं प्रतिष्ठा व त्रयस्त्रिंशस्तोमस्वरूपिणी आहेस. हे इष्टके, तूं सूर्य व स्वाराज्य देणारा जो त्या चतुस्त्रिंशस्तोम तद्रूपी आहेस. हे इष्टके, तूं स्वर्गप्रद षट्-त्रिंशस्तोमरूपिणी आहेस. हे इष्टके, तूं ज्यांत सामाची आवृत्ति आहे अशा अष्टाच-त्वारिंशस्तोमरूपिणी आहेस. हे इष्टके, तूं धारण करणाऱ्या चतुष्टोमस्वरूपी आहेस. या सर्वरूपी इष्टकांचें मी स्थापन करतों. ॥ २३ ॥

विनियोग—'अग्नेर्भागोऽसि' इत्यादि दहा मंत्रांनीं स्पृत्संज्ञक दहा इष्टकांचें स्थापन करावें.

अग्नेर्भागोऽसि दीक्षायाऽआधिपत्यं ब्रह्म स्पृतं त्रिवृत्स्तोमऽइन्द्रस्य भागोऽसि विष्णोराधिपत्यं क्षत्रꣳ स्पृतं पञ्चदश स्तोमो नृचक्षसां भागोऽसि धातुराधिपत्यं जनित्रꣳ स्पृतꣳ सप्तदश स्तोमो मित्रस्य भागोऽसि वरुणस्याधिपत्यं दिवो वृष्टिर्वात स्पृतऽएकविꣳशस्तोमः ॥ २४ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं अग्नीचा भाग आहेस, तुझे ठायीं वाणीचें आधिपत्य आहे व त्रिवृत् स्तोमस्वरूपी तुझ्या योगानें मृत्यूपासून ब्राह्मणाचें रक्षण झालें; त्या तुझें मी स्थापन करतों. तसेंच तूं इंद्राचा, शुभाशुभ करणाऱ्यांना पहाणाऱ्या देवांचा व मित्राचा भाग आहेस, तुझे ठायीं विष्णु, धाता व वरुणांचें आधिपत्य आहे, व पञ्चदशस्तोम-स्वरूपी तुझ्या योगानें क्षत्रियत्वाचें, सप्तदशस्तोमस्वरूपी तुझ्या योगानें वैश्यजातीचें मृत्यूपासून रक्षण केलें गेलें व एकविंशस्तोमरूपी अशा तुझ्या योगें द्युलोकासंबंधीं वृष्टि व वायु रक्षण केले गेले; अशा हे इष्टकांनो तुमचें मी स्थापन करतों ॥ २४ ॥

विनियोग—'वसूनां भागः' वगैरे सहा मंत्रांनीं सहा पद्यानामक इष्टकांचें स्थापन करावें.

वसूनां भागोऽसि रुद्राणामाधिपत्यं चतुष्पात् स्पृतं चतुर्विꣳश स्तोमऽआदित्यानां भागोऽसि मरुतामोधिपत्यं गर्भाः स्पृताꣳ पञ्चविꣳश स्तोमोऽदित्यै भागोऽसि पूष्णऽआधिपत्यमोजः स्पृतं त्रिणव स्तोमो देवस्य सवितुर्भागोऽसि बृहस्पतेराधिपत्यꣳ सर्मीचीर्दिशः स्पृताश्चतुष्टोम स्तोमः ॥ २५ ॥

यवानां भागोऽस्यवानामाधिपत्यं प्रजा स्पृताश्चतुश्चत्वारिꣳश स्तोमऽ ऋभूणां भागोऽसि विश्वेषां देवानामाधिपत्यं भूतꣳस्पृतं त्रयस्त्रिꣳश स्तोमः ॥ २६ ॥

अर्थ--हे इष्टके, तूं वसु, आदित्य, अदिति, सवितृदेव, शुक्लपक्ष व ऋभुदेव यांचा भाग आहेस. तुझे ठायीं रुद्र, मरुत्, पूषा, बृहस्पति, उत्तर (कृष्ण) पक्ष व विश्वेदेव यांचें आधिपत्य आहे व तूं चतुर्विꣳशस्तोमरूपानें चतुष्पादांचें, पञ्चविꣳशस्तोमरूपानें गर्भाचें, त्रिणवस्तोमरूपानें तेजाचें, चतुष्टोमरूपानें विस्तारयुक्त अशा दिशांचें, चतुश्चत्वारिꣳशस्तोमरूपानें प्रजांचें व त्रयस्त्रिꣳशस्तोमरूपानें सर्व भूतांचें मृत्यूपासून रक्षण केलें. त्या सर्व इष्टकांचें मी स्थापन करतों ॥ २५-२६ ॥

विनियोग--' सहश्च सहस्यश्च ' या मंत्राने ऋतव्य इष्टकांचें स्थापन करावें.

सहश्च सहस्यश्च हैमन्तिकावृतूऽअग्नेरन्तꣳश्लेषोऽसि कल्पेतां द्यावापृथिवी कल्पन्तामापऽओषधयꣳ कल्पन्तामग्नयꣳ पृथङ् मम ज्यैष्ठ्याय सव्रताꣳ । तेऽअग्नयꣳ समनसोऽन्तरा द्यावापृथिवीऽइमे । हैमन्तिकावृतूऽअभिकल्पमानाऽ इन्द्रमिव देवाऽअभिसंविशन्तु तया देवतयाङ्गिरस्वद्ध्रुवे सीदतम् ॥ २७ ॥

अर्थ--मार्गशीर्ष व पौष हे हेमन्त ऋतूचे अवयव आहेत. हे हेमन्त ऋतो, तूं या अग्नीच्या आंत राहून जोडणारा आहेस म्हणून द्यावापृथिवींनीं अग्निचयन करणाऱ्या माझें (यजमानाचें) ज्येष्ठत्व प्राप्त करण्याकरितां योग्य उपकार करावा. जल व ओषधि आणि एकाच चयनयज्ञामध्यें कार्य करणारे निरनिराळे इष्टकारूपी अग्नि तुला ज्येष्ठत्व देण्याला समर्थ होवोत. ह्या द्यावापृथिवी व त्यांत असणारे एकचित्ताचे अग्नि हेही हेमंत ऋतूसंबंधीं संपत्ति मिळवून या कर्माचा आश्रय करोत. यास दृष्टान्त--ज्याप्रमाणें देव इंद्राच्या सेवेकरितां येतात त्याप्रमाणें अन्य इष्टका हेमंताच्या सेवेकरतां येवोत. हे ऋतव्य इष्टकांनो, त्या देवतेनें स्थापित केलेल्या तुम्ही अंगिरस् ऋषीच्या यज्ञाप्रमाणें या यज्ञांत येऊन स्थिर होऊन रहा ॥ २७ ॥

विनियोग--' एकयास्तुवत ' इत्यादि मंत्रांनीं सतरा इष्टकांचें स्थापन करावें.

एकयास्तुवत प्रजाऽअधीयन्त प्रजापतिरधिपतिरासीत्तिसृभिरस्तुवत

ब्रह्मासृज्यत ब्रह्मणस्पतिरधिपतिरासीत्प्रभिरस्तुवत भूतान्यसृज्यन्त भूतानां पतिरधिपतिरासीत्सप्तभिरस्तुवत सप्तऽऋषयोऽसृज्यन्त धाताधिपतिरासीत् ॥ २८ ॥

अर्थ--प्रजापतीनें एका वाणीसह आपली स्तुति केली, प्रजा उत्पन्न केल्या व तो त्यांचा अधिपति झाला. ब्रह्मदेवानें प्राणोपानव्यानांसह आपली स्तुति केली व ब्राह्मण जाति उत्पन्न केली व तो तिचा स्वामी झाला. भूताधिपतीनें, पंच प्राणांनीं आपली स्तुति केली व पंचमहाभूतें उत्पन्न केलीं आणि तो त्यांचा स्वामी झाला. जगत्स्रष्ट्यानें श्रोत्र, चक्षु, नासिका व वाक् यांचेसह आपली स्तुति केली व सात चक्षुरादिक उत्पन्न केले व तो त्यांचा स्वामी झाला. ॥ २८ ॥

नवभिरस्तुवत पितरोऽसृज्यन्तादितिरधिपत्न्यासीदेकादशभिरस्तुवतऽऋतवोऽसृज्यन्तार्तवाऽअधिपतयऽआसँस्त्रयोदशभिरस्तुवत मासाऽसृज्यन्त संवत्सरोऽधिपतिरासीत्पञ्चदशभिरस्तुवत क्षत्रमसृज्यतेन्द्रोऽधिपतिरासीत्सप्तदशभिरस्तुवत ग्राम्याः पशवोऽसृज्यन्त बृहस्पतिरधिपतिरासीत् ॥२९॥

अर्थ—प्रजापतीनें नऊ प्राणादिछिद्रांसह आपली स्तुति केली व अग्निष्वात्तादि पितर निर्माण केले व अखण्डित-शक्ति-विशिष्ट अशी प्रजापतीची शक्ति उत्पन्न केलेल्या पितरांची स्वामिनी झाली. त्या प्रजापतीनें एकादश प्राणांसह आपली स्तुति केली, वसंतादिऋतु निर्माण केले, ऋतुपालक देव स्वामी झाले. त्यानें त्रयोदश अवयवांनीं आपली स्तुति केली. त्यापासून चैत्रादि महिने निर्माण झाले व संवत्सर त्यांचा अधिपति झाला. प्रजापतीनें पंधरा अवयवांसह आपली स्तुति केली. त्यापासून क्षत्रिय जाति निर्माण झाली व ऐश्वर्यशाली इन्द्र त्यांचा स्वामी झाला. प्रजापतीनें सप्तदश अवयवांनीं आपली स्तुति केली व गो वगैरे ग्राम्य पशू निर्माण केले आणि बृहस्पति त्यांचा स्वामी झाला. ॥ २९ ॥

नवदशभिरस्तुवत शूद्रार्यावसृज्येतामहोरात्रेऽअधिपत्नीऽआस्तामेकविꣳशत्यास्तुवतैकशफाः पशवोऽसृज्यन्त वरुणोऽधिपतिरासीत् त्रयोविꣳशत्यास्तुवत क्षुद्राः पशवोऽसृज्यन्त पूषाधिपतिरासीत्पञ्चविꣳशत्यास्तुवतारण्याः पशवोऽसृज्यन्त वायुरधिपतिरासीत्सप्तविꣳशत्यास्तुवत द्यावापृथिवी ह्येतां वसवो रुद्राऽआदित्याऽअनुव्युायँस्तऽएवाधिपतयऽआसन् ॥ ३० ॥

अर्थ--प्रजापतीनें एकोणीस अवयवांसह आपली स्तुति केली. त्यापासून शूद्र व वैश्य निर्माण झाले व अहोरात्र त्यांचे स्वामी बनले. प्रजापतीनें एकवीस अवयवांसह आपली स्तुति केली, त्यापासून एका खुराचे अश्व वगैरे पशु उत्पन्न झाले व वरुण त्यांचा अधिपति झाला. प्रजापतीनें तेवीस अवयवांसह आपली स्तुति केली त्यापासून अज वगैरे क्षुद्र पशु उत्पन्न झाले व पूषा त्यांचा अधिपति झाला. प्रजापतीनें पंचवीस अवयवांसह आपली स्तुति केली, त्यापासून कृष्णमृगप्रभृति आरण्य पशु निर्माण झाले वायु त्यांचा अधिपति झाला. प्रजापतीनें सत्तावीस अवयवांसह आपली स्तुति केली. त्यापासून द्यावापृथिवी उत्पन्न झाले त्यांचें अष्ट वसु, एकादश रुद्र व आदित्यांनीं अनुगमन केलें व तेच त्यांचे स्वामी बनले. ॥ ३० ॥

नवँविꣳ शत्यास्तुवत वनस्पतयोऽसृज्यन्त सोमोऽधिपतिरासीदेकात्रिꣳ शतास्तुवत प्रजाऽसृज्यन्त षवाश्चायवाश्चाधिपतयऽआसँस्त्रयस्त्रिꣳ शतास्तुवत भूतान्यशाम्यन्प्रजापतिꣳ परमेष्ठ्यधिपतिरासील्लोकं ताऽइन्द्रम् ॥३१॥

अर्थ--प्रजापतीनें एकूणतीस अवयवांसह आपली स्तुति केली व वनस्पति निर्माण केल्या सोम त्यांचा अधिपति झाला. प्रजापतीनें एकतीस अवयवांसह आपली स्तुति केली त्यापासून प्रजा निर्माण झाल्या शुक्ल पक्ष व कृष्ण पक्ष हे त्यांचे अधिपति झाले. प्रजापतीनें तेहतीस अवयवांसह आपली स्तुति केली त्यायोगें सर्व प्राणी सुखी बनले सत्यलोकांत राहणारा प्रजापति त्यांचा स्वामी झाला. बाराव्या अध्यायांतील ५४, ५५ व ५६ या मंत्रांचीं प्रतीकें क्रमेंकरून लोकम्--ताः--इन्द्रम् अशीं आहेत. ॥ ३१ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**
माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

इति चतुर्दशोऽध्यायः समाप्तः ।



अथ पञ्चदशोऽध्यायः ॥ १५ ॥

विनियोग--चौदाव्या अध्यायांत दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या चितीचे मंत्र सांगितले. पंधराव्या अध्यायांत पांचव्या चितीचे मंत्र सांगतात. 'अग्ने जातान्' इत्यादि मंत्रांनीं पांच अरिसपत्न इष्टकाचें स्थापन करावें.

अग्ने जातान्प्रणुदा नः सपत्नान्प्रत्यजातान्नुद जातवेदः । अधि नो ब्रूहि सुमताऽअहेडँस्तव स्याम शर्मन्त्रिवरूथऽउद्भौ ॥ १ ॥

अर्थ--हे अग्ने, यापूर्वी उत्पन्न झालेले व प्रजावान् अग्ने, भविष्यकालीं उत्पन्न होणारे जे आमचे शत्रु त्यांचा तूं नाश कर. तूं न रागावतां आम्हांला यज्ञाची इतिकर्तव्यता शिकव व आमच्याविषयीं सद्बुद्धि धारण कर. हे अग्ने, तुझ्या सदोमण्डप, हविर्धानमण्डप, अग्नीध्रमण्डप या तीन मण्डपांनीं युक्त सुखाचे स्थान अशा शालेमध्यें आम्ही यज्ञ करूं. ती यज्ञशाला पुरुष, पशु, धनधान्य यांनीं समृद्ध आहे. ॥१॥

सहसा जातान्प्रणुदा नः सपत्नात्प्रत्यजाताञ्जातवेदो नुदस्व । अधि नो ब्रूहि सुमनस्यमानो वयꣳ स्याम प्रणुदा नः सपत्नान् ॥ २ ॥

अर्थ—बलासहवर्तमान उत्पन्न झालेल्या व पुढें उत्पन्न होणाऱ्या आमच्या शत्रूंचा तूं नाश कर. हे प्रज्ञावान् अग्ने, तूं आमच्याविषयीं सद्बुद्धि धारण करून आम्ही शत्रूंपेक्षां अधिक होऊं असें म्हण. व तुझ्या कृपेनें आम्ही शत्रूंपेक्षां अधिक होऊं ॥ २ ॥

षोडशी स्तोमऽओजा द्रविणं चतुश्चत्वारिꣳश स्तोमो वर्चो द्रविणम् । अग्नेः पुरीषमस्यप्सो नाम तां त्वा विश्वेऽअभिगृणन्तु देवाः । स्तोमपृष्ठा घृतवतीह सीद प्रजावद्रस्मे द्रविणायजस्व ॥ ३ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं षोडशस्तोमाचें व ओजोरूपी द्रव्याचें स्वरूप धारण करणारी आहेस. तसेंच चव्हेचाळीस आवृत्तींनीं युक्त स्तोम व बलरूपी धन यांचें स्वरूप धारण करणारी आहेस. हे इष्टके, रक्षक असा जो अग्नि त्याला पूर्ण करणारी तूं आहेस. विश्वेदेव तुझी स्तुति करोत. स्तोम व पृष्ठ यांनीं युक्त व घृतसहित अशी तूं चौथ्या चितीमध्यें बैस व आमचे ठायीं पुत्रयुक्त द्रव्य आम्हांला दे. (या सर्व इष्टकांचें मी स्थापन करतों) ॥ ३ ॥

विनियोग—विराट् संज्ञक दहा दहा इष्टका प्रत्येक दिशेला ' एवश्छन्दः ' वगैरे मंत्रांनीं स्थापन कराव्या.

एवश्छन्दो वरिवश्छन्दः÷ शम्भूश्छन्दः÷ परिभूश्छन्दऽआच्छच्छन्दो मनश्छन्दो व्यचश्छन्दः सिन्धुश्छन्दः समुद्रश्छन्दः÷ सरिरं छन्दः÷ ककुप्छन्दस्त्रिककुप्छन्दः÷ काव्यं छन्दोऽअङ्कुपं छन्दोऽक्षरपङ्क्तिश्छन्दः पदपङ्क्तिश्छन्दो विष्टारपङ्क्तिश्छन्दः÷ क्षुरोभ्रजश्छन्दः÷ ॥ ४ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं पृथ्वीलोक, अंतरिक्षलोक, द्युलोक, दिशा, अन्न, मन, सर्वव्यापक आदित्य, प्राणवायु, विकल्पोत्पादक मन, वाणी, प्राण, उदान, तीन वेद, जल, नाशरहित असा द्युलोक, भूलोक, दिशा, तीव्र व प्रकाशमान आदित्य, एतच्छंदरूपी आहेस ॥ ४ ॥

आच्छन्दः÷ प्रच्छच्छन्दः÷ संयच्छन्दो वियच्छन्दो बृहच्छन्दो रथन्तरञ्छन्दो निकायश्छन्दो विवधछन्दो गिरश्छन्दो भ्रजश्छन्दः÷ सꣳस्तुप्छन्दोऽनुष्टुप्छन्दऽएवश्छन्दो वरिवश्छन्दो वयश्छन्दो वयस्कृच्छन्दो विष्पर्धाश्छन्दो विशालं छन्दश्छदिश्छन्दो दूरोहणं छन्दस्तन्द्रं छन्दोऽअङ्काङ्कं छन्दः÷ ॥ ५ ॥

अर्थ—आच्छादन करणारे व विशेषेंकरून आच्छादन करणारे असें अन्न, सर्व व्यापार निर्वृत्त करणारी अशी रात्रि, व ज्या वेळीं व्यापाराकरितां लोक इकडे तिकडे जातात तो दिवस, विस्तीर्ण स्वर्गलोक, भूमण्डल, वायुमण्डल, नानाप्रकारानें जेथें पापाचें फळ मिळतें असा अंतरिक्षलोक अन्न व अग्नि, अनुष्टुप् छंद, वाणी, भूलोक, अंतरिक्षलोक, अन्न, बाल्यादिवयोत्पादक जठराग्नि, नाना प्रकारेकरून जेथें स्पर्धा चालते असा स्वर्ग, विशाल असें भूतल, अंतरिक्ष, विशेष कष्टानेंही चढण्यास कठीण असें रविस्थान, स्थानसंकोचानें जेथें चढतां येत नाहीं अशी पद्धति, ज्यांत खांचखळगे, पाषाण वगैरेचें चिन्ह आहे असें जल, एतच्छन्दरूपी आहेस. एतद्रूपी इष्टकांनो, तुमचें मी स्थापन करतों. ॥ ५ ॥

विनियोग—' रश्मिना सत्याय ' वगैरे एकूणचाळीस मंत्रांनीं स्तोमभागसंज्ञक इष्टकांचें स्थापन करावें.

रश्मिना सत्याय सत्यं जिन्व प्रेतिना धर्मणा धर्मं जिन्वान्वित्या दिवा

दिवे जिन्व सन्धिनान्तरिक्षेणान्तरिक्षं जिन्व प्रतिधिना पृथिव्या पृथिवीं जिन्व विष्टम्भेन वृष्ट्या वृष्टिं जिन्व प्रवयाहार्जिन्वानुया राज्या रात्रीं जिन्वोशिजा वसुभ्यो वसूञ्जिन्व प्रकेतेनादित्येभ्यऽआदित्याञ्जिन्व ॥ ६ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं अन्नानें सत्याकरितां स्थापन केली आहेस. सत्यवाक्याची वृद्धि कर. हे इष्टके, तूं विशेषेंकरून अन्नाच्या योगानें धर्माकरितां स्थापन केली गेली आहेस. धर्माची वृद्धि कर. अन्नाच्या योगानें द्युलोकाकरितां, उत्तम बलादिकांना धारण करणाऱ्या अन्नानें अंतरिक्षाकरितां, स्थापन केल्या जाणाऱ्या अन्नानें पृथ्वीकरितां, देहधारक अन्नानें वृष्टीकरितां, विशेषेंकरून देहगामी अन्नानें दिवसांकरितां, देहान्तर्गत नाडींनीं गमन करणाऱ्या अन्नानें रात्रीकरितां, स्पृहणीय अशा अन्नानें वसुदेवाकरितां, सुख मिळवून देणाऱ्या अन्नानें आदित्याकरितां तुझें स्थापन केलें आहे म्हणून तूं द्युलोक, अंतरिक्ष वगैरेंना संतुष्ट कर. ॥ ६ ॥

तन्तुना रायस्पोषेण रायस्पोषं जिन्व सꣳ सर्पेण श्रुतायं श्रुतं जिन्वैडेनौषधीभिरोषधीर्जिन्वोत्तमेन तनूभिस्तनूर्जिन्व वयोधसाधीतेनाधीतं जिन्वाभिजिता तेजसा तेजो जिन्व ॥ ७ ॥

अर्थ—विस्तार पावणाऱ्या अन्नानें धनाच्या वृद्धीकरितां, देहांत पसरणाऱ्या अन्नानें शास्त्राकरितां व इडारूप अन्नानें ओषधीकरितां, अत्यंत उत्कृष्ट अन्नानें शरीराकरितां, बाल्यादि वय वाढविणाऱ्या अन्नानें अध्ययनाकरितां, सर्वजयहेतुभूत अन्नानें तेजाकरितां तुझें मीं स्थापन केलें आहे. तूं धनपुष्टि, शास्त्र, ओषधी, शरीर, अध्ययन व तेज यांना संतुष्ट कर ॥ ७ ॥

प्रतिपदासि प्रतिपदे त्वानुपदंस्यनुपदे त्वा सम्पदसि सम्पदे त्वा तेजोऽसि तेजसे त्वा ॥ ८ ॥

अर्थ—(प्रतिपद् अन्न म्हणजे जीवनप्रापक अन्न, अनुपद् अन्न म्हणजे प्रतिदिनीं भक्षिलें जाणारे अन्न, संपदन्न म्हणजे संपत्ति देणारे अन्न व तेजोऽन्न म्हणजे तेज देणारें अन्न) हे इष्टके, तूं प्रतिपद् अन्नरूपी, अनुपद् अन्नरूपी, संपदन्नरूपी, तेजोऽन्नरूपी आहेस. प्रतिपदादि अन्न, संपत्ति व तेज यांचे प्राप्तीकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ८ ॥

त्रिवृदसि त्रिवृते त्वा प्रवृदसि प्रवृते त्वा विवृदसि विवृते त्वा सवृदसि

सबृतें त्वाक्रमोऽस्याक्रमायं त्वा संक्रमोऽसि संक्रमायं त्वोत्क्रमोऽस्युत्क्रमाय त्वोत्क्रान्तिरस्युत्क्रान्त्यै त्वाधिपतिनोर्जोर्जे जिन्व ॥ ९ ॥

अर्थ—कृषि, वृष्टि व बीज या तीन रूपानें अन्न तीन तऱ्हेनें राहतें. त्यांस 'त्रिवृत्' म्हणावें. तद्रूपी तुझें मी त्रिवृदन्नाकरितां स्थापन करतों. भूतांना आच्छादक जें अन्न त्यास ' प्रवृत् ' म्हणावें. त्या ' प्रवृत् ' अन्नाकरितां तुझें मी स्थापन करतों. भूतांना विशेषेंकरून राहणाऱ्या अन्नाला ' विवृत् ' म्हणावें. सह राहणाऱ्या अन्नाला 'सवृत्' म्हणावें. क्षुधेचें आक्रमण करणाऱ्या अन्नाला ' आक्रम ' म्हणावें. देहांत संक्रमण करणाऱ्या अन्नाला ' संक्रम ' म्हणावें. संतानोत्पत्तीकरितां बीजरूपानें परिणाम पावणाऱ्या अन्नाला 'उत्काम' म्हणावें. उत्कृष्ट गमन करणाऱ्या अन्नाला ' उत्क्रान्ति ' असें म्हणावें. हे इष्टके, एतत्सर्वस्वरूपी जें अन्न तद्रूपिणी तूं आहेस. व त्या त्या त्रिवृत्, प्रवृत् वगैरे अन्नाकरितां तुझें मी स्थापन करतों. हे इष्टके, अधिक तऱ्हेनें संरक्षण करणाऱ्या अन्नरसानें अन्नरसाला संतुष्ट कर ॥ ९ ॥

विनियोग—' राज्ञ्यसि ' इत्यादि पांच मंत्रांनीं नाकसत् संज्ञक इष्टकांचें स्थापन करावें.

राज्ञ्यसि प्राची दिग्वसवस्ते देवाऽअधिपतयोऽग्निर्हेतीनां प्रतिधर्ता त्रिवृत् त्वा स्तोम÷ पृथिव्याꣳ श्रयत्वाज्यमुकथमव्यथायै स्तभ्नातु रथन्तरꣳ साम प्रतिष्ठित्याऽअन्तरिक्षऽऋषयस्त्वा प्रथमजा देवेषु दिवो मात्रया वरिम्णा प्रथन्तु विधर्ता चायमधिपतिश्च ते त्वा सर्वे संविदाना नाकस्य पृष्ठे स्वर्गे लोके यजमानं च सादयन्तु ॥ १० ॥

अर्थ—हे इष्टके, तूं शोभणारी पूर्वदिशा आहेस, अष्टवसु विशेषेंकरून तुझें पालन करतात, अग्नि तुला उपद्रव देणाऱ्या शत्रुशस्त्रांचें निराकरण करणारा आहे, पृथिवीवर त्रिवृत् स्तोम तुझा आश्रय करो, तुझें चलन न व्हावें म्हणून आज्यसंज्ञक शस्त्र तुला दृढ करो तसेंच तुझी अन्तरिक्षांत प्रतिष्ठा (स्थिति) व्हावी म्हणून रथन्तरसाम तुला दृढ करो, प्रथमोत्पन्न प्राण देवलोकांत आकाशाच्या परिमाणानें व विस्तारानें तुला विशाल करोत, इष्टका निर्माण करणारा व इष्टकापालक तुला विस्तीर्ण करोत. ते सर्व वसु, अग्निप्रभृति देव ऐकमत्य करून या यजमानाला स्वर्गलोकांत व इष्टके, तुला या यज्ञांत स्थापन करोत ॥ १० ॥

विराडसि दक्षिणा दिग्रुद्रास्ते देवाऽअधिपतयऽइन्द्रो हेतीनां प्रतिधर्ता

पञ्चदशस्त्वा स्तोमः पृथिव्याꣳ श्रयतु प्रऽउगमुक्थमव्यथायै स्तभ्नातु बृहत्साम प्रतिष्ठित्याऽअन्तरिक्षऽऋषयस्त्वा प्रथमजा देवेषु दिवो मात्रया वरिम्णा प्रथन्तु विधर्ता चायमधिपतिश्च ते त्वा सर्वे संविदाना नाकस्य पृष्ठे स्वर्गे लोके यजमानं च सादयन्तु ॥ ११ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं विशेषेंकरून शोभणारी दक्षिण दिशा आहेस, रुद्रदेव तुझें पालन करतात, इन्द्र तुला उपद्रव देणाऱ्या शत्रुशस्त्रांचें निराकरण करणारा आहे, पृथ्वीवर पंचदश स्तोम तुझा आश्रय करो, तुझें चलन न व्हावें म्हणून प्रउगसंज्ञक शस्त्र तुला दृढ करो, तुझी अन्तरिक्षांत स्थिति व्हावी म्हणून बृहत्साम तुला दृढ करो, प्रथमोत्पन्न प्राण देवलोकांत आकाशाच्या परिमाणानें व विस्तारानें तुला विशाल करोत, इष्टका निर्माण करणारा व इष्टकापालक तुझें पालन करोत. ते सर्व रुद्र, इंद्र-प्रभृति देव ऐकमत्य करून या यजमानाला स्वर्गलोकांत व तुला या यज्ञांत स्थापन करोत ॥ ११ ॥

सम्राडसि प्रतीची दिगादित्यास्ते देवाऽअधिपतयो वरुणो हेतीनां प्रतिधर्ता सप्तदशस्त्वा स्तोमः पृथिव्याꣳ श्रयतु मरुत्वतीयमुक्थमव्यथायै स्तभ्नातु वैरूपꣳ साम प्रतिष्ठित्याऽअन्तरिक्षऽऋषयस्त्वा प्रथमजा देवेषु दिवो मात्रया वरिम्णा प्रथन्तु विधर्ता चायमधिपतिश्च ते त्वा सर्वे संविदाना नाकस्य पृष्ठे स्वर्गे लोके यजमानं च सादयन्तु ॥ १२ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं उत्तम शोभणारी पश्चिम दिशा आहेस. आदित्यदेव तुझें पालन करतात, वरुण तुला उपद्रव देणाऱ्या शत्रुशस्त्रांचें निराकरण करणारा आहे, पृथिवीवर सप्तदश स्तोम तुझा आश्रय करो, तुझें चलन न व्हावें म्हणून मरुत्वतीय-संज्ञक शस्त्र तुला दृढ करो, तुझी अन्तरिक्षांत स्थिति व्हावी म्हणून वैरूपसाम तुला दृढ करो, प्रथमोत्पन्न प्राण देवलोकांत आकाशाच्या परिमाणानें व विस्तारानें तुला विशाल करोत, इष्टका निर्माण करणारा तुझें पालन करो. ते सर्व आदित्य, वरुण-प्रभृति देव ऐकमत्य करून या यजमानाला स्वर्गलोकांत व तुला या यज्ञांत स्थापन करोत ॥ १२ ॥

स्वराडस्युदीची दिङ् मरुतस्ते देवाऽअधिपतयः सोमो हेतीनां प्रतिधर्तैकविꣳशस्त्वा स्तोमः पृथिव्याꣳ श्रयतु निष्केवल्यमुक्थमव्यथायै स्तभ्नातु वैराजꣳ साम प्रतिष्ठित्याऽअन्तरिक्षऽऋषयस्त्वा प्रथमजा देवेषु

दिवो मात्रया वरिम्णा प्रथन्तु विधर्ता चायमधिपतिश्च ते त्वा सर्वे संविदाना नाकस्य पृष्ठे स्वर्गे लोके यजमानं च सादयन्तु ॥ १३ ॥

अर्थ—हे इष्टके, तूं स्वयंशोभणारी उत्तर दिशा आहेस, मरुत् देव तुझे अधिपति आहेत, सोम तुला उपद्रव देणाऱ्या शत्रुशस्त्रांचा निराकरण करणारा आहे, पृथिवीवर एकविंश स्तोम तुझा आश्रय करो, तुझें चलन न व्हावें म्हणून निष्केवल्यसंज्ञक शस्त्र तुला दृढ करो, तुझी अन्तरिक्षांत स्थिति व्हावी म्हणून वैराज साम तुला दृढ करो, प्रथमोत्पन्न प्राण देवलोकांत आकाशाच्या परिमाणानें व विस्तारानें तुला विशाल करोत, इष्टका निर्माण करणारा तुझें पालन करो, ते सर्व मरुत् सोम प्रभृति देव ऐकमत्य करून या यजमानाला स्वर्गलोकांत व तुला या यज्ञांत स्थापन करोत. ॥ १३ ॥

अधिपत्न्यसि बृहती दिग्विश्वे ते देवाऽअधिपतयो बृहस्पतिर्हेतीनां प्रतिधर्ता त्रिणवत्रयस्त्रिꣳशौ त्वा स्तोमौ पृथिव्याꣳ श्रयतां वैश्वदेवाग्निमारुतेऽउक्थेऽअन्यथायै स्तभ्नीताꣳ शाक्वररैवते सामनी प्रतिष्ठित्याऽअन्तरिक्षꣳऋषयस्त्वा प्रथमजा देवेषु दिवो मात्रया वरिम्णा प्रथन्तु विधर्ता चायमधिपतिश्च ते त्वा सर्वे संविदाना नाकस्य पृष्ठे स्वर्गे लोके यजमानं च सादयन्तु ॥ १४ ॥

अर्थ—हे मध्यदेशांतील इष्टके, तूं अतिशयेंकरून पालन करणारी प्रौढ अशी ऊर्ध्व दिशा आहेस, विश्वेदेव तुझे अधिपति आहेत, बृहस्पति तुला उपद्रव देणाऱ्या शत्रुशस्त्रांचा निराकरण करणारा आहे, पृथिवीवर त्रिणव व त्रयस्त्रिंश हे दोन स्तोम तुझा आश्रय करोत, तुझें चलन न व्हावें म्हणून विश्वेदेव व अग्निमारुत उक्थें तुला दृढ करोत, शाक्कर व रैवत सामें तुझी अंतरिक्षांत स्थिति व्हावी म्हणून तुला दृढ करोत. प्रथमोत्पन्न प्राण देवलोकांत आकाशाच्या परिमाणानें व विस्तारानें तुला विशाल करोत, इष्टका निर्माण करणारा तुझें पालन करो. ते सर्व विश्वेदेव बृहस्पतिप्रभृति देव ऐकमत्य करून या यजमानाला स्वर्गलोकांत व तुला या यज्ञांत स्थापन करोत ॥१४॥

विनियोग—' अयं पुरः ' इत्यादि पांच मंत्रांनीं पञ्चचूडासंज्ञक पांच इष्टकांचें स्थापन करावें.

अयं पुरो हरिकेशꣳ सूर्यरश्मिस्तस्य रथगृत्सश्च रथौजाश्च सेनानीग्रामण्यौ । पुञ्जिकस्थला च क्रतुस्थला चाप्सरसौ दङ्क्षणवः÷ पशवो

केतिः पौरुषेयो वधः प्रहेतिस्तेभ्यो नमोऽअस्तु ते नोऽवन्तु ते नो मृडयन्तु ते यं द्विष्मो यश्च नो द्वेष्टि तमेषां जम्भे दध्मः ॥ १५ ॥

अर्थ—हा पुढें असलेला अग्नि हरिकेश म्हणजे सुवर्ण ज्वालांनीं युक्त, सूर्यरश्मि म्हणजे सूर्याप्रमाणें ज्याचे किरण आहेत असा, रथगृत्स म्हणजे रथकार्यांत कुशल, रथौजाः म्हणजे रथयुद्धकुशल, सेनानी म्हणजे सेनापति, ग्रामणी म्हणजे गांव चालविणारा गांवचा पुढारी, पुञ्जिकस्थला म्हणजे रूपलावण्यादिकांना आधारभूत, क्रतुस्थला म्हणजे रूपादिज्ञानांचें स्थान, दंक्ष्णु म्हणजे दंश करण्याचा (चावण्याचा) ज्यांचा स्वभाव आहे असे, पौरुषेय वध म्हणजे जें अस्त्र सोडलें असतां शत्रु आपसांतच युद्ध करून मरतात हा जो पूर्वेकडील अग्नि तो हरिकेश व सूर्यरश्मि आहे. रथगृत्स व रथौजा (वासंतिक मास) हे त्याचे सेनापति आणि ग्रामनायक आहेत. पुञ्जिकस्थला व क्रतुस्थला या त्याच्या दोन परिचारिका अप्सरा आहेत. दंश करणारे व्याघ्रादि पशु त्यांचें शस्त्र आहे. पौरुषेयवध त्यांचें प्रकृष्ट शस्त्र आहे. या सर्वांना नमस्कार असो. ते आमचें रक्षण करोत व आम्हांला सुख देवोत. ज्याचा आम्ही द्वेष करतों व जो आमचा द्वेष करतो त्याला आम्ही हरिकेशादिकांच्या मुखांत (दाढेंत) स्थापन करतों ॥ १५ ॥

अयं दक्षिणा विश्वकर्मा तस्य रथस्वनश्च रथेचित्रश्च सेनानीग्रामण्यौ । मेनका च सहजन्या चाप्सरसौ यातुधाना हेती रक्षाꣳसि प्रहेतिस्तेभ्यो नमोऽअस्तु ते नोऽवन्तु ते नो मृडयन्तु ते यं द्विष्मो यश्च नो द्वेष्टि तमेषां जम्भे दध्मः ॥ १६ ॥

अर्थ—विश्वकर्मा–सर्व कर्मे करणारा, रथस्वनः–रथांत बसून शब्द करणारा, रथेचित्रः–रथांत बसून आश्चर्यकारक कर्मे करणारा, मेनका–जिला सर्व लोक मान देतात ती, सहजन्या–सर्व लोकोपयोगी हा दक्षिण दिशेकडील अग्नि विश्वकर्मा आहे–रथेस्वन व रथेचित्र (ग्रीष्मऋतूचे अवयव) हे त्याचे सेनापति व ग्रामनायक आहेत. मेनका व सहजन्या या त्याच्या अप्सरा आहेत. यातुधान जातीचे राक्षस हें त्यांचें शस्त्र व राक्षस हें त्यांचें उत्कृष्ट शस्त्र आहे. या सर्वांना नमस्कार असो. ते आमचें रक्षण करोत व आम्हांला सुख देवोत. ज्याचा आम्ही द्वेष करतों व जो आमचा द्वेष करतो त्याला आम्ही विश्वकर्मादिकांच्या मुखांत (दाढेंत) स्थापन करतों ॥ १६ ॥

अयं पश्चाद्विश्वव्यचास्तस्य रथप्रोतश्चासमरथश्च सेनानीग्रामण्यौ । प्रम्लोचन्ती चानुम्लोचन्ती चाप्सरसौ व्याघ्रा हेतिः सर्पाः प्रहेतिस्तेभ्यो नमोऽअस्तु ते नोऽवन्तु ते नो मृडयन्तु ते यं द्विष्मो यश्च नो द्वेष्टि तमेषां जम्भे दध्मः ॥ १७ ॥

अर्थ—विश्वव्यचा—उदय पावून सर्वांना प्रकाशित करणारा, रथप्रोत-रथांत शिवून टाकल्याप्रमाणें असलेला, असमरथ—ज्याचा रथ दुसऱ्यासारखा नसून अधिक आहे, (हे दोन वर्षाऋतूचे अवयव) प्रम्लोचन्ती—पुरुषाला आपलें शरीर दाखविणारी, अनुम्लोचन्ती—वारंवार शरीर दाखविणारी, हा पश्चिम दिशेकडील अग्नि विश्वव्यचा आहे, रथप्रोत हा त्याचा सेनापति व असमरथ त्याचा ग्रामनायक आहे, प्रम्लोचन्ती व अनुम्लोचन्ती या त्याच्या परिचारिणी अप्सरा आहेत. व्याघ्र हें त्याचें शस्त्र व सर्प उत्कृष्ट शस्त्र आहे. या सर्वांना नमस्कार असो. ते आमचें रक्षण करोत व आम्हाला सुख देवोत. ज्याचा आम्ही द्वेष करतों व जो आमचा द्वेष करतो त्याला आम्ही विश्वव्यचा प्रभृतींच्या दाढेंत स्थापन करतों ॥ १७ ॥

अयमुत्तरात्संयद्वसुस्तस्य तार्क्ष्यश्चारिष्टनेमिश्च सेनानीग्रामण्यौ । विश्वाची च घृताची चाप्सरसावापो हेतिर्वातः प्रहेतिस्तेभ्यो नमोऽअस्तु ते नोऽवन्तु ते नो मृडयन्तु ते यं द्विष्मो यश्च नो द्वेष्टि तमेषां जम्भे दध्मः ॥ १८ ॥

अर्थ—संयद्वसुः— ज्यांप्रत द्रव्यप्राप्तीकरितां लोक गमन करतात तो यज्ञ, तार्क्ष्य-तीक्ष्ण असे पक्ष अन्तरिक्षांत स्थापन करणारा, अरिष्टनेमिः—ज्याचें आयुध अहिंसित आहे, विश्वाची—सर्व विश्वांत गमन करणारी, घृताची—घृतभक्षण करणारी, हा उत्तर दिशेकडील संयद्वसु नांवाचा अग्नि आहे, तार्क्ष्य त्याचा सेनापति व अरिष्टनेमि त्याचा ग्रामनायक आहे (हे शरदृतूचे अवयव आहेत) विश्वाची व घृताची या त्याच्या परिचारिका अप्सरा आहेस. जलसमूह हें त्याचें शस्त्र व वायु हें उत्कृष्ट शस्त्र आहे. या सर्वांना नमस्कार असो. ते आमचें रक्षण करोत व आम्हांला सुख देवोत. ज्याचा आम्ही द्वेष करतों व जो आमचा द्वेष करतो त्याला आम्ही संयद्वसुप्रभृतीच्या दाढेंत स्थापन करतों ॥ १८ ॥

अयमुपर्यर्वाग्वसुस्तस्य सेनजिच्च सुषेणश्च सेनानीग्रामण्यौ । उर्वशी च पूर्वचित्तिश्चाप्सरसावव्स्फूर्जन्हेतिर्विद्युत्प्रहेतिस्तेभ्यो नमोऽअस्तु ते

नोऽवन्तु ते नो मृडयन्तु ते वं द्विष्मो यश्च नो द्वेष्टि तमेषां जम्भे दध्मः ॥ १९ ॥

अर्थ—अर्वाग्वसु–अधोभागीं जलवृष्टि करणारा पर्जन्य, सेनजित्–पर्जन्याची सेना जिंकणारा, सुषेण–ज्याची सेना उत्तम आहे असा (हे हेमन्तऋतूचे अवयव), उर्वशी-विशेषेंकरून वश करणारी, पूर्वचित्ति–प्रथमच पुरुषाचें मन हरण करणारी, स्फूर्जन्–मेघाचा शब्द हा ऊर्ध्वदेशावर राहणारा अर्वाग्वसुनामक अग्नि आहे. सेनजित् हा त्याचा सेनापति व सुषेण हा त्याचा ग्रामनायक आहे. ऊर्वशी व पूर्वचित्ति या त्याच्या परिचारिका अप्सरा आहेत, मेघाचा शब्द हें त्याचें शस्त्र व वीज हें त्याचें उत्कृष्ट शस्त्र आहे. या सर्वांना नमस्कार असो. ते आमचें रक्षण करोत व आम्हांला सुख देवोत. ज्याचा आम्ही द्वेष करतों व जो आमचा द्वेष करतो त्याला आम्ही अर्वाग्वसु-प्रभृतीच्या दाढेंत स्थापन करतों ॥ १९ ॥

विनियोग—' अग्निर्मूर्धा ' इत्यादि मंत्रांनीं छन्दस्यासंज्ञक इष्टकांचें स्थापन करावें.

अग्निर्मूर्धा दिवः ककुत्पतिः÷ पृथिव्याऽअयम् । अपाꣳ रेताꣳसि जिन्वति ॥ २० ॥

अर्थ—हा अग्नि द्युलोकांतून पडणाऱ्या जलांचे व्रीहियवादिरूपी सारभाग वाढवितो. तो अग्नि द्युलोकाचें मस्तक व वशिंड असून पृथ्वीचा पालक आहे. ॥ २० ॥

अयमग्निꣳ सहस्रिणो वाजस्य शतिनस्पतिः÷ । मूर्धा कवी रय्ीणाम् ॥ २१ ॥

अर्थ—सहस्र व शतसंख्याक अन्नाचा स्वामी व विद्वान् आणि सर्व धनांत श्रेष्ठ जो अग्नि त्याची मी स्तुति करतों ॥ २१ ॥

त्वामग्ने पुष्करादध्यथर्वा निरमन्थत । मूर्ध्नो विश्वस्य वाघतः÷ ॥ २२ ॥

अर्थ—हे अग्ने, अथर्वऋषीनें उदकापासून तुझें मंथन केलें, व सर्व जगांतील ऋत्विजांनीं अरणींतून तुझें मंथन केलें ॥ २२ ॥

विनियोग—' भुवोयज्ञस्य' इत्यादि तीन ऋचांनीं त्रिष्टुप्संज्ञक इष्टकांचें स्थापन करावें.

धुवो यज्ञस्य रजसश्च नेता यत्रा नियुद्भिः सचसे शिवाभिः÷। दिवि मूर्धानं दधिषे स्वर्षां जिह्वामग्ने चकृषे हव्यवाहम् ॥ २३ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं ज्यावेळीं हविर्द्रव्याचें वहन करणारी ज्वाला पसरतोस त्यावेळीं द्रव्यदेवतायुक्त यागाचा व यज्ञपरिणामरूपी उदकाला नेतोस. त्या स्थानामध्यें मंगलरूपी अश्वांनीं व अश्वस्त्रियांनीं तूं युक्त होतोस व द्युलोकांत स्वर्ग देणाऱ्या सूर्याला धारण करतोस. ज्या तुझें हें सर्व कृत्य आहे त्या तुला इष्टकेच्या रूपानें मी स्थापन करतों ॥ २३ ॥

अबोध्यग्निः समिधा जनानां प्रति धेनुमिवायतीमुषासम्। यह्वाइव प्र वयामुज्जिहानाः प्र भानवः÷ सिस्रते नाकमच्छ ॥ २४ ॥

अर्थ—गाय आली म्हणजे वत्स जागृत होतें, सकाळ झाली म्हणजे लोक जागे होतात त्याप्रमाणें अग्निहोत्रीलोकांनीं प्रदीप्त केल्यामुळें अग्नि जागृत होतो. तसेंच पंख फुटलेले पक्षी वृक्षशाखेकडे जात असतां आकाशांत पसरतात त्याप्रमाणें अग्नीचे किरण स्वर्गाकडे पसरतात ॥ २४ ॥

अवोचाम कवये मेध्याय वचो वन्दारु वृषभाय वृष्णे। गविष्ठिरो नमसा स्तोममग्नौ दिवीव रुक्ममुरुव्यञ्चमश्रेत् ॥ २५ ॥

अर्थ—(उद्गाते म्हणतात) आम्ही भूतवस्तुदर्शी अग्नीची वन्दनयुक्त स्तुति केली. तो अग्नि यज्ञार्ह, तरुण व कामनांची वृष्टि करणारा असा आहे. अस्खलित वाणी बोलणारा होता. याज्यानुवाक्या अस्खलित वाणीनें उच्चारून द्युलोकांत प्रकाशमान व विशेषस्तुतियुक्त आदित्याप्रमाणें अग्नीशीं हविर्द्रव्य संबद्ध करतो ॥ २५ ॥

विनियोग—' अयमिह ' या मंत्रांनीं तीन जगतीसंज्ञक इष्टका स्थापन कराव्या.

अयमिह प्रथमो धायि धातृभिर्होता यजिष्ठोऽअध्वरेष्वीड्यः÷। यमप्नवानो भृगवो विरुरुचुर्वनेषु चित्रं विभ्वं विशे-विशे ॥ २६ ॥

अर्थ—हा अग्नि प्रथम असल्यानें स्थापन करणाऱ्यांनीं याचें स्थापन केलें. हा देवांना बोलावणारा, अतिशय पूज्य, सोमादियागांत ऋत्विजांनीं स्तुति केला गेलेला असा आहे. तसेंच पुत्रवान् अशा भृगुवंशोत्पन्न मुनींनीं याला प्रत्येक यजमानाच्या कल्याणाकरितां ग्रामाचे बाहेर अरण्य-प्रदेशांत प्रदीप्त केलें. तो विविधकर्मोपयोगी असल्यानें आश्चर्यकारक व म्हणूनच व्यापक-शक्तियुक्त असा आहे ॥ २६ ॥

जनस्य गोपाऽअजनिष्ट जागृविरग्निꣳ सुदक्षꣳ सुविताय नव्यसे। घृतप्रतीको बृहता दिविस्पृशा द्युमद्विभाति भरतेभ्यꣳ शुचिꣳ॥ २७॥

अर्थ—जो अग्नि नवीन अशा यज्ञकर्माकरितां ऋत्विजांनीं मंथन करून उत्पन्न केला व तो द्युलोकास स्पर्श करणाऱ्या मोठ्या ज्वालासमूहानें प्रदीप्त केला तो अग्नि लोकांचें रक्षण करणारा, कर्मांत जागा राहणारा, अत्यंत उत्साही, व ज्याचें मुखांत घृत होमलें जात असूनही उष्टा न होणारा पवित्र असा आहे॥ २७॥

त्वामग्नेऽअङ्गिरसो गुहा हितमन्वविन्दञ्छ्रिश्रियाणं वने-वने। स जायसे मथ्यमानꣳ सहो महत्त्वामाहुꣳ सहसस्पुत्रमङ्गिरꣳ॥ २८॥

अर्थ—हे अग्ने, अंगिरोवंशांतील ऋषि गूढ प्रदेशांत राहणाऱ्या (पाण्यांत असलेला) व निरनिराळ्या वनस्पतीचा आश्रय करून राहणाऱ्या अशा तुला शोधून काढते झाले. असा तूं अरणींतून उत्पन्न होतोस. मोठ्या जोरानें तुझें मंथन करतात म्हणून हे अङ्गिरो अग्ने, तुला बलाचा पुत्र म्हणतात॥ २८॥

विनियोग—'सखायः सम्' इत्यादि तीन ऋचांनीं तीन अनुष्टुप्संज्ञक इष्टका स्थापन कराव्या.

सखायꣳ सं वः सम्यञ्चमिषꣳ स्तोमं चाग्नये। वर्षिष्ठाय क्षितीनामूर्जो नप्त्रे सहस्वते॥ २९॥

अर्थ—यजमान ऋत्विजांना म्हणतो—हे ऋत्विजांनो, तुम्ही अग्नीकरितां उत्तम हविरूपी अन्न व त्रिवृत् पंचदशादि स्तोमाचें संपादन करावें. तूं सर्व मनुष्यांत अत्यंत वृद्ध आहेस व जलांचा पौत्र व बलवान् आहेस॥ २९॥

सꣳ समिधुवसे वृषभग्ने विश्वान्यर्षऽआ। इडस्पदे समिध्यसे स नो वसून्याभर॥ ३०॥

अर्थ—हे सिंचन करणाऱ्या अग्ने, तूं फलांचा स्वामी असल्यानें सर्व फलें सर्व बाजूंनीं यजमानाला देतोस. व तूं पृथ्वीच्या उत्तर वेदीस्थानावर प्रदीप्त केला जातोस. असा तूं आम्हांला द्रव्यें दे॥ ३०॥

त्वां चित्रश्रवस्तम हवन्ते विक्षु जन्तवः। शोचिष्केशं पुरुप्रियाग्ने हव्याय वोढवे॥ ३१॥

अर्थ—ज्याची कीर्ति अतिशयेंकरून आश्चर्यकारक आहे व पुष्कळ यजमानांना प्रिय अशा हे अग्ने, ऋत्विग्यजमान हविर्द्रव्य वहन करण्याकरितां ज्याच्या ज्वाला प्रदीप्त आहेत अशा तुला बोलावतात ॥ ३१ ॥

विनियोग—' एना वः ' इत्यादि तीन मंत्रांनीं बृहतीसंज्ञक तीन इष्टकांचें स्थापन करावें.

एना वोऽआग्निं नमसोर्जो नपातमाहुवे । प्रियं चेतिष्ठमरतिꣳ स्वध्वरं विश्वस्य दूतममृतम् ॥ ३२ ॥

अर्थ—हे ऋत्विग्यजमानांनो, तुमच्या या हविर्द्रव्यरूपी अन्नानें मी अग्नीला बोलावतों. तो अग्नि जलांचा पौत्र, यजमानांचा आवडता, अतिशयेंकरून चेतना उत्पन्न करणारा, सर्वदा उद्योगी व उत्तम यज्ञांनीं युक्त असा सर्व यजमानांचा दूत व अमर असा आहे ॥ ३२ ॥

विश्वस्य दूतममृतं विश्वस्य दूतममृतम् । स योजतेऽअरुषा विश्वभोजसा स दुद्रवत्स्वाहुतः ॥ ३३ ॥

अर्थ—तो अग्नि विशेषेंकरून सर्वांचे घरीं दूतकार्य करणारा व अविनाशी आहे. उत्तम प्रकारे बोलविला जाणारा तो अग्नि रोषरहित व सर्वभक्षक घोडे रथाला जोडतो व जातो ॥ ३३ ॥

स दुद्रवत् स्वाहुतꣳ स दुद्रवत् स्वाहुतꣳ । सुब्रह्मा यज्ञꣳ सुशर्मा वसूनां देवꣳ राधो जनानाम् ॥ ३४ ॥

अर्थ—तोच अग्नि रथावर बसून उत्तम प्रकारे बोलावला जाणारा असा होत्साता जेथें वसुरुद्रादित्ययुक्त सवनत्रयविशिष्ट यज्ञ होतो व जेथें यजमानांचें हविरूपी धन आहे व जेथें उत्तम कर्में होतात व जेथें चांगला ब्रह्मा आहे तेथें (यज्ञांत) जातो ॥३४॥

विनियोग—' अग्ने वाजस्य ' इत्यादि तीन मंत्रांनीं उष्णिक्संज्ञक तीन इष्टका स्थापन कराव्या.

अग्ने वाजस्य गोमतऽईशानꣳ सहसो यहो । अस्मे धेहि जातवेदो महि श्रवः ॥ ३५ ॥

अर्थ—हे बलपुत्र अग्ने, हे प्रज्ञावन्, आम्हांला पुष्कळ द्रव्य दे. तूं धेनुयुक्त अन्नाचा अधिपति आहेस. ॥ ३५ ॥

सऽइधानो वसुष्कविरग्निरीडेन्यो गिरा । रेवदस्मभ्यं पुर्वणीक दीदिहि ॥ ३६ ॥

अर्थ—हे बहुमुखाचे अग्ने आमच्याकरितां धन देणारा होत्साता प्रदीप्त हो. तूं दीप्यमान, निवासहेतु, भूतदर्शी, यज्ञाचा प्रथम प्रवर्तक व वेदत्रयात्मक वाणीनें स्तुत्य आहेस. ॥ ३६ ॥

क्षपो राजन्नुत त्मनाग्ने वस्तोरुतोषसः÷ । स तिग्मजम्भ रक्षसो दह प्रति ॥ ३७ ॥

अर्थ—हे प्रकाशमान, तीक्ष्णदंष्ट्र अग्ने, परस्परसंबंधीं व उषःकालसंबंधीं प्रत्येक राक्षसाला तूं जाळ. तूं स्वभावतःच राक्षसांचा नाशक आहेस ॥ ३७ ॥

विनियोग—'भद्रोनः' इत्यादि तीन मंत्रांनीं ककुप्संज्ञक तीन इष्टकांचें स्थापन करावें.

भद्रो नोऽअग्निराहुतो भद्रा रातिः सुभग भद्रोऽअध्वरः । भद्राऽउत प्रशस्तयः ॥ ३८ ॥

अर्थ—हे सर्वैश्वर्ययुक्त चैत्य अग्ने, ऋत्विजांनीं बोलावलेला अग्नि आमचें कल्याण करणारा होवो. तुझें दान, यज्ञ तशाच प्रशस्त कीर्तीही कल्याणकारक होवोत. ॥३८॥

भद्राऽउत प्रशस्तयो भद्रं मनः कृणुष्व वृत्रतूर्ये । येना समत्सु सासहः÷ ॥ ३९ ॥

अर्थ—हे अग्ने, ज्या मनानें तूं संग्रामांत शत्रू जिंकतोस तें तुझें मन आमच्या पापांचा नाश व कल्याण करो ॥ ३९ ॥

येना समत्सु सासहोऽव स्थिरा तनुहि भूरि शर्धताम् । वनेमा ते अभिष्टिभिः ॥ ४० ॥

अर्थ—हे अग्ने, ज्या मनानें तूं संग्रामांत शत्रू जिंकतोस तें तुझें मन बलवंतांचीं धनुष्यें रज्जुरहित करो व तुझ्या मार्गांनीं आम्ही उपभोग्य वस्तूंचें सेवन करूं ॥४०॥

विनियोग—' अग्निं तम् ' इत्यादि तीन मंत्रांनीं पंक्तिसंज्ञक तीन इष्टकांचें स्थापन करावें.

अग्निं तं मन्ये यो वसुरस्तं यं यन्ति धेनवः ÷ । अस्तमर्वन्तऽआशवोऽस्तं नित्यासो वाजिनऽइषꣳ स्तोतृभ्यऽआभर ॥ ४१ ॥

अर्थ—निवास करविणारा जो अग्नि त्याला मी पुढील प्रकारेंकरून ओळखतों. त्याचें उद्धरण झालें कीं हा आपला दोहनकाल आहे असें समजून गाई घरीं येतात. व शीघ्रगामी अश्वही अग्नीला पाहून यजमानाचे घरीं येतात. सर्वकाल राहणारे बलवान् व सिंधु देशांतील घोडे ज्याला पाहून यजमानाचे घरीं येतात अशा हे अग्ने, स्तुति करणाऱ्या यजमानांना अन्न दे. ॥ ४१ ॥

सोऽअग्निर्यो वसुर्गृणे सं यमायन्ति धेनवः ÷ । समर्वन्तो रघुद्रुवः सꣳ सुजातासः ÷ सूरयऽइषꣳ स्तोतृभ्यऽआभर ॥ ४२ ॥

अर्थ—जो अग्नि निवास करविणारा आहे त्याची मी स्तुति करतों. ज्या अग्नीकडे धेनु व क्षिप्रगामी घोडे येतात व विद्वान्, उत्तम कुलांत जन्मलेले ऋत्विज् ज्याचें सेवन करतात अशा हे अग्ने, तूं स्तुति करणाऱ्या यजमानांना अन्न दे. ॥ ४२ ॥

उभे सुश्चन्द्र सर्पिषो दर्वी श्रीणीषऽआसनि । उतो नऽउत्पुपूर्याऽउक्थेषु शवसस्पतऽइषꣳ स्तोतृभ्यऽआभर ॥ ४३ ॥

अर्थ—हे सुवर्णोत्पादक अग्ने, तूं घृतपानाकरितां दर्वीच्या आकाराचे दोन हात तोंडांत स्थापन करतोस आणखी हे बलाधिपते, शस्त्रयुक्त यज्ञामध्यें धन देऊन आमचा उत्कर्ष कर व स्तोत्यांना अन्न दे. ॥ ४३ ॥

विनियोग—' अग्ने तम् ' इत्यादि तीन मंत्रांनीं पदपंक्तिसंज्ञक तीन इष्टका स्थापन कराव्या.

अग्ने तमद्याश्वं न स्तोमैः क्रतुं न भद्रꣳ हृदिस्पृशम् । ऋध्यामा तऽओहैः ÷ ॥ ४४ ॥

अर्थ—हे अग्ने, ज्याप्रमाणें ब्राह्मण स्तुति करून अश्वमेधांतील घोड्याला व तसेंच ते अत्यंत आवडत्या अशा आपल्या कल्याणकारक संकल्पाला पूर्ण करतात त्याप्रमाणें फलदायी अशा सामसमुदायांनीं तुझ्या यज्ञाला आज आम्हीं समृद्ध करावें ॥ ४४ ॥

अधा ह्यग्ने क्रतोर्भद्रस्य दक्षस्य साधोः । रथीर्ऋतस्य बृहतो बभूथ ॥ ४५ ॥

अर्थ—हे अग्ने, सारथी यज्ञ चालवितो त्याप्रमाणें तूं आमच्या यज्ञाला नंतर संपन्न कर. तो यज्ञ कल्याणरूपी, समृद्ध, उत्तम रीतीनें सिद्ध होणारा, अमोघफलाचा व प्रौढ असा आहे ॥ ४५ ॥

प्रभिर्नोऽअर्कैर्भवा नोऽअर्वाङ् स्वर्ण ज्योतिः । अग्ने विश्वेभिः सुमनाऽअनीकैः ॥ ४६ ॥

अर्थ—ज्याप्रमाणें स्तुति केलेलें आदित्यरूपी तेज प्राण्यांच्या सन्मुख येतें त्याप्रमाणें पूज्य अशा मंत्रांनीं तूं प्रसन्न होऊन सर्व मुखांनीं आमच्या सन्मुख होऊन आमच्यावर अनुग्रह कर. ॥ ४६ ॥

विनियोग—'अग्निꣳ होतारम्' या मंत्रानें अतिछन्दस् संज्ञक इष्टकेचें स्थापन करावें.

अग्निꣳ होतारं मन्ये दास्वन्तं वसुꣳ सूनुꣳ सहसो जातवेदसं विप्रं न जातवेदसम् । यऽऊर्ध्वया स्वध्वरो देवो देवाच्या कृपा । घृतस्य विभ्राष्टि-मनुवष्टि शोचिषाजुह्वानस्य सर्पिषः ॥ ४७ ॥

अर्थ—दानादिगुणयुक्त असा जो अग्नि देवाकडे जाण्यास समर्थ अशा आपल्या उंच ज्वालेनें सर्वत्र पसरणाऱ्या व होमल्या जाणाऱ्या घृताच्या पडणाऱ्या थेंबाची वाट पाहतो तो अग्नि पुढील गुणांनीं विशिष्ट आहे असें मी समजतों. तो देवांना बोलावणारा, दाता, चांगले यज्ञ करणारा, निवास करविणारा, बलानें मंथन केल्यामुळें उत्पन्न झालेला व ब्राह्मणाप्रमाणें ज्याला ज्ञान प्राप्त झालें असा आहे ॥ ४७ ॥

विनियोग—'अग्नेत्वं नो' इत्यादि तीन मंत्रभागांनीं द्विपदासंज्ञक तीन इष्टकांचें स्थापन करावें.

अग्ने त्वं नोऽअन्तमऽउत त्राता शिवो भवा वरूथ्यः । वसुरग्निर्वसु-श्रवाऽअच्छा नक्षि द्युमत्तमꣳ रयिन्दाः । तं त्वा शोचिष्ठ दीदिवः सुम्नाय नूनमीमहे सखिभ्यः ॥ ४८ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं सर्वदा आमच्याजवळ राहून आमचें पालन कर व कल्याण कर व आमच्या पुत्रादि समुदायांचें हित कर. तूं लोकांना निवास करविणारा,

क्षमशील, द्रव्यदाता म्हणून प्रसिद्ध असलेला असा आहेस. हे निर्मळ अग्ने, तूं आमच्या होमशाळेंत ये व अत्यंत प्रकाशमान धन दे. हे प्रकाशमान व सर्वदीपक अग्ने, पूर्वोक्तगुणविशिष्ट अशा तुजकडे आम्ही मित्रांकरितां निश्चयात्मक सुख मागतों ॥ ४८ ॥

विनियोग—'येन' इत्यादि आठ ऋचांनीं पुनः चिति करावी म्हणजे इष्टका-स्थापन करावें.

येनऽऋषयस्तपसा सत्रमायन्निन्धानाऽअग्निꣳ स्वराभरन्तऽ। तस्मिन्नहं निदधे नाकेऽअग्निं यमाहुर्मनव स्तीर्णबर्हिषम् ॥ ४९ ॥

अर्थ—मुनि एकाग्र अन्तःकरणानें यज्ञ करण्यास तयार झाले ते अग्नि प्रदीप्त करणारे, स्वर्गाप्रत जाणारे असे आहेत. त्या तपाचे योगें स्वर्गलोकाचे निमित्तानें मी अग्नीचें स्थापन करतों. त्या अग्नीला मनन करणारे ऋषी ज्यांत दर्भ पसरले आहेत असा यज्ञाचा साधक समजतात ॥ ४९ ॥

तं पत्नीभिरनुगच्छेम देवाऽ पुत्रैर्भ्रातृभिरुत वा हिरण्यैऽ। नाकं गृभ्णानाऽ सुकृतस्य लोके तृतीये पृष्ठेऽअधि रोचने दिवऽ ॥ ५० ॥

अर्थ—हे प्रकाशमान ऋत्विजांनो कलत्र, पुत्र, बंधु व सुवर्ण यांसह आम्ही त्या अग्नीचें अनुगमन करतों. आम्ही प्रकाशमान व पुण्यफलभूत अशा द्युलोकांत स्वर्गाची इच्छा करणारे आहों ॥ ५० ॥

आ वाचो मध्यमरुहद्भुरण्युरयमाग्निऽ सत्पतिश्चेकितानऽ। पृष्ठे पृथिव्या निहितो दविद्युतदधस्पदं कृणुतां ये पृतन्यवः ॥ ५१ ॥

अर्थ—ज्या अग्नीनें चयनस्थानावर आरोहण केलें तो अग्नि युद्धेच्छु पापी लोकांना पायाखालीं चिरडून टाको. तो अग्नि जगाचा पोषक, साधूंचा पालक, ज्ञान देणारा, अतिशय प्रकाशणारा व पृथ्वीवर स्थापन केलेला असा आहे ॥ ५१ ॥

अयमग्निर्वीरतमो वयोधाऽ सहस्रियो योततामप्रयुच्छन्। विभ्राजमानऽ सरिरस्य मध्यऽउपप्रयाहि दिव्यानि धाम ॥ ५२ ॥

अर्थ—हा अग्नि प्रकाशित होवो व दिव्यस्थानांना जावो. तो अतिशय पराक्रमी, हविर्द्रव्य धारण करणारा, हजार इष्टकांनीं मोजला गेलेला, कर्मांत न चुकतां तीनही लोकांत प्रकाशमान असा आहे ॥ ५२ ॥

सम्प्रच्यवध्वमुप सम्प्रयाताग्ने पथो देवयानान् कृणुध्वम् । पुनः कृण्वाना पितरा युवानान्वातांश्च सीत् त्वयि तन्तुमेतत् ॥ ५३ ॥

अर्थ—हे ऋषींनी, या अग्नीजवळ येऊन त्याला उत्तम रीतीनें प्राप्त व्हा. हे अग्ने, तूं देवलोक प्राप्त करून देणारे मार्ग दे. कारण या ऋषींनीं हा यज्ञ केला आहे ते ऋषि वाणी व मनांना तरुण व नियमित करणारे आहेत म्हणजे जितेंद्रिय आहेत ॥ ५३ ॥

उद्बुध्यस्वाग्ने प्रतिजागृहि त्वमिष्टापूर्ते सꣳसृजेथामयं च । अस्मिन्त्सधस्थेऽअध्युत्तरस्मिन् विश्वे देवा यजमानश्च सीदत ॥ ५४ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं सावधान हो व या यजमानाला रोज सावध कर. नंतर इष्टापूर्त कर्मे यजमानाशीं युक्त होवोत व हा यजमान इष्टापूर्त कर्मांशीं युक्त होवो. हे विश्वेदेवांनो, तुम्ही व हा इष्टापूर्तकारी यजमान देवांसह असणाऱ्या या अत्युत्कृष्ट द्युलोकांत राहो ॥ ५४ ॥

येन वहसि सहस्रं येनाग्ने सर्ववेदसम् । तेनेमं यज्ञं नो नय स्वर्देवेषु गन्तवे ॥ ५५ ॥

अर्थ—हे अग्ने, ज्या सामर्थ्यानें तूं सहस्रदक्षिणायुक्त व सर्वस्वदक्षिणायुक्त यज्ञ धारण करतोस त्याच सामर्थ्यानें आमच्या यज्ञाला देवांकडे जाण्याकरितां स्वर्गांत ने ॥ ५५ ॥

अयं ते योनिर्ऋत्वियो यतो जातोऽअरोचथाः तं जानन्नग्नऽआरोहाथा नो वर्धया रयिम् ॥ ५६ ॥

अर्थ—हे अग्ने, हें तुझें उत्पत्तिस्थान आहे. तूं सायंकालीं व प्रातःकालीं उत्पन्न होण्यास योग्य आहेस. कारण तूं गार्हपत्यांतून उत्पन्न होऊन प्रकाशित झालास. हे अग्ने, त्या आपल्या पित्याला ओळखून कर्माचे शेवटीं त्यांत प्रवेश कर व आमच्याकरतां धनवृद्धि कर ॥ ५६ ॥

विनियोग—'तपश्च तपस्यश्च' या मंत्रानें ऋतव्यसंज्ञक दोन पयेष्टकांचें स्थापन करावें.

तपश्च तपस्यश्च शैशिरावृतूऽअग्नेरन्तꣳ श्लेषोऽसि कल्पेतां द्यावापृथिवी

कल्पन्तामाप ओषधय कल्पन्तामग्नय पृथुरुग्मम् ज्यैष्ठ्याय सव्रता । येऽअग्नय समनसोऽन्तरा द्यावापृथिवीऽइमे । शैशिरावृतूऽअभिकल्पमानाऽइन्द्रमिव देवाऽअभिसंविशन्तु तया देवतयाङ्गिरस्वद्ध्रुवे सीदतम् ॥ ५७ ॥

अर्थ—माघ व फाल्गुन हे दोन्ही शिशिरऋतूसंबंधी अवयव आहेत. हे शिशिरऋतो तूं या अग्नीच्या आंत राहून जोडणारा आहेस म्हणून द्यावापृथिवींनीं अग्निचयन करणाऱ्या माझें (यजमानाचें) ज्येष्ठत्व प्राप्त करण्याकरितां योग्य उपकार करावा. जल व ओषधि आणि एकाच चयनयज्ञामध्यें कार्य करणारे निरनिराळे इष्टकारूपी अग्नि तुला ज्येष्ठत्व देण्याला समर्थ होवोत. ह्या द्यावापृथिवी व त्यांत असणारे एकचित्ताचे अग्नि तेही शिशिरऋतूंतील संपत्ति मिळवून या कर्माचा आश्रय करोत. यास दृष्टान्त—ज्याप्रमाणें देव इंद्राच्या सेवेकरतां येतात त्याप्रमाणें अन्य इष्टका शिशिरऋतूच्या सेवेकरतां येवोत. हे ऋतव्य इष्टकांनो, त्या देवतेनें स्थापित केलेल्या तुम्ही अंगिरस् ऋषीच्या यज्ञाप्रमाणे या यज्ञांत येऊन स्थिर होऊन रहा ॥ ५७ ॥

विनियोग—'परमेष्ठी त्वा' या मंत्रानें विश्वज्योतिष्संज्ञक इष्टकेचें स्थापन करावें.

परमेष्ठी त्वा सादयतु दिवस्पृष्ठे ज्योतिष्मतीम् । विश्वस्मै प्राणायापानाय व्यानाय विश्वं ज्योतिर्यच्छ । सूर्यस्तेऽधिपतिस्तया देवतयाङ्गिरस्वद् ध्रुवासीद ॥ ५८ ॥

अर्थ—हे इष्टके, परमेष्ठी सूर्यरूपी तुला द्युलोकाचे पृष्ठभागीं स्थापन करो. सर्व प्राणापानव्यानवृत्तींच्या लाभाकरितां तूं मला तेज दे. सूर्य तुझा अधिपति आहे. तुझ्या अधिष्ठात्री देवतेनें अनुगृहीत झालेली अशी तूं अंगिरोऋषीच्या यज्ञाप्रमाणें या यज्ञांत स्थिर होऊन रहा ॥ ५८ ॥

विनियोग—'लोकं पृण,' इत्यादि मंत्रांनीं लोकंपृणसंज्ञक इष्टकांचें स्थापन करावें.

लोकं पृण छिद्रं पृणाथो सीद ध्रुवा त्वम् । इन्द्राग्नी त्वा बृहस्पतिरस्मिन् योनावसीषदन् ॥ ५९ ॥

अर्थ—हे लोकंपृणेष्टके तूं गार्हपत्यचयनस्थानीं रिकाम्या असलेल्या जागीं स्थित हो व चिकटून बैस. छिद्र दिसणार नाहीं अशा रीतीनें चिकटून बैस व दृढ रहा. इंद्र, अग्नि आणि बृहस्पति यांनीं तुला या स्थानीं स्थापन केलें ॥ ५९ ॥

ताऽअस्य सूददोहसऽसु सोमꣳ श्रीणन्ति पृश्नयऽ। जन्मन्देवानां विशः खिष्वारोचने दिवः ॥ ६० ॥

अर्थ—द्युलोकसंबंधी नाना प्रकारचीं अन्नें व जलें प्रत्येक वर्षी तीनही सवनांमध्यें या यज्ञांतील सोमाला शिजवितात. ॥ ६० ॥

इन्द्रं विश्वाऽअवीवृधन्त्समुद्रव्यचसं गिरः÷। रथीतमꣳ रथीनां वाजानाꣳ सत्पतिं पतिम् ॥ ६१ ॥

अर्थ—ऋग्यजुःसामरूपी सर्व स्तुति इंद्राला वाढवितात. तो इंद्र समुद्राप्रमाणें व्यापक, विविधगतिमान्, सर्व रथींत श्रेष्ठ, अन्नस्वामी व धर्मनिष्ठ लोकांचा पालक आहे ॥ ६१ ॥

विनियोग—'प्रोथदश्वः' इत्यादि मंत्रानें विकर्णीसंज्ञक इष्टकेचें स्थापन करावें.

प्रोथदश्वो न यवसेऽविष्यन्यदा महः संवरणाद्व्यस्थात्। आदस्य वातोऽअनुवाति शोचिरध स्म ते व्रजनं कृष्णमस्ति ॥ ६२ ॥

अर्थ—पुढील वाक्य मथ्यमान अग्नीला म्हटलें आहे. गवत खाण्याचे पूर्वी घोडा खिंकाळतो त्याप्रमाणें अग्नि अरणिकाष्ठांतून निघतो त्यावेळीं शब्द करतो. अग्नीनें प्रज्वलनाचा शब्द केल्यानंतर त्या धोरणानें तो वायुही पसरतो. तो वायु अग्नीचा प्रदीपक आहे. नंतर वायूनें अग्नि प्रदीप्त केल्यावर त्याचें गमनस्थान कृष्णवर्णाचें होतें ॥ ६२ ॥

विनियोग—'आयोष्ट्वा' या मंत्रानें स्वयमातृण्णासंज्ञक इष्टकेचें स्थापन करावें.

आयोष्ट्वा सदने सादयाम्यवतश्छायायाꣳ समुद्रस्य हृदये। रश्मीवतीं भास्वतीमा या यां भास्यापृथिवीमोर्वन्तरिक्षम् ॥ ६३ ॥

अर्थ—हे स्वयमातृण्णे, मी सूर्याच्या आश्रयभूत व प्रधान अशा स्थानीं तुझें स्थापन करतो. तो सूर्य जगाचें पालन करणारा, वृष्टीच्या योगें सर्व जग भिजविणारा असा आहे. हे इष्टके, तूं द्युलोक, पृथ्वीलोक व विस्तीर्ण अशा अन्तरिक्ष लोकांस प्रकाशित करतेस, अशा किरणयुक्त म्हणून शोभणाऱ्या तुला मी स्थापन करतों ॥ ६३ ॥

परमेष्ठी त्वा सादयतु दिवस्पृष्ठे व्यचस्वतीं प्रथस्वतीं दिवं यच्छ दिवं दृꣳह दिवं मा हिꣳसीः। विश्वस्मै प्राणायापानाय व्यानायोदानाय

प्रतिष्ठायै चरित्राय । सूर्यस्त्वाभिपातु महत्वा स्वस्त्या छर्दिषा शन्तमेन तया देवतयाङ्गिरस्वद् ध्रुवे सीदतम् ॥ ६४ ॥

अर्थ—हे इष्टके, परमेष्ठी अंतरिक्षाच्या पृष्ठभागीं तुझें स्थापन करो. तूं अभिव्यक्तियुक्त व विस्तारयुक्त आहेस. तूं अंतरिक्षाचें नियमन कर व त्याला दृढ कर. सर्व प्राणादिकांची वृत्ति, स्वगृहस्थिति व शास्त्रीय आचरण यांकरितां त्या अंतरिक्षाची हिंसा करूं नकोस. मोठ्या योगक्षेमकर, अत्यंत शुभकारी तेजोविशेषानें सूर्य तुझें सर्व बाजूनें रक्षण करो. अंगिरोऋषींच्या यज्ञाप्रमाणें या यज्ञांत तुझ्या अधिष्ठात्री देवतेच्या अनुग्रहानें तूं स्थिर हो. ॥ ६४ ॥

विनियोग—'सहस्रस्य' इत्यादि प्रत्येक मंत्रानें इष्टकाचित पक्षपुच्छसहित अग्नीच्या पश्चात् व उत्तर, पूर्व, दक्षिण आणि पश्चिम अशा पांच ठिकाणीं उभे राहून सोदक दोनशें दोनशें वेळां प्रकिरण करावें म्हणजे पसरावें व जलसिंचन करावें.

सहस्रस्य प्रमासि सहस्रस्य प्रतिमासि सहस्रस्योन्मासि साहस्रोऽसि सहस्राय त्वा ॥ ६५ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं सहस्र इष्टकांचें प्रमाण आहेस व तूं सहस्र इष्टकांचा प्रतिनिधि आहेस. तूं हजार इष्टकांची तुला आहेस व तूं सहस्र इष्टकांना योग्य आहेस म्हणून अनन्त फलप्राप्तीकरितां तुझें मी प्रोक्षण करतों ॥ ६५ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**

माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** पञ्चदशोऽध्यायः समाप्तः॥१५॥

इति पञ्चदशोऽध्यायः समाप्तः ।



अथ षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

विनियोग--पंधराव्या अध्यायांत चयनाचे मंत्र संपविले. या सोळाव्या अध्यायांत शतरुद्रियसंज्ञक होमाचे मंत्र सागतात.

नमस्ते रुद्र मन्यवऽउतो तऽइषवे नमः÷। बाहुभ्यामुत ते नमः÷॥ १॥

अर्थ—हे दुःखनाशका रुद्रा, तुझ्या क्रोधाला, बाणांना व हस्तांना नमस्कार असो ॥ १ ॥

या ते रुद्र शिवा तनूरघोरापापकाशिनी। तया नस्तन्वा शन्तमया गिरिशन्ताभिचाकशीहि ॥ २ ॥

अर्थ--कैलासावर राहून जगाचें कल्याण करणाऱ्या हे रुद्रा, जें तुझें मंगलप्रद, सौम्य, केवल पुण्यप्रकाशक शरीर त्या अनंत सुखकारक शरीरानें आमच्याकडे अवलोकन कर (आमचें रक्षण कर) ॥ २ ॥

यामिषुं गिरिशन्त हस्ते बिभर्ष्यस्तवे। शिवां गिरित्र तां कुरु मा हिꣳसीः पुरुषं जगत् ॥ ३ ॥

अर्थ--कैलासावर राहून जगाचें कल्याण करणाऱ्या, तसेंच मेघांत राहून वृष्टिरूपानें जगाचें रक्षण करणाऱ्या व सर्वज्ञ रुद्रा, शत्रुनाशाकरितां जो बाण तूं हातांत धारण करतोस तो सर्वांचें कल्याण करणारा कर व जंगम जे पुत्रपौत्रादिक आणि गो, अश्व वगैरे यांचा नाश करूं नकोस ॥ ३ ॥

शिवेन वचसा त्वा गिरिशाच्छा वदामसि। यथा नः सर्वमिज्जगदयक्ष्मꣳ सुमनाऽअसत् ॥ ४ ॥

अर्थ—हे कैलासस्थित रुद्रा, तुजप्रत आम्ही प्राप्त होण्याकरितां तुझी स्तुति करतों व तुला असें सांगतों कीं, आमचें जंगम जे पुत्रपौत्रादि व गो, अश्व वगैरे ते निरोगी व चांगल्या मनाचे होतील असें कर ॥ ४ ॥

अध्यवोचदधिवक्ता प्रथमो दैव्यो भिषक्। अहीꣳश्च सर्वाञ्जम्भयन्त्सर्वाश्च यातुधान्योऽधराचीः परासुव ॥ ५ ॥

अर्थ—सर्वश्रेष्ठत्व देण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा, सर्वश्रेष्ठ, देवहितकारी, रोगनाशक रुद्र मला सर्वश्रेष्ठत्व देवो. हे रुद्रा, सर्व सर्पव्याघ्रादिकांचा नाश करून अधोगमन करणाऱ्या राक्षसींना आमच्यापासून दूर कर ॥ ५ ॥

असौ यस्ताम्रोऽअरुणऽउत बभ्रुः सुमङ्गलः । येचैनꣳ रुद्राऽअभितो दिक्षु श्रिताः सहस्रशोऽवैषाꣳ हेडऽईमहे ॥ ६ ॥

अर्थ—उदयसमयीं व अस्तसमयीं रक्तवर्णाचा व इतर वेळीं पिंगट वर्णाचा व सर्वमंगलप्रद रविरूपी रुद्र आहे त्याचा दहा दिशांत असलेले हजारों रुद्र आश्रय करते झाले. त्यांचा आमच्यावर असलेला क्रोध आम्ही (भक्तीनें) दूर करतों. ॥ ६ ॥

असौ योऽवसर्पति नीलग्रीवो विलोहितः । उतैनं गोपाऽअदृश्रन्नदृश्रन्नुदहार्युः स दृष्टो मृडयाति नः ॥ ७ ॥

अर्थ—ज्याला अज्ञानी असे गोप व पाणी भरणाऱ्या मोलकरणी बाया हीं प्रत्यक्ष पाहूं शकतात, विषधारणामुळें ज्याचा कंठ नीळ वर्णाचा झालेला आहे व विशेषेंकरून रक्तवर्णाचा होऊन जो नेहमीं उदय व अस्त पावून सर्वदा गमन करतो तो सूर्यमण्डलस्थ रुद्र आम्हांला सुख देवो ॥ ७ ॥

नमोऽस्तु नीलग्रीवाय सहस्राक्षाय मीढुषे । अथो येऽअस्य सत्वानोऽहं तेभ्योऽकरं नमः ॥ ८ ॥

अर्थ—नीलकण्ठ, सहस्रनेत्र इन्द्ररूपी व वृष्टि करणाऱ्या रुद्राला माझा नमस्कार असो. तसेंच त्याचे जे भृत्य (सेवक) त्यांना मी नमस्कार करतों. ॥ ८ ॥

प्रमुञ्च धन्वनस्त्वमुभयोरार्त्न्योर्ज्याम् । याश्च ते हस्तऽइषवः परा ता भगवो वप ॥ ९ ॥

अर्थ—हे भगवन्, धनुष्याच्या दोन्ही टोकांत असलेल्या दोरीला तूं टाकून दे व तुझ्या हातांतील बाणही टाकून दे ॥ ९ ॥

विज्यं धनुः कपर्दिनो विशल्यो बाणवाँऽउत । अनेशन्नस्य याऽइषवऽआभुरस्य निषङ्गधिः ॥ १० ॥

अर्थ—जटाजूट धारण करणाऱ्या रुद्राचें धनुष्य मौर्वीरहित (दोरीशिवाय)

असो. तसेंच भात्यांतील बाणांचीं टोकें नाहींशी होवोत व त्याचे बाण नष्ट होवोत, व त्याचें तरवारीचें म्यान रिकामें (तलवार नसलेलें) असो ॥ १० ॥

या ते हेतिर्मीढुष्टम हस्ते बभूव ते धनुः । तयास्मान्विश्वतस्त्वमयक्ष्मया परिभुज ॥ ११ ॥

अर्थ—हे अत्यंत वृष्टि करणाऱ्या रुद्रा, तुझ्या हातांत जें धनुष्य आहे त्या दृढ अशा धनुष्यानें आमचें सर्व बाजूंनीं रक्षण कर ॥ ११ ॥

परि ते धन्वनो हेतिरस्मान्वृणक्तु विश्वतः । अथो य इषुधिस्तवारेऽअस्मिन्निधेहि तम् ॥ १२ ॥

अर्थ—हे रुद्रा, तुझें धनुष्यरूपी आयुध आमचा सर्व बाजूंनीं परिहार करो. म्हणजे आम्हांस न मारो. तसेंच तुझा बाणांचा भाता आमच्यापासून दूर ठेव ॥१२॥

अवतत्य धनुष्टवꣳ सहस्राक्ष शतेषुधे । निशीर्य शल्यानां मुखा शिवो नः सुमना भव ॥ १३ ॥

अर्थ—शंभर भाते व सहस्र नेत्र असलेल्या इंद्रा, धनुष्याची दोरी नाहींशी करून व बाणांचीं अग्रें मोडून तूं आमच्याविषयीं शांत व चांगली बुद्धि धारण करणारा असा हो ॥ १३ ॥

नमस्तऽआयुधायानातताय धृष्णवे । उभाभ्यामुत ते नमो बाहुभ्यां तव धन्वने ॥ १४ ॥

अर्थ—हे रुद्रा, शत्रु मारण्यांत ज्यास धार्ष्ट्य आहे व धनुष्यावर स्थापन न केलेल्या अशा तुझ्या बाणाला नमस्कार असो. तसेंच दोन्ही बाहूंना व धनुष्यालाही नमस्कार असो ॥ १४ ॥

मा नो महान्तमुत मा नोऽअर्भकं मा नऽउक्षन्तमुत मानऽउक्षितम् । मा नो वधीः पितरं मोत मातरं मा नः प्रियास्तन्वो रुद्र रीरिषः ॥१५॥

अर्थ—हे रुद्रा, आमच्या म्हाताऱ्या, तरुण व बालक अशा संबंधी जनांचा नाश करूं नकोस, तसेंच आमचे गर्भस्थ असे संबंधी आणि बाप, आई व आवडते पुत्र-पौत्रादि यांचाही नाश करूं नकोस ॥ १५ ॥

मा नस्तोके तनये मा न आयुषि मा नो गोषु मा नोऽअश्वेषु

रीरिषꣳ । मा नो वीरान् रुद्र भामिनो वधीर्हविष्मन्तꣳ सदमित् त्वा हवामहे ॥ १६ ॥ शतं ८०० ।

अर्थ—हे रुद्रा, आमचे पुत्रपौत्र, आयुष्य, गाई व घोडे यांचा नाश करूं नकोस. तसेंच रागीट अशाही आमच्या नोकरांचा नाश करूं नकोस. आम्ही सर्वदाच हविर्धारण करून यज्ञांत तुला बोलावतों ॥ १६ ॥

नमो हिरण्यबाहवे सेनान्ये दिशां च पतये नमो नमो वृक्षेभ्यो हरिकेशेभ्यꣳ पशूनां पतये नमो नमः शष्पिञ्जराय त्विषीमते पथीनां पतये नमो नमो हरिकेशायोपवीतिने पुष्टानां पतये नमः ॥ १७ ॥

अर्थ—ज्याचे बाहू अलंकाररूपी आहेत, सेनापति, दिक्पालक, हिरवीं पानें असलेल्या वृक्षांचें रूप धारण करणारा, जीवांचें रक्षण करणारा, बालतृणाप्रमाणें पिवळसर व रक्तवर्णाचा, कांतिमान्, मार्गाचा रक्षक, कृष्णकेश असलेला, मंगलार्थ यज्ञोपवीत धारण करणारा, सर्व गुणयुक्त नरांचा अधिपति असा जो रुद्र त्याला नमस्कार असो ॥ १७ ॥

नमो बभ्लुशाय व्याधिनेऽन्नानां पतये नमो नमो भवस्य हेत्यै जगतां पतये नमो नमो रुद्रायाततायिने क्षेत्राणां पतये नमो नमः सूतायाहन्त्यै वनानां पतये नमः ॥ १८ ॥

अर्थ—कपिलवर्ण, शत्रुनाशक, अन्नपालक, संसारनाशक, आयुधस्वरूपी, जगत्पति, आततायी, क्षेत्रपालक, हनन न करणारा, सारथीरूपी, व वनांचा पालक जो रुद्र त्याला नमस्कार असो ॥ १८ ॥

नमो रोहिताय स्थपतये वृक्षाणां पतये नमो नमो भुवन्तये वारिवस्कृतायौषधीनां पतये नमो नमो मन्त्रिणे वाणिजाय कक्षाणां पतये नमो नमोऽउच्चैर्घोषायाक्रन्दयते पत्तीनां पतये नमः ॥ १९ ॥

अर्थ—लोहितवर्णाचा, विश्वकर्मरूपानें घरांचा कर्ता, वृक्षपालक, भूमंडलविस्तारक, द्रव्योत्पादक, गांवठी व रानटी अशा औषधींचें पालन करणारा, मंत्री, व्यापारी, रानांतील गवत व झुडपें वाढविणारा, उच्च व महाशब्द करणारा, आणि पायदळ सेनेचा अधिपति असा जो रुद्र त्याला नमस्कार असो. ॥ १९ ॥

नमः÷ कृत्स्नायतया धावते सत्वनां पतये नमो नमꣳ सहमानाय निव्याधिनऽआव्याधिनीनां पतये नमो नमो निषङ्गिणे ककुभाय स्तेनानां पतये नमो नमो निचेरवे परिचरायारण्यानां पतये नमः÷ ॥ २० ॥

अर्थ—आकर्ण ओढलेले व दीर्घ धनुष्य घेऊन युद्धभूमीवर धांवत जाणारा, प्राणांचा अधिपति, शत्रूंचा पराजय करणारा व विशेषेंकरून त्यांचा नाश करणारा, शूर सेनेचा पालक, खड्ग धारण करणारा महान् असा गुप्त चोरांचा पालक, चोरीच्या व अपहाराच्या बुद्धीनें ठिकठिकाणीं हिंडणारा जो चोर तत्स्वरूपी व अरण्यांचा अधिपति जो रुद्र त्याला नमस्कार असो. ॥ २० ॥

नमो वञ्चते परिवञ्चते स्तायूनां पतये नमो नमो निषङ्गिणऽइषुधिमते तस्कराणां पतये नमो नमः÷ सृकायिभ्यो जिघाꣳसद्भ्यो मुष्णतां पतये नमो नमो सिमद्भ्यो नक्तञ्चरद्भ्यो विकृन्तानां पतये नमः÷ ॥ २१ ॥

अर्थ—एकट्याचें अथवा पुष्कळांचें द्रव्य फसवून घेणारा जो तत्स्वरूपी, न कळत दुसऱ्याचें द्रव्य हरण करणारे जे चोर तत्स्वरूपी, बाण व भाते धारण करणारा, उघड चोरी करणारे जे त्यांचा अधिपति, वज्र हस्तांत असलेले व शत्रूंचा नाश इच्छिणारे जे तत्स्वरूपी, लुटारूंचा अधिपति, खड्गधारी व रात्रीं संचार करणारांचा व दुसऱ्याचा उच्छेद करून त्याचे द्रव्याचा अपहार करणाऱ्यांचा अधिपति असा जो रुद्र त्याला नमस्कार असो. ॥ २१ ॥

नमऽउष्णीषिणे गिरिचराय कुलुञ्चानां पतये नमो नमऽइषुमद्भ्यो धन्वायिभ्यश्च वो नमो नमऽआतन्वानेभ्यः÷ प्रतिदधानेऽभ्यश्च वो नमो नमऽआयच्छद्भ्योऽस्यद्भ्योश्च वो नमः÷ ॥ २२ ॥

अर्थ—पागोटें डोक्यावर असलेला, पर्वतादिदुर्गम स्थानांत फिरणारा, बारीक सारीक चोरी करणारांचा जो अधिपति रुद्र त्याला नमस्कार असो. तसेंच बाण व धनुष्य धारण करणारे, धनुष्यावर दोरी स्थापन करणारे, (धनुष्य सज्ज करणारे) धनुष्यानें बाण संधान करणारे, धनुष्य आकर्षण करणारे, व बाण टाकणारे असे जे रुद्र त्यांना नमस्कार असो. ॥ २२ ॥

नमो विसृजद्भ्यो विध्यद्भ्यश्च वो नमो नमः÷ स्वपद्भ्यो जाग्रद्भ्यश्च वो नमो नमꣳ शयानेभ्यऽआसीनेभ्यश्च वो नमो नमस्तिष्ठद्भ्यो धावद्भ्यश्च वो नमः÷ ॥ २३ ॥

अर्थ—शत्रूंवर बाण टाकणारे, शत्रूंना वेध करणारे, स्वप्न, जागृति व सुषुप्ति अवस्था धारण करणारे, बसणारे, उठणारे व धावणारे जे रुद्र त्यांना नमस्कार असो. ॥ २३ ॥

नमः÷ सभाभ्यः÷ सभापतिभ्यश्च वो नमो नमोऽश्वेभ्योऽश्वपतिभ्यश्च वो नमो नमऽआव्याधिनीभ्यो विविध्यन्तीभ्यश्च वो नमो नमऽउगणाभ्यस्तृꣳ हतीभ्यश्च वो नमः÷ ॥ २४ ॥

अर्थ—सभा, सभापति, अश्व, अश्वपतिरूपी जे रुद्र त्यांना नमस्कार असो. सर्व बाजूंनीं व विशेषेंकरून वेध करणाऱ्या, उत्कृष्ट सेवकसमूह ज्यांना आहे अशा व वधसमर्थ अशा ब्रह्मादि देवतांना नमस्कार असो. ॥ २४ ॥

नमो गणेभ्यो गणपतिभ्यश्च वो नमो नमो व्रातेभ्यो व्रातपतिभ्यश्च वो नमो नमो गृत्सेभ्यो गृत्सपतिभ्यश्च वो नमो नमो विरूपेभ्यो विश्वरूपेभ्यश्च वो नमः÷ ॥ २५ ॥

अर्थ—भूतविशेषसंघ, देवानुचर समुदायांचे पालक, निरनिराळ्या जातीचे पालक, बुद्धिमान् व त्यांचे पालक, विकृत स्वरूपांचे व अश्वमुख वगैरे निरनिराळ्या रूपांचे जे रुद्र त्यांना नमस्कार असो. ॥ २५ ॥

नमस्तृꣳ सेनाभ्यस्तृꣳ सेनानिभ्यश्च वो नमो नमो रथिभ्योऽरथेभ्यश्च वो नमो नमः÷ क्षत्तृभ्यः÷ संग्रहीतृभ्यश्च वो नमो नमो महद्भ्योऽअर्भकेभ्यश्च वो नमः÷ ॥ २६ ॥

अर्थ—सेनारूपी, सेनापतिरूपी, रथांतून जाणारे व रथांतून न जाणारे, रथांचे स्वामी व सारथि, उत्तम जातिगुणविशिष्ट व अल्प प्रमाणाचे जे रुद्र त्यांना नमस्कर असो. ॥ २६ ॥

नमस्तक्षभ्यो रथकारेभ्यश्च वो नमो नमस्तृꣳ कुलालेभ्यस्तृꣳ कर्मारेभ्यश्च वो नमो नमो निषादेभ्यः÷ पुञ्जिष्टेभ्यश्च वो नमो नमः÷ श्वनिभ्यो मृगयुभ्यश्च वो नमः÷ ॥ २७ ॥

अर्थ—सुतारकाम करणारे, रथ बनविणारे, कुंभार, लोहार, भील, कोळी, अंत्यज वगैरे कुत्र्यांच्या गळ्यांत बांधलेली दोरी धारण करणारे व पारधी एतत्स्वरूपी जे रुद्र त्यांना नमस्कार असो. ॥ २७ ॥

नमः श्वभ्यः श्वपतिभ्यश्च वो नमो नमो भवाय च रुद्राय च नमः शर्वाय च पशुपतये च नमो नीलग्रीवाय च शितिकण्ठाय च ॥ २८ ॥

अर्थ—कुत्रे व त्यांचे पालन करणारे जे रुद्र त्यांना नमस्कार असो. सर्व प्राण्यांचा उत्पादक, दुःखनाशक, पाप दूर करणारा, अज्ञांचें पालन करणारा, विषभक्षणानें ज्याचे कण्ठाचा कांहीं भाग काळा झाला आहे व त्याच कंठाचा कांहीं भाग पांढरा आहे ज्याचा, अशा रुद्राला नमस्कार असो. ॥ २८ ॥

नमः कपर्दिने च व्युप्तकेशाय च नमः सहस्राक्षाय च शतधन्वने च नमो गिरिशायाय च शिपिविष्टाय च नमो मीढुष्टमाय चेषुमते च ॥ २९ ॥

अर्थ—जटा धारण करणारा, ज्याचे केशांचें मुंडन झालें आहे असा, हजार डोळे व शंभर धनुष्यें धारण करणारा, कैलासावर राहणारा, सर्व प्राण्यांचीं शरीरें व्यापून राहणारा, अत्यंत वृष्टि करणारा व बाण जवळ असलेला जो रुद्र त्याला नमस्कार असो. ॥ २९ ॥

नमो ह्रस्वाय च वामनाय च नमो बृहते च वर्षीयसे च नमो वृद्धाय च संवृधे च नमोऽग्र्याय च प्रथमाय च ॥ ३० ॥

अर्थ—लहान, ठेंगू, मोठा अधिक वयाचा, विद्याविनयादिगुणविशिष्ट अशा वृद्धाबरोबर राहणारा, सर्वांत श्रेष्ठ व प्रथम असा जो रुद्र त्याला नमस्कार असो. ॥ ३० ॥

नमऽआशवे चाजिराय च नमः शीघ्र्याय च शीभ्याय च नमऽऊर्म्याय चावस्वन्याय च नमो नादेयाय च द्वीप्याय च ॥ ३१ ॥

अर्थ—सर्वव्यापी, गतिशील, शीघ्रवस्तूंत राहणारा, जलप्रवाहांत राहणारा लाटांत असलेला, स्थिर अशा जलांत किंवा खड्ड्यांतील जलांत, नदींत व बेटांत राहणारा जो रुद्र त्याला नमस्कार असो. ॥ ३१ ॥

नमो ज्येष्ठाय च कनिष्ठाय च नमः पूर्वजाय चापरजाय च नमो मध्यमाय चापगल्भाय च नमो जघन्याय च बुध्न्याय च ॥ ३२ ॥

अर्थ—सर्वांत वडील व सर्वांत धाकटा, जगाचे आरंभीं उत्पन्न झालेला, प्रलय-

कालीं व मध्यभागीं असलेला, अज्ञानी, गाई वगैरेच्या जघन भागांतून उत्पन्न झालेला व झाडाचे बुंध्यांतून उत्पन्न झालेला जो रुद्र त्याला नमस्कार असो. ॥ ३२ ॥

नमश्च सोभ्याय च प्रतिसर्याय च नमो याम्याय च क्षेम्याय च नमश्च श्लोक्याय चावसान्याय च नमऽउर्व्वर्य्याय च खल्याय च ॥ ३३ ॥

अर्थ—गंधर्व नगरांत व अभिचार कर्मांत उत्पन्न झालेला, नरकपीडा करणारा, कुशलकर्मांत व वैदिकमंत्रांत असणारा, वेदांतांत आढळणारा, भूमींत धान्यरूपानें उत्पन्न होणारा व खळ्यांत असलेला जो रुद्र त्याला नमस्कार असो. ॥ ३३ ॥

नमो वन्याय च कक्ष्याय च नमः÷ श्रवाय च प्रतिश्रवाय च नमऽआशुषेणाय चाशुरथाय च नमश्च शूराय चावभेदिने च ॥ ३४॥

अर्थ—वनांत व झुडपांत असणारा, ध्वनि व प्रतिध्वनिस्वरूपी, ज्याची सेना व रथ शीघ्रगामी आहे, शूर व शत्रुनाशक जो रुद्र त्याला नमस्कार असो. ॥३४॥

नमो बिल्मिने च कवचिने च नमो वर्मिणे च वरूथिने च नमः÷ श्रुताय च श्रुतसेनाय च नमो दुन्दुभ्याय चाहनन्याय च ॥ ३५ ॥

अर्थ—शिरस्त्राण, कापसाचा अंगरखा व लोखंडाचें कवच धारण करणारा, ज्याचे रथाला वरूथ (घुमट) आहे असा, जो स्वतः प्रसिद्ध असून ज्याची सेना प्रसिद्ध आहे असा, नगारा व तो वाजविण्याचे दंड यांत असणारा जो रुद्र त्याला नमस्कार असो ॥ ३५ ॥

नमो धृष्णवे च प्रमृशाय च नमो निषङ्गिणे चेषुधिमते च नमस्तीक्ष्णेषवे चायुधिने च नमः÷ स्वायुधाय च सुधन्वने च ॥ ३६ ॥

अर्थ—प्रगल्भ, विचारशील, खड्ग, भाते, तीक्ष्ण बाण व आयुधें जवळ असलेला त्रिशूळ व चांगलें धनुष्य धारण करणारा जो रुद्र त्याला नमस्कार असो. ॥ ३६ ॥

नमश्च स्रुत्याय च पथ्याय च नमश्च काट्याय च नीप्याय च नमश्च कुल्याय च सरस्याय च नमो नादेयाय च वैशन्ताय च ॥ ३७ ॥

अर्थ—गल्लींत व मोठ्या रस्त्यांत तसेंच अडचणीचे मार्गांत, पर्वताचे सखल प्रदेशांत, पाटांवर (कालव्यांवर) अगर सर्व देहांत, सरोवरांत, नद्यांत व डबक्यांत असणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ॥ ३७ ॥

नमस्कूल्याय चावट्याय च नमो वीध्र्याय चातप्याय च नमो मेघ्याय च विद्युत्याय च नमो वर्ष्याय चावर्ष्याय च ॥ ३८ ॥

अर्थ—विहिरी, खड्डे, शरदृतूंतील मेघ, ऊन, ढग, विजा, वृष्टि व अनावृष्टि या सर्वांत असणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ॥ ३८ ॥

नमो वात्याय च रेष्म्याय च नमो वास्तव्याय च वास्तुपाय च नमस्कूल्याय च नमो सोमाय च रुद्राय च नमस्ताम्राय चारुणाय च ॥ ३९ ॥

अर्थ—वायु, प्रलयकाल, गृहें (घरे) यांत असणारा, गृहपालक, पार्वतीसह असणारा, दुःखनाशक, पूर्ण किंवा किंचित् ताम्र वर्णाचा जो रुद्र त्याला नमस्कार असो. ॥ ३९ ॥

नमः÷ शङ्गवे च पशुपतये च नमऽउग्राय च भीमाय च नमोऽग्रेवधाय च च दूरेवधाय च नमो हन्त्रे च हनीयसे च नमो वृक्षेभ्यो हरिकेशेभ्यो नमस्ताराय ॥ ४० ॥

अर्थ—सुखस्वरूपी वाणी बोलणारा, प्राण्यांचा अधिपति, शस्त्रें उंच धारण करणारा, भयंकर, पुढें येणाऱ्या व दूरस्थ शत्रूंचा नाश करणारा, एरव्हीं सामान्यरूपेंकरून मारणारा, व प्रलयकालीं विशेषेंकरून मारणारा असा जो रुद्र त्याला नमस्कार व हिरव्या वर्णाचे जे कल्पवृक्ष तद्रूपी रुद्रांना माझा नमस्कार असो व संसारतारक जो रुद्र त्यास नमस्कार असो. ॥ ४० ॥

नमस्कूल्याय च मयोभवाय च नमः÷ शङ्कराय च मयस्कराय च नमः÷ शिवाय च शिवतराय च ॥ ४१ ॥

अर्थ—संसार व मुक्तिस्वरूपी, सांसारिक व इतर ऐहिक आणि मोक्षसुखें देणारा, स्वतः निष्पाप व भक्तांना अत्यंत निष्पाप करणारा जो रुद्र त्याला नमस्कार असो. ॥ ४१ ॥

नमस्कूल्याय चावार्याय च नमः÷ प्रतरणाय चोत्तरणाय च नमस्तीर्थ्याय च कूल्याय च नमस्कूल्याय च फेन्याय च ॥ ४२ ॥

अर्थ—संसाराचे पलीकडे व संसारांत असणारा, पाप व संसार यांतून तरून जाण्यास कारणीभूत, प्रयागादि तीर्थें त्यांचे तट, बालतृण व फेंस यांत असलेल्या रुद्राला नमस्कार असो. ॥ ४२ ॥

नमः÷ सिकत्याय च प्रवाह्याय च नमः÷ किꣳ शिलाय च क्षयणाय च नमः÷ कपर्दिने च पुलस्तये च नमऽइरिण्याय च प्रपथ्याय च ॥ ४३ ॥

अर्थ--रेती, जलप्रवाह, वालू, ज्यांत पाणी स्थिर रहातें असा तलाव वगैरे प्रदेश यांत असणारा, जटा ज्यास आहेत असा सर्वांतर्यामी, खडकाळ (ऊषर जमीन) व मोठा राजमार्ग यांत राहणारा जो रुद्र त्याला नमस्कार असो. ॥ ४३ ॥

नमो व्रज्याय च गोष्ठ्याय च नमस्तल्प्याय च गेह्याय च नमो ह्रद्यय च निवेष्प्याय च नमꣳ काट्याय च गह्वरेष्ठाय च ॥ ४४ ॥

अर्थ—गोसमुदाय, गोठा, अंथरूण, गृह, हृदय, पाण्यांतील भोवरा, गहन अरण्यांतील प्रदेश व गुहा यांत असणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ॥ ४४ ॥

नमꣳ शुष्क्याय च हरित्याय च नमः÷ पाꣳ सव्याय च रजस्याय च नमो लोप्याय चोलप्याय च नमऽऊव्यीय च सूव्यीय च ॥ ४५ ॥

अर्थ—वाळलेलीं व ओलीं लांकडें, मोठी व बारीक धूळ, अगम्य प्रदेश, बल्वज-संज्ञक तृण, वडवानल, व प्रलय काळचा अग्नि यांत असणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. ॥ ४५ ॥

नमः÷ पर्णाय च पर्णशदाय च नमऽउद्गुरमाणाय चाभिघ्नते च नमऽ आखिदते च प्रखिदते च नमऽइषुकृद्भ्यो धनुष्कृद्भ्यश्च वो नमो नमो वꣳ किरिकेभ्यो देवानाꣳ हृदयेभ्यो नमो विचिन्वत्केभ्यो नमो विक्षिणत्केभ्यो नमः आनिर्हतेभ्यः÷ ॥ ४६ ॥

अर्थ--पानें, तशीच पानें पडण्याची जागा, उद्योगी, शत्रुनाशक, अभक्तांना व पापी लोकांना सर्व बाजूंनीं दैन्य उत्पन्न करणारा जो रुद्र त्याला नमस्कार. तसेंच बाण व धनुष्य करणारे, वृष्टिद्वारा जगाची वृद्धि करणारे, हा पापी हा पुण्यवान् असा विभाग करणारे, नाना तऱ्हेनें हिंसा करणारे, सृष्टीच्या आरंभीं उत्पन्न झालेले असे व रुद्रांचे हृदयस्वरूपी असणारे अग्नि, वायु व सूर्य असे जे रुद्र त्यांना माझा नमस्कार असो. ॥ ४६ ॥

व्रापेऽअन्धसस्पते दरिद्र नीललोहित । आसां प्रजानामेषां पशूनां मा भेर्मा रोङ्मो च नꣳ किंचनाममत् ॥ ४७ ॥

अर्थ—पापी लोकांना वाईट गति देणारा, सोमाचा (सोमरसाचा) स्वामी, जवळ कोणताही परिग्रह नसलेला, ज्याचा गळा नीलवर्ण व इतर शरीर ताम्रवर्ण आहे अशा हे रुद्रा, शिवा, आमच्या पुत्रादि प्रजांना व गाई वगैरे पशूंना भीति दाखवूं नकोस, त्यांचा भंग करूं नको व त्यांना कोणताही रोग उत्पन्न करूं नकोस. ॥४७॥

इमा रुद्राय तवसे कपर्दिने क्षयद्वीराय प्रभरामहे मतीः । यथा शमसद्द्विपदे चतुष्पदे विश्वं पुष्टं ग्रामेऽअस्मिन्ननातुरम् ॥ ४८ ॥

अर्थ—आम्ही आपली बुद्धि रुद्राचे स्वाधीन करतों म्हणजे त्याचे स्मरण करतों. त्यायोगें आमच्या पुत्रपशूंना सुख होवो व आमच्या गांवांतील सर्व प्राणी पुष्ट व निरोगी होवोत. तो रुद्र बलवान्, जटाधारी, शत्रुनाशक असा आहे. ॥ ४८ ॥

या ते रुद्र शिवा तनूः शिवा विश्वाहा भेषजी । शिवा रुतस्य भेषजी तया नो मृड जीवसे ॥ ४९ ॥

अर्थ—हे रुद्रा, तुझें सर्वकाळ कल्याणप्रद, व्याधि दूर करणारे जें औषधरूपी असें उत्तम शरीर आहे त्यायोगें आम्हांला वांचण्याकरितां सुखी ठेव. (वांचव व सुखी कर). ॥ ४९ ॥

परि नो रुद्रस्य हेतिर्वृणक्तु परि त्वेषस्य दुर्मतिरघायोः । अव स्थिरा मघवद्भ्यस्तनुष्व मीढ्वस्तोकाय तनयाय मृड ॥ ५० ॥

अर्थ—हे रुद्रा, तुझें आयुध व रागावलेल्या द्वेषी पुरुषाची दुर्बुद्धि आम्हांला वर्ज्य करोत. म्हणजे त्यांची पीडा आम्हांला न होवो. इष्ट वस्तूंची वृष्टि करणाऱ्या हे रुद्रा, तूं आपलीं दृढ धनुष्यें दोरीनें रहित करून यजमानांचें भय दूर कर व पुत्रपौत्रांना सुखी कर. ॥ ५० ॥

मीढुष्टम शिवतम शिवो नः सुमना भव । परमे वृक्षऽआयुधं निधाय कृत्तिं वसानऽआचर पिनाकं बिभ्रदागहि ॥ ५१ ॥

अर्थ—इष्टफलें व कल्याण यांची अतिशय वृष्टि करणाऱ्या रुद्रा, आमच्यावर प्रसन्न हो व दूर असलेल्या झाडांवर त्रिशूलादिक आयुध ठेवून गजचर्म परिधान करून तप कर आणि केवल शोभेकरितां नुसतें धनुष्य घेऊन ये. ॥ ५१ ॥

विकिरिद विलोहित नमस्तेऽअस्तु भगवः । यास्ते सहस्रꣳ हेतयोऽन्यमस्मन्निवपन्तु ताः ॥ ५२ ॥

अर्थ—निरनिराळ्या उपद्रवांचा नाश करणाऱ्या शुद्धस्वरूपी भगवान् रुद्रा, तुला नमस्कार असो. तुझीं जीं असंख्य आयुधें आहेत तीं आमच्याशिवाय दुसऱ्यावर पडोत. ॥ ५२ ॥

सहस्राणि सहस्रशो बाह्वोस्तव हेतयः÷ । तासामीशानो भगवꣳ पराचीना मुखा कृधि ॥ ५३ ॥

अर्थ--जगाचा स्वामी अशा हे रुद्रा, तुझ्या हातांत जीं हजारों प्रकारचीं असंख्य आयुधें आहेत त्यांचीं तोंडें (अग्रभाग) आमच्या विरुद्ध दिशांकडे कर म्हणजे आयुधें आमच्यावर चालवूं नकोस. ॥ ५३ ॥

असंख्याता सहस्राणि ये रुद्राऽअधि भूम्याम् । तेषाꣳ सहस्रयोजनेऽव धन्वानि तन्मसि ॥ ५४ ॥

अर्थ--पृथ्वीवर जे असंख्य रुद्र हजारों प्रकारांनीं राहतात त्यांचीं असंख्य धनुष्यें आम्ही हजारो कोसांच्या पलीकडील मार्गावर नेऊन टाकतों. ॥ ५४ ॥

अस्मिन् महत्यर्णवेऽन्तरिक्षे भवाऽअधि । तेषाꣳसहस्रयोजनेऽव धन्वानि तन्मसि ॥ ५५ ॥

अर्थ—मोठ्या व मेघमण्डळयुक्त आकाशांत जे रुद्र राहतात त्यांचीं असंख्य धनुष्यें आम्ही हजारों कोसांच्या पलीकडील मार्गावर नेऊन टाकतों. ॥ ५५ ॥

नीलग्रीवाः शितिकण्ठा दिवꣳरुद्राऽउपश्रिताः । तेषाꣳसहस्रयोजनेऽव धन्वानि तन्मसि ॥ ५६ ॥

अर्थ—कांहीं भागांत कृष्णवर्ण व कांहीं भागांत श्वेतवर्ण ज्यांचा कंठ आहे असे द्युलोकांत राहणारे जे रुद्र त्यांचीं असंख्य धनुष्यें आम्ही हजारों कोसांच्या पलीकडील मार्गावर नेऊन टाकतों. (रुद्रांचे श्वेतकंठ विषभक्षणानें कांहीं भागांत काळे झाले आहेत.) ॥ ५६ ॥

नीलग्रीवाः शितिकण्ठाः÷ शर्वाऽअधः क्षमाचराः । तेषाꣳसहस्रयोजनेऽव धन्वानि तन्मसि ॥ ५७ ॥

अर्थ--कांहीं भागांत कृष्णवर्ण व कांहीं भागांत शुक्लवर्ण ज्यांचा कंठ आहे असे व भूमीचे अधोभागीं पाताळांत राहणारे जे रुद्र त्यांचीं असंख्य धनुष्यें आम्ही हजारों कोसांच्या पलीकडील मार्गावर नेऊन टाकतों ॥ ५७ ॥

ये वृक्षेषु शष्पिञ्जरा नीलग्रीवा विलोहिताः । तेषाꣳसहस्रयोजनेऽव धन्वानि तन्मसि ॥ ५८ ॥

अर्थ—लहान गवताप्रमाणें हिरव्या वर्णाचे व कांहीं भागांत कृष्णवर्ण व कांहीं भागांत शुक्लवर्ण ज्यांचा कंठ आहे असे आणि रक्तरहित असे (रुद्र तेजोमय शरीराचे असल्यामुळें त्यांचे शरीरांत रक्तमांसादि नाहीं) व अश्वत्थादि वृक्षावर राहणारे जे रुद्र त्यांचीं धनुष्यें आम्ही हजारों कोसांच्या पलीकडील मार्गावर नेऊन टाकतों. ॥ ५८ ॥

ये भूतानामधिपतयो विशिखासः कपर्दिनः । तेषाꣳसहस्रयोजनेऽव धन्वानि तन्मसि ॥ ५९ ॥

अर्थ—शिरावर केश नसलेले, तसेंच जटाजूटधारी असलेले व पिशाचांचे अधिपति जे रुद्र त्यांचीं धनुष्यें आम्ही हजारों कोसांच्या पलीकडील मार्गावर नेऊन टाकतों. ॥ ५९ ॥

ये पथां पथिरक्षय ऐलबृदाऽआयुर्युधः । तेषाꣳसहस्रयोजने ऽव धन्वानि तन्मसि ॥ ६० ॥

अर्थ—अन्न देऊन प्राण्यांचें पोषण करणारे व यावज्जीव युद्ध करणारे, लौकिक वैदिक मार्गांचें रक्षण करणारे अधिपति असे जे रुद्र त्यांचीं धनुष्यें आम्ही हजारों कोसांच्या पलीकडील मार्गावर नेऊन टाकतों. ॥ ६० ॥

ये तीर्थानि प्रचरन्ति सृकाहस्ता निषङ्गिणः । तेषाꣳसहस्रयोजने ऽव धन्वानि तन्मसि ॥ ६१ ॥

अर्थ—आयुधें हातांत घेऊन व खड्ग धारण करून जे रुद्र तीर्थांवर गमन करतात त्यांचीं धनुष्यें आम्ही हजारों कोसांच्या पलीकडील मार्गावर नेऊन टाकतों ॥ ६१ ॥

येऽन्नेषु विविध्यन्ति पात्रेषु पिबतो जनान् । तेषाꣳसहस्रयोजने ऽव धन्वानि तन्मसि ॥ ६२ ॥

अर्थ—अन्न खाल्ल्यावर व पाणी प्याल्यावर त्यांत असलेले जे रुद्र तें अन्न खाणाऱ्या व तें पाणी पिणाऱ्या प्राण्यांना पीडा करतात त्यांचीं धनुष्यें आम्ही हजारों कोसांच्या पलीकडील मार्गावर नेऊन टाकतों ॥ ६२ ॥

षऽएतावन्तश्च भूयाꣳसश्च दिशो रुद्रा वितस्थिरे। तेषाꣳसहस्रयोजने ऽव धन्वानि तन्मसि ॥ ६३ ॥

अर्थ—दहा दिशा व्यापून रहाणारे जे पुष्कळ व अतिशय रुद्र आहेत त्यांचीं धनुष्यें आम्ही हजारों कोसांच्या पलीकडील मार्गावर नेऊन टाकतों ॥ ६३ ॥.

नमोऽस्तु रुद्रेभ्यो ये दिवि येषां वर्षमिषवꣳ। तेभ्यो दश प्राचीर्दशो दक्षिणा दश प्रतीचीर्दशोदीचीर्दशोर्ध्वाऽ। तेभ्यो नमोऽअस्तु ते नोऽवन्तु ते नो मृडयन्तु ते यं द्विष्मो यश्च नो द्वेष्टि तमेषां जम्भे दध्मꣳ ॥ ६४ ॥

अर्थ—जे रुद्र द्युलोकांत राहातात व ज्यांचे बाण वृष्टिरूपी आहेत त्यांना हात जोडून पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर व ऊर्ध्व या दिशांकडे आम्ही दहा अंगुळी करतों म्हणजे सर्व दिशांकडे हात जोडून आम्ही नमस्कार करतों. ते रुद्र आमचें रक्षण करोत व आम्हांला सुख देवोत. जो आमचा द्वेष करतो व आम्ही ज्याचा द्वेष करतों त्या शत्रूला आम्ही रुद्राच्या दाढेंत स्थापन करतों म्हणजे त्याचा नाश होवो ॥ ६४ ॥

नमोऽस्तु रुद्रेभ्यो येऽन्तरिक्षे येषां वातऽइषवꣳ। तेभ्यो दश प्राचीर्दशो दक्षिणा दश प्रतीचीर्दशोदीचीर्दशोर्ध्वाऽ। तेभ्यो नमोऽअस्तु ते नोऽवन्तु ते नो मृडयन्तु ते यं द्विष्मो यश्च नो द्वेष्टि तमेषां जम्भे दध्मꣳ ॥ ६५ ॥

अर्थ—जे रुद्र आकाशांत रहातात व ज्यांचे बाण वायुरूपी आहेत त्यांना हात जोडून पूर्व दक्षिण, पश्चिम, उत्तर व ऊर्ध्व या दिशांकडे आम्ही दहा अंगुली करतों. म्हणजे सर्व दिशांकडे हात जोडून आम्ही नमस्कार करतों. ते रुद्र आमचें रक्षण करोत व आम्हाला सुख देवोत जो आमचा द्वेष करतो व आम्ही ज्याचा द्वेष करतों त्या शत्रूला आम्ही रुद्राच्या दाढेंत स्थापन करतों म्हणजे त्याचा नाश होवो. ॥ ६५ ॥

नमोऽस्तु रुद्रेभ्यो ये पृथिव्यां येषामन्नमिषवꣳ। तेभ्यो दश प्राचीर्दशो दक्षिणा दश प्रतीचीर्दशोदीचीर्दशोर्ध्वाऽ। तेभ्यो नमोऽअस्तु ते नोऽवन्तु ते नो मृडयन्तु ते यं द्विष्मो यश्च नो द्वेष्टि तमेषां जम्भे दध्मꣳ ॥ ६६ ॥

अर्थ—जे रुद्र पृथिवीवर रहातात व ज्यांचे बाण अन्नरूपी आहेत त्यांना हात

जोडून पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर व ऊर्ध्व या दिशांकडे आम्ही दहा अंगुलि करतों म्हणजे सर्व दिशांकडे हात जोडून आम्ही नमस्कार करतों. ते रुद्र आमचें रक्षण करोत व आम्हाला सुख देवोत. जो आमचा द्वेष करतो व आम्ही ज्याचा द्वेष करतों त्या शत्रूला आम्ही रुद्राचे दाढेंत स्थापन करतों म्हणजे त्याचा नाश होवो. ॥६६॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**

माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** षोडशोऽध्यायः समाप्तः ॥

इति षोडशोऽध्यायः समाप्तः ।



अथ सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥



विनियोग—सोळाव्या अध्यायांत शतरुद्रिय होम सांगितला. सतराव्या अध्यायांत चित्याग्नीच्या अभिषेकाचे वगैरे मंत्र सांगतात.

विनियोग—'अश्मन्नूर्जम्' या मंत्रानें चित्य अग्नीवर प्रदक्षिणक्रमानें जलधारा धरावी.

अश्मन्नूर्जं पर्वते शिश्रियाणामद्भ्यऽओषधीभ्यो वनस्पतिभ्योऽअधि सम्भृतं पयः । तां नऽइषमूर्जं धत्त मरुतꣳ सꣳरराणाऽअश्मँस्ते क्षुन्मयि तऽऊर्ग्यं द्विष्मस्तं ते शुगृच्छतु ॥ १ ॥

अर्थ—उत्तम दानशील अशा महद्देवांनो तुम्ही आम्हाला अन्न व अन्नरस द्या. तें अन्न व तो रस हिमालयादि पर्वतावर राहणारा व बलाचें कारण असा आहे. तसेंच तो रस, जल, यवादि ओषधि, अश्वत्थादिवृक्ष यांच्या संबंधानें धेनूपासून दुग्धद्वारा प्राप्त झाला आहे. हे सर्व भक्षक अग्ने, तुला क्षुधा उत्पन्न होवो. व तुझा सारभाग माझे ठायी असो. हे अग्ने, आम्ही ज्याचा द्वेष करतों त्या पुरुषाकडे तुझा शोक जावो. ॥ १ ॥

विनियोग—नंतर इमा मे 'अग्न इष्टकाः' या दोन मंत्रांचा जप करावा.

इमा मेऽअग्नऽइष्टका धेनवः सन्त्वेका च दश च दश च शतं च शतं च सहस्रं च सहस्रं चायुतं चायुतं च नियुतं च नियुतं च प्रयुतं चार्बुदं च न्यर्बुदं च समुद्रश्च मध्यं चान्तश्च परार्धश्चैता मेऽअग्नऽइष्टका धेनवः सन्त्वमुत्रामुष्मिँल्लोके ॥ २ ॥

अर्थ—हे अग्ने या पांच चितीवर मीं स्थापन केलेल्या इष्टका माझ्या इच्छा पूर्ण करणाऱ्या होवोत. (या ठिकाणीं एकापासून परार्धपर्यंत संख्या सांगितली आहे. पहिल्या संख्येच्या दसपट दुसरी संख्या आहे) एक, दहा, शंभर, हजार, दहाहजार, लक्ष, दशलक्ष, कोटि, दशकोटि, अब्ज, खर्व, निखर्व, महापद्म, शंकु, समुद्र, मध्य, अन्त आणि परार्ध (या अठरा संख्या यांत कांहींचीं नांवें सांगितलीं आहेत तीं अवशिष्ट संख्यांचीं उपलक्षण समजावींत) हे अग्ने, एतत्संख्याक इष्टका अन्यजन्मांत व अन्यलोकांत इष्टफलें देणाऱ्या होवोत. ॥ २ ॥

ऋतवं स्थऽऋतावृधऽऋतुष्ठा स्थऽऋतावृधः । घृतश्चुतो मधुश्चुतो विराजो नाम कामदुघाऽअक्षीयमाणाः ॥ ३ ॥

अर्थ—हे इष्टकांनो, तुम्ही आमच्या इच्छा पूर्ण करणाऱ्या व्हा. तुम्ही वसंतादि ऋतुस्वरूपी, यज्ञ वाढविणाऱ्या, वसंतादि ऋतूंत राहणाऱ्या, घृत व मधु ज्यांतून गळतें अशा, विशेषेंकरून शोभणाऱ्या, म्हणून प्रसिद्ध असलेल्या इष्टफल देणाऱ्या व क्षय न पावणाऱ्या अशा आहांत ॥ ३ ॥

विनियोग—' समुद्रस्य त्वा ' इत्यादि सात मंत्रांनीं बांबूनें अग्नीचे जागीं सात रेघा ओढाव्या.

समुद्रस्य त्वावकयाग्ने परिव्ययामसि । पावकोऽअस्मभ्यꣳ शिवो भव ॥ ४ ॥

अर्थ—हे अग्ने, भिजविणारे जें जल त्याचे शेवाळानें आम्ही तुला सर्व बाजूंनीं वेष्टित करतों. तूं आम्हांला पवित्र करणारा व आमचें कल्याण करणारा हो. ॥ ४ ॥

हिमस्य त्वा जरायुणाग्ने परिव्ययामसि । पावकोऽअस्मभ्यꣳ शिवो भव ॥ ५ ॥

अर्थ—जरायु (गर्भवेष्टन) प्रमाणें शैत्याचें उत्पत्तिस्थान जें शेवाळ त्यायोगे आम्ही तुझें सर्व बाजूंनीं वेष्टन करतों. तूं आम्हाला पवित्र करणारा व आमचें कल्याण करणारा हो. ॥ ५ ॥

उप ज्मन्नुप वेतसेऽवतर नदीष्वा । अग्ने पित्तमपामसि मण्डूकि ताभिरागहि सेमं नो यज्ञं पावकवर्णꣳ शिवं कृधि ॥ ६ ॥

अर्थ—हे अग्ने, पृथिवीवर, वेताच्या शाखेवर व जलांत शेवाळावर उतर. कारण कीं, तूं जलांचें तेज आहेस, तसेंच हे मण्डूकि, त्या जलांसह येथें ये व आम्ही केलेल्या अग्निप्रमाणें तेजस्वी अशा यज्ञाला सुखप्रद कर. ॥ ६ ॥

अपामिदं न्ययनꣳ समुद्रस्य निवेशनम् । अन्याँस्तेऽअस्मत्तपन्तु हेतयः पावकोऽअस्मभ्यꣳ शिवो भव ॥ ७ ॥

अर्थ—हें चित्याग्निस्थान जलप्राप्तीचें साधन आहे. तसेंच तें समुद्राच्या घरासारखें आहे. अशा हे अग्ने, तुझ्या ज्वाला आमच्याहून इतर असे जे आमचे विरोधी त्यांना ताप देवोत व तूं आम्हांला पवित्र करणारा आणि शांत हो ॥ ७ ॥

विनियोग—'अग्ने पावक' या मंत्रानें पक्ष व पुच्छ यांवर रेघ ओढावी.

अग्ने॑ पावक रो॒चिषा॑ म॒न्द्रया॑ देव जि॒ह्वया॑। आ दे॒वान्व॑क्षि॒ यक्षि॑ च ॥ ८ ॥

अर्थ—हे शुद्ध करणाऱ्या प्रकाशक अग्ने, प्रकाशक अशा ज्वालासमुदायानें आहवनीयस्वरूपानें तूं स्थित आहेस. तूं देवांना बोलाव व त्यांचा याग कर. ॥ ८ ॥

स नः॑ पावक दी॒दिवोऽग्ने॑ दे॒वाँ२ऽइ॒हा व॑ह। उप॑ य॒ज्ञꣳ हवि॑श्च नः ॥ ९ ॥

अर्थ—हे शुद्ध करणाऱ्या दीप्तिमान् अग्ने, देवांना आमच्या यज्ञांत आण व यज्ञासमीप असलेलें हविर्द्रव्य देवांकडे ने ॥ ९ ॥

पा॒व॒कया॒ यश्चि॒न्तय॑न्त्या कृ॒पा क्षामं॑न् रुरु॒चऽउ॒षसो॒ न भा॒नुना॑। तूर्व॒न्न या॑म॒न्नेत॑शस्य नू॒ रण॒ऽआ यो घृ॒णे न त॑तृषा॒णोऽअ॒जर॑ः ॥ १० ॥

अर्थ—हे अग्ने, उषःकाल स्वप्रकाशानें शोभतात त्याप्रमाणें जो अग्नि शुद्ध करणाऱ्या चेतनोत्पादक सामर्थ्यानें पृथ्वीवर शोभतो व जो दीप्तिमान् अग्नि गमन-कुशल अशा अश्वाच्या नियमन करणाऱ्या युद्धांत शत्रुसैन्यांची हिंसा करणारा असाच कीं काय शोभतो व जो पूर्णाहुतिविषयीं तहानलेला व जरारहित आहे त्या अग्नीचें आम्ही कर्षण करतों. ॥ १० ॥

विनियोग—'नमस्ते' या मंत्रानें स्रुचेंतील आज्य व पात्री घेऊन अध्वर्यूनें चित्याग्नीवर आरोहण करावें.

नम॑स्ते हर॒से शो॒चिषे॒ नम॑स्तेऽअस्त्व॒र्चिषे॑। अ॒न्याँस्ते॑ अ॒स्मत्त॑पन्तु॒ हेत॑यः पाव॒कोऽअ॒स्मभ्यꣳ शि॒वो भ॑व ॥ ११ ॥

अर्थ—हे अग्ने, सर्व रसांना हरण करणाऱ्या व प्रकाशक अशा तुझ्या तेजाला नमस्कार असो. तसेंच पदार्थप्रकाशक अशा तुझ्या ज्वालेला नमस्कार असो. हे अग्ने, तुझ्या ज्वाला आमच्याहून इतर असे जे आमचे विरोधी त्यांना ताप देवोत व तूं आम्हांला पवित्र करणारा आणि शांत हो. ॥ ११ ॥

विनियोग—'नृषदेवेट्' इत्यादि पांच मंत्रभागांनीं पांच आज्य आहुतींचा होम करावा.

नृषदे वेडप्सुषदे वेड् वर्हिषदे वेड् वनसदे वेड् स्वर्षिदे वेट् ॥ १२ ॥

अर्थ—मनुष्यांमध्यें जठराग्निस्वरूपानें, जलांत और्व-अग्निस्वरूपानें, यज्ञांत आहवनीय अग्निस्वरूपानें, व वृक्षांत दावाग्निस्वरूपानें व स्वर्गांत आदित्यरूपानें रहाणाऱ्या अग्नीला हें हवि, सुहुत असो. ॥ १२ ॥

विनियोग—' ये देवा ' इत्यादि दोन मंत्रांनीं अग्नीवर प्रोक्षण करावें.

ये देवा देवानां यज्ञिया यज्ञियानाꣳ संवत्सरीणमुपं भागमासते । अहुतादो हविषो यज्ञेऽअस्मिन्त्स्वयं पिबन्तु मधुनो घृतस्य ॥ १३ ॥

अर्थ—हे प्राणरूपी देव या चयन यज्ञामध्यें मध व दही घृत एतद्रूपी हविर्भागाचें स्वतः सेवन करोत. हे प्राणादि देव अग्नींत दिलेलें हवि भक्षण करीत नाहींत; तर प्रत्यक्षच अन्न भक्षण करतात. तसेंच ते संवत्सरपर्यंत उपभोग सेवन करितात व यज्ञार्ह देवामध्यें ते विशेषेंकरून शोभणारे ब यज्ञयोग्य असे आहेत. ॥ १३ ॥

ये देवा देवेष्वधि देवत्वमायन्ये ब्रह्मणꣳ पुरऽएतारोऽअस्य । येभ्यो नऽऋते पवते धाम किञ्चन न ते दिवो न पृथिव्याऽअधि स्नुषु ॥ १४ ॥

अर्थ—जे प्राणदेव इंद्रादिकांच्या ठिकाणीं अधिष्ठाते होऊन देवत्व प्राप्त करते झाले व जे या देवाच्यापुढें गमन करतात व ज्यांच्या वांचून कोणतेंही शरीर हालचाल करूं शकत नाहीं ते प्राणरूपी देव स्वर्गावर रहात नाहींत व पृथ्वीवरही रहात नाहीं तर चक्षुरादि इंद्रियांमध्यें राहातात ॥ १४ ॥

विनियोग—' प्राणदा ' या मंत्रानें अग्निवरून खालीं उतरावें.

प्राणदाऽअपानदा व्यानदा वर्चोदा वरिवोदाः । अन्याँस्तेऽअस्मत्तपन्तु हेतयः पावकोऽअस्मभ्यꣳ शिवो भव ॥ १५ ॥

अर्थ—हे अग्ने, तुझ्या ज्वाला आमच्याहून इतर असे जे आमचे विरोधी त्यांना ताप देवोत व तूं आम्हांला पवित्र करणारा आणि शान्त हो. तूं यजमानाला प्राण, अपान, व्यान, बल व धन देणारा आहेस ॥ १५ ॥

विनियोग—' अग्निस्तिग्मेन ' या मंत्रानें अग्नींत घृताचा होम करावा.

अग्निस्तिग्मेन शोचिषा यासद्विश्वं न्युत्रिणम् । अग्निर्नो वनते रयिम् ॥ १६ ॥

अर्थ—अग्नि सर्व राक्षसांना आपल्या तीक्ष्ण तेजानें अतिशय क्षीण करो आणि तो अग्नि आम्हांला द्रव्य देवो ॥ १६ ॥

विनियोग—'ष इमा' या ऋचेपासून आठ ऋचांनीं आज्याचा अग्नीमध्यें होम करावा.

षऽइमा विश्वा भुवनानि जुह्वदृषिर्होता न्यसीदत्पिता नः÷। सऽआशिषा द्रविणमिच्छमानः प्रथमच्छदवराँ२ऽआविवेश ॥ १७ ॥

अर्थ—जो विश्वकर्मा या सर्व भूतजातीचा संहार करून स्थित होता झाला तो अतीद्रियद्रष्टा संहाररूपी होमाचा कर्ता, आमचा पिता असा आहे. तो परमेश्वर 'बहु स्यां प्रजायेय' अशा रीतीनें सृष्टीची इच्छा करून जगद्रूपी धनाची अपेक्षा करून जीवरूपानें सर्व उपाधींत प्रविष्ट होता झाला. त्यानें प्रथम अद्वितीय स्वरूपाचें आच्छादन केलें व उत्कृष्ट रूपाचें आवरण करून तो त्यांत शिरला ॥ १७ ॥

किꣳ स्विदासीदधिष्ठानमारम्भणं कतमत्स्वित्कथासीत्। यतो भूमिं जनयन्विश्वकर्मा वि यामौर्णोन्महिना विश्वचक्षाः ॥ १८ ॥

अर्थ—(ईश्वराचा सृष्टीचा प्रकार प्रश्नोत्तररूपानें सांगतात) द्यावाभूमी निर्माण करणाऱ्या विश्वकर्म्याचें अधिष्ठान म्हणजे बसावयाची जागा काय बरे असावी ? या जगाचें उपादान कारण काय असावें व निमित्तकारण कोणतें असावें, कारण ज्या वेळीं सर्वद्रष्ट्या विश्वकर्म्यानें भूमि व स्वर्ग उत्पन्न करून आपल्या सामर्थ्यानें द्यावापृथिवीचें आच्छादन केलें त्या वेळीं अधिष्ठान काय होतें वगैरे प्रश्न ॥ १८ ॥

विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुखो विश्वतोबाहुरुत विश्वतस्पात्। सं बाहुभ्यां धमति सं पतत्रैर्द्यावाभूमी जनयन्देवऽएकः÷ ॥ १९ ॥

अर्थ—उत्तर—एकटा विश्वकर्मा ईश्वर कोणाचेंही साह्य न घेतां धर्माधर्मरूपी निमित्तकारणानें व अनित्य अशा पंच महाभूत उपादानकारणानें द्यावापृथ्वींना उत्पन्न करतो. तो सर्वद्रष्टा सर्व बाजूला मुखें, बाहू व पाय असलेला असा आहे. ॥ १९ ॥

किꣳस्विद्वनं कऽउ स वृक्षऽआसयतो द्यावापृथिवी निष्टतक्षुः। मनीषिणो मनसा पृच्छतेदु तद्यदध्यतिष्ठद्भुवनानि धारयन् ॥ २० ॥

अर्थ—पुनः प्रश्न—सुताराला घर निर्माण करण्याचे वेळीं रानांतील झाड लागतें त्याप्रमाणें या विश्वकर्म्यानें कोणतें अरण्य व कोणतें झाड घेतलें कीं, ज्यापासून यानें

द्यावापृथिवी निर्माण केली. तसेंच विद्वानांनो, विश्वकर्म्यानें भुवनें धारण करतांना कोणत्या स्थानावर आरोहण केलें त्याविषयींचा प्रश्नही तुम्ही विचारपूर्वक विचारा ॥ २० ॥

या ते धामानि परमाणि यावमा या मध्यमा विश्वकर्मन्नुतेमा । शिक्षा सखिभ्यो हविषि स्वधावः स्वयं यजस्व तन्वं वृधानः ॥ २१ ॥

अर्थ—हे हविर्लक्षण अन्नवन्, विश्वकर्म्या, तुझीं उत्कृष्ट, कनिष्ठ व मध्यम स्थानें या, मित्रभूत यजमानांना दे. यजमानाचें हविर्द्रव्य तुझ्यासंनिध उपस्थित झालें असतां आपलें शरीर वाढव व तूंच याग कर (कारण तुझा याग करण्याचें यजमानांना काय सामर्थ्य आहे ? तूं तुझाच याग करून घे) ॥ २१ ॥

विश्वकर्मन्हविषा वावृधानः स्वयं यजस्व पृथिवीमुत द्याम् । मुह्यर्धन्त्वन्येऽअभितः सपत्नाऽइहास्माकं मघवा सूरिरस्तु ॥ २२ ॥

अर्थ—हे विश्वकर्म्या, मीं दिलेल्या हविर्द्रव्यानें वाढून म्हणजे हर्षयुक्त होऊन माझ्यावर कृपा करून माझ्या यज्ञांत पृथ्वीवरील व द्युलोकावरील भूतांचा याग कर. व तुझ्या प्रसादानें दुसरे सर्वत्र असलेले शत्रु मोह पावोत व या यज्ञांत इन्द्र आमचा ज्ञानोपदेशक गुरु असो ॥ २२ ॥

वाचस्पतिं विश्वकर्माणमूतये मनोजुवं वाजेऽअद्या हुवेम । स नो विश्वानि हवनानि जोषद्विश्वशम्भूरवसे साधुकर्मा ॥ २३ ॥

अर्थ—आज मी अन्नप्राप्तीकरितां व रक्षणाकरितां इंद्राला बोलावतों तो इंद्र वाणीचा अधिपति, जगदुत्पत्त्यादि सर्व कर्में करणारा व मनाप्रमाणें वेगवान् आहे. त्या जगत्कल्याणकारी व उत्तम कर्में करणाऱ्या इंद्रानें आमचीं सर्व बोलावणीं अन्नवृद्धीकरितां प्रीतीनें स्वीकारावींत ॥ २३ ॥

विश्वकर्मन्हविषा वर्धनेन त्रातारमिन्द्रमकृणोरवध्यम् । तस्मै विशः समनमन्त पूर्वीरयमुग्रो विहव्यो यथासत् ॥ २४ ॥

अर्थ—हे विश्वकर्म्या, वृद्धि करणाऱ्या हविर्द्रव्यानें तूं जगाच्या रक्षण करणाऱ्या इंद्राला अवध्य केलेंस. त्या इंद्राला पूर्वीच्या प्रजांनीं व वशिष्ठादिकांनीं नमन केलें. कारण कीं हा इंद्र उग्र असून विविध कार्यांत बोलाविला जातो ॥ २४ ॥

विनियोग—' चक्षुषः पिता ' इत्यादि आठ ऋचांनीं अभीत आज्याचा होम करावा.

चक्षुषꣳ पिता मनसा हि धीरो घृतमेनेऽअजनन्नम्नमाने । यदेदन्ताऽअदंदृहन्त पूर्वआदिद्द्यावापृथिवीऽअप्रथेताम् ॥ २५ ॥

अर्थ—पूर्वीच्या वसिष्ठादि मुनींनीं द्यावापृथिवींचे प्रांतभाग दृढ केल्याबरोबरच द्यावापृथिवी लोक विस्तीर्ण झाले. नंतर चक्षुरादि इंद्रियांच्या पालक अशा विश्वकर्म्यानें मनानें निश्चय करून नम्र होणाऱ्या द्यावापृथिवींना आडवून धरलें व त्यांवर जलवृष्टि केली ॥ २५ ॥

विश्वकर्मा विमनाऽआद्विहाया धाता विधाता परमोत सन्दृक् । तेषामिष्टानि समिषा मदन्ति यत्रा सप्तऽऋषीन्परऽएकमाहुः ॥ २६ ॥

अर्थ—(विश्वकर्म्याशीं ज्यांचें ऐक्य झालें त्याबद्दल सूत्र असें म्हणतात) सप्तर्षी ज्या लोकांत विश्वकर्म्याशीं एकत्वाला प्राप्त होतात; तेथें विश्वकर्म्याकडून पाहिल्या गेलेल्या अशा त्यांच्या अभीष्ट वस्तु आहुतिरसभूत अन्नासह वृद्धिंगत होतात. तो विश्वकर्मा विशिष्टज्ञानवान् व आकाशाप्रमाणें व्यापक आहे. तसेंच तो पोषण करणारा, उत्पादक व सर्व श्रेष्ठ आहे ॥ २६ ॥

यो नः पिता जनिता यो विधाता धामानि वेद भुवनानि विश्वा । यो देवानां नामधाऽएकऽएव तꣳसम्प्रश्नं भुवना यन्त्यन्या ॥ २७ ॥

अर्थ—जो विश्वकर्मा आमचा पालक, उत्पादक व विशेषेंकरून धारण करणारा आहे तो आमच्या सर्व स्थानांना जाणतो. जो अद्वितीय असून सर्व देवांचें नामकरण करतो; तसेंच बाकीचे भूतसमुदाय त्याला आपआपले अधिकार विचारण्यास येतात म्हणजे तोच त्यांना कामें नेमून देतो ॥ २७ ॥

तऽआयजन्त द्रविणꣳ समस्माऽऋषयः पूर्वे जरितारो न भूना । असूर्ते सूर्ते रजसि निषत्ते ये भूतानि समकृण्वन्निमानि ॥ २८ ॥

अर्थ—विश्वकर्म्यानें उत्पन्न केलेले असे वसिष्ठादि पूर्वऋषि सर्व प्राणिसमुदायाला जलरूपी द्रव्य युक्ति युक्तीनें देते झाले त्यांनीं तें त्याला एकदम पुष्कळ देऊन टाकलें नाहीं. ते वसिष्ठादि ऋषि स्तुति करणारे, भूतावर जलवृष्टि करणारे,

सप्तदशावयवात्मक लिंगशरीर देऊन त्यांची प्रेरणा करणारे व विस्तीर्ण अशा अन्तरिक्ष लोकांत स्थित होणारे असे आहेत ॥ २८ ॥

परो दिवा परऽएना पृथिव्या परो देवेभिरसुरैर्यदस्ति । कꣳस्विद् गर्भं प्रथमं दध्रऽआपो यत्र देवाः समपश्यन्त पूर्वे ॥ २९ ॥

अर्थ—(यापुढें वेदान्तविषयक प्रश्नोत्तरें आहेत.) जें हें हृदयपुण्डरीकांत ईश्वरतत्त्व आहे; द्युलोक तसेंच देव व राक्षस यांपासून फारच दूर आहे म्हणजे या सर्वांपेक्षां तें अत्यंत विलक्षण आहे. जलांनीं प्रथम ज्यांत वसिष्ठादि पूर्वऋषींनीं जगत् पाहिलें असा कोणता गर्भ धारण केला बरें ? ॥ २९ ॥

तमिद्गर्भं प्रथमं दध्रऽआपो यत्र देवाः समगच्छन्त विश्वे । अजस्य नाभावध्येकमर्पितं यस्मिन् विश्वानि भुवनानि तस्थुः ॥ ३० ॥

अर्थ—ज्यांत सर्व देव एकत्र होऊन राहतात असाच गर्भ जलांनीं धारण केला. जन्म रहित परमेश्वराच्या नाभींत (मध्यभागांत) परमेश्वराशीं अभिन्न असलेला असा एक गर्भ स्थापन केला आहे; त्यांत हीं सर्व भूतें स्थित आहेत ॥ ३० ॥

न तं विदाथ यऽइमा जजानान्यद्युष्माकमन्तरं बभूव । नीहारेण प्रावृता जल्प्या चासुतृपऽउक्थशासश्चरन्ति ॥ ३१ ॥

अर्थ—हे जीवांनो, ज्यानें हें जग निर्माण केलें त्या विश्वकर्म्याला तुम्ही ओळखीत नाहीं. कारण तुमचें परिचित जें जीवस्वरूप त्याचेही आंत तें आत्मस्वरूप आहे. तुम्हाला न कळण्याचें कारण कीं तुम्ही देवाप्रमाणें पसरलेल्या अज्ञानानें आवृत, मी व माझें या असत्य भाषणानें भरलेले व केवळ इंद्रियाद्युपभोगांत संतोष पावणारे असे आहांत ॥ ३१ ॥

विश्वकर्मा ह्यजनिष्ट देवऽआदिद्गन्धर्वोऽअभवद् द्वितीय÷ । तृतीय÷ पिता जनितौषधीनामपां गर्भं व्युदधात्पुरुत्रा ॥ ३२ ॥

अर्थ—ब्रह्माण्डोत्पत्तिसमयीं देवतीर्यगादि जगाचा स्रष्टा ब्रह्मदेव प्रथम उत्पन्न झाला. त्यामागूनच दुसरा पृथिवी धारण करणारा अग्नि उत्पन्न झाला. नंतर तिसऱ्यानें सर्वांचा पालक व ओषधींचा उत्पादक असा पर्जन्य उत्पन्न झाला व तो पुष्कळ पदार्थ निर्माण करणारा जलांचा गर्भ धारण करतो ॥ ३२ ॥

आशुꣳ शिशानो वृषभो न भीमो धनाघनꣳ क्षोभणश्चर्षणीनाम्। संक्रन्दनोऽनिमिषऽएकवीरꣳ शतꣳ सेनाऽअजयत्साकमिन्द्रः॥ ३३॥

अर्थ—शीघ्रगामी, वज्र तीक्ष्ण करणारा, वृषभाप्रमाणें भयंकर, शत्रूंचा अत्यंत घातक, मनुष्यांना क्षुब्ध करणारा, शत्रूंना भयप्रद असा ध्वनि करणारा, डोळ्यांना पापण्या नसलेला (देवांच्या डोळ्यांना पापण्या नसतात) व दुसऱ्यांच्या सहाय्यावांचून एकटाच शत्रू जिंकणारा, इंद्र एकदमच इतिसंख्याक शत्रुसेनेला जिंकतो॥ ३३॥

संक्रन्दनेनाभिषेण जिष्णुना युत्कारेण दुश्च्यवनेन धृष्णुना। तदिन्द्रेण जयत तत्सहध्वं युधो नरऽइषुहस्तेन वृष्णा॥ ३४॥

अर्थ—हे युद्ध करणाऱ्या पुरुषांनों, इंद्राच्या सहाय्यानें तुम्ही शत्रुसैन्याचा पराजय करा व त्याचा नाश करा. तो इंद्र शब्द करणारा निमेषभरही दुर्लक्ष न करणारा, विजयी, युद्ध करणारा, अजय्य, भीतिरहित, वारुणादि आयुध विशिष्ट व इष्ट फलांची वृष्टि करणारा आहे॥ ३४॥

सऽइषुहस्तैꣳ स निषङ्गिभिर्वशी सꣳस्रष्टा स युधऽइन्द्रो गणेन। सꣳसृष्टजित्सोमपा बाहुशर्ध्युग्रधन्वा प्रतिहिताभिरस्ता॥ ३५॥

अर्थ—बाण व भाते धारण करणाऱ्या योध्यांशीं युक्त असलेला, शत्रूंना वश करणारा, रिपुसमुदायांबरोबर युद्ध करणारा, युद्धास आलेल्या शत्रूंचा पराजय करणारा, सोमपानकर्ता, ज्याचे बाहु बलयुक्त आहेत असा, उग्र धनुष्य धारण करणारा, धनुष्यानें बाणसंधान करून शत्रूंचा नाश करणारा इंद्र आमचें रक्षण करो॥ ३५॥

बृहस्पते परिदिया रथेन रक्षोहामित्राँ२ऽअपबाधमानः। प्रभञ्जन्त्सेनाः प्रमृणो युधा जयन्नस्माकमेध्यविता रथानाम्॥ ३६॥

अर्थ—हे इंद्रा, तूं रथावर बसून गमन सर्वत्र कर व आमच्या रथांचें रक्षण कर. तूं राक्षसांना मारणारा, शत्रूंना पीडा करणारा, परकीय सेनांचा विनाशक व युद्धामध्यें हिंसकांचा पराजय करणारा आहेस॥ ३६॥

बलविज्ञाय स्थविरꣳ प्रवीरꣳ सहस्वान् वाजी सहमानऽउग्रः। अभिवीरोऽअभिसत्त्वा सहोजा जैत्रमिन्द्र रथमातिष्ठ गोवित्॥ ३७॥

अर्थ--हे इंद्रा, तूं विजयी रथावर आरोहण कर. तूं सैन्यावरून ओळखला जाणारा, पुरातन काळापासून सर्वांचा शिक्षक, अत्यंत शूर, बलवान्, अन्नवान्, शत्रूंचा पराजय करणारा, क्रूर, ज्याचे सर्व बाजूंनीं शूर असे योद्धे व परिचारक आहेत असा, केवळ बळापासूनच उत्पन्न झालेला म्हणूनच इतक्या बलानें युक्त व स्तुतिरूपी वाणी जाणणारा आहेस ॥ ३७ ॥

गोत्रभिदं गोविदं वज्रबाहुं जयन्तमज्मं प्रमृणन्तमोजसा । इमꣳसजाताऽअनु वीरयध्वमिन्द्रꣳ सखायोऽअनु सꣳरभध्वम् ॥ ३८ ॥

अर्थ--हे इंद्राच्या मित्रभूत देवांनो, पराक्रम करणाऱ्या इंद्राचे मागें जाऊन शौर्य करून त्याला प्रोत्साहन द्या व वेगवान् अशा त्याचे मागें जाऊन तुम्हीही वेगवान् व्हा. तो इंद्र मेघनाशक, पण्डित, वज्रहस्त, युद्धांत विजयी व बलानें शत्रूंचा नाश करणारा आहे ॥ ३८ ॥

अभि गोत्राणि सहसा गाहमानोऽदयो वीरः शतमन्युरिन्द्रः । दुश्च्यवनः पृतनाषाडयुध्योस्माकꣳ सेनाऽअवतु प्र युत्सु ॥ ३९ ॥

अर्थ—इन्द्र युद्धामध्यें आमच्या सेनांचें उत्तम तऱ्हेनें रक्षण करो. तो असुरकुलनाशक, निर्दय, शूर, शंभर यज्ञ करणारा, अजेय, सेनेचा पराजय करणारा व कोणालाही युद्ध करण्यास कठीण असा आहे. ॥ ३९ ॥

इन्द्रऽआसां नेता बृहस्पतिर्दक्षिणा यज्ञः पुरऽएतु सोमः । देवसेनानामभिभञ्जन्तीनां जयन्तीनां मरुतो यन्त्वग्रम् ॥ ४० ॥

अर्थ—इंद्र व बृहस्पति या शत्रूनाशक व विजयी देवसेनांना वाहून नेवो. यज्ञपुरुष विष्णु त्या सेनांचे दक्षिणेकडे, सोम त्यांचे पूर्वभागीं व मरुद्गण त्यांचे अग्रभागीं गमन करोत ॥ ४० ॥

इन्द्रस्य वृष्णो वरुणस्य राज्ञऽआदित्यानां मरुतां शर्धऽउग्रम् । महामनसां भुवनच्यवानां घोषो देवानां जयतामुदस्थात् ॥ ४१ ॥

अर्थ--अभीष्टफल देणाऱ्या इंद्राच्या, वरुणराजाच्या, द्वादश आदित्यांच्या व युद्धांत स्थिर चित्त असलेल्या, भुवनांचा भ्रंश करण्यास समर्थ आणि विजयी अशा मरुद्गणांचें सैन्य उठलें व त्यांतून ' जिंकले, जिंकले ' असा मोठा शब्द उत्पन्न झाला ॥ ४१ ॥

उद्धर्षय मघवन्नायुधान्युत्सत्वनां मामकानां मनांसि । उद्वृत्रहन् वाजिनां वाजिनान्युद्रथानां जयतां यन्तु घोषाः ॥ ४२ ॥

अर्थ—हे इंद्रा, आपलीं आयुधें व माझ्या योध्यांचीं मनें हर्षित कर. तसेंच वृत्रघातका, घोडयांना लवकर लवकर गमन करावयास लाव. जय मिळविणाऱ्या रथांचे शब्द निघूं दे ॥ ४२ ॥

अस्माकमिन्द्रः समृतेषु ध्वजेष्वस्माकं याऽइषवस्ता जयन्तु । अस्माकं वीराऽउत्तरे भवन्त्वस्माँऽउ देवाऽअवता हवेषु ॥ ४३ ॥

अर्थ—आमचे व शत्रूंचे ध्वज एकत्र झाले असतां म्हणजे घनघोर लढाई सुरू असतां इंद्र आमचें रक्षण करो. त्यावेळीं आमच्या वीरांनीं सोडलेले बाण शत्रुसैन्यांना जिंकोत. आमचेकडील योद्धे शत्रुकडील योध्यापेक्षां उत्कृष्ट ठरोत; आणि हे देवांनो, यज्ञांत आम्ही बोलावल्यावर आमचें रक्षण करा ॥ ४३ ॥

अमीषां चित्तं प्रतिलोभयन्ती गृहाणाङ्गान्यप्वे परेहि । अभिप्रेहि निर्दह हृत्सु शोकैरन्धेनामित्रास्तमसा सचन्ताम् ॥ ४४ ॥

अर्थ—हे व्याधिरूपी देवते, तूं शत्रूंच्या चित्तांत मोह उत्पन्न करून त्यांचीं गात्रें हरण करून घेऊन ये. पुन्हा दुसऱ्या शत्रूंना पकडण्याकरितां त्यांचे समुदायांत गमन कर व त्यांच्या हृदयांत (धनपुत्रादिकांचा) शोक उत्पन्न करून त्यांना पीडा कर; व शत्रु गाढ अंधकारांत मग्न होवोत ॥ ४४ ॥

अवसृष्टा परापत शरव्ये ब्रह्मसंशिते । गच्छामित्रान्प्रपद्यस्व मामीषां कञ्चनोच्छिषः ॥ ४५ ॥

अर्थ—ब्रह्मदेवानें तीक्ष्ण केलेल्या हिंसक बाणरूपी शस्त्रा, आमच्या हातून सुटून तूं परसैन्यांत पतन पाव व शत्रूजवळ जाऊन त्यांचे शरीरांत प्रवेश कर व त्या शत्रूंपैकीं एकही मनुष्य शिल्लक ठेवूं नकोस, सर्वांस मार ॥ ४५ ॥

प्रेता जयता नरऽइन्द्रो वः शर्म यच्छतु । उग्रा वः सन्तु बाहवोऽनाधृष्या यथासथ ॥ ४६ ॥

अर्थ—हे अस्मत्पक्षीय योद्धयांनो, तुम्ही शत्रुसैन्यावर चाल करून जा व विजय मिळवा. इंद्र तुम्हांला विजय सुख देवो. तुमचा कोणीही तिरस्कार करणार नाहीं असे तुमचे बाहु उग्र होवोत ॥ ४६ ॥

असौ या सेना मरुतः परेषामभ्यैति नऽओजसा स्पर्धमाना । तां गूहत तमसापव्रतेन यथामीऽअन्योऽअन्यं न जानन् ॥ ४७ ॥

अर्थ—हे मरुद्गणांनो, बलानें स्पर्धा करणारी जी ही शत्रूंची सेना आमच्यावर चाल करून येत आहे तिला गाढ अंधकारांत मग्न करा. ज्या अंधकारांत कोणतेंही कार्य सुचत नाहीं, अशा, अंधकारांत शत्रुसैन्याला तुम्ही इतके बुडवून टाका कीं, ते शत्रुसैन्यांतील लोक एकमेकांना देखील ओळखूं शकणार नाहींत ॥ ४७ ॥

यत्र बाणाः सम्पतन्ति कुमारा विशिखाऽइव । तन्नऽइन्द्रो बृहस्पतिरदितिः शर्म यच्छतु विश्वाहा शर्म यच्छतु ॥ ४८ ॥

अर्थ—शिखा नसलेले म्हणजे ज्यांचें चौलकर्म झालें नाहीं अर्थात् तीन वर्षांचे आंतील वयाचे बालक ज्याप्रमाणें चपळपणानें इकडे तिकडे धावतात; त्याप्रमाणें शत्रूंचे बाण सर्व बाजूंनीं ज्या युद्धांत पडतात त्या युद्धामध्यें इन्द्र आम्हांला विजयजन्य सुख देवो. तो युद्धांतील अस्त्रांचे मंत्र जाणणारा, अखण्डितशक्ति व सर्व शत्रूंना मारणारा आहे. (आदर दाखविण्याकरितां तो इन्द्र आम्हांस विजय देवो अशा अर्थाचे शब्द मंत्रांत पुन्हा आले आहेत) ॥ ४८ ॥

विनियोग—' मर्माणि ते ' मंत्रानें अध्वर्यूनें क्षत्रियाला कवच द्यावें.

मर्माणि ते वर्मणा छादयामि सोमस्त्वा राजामृतेनानुवस्ताम् । उरोर्वरीयो वरुणस्ते कृणोतु जयन्तं त्वानु देवा मदन्तु ॥ ४९ ॥

अर्थ—हे यजमाना, मी कवचानें तुझ्या स्थानांना झांकतों. सोमराजा मरणनिवारक कवचानें तुझें आच्छादन करो. तसेंच वरुण कवचाला अतिशय विस्तृत करो व देव जय मिळविण्याच्या कामीं तुला अनुकूल होवोत ॥ ४९ ॥

विनियोग—' उदेनम् ' या तीन मंत्रांनीं तीन उंबरांच्या समिधांचा होम करावा.

उदेनमुत्तरां नयाग्ने घृतेनाहुत । रायस्पोषेण सꣳसृज प्रजया च बहुं कृधि ॥ ५० ॥ शतं ९००

अर्थ—घृताच्या आहुति ज्यांत दिलेल्या आहेत अशा, हे अग्ने, या यजमानाना उत्कृष्ट ऐश्वर्य दे. त्याला पुष्कळ धनसमृद्धि व पुष्कळ प्रजा दे ॥ ५० ॥

इन्द्रेमं प्रतरां नय सजातानामसद्वशी । समेनं वर्चसा सृज देवानां भागदाऽअसत् ॥ ५१ ॥

अर्थ—हे ऐश्वर्ययुक्त इंद्रा, या यजमानाला पुष्कळ ऐश्वर्य दे. हा यजमान आपल्या बरोबरीच्या मंडळीचें नियमन करणारा होवो. तसेंच तूं या यजमानाला तेजस्वी कर व हा यजमान यज्ञांत देवांना भाग देणारा होवो ॥ ५१ ॥

यस्य कुर्मो गृहे हविस्तमग्ने वर्धया त्वम् । तस्मै देवाऽअधिब्रुवन्नयं च ब्रह्मणस्पतिः ॥ ५२ ॥

अर्थ—हे अग्ने, ज्याचे घरीं आम्ही हविर्याग करतों त्या यजमानाला तूं वाढव. देव त्या यजमानाला हा सर्वांत अधिक आहे असें म्हणोत. व हा यजमान यज्ञकर्माचा पालक होवो ॥ ५२ ॥

विनियोग—'उदुत्वा' या मंत्रानें प्रतिप्रस्थात्यानें प्रज्वलित इध्म वर उचलावा.

उदु त्वा विश्वे देवाऽअग्ने भरन्तु चित्तिभिः । स नो भव शिवस्त्वꣳ सुप्रतीको विभावसुः ॥ ५३ ॥

अर्थ—हे अग्ने, सर्व प्राणरूपी देव उद्योगप्रवीण अशा वृत्तींनीं तुला वर उचलून धरोत. चांगल्या मुखाचा व प्रकाश हेंच ज्याचें द्रव्य आहे अशा, हे अग्ने, वर धारण केल्यावर आमचें कल्याण करणारा हो ॥ ५३ ॥

विनियोग—'पञ्चदिशः' इत्यादि पांच मंत्र म्हणून ब्रह्मा, होता, अध्वर्यु, प्रतिप्रस्थाता व यजमान या पाचांनीं चित्य अग्नीकडे जावें.

पञ्च दिशो दैवीर्यज्ञमवन्तु देवीरपामतिं दुर्मतिं बाधमानाः । रायस्पोषे यज्ञपतिमाभजन्ती रायस्पोषेऽअधि यज्ञोऽअस्थात् ॥ ५४ ॥

अर्थ—पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर व मध्य अशा पांच प्रकाशक दिशा आमच्या यज्ञाचें रक्षण करोत. त्या दिशा इंद्रयमवरुणसोम व ब्रह्मदेव एतत्संबंधीं आहेत. त्या आमच्या दुष्टबुद्धीच्या जाश करणाऱ्या व यजमानाच्या धनाची वृद्धि करणाऱ्या आहेत; आणि यज्ञ आमच्या धनाच्या वृद्धीनें समृद्ध होवो ॥ ५४ ॥

समिद्धेऽअग्नावधि मामहानऽउक्थपत्रऽईड्यो गृभीतः। तꣳ घर्मं परि-गृहꣳयजन्तोर्जा यद्यज्ञमयजन्त देवाः ॥ ५५ ॥

अर्थ—ऋत्विज् प्रज्वलित प्रवर्ग्य घेऊन ज्यावेळीं हविर्द्रव्यानें याग करतात त्यावेळीं अग्नि प्रदीप्त झाल्यावर शस्त्रें हेंच ज्याचें वाहन आहे असा यज्ञ धारण केला जातो. तो यज्ञ स्तुत्य व देवांचा पूजक आहे ॥ ५५ ॥

दैव्याय धर्त्रे जौष्ट्रे देवश्रीः श्रीमनाः शतपयाः। परिगृहꣳ देवा यज्ञ-मायन् देवा देवेभ्योऽअध्वर्यन्तोऽअस्थुः ॥ ५६ ॥

अर्थ—देवांचें हित करणारा, जगाचा धारक, हविर्द्रव्यांचें सेवन करणाऱ्या अशा अग्नीला यज्ञ दिला जातो तो यज्ञ देवांचें सेवन करणारा, यजमानावर अनुग्रह करणारा व ज्यांत पय वगैरे शतसंख्याक हविर्द्रव्यें आहेत असा आहे. ऋत्विज् अशा यज्ञाग्नीला बरोबर घेऊन यज्ञाकडे येतात व ते प्रकाशमान ऋत्विज् देवाकरितां यज्ञ करण्याच्या इच्छेनें राहतात ॥ ५६ ॥

वीतꣳ हविः शमितꣳ शमिता यजध्यै तुरियो यज्ञो यत्र हव्यमेति। ततो वाकाऽआशिषो नो जुषन्ताम् ॥ ५७ ॥

अर्थ—चतुर्थ असा यज्ञ ज्यावेळीं हविर्द्रव्याला प्राप्त होतो तेव्हां त्यापासून निघालेली ऋग्वेदायुक्त (प्रथम यजुर्जप नंतर होत्रादि ऋचांचें पठन त्यानंतर ब्रह्म्याचा अप्रतिरथ जप व चवथा यज्ञ) फलें आम्हांला प्राप्त होवोत. तें हविर्द्रव्य देवांना इष्ट आणि शमित्यानें यज्ञाकरितां संस्कृत केलें आहे ॥ ५७ ॥

सूर्यरश्मिर्हरिकेशः पुरस्तात्सविता ज्योतिरुदयाँऽ अजस्रम्। तस्य पूषा प्रसवे याति विद्वान्त्सम्पश्यन्विश्वा भुवनानि गोपाः ॥ ५८ ॥

अर्थ—ज्योतीरूपी अग्नि रोज पूर्वेकडे आहवनीयरूपानें उदय पावतो. त्या अग्नीचे किरण सूर्यासारखे, ज्वाला सोन्यासारख्या आहेत; तो प्राण्यांचा प्रेरक आहे अशा ह्या अग्नीच्या आज्ञेनें सूर्य उदय व अस्त पावतो. तो सूर्य आपल्या अधिकारावें कार्य जाणणारा, सर्व लोकांचें उत्तमप्रकारेंकरून अवलोकन करणारा व धर्माचा रक्षक आहे ॥ ५८ ॥

विनियोग—' विमानऽएषः ' इत्यादि दोन मंत्रांनीं अग्नीध्रस्थानाचे दक्षिणभागीं पाषाण स्थापन करावे.

विमानऽएष दिवो मध्यऽआस्तऽआपप्रिवान्रोदसीऽअन्तरिक्षम् । स विश्वाचीरभिचष्टे घृताचीरन्तरा पूर्वमपरं च केतुम् ॥ ५९ ॥

अर्थ—हा जगन्निर्माण करण्यांत समर्थ असा पाषाण, सूर्यरूपानें अन्तरिक्षांत राहतो. या पाषाणानें द्यावापृथिवी व अन्तरिक्ष हे तेजानें पूर्ण केले. हा आदित्यरूपी अश्मा सर्व हविर्द्रव्यें ज्यांत ठेवलीं जातात अशा वेदी व ज्यांत घृत ठेवलें जातें अशा स्रुच्याकडे पहातो. तसेंच तो या ब्रह्माण्डांत होणाऱ्या सूर्याच्या उदय व अस्तांना पहातो ॥ ५९ ॥

उक्षा समुद्रोऽअरुणः सुपर्णः पूर्वस्य योनिं पितुराविवेश । मध्ये दिवो निहितः पृश्निरश्मा विचक्रमे रजसस्पात्यन्तौ ॥ ६० ॥

अर्थ—जो आदित्य पूर्वेकडे असलेल्या द्युलोकस्थानांत प्रवेश करता झाला; तो वृष्टिद्वारां जलसिंचन करणारा, उदयसमयीं दंव पाडून जमीन भिजविणारा, रक्तवर्णाचा, उत्तम रीतीनें गमन करणारा, द्युलोकांत असलेला, नानाप्रकारच्या किरणांनीं युक्त व व्यापक असा आहे. असा तो आदित्य आकाशांत गमन करतो. अशा प्रकारे जात असतां तो लोकांच्या अंतिमभागांप्रत रक्षण करतो ॥ ६० ॥

विनियोग—या पाषाणाला एखाद्या गुप्त जागीं ठेवून 'इन्द्रं विश्वा' इत्यादि चार ऋचा म्हणून सर्वांनीं चयनस्थानाकडे जावें.

इन्द्रं विश्वाऽअवीवृधन्त्समुद्रव्यचसं गिरः । रथीतमꣳ रथीनां वाजानाꣳ सत्पतिं पतिम् ॥ ६१ ॥

अर्थ—ऋग्यजुःसामरूपी सर्व स्तुति इंद्राला वाढवितात. तो इंद्र समुद्राप्रमाणें व्यापक, विविधगतिमान्, सर्व रथींत श्रेष्ठ, अन्नस्वामी व धर्मनिष्ठ लोकांचा पालक आहे ॥ ६१ ॥

देवहूर्षऽआ च वक्षत्सुम्नहूर्षऽआ च वक्षत् । यक्षदग्निर्देवो देवाँऽआ च वक्षत् ॥ ६२ ॥

अर्थ—देवांना बोलावणारा व सुखकारक यज्ञ देवांना बोलावो. व अग्निदेव देवांना बोलवो व त्यांचा यज्ञ करो ॥ ६२ ॥

वाजस्य मा प्रसवऽउद्ग्राभेणोदग्रभीत् । अधा सपत्नानिन्द्रो मे निग्राभेणाधराँऽअकः ॥ ६३ ॥

अर्थ—अन्नाची प्रसूती मला दान देण्याकरितां उंच हात करायला लावो व इंद्र माझ्या शत्रूंना भिक्षा मागण्याकरितां खालीं हात करावयास लावो. (म्हणजे मी दाता व्हावें व माझ्या शत्रूंनीं अन्नाभावास्तव याचक व्हावें) ॥ ६३ ॥

उद्ग्राभं च निग्राभं च ब्रह्म देवाऽअवीवृधन्। अधा सपत्नानिन्द्राग्नी मे विषूचीनान्व्यस्यताम् ॥ ६४ ॥

अर्थ—देव आमचा उत्कर्ष, शत्रूंचा अपकर्ष व यज्ञविषयक तीन वेद यांस वाढवो. नंतर इंद्राग्नींनीं माझ्या शत्रूंना निरनिराळ्या दिशांकडे जावयास लावून त्याचा नाश करण्याकरितां व ते पुनः न येवोत याकरितां लांब फेकून द्यावे ॥ ६४ ॥

विनियोग—' क्रमध्वमग्निना ' इत्यादि पांच मंत्रांनीं ऋत्विजांनीं चित्याग्नीवर आरोहण करावें.

क्रमध्वमग्निना नाकमुख्यꣳ हस्तेषु बिभ्रतः। दिवस्पृष्ठꣳ स्वर्गत्वा मिश्रा देवेभिराध्वम् ॥ ६५ ॥

अर्थ—हे ऋत्विग्यजमानांनो, उख्य अग्नीला हातांत धारण करून तुम्ही या अग्नीचे द्वारां स्वर्ग लोकाचें आक्रमण करा. नंतर अन्तरिक्षाच्या पृष्ठावर जाऊन देवांशीं युक्त होऊन स्वर्गावर उपवेशन करा (बसा) ॥ ६५ ॥

प्राचीमनु प्रदिशं प्रेहि विद्वानग्नेरग्ने पुरोऽअग्निर्भवेह। विश्वाऽआशा दीयानो विभाह्यूर्जं नो धेहि द्विपदे चतुष्पदे ॥ ६६ ॥

अर्थ—आपला अधिकार जाणणाऱ्या व आतां आणलेल्या हे उख्य अग्ने, पूर्व दिशेच्या धोरणानें जा, व इष्टकानिष्पादित अशा चितिरूपी अग्नीच्या सन्मुख रहा. तसेंच सर्व दिशांना प्रकाशित कर व तूंही विशेष रीतीनें प्रकाशित हो. नंतर आमच्या पुत्रादिकांना व पश्वादिकांना अन्न दे ॥ ६६ ॥

पृथिव्याऽअहमुदन्तरिक्षमारुहमन्तरिक्षाद्दिवमारुहम्। दिवो नाकस्य पृष्ठात् स्वर्ज्योतिरगामहम् ॥ ६७ ॥

अर्थ—मी यजमान पृथ्वीलोकांतून वर जाऊन अन्तरिक्षाप्रत आरोहण करता झालों. तेथून द्युलोकाप्रत तेथून दुःखरहित स्वर्गपृष्ठाप्रत प्राप्त झालों व तेथून ऊर्ध्व अशा स्वर्गलोकस्थ तेजःस्थानाप्रत प्राप्त होईन ॥ ६७ ॥

स्वर्यन्तो नापेक्षन्तऽआ याꣳरोहन्ति रोदसी । यज्ञं ये विश्वतोधारꣳ सुविद्वाꣳसो वितेनिरे ॥ ६८ ॥

अर्थ—चांगले विद्वान् यज्ञाचें अनुष्ठान करतात तो यज्ञ सर्वत्र आहुति दक्षिणा व अन्नरूपी धारा आहेत ज्याच्या असा आहे. यज्ञ करणारे स्वर्गांत जात असतां पुत्रादिकांची अपेक्षा करीत नाहींत व ते जरामृत्यु वगैरेंना दूर करणाऱ्या द्युलोकाप्रत आरोहण करतात. ॥ ६८ ॥

अग्ने प्रेहि प्रथमो देवयतां चक्षुर्देवानामुत मर्त्यानाम् । इयक्षमाणा भृगुभिꣳ सजोषाꣳ स्वर्यन्तु यजमानाꣳ स्वस्ति ॥ ६९ ॥

अर्थ—हे अग्ने, देवेच्छु यजमानांच्या अग्रभागीं विशेषेंकरून जा. कारण कीं, तूं देव व मनुष्यें यांच्या नेत्रांच्या स्थानीं आहेस. व भृगुगोत्रांतील उत्तम ब्राह्मणांवर प्रीति करणारे यज्ञ करण्याची इच्छा करणारे यजमान कल्याणकारक रीतीनें स्वर्गाप्रत जावोत. ॥ ६९ ॥

विनियोग—' नक्तोषासा ' या दोन ऋचांनीं अध्वर्यूनें स्वयमातृण्णासंज्ञक इष्टकेवर सिंचन करून इध्मस्थ अग्नीवर होम करावा.

नक्तोषासा समनसा विरूपे धापयेते शिशुमेकꣳ समीची । द्यावाक्षामा रुक्मोऽअन्तर्विभाति देवाऽअग्निं धारयन् द्रविणोदाꣳ ॥ ७० ॥

अर्थ—आईबाप मुलांचें पोषण करतात त्याप्रमाणें रात्रि व दिवसा या एका अग्नीचा सायंप्रातर्होमादिकांनीं संतोष करतात. त्या रात्रीदिवसांचें रूप विचित्र आहे. तरी त्यांचें ऐकमत्य आहे. द्यावापृथिवीच्या मध्यभागीं अन्तरिक्षांत जो सुवर्णरूपी अग्नि प्रकाशतो त्याला मी नेतों. यागद्वारां धनरूप फल देणारे देव ज्या अग्नीला धारण करते झाले त्याला मी नेतों ॥ ७० ॥

अग्ने सहस्राक्ष शतमूर्धञ्छतं ते प्राणाꣳ सहस्रं व्यानाꣳ । त्वꣳ साह-स्रस्य रायऽईशिषे तस्मै ते विधेम वाजाय स्वाहा ॥ ७१ ॥

अर्थ—हिरण्यशकलरूपी सहस्र नेत्रांच्या व शंभर मस्तकांच्या अग्ने, तुझे प्राण व व्यान अपरिमित आहेत व तूं अपरिमित द्रव्यांचा स्वामी आहेस अशा तुला आम्ही अन्नरूपी हवि देतों तें सुहुत असो ॥ ७१ ॥

विनियोग—' सुपर्णोऽसि ' या दोन मंत्रांनीं स्वयमातृण्णा इष्टकेवर अग्नि-स्थापन करावें.

सुपर्णोऽसि गरुत्मान् पृष्ठे पृथिव्याः सीद । भासान्तरिक्षमापृण ज्योतिषा दिवमुत्तमान तेजसा दिशऽउद्दृꣳह ॥ ७२ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं गरुडाच्या आकाराचा व अशनाया (भूक) वान् आहेस म्हणून पृथ्वीवर बैस व आपल्या प्रकाशानें अन्तरिक्षाला पूर्ण कर व आपल्या सामर्थ्यानें द्युलोकाला वर कर. व आपल्या तेजानें दिशांना दृढ कर ॥ ७२ ॥

आजुह्वानꣳ सुप्रतीकꣳ पुरस्तादग्ने स्वं योनिमासीद साधुया । अस्मिन्त्सधस्थेऽअध्युत्तरस्मिन्विश्वे देवा यजमानश्च सीदत ॥ ७३ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं आमच्याकडून बोलावला गेलेला शोभन मुखाचा होऊन पूर्व-दिशेकडील आपल्या उत्तम स्थानाप्रत अधिष्ठित हो. हे विश्वेदेवांनो, तुम्ही व यजमानानें अग्नीसह अधिष्ठित होण्यास योग्य अशा पुढें असलेल्या उत्तम स्वर्ग-स्थानावर उपवेशन करा ॥ ७३ ॥

विनियोग—अग्निस्थापनानंतर अध्वर्यूनें ' ताꣳसवितुः, ' इत्यादि तीन मंत्रांनीं तीन समिधांचा होम करावा.

ताꣳ सवितुर्वरेण्यस्य चित्रामाहं वृणे सुमतिं विश्वजन्याम् । यामस्य कण्वोऽअदुहत्प्रपीनाꣳ सहस्रधारां पयसा महीं गाम् ॥ ७४ ॥

अर्थ—श्रेष्ठ अशा सवित्याच्या त्या सद्बुद्धीचा मी स्वीकार करतों. ती सद्बुद्धि आम्हांला इष्ट अशीं नानाविध फलें देणारी आहे व सर्व लोकांचें हित करणारी आहे. ज्या धेनुरूपी सद्बुद्धींचें कण्वमुनीनें दोहन केलें; जी सद्बुद्धि धेनु दुग्धानें पूर्ण, क्षीराच्या सहस्रधारांनीं युक्त व सर्वसिद्धि देणारी म्हणून मोठी आहे ॥ ७४ ॥

विधेम ते परमे जन्मन्नग्ने विधेम स्तोमैरवरे सधस्थे । यस्मायोनेरुदारिथा यजे तं प्र त्वे हवी षि जुहुरे समिद्धे ॥ ७५ ॥

अर्थः— हे अग्ने, उत्कृष्ट जन्मांत म्हणजे द्युलोकांत सूर्यरूपानें स्थित अशा तुला आम्ही हविर्द्रव्य देतों. तसेंच द्युलोकाचे अधोभागीं अग्नीसह असलेल्या अन्तरिक्ष लोकांत विद्युद्रूपानें असलेल्या तुझी आम्ही स्तुति करतों. हे अग्ने, ज्या इष्टकाचयन-रूपी स्थानांतून तूं उदय पावलास त्याची आम्ही पूजा करितों. नंतर प्रज्वलित झालेल्या अशा तुझ्या ठायीं ऋत्विज होम करतात ॥ ७५ ॥

प्रेद्धोऽअग्ने दीदिहि पुरो नोऽजस्रया सूर्म्या यविष्ठ । त्वाꣳशश्वन्तऽउपयन्ति वाजाः ॥ ७६ ॥

अर्थ—हे तरुणतम अग्ने, आम्ही तुझ्यांत निरंतर समिधा घालतों व तूं आमच्या पुरोभागीं प्रदीप्त हो. कारण तुजकडे हविर्द्रव्यरूपी अन्नें निरंतर प्राप्त होतात ॥ ७६ ॥

विनियोग—' अग्ने तम् ' इत्यादि दोन मंत्रांनीं दोन घृताहुतींचा अग्नींत होम करावा.

अग्ने तमद्याश्वं न स्तोमैः क्रतुं न भद्रꣳ हृदिस्पृशम् । ऋध्यामा तऽओहैः ॥ ७७ ॥

अर्थ—हे अग्ने, ज्याप्रमाणें ब्राह्मण स्तुति करून अश्वमेधांतील घोड्याला व तसेंच ते अत्यंत आवडत्या अशा आपल्या संकल्पाला पूर्ण करतात; त्याप्रमाणें फलदायी अशा सामसमुदायांनीं तुझ्या यज्ञाला आम्ही समृद्ध करतों ॥ ७७ ॥

चित्तिं जुहोमि मनसा घृतेन यथा देवाऽइहागमन्वीतिहोत्राऽऋतावृधः । पत्ये विश्वस्य भूमनो जुहोमि विश्वकर्मणे विश्वाहादाभ्यꣳ हविः ॥ ७८ ॥

अर्थ—संशयात्मक तें मन, निश्चयात्मक तें चित्त आणि घृत यांचा मी अग्नीशीं असा संबंध करतों कीं, ज्यायोगें देव या यज्ञांत येतील. ते देव यज्ञेच्छु व सत्य वाढविणारे असे आहेत व रोज अक्षीण व मधुर अशा हविर्द्रव्याचा मी प्रजापतीला होम करतों. तो प्रजापति सर्वकार्यकर्ता व मोठ्या जगाचा स्वामी आहे ॥ ७८ ॥

विनियोग—' सप्त ते ' इत्यादि मंत्रानें पूर्णाहुतीचा होम करावा.

सप्त तेऽअग्ने समिधः सप्त जिह्वाः सप्तऽऋषयः सप्त धाम प्रियाणि । सप्तहोत्राः सप्तधा त्वा यजन्ति सप्त योनीरापृणस्व घृतेन स्वाहा ॥ ७९ ॥

अर्थ—हे अग्ने, सात समिधा तुझे प्राण, सात ज्वाला तुझ्या जिव्हा, मरीच्यादि सात तुझे द्रष्टे ऋषि, गायत्र्यादि सप्त छन्द तुझीं स्थानें आहेत. तसेंच हे अग्ने, होता वगैरे सात ऋत्विज् अग्निष्टोमादि सप्त संस्थांनीं तुझें यजन करतात व तूं सप्त चितींना घृतानें पूर्ण कर. हें हवि सुहुत असो ॥ ७९ ॥

विनियोग—' शुक्रज्योतिश्च ' वगैरे प्रत्येक मंत्रानें मरुत् देवताक पुरोडाशाचा होम करावा.

शुक्रज्योतिश्च चित्रज्योतिश्च सत्यज्योतिश्च ज्योतिष्माँश्च । शुक्रश्च ऽऋतपाश्चात्यꣳ हाꣳ ॥ ८० ॥

अर्थ—शुक्रज्योतिनामक वगैरे ४९ एकोणपन्नास मरुद्देवतांनो, तुम्ही आज आमच्या या यज्ञांत या. १ ज्यांचें तेज शुद्ध आहे २ ज्याची ज्योति दर्शनीय आहे ३ ज्याचें तेज ब्रह्मरूपी आहे ४ तेजस्वी ५ प्रदीप्त ६ यज्ञरक्षक ७ पापांचें अतिक्रमण करणारा ॥ ८० ॥

ईदृङ् चान्यादृङ् च सदृङ् च प्रतिसदृङ् च । मितश्च सम्मितश्च सभराꣳ ॥ ८१ ॥

अर्थ—८ या पुरोडाशाकडे पाहणारा ९ दुसऱ्याही पुरोडाशाकडे पाहणारा १० सारखें पाहणारा ११ निरनिराळ्या पुरोडाशांकडे सारखें पाहणारा १२ मोजलेला १३ एकत्र मोजलेला १४ एकत्र धारण करणारा ॥ ८१ ॥

ऋतश्च सत्यश्च ध्रुवश्च धरुणश्च । धर्ता च विधर्ता च विधारयꣳ ॥८२॥

अर्थ—१५ सत्यरूपी १६ सद्वस्तूंत राहणारा १७ स्थिर १८ स्वतः धारण करणारा १९ दुसऱ्याकडून धारण करविणारा २० विशेषेंकरून धारण करविणारा २१ नानाप्रकारें करून धारण करविणारा ॥ ८२ ॥

ऋतजिच्च सत्यजिच्च सेनजिच्च सुषेणश्च । अन्तिमित्रश्च दूरेऽअमित्रश्च गणꣳ ॥ ८३ ॥

अर्थ— २२ यज्ञ जिंकणारा २३ सत्य जिंकणारा २४ शत्रुसेनेला जिंकणारा २५ उत्तम सेनायुक्त २६ ज्याचे मित्र समीप आहेत २७ ज्याचे शत्रु दूर आहेत २८ सर्वांना मोजणारा ॥ ८३ ॥

ईहक्षासऽएतादृक्षासऽऊ षु णः सदृक्षासꣳ प्रतिसदृक्षासऽएतन । मितासश्च सम्मितासो नोऽअथ सभरसो मरुतो यज्ञेऽअस्मिन् ॥ ८४ ॥

अर्थ—२९ जवळचे पाहणारे ३० फारच जवळचें पाहणारे ३१ सारखे पहाणारे ३२ प्रत्येक वस्तूकडे सारखे पहाणारे ३३ प्रमाणानें मोजले गेलेले ३४ एकत्र होऊन मोजले गेलेले ३५ सारखे दागिने घालणारे ॥ ८४ ॥ (या मंत्रांत आदरार्थी बहुवचन आहे.)

स्वतवाँश्च प्रघासी च सान्तपनश्च गृहमेधी च । क्रीडी च शाकी चोज्जेषी ॥ ८५ ॥

अर्थ—३६ स्वाधीनबलानें युक्त ३७ पुष्कळ पुरोडाश खाणारे ३८ सूर्यसंबंधी ३९ गृहस्थधर्मवान् ४० क्रीडाशील ४१ समर्थ ४२ उत्कृष्टजयशील (उग्रश्चया कंसांतील मंत्राचा अर्थ) ४३ उत्कृष्ट ४४ भीतिप्रद ४५ शत्रूंना अन्ध करणारा ४६ शत्रूंना कापविणारा ४७ शत्रुबल सहन करणारा ४८ भक्तांना सुखप्रद व ४९ शत्रुविनाशक या ४९ मरुद्देवतांना हें हवि सुहुत असो ॥ ८५ ॥

इन्द्रं दैवीर्विशो मरुतोऽनुवर्त्मानोऽभवन्यथेन्द्रं दैवीर्विशोमरुतोऽनुवर्त्मानोऽभवन् । एवमिमं यजमानं दैवीश्च विशो मानुषीश्चानुवर्त्मानो भवन्तु ॥ ८६ ॥

अर्थ—मरुद्रूपी देवप्रजा इंद्राचें अनुगमन करत्या झाल्या. ज्याप्रमाणें मरुद्रूपी दैवप्रजा इंद्राचें अनुगमन करत्या झाल्या त्याप्रमाणें दैव व मानुष प्रजा या यजमानाचें अनुगमन करोत ॥ ८६ ॥

विनियोग—अध्वर्यूनें ' इमꣳस्तनम् ' इत्यादि १३ ऋचा यजमानाकडून म्हणवाव्या अथवा स्वतः म्हणाव्या.

इमꣳस्तनꣳसूर्जस्वन्तं धयापां प्रपीनमग्ने सरिरस्य मध्ये । उत्सं जुषस्व मधुमन्तमर्वन्त्समुद्रियꣳ सदनमाविशस्व ॥ ८७ ॥

अर्थ—हे अग्ने, या लोकांत राहून तूं या स्रुचेंतून पडणारी घृताची धारा पी. ती धारा विशिष्ट रसयुक्त घृतानें पूर्ण अशी आहे. हे सर्वत्र गमन करणाऱ्या अग्ने, सर्वत्र उसळणाऱ्या स्रुच्यारूपी कूपाचें सेवन कर. तो कूप मधुररसात्मक घृतानें युक्त असा आहे. तदनंतर हे अग्ने, तूं तृप्त होऊन चयनयागसंबंधी अशा आपल्या घराचें सेवनकर ॥ ८७ ॥

घृतं मिमिक्षे घृतमस्य योनिर्घृते श्रितो घृतमस्वस्य धाम । अनुष्वधमावह मादयस्व स्वाहाकृतं वृषभ वक्षि हव्यम् ॥ ८८ ॥

अर्थ—मी अग्निमुखांत घृताचा होम करण्याची इच्छा करतों; कारण घृत हें अग्नीचें उत्पत्तिस्थान आहे. तो अग्नि घृताचा आश्रय करतो; कारण घृतच त्याचें घर

आहे. म्हणून हे अध्वर्यो, प्रथम तूं अन्न तयार करून ठेव व नंतर अग्नीला बोलाव. व त्याला संतुष्ट कर आणि सांग कीं इष्ट वस्तूंची वृष्टि करणाऱ्या हे अग्ने, स्वाहाकारानें होमलेलें हें हविर्द्रव्य तूं देवांकडे ने ॥ ८८ ॥

विनियोग—या मंत्रांत अन्नाचा अध्यास करून घृताची व प्राणाचा अध्यास करून अग्नीची स्तुति केली आहे.

समुद्रादूर्मिर्मधुमाँ२ऽ उदारदुपाꣳ शुना सममृतत्वमानट् । घृतस्य नाम गुह्यं यदस्ति जिह्वा देवानाममृतस्य नाभिः ॥ ८९ ॥

अर्थ—घृतमय समुद्रांतून रसवान् अशी एक लाट उत्पन्न झाली. नंतर ती लाट जगत्प्राणभूत अग्नीशीं एकत्र होऊन अमृतत्ववाला (अविनाशित्ववाला) प्राप्त होते. त्या घृताचें कोणाला ठाऊक नसलेलें गुप्त असें नांव म्हणजे देवांची जिव्हा असें आहे. म्हणजे घृत दिसल्याबरोबर त्याच्या अभिलाषानें देव आपली जिव्हा लांबवितात व त्याचें सर्वविदित असें नांव अमृताची नाभि असें आहे ॥ ८९ ॥

वयं नाम प्रब्रवामा घृतस्यास्मिन् यज्ञे धारयामा नमोभिः । उप ब्रह्मा शृणवच्छस्यमानं चतुः शृङ्गोऽवमीद्गौर एतत् ॥ ९० ॥

अर्थ—घृताचें नामोच्चारण देखील देवांना आवडतें म्हणून त्या नांवाची आम्ही स्तुति करतों व अन्नांनीं यज्ञाचें धारण करतों व ब्रह्मा या ऋत्विजानें आम्ही स्तुत असें घृताचें नांव तसें ऐकावें; ज्या योगें चार ऋत्विज ज्यांचे शृंगस्थानीय आहेत व जो शुद्ध आहे असा यज्ञ आम्हांला हें घृतयज्ञाचें फल देतो ॥ ९० ॥

विनियोग—या मंत्रांत पूर्वोक्त चतुःशृंगात्मक यज्ञाची वृषभरूपानें स्तुति आहे.

चत्वारि शृङ्गा त्रयोऽअस्य पादा द्वे शीर्षे सप्त हस्तासोऽअस्य । त्रिधा बद्धो वृषभो रोरवीति महो देवो मर्त्याँ२ऽ आविवेश ॥ ९१ ॥

अर्थ—अभीष्ट फलांची वृष्टि करणारा असा जो मोठा देव (यज्ञ) तो सर्व मनुष्यांच्या शरीरांत व्याप्त होऊन राहतो. त्याचे १ ब्रह्मा, २ होता, ३ अध्वर्यु, ४ उद्गाता हीं चार शिंगें आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद हे तीन पाय आहेत. हविर्धान व प्रवर्ग्य हीं दोन मस्तकें आहेत. सप्तच्छन्द त्याचे हात आहेत व तो प्रातःसवन, माध्यंदिनसवन व तृतीयसवन यांनीं बांधलेला आहे. ॥ ९१ ॥

त्रिधा हितं पणिभिर्गुह्यमानं गवि देवासो घृतमन्वविन्दन् । इन्द्रऽएकꣳ सूर्यऽएकं जजान वेनादेकꣳस्वधया निष्टतक्षुꣳ ॥ ९२ ॥

अर्थ—देवांनीं क्रमेंकरून धेनूचे ठिकाणीं घृत मिळविलें. तें तीन प्रकारेकरून या लोकांत स्थापन केलेलें, यज्ञाचा परिणाम असलेलें व असुरांनीं रक्षण केलेलें आहे. त्याचा एक भाग इंद्रानें उत्पन्न केला व दुसरा सूर्यानें उत्पन्न केला व द्विजातींनीं त्याचा तिसरा भाग यज्ञसाधनभूत अग्निपासून स्वधारूपी अन्नानें निर्माण केला ॥९२॥

एताऽअर्षन्ति हृद्यात्समुद्राच्छतव्रजा रिपुणा नावचक्षे । घृतस्य धाराऽअभिचाकशीमि हिरण्ययो वेतसो मध्यऽआसाम् ॥ ९३ ॥

अर्थ—या वाणी श्रद्धारूपी उदकानें भरलेल्या देवतोपासनचिन्तनमय समुद्रांतून निघतात. त्या वाणींचे शेकडों अर्थ आहेत व कुतार्किकरूपी शत्रूंना त्या अर्थांना दोष देतां येत नाहीं. मी त्या वाणींना घृताच्या धारांप्रमाणें पहातों. तसेंच या वाणीमध्यें असलेला त्यांचा अधिष्ठाता जो प्रकाशमान अग्नि त्यालाही मी पाहतों ॥ ९३ ॥

सम्यक् स्रवन्ति सरितो न धेनाऽअन्तर्हृदा मनसा पूयमानाः । एतेऽअर्षन्त्यूर्मयो घृतस्य मृगा इव क्षिपणोरीषमाणाः ॥ ९४ ॥

अर्थ—नद्यांप्रमाणें अविच्छिन्न प्रवाहानें त्या वाणी उत्तमरीतीनें पसरतात. त्या वाणी शरीरांतील हृदयानें व मनानें पवित्र केल्या आहेत; म्हणजे मनानें व हृदयानें त्या वाणींतील दोष काढून टाकले आहेत. बाण टाकणाऱ्या व्याधापासून भिऊन पळणाऱ्या मृगांप्रमाणें जे घृताचे ओघ स्रुचेंतून खालीं सांडतात; ते व वरील वाणी अग्नीचीच स्तुति करतात ॥ ९४ ॥

सिन्धोरिव प्राध्वने शूघनासो वातप्रमियः पतयन्ति यह्वाः । घृतस्य धाराऽअरुषो न वाजी काष्ठा भिन्दन्नूर्मिभिः पिन्वमानः ॥ ९५ ॥

अर्थ—ज्याप्रमाणें शीघ्रगमन करणाऱ्या वाऱ्यानें फुटणाऱ्या लाटा विषमप्रदेशांत जाऊन पडतात; तसेंच ज्याप्रमाणें संग्रामप्रदेशांचा भेद करणारा व श्रमजन्य घर्मोदिकांनीं भूमि भिजविणारा उत्तम जातीचा घोडा तृण भक्षण करतो, त्याप्रमाणें स्रुचेंतून खालीं सांडणाऱ्या मोठ्या घृतधारांना अग्नि भक्षण करतो ॥ ९५ ॥

अभिप्रवन्त समनेव योषाः कल्याण्यः स्मयमानासोऽअग्निम् । घृतस्य धारा समिधो नसन्त ता जुषाणो हर्यति जातवेदाः ॥ ९६ ॥

अर्थ—पतीच्या मनाप्रमाणें वागणाऱ्या, रूपयौवनसंपन्न व गालांतल्या गालांत हसणाऱ्या स्त्रिया ज्याप्रमाणें पतिसमीप गमन करतात; त्याप्रमाणें प्रदीप्त करणाऱ्या घृताच्या धारा अग्नीप्रत प्राप्त होऊन त्याला व्याप्त करतात व प्रज्ञानवान् असा अग्नि संतुष्ट होऊन त्या धारांना प्राप्त करतो व त्यांची इच्छा करतो ॥ ९६ ॥

कन्याऽइव वहतुमेतवाऽउऽ अज्यु॒ज्जाना ऽअभिचाकशीमि । यत्र सोमः॑ सूयते यत्र॑ य॒ज्ञो घृतस्य धाराऽअभि तत्पवन्ते ॥ ९७ ॥

अर्थ—ज्या ठिकाणीं सोमरसाचें कंडण होतें व जेथें सौत्रामणि यज्ञ होतो तेथें जाणाऱ्या घृतधारांना मी पहातों. त्या घृतधारा स्पष्ट स्त्रीचिन्ह धारण करणाऱ्या व भर्त्याकडे जाणाऱ्या कन्याप्रमाणे आहेत; म्हणजे वरील कन्या ज्याप्रमाणें भर्त्याकडे गमन करतात त्याप्रमाणें घृतधारा यज्ञाकडे जातात ॥ ९७ ॥

अभ्यु॑र्षत सुष्टु॒तिं गव्य॑माजि॒मस्मासु॑ भ॒द्रा द्रवि॑णानि धत्त । इ॒मं य॒ज्ञं नय॑त दे॒वता॑ नो घृ॒तस्य॒ धारा॒ मधु॑मत्पवन्ते ॥ ९८ ॥

अर्थ—हे देवांनो, तुम्ही स्तुति श्रवण करा व स्वर्ग देणाऱ्या घृतयुक्त यज्ञाप्रत प्राप्त व्हा व तुम्ही यज्ञांत येऊन आम्हांला उत्तम द्रव्ये द्या व आमचा हा सौत्रामणी यज्ञ देवलोकांत न्या व या मधुर रसयुक्त पसरणाऱ्या घृताच्या धाराही देवलोकांत न्या ॥ ९८ ॥

धाम॑ ते॒ वि॒श्वं भु॒व॒न॒मधि॑ श्रितम॒न्तः स॑मु॒द्रे हृ॒द्य॒न्तरायु॑षि । अ॒पाम॑नीके समि॒थे य॒ऽआभृ॑त॒स्तमश्या॑म॒ मधु॑मन्तं त॒ऽऊ॒र्मिम् ॥ ९९ ॥

अर्थ—हे अग्ने, संपूर्ण भूतसमुदाय तुझ्या विभूतीच्या आश्रयानें राहिला आहे. तसेंच समुद्रांत असणारीं, हृदयांत असणारीं, हिरण्यगर्भाच्या आयुष्यांत उत्पन्न होणारीं हीं सर्व भूतें तुझ्या विभूतीच्याच आश्रयानें राहिलीं आहेत. म्हणून आम्ही मधुररसयुक्त अशा तुझ्या घृतप्रवाहाचें भक्षण करतों. तो घृतप्रवाह जलाचे मुखांत असलेला राक्षसांशीं युद्ध करून देवांनीं आणला. ॥ ९९ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**
माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** *सप्तदशोऽध्यायः समाप्तः॥१७॥*

इति सप्तदशोऽध्यायः समाप्तः ।

अथ अष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥



विनियोग—(सतराव्या अध्यायांत चित्यारोहणाचे मंत्र सांगितले. अठराव्या अध्यायांत वसोर्धारेसंबंधीं मंत्र सांगतात.) नंतर यजमानानें आज्यसंस्कार करून मोठ्या स्रुव्यानें तें संस्कृत घृत पांच वेळां उंबराच्या मोठ्या स्रुचेमध्यें घेऊन त्या घृताची अग्नीवर सारखी धार लावावी. घृत अग्नीशीं संयुक्त झाल्यावर ' वाजश्च ' पासून ' वेहत्स्वाहा 'पर्यंत २९ एकोण तीस मंत्र म्हणावे.

वाजश्च मे प्रसवश्च मे प्रयतिश्च मे प्रसितिश्च मे धीतिश्च मे क्रतुश्च मे स्वरश्च मे श्लोकश्च मे श्रवश्च मे श्रुतिश्च मे ज्योतिश्च मे स्वश्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ १ ॥

अर्थ—मीं केलेल्या यज्ञानें वाजादि पदार्थ मला प्राप्त होवोत. १ अन्न २ अन्नदानाची आज्ञा ३ शुद्धि ४ अन्नविषयक उत्कण्ठा ५ ध्यान ६ संकल्प ७ उत्तम शब्द ८ स्तुति ९ वेदमंत्र १० ब्राह्मणग्रंथ ११ प्रकाश १२ स्वर्ग ॥ १ ॥

प्राणश्च मेऽपानश्च मे व्यानश्च मेऽसुश्च मे चित्तं च मऽआधीतं च मे वाक् च मे मनश्च मे चक्षुश्च मे श्रोत्रं च मे दक्षश्च मे बलं च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ २ ॥

अर्थ—१३ ऊर्ध्वगामी वायु १४ अधोगामी वायु १५ सर्वशरीरसंचारी वायु १६ प्रवृत्तिमान् वायु १७ मानससंकल्प १८ बाह्यविषयज्ञान १९ वागिन्द्रिय २० मन २१ चक्षु २२ श्रवणेंद्रिय २३ ज्ञानेन्द्रियकौशल्य २४ कर्मेंद्रियकौशल्य ॥ २ ॥

ओजश्च मे सहश्च मऽआत्मा च मे तनूश्च मे शर्म च मे वर्म च मेऽङ्गानि च मेऽस्थीनि च मे परूंषि च मे शरीराणि च मऽआयुश्च मे जरा च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ ३ ॥

अर्थ—२५ बलाचें कारण तेंच २६ शारीरबल २७ परमात्मा २८ सुंदर शरीर २९ सुख ३० कवच ३१ हस्तादि अवयव ३२ अस्थि (हाडें) ३३ बोटाचीं पेरें ३४ सामान्य शरीरावयव ३५ जीवन ३६ म्हातारपण ॥ ३ ॥

ज्यैष्ठ्यं च मऽआधिपत्यं च मे मन्युश्च मे भामश्च मेऽमश्च मेऽम्भश्च

मे जेमा च मे महिमा च मे वरिमा च मे प्रथिमा च मे वर्षिमा च मे द्राघिमा च मे वृद्धं च मे वृद्धिश्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ ४ ॥

अर्थ—३७ प्रशस्तपणा ३८ स्वामित्व ३९ मनांतील कोप ४० शरीरावर दिसणारा कोप ४१ अपरिमितपणा ४२ थंड व गोड पाणी ४३ जयसामर्थ्य ४४ धनाचा मोठेपणा ४५ संततीचें विशालत्व ४६ गृहादिविस्तार ४५ दीर्घ जीवित ४६ अविच्छिन्न संतति ४७ अन्नद्रव्यादिकांचें बाहुल्य ४८ विद्यादिकांचा उत्कर्ष ॥ ४ ॥

सत्यं च मे श्रद्धा च मे जगच्च मे धनं च मे विश्वं च मे महश्च मे क्रीडा च मे मोदश्च मे जातं च मे जनिष्यमाणं च मे सूक्तं च मे सुकृतं च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ ५ ॥

अर्थ—४९ खरें बोलणें ५० परलोकविश्वास ५१ जंगम वस्तु ५२ सुवर्णादि द्रव्य ५३ स्थावर वस्तु ५४ दीप्ति ५५ घृतादि क्रीडा ५६ त्यांपासून होणारा आनंद ५७ पूर्वी झालेली संतति ५८ पुढें होणारी संतति ५९ ऋक्समूह ६० त्याच्या पठणाचें पुण्य ॥ ५ ॥

ऋतं च मेऽमृतं च मेऽयक्ष्मं च मेऽनामयच्च मे जीवातुश्च मे दीर्घायुत्वं च मेऽनमित्रं च मेऽभयं च मे सुखं च मे शयनं च मे सूषाश्च मे सुदिनं च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ ६ ॥

अर्थ—६१ यज्ञादि कर्म ६२ त्याचें स्वर्गादि फल ६३ क्षयादि महारोगांचा अभाव ६४ सामान्य रोगांचा अभाव ६५ व्याधिनाशक औषधि ६६ दीर्घायुष्य ६७ शत्रूंचा अभाव ६८ अभय ६९ आनन्द ७० उत्तम शय्या ७१ उत्तम प्रातःकाल ७२ चांगला दिवस ॥ ६ ॥

यन्ता च मे धर्ता च मे क्षेमश्च मे धृतिश्च मे विश्वं च मे महश्च मे संविच्च मे ज्ञात्रं च मे सूश्च मे प्रसूश्च मे सीरं च मे लयश्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ ७ ॥

अर्थ—७३ अश्वादिकांचा नियामक ७४ पोषण करणारा ७५ असलेलें द्रव्य रक्षण करण्याचें सामर्थ्य ७६ धैर्य ७७ सर्वानुकूलता ७८ आदर ७९ वेदशास्त्रादि ज्ञान ८० विज्ञान सामर्थ्य ८१ पुत्रप्रेरण सामर्थ्य ८२ पुत्रजनन सामर्थ्य ८३ नांगरादि साहाय्यानें उत्पन्न होणारें धान्य ८४ शेतीला होणाऱ्या प्रतिबन्धाची निवृत्ति ॥ ७ ॥

शं च मे मयश्च मे प्रियं च मेऽनुकामश्च मे कामश्च मे सौमनसश्च मे भगश्च मे द्रविणं च मे भद्रं च मे श्रेयश्च मे वसीयश्च मे यशश्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ ८ ॥

अर्थ—८५ ऐहिक सुख ८६ पारलौकिक सुख ८७ प्रिय वस्तु ८८ अनुकूल यत्नसाध्य पदार्थ ८९ विषयजन्य सुख ९० मनाची प्रसन्नता करणारा बन्धुवर्ग ९१ सौभाग्य ९२ द्रव्य ९३ कल्याण ९४ श्रेय ९५ निवासयोग्य गृहादि ९६ कीर्ति ॥ ८ ॥

ऊर्क् च मे सूनृता च मे पयश्च मे रसश्च मे घृतं च मे मधु च मे सग्धिश्च मे सपीतिश्च मे कृषिश्च मे वृष्टिश्च मे जैत्रं च मऽऔद्भिद्यं च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ ९ ॥

अर्थ—९७ अन्न ९८ सत्य व प्रिय वाणी ९९ दुग्ध १०० त्यांतील सार १०१ घृत १०२ मध १०३ बन्धूंसह भोजन १०४ बन्धूंसह पान १०५ धान्योत्पत्ति १०६ वृष्टि १०७ जयसामर्थ्य १०८ आम्रादि वृक्षांची उत्पत्ति ॥ ९ ॥

रयिश्च मे रायश्च मे पुष्टं च मे पुष्टिश्च मे विभु च मे प्रभु च मे पूर्णं च मे पूर्णतरं च मे कुयवं च मेऽक्षितं च मेऽन्नं च मेऽक्षुच्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ १० ॥

अर्थ—१०९ सुवर्ण ११० मुक्तादिमणि १११ धनवृद्धि ११२ शरीरवृद्धि ११३ व्याप्तिसामर्थ्य ११४ ऐश्वर्य ११५ धनपुत्रादि बाहुल्य ११६ गजतुरगादि बाहुल्य ११७ कडधान्य ११८ उत्तम धान्य ११९ अन्न १२० अन्नाचा परिपाक. ॥ १० ॥

वित्तं च मे वेद्यं च मे भूतं च मे भविष्यच्च मे सुगं च मे सुपथ्यं च मऽऋद्धं च मऽऋद्धिश्च मे क्लृप्तं च मे क्लृप्तिश्च मे मतिश्च मे सुमतिश्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ ११ ॥

अर्थ—१२१ पूर्वी मिळालेलें द्रव्य १२२ पुढें मिळणारें द्रव्य १२३ पूर्वीच असलेलें शेत १२४ त्यांत पुढें येणारें धान्य १२५ सहज जाण्यासारखा प्रदेश १२६ चांगल्या हितकर वस्तु १२७ यज्ञफल १२८ यज्ञफलसमृद्धि १२९ कार्ययोग्य

द्रव्य १३० कार्यसामर्थ्य १३१ सामान्य पदार्थांचा निश्चय १३२ दुर्घटकार्याविषयीं निश्चय ॥ ११ ॥

व्रीहयश्च मे यवाश्च मे माषाश्च मे तिलाश्च मे मुद्गाश्च मे खल्वाश्च मे प्रियङ्गवश्च मेऽणवश्च मे श्यामाकाश्च मे नीवाराश्च मे गोधूमाश्च मे मसूराश्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ १२ ॥

अर्थ--१३३ व्रीहि (तांदूळ) १३४ जव १३५ उडीद १३६ तीळ १३७ मूग १३८ चणे १३९ कांगणी १४० अणु १४१ सावे १४२ रानांतील तृणधान्यें १४३ गहूं १४४ मसूर ॥ १२ ॥

अश्मा च मे मृत्तिका च मे गिरयश्च मे पर्वताश्च मे सिकताश्च मे वनस्पतयश्च मे हिरण्यं च मेऽयश्च मे श्यामं च मे लोहं च मे सीसं च मे त्रपु च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ १३ ॥

अर्थ—१४५ दगड १४६ उत्तम माती १४७ लहान पर्वत १४८ मोठे पर्वत १४९ वाळू १५० झाडें १५१ सोनें व रुपें १५२ पोलाद १५३ लोखंड १५४ शिसें १५५ कथील ॥ १३ ॥

अग्निश्च मऽआपश्च मे वीरुधश्च मऽओषधयश्च मे कृष्टपच्याश्च मेऽकृष्टपच्याश्च मे ग्राम्याश्च मे पशवऽआरण्याश्च मे वित्तं च मे वित्तिश्च मे भूतं च मे भूतिश्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ १४ ॥

अर्थ—१५६ अग्नि १५७ जलें १५८ लतावेली १५९ ओषधी १६० जमीन नांगरून पिकणारीं धान्यें १६१ जमीन न नांगरता पिकणारीं धान्यें १६२ न पेरतां उत्पन्न होणारीं धान्यें १६३ ग्राम्य पशु १६४ रानटी पशु १६५ पूर्वप्राप्त द्रव्य १६६ पुढें प्राप्त होणारे द्रव्य १६७ पूर्वोत्पन्न पुत्र १६८ स्वोपार्जित ऐश्वर्य ॥ १४ ॥

वसु च मे वसतिश्च मे कर्म च मे शक्तिश्च मेऽर्थश्च मऽएमश्च मऽइत्या च मे गतिश्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ १५ ॥

अर्थ—१६९ द्रव्य १७० गृह १७१ अग्निहोत्रादि कर्म १७२ कर्मानुष्ठान सामर्थ्य १७३ दृष्ट पदार्थ १७४ प्राप्तव्य पदार्थ १७५ इष्टप्राप्त्युपाय १७६ इष्टप्राप्ति ॥ १५ ॥

विनियोग—या पुढें तीन मंत्रांत ज्या आहुति आहेत त्यांतील अर्धभागाचा स्वामी इंद्र आहे व अर्ध्या भागाच्या अग्नि वगैरे आहेत म्हणून इंद्रदेवतेचें पठण प्रत्येक देवतेबरोबर केलें आहे.

अग्निश्च मऽइन्द्रश्च मे सोमश्च मऽइन्द्रश्च मे सविता च मऽइन्द्रश्च मे सरस्वती च मऽइन्द्रश्च मे पूषा च मऽइन्द्रश्च मे बृहस्पतिश्च मऽइन्द्रश्च मे यज्ञेनं कल्पन्ताम् ॥ १६ ॥

अर्थ—१७७ अग्नि व इंद्र १७८ सोम व इंद्र १७९ सविता व इंद्र १८० सरस्वती व इंद्र १८१ पूषा व इंद्र १८२ बृहस्पति व इंद्र ॥ १६ ॥

मित्रश्च मऽइन्द्रश्च मे वरुणश्च मऽइन्द्रश्च मे धाता च मऽइन्द्रश्च मे त्वष्टा च मऽइन्द्रश्च मे मरुतश्च मऽइन्द्रश्च मे विश्वे च मे देवाऽइन्द्रश्च मे यज्ञेनं कल्पन्ताम् ॥ १७ ॥

अर्थ—१८३ मित्र व इंद्र १८४ वरुण व इंद्र १८५ धाता व इंद्र १८६ त्वष्टा व इंद्र १८७ मरुत् व इंद्र १८८ विश्वेदेव व इंद्र ॥ १७ ॥

पृथिवी च मऽइन्द्रश्च मेऽन्तरिक्षं च मऽइन्द्रश्च मे यौश्च मऽइन्द्रश्च मे समाश्च मऽइन्द्रश्च मे नक्षत्राणि च मऽइन्द्रश्च मे दिशश्च मऽइन्द्रश्च मे यज्ञेनं कल्पन्ताम् ॥ १८ ॥

अर्थ—१८९ पृथ्वी व इंद्र १९० अन्तरिक्ष व इंद्र १९१ द्युलोक व इंद्र १९२ वर्षाधिष्ठात्री देवता व इंद्र १९३ नक्षत्रें व इंद्र १९४ पूर्वदिशा व इंद्र ॥ १८ ॥

विनियोग—या पुढील तीन मंत्रांनीं ग्रहपात्रांचा होम आहे.

अꣳशुश्च मे रश्मिश्च मेऽदाभ्यश्च मेऽधिपतिश्च मऽउपाꣳशुश्च मऽन्तर्यामश्च मऽऐन्द्रवायवश्च मे मैत्रावरुणश्च मऽआश्विनश्च मे प्रतिप्रस्थानश्च मे शुक्रश्च मे मन्थी च मे यज्ञेनं कल्पन्ताम् ॥ १९ ॥

अर्थ—१९५ अंशु १९६ रश्मि १९७ अदाभ्य १९८ अधिपति १९९ उपांशु २०० अन्तर्याम २०१ ऐन्द्रवायव २०२ मैत्रावरुण २०३ आश्विन २०४ प्रतिप्रस्थान २०५ शुक्र २०६ मन्थी ॥ १९ ॥

आग्रयणश्च मे वैश्वदेवश्च मे ध्रुवश्च मे वैश्वानरश्च मऽऐन्द्राग्नश्च मे महा-वैश्वदेवश्च मे मरुत्वतीयाश्च मे निष्केवल्यश्च मे सावित्रश्च मे सारस्वतश्च मे पात्नीवतश्च मे हारियोजनश्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ २० ॥

अर्थ—२०७ आग्रयण २०८ वैश्वदेव २०९ ध्रुव २१० वैश्वानर २११ ऐन्द्राग्न २१२ महावैश्वदेव २१३ मरुत्वतीय २१४ निष्केवल्य २१५ सावित्र २१६ सारस्वत २१७ पात्नीवत २१८ हारियोजन ॥ २० ॥

स्रुचश्च मे चमसाश्च मे वायव्यानि च मे द्रोणकलशश्च मे ग्रावाणश्च मेऽधिषवणे च मे पूतभृच्च मऽआधवनीयश्च मे वेदिश्च मे बर्हिश्च मेऽवभृथश्च मे स्वगाकारश्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ २१ ॥

अर्थ—२१९ स्रुचा २२० चमस २२१ वायव्य पात्रें २२२ द्रोणकलश २२३ ग्रावन् २२४ अधिषवण २२५ पूतभृत् २२६ अधिषवण काष्ठफलकें २२७ आधवनीय २२८ वेदि २२९ बर्हि २३० अवभृथ २३१ शम्युवाक ॥ २१ ॥

विनियोग—यानंतर दोन मंत्रांनीं यज्ञक्रतूंचा होम आहे

अग्निश्च मे घर्मश्च मेऽर्कश्च मे सूर्यश्च मे प्राणश्च मेऽश्वमेधश्च मे पृथिवी च मेऽदितिश्च मे दितिश्च मे द्यौश्च मेऽङ्गुलयः शक्वरयो दिशश्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ २२ ॥

अर्थ—२३२ अग्निष्टोम २३३ प्रवर्ग्य २३४ अर्कयाग २३५ सूर्ययाग २३६ गवामयन २३७ अश्वमेध २३८ पृथिवी २३९ अदिति २४० द्युलोक २४१ विराट् पुरुषाच्या अंगुलि २४२ त्याच्या शक्ति २४३ पूर्वादि दिशा ॥ २२ ॥

व्रतं च मऽऋतवश्च मे तपश्च मे संवत्सरश्च मेऽहोरात्रेऽऊर्वष्ठीवे बृहद्रथन्तरे च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ २३ ॥

अर्थ—२४४ व्रतनियम २४५ वसंतादि ऋतु २४६ कृच्छ्रचांद्रायणादि तप २४७ प्रभवादि संवत्सरें २४८ दिवस २४९ दिवस व रात्रि २५० मांड्या २५१ गुडघे २५२ बृहत्साम २५३ रथन्तरसाम ॥ २३ ॥

विनियोग—'एका च मे' या मंत्रानें अयुग्म (विषमसंख्याक) स्तोमांचा यज्ञ आहे. येथें व पुढील मंत्रांत आदरार्थ द्विरुक्ती आहे

एका च मे तिस्रश्च मे तिस्रश्च मे पञ्च च मे पञ्च च मे सप्त च मे सप्त च मे नव च मे नव च मऽएकादश च मऽएकादश च मे त्रयोदश च मे त्रयोदश च मे पञ्चदश च मे पञ्चदश च मे सप्तदश च मे सप्तदश च मे नवदश च मे नवदश च मऽएकविꣳ शतिश्च मऽएकविꣳशतिश्च मे त्रयोविꣳशतिश्च मे त्रयोविꣳ शतिश्च मे पञ्चविꣳशतिश्च मे पञ्चविꣳ शतिश्च मे सप्तविꣳ शतिश्च मे सप्तविꣳशतिश्च मे नवविꣳशतिश्च मे नवविꣳ शतिश्च मऽएकत्रिꣳशच्च मऽएकत्रिꣳशच्च मे त्रयस्त्रिꣳ शच्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ २४ ॥

अर्थ—२५४ एक २५५ तीन २५६ पांच २५७ सात २५८ नऊ २५९ अकरा २६० तेरा २६१ पंधरा २६२ सतरा २६३ एकोणीस २६४ एकवीस २६५ तेवीस २६६ पंचवीस २६७ सत्तावीस २६८ एकोणतीस २६९ एकतीस २७० तेहतीस ॥ २४ ॥

विनियोग—' चतस्रश्च मे ' या मंत्राने युग्मस्तोमाचा होम आहे

चतस्रश्च मेऽष्टौ च मेऽष्टौ च मे द्वादश च मे द्वादश च मे षोडश च मे षोडश च मे विꣳ शतिश्च मे विꣳ शतिश्च मे चतुर्विꣳ शतिश्च मे चतुर्विꣳशतिश्च मेऽष्टाविꣳ शतिश्च मेऽष्टाविꣳ शतिश्च मे द्वात्रिꣳ शच्च मे द्वात्रिꣳ शच्च मे षट्त्रिꣳ शच्च मे षट्त्रिꣳ शच्च मे चत्वारिꣳ शच्च मे चत्वारिꣳ शच्च मे चतुश्चत्वारिꣳ शच्च मे चतुश्चत्वारिꣳ शच्च मेऽष्टाचत्वारिꣳ शच्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ २५ ॥

अर्थ— २७१ चार २७२ आठ २७३ बारा २७४ सोळा २७५ वीस २७६ चोवीस २७७ अठ्ठावीस २७८ बत्तीस २७९ छत्तीस २८० चाळीस २८१ चवेचाळीस २८२ अठ्ठेचाळीस ॥ २५ ॥

विनियोग—' त्र्यविश्च ' इत्यादि दोन मंत्रांचा निरनिराळ्या वयाच्या पशूंचा होम करण्यांत विनियोग आहे

त्र्यविश्च मे त्र्यवी च मे दित्यवाट् च मे दित्यौही च मे पञ्चाविश्च मे पञ्चावी च मे त्रिवत्सश्च मे त्रिवत्सा च मे तुर्यवाट् च मे तुर्यौही च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ २६ ॥

अर्थ—२८३ दीड वर्षाचा बैल २८४ दीड वर्षाची गाय २८५ दोन वर्षांचा बैल २८६ दोन वर्षांची गाय २८७ अडीच वर्षांचा बैल २८८ अडीच वर्षांची गाय २८९ तीन वर्षांचा बैल २९० तीन वर्षांची गाय २९१ साडेतीन वर्षांचा बैल २९२ साडेतीन वर्षांची गाय ॥ २६ ॥

पष्ठवाट् च मे पष्ठौही च मऽउक्षा च मे वशा च मऽऋषभश्च मे वेहच्च मेऽनड्वांश्च मे धेनुश्च मे यज्ञेन कल्पन्ताम् ॥ २७ ॥

अर्थ—२९३ चार वर्षांचा बैल २९४ चार वर्षांची गाय २९५ वीर्यसिंचन करण्यास समर्थ बैल २९६ वन्ध्या गाय २९७ अत्यंत तरुण बैल २९८ गर्भनाश करणारी गाय २९९ शकटवहनसमर्थ बैल ३०० नवीन प्रसविलेली धेनु ॥ २७ ॥

विनियोग—'वाज' वगैरे या मंत्रांतील शब्दांचा उच्चार करून होम करावा.

वाजाय स्वाहा प्रसवाय स्वाहा पिजाय स्वाहा क्रतवे स्वाहा वसवे स्वाहा ह्रर्पतये स्वाहाह्लै मुग्धाय स्वाहा मुग्धाय वैनꣳ शिनाय स्वाहा विनꣳ शिनऽआन्त्यायनाय स्वाहान्त्याय भौवनाय स्वाहा भुवनस्य पतये स्वाहाधिपतये स्वाहा प्रजापतये स्वाहा । इयं ते राण्मित्राय यन्तासि यमनऽऊर्जे त्वा वृष्टयै त्वा प्रजानां त्वाधिपत्याय ॥ २८ ॥

अर्थ—अन्नाकरितां होम असो. अनुज्ञादानाकरितां होम असो अशा रीतीनें मंत्रार्थ समजावा. किंवा वाज वगैरे चैत्रादि बारा मासांचीं नांवें आहेत. त्याकारणें होम असो. अन्न पुष्कळ उत्पन्न होतें म्हणून चैत्राला वाज म्हणतात. जलक्रीडेला आज्ञा देण्याचा प्रसंग म्हणून वैशाखाला प्रसव म्हणतात. तसेंच जलक्रीडेंत जन तत्पर होतात म्हणून ज्येष्ठाला अपिज, चातुर्मास्य याग त्यांत केले जातात म्हणून आषाढाला क्रतु, प्रवास न करतां घरींच राहण्याचा प्रसंग म्हणून श्रावणाला वसु, तापदायक असल्यानें भाद्रपदाला अर्हपति, धुकें उत्पन्न झाल्यानें मोह उत्पन्न करणारे दिवस म्हणून अश्विनाला मुग्ध अहन्, स्नानादि नियमानें पापांचा नाशक व दिवस लहान असल्यानें लवकर नाश पावणारा म्हणून कार्तिकाला अमुग्ध वैनशिन, अविनाशी व सर्व नाश झाला तरी शिल्लक राहणारा विष्णुरूपी म्हणून मार्गशीर्षाला अविनशि आन्त्यायन, सर्व भुवनांचा अन्तस्वरूपी पोषक अर्थात् जाठराग्नि प्रदीप्त करून पुष्टि करणारा म्हणून पौषाला आन्त्य भौवन, स्नानादिकांचें पुण्य उत्पन्न करून सर्व प्राण्यांचा पालक म्हणून माघाला भुवनपति,

अधिक पालक म्हणून फाल्गुनाला अधिपति, म्हणतात; अशा रीतीनें द्वादश मासांचा अधिपति जो प्रजापति त्याला हें हवि सुहुत असो. हे अग्ने, जेथें जेथें आम्ही यज्ञ करतों हें तुझें राज्य आहे. तूं मित्र अशा यजमानाचा नियामक आहेस. तूं अग्निष्टोमादि कर्मांत सर्वांचें नियमन करतोस म्हणून विशिष्ट अन्नरसाकरितां, वृष्टीकरितां व प्रजेच्या स्वामित्वप्राप्तीकरितां वसोर्धारेनें तुजवर अभिषेक करतों ॥ २८ ॥

विनियोग—' आयुर्यज्ञेन ' या मंत्रानें कल्पहोम करावा.

आयुर्यज्ञेन कल्पतां प्राणो यज्ञेन कल्पतां चक्षुर्यज्ञेन कल्पताꣳ श्रोत्रं यज्ञेन कल्पतां वाग् यज्ञेन कल्पतां मनो यज्ञेन कल्पतामात्मा यज्ञेन कल्पतां ब्रह्मा यज्ञेन कल्पतां ज्योतिर्यज्ञेन कल्पताꣳ स्वर्यज्ञेन कल्पतां पृष्ठं यज्ञेन कल्पतां यज्ञो यज्ञेन कल्पताम् । स्तोमश्च यजुश्च ऋक् च साम च बृहच्च रथन्तरं च । स्वर्देवाऽअगन्मामृताऽअभूम प्रजापतेꣳ प्रजाऽअभूम वेट् स्वाहा ॥ २९ ॥

अर्थ—आयुष्य, प्राण, चक्षु, श्रोत्र, वाणी, मन, देह, वेद, स्वयंप्रकाश परमात्मा, स्वर्ग, पृष्ठस्तोत्र हीं मीं केलेल्या यज्ञानें सिद्ध होवोत. तसेंच माझा यज्ञही यज्ञानेंच सिद्ध होवो. (मला स्वतःला यज्ञ करण्यांचें सामर्थ्य नाहीं.) तसेंच त्रिवृत् पञ्चदशादि स्तोम, अनियत पादात्मक यजुर्मंत्र, नियतपादात्मक ऋग्मंत्र, गायनप्रधान साममंत्र व त्या सामांतील विशिष्ट भाग बृहत् व रथन्तर हीं सर्व मीं केलेल्या यज्ञानें सिद्ध होवोत. आम्ही यजमान देवरूपी होऊन स्वर्गाला गेलों व अमर होऊन तेथें हिरण्यगर्भाची प्रजा होऊन राहिलों. तात्पर्य हा वसोर्धाराहोम सर्वकामप्रद आहे. हें वसोर्धारारूपी हवि सुहुत असो ॥ २९ ॥

विनियोग—' वाजस्य नु ' इत्यादि सात मंत्रांनीं सर्वौषधरूपी हवीचा स्रुव्यानें होम करावा.

वाजस्य नु प्रसवे मातरं महीमदितिं नाम वचसा करामहे । यस्यामिदं विश्वं भुवनमाविवेश तस्यां नो देवः सविता धर्म सावीषत् ॥ ३० ॥

अर्थ—अन्नाच्या आज्ञेंतच राहणारे आम्ही ज्या जगन्निर्माण करणाऱ्या, मोठ्या व अखंडित अशा पृथिवीला अनुकूल करून घेतों व जिच्यांत हें सर्व जग प्रविष्ट झालें त्या पृथ्वीवरच राहण्याची प्रकाशमान सवित्यानें आम्हाला प्रेरणा करावी ॥ ३० ॥

विश्वेऽअ॒य म॒रुतो॒ विश्वेऽऊ॒ती विश्वे॑ भवन्त्व॒ग्नय॒ऽ समि॑द्धाऽ। विश्वे॑ नो॒ दे॒वाऽअव॒सागम॑न्तु॒ विश्व॑मस्तु॒ द्रवि॑ण॒ं वाजो॑ऽअ॒स्मे ॥ ३१ ॥

अर्थ—आज सर्व मरुद्गण येवोत, व इतर वसु, रुद्र व आदित्यरूपी मरुद्गण अन्नरूपी हविर्भक्षणानें संतुष्ट होण्याकरितां येवोत व त्यांच्या येण्यानें सर्व गार्हपत्यादि अग्नि प्रदीप्त होवोत व देवांचे संतोषानें सर्व गोभूहिरण्यादि द्रव्य व अन्न आम्हांला प्राप्त होवो ॥ ३१ ॥

वाजो॑ नऽ॒ स॒प्त प्र॒दिश॒श्चत॑स्रो॒ वा प॒रावत॑÷ । वाजो॑ नो॒ विश्वै॑र्दे॒वैर्धन॑-सातावि॒हाव॑तु ॥ ३२ ॥

अर्थ—आमचें अन्न प्राच्यादि चार दिशांना व भूः भुवः स्वः या तीन समीपस्थ लोकांना आणि महः जनः तपः सत्यं या चार दूरच्या लोकांना एकंदरींत सातही लोकांना तृप्त करो. धनविभागाचे वेळीं आमचें अन्न सर्व देवांसह आमचें पालन करो ॥ ३२ ॥

वाजो॑ नोऽअ॒य प्रसु॑वाति॒ दान॑ं वाजो॑ दे॒वाँ२॥ ऋ॒तुभि॑÷ कल्पयाति । वाजो॒ हि मा॒ सर्व॑वीरं॒ ज॒जान॒ वि॒श्व॒ाऽआशा॒ वाज॑पतिर्जयेयम् ॥ ३३ ॥

अर्थ—आज अन्नाधिष्ठात्री देवता आम्हांला दानाची प्रेरणा करो म्हणजे आम्हांला अन्नदानाची इच्छा होवो. व ती अन्नाधिष्ठात्री देवता कालासह देवांना योग्यस्थानीं स्थापन करो. तसेंच ती देवता मला पुष्कळ पुत्रपौत्र देवो. नंतर समृद्धान्न होऊन त्या अन्नदानानें मी सर्व दिशांना जिंकेन ॥ ३३ ॥

वाज॑÷ पु॒रस्ता॑दुत॒ मध्य॒तो नो॒ वाजो॑ दे॒वान् ह॒विषा॑ वर्धयाति । वाजो॒ हि मा॒ सर्व॑वीरं॒ च॒कार॒ सर्वा॒ऽआशा॒ वाज॑पतिर्भवेयम् ॥ ३४ ॥

अर्थ—अन्न माझे अग्रभागीं व गृहमध्यभागीं असो व तें आमच्या हविर्द्रव्य-स्वरूपानें देवांना वाढवो. अन्न मला पुत्रपौत्रयुक्त करो व मी अन्नस्वामी होऊन सर्व दिशांना वश करीन ॥ ३४ ॥

सं मा॑ सृजामि॒ पय॑सा पृथि॒व्याः॒ सं मा॑ सृजाम्य॒द्भिरोष॑धीभिः॒ । सोऽहं वाज॑ꣳ सनेयमग्ने ॥ ३५ ॥

अर्थ—हे अग्ने, पृथ्वीच्या रसानें, जलानें व ओषधींनीं जो मी आपल्या शरीराला संयुक्त करतों असा मी अन्न प्राप्त करतों ॥ ३५ ॥

पयः÷ पृथिव्यां पयऽओषधीषु पयो दिव्युन्तरिक्षे पयो धाः। पयस्वतीः प्रदिशः÷ सन्तु मह्यम् ॥ ३६ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं पृथ्वीवर, ओषधींवर, स्वर्गांत व अन्तरिक्ष लोकांत रस स्थापन कर. व मजकरितां दिशा व विदिशा रसयुक्त होवोत ॥ ३६ ॥

विनियोग—' देवस्य त्वा ' या मंत्रानें अध्वर्यूनें कृष्णाजिनावर बसलेल्या यजमानावर सर्वोषधींचा अभिषेक करावा.

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम्। सरस्वत्यै वाचो यन्तुर्यन्त्रेणाग्नेः साम्राज्येनाभिषिञ्चामि ॥ ३७ ॥

अर्थ—हे यजमाना, प्रेरक अशा सूर्याच्या प्रेरणेनें अश्विनीकुमाराच्या बाहूंनीं, पूष्याच्या हातांनीं, वाणीचा नियामक जो प्रजापति त्याच्या नियमनानें व अग्नीच्या चक्रवर्तित्वानें मी तुजवर अभिषेक करतों ॥ ३७ ॥

विनियोग—' ऋताषाट् ' इत्यादि बारा मंत्रांनीं राष्ट्रभृत्संज्ञक बारा आहुतीचा होम करावा. स्वाहान्तो मंत्रः या प्रमाणानें या एक एक मंत्रांत दोन मंत्र समजावे.

ऋताषाड्घृतधामाग्निर्गन्धर्वस्तस्यौषधयोऽप्सरसो मुदो नाम। स नऽइदं ब्रह्म क्षत्रं पातु तस्मै स्वाहा वाट् ताभ्यः स्वाहा ॥ ३८ ॥

अर्थ—जो सत्यालाच कबूल करतो व ज्याचें गृह अविनाशि आहे असा जो अग्निनामक गंधर्व आहे त्याच्या आनन्ददायक अशा सात ओषधि मुद नांवाच्या अप्सरा आहेत तो आमच्या ब्राह्मण व क्षत्रिय जातींचें रक्षण करो त्या अग्नीला व त्या अप्सरांना हे हवि सुहुत असो ॥ ३८ ॥

सꣳहितो विश्वसामा सूर्यो गन्धर्वस्तस्य मरीचयोऽप्सरसऽआयुवो नाम। स नऽइदं ब्रह्म क्षत्रं पातु तस्मै स्वाहा वाट् ताभ्यः स्वाहा ॥ ३९ ॥

अर्थ—दिवसरात्रीना जोडणारा व सर्वसामप्रतिपादित असा सूर्यनामक गंधर्व आहे त्याच्या एकमेकांत मिसळणाऱ्या किरणरूपी आयु नांवाच्या अप्सरा आहेत तो सूर्य आमच्या ब्राह्मण व क्षत्रिय जातीचें रक्षण करो. त्या सूर्याला व मरीचींना हें हवि सुहुत असो ॥ ३९ ॥

सुषुम्णꣳ सूर्यरश्मिश्चन्द्रमा गन्धर्वस्तस्य नक्षत्राण्यप्सरसो भेकुरयो नाम । स नऽइदं ब्रह्म क्षत्रं पातु तस्मै स्वाहा वाट् ताभ्यꣳ स्वाहा ॥ ४० ॥

अर्थ—यज्ञद्वारा सुख देणारा व सूर्याप्रमाणें किरणें असलेला चन्द्र नांवाचा गंधर्व आहे. प्रकाशक नक्षत्रें त्याच्या भेकुर नांवाच्या अप्सरा आहेत तो चंद्र आमच्या ब्राह्मण व क्षत्रिय जातीचें रक्षण करो त्या चंद्राला व नक्षत्रांना हें हवि सुहुत असो ॥ ४० ॥

इषिरो विश्वव्यचा वातो गन्धर्वस्तस्यापोऽअप्सरसऽऊर्जो नाम । स नऽइदं ब्रह्म क्षत्रं पातु तस्मै स्वाहा वाट् ताभ्यꣳ स्वाहा ॥ ४१ ॥

अर्थ—शीघ्रगामी व सर्वगामी असा वात नामक गंधर्व आहे. धान्योत्पादक जलें या त्याच्या ऊर्जे नांवाच्या अप्सरा आहेत तो वात आमच्या ब्राह्मण व क्षत्रिय जातींचें रक्षण करो. त्या वाताला व जलांना हें हवि सुहुत असो ॥ ४१ ॥

भुज्युꣳ सुपर्णो यज्ञो गन्धर्वस्तस्य दक्षिणाऽअप्सरसस्तावा नाम । स नऽइदं ब्रह्म क्षत्रं पातु तस्मै स्वाहा वाट् ताभ्यꣳ स्वाहा ॥ ४२ ॥

अर्थ—भूतांचें पालन करणारा व स्वर्गांत गमन करणारा यज्ञ नांवाचा गंधर्व आहे. यजमानाची स्तुति करणाऱ्या दक्षिणातावा नांवाच्या त्याच्या अप्सरा आहेत. तो यज्ञ आमच्या ब्राह्मण व क्षात्रिय जातींचें रक्षण करो. त्या यज्ञाला व दक्षिणांना हें हवि सुहुत असो ॥ ४२ ॥

प्रजापतिर्विश्वकर्मा मनो गन्धर्वस्तस्य ऋक्सामान्यप्सरस ऽएष्टयो नाम । स नऽइदं ब्रह्म क्षत्रं पातु तस्मै स्वाहा वाट् ताभ्यꣳ स्वाहा ॥ ४३ ॥

अर्थ—प्रजापालक व सर्वकार्यकर्ता मन नांवाचा गंधर्व आहे. आकांक्षा पूर्ण करणारे ऋक्साममंत्र त्याच्या एष्टि नांवाच्या अप्सरा आहेत. तो मनोगंधर्व आमच्या ब्राह्मण व क्षत्रिय जातीचें रक्षण करो. त्या मनाला व ऋक्साममंत्रांना हें हवि सुहुत असो ॥ ४३ ॥

विनियोग—प्रतिप्रस्थाता इत्यादिकांनीं रथाचें शिर आहवनीयावर धरावें नंतर अध्वर्यूनें 'स नो भुवनस्य' हा मंत्र पांच वेळां म्हणून आज्याच्या पांच आहुति द्याव्या.

स नो भुवनस्य पते प्रजापते यस्य तऽउपरि गृहा यस्य वेह । अस्मै ब्रह्मणेऽस्मै क्षत्राय महि शर्म यच्छ स्वाहा ॥ ४४ ॥

अर्थ—हे भुवनपालक प्रजापते, ज्या तुझे स्वर्गावर व या भूलोकावर गृहपात्र आहेत तो तूं आमच्या ब्राह्मण व क्षत्रिय जातीला पुष्कळ सुख दे. हें हवि सुहुत असो ॥ ४४ ॥

विनियोग—' नंतर समुद्रोऽसि ' इत्यादि तीन मंत्रभागांनीं तीन वायुहोम करावे.

समुद्रोऽसि नभस्वानार्द्रदानुः शंभूर्मयोभूरभि मा वाहि स्वाहा । मारुतोऽसि मरुतां गणः शंभूर्मयोभूरभि मा वाहि स्वाहा वस्यूरसि दुवस्वाञ्छंभूर्मयोभूरभि मा वाहि स्वाहा ॥ ४५ ॥

अर्थ—हे वायो, वक्ष्यमाणगुणविशिष्ट असा तूं आमच्या सन्मुख वहा. तुला हें हवि सुहुत असो. तूं नक्षत्रयुक्त, वृष्टिदायक, ऐहिक व पारलौकिक सुख देणारा आहेस व तूं शुक्रज्योतिःप्रभृति मरुद्गणांचा अधिपति असून ऐहिक व पारलौकिक सुख देणारा आहेस. तसेंच तूं रक्षण करणारा व हविर्द्रव्ययुक्त असून ऐहिक व पारलौकिक सुख देणारा आहेस ॥ ४५ ॥

विनियोग—' यास्ते ' इत्यादि नऊ मंत्रांनीं नवाहुतीचा होम करावा. पहिले चार मंत्र सर्व म्हणून होम करावा. पांचव्या ' स्वर्णधर्मः स्वाहा ' या मंत्राचे स्वाहापर्यंतचे पांच भाग करावे व नऊ आहुती द्याव्या.

यास्तेऽअग्ने सूर्ये रुचो दिवमातन्वन्ति रश्मिभिः । ताभिर्नोऽअद्य सर्वाभी रुचे जनाय नस्कृधि ॥ ४६ ॥

अर्थ—हे अग्ने, ज्या तुझ्या कांति सूर्यमंडलांत राहून आपल्या किरणांनीं द्युलोकाला प्रकाशित करतात त्या सर्वांच्या योगानें आज आमची शोभा वाढव व शोभायुक्त म्हणजे प्रसिद्ध असे पुत्रपौत्रादिक आम्हाला दे ॥ ४६ ॥

या वो देवाः सूर्ये रुचो गोष्वश्वेषु या रुचः । इन्द्राग्नी ताभिः सर्वाभी रुचं नो धत्त बृहस्पते ॥ ४७ ॥

अर्थ—हे देवांनो, हे इंद्राग्नींनो, हे बृहस्पते, तुमच्यासंबंधीं ज्या कांति सूर्यमंडलांत व गोअश्व यांत आहेत त्या सर्वांच्या योगानें आम्हांला कांति द्या ॥ ४७ ॥

रुचं नो धेहि ब्राह्मणेषु रुचꣳ राजसु नस्कृधि । रुचं विश्येषु शूद्रेषु मयि धेहि रुचा रुचम् ॥ ४८ ॥

अर्थ—हे अग्ने, आमच्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र जातींचे ठायीं कांति स्थापन कर. व माझे ठायींहि अविच्छिन्न अशी ती कांति स्थापन कर ॥ ४८ ॥

तत्त्वा यामि ब्रह्मणा वन्दमानस्तदाशास्ते यजमानो हविर्भिः । अहेडमानो वरुणेह बोध्युरुशꣳस मा नऽआयुः प्रमोषीः ॥ ४९ ॥

अर्थ—हे वरुणा, यजमान हविर्भाग देऊन तुझ्याकडे जे जे वर मागतो ते ते देण्याविषयीं तीन वेदांनीं स्तुति करणारा मी तुझी प्रार्थना करतों ते तूं त्याला दे. हे बहुस्तुतियुक्त वरुणा, क्रोध न करितां माझी स्तुति तूं समजून घे. व आमचें आयुष्य चोरूं नकोस. अर्थात् आम्हांला पूर्ण आयुष्य दे ॥ ४९ ॥

स्वर्ण घर्मः स्वाहा स्वर्णार्कः स्वाहा स्वर्ण शुक्रः स्वाहा स्वर्ण ज्योतिः स्वाहा स्वर्ण सूर्यः स्वाहा ॥ ५० ॥

अर्थ—दिवसाप्रमाणें जो आदित्य त्याचा मी अग्नींत होम करतों. सूर्याप्रमाणे जो अग्नि त्याचा मी आदित्यांत होम करतों. देवाप्रमाणे आदित्य त्याचा मी आदित्यांतच होम करतों. स्वर्गाप्रमाणें जो अग्नि त्याचा मी अग्नींतच होम करतों. सर्व देवांप्रमाणें जो सूर्य त्याला मी उत्तम करतों. आदित्याचा अग्नींत होम म्हणजे त्याची अग्नींत स्थापना. अशा रीतीनें अग्नि व सूर्य यांचें ऐक्य सांगून सर्व देवांत सूर्य उत्तम असें या मंत्रांत सांगितलें आहे ॥ ५० ॥

विनियोग—'अग्निं युनज्मि' इत्यादि तीन मंत्रांनीं परिधींचा स्पर्श करून अग्निसंयोग करावा.

अग्निं युनज्मि शवसा घृतेन दिव्यꣳ सुपर्णं वयसा बृहन्तम् । तेन वयं गमेम ब्रध्नस्य विष्टपꣳ स्वरुहाणाऽअधिनाकमुत्तमम् ॥५१॥ शतं १०००

अर्थ—बलाशीं व घृताशीं मी अग्नीचा संयोग करतों. तो अग्नि द्युलोकांत राहणारा, उत्तम गमन करणारा व धूमानें मोठा होणारा असा आहे. त्या अग्नीशीं संयुक्त होऊन आम्ही तापरहित अशा आदित्याच्या लोकाप्रत जाऊं. नंतर त्याच्याही पलीकडे स्वर्गावर आरोहण करण्याकरितां उत्तम व दुःखरहित अशा नाकलोकास जाऊं ॥ ५१ ॥

इमौ ते पक्षावजरौ पतत्रिणौ याभ्यां रक्षांसि स्यपहꣳ स्यग्ने । ताभ्यां पतेम सुकृतामु लोकं यत्र ऋषयो जग्मुः प्रथमजाः पुराणाः ॥ ५२ ॥

अर्थ—हे अग्ने, जे तुझे सर्वदा जरारहित व उत्पतनशील उत्तर दक्षिण पक्ष आहेत व ज्यांच्यायोगें तूं राक्षसांना मारतोस त्या पक्षांच्या योगानें आम्ही पुण्यवानांच्या लोकांप्रत उडून जाऊं. त्या लोकांत पूर्वोत्पन्न प्राचीन ऋषि गेले ॥ ५२ ॥

इन्दुर्दक्षः श्येनऽऋतावा हिरण्यपक्षः शकुनो भुरण्युः । महान् सधस्थे ध्रुव आ निषत्तो नमस्तेऽअस्तु मा मा हिꣳसीः ॥ ५३ ॥

अर्थ—हे अग्ने, वक्ष्यमाणविशेषणविशिष्ट अशा तुला नमस्कार असो. तूं आमची हिंसा करूं नकोस. तूं ऐश्वर्यसंपन्न, उत्साही, श्येन पक्ष्याप्रमाणें आकाशांत संचार करणारा, सत्ययुक्त, सुवर्णपक्ष असलेल्या पक्ष्यासारखा, पोषण करणारा, प्रभाववान्, स्थिर व एका आसनावर ब्रह्मयाबरोबर बसणारा आहेस ॥ ५३ ॥

विनियोग—' दिवो मूर्धा ' इत्यादि दोन ऋचांनीं परिधिसंधींना स्पर्श करून अग्निसंयोग करावा.

दिवो मूर्धासि पृथिव्या नाभिरूर्गपामोषधीनाम् । विश्वायुꣳ शर्म सप्रथा नमस्पथे ॥ ५४ ॥

अर्थ—हे अग्ने, स्वर्गमार्गरूपी अशा तुला नमस्कार असो, तूं स्वर्लोकाचे मस्तक, पृथ्वीचा मध्यभाग, जले व ओषधींचा सारभूत रस, सर्व प्राण्यांचें जीवन, सर्वांचें कल्याण करणारा व वरखालीं वगैरे सर्वत्र विस्तृत असा आहेस ॥ ५४ ॥

विश्वस्य मूर्धन्नधितिष्ठसि श्रितः समुद्रे ते हृदयमप्स्वायुरपो दत्तोदधिं भिन्त । दिवस्पर्जन्यादन्तरिक्षात्पृथिव्यास्ततो नो वृष्टयावꣳ ॥ ५५ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं द्युलोकांतून, मेघांतून, अन्तरिक्षांतून, पृथिवींतून व जेथें जेथें जल असेल तेथून जल आणून वृष्टिद्वारां आमचें रक्षण कर. तूं सुषुम्णा नाडीद्वारां सर्व जगाच्या मस्तकांत राहतोस म्हणजे आदित्यद्वारां प्रकाशतोस. तुझें हृदय अन्तरिक्ष लोकांत आहे व तुझ्या जलावर सगळ्यांचें जीवन अवलंबून आहे. तूं मेघ फोडून आम्हांला जलें दे ॥ ५५ ॥

विनियोग—'इष्टो यज्ञ' इत्यादि दोन मंत्रांनीं समिष्टयजुःसंज्ञक हविर्द्रव्याचा होम करावा.

इष्टो यज्ञो भृगुभिराशीर्दा वसुभिः। तस्य नऽइष्टस्य प्रीतस्य द्रविणे हागमेः ॥ ५६ ॥

अर्थ—हे द्रव्या, आम्हांला आवडत्या व आमच्यावर प्रेम करणाऱ्या या यजमानाचे घरीं तूं ये. या यजमानाचा इष्ट देणारा असा यज्ञ भृगुगोत्री ब्राह्मणांनीं व वस्वादि देवांनीं केला ॥ ५६ ॥

इष्टोऽअग्निराहुतः पिपर्तु नऽइष्टꣳ हविः। स्वगेदं देवेभ्यो नमः ॥५७॥

अर्थ—अग्नि आमचें इच्छित पूर्ण करो. त्या अग्नीचा याग झाला आहे व त्याला उत्तम हवि दिलें गेलें आहे तसेंच हें स्वयंगमनशील समिष्टयजुसंज्ञक हविर्द्रव्य देवांना सुहुत असो ॥ ५७ ॥

विनियोग—'यदा कूतात्' इत्यादि आठ मंत्रांनीं आठ स्रुवाहुतींचा होम करावा.

यदाकूतात्समसुस्रोद्धृदो वा मनसो वा संभृतं चक्षुषो वा। तदनु प्रेत सुकृतामु लोकं यत्र ऋषयो जग्मुः प्रथमजाः पुराणाः ॥ ५८ ॥

अर्थ—हे ऋत्विजांनो, तुम्ही प्रजापतिकृतकर्माचें अनुसरण करा व पुण्यवानांना प्राप्य अशा स्वर्गलोकाप्रतच गमन करा. त्या लोकांत पूर्वोत्पन्न पुराण ऋषि गमन करते झाले. तें पूर्वोक्तपूर्ण सामग्रीयुक्त कर्म प्रजापतीच्या अभिप्रायानुसार त्याच्या हृदय, बुद्धि, संकल्प व चक्षुरादि इंद्रियें यांपासून उत्पन्न झालें व ब्रह्मदेवानें जें सर्व तन्हेनें निर्माण केलें ॥ ५८ ॥

एतꣳ संधस्थं परि ते ददामि यमावहाच्छेवधिं जातवेदाः। अन्वागन्ता यज्ञपतिर्वोऽअत्र तꣳस्म जानीत परमेव्योमन् ॥ ५९ ॥

अर्थ—हे देवनिवासस्थान अशा स्वर्गा, हा यजमान मी तुझ्या स्वाधीन करतों व अग्नीनें सुखनिधान असें जें यज्ञफल निर्माण केलें तेंहि रक्षणाकरितां तुझ्या स्वाधीन करतों. हे देवांनो, हा यजमान कर्मसमाप्तीनंतर तुमच्याकडे येईल तेव्हां अशा रीतीनें उत्कृष्ट आकाशरूपी स्वर्गांत आलेल्या यजमानाची तुम्ही ओळख ठेवा म्हणजे त्याला ओळखून तुम्ही त्याची संभावना करा ॥ ५९ ॥

एतं जानीथ परमे व्योमन्देवा÷ सधस्था विद रूपमस्य । यदागच्छात्पथिभिर्देवयानैरिष्टापूर्ते कृणवाथाविरस्मै ॥ ६० ॥

अर्थ—उत्कृष्ट स्वर्गावर एकत्र राहणाऱ्या हे देवांनो, या यजमानाला ओळखा. व ओळखीकरितां त्याचें रूप समजून ठेवा. व ज्यावेळीं हा स्वर्गमार्गांनीं येईल त्यावेळीं याच्या इष्टापूर्तकर्मांचीं फलें याला प्रकट करा म्हणजे द्या ॥ ६० ॥

उद्बुध्यास्वाग्ने प्रतिजागृहि त्वमिष्टापूर्ते सꣳ सृजेथामयं च । अस्मिन्त्सधस्थेऽअध्युत्तरस्मिन्विश्वेदेवा यजमानश्च सीदत ॥ ६१ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं सावधान हो व या यजमानाला रोज सावध कर. नंतर इष्टापूर्तकर्मे यजमानाशीं युक्त होवोत. व हा यजमान इष्टापूर्तकर्माशीं युक्त होवो. हे विश्वेदेवांनो, तुम्ही व हा इष्टापूर्तकारी यजमान देवांसह असणाऱ्या या अत्युत्कृष्ट द्युलोकांत राहो ॥ ६१ ॥

येन वहासि सहस्रं येनाग्ने सर्ववेदसम् । तेनेमं यज्ञं नो नय स्वर्देवेषु गन्तवे ॥ ६२ ॥

अर्थ—हे अग्ने, ज्या सामर्थ्यानें तूं सहस्रदक्षिणायुक्त व सर्वस्वदक्षिणायुक्त यज्ञ धारण करतोस त्याच सामर्थ्यानें आमच्या यज्ञाला देवांकडे जाण्याकरितां स्वर्गात ने ॥ ६२ ॥

प्रस्तरेण परिधिना स्रुचा वेद्या च बर्हिषा । ऋचेमं यज्ञं नो नय स्वर्देवेषु गन्तवे ॥ ६३ ॥

अर्थ—हे अग्ने, आमच्या या यज्ञाला देवांकडे जाण्याकरितां स्वर्गात ने. हा यज्ञ दर्भमुष्टि, तीन परिधिकाष्ठें, स्रुक्, वेदी, दर्भ व ऋगादिमंत्र यांनीं युक्त आहे ॥ ६३ ॥

यद्दत्तं यत्परादानं यत्पूर्तं याश्च दक्षिणाः । तदग्निर्वैश्वकर्मणः स्वर्देवेषु नो दधत् ॥ ६४ ॥

अर्थ—आम्ही कुटुंबियांना दिलेलें, परोपकाराचे निमित्तानें अंधादिकांना दिलेलें, स्मृतिविहित असें कूपारामादि व यज्ञांतील दक्षिणा एतद्रूपी आम्हीं केलेलें दान विश्वकर्मा अग्नि स्वर्गात देवांचे ठायीं स्थापन करो ॥ ६४ ॥

यत्र धाराऽअनपेता मधोर्घृतस्य च याः । तदग्निर्वैश्वकर्मणः स्वर्देवेषु नो दधत् ॥ ६५ ॥

अर्थ—ज्या ठिकाणीं मधुघृतादिकांचे प्रवाह अक्षीण तऱ्हेनें वाहतात त्या स्वर्गांत देवांमध्ये अग्नि आम्हाला स्थापन करो ॥ ६५ ॥

अग्निरस्मि जन्मना जातवेदा घृतं मे चक्षुरमृतं मऽआसन्। अर्कस्त्रिधातू रजसो विमानोऽजस्रो घर्मो हविरस्मि नाम ॥ ६६ ॥

अर्थ—मी जन्मतःच उत्पन्न झालेल्या सर्व वस्तूंचा स्वामी आहें म्हणून माझे नेत्रांचे ठायीं घृत व मुखाचे ठायीं अमृत आहे. मी पूज्य असा ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेदात्मक यज्ञ आहें. मी जलांचा निर्माण करणारा अक्षय्य मेघरूपी व प्रदीप्त असा सूर्यरूपी अग्नि आहें ॥ ६६ ॥

विनियोग—या मंत्रांपैकीं ' ये अग्नय ' या भागानें अग्नींचे उपस्थान करावे.

ऋचो नामास्मि यजूंष्षि नामास्मि सामानि नामास्मि। येऽअग्नयऽ पाञ्चजन्याऽअस्यां पृथिव्यामधि। तेषामसि त्वमुत्तमऽ प्र नो जीवातवे सुव ॥ ६७ ॥

अर्थ—मी नामतः ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेदरूपी आहे म्हणजे ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद हीं माझीं नांवें आहेत. हे चित्याग्ने या पृथिवीवर मनुष्यहितकारी जे अग्नि आहेत त्यांमध्यें तूं श्रेष्ठ आहेस म्हणून आमच्या दीर्घायुत्वाची प्रेरणा कर म्हणजे आम्हाला पुष्कळ वर्षेपर्यंत वांचव ॥ ६७ ॥

विनियोग—' वार्त्रहत्याय ' इत्यादि सात, आठ अथवा दहा मंत्रांनीं चितीचे उपस्थान करावें, सूत्रकारानें एथें तीन मतें दिलीं आहेत.

वार्त्रहत्याय शवसे पृतनाषाह्याय च। इन्द्र त्वावर्तयामसि ॥ ६८ ॥

अर्थ—हे इंद्रा, दैत्यहननसमर्थ व शत्रुसेनाविनाशसमर्थ अशा बलाच्या वृद्धीकरितां आम्ही तुझें उपस्थान करतों ॥ ६८ ॥

सहदानुं पुरुहूत क्षियन्तमहस्तमिन्द्र संपिणक्कुणारुम्। अभि वृत्रं वर्धमानं पियारुमपादमिन्द्र तवसा जघन्थ ॥ ६९ ॥

अर्थ—पुष्कळ यजमानांकडून बोलावल्या गेलेल्या हे इंद्रा, उत्साहरूपी बलाच्या वर्धक अशा शत्रूला हस्तहीन करून त्याचें चूर्ण कर. तो शत्रु समीप निवास करणारा, वाईट वाक्यें बोलणारा असा आहे. हे इंद्रा, जगाला व्याप्त करणाऱ्या, देवनाशक अशा वृत्रासुराचे पाय तोडून बलानें त्याला मार ॥ ६९ ॥

वि नऽइन्द्र मृधो जहि नीचा यच्छ पृतन्यतः। योऽअस्माँ२ अभिदासत्यधरं गमया तमः॥ ७०॥

अर्थ—हे इंद्रा, आमच्या संग्रामांचा नाश कर व आमच्या शत्रूंना युद्धापासून परावृत्त कर. तसेंच जो आमचा क्षय करतो, अशा शत्रूला अधोभागीं नरकांत पाठव॥ ७०॥

मृगो न भीमः कुचरो गिरिष्ठाः परावतऽआजगन्था परस्याः। सृकꣳ सꣳ शायपविमिन्द्र तिग्मं वि शत्रून् ताढि वि मृधो नुदस्व॥ ७१॥

अर्थ—हे इंद्रा, फार दूरच्या देशांतून व लांबच्या दिशेकडूनही तूं ये व येथें येऊन शत्रूंचे विशेषेंकरून ताडण कर व शत्रुशरीरांत शिरणाऱ्या वज्राला तीक्ष्ण करून संग्रामांना दूर सार. (यास दृष्टांत) ज्याप्रमाणे भयंकर, वांकडा-तिकडा चालणारा व पर्वतांत राहणारा सिंह दुरून येऊन प्राण्यांना मारतो॥ ७१॥

वैश्वानरो नऽऊतयऽआ प्रयातु परावतः। अग्निर्नः सुष्टुतीरुपं॥ ७२॥

अर्थ—वैश्वानर अग्नि आमच्या रक्षणाच्या निमित्ताने आमच्या स्तुति ऐकण्याकरितां दूर देशांतून येवो॥ ७२॥

पृष्टो दिवि पृष्टोऽअग्निः पृथिव्यां पृष्टो विश्वाऽओषधीराविवेश। वैश्वानरः सहसा पृष्टोऽअग्निः स नो दिवा स रिषस्पातु नक्तम्॥ ७३॥

अर्थ—आदित्यरूपानें हा कोण प्रकाशतो आहे असें मुमुक्षूंनीं द्युलोकांत विचारला गेलेला, हा विद्युद्रूपानें कोण प्रकाशतो असें जलार्थीजनांनीं अन्तरिक्षांत विचारला गेलेला व जो सर्व व्रीह्यादि ओषधींत प्रविष्ट झाल्यानें हा जीवनहेतु कोण आहे असें विचारला गेलेला तसेंच अध्वर्यूंनें बलानें मंथन केल्यावर लोकांकडून हा कोण असें विचारला गेलेला विश्वकर्मा अग्नि रात्रंदिवस आमचें वधापासून रक्षण करो म्हणजे आमचा वध न करो॥ ७३॥

अश्याम तं काममग्ने तवोतीऽअश्याम रयिꣳ रयिवः सुवीरम्। अश्याम वाजमभि वाजयन्तोऽश्याम द्युम्नमजराजरं ते॥ ७४॥

अर्थ—हे अग्ने, तुझ्या पालनानें आम्ही इच्छित फल मिळवूं व हे धनवन्

अग्ने, आम्ही पुत्रसहित धन मिळवूं आणि अग्नीची पूजा करणारे आम्ही सर्वत्र अन्न मिळवूं. तसेंच हे जरारहित अग्ने, आम्ही तुझी अक्षय्य कीर्ति मिळवूं ॥ ७४ ॥

वयं तेऽअद्य रिरिमा हि काममुत्तानहस्ता नमसोपसद्य। यजिष्ठेन मनसा यक्षि देवानस्रेधता मन्मना विप्रोऽअग्ने ॥ ७५ ॥

अर्थ—हे अग्ने, मुक्तहस्ताचे आम्ही सावध, यागतत्पर, एकाग्रतायुक्त व देवता-याथात्म्य जाणणाऱ्या मनानें नमस्कारपूर्वक आज तुला यथेष्ट हवि देतों, म्हणून बुद्धिमान् अशा तूं आम्हीं दिलेल्या हविर्द्रव्यानें देवांचा याग कर ॥ ७५ ॥

धामच्छदग्निरिन्द्रो ब्रह्मा देवो बृहस्पतिः। सचेतसो विश्वेदेवा यज्ञं प्रावन्तु नः शुभे ॥ ७६ ॥

अर्थ—गृहांचें आच्छादन करणारे म्हणजे न्यूनातिरिक्तता घालवून कर्मांत समता आणणारे व एकमतानें वागणारे असे अग्नि, इन्द्र, ब्रह्मदेव, बृहस्पति व विश्वेदेव हे सर्व देव आमच्या यज्ञाला विशेषेंकरून रक्षण करोत व इष्ट अशा स्वर्गस्थानांत त्यांचें स्थापन करोत ॥ ७६ ॥

त्वं यविष्ठ दाशुषो नॄँः पाहि शृणुधी गिरः। रक्षा तोकमुत त्मना ॥७७॥

अर्थ—हे तरुणतम अग्ने, आमच्या स्तुतिवाक्यांचें श्रवण कर व हविर्द्रव्यें देणाऱ्या यजमानांचें रक्षण कर व तूं स्वतः यजमानापत्यांचेंही रक्षण कर ॥ ७७ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**

माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** अष्टादशोऽध्यायः ॥१८॥

इति अष्टादशोऽध्यायः समाप्तः ।



अथ ऊनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥



विनियोग—एकोणीस, वीस व एकवीस या तीन अध्यायांत सौत्रामणी यागाचे मंत्र आहेत. हा यज्ञ करण्याचा अधिकार ऐश्वर्येच्छु चयन याग केलेल्या यजमानाला व मुख व तदितरद्वारा सोमरसाचें ज्याला वमन झालें, अशा यजमानाला आणि राज्य-भ्रष्ट क्षत्रियाला व पशूंची इच्छा करणाऱ्या यजमानाला आहे.

' स्वाद्वीं त्वा ' या मंत्रानें सुरासंधान करावे.

स्वाद्वीं त्वा स्वादुना तीव्रां तीव्रेणामृतामृतेन मधुमतीं मधुमता सृजामि सꣳ सोमेन । सोमोऽस्यश्विभ्यां पच्यस्व सरस्वत्यै पच्यस्वेन्द्राय सुत्राम्णे पच्यस्व ॥ १ ॥

अर्थ—हे सुरे, तुला मी सोमरसाशीं युक्त करतों. तूं गोड, शीघ्र मद उत्पन्न करणारी, अमृततुल्य व मधुरस्वादयुक्त आहेस व हा सोमही गोड, शीघ्र मद उत्पादक, अमृततुल्य व मधुररस विशिष्ट आहे. हे सुरे, तूं सोमाच्या संसर्गानें सोमरूपी आहेस म्हणून मी तुला सांगतों कीं, अश्विनीकुमाराकरितां, सरस्वतीकरतां व उत्तम तऱ्हेनें रक्षण करणाऱ्या इंद्राकरितां तूं परिणाम पाव म्हणजे मादक गुण-विशिष्ट हो ॥ १ ॥

विनियोग—' परीतः ' या मंत्रानें अध्वर्यूनें सुरेवर गाईच्या दुग्धाचें सिंचन करावें.

परीतो षिञ्चता सुतꣳ सोमो यऽउत्तमꣳ हविः । दधन्वा यो नर्योऽ अप्स्वन्तरा सुषाव सोममद्रिभिः ॥ २ ॥

अर्थ—हे ऋत्विजांनो, या गाईच्या दुधानें कांडलेल्या सोमरसाचें सिञ्चन करा. जो सोमरस सर्वश्रेष्ठ हवि आहे व सर्व प्राण्यांना हितकर असून यजमानाचें धारण करणारा आहे. जलांत असलेल्या ज्या सोमाला अध्वर्यूनें पाषाणांच्या योगें कुटलें ॥२॥

विनियोग—" वायोः पूतः " या कंडिकेंत दोन ऋचा आहेत व " पुनाति ते " ही तिसरी ऋचा यांचा उलटक्रमानें सुरापवित्रीकरणांकडे विनियोग आहे.

वायोः पूतः पवित्रेण प्रत्यङ्क्सोमोऽअतिद्रुतः । इन्द्रस्य युज्यः

सखा । वायोः पूतः पवित्रेण प्राङ्क्सोमोऽअतिद्रुतः । इन्द्रस्य युज्यः सखा ॥ ३ ॥

अर्थ--अपानद्वारा खालीं गेलेला सोम पोटांतील वायूच्या पावित्र्यानें शुद्ध केला गेला. तो सोम इंद्राच्या बरोबर राहणारा मित्र आहे. मुखद्वारां वांत झालेला म्हणजे ओकला गेलेला सोम हृदयांत असलेल्या वायूच्या पावित्र्यानें शुद्ध केला गेला. तो सोम इंद्राच्या बरोबर राहणारा मित्र आहे ॥ ३ ॥

पुनाति ते परिस्रुतꣳ सोमꣳ सूर्यस्य दुहिता । वारेण शश्वता तना ॥ ४ ॥

अर्थ—अध्वर्यू यजमानाला म्हणतोः—हे यजमाना, सूर्याची मुलगी जी श्रद्धा ती तुझ्या सोमरूपापन्न सुरेला अनादि धनस्वरूपी गाईच्या किंवा अश्वाच्या पुच्छ केशानें पवित्र करिते. ॥ ४ ॥

विनियोग--" ब्रह्म क्षत्रं " या मंत्रानें वेतस पात्रांतील पय अजमेषलोमकृत पवित्रानें शुद्ध करावे.

ब्रह्म क्षत्रं पवते तेजऽइन्द्रियꣳ सुरया सोमः सुतऽआसुतो मदाय । शुक्रेण देव देवताः पिपृग्धि रसेनान्नं यजमानाय धेहि ॥ ५ ॥

अर्थ--हे सोमदेवा, तूं शुद्ध अशा वीर्यानें अग्न्यादि देवांना प्रसन्न कर व घृतादियुक्त अन्न यजमानाला दे. कारण तुझें कंडण झाल्यावर तूं ब्राह्म व क्षात्र तेजाला वाढवितोस व सुरा मिश्रित झाल्यानें तीव्र होऊन तूं मद उत्पन्न करितोत. ॥ ५ ॥

विनियोग--" कुविदंग " या मंत्रानें तीन पयःपात्रांचें ग्रहण करावें.

कुविदङ्ग यवमन्तो यवं चियथा दान्त्यनुपूर्वं वियूय । इहेहैषां कृणुहि भोजनानि ये बर्हिषो नमउक्तिं यजन्ति । उपयामगृहीतोऽस्यश्विभ्यां त्वा सरस्वत्यै त्वेन्द्राय त्वा सुत्राम्णेऽएष ते योनिस्तेजसे त्वा वीर्याय त्वा बलाय त्वा ॥ ६ ॥

अर्थ—हे सोमा, ज्याप्रमाणें पुष्कळ धान्याचे स्वामी असे शेतकरी आपले पुष्कळ धान्य वेगळें करून शीघ्र कापतात, त्याप्रमाणें या यजमानाचे ठायीं इतर यजमानांच्या उपभोग्य वस्तु स्थापन कर. ते यजमान दर्भावर बसून हविर्भागात्मक अन्नांचा याग करितात. तात्पर्य यज्ञ करणाऱ्या इतरांचीं सर्व फलें या यजमानास

मिळोत. हे दुग्धा, अश्विनीकुमार, सरस्वती देवी व चांगलें रक्षण करणारा इंद्र यांचे-करितां तूं परिपक्व हो. तुझें मीं उपयामपात्रानें ग्रहण केलें आहे. हें तुझें स्थान आहे त्यावर तेज, वीर्य व बल मिळविण्याकरितां तुझें मी स्थापन करितों ॥ ६ ॥

विनियोग—" नाना हि वाम् " या मंत्रानें उलट क्रमानें मृण्मय स्थालींतील तीन सुरापात्रांचें ग्रहण करावें.

नाना हि वां देवहितꣳ सदस्कृतं मासꣳ सृक्षाथां परमे व्योमन् । सुरा त्वमसि शुष्मिणी सोमऽएष मा मा हिꣳसीꣳ स्वां योनिमाविशन्ती ॥ ७ ॥

अर्थ—हे सुरा सोमांनों, ज्या अर्थी तुमच्या दोघांकरितां देवांना हितकारक असें वेगळें वेगळें स्थान केलें आहे, त्या अर्थी तुम्ही उत्कृष्ट व आकाशाप्रमाणें विशाल अशा या हवन स्थानामध्ये एकमेकांत मिसळूं नका. हे सुरे, तूं बलयुक्त (अशांत) अशी सुरा आहेस. हा सोम शांत आहे म्हणून या आपल्या उत्पत्तिस्थानांत प्रवेश करून तूं या सोमाची हिंसा करू नकोस ॥ ७ ॥

उपयामगृहीतोऽस्याश्विनं तेज÷ सारस्वतं वीर्यमैन्द्रं बलम् । एष ते योनिर्मोदाय त्वानन्दाय त्वा महसे त्वा ॥ ८ ॥

अर्थ—तूं उपयामपात्राने गृहीत आहेस. प्रत्यक्ष आश्विन तेज, सरस्वतीचे सामर्थ्य व इंद्रसंबंधीं बल तूंच आहेस. हें तुझे स्थान आहे. यावर प्रमोद, हर्ष व महत्त्व प्राप्त करण्याकरितां तुझे मी स्थापन करितों. ॥ ८ ॥

विनियोग—' तेजोसि ' इत्यादि तीन मंत्र भागानी गोधूम व कुवलचूर्ण, इंद्र-जव व बदरीफल चूर्ण, आणि जव व मोठ्या बोराचे चूर्ण क्रमें करून तीनही पयः-पात्रात टाकावें. नंतर ' ओजोऽसि ' वगैरे प्रत्येक मंत्रांनीं ब्रह्मादिकांचे केश सुरापानांत मिसळावेत. साधारण लहान बोरीच्या फळांना बदर म्हणतात, त्याहून मोठ्यांना कुवल म्हणतात व सर्वांत मोठ्यांना कर्कंधु असे म्हणतात.

तेजोऽसि तेजो मयि धेहि वीर्यमसि वीर्यं मयि धेहि बलमसि बलं मयि धेहि ओजोऽसि ओजो मयि धेहि मन्युरसि मन्युं मयि धेहि सहोऽसि सहो मयि धेहि ॥ ९ ॥

अर्थ—हे दुग्धा, तूं तेजोरूपी आहेस म्हणून माझे ठायीं तेजाचें स्थापन कर.

हे पात्रा, तूं वीर्यरूपी आहेस म्हणून माझें ठायीं वीर्य स्थापन कर. हे पात्रा, तूं बलरूपी आहेस म्हणून माझे ठायीं बल स्थापन कर. हे सुरे, तूं ओजोरूपी आहेस म्हणून माझे ठायीं कांति स्थापन कर. व तूं कोपरूपी आहेस म्हणून माझें ठायीं कोप स्थापन कर. ॥ ९ ॥

विनियोग—यानंतर अध्वर्यु व प्रतिप्रस्थाता या दोघांनीं श्येनाचें पीस हातांत घेऊन पूर्वाभिमुख यजमानाला पवित्र करावें.

या व्याघ्रं विषूचिकोभौ वृकं च रक्षति। श्येनं पतत्रिणꣳसिꣳहꣳसेमं पात्वꣳहंसꣳ ॥ १० ॥

अर्थ—जी विषूचिका (महामारी) वाघ व लांडगा या दोघांचें तसेंच श्येन पक्षी आणि सिंह या दोघांचें रक्षण करिते ती या यजमानाचे व्याधिहेतुभूत पापापासून रक्षण करो. ॥ १० ॥

विनियोग—' यदापिपेष ' या मंत्रांनें अध्वर्यूनें यजमानाला अग्नीकडे पहाण्यास सांगावें व त्यानें उत्तर वेदी वरील अग्नीकडे पाहावें. 'संपृचस्थ' या मंत्रभागानें यजमानानें सर्व पयःपात्रांना एकदम स्पर्श करावा व ' विपृचस्थ ' या मंत्रभागानें सुरापात्रांना स्पर्श करावा.

यदा पिपेष मातरं पुत्रꣳ प्रमुदितो धयन्। एतत्तदग्नेऽअनृणो भवाम्यहतौ पितरौ मया। संपृचं स्थ सं मा भद्रेण पृङ्क्त। विपृचं स्थ विमा पाप्मना पृङ्क्त ॥ ११ ॥

अर्थ—पुत्र असा मी आनंदित होऊन स्तनपान करीत असतां आईला लाथा मारून पीडा केली. हे अग्ने, तुझ्या समक्ष मी त्या ऋणांतून मुक्त होतों व म्हणतों की मीं आईबापांना पीडा केली नाहीं. हे पयःपात्रांनो, तुम्ही स्वतःच संयुक्त होणारे आहां म्हणून मला कल्याणानें युक्त करा. हे सुरापात्रांनो, तुम्ही वियुक्त होणारे आहां म्हणून मला पापांपासून मुक्त करा ॥ ११ ॥

देवा यज्ञमतन्वत भेषजं भिषजाश्विना। वाचा सरस्वती भिषगिन्द्रायेन्द्रियाणि दधतꣳ ॥ १२ ॥

अर्थ—देवांनीं सौत्रामणी यज्ञरूपी औषध इंद्राकरितां विस्तृत केलें त्यावेळीं अश्विनीकुमार वैद्य होते आणि सरस्वती ऋग्वेदादि तीन वेदांनीं वैद्यकर्म करणारी होती. त्या सरस्वती व अश्विनीकुमारांनीं इंद्राला सामर्थ्य दिलें ॥ १२ ॥

दीक्षायै॑ रूप॒ꣳ शष्पा॑णि प्राय॒णीय॑स्य॒ तोक्मा॑नि। क्र॒यस्य॑ रूप॒ꣳ सोम॑स्य॒ लाजा॒ऽ सोमा॑शꣳ शवो॒ मधु॑ ॥ १३ ॥

अर्थ—दीक्षणीय इष्टीचें स्वरूप बालतृणें आहेत व नवीन उत्पन्न झालेले जव हे प्रायणीय इष्टीचें रूप आहेत व लाज (साळीच्या लाह्या) सोमक्रयाचें रूप आहे तसेंच मधु हे सोमखंडांचें रूप आहे. तात्पर्य बालतृण वगैरेचें दीक्षणीयादि रूपांनीं ध्यान करावें ॥ १३ ॥

आति॒थ्यरू॒पं मास॑रं महावी॒रस्य॑ नग्नहु॒ः। रू॒पमु॑प॒सदा॑मे॒तत्ति॒स्रो रात्री॒ꣳ सुरा॑सुता ॥ १४ ॥

अर्थ—मासर (बालतृण वगैरेच्या संयोगानें होणारे द्रव्य) हें आतिथ्येष्टीचें रूप आहे व नग्नहू (सर्जत्वक् वगैरेच्या संयोगानें होणारे द्रव्य) हें धर्माचें रूप आहे. तीन दिवसपर्यंत कंडण करून खड्यांत स्थापन केलेली सुरा हें उपसद्-इष्टीचें रूप आहे ॥ १४ ॥

सोम॑स्य रू॒पं क्री॒तस्य॑ परिस्रु॒त्परि॑षिच्यते। अ॒श्वि॒भ्यां दु॒ग्धं भे॑ष॒जमिन्द्रा॑-यै॒न्द्रꣳ सर॑स्वत्या ॥ १५ ॥

अर्थ—अश्विनीकुमाराकरितां, सरस्वतीकरितां व इंद्राकरितां जें दुग्ध तीन दिवस काढलें ती जी परिस्रुत्रूपी सुरा सिञ्चन केली जाते ती क्रीत (विकत घेतलेल्या) सोमाचें रूप आहे ॥ १५ ॥

आस॒न्दी रू॒पꣳ रा॑जास॒न्यै वे॒यै॑ कु॒म्भी सु॒रा॒धानी॑। अ॒न्तर॑ऽउत्तरवे॒या रू॒पं का॑रोत॒रो भि॒षक् ॥ १६ ॥

अर्थ—हा चौरंग सोमाच्या चौरंगाचें रूप आहे. व सुरा कुंभी (ज्यांत दारू आहे असा घट) सोमयज्ञांतील वेदीचें रूप आहे. दोन वेदींतील मध्यभाग हें उत्तर वेदीचें रूप आहे. तसेंच सुरा गाळण्याची चाळणी ही इंद्राच्या व यजमानाच्या वैद्याचें रूप आहे ॥ १६ ॥

वेद्या वेदिꣳ समाप्यते बर्हिषा बर्हिरिन्द्रियम् । यूपेन यूपऽआप्यते प्रणीतोऽअग्निरग्निना ॥ १७ ॥

अर्थ—येथें असलेल्या वेदीनें सोमांतील वेदीचें काम होतें व येथें असलेल्या दर्भानें सोमांतील दर्भाचें काम होतें तसेंच येथील वीर्यानें सौमिक वीर्य व येथील यूपानें सौमिक यूप तसेंच येथील अग्नीनें सौमिक अग्नि यांचें कार्य होतें म्हणजे त्या त्या पदार्थांचें तत् तत् रूपानें ध्यान करावें ॥ १७ ॥

हविर्धानं यदश्विनाग्नीध्रं यत्सरस्वती । इन्द्रायैन्द्रꣳ सदस्कृतं पत्नीशालं गार्हपत्यꣳ ॥ १८ ॥

अर्थ—या सौत्रामणी यागांत ज्या अश्विनीकुमार देवता आहेत त्यायोगें सौमिक हविर्धान, व येथें जी सरस्वती देवता आहे तिच्यायोगें सौमिक आग्नीध्र संपन्न होतें. व या सौत्रामणी यागांत जें इंद्रदेवताक हविर्द्रव्य केलें जातें त्यायोगें सोमांतील सदोमंडप, पत्नीशाला व गार्हपत्य यांचें कार्य होतें म्हणजे तत् तत् रूपानें त्या त्या वस्तूंचें ध्यान करावें. ॥ १८ ॥

प्रैषेभिः प्रैषानाप्नोत्याप्रीभिराप्रीर्यज्ञस्य । प्रयाजेभिरनुयाजान्वषट्कारेभिराहुतीꣳ ॥ १९ ॥

अर्थ—येथील प्रैषांनी, आप्रींनीं (प्रयाजयाज्यांनीं) यज्ञाच्या प्रयाजांनीं, अनुयाजांनीं, वषट्कारांनीं व आहुतीनीं व सोमांतील प्रैष आप्री, प्रयाज, अनुयाज, वषट्कार व आहुतीचें कार्य होतें. ॥ १९ ॥

पशुभिः पशूनाप्नोति पुरोडाशैर्हविर्द्रव्या । छन्दोभिꣳ सामिधेनीर्याज्याभिर्वषट्कारान् ॥ २० ॥

अर्थ—येथील (सौत्रामणींतील) पशूंनीं, पुरोडाशांनीं, हविर्द्रव्यांनीं, छंदांनीं, सामिधेनींनीं व याज्या मंत्रांनीं आणि वषट्कारांनीं सोमांतील पशु, पुरोडाश, हविर्द्रव्यें, छंद, सामिधेनी व याज्या मंत्र आणि वषट्कार यांचें कार्य होतें ॥ २० ॥

धानाꣳ करम्भꣳ सक्तवꣳ परीवापꣳ पयो दधि । सोमस्य रूपꣳ हविषऽआमिक्षा वाजिनं मधु ॥ २१ ॥

अर्थ—येथील धाना (भाजलेले जव) उदमंथ, सातू, हविर्द्रव्यें, दूध, दहीं, हीं

सोमाचीं रूपें आहेत. आमिक्षा आणि मधुर वाजिन हें हविर्द्रव्याचें रूप आहे. (तापलेल्या दुधांत दही घातलें असतां त्याचे दोन भाग होतात, एक घन (गोळा) भाग व दुसरा द्रव (पातळ) भाग त्यांतील गोळा भागाला आमिक्षा म्हणतात व पातळ भागाला वाजिन म्हणतात) ॥ २१ ॥

धानानांꣳ रूपं कुबलं परीवापस्यं गोधूमांऽ । सक्तूनाꣳ रूपं बदरमुपवाकाऽ करम्भस्यं ॥ २२ ॥

अर्थ—कोंवळें बदरीफल हें धानांचें रूप आहे व गोधूम (गहूं) परीवापाचें व स्थूल बदरीफल सातूंचें व जव हें करंभांचें रूप आहे, असें समजावें. ॥ २२ ॥

पयसो रूपं यवयवा दध्नो रूपं कर्कन्धूनि । सोमस्य रूपं वाजिनꣳ सौम्यस्यं रूपमामिक्षा ॥ २३ ॥

अर्थ—जव हें दुधाचें रूप, स्थूल बदर दह्याचें, वाजिन सोमाचें, व आमिक्षा सोमांतील चरूचें रूप आहे ॥ २३ ॥

आश्रावयेति स्तोत्रियांऽ प्रत्याश्रावोऽअनुरूपऽ । यजेति धाय्यारूपं प्रगाथा येयजामहाऽ ॥ २४ ॥

अर्थ—' आश्रावय ' हा शब्द स्तोत्रांतील पहिल्या तीन ऋचांचें स्वरूप आहे. तसेंच अस्तुश्रौषट् हा शब्द उत्तर तीन ऋचांचें, 'यज' हें धाम्यांचें व ' ये यजामहे ' हें प्रगाथांचें रूप आहे. ॥ २४ ॥

अर्धऋचैरुक्थानांꣳ रूपं पदैरांप्नोति निविदंऽ । प्रणवैऽ शस्त्राणांꣳ रूपं पयसा सोमंऽआप्यते ॥ २५ ॥

अर्थ—येथील (सौत्रामणींतील) अर्ध ऋचांनीं उक्थशस्त्रांचें, पदांनीं न्यूङ्खाचें, ॐकारांनीं शस्त्रांचें रूप प्राप्त केलें जातें व दुधानें सोमरस प्राप्त केला जातो. ॥२५॥

अश्विभ्यां प्रातऽसवनमिन्द्रेणैन्द्रं माध्यन्दिनम् । वैश्वदेवꣳ सरस्वत्या तृतीयसवनम् ॥ २६ ॥

अर्थ—अश्विनीकुमार देवांनीं प्रातः सवनाची प्राप्ति होते. तसेंच इंद्र देवानें माध्यंदिन सवनाची व सरस्वती देवतेनें तृतीय सवनाची प्राप्ति होते ॥ २६ ॥

वायव्यैर्वायव्यान्याप्नोति सतेन द्रोणकलशम् । कुम्भीभ्यांमम्भृणौ सुते स्थालीभिः । स्थालीरांप्नोति ॥ २७ ॥

अर्थ—वायव्य पात्रांनीं वायव्य सोम पात्रांची, वैतस् पात्रानें द्रोणकलशाची, शतःछिद्र सुरा कुंभीच्यायोगानें सोम कंडण झाल्यावर होणाऱ्या पूतभृत व आधवनीयांची आणि स्थालींच्या योगानें स्थालींची प्राप्ति होते ॥ २७ ॥

यजुर्भिराप्यन्ते ग्रहा ग्रहैः स्तोमाश्च विष्टुतीः । छन्दोभिरुक्थाशस्त्राणि साम्नावभृथऽआप्यते ॥ २८ ॥

अर्थ—यजूंच्यायोगें यजु, गृहांच्यायोगें गृह, स्तोमांच्यायोगें स्तोम, विविध स्तुतींच्या योगें विविध स्तुती, छंदांच्यायोगें उक्थ आणि शस्त्रें, सामाच्यायोगें साम आणि अवभृथाच्यायोगें अवभृथ यांची प्राप्ति होते. ॥ २८ ॥

इडाभिर्भक्षानाप्नोति सूक्तवाकेनाशिषः । शंयुना पत्नीसंयाजान्त्समिष्टयजुषा सꣳस्थाम् ॥ २९ ॥

अर्थ—इडा, भक्ष, सूक्तवाक आशीर्वाद, शंयु नांवाचा होम, पत्नीसंयाज व समिष्ट यजु आणि संस्था यांच्यायोगें क्रमेंकरून इडा, भक्ष, सूक्तवाक, आशीर्वाद, शंयु नांवाचा होम, पत्नीसंयाज, समिष्टयजु आणि संस्था यांची प्राप्ति होते. ॥ २९ ॥

व्रतेन दीक्षामाप्नोति दीक्षयाप्नोति दक्षिणाम् । दक्षिणा श्रद्धामाप्नोति श्रद्धया सत्यमाप्यते ॥ ३० ॥

अर्थ—व्रतानें दीक्षा, दीक्षेनें दक्षिणा, दक्षिणेनें श्रद्धा, व श्रद्धेनें सत्यज्ञानानंतरूपी ब्रह्मस्वरूप प्राप्त होतें. ॥ ३० ॥

एतावद्रूपं यज्ञस्य यद्देवैर्ब्रह्मणा कृतम् । तदेतत्सर्वमाप्नोति यज्ञे सौत्रामणीसुते ॥ ३१ ॥

अर्थ—देवांनीं व प्रजापतीनें जें यज्ञाचें रूप बनविलें तें हें एवढेंच आहे. सौत्रामणी यागांत सोमरसाचें कंडण केलें असतां वर सांगितलेलें सोमाचें सर्व रूप प्राप्त होतें ॥ ३१ ॥

विनियोग—'सुरावंत' या मंत्रानें अध्वर्यूनें तीनही पयःपात्रांचा एकदम होम करावा म्हणजे सर्व पात्रांतील दुधाचा होम करावा.

सुरावन्तं बर्हिषदꣳ सुवीरं यज्ञꣳ हिन्वन्ति महिषा नमोभिः । दधानाः सोमं दिवि देवतासु मदेमेन्द्रं यजमानाः स्वर्काः ॥ ३२ ॥

अर्थ—मोठे ऋत्विज् सौत्रामणी यज्ञाला वाढवितात. तो यज्ञ देवता विशिष्ट, सुरायुक्त व उत्तम ऋत्विजांनीं युक्त असा आहे व ते ऋत्विज अन्नानें व नमस्कारांनीं स्वर्गावर एकत्र राहणाऱ्या देवतांचे ठायीं सोमरसाचें स्थापन करणारे आहेत. त्या यज्ञांत उत्तम मंत्र म्हणून व इंद्राचा याग करून आम्ही संतुष्ट होऊं. ॥ ३२ ॥

विनियोग—' यस्ते ' या मंत्रानें प्रतिप्रस्थात्यानें दक्षिणाग्नीवर सुराग्रहांचा होम करावा)

यस्ते रसꣳ संभृतऽओषधीषु सोमस्य शुष्मꣳ सुरया सुतस्य । तेन जिन्व यजमानं मदेन सरस्वतीमश्विनाविन्द्रमग्निम् ॥ ३३ ॥

अर्थ—हे सुरे, जो तुझा रस औषधींत एकत्र झाला आहे व सुरेसह कण्डण केलेल्या सोमरसाचें जें बल आहे त्या मदजनक सुरारसानें व सोमबलानें यजमान, सरस्वती, अश्विनीकुमार, इन्द्र, व अग्नि यांना संतुष्ट कर ॥ ३३ ॥

विनियोग—' यमश्विना ' या मंत्रानें अध्वर्यु, प्रतिप्रस्थाता व आग्नीध्र यांनीं आश्विन पयोग्रहाचें दोन दोन वेळां भक्षण करावें. होता, ब्रह्मा व मैत्रावरुण यांनीं सारस्वत पयोग्रहाचें भक्षण करावें व यजमानानें ऐन्द्र पयोग्रहाचें भक्षण करावें.

यमश्विना नमुचेरासुरादधि सरस्वत्यसुनोदिन्द्रियाय । इमं तꣳ शुक्रं मधुमन्तमिन्दुꣳ सोमꣳ राजानमिह भक्षयामि ॥ ३४ ॥

अर्थ—अश्विनीकुमारांनीं असुरपुत्र नमुचीपासून जो सोमरस आणला व सरस्वतीनें इंद्रियसामर्थ्याकरितां ज्याचें कंडण केलें त्या त्या शुद्ध, मधुररसयुक्त व ऐश्वर्यप्रद अशा सोमराजाला या यज्ञांत मी भक्षण करतों ॥ ३४ ॥

विनियोग—' यदत्र ' या मंत्रानें अध्वर्यु वगैरेंनीं अपसव्य करून आश्विनादि सुराग्रह भक्षण करावे.

यदत्र रिप्तꣳ रसिनः सुतस्य यदिन्द्रोऽअपिबच्छचीभिः । अहं तदस्य मनसा शिवेन सोमꣳ राजानमिह भक्षयामि ॥ ३५ ॥

अर्थ—रसयुक्त व कण्डन केलेल्या सोमाचा जो अंश या सुरेंत संलग्न झाला व ज्या सुरालग्न सोमभागाला कर्मांनीं शुद्ध करून त्याचें इंद्रानें पान केलें त्या सुरानिर्गत सोमांशाचें मी या यज्ञांत शुद्धमनानें भक्षण करतों ॥ ३५ ॥

विनियोग—' पितृभ्यः ' इत्यादि मंत्राच्या प्रत्येक भागानें आश्विनादि सुराग्रहाचा होम करावा.

पितृभ्यः÷ स्वधायिभ्यः÷ स्वधा नमः÷ पितामहेभ्यः÷ स्वधायिभ्यः स्वधा नमः÷ प्रपितामहेभ्यः÷ स्वधायिभ्यः÷ स्वधा नमः÷। अक्षन्पितरोऽमीमदन्त पितरोऽतीतृपन्त पितरः पितरः शुन्धध्वम् ॥ ३६ ॥

अर्थ—स्वधासंज्ञक अन्न ग्रहण करणाऱ्या पितृपितामहप्रपितामहांना स्वधारूपी अन्न असो व त्यांस नमस्कार असो, पितरांनीं तें अन्न भक्षण केलें व ते संतुष्ट झाले व अभीष्ट देऊन त्यांनीं आम्हांस संतुष्ट केलें. हे पितरांनो, तुम्ही हस्तप्रक्षालन करून शुद्ध व्हा ॥ ३६ ॥

विनियोग—अध्वर्यूनें यजमानाकडून 'पुनन्तु मा' इत्यादि नऊ ऋचा म्हणवाव्या.

पुनन्तु मा पितरः÷ सोम्यासः÷ पुनन्तु मा पितामहाः पुनन्तु प्रपितामहाः पवित्रेण शतायुषा। पुनन्तु मा पितामहाः पुनन्तु प्रपितामहाः पवित्रेण शतायुषा विश्वमायुर्व्यश्नवै ॥ ३७ ॥

अर्थ—सौम्य असे पितृ, पितामह व प्रपितामह मला शंभर वर्षे आयुष्य देणाऱ्या अशा पवित्रानें शुद्ध करोत. (पुनः तोच अर्थ आदरार्थ सांगितला आहे) अशा रीतीनें पितरांनीं शुद्ध केलेल्या मला संपूर्ण आयुष्य प्राप्त होवो ॥ ३७ ॥

अग्नेऽआयूंꣳषि पवसेऽआसुवोर्जमिषं च नः। आरे बाधस्व दुच्छुनाम् ॥ ३८ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं आयुष्यप्रापक कर्मे करवितोस म्हणून आम्हाला व्रीह्यादि धान्य, दहीं वगैरे रस दे. व आमच्यापासून दूर असलेल्यालाही दुष्ट श्वानांसारख्या दुर्जनांचा तूं नाश कर ॥ ३८ ॥

पुनन्तु मा देवजनाः पुनन्तु मनसा धियः÷। पुनन्तु विश्वा भूतानि जातवेदः पुनीहि मा ॥ ३९ ॥

अर्थ—देवानुयायी जन मनासह कर्मे व सर्व भूतें मला पवित्र करोत. हे अग्ने, तूंही मला पवित्र कर ॥ ३९ ॥

पवित्रेण पुनीहि मा शुक्रेण देव दीद्यत्। अग्ने क्रत्वा क्रतूँ२॥ रनु ॥४०॥

अर्थ—हे प्रकाशमान अग्ने, शुद्ध पवित्रानें मला व यज्ञासंबंधी माझ्या कर्मांना पवित्र कर ॥ ४० ॥

यत्ते पवित्रमर्चिष्यग्ने वितततमन्तरा । ब्रह्म तेन पुनातु मा ॥ ४१ ॥

अर्थ—हे अग्ने, तुझ्या ज्वालेमध्यें जें वेदत्रयरूपी ब्रह्म पसरलें आहे त्यानें मला पवित्र कर ॥ ४१ ॥

पवमानꣳ सोऽअद्य नः÷ पवित्रेण विचर्षणिꣳ । यꣳ पोता स पुनातु मा ॥ ४२ ॥

अर्थ—माझें रुत व अकृत कर्म जाणणारा शोधक असा सोम आज मला पवित्रानें शुद्ध करो. तसेंच शुद्ध करणारा वायूही शुद्ध करो ॥ ४२ ॥

उभाभ्यां देव सवितः पवित्रेण सवेन च । मां पुनीहि विश्वतः÷ ॥४३॥

अर्थ—हे सवितृ देवा, पवित्र व यज्ञानुज्ञा या दोघांनीं मला सर्व बाजूंनीं पवित्र कर. ॥ ४३ ॥

वैश्वदेवी पुनती देव्यागादयस्यामिमा ब्रह्मचुस्तन्वो वीतपृष्ठाः । तया मदन्तः सधमादेषु वयꣳस्याम पतयो रयीणाम् ॥ ४४ ॥

अर्थ—सर्व देवांना हितकारक, पवित्र करणारी व प्रकाशमान सुराकुंभी (दारूचा घट) आली. जिच्यांत इष्ट स्वरूपी शरीरासारख्या पुष्कळ घृतधारा आहेत, यज्ञस्थानामध्यें त्या सुराकुंभीनें आम्ही आनंदित होऊन पुष्कळ धनाचे स्वामी होऊं ॥ ४४ ॥

विनियोग—यजमानानें अपसव्य करून "ये समानाः" या मंत्रानें दक्षिणाग्नींत होम करावा.

ये समानाः समनसः पितरो यमराज्ये । तेषां लोकः स्वधानमो यज्ञो देवेषु कल्पताम् ॥ ४५ ॥

अर्थ—ज्यांत यमाचें राज्य आहे अशा यमलोकांत ज्यांचें जाती, रूप व मन सारखें आहे अशा पितरांना आम्हीं दिलेलें अन्न समर्पित होवो व त्यांस आमचा नमस्कार असो व यज्ञ देवांना संतुष्ट करण्यास समर्थ होवो. ॥ ४५ ॥

विनियोग—"ये समानाः" या मंत्रानें यजमानानें सव्य करून आहवनीय अग्नीवर आज्याचा होम करावा.

ये समानाः समनसो जीवा जीवेषु मामकाः । तेषाꣳ श्रीर्मयि कल्पतामस्मिल्लोके शतꣳ समाः ॥ ४६ ॥

अर्थ—या लोकामध्यें जे प्राणी मजसारख्या जातीनें, रूपानें व मनानें युक्त आहेत व त्यामध्यें जे माझे सपिंड व दायाद आहेत, त्यांची संपत्ति शंभर वर्षेपावेतों मला प्राप्त होवो. ॥ ४६ ॥

विनियोग—" द्वे सृती " या मंत्रानें अध्वर्यूनें दुग्धाचा होम करावा.

द्वे सृतीऽअशृणवं पितॄणामहं देवानामुत मर्त्यानाम् । ताभ्यामिदं विश्वमेजत्समेति यदन्तरा पितरं मातरं च ॥ ४७ ॥

अर्थ—मर्त्य प्राण्यांकरितां दोन मार्ग आहेत असें मीं ऐकिलें आहे. एक देवमार्ग व एक पितृमार्ग. द्युलोक व पृथ्वी लोकांमध्यें चलन पावणारें हें सर्व जग या देवयान व पितृयान मार्गांनीं युक्त होतें. त्या मार्गांना हें हवि सुहुत असो. ॥ ४७ ॥

विनियोग—" इदꣳ हविः " या मंत्रानें यजमानानें हविःशेष भक्षण करावें.

इदꣳ हविः प्रजननं मेऽअस्तु दशवीरꣳ सर्वगणꣳस्वस्तये । आत्मसनि प्रजासनि पशुसनि लोकसन्यभयसनि । अग्निः प्रजां बहुलां मे करोत्वन्नं पयो रेतोऽअस्मासु धत्त ॥ ४८ ॥

अर्थ—हें पयोरूपी हविर्द्रव्य माझें कल्याण करो. हें हविर्द्रव्य प्रजोत्पादक, प्राणापानादिकांना स्वास्थ्य देणारें, सर्व अवयवांना स्वास्थ्य देणारें, शरीर, बल, प्रजा, पशु, ऐहिक सुख व स्वर्ग यांप्रत देणारें असें आहे. अग्नि माझ्या प्रजेला वाढवो. हे ऋत्विजांनो, आमचे ठायीं व्रीह्यादि अन्न, व दुग्ध वीर्य स्थापन करा. ॥ ४८ ॥

विनियोग—अध्वर्यूनें यजमानाकडून " उदीरताम् " इत्यादि तेरा मंत्र म्हणवावे.

उदीरतामवरऽउत्परासऽउन्मध्यमाः पितरः सोम्यासः । असुं यऽईयुरवृकाऽऋतज्ञास्ते नोऽवन्तु पितरो हवेषु ॥ ४९ ॥

अर्थ—ऊर्ध्व लोकस्थित व मध्यलोकस्थित पितर त्या पेक्षांही वर जावोत. ते सोम संपादन करणारे वातरूपी, शत्रुरहित, सत्य अगर यज्ञ जाणणारे पितर यज्ञांत आमचें रक्षण करोत. ॥ ४९ ॥

अङ्गिरसो नः पितरो नवग्वाऽअथर्वाणो भृगवः सोम्यासः । तेषां वयꣳ सुमतौ यज्ञियानामपि भद्रे सौमनसे स्याम ॥ ५० ॥

अर्थ—यज्ञाचें हित करणारे व सोम संपादन करणारे, ज्यांची गति स्तुत्य आहे व जे अथर्वकुलोत्पन्न आणि भृगुकुलोत्पन्न आहेत ते पितर आमचे ठिकाणीं सद्बुद्धि धारण करोत. ॥ ५० ॥

ये नः पूर्वे पितरः सोम्यासोऽनूहिरे सोमपीथं वसिष्ठाः । तेभिर्यमः संरराणो हवींष्युशन्नुशद्भिः प्रतिकाममंतु ॥ ५१ ॥

अर्थ—सोम संपादन करणारे व वसिष्ठ गोत्रोत्पन्न असे जे आमचे पितर ते सोमरस देवाकडे पोचविते झाले. त्या इच्छा करणाऱ्याचा पितरांसह इच्छा करणारा यम संतुष्ट होऊन यथेच्छ हवि भक्षण करो. ॥ ५१ ॥

त्वꣳसोम प्रचिकितो मनीषा त्वꣳरजिष्ठमनुनेषि पन्थाम् । तव प्रणीती पितरो नऽइन्दो देवेषु रत्नमभजन्त धीराः ॥ ५२ ॥

अर्थ—हे चेतनावान् सोमा, तूं आपल्या बुद्धीनें अत्यंत सरळ अशा देवयान मार्गाप्रत आम्हांला पोंचवितोस तसेंच आमचे बुद्धिमान् पितर तुझ्या आज्ञेनें देवलोकांतील रम्य असें यज्ञफल मिळविते झाले ॥ ५२ ॥

त्वया हि नः पितरः सोम पूर्वे कर्माणि चक्रुः पवमान धीराः । वन्वन्नवातः परिधीँ१॥ रपोर्णु वीरेभिरश्वैर्मघवा भवा नः ॥ ५३ ॥

अर्थ—हे पवित्र करणाऱ्या सोमा, आमचे बुद्धिमान् पूर्वज तुझ्या साह्यानें यज्ञादि कर्मांचें अनुष्ठान करिते झाले म्हणून आम्हांला उपद्रव करणाऱ्या शत्रूंचा नाश कर. तूं आमच्या कर्मांचा विभाग करणारा व वातादि उपद्रवांनीं रहित असा आहेस. तूं आम्हांला पुत्र, अश्व व धन दे ॥ ५३ ॥

त्वꣳ सोम पितृभिः संविदानोऽनु द्यावापृथिवी आततन्थ । तस्मै तऽइन्दो हविषा विधेम वयꣳ स्याम पतयो रयीणाम् ॥ ५४ ॥

अर्थ—हे सोमा, पितरांबरोबर संभाषण करणारा असा तूं द्युलोक व पृथ्वी लोकांप्रत निर्माण करिता झालास. अशा हे इंदो, तुला आम्ही हवि देतों. त्यायोगें आम्ही द्रव्याचे स्वामी होऊं ॥ ५४ ॥

बर्हिषदः पितरऊत्युर्वागिमा वो हव्या चकृमा जुषध्वम्। तऽआगतावसा शंतमेनाथा नऽ शं योरपो दधात ॥ ५५ ॥

अर्थ—हे दर्भस्थ पितरांनो, तुम्ही आमच्या संरक्षणाकरितां खालीं या. कां कीं, आम्ही तुम्हांला हविर्द्रव्य देतों तें तुम्ही सेवन करा. नंतर सुखकारक अशा अन्नानें संतुष्ट होऊन आमचें कल्याण, अभय व पापनिवृत्ति करा ॥ ५५ ॥

आहं पितून्त्सुविदत्राँ२॥ अवित्सि नपातं च विक्रमणं च विष्णोः। बर्हिषदो ये स्वधया सुतस्य भजन्त पित्वस्तऽइहागमिष्ठाः ॥ ५६ ॥

अर्थ—मी कल्याणकारक पितरांना सन्मुख होऊन जाणता झालों आणि व्यापक जो यज्ञ त्याचे देवयान व पितृयान नांवाचे मार्ग मी जाणतों. तसेंच ऊर्ध्वगामी पितरांनाही जाणतों. म्हणून म्हणतों कीं, जे दर्भस्थ पितर हवनीय अन्नाबरोबर कुटलेल्या सोमाच्या रसाचे पान करितात ते या यज्ञांत येवोत ॥ ५६ ॥

उपहूताः पितरः सोम्यासो बर्हिष्येषु निधिषु प्रियेषु। तऽआगमन्तु तऽइह श्रुवन्त्वधिब्रुवन्तु तेजिन्त्वस्मान् ॥ ५७ ॥

अर्थ—दर्भावर सांठवून ठेवलेल्या इष्ट हविर्द्रव्याकरितां बोलाविले जाणारे सोमपानार्ह अशा हे पितरांनो, तुम्ही या, आमचें वाक्य ऐका व तें ऐकल्यावर आम्हांला योग्य तें सांगा व आमचें रक्षण करा ॥ ५७ ॥

आयन्तु नः पितरः सोम्यासोऽग्निष्वात्ताः पथिभिर्देवयानैः। अस्मिन् यज्ञे स्वधया मदन्तो धिब्रवन्तु तेऽवन्त्वस्मान् ॥ ५८ ॥

अर्थ—सोमपानार्ह व श्रौतस्मार्त कर्म करणारे पितर देवमार्गांनीं येवोत व येथें येऊन अन्नानें संतुष्ट होऊन त्यांनीं आम्हांस मोठें म्हणावें आणि त्यांनीं आमचें पालन करावें ॥ ५८ ॥

अग्निष्वात्ताः पितरऽएह गच्छत सदः सदः सदत सुप्रणीतयः। अत्ता हवींषि प्रयतानि बर्हिष्यथा रयिꣳ सर्ववीरं दधातन ॥ ५९ ॥

अर्थ—ज्यांचें उत्तम प्रकारें करून स्तवन केलें आहे, अशा अग्निष्वात्त पितरांनो, या यज्ञांत या व सदोमंडपांत बसून दर्भावर विधिपूर्वक ठेवलेलें हविर्द्रव्य भक्षण करा. नंतर संतुष्ट होऊन पुत्रादि सर्व समृद्धियुक्त द्रव्य आम्हांला द्या ॥ ५९ ॥

येऽअग्निष्वात्ता येऽअनग्निष्वात्ता मध्ये दिवः स्वधया मादयन्ते ।
तेभ्यः स्वराऽसुनीतिमेतां यथावशं तन्वं कल्पयाति ॥ ६० ॥

अर्थ—उत्तरक्रिया (और्ध्वदेहिक कर्म) यथाविधि झाली असो अगर नसो तथापि जे पितर आपल्या कर्मानें मिळविलेल्या अन्नानें स्वर्गांत सुखानें राहतात त्यांना स्वयंप्रकाशमान असा यम आपल्या इच्छेप्रमाणें चिरकाल टिकणारें मनुष्य-शरीर देतो. ॥ ६० ॥

अग्निष्वात्तानृतुमतो हवामहे नाराशꣳसे सोमपीथं य ऽआशुः ।
ते नो विप्रासः सुहवा भवन्तु वयꣳस्यामु पतयो रयीणाम् ॥ ६१ ॥

अर्थ—ऋतुयुक्त अशा अग्निष्वात्त पितरांचें आम्ही आव्हान करितों. जे पितर नाराशंस (पितृभक्षयुक्त) चमस पात्रांत सोमपान करिते झाले ते पितर आमच्या बोलावण्यानें शीघ्र येवोत. नंतर त्यायोगें आम्ही द्रव्याचे स्वामी होऊं. ॥ ६१ ॥

विनियोग—'आच्या जानु ' इत्यादि दहा ऋचांनीं पितरांची प्रार्थना करावी.

आच्या जानु दक्षिणतो निषद्येमं यज्ञमभिगृणीत विश्वे ।
मा हिꣳसिष्ट पितरः केनचिन्नो यद्वऽआगः पुरुषता करम ॥ ६२ ॥

अर्थ—हे पितरांनो, तुम्ही सर्वांनीं दक्षिणाभिमुख होऊन व डावा जानुभाग (गुडघा) पालथा करून या सौत्रामणी यागाची स्तुति करावी. हे पितरांनो, कोण-त्याही कारणांकरितां तुम्ही आमची हिंसा करूं नका; कारण पुरुषस्वभावाप्रमाणें चंचल चित्त होऊन आम्ही तुमचा अपराध करितों. तथापि तुम्ही मात्र आमची हिंसा करूं नये. ॥ ६२ ॥

आसीनासो अरुणीनामुपस्थे रयिं धत्त दाशुषे मर्त्याय । पुत्रेभ्यः
पितरस्तस्य वस्वः प्रयच्छत तऽइहोर्जं दधात ॥ ६३ ॥

अर्थ—हे पितरांनो, रक्तवर्णाच्या ऊर्णासनावर बसलेल्या तुम्ही हविर्भाग देणाऱ्या या यजमानाला द्रव्य द्यावें. हे पितरांनो, तुम्ही यजमानरूपी आपल्या पुत्रांना इष्ट असें द्रव्य द्या व आमच्या यज्ञांमध्यें यश स्थापन करा ॥ ६३ ॥

यमग्ने कव्यवाहन त्वं चिन्मन्यसे रयिम् । तं नो गीर्भिः श्रवाय्यं
देवत्रा पनया युजम् ॥ ६४ ॥

अर्थ—पितृहविर्भाग धारण करणाऱ्या हे अग्ने, तूंही जें आमचें हविर्द्रव्य (तुला चांगलें वाटतें तें देवांस समर्पण कर. तें हविर्द्रव्य) पुरोनुवाक्या व याज्या आणि वषट्कारांनीं श्रवण करण्यास योग्य आहे ॥ ६४ ॥

योऽ अग्निः कव्यवाहनः पितृन्यक्षदृतावृधः ÷ । प्रेदु हव्यानि वोचति देवेभ्यश्च पितृभ्य ऽ आ ॥ ६५ ॥

अर्थ—पितृहविर्द्रव्य धारण करणारा जो अग्नि सत्य वाढविणाऱ्या पितरांचा याग करिता झाला तो आतां देवांना व पितरांना आमची हविर्द्रव्यें सांगो म्हणजे देवांकडे व पितरांकडे जाऊन हीं तुमचीं हविर्द्रव्यें आहेत असें कथन करो. ॥ ६५ ॥

त्वमग्नऽईड्डितः कव्यवाहनावाड्ढव्यानि सुरभीणि कृत्वी । प्रादाः पितृभ्यः ÷ स्वधया तेऽअक्षन्नद्धि त्वं देव प्रयता हवीꣳषि ॥ ६६ ॥

अर्थ—पितृहविर्द्रव्य धारण करणाऱ्या हे अग्ने, देव ऋत्विजांकडून स्तुति केला गेलेला तूं हविर्द्रव्यांना वहन केलेंस म्हणजे नेलेंस व स्वधारूपी पितृमंत्रानें पितरांकडे नेलेंस त्या पितरांनीं तें हविर्द्रव्य भक्षण केलें. हे अग्ने, तूंही शुद्ध अशीं तीं हविर्द्रव्यें भक्षण कर. ॥ ६६ ॥

ये चेह पितरो ये च नेह यांश्च विद्म याँ२॥ उ च न प्रविद्म । त्वं वेत्थ यति ते जातवेदः स्वधाभिर्यज्ञꣳ सुकृतं जुषस्व ॥ ६७ ॥

अर्थ—जे पितर या लोकांत आहेत व जे या लोकांत नाहींत तसेंच जे पितर आम्हांस माहीत आहेत व नाहींत ते सर्व किती आहेत ते हे अग्ने, तुला माहीत आहे. तूं पितरांच्या स्वधारूपी अन्नानें केलेल्या यज्ञाचें सेवन कर. ॥ ६७ ॥

इदं पितृभ्यो नमोऽ अस्त्वद्य ये पूर्वासो यऽ उपरासऽईयुः । ये पार्थिवे रजस्या निषत्ता ये वा नूनꣳ सुवृजनासु विक्षु ॥ ६८ ॥

अर्थ—जे पूर्वीचे पितर स्वर्गांत गेले व कृतकृत्य होऊन जे पितर मोक्षास गेले व जे पृथ्वीवरील अग्नींत स्थित झालेले, तसेंच धर्मबलानें युक्त अशा यजमानरूप प्रजेचे ठायीं जे स्थित झाले अशा चारही प्रकारच्या पितरांना हें अन्न असो. ॥ ६८ ॥

अधा यथा नः पितरः परासः प्रत्नासो ऽ अग्न ऽ ऋतमाशुषाणाः । शुचीदयन्दीधितिमुक्थशासः क्षामा भिन्दन्तोऽअरुणीरपव्रन् ॥ ६९ ॥

अर्थ—हे अग्ने, जे आमचे उत्कृष्ट, प्राचीन व यज्ञाला प्राप्त करणारे पितर मरणानंतर ज्या प्रकारें करून देवयान मार्गानें निर्मळ अशा रविमंडळाला प्राप्त झाले, त्याप्रमाणें यज्ञांतील शस्त्र म्हणणारे वेदी, चात्वाल इत्यादिकांच्या योगानें भूमीचें विदारण करणारे म्हणजे यज्ञ करणारे आम्हीही रक्तवर्णाच्या सूर्यकिरणांना व्याप्त करूं म्हणजे देवयानमार्गाला प्राप्त होऊं ॥ ६९ ॥

उशन्तस्त्वा निधीमहयुशन्तꣳ समिधीमहि । उशन्नुशत ऽ आवह पितॄन्हाविषे ऽ अत्तवे ॥ ७० ॥

अर्थ—हे अग्ने, कामना करणारे आम्ही तुझी स्थापना करितों व तुला प्रदीप्त करितों व हे कामना असलेल्या अग्ने, तूं आमच्या पितरांना भक्षण करण्याकरितां हविर्द्रव्य आण ॥ ७० ॥

अपां फेनेन नमुचेꣳ शिरऽ इन्द्रोदवर्तयꣳ । विश्वा यदजय । स्पृधः ÷ ॥ ७१ ॥

अर्थ—हे इंद्रा, ज्या वेळीं तूं सर्व संग्रामांना जिंकलेंस त्यावेळीं तूं जलाच्या फेंसानें नमुचिराक्षसाचें मस्तक तोडलेंस ॥ ७१ ॥

विनियोग—' सोमो राजा ' इत्यादि आठ मंत्रांनीं अध्वर्यूनें एकदमच पयोग्रह व सुराग्रहांचें उपस्थान करावें.

सोमो राजामृतꣳ सुत ऽऋजीषेणाजहान्मृत्युम् । ऋतेन सत्यमिन्द्रियं विपानꣳ शुक्रमन्धस ऽ इन्द्रस्येन्द्रियमिदं पयोऽमृतं मधु ॥ ७२ ॥

अर्थ—सोम राजा कांडला गेला म्हणजे अमृतस्वरूपी रस बनतो. कारण नीरस अशा सोमलताचूर्णानें तो स्थूलभावरूपी मृत्यूला टाकतो. या सत्यानें हें सत्य जाणलें गेलें. सोमाचें अशा रीतीनें विभागपूर्वक केलेलें प्राशन शुद्ध असतें म्हणून तें वीर्यप्रद होवो. तसेंच इंद्राचें दुग्ध, वीर्ययुक्त आणि अजरामरत्व देणारे व मधुर असें आहे ॥ ७२ ॥

अद्भ्यः क्षीरं व्यपिबत्कुङ्कुरांङ्गिरसो धिया । ऋतेन सत्यमिन्द्रियं विपानꣳ शुक्रमन्धस ऽ इन्द्रस्येन्द्रियमिदं पयोऽमृतं मधु ॥ ७३ ॥

अर्थ—अंगाचा रस जो प्राण तो हंसाप्रमाणें बुद्धीनें जलांतून दुग्धाचें पान करितो. (दूध व पाणी एकत्र केलें असतां त्यांतील दूधच तेवढें हंस घेतो) या

सत्यानें हें सत्य जाणलें गेलें. सोमाचें अशा रीतीनें विभागपूर्वक केलेलें प्राशन शुद्ध असतें म्हणून तें वीर्यप्रद होवो. तसेंच इंद्राचें दुग्ध, वीर्ययुक्त आणि अजरामरत्व देणारें व मधुर असें आहे ॥ ७३ ॥

सोमम॒न्द्रयो व्यपिब॒च्छन्दसा ह॒ꣳसꣳ शु॒चिष॒त् । ऋ॒तेन॑ स॒त्यमिन्द्रि॒यं वि॒पान॒ꣳ शु॒क्रमन्ध॑स॒ऽइन्द्रस्येन्द्रि॒यमि॒दं पयोऽमृ॒तं मधु॑ ॥ ७४ ॥ शतं ११०० ॥

अर्थ—निर्मल गगनांमध्यें राहणारा आदित्य जलांतून वेदरूप किरणांनीं ज्याप्रमाणें सोमाचें पान करितो त्या सत्यानें हें सत्य जाणलें गेलें. सोमाचें अशा रीतीनें विभागपूर्वक केलेलें प्राशन शुद्ध असतें म्हणून तें वीर्यप्रद होवो. तसेंच इंद्राचें दुग्ध वीर्ययुक्त आणि अजरामरत्व देणारे व मधुर असें आहे ॥ ७४ ॥

अन्नात्परि॒स्रुतो॑ रस॒ं ब्रह्म॑णा व्यपिबत्क्ष॒त्रं पय॒ꣳ सोम॑ं प्र॒जाप॑तिꣳ । ऋ॒तेन॑ स॒त्यमिन्द्रि॒यं वि॒पान॒ꣳ शु॒क्रमन्ध॑सऽइन्द्रस्येन्द्रि॒यमि॒दं पयोऽमृ॒तं मधु॑ ॥ ७५ ॥

अर्थ—प्रजापति सुरारूपी अन्नांतून गायत्रीमंत्रानें रस वेगळा करून प्राशन करिता झाला व त्यानें क्षत्रियाला वश केलें व त्यानें दुग्धाचें व सोमाचें प्राशन केलें. या सत्यानें हें सत्य जाणलें गेलें. सोमाचें अशा रीतीनें विभागपूर्वक केलेलें प्राशन शुद्ध असतें म्हणून तें वीर्यप्रद होवो. तसेंच इंद्राचें दुग्ध वीर्ययुक्त आणि अजरामरत्व देणारें व मधुर असें आहे ॥ ७५ ॥

रेतो॑ मू॒त्रं वि॑जहाति॒ योनिं॑ प्रवि॒शदिन्द्रि॒यम् । गर्भो॑ ज॒रायु॑णावृ॒त उल्बं॑ जहाति॒ जन्म॑ना । ऋ॒तेन॑ स॒त्यमिन्द्रि॒यं वि॒पान॒ꣳ शु॒क्रमन्ध॑स॒ऽइन्द्रस्येन्द्रि॒यमि॒दं पयोऽमृ॒तं मधु॑ ॥ ७६ ॥

अर्थ—पुरुषाचें शिश्न योनींत प्रविष्ट झाल्यावर वीर्याचाच त्याग करितें व इतर वेळीं मूत्राचा त्याग करितें. गर्भवेष्टनानें वेष्टिलेला गर्भ जन्माचे वेळीं त्या गर्भवेष्टनाला टाकितो. मध्यंतरीं टाकीत नाहीं. (पहिल्या उदाहरणांत द्वार एक असून स्थानें भिन्न झाल्यानें क्रिया भिन्न होतात हें सांगितलें. स्थान एक असून द्वारें भिन्न असण्यानें क्रिया भिन्न होतात हें दुसऱ्या उदाहरणांत सांगितलें.) या सत्यानें हें सत्य जाणलें गेलें. सोमाचें अशा रीतीनें विभागपूर्वक केलेलें प्राशन शुद्ध असतें

म्हणून तें वीर्यप्रद होवो. तसेंच इंद्राचें दुग्ध वीर्ययुक्त आणि अजरामरत्व देणारें व मधुर असें आहे. ॥ ७६ ॥

हृद्वा रूपे व्याकरात्सत्यानृते प्रजापतिः । अश्रद्धामनृतेऽदधाच्छ्रद्धाꣳ सत्ये प्रजापतिः ऋतेन सत्यमिन्द्रियं विपानꣳ शुक्रमन्धसऽइन्द्रस्येन्द्रियमिदं पयोऽमृतं मधु ॥ ७७ ॥

अर्थ—प्रजापतीनें मूर्तिमान् अशा सत्य व अनृतांचें पृथक्करण केलें. अनृतामध्यें अश्रद्धा व सत्यामध्यें श्रद्धा स्थापन केली. या सत्यानें हें सत्य जाणलें गेलें. सोमाचें अशा रीतीनें विभागपूर्वक केलेलें प्राशन शुद्ध असतें म्हणून तें वीर्यप्रद होवो. तसेंच इंद्राचें दुग्ध वीर्ययुक्त आणि अजरामरत्व देणारें व मधुर असें आहे ॥ ७७ ॥

वेदेन रूपे व्यपिबत्सुतासुतौ प्रजापतिः । ऋतेन सत्यमिन्द्रियं विपानꣳ शुक्रमन्धसऽइन्द्रस्येन्द्रियमिदं पयोऽमृतं मधु ॥ ७८ ॥

अर्थ—प्रजापतीनें सुत म्हणजे सोम, असुत म्हणजे दुग्ध यांच्या रूपांचें ज्ञान करून घेऊन विभागपूर्वक प्राशन केलें. या सत्यानें सत्य जाणलें गेलें. सोमाचें अशा रीतीनें विभागपूर्वक केलेलें प्राशन शुद्ध असतें म्हणून तें वीर्यप्रद होवो. तसेंच इंद्राचें दुग्ध वीर्ययुक्त आणि अजरामरत्व देणारें व मधुर असें आहे. ॥ ७८ ॥

हृद्वा परिस्रुतो रसꣳ शुक्रेण शुक्रं व्यपिबत्पयः सोमं प्रजापतिः । ऋतेन सत्यमिन्द्रियं विपानꣳ शुक्रमन्धसऽइन्द्रस्येन्द्रियमिदं पयोऽमृतं मधु ॥ ७९ ॥

अर्थ—प्रजापतीनें सुरेचा रस पाहून शुद्ध अशा मंत्रानें दुग्ध व सोमाला शुद्ध करून त्याचें विभागपूर्वक प्राशन केलें. या सत्यानें हें सत्य जाणलें गेलें. सोमाचें अशा रीतीनें विभागपूर्वक केलेलें प्राशन शुद्ध असतें म्हणून तें वीर्यप्रद होवो. तसेंच इंद्राचें दुग्ध वीर्ययुक्त आणि अजरामरत्व देणारें व मधुर असें आहे. ॥ ७९ ॥

विनियोग—" सीसेन तंत्रं " इत्यादि सोळा मंत्रांनीं प्रत्येक मंत्रानें दोन, अशा बत्तीस सुराग्रहांचा होम करावा.

सीसेन तन्त्रं मनसा मनीषिणऽऊर्णासूत्रेण कवयो वयन्ति । अश्विना यज्ञꣳसविता सरस्वतीन्द्रस्य रूपं वरुणो भिषज्यन् ॥ ८० ॥

अर्थ—ज्याप्रमाणें एखादा कारागीर शिशाच्या तारेनें बहुभूषण ओवतो व ऊर्णा-सूत्रानें पट विणतो त्याप्रमाणें अश्विनीकुमार, सविता, सरस्वती आणि वरुण हे शिशाच्या सूत्रानें आणि ऊर्णासूत्रानें यज्ञ संपादन करितात. ते अश्विनीकुमारादि-देव मेधावी भूत वस्तुद्रष्टे व इंद्राच्या रूपाला औषध देऊन बरे करणारे असे आहेत ॥ ८० ॥

तदस्य रूपमृतꣳशचीभिस्तिस्रो दधुर्देवताꣳ सꣳरराणाः। लोमानि शष्पैर्बहुधा न तोक्मभिस्त्वगस्य मांꣳसमभवन्न लाजाः ॥ ८१ ॥

अर्थ—दोन अश्विनीकुमार व सरस्वती या तीन देवतांनीं उत्तम तऱ्हेनें रममाण होऊन म्हणजे सहज लीलेनें या इंद्राचे अविनाशी रूप पुढील कर्मांगांनीं संयुक्त केलें तें असें—इंद्राचे लोम उगवलेल्या गवतांनीं जोडले व त्याची त्वचा वाढलेल्या जवांनीं संयुक्त केली व साळीच्या लाह्या याचें मांस बनलें ॥ ८१ ॥

तदश्विना भिषजा रुद्रवर्तनी सरस्वती वयति पेशोऽअन्तरम्। अस्थि मज्जानं मासरैꣳ कारोतरेण दधतो गवां त्वचि ॥ ८२ ॥

अर्थ—रुद्राप्रमाणें ज्यांचा मार्ग आहे असे वैद्य अश्विनीकुमार आणि सरस्वती यांनीं इंद्राचें अंतर्वर्ती रूप पुढील वस्तूंनीं संबद्ध केलें. शष्पादि चूर्णाच्या चरूंतून गळणाऱ्या जलांनीं इंद्राचीं हाडें युक्त केलीं. सुरा गाळण्याचे चाळणीनें याची मज्जा निर्माण केली. ते अश्विनीकुमार व सरस्वती गाईच्या चर्मावर सुरा स्थापन करणारे असे आहेत. ॥ ८२ ॥

सरस्वती मनसा पेशलं वसु नासत्याभ्यां वयति दर्शतं वपुः। रसं परिस्रुता न रोहितं नग्नहुर्धीस्तसरं न वेम ॥ ८३ ॥

अर्थ—अश्विनीकुमारासहवर्तमान सरस्वती इंद्राचें हिरण्ययुक्त द्रव्य व सुंदर रूप वस्त्राप्रमाणें विणते, व इंद्राचे शरीर रंगविण्याकरितां सुरेचा लोहित रस त्यास लावते. या विणण्याचे वेळीं मादक सुराकंद विणण्याचें साधन असा, दंड व धोटा होतो ॥ ८३ ॥

पयसा शुक्रमृतं जनित्रꣳसुरया सूत्राञ्जनयन्त रेतः। अपामतिं दुर्मतिं बाधमानाऽऊर्वध्यं वातꣳसव्वं तदारात् ॥ ८४ ॥

अर्थ—अश्विनीकुमार व सरस्वती इंद्राचें वीर्य दुग्धानें निर्माण करते झाले. तें वीर्य शुद्ध, अविनाशी व उत्पादक असें आहे. तसेंच त्यांनीं जवळ राहून आमाशयांतील अन्न व पक्वाशयांतील अन्न सुरेनें निर्माण केलें व मूत्रापासून मूत्र निर्माण केलें. ते अश्विनिकुमार आणि सरस्वती वध्यपणा व दुर्बुद्धीला बाधित करून सद्बुद्धि देणारे आहेत. ॥ ८४ ॥

इन्द्रं÷ सुत्रामा हृदयेन सत्यं पुरोडाशेन सविता जजान । यकृत् क्लोमानं वरुणो भिषज्यन्मतस्ने वायव्यैर्न मिनाति पित्तम् ॥ ८५ ॥

अर्थ—चांगलें संरक्षण करणारा पुरोडाशदेवतारूपी जो इंद्र तो या रोगी इंद्राचें हृदय उत्पन्न करितो. व सविता पुरोडाशानें इंद्राचें सत्य निर्माण करितो. तसेंच इंद्राची चिकित्सा करणारा वरुण यकृत आणि क्लोम म्हणजे गलनाडिका उत्पन्न करितो. वायव्य संज्ञक ऊर्ध्व अशा पात्रांनीं त्याच्या हृदयाच्या दोन्ही बाजूंच्या अस्थि आणि पित्त निर्माण करितो. ॥ ८५ ॥

आन्त्राणि स्थालीर्मधु पिन्वमाना गुदाः पात्राणि सुदुघा न धेनुः । श्येनस्य पत्रं न प्लीहा शचीभिरासन्दी नाभिरुदरं न माता ॥ ८६ ॥

अर्थ—मध सिञ्चन करणाऱ्या स्थाली अंत्रें म्हणजे आंतडें बनल्या. पात्रें गुदस्थानें व उत्तम दोहनशील धेनू गुदरूपी बनली. श्येनाचा पंख प्लीहा झाला व सोमाच्या मातेसारखा असलेला चौरंग कर्माच्या योगानें नाभी व उदर बनला ॥ ८६ ॥

कुम्भो वनिष्ठुर्जनिता शचीभिर्यस्मिन्नग्रे योन्यां गर्भोऽअन्तः । प्लाशिर्व्यक्तः शतधारऽउत्सो दुहे न कुम्भी स्वधां पितृभ्यः÷ ॥ ८७ ॥

अर्थ—सुराकुंभ कर्माच्या योगानें स्थूल आंतडें बनला. ज्या सुराकुंभरूपी स्थानांत पूर्वी सुरारूपी गर्भ राहिला होता, तो शतधारायुक्त कूपासारखा स्पष्ट असणारा कुंभ शिश्न बनला व सुराकुंभी पितरांकरितां अन्न पूर्ण करिते म्हणजे पितरांना अन्न देणारी बनली. ॥ ८७ ॥

मुखꣳसदस्य शिरऽइत्सतेन जिह्वा पवित्रमश्विनासन् सरस्वती । चप्र्यं न पायुर्भिषगस्य वालो वस्तिर्न शेपो हरसा तरस्वी ॥ ८८ ॥

अर्थ—सत नांवाचें पात्र या इंद्राचें मुख बनलें व त्या पात्रानें याचें शिर निर्माण झालें. पवित्र, जिव्हा बनलें व अश्विनी कुमार आणि सरस्वती हे देव

याच्या मुखांत राहते झाले. चप्य पायु इंद्रिय झालें व सुरा गाळण्याचें वस्त्र या इंद्राचा वैद्य, गुदस्थान व वीर्यानें वेगवान् असें लिंग या तीन वस्तु बनल्या. ॥ ८८ ॥

अश्विभ्यां चक्षुरमृतं ग्रहाभ्यां छागेन तेजो हविषा शृतेन । पक्ष्माणि गोधूमैः कुर्वलैरुतानि पेशो न शुक्रमसितं वसाते ॥ ८९ ॥

अर्थ—आश्विनपात्रांनीं याचें अविनाशी चक्षुरिंद्रिय केलें जातें व छागरूपी पक्व हविर्द्रव्यानें नेत्र तेज, गोधूमांनीं नेत्रलोमें केलीं जातात व तीं लोमें बदरांनीं नेत्राशीं जोडलीं जातात. व नेत्रांतील शुक्ल व कृष्ण रूपेंहि अश्विनीकुमाराकडून केलीं जातात. ॥ ८९ ॥

अविर्न मेषो नसि वीर्याय प्राणस्य पन्थाऽअमृतो ग्रहाभ्याम् । सरस्वत्युपवाकैर्व्यानं नस्यानि बर्हिर्बदरैरजान ॥ ९० ॥

अर्थ—बकरी व मेंढा यांनीं इंद्राच्या नासिकेंतील वीर्य निर्माण केलें जातें व सारस्वत गृहांनीं (पात्रांनीं) प्राणवायूचा अविनाशी मार्ग केला जातो. सरस्वती यवांकुरांनीं इंद्राचा व्यान वायु निर्माण करिते व दर्भ आणि बोरांनीं त्याचे नासिकेंतील केश निर्माण केले जातात ॥ ९० ॥

इन्द्रस्य रूपमृषभो बलाय कर्णाभ्याꣳ श्रोत्रममृतं ग्रहाभ्याम् यवा न बर्हिर्भ्रुवि केसराणि कर्कन्धु जज्ञे मधु सारघं मुखात् ॥ ९१ ॥

अर्थ—ऋषभ सामर्थ्याकरितां इंद्राचें रूप करिता झाला. व ऐंद्रपात्रांनीं शब्दग्राही श्रोत्रेंद्रिय कर्णाचे ठिकाणीं स्थापन केलें. यव व बर्हि (कुश) भृकुटींचे केश बनले. बोर व मध हें मुखांतील लाळ बनले ॥ ९१ ॥

आत्मन्नुपस्थे न वृकस्य लोम मुखे श्मश्रूणि न व्याघ्रलोम । केशा न शीर्षन्यशसे श्रियै शिखा सिꣳहस्य सोम त्विषिरिन्द्रियाणि ॥ ९२ ॥

अर्थ—शरीरावर उपस्थ भागांत (गुह्येंद्रियावर) जे केश आहेत ते वृक लोमापासून बनले. व्याघ्रलोमापासून मुखावरील केश झाले. तसेंच मस्तकावरील कीर्तिकरितां असलेले जे केश व शोभे करितां अमलेली जी शिखा त्यांची कांति व इतर सर्व इंद्रियें सिंहाच्या लोमांपासून उत्पन्न झालीं ॥ ९२ ॥

अङ्गान्यात्मन्भिषजा तदश्विनात्मानमङ्गैः समधात्सरस्वती । इन्द्रस्य रूपꣳशतमानमायुश्चन्द्रेण ज्योतिरमृतं दधानाः ॥ ९३ ॥

अर्थ—अश्विनीकुमारांनीं शरीरावयव निर्माण केले व सरस्वतीनें त्यांचें शरीरावर स्थापन केलें. ते अश्विनीकुमार आणि सरस्वती इंद्राचें, जगत् पूज्य रूप व आयुष्य आल्हादक तेजासह अविनाशी करणारें आहे ॥ ९३ ॥

सरस्वती योन्यां गर्भमन्तरश्विभ्यां पत्नी सुकृतं बिभर्ति । अपाꣳरसेन वरुणो न साम्नेन्द्रꣳश्रियै जनयन्नप्सु राजा ॥ ९४ ॥

अर्थ—सरस्वती अश्विनीकुमारांची पत्नी होऊन आपल्या योनींत सुविहीत असा गर्भ धारण करते. व जलांचा राजा वरुण उदकरसभूत सामवेदाच्या योगानें इंद्राला लक्ष्मीकरितां उत्पन्न करितो व त्याचें पोषण करितो ॥ ९४ ॥

तेजः÷ पशूनाꣳ हविरिन्द्रियावत्परिस्रुता पयसा सारघं मधु । अश्विभ्यां दुग्धं भिषजा सरस्वत्या सुतासुताभ्यामसृतꣳ सोमऽइन्दुः÷ ॥ ९५ ॥

अर्थ—वैद्य अश्विनीकुमारांनीं व सरस्वतीनें वीर्ययुक्त पशुसंबंधीं हविर्द्रव्य सुरा, दुग्ध व मध घेऊन इंद्राकरितां तेजोरूपी सौम्यमणी संज्ञक दुग्ध उत्पन्न केलें व सुरा आणि दुग्धापासून व अविनाशी आणि ऐश्वर्यप्रद असा सोम निर्माण केला ॥ ९५ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**

माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** ऊनविंशोऽध्यायः समाप्तः॥१९॥

इति ऊनविंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ विंशोऽध्यायः ॥ २० ॥



विनियोग—" क्षत्रस्य योनि " या मंत्रभागानें दक्षिणोत्तर वेदीवर चौरंग स्थापन करावा व " मा त्वा " या मंत्रभागानें त्या चौरंगावर कृष्णाजिन पसरावें.

क्षत्रस्य योनिरसि क्षत्रस्य नाभिरसि । मा त्वा हिꣳ सीन्मा मा हिꣳसीꣳ ॥ १ ॥

अर्थ—हे चौरंगा, तूं क्षत्र जातीचें उत्पत्तिस्थान व बंधनस्थान आहेस. हे कृष्णाजिना, चौरंग तुझी हिंसा न करो व तूं माझी हिंसा करूं नकोस ॥ १ ॥

विनियोग—' निषसाद ' या मंत्रानें यजमानानें कृष्णजिनावर बसावें नंतर ' मृत्योः ' या मंत्रभागानें सोन्याचें भूषण यजमानाच्या मस्तकावर स्थापन करावें.

निषसाद धृतव्रतो वरुणः पस्त्यास्वा । साम्राज्याय सुक्रतुः । मृत्योः पाहि विद्योत्पाहि ॥ २ ॥

अर्थ—हा यज्ञकर्म करणारा, अनिष्टनिवारक व बुद्धिमान् असा यजमान स्वामित्वानें प्रजेमध्यें साम्राज्य भोगण्याकरितां बसला. हे सुवर्ण रुक्मा, मृत्यू पासून व विद्युत्पातापासून माझें रक्षण कर ॥ २ ॥

विनियोग—" देवस्यत्वा " इत्यादि तीन मंत्रांनीं अध्वर्यूनें यजमानावर अभिषेक करावा.

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम् । अश्विनो-र्भैषज्येन तेजसे ब्रह्मवर्चसायाभिषिञ्चामि सरस्वत्यै भैषज्येन वीर्यायान्ना-द्यायाभिषिञ्चामीन्द्रस्येन्द्रियेण बलाय श्रियै यशसेऽभिषिञ्चामि ॥ ३ ॥

अर्थ—प्रेरक अशा सवितृदेवाच्या प्रेरणेनें, अश्विनीकुमाराच्या बाहूंनीं व पूषाच्या हस्तांनीं हे यजमाना, अश्विनीकुमारांच्या वैद्य कर्मानें ब्रह्मवर्चस तेजाकरितां मी तुज-

वर अभिषेक करितों व सरस्वतीच्या वैद्य कर्मानें, अन्नभक्षण सामर्थ्याकरितां मी तुजवर अभिषेक करितों, आणि इंद्राच्या सामर्थ्यानें बलाकरितां, समृद्धीकरितां व कीर्तीकरितां मी तुझ्यावर अभिषेक करितों ॥ ३ ॥

विनियोग—'कोऽसि' हा मंत्रभाग म्हणून अध्वर्यूनें यजमानाला स्पर्श करावा नंतर यजमानानें 'सुश्लोक' इत्यादि नांवाच्या पुरुषांना बोलवावें.

कोऽसि कतमोऽसि कस्मै त्वा काय त्वा । सुश्लोक सुमङ्गल सत्यराजन् ॥ ४ ॥

अर्थ—हे यजमाना, तूं प्रजापति आहेस. तसेंच सर्व प्रजिापतींत श्रेष्ठ आहेस. मीं कोणच्या प्रजापतिपदप्राप्तीकरितां व प्रजापतित्वाकरितां तुजवर अभिषेक केला. उत्तम कीर्ति ज्याची आहे अशा सुश्लोका तूं ये. चांगला ज्याचा उदय आहे अशा सुमंगला तूं ये आणि ज्याचा राजा अविनाशी आहे अशा सत्यराज संज्ञक पुरुषा तूं ये. ॥ ४ ॥

विनियोग—'शिरो मे' इत्यादि पांच मंत्रांत सांगितलेल्या शरीरावयवांना यजमानानें स्पर्श करावा.

शिरो मे श्रीर्यशो मुखं त्विषिः केशाश्च श्मश्रूणि । राजा मे प्राणोऽअमृतꣳ सम्राट् चक्षुर्विराट् श्रोत्रम् ॥ ५ ॥

अर्थ—माझे मस्तक शोभारूपी, मुख यशोरूपी, केश व श्मश्रू दीप्तिरूपी, प्राण वायु अमृतरूपी, चक्षुरिंद्रिय सम्राट्स्वरूपी आणि श्रोतेंद्रिय नानातऱ्हेनें शोभणारें विराट्रूपी असो. ॥ ५ ॥

जिह्वा मे भद्रं वाङ्महो मनो मन्युꣳ स्वराड् भामः । मोदाꣳ प्रमोदाऽअङ्गुलीरङ्गानि मित्रं मे सहः ॥ ६ ॥

अर्थ—माझी जिव्हा कल्याणरूपी, वाणी पूज्यरूपी, मन क्रोधरूपी, क्रोध स्वयंशोभमानरूपी, अंगुली आनंदरूपी, अंगें प्रमोदरूपी व माझे मित्र रिपुनाशकस्वरूपी असोत. ॥ ६ ॥

बाहू मे बलमिन्द्रियꣳ हस्तौ मे कर्म वीर्यम् । आत्मा क्षत्रमुरो मम ॥ ७ ॥

अर्थ—माझे बाहु बलवान्, इंद्रिय आणि बल स्वकार्य समर्थ, हस्त स्वकर्म-कुशल आणि माझें अंतःकरण व हृदय नाशापासून निवारण करणारे असें असो. ॥७॥

पृष्टीर्मे राष्ट्रमुदरमꣳसौ ग्रीवाश्च श्रोणि । ऊरूऽअरत्नी जानुनी विशो मेऽङ्गानि सर्वतः ॥ ८ ॥

अर्थ—माझा पृष्ठभाग देशासारखा सर्वाधार, उदर, खांदे, कंठ, कंबर, जंघा, मांड्या; हात, गुडघे इत्यादि सर्व माझीं अंगें प्रजेप्रमाणें पोषण करण्यास योग्य असोत. ॥ ८ ॥

नाभिर्मे चित्तं विज्ञानं पायुर्मेऽपचितिर्भमत् । आनन्दनन्दावाण्डौ मे भगꣳ सौभाग्यं पसः । जङ्घाभ्यां पद्भ्यां धर्मोऽस्मि विशि राजा प्रतिष्ठितꣳ ॥ ९ ॥

अर्थ—माझी नाभी ज्ञानरूपी, गुदेंद्रिय विज्ञानरूपी, स्त्रीजननेंद्रिय प्रजारूपी असो. (स्त्रीजननेंद्रिय यजमान पत्नीसंबंधीं समजावयाचें.) माझीं वृषणेंद्रियें संभोगमुखानें आनंदित होणारीं असोत; लिंग ऐश्वर्ययुक्त व संपत्तियुक्त असो, मांड्या व पायांच्या योगानें मी धर्मरूपी असो, धर्मरूपामुळें राजा प्रजेच्या ठायी उत्तम रीतीनें प्रतिष्ठित होतो. (जो धर्मप्रतिष्ठित असतो तोच राजा होतो.) ॥ ९ ॥

विनियोग—" प्रति क्षत्रे " हा मंत्र म्हणून यजमानानें चौरंगावरून कृष्णाजिनावर उतरावें.

प्रति क्षत्रे प्रतितिष्ठामि राष्ट्रे प्रत्यश्वेषु प्रतितिष्ठामि गोषु । प्रत्यङ्गेषु प्रतितिष्ठाम्यात्मन्प्रति प्राणेषु प्रतितिष्ठामि पुष्टे प्रति यावापृथिव्योः प्रतितिष्ठामि यज्ञे ॥ १० ॥

अर्थ—क्षत्रिय व राष्ट्र माझे स्वाधीन होवो. मला गाई व घोडे मिळोत. मी सर्व शरीरानीं निरोगी व निश्चित असावें, तसेंच धनसमृद्ध असावें. पृथ्वी व स्वर्ग उभयलोकीं मला कीर्ति मिळावी व मीं यज्ञ करावे. ॥ १० ॥

विनियोग—'त्रयो देवाः' इत्यादि दोन मंत्रांनीं वसापात्राचा होम करावा.

त्रयो देवाऽएकादश त्रयस्त्रिꣳशाः सुराधसꣳ बृहस्पतिपुरोहिता देवस्य सवितुः सवे । देवा देवैरवन्तु मा ॥ ११ ॥

अर्थ—तिप्पट केलेलें अकरा म्हणजे तेहतीस संख्याक उत्तम द्रव्यवान् देव पुढें सांगितलेल्या देवांसह आमचें संरक्षण करोत. त्यांचा पुरोहित बृहस्पति आहे. ते सवितृ देवाच्या आज्ञेंत वागतात व ते प्रकाशमान आहेत. ॥ ११ ॥

प्रथमा द्वितीयैर्द्वितीयास्तृतीयैस्तृतीयाꣳ सत्येन सत्यं यज्ञेन यज्ञो यजुर्भिर्यजूꣳषि सामभिꣳ सामान्यृग्भिर्ऋचः पुरोऽनुवाक्याभिꣳ पुरोऽनुवाक्या याज्याभिर्याज्या वषट्कारैर्वषट्काराऽआहुतिभिराहुतयो मे कामान्त्समर्धयन्तु भूः स्वाहा ॥ १२ ॥

अर्थ—प्रथम देव द्वितीय देवांसह, द्वितीय देव तृतीय देवांसह, तृतीय देव सत्यासह, सत्य यज्ञासह, यज्ञ यजुर्मंत्रांसह, यजुर्मंत्र साममंत्रासह, साममंत्र ऋग्मंत्रांसह, ऋग्मंत्र पुरोनुवाक्यांसह, पुरोनुवाक्या याज्यासह, याज्या वषट्कारांसह, वषट्कार आहुतींसह व आहुती पूर्व देवांनीं पालित होऊन माझ्या सर्व इच्छांना पूर्ण करोत, भूलोकाला हें हवि सुहुत असो ॥ १२ ॥

विनियोग—" लोमानि प्रयतिः " या मंत्रानें यजमानानें ग्रह शेषावें भक्षण करावें.

लोमानि प्रयतिर्मम त्वङ्मऽआनतिरागतिꣳ । माꣳ सं मऽउपनतिर्वस्वस्थि मज्जा मऽआनतिꣳ ॥ १३ ॥

अर्थ—माझीं लोमें (बारीक केश) प्रयत्नरूपी, माझी त्वचा सर्वभूत नमस्काररूपी, माझें मांस उपनती (ज्याकडे भूतें येतात) रूपी, माझें अस्थि धनरूपी, मज्जा आनती (जिकडे भूतें येतात) तद्रूपी आहे. ॥ १३ ॥

विनियोग—यानंतर अवभृथ इष्टी करावी " यद्देवा " इत्यादि साडेचार मंत्रांनीं मासरकुंभ पाण्यामध्यें तरंगावयास लावावा.

यद्देवा देवहेडनं देवासश्चकृमा वयम् । अग्निर्मा तस्मादेनसो विश्वान्मुञ्चत्वꣳ हसꣳ ॥ १४ ॥

अर्थ—हे प्रकाशमान देवांनो, आम्हीं देवांचा जो अपराध केला त्या पापांपासून अग्नि आम्हांला मुक्त करो, तसेंच तो सर्व विघ्नांपासून आम्हाला मुक्त करो ॥ १४ ॥

यदि दिवा यदि नक्तमेनाꣳसि चकृमा वयम् । वायुर्मा तस्मादेनसो विश्वान्मुञ्चत्वꣳ हसः ॥ १५ ॥

अर्थ—दिवसा व रात्रींही जर आम्हीं पापें केलीं असतील; तर वायू त्या पापांपासून व सर्व विघ्नांपासून आम्हाला मुक्त करो ॥ १५ ॥

यदि जाग्रद्यदि स्वप्नऽएनाꣳसि चकृमा वयम् । सूर्यो मा तस्मादेनसो विश्वान्मुञ्चत्वꣳ हसः ॥ १६ ॥

अर्थ—जाग्रत् दशेंत अथवा स्वप्नावस्थेंत जर आम्ही पापें केलीं असतील; तर सूर्य त्या पापांपासून व सर्व विघ्नांपासून आमचें रक्षण करो. ॥ १६ ॥

यद्ग्रामे यदरण्ये यत्सभायां यदिन्द्रिये । यच्छूद्रे यदर्ये यदेनश्चकृमा वयं यदेकस्याधि धर्मणि तस्यावयजनमसि ॥ १७ ॥

अर्थ—गांवांत, रानांत व सभेंत जें आम्ही पाप केलें व परस्त्रीदर्शनादि जें इंद्रियजन्य पाप केलें, तसेंच शूद्रविषयक, वैश्यविषयक, व देवविषयक जें पाप केलें आणि पत्नी व यजमान या दोघांपैकीं कोणाच्याहीं एकाच्या कर्मामध्यें जो धर्मलोप झाला त्या सर्वांचा हे कुंभा, तूं नाशक आहेस. ॥ १७ ॥

विनियोग—" यदापः " इत्यादि " ओषधी रुतापः " इत्यंत मंत्रानें कुंभ जलांत बुडवावा व " सुमित्रियानः " या मंत्रानें उत्तर दिशेकडे दोन पावलें जाऊन ज्या बाजूला शत्रु असेल त्या दिशेंत जलांजली टाकावा.

यदापोऽअघ्न्याऽइति वरुणेति शपामहे ततो वरुण नो मुञ्च । अवभृथ निचुम्पुण निचेरुरसि निचुम्पुणः । अव देवैर्देवकृतमेनोऽयक्ष्यव मर्त्यैर्मर्त्यकृतं पुरुराव्णो देवरिषस्पाहि ॥ १८ ॥

अर्थ—हे वरुणा, अहिंस्य आहेत आणि आम्हीं तर हिंसा केली तेव्हां आम्ही प्रार्थना करितों कीं, आम्हांला या हिंसादोषापासून मुक्त कर. हे अवभृथ यज्ञा, जरी तूं नित्य गमनशील आहेस तथापि मंद गमन करणारा हो. कारण कीं, द्योतनात्मक अशा आमच्या इंद्रियांनीं हविःस्वामी देवांविषयीं जें पाप केलें व आमच्या ऋत्विजांनीं यज्ञ पाहण्याकरितां आलेल्या लोकांचा अपमान करून जें पाप संपादन केलें, तें मीं या जलांत नष्ट केलें आहे. हे अवभृथ यज्ञा, विरुद्ध फल देणाऱ्या यज्ञापासून तूं आमचें रक्षण कर ॥ १८ ॥

समुद्रे ते हृदयमप्स्वन्तꣳ सं त्वा विशन्त्वोषधीरुतापꣳ सुमित्रिया नऽआपऽओषधयꣳ सन्तु दुर्मित्रियास्तस्मै सन्तु योऽस्मान् द्वेष्टि यं वयं द्विष्मꣳ ॥ १९ ॥

अर्थ— जें तुझें हृदय समुद्रासारख्या पाण्यांत आहे तेथें तुला मीं पोहोचवितों. तेथें तुझ्याकडे ओषधी व जलें येवोत. जलें व ओषधी आमच्याशीं चांगली मैत्री करोत व जो आमचा द्वेष करतो व आम्ही ज्याचा द्वेष करतों त्याच्याशीं जलें व ओषधी शत्रुत्व करोत ॥ १९ ॥

विनियोग—" द्रुपदादिव " या मंत्रानें यजमानानें व पत्नीनें आपलें वस्त्र पाण्यांत टाकावें.

द्रुपदादिव मुमुचानꣳ स्विन्नꣳ स्नातो मलादिव । पूतं पवित्रेणेवाज्यमापꣳ शुन्धन्तु मैनसꣳ ॥ २० ॥

अर्थ—पादत्राण काढल्यावर पादत्राणाचे दोष ते घालणाराला स्पर्श करीत नाहींत, घाम आल्यानंतर स्नान केलेल्या पुरुषाला घामाचे दोष लागत नाहींत. कामळ्यांतून गाळलेलें तूप शुद्ध होतें; म्हणजे कीटादिकांनीं रहित होतें; त्याप्रमाणें जलांनीं मला पातकांपासून मुक्त करावें; म्हणजे शुद्ध करावें ॥ २० ॥

विनियोग—" उद्वयं " या मंत्रानें जलाच्या बाहेर पडावें.

उद्वयं तमसस्परि स्वः पश्यन्तऽउत्तरम् । देवं देवत्रा सूर्यमगन्म ज्योतिरुत्तमम् ॥ २१ ॥

अर्थ—आम्ही उत्कृष्ट अशा स्वर्गाकडे पाहणारे होत्साते तमो बहुल अशा या लोकांतून बाहेर पडलों आणि देवलोकांत सूर्याकडे पहात पहात आम्ही ब्रह्मलोकांत प्राप्त झालों ॥ २१ ॥

विनियोग—" आपो अद्य " या मंत्रानें यजमानानें आहवनीय अग्नीचें उपस्थान करावें.

अपोऽअद्यान्वचारिषꣳ रसेन समसृक्ष्महि । पयस्वानग्नऽआगमं तं मा सꣳसृज वर्चसा प्रजया च धनेन च ॥ २२ ॥

अर्थ—हे अग्ने, जो मी अवभृथ कर्मानें जलाला प्राप्त झालों व जलानें संयुक्त झालों व उदकयुक्त होऊन बाहेर आलों त्या मला तूं ब्रह्मवर्चस तेज, पुत्रादिक प्रजा व सुवर्णादि द्रव्य यांनीं युक्त कर ॥ २२ ॥

विनियोग—"एधोसि" या मंत्रभागानें समिधा घेऊन "समिदसि" या मंत्र भागानें तिचा अग्नींत होम करावा व समाववर्ति या मंत्र भागानें आज्याचा होम करावा.

एधोऽस्येधिषीमाह सामदास तजाऽस तेजो मयि धेहि । समाववर्ति पृथिवी समुषाꣳ समु सूर्यैः । समु विश्वमिदं जगत् ॥ वैश्वानरज्योति-र्भूयासं विभूःकामान्व्यृश्नवै भूꣳस्वाहा ॥ २३ ॥

अर्थ—हे समिधे, तूं प्रदीप्त करणारी आहेस म्हणून आम्ही धनादिकांची वृद्धि मिळवूं. हे समिधे, तूं तेजोरूपी आहेस म्हणून मजमध्यें तेज स्थापन कर. पृथ्वी व दिवसही व सूर्य पुनः पुनः प्रदक्षिणा घालून नष्ट होतो व हें सर्व जग नष्ट होतें; म्हणून मी परमात्म ब्रह्मःज्योतीरूपी होईन व महामनोरथांना प्राप्त होईन. सत्ता-स्वरूपी जें ब्रह्म त्याला हें हवि सुहुत असो. ॥ २३ ॥

विनियोग—"अभ्यादधामि" इत्यादि तीन ऋचांनीं यजमानानें तीन समिधांचा आहवयाग्नींत होम करावा.

अभ्यादधामि समिधमग्ने व्रतपते त्वयि । व्रतं च श्रद्धां चोपैमीन्धे त्वा दीक्षितोऽअहम् ॥ २४ ॥

अर्थ—हे कर्मपालक अग्ने, मी तुजमध्यें समिधेचा होम करितों. त्यायागें दीक्षित झालेला असा मी कर्म व श्रद्धा यांप्रत प्राप्त होतों. मी तुला प्रदीप्त करतों. ॥ २४ ॥

यत्र ब्रह्म च क्षत्रं च सम्यञ्चौ चरतꣳ सह । तं लोकं पुण्यं प्रज्ञेषं यत्र देवाꣳ सहाग्निना ॥ २५ ॥

अर्थ—त्या पवित्र लोकाला मी समजून घ्यावें. ज्या लोकांत उत्तम गमन कर-णाऱ्या ब्राह्मण व क्षत्रिय जाति एकत्र राहतात व त्या लोकांत देव अग्निबरोबर संचार करितात. ॥ २५ ॥

यत्रेन्द्रश्च वायुश्च सम्यञ्चौ चरतꣳ सह । तं लोकं पुण्यं प्रज्ञेषं यत्र सोदिर्न विद्यते ॥ २६ ॥

अर्थ—ज्या लोकांत उत्तम गमन करणारे इंद्र व वायूबरोबर गमन करतात व ज्यांत अन्न न मिळाल्याचें दुःख नाहीं; म्हणजे जेथें सर्वदा अन्न मिळतें त्या पवित्र लोकांला मी समजून घ्यावें. ॥ २६ ॥

विनियोग—" अꣳशुना " ही ऋचा सुरा मिश्रीकरणांत विनियुक्त आहे.

अꣳशुना तेऽअꣳशुꣳ पृच्यतां परुषा परुः । गन्धस्ते सोममवतु मदाय रसोऽअच्युतः ॥ २७ ॥

अर्थ—हे सुरे, तुझा अंशभाग सोमभागाशीं युक्त होवो व तुझे पर्व सोमपर्वांशीं युक्त होवोत. तुझा सुवास व अविनाशी रस मद, उत्पन्न करण्याकरितां सोमाचें आलिंगन करो. म्हणजे सुरा व सोम यांचा योग होवो. ॥ २७ ॥

विनियोग—" सिञ्चन्ति " या मंत्राचा सुराग्रहणांत विनियोग आहे.

सिञ्चन्ति परिषिञ्चन्त्युत्सिञ्चन्ति पुनन्ति च । सुरायै बभ्रवे मदे किंत्वो वदति किंत्वः ॥ २८ ॥

अर्थ—पिंगट वर्णाच्या ऋत्विज पात्रांमध्यें दूध वगैरे घालून जिला ओततात व गोपुच्छ केश वगैरेंनीं जिला पवित्र करतात; त्या सुरेनें उन्मत्त झालेला इंद्र दुसऱ्याला तूं कोण व कोणाचा असें तिरस्कारात्मक वाक्य बोलतो. ॥ २८ ॥

विनियोग—" धानावंत " हा मंत्र श्रवण कर्मांतील धानाहोमामध्यें विनियुक्त आहे.

धानावन्तं करम्भिणमपूपवन्तमुक्थिनम् । इन्द्र प्रातर्जुषस्व नः ॥ २९ ॥

अर्थ—हे इंद्रा, आम्ही प्रातःकालीं उक्थस्तुतिपूर्वक दिलेल्या धाना, करंभ व अपूपांनीं युक्त असा जो पुरोडाश तो तूं ग्रहण कर ॥ २९ ॥

विनियोग—" बृहदिंद्राय " या मंत्रानें ब्रह्मदेवानें बृहत्सामाचें गायन करावें.

बृहदिन्द्राय गायत मरुतो वृत्रहन्तमम् । येन ज्योतिरजनयन्नृतावृधो देवं देवाय जागृवि ॥ ३० ॥

अर्थ—हे ऋत्विजांनो, तुम्ही इंद्राकरितां बृहत्सामाचें गायन करा. तें बृहत्साम

अत्यंत पापनाशक आहे. यज्ञ वाढविणारे देव ज्या सामगायनानें इंद्राकरितां प्रकाशक व अविनाशी तेज उत्पन्न करिते झाले असें तें बृहत् तेज आहे ॥ ३० ॥

विनियोग—"अध्वर्योः अद्रिभिः" या मंत्रानें ब्रह्मयानें पयावें अभिमंत्रण करावें.

अध्वर्योऽअद्रिभिꣳ सुतꣳ सोमं पवित्रऽआनय। पुनाहीन्द्राय पातवे ॥३१॥

अर्थ—हे अध्वर्यो, तूं दगडांनीं कुटलेला सोम, कामळ्याच्या पवित्रावर इंद्राला पिण्याकरितां ओत व गाळ ॥ ३१ ॥

विनियोग—"यो भूतानां" या मंत्रानें अध्वर्यूनें त्रयस्त्रिंश संज्ञक वसाग्रहाचें ग्रहण करावें.

यो भूतानामधिपतिर्यस्मिल्लोकाऽअधिश्रिताः। यऽईशे महतो महाँस्तेन गृह्णामि त्वामहं मयि गृह्णामि त्वामहम् ॥ ३२ ॥

अर्थ—हे ग्रहा (पात्रा), जो परमात्मा जरायुजादि चतुर्विध प्राण्यांचा अधिपति आहे व ज्यांवर भूरादि लोक राहतात व जो सर्वोत्कृष्ट असा महत्तत्वादिकांचा नियंता आहे त्या परमात्म्याच्या साह्यानें मी तुझें ग्रहण करतों व परमात्मस्वरूपी अशा मजविषयींही तुझें ग्रहण करितों ॥ ३२ ॥

विनियोग—"उपयाम" हा मंत्र पात्रस्थापनामध्यें विनियुक्त आहे.

उपयाम गृहीतोऽस्यश्विभ्यां त्वा सरस्वत्यै त्वेन्द्राय त्वा सुत्राम्णे। एष ते योनिरश्विभ्यां त्वा सरस्वत्यै त्वेन्द्राय त्वा सुत्राम्णे ॥ ३३ ॥

अर्थ—तूं उपयाम पात्रानें गृहीत आहेस. अश्विनीकुमारांकरितां, सरस्वतीकरितां, इंद्राकरितां व सुत्रास्याकरितां तुझें मीं ग्रहण केलें. हें तुझें स्थान आहे. त्यावर अश्विनीकुमाराकरितां, सरस्वतीकरितां व संरक्षक इंद्राकरितां तुझें स्थापन करितों ॥ ३३ ॥

विनियोग—नंतर सर्व ऋत्विजांनीं पात्रांतील हविशेषाचें भक्षण करावें.

प्राणपा मेऽअपानपाश्चक्षुष्पाः श्रोत्रपाश्च मे। वाचो मे विश्वभेषजो मनसोऽसि विलायकꣳ ॥ ३४ ॥

अर्थ—हे ग्रहा तूं माझ्या प्राणाचें, अपानाचें, चक्षूंचें, श्रोत्राचें रक्षण करणारा आहेस व माझ्या वाणीला सर्व तऱ्हेनें जपादि द्वारां औषधरूपी बनविणारा आहेस व मनाला विषयापासून निवृत्त करून आत्म्यामध्यें विलीन करणारा आहेस ॥ ३४ ॥

अश्विनंकृतस्य ते सरंस्वतीकृतस्येन्द्रेण सुत्राम्णा कृतस्य । उपंहूतऽउपंहूतस्य भक्षयामि ॥ ३५ ॥

अर्थ—हे ग्रहा, ऋत्विजांनीं आज्ञा केल्यामुळें मी तुझें भक्षण करतों. तूं अश्विनीकुमार, सरस्वती व संरक्षक इंद्र यांनीं दृष्ट आणि ऋत्विजांकडून उपहूत असा आहेस ॥ ३५ ॥

विनियोग—आध्वर्यव कांड संपलें. आतां यापुढें सौत्रामणींतील हौत्र सांगतात. " समिद्ध इंद्र " इत्यादि अकरा ऋचा ऐंद्र पशूच्या प्रयाज याज्या आहेत.

समिद्धऽइन्द्रेऽउषसामनीके पुरोरुचां पूर्वकृद्वावृधानः । त्रिभिर्देवैस्त्रिंऽशता वज्रबाहुर्जघानं वृत्रं वि दुरो ववार ॥ ३६ ॥

अर्थ—इंद्रानें वृत्रासुराला मारलें व त्याच्या नगराचीं द्वारे मोकळीं केलीं. तो इंद्र प्रदीप्त झालेला, प्रातःकालीं पुढें पसरणाऱ्या कांतीनें आदित्यस्वरूपानें पूर्व दिशेला उत्पन्न करणारा, तेहतीस देवांच्या योगानें वाढणारा व हातांत वज्र धारण करणारा असा आहे ॥ ३६ ॥

नराशꣳसꣳप्रति शूरो मिमानस्तनूनपात्प्रति यज्ञस्य धामं । गोभिर्वपावान्मधुना समञ्जन्हिरण्यैश्चन्द्री यजाति प्रचेताꣳ ॥ ३७ ॥

अर्थ—प्रकृष्ट ज्ञानसंपन्न यजमान इंद्राचा रोज याग करितो तो इंद्र ऋत्विजांकडून स्तुती केला गेलेला, यज्ञस्थानें जाणणारा, शूर, प्रजापतीचा नातू, पशुसंबंधीं वसांनीं युक्त, गोड अशा घृतानें हविर्द्रव्यें भक्षण करणारा, पश्ववदानरूपी सुवर्णानें सुवर्णयुक्त असा आहे ॥ ३७ ॥

ईडितो देवैर्हरिवाँ२ ॥ अभिष्टिराजुह्वानो हविषा शर्धमानꣳ । पुरन्दरो गोत्रभिद्वज्रबाहुरायातु यज्ञमुपं नो जुषाणः ॥ ३८ ॥

अर्थ—देवांनीं पूजित, अश्वयुक्त, सर्वत्र ज्याचा याग होतो असा, ऋत्विजांनीं हविर्द्रव्याच्या निमित्तानें बोलावला जाणारा, अत्यंत बलवान्, शत्रुनगर फोडणारा,

पर्वतांना विनाशक वज्र धारण करणारा, व आमच्या यज्ञाचें सेवन करणारा असा इंद्र येवो ॥ ३८ ॥

जुषाणो बर्हिर्हरिवान्नऽइन्द्र÷ प्राचीनꣳ सीदत्प्रदिशा पृथिव्याः । ऊरुप्रथाः प्रथमानꣳ स्योनमादित्यैरक्तं वसुभिः सजोषा÷ ॥ ३९ ॥

अर्थ—इंद्र आमच्या पूर्वदिशेकडील स्थानावर बसो. तो इंद्र अश्वयुक्त, देवयजन भूमि दाखविणारा. विस्तीर्ण कीर्तिमान्, संतुष्ट, विस्तीर्ण व सुखकारक आदित्य व वसु यांनीं घृतसिंचित अशा दर्भाचें सेवन करणारा असा आहे. ॥ ३९ ॥

इन्द्रं दुर÷ कवण्यो धावमाना वृषाणं यन्तु जनयः सुपत्नीः । द्वारो देवीरभितो विश्रयन्ताꣳ सुवीरा वीरं प्रथमाना महोभिः ॥ ४० ॥

अर्थ—यज्ञगृहाचीं द्वारें शूर व इच्छापूर्ण करणाऱ्या इंद्राप्रत प्राप्त होवोत. तीं द्वारें सच्छिद्र असल्यानें शब्द करणारीं व शीघ्र गमन करणारीं अशीं आहेत. ज्याप्रमाणें पतिव्रता यज्ञपत्न्या शीघ्र गमन करतात त्याप्रमाणें हीं द्वारें इंद्राप्रत जावोत व इंद्राकडे गेल्याकर उत्तम ऋत्विजांनीं युक्त व तेजांनीं विस्तृत होणारीं हीं प्रकाशक द्वारें सर्वत्र पसरोत म्हणजे इंद्राकरितां उघडीं होवोत. ॥ ४० ॥

उषासानक्ता बृहती बृहन्तं पयस्वती सुदुघे शूरमिन्द्रम् तन्तुं ततं पेशसा संवयन्ती देवानां देवं यजतꣳ सुरुक्मे ॥ ४१ ॥

अर्थ—आदित्यप्रभा व रात्री या दोघी इंद्राशीं युक्त होतात. तो इंद्र मोठा पराक्रमी व सर्वदेवपूज्य आहे. आदित्यप्रभा आणि रात्री या मोठ्या, ज्यांत दंव पडतें अशा, उत्तम दोहन करणाऱ्या व विचित्र रूपानें इंद्राला संग्रथन करणाऱ्या म्हणजे संयुक्त करणाऱ्या व उत्तम कांतिमान् अशा आहेत. संग्रथनाविषयीं दृष्टांत—ज्याप्रमाणें विस्तीर्ण तंतु एखादा कारागीर पट निर्माण करण्याकरितां सूत्ररूपानें ग्रथित करितो त्याप्रमाणें आदित्यप्रभा व रात्री इंद्राला रूपानें संयुक्त करितात. ॥ ४१ ॥

दैव्या मिमाना मनुषः पुरुत्रा होताराविन्द्रं प्रथमा सुवाचा । मूर्धन्यज्ञस्य मधुना दधाना प्राचीनं ज्योतिर्हविषा वृधातः ॥ ४२ ॥

अर्थ—हा अग्नि व वायु हे दोघे देवांचे होते आहेत. ते पूर्वदिशेकडील आहवनीय अग्नीला मधुर हविर्द्रव्यानें वाढवितात. ते अग्निवायु पुष्कळ तऱ्हेनें यज्ञ निर्माण

करणारे, मनुष्य होत्याच्या आरंभीं उत्पन्न झालेले, उत्तम वाणी बोलणारे व यज्ञाच्या मस्तकावर इंद्राचे स्थापन करणारे असे आहेत. ॥ ४२ ॥

तिस्रो देवीर्हविषा वर्धमानाऽइन्द्रं जुषाणा जनयो न पत्नीः। अच्छिन्न तन्तुं पयसा सरस्वतीडा देवी भारती विश्वतूर्तिः ॥ ४३ ॥

अर्थ—सरस्वती, ईडा व भारती या तीन देवी पयोरूपी हविर्द्रव्यानें यज्ञाला निर्विघ्न करोत. या पुष्टियुक्त आहेत व पतिव्रता स्त्रियांप्रमाणें इंद्राचें सेवन करितात. त्या प्रकाशमान असून सर्वगामी आहेत ॥ ४३ ॥

त्वष्टा दधच्छुष्ममिन्द्राय वृष्णेऽपाकोऽचिष्टुर्यशसे पुरूणि। वृषा यजन् वृषणं भूरिरेता मूर्धन्यज्ञस्य समनक्तु देवान् ॥ ४४ ॥

अर्थ—त्वष्टा, यज्ञाचें शिर जें आहवनीय अग्नि त्यावर देवांना जेऊं घालो. तो त्वष्टा, यशस्वी व वीर्यसिंचन करणाऱ्या इंद्रास पुष्कळ बळ देणारा, ज्याहून दुसरा कोणी प्रशस्त नाहीं असा सर्वत्र गमन करणारा, इंद्राची पूजा करणारा व सर्वोत्पादक असा आहे ॥ ४४ ॥

वनस्पतिरवसृष्टो न पाशैस्त्मन्या समञ्जञ्छमिता न देवः। इन्द्रस्य हव्यैर्जठरं पृणानः स्वदाति यज्ञं मधुना घृतेन ॥ ४५ ॥

अर्थ—वृक्षाचा बनविलेला प्रकाशक यूप, मधुर रस व घृत यज्ञाकडून भक्षण करवो. तो यूप पाशांनीं (रज्जूंनीं) आज्ञप्त केल्याप्रमाणें आपल्या शरीरांत पशूंला बांधतो. ज्याप्रमाणें शमिता (पशुहिंसक) दोऱ्यांनीं पशूंला आपल्या शरीराशीं बांधतो त्याप्रमाणें यूप पशूला बांधतो. तसेंच हा यूप हविर्द्रव्यांनीं इंद्राच्या उदराला पूर्ण करणारा आहे ॥ ४५ ॥

स्तोकानामिन्दुं प्रति शूरऽइन्द्रो वृषायमाणो वृषभस्तुराषाट्। घृतप्रुषा मनसा मोदमानाः स्वाहा देवाऽअमृता मादयन्ताम् ॥ ४६ ॥

अर्थ—होम केले गेलेले देव वपासंबंधीं जे बिंदु तद्रूपी सोमाच्या उद्देशानें संतुष्ट होवोत व इंद्रही वरील सोमाच्या उद्देशानें संतुष्ट होवो. तो इंद्र, शूर, वृषभाप्रमाणें गर्जना करणारा, वीर्यसेचन करणारा व शत्रूंचा पराजय करणारा आहे. ते होम केलेले देव घृतबिंदुही प्राप्त झाला असतां अंतःकरणांत संतुष्ट होणारे व अविनाशी असे आहेत ॥ ४६ ॥

विनियोग--यापुढें याज्या व अनुवाक् या आहेत.

आ॒या॒त्विन्द्रो॑ऽव॒स॒ऽउप॑ नऽइ॒ह स्तु॒तः स॑ध॒मादं॑स्तु शू॒रः÷ । वा॒वृ॒धा॒नस्त॑विषी॒र्यस्य॑ पू॒र्वीर्यौर्न क्ष॒त्रम॒भिभू॑ति पु॒ष्यात् ॥ ४७ ॥

अर्थ--इंद्र आमचें रक्षण करण्याकरितां आमच्याजवळ येवो व देवांसहवर्तमान भोजन करो. त्या शूर व वाढणाऱ्या इंद्राची आम्ही स्वर्गाप्रमाणें वृत्रवधादि पराक्रमांची स्तुति करतों. तो इंद्र आमचें शत्रुनाशक तेज वाढवो ॥ ४७ ॥

आ न॑ऽइन्द्रो॑ दू॒रादा न॑ऽआ॒सादभि॒ष्टिकृ॑दव॒से या॑सदु॒ग्रः÷ । ओजि॑ष्ठेभि॒र्नृपति॒र्वज्र॑बाहु॒ः स॒ङ्के स॒मत्सु॒ तुर्व॑णिः÷ पृ॒त॒न्यून् ॥ ४८ ॥

अर्थ--आमचें रक्षण करण्याकरितां इंद्र जवळच्या व दूरच्याही प्रदेशांतून येवो. तो आमचे मनोरथ पूर्ण करणारा आहे व तो उत्कृष्ट असून तेजस्वी अशा अनुयायांनीं युक्त आहे. वज्र हस्त व मनुष्य रक्षक असा तो एका अगर एकदम उत्पन्न झालेल्या पुष्कळ युद्धांत शत्रूंचा नाश करणारा आहे ॥ ४८ ॥

आ न॑ऽइन्द्रो॒ हरि॑भि॒र्याह्यच्छा॒र्वाची॑नोऽव॒से रा॑धसे च । तिष्ठा॑ति व॒ज्री म॒घवा॑ वि॒रप्शी॑मं य॒ज्ञमनु॑ नो वाजसातौ ॥ ४९ ॥

अर्थ--इंद्र आमचें रक्षण करण्याकरितां व आम्हाला धन देण्याकरितां अश्वयुक्त रथानें आमच्या सन्मुख येवो. आल्यानंतर वज्रयुक्त धनवान् व महान् अशा त्यानें आमच्या यज्ञांत अन्न वांटण्याच्या निमित्तानें रहावें; म्हणजे आमचे यज्ञांतील अन्न वांटण्यावें काम करावें ॥ ४९ ॥

त्रा॒तार॒मिन्द्र॑मवि॒तार॒मिन्द्र॒ꣳ हवे॑ हवे सु॒हव॒ꣳ शूर॒मिन्द्र॑म् । ह्वया॑मि श॒क्रं पु॑रुहू॒तमिन्द्र॑ꣳ स्व॒स्ति नो॑ म॒घवा॑ धात्विन्द्रः÷ ॥ ५० ॥

अर्थ--रक्षण करणारा, संतुष्ट करणारा, सहज बोलावतां येण्यासारखा शूर समर्थ व पुष्कळांनीं बोलाविलेला जो इंद्र त्याला आम्ही प्रत्येक यज्ञांत बोलावितों. अशा तऱ्हेनें बोलाविला गेलेला तो धनवान् इंद्र आमचें कल्याण करो ॥ ५० ॥

इन्द्रः÷ सु॒त्रामा॒ स्ववाँ२॥ अवो॑भिः सु॒मृ॒ळीको॑ भवतु वि॒श्ववे॑दाः । बाध॑तां॒ द्वेषोऽअभ॑यं कृणोतु सु॒वीर्य॑स्य॒ पत॑यः स्याम ॥ ५१ ॥

अर्थ—संपूर्ण वस्तूंचा मालक, धनवान्, चांगलें रक्षण करणारा इंद्र अन्न देऊन आम्हांला सुखी करो. तो आमचें दौर्भाग्य दूर करो व अभय देवो. आणि त्याचे प्रसादानें आम्ही द्रव्याचे स्वामी होऊं ॥ ५१ ॥

तस्य वयꣳ सुमतौ यविष्ठस्यापि भद्रे सौमनसे स्याम । स त्रामा स्ववाँ२॥ इन्द्रोऽअस्मेऽआराच्चिद्द्वेषः सनुतर्युयोतु ॥ ५२ ॥

अर्थ—आमचेविषयीं हित करणाऱ्या अशा, त्याची बुद्धि चांगली होवो व त्याचें मत उत्तम होवो. तो चांगला रक्षण करणारा धनवान् इंद्र आमचे जवळचें व दूरचें दौर्भाग्य नाहींसें करो ॥ ५२ ॥

आ मन्द्रैरिन्द्र हरिभिर्याहि मयूररोमभिः । मा त्वा केचिन्नियमन् विं न पाशिनोऽतिधन्वेव तां २॥ इहि ॥ ५३ ॥

अर्थ—हे इंद्रा, तूं गंभीर नाद करणारे व ज्यांचे केश मोरासारखे आहेत असे घोडे जुंपलेल्या रथांत बसून ये. फासेपारधी ज्याप्रमाणें पक्ष्याला अडवितात त्याप्रमाणें तुला कोणी न आडवो. तसेंच वाटसरू निर्जल मरुप्रदेश ओलांडून जातात त्याप्रमाणें रस्त्यांत आडविणारास तूं ओलांडून जा ॥ ५३ ॥

एवेदिन्द्रं वृषणं वज्रबाहुं वसिष्ठासोऽअभ्यर्चन्त्यर्कैः । स नः स्तुतो वीरवद्धातु गोमद्यूयं पात स्वस्तिभिः सदा नः ॥ ५४ ॥

अर्थ—वशिष्ट पुत्र मुनी मंत्रांनीं अशीच इंद्राची स्तुति करतात तो इंद्र वृष्टी करणारा व वज्रबाहु आहे, अशा रीतीनें स्तुति केलेला तो इंद्र पुत्र व गाईंनीं संयुक्त धन आम्हांला देवो. हे ऋत्विजांनो, तुम्ही आमचा नाश करूं नका व सर्वदा आमचें पालन करा ॥ ५४ ॥

विनियोग—' समिद्धः ' इत्यादि बारा ऋचा त्रिपशूच्या प्रयाज याज्या आहेत.

समिद्धोऽअग्निरश्विना तप्तो घर्मो विराट् सुतः । दुहे धेनुः सरस्वती सोमꣳ शुक्रमिहेन्द्रियम् ॥ ५५ ॥

अर्थ—हे अश्विनीकुमारांनो, अग्नि प्रदीप्त झाला आहे व प्रवर्ग्यही तापला आहे. विविध प्रकारें शोभणाऱ्या सोमाचें कंडण झालें आहे. संतुष्ट करणारी सरस्वती या यज्ञांत शुद्ध व इंद्रियांना बलप्रद अशा सोमाचें दोहन करिते म्हणजे देते. अर्थात् यज्ञाची तयारी झाली तुम्ही या ॥ ५५ ॥

तनूपा भिषजा सुतेऽश्विनोभा सरस्वती । मध्वा रजाꣳ सीन्द्रियमिन्द्राय पथिभिर्वहान् ॥ ५६ ॥

अर्थ—सोमरसाचें कंडण झालें असतां दोघे अश्विनीकुमार आणि सरस्वती मधुर रसानें लोकांना पूर्ण करितात. ते अश्विनीकुमार शरीरांचे संरक्षक व वैद्य आहेत व ते अश्विनीकुमार आणि सरस्वती इंद्राकरितां यज्ञमार्गांनीं वीर्य धारण करितात ॥ ५६ ॥

इन्द्रायेन्दुꣳ सरस्वती नराशꣳ सेन नग्नहुम् । अधातामश्विना मधु भेषजं भिषजा सुते ॥ ५७ ॥

अर्थ—सरस्वती यज्ञासह इंद्राकरितां सोम व सुराकंद धारण करिती झाली. सोम रसाचें कंडण झाल्यावर अश्विनीकुमाररूपी वैद्य मधुर असें औषध धारण करिते झाले ॥ ५७ ॥

आजुह्वाना सरस्वतीन्द्रायेन्द्रियाणि वीर्यम् । इडाभिरश्विनाविषꣳ समूर्जꣳ सꣳ रथिं दधुः ॥ ५८ ॥

अर्थ—इंद्राला बोलावणारी सरस्वती आणि अश्विनीकुमार इंद्राकरितां चक्षुरादि इंद्रियें, त्यांचें सामर्थ्य, पशूंसह अन्न, दधि वगैरे रस आणि द्रव्य यांप्रत धारण करिते झाले ॥ ५८ ॥

अश्विना नमुचेः सुतꣳ सोमꣳ शुक्रं परिस्रुता । सरस्वती तमाभरद्बर्हिषेन्द्राय पातवे ॥ ५९ ॥

अर्थ—अश्विनीकुमारांनीं सुरेसह कांडलेला, शुद्ध सोमरस नमुचिनामक असुरापासून आणला व सरस्वतीनें तोच रस इंद्राला पिण्याकरितां यज्ञांत पसरण्यास योग्य अशा दर्भासह आणला ॥ ५९ ॥

कवष्यो न व्यचस्वतीरश्विभ्यां न दुरो दिशः । इन्द्रो न रोदसीऽ उभे दुहे कामान्सरस्वती ॥ ६० ॥

अर्थ—अश्विनीकुमार, सरस्वती व इंद्र यांनीं द्युलोकांतून व पृथ्वीलोकांतून आपल्या इच्छा दोहन केल्या. तसेंच सच्छिद्र व अवकाशसहित अशा दिशांतून आपल्या इच्छा दोहन केल्या. ॥ ६० ॥

उषासानक्तमश्विना दिवेन्द्रꣳ सायमिन्द्रियैः । संजानाने सुपेशसा समञ्जाते सरस्वत्या ॥ ६१ ॥

अर्थ—हे अश्विनीकुमारांनो, रविप्रभा व रात्री यांनीं दिवसा व संध्याकाळीं सरस्वतीसह इंद्राला वीर्याशीं युक्त करतात. त्या रविप्रभा व रात्री एकामतानें चालणाऱ्या आहेत. रविप्रभेचें रूप पांढरें व रात्रीचें रूप काळें आहे. ॥ ६१ ॥

पातं नोऽअश्विना दिवा पाहि नक्तꣳ सरस्वति । दैव्या होतारा भिषजा पातमिन्द्रꣳ सचा सुते ॥ ६२ ॥

अर्थ—हे अश्विनीकुमारांनो, तुम्ही आमचे दिवसा रक्षण करा व हे सरस्वति, तूं आमचें रात्रीं रक्षण कर. हे वैद्य अशा देवांसंबंधी होत्यांनो, सोमरसाचें कंडण झाल्यावर तुम्ही एकत्र होऊन इंद्राचें रक्षण करा. ॥ ६२ ॥

तिस्रस्त्रेधा सरस्वत्यश्विना भारतीडा । तीव्रं परिस्रुता सोममिन्द्राय सुषुवुर्मदम् ॥ ६३ ॥

अर्थ—इडा, सरस्वती व भारती या तीन देवता तीन ठिकाणी असलेल्या पृथ्वी, मध्य (अंतरिक्ष) व द्युलोक या तीन ठिकाणीं असलेल्या व अश्विनीकुमार हुशारी देणारा व मदोत्पादक अशा सोमाचें सुरेसह इंद्राकरितां कंडण करिते झाले. ॥ ६३ ॥

आश्विना भेषजं मधु भेषजं न सरस्वती । इन्द्रे त्वष्टा यशसꣳ श्रियꣳरूपꣳ रूपमधुꣳ सुते ॥ ६४ ॥

अर्थ—सोमरसाचें कंडण झाल्यावर अश्विनीकुमार आमची सरस्वती व प्रयाज देवता जी त्वष्टा, यांनीं इंद्रामध्यें सार्थे औषध व गोड असें औषध व कीर्ति, लक्ष्मी आणि नानाप्रकारचे रूप स्थापन केलें. ॥ ६४ ॥

ऋतुथेन्द्रो वनस्पतिः शशमानः परिस्रुता । कीलालमश्विभ्यां मधु दुहे धेनुः सरस्वती ॥ ६५ ॥

अर्थ—प्रयाजांचा देव जो वनस्पती तो स्तुति करून प्रत्येक ऋतूंत इंद्राकरितां सुरेसह अमृतरसाचें दोहन करितो व सरस्वती अश्विनीकुमारांसह धेनुरूप धारण करून इंद्राकरितां मध दोहन करिते. ॥ ६५ ॥

गोभिर्न सोममश्विना मासरेण परिस्रुता। समधात्ꣳ सरस्वत्या स्वाहेन्द्रे सुतं मधु ॥ ६६ ॥

अर्थ--हे अश्विनीकुमारांनो, तुम्ही सुरेसह व गोप्रभृति पशूंसह कांडलेला सोम व मध इंद्राचे ठायीं स्थापन करितां. हे होमलेल्या प्रयाज देवांनो तुम्ही सरस्वतीसह इंद्राचे ठायीं कंडण केलेला रस स्थापन करितां. ॥ ६६ ॥

विनियोग--"अश्विना हवि" या तीन ऋचा वपांच्या याज्या व पुरोनुवाक्या आहेत.

अश्विना हविरिन्द्रियं नमुचेर्धिया सरस्वती। आ शुक्रमासुराद्वसु मय-मिन्द्रायजभ्रिरे ॥ ६७ ॥

अर्थ--अश्विनीकुमार व सरस्वती बुद्धीच्या साह्यानें नमुचि राक्षसापासून इंद्राकरितां शुद्ध हविर्द्रव्य, वीर्य व पूज्य धन आणिते झाले. ॥ ६७ ॥

यमश्विना सरस्वती हविषेन्द्रमवर्धयन्। स विभेद बलं मधं नमुचावासुरे सचा ॥ ६८ ॥

अर्थ—अश्विनीकुमार व सरस्वती हविर्द्रव्यानें ज्या इंद्राला वाढविते झाले तो इंद्र नमुचि राक्षसासह प्रशस्त अशा मेघाचें विदारण करिता झाला. ॥ ६८ ॥

तमिन्द्रं पशवꣳ सचाश्विनोभा सरस्वती दधानाऽअभ्ययूनषत हविषा यज्ञऽइन्द्रियैꣳ ॥ ६९ ॥

अर्थ—गो, मेष वगैरे कर्मांग पशू, अश्विनीकुमार आणि सरस्वती हे सर्व एक होऊन यज्ञामध्यें हविर्द्रव्यानें व सामर्थ्यानें पोषण करून त्या इंद्राला वाढवितात ॥ ६९ ॥

विनियोग—'स इंद्र' इत्यादि तीन ऋचा पशु पुरोडाशाच्या याज्या व अनुवाक्या आहेत.

सऽइन्द्रऽइन्द्रियं दधुꣳ सविता वरुणो भगः। स सुत्रामा हविष्पतिर्यजमानाय सश्चत ॥ ७० ॥

अर्थ—सविता, वरुण व भग हे तीन देव इंद्राचे ठायीं वीर्य स्थापन करिते

झाले. तो उत्तम रक्षण करणारा हविर्द्रव्यांचा स्वामी इंद्र या यजमानास अभीष्ट देऊन सुखी करो ॥ ७० ॥

सविता वरुणो दधद्यजमानाय दाशुषे। आदत्त नमुचेर्वसु सुत्रामा बलमिन्द्रियम् ॥ ७१ ॥

अर्थ—संरक्षण करणाऱ्या इंद्रानें नमुचि राक्षसापासून जें द्रव्य, वीर्य व बल आणलें; तें सविता, वरुण व भगरूपी देव हविर्भाग देणाऱ्या या यजमानाला देवोत ॥ ७१ ॥

वरुणः क्षत्रमिन्द्रियं भगेन सविता श्रियम्। सुत्रामा यशसा बलं दधाना यज्ञमाशत ॥ ७२ ॥

अर्थ—वरुण, सविता व संरक्षक इंद्र हे सौत्रामणी यज्ञाला व्याप्त करिते झाले. ते नाशापासून दूर करण्यांत समर्थ असें वीर्य, भाग्यासह लक्ष्मी व कीर्तीसह बल, क्रमेंकरून या यजमानाचे ठायीं स्थापन करणारे असे आहेत ॥ ७२ ॥

विनियोग—" अश्विना गोभिः " इत्यादि तीन ऋचा हविर्द्रव्याच्या याज्यानुवाक्या आहेत.

अश्विना गोभिरिन्द्रियमश्वेभिर्वीर्यं बलम्। हविषेन्द्रꣳ सरस्वती यजमानमवर्धयन् ॥ ७३ ॥

अर्थ—अश्विनी कुमार व सरस्वती यांनीं इंद्राची व यजमानाची पुढील पदार्थांनीं वृद्धि केली. तें असें—गोप्रभृति पशु, इंद्रियसामर्थ्य, दक्षिणारूपी अश्व, मनःसामर्थ्य, शरीरसामर्थ्य व पशुपुरोडाशरूपी हविर्द्रव्य (इंद्राची वृद्धि म्हणजे त्याची तृप्ति व यजमानाची वृद्धि म्हणजे धन—पुत्रादिकांनीं त्याचें पोषण) ॥ ७३ ॥

ता नासत्या सुपेशसा हिरण्यवर्तनी नरा। सरस्वती हविष्मतीन्द्र कर्मसु नोऽवत ॥ ७४ ॥

अर्थ—अश्विनीकुमार आणि सरस्वती सौत्रामण्यादि यागामध्यें आमचें रक्षण करोत व हे इंद्रा, तूंहि पूर्वोक्त यागांत आमचें रक्षण कर. ते अश्विनीकुमार हिरण्ययुक्त मार्गानें जाणारे सुंदररूपयुक्त व मनुष्याकार आहेत व ती सरस्वती हविर्द्रव्ययुक्त आहे ॥ ७४ ॥

ता भिषजा सुकर्मणा सा सुदुघा सरस्वती । स वृत्रहा शतक्रतुरिन्द्राय दधुरिन्द्रियम् ॥ ७५ ॥

अर्थ—ते प्रसिद्ध वैद्य अश्विनीकुमार आणि ती प्रसिद्ध सरस्वती व वृत्रासुराचा नाश करणारा, तसेंच शंभर यज्ञ करणारा इंद्र, या युगांतील इंद्राचे ठायीं वीर्य स्थापन करिते झाले ॥ ७५ ॥

विनियोग—" युवं " हा मंत्र पयोग्रह व सुराग्रह यांची पुरोनुवाक्या आहे

युवꣳ सुराममश्विना नमुचावासुरे सचा । विपिपानाꣳ सरस्वतीन्द्रं कर्मस्वावत ॥ ७६ ॥

अर्थ—हे अश्विनीकुमारांनो, तुम्ही व सरस्वती एकत्र होऊन नमुचि राक्षसांत असलेला सुरामय ग्रह नानातऱ्हेनें प्राशन करा व कर्मांमध्यें इंद्राचें सर्व बाजूंनीं रक्षण करा ॥ ७६ ॥

विनियोग—' पुत्रमिव ' ही ऋचा पयोग्रह व सुराग्रहाची याज्या आहे.

पुत्रमिव पितरावश्विनोभेन्द्रावथुः काव्यैर्दꣳसनाभिः । यत्सुरामं व्यपिबः शचीभिः सरस्वती त्वा मघवन्नभिष्णक् ॥ ७७ ॥

अर्थ—हे इंद्रा, आईबाप मुलांचें रक्षण करितात, त्याप्रमाणें दोघांहि अश्विनीकुमारांनीं मंत्रांनीं व कर्मांनीं तुझें रक्षण केलें. कारण कीं, हे इंद्रा, तूं नमुचि राक्षसवधादि कर्मांनीं अत्यंत रमणीय असा सोम विशेषेंकरून प्यालास; आणखी दुसरे कारण असें कीं, सरस्वती देवी तुझी सेवा करिते म्हणजे तूं सोमपान केलेंस म्हणून व सरस्वती तुझी सेवा करिते म्हणून अश्विनीकुमारांनीं तुझें रक्षण केलें ॥ ७७ ॥

विनियोग—" यस्मिन् अश्वासः " ही स्विष्टकृत् यागांतील पुरोनुवाक्या आहे व ' अहाव्यग्ने ' ही पुढील ऋचा त्या यागाची याज्या आहे.

यस्मिन्नश्वासऽऋषभासऽउक्षणो वशा मेषाऽअवसृष्टासऽआहुताः । कीलालपे सोमपृष्ठाय वेधसे हृदा मतिं जनय चारुमग्नये ॥ ७८ ॥

अर्थ—हे अध्वर्यो, त्या अग्नीकरितां मन व बुद्धि शुद्ध कर. तो अग्नि अन्नरस पिणारा, पृष्ठभागीं सोमरस वाहणारा, शुभ कार्य करणारा असा आहे. त्या अग्नीमध्यें

अश्व, सामान्य वृषभ, सेचन समर्थ वृषभ, वंध्या गो व अज यांचा अवदानपूर्वक होम केला जातो ॥ ७८ ॥

अहाव्यग्ने हविरास्ये ते स्रुचीव घृतं चम्वीव सोमः । वाजसनिं रयिमस्मे सुवीरं प्रशस्तं धेहि यशसं बृहन्तम् ॥ ७९ ॥ शतं १२००

अर्थ—हे अग्ने, स्रुचेंत असलेल्या घृताप्रमाणें व कंडणचर्मावर असलेल्या सोमाप्रमाणें सर्वदा तुझ्या मुखांत सर्व बाजूंनीं हविर्द्रव्याचा होम केला. हे अग्ने, असा तूं आमचे ठायीं अन्नाचा उपभोग, सुपुत्रयुक्त द्रव्य व सर्वलोकप्रसिद्ध कीर्ति स्थापन कर ॥ ७९ ॥

विनियोग—'अश्विना तेजसा' इत्यादि अकरा मंत्रांचे शत्र (स्तुतिवाक्य) आहे.

अश्विना तेजसा चक्षुः प्राणेन सरस्वती वीर्यम् । वाचेन्द्रो बलेनेन्द्राय दधुरिन्द्रियम् ॥ ८० ॥

अर्थ—अश्विनीकुमार इंद्राकरितां सतेज चक्षुरिंद्रिय धारण करिते झाले. सरस्वती इंद्राकरितां सप्राण असें वीर्य धारण करिती झाली व युगांतरीय इंद्र या युगांतील इंद्राकरितां बलसहित इंद्रियसामर्थ्य धारण करिता झाला ॥ ८० ॥

गोमद्दूषु णासत्याश्वावद्यातमश्विना । वर्ती रुद्रा नृपाय्यम् ॥ ८१ ॥

अर्थ—हे शत्रूंना रडविणाऱ्या अश्विनीकुमारांनो, तुम्ही मनुष्य ज्यांत सोमपान करितात अशा यज्ञाप्रत, गोयुक्त व अश्वयुक्त द्रव्य घेऊन मार्गानें जा ॥ ८१ ॥

न यत्परो नान्तरऽआदधर्षद्दूषण्वसू । दुःशꣳसो मर्त्यो रिपुः ॥ ८२ ॥

अर्थ—वृष्टि हेंच ज्यांचें द्रव्य आहे अशा अश्विनीकुमारांनो, अपवाद देणारा शत्रु, सामान्य मनुष्य, स्वकीय अथवा परकीय, संबद्ध अथवा असंबद्ध असाहि मनुष्य इंद्राचा पराभव न करो ॥ ८२ ॥

ता नऽआवोढमश्विना रयिं पिशङ्गसंदृशम् । धिष्ण्या वरिवोविदम् ॥ ८३ ॥

अर्थ—धिष्ण्य अग्निरूपी हे अश्विनीकुमारांनो, तुम्ही आमच्याकरितां पीतवर्णाचें सुवर्णरूपी व अन्य द्रव्याला हेतुभूत असें द्रव्य आणा ॥ ८३ ॥

पावका नः सरस्वती वाजेभिर्वाजिनीवती । यज्ञं वष्टु धियावसुः ॥ ८४ ॥

अर्थ—सरस्वती आमच्या यज्ञाची इच्छा करो, म्हणजे आमच्या यज्ञांत येवो. ती पवित्र करणारी, यज्ञक्रियाधिष्ठात्री व कर्माचे साहाय्यानें द्रव्य प्राप्त करणारी अशी आहे ॥ ८४. ॥

चोदयित्री सूनृतानां चेतन्ती सुमतीनाम् । यज्ञं दधे सरस्वती ॥ ८५ ॥

अर्थ—प्रियसत्य वाक्यात्मक अशा तीन वेदांची प्रेरणा करणारी, उत्तम बुद्धि देणारी सरस्वती आमच्या यज्ञाचें धारण करते ॥ ८५ ॥

महोऽअर्णः सरस्वती प्रचेतयति केतुना । धियो विश्वा विराजति ॥ ८६ ॥

अर्थ--सरस्वती कर्माच्या योगें मोठ्या उदकाची प्रेरणा करते म्हणजे वृष्टि करते व सर्व प्राण्यांच्या बुद्धीना प्रकाशित करते. आम्ही तिचें स्तवन करतों ॥८६॥

इन्द्रायाहि चित्रभानो सुताऽइमे त्वायवः । अण्वीभिस्तना पूतासः ॥ ८७ ॥

अर्थ—नानाविध प्रकाशयुक्त अशा हे इन्द्रा, तूं ये. कारण तुझी इच्छा करणाऱ्या या सोमलतांचें कण्डन झालें आहे व ते सोम अंगुलींनीं आणि दशापवित्रांनी शुद्ध केले गेले आहेत ॥ ८७ ॥

इन्द्रायाहि धियेषितो विप्रजूतः सुतावतः । उप ब्रह्माणि वाघतः ॥८८॥

अथ --हे इंद्रा, तूं स्वयंप्रेरणेनें ये. तूं बुद्धिमान् ब्राह्मणांकडून सेवित आहेस व ज्यानें सोमाचें कण्डन केलें, अशा यजमानाच्या हविर्द्रव्यांजवळ ऋत्विज् उभे आहेत म्हणजे सर्व तयारी आहे म्हणून ॥ ८८ ॥

इन्द्रायाहि तुतुजान उप ब्रह्माणि हरिवः । सुते दधिष्व नश्चनः ॥८९॥

अर्थ—हे अश्वयुक्त इन्द्रा, त्वरायुक्त होऊन तूं या यजमानाच्या हविर्द्रव्यासमीप ये व सोमरसाचें कण्डन झाल्यावर आमचें सोमरूपी अन्न उदरांत धारण कर ॥८९॥

अश्विना पिबतां मधु सरस्वत्या सजोषसा । इन्द्र सुत्रामा वृत्रहा जुषन्ताꣳ सोम्यं मधु ॥ ९० ॥

अर्थ--प्रीतियुक्त व सरस्वतीसहवर्तमान अश्विनीकुमार व संरक्षण करणारा वृत्रनाशक इंद्र मधुर व सोमरसयुक्त हविर्भागाचें सेवन करोत ॥ ९० ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**

माध्यन्दिनवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** विंशोऽध्यायः ॥ २० ॥

इति विंशोऽध्यायः समाप्तः ।

॥ पूर्वार्धः समाप्तः ॥



॥ अथोत्तरार्ध-प्रारम्भः ॥

अथ एकविंशोऽध्यायः ॥ २१ ॥

विनियोग—'इमं मे व तत्त्वा यामि' या दोन ऋचा वारुणपुरोडाशाच्या पुरोऽनुवाक्या व याज्या आहेत.

इमं मे वरुण श्रुधी हवमद्या च मृडय । त्वामवस्युराचके ॥ १ ॥

अर्थ—हे वरुणा, तूं आमचें बोलावणें ऐक आणि आज आम्हांला सुख दे. कारण कीं, स्वतःचे रक्षणाकरितां मी तुला इच्छितों ॥ १ ॥

तत्त्वा यामि ब्रह्मणा वन्दमानस्तदाशास्ते यजमानो हविर्भिः । अहेडमानो वरुणेह बोध्युरुशꣳस मा नऽआयुः प्रमोषीः ॥ २ ॥

अर्थ—हे वरुणा, यजमानाला इष्ट असलेले धनपुत्रादिक मी तुजजवळ मागतों ते त्याला दे. मी तीन्ही वेदांनीं तुझी स्तुति करतों. हे बहुस्तुतियुक्त वरुणा, न रागावतां या ठिकाणीं बसून माझी स्तुति ऐक व माझ्या आयुष्याचा नाश करूं नकोस ॥ २ ॥

विनियोग—'त्वं नः', 'सत्वं नो' या दोन ऋचा अग्निवरुण यागांतील पुरोऽनुवाक्या व याज्या आहेत.

त्वं नोऽअग्ने वरुणस्य विद्वान्देवस्य हेडोऽअवयासिसीष्ठाः । यजिष्ठो वह्नितमः शोशुचानो विश्वा द्वेषाꣳसि प्रमुमुग्ध्यस्मत् ॥ ३ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं स्वतःचा अधिकार जाणणारा अत्यंत पूज्य, हविर्द्रव्यांचें वहन करणारा व अत्यंत दैदीप्यमान आहेस असा तूं आमच्या विषयीं असलेला वरुणाचा क्रोध दूर कर व आमचीं दौर्भाग्यें आम्हांपासून दूर कर ॥ ३ ॥

स त्वं नोऽअग्नेऽवमो भवोती नेदिष्ठोऽअस्याऽउषसो व्युष्टौ । अवयक्ष्व नो वरुणꣳरराणो वीहि मृडीकꣳ सुहवो नऽएधि ॥ ४ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं आज प्रातःकालीं आमचें रक्षण करून आमचेजवळ रहा आणि आमचें हविर्द्रव्य वरुणास दे. नंतर तूं स्वतः सुखकारक हविर्द्रव्य भक्षण कर व आम्हांला बोलावतां येण्यास सुलभ हो ॥ ४ ॥

विनियोग—आदित्य चरूची ' महीमूषु ' ही ऋचा याज्या व पुढील ऋचा पुरोनुवाक्या आहे.

महीमूषु मातरꣳ सुव्रतानामृतस्य पत्नीमवसे हुवेम । तुविक्षत्रामजरन्तीमुरूचीꣳ सुशर्माणमदितिꣳ सुप्रणीतिम् ॥ ५ ॥

अर्थ—आम्ही देवमाता जी अदिति तिला आमच्या रक्षणाकरितां बोलावतों. ती मोठी, उत्तम कार्ये करणारी, यज्ञपालक, पुष्कळ क्षतांपासून रक्षण करणारी, जरारहित, बहुगमनशील, चांगल्या आश्रयानें युक्त व उत्तम सेवन करणारी अशी आहे ॥ ५ ॥

सुत्रामाणं पृथिवीं यामनेहसꣳ सुशर्माणमदितिꣳ सुप्रणीतिम् । दैवीं नावꣳ स्वरित्रामनागसमस्रवन्तीमारुहेमा स्वस्तये ॥ ६ ॥

अर्थ—आम्ही कल्याण व्हावें म्हणून देवांच्या नौकेवर आरोहण करतों. ती नौका पृथ्वीप्रमाणे विशाल व स्वर्गाप्रमाणे क्रोधरहित आहे. तसेंच ती चांगल्या तऱ्हेनें रक्षण करणारी, अखंडित, उत्तम तऱ्हेनें परतीराला नेणारी असून दोषरहित व छिद्ररहित आहे व तिच्यावर उत्तम वल्हीं आहेत ॥ ६ ॥

सुनावमारुहेयमस्रवन्तीमनागसम् । शतारित्राꣳ स्वस्तये ॥ ७ ॥

अर्थ—माझें कल्याण व्हावें म्हणून मी चांगल्या नावेवर आरोहण करतों. ती छिद्ररहित असून तिच्यांत कोणताहि दोष नाहीं व तिच्यावर शेंकडों वल्हीं आहेत ॥ ७ ॥

विनियोग—"आ नो मित्रा" ही पयस्येची पुरोऽनुवाक्या आहे व "प्र बाहवा" ही याज्या आहे.

आ नो मित्रावरुणा घृतैर्गव्यूतिमुक्षतम् मध्वा रजाꣳसि सुक्रतु ॥ ८ ॥

अर्थ—हे मित्रावरुण देवांनो, तुम्ही आमच्या यज्ञमार्गाचें सर्व बाजूंनीं शुद्धोदकांनी सिञ्चन करा, हे शुभकर्मे करणाऱ्यांनो, तुम्ही आमच्या लोकांचे मधानें सिञ्चन करा ॥ ८ ॥

प्र बाहवा सिसृतं जीवसे नऽआ नो गव्यूतिमुक्षतं घृतेन । आ मा जने श्रवयतं युवाना श्रुतं मे मित्रावरुणा हवेया ॥ ९ ॥

अर्थ—हे तरुण अशा मित्रावरुणांनो, आम्हांला पुष्कळ दिवस आयुष्य प्राप्त व्हावें म्हणून तुम्ही आपले बाहु पसरा व आमच्या क्षेत्राचें घृतानें सिञ्चन करा व त्या क्षेत्रांतील धान्यानें मीं याग केला असें सर्व देशांत माझें वर्णन करा व तुम्ही माझे बोलावणें ऐका ॥ ९ ॥

विनियोग—" शन्नो भवंतु " ही वाजिन यागाची पुरोऽनुवाक्या आहे व पुढील ' वाजे वाजे ' ही ऋचा याज्या आहे.

शं नो भवन्तु वाजिनो हवेषु देवताता मितद्रवः स्वर्काः । जम्भयन्तोऽहिं वृकꣳ रक्षाꣳसि सनेम्यस्मद्युयवन्नमीवाः ॥ १० ॥

अर्थ—यज्ञकर्मांत बोलावणीं आलीं असतां घोडे आम्हांला सुखकर होवोत. ते घोडे परिमित गमन करणारे, उत्तम कांतिमान् व लांडग्यांचा आणि राक्षसांचा नाश करणारे असे आहेत. तसेंच ते आमच्या व्याधींना शीघ्र दूर करोत ॥ १० ॥

वाजेवाजेऽवत वाजिनो नो धनेषु विप्राऽअमृताऽऋतज्ञाः । अस्य मध्वः पिबत मादयध्वं तृप्ता यात पथिभिर्देवयानैः ॥ ११ ॥

अर्थ—हे अश्वांनो, सर्व अन्नें व धनें प्राप्त झालीं असतां आमचें रक्षण करा. तुम्ही बुद्धिमान् अविनाशी व यज्ञ जाणणारे आहां. हे गोड निवारादि तृण खा व संतुष्ट व्हा व तृप्त होऊन देव जातात त्या मार्गांनीं गमन करा ॥ ११ ॥

विनियोग—' समिद्धो अग्निः ' या अकरा ऋचा वायोधस संज्ञक पशुयागांतील प्रयाज याज्या आहेत.

समिद्धोऽअग्निꣳ समिधा सुसमिद्धो वरेण्यः । गायत्री छन्दऽइन्द्रियं त्र्यविर्गौर्वयो दधुः ॥ १२ ॥

अर्थ—अग्नि, गायत्री छंद व दीड वर्ष वयाचा वृषभ या तिघांनीं इंद्राचे ठायीं वीर्य व सत्व स्थापन करावें. तो अग्नि प्रयाज देवतेनें व प्रयाज घृतानें प्रदीप्त केलेला व सेवनीय असा आहे. ॥ १२ ॥

तनूनपाच्छुचिव्रततमनूपाश्च सरस्वती । उष्णिहा छन्दऽइन्द्रियं दित्य-वाड् गौर्वयो दधुः ॥ १३ ॥

अर्थ--शुद्ध कर्मयुक्त, जलपौत्र असा अग्नि, उष्णिक् छंद, दोन वर्षांचा दिव्य हविर्वहन करणारा वृषभ आणि शरीररक्षक सरस्वती हे चार इंद्राचे ठायीं वीर्य व सत्व धारण करोत. ॥ १३ ॥

इडाभिरग्निरीडन्यः सोमो देवोऽअमर्त्यः अनुष्टुप् छन्दऽइन्द्रियं पञ्चावि गौर्वयो दधुः ॥ १४ ॥

अर्थ—प्रयाज देवतांसह स्तुत्य असा अग्नि, अविनाशी सोमदेव, अनुष्टुप् छंद व अडीच वर्षांचा वृषभ हे पांच इंद्राचे ठायीं वीर्य व सत्व धारण करोत ॥ १४ ॥

सुबर्हिरग्निः पूषण्वान्स्तीर्णबर्हिरमर्त्यः । बृहती छन्दऽइन्द्रियं त्रिवत्सो गौर्वयो दधुः ॥ १५ ॥

अर्थ--सुबर्ही नांवाची प्रयाज देवता पूषानें युक्त, ज्याकरितां दर्भ पसरले आहेत असा व अविनाशी अग्नि, बृहती छंद व तीन वर्षांचा वृषभ हे चौथे इंद्राचे ठायीं वीर्य व सत्व धारण करोत ॥ १५ ॥

दुरो देवीर्दिशो महीर्ब्रह्मा देवो बृहस्पतिः । पङ्क्तिश्छन्दऽइहेन्द्रियं तुर्य-वाड् गौर्वयो दधुः ॥ १६ ॥

अर्थ—द्वार संज्ञक अशा प्रयाज देवता, मोठ्या दिशा, ब्रह्मदेव, बृहस्पति, पंक्ति-च्छन्द व चार वर्षांचा वृषभ हे सहा देव या इंद्राचे ठायीं वीर्य व सत्व धारण करोत ॥ १६ ॥

उषे बृही सुपेशसा विश्वेदेवाऽअमर्त्याः । त्रिष्टुप्छन्दऽइहेन्द्रियं पष्ठ-वाड् गौर्वयो दधुः ॥ १७ ॥

अर्थ--मोठ्या व उत्तम रूपवान् अशा दिवस आणि रात्री, अविनाशी विश्वेदेव, त्रिष्टुप् छंद व भारवाही वृषभ, हे पांच या इंद्राचे ठायीं वीर्य व सत्व धारण करोत ॥ १७ ॥

दैव्या होतारा भिषजेन्द्रेण सयुजा युजा । जगतीछन्दऽइन्द्रियमनड्वान् गौर्वयो दधुः ॥ १८ ॥

अर्थ—देवांचे होते वैय प्रयाज देव असे, अग्नि व वायू इंद्रासहवर्तमान तसेंच जगती छंद व शकट वहन करणारा वृषभ हे इंद्राचे ठायीं वीर्य व सत्व स्थापन करोत ॥ १८ ॥

तिस्रऽइडा सरस्वती भारती मरुतो विशः÷ । विराट्छन्दऽइहेन्द्रियं धेनुगौर्न वयो दधुः ॥ १९ ॥

अर्थ—इडा, सरस्वती, भारती या तीन प्रयाज देवता, मरुत, इंद्र, प्रजा, विराट् छंद व दोहनशील गाय या इंद्राच ठायीं वीर्य व सत्व धारण करोत ॥ १९ ॥

त्वष्टा तुरीपोऽअद्भुतऽइन्द्राग्नी पुष्टिवर्धना । द्विपदा छन्दऽइन्द्रियमुक्षा गौर्न वयो दधुः ॥ २० ॥

अर्थ—शीघ्र गमन करणारा मोठा असा त्वष्टृसंज्ञक प्रयाज देव व धनवृद्धी करणारे इंद्राग्नी, द्विपदा छंद, वीर्य सिञ्चन करणारा वृषभ हे पांच इंद्राचे ठायीं वीर्य व सत्त्व धारण करोत ॥ २० ॥

शमिता नो वनस्पतिः÷ सविता प्रसुवन्भगम् । ककुप्छन्दऽइहेन्द्रियं वशा वेहद्वयो दधुः ॥ २१ ॥

अर्थ—आम्हांला सुख देणारा वनस्पतिसंज्ञक प्रयाज देव व धन देणारा सूर्य, ककुभ् छंद, वंध्या गाय व गर्भघातिनी गाय हे पांच या इंद्राचे ठायीं वीर्य व सत्त्व धारण करोत ॥ २१ ॥

स्वाहा यज्ञं वरुणꣳ सुक्षत्रो भेषजं करत् । अतिच्छन्दाऽइन्द्रियं बृहद्वृषभो गौर्वयो दधुः ॥ २२ ॥

अर्थ—चांगल्या तऱ्हेनें नाशापासून रक्षण करणारा वरुण प्रयाज देवासह इंद्राला यज्ञरूपी औषध देवो; आणि 'अतिच्छंद' संज्ञक छंद, मोठा वृषभ वरुण व प्रयाज देव हे चार या इंद्राचे ठायीं वीर्य व सत्त्व स्थापन करोत ॥ २२ ॥

विनियोग—'वसंतेन ऋतुना' इत्यादि सहा ऋचा वयोधस पशुयागांतील पुरोऽनुवाक्या व याज्या आहेत.

वसन्तेन ऋतुना देवा वसवस्त्रिवृता स्तुताः रथन्तरेण तेजसा हविरिन्द्रे वयो दधुः ॥ २३ ॥

अर्थ—वसंत ऋतु, त्रिवृत स्तोम आणि रथंतर पृष्ठ यांनीं स्तविलेले देव इंद्राचे ठायीं तेजासह वपाख्य हवि व शक्ति स्थापन करोत ॥ २३ ॥

ग्रीष्मेण ऋतुना देवा रुद्राः पञ्चदशे स्तुताः बृहता यशसा बलꣳहविरिन्द्रे वयो दधुः ॥ २४ ॥

अर्थ—ग्रीष्म ऋतु, पंचदश स्तोम व बृहत् पृष्ठ यांनीं स्तुत केलेले देव इंद्राचे ठायीं यशासह बलरूपी हवि व शक्ति स्थापन करोत ॥ २४ ॥

वर्षाभिर्ऋतुनादित्याः स्तोमे सप्तदशे स्तुताः । वैरूपेण विशौजसा हविरिन्द्रे वयो दधुः ॥ २५ ॥

अर्थ—वर्षा ऋतु, सप्तदश स्तोम व वैरूप पृष्ठ यांनीं स्तुत झालेले आदित्य देव इंद्राचे ठायीं प्रजा व ओज यांसह हविर्द्रव्य व शक्ति स्थापन करोत ॥ २५ ॥

शारदेनऽऋतुना देवाऽएकविꣳशऽऋभव स्तुताः । वैराजेन श्रिया श्रियꣳहविरिन्द्रे वयो दधुः ॥ २६ ॥

अर्थ—शरद् ऋतु, एकविंश स्तोम, वैराज पृष्ठ व लक्ष्मी यांनीं स्तुत झालेले ऋभू संज्ञक देव या इंद्राच ठायीं श्रीरूपी हविर्द्रव्य व शक्ति स्थापन करोत ॥ २६ ॥

हेमन्तेनऽऋतुना देवास्त्रिणवे मरुत स्तुताः। बलेन शाक्करीꣳ सहो हविरिन्द्रे वयो दधुः ॥ २७ ॥

अर्थ—हेमंत ऋतु, त्रिणव स्तोम व शाक्कर पृष्ठ यांनीं स्तुत झालेले मरुत् देव इंद्राचे ठायीं बलासह इंद्रिय सामर्थ्यरूपी हवि व शक्ति स्थापन करोत ॥ २७ ॥

शैशिरेणऽऋतुना देवास्त्रयस्त्रिꣳशोऽमृता स्तुताः । सत्येन रेवतीꣳ क्षत्रꣳ हविरिन्द्रे वयो दधुः ॥ २८ ॥

अर्थ—शिशिर ऋतु, त्रयस्त्रिंश स्तोम व रैवत पृष्ठ यांनीं स्तुत झालेले अविनाशी देव या इंद्राचे ठायीं सत्यासह विनाशरक्षक असें हविर्द्रव्य व शक्ति स्थापन करोत ॥ २८ ॥

विनियोग—'होता यक्षत्' इत्यादि बारा ऋचा त्रिपशूंचें प्रयाज प्रैष आहेत.

होता यक्षत्समिधाग्निमिडस्पदेऽश्विनेन्द्रꣳ सरस्वतीमजो धूम्रो न गोधूमैꣳ कुवलैर्भेषजं मधु शष्पैर्न तेजऽइन्द्रियं पयꣳ सोमः परिस्रुता घृतं मधु व्यन्त्वाज्यस्य होतर्यज ॥ २९ ॥

अर्थ—देवांचा होता प्रयाज देवतेसह अग्नि, अश्विनीकुमार, इंद्र व सरस्वती यांचा गोपदस्थलीं असलेल्या आहवनीयामध्यें याग करो. त्या यागामध्यें अज, धूसर वर्णाचा मेष हे गोधूम, बदर व अंकुर आलेलें धान्य यांच्यासह इंद्राचे औषधरूपी होतात, तें औषध तेज व इंद्रिय सामर्थ्य देणारें आहे. तें अश्विनीकुमार सरस्वती व इंद्र संज्ञक देव, यांचा दैवी होत्यानें होम केल्यावर ते पय मदिरेसह सोम, घृत व मधु प्राशन करोत. हे मनुष्य होत्या, तूंही घृताचा होम कर ॥ २९ ॥

होता यक्षत्तनूनपात्सरस्वतीमविर्मेषो न मेषजं पथा मधुमता भरन्नश्विनेन्द्राय वीर्यꣳ बदरैरुपवाकाभिर्भेषजं तोकमभिꣳ पयꣳ सोमः परिस्रुता घृतं मधु व्यन्त्वाज्यस्य होतर्यज ॥ ३० ॥

अर्थ—दैवी होता तनूनपात् रूपी प्रयाज देव, सरस्वती, अश्विनीकुमार व इंद्र यांचा याग करो. त्या यागामध्यें बकरी व मेष हे रसयुक्त यज्ञमार्गानें शरीर पोषण करणारें होऊन बदरी फलें, इंद्रजव व अंकुरित व्रीहि यांसह इंद्राचें वीर्योत्पादक औषध बनतात. अश्विनीकुमार, सरस्वती व इंद्र हे दैवी होत्यानें होम केल्यावर ते पय मदिरेसह सोम, घृत व मधु यांचें प्राशन करोत. हे मनुष्य होत्या, तूंही घृताचा होम कर ॥ ३० ॥

होता यक्षन्नराशꣳसं न नग्नहुं पातꣳ सुरया भेषजं मेषꣳ सरस्वनी भिषग्थो न चन्द्रश्विनोर्वपाऽइन्द्रस्य वीर्यꣳ बदरैरुपवाकाभिर्भेषजं तोकमभिꣳ पयꣳ सोमः परिस्रुता घृतं मधु व्यन्त्वाज्यस्य होतर्यज ॥ ३१ ॥

अर्थ—दैवी होता, पालक असा नराशंस संज्ञक प्रयाज देव, सरस्वती व वैद्य अशा अश्विनीकुमारांचा सुवर्णमय रथ यांचा याग करो. त्या यागांत सुरेसह सुरा कंद, मेष व तीन पशूंच्या वपा ह्या बदरीफल, इंद्रजव, व अंकुरित व्रीहि यांसह इंद्राचें वीर्योत्पादक औषध बनोत. नराशंस संज्ञक प्रयाजदेव, सरस्वती व अश्विनीकुमारांचा रथ हे दैवी होत्यानें होम केल्याकर ते पय मदिरेसह सोम, घृत व मधु यांचें प्राशन करोत. हे मनुष्य होत्या, तूंही घृताचा होम कर ॥ ३१ ॥

होता यक्षद्विडेडितऽआजुह्वानꣳ सरस्वतीमिन्द्रं बलेन वर्धयन्नृषभेण गवेन्द्रियमश्विनेन्द्राय भेषजं यवे ÷ कर्कन्धुभिर्मधु लाजैर्न मासरं पयꣳ सोम÷ परिस्रुता घृतं मधु व्यन्त्वाज्यस्य होतर्यज ॥ ३२ ॥

अर्थ—दैवी होता ऋत्विजांनीं स्तुत होऊन व इडादिकांना आव्हान करून इडा-संज्ञक प्रयाज देवता, सरस्वती व इंद्र आणि अश्विनीकुमार यांचा याग करो व धेनु गाय व बल यांच्या योगें वरील देवतांना वाढवो. या यागांत यव, काकडी, मध साळीच्या लाह्या व भाताची पेज हे इंद्राचें वीर्योत्पादक औषध बनतें. अश्विनी-कुमार, सरस्वती व इंद्र दैवी होत्यानें होम केल्यावर ते पय मदिरेसह सोम, घृत व मधु यांचें प्राशन करोत. हे मनुष्य होत्या, तूंहि घृताचा होम कर ॥ ३२ ॥

होता यक्षद्बर्हिरूर्णम्रदा भिषङ्नासत्या भिषजाश्विनाश्वा शिशुमती भिष-ग्धेनुꣳ सरस्वती भिषग् दुहऽइन्द्राय भेषजं पयꣳ सोम÷ परिस्रुता घृतं मधु व्यन्त्वाज्यस्य होतर्यज ॥ ३३ ॥

अर्थ—दैवी होता ऊर्णेप्रमाणें अत्यंत मऊ ज्याचे दर्भ आहेत असा प्रयाजदेव, वैद्य व सत्यस्वरूपी अश्विनीकुमार आणि सरस्वती यांचा याग करो. त्या यागा-मध्यें बालकयुक्त घोडी व धेनु आणि सरस्वती हे वैद्य आहेत व ते इंद्राला सामर्थ्योत्पादक असें औषध देतात. (तात्पर्य, घोडी धेनु वगैरे या यज्ञांत दक्षिणा दिल्या जातात) प्रयाजदेव, अश्विनीकुमार व सरस्वती हे पय, मदिरेसह सोम, घृत व मधु यांचें प्राशन करोत. हे मनुष्य होत्या, तूंहि घृताचा होम कर ॥ ३३ ॥

होता यक्षद्दुरो दिशः÷ कवष्यो न व्यचस्वतीरश्विभ्यां न दुरो दिशऽ-इन्द्रो न रोदसी दुघे दुहे धेनुꣳ सरस्वत्यश्विनेन्द्राय भेषजꣳ शुक्रं न ज्योति-रिन्द्रियं पयꣳ सोम÷ परिस्रुता घृतं मधु व्यन्त्वाज्यस्य होतर्यज ॥ ३४ ॥

अर्थ—दैवी होता, सच्छिद्र व अवकाशयुक्त व गमन करणाऱ्या अशा द्वार-संज्ञक प्रयाज देवता, इंद्र, सरस्वती व अश्विनीकुमार यांचा याग करो. त्या दिशे-प्रमाणें असणाऱ्या अश्विनीकुमारांसह द्वारदेवतावर अधिष्ठित होऊन इंद्र दोहनशील अशा द्यावा पृथ्वीपासून औषधाचें दोहन करितो व सरस्वती धेनुरूपी होऊन ज्या द्वारदेवतांप्रत अधिष्ठित होऊन इंद्राकरितां शुद्ध व इंद्रिय व वीर्य दोहन करिती झाली. अश्विनीकुमारांसह द्वाररूपी प्रयाज देवता; इंद्र आणि सरस्वती हे पय,

मदिरेसह सोम, घृत व मधु यांचें प्राशन करोत. हे मनुष्य होत्या, तूंहि घृताचा होम कर ॥ ३४ ॥

होता यक्षत्सुपेशसोषे नक्तं दिवाश्विना समञ्जाते सरस्वत्या त्विषिमिन्द्रेण भेषजꣳ श्येनो न रजसा हृदा श्रिया न मासरं पयꣳ सोमꣳ परिस्रुता घृतं मधु व्यन्त्वाज्यस्य होतर्यज ॥ ३५ ॥

अर्थ—दैवी होता उत्तम रूपवान् अशा रात्रि व उषारूपी प्रयाजदेवतांचा व सरस्वतीसह अश्विनीकुमारांचा याग करो. ते अश्विनीकुमार रात्रंदिवस तेज, चित्त व लक्ष्मीसह मासररूपी औषध, श्येनाचा पंख व कांति यांस इंद्राशीं संयुक्त करतात. अशा तऱ्हेनें होत्यानें याग केल्यावर अश्विनीकुमार, इन्द्र व सरस्वती या देवता पय, सोम, सुरा, घृत व मधु यांचे पान करोत. हे मनुष्य होत्या, तूंहि घृताचा याग कर ॥ ३५ ॥

होता यक्षद्दैव्या होतारा भिषजाश्विनेन्द्रं न जागृवि दिवानक्तं न भेषजैꣳ शूषꣳ सरस्वती भिषक् सीसेन दुहऽइन्द्रियं पयꣳ सोमꣳ परिस्रुता घृतं मधु व्यन्त्वाज्यस्य होतर्यज ॥ ३६ ॥

अर्थ—दैवी होता, दैवी होते, जे अग्नि व सूर्यरूपी प्रयाजदेव, वैद्य, अश्विनीकुमार व इंद्र यांचा याग करो. रात्रंदिवस स्वकार्यसिद्धि करण्याकरितां जागणारी वैद्य बनलेली सरस्वती औषधांसह बल व वीर्याशीं शिशाच्या सळईनें इंद्राकरितां दोहन करती झाली. होत्यानें याग केल्यावर अश्विनीकुमार, सरस्वती व इंद्र या देवता पय, सोम, सुरा, घृत व मधु यांचें प्राशन करोत. हे मनुष्य होत्या, तूंहि आज्याचा याग कर ॥ ३६ ॥

होता यक्षत्तिस्रो देवीर्न भेषजं त्रयस्त्रिधातवोऽपसो रूपमिन्द्रे हिरण्ययमश्विनेडा न भारती वाचा सरस्वती महऽइन्द्राय दुहऽइन्द्रियं पयꣳ सोमꣳ परिस्रुता घृतं मधु व्यन्त्वाज्यस्य होतर्यज ॥ ३७ ॥

अर्थ—दैवी होता इडा, भारती, सरस्वती या तीन प्रयाजदेवता, अश्विनीकुमार व इंद्र यांचा याग करो. सरस्वतीनें वेदत्रयरूपी वाणीनें, कर्मयुक्त प्रधानांगोपांगविशिष्ट तीन पशूंनीं औषधरूपी प्रकाशमान वीर्य व तेज इंद्राकरितां दोहन केलें. ते कर्मयुक्त

तीन पशु असे–अश्विनीकुमारांचा पशु धूसर वर्णाचा अज, सरस्वतीचा मेष व इंद्राचा ऋषभ. होत्यानें याग केल्यावर अश्विनीकुमार, सरस्वती व इन्द्र या देवता पय, सोम, सुरा, घृत व मध यांचें प्राशन करोत. हे मनुष्य होत्या, तूंहि आज्याचा याग कर ॥ ३७ ॥

होता यक्षत्सुरेतसमृषभं नर्वापसं त्वष्टारमिन्द्रमाश्विना भिषजं न सरस्वतीमोजो न जूतिरिन्द्रियं वृको न रभसो भिषग्यशऽ सुरया भेषजꣳ श्रिया न मासरं पयऽ सोमऽ परिस्रुता घृतं मधु व्यन्त्वाज्यस्य होतर्यजं ॥ ३८ ॥

अर्थ—दैवी होता वृष्टिरूपी उत्तम वीर्यानें युक्त, मनुष्य हितकारी त्वष्टृरूपी प्रयाजदेव, इन्द्र, अश्विनीकुमार, व भिषग्भूत सरस्वती यांचा सुरेनें व वैद्यभूत वृकलोमानें (सुरेत घातलेल्या वृकलोमांनीं) औषधभूत अशा मासर ओदनानें याग करो. असा याग झाल्यावर तेज, वीर्य, यश व श्री इंद्राचे ठायीं संपन्न होवोत. होत्यानें याग केल्यावर त्वष्टा, इन्द्र, अश्विनीकुमार व सरस्वती या देवता पय, सोम, सुरा, घृत व मध यांचें प्राशन करोत. हे मनुष्य होत्या, तूंहि आज्याचा याग कर ॥ ३८ ॥

होता यक्षद्वनस्पतिऽ शमितारऽ शतक्रतुं भीमं न मन्युऽ राजानं व्याघ्रं नमसाश्विना भामऽ सरस्वती भिषगिन्द्राय दुहऽइन्द्रियं पयऽ सोमऽ परिस्रुता घृतं मधु व्यन्त्वाज्यस्य होतर्यजं ॥ ३९ ॥

अर्थ—दैवी होता यूपरूपानें पशूंचा संस्कार करणारा, क्रोधरूपी, वनस्पति संज्ञक प्रयाजदेव विशेषेंकरून भक्षण करणारा व राजाप्रमाणें असलेला, शतयज्ञ करणारा इंद्र, अश्विनीकुमार आणि सरस्वती यांचा अन्नानें याग करो. वैद्यरूपी सरस्वती इंद्राकरितां क्रोध व वीर्य दोहन करते. होत्यानें यज्ञ केल्यावर वनस्पति, इन्द्र, अश्विनीकुमार व सरस्वती या देवता पय, सोम, सुरा, घृत व मध यांचें प्राशन करोत. हे मनुष्य होत्या तूंही आज्याचा याग कर ॥ ३९ ॥

होता यक्षद्वह्निꣳ स्वाहाज्यस्य स्तोकानाꣳ स्वाहा मेदसां पृथक् स्वाहा च्छागमश्विभ्याꣳ स्वाहा मेषऽ सरस्वत्यै स्वाहाऽऋषभमिन्द्राय सिꣳहाय

सहसऽइन्द्रियꣳ स्वाहाग्निं न भेषजꣳ स्वाहा सोममिन्द्रियꣳ स्वाहेन्द्रꣳ सुत्रामाणꣳ सवितारं वरुणं भिषजां पतिꣳ स्वाहा वनस्पतिं प्रियं पाथो न भेषजꣳ स्वाहा देवाऽआज्यपा जुषाणोऽअग्निर्भेषजं पयऽ सोमः परिस्रुता घृतं मधु व्यन्वाज्यस्य होतर्यज ॥ ४० ॥

अर्थ—दैवी होता प्रयाज देवता अग्नि अथवा आहवनीय अग्नि यांचा याग करो. यजमान घृतबिंदूंना चांगलें म्हणतो व वपासंबंधी मेदांनाही पृथक् पृथक् रीतीनें चांगलें म्हणतो. तो अश्विनीकुमारांकरितां छागाला, सरस्वतीकरतां मेषाला, इन्द्राकरितां वीर्यप्रद अशा ऋषभालाही तो चांगला म्हणतो. तो इंद्र सिंहतुल्य शत्रुनाशक व बलप्रद असा आहे व औषध आणि हितकारक अग्नीला तो चांगला म्हणतो आणि इंद्रिय व वीर्यप्रद सोम, अग्नीषोम, संरक्षक इंद्र, सविता व वैद्यपति वरुण या सर्व पुरोडाशदेवतांना यजमान चांगलें म्हणतो; तसेंच तो अभीष्ट अन्नरूपी औषध व वनस्पतीरूपी प्रयाजदेव व आज्यपान करणारे देव या सर्वांना यजमान चांगलें म्हणतो. औषध सेवन करणारा अग्नि, अश्विनीकुमार, सरस्वती व इन्द्र या देवता होत्यानें याग केल्यावर पय, सोम, सुरा, घृत व मधु यांचें प्राशन करोत. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ४० ॥

विनियोग—' होता यक्षदश्विनौ ' हे तीन मंत्रभाग त्यांत सांगितलेल्या देवतांचे वपोप्रेष आहेत.

होता यक्षदश्विनौ छागस्य वपाया मेदसो जुषेताꣳ हविर्होतर्यज । होता यक्षत्सरस्वतीं मेषस्य वपाया मेदसो जुषतांꣳ हविर्होतर्यज होता यक्षदिन्द्रमृषभस्य वपाया मेदसो जुषतांꣳ हविर्होतर्यज ॥ ४१ ॥

अर्थ—दैवी होता अश्विनीकुमारांचा याग करो. तो छागाची वपा व मेद एतत्संबंधीं हवि भक्षण करो. हे मनुष्य होत्या, तूं घृताचा याग कर. दैवी होता सरस्वतीचा याग करो. ती मेषाची व मेद एतत्संबंधीं हवि भक्षण करो. हे मनुष्य होत्या, तूं घृताचा याग कर. दैवी होता इंद्राचा याग करो; तो वृषभाची वपा व मेद यांचें हवि भक्षण करो. हे मनुष्य होत्या, तूं घृताचा याग कर ॥ ४१ ॥

होता यक्षदश्विनौ सरस्वतीमिन्द्रꣳ सुत्रामाणमिमे सोमाऽ सुरामाणः छागैर्न मेषैर्ऋषभैः सुताः शष्पैर्न तोकमभिर्लाजैर्महस्वन्तो मदा मासरेण

परिष्कृताꣳ शुक्राꣳ पयस्वन्तोऽमृताꣳ प्रस्थिता वो मधुश्चुतस्तानश्विना सरस्वतीन्द्रः सुत्रामा वृत्रहा जुषन्तांꣳ सोम्यं मधु पिबन्तु मदन्तु व्यन्तु होतर्यज ॥ ४२ ॥

विनियोग--' होता यक्षदश्विनौ सरस्वतीमिन्द्रं ' हा ग्रहांचा चतुर्थ प्रैष आहे.

अर्थ--दैवी होता अश्विनीकुमार, सरस्वती व रक्षण करणारा इंद्र यांचा याग करो. हे अध्वर्यूनो, हे तुम्ही काण्डलेले, छाग, मेष व वृषभ या पशूंनीं रमणीय, सुरायुक्त, शष्प (बालतृण) यवांकुर व साळीच्या लाह्या यांनीं युक्त, तेजस्वी, मदोत्पादक, मासरानें सुशोभित, प्रकाशयुक्त, दुग्धमिश्रित व अमृतसदृश सोमरस मदाचा स्राव करीत होमाकडे निघाले आहेत. अश्विनीकुमार, सरस्वती व वृत्रनाशक इंद्र त्यांचें सेवन करो. त्या अश्विनीकुमार, सरस्वती व इन्द्र या देवता सोमयुक्त मध पिवोत व संतुष्ट होवोत. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ४२ ॥

विनियोग--यानंतर तीन मंत्रांत आश्विनादिहवियागांचे मंत्र आहेत.

होता यक्षदश्विनौ छागस्य हविषऽआत्तामग्न्य मेध्यतो मेवऽउद्भृतं पुरा द्वेषोभ्यꣳ पुरा पौरुषेण्या गृभो घस्तां नूनं घासेऽआज्राणां यवसप्रथमानाꣳ सुमन्क्षराणाꣳ शतरुद्रियाणामग्निष्वात्तानां पीवोपवसनानां पार्श्वतꣳ श्रोणितꣳ शितामतऽउत्सादतोऽङ्गादङ्गादवत्तानां करतऽएवाश्विना जुषेतांꣳ हविर्होतर्यज ॥ ४३ ॥

अर्थ—दैवी होता अश्विनीकुमारांचा याग करो. ते छागसंबंधीं हवि भक्षण करते झाले व त्यांनीं आज उदरांतून काढलेलें वपारूपी मेद भक्षण केलें. (आतां वपेच्या उद्धरणाचा प्रकार सांगतात.) यज्ञाचा द्वेष करणारे असुर व राक्षस पराभव करण्यास येण्यापूर्वी व ऋत्विजांकरितां घेतलेल्या इडेचे पूर्वी ती वपा उदरांतून काढली आहे. ते अश्विनीकुमार प्रत्येक घासांत रुच्युत्पादक, मांसमय व अन्न ज्यांत विशेष आहे अशीं, स्वतः क्षरण पावणारीं, असंख्य मंत्रांनीं स्तुत, पाकसमयीं अग्नीनें भक्षिलेलीं स्थूलांग समीप असलेलीं, पार्श्व, कटि, बाहु, यकृत्, योनिप्रदेश व प्रत्यंग-प्रदेश व छेदनस्थानांपासून अवदानरूपानें घेतलीं गेलेलीं जीं अंगें त्यांचें निश्चयानें भक्षण करतात व त्यायोगें त्यांची तृप्ति होते. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ४३ ॥

होता यक्षत्सरस्वतीं मेषस्य हविषऽआवयदग्नेमध्यतो मेदऽउद्भृतं पुरा द्वेषोभ्यऽ पुरा पौरुषेय्या गृभो घसत्सूनं घासेऽअज्राणां यवसप्रथमानाꣳ सुमत्क्षराणाꣳ शतरुद्रियाणामग्निष्वात्तानां पीवोपवसनानां पार्श्वतऽ श्रोणितऽ शितामतऽउत्सादतोऽङ्गादङ्गादवत्तानां करदेवऽ सरस्वती जुषतांꣳ हविर्होतर्यज ॥ ४४ ॥

अर्थ—दैवी होता सरस्वतीचा याग करो. ती मेषसंबंधीं हवी भक्षण करिती झाली व तिनें आज उदरांतून काढलेलें वपारूपी मेद भक्षण केलें. यज्ञाचा द्वेष करणारे असुर व राक्षस पराभव करण्यास येण्यापूर्वी व ऋत्विजाकरितां घेतलेल्या इडेच्या पूर्वी ती वपा उदरांतून काढली आहे. ते अश्विनीकुमार प्रत्येक घासांत रुच्युत्पादक मांसमय व अन्न ज्यांत विशेष आहे ती सरस्वतीदेवी प्रत्येक घासास रुच्युत्पादक मांसमय व अन्न ज्यांत विशेष आहे अशीं स्वतः क्षरण पावणारीं असंख्य मंत्रांनीं स्तुत, पाकसमयीं अग्नीनें भक्षिलेलीं, स्थूलांग समीप असलेलीं पार्श्व, कटि, बाहु, यकृत्, योनिप्रदेश, व प्रत्यंगप्रदेश व छेदन स्थानांपासून अवदान रूपानें घेतलीं गेलेलीं जीं अंगें त्यांचें निश्चयानें भक्षण करिते व त्यायोगें तिची तृप्ति होते. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ४४ ॥

होता यक्षदिन्द्रमृषभस्य हविषऽआवयदग्नेमध्यतो मेदऽउद्भृतं पुरा द्वेषोभ्यऽ पुरा पौरुषेय्या गृभो घसत्सूनं घासेऽअज्राणां यवसप्रथमानाꣳ सुमत्क्षराणाꣳ शतरुद्रियाणामग्निष्वात्तानां पीवोपवसनानां पार्श्वतऽ श्रोणितऽ शितामतऽउत्सादतोऽङ्गादङ्गादवत्तानां करदेवमिन्द्रो जुषतांꣳ हविर्होतर्यज ॥ ४५ ॥

अर्थ—दैवी होता इंद्राचा याग करो. तो वृषभसंबंधीं हवि भक्षण करिता झाला व त्यानें आज उदरांतून काढलेलें वपारूपी मेद भक्षण केलें. यज्ञाचा द्वेष करणारे असुर व राक्षस पराभव करण्यास येण्यापूर्वी व ऋत्विजांकरितां घेतलेल्या इडेचे पूर्वी ती वपा उदरांतून काढली आहे अशीं स्वतः क्षरण पावणारीं, असंख्य मंत्रांनीं स्तुत स्थूलांग समीप असलेलीं पार्श्व, कटि, बाहु, यत्कृत् योनिप्रदेश, व प्रत्यंग-प्रदेश व छेदन स्थानांपासून अवदान रूपानें घेतलीं गेलेलीं जीं अंगें त्यांचें निश्चयानें भक्षण करितो व त्यायोगें त्याची तृप्ति होते. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ४५ ॥

विनियोग—वनस्पति याग व स्विष्टकृत्याग यांतील प्रैष या मंत्रानें सांगितले आहेत.

होता यक्षद्वनस्पतिꣳसभि हि पिष्टतमया रभिष्ठया रशनयार्धित । यत्राश्विनोश्छागस्य हविषः प्रिया धामानि यत्र सरस्वत्या मेषस्य हविषः प्रिया धामानि यत्रेन्द्रस्यऽऋषभस्य हविषः प्रिया धामानि यत्राग्नेः प्रिया धामानि यत्र सोमस्य प्रिया धामानि यत्रेन्द्रस्य सुत्राम्णः प्रिया धामानि यत्र सवितुः प्रिया धामानि यत्र वरुणस्य प्रिया धामानि यत्र वनस्पतेः प्रिया पाथाꣳसि यत्र देवानामाज्यपानां प्रिया धामानि यत्राग्नेर्होतुः प्रिया धामानि तत्रैतान्प्रस्तुत्येवोपस्तुत्येवोपावस्रक्षद्रभीयसऽइव कृत्वी करदेवं देवो वनस्पतिर्जुषताꣳ हविर्होतर्यज ॥ ४६ ॥

अर्थ—दैवी होता वनस्पतीयूपाचा याग करो. कारण वनस्पति अत्यंत सुरूपी आणि समर्थ (पशूंचें नियमन करणारी) अशा रज्जूनें पशूंचें धारण करिता झाला. (आतां वनस्पतीची प्रार्थना करितात.) ज्या ठिकाणीं अधिनीकुमारांच्या छागरूपी हवींचीं, सरस्वतीच्या मेषरूपी हवींचीं व इंद्राच्या वृषभरूपी हवींचीं, तसेंच अग्नीचीं व वरुणाचीं प्रियस्थानें आहेत व सोमाचींही प्रियस्थानें आहेत. तसेंच या ठिकाणीं संरक्षक इंद्र व सविता यांचीं प्रियस्थानें, व वनस्पतींचीं प्रिय अन्नें आहेत आणि प्रयाजअनुयाजरूपी आज्यम देवांची प्रियस्थानें आहेत व ज्या ठिकाणीं होता जो अग्नि व स्विष्टकृत्याग यांचीं प्रियस्थानें आहेत. त्या ह्या छागादि पशूंना जवळ जाऊन पुनः पुनः स्तुति करून पूर्व स्थानावर स्थापन करो. वनस्पति देव असें करो व हवींचें सेवन करो. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ४६ ॥

होता यक्षद्वह्निꣳ स्विष्टकृतमयाड्ग्निरश्विनोश्छागस्य हविषः प्रिया धामान्ययाद् सरस्वत्या मेषस्य हविषः प्रिया धामान्ययाडिन्द्रस्य ऋषभस्य हविषः प्रिया धामान्ययाड्ग्नेः प्रिया धामान्ययाद् सोमस्य प्रिया धामान्ययाडिन्द्रस्य सुत्राम्णः प्रिया धामान्ययाद् सवितुः प्रिया धामान्ययाद् वरुणस्य प्रिया धामान्ययाद् वनस्पतेः प्रिया पाथाꣳस्ययाद् देवानामाज्यपानां प्रिया धामानि यक्षद्वह्नेर्होतुः प्रिया धामानि यक्षत्स्वं महिमानमायजतामेज्याऽइषः कृणोतु सोऽअध्वरा जातवेदा जुषताꣳ हविर्होतर्यज ॥ ४७ ॥

अर्थ—दैवी होता स्विष्टकृत् अग्निचा याग करो. जो स्विष्टकृत् अग्नि अश्विनीकुमारांच्या छागरूपी हवींच्या प्रियस्थानांचा याग करिता झाला व सरस्वतीच्या मेषसंबंधीं हविस्थानांचा आणि इंद्राच्या वृषभरूपी हविस्थानांचा याग करिता झाला. (ह्या प्रधानदेवता आहेत.) अग्नीचीं व सोमाचीं प्रियधामें यांचाही याग करिता झाला. (हे दोन आज्य भाग आहेत.) इंद्राच्या, सवित्याचा व वरुणाच्या प्रियस्थानांचा याग करिता झाला. (ह्या पशु पुरोडाश देवता आहेत.) वनस्पतीच्या प्रियस्थानांचा याग करिता झाला. (हें प्रधान अंग आहे). आज्यप देवांच्या प्रियस्थानांचा याग करिता झाला; (हे प्रयाजानुयाज आहेत.) व त्या अग्नीनें स्विष्टकृत अग्नीच्या अर्थात् स्वतःच्या प्रियस्थानांचा याग केला. यागार्ह व सकाम अशा प्रजा याग करोत. तो जातप्रज्ञ स्विष्टकृत् अग्नि यज्ञ संपादन करो व हवींचें सेवन करो. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ४७ ॥

विनियोग—' देवं बर्हिं ' इत्यादि अकरा ऋचा त्रिपशूंच्या अनुयाजांचे प्रैष व याज्या आहेत.

देवं बर्हिः सरस्वती सुदेवमिन्द्रेऽअश्विना । तेजो न चक्षुरक्ष्योर्बर्हिषा दधुरिन्द्रियं वसुषने वसुधेयस्य व्यन्तु यज ॥ ४८ ॥

अर्थ—उत्तम देवता युक्त जे दर्भ तद्रूपी जी अनुयाज देवता, ती त्या बर्हींनें सरस्वती व अश्विनीकुमार हे इंद्राचे ठायीं तेज स्थापन करोत व तेच इंद्राच्या नेत्रांत चक्षुरिंद्रिय स्थापन करो. अश्विनीकुमार सरस्वती व इंद्र यांनीं धन मिळविण्याकरितां व त्याच्या स्थापनाकरितां हवि भक्षण करावें. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ४८ ॥

देवीर्द्वारोऽअश्विना भिषजेन्द्रे सरस्वती । प्राणं न वीर्यं नसि द्वारो दधुरिन्द्रियं वसुवने वसुधेयस्य व्यन्तु यज ॥ ४९ ॥

अर्थ—ज्या यज्ञ गृहद्वार रूपी अनुयाज देवता आहेत; त्यांसह अश्विनीकुमार व सरस्वती इंद्राचे ठायीं बल स्थापन करो व त्याच्या नासिकेंत घ्राणेंद्रिय स्थापन करोत. अश्विनीकुमार, सरस्वती व इंद्र हे द्रव्याच्या प्राप्तीकरितां व त्याच्या स्थापनाकरितां हविर्द्रव्य भक्षण करोत. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ४९ ॥

देवीऽउषासावश्विना सुत्रामेन्द्रे सरस्वती । बलं न वाचमास्युऽउषाभ्यां दधुरिन्द्रियं वसुवने वसुधेयस्य व्यन्तु यज ॥ ५० ॥

अर्थ—जे रात्र व सूर्य प्रभारूपी अनुयाज देव आहेत; त्यांच्यासहवर्तमान अश्विनीकुमार व चांगलें रक्षण करणारी सरस्वती इंद्राचे ठायीं बल स्थापन करोत. ते इंद्राच्या मुखांत वागिंद्रिय स्थापन करोत. द्रव्याच्या लाभाकरितां व स्थापनाकरितां अश्विनीकुमार, सरस्वती आणि इंद्र हवि भक्षण करोत. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ५० ॥

देवी जोष्ट्री सरस्वत्यश्विनेन्द्रमवर्धयन् । श्रोत्रं न कर्णयोर्यशो जोष्ट्रीभ्यां दधुरिन्द्रियं वसुवने वसुधेयस्य व्यन्तु यज ॥ ५१ ॥

अर्थ—सुख सेवन करणाऱ्या द्यावा, पृथ्वीरूपी ज्या अनुयाज देवता, त्यांसह अश्विनीकुमार आणि सरस्वती यश देऊन व कर्णांत श्रोत्रेंद्रिय स्थापन करून इंद्राला वाढवित्या झाल्या. अश्विनीकुमार, सरस्वती आणि इंद्र द्रव्याच्या लाभाकरितां आणि स्थापनाकरितां हवि भक्षण करोत. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ५१ ॥

देवी ऊर्जाहुती दुघे सुदुघेन्द्रे सरस्वत्यश्विना भिषजावतꣳ । शुक्रं न ज्योतिस्तनयोराहुती धनऽइन्द्रियं वसुवने वसुधेयस्य व्यन्तु यज ॥ ५२ ॥

अर्थ—ज्या रसयुक्त व इच्छापूरक आहुतीरूपी देवता आहेत, त्यांसह अश्विनीकुमार व सरस्वती इंद्राच्या स्तनांचे ठायीं शुक्र स्थापन करून व शरीरांत बल स्थापन करून इंद्राचें रक्षण करितात. अश्विनीकुमार, सरस्वती व इंद्र द्रव्याच्या लाभाकरितां व स्थापनेकरितां हवि भक्षण करोत. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥५२॥

देवा देवानां भिषजा होतारा विन्द्रमश्विना । वषट्कारैः सरस्वती त्विषिं न हृदये मतिꣳहोतृभ्यां दधुरिन्द्रियं वसुवने वसुधेयस्य व्यन्तु यज ॥ ५३ ॥

अर्थ—देवांचे होते असे जे अनुयाज देव त्यांसह व वषट्कारांसह अश्विनीकुमार व सरस्वती इंद्राचे ठायीं कांति व त्याच्या हृदयांत बुद्धींद्रिय स्थापन करो. अश्विनीकुमार, सरस्वती व इंद्र धनाच्या लाभाकरितां व स्थापनेकरितां हवि भक्षण करोत; हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ५३ ॥

देवीस्तिस्रस्तिस्रो देवीरश्विनेडा सरस्वती । शूषं न मध्ये नाभ्यामिन्द्राय दधुरिन्द्रियं वसुवने वसुधेयस्य व्यन्तु यज ॥ ५४ ॥

अर्थ—सरस्वती, भारती व इडा या तीन देवतांसह अश्विनीकुमार व सरस्वती इंद्राचे ठायीं बल व त्याच्या नाभीचे ठायीं इंद्रिय स्थापन करोत. अश्विनीकुमार सरस्वती व इंद्र धनाच्या लाभाकरितां व स्थापनेकरितां हवि भक्षण करोत. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ५४ ॥

देवऽइन्द्रो नराशꣳ सन्त्रिवरूथꣳ सरस्वत्याश्विभ्यामीयते रथ÷ । रेतोन रूपममृतं जानिन्नमिन्द्राय त्वष्टा दधदिन्द्रियाणि वसुवने वसुधेयस्य व्यन्तु यज ॥ ५५ ॥

अर्थ—ऐश्वर्यवान्, सदो हविर्धान व अग्नीध्र या तीन ग्रहांनीं युक्त जगाचा कर्ता व ज्याचा रथ अश्विनीकुमार व सरस्वतीकडून वहन केला जातो, असा मनुष्यांनीं स्तुत अनुयाज देवतारूपी यज्ञ इंद्राकरितां वीर्य, सौंदर्य, उत्तम जन्म व इंद्रियें धारण करो. अश्विनीकुमार सरस्वती व इंद्र हे धनाच्या लाभाकरितां व स्थापनाकरितां हवि भक्षण करोत. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ५५ ॥

देवो देवैर्वनस्पतिर्हिरण्यपर्णोऽअश्विभ्याꣳ सरस्वत्या सुपिप्पलऽइन्द्राय पच्यते मधु । ओजो न जूतिर्ऋषभो न भामं वनस्पतिर्नो दधदिन्द्रियाणि वसुवने वसुधेयस्य व्यन्तु यज ॥ ५६ ॥

अर्थ—वनस्पती देव, आमचें तेज, वेग, क्रोध व इंद्रियें धारण करो. देवरूपी हिरण्यपर्णांनीं युक्त व अश्विनीकुमार आणि सरस्वतीरूपी शोभन फलांनीं युक्त असा जो पूज्य वनस्पती तो इंद्राला मधुर फल देतो. अश्विनीकुमार, सरस्वती व इंद्र द्रव्याच्या लाभाकरितां व स्थापनेकरितां हवि भक्षण करोत. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥ ५६ ॥

देवं बर्हिर्वारितीनामध्वरे स्तीर्णमश्विभ्यामूर्णम्रदाꣳ सरस्वत्या स्योन-मिन्द्र ते सद÷ । ईशायै मन्युꣳ राजानं बर्हिषा दधुरिन्द्रियं वसुवने वसुधेयस्य व्यन्तु यज ॥ ५७ ॥

अर्थ—हे इंद्रा, तुझ्या यज्ञांत अश्विनीकुमारांनीं व सरस्वतीनें जलांत उत्पन्न झालेल्या औषधींचें व ऊर्णेप्रमाणें मृदु असल्यामुळें सुखावह व प्रकाशक असे दर्भ पसरले व हे इंद्रा, अश्विनीकुमार आणि सरस्वतीनीं तुझ्या ठायीं ऐश्वर्यप्राप्तीकरितां दीप्यमान् क्रोध स्थापन केला. अश्विनीकुमार, सरस्वती व इंद्र धनाच्या लाभाकरितां व स्थापनाकरितां हवि भक्षण करोत. हे मनुष्य होत्या, तूंही याग कर ॥५७॥

देवोऽअग्निꣳ स्विष्टकृद्देवान्यक्षयथायथꣳ होतारावेन्द्रमश्विना वाचा वाचꣳसरस्वतीमग्निꣳ सोमꣳस्विष्टकृत्स्विष्टऽइन्द्रः॑ सुत्रामा सविता वरुणो भिषगिष्टो देवो वनस्पतिः॑ स्विष्टा देवाऽआज्यपाꣳ स्विष्टोऽअग्निरग्निना होता होत्रे स्विष्टकृयशो न दधदिन्द्रियभूर्जमपचितिꣳ स्वधां वसुवने वसुधेयस्य व्यन्तु यज ॥ ५८ ॥

अर्थ—उत्तम यज्ञ करणारा देव योग्य तऱ्हेनें मैत्रावरुणरूपी होते. इंद्र, अश्विनीकुमार, सरस्वती, अग्नि, सोम या देवांचा मंत्रानें याग करिता झाला व त्यानें उत्तम यज्ञ करणारा सुरक्षक इंद्र, सविता भिषक म्हणजे वैद्य, वरुण, वनस्पती देव, प्रयाजानुयाज देव यांचा याग केला तसेंच भूमीवरील हविर्द्रव्यानें अधिष्ठातृ अशा अग्नीचाही याग केला. दैवी होत्यानें मनुष्यरूपी होत्याला यश, इंद्रिय, अन्न, पूजा व पितरांचें अन्न द्यावें. अश्विनीकुमार, सरस्वती व इंद्र द्रव्याच्या लाभाकरितां आणि स्थापनाकरितां हवि भक्षण करोत. मनुष्य होत्या, तूंहि याग कर ॥ ५८ ॥

विनियोग—अग्निमग्य इत्यादि तीन ऋचा सूक्तवाक प्रैष आहेत.

अग्निमग्य होतारमवृणतायं यजमानꣳ पचन्पक्तीꣳ पचन्पुरोडाशान्बध्नन्नश्विभ्यां छागꣳ सरस्वत्यै मेषमिन्द्रायऽऋषभꣳ सुन्वन्नश्विभ्याꣳ सरस्वत्याऽइन्द्राय सुत्राम्णे सुरासोमान् ॥ ५९ ॥

अर्थ—या यजमानानें आज सामान्यतः शिजविण्यास योग्य अशीं हविर्द्रव्यें व विशेषतः पुरोडाश शिजविले आणि त्यानें अश्विनीकुमारांकरितां छाग, सरस्वतीकरितां मेष यूपाला बांधले व अश्विनीकुमार, सरस्वती आणि रक्षक इंद्र यांच्याकरितां सुरेसहित सोमाचें कंडण केलें व अग्निरूपी होत्याचें वरण केलें. म्हणजे अग्नीला होता ऋत्विज बनविला. ॥ ५९ ॥

सूपस्थाऽअग्य देवो वनस्पतिरभवदश्विभ्यां छागेन सरस्वत्यै मेषेणेन्द्रायऽऋषभेणाक्षँस्तान्मेदस्तः॑ प्रति पचताꣳभीषतावीवृधन्त पुरोडाशैरपुरश्विना सरस्वतीन्द्रः॑ सुत्रामा सुरासोमान् ॥ ६० ॥

अर्थ—आज यूपरूपी वनस्पती देव छागांनीं अश्विनीकुमारांची, मेषानें सरस्वतीची व वृषभानें इंद्राची सेवा करिता झाला. कारण अश्विनीकुमार, सरस्वती व इंद्र हे छाग, मेष व वृषभांना वपेपासून आरंभ करून भक्षण करिते झाले; व शिजवून

त्यानें त्यांचीं अवदानें घेतलीं. व पुन्हां ते पुरोडाशानें वृद्धि प्राप्त करिते झाले. अश्विनीकुमार, सरस्वती व पालक असा इंद्र हे सुरायुक्त सोमपान करिते झाले॥६०॥

त्वामयऽऋषऽआर्षेयऽऋषीणां नपादवृणीतायं यजमानो बहुभ्यऽआ सङ्गतेभ्यऽएष मे देवेषु वसु वार्याय॑क्ष्यतऽइति ता षा देवा देव दानान्य-दुस्तान्यस्माऽआ च शास्त्वा च गुरस्वोषितश्च होतरसि भद्रवाच्याय प्रेषितो मानुषऽ सूक्तवाकाय सूक्ता ब्रूहि ॥ ६१ ॥

अर्थ—(दैवी होता अग्नीला म्हणतात.) हे मंत्रद्रष्ट्या, यजमानगोत्रानें वृत अशा ऋषिपुत्रा दैवी होत्या अग्ने, हा यजमान पुष्कळ देव आले असतांहि तुझेंच वरण करिता झाला. कारण कीं, त्याला असें वाटलें तूंच देवांला देण्यास योग्य असें द्रव्य ग्रहण करशील. आतां हे अग्ने, जीं दानें देवांनीं दिलीं असतील तीं या यजमानाला दे अथवा देण्याचा उपक्रम कर. हे होत्या, तूं चांगलें बोलण्याकरितां पाठविला गेला आहेस. तूं चांगलीं वाक्यें बोल. हा मनुष्यहोता देखील चांगलीं वाक्यें बोलण्याकरितां पाठविला गेला आहे ॥ ६१ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**
माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** एकविंशोऽध्यायः समाप्तः॥२१॥

इति एकविंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥



विनियोग—यानंतर चार अध्यायांत अश्वमेध यज्ञाचे मंत्र सांगितले आहेत. 'तेजोऽसि' या मंत्राचा 'पाहि' पर्यंतचा भाग अध्वर्यूनें यजमानाच्या गळ्यांत सुवर्णनिर्मित निष्कनामक आभरण बांधीन असतां त्याजकडून म्हणवावा. नंतर 'देवस्य त्वा' पासून आरपन्तीपर्यंतच्या मंत्रभागानें अश्वबन्धनार्थ दर्भमय रज्जु घेऊन 'ब्रह्मन्नश्वमित्यादि तेन राध्यासम्' येथपर्यंतच्या मंत्रानें अध्वर्यूनें हस्तबंधना-विषयीं ब्रह्म्याची आज्ञा मागावी. नंतर 'तं बधान' या मंत्रानें ब्रह्म्यानें आज्ञा दिल्यावर अध्वर्यूनें 'अभिधा असि, इत्यादि प्रजापतये' इत्यन्त मंत्रानें रज्जूनें अश्वबंधन करावें.

तेजोऽसि शुक्रमस्यमृतमायुष्पाऽआयुर्मे पाहि । देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्यामाददे ॥ १ ॥

अर्थ—हे सुवर्णाभरणा, तूं तेजस्वी, शुद्ध व अमृतस्वरूपी आहेस व आयुष्याचें रक्षण करणारे आहेस म्हणून प्रेरक अशा सवित्याच्या आज्ञेनें अश्विनीकुमाराच्या बाहूंनीं व पूष्याच्या हातांनीं मी तुझें ग्रहण करतों ॥ १ ॥

इमामगृभ्णन्रशनामृतस्य पूर्वऽआयुषि विदथेषु कव्या । सा नोऽअस्मिन्सुतऽआबभूव ऋतस्य सामन्सरमाऽऽरपन्ती ॥ २ ॥

अर्थ—यज्ञाच्या आरंभी यज्ञप्रसार होवो असें म्हणणारी ती रशना (रज्जु) आमच्या यज्ञांत उत्पन्न झाली जिचें यज्ञकुशल प्रजापति प्रभृतींनीं आपल्या यज्ञाच्या आरंभीं ग्रहण केलें ॥ २ ॥

अभिधाऽअसि भुवनमसि यन्तासि धर्ता । स त्वमग्निं वैश्वानरꣳ सप्रथसं गच्छ स्वाहाकृतꣳ ॥ ३ ॥

अर्थ—हे अश्वा, तूं स्तुति केला गेलेला, सर्वांचा आश्रयभूत, नियमनकर्ता व जगाचा धारण करणारा आहेस, अशा तुझा स्वाहाकारानें हुत झाल्यावर तूं सर्वलोक-हितकारी व वर, खालीं आणि सर्व बाजूला जाणाऱ्या अग्नीकडे गमन कर ॥ ३ ॥

स्वगा त्वा देवेभ्यः÷ प्रजापतये ब्रह्मन्नश्वं भन्त्स्यामि देवेभ्यः÷ प्रजापतये तेन राध्यासम् । तं बधान देवेभ्यः÷ प्रजापतये तेन राध्नुहि ॥ ४ ॥

अर्थ—हे अश्वा, देवाकरितां व प्रजापतीकरितां त्यांचेकडे तूं स्वतः गमन करशील असें करतों. हे ब्रह्मन्या, मी देवाकरितां व प्रजापतीकरितां अश्वबंधन करितों. त्यायोगें माझी कर्मसमाप्ति होवो. हे अध्वर्यो, तुझ्या इच्छित घोडयाला देवाकरितां व प्रजापतीकरितां बांध, त्यायोगें तुझी कर्मसमाप्ति होवो ॥ ४ ॥

विनियोग—नंतर अध्वर्यूनें तलावाजवळ वगैरे जाऊन तेथील पाण्यानें 'प्रजापतये त्वा' इत्यादि पांच मंत्रभागांनीं अश्वाचें सिंचन करावें. नंतर त्यानें 'यो अर्वन्तम्' हा मंत्रभाग यजमानाकडून म्हणवावा. मारलेल्या चार डोळ्याच्या कुत्र्याला वेताचे चटईवर धरून घोड्याचे खालीं पाण्यांत धरावा.

प्रजापतये त्वा जुष्टं प्रोक्षामीन्द्राग्नीभ्यां त्वा जुष्टं प्रोक्षामि वायवे त्वा जुष्टं प्रोक्षामि विश्वेभ्यस्त्वा देवेभ्यो जुष्टं प्रोक्षामि सर्वेभ्यस्त्वा देवेभ्यो जुष्टं प्रोक्षामि । योऽअर्वन्तं जिघांꣳसति तमभ्यमीति वरुणꣳ परो मर्तः÷ परꣳ श्वा ॥ ५ ॥

अर्थ—हे अश्वा, मी प्रीत अशा तुझें प्रजापति, इंद्राग्नि, वायु, विश्वेदेव व सर्व देव यांकरितां प्रोक्षण करतों. जो घोड्याला मारण्याची इच्छा करतो त्याचा वरुण नाश करतो. तो अश्वहननेच्छु मनुष्य व कुत्रा पराभूत झाला म्हणजे अश्वहिंसक मनुष्याचा कुत्र्याप्रमाणें तिरस्कार केला गेला ॥ ५ ॥

विनियोग—नंतर सरोवरादि जलांपासून अश्व अग्नीचे जवळ आणावा आणि जुहूनें घृताच्या 'अग्नये स्वाहा' वगैरे मंत्रांनीं ९ हा आहुति द्याव्यात.

अग्नये स्वाहा सोमाय स्वाहापां मोदाय स्वाहा सवित्रे स्वाहा वायवे स्वाहा विष्णवे स्वाहेन्द्राय स्वाहा बृहस्पतये स्वाहा मित्राय स्वाहा वरुणाय स्वाहा ॥ ६ ॥

अर्थ—१ अग्नि २ सोम ३ जलांना आनन्द देणारा ४ सविता ५ वायु ६ व्यापक विष्णु ७ इन्द्र ८ बृहस्पति ९ मित्र व १० वरुण या देवतांना हें हवि सुहुत असो ॥ ६ ॥

विनियोग—'हिङ्काराय स्वाहा' इत्यादि मंत्रांनीं दक्षिणाग्नीमध्यें ४९ प्रक्रमसंज्ञक आहुतींचा होम करावा. अश्वाच्या एकूणपन्नास क्रिया आहेत.

हिङ्कारायꣳ स्वाहा हिङ्कृतायꣳ स्वाहा क्रन्दतेꣳ स्वाहाऽवक्रन्दायꣳ स्वाहा प्रोथतेꣳ स्वाहा प्रप्रोथायꣳ स्वाहा गन्धायꣳ स्वाहा घ्रायꣳ स्वाहा निविष्टायꣳ स्वाहोपविष्टायꣳ स्वाहा संदितायꣳ स्वाहा वल्गतेꣳ स्वाहा सीमायꣳ स्वाहा शयानायꣳ स्वाहा स्वपतेꣳ स्वाहा जाग्रतेꣳ स्वाहा कूजतेꣳ स्वाहा प्रबुद्धायꣳ स्वाहा विजृम्भमाणायꣳ स्वाहा विचृतायꣳ स्वाहा सꣳ हानायꣳ स्वाहोपस्थितायꣳ स्वाहायतनायꣳ स्वाहा प्रायणायꣳ स्वाहा ॥ ७ ॥

अर्थ—१ हिंकार २ हिंकृत ३ खिंकाळणें ४ खालीं तोंड करून खिंकाळणें ५ फुरफुरणें ६ नाक फुगविणें ७ वास घेणें ८ हुंगणें ९ खालीं बसणें १० पाय पसरून बसणें ११ पायानें जमीन खणणें १२ शब्द करणें १३ बसणें १४ ऐसपैस निजणें १५ सामान्यतः पाय पसरून निजणें १६ जागणें १७ कुजबुज करणें १८ पूर्ण जागें होणें १९ जांभई घेणें २० प्रकाशित होणें २१ शरीर आवरणें २२ स्वस्थ उभें राहणें २३ गमन करणें २४ विशेषेंकरून गमन करणें ॥ ७ ॥

यतेꣳ स्वाहा धावतेꣳ स्वाहोद्द्रावायꣳ स्वाहोद्द्रुतायꣳ स्वाहा शूकारायꣳ स्वाहा शूकृतायꣳ स्वाहा निषण्णायꣳ स्वाहोत्थितायꣳ स्वाहा जवायꣳ स्वाहा बलायꣳ स्वाहा विवर्तमानायꣳ स्वाहा विवृत्तायꣳ स्वाहा विधून्वानायꣳ स्वाहा विधूतायꣳ स्वाहा शुश्रूषमाणायꣳ स्वाहा शृण्वतेꣳ स्वाहेक्षमाणायꣳ स्वाहेक्षितायꣳ स्वाहा वीक्षितायꣳ स्वाहा निमेषायꣳ स्वाहा यदत्तिꣳ तस्मैꣳ स्वाहा यत्पिबतिꣳ तस्मैꣳ स्वाहा यन्मूत्रꣳ करोतिꣳ तस्मैꣳ स्वाहा कुर्वतेꣳ स्वाहा कृतायꣳ स्वाहा ॥ ८ ॥

अर्थ—२५ गमन करणें २६ धावणें २७ उसळून धावणें २८ अधिक उड्या मारणें २९ शू शू करणें ३० शू शू केलेलें असणें ३१ बसून राहणें ३२ उठून उभें राहणें ३३ वेगयुक्त असणें ३४ बलयुक्त असणें ३५ अंगाला आळेपिळे घेणें ३६ अंगाला आळेपिळे घेतलेले असणें ३७ शरीराला कंप आणणें ३८ शरीराला कंप आलेला असणें ३९ ऐकण्याची इच्छा करणें ४० ऐकणें ४१ पाहणें ४२ पाहिलेलें असणें ४३ विशेषेंकरून पाहिलेलें असणें ४४ पांपण्या लावणें ४५ जें कांहीं खाणें ४६ जें कांहीं पिणें ४७ मूत्र करणें ४८ जें कांहीं करणें व ४९ जें कांहीं केलेलें असणें या सर्व क्रियांना हें हवि, सुहुत असो ॥ ८ ॥

विनियोग—या पुढील सहा ऋचा याज्यानुवाक्या आहेत.

तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः÷ प्रचोदयात् ॥९॥

अर्थ—प्रकाशक, सर्व प्रेरक व आदित्यान्तर्गत ब्रह्मपुरुषाचें जें श्रेष्ठ व सर्व पापनाशक तेज त्याचें आम्ही ध्यान करतों. तें आम्हाला चांगली बुद्धि देवो ॥ ९ ॥

हिरण्यपाणिमूतये सवितारमुपह्वये । स चेत्ता देवता पदम् ॥ १० ॥

अर्थ—मी सुवर्णमय हस्ताच्या सवित्याला रक्षणाकरितां बोलवतों कारण कीं तो सविता देव सर्वज्ञ व ज्ञान्यांचें स्थान आहे ॥ १० ॥

देवस्य चेततो महीं प्र सवितुर्हवामहे । सुमतिꣳ सत्यराधसम् ॥ ११ ॥

अर्थ—आम्ही ज्ञात्या सवितृदेवाच्या चांगल्या बुद्धीची प्रार्थना करतों ती मोठी व सत्य साधणारी आहे ॥ ११ ॥

सुष्टुतिꣳ सुमतीवृधो रातिꣳ सवितुरीमहे । प्रदेवाय मतीविदे ॥ १२ ॥

अर्थ—आम्ही सवितृदेवाच्या चांगल्या बुद्धीची व दानाची स्तुति करतों. तो चांगली बुद्धि वाढविणारा व सर्वांची मति जाणणारा आहे ॥ १२ ॥

रातिꣳ सत्पतिं महे सवितारमुपह्वये । आसवं देववीतये ॥ १३ ॥

अर्थ—मी देवांच्या संतोषाकरितां सवितृदेवाला बोलावतों व त्याची पूजा करतों. तो दान देणारा, साधूंचा पालक व सन्मुख येऊन कर्मांची आज्ञा देणारा असा आहे ॥ १३ ॥

देवस्य सवितुर्मतिमासवं विश्वदेव्यम् । धिया भगं मनामहे ॥ १४ ॥

अर्थ—आम्ही आपल्या बुद्धीनें सवितृदेवाच्या बुद्धीप्रत धन मागतों म्हणजे त्याची बुद्धि आम्हाला धन देण्यास प्रवृत्त होवो. तें धन आम्हांला सर्वांना आज्ञा करण्याचें सामर्थ्य देणारें व सर्व देवांना संतोष देणारें आहे ॥ १४ ॥

विनियोग—या पुढील तीन ऋच्या स्विष्टकृताच्या पुरोऽनुवाक्य आहेत.

अग्निꣳस्तोमेन बोधय समिधानोऽअनर्त्यम् । हव्या देवेषु नो दधत् ॥ १५ ॥

अर्थ—हे अध्वर्यो, तूं मृत्युरहित अग्नीला प्रदीप्त करून स्तुतीनें आपल्या मनांतील अभिप्राय कळव. हें त्याला कळल्यावर तो आमचीं हविर्द्रव्यें देवांप्रत नेवो ॥ १५ ॥

स हव्यवाडमर्त्यऽउशिग्दूतश्चनोहितः । अग्निर्धिया समृण्वति ॥ १६ ॥

अर्थ—तो अग्नि हवि देण्याकरितां बुद्धीनें देवांशीं संयुक्त होतो. तो हविर्द्रव्यें धारण करणारा, मृत्युरहित, सर्वांना प्रिय, देवांचा दूत व हविर्द्रव्यरूपी अन्न भक्षण करण्याकरितां स्थापन केलेला आहे ॥ १६ ॥

अग्निं दूतं पुरो दधे हव्यवाहमुप ब्रुवे । देवाँ२ ॥ आसादयादिह ॥१७॥

अर्थ—मी ज्या अग्नीचें अग्रभागीं स्थापन करतों त्याला मी असें म्हणतों कीं हे अग्ने, या यज्ञांत तूं देवांचें स्थापन कर. तो अग्नि देवांचा दूत व हविर्द्रव्यें वहन करकरा आहे ॥ १७ ॥

विनियोग—या ऋचेंत पवमान स्तुति आहे.

अजीजनो हि पवमान सूर्यं विधारे शक्मना पयः । गोजीरया रꣳहमाणः पुरन्ध्या ॥ १८ ॥

अर्थ—हे पवमाना, तूं सूर्याला उत्पन्न केलेंस व गाईची जीविका चालावी म्हणून आपल्या शक्तीनें वृष्टीकरितां विशेषेंकरून जलांना धारण करितोस. तूं धारेनें गमन करणारा आहेस म्हणजे दशापवित्रानें तूं द्रोणकलशाकडे जातोस. ॥ १८ ॥

विनियोग—अध्वर्यु व यजमानानें 'विभूर्मात्रा' या मंत्राचा घोड्याच्या उजव्या कानांत जप करावा. नंतर ' देवा आशापाला ' या मंत्रभागानें घोड्याच्या रक्षकांना आज्ञा करावी, नंतर ' इहरंतिः ' या मंत्रभागानें आहवनीय अग्नींत चार धृतिसंज्ञक आहुतींचा होम करावा.

विभूर्मात्रा प्रभूः पित्राश्वोऽसि हयो स्यत्योऽसि मयोऽस्यर्वासि सप्तिरसि वाज्यसि वृषासि नृमणाऽअसि । ययुर्नामासि शिशुर्नामास्यादित्यानां पत्वान्विहि देवाऽआशापालाऽएतं देवेभ्योऽश्वं मेधाय प्रोक्षितꣳ रक्षते रन्तिरिह रमतामिह धृतिरिह स्वधृतिः स्वाहा ॥ १९ ॥

अर्थ—हे अश्वा, तूं पृथ्वीपासून व द्युलोकापासून समर्थ झाला आहेस. तुझें नांव अश्व म्हणजे व्याप्त करणारा, हय म्हणजे गमन करणारा, अत्य म्हणजे सतत गमन करणारा, मय म्हणजे सुखस्वरूपी, अर्वा म्हणजे शत्रुनाशक, वाजी म्हणजे पक्षयुक्त, वृषा म्हणजे वीर्यसिंचक, नृमणा म्हणजे यजमानांकडे लक्ष देणारा व ययु

म्हणजे अत्यंत गमन करणारा व सिंधु म्हणजे स्तुत्य अशा नांवाचा आहेस. या सर्व नावांनीं विशिष्ट असा तूं आदित्य देवांच्या मार्गाप्रत गमन कर म्हणजे आदित्य ज्या मार्गानें जातात त्या मार्गानें जा. हे दिक्पाल देवतांनो, यज्ञाकरितां प्रोक्षणानें संस्कृत केलेल्या या घोड्याचें तुम्ही रक्षण करा. (घोड्याचें रक्षण करणारें राजपुत्रच या ठिकाणीं आशापाल देव समजावयाचे.) हे अश्वा, तूं रममाण हो. हे अश्वा, या ठिकाणीं तुझें रमण असो. या ठिकाणीं तूं रममाण हो. या ठिकाणीं तुझा संतोष असो व या यज्ञांत तुझें स्वतःचें धारण असो. हें हवि, सुहुत असो ॥ १९ ॥

विनियोग—' सप्ताहं प्रचारंति ' या श्रुतीवरून सात दिवस दीक्षणीया इष्टि करावी. ' काय स्वाहा ' इत्यादि ऋचेमध्यें सात त्रिकें आहेत त्यापैकीं सात दिवस क्रमानें एक एक त्रिकाचा होम करावा.

काय॒ स्वाहा॒ कस्मै॒स्वाहा॑ कत॒मस्मै॒ स्वाहा॒ स्वाहा॒धिमा॑धीताय॒ स्वाहा॒ मन॑ः प्र॒जाप॑तये॒ स्वाहा॑ चि॒त्तं वि॒ज्ञाता॑यादि॑त्यै॒ स्वाहादि॑त्यै म॒ह्यै स्वाहादि॑त्यै सुमृडी॒कायै॒ स्वाहा॒ सर॑स्वत्यै॒ स्वाहा॒ सर॑स्वत्यै पाव॒कायै॒ स्वाहा॒ सर॑स्वत्यै बृह॒त्यै स्वाहा॑ पू॒ष्णे स्वाहा॑ पू॒ष्णे प्र॑प॒थ्या॑य॒ स्वाहा॑ पू॒ष्णे न॒रंधि॑षाय॒ स्वाहा॒ त्वष्ट्रे॒ स्वाहा॒ त्वष्ट्रे॑ तु॒रीपा॑य॒ स्वाहा॒ त्वष्ट्रे॑ पुरु॒रूपा॑य॒ स्वाहा॒ विष्ण॑वे॒ स्वाहा॒ विष्ण॑वे नि॒भूय॑पाय॒ स्वाहा॒ विष्ण॑वे शिपिवि॒ष्टाय॒ स्वाहा॑ ॥ २० ॥

अर्थ—१ प्रजापति २ प्रजापति ३ प्रजापतिश्रेष्ठ यांना हें हवि, सुहुत असो ॥१॥ १ आधान २ आधानप्राप्त ३ मनाचे ठिकाणीं प्रवृत्त झालेला, व सर्वांचे चित्तांचा साक्षी जो प्रजापति त्याला हें हवि, सुहुत असो ॥ २ ॥ अखंडित अदिति, पूज्य अदिति आणि सुखदात्री अदिति यांना हें हवि, सुहुत असो. ॥ ३ ॥ वाग् अधिष्ठात्री सरस्वती, शोधक सरस्वती, आणि महासरस्वती यांना हें हवि सुहुत असो. ॥ ४ ॥ प्रगत मार्गांत असलेला पूषा, उदयानें मनुष्याला शब्द करणारा पूषा व पूषा यांना हें हवि सुहुत असो. ॥ ५ ॥ तासणारा त्वष्टा, वेग रक्षक त्वष्टा याला हें हवि सुहुत असो. ॥ ६ ॥ व्यापक विष्णु, मत्स्यादि अवतारद्वारा विशेषेंकरून रक्षण करणारा विष्णु व प्राण्यांत प्रविष्ट होणारा विष्णु यांना हें हवि सुहुत असो ७ ॥ २० ॥

विनियोग--सातव्या दीक्षणीय इष्टीचा हा विशेष आहे कीं चार औदुंबर आहुतींचा होम करावयाचा त्यांचे ऐवजीं सहा आग्नेय आहुतींचा आकूति प्रयुजं अग्नि॰ स्वाहा या मंत्रानें होम करून आश्वमेधिक तीन आहुतींचा होम झाल्यावर 'विश्वो देवस्य' या मंत्रानें दहाव्या औदुंबर आहुतीचा होम करावा.

विश्वो देवस्य नेतुर्मर्तो वुरीत सख्यम्। विश्वो रायऽइषुध्यति द्युम्नं वृणीत पुष्यसे स्वाहा ॥ २१ ॥

अर्थ—सगळे लोक फलदायी व प्रकाशक अशा सवित्याच्या मैत्रीची इच्छा करितात व ते धनाकरितां आणि स्वप्रजापालनार्थ अन्नाकरितां ज्याची प्रार्थना करितात अशा त्या प्रेरक सूर्याला हें हवि सुहुत असो. ॥ २१ ॥

विनियोग—अध्वर्यूनें 'आब्रह्मन्' या मंत्राचा जप करावा.

आ ब्रह्मन्ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायतामा राष्ट्रे राजन्युः शूरऽइषव्योऽतिव्याधी महारथो जायतां दोग्ध्री धेनुर्वोढानड्वानाशुः सप्तिः पुरन्धिर्योषा जिष्णू रथेष्ठाः सभेयो युवास्य यजमानस्य वीरो जायतां निकामे निकामे नः पर्जन्यो वर्षतु फलवत्यो न ओषधयः पच्यन्तां योगक्षेमो नः कल्पताम् ॥ २२ ॥

अर्थ—हे ब्रह्मदेवा आमच्या राष्ट्रांत यज्ञाध्ययनशील ब्राह्मण उत्पन्न होवो, पराक्रमी बाणकुशल शत्रूंचा वेध करणारा, महारथी (एकटा दहा हजार योध्यांबरोबर युद्ध करणारा) असा क्षत्रिय उत्पन्न होवो, दुग्ध देणारी धेनु, शकटवहन करणारा वृषभ, शीघ्रगामी अश्व, व सर्वगुणसंपन्न शरीर धारण करणारी स्त्री उत्पन्न होवो. तसेंच रथावर बसणारा, युद्धेच्छु व जयशील पुरुष आमच्या राष्ट्रांत उत्पन्न होवो. या यजमानाला तरुण व सभेंत बसण्यास योग्य असा वीरपुत्र होवो. आणि आमच्या राष्ट्रांत आम्ही जेव्हां जेव्हां इच्छा करू तेव्हां मेघ वृष्टि करोत. फलयुक्त औषधी स्वतः परिपक्व होवोत आणि आमचा योगक्षेम उत्तम रीतीनें चालो. (*योग म्हणजे अप्राप्त वस्तूंचा लाभ व क्षेम म्हणजे प्राप्त वस्तूचें परिपालन*) ॥ २२ ॥

विनियोग—पुढील बारा मंत्रांनीं आज्यादिकांच्या आहुति उत्तर वेदीवरील अग्नींत द्याव्या.

प्राणाय स्वाहाऽपानाय स्वाहा व्यानाय स्वाहा चक्षुषे स्वाहा श्रोत्राय स्वाहा वाचे स्वाहा मनसे स्वाहा ॥ २३ ॥

अर्थ—प्राण, अपान, व्यान, चक्षु, श्रोत्र, वाणी आणि मन या इंद्रिय देवतांना हें हवि सुहुत असो ॥ २३ ॥

प्राच्यै दिशे स्वाहार्वाच्यै दिशे स्वाहा दक्षिणायै दिशे स्वाहार्वाच्यै दिशे स्वाहा प्रतीच्यै दिशे स्वाहार्वाच्यै दिशे स्वाहोदीच्यै दिशे स्वाहार्वाच्यै दिशे स्वाहोर्ध्वायै दिशे स्वाहार्वाच्यै दिशे स्वाहार्वाच्यै दिशे स्वाहार्वाच्यै दिशे स्वाहा ॥ २४ ॥

अर्थ—प्राची, अर्वाची, दक्षिणा, प्रतीची (पश्चिमा), उत्तर, ऊर्ध्व व अधः या दिग्देवतांना हें हवि सुहुत असो (या ठिकाणीं अर्वाची या दिग्देवतेची बरेच वेळां पुनरुक्ति झाली आहे.) ॥ २४ ॥

अद्भ्यः स्वाहा वार्भ्यः स्वाहोदकाय स्वाहा तिष्ठन्तीभ्यः स्वाहा स्रवन्तीभ्यः स्वाहा स्यन्दमानाभ्यः स्वाहा कूप्याभ्यः स्वाहा सूद्याभ्यः स्वाहा धार्याभ्यः स्वाहार्णवाय स्वाहा समुद्राय स्वाहा सरिराय स्वाहा ॥ २५ ॥

अर्थ—अप, वार, उदक तिष्ठंती (तलावांतील न वाहणारें पाणी) स्रवन्ती (वाहणारें पाणी), स्यंदमान नदी रूपानें वाहणारे पाणी, कूप्य विहिरींतील खोल पाणी, सूद्य सहज वर काढतां येणारे पाणी, धार्य म्हणजे सहज प्राप्त होणारें जल, अर्णव म्हणजे डोहाचें पाणी, समुद्र म्हणजे समुद्राचें पाणी, सरीर म्हणजे गमन करणारे उदक या सर्व जलदेवतांना हें हवि सुहुत असो ॥ २५ ॥

वाताय स्वाहा धूमाय स्वाहाभ्राय स्वाहा मेघाय स्वाहा विद्योतमानाय स्वाहा स्तनयते स्वाहावस्फूर्जते स्वाहा वर्षते स्वाहा ववर्षते स्वाहोग्रं वर्षते स्वाहा शीघ्रं वर्षते स्वाहोद्गृह्णते स्वाहोद्गृहीताय स्वाहा प्रुष्णते स्वाहा शीकायते स्वाहा प्रुष्वाभ्यः स्वाहा ह्लादुनीभ्यः स्वाहा नीहाराय स्वाहा ॥ २६ ॥

अर्थ—वात, धूम, अभ्र, मेघ, विद्योतमान, स्तनयत्, अवस्फूर्जत्, वर्षत्, ववर्षत्, उग्र वर्षत्, शीघ्र वर्षत्, उद् गृण्हत्, उद् गृहीत, प्रुष्णत्, शीकायत्, पृष्वा, लहादुनी आणि नीहार या सर्व मेघोपयोगी देवतांना हें हवि सुहुत असो ॥२६॥

अग्नये स्वाहा सोमाय स्वाहेन्द्राय स्वाहा पृथिव्यै स्वाहान्तरिक्षाय स्वाहा दिवे स्वाहा दिग्भ्यः स्वाहाशाभ्यः स्वाहोर्व्यै दिशे स्वाहार्वाच्यै दिशे स्वाहा ॥ २७ ॥

अर्थ—अग्नि, सोम, इंद्र, पृथ्वी, अंतरिक्ष, द्युलोक, दिक्, आशा, ऊर्वादिक् व अर्वाक्दिक् या सर्व देवतांना हें हवि सुहुत असो ॥ २७ ॥

नक्षत्रेभ्यः स्वाहा नक्षत्रियेभ्यः स्वाहाहोरात्रेभ्यः स्वाहार्धमासेभ्यः स्वाहा मासेभ्यः स्वाहर्तुभ्यः स्वाहार्तवेभ्यः स्वाहा संवत्सराय स्वाहा द्यावापृथिवीभ्याꣳ स्वाहा चन्द्राय स्वाहा सूर्याय स्वाहा रश्मिभ्यः स्वाहा वसुभ्यः स्वाहा रुद्रेभ्यः स्वाहादित्येभ्यः स्वाहा मरुद्भ्यः स्वाहा विश्वेभ्यो देवेभ्यः स्वाहा मूलेभ्यः स्वाहा शाखाभ्यः स्वाहा वनस्पतिभ्यः स्वाहा पुष्पेभ्यः स्वाहा फलेभ्यः स्वाहौषधीभ्य स्वाहा ॥२८॥ शतम् १००

अर्थ—नक्षत्र, नक्षत्रिय, अहोरात्र, अर्धमास, मास, ऋतु, ऋतु संबंधी, संवत्सर, द्यावापृथ्वी, चंद्र, सूर्य, रश्मि, वसु, रुद्र, आदित्य, मरुत्, विश्वेदेव, मूल, शाखा, वनस्पती, पुष्प, फल व ओषधी या सर्व कालाधिष्टात्री देवतांना हें हवि सुहुत असो ॥ २८ ॥

पृथिव्यै स्वाहान्तरिक्षाय स्वाहा दिवे स्वाहा सूर्याय स्वाहा चन्द्राय स्वाहा नक्षत्रेभ्यः स्वाहाद्भ्यः स्वाहौषधीभ्यः स्वाहा वनस्पतिभ्यः स्वाहा परिप्लवेभ्यः स्वाहा चराचरेभ्यः स्वाहा सरीसृपेभ्यः स्वाहा ॥ २९ ॥

अर्थ—पृथ्वी, अंतरिक्ष, द्युलोक, सूर्य, चंद्र, नक्षत्र, अप, ओषधि वनस्पति, परिप्लव, चराचर, सरीसृप या लोकाधिष्ठात्री देवतांना हें हवि सुहुत असो ॥ २९ ॥

असवे स्वाहा वसवे स्वाहा विभुवे स्वाहा विवस्वते स्वाहा गणश्रिये स्वाहा गणपतये स्वाहाभिभुवे स्वाहाधिपतये स्वाहा शूषाय स्वाहा सꣳसर्पाय स्वाहा चन्द्राय स्वाहा ज्योतिषे स्वाहा मलिम्लुचाय स्वाहा दिवा पतयते स्वाहा ॥ ३० ॥

अर्थ—असु, वसु, विभू, विवस्वत्, गणश्री, गणपति, अधिभू, अधिपति, शूष, संसर्प, चंद्र, ज्योति, मलिम्लुच आणि दिवापतयत या देवतांना हें हवि सुहुत असो ॥ ३० ॥

मधवे स्वाहा माधवाय स्वाहा शुक्राय स्वाहा शुचये स्वाहा नभसे स्वाहा नभस्याय स्वाहेषाय स्वाहोर्जाय स्वाहा सहसे स्वाहा सहस्याय स्वाहा तपसे स्वाहा तपस्याय स्वाहाꣳ हसस्पतये स्वाहा ॥ ३१ ॥

अर्थ—मधु, माधव, शुक्र, शुचि, नभस्, नभस्य, इष, ऊर्ज, सहस्, सहस्य, तपस्, तपस्य व अंहस्पति या मासाधिष्ठात्री देवतांना हें हवि सुहुत असो ॥३१॥

वाजाय स्वाहा प्रसवाय स्वाहा पिजाय स्वाहा क्रतवे स्वाहा स्वꣳ स्वाहा मूर्ध्ने स्वाहा व्यश्नुविने स्वाहान्त्याय स्वाहान्त्यायꣳ भौवनाय स्वाहा भुवनस्य पतये स्वाहाधिपतये स्वाहा प्रजापतये स्वाहा ॥ ३२ ॥

अर्थ—वाज, प्रसव, अपिज, क्रतु, मूर्धन्, व्यश्नुविन्, अंत्य, अंत्यभौवन, भुवन पति, अधिपति व प्रजापति या अन्नाधिपति देवतांना हें हवि सुहुत असो ॥३२॥

आयुर्यज्ञेन कल्पताꣳस्वाहा प्राणो यज्ञेन कल्पताꣳस्वाहापानो यज्ञेन कल्पताꣳस्वाहा व्यानो यज्ञेन कल्पताꣳस्वाहोदानो यज्ञेन कल्पताꣳ स्वाहा समानो यज्ञेन कल्पताꣳस्वाहा चक्षुर्यज्ञेन कल्पताꣳस्वाहा श्रोत्रं यज्ञेन कल्पताꣳस्वाहा वाग्यज्ञेन कल्पताꣳस्वाहा मनो यज्ञेन कल्पताꣳ स्वाहात्मा यज्ञेन कल्पताꣳस्वाहा ब्रह्मा यज्ञेन कल्पताꣳस्वाहा ज्योतिर्-र्यज्ञेन कल्पताꣳस्वाहा स्वर्यज्ञेन कल्पताꣳस्वाहा पृष्ठं यज्ञेन कल्पताꣳ स्वाहा यज्ञो यज्ञेन कल्पताꣳस्वाहा ॥ ३३ ॥


अर्थ—अश्वमेध यज्ञानें आयुष्य, प्राण, अपान, व्यान, उदान, समान, चक्षु, श्रोत्र, वाक्, मन, आत्मा, ब्रह्मा, ज्योति, स्वर्ग, पृष्ठ व यज्ञ संपन्न होवो. या देवतांना हें हवि सुहुत असो ॥ ३३ ॥

एकस्मै स्वाहा द्वाभ्याꣳस्वाहा शताय स्वाहैकशताय स्वाहा व्युष्टयै स्वाहा स्वर्गाय स्वाहा ॥ ३४ ॥

अर्थ—एक, दोन, शत, एकशेएक रात्री व दिवस या देवतांना हें हवि सुहुत असो ॥ ३४ ॥

इतिश्री **पाठकोपाभिधमहामहोपाध्याय श्रीधरशास्त्रिकृते**
माध्यन्दिनीय वाजसनेयि संहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** द्वाविंशोऽध्यायः समाप्तः॥२२॥

इति द्वाविंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥



विनियोग—बावीसाव्या अध्यायांत होममंत्र सांगितलें. राहिलेले कर्म तेवीसावे अध्यायांत सांगतात. दुसरे दिवसाला उक्थ्य असें नांव आहे. त्या दिवशीं महिमनामक दोन पात्रांचें ग्रहण करावें. त्यांतील प्रथम महिमपात्राचें सुवर्णोल्लखलानें ' हिरण्यगर्भः ' हा मंत्र म्हणून ग्रहण करावें.

हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेकऽआसीत् । स दाधार पृथिवीं द्यामुतेनां कस्मै देवाय हविषा विधेम ॥ १ ॥

अर्थ—हिरण्यपुरुषरूपी ब्रह्माण्डांत गर्भरूपानें असणारा प्रजापति सर्व प्राणिसमुदायाच्या पूर्वी शरीर धारण करतां झाला. तो एकटाच पुढें उत्पन्न होणाऱ्या जगाचा स्वामी होता. तोच भूलोक, अन्तरिक्षलोक व द्युलोकाला धारण करता झाला. त्या प्रजापति देवाला आम्ही हवि देतों ॥ १ ॥

विनियोग—' एष ते योनिः ' या मंत्रभागानें पात्र स्थापन करावें. व 'यस्तेऽहन् ' या मंत्रभागानें हवन करावें.

उपयामगृहीतोऽसि प्रजापतये त्वा जुष्टं गृह्णाम्येष ते योनिः सूर्यस्ते महिमा । यस्तेऽहन्त्संवत्सरे महिमा संबभूव यस्ते वायावन्तरिक्षे महिमा संबभूव यस्ते दिवि सूर्ये महिमा संबभूव तस्मै ते महिम्ने प्रजापतये स्वाहा देवेभ्यः ॥ २ ॥

अर्थ—तूं उपयामपात्रानें गृहीत आहेस. प्रजापतीला आवडणाऱ्या अशा तुझें मी ग्रहण करतों. हे पात्रा, हें तुझें स्थान आहे व सूर्य ही तुझी शक्ति आहे. हे महिमपात्रा, जो तुझा महिमा (सामर्थ्य) प्रत्येक दिवशीं व प्रत्येक वर्षी तसेंच वायूंत व अन्तरिक्षांत आणि सूर्यांत व अन्तरिक्षांत उत्पन्न झाला त्या तुझ्या सामर्थ्याच्या, प्रजापतीच्या व सर्व देवांच्या निमित्तानें हें हवि सुहुत असो ॥ २ ॥

विनियोग—' यः प्राणतः ' या मंत्रानें द्वितीय महिमपात्राचें राजतोल्लखलानें ग्रहण करावें.

यऽ प्राणतो निमिषतो महित्वैकऽइद्राजा जगतो बभूव । यऽईशेऽअस्य द्विपदश्चतुष्पदः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ३ ॥

अर्थ—त्या प्रजापति देवतेला आम्ही हवि देतों. जो जीवनव्यापार करणाऱ्या व नेत्रांची उघडझाप करणाऱ्या अर्थात् सर्व सचेतन जगाचा मोठ्या ऐश्वर्यानें एकटाच अधिपति झाला. तसेंच तो मनुष्यादि द्विपाद प्राण्यांवर व गजवगैरे चतुष्पाद प्राण्यांवर सत्ता चालवितो ॥ ३ ॥

विनियोग—वपायागाचे शेवटी पूर्वीप्रमाणें ' यस्ते रात्री ' या मंत्रभागानें द्वितीय महिमपात्राचा होम करावा.

उपयामगृहीतोऽसि प्रजापतये त्वा जुष्टं गृह्णाम्येष ते योनिश्चन्द्रमास्ते महिमा यस्ते रात्रौ संवत्सरे महिमा संबभूव यस्ते पृथिव्यामग्नौ महिमा संबभूव यस्ते नक्षत्रेषु चन्द्रमसि महिमा संबभूव तस्मै ते महिम्ने प्रजापतये देवेभ्यः स्वाहा ॥ ४ ॥

अर्थ—हे पात्रा, तूं उपयामपात्रानें गृहीत आहेस—प्रजापतीला आवडणाऱ्या अशा तुझें मी ग्रहण करतों. चंद्र ही तुझी शक्ति आहे. हे महिमपात्रा, जो तुझा महिमा (सामर्थ्य) प्रत्येक रात्रीं व प्रत्येक वर्षी तसेंच पृथ्वीवर व अग्नींत आणि नक्षत्रांवर व चंद्रमंडलांत उत्पन्न झाला त्या तुझ्या सामर्थ्याच्या, प्रजापतीच्या व सर्व देवांच्या निमित्तानें हें हवि सुहुत असो ॥ ४ ॥

विनियोग—' युञ्जन्ति ब्रध्नम् ' या मंत्रानें रथाला अश्व जुंपावा.

युञ्जन्ति ब्रध्नमरुषं चरन्तं परि तस्थुषः । रोचन्ते रोचना दिवि ॥ ५ ॥

अर्थ—कर्म करण्याकरितां स्थित असलेले ऋत्विज् सूर्याप्रमाणें असलेल्या घोड्याला रथास जुंपतात. तो घोडा क्रोधरहित व वैदिक कर्म सिद्ध होण्याकरितां सर्वत्र गमन करणारा आहे व त्याच्या कांति आकाशांत प्रकाशित होतात ॥ ५ ॥

विनियोग—' युञ्जन्त्यस्य ' या मंत्रानें दुसरे तीन घोडे रथास जुंपावे.

युञ्जन्त्यस्य काम्या हरी विपक्षसा रथे । शोणा धृष्णू नृवाहसा ॥ ६ ॥

अर्थ—या अश्वमेधांतील घोड्याची इच्छा पूर्ण करणारे (एकट्या त्या अश्वमेधांतील घोड्याला रथ ओढतां येणार नाहीं म्हणून त्याला साहाय्य करणारे)

पक्ष्याप्रमाणें शरीर धारण करणारे (वेगवान् शरीर असलेले) रक्त वर्णाचे, प्रौढ व मनुष्यांना वहन करणारे असे घोडे ऋत्विज रथाला जुंपतात ॥ ६ ॥

विनियोग—नंतर चार घोडे जुंपलेल्या रथावर अध्वर्यू व यजमानांनीं आरोहण करावें. पुढें रथाचे घोडे तलाव वगैरे जलाशयांतील जलांत प्रवेश करतील तेव्हां ' यद्वातः ' हा मंत्र अध्वर्यूने यजमानाकडून म्हणवावा.

यद्वातोऽअपोऽअगंनीगन् प्रियामिन्द्रस्य तन्वम् । एतꣳस्तोतरनेन पथा पुनरश्वमावर्तयासि नऽ ॥ ७ ॥

अर्थ—आमचा वायुसमान वेगवान् असा घोडा पाण्यांत बराच दूर गेला आहे. तो इंद्राच्या प्रियशरीराला ओलांडून बराच दूर गेला. हे अध्वर्यो, त्याला गेल्या मार्गानें परत आण ॥ ७ ॥

विनियोग—नंतर जलप्रदेशांतून देवयजनस्थलीं (यागभूमीवर) रथ आल्यावर त्याचा आश्वमेधिक घोडा सोडावा. व राजाच्या १ महिषी २ वावाता ३ परिवृक्ता या नांवाच्या तीन पत्न्यांनीं क्रमेंकरून 'वसवस्त्वा' इत्यादि तीन मंत्रभागांनीं घोड्याच्या देहाच्या पूर्व भागाला, मध्यभागाला व पश्चाद्भागाला तूप लावावें. तदनंतर ' भूर्भुवः स्वः ' या तीन मंत्रांनीं तीनही राजपत्न्यांनीं क्रमेंकरून १०१ सोन्याचे मणि घोड्याच्या मस्तकावरील, मानेवरील केशांत व पुच्छांतील केशांत बांधावे म्हणजे महिषीनें ' भूः ' ही महाव्याहृति म्हणून अश्वाच्या मस्तकावरील केशांत १०१ सुवर्णमणि बांधावे. वावाता संज्ञक पत्नीनें मानेवरील केशांत सुवर्णाचे १०१ मणि बांधावेत व परिवृक्तेनें पुच्छांतील केशांत सुवर्णाचे १०१ मणि बांधावेत. त्यानंतर ' लाजीन् ' इत्यादि मंत्रभागानें घोड्याला रात्रीचा अवशिष्ट राहिलेला हविर्भाग द्यावा. तो न खाईल तर हविर्भाग पाण्यांत टाकावा.

वसवस्त्वाञ्जन्तु गायत्रेण छन्दसा रुद्रास्त्वाञ्जन्तु त्रैष्टुभेन छन्दसादित्यास्त्वाञ्जन्तु जागतेन छन्दसा भूर्भुवꣳ स्वुर्लाजी ३ञ्छाची ३ न्यन्ये गव्यऽ एतदक्षमत्त देवाऽएतदक्षमाद्धि प्रजापते ॥ ८ ॥

अर्थ—हे अश्वा अष्ट वसु गायत्रछन्दानें तुझें अंजन करोत म्हणजे तुला घृतानें माखोत. एकादश रुद्र त्रैष्टुभछन्दानें तुझें अंजन करोत व द्वादश आदित्य जागतछन्दानें तुझें अंजन करोत. भूर्भुवः स्वः या तीन महाव्याहृति म्हणजे तीन

लोक अगर ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य. हे देवांनो, लाजांचा समुदाय, सक्तुसमुदाय, यवसमुदाय व दूध दही वगैरे पदार्थ एतद्रूपी अन्न तुम्ही भक्षण करा. हे प्रजापते, तूं हें हविरूपी अन्न भक्षण कर ॥ ८ ॥

विनियोग—यज्ञस्तंभाच्या दक्षिणेस उत्तराभिमुख असलेल्या ब्रह्मयानें यज्ञस्तंभाच्या उत्तरेकडे दक्षिणाभिमुख असलेल्या होत्यास 'कः स्वित्' इत्यादि प्रश्न विचारावे. ब्रह्मोद्य कर्मांत होता व ब्रह्मा यांचे प्रश्न प्रतिप्रश्न या चार अनुष्टुप् छन्दांत वर्णिले आहेत.

यापुढें ब्रह्मयाची व होत्यांचीं प्रश्नोत्तरें आहेत.

कऽ स्विदेकाकी चरति कऽउ स्विज्जायते पुनः । किंऽस्विद्धिमस्य भेषजं किंवावपनं महत् ॥ ९ ॥

अर्थ—ब्रह्मयाचा प्रश्न–१ कोण एकटाच संचार करतो २ नष्ट होऊन कोण पुनः जन्माला येतो ३ थंडीचें औषध कोणतें ४ सर्व बाजूंनीं ज्यांत बीं पेरतात असें मोठें स्थल कोणतें ॥ ९ ॥

विनियोग—'सूर्य' इत्यादि मंत्रभागानें होता व ब्रह्मा हे यजमानांत ब्रह्मवर्चस्व स्थापन करतात, 'चंद्रमा' इत्यादि मंत्रभागानें आयुष्य स्थापन करतात, 'हिमस्य' इत्यादि मंत्रभागानें तेज स्थापन करतात व 'भूमिः' या मंत्रभागानें प्रतिष्ठा स्थापन करतात.

सूर्यऽएकाकी चरति चन्द्रमा जायते पुनः । अग्निर्हिमस्य भेषजं भूमिरावपनं महत् ॥ १० ॥

अर्थ—होत्यांचें उत्तर–१ सूर्य एकटा गमन करतो २ चंद्र क्षय पावून पुनः जन्माला येतो म्हणजे वाढतो. ३ अग्नि हें थंडीचें औषध आहे ४ ही पृथ्वी बीं पेरण्याचें मोठें स्थान आहे ॥ १० ॥

विनियोग—'का स्विदत्' इत्यादि मंत्रानें होता ब्रह्मयाला प्रश्न करतो.

का स्विदासीत्पूर्वचित्तिः किंऽस्विदासीद्बृहद्वयः । का स्विदासीत्पिलिप्पिला का स्विदासीत्पिशङ्गिला ॥ ११ ॥

अर्थ—१ प्रथम कशाची आठवण होते २ मोठा पक्षी कोणता ३ पिलिप्पिला कोणाला म्हणावें ४ पिशंगिला कोणाला म्हणावें. ॥ ११ ॥

विनियोग—'यौः' इत्यादि मंत्रानें ब्रह्मा होत्याला उत्तर देतो.

यौरासीत्पूर्वचित्तिरश्वऽआसीद्बृहद्वयं÷ अविरासीत्पिलिप्पिला रात्रिरासीत्पिशङ्गिला ॥ १२ ॥

अर्थ—१ प्रथम वृष्टीचें स्मरण होतें कारण ती सर्व प्राण्यांस इष्ट आहे २ अश्वमेध हा मोठा पक्षी आहे कारण पक्षी जसा ऊर्ध्व गमन करतो तसा अश्वमेध यजमानाला घेऊन वर जातो. ३ पृथ्वीस पिलिप्पिला म्हणावें. कारण ती वृष्टीनें ओली होऊन चिक्कण होते. ४ रात्रीस पिशङ्गिला (अन्तर्धान करणारी) म्हणतात कारण रात्री सर्व वस्तु अन्तर्धान पावतात ॥ १२ ॥

विनियोग—'वायुष्ट्वा' इत्यादि चार मंत्रांनीं अश्वप्रोक्षण करावें.

वायुष्ट्वा पचतैरवत्वसितग्रीवश्छागैन्यग्रोधश्चमसैः शल्मलिर्बृध्या। एष स्य राश्यो वृषा पञ्चिश्चतुर्भिरेदगन्ब्रह्माऽकृष्णश्च नोऽवतु नमोऽग्नये ॥१३॥

अर्थ—हे अश्वा, वायु पाकांनीं तुझें रक्षण करो. धूमयुक्त असल्यानें कृष्णकंठ अग्नि छागांच्या योगानें तुझें रक्षण करो. न्यग्रोधवृक्ष सोमपात्रांनीं तुझें रक्षण करो. शल्मील वृक्ष (सावरीचें झाड) वृद्धीनें तुझें रक्षण करो. हा वीर्यसिंचन करणारा, रथ ओढण्यास योग्य असा अश्व चार पादांनीं या स्थानाप्रत आला. कलंकरहित चंद्रमा आमच्या अश्वाचें रक्षण करो. अग्नीला नमस्कार असो ॥ १३ ॥

सꣳशितो रश्मिना रथꣳ सꣳशितो रश्मिना हयं÷। सꣳशितोऽअप्स्वप्सुजा ब्रह्मा सोमपुरोगवꣳ ॥ १४ ॥

अर्थ—रथ व घोडा रश्मीनें (किरणानें) सुशोभित दिसतो म्हणून हा जलोत्पन्न व दृढ शरीराचा आश्वमेधिक अश्व सोमाला पुढें करून स्वर्गावर जातो ॥१४॥

स्वयं वाजिस्तन्वं कल्पयस्व स्वयं यजस्व स्वयं जुषस्व। महिमा तेऽन्येन न संनशे ॥ १५ ॥

अर्थ—हे अश्वा, तूं आपले इच्छेप्रमाणें रूप धारण कर. (तुला स्वाराज्य आहे म्हणून) तूं स्वतः याग कर. व तूं स्वतः इष्टस्थानाला गमन कर. तुझें माहात्म्य

दुसऱ्या कोणाला व्याप्त करतां येत नाहीं. म्हणजे तुझें माहात्म्य सर्वापेक्षां अधिक आहे ॥ १५ ॥

न वाऽउऽएतन्म्रियसे न रिष्यसि देवाँ२ ॥ इदेषि पथिभिः सुगेभिः यत्रासते सुकृतो यत्र ते ययुस्तत्र त्वा देवः सविता दधातु ॥ १६ ॥

अर्थ—हे अश्वा; आम्ही तुझी हिंसा करतो यायोगें तूं मरत नाहींस व तुझा नाश होत नाहीं तर तूं उत्तम अशा देवयान मार्गोनीं देवांप्रत गमन करतोस. व ज्या लोकांत पुण्यवान् लोक राहतात व जातात त्या लोकांत सविता देव तुझें स्थापन करो ॥ १६ ॥

विनियोग—' अग्निः पशुः ' इत्यादि मंत्रानें प्रोक्षणीजल अश्वमुखांत स्थापन करावें (घालावें).

अग्निः पशुरासीत्तेनायजन्त सऽएतंल्लोकमजयद्यस्मिन्नाग्निः स ते लोको भविष्यति तं जेष्यसि पिबैताऽअपः । वायुः पशुरासीत्तेनायजन्त स एतंल्लोकमजयद्यस्मिन्वायुः स ते लोको भविष्यति तं जेष्यसि पिबैताऽअपः । सूर्यः पशुरासीत्तेनायजन्त सऽएतं लोकमं जयद्यस्मिन्सूर्यः स ते लोको भविष्यति तं जेष्यसि पिबैताऽअपः ॥ १७ ॥

अर्थ—अग्नि हा सृष्टियज्ञांत देवांचा पशु होता. देवांनीं त्या अग्निरूपी पशूचा यज्ञ केला. तो पशु बनलेला अग्नि या भूलोकाला जिंकता झाला. हे अश्वा ज्या लोकांत (भूलोकांत) अग्नि आहे तो भूलोक तुला प्राप्त होवो. तूं त्याला जिंकशील म्हणून या प्रोक्षणीजलांचें पान कर. वायु हा सृष्टियज्ञांत देवांचा पशु होता. देवांनीं त्या वायुरूपी पशूचा यज्ञ केला. तो पशु बनलेला वायु या अन्तरिक्ष लोकाला जिंकता झाला. हे अश्वा, ज्या अन्तरिक्ष लोकांत वायु आहे तो अन्तरिक्षलोक तुला प्राप्त होवो. तूं त्याला जिंकशील म्हणून या प्रोक्षणीजलाचें पान कर. सूर्य हा सृष्टियज्ञांत देवांचा पशु होता. देवांनीं त्या सूर्यरूपी पशूचा याग केला. तो पशु बनलेला सूर्य या स्वर्ग-लोकाला जिंकता झाला. हे अश्वा, ज्या स्वर्ग लोकांत सूर्य आहे तो स्वर्गलोक तुला प्राप्त होवो. तूं त्याला जिंकशील म्हणून या प्रोक्षणीजलाचें पान कर ॥ १७ ॥

विनियोग—अश्वहननाचे पूर्वी परिपशव्ये स्वाहा या आहुतीचा होम करावा व नंतर १ देवेभ्यः स्वाहा २ प्राणायः स्वाहा ३ अपानाय स्वाहा ४ व्यानाय स्वाहा

या चार आहुतींचा होम करावा. सर्व राजपत्नींना पशूंकडे नेत असतां त्यांचे कडून ' अम्बे ' इत्यादि मंत्र भाग म्हणवावा.

प्राणाय स्वाहा पानाय स्वाहा व्यानाय स्वाहा । अम्बेऽअम्बिकेऽम्बालिके न मा नयति कश्चन । ससस्त्यश्वकꣳ सुभद्रिकां काम्पीलवासिनीम् ॥ १८ ॥

अर्थ—१ प्राणाय स्वाहा २ अपानाय स्वाहा ३ व्यानाय स्वाहा या तीन आहुति आहेत. अम्बा, अम्बिका व अम्बलिकासंज्ञक राजपत्न्या परस्परांत बोलतात. हे अम्बे, हे अम्बिके, हे अम्बालिके कोणीही मनुष्य मला अश्वाकडे नेत नाहीं, तर मीच स्वतः जातें. मी जर न जाईन तर, तो दुष्ट अश्व त्या सुभद्रानामक स्त्रीला जवळ घेऊन निजेल. ती सुभद्रा कांपीलनगरांत राहणारी आहे (त्या नगरांतील स्त्रिया सुंदर व चतुर असतात) ॥ १८ ॥

विनियोग—सर्व राजपत्न्यांनीं ' गणानां त्वा ' इत्यादि तीन मंत्रभागांनीं घोड्याला तीन प्रदक्षिणा घालाव्या. मधली प्रदक्षिणा पितृकर्माप्रमाणें उलटी करावी. नंतर राजपत्न्या, अध्वर्यु व यजमान यांनीं अश्वांचें प्राणसंशोधन केल्यावर ' आहमजानि ' इत्यादि मंत्रभाग म्हणून महिषीसंज्ञक राजपत्नीनें अश्वाचे समीप शयन करावें.

गणानां त्वा गणपतिꣳ हवामहे प्रियाणां त्वा प्रियपतिꣳ हवामहे निधीनां त्वा निधिपतिꣳ हवामहे वसो मम । आहमजानि गर्भधमा त्वमजासि गर्भधम् ॥ १९ ॥

अर्थ—हे अश्वा, आम्ही तुला बोलावतों. तूं समुदायांचा गणरूपानें पालक आहेस. तसेंच वल्लभांचें प्रियपालन करणारा आहेस व तूं सुखांचे जे साठे (निधि) त्यांचा पालक आहेस. हे वसुरूपी अश्वा, तूं माझा पति हो. हे अश्वा, गर्भधारण करणाऱ्या रेतांचें आकर्षण करून मी स्थापन करतें व तूंही तें गर्भस्थापक वीर्य आकर्षण करून स्थापन कर ॥ १९ ॥

विनियोग—' स्वर्गे लोके ' इत्यादि मंत्रभागानें महिषी व अश्वाचे शरीरांवर पांघरूण घालावें. ' वृषा वाजी ' इत्यादि मंत्रभाग म्हणून महिषीनें अश्वशिश्न आपले योनींत स्थापन करावें.

ताऽउभौ चतुरः÷ पदः संप्रसारयाव स्वर्गे लोके प्रोर्णुवाथां वृषा वाजी रेतोधा रेतो दधातु ॥ २० ॥

अर्थ—महिषी म्हणते–हे अश्वा, तूं व मी आपले दोन दोन मिळून चार पाय पसरूं. अध्वर्यु म्हणतो–हे अश्वमहिषींनो, तुम्ही या यज्ञभूमीवर हें वस्त्र पांघरा. महिषी म्हणते–वीर्य धारण करणारा व वीर्यसिंचन करणारा अश्व माझे ठायीं वीर्य स्थापन करो ॥ २० ॥

विनियोग—' उत्सक्थ्या ' इत्यादि मंत्रभागानें यजमानानें अश्वाचें अभिमंत्रण करावें.

उत्सक्थ्याऽअवगुदं धेहि समञ्जि चारया वृषन्। य स्त्रीणां जीवभोजनः ॥ २१ ॥

अर्थ—यजमान म्हणतो–हे वीर्यसिंचन करणाऱ्या अश्वा, या उंच मांडया असलेल्या महिषीच्या योनींत वीर्य स्थापन कर. त्याकरितां तूं योनींत तुझें लिंग प्रविष्ट कर. कारण कीं लिंग हें स्त्रियांना जिवंत ठेवतें व उपभोगप्रदान करतें ॥ २१ ॥

विनियोग—' यकासकौ ' इत्यादि दहा ऋच्यांत १ अध्वर्यु २ ब्रह्मा ३ उद्गाता ४ होता ५ क्षत्ता यांचे कुमारी व महिषी यांच्याशीं झालेल्या थट्टेच्या भाषणाचा निर्देश आहे. हये असें संबुद्धि बोधक हें या शब्दाचें रूप आहे. ' असौ ' या शब्दानें त्या त्या व्यक्तीचें नामग्रहण आहे.

यकाऽसकौ शकुन्तिका हलगिति वञ्चति। आहन्ति गभे पसो निगल्गलीति धारका ॥ २२ ॥

अर्थ—अध्वर्यु कुमारीला तिच्या योनीकडे बोट दाखवून विचारतो हे कुमारि, तूं शीघ्र गमन करीत असतां हलहला असा शब्द करणारी लहान पक्षिणीसारखी जी तुझी योनि आहे तिच्यांत ज्यावेळीं लिंग प्रवेश करतें त्या वेळीं ती लिंग धारण करीत असतां अतिशय वीर्य क्षरण पावतें तेव्हां तिच्यांतून गल्गला असा शब्द निघतो ॥ २२ ॥

यकोऽसकौ शकुन्तकऽआहलगिति वञ्चति। विवक्षत इव ते मुखमध्वर्यो मा नस्त्वमभिभाषथाः ॥ २३ ॥

अर्थ—कुमारी अध्वर्यूला अंगुलीनें त्याचें लिंग दाखवून उत्तर देते. हे अध्वर्यो,

बोलण्याचे वेळीं जसें तोंड उघडतें त्याप्रमाणें पक्ष्यासारखें हें तुझें लिंग आहे व त्याचे मध्यभागीं मुख आहे व चालतांना हलहल असा शब्द करून जें हालतें अशा लिंगासारख्या मुखानें तूं माझ्याशीं बोलूं नकोस ॥ २३ ॥

माता चं ते पिता च तेऽग्रे वृक्षस्य रोहतः । प्रतिलोमीति ते पिता गभे मुष्टिमतꣳ सयत् ॥ २४ ॥

अर्थ—ब्रह्मा महिषीला म्हणतो—हे महिषि, जेव्हां तुझे आई व बाप पलंगावर निजले व तुझ्या बापानें तुझ्या आईच्या योनींत लिंग घातलें व तुझ्या (तुझ्या आईच्या) उपभोगानें मला सुख होतें असें तो म्हणाला तेव्हां तुझी उत्पत्ति झाली ॥ २४ ॥

माता चं ते पिता च तेऽग्रे वृक्षस्य क्रीडतः । विवक्षत इव ते मुखं ब्रह्मन्मा त्वं वदो बहु ॥ २५ ॥

अर्थ—दासीस्त् महिषी ब्रह्माला म्हणते—हे ब्राह्मणा, तुझ्या आईबापांनीं पलंगावर आरोहण करून क्रीडा केली तेव्हांच तुझी उत्पत्ति झाली यावर तुझ्याकडेही हा दोष येत असतां मला एकटीलाच त्याबद्दल कां दोष देतोस यावरही बोलावें अशी तुझ्या मुखाची हालचाल दिसते आहे तूं फार बोलूं नकोस ॥ २५ ॥

ऊर्ध्वामेनामुच्छ्रापय गिरौ भारꣳ हरन्निव । अथास्यै मध्यमेधतां शीते वाते पुनन्निव ॥ २६ ॥

अर्थ—उद्गाता वावातासंज्ञक राजपत्नीच्या संबंधांत एका मनुष्याला म्हणतो—हे पुरुषा, उंच जागीं ओझें ठेवावें त्याप्रमाणें या वावाता स्त्रीला उंच कर, तिला अशी उंच कर कीं ज्यायोगें हिचे योनीचा भाग विस्तृत होईल म्हणजे कंबरेला धरून उंच कर. उंच करण्याच्या संबंधांत दुसरा दृष्टांत—ज्याप्रमाणें खळ्यांत धान्य उडविणारा मनुष्य शीतल वारा सुरू असतां धान्याची पाटी वर करतो ॥ २६ ॥

ऊर्ध्वमेनमुच्छ्रयतादिरौ भारꣳ हरन्निव । अथास्य मध्यमेजतु शीते वाते पुनन्निव ॥ २७ ॥

अर्थ—वावाता उद्गात्यासंबंधानेंही पूर्वीप्रमाणेंच म्हणते. हे पुरुषा, उंच जागीं ओझें ठेवावें त्याप्रमाणें या उद्गात्याला उंच कर असा उंच कर कीं ज्यायोगें याचें

लिंग उंच होऊन हालूं लागेल (या वेळीं स्त्रीनें पुरुषासारखें होऊन वर निजून मैथुन करावयाचें आहे यास पुरुषायित म्हणतात) उंच करण्यासंबंधांत दुसरा दृष्टांत ज्याप्रमाणें खळ्यांत धान्य उडविणारा मनुष्य शीतल वारा सुरू असतां धान्याची पाटी वर करतो ॥ २७ ॥

यद॑स्याऽअ॒ह्रु॒भे॒या॑ ÷ कु॒धु स्थू॒लमु॒पात॑सत् । मु॒ष्काविद॑स्याऽएजतो गोश॒फे श॑कु॒लावि॑व ॥ २८ ॥

अर्थ—होता परिवृक्तासंज्ञक राजपत्नीसंबंधांत म्हणतो—जिची योनि विदारण करण्यास योग्य आहे अशा परिवृक्तेच्या योनींत ज्यावेळीं आंखूड व जाडें लिंग प्रवेश करतें त्यावेळीं वृषण योनीच्याबाहेर राहूनच हालतात. यास दृष्टांत—ज्याप्रमाणें गाईच्या खुरांचे जागीं मत्स्य कंपायमान होतात म्हणजे चिखलांत उमटलेल्या गाईचे खुरांतील पाण्यांत दोन मासोळ्या हालतात. ॥ २८ ॥

यद्हे॒वासो॑ ल॒लाम॑गु॒ प्रवि॑ष्टीमिन॒माविषु॒ः । स॒क्थ्या॑ दे॑दिश्यते॒ नारी॑ स॒त्यस्याक्षि॒भुवो॑ यथा ॥ २९ ॥

अर्थ—परिवृक्तासंज्ञक राजपत्नी होत्याला म्हणते—ज्यावेळीं होत्रादिक ऋत्विज योनिप्रवेशानंतर भिजणारें व ज्याला सुख होतें असें लिंग योनींत प्रविष्ट करतात त्यावेळीं प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टीप्रमाणें स्त्रियांच्या मांड्या स्पष्ट दिसतात, बाकीचें शरीर पुरुषशरीरानें झाकलें जातें. ॥ २९ ॥

यद्धरि॑णो यव॒मत्ति॒ न पु॒ष्टं प॒शु म॑न्यते । शू॒द्रा यद॑र्ये॒जारा॒ न पोषा॑य धनायति ॥ ३० ॥

अर्थ—क्षत्ता पालागलीस म्हणतो—ज्यावेळीं हरीण शेतांतील धान्य खातो त्यावेळीं शेतांच्या मालकाला हरिण पुष्ट झाला बरें झालें असें न वाटतां माझें धान्य नष्ट झालें म्हणून दुःख होतें त्याप्रमाणें शूद्र स्त्री ज्यावेळीं वैश्याशीं जारकर्म करते त्यावेळीं शूद्राला 'माझी स्त्री वैश्यधनानें पुष्ट झाली बरें झालें' असें वाटत नाहीं तर ही व्यभिचारिणी झाली म्हणून दुःख होतें ॥ ३० ॥

यद्धरि॑णो यव॒मत्ति॒ न पु॒ष्टं ब॒हु म॑न्यते । शू॒द्रो यद॑र्ये॒ जारो॒ न पोष॒मनु॑मन्यते ॥ ३१ ॥

अर्थ—पालागली क्षत्त्याला म्हणते--ज्यावेळीं हरिण शेतांतील धान्य खातो त्या वेळीं शेताच्या मालकाला हरिण पुष्ट झाला बरें झालें असें न वाटतां माझें धान्य नष्ट झालें म्हणून दुःख होतें त्याप्रमाणें शूद्र ज्यावेळीं वैश्य स्त्रीशीं जारकर्म करतो त्यावेळीं वैश्याला 'माझी स्त्री पुष्ट झाली बरें झालें' असें वाटत नाहीं तर ही व्यभिचारिणी झाली म्हणून दुःख होतें ॥ ३१ ॥

विनियोग—'दधिक्राव्णः' इत्यादि मंत्रानें १ अध्वर्यु २ ब्रह्मा ३ उद्गाता ४ होता व ५ क्षत्ता या ऋत्विजांनीं अश्वाजवळ निजलेल्या महिषीसंज्ञक यजमानपत्नीला अश्वापासून उठवून दूर करावें.

दधिक्राव्णोऽअकारिषं जिष्णोरश्वस्य वाजिनः। सुरभि नो मुखा करत्प्राणऽआयूꣳषि तारिषत् ॥ ३२ ॥

अर्थ—आम्ही अध्वर्युप्रभृति ऋत्विज् धारण करून गमन करणारा, जयशील व वेगवान् असा जो अश्व त्याच्या संस्काराकरितां अश्लील भाषण करते झालों त्यायोगें अशुद्ध झालेलीं आमचीं तोंडें व घोड्याचें तोंड हा यज्ञ शुद्ध करो (यज्ञाचे प्रसादानें अश्लील भाषणाचा दोष दूर होवो) व तो यज्ञ आमचीं आयुष्यें वाढवों ॥ ३२ ॥

विनियोग—'गायत्री त्रिष्टुप्' इत्यादि सहा ऋचांपैकीं महिषी वगैरे तीन राजपत्नींनीं क्रमेकरून दोन दोन ऋचा म्हणाव्या व तिघींनीं क्रमानें तांब्याच्या, रुप्याच्या व सुवर्णाच्या एकेक सुया घेऊन त्यायोगें अश्वाचें शरीर जर्जरित करावें अशा जर्जरित शरीरांत तलवारीचा प्रवेश सहज होतो.

गायत्री त्रिष्टुब्जगत्यनुष्टुप्पङ्क्त्या सह। बृहत्युष्णिहा ककुप् सूचीभिः शम्यन्तु त्वा ॥ ३३ ॥

अर्थ--गायत्री, त्रिष्टुप्, अनुष्टुप् छंदासह जगती, उष्णिक् छन्दासह बृहती व ककुप् हे छन्द हे अश्वा तुझ्या शरीराला सुसंस्कृत करो. सुयांनीं रेघा ओढून छिद्रें करणें हा अश्वसंस्कार आहे ॥ ३३ ॥

द्विपदा याश्चतुष्पदास्त्रिपदा याश्च षट्पदाः। विच्छन्दा याश्च सच्छन्दाः सूचीभिः शम्यन्तु त्वा ॥ ३४ ॥

अर्थ--दोन, चार, तीन व सहा पादांनीं युक्त, छन्दोलक्षणरहित व छन्दोलक्षणसहित अशा छन्दो जाति हे अश्वा, तुला सूचिभेदानें सुसंस्कृत करोत ॥ ३४ ॥

महानाम्न्यो रेवत्यो विश्वाऽआशाः प्रभूवरीः । मेघीर्विद्युतो वाचः सूचीभिः शम्यन्तु त्वा ॥ ३५ ॥

अर्थ—हे अश्वा, शकूरी, रेवती, सर्व धारण करणाऱ्या सर्व दिशा, मेघसंबंधीं व विद्युत्संबंधीं वाणी सूचींच्या योगानें तुला सुसंस्कृत करोत ॥ ३५ ॥

नार्यस्ते पत्न्यो लोमः विचिन्वन्तु मनीषया । देवानां पत्न्यो दिशः सूचीभिः शम्यन्तु त्वा ॥ ३६ ॥

अर्थ—हे अश्वा, यजमानाच्या महिष्यादि स्त्रिया विचारपूर्वक इच्छेनें तुझे केश पृथक् करोत. इंद्रादि देवांच्या पत्न्या व पूर्वादि दिशा सूचींच्या योगानें तुला सुसंस्कृत करोत ॥ ३६ ॥

रजता हरिणीः सीसा युजो युज्यन्ते कर्मभिः । अश्वस्य वाजिनस्त्वचि सिमाः शम्यन्तु शम्यन्तीः ॥ ३७ ॥

अर्थ—रुप्याच्या, सोन्याच्या व तांब्याच्या सुया अश्वाच्या शरीरावर मर्यादा करण्यास योग्य अशा रेघा करण्यास योग्य आहेत. त्या संस्कार करणाऱ्या सुया घोड्याच्या शरीरावर उत्तम रीतीनें मर्यादाबोधक रेघा करोत ॥ ३७ ॥

कुविदङ्ग यवमन्तो यवं चियथा दान्त्यनुपूर्वं वियूय । इहेहैषां कृणुहि भोजनानि ये बर्हिषो नमउक्तिं यजन्ति ॥ ३८ ॥

अर्थ—हे अश्वा ज्याप्रमाणें पुष्कळ धान्याचे स्वामी असे शेतकरी आपले पुष्कळ धान्य वेगळें करून शीघ्र कापतात त्याप्रमाणें या यजमानाचे ठायीं 'जे यजमान दर्भासनांवर बसून हविर्भागात्मक अन्नाचा याग करतात' अशा इतर यजमानांच्या उपभोग्य वस्तु स्थापन कर. तात्पर्य—यज्ञ करणाऱ्या इतरांचीं सर्व फलें या यजमानास मिळोत ॥ ३८ ॥

विनियोग—'कस्त्वा' इत्यादि सहा मंत्रांच्या अनुवाकानें मेद काढण्याकरितां अश्वाचें पोट चिरावें.

कस्त्वाऽऽच्छयति कस्त्वा विशास्ति कस्ते गात्राणि शम्यति । कऽउ ते शमिता कविः ॥ ३९ ॥

अर्थ—हे अश्वा, प्रजापति तुझें पोट चिरतो व तोच तुझी त्वचा फाडून काढतो व तुझ्या गात्रांचें हविर्द्रव्य करतो. बुद्धिमान् प्रजापतिच तुला मारणारा आहे, मी नाहीं ॥ ३९ ॥

ऋतवस्त॑ऽऋतु॒था पर्व॑ शमि॒तारो॒ विशा॑सतु । सं॒व॒त्स॒स्य॒ तेज॑सा शमी॒भि॰ शम्य॑न्तु त्वा ॥ ४० ॥

अर्थ—हे अश्वा, संस्कार करणारे ऋतु प्रत्येक ऋतुसमयीं संवत्सराच्या तेजानें तुझ्या अस्थिग्रंथींना आपल्या कर्मांनीं वियुक्त करोत. व ते ऋतु अस्थिग्रंथि फाडून तुला हविर्द्रव्य बनवोत ॥ ४० ॥

अ॒र्ध॒मा॒सा॰ पर॑ऽपूंषि ते मासा॒ऽआच्छ॑यन्तु शम्य॒न्त॰ । अ॒हो॒रा॒त्राणि॑ म॒रुतो॒ विलि॑ष्ट॒ ꣳ सू॒द॒य॒न्तु॒ ते ॥ ४१ ॥

अर्थ—हे अश्वा, पक्ष व मासाच्या देवता संस्कार करीत असतां तुझ्या सर्व अस्थिग्रंथींना सर्व बाजूंनीं फाडोत. व अहोरात्र देवता व मरुद्देवता अत्यंत अल्पही अंग संयुक्त करोत म्हणजे तुझें कोणतेंही अंग व्यर्थ न होवो ॥ ४१ ॥

दैव्याऽअध्व॑र्यव॒स्त्वाच्छ॑यन्तु॒ वि च॑ शासतु । गात्रा॑णि पर्व॒शस्ते॒ सिमा॑ꣳ कृण्वन्तु शम्य॒न्ती॰ ॥ ४२ ॥

अर्थ—हे अश्वा, अश्विनीकुमारप्रभृति देवांचे अध्वर्यु तुला फाडोत, मारोत व त्यायोगें हविर्द्रव्य करोत. व ते तुझ्या गात्रांवरील अस्थिसंधींवर संस्कार करणाऱ्या सीमा करोत ॥ ४२ ॥

यौस्ते॑ पृथि॒व्युन्तरि॑क्षं॒ वा॒युश्छि॒द्रं पूं॑णातु ते । सूर्यं॑स्ते॒ नक्ष॑त्रै॒ꣳ सह॒ लो॒कं कृ॑णोतु साधु॒या ॥ ४३ ॥

अर्थ—हे अश्वा, स्वर्ग, पृथिवी व अन्तरिक्ष या तीनही लोकांचे स्वामी जे अग्नि, वायु, सूर्य ते व शरीरस्थ प्राणवायु हे तुझें जें न्यून असेल तें पूर्ण करोत. व नक्षत्रयुक्त सूर्य तुला शुभ लोक देवो ॥ ४३ ॥

शं ते॒ परे॑भ्यो गात्रे॒भ्य॒ꣳ शम॒स्त्वव॑रेभ्य॒ꣳ । शम॒स्थभ्यो॑ म॒ज्जभ्य॒ꣳ शम्व॑स्तु त॒न्वै॒ तव ॥ ४४ ॥

अर्थ—हे अश्वा, तुझ्या कंबरेच्या वरील मस्तकादि अवयवांना व खालच्या पादादि अवयवांना, अस्थींना व मज्जांना तसेंच तुझ्या सर्व शरीराला सुख असो ॥ ४४ ॥

विनियोग—यापुढें अठरा ऋचांत ऋत्विजांचा परस्पर संवाद आहे त्यापैकीं 'कः स्वित्' इत्यादि चार ऋचांत होता व अध्वर्यु यांचा संवाद आहे.

कꣳ स्विदेकाकी चरति कऽउ स्विज्जायते पुनः÷। किꣳ स्विद्धिमस्य भेषजं किंवावपनं महत् ॥ ४५ ॥

अर्थ—होता अध्वर्यूस विचारतो–१ कोण एकटाच संचार करतो? २ नष्ट होऊन कोण पुनः जन्माला येतो? ३ थंडीचें औषध कोणतें? ४ सर्वबाजूंनीं ज्यांत बीं पेरतात असें मोठें स्थल कोणतें? ॥ ४५ ॥

सूर्यऽएकाकी चरति चन्द्रमा जायते पुनः÷। अग्निर्हिमस्य भेषजं भूमिरावपनं महत् ॥ ४६ ॥

अर्थ—अध्वर्यूचें उत्तर–१ सूर्य एकटाच गमन करतो २ चंद्र क्षय पावून पुनः जन्माला येतो म्हणजे वाढतो. ३ अग्नि हें थंडीचें औषध आहे. ४ ही पृथ्वी बीं पेरण्याचें मोठें साधन आहे ॥ ४६ ॥

किꣳ स्वित्सूर्यसमं ज्योतिः किꣳ समुद्रसमꣳ सरः÷। किꣳ स्वित्पृथिव्यै वर्षीयः कस्य मात्रा न विद्यते ॥ ४७ ॥

अर्थ—अध्वर्यु होत्यास विचारतो–१ सूर्यमंडलासारखें तेज कोणतें? २ समुद्रासारखें सरोवर कोणतें? ३ पृथ्वीपेक्षां मोठें काय आहे? ४ कोणत्या वस्तूला परिमाण नाहीं? ॥ ४७ ॥

ब्रह्म सूर्यसमं ज्योतिर्यौः समुद्रसमꣳ सरः÷। इन्द्रः÷ पृथिव्यै वर्षीयान् गौस्तु मात्रा न विद्यते ॥ ४८ ॥

अर्थ—होत्याचें उत्तर–१ ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांचें तेज सूर्यासारखें आहे. २ अन्तरिक्ष हें समुद्रासारखें सरोवर आहे. ३ इंद्र पृथ्वीपेक्षां मोठा आहे. ४ धेनूला परिमाण नाहीं कारण ती यज्ञाला धारण करणारी आहे ॥ ४८ ॥

विनियोग—'पृच्छामि त्वा' या दोन ऋचांत ब्रह्मा व उद्दालकाचीं प्रश्नोत्तरें आहेत.

पृच्छामि त्वा चितये देवसख यदि त्वमत्र मनसा जगन्थ । येषु विष्णुस्त्रिषु पदेष्वेष्टस्तेषु विश्वं भुवनमाविवेशौ३ ॥ ४९ ॥

अर्थ—ब्रह्मा उद्दालकास विचारतो—हे देवमित्रा उद्दालका, मी ज्ञान होण्याकरितां तुला कांहीं विचारतों तुला जर माझ्या प्रश्नासंबंधीं कांहीं ठाऊक असेल तर सांग. प्रश्न असा—गार्हपत्य, आहवनीय व दक्षिणाग्नि या तीन स्थानांत याग केला जातो त्या तीन स्थानांत सर्व भुवनें प्रविष्ट झालीं आहेत अगर नाहींत ? ॥ ४९ ॥

अपि तेषु त्रिषु पदेष्वस्मि येषु विश्वं भुवनमाविवेश । सर्वꣳ पर्वेमि पृथिवीमुत द्यामेकेनाङ्गेन दिवोऽअस्य पृष्ठम् ॥ ५० ॥

अर्थ—उद्दालकाचें उत्तर—ज्या गार्हपत्यादि स्थानांत सर्व विश्व प्रविष्ट झालें अगर नाहीं असा तुझा प्रश्न आहे त्यांत मी प्रविष्ट झालों आहे व तूंहि प्रविष्ट झाला आहेस; इतकेंच नव्हे तर, त्या स्थानांत पृथिवी, स्वर्ग व स्वर्गावरील पृष्ठभागहि प्रविष्ट झाला आहे असें मी मनानें निश्चित समजतों. आतां सर्व भूतें प्रविष्ट झालीं हें वेगळें काय सांगावयाचें ? ॥ ५० ॥

केष्वन्तꣳ पुरुषेऽआविवेश कान्यन्तꣳ पुरुषेऽअर्पितानि । एतद्ब्रह्मन्नुपवक्तामासि त्वा किꣳस्विन्नꣳ प्रतिवोचास्यत्र ॥ ५१ ॥

अर्थ—उद्दालकाचा ब्रह्माला प्रश्न—हे ब्रह्मन्, कोणत्या वस्तूंच्या आंत पुरुष (आत्मा) प्रवेश करता झाला व पुरुषाच्या आंत कोणत्या वस्तु शिरल्या हें मी तुला ठासून विचारतों, पाहूं तूं काय उत्तर देतोस तें ॥ ५१ ॥

पञ्चस्वन्तꣳ पुरुषेऽआविवेश तान्यन्तꣳ पुरुषेऽअर्पितानि । एतत्त्वात्र प्रतिमन्वानोऽस्मि न मायया भवस्युत्तरो मत् ॥ ५२ ॥

अर्थ—ब्रह्म्याचें उत्तर—पुरुष (आत्मा) पंचमहाभूतांत शिरला व पृथिव्यादि पंचमहाभूतें पुरुषांत शिरलीं, हें माझें प्रतिज्ञापूर्वक उत्तर समज. तूं मजपेक्षां अधिक बुद्धिमान् नाहींस. ॥ ५२ ॥

का स्विदासीत्पूर्वचित्तिः किꣳस्विदासीद्बृहद्वयः÷ । का स्विदासीत्पिलिप्पिला का स्विदासीत्पिशङ्गिला ॥ ५३ ॥

अर्थ—होता अध्वर्यूला विचारतो—१ प्रथम कशाची आठवण होते ? २ मोठा पक्षी कोणता ? ३ पिलिप्पिला कोणाला म्हणावें ? ४ पिशिङ्गिला कोणाला म्हणावें ? ॥ ५३ ॥

द्यौरासीत्पूर्वचित्तिरश्वऽआसीद्बृहद्वयः÷ । अविरासीत्पिलिप्पिला रात्रिरासीत्पिशङ्गिला ॥ ५४ ॥

अर्थ—अध्वर्यूचें उत्तर—१ प्रथम वृष्टीचें स्मरण होतें कारण ती सर्व प्राण्यांस इष्ट आहे. २ अश्वमेध हा मोठा पक्षी आहे कारण पक्षी जसा ऊर्ध्व गमन करतो तसा अश्वमेध यजमानाला घेऊन वर जातो. ३ पृथ्वीस पिलिप्पिला म्हणावें कारण ती वृष्टीनें ओली होऊन चिक्कण होते. ४ रात्रीस पिशङ्गिला (अन्तर्धान करणारी) म्हणतात कारण सर्व वस्तु रात्रीं अन्तर्धान पावतात. ॥ ५४ ॥

काऽईमरे पिशङ्गिला का ईꣳकुरुपिशङ्गिला । कऽईमास्कन्दमर्षति क ईꣳऽपन्थां विसर्पति ॥ ५५ ॥

अर्थ—अध्वर्यूचा होत्याला प्रश्न—हे होत्या, १ पिशंगिला कोणास म्हणावें ? २ तसेंच कुरुपिशिंगिला कोणास म्हणावें ? ३ मध्यें मध्यें उड्या मारून कोण गमन करतो ? ४ व मार्गात निरनिराळ्या गतीनें कोण गमन करतो ? ॥ ५५ ॥

अजारे पिशंगिला श्वाविल्कुरुपिशंगिला । शशऽआस्कन्दमर्ष्त्यहिꣳ पन्थां विसर्पति ॥ ५६ ॥

अर्थ—होत्याचें उत्तर—१ मायेला अगर रात्रीला पिशङ्गिला म्हणतात कारण मायेंत सर्व विश्व लीन होतें व रात्रींच्या अंधारांत सर्व रूपवान् पदार्थ दिसत नाहींत. २ घोरपड सेधा या प्राण्याला कुरुपिशिङ्गिला असें म्हणतात कारण त्या प्राण्याचा स्वभाव कुरु कुरु असा शब्द करून झाडांच्या शेंकडों मुळ्या भक्षण करणें व आपल्या पोटांत ठेवणें असा आहे. ३ ससा हा नेहमीं उड्या मारीत गमन करितो असा त्याचा स्वभाव आहे. ४ सर्प हा मार्गातून शीघ्र—गमन करितो व जातांना त्याच्या चालण्याचे वाकडे वाकडे वण पडत जातात असा त्याचा स्वभाव आहे. ॥ ५६ ॥

विनियोग—'कत्यस्य' इत्यादि चार मंत्रांनीं ब्रह्मा व उद्गाता हे दोन ऋत्विज् प्रश्न-प्रतिप्रश्न करितात—

कत्यस्य विष्टाः कत्यक्षराणि कति होमासः कतिधा समिद्धः । यज्ञस्य त्वा विदथा पृच्छमत्र कति होतारऽऋतुशो यजन्ति ॥ ५७ ॥

अर्थ—ब्रह्मयाचा उद्गात्याला प्रश्न—१ यज्ञांत ज्या अन्नांची आहुंति दिली जाते तीं अन्नें किती प्रकारचीं आहेत ? २ यज्ञसंबंधीं अक्षरें किती ? ३ होम किती ? ४ समिधा किती ? हें यज्ञ जाणण्याकरितां मी तुला विचारतों आणि ५ प्रत्येक ऋतूंत किती होते याग करितात ? ॥ ५७ ॥

षडस्य विष्टाः शतमक्षराण्यशीतिर्होमाः समिधो ह तिस्रः । यज्ञस्य ते विदथा प्रब्रवीमि सप्त होतारऽऋतुशो यजन्ति ॥ ५८ ॥

उद्गात्यांचें उत्तर—१ या यज्ञाच्या अन्नांचे प्रकार सहा (कारण कीं सर्व अन्नें षड्-रसात्मक असतात.) २ यज्ञाचीं अक्षरें शंभर. कारण गायत्र्यादि, अतिधृत्यंत छंदांचीं शंभर अक्षरें होतात. ३ यज्ञाचे होम ऐंशी. ४ यज्ञाच्या अश्व, तूपर, गोमृग हे तीन पशु म्हणजे समिधा. यज्ञ जाणण्याकरितां हें मी तुला सांगतों आणि ५ सात होते प्रत्येक ऋतूंमध्यें याग करितात ॥ ५८ ॥

कोऽअस्य वेद भुवनस्य नाभिं को द्यावा पृथिवीऽअन्तरिक्षम् । कः सूर्यस्य वेद बृहतो जनित्रं को वेद चन्द्रमसं यतोजाः ॥ ५९ ॥

अर्थ—उद्गात्याचा ब्रह्मयाला प्रश्न—१ हे ब्रह्मया, नाभिस्थानांत सर्व नाडींचें बंधन होतें म्हणजे नाभिस्थान हें सर्व नाडींचें बंधनस्थान अर्थात् कारण आहे त्याप्रमाणें या भुवनाचें कारण काय हें कोण जाणतो ? २ द्युलोक, पृथ्वीलोक व अंत-रिक्ष लोक यांस कोण जाणतो ? ३ महान् अशा सूर्याचें जन्म कोणास ठाऊक आहे अर्थात् सूर्याची उत्पत्ति कोणापासून झाली ? ४ तसेंच चंद्राची उत्पत्ति कोणा-पासून झाली हें कोण जाणतो ? ॥ ५९ ॥

वेदाहमस्य भुवनस्य नाभिं वेद द्यावापृथिवीऽअन्तरिक्षम् । वेद सूर्यस्य बृहतो जनित्रमथो वेद चन्द्रमसं यतोजाः ॥ ६० ॥

अर्थ—ब्रह्मयाचें उत्तर—१ मी या भुवनाचें कारण जाणतों, म्हणजे परब्रह्म हें

जगाचें कारण आहे. तसेंच २ द्युलोक, पृथ्वीलोक व अंतरिक्ष लोक हे परब्रह्माचे विवर्तरूपी आहेत. ३ मोठ्या सूर्याचें उत्पत्तिस्थान ब्रह्मच आहे. ४ आणखी चंद्र हाहि परब्रह्मापासूनच उत्पन्न झाला आहे असें मी समजतों. ॥ ६० ॥

विनियोग—' पृच्छामित्वा ' या दोन मंत्रांत यजमानाचा प्रश्न व अध्वर्यूचें उत्तर आहे.

पृच्छामि त्वा परमन्तं पृथिव्याः पृच्छामि यत्र भुवनस्य नाभिः। पृच्छामि त्वा वृष्णोऽअश्वस्य रेतः पृच्छामि वाचः परमं व्योम ॥६१॥

अर्थ—यजमानाचा अध्वर्यूस प्रश्न–१ हे अध्वर्यो, पृथ्वीचा शेवटचा अवधि कोणता ? २ ज्या स्थलामध्यें भुवनाचें कारण राहतें तें स्थल कोणतें ? ३ वीर्यसिंचन करणाऱ्या अश्वाचें वीर्य कोणतें ? ४ ऋग् यजुः साम एतद्रूपी वेदत्रयीचें उत्कृष्ट स्थान कोणतें ? हे चार प्रश्न मी तुला विचारतों. ॥ ६१ ॥

इयं वेदिः परोऽअन्तः पृथिव्याऽअयं यज्ञो भुवनस्य नाभिः। अयꣳ सोमो वृष्णोऽअश्वस्य रेतो ब्रह्मायं वाचः परमं व्योम ॥ ६२ ॥

अर्थ—अध्वर्यूचें उत्तर–१ ही वेदी पृथ्वीची शेवटची मर्यादा आहे. २ हा अश्वमेधयज्ञ प्राणिसमुदायाचें कारण आहे. ३ ही सोमलता अश्वाचें वीर्य आहे म्हणजे सोमलता अश्ववीर्यापासून उत्पन्न झाली. ४ हा ब्रह्मदेव ऋग्यजुःसाम वेदांचें उत्कृष्ट स्थान आहे. (येथें ब्रह्मसंबंधीं वादविवाद संपला) ॥ ६२ ॥

विनियोग—नंतर अध्वर्यूनें हिरण्मय पात्रानें प्राजापत्य महिमपात्राचें ग्रहण करावें. या महिमपात्राची ' सुभूःही ' पुरोनुवाक्या आहे.

सुभूः स्वयंभूः प्रथमोऽन्तर्भुवन्यूर्णवे। दधे ह गर्भमृत्वियं यतो जातः प्रजापतिः ॥ ६३ ॥

अर्थ—विश्वोत्पादक व स्वेच्छेनें शरीर धारण करणाऱ्या अशा अनाद्यनंत परमेश्वरानें युगांताचे वेळीं गर्भ स्थापन केला. तो गर्भ योग्य वेळीं स्थापन केला व त्यापासून पुढें ब्रह्मदेव उत्पन्न झाला ॥ ६३ ॥

विनियोग—' होता यक्षत् ' हा मंत्र महिमपात्राचा प्रैष आहे.

होता यक्षत्प्रजापतिꣳ सोमस्य महिम्नः । जुषतां पिबतु सोमꣳ होतर्यज ॥ ६४ ॥

अर्थ—दैवी होता महिमसंज्ञक सोमपात्रासंबंधी प्रजापतीचें हवन करो व ज्याचा याग झाला असा प्रजापति महिमपात्रांतील सोमाचें पान करो. हे मनुष्य होत्या, तूंहि याग कर ॥ ६४ ॥

विनियोग—' प्रजापते ' या मंत्रानें होत्यानें याग करावा.

प्रजापते न त्वदेतान्यन्यो विश्वा रूपाणि परि ता बभूव । यत्कामास्ते जुहुमस्तन्नोऽअस्तु वयꣳस्याम पतयो रयीणाम् ॥ ६५ ॥

अर्थ—हे प्रजापते, तुझ्याहून अन्य कोणीहि देव या सर्व विविध रूपांची उत्पत्ति व नाश करण्यास समर्थ झाला नाहीं. म्हणून आम्ही ज्या फलाच्या इच्छेनें तुझा होम करितों तें फळ आम्हांस मिळो. आम्ही या द्रव्यांचे स्वामी होऊं ॥ ६५ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**
माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥

इति त्रयोविंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ चतुर्विंशोऽध्यायः ॥ २४ ॥



विनियोग—अश्वमेध यज्ञांतील कोणत्या पशूंच्या कोणत्या देवता हें या अध्यायांत सांगितलें आहे. अश्वमेध यज्ञांत एकवीस यज्ञस्तंभ असतात त्यांतील मध्यस्थस्तंभाचें नांव अग्निष्ठ असें आहे. त्या अग्निष्ठस्तंभाजवळ सतरा पशूंचा नियोग करावयाचा असतो. ते पशू व त्यांच्या देवता पुढें सांगितल्या आहेत.

अश्वस्तूपरो गोमृगस्ते प्राजापत्याः कृष्णग्रीवऽआग्नेयो ररार्टे पुरस्तात्सारस्वती मेष्युधस्ताद्बन्धोराश्विनावधोरामौ बाह्वोः सौमापौष्णः श्यामो नाभ्यांः सौर्वयामौ श्वेतश्च कृष्णश्च पार्श्वयोस्त्वाष्ट्रौ लोमशसक्थौ सक्थोर्वायव्यः श्वेतः पुच्छऽइन्द्राय स्वपस्याय वेहद्वैष्णवो वामनः ॥१॥

अर्थ—१ अश्व, २ तूपर, (योग्य वेळीं ज्याला शिंगें उत्पन्न होत नाहींत) ३ गोमृग (गवा) ह्या तीन पशूंची प्रजापति ही देवता आहे (म्हणून यांच्या नियोगाच्या वेळीं 'प्रजापतये जुष्टं नियुनज्मि' या मंत्रानें पशूंचें बंधन करावें). ४ कृष्णग्रीव (ज्याची मान काळ्या रंगाची आहे) असा अजरूपी पशु अश्वाच्या समोर त्याचे मस्तकाजवळ बांधावा. याची देवता अग्नि आहे. अश्वाच्या हनवटीच्या अधोभागीं सरस्वती देवताक ५ मेषीचें बंधन करावें. अश्विनीकुमार ज्यांची देवता आहे असे व ज्यांची दाढी खालीं लोंबते असें पांढऱ्या वर्णाचे ६।७ दोन अज अश्वाच्या पूर्वेकडील प्रत्येकीं दोन पायांशीं बांधावे. सोम व पूषा ज्यांची देवता आहे असा कृष्णकेश ८ अज अश्वाच्या नाभिस्थळीं बांधावा. सूर्य आणि यम ज्यांची देवता आहे असे श्वेत व कृष्ण ९।१० अज घोड्याच्या क्रमेंकरून उजव्या व डाव्या बाजूला बांधावेत. त्वष्टा ज्यांची देवता आहे व ज्यांच्या शेपटीला पुष्कळ केस आहेत असे ११।१२ दोन पशू घोड्याच्या मागच्या दोन पायांच्या प्रत्येक मांडीशीं बांधावेत. वायुदेवताक श्वेतवर्णाचा १३ पशु अश्वाच्या पुच्छाशीं बांधावा. तसेंच पुच्छाशींच जिची देवता इंद्र आहे अशी गर्भनष्ट झालेली १४ मेंढी बांधावी. (ही मेंढी उत्तम कर्म करणाऱ्या इंद्राकरितां आहे म्हणजे तिची देवता इंद्र आहे.) व १५ वामन म्हणजे ठेंगणा पशु विष्णु देवताक आहे व तो पुच्छस्थानीं बांधावा ॥ १ ॥

रोहितो धूम्ररोहितꣳ कर्कन्धुरोहितस्ते सौम्या बभ्रुरुणबभ्रुꣳ शुकबभ्रुस्ते वारुणाः शितिरन्ध्रोऽन्यतः÷ शितिरन्ध्रꣳ समन्तशितिरन्ध्रस्ते सावित्राः शितिबाहुरन्यतः÷ शितिबाहुꣳ समन्तशितिबाहुस्ते बार्हस्पत्याः पृषती क्षुद्रपृषती स्थूलपृषती ता मैत्रावरुण्यꣳ ॥ २ ॥

अर्थ—१६ रोहित (सर्व अंग लाल आहे) धूम्ररोहित (धूसरवर्णमिश्रित लाल) कर्कंधुरोहित (बोरासारखा लाल) या तीन पशूंची देवता सोम आहे. १७ बभ्रु (कपिलवर्ण) अरुण बभ्रु (रक्तवर्णमिश्रित कपिल) शुक बभ्रु (शुक पक्ष्याप्रमाणें असून कपिलवर्ण) ह्या तीन पशूंची देवता वरुण आहे. हे सतरा पशु मध्यम यूपाशींच बांधावयाचे आहेत. शितिरंध्र (काळ्या छिद्राचा) अन्यतः शितिरंध्र (एका बाजूला काळ्या छिद्राचा) समंत शितिरंध्र (सर्व बाजूला काळ्या छिद्राचा.) ह्या पशूंची देवता सविता आहे. शितिबाहु (ज्यांचे पुढचे पाय पांढरे आहेत) अन्यतः शितिबाहु (ज्याचा एक बाजूचा पाय पांढरा आहे) समंत शितिबाहु ज्यांचे सर्व पाय पांढरे आहेत. या पशूंची देवता बृहस्पति आहे. हे सर्व पशु मध्यम यज्ञस्तंभालाच बांधावे (नंतर द्वितीय यूपाचे पशु व त्याच्या देवता. मध्यमयूपातिरिक्त इतर वीस यूपांना १६।१६ पशु पृषती वगैरे मंत्रांनीं बांधावे. पृषती (काबऱ्या वर्णाचे ठिपके अंगावर असलेली) क्षुद्रपृषति (काबऱ्या वर्णाचे बारीक ठिपके असलेली) स्थूल पृषती (काबऱ्या वर्णाचे मोठे ठिपके अंगावर असलेली.) या तीन स्त्रीपशूंची देवता मित्रावरुण ही आहे. ॥ २ ॥

शुद्धवालꣳ सर्वशुद्धवालो मणिवालस्तऽआश्विनाः श्येतः श्येताक्षोऽरुणस्ते रुद्राय पशुपतये कर्णा यामाऽअवलिप्ता रौद्रा नभोरूपाः पार्जन्याः ॥ ३ ॥

अर्थ—शुद्धवाल (कांहीं भागांत शुभ्र केसांचा) सर्व शुद्धवाल (सर्व केश शुभ्र आहेत ज्याचे असा) मणिशुद्धवाल (मण्याप्रमाणें ज्याच्या केसांचा रंग आहे) या तीन पशूंची देवता अश्विनीकुमार आहे. श्येत (पांढऱ्या रंगाचा), श्येताक्ष (पांढऱ्या डोळ्याचा) अरुण (रक्तवर्णी) या तीन पशूंची देवता पशुपति रुद्र आहे. कर्ण (चंद्राप्रमाणें ज्यांच्या कानाचा रंग पांढरा आहे असे तीन पशु) यांची देवता यम आहे. व गर्विष्ठ असे जे तीन पशु त्यांची देवता रुद्र आहे. (या पंधरा पशूंचें द्वितीययूपाशीं बंधन करावें) नभोरूप (आकाशाप्रमाणें नील वर्णाचे पशु) यांची देवता पर्जन्य आहे. ॥ ३ ॥

पृश्निस्तिरश्चीनपृश्निरूर्ध्वपृश्निस्ते मारुताः फल्गूर्लोहितोर्णी पलक्षी ताः सारस्वत्यः क्लीहाकर्णी÷ शुण्ठाकर्णोऽद्ध्यालोहकर्णस्ते त्वाष्ट्राः कृष्णग्रीवः शितिकक्षोऽञ्जिसक्थस्त ऐन्द्राग्नाः कृष्णाज्जिरल्पाज्जिर्महाज्जिस्तऽउषस्याः ॥ ४ ॥

अर्थ—पृश्नि (विचित्र वर्णाचा) तिरश्चीन पृश्नि (तिरपे ठिपके असलेला) ऊर्ध्वपृश्नि (ऊर्ध्व भागीं ठिपके असलेला.) या तीन पशूंची देवता मरुत् आहे. फल्गु (वाळक्या शरीराची) लोहितोर्णी (लाल केसांची) पलक्षी (पांढऱ्या रंगाची) या तीन स्त्रीपशूंची देवता सरस्वती आहे. क्लीहाकर्ण (रोगी कानांचा) शुंठकर्ण (आंखूड कानांचा) अध्यालोहकर्ण (लाल कानांचा) या तीन पशूंची देवता त्वष्टा आहे. कृष्णग्रीव (काळ्या मानेचा) शितिकक्ष (ज्यांच्या कांखेंतील केस काळे आहेत) श्वेतकक्ष (ज्याच्या कांखेंतील केस पांढरे आहेत) अंजिसक्थ (ज्याच्या मांडीवर केसांची उभी रेष आहे) या पशूंची देवता इंद्र व अग्नि आहे. (हे पंधरा पशु तिसऱ्या यज्ञस्तंभाला बांधावे.) कृष्णाज्जि (काळी ऊर्ध्वरेषा असलेला) अल्पाज्जि (लहान ऊर्ध्वरेषा असलेला) महाज्जि (मोठी ऊर्ध्वरेषा असलेला) या तीन पशूंची देवता उषा ही आहे. ॥ ४ ॥

शिल्पा वैश्वदेव्यो रोहिण्यश्यवयो वाचेऽविज्ञाताऽअदित्यै सरूपा धात्रे वत्सतर्यो देवानां पत्नीभ्यः ॥ ५ ॥

अर्थ—शिल्प (विचित्र वर्णाचे तीन स्त्रीपशु. यांची देवता विश्वेदेव आहे) लाल वर्णाच्या तीन अवि म्हणजे दीड वर्षाच्या बकऱ्या यांची देवता वाणी ही आहे. कोणतेंहि विशिष्ट चिन्ह नसलेले तीन पशु. यांची देवता अदिति आहे. सारख्या रंगाचे तीन पशु यांची देवता धाता आहे. (हे पंधरा पशु चौथ्या यूपाशीं बांधावे, तीन लहानग्या मेंढ्या यांच्या देवता देवपत्नी ॥ ५ ॥

कृष्णग्रीवाऽआग्नेयाः शितिभ्रवो वसूनाꣳ रोहिता रुद्राणाꣳ श्वेताऽआवरोकिणऽआदित्यानां नभोरूपाः पार्जन्याः ॥ ६ ॥

अर्थ—कृष्णग्रीव (गळा काळा असलेले तीन पशु) यांची देवता अग्नि आहे. शितिभ्रू (पांढऱ्या वर्णाची भुकुटि असलेले तीन पशु) यांची देवता वसु, रोहित (रक्त वर्णाचे तीन पशु) यांची देवता रुद्र श्वेत वर्णाचे व अधोभागीं छिद्र अस-

लेले तीन पशु यांची देवता आदित्य, (हे पंधरा पशु पांचव्या यूपाशीं बांधावे) नभोरूप (आकाशाप्रमाणें नील वर्णाचे तीन पशु) यांची देवता पर्जन्य ॥ ६ ॥

उन्नतऽऋषभो वामनस्तऽऐन्द्राविष्णवाऽउन्नतꣳ शितिबाहुꣳ शितिपृष्ठस्तऽ ऐन्द्राबार्हस्पत्याꣳ शुकरूपा वाजिनाꣳ कल्माषाऽआग्निमारुताꣳ श्यामाꣳ पौष्णाꣳ ॥ ७ ॥

अर्थ—१ उंच २ पुष्ट ३ पुष्कळ वय झालें तरी वाढीस न लागलेला. या तीन पशूंच्या इंद्र व विष्णु या देवता आहेत. तसेंच १ उंच २ पुढील पाय पांढरे असलेला ३ ज्याची पाठ पांढरी आहे अशा तीन पशूंची देवता इंद्र व बृहस्पति आहे. पोपटासारख्या रंगाच्या तीन पशूंची देवता वाजी ही आहे. काबऱ्या वर्णाच्या तीन पशूंची देवता अग्नि व मरुत् ही आहे. हे पंधरा पशु सहाव्या यूपाशीं बांधावे. काळ्या वर्णाच्या तीन पशूंची देवता पूषा ही आहे ॥ ७ ॥

एतांऽऐन्द्राग्ना द्विरूपाऽअग्नीषोमीया वामनाऽअनड्वाहऽ आग्नावैष्णवा वृशा मैत्रावरुण्योऽन्यतऽएन्यो मैत्र्युः ॥ ८ ॥

अर्थ—काबऱ्या वर्णाच्या तीन पशूंची देवता इंद्र व अग्नि आहे. दोन रंगांच्या तीन पशूंची देवता अग्नि व सोम आहे. ठेंगण्या, गाडीस जुंपण्यास योग्य अशा तीन पशूंची देवता अग्नि व विष्णु ही आहे. वंध्य अशा तीन अजांची देवता मित्र व वरुण आहे. (हे पंधरा पशु सातव्या यूपाशीं बांधावे.) एका बाजूवर काबऱ्या वर्णाच्या तीन मेंढ्या यांची देवता मित्र ही आहे ॥ ८ ॥

कृष्णग्रीवाऽआग्नेया बभ्रवः सौम्याः श्वेता वायव्याऽअविज्ञाताऽ अदित्यै सरूपा धात्रे वत्सतर्यो देवानां पत्नीभ्यः ॥ ९ ॥

अर्थ—कृष्णकंठांच्या तीन पशूंची देवता अग्नि आहे. कपिल वर्णाच्या तीन पशूंची देवता सोम आहे. पांढऱ्या रंगांच्या तीन पशूंची देवता वायु आहे. विशिष्ट चिन्ह नसलेल्या तीन पशूंची देवता अदिति आहे. हे पंधरा पशु आठव्या यूपाशीं बांधावे. सारख्या रंगांच्या तीन पशूंची देवता धाता ही आहे. लहान अशा तीन अजांची देवता देवपत्नी आहे ॥ ९ ॥

कृष्णा भौमा धूम्राऽआन्तरिक्षा बहुन्तो द्विव्याः शबला वैद्युताः सिध्मास्तारकाः ॥ १० ॥

अर्थ—काळ्या वर्णाच्या तीन पशूंची देवता भूमि आहे. धुरकट वर्णाच्या तीन पशूंची देवता अंतरिक्ष आहे. मोठ्या अशा तीन पशूंची देवता द्युलोक आहे. हे पंधरा पशु नवव्या यूपाशीं बांधावे. काबऱ्या वर्णाच्या तीन पशूंची देवता वीज आहे. सिध्मरोग असलेल्या (कुष्ठरोग असलेल्या) तीन पशूंची देवता नक्षत्रें ही आहे ॥१०॥

धूम्रान्वसन्तायालभते श्वेतान् ग्रीष्माय कृष्णान्वर्षाभ्योऽरुणाञ्छरदे पृषतो हेमन्तायं पिशङ्गाञ्छिशिराय ॥ ११ ॥

अर्थ—धूम्र वर्णाच्या (धुरासारख्या) रंगाच्या तीन पशूंची वसंताकरितां हिंसा करावी म्हणजे धूम्रवर्ण पशूंची देवता वसंत आहे. त्याचप्रमाणें श्वेतवर्ण तीन पशूंची देवता ग्रीष्म. कृष्णवर्ण तीन पशूंची देवता वर्षा. हे पंधरा पशु दहाव्या यूपाशीं बांधावे. लाल वर्णाच्या तीन पशूंची देवता शरद्. विचित्र वर्णाचे ठिपके असलेल्या तीन पशूंची देवता हेमंत. लाल व कपिल वर्णाचे ठिपके असलेल्या तीन पशूंची देवता शिशिर. ॥ ११ ॥

त्र्यवयो गायत्र्यै पञ्चावयस्त्रिष्टुभे दित्यवाहो जगत्यै त्रिवत्साऽनुष्टुभे तुर्यवाहऽउष्णिहे ॥ १२ ॥

अर्थ—दीड वर्षाच्या तीन पशूंची देवता गायत्री, अडीच वर्षाच्या तीन पशूंची देवता त्रिष्टुभ्, हे पंधरा पशु अकराव्या यूपाशीं बांधावे. दोन वर्षांच्या तीन पशूंची देवता जगती, तीन वर्षांच्या तीन पशूंची देवता अनुष्टुभ्, साडेतीन वर्षाच्या तीन पशूंची देवता उष्णिक्. ॥ १२ ॥

पष्ठवाहो विराज उक्षाणो बृहत्यऽऋषभाः ककुभेऽनड्वाहः पङ्क्त्यै धेनवोऽतिच्छन्दसे ॥ १३ ॥

अर्थ—चार वर्षाच्या तीन पशूंची देवता विराट्, वीर्यसिंचनसमर्थ तरुण अशा तीन पशूंची देवता बृहती, हे पंधरा पशु बाराव्या यूपाशीं बांधावे. तारुण्यापेक्षां अधिक वय असलेल्या तीन पशूंची देवता ककुभ्, शकट धारण करणाऱ्या तीन पशूंची देवता पंक्ति, नवीन प्रसूत झालेल्या तीन मेंढयांची देवता अतिछंदस् ॥१३॥

कृष्णग्रीवाऽआग्नेया ब्रध्नं सोम्याऽउपध्वस्ताः सावित्रा वत्सतर्यः सारस्वत्यः श्यामाः पौष्णाः पृश्नयो मारुता बभ्रुरूपा वैश्वदेवा वशा द्यावापृथिवीयाः ॥ १४ ॥

अर्थ—कृष्णकंठांच्या तीन पशूंची देवता अग्नि, कपिल वर्णाच्या तीन पशूंची देवता सोम, हे पंधरा पशु तेराव्या यूपाशीं बांधावे. मिश्र रंगांच्या तीन पशूंची देवता सविता, लहान तीन वासऱ्यांची देवता सरस्वती, श्यामवर्ण तीन पशूंची देवता पूषा, कृश शरीराच्या तीन पशूंची देवता मरुत्, निरनिराळे पुष्कळ वर्ण ज्यांवर आहेत अशा तीन पशूंची देवता विश्वेदेव, हे पंधरा पशु चौदाव्या यूपाशीं बांधावे. वंध्य अशा तीन स्त्रीपशूंची देवता द्यावापृथिवी ॥ १४ ॥

विनियोग—या पुढें वरुणप्रघासपर्वातील पशु सांगतात.

उक्ताꣳ संचराऽएतांऽऐन्द्राग्नाꣳ कृष्णा वारुणाꣳ पृश्नयो मारुताꣳ क्रायास्तूपराꣳ ॥ १५ ॥

अर्थ—' कृष्णग्रीवा आग्नेया ' हे पूर्व ऋचेंत सांगितलेले जे पंधरा पशु त्यांना संचर असें म्हणतात. ते संचर म्हणजे आग्नेयादि पंधरा पशु पूर्वी सांगितले. वरील पंधरा पशु पंधराव्या यूपाशीं बांधावे. काबऱ्या वर्णाच्या तीन पशूंची देवता इंद्र व अग्नि आहे. कृष्ण वर्णाच्या तीन पशूंची देवता वरुण. लघुशरीराच्या तीन पशूंची देवता मरुत्, तूपर (योग्यवेळीं ज्यांना शृंगें उत्पन्न होत नाहींत असे पशु) यांची देवता क म्हणजे प्रजापति आहे ॥ १५ ॥

अग्नयेऽनीकवते प्रथमजानालंभते मरुद्भ्यः सान्तपनेभ्यः सवात्यान्मरुद्भ्यो गृहमेधिभ्यो बष्किहान्मरुद्भ्यः क्रीडिभ्यः सꣳसृष्टाम्मरुद्भ्यꣳ स्वतवद्भ्योऽनुसृष्टान् ॥ १६ ॥

अर्थ—यापुढें साकमेधाचे पशु–पहिली संतति अशा तीन पशूंची देवता अनीकवान् अग्नि, वातसमुदायामध्यें असणाऱ्या तीन पशूंची देवता सांतपन मरुत्, चिरप्रसूत पुष्कळ दिवसांनीं उत्पन्न झालेल्या तीन पशूंची देवता गृहमेधी मरुत्, संसृष्ट म्हणजे जुळ्या जन्मलेल्या तीन पशूंची देवता क्रीडिमरुत् व एका पाठीवर एक जन्मलेल्या तीन पशूंची देवता स्वतवत् मरुत्, हे पंधरा पशु सतराव्या यूपाशीं बांधावे ॥ १६ ॥

उक्ताꣳ संचराऽएतांऽऐद्राग्नाꣳ प्राशृङ्गा माहेन्द्रा बहुरूपा वैश्वकर्मणाꣳ ॥ १७ ॥

अर्थ—अठराव्या यूपाशीं पूर्वी सांगितलेले कृष्णग्रीवादि पंधरा महा हविः पशु बांधावे. काबऱ्या वर्णाच्या तीन पशूंची देवता इंद्र व अग्नि, उत्तम शिंगें असलेल्या तीन पशूंची देवता महेंद्र, निरनिराळ्या रूपाच्या तीन पशूंची देवता विश्वकर्मा ॥१७॥

धूम्रा बभ्रुनीकाशाऽ पितॄणाꣳ सोमवतां बभ्रवो धूम्रनीकाशाऽ पितॄणां बर्हिषदां कृष्णा बभ्रुनीकाशाऽ पितॄणामग्निष्वात्तानां कृष्णाऽ पृषन्तश्चैय-म्बकाऽ ॥ १८ ॥

अर्थ—यापुढें पित्रेष्टिदेवता पशु सांगतात–धूसर वर्णाचे व कपिल वर्णासारखे जे तीन पशु त्यांची देवता सोमवत् पितर, कपिल वर्णाचे व धुर्कट रंगासारखे जे तीन पशु त्यांची देवता बर्हिषत् पितर, हे पंधरा पशु एकोणिसाव्या यज्ञस्तंभाशीं बांधावे. काळे व कपिल वर्णासारखे जे तीन पशु त्यांची देवता अग्निष्वात्त पितर, काळे व ठिपक्याचे जे तीन पशु त्यांची देवता त्र्यंबक ॥ १८ ॥

उक्ताऽ संचराऽएता÷ शुनासीरीया÷ श्वेता वायव्याऽ श्वेताऽ सौर्याऽ ॥ १९ ॥

अर्थ—यापुढें शुनासीरीय पशु सांगतात. कृष्णग्रीव वगैरे जे पशु पूर्वी गेले ते विसाव्या यूपाशीं बांधावे. कपिल वर्णाच्या तीन पशूंची देवता सोम आहे. उपध्वस्त (निरनिराळ्या रंगांचें मिश्रण असलेले) असे जे तीन पशु त्यांची देवता सविता, हे पशु विसाव्या यूपाशीं बांधावे. तीन वासऱ्यांची देवता सरस्वती. कृष्ण वर्णाच्या तीन पशूंची देवता पूषा. काबऱ्या वर्णाच्या तीन पशूंची देवता शुनासीर. श्वेत वर्णाच्या तीन पशूंची देवता वायु, दुसऱ्या श्वेत वर्णाच्या तीन पशूंची देवता सूर्य, हे पंधरा पशु एकविसाव्या यूपाशीं बांधावे. येणेंप्रमाणें ग्राम्य पशु सांगितले ॥१९॥

विनियोग—यापुढें अरण्यपशु सांगतात. वर सांगितलेल्या एकवीस यज्ञस्तंभांचे वीस मध्यभाग होतात. त्या प्रत्येकांत एकेक आरण्यपशु योग्य साधनांनीं बांधावा. त्याचा नियोग ज्या देवतेकरितां आहे त्या पुढें दिल्या आहेत.

वसन्ताय कपिञ्जलानालभते ग्रीष्माय कलविङ्कान्वर्षाभ्यस्तित्तिरीञ्छ-रदे वर्तिका हेमन्ताय ककराञ्छिशिराय विकंकरान् ॥ २० ॥

अर्थ—पहिल्या दोन स्तंभांच्या मध्यभागीं तीन कपिंजल वसंत देवतेकरितां बांधावे, तीन कलविंक ग्रीष्म देवतेकरितां बांधावे, तीन तित्तिरिपक्षांची देवता वर्षा,

तीन वर्तिकांची देवता शरद, तीन ककरांची देवता हेमंत, तीन विककरांची देवता शिशिर ॥ २० ॥

समुद्राय शिशुमारानालभते पर्जन्याय मण्डूकान्नद्भ्यो मत्स्यान्मित्राय कुलीपयान्यरुणाय नाक्रान् ॥ २१ ॥

अर्थ—तीन शिशुमार (जलचर जंतु) यांची देवता समुद्र, तीन मंडूक (बेडूक) यांची देवता पर्जन्य, तीन मत्स्यांची देवता अप्, तीन कुलीपय (जलजन्य जंतु) यांची देवता मित्र, तीन नक्रांची देवता वरुण. ॥ २१ ॥

सोमाय हंसानालभते वायवे बलाकाऽइन्द्राग्निभ्यां क्रुञ्चान्मित्राय मद्गून्वरुणाय चक्रवाकान् ॥ २२ ॥

अर्थ—तीन हंसाची देवता सोम, तीन बलाका (बगळ्यांच्या स्त्रिया) यांची देवता वायु, तीन क्रुंच पक्ष्याच्या देवता इंद्र व अग्नि, तीन मद्गु (पाण्यांतील कावळे) यांची देवता मित्र, तीन चक्रवाकांची देवता वरुण ॥ २२ ॥

अग्नये कुटरूनालभते वनस्पतिभ्यऽउलूकानग्नीषोमाभ्यां चाषान्नभिभ्यां मयूरान्मित्रावरुणाभ्यां कपोतान् ॥ २३ ॥

अर्थ—तीन कुक्कुटांची देवता अग्नि, तीन उलूक (घुबड) यांची देवता वनस्पति, तीन चाष यांची देवता अग्नि व सोम, तीन मयूर यांची देवता अश्विनीकुमार, तीन कपोत यांची देवता मित्र व वरुण ॥ २३ ॥

सोमाय लबानालभते त्वष्ट्रे कौलीकान् गोषादीर्देवानां पत्नीभ्यः कुलीका देवजामिभ्योऽग्नये गृहपतये पारुष्णान् ॥ २४ ॥

अर्थ—तीन लावक पक्ष्यांची देवता सोम, तीन कौलीक पक्ष्यांची देवता त्वष्टा, गायीला मारणाऱ्या गोषादी नामक तीन पक्षिणींच्या देवता देवपत्नी, तीन कुलीक पक्षिणींच्या देवता देवबधू, तीन पारुष्ण संज्ञक पक्ष्यांची देवता गृहपति अग्नि.॥२४॥

अह्ने पारावतानालभते रात्र्यै सीचापूरहोरात्रयोः सन्धिभ्यो ऋतूर्मासेभ्यो दात्यौहान्संवत्सराय महतः सुपर्णान् ॥ २५ ॥

अर्थ—तीन पारावत पक्ष्यांची देवता अहन्, तीन सीचापू पक्षिणींची देवता

रात्रि, तीन पात्रसंज्ञक पक्षिणींची देवता अहोरात्र संधि, तीन दात्यूह (कलकण्ठ) संज्ञक पक्ष्यांची देवता माष, तीन मोठ्या पक्ष्यांची देवता संवत्सर ॥ २५ ॥

भूम्याऽआखूनालभतेऽन्तरिक्षाय पाङ्क्तान्दिवे कशान्दिग्भ्योनकुलान्वर्ष्मकानवान्तरदिशाभ्यः ॥ २६ ॥

अर्थ—तीन मूषकांची देवता भूमि, तीन पाङ्क्तसंज्ञक मूषकांची देवता अंतरिक्ष, तसेंच कशसंज्ञक तीन मूषकांची देवता द्युलोक, तीन नकुलांची देवता दिशा, तीन धूसर वर्णाच्या पशूंची देवता अवान्तर दिशा (पोटदिशा) ॥ २६ ॥

वसुभ्यऽऋश्यानालभते रुद्रेभ्यो रुरूणादित्येभ्यो न्यङ्कून् विश्वेभ्यो देवेभ्यः पृषतान् साध्येभ्यः कुलुङ्गान् ॥ २७ ॥

अर्थ—तीन ऋष्यसंज्ञक हरणांची देवता वसु, तीन रुरूंची देवता रुद्र, तीन न्यंकूंची (न्यंकूसंज्ञक) मृगांची देवता आदित्य, तीन ठिपके असलेल्या पशूंची देवता विश्वेदेव, तीन कुलुंग पशूंची देवता साध्य ॥ २७ ॥

ईशानाय परस्वतऽआलभते मित्राय गौरान्वरुणाय महिषान्बृहस्पतये गवयाँस्त्वष्ट्रऽउष्ट्रान् ॥ २८ ॥

अर्थ—तीन परस्वतसंज्ञक हरिणांची देवता ईशान, तीन गौरमृगांची देवता मित्र. तीन महिषांची देवता वरुण, तीन गव्यांची देवता बृहस्पति, तीन उष्ट्रांची देवता त्वष्टा ॥ २८ ॥

प्रजापतये पुरुषान्हस्तिनऽआलभते वाचे प्लुषीश्चक्षुषे मशकान्श्रोत्राय भृङ्गान् ॥ २९ ॥

अर्थ—तीन पुरुष हत्तींची देवता प्रजापति, तीन वाकड्या तोंडाच्या पशूंची देवता वाणी, तीन मशकांची देवता चक्षु, तीन भृंगांची देवता श्रोत्र ॥ २९ ॥

प्रजापतये च वायवे च गोमृगो वरुणायारण्यो मेषो यमाय कृष्णो मनुष्यराजाय मर्कटः शार्दूलाय रोहिद्वृषभाय गवयी क्षिप्रश्येनाय वर्तिका नीलङ्गोऽ कृमिः समुद्राय शिशुमारो हिमवते हस्ती ॥ ३० ॥

अर्थ—एका गवयाची देवता प्रजापति व वायु, एका वनमेंढ्याची देवता वरुण,

एका कृष्ण मेंढ्याची देवता यम, एका मर्कटाची देवता मनुष्यराज, एका रोहित पक्ष्याची देवता शार्दूल, एका गव्याच्या स्त्रीची देवता ऋषभ्, एका वर्तिकेची देवता क्षिप्रश्येन, एका कीटाची देवता नीलंगु, एका जलचराची देवता समुद्र, एका हस्तीची देवता हिमवान् ॥ ३० ॥

मयु॰ प्राजापत्यऽउलो ह्रलिक्ष्णो वृषदꣳ शस्ते धात्रे दिशां कꣳ धुꣳक्षाग्नेयी कलविङ्को लोहिताहि॰ पुष्करसादस्ते त्वाष्ट्रा वाचे क्रुञ्चः ॥ ३१ ॥

अर्थ—अश्वमुखी किन्नराची देवता प्रजापति, उलसंज्ञक हरिणाची देवता हलिक्ष्ण जातीचा सिंह, तीन बिडालांची देवता धाता, एका बकाची देवता दिशा, एका धुंक्षि पक्षिणीची देवता अग्नि, एका चटकाची देवता रक्तसर्प, तीन कमल भक्षण करणाऱ्या पक्ष्यांची देवता त्वष्टा, एका क्रुंच पक्ष्याची देवता वाक् ॥ ३१ ॥

सोमाय कुलुङ्गऽआरण्युोऽजो नकुल॰ शका ते पौष्णा॰ क्रोष्टा मायो-रिन्द्रस्य गौरमृग॰ पिद्वो न्यङ्कुः कङ्कटस्तेऽनुमत्यै प्रतिश्रुत्काये चक्र-वाक॰ ॥ ३२ ॥

अर्थ—एका कुरंगाची देवता सोम, वनांतील मेष, नकुल व शकुंति या तिघांची देवता पूषा, कोल्ह्याची देवता मायु, एका गौर मृगाची देवता इंद्र, पिद्वसंज्ञक मृग, न्यंकु आणि कङ्कट या तिघांची देवता अनुमति, एका चक्रवाकाची देवता प्रति-श्रुत्का ॥ ३२ ॥

सौरी बलाका शार्ग॰ सृंजय॰ शयाण्डकस्ते मैत्रा॰ सरस्वत्यै शारिः पुरुषवाक् श्वाविद्भौमी शार्दूलो वृक॰ पृदाकुस्ते मन्यवे सरस्वते शुकः पुरुषवाक् ॥ ३३ ॥

अर्थ—एका बलाकीची देवता सूर्य, शार्गसंज्ञक पक्षी, सृजयसंज्ञक पक्षी व शयाण्डक संज्ञक पक्षी या तिघांची देवता मित्र, माणसासारखे बोलणाऱ्या सारिकेची देवता सरस्वती, सेधा पक्ष्याची देवता भू, व्याघ्र, वृक व सर्प या तिघांची देवता मन्यु, माणसासारखे बोलणाऱ्या शुकाची देवता सरस्वान् म्हणजे समुद्र ॥ ३३ ॥

सुपर्ण॰ पार्जन्यऽआतिर्वाहसो दर्विदा ते वायवे बृहस्पतये वाचस्पतये पैङ्गराजो लजऽआन्तरिक्ष॰ प्लवो मद्गुर्मत्स्यस्ते नदीपतये यावापृथिवीयः कूर्म॰ ॥ ३४ ॥

अर्थ—गरुडाची देवता पर्जन्य, आति, वाहस व दार्विदा एतत्संज्ञक तीन पक्ष्यांची देवता वायु, पैंगराज पक्ष्याची देवता वाणीचा अधिपति बृहस्पति, अलज पक्ष्याची देवता अंतरिक्ष, प्लवसंज्ञक व मद्गुसंज्ञक जलपक्षी आणि मत्स्य या तिघांची देवता नदीपति, कच्छपा (कासव) ची देवता द्युलोक व पृथ्वीलोक ॥ ३४ ॥

पुरुषमृगश्चन्द्रमसो गोधा कालका दार्वाघाटस्ते वनस्पतीनां कङ्क-वाकः सावित्रो हꣳसो वातस्य नाक्रो मकरः कुलीपयस्तेऽकूपारस्य ह्रियै शल्यकः ॥ ३५ ॥

अर्थ—पुरुष मृग (नर मृग) याची देवता चंद्रमा, गोधा, कालका व दार्वा-घाट या तीघांची देवता वनस्पति, कोंबड्याची देवता सविता, हंसाची देवता वात, नाक्र, मकर व कुलीपय एतत्संज्ञक तीन जलचरांची देवता समुद्र, व शल्यकाची देवता ही देवी. ॥ ३५ ॥

पृष्यह्नो मण्डूको मूषिका तित्तिरिस्ते सर्पाणां लोपाशऽआश्विनः कृष्णो राज्याऽऋक्षो जतूः सुषिलीका तऽइतरजनानां जहका वैष्णवी ॥ ३६ ॥

अर्थ—हरिणीची देवता अहन्, मंडूक, मूषिका, व तित्तिरि या तिघांची देवता सर्प, लोपाशसंज्ञक वनचराची देवता अश्विनीकुमार, कृष्णमृगाची देवता रात्रि, ऋक्ष, जतू, सुषीलिका या तिघांची देवता इतरजनसंज्ञक देव, जहका (आपलें अंग आवरून धरणारी) हिची देवता विष्णु ॥ ३६ ॥

अन्यवापोऽर्धमासानामृश्यो मयूरः सुपर्णस्ते गन्धर्वाणामपामुद्रो मासां कश्यपो रोहितकुण्डृणाचीं गोलसिका तेऽप्सरसां मृत्यवेऽशितः ॥ ३७ ॥

अर्थ—कोकिल पक्ष्याची देवता अर्धमास, ऋष्यमृग, मयूख व सुपर्ण या तिघांची देवता गंधर्व, उद्र नांवाच्या जलचराची देवता अप, कश्यपसंज्ञक कासवाची देवता मास, रोहित, पुण्डृणाची संज्ञक वनचरी व गोलसिका या तिघांच्या देवता अप्सरा व कृष्णपशूची देवता मृत्यु ॥ ३७ ॥

वर्षाह्रूर्ऋतूनामाखुः कशो मान्थालस्ते पितॄणां बलायाजगरो वस्तूनां कपिञ्जलः कपोतऽउलूकः शशस्ते निर्ऋत्यै वरुणायारण्यो मेषः ॥ ३८ ॥

अर्थ—वेडकीची देवता ऋतु, मूषक, कश व मान्थाल या तिघांची देवता पितर,

अजगराची देवता बल, कपिञ्जलाची देवता वसु, कपोत, उलूक व शश यांची देवता निर्ऋति, रानटी मेंढ्याची देवता वरुण ॥ ३८ ॥

श्वित्रऽआदित्यानामुष्ट्रो घृणीवान् दार्भीनसस्ते मत्याऽअरण्याय सृमरो रुरू रौद्रꣳ कयिं÷ कुटरुर्दात्यौहस्ते वाजिनां कामाय पिकꣳ ॥ ३९ ॥

अर्थ—श्वेत पशूची देवता आदित्य, उष्ट्र, घृणिवान्संज्ञक पशु व ज्याच्या गळ्याला स्तन लोंबतो असा मेष या तिघांची देवता मतिदेवी, गव्याची देवता अरण्य, रुरु मृगाची देवता रुद्र, कयि, कुटरु, दात्यौह या तिघांची देवता वाजिदेव, कोकिलाची देवता काम ॥ ३९ ॥

खड्गो वैश्वदेवꣳ श्वा कृष्णꣳ कर्णो गर्दभस्तरक्षुस्ते रक्षꣳसामिन्द्राय सूकरꣳ सिꣳहो मारुतꣳ कृकलासꣳ पिप्पका शकुनिस्ते शरव्यायै विश्वेषां देवानां पृषतꣳ ॥ ४० ॥

अर्थ—खड्ग मृगाची देवता विश्वेदेव, काळा कुत्रा, लंबकर्ण गर्दभ व तरस या तिघांची देवता रक्षक, सूकराची देवता इंद्र, सिंहाची देवता मरुत्, सरडा, पिप्पका पक्षिणी व शकुनि या तिघांची देवता शरव्या, व एका पृषतसंज्ञक मृगाची देवता विश्वेदेव, याप्रमाणें अरण्यपशु संपले. ॥ ४० ॥

इति श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते
माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे वेदप्रकाशाख्ये चतुर्विंशोऽध्यायः समाप्तः॥२४॥

इति चतुर्विंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ पञ्चविंशोऽध्यायः ॥ २५ ॥



विनियोग—वनस्पतियागानंतर स्विष्टकृत्यागाचे पूर्वी लोखंडाच्या सळईवर शिजविलेल्या मांसाचा प्रजापतिदेवतेच्या निमित्तानें होम करावा. नंतर अश्वाच्या अंगांचा त्या त्या देवतेच्या निमित्तानें होम करावा. या मंत्रापासून नवव्या मंत्रांतील पृथ्वीत्वचा येथपर्यंतचा भाग द्रव्य व देवता यांचें कथन करितो म्हणजे दंत वगैरे तृतीयांत अश्वावयवरूपी द्रव्यांनीं शाद इत्यादि देवतांचें हवन करावें. उदाहरणार्थ होमाचा मंत्र " शादंदद्भिः प्रीणामिस्वाहा " असा आहे.

शादं॑ द॒न्भिर॑वकां॑ दन्तमू॒लैर्मृदं॑ वस्वैस्तेगां॑ दꣳष्ट्रा॒भ्या॒ꣳ सर॑स्वत्याऽ अग्रजि॒ह्वं जि॒ह्वाया॑ऽउत्सा॒दम॑वक॒न्देन॒ तालु॒ वाज॒ꣳ हनु॑भ्यामपऽआस्ये॒न वृ॒ष॒ण॒मा॒ण्डा॒भ्यां॑मादि॒त्यौँश्म॑श्रुभि॒ꣳ पन्थां॑नं भ्रू॒भ्यां॑ यावा॑पृथि॒वी व॑र्तो॒भ्यां॑ वि॒द्युतं॑ क॒नी॒न॒का॒भ्या॒ꣳ शु॒क्ला॒य स्वाहा॑ कृ॒ष्णा॒य॒ स्वाहा॒ पर्षी॑णि॒ पक्ष्मा॑ण्य॒-वार्षा॑ऽड॒क्षवो॑ऽवार्षा॑णि॒ पक्ष्मा॑णि॒ पार्षी॑ऽड॒क्षव॑ ÷ ॥ १ ॥

अर्थ—अश्वदंतांनीं शाददेवाला, दंतमूल भागांनीं अवकादेवतेला, दंताच्या अधोभागीं असलेल्या मांसांनीं मृत्तिकारूपी देवतेला, दोन दाढांनीं तेगासंज्ञक देवतेला, जिभेच्या अग्रभागानें सरस्वतीला, संपूर्ण जिभेनें उत्साददेवाला, टाळूच्या भागानें अवकंददेवाला, हनवटींनीं वाजदेवाला, मुखानें जलदेवतांना, अण्डभागांनीं वृषणदेवाला, मुखावरील केसांनीं आदित्याला, भ्रुकुटींनीं पंथादेवाला, भिवईवरील केसांनीं द्यावापृथ्वि देवतांना, नेत्रांतील बाहुल्यांनीं घोड्याच्या पांढऱ्या व काळ्या अंगांनीं प्रजापति देवतेला, पापण्यांनीं पार देवतेला, डोळ्याच्या खालच्या केसांनीं अवार देवतेला अथवा ह्याच्या पापण्यांनीं अवार देवतेला व डोळ्याच्या खालच्या केसांनीं पार देवतेला मी संतुष्ट करितों. ॥ १ ॥

वातं॑ प्रा॒णेना॑पा॒नेन॒ नासि॑केऽउपया॒ममधरे॒णौष्ठे॒न सदु॑त्तरे॒ण प्रका॑शो॒-नान्तर॑मनूका॒शेन॒ बा॒हूं नि॒वेष्यं॑ मू॒र्ध्ना स्त॑नयि॒त्नुं नि॒र्बा॒धे॒ना॒शनिं॑ म॒स्ति॒ष्के॒ण वि॒द्युत॑ क॒नी॒न॒का॒भ्यां॑ कर्णा॒भ्या॒ꣳ श्रोत्र॒ꣳ श्रोत्रा॑भ्यां॑ कर्णौ॑ ते॒व॒नि॒म॒धर॑कण्ठेना॒प॑ꣳ शु॒ष्क॒क॒ण्ठेन॑ चि॒त्तं म॑न्या॒भिर॑दिति॒ꣳ शी॒र्ष्णा नि॒र्ऋ॑तिं॑ नि॒र्ऋ॑त्या॒ शी॒र्ष्णा सꣳक्रो॒शे॑ꣳ प्रा॒णान् रे॒ष्मा॒णꣳ स्तु॒पेन ॥ २ ॥

अर्थ—अश्वाच्या प्राणवायूनें वायुदेवतेला, अपानवायूनें नासिकास्थ दोन देवतांना, खालच्या ओठानें उपयामदेवतेला, वरच्या ओठानें सत्संज्ञक देवतेला, वरच्या देहाच्या शरीरकांतीनें अंतरदेवाला, खालच्या देहाच्या शरीरकांतीनें बाह्यदेवाला, मस्तकानें निवेष्यदेवाला, डोक्यांतील मज्जाभागानें स्तनयित्नुदेवाला, मस्तकांतील मांसभागानें अशनिदेवाला, कनीनिकांनीं (बाहुल्या) विद्युद्देवतेला, कानांनीं श्रोत्र देवाला, गळ्याच्या खालच्या भागानें तेदनीदेवतेला, कंठांतील मांसरहित भागानें अपदेवतांना, मानेच्या मागच्या नाडींनीं चित्तदेवतेला, शिरोभागानें दितिदेवतेला, जर्जर अशा शिरोभागानें निर्ऋतिदेवतेला, घोडा चालत असतांना ज्या अवयवांचा शब्द होतो त्या अवयवांनीं प्राणदेवांना, उंच शिखेसारख्या अश्वशरीरानें रेष्मन्देवाला मी संतुष्ट करितों. ॥ २ ॥

मशकान्केशैरिन्द्रꣳ स्वपसा वहेन बृहस्पतिꣳ शकुनिसादेन कूर्माञ्छफैराक्रमणꣳ स्थूराभ्यांमृक्षलाभिꣳ कपिञ्जलां जवं जङ्घाभ्यामध्वानं बाहुभ्यां जाम्बीलेनारण्यमग्निमंतिरुग्भ्यां पूषणं दोर्भ्यामश्विनावꣳ सांभ्याꣳ रुद्रꣳ रोरांभ्याम् ॥ ३ ॥

अर्थ—खांद्यावरील केसांनीं मशकदेवांना खोगीर धारण करण्याचें उत्तम कार्य करणारा जो खांदा त्याचे योगानें इंद्राला, पक्ष्यांसारखें उसळी मारीत जें घोड्याचें चालणें त्यायोगें बृहस्पतिदेवाला, खुरांनीं कूर्मदेवांना, स्थूल अशा घोड्यांनीं आक्रमणदेवाला, घोड्याखालील नाड्यांनीं कपिञ्जलदेवांना, जंघांनीं जवदेवाला, गुडघ्यांनीं अध्वन्देवाला, पोटऱ्यांनीं अरण्यदेवाला, अत्यंत शोभायमान अशा जानुदेशांनीं अग्निदेवतेला, पुढील पायाच्या गुडघ्याखालील भागांनीं पूषन्देवाला, खांद्यांनीं अश्विनीदेवतांना, खांद्यावरील मांसग्रंथींनीं मी रुद्रदेवतेला प्रसन्न करितों. ॥ ३ ॥

अग्नेः पंक्षतिर्वायोर्निपक्षतिरिन्द्रस्य तृतीया सोमस्य चतुर्थ्यदित्यै पञ्चमीन्द्राण्यै षष्ठी मरुतां सप्तमी बृहस्पतेरष्टम्यर्यम्णो नवमी धातुर्दशमीन्द्रस्यैकादशी वरुणस्य द्वादशी त्वमस्य त्रयोदशी ॥ ४ ॥

अर्थ—उजव्या पार्श्वभागांतील पहिल्या हाडानें अग्निदेवतेला, त्याच भागांतील खालच्या हाडानें वायुदेवतेला, तसेंच तिसऱ्या हाडानें इंद्राला, चवथ्यानें सोमाला, पांचव्यानें अदितीला, सहाव्यानें इंद्राणीला, सातव्यानें मरुत्देवतांना, आठव्यानें बृहस्पतीला, नवव्यानें अर्यमादेवतेला, दहाव्यानें धातृदेवतेला, अकराव्यानें इंद्र-

देवतेला, बाराव्यानें वरुणदेवतेला, तेराव्यानें यमदेवतेला, (हीं तेरा हाडें उजव्या बाजूच्या पार्श्वभागांतील आहेत) मी प्रसन्न करितों. ॥ ४ ॥

इन्द्राग्न्योऽ पंक्षतिऽ सरस्वत्यै निपंक्षतिर्मित्रस्य तृतीयापां चतुर्थी निर्ऋत्यै पञ्चभ्युग्नीषोमयोऽ षष्ठी सर्पाणाᳬ सप्तमी विष्णोरष्टमी पूष्णो नवमी त्वष्टुर्दशमीन्द्रस्यैकादशी वरुणस्य द्वादशी यमाय त्रयोदशी द्यावा-पृथिव्योर्दक्षिणं पार्श्वं विश्वेषां देवानामुत्तरम् ॥ ५ ॥

अर्थ—डाव्या पार्श्वभागांतील हाडांच्या देवता—पहिल्या हाडाची देवता इंद्र व अग्नि, दुसऱ्याची सरस्वती, तिसऱ्याची मित्र, चवथ्याची अप, पांचव्याची निर्ऋति, सहाव्याची अग्नि व सोम, सातव्याची सर्पदेव, आठव्याची विष्णुदेव, नवव्याची पूषा, दहाव्याची त्वष्टा, अकराव्याची इंद्र, बाराव्याची वरुण, तेराव्याची यम या सर्व देवतांना या हाडांनीं मी संतुष्ट करितों. सगळ्या उजव्या पार्श्वभागाची देवता द्यावा-पृथिवी आहे व डाव्या पार्श्वभागाची देवता विश्वेदेव आहे. ॥ ५ ॥

मरुतामᳬ स्कन्धा विश्वेषां देवानां प्रथमा कीकसा रुद्राणां द्वितीया-दित्यानां तृतीया वायोऽ पुच्छमग्नीषोमयोर्भासदौ कुञ्चौ श्रोणिभ्यामिन्द्रा-बृहस्पतीऽऊरुभ्यां मित्रावरुणावल्गाभ्यामाक्रमणᳬ स्थूराभ्यां बलं कुष्ठा-भ्याम् ॥ ६ ॥

अर्थ—स्कंधांची देवता मरुत, घोड्याच्या पुच्छावर हाडांच्या तीन रांगा आहेत त्यांपैकीं पहिल्या रांगेची देवता विश्वेदेव, दुसरीची देवता रुद्र, तिसरीची देवता आदित्य, पुच्छभागाची देवता वायु, नितंबभागांची अग्निषोम, श्रोणींची देवता कुंच, उरूंची देवता इंद्र व बृहस्पति, उरुसंधीची देवता मित्रावरुण, नाभीजवळील नितंब भागांची देवता आक्रमण, नितंबावरील भोंवऱ्यांची देवता बल. या शरीरावयवांनीं या देवतांना मी संतुष्ट करितों. ॥ ६ ॥

पूषणं वनिष्ठुनान्धाहीन्स्थूलगुदया सर्पान्गुदाभिर्विहुतऽआन्त्रैरपो वस्तिना वृषणमाण्डाभ्यां वाजिनᳬ शेपेन प्रजाᳬ रेतसा चायोप्पित्तेन यदराम्मायुना कृशाञ्छकपिण्डैऽ ॥ ७ ॥

अर्थ—स्थूल आतड्यांची देवता पूषा, गुदाच्या स्थूल भागाची देवता अंधसर्प,

इतर गुदभागांची देवता सर्प, आतड्यांतील मासांची देवता विहृत, वस्तिभागाची देवता जल, अण्डभागांची देवता वृषण, लिंगाची देवता वाजदेव, वीर्याची देवता प्रजा, पित्ताची देवता तापदेव, गुदाच्या अवशिष्ट भागाची देवता प्रवरदेव, विष्ठा पिंडांचे देवता कूश्मदेव, पूर्वोक्त अंगांनीं पूर्वोक्त देवतांना मी संतुष्ट करितों. ॥ ७ ॥

इन्द्रस्य क्रोडोऽदित्यै पाजस्यं दिशां जत्रवोऽदित्यै भसज्जीमूतान्हृदयौपशेनान्तरिक्षं पुरीतता नभऽउदर्येण चक्रवाकौ मतस्नाभ्यां दिवं वृक्काभ्यां गिरीन्प्लाशिभिरुपलान्प्लीह्ना वल्मीकान्क्लोमभिर्गुल्मान्नाभिरापः स्रवन्तीर्हृदान्कुक्षिभ्यां समुद्रमुदरेण वैश्वानरं भस्मना ॥ ८ ॥

अर्थ—वक्षस्थलाच्या मध्यभागाची देवता इंद्र, बल उत्पन्न करणाऱ्या अंगाची देवता अदिति, खांदे व काखा यांच्या संधिभागांची देवता दिशा, लिंगाच्या अग्रभागाची देवता अदिति, हृदयस्थ मांसाची देवता जीमूत, हृदयाच्छादक आतड्याची देवता अंतरिक्ष, पोटांतील मांसाची देवता नभोदेव, हृदयाच्या दोन्ही बाजूंच्या हाडांची देवता चक्रवाक्, वृक्कांची देवता द्युलोक, शिश्नमूल नाडींची देवता गिरी, फुप्फुसांची देवता उपलदेव, क्लोमाची देवता वल्मीक, हृदयनाडींची देवता गुल्म, अन्नवाहिनी नाड्यांची देवता स्रवन्ती, डाव्या उजव्या कुक्षींची देवता ह्रददेव, उदराची देवता समुद्र, अंगावरील भस्माची देवता वैश्वानर, या पूर्वोक्त अंगांनीं या पूर्वोक्त देवतांना मी संतुष्ट करितों. ॥ ८ ॥

विधृतिं नाभ्यां घृतꣳ रसेनापो वृष्णा मरीचीर्विप्रुड्भिर्नीहारमूष्मणा शीनं वसया प्रुष्वाऽअश्रुभिर्ह्रादुनीं दूषीकाभिरस्ना रक्षाꣳसि चित्राण्यङ्गैर्नक्षत्राणि रूपेण पृथिवीं स्रुचा जम्बूकाय स्वाहा ॥ ९ ॥

अर्थ—नाभीची देवता विधृति, वीर्याची देवता घृत, पक्वान्नरसांची देवता जल, वसाबिंदूंची देवता मरीचि, शरीरांतील उष्णतेची देवता नीहार, मांसलेहाची देवता शीन, अश्रूंची देवता प्रुष्वा, नेत्रमलाची देवता ह्रादुनी, रक्ताची देवता रक्षस्, राहिलेल्या इतर अंगांची देवता चित्र, सौंदर्याची देवता नक्षत्र, चर्माची देवता पृथिवी या अंगांनीं या पूर्वोक्त देवतांच्या निमित्तानें मी घृताचा होम करितों. यानंतर 'जंबूकायस्वाहा' या मंत्रानें अवशृथ यागाचे शेवटीं पाण्यांत बुडी मारलेल्या, घाऱ्या डोळ्याच्या, टक्कल पडलेल्या, मोठे दांत असलेल्या, अत्यंत गौरवर्ण पुरुषाच्या

मस्तकावर घृताचा होम करावा. मंत्राचा अर्थ—वरुणाला हें हवि सुहुत असो (हारीत ऋषींचें असें मत आहे कीं, जुंबकायस्वाहा ही जुंबका नांवाची गायत्री आहे. पाण्यांत बुडून या गायत्रीचा जप केला असतां ब्रह्महत्त्येचें पाप नाहींसें होतें). ॥ ९ ॥

विनियोग—यापुढील चार मंत्र प्राजापत्य पशूंचे याज्यानुवाक्यारूपी आहेत.

हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेकऽआसीत्। स दाधार पृथिवीं द्यामुतेमां कस्मै देवाय हविषा विधेम ॥ १० ॥

अर्थ—हिरण्यपुरुषरूपी ब्रह्माण्डांत गर्भरूपानें असणारा प्रजाप्रति सर्व प्राणिसमुदायाच्यापूर्वी शरीर धारण करितां झाला. तो एकटाच पुढें उत्पन्न होणाऱ्या जगाचा स्वामी होता. तोच भूलोक, अंतरिक्ष लोक व द्युलोकाला धारण करिता झाला. त्या प्रजापति देवाला आम्ही हवि देतों. ॥ १० ॥

यः प्राणतो निमिषतो महित्वैकऽइद्राजा जगतोबभूव। यऽईशेऽअस्यद्विपदश्चतुष्पदः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ११ ॥

अर्थ—त्या प्रजापति देवतेला आम्ही हवि देतों जो जीवनव्यापार करणाऱ्या व नेत्रांची उघडझांप करणाऱ्या अर्थात् सर्व सचेतन जगाचा मोठ्या ऐश्वर्यानें एकटाच अधिपति झाला. तसेंच तो मनुष्यादि द्विपाद प्राण्यावर व गज वगैरे चतुष्पाद प्राण्यावर सत्ता चालवितो. ॥ ११ ॥

यस्येमे हिमवन्तो महित्वा यस्य समुद्रꣳ रसया सहाहुः। यस्येमाः प्रदिशो यस्य बाहू कस्मै देवाय हविषा विधेम ॥ १२ ॥

अर्थ—आम्ही प्रजापति देवतेला हवि देतों त्याचें हे हिमालयादि पर्वत नदीसह समुद्र व पूर्वादि दिशा ऐश्वर्य आहे असें शहाणे लोक म्हणतात व त्याचे बाहु जगाचें रक्षण करण्यास समर्थ आहेत ॥ १२ ॥

यऽआत्मदा बलदा यस्य विश्वऽउपासते प्रशिषं यस्य देवाः। यस्य च्छायामृतं यस्य मृत्युः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ १३ ॥

अर्थ—उपासकांना सायुज्यमुक्ति देणारा व सामर्थ्य देणारा आणि ज्याच्या आज्ञेंत सर्व देव आणि मनुष्यें राहतात व ज्याचें ज्ञानपूर्वक उपासन केलें असतां मोक्ष प्राप्त होतो व ज्याच्या अज्ञानानें संसारकारणीभूत मृत्यु येतो त्या प्रजापति देवतेला आम्ही हें हवि देतों ॥ १३ ॥

विनियोग—वैश्वदेव पशु, वपा व पुरोडाश पशूंच्या पुढील दहा ऋचा याज्यानुवाक्या आहेत.

आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतोऽदब्धासोऽअपरीतासऽउद्भिदः। देवा नो यथा सदमिद्वृधेऽअसन्नप्रायुवो रक्षितारो दिवेदिवे ॥ १४ ॥

अर्थ—कल्याणकारी, सर्व बाजूंनीं निर्विघ्न, पूर्वी अविज्ञात व अन्य यज्ञांची माहिती करून देणारे अशा यज्ञांचे कर्ते आम्ही होऊं. ज्यायोगें प्रमाद व आळस न करणारे व प्रत्येक दिवशीं रक्षण करणारे देव आमच्या वृद्धीमध्यें तत्पर राहतील ॥ १४ ॥

देवानां भद्रा सुमतिर्ऋजूयतां देवानाꣳरातिरभि नो निवर्तताम्। देवानाꣳसख्यमुपसेदिमा वयं देवा नऽआयुः प्रतिरन्तु जीवसे ॥ १५ ॥

अर्थ—यजमानाचें शुभचिंतन करणारे जे देव त्यांची आमच्याविषयीं चांगली बुद्धि होवो व ते आम्हाला दान देवोत. नंतर आम्ही देवाचे मित्र होऊं. व आम्हां मित्रांना पुष्कळ दिवस वांचण्याकरितां ते आयुष्य देवोत ॥ १५ ॥

तान्पूर्वया निविदा हूमहे वयं भगं मित्रमदितिं दक्षमस्रिधम्। अर्यमणं वरुणꣳ सोममश्विना सरस्वती नः सुभगा मयस्करत् ॥ १६ ॥

अर्थ—आम्ही भग, मित्र, अदिति, दक्ष, प्रजापति, अर्यमा, वरुण, सोम व अश्विनीकुमार या निश्चलस्वरूपी देवांना वेदरूपी प्राचीन स्वयंभू वाणीनें बोलावितों. महापूजनीया सरस्वती भगादि देवांसहवर्तमान आमचें कल्याण करो ॥ १६ ॥

तन्नो वातो मयोभु वातु भेषजं तन्माता पृथिवी तत्पिता द्यौः। तद्ग्रावाणः सोमसुतो मयोभुवस्तदश्विना शृणुतं धिष्ण्या युवम् ॥ १७ ॥

अर्थ—वारा आम्हाला हितकारक रीतीनें वाहो. तो आमचें सुखकारी हित करो. तसेंच पृथिवी व स्वर्ग आमचें तसलें हित करोत. सुखदाते सोमरसाचें कंडण करणारे पाषाण आमचें हित करोत. हे अश्विनीकुमारांनो, गृहाप्रमाणें धारण करणारे तुम्ही आमची वातादिकांकरितां केलेली हितप्रार्थना ऐका व तुम्हीही आमचें हित करा ॥ १७ ॥

तमीशानं जगतस्तस्थुषस्पतिं धियंजिन्वमवसे हूमहे वयम्। पूषा नो यथा वेदसामसद्वृधे रक्षिता पायुरदब्धः स्वस्तये ॥ १८ ॥

अर्थ—आम्ही त्या प्रसिद्ध रुद्राला संतुष्ट करण्याकरितां बोलावितों. तो स्थावर-जंगम प्राणिसमुदायांचा रक्षक आहे व आमच्या बुद्धीला संतोष देणारा आहे. तसेंच आम्ही ज्ञानरक्षक व पुत्रादिकांचा पालक व अविनाशी पूषा आमच्या बुद्धीला व कल्याणाला कारण होईल अशा तऱ्हेनें आम्ही त्याला बोलावतों ॥ १८ ॥

स्वस्ति नऽइन्द्रो वृद्धश्रवाः स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः । स्वस्ति नस्तार्क्ष्योऽअरिष्टनेमिः स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥ १९ ॥

अर्थ—मोठा कीर्तिमान् इंद्र व सर्वज्ञ पूषा आणि अविनाशी पंखांचा गरुड तसेंच देवगुरु बृहस्पति आमचें कल्याण करो ॥ १९ ॥

पृषदश्वा मरुतः पृश्निमातरः शुभंयावानो विदथेषु जग्मयः । अग्निजिह्वा मनवः सूरचक्षसो विश्वे नो देवाऽअवसा गमन्निह ॥ २० ॥

अर्थ—पृषतीसंज्ञक घोडीवर आरोहण करणारे, अदिति ज्यांची माता आहे, कल्याण प्राप्त करून देणारे, सर्वदा यज्ञगृहांत गमन करणारे, अग्निमुखानें हविर्भक्षण करणारे, सर्वज्ञ व सूर्य ज्यांचे नेत्र आहे असे सर्व मरुत आणि सर्व देव आमच्या यज्ञांत हवि मिळविण्याकरितां येवोत ॥ २० ॥

भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः । स्थिरैरङ्गैस्तुष्टुवाꣳसस्तनूभिर्व्यशेमहि देवहितं यदायुः ॥ २१ ॥

अर्थ—हे यजमानाचें पालन करणाऱ्या देवांनो, आम्ही कानांनीं चांगलें ऐकावें व डोळ्यांनीं चांगलें पहावें. दृढ शरीरावयवांनीं तुमची स्तुति करणारे आम्ही देवांनीं दिलेलें शंभर वर्षांचें आयुष्य प्राप्त करावें म्हणजे आम्हांला तुम्ही शंभर वर्षे आयुष्य द्या ॥ २१ ॥

शतमिन्नु शरदोऽअन्ति देवा यत्रा नश्चक्रा जरसं तनूनाम् । पुत्रासो यत्र पितरो भवन्ति मा नो मध्या रीरिषतायुर्गन्तोः ॥ २२ ॥

अर्थ—हे देवांनो, तुम्ही आम्ही म्हातारे होईपर्यंत अर्थात् शंभर वर्षे आमच्या-जवळ रहा. आम्हांला इतक्या म्हातारपणापर्यंत वांचवा कीं, तोंपर्यंत आमच्या मुलांना मुलें व्हावींत. त्याच्या आंत हें आमचें विनाशी जीवित नष्ट करूं नका ॥ २२ ॥

अदितिर्द्यौरदितिरन्तरिक्षमदितिर्मातासपितासपुत्रः । विश्वे देवाऽअदितिः पञ्चजनाऽअदितिर्जातमदितिर्जनित्वम् ॥ २३ ॥

अर्थ—द्युलोक, अंतरिक्ष, माता, पिता व पुत्र आणि सर्व देव हे अदितिस्वरूप आहेत. विशेष काय सांगावें ? पूर्वी झालेले व पुढें होणारे सर्व प्राणीही अदितिस्वरूपीच आहेत म्हणजे अदिति सर्वव्यापी आहे ॥ २३ ॥

विनियोग—" मानः " इत्यादि सोळा ऋचांच्या दोन अनुवाकांनीं घृताचा होम करावा.

मा नो मित्रो वरुणोऽअर्यमायुरिन्द्रऽऋभुक्षा मरुतः परिख्यन् । यद्वाजिनो देवजातस्य सप्तेः प्रवक्ष्यामो विदथे वीर्याणि ॥ २४ ॥

अर्थ—यज्ञांत आम्ही अश्वाच्या चरित्रांचें वर्णन करणार आहों त्याबद्दल मित्र, वरुण, अर्यमा, वायु, इंद्र, ऋभुक्षा इत्यादि देवांनीं आमची निंदा करूं नये. कारण कीं, आम्ही सूर्यापासून उत्पन्न झालेल्या अश्वाचीच स्तुति करणार आहोंत. म्हणजे अश्वरूपानें आम्ही ती देवांची स्तुति करितों ॥ २४ ॥

यन्निर्णिजा रेक्णसा प्रावृतस्य रातिं गृभीतां मुखतो नयन्ति । सुप्राङजो मेम्यद्विश्वरूपऽइन्द्रापूष्णोः प्रियमप्येति पाथः ॥ २५ ॥

अर्थ—ज्या वेळीं ऋत्विज् स्नान करून उटणें लावलेल्या व सोन्याचे मणि पुच्छास बांधलेल्या घोड्याच्या तोंडाशीं आज्य, सक्तु वगैरे नेतात त्यावेळीं ढोक्याला दोरी बांधलेला मे मे शब्द करणारा नाना रंगांचा अज तें आज्यसक्तु भक्षण करण्याकरितां येतो. व दुसरा नाभीजवळ बांधलेला इंद्र व पूषा यांचें आवडतें अन्न असलेला अजही पूर्वोक्त घृतसक्तु भक्षण करण्यास येतो ॥ २५ ॥

एष छागः पुरोऽअश्वेन वाजिना पूष्णो भागो नीयते विश्वदेव्यः । अभिप्रियं यत्पुरोडाशमर्वता त्वष्टेदेनꣳ सौश्रवसाय जिन्वति ॥ २६ ॥

अर्थ—ज्यावेळीं हा अग्नीचा हविर्भाग असलेला विश्वेदेवप्रिय अज वेगवान् अश्वाकडून पुढें नेला जातो त्यावेळीं प्रजाप्रतींत या—च्छागाला उत्तम कीर्ति देण्याकरितां संतुष्ट करितो. कारण कीं, तो अज देवांना संतुष्ट करणारा आणि हविर्भागरूपानें पुढें ठेवण्यास योग्य असा आहे ॥ २६ ॥

यद्धविष्यमृतुशो देवयानं त्रिर्मानुषाः पर्येश्वं नयन्ति। अत्रा पूष्णः प्रथमो भागऽएति यज्ञं देवेभ्यः प्रतिवेदयंभजः ॥ २७ ॥

अर्थ—ऋत्विज् ज्यावेळीं हविर्योग्य, आदित्याप्रमाणें गमन करणाऱ्या अश्वाकडून तीन वेळा अग्नीला प्रदक्षिणा घालवितात त्यावेळीं पोषण करणाऱ्या अग्नीचा हविर्भाग जो अज तो देवांना आपण आल्याची ओळख देण्याकरितां शब्द करीत पुढें येतो ॥ २७ ॥

होताध्वर्युरावयाऽअग्निमिन्धो ग्रावग्राभऽउत शꣳस्ता सुविप्रः। तेन यज्ञेन स्वरंकृतेन स्विष्टेन वक्षणाऽआपृणध्वम् ॥ २८ ॥

अर्थ—हे होत्रादि ऋत्विजांनो, प्रसिद्ध अश्वमेधयज्ञानें घृतकुल्या (घृताचे पाट) वगैरे नद्या घृतादिकांनीं पूर्ण भरा. यज्ञ करून फळ मिळवा. तो यज्ञ विप्र, हवि, दक्षिणा इत्यादिकांनीं सुशोभित आहे व चांगला हुत आहे. होत्रादि ऋत्विजांचा तपशील १ होता (देवाला बोलावणारा ऋत्विज) २ अध्वर्यु (यज्ञाची इच्छा करणारा) ३ आवयाः (सन्मुख उभा राहून होम करणारा) प्रतिप्रस्थाता ४ अग्निमिंधः (अग्नीला प्रदीप्त करणारा) अग्निध्र ५ ग्रावग्राभः (सोम कांडण्याचे दगडांची स्तुति करणारा) ६ शंस्ता (प्रशास्ता) ७ सुविप्रः (ब्रह्मा) ॥ २८ ॥

यूपव्रस्काऽउत ये यूपवाहाश्चषालं येऽअश्वयूपाय तक्षति। ये चार्वते पचनꣳ सम्भरन्त्युतो तेषामभिगूर्तिर्नऽइन्वतु ॥ २९ ॥

अर्थ—त्या ऋत्विजांचा प्रयत्न आमच्या यज्ञाची सिद्धि करो. ज्यांनीं यूपाकरितां झाड तोडलें, तोडलेलें लांकूड वाहून आणलें व यूपावरील चषाल नांवाचें काष्ठ तयार केलें आणि ज्यांनीं अश्वाकरितां पाकसाधन असे काष्ठभाण्डादिक आणले त्या ऋत्विजांचा उद्योग आमचा यज्ञ सिद्ध करो ॥ २९ ॥

उप प्रागात्सुमन्मे धाइऽमन्म देवानामाशाऽउप वीतपृष्ठः। अन्वेनं विप्राऽऋषयो मदन्ति देवानां पुष्टे चकृमा सुबन्धुम् ॥ ३० ॥

अर्थ—आमचें इष्टफल स्वतः आमचेकडे येवो. तें फल आम्हीं धारण केलें आणि ज्यांच्या पृष्ठावर बसण्यास सर्व इच्छितात असा अश्व देवांचें मनोरथ पूर्ण करण्याकरितां आमच्याकडे येवो. आम्ही देवांच्या पोषणाच्या निमित्तानें ज्या घोड्याला

चांगल्या तऱ्हेनें बांधून ठेवलें त्याला बुद्धिमान् ऋषि (मंत्रद्रष्टे) ऋत्विज अनुमोदन देवोत. अर्थात् त्या अश्वाकडे पाहून ऋत्विज् संतुष्ट होवोत. ॥ ३० ॥

यद्वाजिनो दाम संदानमर्वतो या शीर्षण्या रशना रज्जुरस्य । यद्वा घास्य प्रभृतमास्ये तृणꣳ सर्वा ता तेऽअपि देवेष्वस्तु ॥ ३१ ॥

अर्थ—हे यजमाना, वेगवान अशा अश्वाच्या गळ्यांत असलेली दोरी, डोक्यावर असलेली दोरी, पायांत असलेला दोरीचा बंध, तसेंच हे अश्वा, तुझ्या तोंडांतील प्रभृत तृण हीं सर्व देवाच्या उपयोगाला पडोत ॥ ३१ ॥

यदश्वस्य क्रविषो मक्षिकाश यद्वा स्वरौ स्वधितौ रिप्तमस्ति । यद्धस्तयोः शमितुर्यन्नखेषु सर्वा ता तेऽअपि देवेष्वस्तु ॥ ३२ ॥

अर्थ—मक्षिकेनें अश्वाचा जो मांसभाग भक्षण केला व घोड्याला उटणें लावीत असतां स्वरुपात्राला जो भाग चिकटला, जें घोड्याचें मांस अंग कापीत असतां शस्त्राला चिकटलें व जें अश्वाला मारणाराच्या हाताला व नखाला चिकटलें तीं सर्व देवोपयोगी होवोत. ॥ ३२ ॥

यदूवध्यमुदरस्यापवाति यऽआमस्य क्रविषो गन्धोऽअस्ति । सुकृता तच्छमितारः कृण्वन्तूत मेधꣳ शृतपाकं पचन्तु ॥ ३३ ॥

अर्थ—खाल्लेल्या तृणाचा जो अपक्व भाग आमाशयांत राहतो त्याला ऊवध्य म्हणतात. तो दुर्गंध उत्पन्न करितो. त्या आममांसभागाचा जो दुर्गंध त्याला विशसिते सुसंस्कृत म्हणजे दोषरहित करोत तसेंच मेध्य अश्वाला ते पाक करणारे योग्य रीतीनें शिजवोत म्हणजे अतिपक्व किंवा किंचित् पक्व न करोत म्हणजे योग्य शिजवोत ॥ ३३ ॥

यत्ते गात्रादग्निना पच्यमानादभिशूलं निहतस्यावधावति । मा तद्भूम्यामाश्रिषन्मा तृणेषु देवेभ्यस्तदुशद्भ्यो रातमस्तु ॥ ३४ ॥

अर्थ—हे अश्वा, तुझें अंग अग्नीवर शिजविलें जात असतां त्याचा जो रस खालीं गळतो तसेंच तें लोखंडाच्या सळईवर भाजलें जात असतां जो भाग खालीं गळून पडतो तो जमिनीवर अगर तृणावर न राहो. तर हविर्भागाची इच्छा करणाऱ्या देवांना तो दिला जावो ॥ ३४ ॥

वे वाजिनं परिपश्यन्ति पक्वं यऽईमाहुः सुरभिर्निर्हरेति । ये चार्वतो मांꣳ सभिक्षामुपासतऽउतो तेषामभिगूर्तिर्नऽइन्वतु ॥ ३५ ॥

अर्थ—ज्यांना हा अश्व परिपक्व झाला असें समजतें व हा पाक सुगंधि झाला आतां अग्नीवरून बाहेर काढा असें जे म्हणतात आणि जे हुतशिष्ट अश्वमांसाची याचना करितात त्या लोकांचा उद्योग आम्हाला प्रसन्न करो ॥ ३५ ॥

यन्नीक्षणं माँ स्पचन्याऽउखाया या पात्राणि यूष्णऽआसेचनानि । ऊष्मण्यापिधानाँ चरूणामङ्काꣳ सूनाꣳ परिभूषन्त्यश्वम् ॥ ३६ ॥

अर्थ—पुढील पदार्थ अश्वाला भूषित करितात. १ मांस शिजविण्याच्या भांड्याकडे मांस शिजलें कीं नाहीं याकरितां पुनः पुनः पाहणें. २ शिजलेला मांसरस ज्यांत ओतावयाचा तीं भांडीं. ३ उष्णता धारण करणारीं (मांसरस निवूं न देणारी) मांसरस-पात्रांचीं झांकणें. ४ हृदयादि अवयव दाखविणारीं वेताचीं साधनें. ५ हिंसा करण्यास साधनीभूत खड्ग वगैरे ॥ ३६ ॥

मा त्वाग्निर्ध्वनयीद्धूमगन्धिर्मोखा भ्राजन्त्यभिविक्त जघ्रिः । इष्टं वीतमभिगूर्तं वषट्कृतं तं देवासऽउप्रतिगृभ्णन्त्यश्वम् ॥ ३७ ॥

अर्थ—हे शिजल्या जाणाऱ्या अश्वाच्या अवयवा, तूं शिजत असतां ज्यांत धूर होत आहे असा अग्नि तुझा सिमसिम असा शब्द न करो. फार उष्णतेनें प्रकाशित होणारी स्थाली (शिजविण्याचें भांडें) न हालो. ती स्थाली देवतेचें गंधग्राहक घ्राण आहे. प्रयाजांनीं होमलेला आग्नीसूक्तांनीं अग्नीला प्रदक्षिणा घातलेला "ये यजामहे" इत्यादि शब्दांनीं आघोषित केला गेलेला आणि वषट्कारांनीं संस्कृत अशा अश्वाला देव ग्रहण करो ॥ ३७ ॥

निक्रमणं निषदनं विवर्तनं यच्च पड्वीशमर्वतः । यच्च पपौ यच्च घासिं जघास सर्वा ता तेऽअपि देवेष्वस्तु ॥ ३८ ॥

अर्थ—हे अश्वा, तुझी हिंसा होत असतां तूं जें इकडे तिकडे हिंडलास, बसलास, लोळलास व बंधस्थानाकडे गेलास आणि तुझ्या क्रिया व जें जलपान केलें, तृणादि भक्षण केलें त्याही सर्व क्रिया देवाला उपयोगी होवोत ॥ ३८ ॥

यदश्वाय वासऽउपस्तृणन्त्यधीवासं या हिरण्यान्यस्मै । संदानमर्वन्तं पड्वीशं प्रियादेवेष्वायामयन्ति ॥ ३९ ॥

अर्थ—ऋत्विज पुढील प्रिय वस्तू देवाकडे पोंचवितात. १ घोड्याचें पांघरावयाचें वस्त्र. २ घोड्याच्या अंगावर घातलेले सोन्याचे दागिने. ३ त्याच्या डोक्यावरील दोरी. ४ व पायाचा बंध. ॥ ३९ ॥

यत्ते सादे महसा शूकृतस्य पार्ष्ण्या वा कशया वा तुतोद । स्रुचेव ता हविषोऽअध्वरेषु सर्वा ता ते ब्रह्मणा सूदयामि ॥ ४० ॥

अर्थ—हे अश्वा, घोडेस्वार मोठा शूत्कार करून धांवणाऱ्या तुला, चाबकानें मारता झाला. तें सर्व मारणें यज्ञामध्यें स्रुचेनें हविर्भाग द्यावा त्याप्रमाणें समंत्र मी आहुतिरूपानें कल्पित करितों. म्हणजे ती यज्ञाची आहुति असें समजतों. ॥ ४० ॥

चतुस्त्रिꣳशद्वाजिनो देवबन्धोर्वङ्क्रीरश्वस्य स्वधितिꣳ समेति । अच्छिद्रा गात्रा वयुना कृणोत परुष्परुरनुधुष्या विशस्त ॥ ४१ ॥

अर्थ—वेगवान आणि देवप्रिय अशा घोड्याच्या पाठीवरील दोन्ही भागांचीं चौतीस हाडें कापण्याकरितां खड्ग संचार करितें म्हणून हे ऋत्विजांनो ज्ञानाच्या योगानें तुम्ही घोड्याचीं शरीरे छिद्ररहित करा. व प्रत्येक पर्वांचें (पेराचें) नांव घेऊन तुम्ही त्याचा छेद करा. ॥ ४१ ॥

एकस्त्वष्टुरश्वस्या विशस्ता द्वा यन्तारा भवतस्तथऽऋतुꣳ । या ते गात्राणामृतुथा कृणोमि ता ता पिण्डानां प्रजुहोम्यग्नौ ॥ ४२ ॥

अर्थ—प्रदीप्त अशा अश्वाला मारणारा कालात्मा प्रजापति आहे तसेंच त्याला नियमन करणारे द्यावापृथिव्यभिमानी देव आहेत. हे अश्वा, तुझ्या शरीरावरील मांसपिंडाचे जे मी खंड करितों ते वसंतादि यज्ञकालामध्यें अग्नींत होमतों ॥ ४२ ॥

मा त्वा तपत्प्रियऽआत्मा प्रियन्तं मा स्वधितिस्तन्वꣳऽआतिष्ठिपत्ते । मा ते गृध्नुरविशस्तातिहाय छिद्रा गात्राण्यसिना मिथूकः ॥ ४३ ॥

अर्थ—हे अश्वा, तूं देवलोकांत जात असतां तुला तुझा देह दुःखित न करो म्हणजे देहवियोगजनित पीडा तुला न होवो. शस्त्र तुझीं शरीरें शिल्लक न ठेवो म्हणजे सर्व अंगें कापून देवांना देवो. व कुशल नसलेला शमिता तुझीं अंगें शास्त्रोक्त क्रम सोडून अयोग्य रीतीनें न कापो. जर तो मांसभक्षणलोलुप होईल तर अयोग्य कापील तसें त्यानें न करावें तर योग्य रीतीनें कापावें. ॥ ४३ ॥

न वाऽउऽएतन्म्रियसे न रिष्यसि देवाँ२ ॥ इदेषि पथिभिः सुगेभिः । हरी ते युञ्जा पृषतीऽअभूतामुपास्थाद्वाजी धुरि रासभस्य ॥ ४४ ॥

अर्थ—हे अश्वा, यज्ञांत मरण्यानें तुझा हा मृत्यु नव्हे व तुझी ही व्यर्थ हिंसाही नव्हे कारण कीं, तूं जाण्यास उत्तम साधनीभूत अशा देवमार्गांनीं जात आहेस. हे अश्वा, तुला नेण्याकरितां इंद्राचे घोडे रथाला जोडले जातात. तसेंच मरुतांचें वाहन पृषतीसंज्ञक तुझ्या रथाला जोडले जातात. तसेंच अश्वीचें वाहन जो रासभ त्याच्या जागीं घोडा जोडला जातो अर्थात् यज्ञांत मारल्यामुळें देवस्वरूपी झालेल्या अशा तुला स्वर्गांत नेण्याकरितां इंद्रादि आपापलीं वाहनें पाठवितील. ॥ ४४ ॥

सुगव्यं नो वाजी स्वश्व्यं पुꣳसः पुत्राँ२ ॥ उत विश्वापुषꣳ रयिम् । अनागास्त्वं नोऽअदितिः कृणोतु क्षत्रं नोऽअश्वो वनताꣳ हविष्मान् ॥ ४५ ॥

अर्थ—या मंत्रांत प्रार्थना आहे. देवस्वरूपी झालेला अश्व आम्हाला पुष्कळ गायी, पुष्कळ चांगले घोडे, पुत्र, सर्वजनपोषक असें द्रव्य देवो, व निष्पाप करो. तसेंच अखंडित, ज्याचे अवयव हविर्भूत झाले असा अश्व आमचें दुसऱ्याच्या पीडेपासून रक्षण करो ॥ ४५ ॥

विनियोग—अश्वलोहित होमानंतर " इमोनु कम् " इत्यादि दोन ऋचांतील द्विपदांचा होम करावा.

इमा नु कं भुवना सीषधामेन्द्रश्च विश्वे च देवाः । आदित्यैरिन्द्रः सगणो मरुद्भिरस्मभ्यं भेषजा करत् । यꣳ च नस्तन्वं च प्रजां चादित्यैरिन्द्रः सह सीषधाति ॥ ४६ ॥

अर्थ—या भुवनांना आम्ही वश करितों. ऐश्वर्यवान् सपरिवार असा देवेंद्र व विश्वेदेव, द्वादश आदित्य व एकूणपन्नास मरुत्गणासहवर्तमान आमचें कल्याण करो व तो इंद्र आदित्यासह आमचा अश्वमेध यज्ञ, शरीर व पुत्रादिक प्रजा यांना सिद्ध करो ॥ ४६ ॥

अग्ने त्वं नोऽअन्तमऽउत त्राता शिवो भवा वरूथ्यः । वसुरग्निर्वसुश्रवाऽअच्छा नक्षि द्युमत्तमꣳ रयिं दाः । तं त्वा शोचिष्ठ दीदिवः सुम्नायं नूनमीमहे सखिभ्यः ॥ ४७ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं सर्वदा आमच्याजवळ रहा. आमचें पालन कर व शांत होऊन

आमच्या पुत्रादिकांचें रक्षण कर. तूं सर्व लोकांचें आश्रयस्थान आहेस. आहवनीयादि रूपानें गमन करणारा व धनदाता म्हणून ज्याची कीर्ति आहे अशा हे अग्ने, तूं निर्मल स्वभावाचा होऊन आमच्या होमस्थानाप्रत ये, म्हणजे जेव्हां जेव्हां आम्ही होम करूं तेव्हां तेव्हां तूं प्राप्त हो. आणि अत्यंत प्रकाशयुक्त द्रव्य आम्हांला दे. ज्वालायुक्त व सर्व प्रकाशक अग्ने, आम्ही तुजकडे आमच्या मित्राच्या कल्याणाची निश्चयेंकरून याचना करितों. समिद्धो अञ्जन् २९।१ हा आश्वमेधिक अध्याय आहे. ह्या वचनावरून हौत्रांत त्या मंत्रांचा विनियोग आहे तेवढे मंत्र अश्वमेधांत घेतले म्हणजे सत्तावीस वर्षांनीं पुरा होणारा अश्वमेध यज्ञ येथें संपला ॥ ४७ ॥

इति श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते

माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे वेदप्रकाशाख्ये पंचविंशोऽध्यायः ॥ २५ ॥

इति पञ्चविंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ षड्विंशोऽध्यायः ॥ २६ ॥

विनियोग—" इषेत्वा " इत्यादि पहिल्या अध्यायापासून दर्शपौर्णमास, पितृयज्ञ, अग्निहोत्रोपस्थान, पशु, चातुर्मास्य अग्निष्टोम, वाजपेय, राजसूय, अग्नि, सौत्रामणि, अश्वमेध या यज्ञांसंबंधीं मंत्रांचें व्याख्यान केलें. यापुढें आलेले मंत्र खिल आहेत. त्यांचा कोणत्याही यज्ञक्रमींत विनियोग नाहीं.

अग्निश्च पृथिवी च संनते ते मे संनमतामदो वायुश्चान्तरिक्षं च संनते ते मे संनमतामदऽआदित्यश्च द्यौश्च संनते ते मे संनमतामदऽआपश्च वरुणश्च संनते ते मे संनतामदः। मन्न सप्तऽसदोऽअष्टमी भूतसाधनी सकामाँ२ ॥ अध्वनस्कुरु संज्ञानमस्तु मेऽमुना ॥ १ ॥

अर्थ—अग्नि व पृथिवी एकमतानें माझा अमुक शत्रु माझ्या स्वाधीन करो असेंच वायु आणि अंतरिक्ष, आदित्य आणि द्युलोक व जल आणि वरुण एकमतानें माझा अमुक शत्रु माझ्या स्वाधीन करोत. यापुढें परमात्म्याची प्रार्थना—हे परमेश्वरा, अग्नि, वायु, अंतरिक्ष, आदित्य, द्युलोक, जल व वरुण हीं तुझीं सात अधिष्ठानें व सर्व प्राण्यांची उत्पादक पृथ्वी ही आठवी असे आपल्या मार्गांना सकाम करोत. म्हणजे आम्ही ज्या मार्गानें जाऊं त्यांत आमचें इच्छित सफल होवो. माझी या देवदत्तादि पुरुषाबरोबर संगति होवो म्हणजे त्याचें व माझें मत एक असो ॥ १ ॥

यथेमां वाचं कल्याणीमावदानि जनेभ्यः। ब्रह्मराजन्याभ्याꣳ शूद्राय चार्याय च स्वाय चारणाय च। प्रियो देवानां दक्षिणायै दातुरिह भूयासमयं मे कामः समृध्यतामुप मादो नमतु ॥ २ ॥

अर्थ—मी ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र, वैश्य, आत्मीय व परका अशा सर्व लोकांना ' यांना अन्न द्या, तुम्ही उत्तम भक्षण करा '; इत्यादि गोड वाक्यें बोलतों म्हणून मी देवांना व या संसारांत दक्षिणेला व दात्याला प्रिय होवो. माझी ही इच्छा सफल होवो व हा देवदत्तादि माझा मित्र मला संतुष्ट करो ॥ २ ॥

बृहस्पतेऽअति यदर्योऽअर्हाद्द्युमद्विभाति क्रतुमज्जनेषु। यद्दीदयच्छवसऽऋतप्रजात तदस्मासु द्रविणं धेहि चित्रम्। उपयामगृहीतोऽसि बृहस्पतये त्वैष ते योनिर्बृहस्पतये त्वा ॥ ३ ॥

अर्थ—हे सत्यब्रह्मापासून उत्पन्न झालेल्या वेदपालक बृहस्पते, श्रीमंताला योग्य असें नाना प्रकारचें द्रव्य आमच्या यजमानांना दे. जें कांतिमान द्रव्य या लोकांमध्यें प्रकाशतें व ज्यायोगें पुष्कळ यज्ञ केले जातात व ज्या द्रव्यानें दुसरे द्रव्य मिळतें असें द्रव्य दे. हे बार्हस्पत्य पात्रा, तुझें मी बृहस्पतीकरितां उपयामपात्रानें ग्रहण करितों. हें तुझें स्थान आहे. यावर बृहस्पतीकरितां तुझें मी स्थापन करितों ॥ ३ ॥

इन्द्र गोमन्निहायाहि पिबा सोमꣳ शतक्रतो । वियद्भिर्ग्रावभिꣳ सुतम् । उपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा गोमतऽएष ते योनिरिन्द्राय त्वा गोमते ॥४॥

अर्थ—शंभर यज्ञ करणाऱ्या हे स्तुतियुक्त इंद्रा, तूं या यज्ञांत ये व सोमपान कर. विशेषेंकरून खंडन (कंडण) करणाऱ्या पाषाणांनीं कुटला गेलेला जो सोमरस त्याचें पान कर. हे पात्रा, तुझें मी गोमानइंद्राकरितां उपयामपात्रानें ग्रहण करितों. हे तुझें स्थान आहे. यावर गोमानइंद्राकरितां तुझें मी स्थापन करितों ॥ ४ ॥

इन्द्रायाहि वृत्रहन्पिबा सोमꣳ शतक्रतो । गोमद्भिर्ग्रावभिꣳ सुतम् । उपयामगृहीतोऽसीन्द्राय त्वा गोमतऽएष ते योनिरिन्द्राय त्वा गोमते ॥५॥

अर्थ—वृत्रासुराला मारणाऱ्या व शंभर यज्ञ करणाऱ्या इंद्रा, तूं ये व स्तुत्य अशा पाषाणांनीं कंडण केलेल्या सोमरसाचें पान कर. हे पात्रा, तुझें मी उपयामपात्रानें गोमानइंद्राकरितां ग्रहण करितों. हें तुझें स्थान आहे. यावर गोमानइंद्राकरितां तुझें मी स्थापन करितों ॥ ५ ॥

ऋतावानं वैश्वानरमृतस्य ज्योतिषस्पतिम् । अजस्रं घर्ममीमहे । उपयामगृहीतोऽसि वैश्वानराय त्वैष ते योनिर्वैश्वानराय त्वा ॥ ६ ॥

अर्थ—आम्ही यज्ञसमाप्तीकरितां सत्ययुक्त अविनाशी तेजाचा पालक अक्षय्य व प्रदीप्त अशा वैश्वानराची स्तुति करितों. हे पात्रा, तुझें मी उपयामपात्रानें वैश्वानराकरितां ग्रहण करितों. हे तुझें स्थान आहे. त्यावर वैश्वानराकरितां तुझें मी स्थापन करितों ॥ ६ ॥

वैश्वानरस्य सुमतौ स्यामꣳ राजा हि कं भुवनानामभिश्रीः । इतो जातो विश्वमिदं विचष्टे वैश्वानरो यतते सूर्येण उपयामगृहीतोऽसि वैश्वानराय त्वैष ते योनिर्वैश्वानराय त्वा ॥ ७ ॥

अर्थ—आमच्याविषयीं वैश्वानराची सद्बुद्धि असो. कारण कीं, वैश्वानर या

अरणींतून उत्पन्न होऊन जगांतील मनुष्यांना त्यांच्या कर्माप्रमाणें फल देतो व सूर्याबरोबर तेजानें स्पर्धा करितो म्हणजे तो सूर्यासारखा तेजस्वी आहे. व तो प्रकाशमान असून भुवनांतील सर्व प्राण्यांना सेव्य आहे. हे पात्रा, तुझें मी उपयामपात्रानें वैश्वानराकरितां ग्रहण करितों. हें तुझें स्थान आहे. त्यावर वैश्वानराकरितां तुझें मी स्थापन करितों ॥ ७ ॥

वैश्वानरो नऽऊतयऽआ प्रयातु परावतः । अग्निरुक्थेन वाहसा । उपयामगृहीतोऽसि वैश्वानरायैष ते योनिर्वैश्वानरायै त्वा ॥ ८ ॥

अर्थ—वैश्वानर आमच्या रक्षणाकरितां दूर देशांतून उक्थस्तोमरूपी वाहनावर बसून येवो. हे पात्रा, तुझें मी उपयामपात्रानें वैश्वानराकरितां ग्रहण करितों. हें तुझें स्थान आहे. त्यावर वैश्वानराकरितां तुझें मी स्थापन करितों ॥ ८ ॥

अग्निर्ऋषिः पवमानः पाञ्चजन्यः पुरोहितः । तमीमहे महागयम् । उपयामगृहीतोऽस्यग्नये त्वा वर्चसऽएष ते योनिरग्नये त्वा वर्चसे ॥ ९ ॥

अर्थ—आम्ही अत्यंत स्तुत्य अशा अग्नीची प्रार्थना करितों. तो अग्नि मंत्रद्रष्टा, पवित्र करणारा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व निषाद यांचा हितकर्ता व यज्ञांत अग्रभागीं स्थापन केलेला असा आहे. हे पात्रा, तुझें मी उपयामपात्रानें तेजोरूपी अग्नीकरितां ग्रहण करितों. हें तुझें स्थान आहे. त्यावर तेजोरूपी अग्नीकरितां तुझें मी स्थापन करितों ॥ ९ ॥

महाँ२॥ इन्द्रो वज्रहस्तः षोडशी शर्म यच्छतु । हन्तु पाप्मानं योऽस्मान्द्वेष्टि । उपयामगृहीतोऽसि महेन्द्राय त्वैष ते योनिर्महेन्द्राय त्वा ॥ १० ॥

अर्थ—इंद्र आमचें कल्याण करो. व जो आमचा द्वेष करितो त्या शत्रूला मारो. तो इंद्र श्रेष्ठ आहे, त्याचे हातांत वज्र आहे व तो आत्मस्वरूपी असल्यामुळें पंचप्राण, दश इंद्रियें व मन हे सोळा पदार्थ लिंगशरीररूपानें त्यांत वास करितात. हे पात्रा, तुझें मी उपयामपात्रानें इंद्राकरितां ग्रहण करितों. हें तुझें स्थान आहे. त्यावर इंद्राकरितां मी तुझें स्थापन करितों ॥ १० ॥

तं वो वस्समृतीषहं वसोर्मन्दानमन्धसः । अभि वत्सं न स्वसरेषु धेनवऽ इन्द्रं गीर्भिर्नवामहे ॥ ११ ॥

अर्थ—हे यजमानांनो, त्या इंद्राची आम्ही स्तुति करितों. तो दर्शनीय व

आपल्या गमनानें शत्रूला नाश करणारा स्थितिकारी अन्नानें आनंदित होणारा असा आहे. प्रत्येक दिवशीं नवीन प्रसवलेल्या गाई आपल्या वत्सांना हंबरण्याच्या शब्दानें ज्याप्रमाणें बोलावतात त्याप्रमाणें आम्ही इंद्राची स्तुति करितों ॥ ११ ॥

यद्वाहिष्ठं तदग्नये बृहदर्च विभावसो। महिषीव त्वद्रयिस्त्वद्वाजाऽ उदीरते ॥ १२ ॥

अर्थ—हे उद्गात्या, इष्ट फलांची अत्यंत प्राप्ति करून देणाऱ्या बृहत् सामाचें तूं अग्नीकरितां गायन कर, व सामगायनानें प्रत्यक्ष झालेल्या अग्नीला असें सांग कीं, कांति हेंच ज्याचें द्रव्य आहे अशा हे अग्ने, तुझ्यापासून, जशी प्रथम परिणीत स्त्री अंतर्गृहांतून पतीकडे उपभोगार्थ जाण्याकरितां निघते, त्याप्रमाणें द्रव्य व अन्नें निघतात. ॥ १२ ॥

पह्यू षुवाणि तेऽग्नऽइत्थेतरा गिरः। एभिर्वर्धासऽइन्दुभिः ॥ १३ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं ये. मी तुझी अशा तऱ्हेनें उत्तम स्तुति करितों. तूं या सोमरसाचे योगानें वाढ. ॥ १३ ॥

ऋतवस्ते यज्ञं वितन्वन्तु मासा रक्षन्तु ते हविः। संवत्सरस्ते यज्ञं दधातु नः प्रजां च परिपातु नः ॥ १४ ॥

अर्थ—हे अग्ने, ऋतुकाल तुझा यज्ञ करोत. चैत्रादि मासाधिष्ठित देव तुझें पुरोडाशादि हविर्द्रव्य रक्षण करो. संवत्सराधिष्ठाता देव तुझ्याकरितां आमचा यज्ञ धारण करो व तोच आमच्या पुत्रादि प्रजेचें रक्षण करो. ॥ १४ ॥

उपह्वरे गिरीणाꣳ संगमे च नदीनाम्। धिया विप्रोऽअजायत ॥ १५ ॥

अर्थ—ब्राह्मण माझ्या सहाय्यानें यज्ञ करितील या बुद्धीनें पर्वतांच्या समीप व गंगादि नद्यांच्या संगमावर सोम उत्पन्न झाला. ॥ १५ ॥

उच्चा ते जातमन्धसो दिविसद्भूम्याददे। उग्रꣳ शर्म महि श्रवः ॥ १६ ॥

अर्थ—हे सोमा, तुझ्या रसापासून उत्पन्न झालेलें होमजन्य, स्वर्गस्थ अपूर्व पृथ्वी ग्रहण करिते तें अपूर्व उत्कृष्ट, सुखकारक आहे व त्यायोगें मोठी कीर्ति प्राप्त होते (या मंत्रांत पंचाहुति परिणाम सांगितला आहे. प्रथम यज्ञांत होमलेली आहुति द्युलोकांत जाते. तेथून जलरूपानें अंतरिक्षांत येतें तेथून अन्नरूपानें पृथ्वीवर पडते त्या अन्नाचें पुरुषाच्या उदरांत रेत होतें. नंतर त्यापासून स्त्रीयोनीच्या ठिकाणीं गर्भ होतो. तो जन्मल्यावर प्राण्याला धन व कीर्ति मिळते.) ॥ १६ ॥

स नऽइन्द्राय यज्यवे वरुणाय मरुद्भ्यः । वरिवोवित्परिस्रव ॥ १७ ॥

अर्थ—हे सोमा, तूं रसरूपी होऊन इंद्र, वरुण व मरुत् यांच्याकरितां आहुतिरूप धारण कर. हे तिघे यज्ञ करण्यास योग्य आहेत व तूं धन प्राप्त करून देणारा आहेस. ॥ १७ ॥

एना विश्वान्यर्यऽआ द्युम्नानि मानुषाणाम् । सिषासन्तो वनामहे ॥ १८ ॥

अर्थ—ईश्वर असा सोम हीं सर्व द्रव्यें दान करणाऱ्या आम्हाला देवो. ती द्रव्यें आम्ही मागतों. ॥ १८ ॥

अनु वीरैरनु पुष्यास्म गोभिरन्वश्वैरनु सर्वेण पुष्टैः । अनु द्विपदानु चतुष्पदा वयं देवा नो यज्ञमृतुथा नयन्तु ॥ १९ ॥

अर्थ—आम्ही पुत्र, धेनू, अश्व व इतर कामना यांनीं परिपुष्ट होऊं व गृहादि सर्व वृद्धिंगत पदार्थांनीं, दासीदासांनीं, गजतुरगांनीं आम्ही वृद्धीप्रत प्राप्त होऊं. व प्रत्येक ऋतूंत देव आमचा यज्ञ स्वर्गाप्रत नेवो. ॥ १९ ॥

अग्ने पत्नीरिहावह देवानामुशतीरुप । त्वष्टारꣳ सोमपीतये ॥ २० ॥

अर्थ—हे अग्ने, तूं हवींची इच्छा करणाऱ्या देवपत्नींना या यज्ञांत आण व सोमपानाकरितां त्वष्टृदेवाला बोलाव. ॥ २० ॥

अभि यज्ञं गृणीहि नो ग्नावो नेष्टꣳ पिबऽऋतुना । त्वꣳ हि रत्नधाऽ असि ॥ २१ ॥

अर्थ—हे पत्नीयुक्त नेष्टया, आमच्या यज्ञाची स्तुति कर. व ऋतुदेवासह सोमपान कर. कारण तूंच उत्तम धनांचा धारण करणारा आहेस ॥ २१ ॥

द्रविणोदाः पिपीषति जुहोत प्र च तिष्ठत । नेष्ट्राद्ऋतुभिरिष्यत ॥ २२ ॥

अर्थ—धनदाता अग्नि सोमपानाची इच्छा करितो. म्हणून हे ऋत्विजांनो, तुम्ही होम करा व आपल्या कार्यास उद्युक्त व्हा व नेष्टृस्थानांतून देवासह सोमाकडे जा ॥ २२ ॥

तवायꣳ सोमस्त्वमेह्यर्वाङ् शश्वत्तमꣳ सुमनाऽअस्यपाहि । अस्मिन्यज्ञे बर्हिष्या निषद्या दधिष्वेमं जठरऽइन्दुमिन्द्र ॥ २३ ॥

अर्थ—हे इंद्रा, हा तुझा सोम आहे म्हणून तूं प्रसन्नचित्तानें आमच्याकडे येऊन या सोमाचें सर्वदा रक्षण कर. व या यज्ञांत पसरलेल्या दर्भासनावर बसून सोमरसाला उदरांत धारण कर ॥ २३ ॥

अमेव नः सुहवाऽआ हि गन्तन नि बर्हिषि सदतना रणिष्टन । अथा मदस्व जुजुषाणोऽअन्धसस्त्वष्टर्देवेभिर्जनिभिः सुमद्गणः ॥ २४ ॥

अर्थ—हे देवपत्नींनो, तुम्ही स्वगृहाप्रमाणें आमच्या यज्ञगृहांत या व दर्भावर स्वस्थपणानें बसा. ज्यांना बोलावणें सुखकर आहे अशा तुम्ही आहां. हे त्वष्ट्या, देवपत्नी आल्यानंतर तूं हविरूपी अन्नाचें सेवन करून संतुष्ट हो व देव, देवपत्नी यांचे समुदायही संतुष्ट होवोत. ॥ २४ ॥

स्वादिष्ठया मदिष्ठया पवस्व सोम धारया । इन्द्राय पातवे सुतः ॥२५॥

अर्थ—हे सोमा, अत्यंत स्वादिष्ट व अत्यंत मदोत्पादक अशा धारेनें तूं दशापवित्रांतून द्रोणकलशांत जा. कारण कीं, इंद्रानें तुझें पान करावे म्हणूनच आम्हीं तुझें कंडण केलें आहे. ॥ २५ ॥

रक्षोहा विश्वचर्षणिरभि योनिमयोहते । द्रोणे सधस्थमासदत् ॥ २६ ॥

अर्थ—दुष्टनाशक सर्वजगतांचें शुभाशुभ पाहणारा सोम द्रोणकलशरूपी स्वस्थानांमध्यें राहतो. तें द्रोणपात्र लोखंडाने कोरून वासल्यानें पात्रासारखे बनविले आहे. व त्यांत बराच सोमरस एकदम राहूं शकतो ॥ २६ ॥

इति श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे वेदप्रकाशाख्ये षड्विंशोऽध्यायः ॥ २६ ॥

इति षड्विंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ सप्तविंशोऽध्यायः ॥ २७ ॥



विनियोग—या सत्ताविसाव्या अध्यायांत पंचचितिक अग्नीच्या संबंधाचे मंत्र आहेत.

समास्त्वाग्नऽऋतवो वर्धयन्तु संवत्सराऽऋषयो यानि सत्या । सं दिव्येन दीदिहि रोचनेन विश्वाऽआभाहि प्रदिशश्चतस्रः ॥ १ ॥

अर्थ—हे अग्ने, मास, ऋतु, व संवत्सरांच्या अधिष्ठातृ देवता, मंत्रद्रष्टे ऋषि व सत्यस्वरूपी मंत्र तुला वाढवोत. व त्यांनीं वाढविलेला असा तूं दिव्यकांतीनें प्रकाशित हो. आणि सर्व दिशा व विदिशांना प्रकाशित कर ॥ १ ॥

सं चेद्धस्वाग्ने प्र च बोधयैनमुच्च तिष्ठ महते सौभगाय । मा च रिषदुपसत्ता तेऽअग्ने ब्रह्माणस्ते यशसः÷ मन्तु मान्ये ॥ २ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं प्रदीप्त हो. व या यजमानाला अग्निचयनाची आठवण दे. त्याला मोठें ऐश्वर्य देण्याचा उद्योग कर. हे अग्ने, तुझी सेवा करणारा यजमान नष्ट न होवो. तुझें यजन करणारे ऋत्विज कीर्तिसंपन्न होवोत व जे यज्ञ न करणारे दुसरे लोक त्यांची कीर्ति न होवो ॥ २ ॥

त्वामग्ने वृणते ब्राह्मणाऽइमे शिवोऽअग्ने संवरणे भवा नः । सपत्नहा नोऽअभिमातिजिच्च स्वे गये जागृह्यप्रयुच्छन् ॥ ३ ॥

अर्थ—हे अग्ने, ऋत्विज यज्ञाकरितां तुझें सेवन करितात म्हणून या यज्ञामध्यें ब्राह्मणासह आमचें कल्याण कर. आमच्या शत्रूंना मार व न मारलेल्या अन्य शत्रूंना वश कर व प्रमादरहित होऊन आपल्या स्थानावर जागृत रहा ॥ ३ ॥

इहैवाग्नेऽअधि धारया रयिं मा त्वा निक्रन्पूर्वचितो निकारिणः÷ । क्षत्रमग्ने सुयममस्तु तुभ्यमुपसत्ता वर्धतां तेऽअनिष्टृतः ॥ ४ ॥

अर्थ—हे अग्ने, या आमच्या यजमानांनाच तूं अधिक द्रव्य दे. ज्यांनीं पूर्वी चयनयज्ञ केला म्हणूनच ज्यांचा विशेष यज्ञ करण्याचा स्वभाव ते तुझा अवमान न करोत. व हे अग्ने, क्षत्रियजाति सहज तुझ्या ताब्यांत राहो. तसेंच तुझा याग करणारा यजमान अहिंसित होऊन धनपुत्रादिकांनीं वाढो ॥ ४ ॥

क्षत्रेणाग्ने÷ स्वायुꣳ सꣳरभस्व मित्रेणाग्ने मित्रधेये यतस्व । सजातानां मध्यमस्थाऽएधि राज्ञामग्ने विहव्यो दीदिहीह ॥ ५ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं क्षत्रियांकडून यज्ञ करीव. तुझे यजमान उत्तम आहेत. हे अग्ने, सूर्यासहवर्तमान तूं यजमानाकडून यज्ञ करीव. या यजमानाच्या बरोबरीच्या यजमानामध्यें तूं मध्यस्थरूपानें रहा. म्हणजे तो इतर यजमानांच्या बरोबरीचा होईल. हे अग्ने, राजांनीं यज्ञांत बोलाविण्यास योग्य असा तूं या यज्ञगृहांत प्रकाशित हो ॥५॥

अति निहोऽअति स्निग्धोऽत्यचित्तिमत्यरातिमग्ने । विश्वा ह्यग्ने दुरिता सहस्वास्थास्मभ्यꣳ सहवीरा रयिं दाः ॥ ६ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं मारणारांचें कुत्सिताचार लोकांचें दुर्लक्षतेचें आणि अदातृत्वाचें अतिक्रमण करून निश्चयेंकरून सर्व पापांचा नाश कर व नंतर आम्हाला पुत्र व द्रव्य दे ॥ ६ ॥

अनाधृष्यो जातवेदाऽअनिष्टृतो विराडग्ने क्षत्रभृद्दीदिहीह । विश्वाऽ आशाꣳ प्रमुञ्चन्मानुषीयऽ शिवेभिरद्य परिपाहि नो वृधे ॥ ७ ॥

अर्थ—हे अग्ने, या यज्ञांत राहून सर्व दिशा प्रकाशित कर. तूं पराजय करण्यास अशक्य आहेस. तुझ्यापासून सर्व द्रव्य उत्पन्न झालें. तुझी कोणीही हिंसा करूं शकत नाहीं. तसेंच विशेषेंकरून शोभणारा असून क्षत्रियांचा पोषक आहे आणि मनुष्यांच्या जन्मजरादि भीत्या नाहींशा करून शांत अशा तुझ्या ज्वालांनीं वृद्धीकरितां आमचें रक्षण कर ॥ ७ ॥

बृहस्पते सवितर्बोधयैनꣳ सꣳ शितं चित्सन्तराꣳ सꣳ शिशाधि । वर्धयैनं महते सौभगाय विश्वेऽएनमनुमदन्तु देवाऽ ॥ ८ ॥

अर्थ—हे बृहस्पते, हे सवित्या, या यजमानाला कर्माविषयीं माहिती दे. पूर्वी शिकविलेलेंही पुनः पुनः शिकीव. मोठ्या ऐश्वर्याकरितां यांना वाढीव. विश्वेदेव या यजमानाच्या संतोषानंतर संतुष्ट होवोत ॥ ८ ॥

अमुत्र भूयादधु यस्यमस्य बृहस्पतेऽअभिशस्तेरमुञ्चꣳ । प्रत्यौहतामश्विना मृत्युमस्माद्देवानामग्ने भिषजा शचीभिꣳ ॥ ९ ॥

अर्थ—हे बृहस्पते, तूं मरणापासून व नरक लोकापासून मुक्त कर. तसेंच

लोकापवादापासून मुक्त कर. देवांचे वैद्य जे अश्विनीकुमार त्यांनीं शुद्ध कर्म करून या यजमानापासून मृत्युकर्म दूर केलें आहे ॥ ९ ॥

उद्वयं तमसस्परि स्वः पश्यन्त उत्तरम्। देवं देवत्रा सूर्यमगन्म ज्योतिरुत्तमम् ॥ १० ॥

अर्थ--आम्ही उत्कृष्ट अशा स्वर्गाकडे पाहणारे होत्साते तमोबहुल अशा या लोकांतून बाहेर पडलों. आणि देवलोकांत सूर्याकडे पहात पहात आम्ही ब्रह्मलोकांत प्राप्त झालों. ॥ १० ॥

ऊर्ध्वाऽअस्य समिधो भवन्त्यूर्ध्वा शुक्रा शोचीꣳष्यग्नेः। द्युमत्तमा सुप्रतीकस्य सूनोः ॥ ११ ॥

अर्थ—या अग्नीच्या समिधा व विश्वप्रकाशक शुद्ध तेजें ऊर्ध्व अशा देवलोकाकडे जातात. ह्या अग्नीचें मुख उत्तम आहे व तो यजमानानें प्रदीप्त केला असल्यामुळें त्याचा पुत्र आहे. ॥ ११ ॥

तनूनपादसुरो विश्ववेदा देवो देवेषु देवः। पथोऽअनक्तु मध्वा घृतेन ॥ १२ ॥

अर्थ—अग्निदेव मधुर घृतानें यज्ञमार्गांना माखो. म्हणजे या यज्ञांत पुष्कळ घृत असो. हा अग्नि जलांचा नातू आहे. (जलापासून वृक्ष उत्पन्न होतात व वृक्षापासून अग्नि उत्पन्न होतो.) तसेंच तो प्राणवान् सर्व द्रव्ययुक्त व सर्व देवांमध्यें प्रकाशक आहे. ॥ १२ ॥

मध्वा यज्ञं नक्षसे प्रीणानो नराशꣳ सोऽअग्ने। सुकृद्देवः सविता विश्ववारः ॥ १३ ॥

अर्थ--हे अग्ने, तूं मधुर घृतानें यज्ञाला व्याप्त करतोस. तूं देवांना संतुष्ट करणारा, ऋत्विजाकडून स्तविलेला, चांगलें कर्म करणारा, प्रकाशमान, विश्वोत्पादक, विश्वव्यापी व सर्वांचा अंगिकार करणारा आहेस. ॥ १३ ॥

अच्छायमोमि शवसा घृतेनेडानो वह्निर्नमसा अग्निꣳ स्रुचोऽअध्वरेषु प्रयत्सु ॥ १४ ॥

अर्थ—ज्ञानसामर्थ्यानें स्तुति करणारा व यज्ञभार उचलणारा हा अध्वर्यु यज्ञ-

कर्मे चालूं असतां घृतानें पूर्ण असलेल्या स्रुचा, जुहू वगैरे पात्रें घेऊन अग्नीकडे येतो. ॥ १४ ॥

स यक्षदस्य महिमानमग्नेऽ स ईं मन्द्रा सुप्रयसः । वसुश्चेतिष्ठो वसुधातमश्च ॥ १५ ॥

अर्थ—तो अध्वर्यु उत्तम अन्नांचा स्वामी जो अग्नि त्याच्या ऐश्वर्याचें स्तवन करो व मदोत्पादक अशीं हविर्द्रव्यें त्याला देवो. तो अग्नि सर्व जगाला आपले ठिकाणीं राहविणारा, अतिशय चेतना देणारा व सर्व द्रव्यदात्यांमध्यें श्रेष्ठ आहे. ॥ १५ ॥

द्वारो देवीरन्वस्य विश्वे व्रता ददन्तेऽअग्नेऽ । उरुव्यचसो धाम्ना पत्यमानाऽ ॥ १६ ॥

अर्थ—ज्यांच्यांत मोठें अंतर आहे, म्हणजे विशाल स्वरूपाची व ऋत्विजांना सहज जाण्यास सुलभ अशीं मोठमोठालीं दारें (तदधिष्ठातृ देवता) या अग्नीचीं यज्ञकर्मे धारण करतात नंतर विश्वेदेव तीं यज्ञकर्मे धारण करितात. ॥ १६ ॥

तेऽअस्य योषणे दिव्ये न योनाऽउषासानक्ता । इमं यज्ञमवतामध्वरं नः ॥ १७ ॥

अर्थ—प्रसिद्ध असलेल्या अहोरात्राच्या देवता आमच्या शास्त्रोक्त यज्ञाचें रक्षण करोत. त्या या अग्नीच्या स्त्रिया असून स्वर्गांत राहतात. जो अग्नि गार्हपत्यस्थानांत स्थित आहे ॥ १७ ॥

दैव्या होताराऽऊर्ध्वमध्वरं नोऽग्नेर्जिह्वामभिगृणीतम् । कृणुतं नऽस्विष्टिम् ॥ १८ ॥

अर्थ—अहो दैव्य होते अग्निवायूंनो, तुम्ही आमचा यज्ञ उत्तम संपादन करा व त्या आमच्या यज्ञाला वर देवमार्गानें जाणारा असा करा व अग्नीच्या ज्वालेची स्तुति करा. ॥ १८ ॥

तिस्रो देवीर्बर्हिरेदꣳ सदन्त्विडा सरस्वती भारती । महीं गृणाना ॥१९॥

अर्थ—पृथ्वीवरील इडा, मध्यस्थ सरस्वती व द्युलोकस्थ भारती ह्या तिन्ही मोठ्या व पूज्य देवता या दर्भासनावर बसोत ॥ १९ ॥

तन्नस्तुरीपमद्भुतं पुरुक्षु त्वष्टा सुवीर्यम् । रायस्पोषं विष्यतु नाभिमस्मे ॥ २० ॥

अर्थ—त्वष्टादेव सहजप्राप्त होणारें, मोठें, अत्यंत सामर्थ्ययुक्त असें जें द्रव्य त्याची वृद्धि आमच्या बेंबीवर ठेवो. तात्पर्य बेंबीवर ठेवलेला पदार्थ सहज मांडीवर येऊन पडतो त्याप्रमाणें हें पुष्कळ द्रव्य आम्हांला मिळो ॥ २० ॥

वनस्पतेऽवसृजा ररा॑णस्त्मना॑ दे॒वेषु॑ । अ॒ग्निर्ह॒व्यꣳ श॑मि॒ता सू॑द॒याति ॥ २१ ॥

अर्थ—शमिता अग्नि हविर्द्रव्याचा संस्कार करितो म्हणून हे वनस्पते, स्वतः देवांना हविर्भाग देणारा असा तूं तें सुसंस्कृत हविर्द्रव्य स्रुचेच्या मुखानें खालीं अग्नींत टाक ॥ २१ ॥

अग्ने॒ स्वाहा॑ कृणुहि जातवेदऽइन्द्रा॑य ह॒व्यम् । विश्वे॑दे॒वा ह॒विरि॒दं जु॑षन्ताम् ॥ २२ ॥

अर्थ—ज्यापासून ज्ञान उत्पन्न होतें अशा हे अग्ने, हें हविर्द्रव्य स्वाहाकारपूर्वक इंद्राला दे. विश्वेदेव हें हवि सर्व सेवन करोत. ॥ २२ ॥

विनियोग—वायूकारणें हुत अशा पशूच्या सहा याज्यानुवाक्या आहेत.

पी॒वोऽअन्ना॑ रयि॒वृधꣳ॑ सु॒मे॒धाꣳ श्वे॒तꣳ सि॑षक्ति नि॒युता॑मभि॒श्रीꣳ । ते वा॑यवे॒ सम॑नसो॒ वित॑स्थु॒र्विश्वेन्नरꣳ॑ स्वप॒त्यानि॑ चक्रुꣳ ॥ २३ ॥

अर्थ—उत्तम बुद्धिमान् अश्वांना आश्रय करण्यास योग्य असा वायु पुष्कळ अन्न खाल्लेल्या व धनवर्धक अशा ज्या घोडयांचें सेवन करितो ते सर्व एकचित्त होऊन वायूकरितां विशेषें करून उभे राहतात अशा तन्हेनें अश्वांचा व वायूचा संयोग झाल्यावर ऋत्विज सर्वच चांगलीं अपत्यें मिळवून देणारीं कर्में करितात ॥ २३ ॥

रा॒ये नु यं ज॒ज्ञतू॒ रोद॑सीमे॒ राये दे॒वी धि॒षणा॑ धाति दे॒वम् । अध॑ वा॒युं नि॒युतः॑ सश्चत॒ स्वाऽउ॒त श्वे॒तं वसु॑धितिं निरे॒के ॥ २४ ॥

अर्थ—या द्यावापृथिवी उदकरूपी धनाकरितां वायूला उत्पन्न करित्या झाल्या व द्रव्याकरितां बुद्धिदात्री वाक्देवी वायूला धारण करिते. वायूच्या उत्पत्तीनंतरच त्याचे घोडे पुष्कळ मंडळी जेथें जमली आहेत अशा स्थानावर त्यांचें सेवन करितात. तो वायु श्वेत वर्णाचा व द्रव्य धारण करणारा आहे ॥ २४ ॥

आपो॑ ह॒ यद्बृ॒हतीर्विश्व॒मायन्ग॒र्भं द॒धाना॑ ज॒नय॑न्तीर॒ग्निम् । ततो॑ दे॒वाना॒ꣳ सम॑वर्त॒तासु॒रेक॒ स्तस्मै॑ दे॒वाय॑ ह॒विषा॑ विधेम ॥ २५ ॥

अर्थ—ज्या वेळीं पूर्वी मोठीं गर्भधारक व अग्निरूपी हिरण्यगर्भाला धारण करणारीं जलें विश्वाप्रत प्राप्त होतीं झालीं त्यावेळीं एक वर्षभर राहिलेल्या त्या गर्भापासून देवांचा प्राण असलेला असा लिंगशरीररूपी हिरण्यगर्भ उत्पन्न झाला. प्रजापतिरूपी हिरण्यगर्भाला आम्ही हवि देतों ॥ २५ ॥

यश्चिदापो महिना पर्यपश्यद्दक्षं दधाना जनयन्तीर्यज्ञम् । यो देवेष्वधि देव एक आसीत्कस्मै देवाय हविषा विधेम ॥ २६ ॥

अर्थ—जो अंतर्यामी देव आपल्या माहात्म्यानें प्रजापतीला धारण करणाऱ्या व यज्ञोत्पादक अशा पूर्वोक्त जलांना पहाता झाला व जो सर्व देवांमध्यें मुख्य आहे त्या प्रजापतिरूपी देवाला आम्ही हवि देतों ॥ २६ ॥

प्र यामिर्यासि दाश्वाꣳ समच्छा नियुद्भिर्वायविष्टये दुरोणे । नि नो रयिꣳ सुभोजसं युवस्व नि वीरं गव्यमश्व्यं च राधः ॥ २७ ॥

अर्थ—हे वायो, तूं ज्या घोड्यांवर (अश्वस्त्रियांवर) आरोहण करून यज्ञाकरितां यज्ञशालेंत असलेल्या हविर्भागाचें दान करणाऱ्या यजमानाकडे जातोस त्या घोड्यावर बसून आमच्याकडे ये व आम्हाला उत्तम उपभोग्य असें द्रव्य दे व पुत्र, गाई व अश्व एतद्रूपी द्रव्य दे ॥ २७ ॥

आ नो नियुद्भिः शतिनीभिरध्वरꣳ सहस्रिणीभिरुपयाहि यज्ञम् । वायोऽअस्मिन्सवने मादयस्व यूयं पात स्वस्तिभिꣳ सदा नः ॥ २८ ॥

अर्थ—हे वायो, शेंकडों व हजारों घोड्यांनीं (अश्वस्त्रियांनीं) आमच्या यज्ञाला ये व या तृतीय सवनामध्यें तृप्त हो. हे ऋत्विजांनो, तुम्ही कल्याणकारक कर्म करून सर्वदा आमचें रक्षण करा ॥ २८ ॥

विनियोग—यापुढील सहा ऋचा वपादिकांच्या याज्यानुवाक्या आहेत.

नियुत्वान्वायवागहि यꣳ शुक्रोऽअयामि ते । गन्तासि सुन्वतो गृहम् ॥ २९ ॥

अर्थ—हे वायो, तुझा स्वभाव नेहमीं यजमानाच्या घरीं जाण्याचा आहे म्हणून अश्वस्त्रियांवर आरोहण करून आमच्याकडे ये. हें शुक्रपात्र तुला प्राप्त होवो. ॥ २९ ॥

वायो शुक्रोऽअयामि ते मध्वोऽअयं दिविष्टिषु । आयाहि सोमपीतये स्पार्हो देव नियुत्वता ॥ ३० ॥

अर्थ—हे वायो, यज्ञामध्यें रसावें सार असें जें शुक्रपात्र तें तुला प्राप्त होवो. हे वायुदेवा, यजमानांना स्पृहणीय असा तूं अश्वयुक्त रथानें सोमपानाकरितां आमच्याकडे ये. ॥ ३० ॥

वायुरग्रेगा यज्ञप्रीः साकं गन्मनसा यज्ञम् । शिवो नियुद्भिः शिवाभिः ॥ ३१ ॥

अर्थ—अग्रभागीं गमन करणारा, यज्ञानें संतुष्ट होणारा व कल्याणकारक असा वायु उत्तम घोड्यावर आरोहण करून सादर चित्तानें यज्ञाप्रत येवो. ॥ ३१ ॥

वायो ये ते सहस्रिणो रथास्तेभिरागहि । नियुत्वान्सोमपीतये ॥ ३२ ॥

अर्थ—हे वायो, अश्वस्त्रियांनीं युक्त असा तूं जे तुझे हजारों रथ आहेत त्यांनीं सोमपानाकरितां ये. ॥ ३२ ॥

एकया च दशभिश्च स्वभूते द्वाभ्यामिष्टये विꣳशती च । तिसृभिश्च वहसे त्रिꣳशतं च नियुद्भिर्वायविह ता विमुञ्च ॥ ३३ ॥

अर्थ—ज्याची जगद्रूपी उत्तम संमृद्धि आहे अशा हे वायो, एक दशक म्हणजे दहा, दोन दशक म्हणजे वीस, तीन दशक म्हणजे तीस घोड्यांवर बसून जीं पात्रें धारण करितोस तीं तूं ह्या यज्ञामध्यें ठेव. ॥ ३३ ॥

तव वायवृतस्पते त्वष्टुर्जामातरद्भुत । अवाꣳ स्यावृणीमहे ॥ ३४ ॥

अर्थ—हे सत्यपालक, त्वष्ट्याच्या जावया, (आदित्यापासून जल घेऊन त्यांत वायु गर्भ स्थापन करितो त्यापासून वृष्टि होते म्हणून वायु आदित्याचा जावई आहे. आदित्य व त्वष्टा एकच) व आश्चर्यस्वरूपी वायो, आम्हीं तुझ्या अन्नांची याचना करितों. ॥ ३४ ॥

अभि त्वा शूर नोनुमोऽदुग्धाऽइव धेनवः । ईशानमस्य जगतः स्वर्दृशमीशानमिन्द्र तस्थुषः ॥ ३५ ॥

अर्थ—हे शूर इंद्रा, दूध पाजण्यापूर्वी गाई ज्याप्रमाणें वत्सांची स्तुति करितात

त्याप्रमाणें आम्ही जंगम वस्तूंचा मालक स्वर्गद्रष्टा, व स्थावर वस्तूंचा अधिपति अशा तुझी सन्मुख होऊन स्तुति करितों. ॥ ३५ ॥

न त्वावाँ२॥ अन्यो दिव्यो न न पार्थिवो न जातो न जनिष्यते । अश्वायन्तो मघवन्निन्द्र वाजिनो गव्यन्तस्त्वा हवामहे ॥ ३६ ॥

अर्थ—हे धनवान् इंद्रा, स्वर्गांत व पृथ्वीवर तुझ्यासारखा कोणी नाहीं. मागें उत्पन्न झाला नाहीं व पुढेंही उत्पन्न होणार नाहीं म्हणून अश्वाची इच्छा करणारे, अन्नयुक्त आणि गायीची कामना करणारे आम्ही तुझी स्तुति करितों. ॥ ३६ ॥

त्वामिद्धि हवामहे सातौ वाजस्य कारवः । त्वां वृत्रेष्विन्द्र सत्पतिं नरस्त्वां काष्ठास्वर्वतः ॥ ३७ ॥

अर्थ—हे इंद्रा, यज्ञ करणारे आम्ही निश्चयेंकरून अन्नप्राप्तीकरितां, शत्रुनाशाकरितां, दिग्विजयाकरितां व अश्वप्राप्तीकरितां तुलाच बोलाविनों. तूं विहित कर्मकारी व निषिद्ध कर्मत्यागी जे साधु त्यांचा पालक आहेस ॥ ३७ ॥

स त्वं नश्चित्र वज्रहस्त धृष्णुया महः स्तवानोऽअद्रिवः । गामश्वं रथ्यमिन्र संकिर सत्रा वाजं न जिग्युषे ॥ ३८ ॥

अर्थ—आश्चर्यकारक कर्म करणाऱ्या, वज्र हस्तांत धारण करणाऱ्या, पर्वत जिंकणाऱ्या इंद्रा, तूं आम्हाला गाय व रथ वाहण्यास योग्य असा अश्व दे. तूं धैर्यानें व तेजानें स्तुत्य आहेस. लढाई जिंकून आलेल्या घोड्याला अगर हत्तीला रक्षण करून ज्याप्रमाणें अन्न देतात त्याप्रमाणें तूं आम्हाला वरील वस्तु दे. ॥ ३८ ॥

कया नश्चित्रऽआभुवदूती सदावृधः सखा । कया शचिष्ठयाऽवृता ॥ ३९ ॥

अर्थ—पूज्य व सर्वदा वर्धमान असा इंद्र संतोषजनक अशा कोणत्या तऱ्हेनें अथवा कोणत्या मोठ्या स्तुत्य अशा यागक्रियेनें आमचा मित्र होईल ? ॥ ३९ ॥

कस्त्वा सत्यो मदानां न हिष्ठो मत्सदन्धसः । दृढा चिदारुजे वसु ॥४०॥

अर्थ—हे इंद्रा, सर्व मदकारक वस्तूंमध्यें अत्यंत मादक असा सोमरूपी अन्नाचा कोणता अंश तुला उन्मत्त करितो ? ज्यायोगें उन्मत्त होऊन तूं अत्यंत कठीण अशाही सुवर्णादि वस्तूंचे तुकडे करून आम्हाला देतोस ॥ ४० ॥

अभी षु णः सखीनामविता जरितॄणाम् । शतं भवास्यूतये ॥ ४१ ॥

अर्थ—हे इंद्रा, आमचें पालन करण्याकरितां तूं शेंकडो रूपें धारण करितोस. तूं स्तुति करणाऱ्या व मित्र असलेल्या अशा आम्हा ऋत्विजांचा पालक आहेस ॥४१॥

यज्ञा यज्ञा वोऽअग्नये गिरा गिरा च दक्षसे । प्रप्र वयममृतं जातवेदसं प्रियं मित्रं न शꣳसिषम् ॥ ४२ ॥

अर्थ—निरनिराळ्या यज्ञांत निरनिराळ्या स्तुतिवाक्यांनीं मी तुमच्याकरितां मित्राप्रमाणें अग्नीची स्तुति करितों. तो अग्नि उत्साह व बलानें युक्त आहे. अविनाशिस्वरूपी व ज्ञानोत्पादक असा आहे ॥ ४२ ॥

पाहि नोऽअग्नऽएकया पाहूत द्वितीयया । पाहि गीर्भिस्तिसृभिरूर्जां पते पाहि चतसृभिर्वसो ॥ ४३ ॥

अर्थ—अन्नपालक व द्रव्यवान् अशा हे अग्ने, ऋग्वेदरूपी वाणींनी तुझी स्तुति केली. आमचें रक्षण कर. तसेंच यजुर्वेदानें ऋग्, यजुः, साम या तीन वेदांनीं आणि गद्यपद्यरूपी निगदवाक्य व ऋग्, यजुः, साम अशा चौघांनीं तुझी स्तुति केली. आतां आमचें रक्षण कर ॥ ४३ ॥

ऊर्जो नपातꣳ स हिनाऽयमस्मयुर्दशिम हव्यदातये । भुवद्वाजेष्वविता भुवद्वृधऽउत त्राता तनूनाम् ॥ ४४ ॥

अर्थ—यजमान अध्वर्यूची प्रार्थना करितो. हे अध्वर्यो, जलाचा नातू जो अग्नि त्याला संतुष्ट कर. ज्याअर्थी हा आमची इच्छा करणारा व अन्नाचा आणि शरीराचा संरक्षक आहे म्हणून आम्ही हविर्भाग देण्याकरितां संकल्प करितों. ॥ ४४ ॥

संवत्सरोऽसि परिवत्सरोऽसीदावत्सरोऽसीद्वत्सरोऽसि वत्सरोऽसि । उषसस्ते कल्पन्ताम होरात्रास्ते कल्पन्तामर्धमासास्ते कल्पन्तां मासास्ते कल्पन्तामृतवस्ते कल्पन्ताꣳ संवत्सरस्ते कल्पताम् । प्रेत्याऽएत्यै संचाञ्च प्र च सारय । सुपर्णचिदसि तया देवतयाङ्गिरस्वद्ध्रुवः सीद ॥ ४५ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं संवत्सर, परिवत्सर, इदावत्सर, इद्वत्सर व वत्सररूपी आहेस (अर्थात् पंचसंवत्सरात्मक युगरूपी आहेस) त्या तुझे प्रातःकालादिक समय दिवस, रात्री, शुक्ल कृष्ण पक्ष, चैत्रादि मास, वसंतादि ऋतू व वर्षे अवयव

होवोत. हे कालरूपी अग्ने, तूं गमनाकरितां संकोच धारण कर व आगमनाकरितां प्रसरण पाव. चयन यज्ञामध्यें तूं गरुडाचा आकार धारण केलेला आहेस तो तूं वाक् देवतेसहवर्तमान प्राणांप्रमाणें स्थिर होऊन रहा ॥ ४५ ॥

इति श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते

माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे वेदप्रकाशाख्ये सप्तविंशोऽध्यायः ॥ २७ ॥

इति सप्तविंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ अष्टाविंशोऽध्यायः ॥ २८ ॥



विनियोग—हा अध्याय सौत्रामणिसंबंधीं पशूंचा प्रयाजानुयाज प्रैषरूपी आहे.

होता यक्षत्समिधेन्द्रमिडस्पदे नाभा पृथिव्याऽआधि । दिवो वर्ष्मन्समिध्यतऽओजिष्ठश्चर्षणीसहां वेत्वाज्यस्य होतर्यज ॥ १ ॥

अर्थ—दैवी होता समित्काष्ठानें इंद्राचा याग करो. जो इंद्र पृथ्वीच्या यजनीय प्रदेशावर अग्निरूपानें, तिच्या नाभिस्थानीं अंतरिक्षामध्यें विद्युद्रूपानें व पृथ्वीच्या वर स्वर्गाच्या वरिष्ठ प्रदेशांत आदित्यस्वरूपानें प्रदीप्त केला जातो. तसेंच तो मनुष्यांना पराजय करणारांमध्यें अत्यंत तेजस्वी आहे. असा इंद्र घृतपान करो. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर. ॥ १ ॥

होता यक्षत्तनूनपातमूतिभिर्जेतारमपराजितम् । इन्द्रं देवꣳ स्वर्विदं पथिभिर्मधुमत्तमैर्नराशꣳसेन तेजसा वेत्वाज्यस्य होतर्यज ॥ २ ॥

अर्थ—दैवी होता नराशंस व तनूनपात (अग्नि) या देवांसह इंद्राचा हविर्द्रव्यांनीं याग करो. तीं हविर्द्रव्यें संतुष्ट करणारीं व अत्यंत मधुर व स्वादिष्ट आहेत. तो इंद्र शत्रूंचा जेता, कोणाकडून पराजित न होणारा व स्वर्गाला आपलें स्थान समजणारा असा आहे. व नराशंस देव तेजस्वी आहे. या दोन देवतांनीं युक्त इंद्र घृतपान करो. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर. ॥ २ ॥

होता यक्षद्दिडाभिरिन्द्रमीडितमाजुह्वानममर्त्यम् । देवो देवैः सवीर्यो वज्रहस्तꣳ पुरंदरो वेत्वाज्यस्य होतर्यज ॥ ३ ॥

अर्थ—दैवी होता प्रयाजदेवतांसह ऋत्विजांनीं स्तुत, यजमानाकडून बोलावला जाणारा व अविनाशी अशा इंद्राचा याग करो. सर्व देवांच्या बरोबरीचा पराक्रम असलेला वज्रहस्त शत्रुनगरीचा नाश करणारा इंद्रदेव घृतपान करो. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर. ॥ ३ ॥

होता यक्षद्बर्हिषीन्द्रं निषद्वरं वृषभं नर्याप्सम् । वसुभी रुद्रैरादित्यैः सयुग्भिर्बर्हिरासदद्वेत्वाज्यस्य होतर्यज ॥ ४ ॥

अर्थ—दैवी होता प्रयाजदेवतेंत स्थित असलेला उपवेशन करणारांत श्रेष्ठ, जलाची वृष्टि करणारा, मनुष्यांना हितकारक कार्ये करणारा असा जो इंद्र त्यांचें यजन करो. तो इंद्र एकमेकांची मैत्री असलेल्या वसु, रुद्र, व आदित्य देवतांसह या दर्भावर बसो व घृतपान करो. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर. ॥ ४ ॥

होता यक्षद्दोजो न वीर्युꣳ सहो द्वारऽइन्द्रमवर्धयन् । सुप्रायणाऽअस्मिन्यज्ञे विश्रयन्तामृतावृधो द्वारऽइन्द्राय मीढुषे व्यन्त्वाज्यस्य होतर्यज ॥ ५ ॥

अर्थ—दैवी होता ज्या प्रयाजदेवतांनीं इंद्र, त्याचें ओज व वीर्य व मनोबल यांस वाढविलें त्यांचा याग करो. (ओज—इंद्रियसामर्थ्य, वीर्य—शारीरसामर्थ्य) त्या प्रयाजदेवता जलसेचन करणाऱ्या अशा इंद्राकरितां द्वाररूपानें उघडल्या जावोत. त्या उघडल्यामुळें ज्यामध्यें गमन सुखकर झालें आहे व ज्या यज्ञ वाढवितात अशा द्वाररूपी प्रयाजदेवता या यज्ञामध्यें घृतपान करोत. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर. ॥ ५ ॥

होता यक्षदुषेऽइन्द्रस्य धेनू सुदुघे मातरा मही । सवातरी न तेजसा वत्समिन्द्रमवर्धतां वीतामाज्यस्य होतर्यज ॥ ६ ॥

अर्थ—दैवी होता रात्रिदेवता व उषा देवतांचा याग करो. त्या एका वत्साला वाढविणाऱ्या, दोन गायींप्रमाणें आपल्या तेजानें इंद्राला वाढवोत. त्या देवता इंद्राला संतुष्ट करणाऱ्या, उत्तम दूध पाजणाऱ्या, आईसारखें रक्षण करणाऱ्या व मोठ्या आहेत. त्या दोन देवतांनीं घृतपान करावें. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर. ॥ ६ ॥

होता यक्षद्दैव्या होतारा भिषजा सखाया हविषेन्द्रं भिषज्यतः । कवी देवौ प्रचेतसाविन्द्राय धत्तऽइन्द्रियं वीतामाज्यस्य होतर्यज ॥ ७ ॥

अर्थ—दैवी होता देवलोकसंबंधी होत्यांचें यजन करो. जे चिकित्साकुशल, परस्परांवर स्नेह करणारे, भूतकालदर्शी, प्रकाशमान व उत्तम ज्ञानयुक्त असे आहेत ते हविर्भागानें इंद्राची चिकित्सा करितात व त्याला सामर्थ्य देतात. ते या घृताचा अंश पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ ७ ॥

होता यक्षत्तिस्रो देवीर्न भेषजं त्रयस्त्रिधातवो पसऽइडा सरस्वती भारती महीः । इन्द्रपत्नीर्हविष्मतीर्व्यन्त्वाज्यस्य होतर्यज ॥ ८ ॥

अर्थ—दैवी होता औषधरूपी जे तीन लोक व इडा, सरस्वती आणि भारती या

तीन देवता यांचा याग करो. त्या तीन लोकांचें धारण करणारे अग्नि, वायु व सूर्य आहेत. तसेंच शीतोष्ण, वात, वृष्टि वगैरे त्यांतील कर्मे आहेत. त्या इडादि तीन देवता मोठ्या, इंद्राच्या पालक व हविर्भागयुक्त अशा आहेत. ते लोक व त्या देवता घृताचा अंश पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ ८ ॥

होता यक्षत्त्वष्टारमिन्द्रं देवं भिषजꣳ सुयजं घृतश्रियम् । पुरुरूपꣳ सुरेतसं पयोनामिन्द्राय त्वष्टा दधदिन्द्रियाणि वेत्वाज्यस्य होतर्यज ॥ ९ ॥

अर्थ--दैवी होता प्रयाजदेवतादि त्वष्टा तिचा याग करो. तो त्वष्टा स्वामी, द्रव्यदाता, रोगनिवर्तक, उत्तम तऱ्हेनें याग करण्यास योग्य, घृतानें ज्याची शोभा वाढते असा, उत्तम वीर्यसंपन्न व धनवान् असा आहे. तो इंद्राचे ठायीं वीर्यस्थापन करून या घृताच्या अंशाचें पान करो. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ ९ ॥

होता यक्षद्वनस्पतिꣳ शमितारꣳ शतक्रतुं धियो जोष्टारमिन्द्रियम् । मध्वा समञ्जन्त्स्वधिभिः सुगेभिꣳ स्वदाति यज्ञं मधुना घृतेन वेत्वाज्यस्य होतर्यज ॥ १० ॥

अर्थ—दैवी होता वनस्पतिसंज्ञक प्रयाजदेवतेचा याग करो. तो वनस्पती हविर्द्रव्यांना संस्कार करणारा, बहुकर्मा, बुद्धीचा सेवक, आत्म्याला हितकारक असा आहे. तो स्वादिष्ट घृतानें यज्ञाला माखून जाण्यास सुलभ अशा मार्गांनीं स्वादघृतयुक्त यज्ञाला देवाकडे नेतो. तो वनस्पती घृताच्या अंशाचें पान करो. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर. ॥ १० ॥

होता यक्षदिन्द्रꣳ स्वाहाज्यस्य स्वाहामेदसꣳ स्वाहा स्तोकानाꣳ स्वाहा स्वाहाकृतीनाꣳ स्वाहा हव्यसूक्तीनाम् । स्वाहा देवाऽआज्यपा जुषाणाऽ इन्द्रऽआज्यस्य व्यन्तु होतर्यज ॥ ११ ॥

अर्थ—दैवी होता इंद्राचा याग करो. तो स्वाहाकारानें आज्याचे, मेदाचे, सोमबिंदूचे स्वाहाकारांचे, हविर्द्रव्यसंबंधी स्तुतींचे जे देव त्यांचा याग करो. स्वाहाकारानें संतुष्ट होणारे जे घृतपसंज्ञक प्रयाज व हा इंद्र घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ ११ ॥

देवं बर्हिरिन्द्रꣳ सुदेवं देवैर्वीरवत्स्तीर्णं वेद्यामधर्धयत् । वस्तोर्वृतं प्राक्तोर्भृतꣳ राया बर्हिष्मतोऽत्यगाद्वसुवने वसुधेयस्य वेतु यज ॥ १२ ॥

अर्थ—बर्हिरादि देवता मरुदादि देवविशिष्ट इंद्राला वाढवितात. त्या बर्हिरादि देवता हविर्भाग देणाऱ्या वीर अशा ऋत्विजांनीं युक्त आहेत. तत्संबंधीं बर्हि म्हणजे दर्भ वेदीवर पसरले आहेत ते दिवसां तोडले आहेत व रात्रीं चांगले संभाळून ठेवले आहेत. जे दर्भ हविर्द्रव्यानें दर्भयुक्त अन्य यागांना सोडून आले तत्संबंधीं देवता धन देण्याकरितां, तें धन ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ १२ ॥

देवीर्द्वारऽइन्द्रꣳ संघाते वीड्वीर्यामन्नवर्धयन् । आ वत्सेन तरुणेन कुमारेण च मीवतापावीणꣳ रेणुककाटं नुदन्तां वसुवने वसुधेयस्य व्यन्तु यज ॥ १३ ॥

अर्थ—यज्ञकर्मामध्यें यज्ञगृहाचीं द्वारें असतात. तद्रूपी देवता इंद्राला वाढवित्या झाल्या. तीं द्वारें अडसर, कवाड, फळ्या वगैरेनीं दृढ आहेत. तीं द्वारें खोडकर, उच्छा मारणारे, तरुण व बालवत्स ज्यांत सहज पडतील अशा रस्त्यांत असलेल्या, मातीनें भरलेल्या लहान कुव्यासारख्या खड्ड्याला दूर करोत. म्हणजे द्वारांनीं आम्हांला असा रस्ता द्यावा कीं ज्यांत यज्ञ, प्रजा यांस विघ्न करणारे कूपादिक येऊं नयेत. द्वारसंबंधीं देवता धन देण्याकरितां, तें धन ठेवण्याकरितां, व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ १३ ॥

देवीऽउषासानक्तेन्द्रं यज्ञे प्रयत्यूह्येताम् । दैवीर्विशꣳ प्रायासिष्टाꣳ सुप्रीते सुधिते वसुवने वसुधेयस्य वीतां यज ॥ १४ ॥

अर्थ—दिवस व रात्रीच्या अधिष्ठातृ देवता यज्ञ चालू असतां इंद्राला बोलावित्या झाल्या. त्या देवसंबंधीं प्रजेकडे आल्या. अत्यंत तुष्ट व अतिशय हितकारक अशा त्या रात्री व दिवस यासंबंधीं देवता धन देण्याकरितां, तें धन ठेवण्याकरितां, व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ १४ ॥

देवी जोष्ट्री वसुधिती देवमिन्द्रमवर्धताम् । अयाव्यन्याघाद्वेषाꣳ स्यान्यावक्षद्वसु वार्याणि यजमानाय शिक्षिते वसुवने वसुधेयस्य वीतां यज ॥ १५ ॥

अर्थ—प्रीतियुक्त व द्रव्य धारण करणाऱ्या ज्या द्यावापृथिवी देवता त्यांनीं इंद्राला वाढविलें. त्या दोघींपैकीं एक यजमानाचीं पापें व दौर्भाग्यें दूर करिते व

दुसरी त्याला उपभोगयोग्य वस्तु देते. त्या तत्त्वज्ञ अशा दोन देवता धन देण्याकरितां, तें धन ठेवण्याकरितां, व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ १५ ॥

देवीऽऊर्जाहुती दुधे सुदुघे पयसेन्द्रमवर्धताम्। इषमूर्जमन्या वक्षत्सग्धिꣳ सपीतिमन्या नवेन. पूर्व दयमाने पुराणेन नवमधातामूर्जमूर्जाहुतीऽऊर्जयमाने वसु वार्याणि यजमानाय शिक्षिते वसुवने वसुधेयस्य वीतां यज॥१६॥

अर्थ—मोठ्यानें हांक मारलेल्या पूर्वोक्त देवता इंद्राला वाढवित्या झाल्या. त्या दोघी इच्छा पूर्ण करणाऱ्या व चांगल्या रीतीनें कामना पुरविणाऱ्या आहेत. त्या दोघींपैकीं एक यजमानाला अन्न व दुग्धादि रस देते व दुसरी त्याला पुत्रादिकांबरोबर भोजन आणि पान करविते. त्या दोघी नव्या व जुन्या अन्नाची गांठ घालून देतात (गेल्या वर्षीचें अन्न पुढील वर्षापर्यंत पुरवितात.) यजमानाला उपभोग्य असें द्रव्य देतात. त्या दोघी रुपा करणाऱ्या रसाच्या आहुतींनीं युक्त व रस वाढविणाऱ्या आहेत. त्या तत्त्वज्ञ अशा दोन देवता धन देण्याकरितां, तें धन ठेवण्याकरितां, व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ १६ ॥

देवा दैव्या होतारा देवमिन्द्रमवर्धताम्। हतार्धशꣳ सावाभाष्टां वसु वार्याणि यजमानाय शिक्षितौ वसुवने वसुधेयस्य वीतां यज ॥ १७ ॥

अर्थ—दैव्यहोते असे देव इंद्रदेवाला वाढविते झाले. पाप्यांचा नाश करणाऱ्या अशा त्या देवांनीं यजमानाकरितां स्पृहणीय द्रव्यें आणिलीं. ते तत्त्वज्ञ असे दोन देव धन देण्याकरितां, तें धन ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ १७ ॥

देवीस्तिस्रस्तिस्रो देवीः पतिमिन्द्रमवर्धयन्। अस्पृक्षद्भारती दिवꣳ रुद्रैर्यज्ञꣳ सरस्वतीडा वसुमती गृहान्वसुवने वसुधेयस्य व्यन्तु यज ॥१८॥

अर्थ—भारती, सरस्वती व इडा या तीन देवता (येथें मंत्रांत आदर दाखविण्याकरितां ' देवीस्तिस्रः, ' तिस्रोदेवीः ' अशी द्विरुक्ति केली आहे) पालन करणाऱ्या इंद्राला वाढवित्या झाल्या. भारती द्युलोकाला स्पर्श करिते, सरस्वती रुद्रासह यज्ञाला स्पर्श करिते. इडा वसुयुक्त होऊन भूलोकाला स्पर्श करिते. त्या देवता धन

देण्याकरितां, तें धन ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ १८ ॥

देवऽइन्द्रो नराशꣳ सन्त्रिवरूथस्त्रिबन्धुरो देवमिन्द्रमवर्धयत् । शतेन शितिपृष्ठानामाहितꣳ सहस्रेण प्रवर्तते मित्रावरुणेदस्य होत्रमर्हतो बृहस्पतिꣳ स्तोत्रमश्विनाध्वर्यवं वसुवने वसुधेयस्य वेतु यज ॥ १९ ॥

अर्थ—ज्यांत ऋत्विज स्तुति करितात असा यज्ञदेव इंद्राला वाढविता झाला. तो यज्ञ ऐश्वर्यवान् सदस्, हविर्धान व आग्नीध्र या तीन वरूथांनीं युक्त ऋग् यजुः साम या तीन बंधनांनीं सहित असा आहे. तो काळ्या पृष्ठाच्या गायींनीं स्थापन केलेला व हजार गायींनीं प्रवृत्त होणारा असा आहे. या यज्ञाच्या हौत्रकर्माला मित्रावरुणच योग्य आहेत. तसेंच औद्गात्रकर्माला बृहस्पति व आध्वर्यवकर्माला अश्विनीकुमार योग्य आहेत. तो यज्ञ धन देण्याकरितां, तें धन ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करो. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ १९ ॥

देवो देवैर्वनस्पतिर्हिरण्यपर्णो मधुशाखꣳ सुपिप्पलो देवमिन्द्रमवर्धयत् । दिवमग्रेणास्पृक्षदान्तरिक्षं पृथिवीमदृꣳहीद्वसुवने वसुधेयस्य वेतु यज ॥ २० ॥

अर्थ—वनस्पतिदेव इतर देवांसह इंद्राला वाढविता झाला. त्या वनस्पतीचीं पानें सोन्याचीं आहेत. त्याच्या शाखा मधुररसयुक्त असून त्याचीं फळें उत्तम आहेत. तो अग्रभागानें द्युलोकाला व मध्यभागानें अंतरिक्षाला स्पर्श करितो. व त्यानें मूल भागानें पृथ्वीला दृढ केलें. तो वनस्पती धन देण्याकरितां, तें ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करो. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ २० ॥

देवं बर्हिर्वारितीनां देवमिन्द्रमवर्धयत् । स्वासस्थमिन्द्रेणासन्नमन्या बर्हीꣳष्यभ्यभूद्वसुवने वसुधेयस्य वेतु यज ॥ २१ ॥

अर्थ—अनुयाज देवतास्वरूपी बर्हि म्हणजे कुश ते इंद्राला वाढविते झाले व त्यांनीं इतर कुशांचा पराभव केला. ते पूर्वोक्त बर्हि इतर जलस्थ औषधीमध्यें प्रकाशमान, भूमीवर उत्तम तऱ्हेनें स्थित होणारे, इंद्रानें ज्याचा आश्रय केला असे

आहेत. ते धन देण्याकरितां, तें ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ २१ ॥

देवोऽअग्निꣳ स्विष्टकृद्देवमिन्द्रमवर्धयत् । स्विष्टं कुर्वन्त्स्विष्टकृत्स्विष्ट-मय करोतु नो वसुवनं वसुधेयस्य वेतु यजं ॥ २२ ॥

अर्थ—स्विष्टकृत् अग्निदेव इंद्रदेवाला वाढविता झाला. यज्ञकर्म उत्तम रीतीनें करावें हा ज्याचा अधिकार आहे असा स्विष्टकृत् नामक अग्नि आमचा यज्ञ उत्तम तऱ्हेनें संपादित करो. तो अग्नि धन देण्याकरितां, तें ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करो. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर ॥ २२ ॥

अग्निमय होतारमवृणीतायं यजमानꣳ पचन्पक्तीꣳ पचन्पुरोडाशं बुध्न-न्निन्द्राय छागम् । सूपस्थाऽअय देवो वनस्पतिरभवदिन्द्राय छागेन । अधुक्त मेदस्तꣳ प्रति पचताग्रेभीदवीवृधत्पुरोडाशेन । त्वामध ऋषे० ॥ २३ ॥

अर्थ—या यजमानानें आज सामान्यतः शिजविण्यास योग्य अशीं हविर्द्रव्यें व विशेषतः पुरोडाश शिजविला आणि त्यानें इंद्राकरितां यूपाला छाग बांधला. आज यूपरूपी वनस्पतिदेव छागानें इंद्राची सेवा करिता झाला. तो वपेपासून आरंभ करून भक्षण करिता झाला व शिजवून त्यानें त्याचीं अवदानें घेतलीं व पुन्हां तो पुरोडाशानें वृद्धि प्राप्त करिता झाला. हे मंत्रद्रष्ट्या, यजमानगोत्रानें वृत अशा ऋषिपुत्रा, दैवी-होत्या अग्ने, हा यजमान पुष्कळ देव आले असतांहि तुझेंच वरण करिता झाला. कारण कीं त्याला असें वाटलें, तूंच देवाला देण्यास योग्य असें द्रव्य ग्रहण करशील. हे अग्ने, जीं दानें देवांनीं दिलीं असतील तीं या यजमानाला दे अथवा देण्याचा उपक्रम कर. हे होत्या, तूं चांगलें बोलण्याकरितां पाठविला गेला आहेस. तूं चांगलीं वाक्यें बोल. हा मनुष्यहोतादेखील चांगलीं वाक्यें बोलण्याकरितां पाठविला गेला आहे ॥ २३ ॥

होता यक्षत्समिधानं महयज्ञꣳ सुसमिध्वं वरेण्यमग्निमिन्द्रं वयोधसम् । गायत्रीं छन्दऽइन्द्रियं त्र्यविं गां वयो दधद्धोत्वाज्यस्य होतर्यज ॥ २४ ॥

अर्थ—दैवी होता अग्नि व आयुष्य देणाऱ्या इंद्राचा याग करो. तो अग्नि मोठा प्रकाशमान् व कीर्तिसंपन्न आहे. हे होत्या, याग करीत असतां तूं गायत्री छंद, वीर्य,

दीड वर्षाची गाय व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन कर. हा इंद्रयुत प्रयाजदेव अग्नि घृताच्या अंशाचें पान करो. हे मनुष्यहोत्या, तूंहि याग कर. ॥ २४ ॥

होता यक्षत्तनूनपातमुद्भिदं यं गर्भमदितिर्दधे शुचिमिन्द्रं वयोधसम् । उष्णिहं छन्दऽइन्द्रियं दित्यवाहं गां वयो दधद्धेत्वाज्यस्य होतर्यज ॥ २५ ॥

अर्थ—दैवी होता तनूनपात् प्रयाजदेव व आयुष्य देणारा आणि अदितिगर्भापासून उत्पन्न झालेला जो इंद्र त्याचा याग करो. तो तनूनपात् यज्ञफल देणारा व पवित्र आहे. याग करीत असतां होत्यानें उष्णिक्छंद, वीर्य, दोन वर्षांची गाय व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करावें. तो इंद्रसहित तनूनपात् देव या घृताच्या अंशाचें पान करो. हे मनुष्यहोत्या, तूंहि याग कर. ॥ २५ ॥

होता यक्षदीडेन्यमीड्तं वृत्रहन्तमभिष्टिभिरीड्यꣳ सहꣳ सोममिन्द्रं वयोधसम् । अनुष्टुभं छन्दऽइन्द्रियं पञ्चाविं गां वयो दधद्धेत्वाज्यस्य होतर्यज ॥ २६ ॥

अर्थ—दैवी होता इडासंज्ञक प्रयाजदेवतांसह आयुष्य देणारा, स्तुत्य, ऋषींनीं स्तविलेला, वृत्रासुराला मारणारा, प्रशस्य व बलानें सोमासारखा आल्हाद देणारा जो इंद्र त्याचा याग करो. याग करीत असतां त्यानें अनुष्टुप्छंद, वीर्य, अडीच वर्षांची गाय व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करावें. इंद्रसहित इडा घृताचा अंश भक्षण करो. हे मनुष्यहोत्या, तूं याग कर. ॥ २६ ॥

होता यक्षत्सुबर्हिषं पूषण्वन्तमर्म्यꣳ सीदन्तं बर्हिषि प्रियेऽमृतेन्द्रं वयोधसम् । बृहतीं छन्दऽइन्द्रियं त्रिवत्सं गां वयो दधद्धेत्वाज्यस्य होतर्यज ॥ २७ ॥

अर्थ—दैवी होता बर्हिरूपी प्रयाजदेवतेसह आयुष्यदात्या इंद्राचा याग करो. तो इंद्र सूर्यानें युक्त, अविनाशी, आवडत्या व अक्षय्य अशा कुशावर राहणारा आहे. होत्यानें याग करीत असतां बृहतीछंद, वीर्य, तीन वर्षांचा वृषभ व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करावें. तो इंद्र घृताच्या अंशाचें पान करो. हे मनुष्यहोत्या, तूंहि याग कर. ॥ २७ ॥

होता यक्षद्वनस्पतीꣳ सुप्रायणाऽऋतावृधो द्वारो देवीर्हिरण्ययीर्ब्रह्माणमिन्द्रं वयोधसम् । पङ्क्तिं छन्दऽइन्द्रियं तूर्यवाहं गां वयो दधद्वन्त्वाज्यस्य होतर्यज ॥ २८ ॥

अर्थ—दैवी होता, द्वारदेवता, सुदृढ व आयुष्य देणाऱ्या इंद्राचा याग करो. त्या देवतांसंबंधीं द्वारें विस्तीर्ण, सहज जातां येण्यासारखीं, सत्य वाढविणारीं व सोन्याचीं बनविलीं असावीं त्याप्रमाणें दृढ आहे. होत्यानें याग करीत असतां पंक्तिच्छंद, वीर्य, साडेतीन वर्षांचा वृषभ व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करावें. द्वारदेवता घृताच्या अंशाचें पान करो. हे मनुष्यहोत्या, तूंहि याग कर. ॥ २८ ॥

होता यक्षत्सुपेशसा सुशिल्पे बृहतीऽउभे नक्तोषासा न दर्शते विश्वमिन्द्रं वयोधसम् । त्रिष्टुभं छन्दऽइहेन्द्रियं पष्ठवाहं गां वयो दधद्धोतामाज्यस्य होतर्यज ॥ २९ ॥

अर्थ—दैवी होता रात्र आणि दिवसाच्या देवता व सर्वात्मा आणि आयुष्यदाता इंद्र यांचा याग करो. त्या दिवस-रात्रींच्या देवता उत्तम रूपवती एकमेकांच्या तोडीच्या व सुंदर आहेत. याग करीत असतां होत्यानें त्रिष्टुप्‌च्छंद, वीर्य, चार वर्षांची गाय व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करावें. त्या दिवसरात्रींच्या देवता घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर. ॥ २९ ॥

होता यक्षत्प्रचेतसा देवानामुत्तमं यशो होतारा दैव्या कवी सयुजेन्द्रं वयोधसम् । जगतीं छन्दऽइन्द्रियमनड्वाहं गां वयो दधद्धोतामाज्यस्य होतर्यज ॥ ३० ॥

अर्थ—दैवी होता देवांचे होते व आयुष्यदाता इंद्र यांचा याग करो. ते देवांचे होते उत्तम ज्ञानवान् देवांचें जणूंकाय मूर्तिमान यश व भूतकालदर्शी आहेत. यागाच्या वेळीं होत्यानें जगतीछंद वीर्य, गाडी ओढणारा बैल व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करावें. ते देवहोते घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर ॥ ३० ॥

होता यक्षत्पेशस्वतीस्तिस्रो देवीर्हिरण्ययीर्भारतीर्बृहतीर्महीः पतिमिन्द्रं वयोधसम् । विराजं छन्दऽइहेन्द्रियं धेनुं गां वयो दधद्यन्त्वाज्यस्य होतर्यज ॥ ३१ ॥

अर्थ—दैवी होता इडा, सरस्वती, भारती या तीन देवता आणि पालक व आयुष्यप्रद अशा इंद्राचा याग करोत. इडादि देवता रूपसंपन्न, अंगावर सोन्याचे दागिने असलेल्या व मोठ्या तेजस्वी आहेत. यागाचे वेळीं होत्यानें विराटच्छंद,

वीर्य, दूध देणारी गाय व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करावें. त्या इंद्रसहित तीन देवता घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर ॥ ३१ ॥

होता यक्षत्सुरेतसं त्वष्टारं पुष्टिवर्धनꣳ रूपाणि बिभ्रतं पृथक्पुष्टि-मिन्द्रं वयोधसम् । द्विपदं छन्दऽइन्द्रियमुक्षाणं गां न वयो दधद्देत्वाज्यस्य होतर्यज ॥ ३२ ॥

अर्थ—दैवी होता, त्वष्टा व आयुष्य देणाऱ्या इंद्राचा याग करो. तो त्वष्टा उत्तम वीर्यसंपन्न, पुष्टि वाढविणारा, नाना जातीमध्यें रूपें व वृद्धि उत्पन्न करणारा असा आहे. याग करीत असतां होत्यानें द्विपदच्छंद; वीर्य, रेतःसिंचनयोग्य वृषभ व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करावें. हे त्वष्टया, घृताच्या अंशाचें पान कर. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर ॥ ३२ ॥

होता यक्षद्वनस्पतिꣳ शमितारꣳ शतक्रतुꣳ हिरण्यपर्णमुस्थिनꣳ रशनां बिभ्रतं वशिं भगमिन्द्रं वयोधसम् । ककुभं छन्दऽइहेन्द्रियं वशां वेहतं गां वयो दधद्देत्वाज्यस्य होतर्यज ॥ ३३ ॥

अर्थ—दैवी होता वनस्पति व आयुष्यदाता इंद्र यांचा याग करो. तो वनस्पती हविर्द्रव्यांचा संस्कार करणारा, पुष्कळ कर्में करणारा, सुवर्णाचीं पानें असलेला, ज्याच्याजवळ शस्त्रें (स्तावक मंत्र) उच्चारले जातात असा पशूची दोरी धारण करणारा, सुंदर व पूज्य असा आहे. यागाचे वेळीं होत्यानें ककुप्च्छंद, वीर्य, वन्ध्या गाय व जिचा गर्भ नष्ट झाला अशी गाय अशा दोन्ही व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करावें. तो इंद्रसहित वनस्पति घृताच्या अंशाचें पान करो. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर ॥ ३३ ॥

होता यक्षत्स्वाहाकृतीरग्निं गृहपतिं पृथग्वरुणं भेषजं कविं क्षत्रमिन्द्रं वयोधसम् । अतिच्छन्दसं छन्दऽइन्द्रियं बृहद्वृषभं गां वयो दधद्यन्वाज्यस्य होतर्यज ॥ ३४ ॥

अर्थ—दैवी होता स्वाहाकारस्वरूपी प्रयाजदेवता व आयुर्दाता इंद्र यांचा याग करो. तो इंद्र देवांचा अग्रणी, प्रत्येक यज्ञांत गृहाचा पालक, ऋत्विजांना प्रार्थना करण्यास योग्य, रोगनाशक, भूतकालदर्शी व व्रणापासून रक्षण करणारा आहे. याग करीत असतां होत्यानें अतिच्छंदस्संज्ञक छंद, वीर्य, मोठा धष्टपुष्ट बैल व आयुष्य

इंद्राचे ठायीं स्थापन करावें. इंद्रसहवर्तमान स्वाहाकृतिरूपी प्रयाजदेवता घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर ॥ ३४ ॥

देवं बर्हिर्वेर्योधसं देवमिन्द्रमवर्धयत् । गायत्र्या छन्दसेन्द्रियं चक्षुरिन्द्रे वयो दधद्वसुवने वसुधेयस्य वेतु यज ॥ ३५ ॥

अर्थ—गायत्रीच्छंदानें चक्षुरिंद्रिय व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करणाऱ्या बर्हिरादि देवता आयुष्यप्रद इंद्राला वाढवित्या झाल्या. त्या बर्हिरादि देवता धन देण्याकरितां व ठेवण्याकरितां यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर. ॥ ३५ ॥

देवीर्द्वारो वयोधसꣳ शुचिमिन्द्रमवर्धयन् । उष्णिहा छन्दसेन्द्रियं प्राणमिन्द्रे वयो दधद्वसुवने वसुधेयस्य व्यन्तु यज ॥ ३६ ॥

अर्थ—उष्णिक्छंदानें प्राण, इंद्रिय व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करणाऱ्या द्वारदेवता आयुष्यप्रद व पवित्र अशा इंद्राला वाढवित्या झाल्या. त्या द्वारदेवता धन देण्याकरितां, तें ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर. ॥ ३६ ॥

देवीऽउषासानक्ता देवमिन्द्रं वयोधसं देवी देवमवर्धताम् । अनुष्टुभा छन्दसेन्द्रियं बलमिन्द्रे वयो दधद्वसुवने वसुधेयस्य वीतां यज ॥ ३७ ॥

अर्थ—अनुष्टुप्छंदानें बलरूपी इंद्रिय व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करणाऱ्या प्रकाशमान अशा दिवस व रात्रीच्या देवता आयुष्यप्रद इंद्राला वाढवित्या झाल्या. त्या देवता धन देण्याकरितां, तें ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर. ॥३७॥

देवी जोष्ट्री वसुधिती देवमिन्द्रं वयोधसं देवी देवमवर्धताम् । बृहत्या छन्दसेन्द्रियꣳ श्रोत्रमिन्द्रे वयो दधद्वसुवने वसुधेयस्य वीतां यज ॥ ३८ ॥

अर्थ—बृहतीच्छंदानें श्रोत्रेंद्रिय व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करणाऱ्या प्रीतिमान् धन देणाऱ्या व प्रकाशक अशा दोन अनुयाज देवता आयुष्यप्रद व प्रकाशमान् इंद्राला वाढवित्या झाल्या. त्या देवता धन देण्याकरितां, तें ठेवण्याकरितां, व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर. ॥ ३८ ॥

देवीऽऊर्जाहुती दुधे सुदुघे पयसेन्द्रं वयोधसं देवी देवमवर्धताम् । पङ्क्त्या छन्दसेन्द्रियं शुक्रमिन्द्रे वयो दधद्वसुवने वसुधेयस्य वीतां यजं ॥३९॥

अर्थ—पंक्तिच्छंदानें वीर्यरूपी इंद्रिय व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करणाऱ्या रसाची ज्यांना आहुति आहे अशा दूध देणाऱ्या, ज्यांचें दूध सहज काढतां येतें अशा दान करणाऱ्या दोन देवता दुग्धानें आयुष्यप्रद इंद्राला वाढवित्या झाल्या. त्या दोन देवता धन देण्याकरितां, तें ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर. ॥३९॥

देवा दैव्या हातारा देवमिन्द्रं वयोधसं देवी देवमवर्धताम् । त्रिष्टुभा छन्दसेन्द्रियं त्विषिमिन्द्रे वयो दधद्वसुवने वसुधेयस्य वीतां यजं ॥ ४० ॥

अर्थ—त्रिष्टुप्छंदानें कांतिरूपी इंद्रिय (त्वक् इंद्रिय) व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करणारे व प्रकाशक असे देवहोते प्रकाशमान व आयुष्यप्रद इंद्राला वाढविते झाले. ते देवहोते धन देण्याकरितां, तें ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशांचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर ॥ ४० ॥

विनियोग—दैवीस्तिस्रः तिस्रोदेवी अशी आदर दाखविण्याकरितां द्विरुक्ति केली आहे.

देवीस्तिस्रस्तिस्रो देवीर्वयोधसं पतिमिन्द्रमवर्धयन् । जगत्या छन्दसेन्द्रियꣳ शूषमिन्द्रे वयो दधद्वसुवने वसुधेयस्य व्यन्तु यजं ॥ ४१ ॥

अर्थ—भारती, इडा व सरस्वती या तीन देवता जगतीछंदानें बलरूपी इंद्राचे ठायीं स्थापन करणाऱ्या होत्साट्या पालक व आयुष्यप्रद अशा इंद्राला वाढवित्या झाल्या. त्या देवता धन देण्याकरितां, तें मिळविण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करोत. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर. ॥ ४१ ॥

देवो नराशꣳ सो देवमिन्द्रं वयोधसं देवो देवमवर्धयत् । विराजा छन्दसेन्द्रियꣳ रूपमिन्द्रे वयो दधद्वसुवने वसुधेयस्य वेतु यजं ॥ ४२ ॥

अर्थ—विराट्छंदानें रूपइंद्रिय व आयुष्य इंद्रियाचे ठायीं स्थापन करणारा यज्ञरूपी देव आयुष्यप्रद प्रकाशमान इंद्राला वाढविता झाला. तो यज्ञदेव धन देण्या-

करितां, तें ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करो. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर. ॥ ४२ ॥

देवो वनस्पतिर्देवमिन्द्रं वयोधसं देवो देवमवर्धयत्। द्विपदा छन्दसेन्द्रियं भगमिन्द्रे वयो दधद्वसुवने वसुधेयस्य वेतु यज ॥ ४३ ॥

अर्थ—द्विपद्छंदानें सौभाग्यरूपी इंद्रिय व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करणारा दाता, यूपरूपी जो वनस्पति देव तो प्रकाशमान व आयुष्यप्रद अशा इंद्राला वाढविता झाला. तो वनस्पती देव धन देण्याकरितां, तें ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करो. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर. ॥ ४३ ॥

देवं बर्हिवारितीनां देवमिन्द्रं वयोधसं देवं देवमवर्धयत् । ककुभा छन्दसेन्द्रियं यशऽइन्द्रे वयो दधद्वसुवने वसुधेयस्य वेतु यज ॥ ४४ ॥

अर्थ—ककुभ्छंदानें यशोरूपी इंद्रिय व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करणारा जलजन्य औषधीमध्यें श्रेष्ठ असा बर्हिदेव प्रकाशमान व आयुष्यप्रद इंद्राला वाढविता झाला. तो बर्हिदेव धन देण्याकरितां, तें ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करो. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर. ॥ ४४ ॥

देवोऽअग्निꣳ स्विष्टकृद्देवमिन्द्रं वयोधसं देवो देवमवर्धयत्। अतिच्छन्दसा छन्दसेन्द्रियं क्षत्रमिन्द्रे वयो दधद्वसुवने वसुधेयस्य वेतु यज ॥ ४५ ॥

अर्थ—अतिच्छंदस्छंदानें नाशापासून रक्षण करणारें इंद्रिय व आयुष्य इंद्राचे ठायीं स्थापन करणारा दाता, उत्तम यज्ञ करणारा अग्निरूपी देव आयुष्यप्रद व प्रकाशमान इंद्राला वाढविता झाला. तो अग्निदेव धन देण्याकरितां, तें ठेवण्याकरितां व यजमानाच्या घरांतील जमिनींत पुरण्याकरितां घृताच्या अंशाचें पान करो. हे मनुष्यहोत्या, तूंही याग कर. ॥ ४५ ॥

अग्निमय होतारमवृणीतायं यजमानऽ पचन्पक्तीऽ पचन्पुरोडाशं बध्नन्निन्द्राय वयोधसे छागम्। सूपस्थाऽअय देवो वनस्पतिरभवदिन्द्राय वयोधसे छागेन। अधत्त मेदस्तꣳ प्रति पचताग्नीदवीवृधत्पुरोडाशेन ॥ त्वामध ऋषे० ॥ ४६ ॥

अर्थ—या यजमानानें आज सामान्यतः शिजविण्यास योग्य अशीं हविर्द्रव्यें व विशेषतः पुरोडाश शिजविला आणि त्यानें आयुष्यप्रद इंद्राकरितां यूपाला छाग बांधला. आज यूपरूपी वनस्पतिदेव छागानें आयुष्यप्रद इंद्राची सेवा करिता झाला. तो वपेपासून आरंभ करून भक्षण करिता झाला. व शिजवून त्यानें त्याचीं अवदानें घेतलीं व पुनः तो पुरोडाशानें वृद्धि प्राप्त करता झाला. हे मंत्रद्रष्ट्या, यजमानगोत्रानें वृत अशा ऋषिपुत्रा, दैवी होत्या अग्ने, हा यजमान पुष्कल देव आले असतांही तुझेंच वरण करिता झाला. कारण कीं त्याला असें वाटलें कीं तूंच देवाला देण्यास योग्य असें द्रव्य ग्रहण करशील. हे अग्ने, जीं दानें देवांनीं दिलीं असतील तीं या यजमानाला दे. अथवा देण्याचा उपक्रम कर. हे होत्या, तूं चांगलें बोलण्याकरितां पाठविला गेला आहेस. तूं चांगलीं वाक्यें बोल. हा मनुष्यहोतादेखील चांगलीं वाक्यें बोलण्याकरितां पाठविला गेला आहे ॥ ४६ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**

माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** अष्टाविंशोऽध्यायः ॥ २८ ॥

इति अष्टाविंशोऽध्यायः समाप्तः।



अथ एकोनत्रिंशोऽध्यायः ॥ २९ ॥

विनियोग—हा अध्याय अश्वमेधसंबंधी आहे.

समिद्धोऽअ॒ञ्जन्कृ॒दरं॑ मती॒नां घृ॒तमग्ने॒ मधु॑म॒त्पिन्व॑मानꣳ। वा॒जी वह॑न्वा॒जिनं॑ जातवेदो दे॒वाना॑ बक्षि प्रि॒यमा स॒धस्थ॑म् ॥ १ ॥

अर्थ—हे ज्ञानोत्पादक अग्ने, तूं प्रिय अशा देवांच्या सभेंत जा व तेथें त्यांना संतुष्ट कर. तूं प्रदीप्त, बुद्धींचा गर्भ प्रकट करणारा, (बुद्धिरहस्य प्रकाशित करणारा) स्वादिष्ट घृत देवांना देणारा, गमन करणारा व वाजिन् नांवाचें हविर्द्रव्य देवाकडे पोंचविणारा असा आहेस ॥ १ ॥

घृ॒तेना॒ञ्जन्सं प॒थो दे॒वय॑नान्प्र॒जाना॑न्वा॒ज्यप्ये॑तु दे॒वान्। अनु॑ त्वा सप्ते प्र॒दिशा॑ ऽ सचन्ताꣳ स्व॒धाम॒स्मै यज॑मानाय धेहि ॥ २ ॥

अर्थ—घृतानें देवयानमार्ग (देवांनीं जावयाचे मार्ग) रूपी जीं हविर्द्रव्यें त्यांना घृतानें भिजविणारा अश्व देवाकडे जावो. त्यानें मीही देवांचें हविर्द्रव्य आहे असें समजावें. हे अश्वा, सर्व दिशांकडील भूतें तुझेमागून गमन करोत. या यजमानाला हविर्द्रव्य दे ॥ २ ॥

ई॒डे॒न्यश्वा॑सि॒ वन्द्य॑श्च वाजिन्ना॒शुश्वा॑सि॒ मेध्य॑श्च सप्ते। अ॒ग्निष्ट्वा॑ दे॒वैर्व॑सु॒भिꣳ स॒जोषा॑ ऽ प्री॒तं वह्निं॑ वहतु जातवेदाꣳ॥ ३ ॥

अर्थ—हे अश्वा, तूं स्तुत्य, वंद्य, शीघ्र, व अश्वमेधयोग्य आहेस. अग्नि संतुष्ट व हविर्द्रव्य धारण करणाऱ्या अशा तुला देवाकडे नेवो. त्या अग्नीचा देवाशीं स्नेह आहे ॥ ३ ॥

स्ती॒र्णं ब॒र्हिꣳ सु॒ष्टरी॑मा जुषा॒णोरु पृ॒थु प्रथ॑मानं पृथि॒व्याम्। दे॒वेभि॑र्युक्त॒मदि॑तिꣳ स॒जोषा॑ꣳ स्यो॒नं कृ॑ण्वा॒ना सु॑वि॒ते द॑धातु ॥ ४ ॥

अर्थ—आम्ही दर्भ उत्तम रीतीनें पसरूं. त्या पृथ्वीवर विस्तीर्ण रीतीनें पसरलेल्या देवसहित दर्भांना अदितिदेवी स्वर्ग लोकामध्यें स्थापन करो. ती अदितिदेवी स्नेहयुक्त, सुख देणारी व प्रसन्न होणारी आहे ॥ ४ ॥

एताऽउ वऽ सुभगा विश्वरूपा विपक्षोभिऽ श्रयमाणाऽउदातेऽ । ऋष्वाः सतीः कवषऽ शुम्भमाना द्वारो देवीः सुप्रायणा भवन्तु ॥ ५ ॥

अर्थ—हे ऋत्विग् यजमानांनो, शोभायुक्त नानारूपी अशीं जीं तुमचीं द्वारें तीं वर विस्तीर्ण अशा कवाडांच्या फळ्यांनीं विशाल होवोत. तीं द्वारें इकडे तिकडे हालणारीं, मोठीं, चांगलीं, लागतांना शब्द करणारीं, सुशोभित व ज्यांत सहज गमन करितां येईल अशीं आहेत ॥ ५ ॥

अन्तरा मित्रावरुणा चरन्ती मुखं यज्ञानामभिसंविदाने । उषासा वाꣳ सुहिरण्ये सुशिल्पेऽऋतस्य योनावि॒ह सादयामि ॥ ६ ॥

अर्थ—हे पत्नी यजमानांनो, तुमच्या यज्ञाच्या या स्थानावर रात्रीं व दिवसाच्या देवतांचें मी स्थापन करितों. ज्या देवता द्युलोक व पृथ्वी यांच्या मध्यभागीं संचार करणाऱ्या यज्ञाचें मुख असा जो अग्निहोत्रहोमकाल त्याला सांगणाऱ्या, ज्यांत उत्तम सुवर्णालंकार भूषणें आहेत व त्या एकमेकांच्या तोडीच्या अशा आहेत ॥ ६ ॥

प्रथमा वाꣳ सरथिना सुवर्णी देवौ पश्यन्तौ भुवनानि विश्वा । अर्पिप्रयं चोदना वां मिमाना होतारा ज्योतिः प्रदिशा दिशन्ता ॥ ७ ॥

अर्थ—हे दोन यजमानांनो, तुमच्या दोन मुख्य होत्यांना मीं प्रसन्न केलें. ते दोन होते एका रथावर बसणारे, चांगल्या अंगकांतीचे, प्रकाशमान, सर्व भुवनांना पाहणारे, तुमच्या यज्ञकर्माचें अनुष्ठान करणारे आपल्या हाताच्या खुणेनें या आहवनीय अग्नींत होम करा असें सांगणारे आहेत ॥ ७ ॥

आदित्यैर्नो भारती वष्टु यज्ञꣳ सरस्वती सह रुद्रैर्नऽआवीत् । इडोपहूता वसुभिः सजोषा यज्ञं नो देवीरमृतेषु धत्त ॥ ८ ॥

अर्थ—आदित्ययुक्त भारती आमच्या यज्ञाची इच्छा करो. रुद्रासह सरस्वती आमच्या यज्ञाचें रक्षण करो. व इडाही रक्षण करो. ती इडा देवांनीं बोलाविलेली व स्नेहयुक्त आहे. हे भारती सरस्वती इडादेवींनो, तुम्ही आमचा यज्ञ देवाकडे न्या ॥ ८ ॥

त्वष्टा वीरं देवकामं जजान त्वष्टुरर्वी जायतऽआशुरश्वः । त्वष्टेदं विश्वं भुवनं जजान बहोः कर्तारमिह यक्षि होतः ॥ ९ ॥

अर्थ—त्वष्टा देवांची इच्छा करणाऱ्या अर्थात् देवांचा याग करणाऱ्या पुत्राला उत्पन्न करितो. त्वष्टयापासून शीघ्र गमन करणारा व सर्व दिशाव्यापी घोडा उत्पन्न होतो. तसेंच त्यानें हें सर्व विश्व निर्माण केलें. हे होत्या, तूं या यज्ञांत पुष्कळ कार्य करणाऱ्या त्वष्टयाचा याग कर ॥ ९ ॥

अश्वो घृतेन त्मन्या समक्तऽउप देवाँ२ ॥ ऋतुशऽ पाथऽएतु । वनस्पतिर्देवलोकं प्रजानन्नग्निना हव्या स्वदितानि वक्षत् ॥ १० ॥

अर्थ—पत्नीनीं घृतानें माखलेला घोडा स्वतः यज्ञाचे वेळीं हविर्भाग देवाकडे नेवो. तसेंच देवलोकांना जाणणारा वनस्पति देव अग्नीनें भक्षित केलेलीं हविर्द्रव्यें देवांकडे नेवो ॥ १० ॥

प्रजापतेस्तपसा वावृधानऽ सद्यो जातो दधिषे यज्ञमग्ने । स्वाहाकृतेन हविषा पुरोगा याहि साध्या हविरदन्तु देवाऽ ॥ ११ ॥

अर्थ—हे अग्ने, प्रजापतीच्या तपश्चर्येनें वाढणारा, नुकताच अरणीपासून उत्पन्न झालेला तूं यज्ञाला धारण करितोस. तूं स्वाहाकारपूर्वक होमलेल्या हविर्द्रव्यासह अग्रगामी (पुढें जाणारा) होऊन देवाकडे जा. तेथें देव उत्तम हवि भक्षण करोत. ॥ ११ ॥

यदक्रन्दः प्रथमं जायमानऽउद्यन्त्समुद्रादुत वा पुरीषात् । श्येनस्य पक्षा हरिणस्य बाहूऽउपस्तुत्यं महि जातं तेऽअर्वन् ॥ १२ ॥

अर्थ—हे अश्वा, उदधींतून प्रथम उत्पन्न झालेला व पशुजातीत उत्पन्न झालेला तूं जेव्हां खिंकाळलास (शब्द करिता झालास) तेव्हां तुझें ऐश्वर्य पुढीलप्रमाणें स्तुति करण्यास योग्य असें असतें झालें. तुझ्या खिंकाळण्यानें शौर्यांत तूं श्येन पक्ष्याला व वेगांत हरिणाच्या पायांना जिंकलेंस. (अशी तुझी स्तुति झाली.) ॥ १२ ॥

यमेन दत्तं त्रितऽएनमायुनगिन्द्रऽएणं प्रथमोऽअध्यतिष्ठत् । गन्धर्वोऽस्य रशनामगृभ्णात्सूरादश्वं वसवो निरतष्ट ॥ १३ ॥

अर्थः—अष्ट वसूंनीं सूर्यमंडलापासून अश्वाला बाहेर ओढून काढलें. त्यावेळीं तीन स्थानांतील वायू यमानें दिलेल्या या अश्वाशीं संयुक्त झाला. प्रथम इंद्र या अश्वावर आरोहण करिता झाला व विश्वावसु गंधर्व या अश्वाची दोरी (लगाम) धारण करिता झाला. ॥ १३ ॥

असि यमोऽअस्यादित्योऽअर्वन्नसि त्रितो गुह्येन व्रतेन । असि सोमेन समया विपृक्तऽआहुस्ते त्रीणि दिवि बन्धनानि ॥ १४ ॥

अर्थ—हे अश्वा, तूं यम व आदित्य आहेस व गुप्त कर्मानें तीन स्थानीं राहणारा असा इंद्र आहेस. तसेंच तूं सोमाशीं संलग्न झाला आहेस. अशा तऱ्हेनें यमादिकाशीं सायुज्याला गेलेल्या व आदित्यरूपानें आकाशांत असलेलीं तुझीं ऋग्यजुःसामरूपी तीन स्वरूपें आहेत असें शहाणे लोक बोलतात. ॥ १४ ॥

त्रीणि तऽआहुर्दिवि बन्धनानि त्रीण्याप्सु त्रीण्यन्तः समुद्रे । उतेव मे वरुणश्छन्त्स्यर्वन्यत्रा तऽआहुः परमं जनित्रम् ॥ १५ ॥

अर्थ—हे अश्वा, ज्या ठिकाणीं वायुरूपानें तुझें श्रेष्ठ जन्म झालें असें शहाणे लोक सांगतात तेथें आकाशांत आदित्यरूपानें तुझीं पूर्वोक्त तीन स्वरूपें त्यांनीं सांगितलीं; जलांत कृषि, वृष्टि व बीजें हीं तुझीं तीन रूपें आहेत, व अंतरिक्षांत मेघ विद्युत् व मेघाचा शब्द हीं तुझीं तीन रूपें आहेत, व वरुणरूपी माझी स्तुति करतोस असें शहाणे लोक बोलतात. ॥ १५ ॥

इमा ते वाजिन्नवमार्जनानीमा शफानाꣳ सतितुर्निधाना । अत्रा ते भद्रा रशनाऽअपश्यमृतस्य याऽअभिरक्षन्ति गोपाः ॥ १६ ॥

अर्थ—हे अश्वा, वेतस, कट वगैरे तुझें अंग झाडणारीं साधनें मी पाहतों. तसेंच तुझ्या खुरांना बांधणाऱ्या ज्या दोऱ्या त्यांच्या खुंट्या मीं पाहिल्या. त्या दोऱ्या कल्याणकारक व यज्ञाच्या संरक्षक आहेत. ॥ १६ ॥

आत्मानं ते मनसारादजानामवो दिवा पतयन्तं पतङ्गम् । शिरोऽअपश्यं पथिभिः सुगेभिररेणुभिर्जेहमानं पतत्रि ॥ १७ ॥

अर्थ—हे अश्वा, तुझें शरीर जवळून व लांबून मी मनानें ओळखतों. तें तुझें शरीर भूमीवरून आकाशमार्गानें सूर्याप्रत उडणारे आहे. आकाशांत असलेले, गमनास सुलभ व धूळ वगैरे नसलेले जे मार्ग त्यायोगें गमन करणारे व उडणारे जें तुझें सूर्यरूपी मस्तक तेंही मी पाहतों. ॥ १७ ॥

अत्रा त रूपमुत्तममपश्यं जिगीषमाणमिषऽआ पदे गोः । यदा ते मर्तोऽअनु भोगमानडादिद्ग्रसिष्ठऽओषधीरजीगः ॥ १८ ॥

अर्थ—हे अश्वा, या सूर्यमंडलामध्यें उत्तम असें तुझें रूप मी सर्व बाजूंनीं पाहतों, तें रूप हविर्द्रव्याला जिंकण्याची इच्छा करितें. ज्यावेळीं मनुष्यरूपी यजमान तुला हविर्भोग देतो त्यावेळीं तत्कालच तूं हविरूपी औषधी (गवत) भक्षण करतोस. तूं अतिशय भक्षण करणारा आहेस ॥ १८ ॥

अनु त्वा रथोऽअनु मर्योऽअर्वन्ननु गावोऽनु भगः कनीनाम्। अनु व्रातासस्तव सख्यमीयुरनु देवा ममिरे वीर्यं ते ॥ १९ ॥

अर्थ—हे अश्वा, रथ, मनुष्य, यजमान, गाई, कन्यांचें ऐश्वर्य हीं तुझ्यामागून गमन करोत. तात्पर्य तूं जाशील तेथें हीं येवोत. तसेंच मनुष्यसमुदाय तुझ्या मैत्रीला प्राप्त होते झाले. विशेष काय सांगावें ? देवांनीं तुझ्या सामर्थ्याचें अनुमान केलें ॥ १९ ॥

हिरण्यशृङ्गो योऽअस्य पादा मनोजवाऽअवरऽइन्द्रऽआसीत्। देवाऽइदस्य हविरद्यमायन्योऽअर्वन्तं प्रथमोऽअध्यतिष्ठत् ॥ २० ॥

अर्थ—या घोड्याची कांति सोन्यासारखी आहे व याचे पाय लोखंडासारखे व मनाप्रमाणें वेगवान् आहेत. जो इंद्र पहिल्यानें या घोड्यावर बसला तो देखील या घोड्यापेक्षां कमी दर्जाचा आहे. कारण हा घोडा वायुरूपी आहे व देवदेखील या घोड्याचें भक्ष्य जें हविर्द्रव्य त्याप्रत आगमन करिते झाले ॥ २० ॥

विनियोग—या घोड्याची सूर्यरथाच्या घोड्यांच्या रूपानें स्तुति करितात.

ईर्मान्तासः सिलिकमध्यमासः सꣳ शूरणासो दिव्यासोऽअत्याः। हꣳसाऽइव श्रेणिशो यतन्ते यदाक्षिषुर्दिव्यमज्मम्श्वाः ॥ २१ ॥

अर्थ—ज्यावेळीं सूर्याच्या रथाला जोडलेले सात घोडे हंसाप्रमाणें संघशक्ति करून (जमावानें जोर करून) उडण्याचा प्रयत्न करितात त्यावेळीं ते आकाशाला व्याप्त करितात. त्यावेळीं त्या अश्वांच्या शरीराचा मध्यभाग पुढें ढकलला जातो म्हणजे छाती व मांड्या मोठ्या होतात; मध्य-प्रदेश संलग्न होऊन पोट लहान होतें व शूं शूं असा शब्द त्यांच्या मुखांतून निघतो. ते अश्व दिव्य आहेत व एकदां रथाला जोडलेले ते ब्रह्मदेवाचा दिवस संपेपर्यंत त्या रविरथाला सारखे ओढीत राहतात ॥ २१ ॥

तव शरीरं पतयिष्ण्वर्वन् तव चित्तं वातऽइव ध्रजीमान् । तव शृङ्गाणि विष्ठिता पुरुत्रारण्येषु जर्भुराणा चरन्ति ॥ २२ ॥

अर्थ—हे अश्वा, तुझे शरीराचा स्वभाव उसळी मारून गमन करण्याचा आहे व तुझें चित्त वाऱ्याप्रमाणें सूक्ष्म वस्तूंचें ग्रहण करण्याचें आहे. तसेंच हे अश्वा, विद्युत्, चंद्र, अर्क व अग्नि यांमध्यें नानाप्रकारेंकरून स्थित असलेल्या व विकास पावणाऱ्या तुझ्या कांति अरण्यांत दावाग्निरूपानें पसरतात ॥ २२ ॥

उप प्रागाच्छसनं वाज्यर्वी देवद्रीचा मनसा दीध्यानꣳ । अजꣳ पुरो नीयते नाभिरस्यानु पश्चात्कवयो यन्ति रेभाः ॥ २३ ॥

अर्थ—घोडा हिंसास्थानाला प्राप्त झाला. तो गमनशील आहे व त्याचें चित्त देवांकडे असल्यानें तो प्रकाशमान आहे. या घोड्याच्या पुढें नाभिस्थानीं अजाला (मेंढयाला) नेतात, व या अश्वाच्या मागें स्तुति करणारे ऋत्विज् येतात ॥ २३ ॥

उप प्रागात्परमं यत्सधस्थमर्वाँ२॥ अच्छा पितरं मातरं च । अद्या देवान्जुष्टतमो हि गम्याऽअथाशास्ते दाशुषे वीर्याणि ॥ २४ ॥

अर्थ—अश्व द्यावापृथिवींच्या समीप त्यांच्या एकत्र बसण्याच्या उत्कृष्ट स्थानांवर प्राप्त झाला. आतां हे यजमाना, तूं संतुष्ट होऊन देवलोकाप्रत जा. अशा तऱ्हेनें देवत्वाला प्राप्त झालेला व हविर्भाग देणाऱ्या तुला देवसमुदाय उपभोग्य वस्तु देवो ॥ २४ ॥

समिद्धोऽअद्य मनुषो दुरोणे देवो देवान्यजसि जातवेदꣳ । आ च वह मित्रमहश्चिकित्वान्त्वं दूतः कविरसि प्रचेताः ॥ २५ ॥

अर्थ—हे सुज्ञ अग्ने, यजमानाच्या यज्ञशाळेंत आज प्रदीप्त असा तूं देवांचा याग करितोस. हे यजमानाना महत्त्व देणाऱ्या अग्ने, तूं देवांना बोलाव व त्यांचा याग कर. कारण कीं, तूं बुद्धिमान, भूतकालदर्शी व शहाणा असा दूत आहेस ॥ २५ ॥

तनूनपात्पथऽऋतस्य यानान्मध्वा समञ्जन्स्वदया सुजिह्व । मन्मानि धीभिरुत यज्ञमृन्धन्देवत्रा च कृणुह्यध्वरं नः ॥ २६ ॥

अर्थ—हे जलाच्या पौत्रा, चांगली जीभ असलेल्या अग्ने, तूं यज्ञाचे मार्ग म्हणजे हविर्द्रव्यें त्यांना भक्षण कर व भक्षण करीत असतां त्या हविर्द्रव्यांना मधुररसानें

माख, बुद्धिसहवर्तमान ज्ञानें वाढवून व यज्ञाची समृद्धि करून आमचा यज्ञ तूं देवांकडे पाठीव ॥ २६ ॥

नराशꣳसस्य महिमानमेषामुपस्तोषाम यजतस्य यज्ञैः । ये सुक्रतवꣳ शुचयो धियंधाः स्वदन्ति देवाऽउभयानि हव्या ॥ २७ ॥

अर्थ—यज्ञांनीं पूजिल्या जाणाऱ्या प्रजापतीचें माहात्म्य देवांच्यामध्यें आम्ही स्तवितों. (माहात्म्याची स्तुति करितों.) ते देव सोम व इतर हविर्द्रव्यें अशा दोघांना भक्षण करितात व ते उत्तम कर्म करणारे पवित्र व बुद्धिधारक आहेत ॥२७॥

आजुह्वानऽईड्यो वन्द्यश्चायाहग्ने वसुभिꣳ सजोषाः । त्वं देवानामसि यह्व होता सऽएनान्यक्षीषितो यजीयात् ॥ २८ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं देवांना बोलविणारा, स्तुत्य, वंद्य, अष्टवसूंशीं स्नेह करणारा असा आहेस. हे महत्स्वरूपा, प्रेरणा केला गेलेला व अत्यंत यजनशील असा तूं देवांना बोलविणारा आहेस. तूं त्यांचा याग कर ॥ २८ ॥

प्राचीनं बर्हिः प्रदिशा पृथिव्या वस्तोरस्या वृज्यतेऽअग्रेऽअह्नाम् । व्युं प्रथते वितरं वरीयो देवेभ्योऽअदितये स्योनम् ॥ २९ ॥

अर्थ—दिवसा सकाळीं श्रुतीची आज्ञा म्हणून पूर्वेकडे अग्र असलेले या वेदीच्या आच्छादनाकरितां दर्भ पसरतात. ते अत्यंत श्रेष्ठ, देवांना व अदितीला सुख देणारे, दर्भ विशेषेंकरून पसरले असल्यानें विस्तीर्ण होतात ॥ २९ ॥

व्यचस्वतीरुर्विया विश्रयन्तां पतिभ्यो न जनयः शुम्भमानाः । देवीर्द्वारो बृहतीर्विश्वमिन्वा देवेभ्यो भवत सुप्रायणाः ॥ ३० ॥

अर्थ—विस्तृत असल्यानें गमनास सुलभ अशा द्वारदेवता, ज्याप्रमाणें स्त्रिया आपल्या पतीच्या निमित्तानें ऊरु (मांड्या) विस्तीर्ण करितात त्याप्रमाणें विशाल होवोत. हे द्वारदेवतांनों, मोठ्या, सर्वत्रगामी, सुशोभित व विशाल अशा तुम्ही देवांकरितां त्यांना सहज जातां येईल अशा रीतीनें विस्तीर्ण व्हा ॥ ३० ॥

आ सुष्वयन्ती यजतेऽउपाकेऽउषासानक्ता सदतां नि योनौ । दिव्ये योषणे बृहती सुरुक्मेऽअधि श्रियꣳ शुक्रपिशं दधाने ॥ ३१ ॥

अर्थ—दिवस-रात्रीच्या देवता आपल्या यज्ञगृहामध्यें निश्चित बसोत. त्या परस्परांस हसणाऱ्या, पूज्य, एकमेकींजवळ बसलेल्या, स्त्री-स्वरूपाच्या, मोठ्या, सोन्याचे

दागिने असलेल्या; श्वेत व काबऱ्या रंगाच्या अशा आहेत. (दिवसाचा रंग पांढरा व रात्रीचा रंग काबरा असतो.) ॥ ३१ ॥

दैव्या होतारा प्रथमा सुवाचा मिमाना यज्ञं मनुषो यजध्यै । प्रचोदयन्ता विदथेषु कारू प्राचीनं ज्योतिः प्रदिशा दिशन्ता ॥ ३२ ॥

अर्थ—दैवी होते चांगली वाणी बोलणारे, यजमानाकरितां यज्ञ निर्माण करणारे, यज्ञामध्यें ऋत्विजांची प्रेरणा करणारे, स्वतःही यज्ञकर्म करणारे व हाताच्या खुणानें आहवनीय अग्नि दाखवून यांत याग करा असें सांगणारे आहेत ॥ ३२ ॥

आ नो यज्ञं भारती तूयमेत्विडा मनुष्वदिह चेतयन्ती । तिस्रो देवीर्बर्हिरेदꣳ स्योनꣳ सरस्वती स्वपसꣳ सदन्तु ॥ ३३ ॥

अर्थ—भारती, इडा व सरस्वती या यजमानयुक्त व कर्मज्ञान करून देणाऱ्या देवता आमच्या यज्ञास शीघ्र येवोत. उत्तम कर्म करणाऱ्या या तीन देवता सुखकारक अशा या दर्भावर बसोत ॥ ३३ ॥

यऽइमे द्यावापृथिवी जनित्री रूपैरपिꣳ शाद्भुवनानि विश्वा । तमद्य होतरिषितो यजीयान्देवं त्वष्टारमिह यक्षि विद्वान् ॥ ३४ ॥

अर्थ—हे होत्या, अत्यंत याग करणारा व स्वतःच्या कार्याचें ज्याला ज्ञान आहे असा तूं त्या त्वष्टृ देवाचा याग कर. ज्या त्वष्टृयानें सर्व प्राण्यांच्या उत्पादक अशा द्यावापृथिवींचीं व सर्व भुवनांचीं विचित्र रूपें निर्माण केलीं ॥ ३४ ॥

उपावसृज त्मन्या समञ्जन्देवानां पाथऽऋतुथा हवींꣳषि । वनस्पतिः शमिता देवोऽअग्निꣳ स्वदन्तु हव्यं मधुना घृतेन ॥ ३५ ॥

अर्थ—हे होत्या, देवांचें हविर्द्रव्य मधुररसयुक्त घृतानें माखून तूं स्वतः प्रत्येक यज्ञाचे वेळीं देवांना हविर्भाग दे. वनस्पतीयूप, शमितादेव व अग्नि हे तूं दिलेलें हविर्द्रव्य भक्षण करोत ॥ ३५ ॥

सयोजातो व्यमिमीत यज्ञमग्निर्देवानामभवत्पुरोगाꣳ । अस्य होतुः प्रदिश्यृतस्य वाचि स्वाहाकृतꣳ हविरदन्तु देवाꣳ ॥ ३६ ॥

अर्थ—देवांना बोलावणाऱ्या, पूर्व दिशेकडे आहवनीय स्वरूपानें असलेल्या या

अग्नीच्या मुखांत स्वाहाकारानें होमलेलें हवि देव भक्षण करोत. जो अग्नि नुकताच उत्पन्न होऊन या यज्ञाला विशेषेंकरून निर्माण करिता झाला व जो देवांचा अग्रगामी बनला ॥ ३६ ॥

केतुं कृण्वन्नकेतवे पेशो मर्याऽअपेशसे । समुषद्भिरजायथाः ॥ ३७ ॥

अर्थ—हे अग्ने, तुला यजमानांनीं उत्पन्न केलें आहे. तूं अज्ञानी मनुष्याला ज्ञान देणारा व सुवर्णरहित मनुष्याला सुवर्ण देणारा असा आहेस ॥ ३७ ॥

जीमूतस्येव भवति प्रतीकं यद्वर्मी याति समदामुपस्थे । अनाविद्धया तन्वा जय त्वꣳ स त्वा वर्मणो महिमा पिपर्तु ॥ ३८ ॥

अर्थ—ज्या वेळीं कवच धारण करणारा वीर संग्रामामध्यें येतो त्या वेळीं सेनेचें मुख मेघासारखें बनतें. म्हणजे विजा, कडकडाट, जलधारा यांचे योगें मेघ जसा असह्य होतो त्याप्रमाणें हस्ति, अश्व वगैरेंनीं व अस्त्र, बाण वगैरेंच्या वृष्टींनीं सेनामुख असह्य होतें. म्हणून हें कवच धारण करणाऱ्या वीरा, व्रणरहित अशा शरीरानें तूं शत्रूंना मारून जय प्राप्त कर. कवचाचा महिमा तुझें पालन करो. (ही कवचाची स्तुति) ॥ ३८ ॥

धन्वना गा धन्वनाजिं जयेम धन्वना तीव्राः समदो जयेम । धनुꣳ शत्रोरपकामं कृणोति धन्वना सर्वाꣳ प्रदिशो जयेम ॥ ३९ ॥

अर्थ—(ही धनुष्याची स्तुति) आम्ही धनुष्याच्या साहाय्यानें गाई, मार्ग व उग्र संग्राम जिंकतों. धनुष्य शत्रूच्या इच्छा अपूर्ण करितें. व आम्ही धनुष्यानें सर्व दिशा जिंकतों. ॥ ३९ ॥

वक्ष्यन्तीवेदागनीगन्ति कर्णं प्रियꣳ सखायं परिषस्वजाना । योषेव शिङ्क्ते वितताधि धन्वञ्ज्याऽइयꣳ समने पारयन्ती ॥ ४० ॥

अर्थ—(धनुष्याच्या दोरीची स्तुति) ही दोरी धनुष्यावर विस्तृत केली असतां (धनुष्य सज्ज केलें असतां) अस्पष्ट शब्द (टणत्कार) करितें. ज्याप्रमाणें एखादी कामिनी स्त्री कामुक पुरुषाला संतुष्ट करण्याकरितां अस्पष्ट शब्द बोलते. ती दोरी संग्रामांतून तरून नेणारी म्हणजे विजय देणारी आहे व आकर्ण ओढली असतां कानांत कांहीं बोलण्याच्या इच्छेनें कीं काय ती योद्धयाच्या कानाच्या अत्यंत समीप येते. व आपला प्रिय मित्र जो बाण त्याला आलिंगन देते. ॥ ४० ॥

तेऽआचरन्ती समनेव योषा मातेव पुत्रं बिभृतामुपस्थे । अप शत्रून्विध्यताꣳ संविदाने ऽआर्न्नीऽइमे विष्फुरन्तीऽअमित्रान् ॥ ४१ ॥

अर्थ—(धनुष्याच्या दोन्ही अग्रभागांची स्तुति) आई मुलाला मांडीवर घेते त्याप्रमाणें धनुष्याचीं दोन्ही टोकें बाणाला मध्यभागीं धारण करितात व शत्रूंना मारतात. एकमताच्या दोन स्त्रिया ज्याप्रमाणें आपल्या प्रियकराकडे येतात त्याप्रमाणें हीं दोन टोकें योद्धयाकडे येतात. तीं परस्परांत संकेत करितात व शत्रूंना भिवविण्याकरितां टणत्कार शब्द करितात. ॥ ४१ ॥

बह्वीनां पिता बहुरस्य पुत्रश्चिश्वाकृणोति समनावगत्य । इषुधिः संकाः पृतनाश्च सर्वीः पृष्ठे निनद्धो जयति प्रसूतः ॥ ४२ ॥

अर्थ—(भात्याची स्तुति) जो भाता पुष्कळ बाणांचा पिता आहे व बाणसमूह ज्याचे पुत्र आहेत तो भाता युद्ध चालू आहे असें समजून चिश्व असा शब्द करितो (भात्यांतून बाण काढीत असतां असा शब्द होतो) तो भाता योद्धयानें पाठीशीं बांधलेला असूनही योद्धयाच्या आज्ञेनें मोठाल्या योद्धयांनीं युक्त अशा शत्रुसेनांचा पराजय करितो. ॥ ४२ ॥

रथे तिष्ठन्नयति वाजिनः÷ पुरो यत्र यत्र कामयते सुषारथिः । अभीशूनां महिमानं पनायत मनः÷ पश्चादनुयच्छन्ति रश्मयः÷ ॥ ४३ ॥

अर्थ—(अर्ध्या मंत्रांत रथाची स्तुति व अर्ध्या मंत्रांत रथाच्या दोरींची स्तुति आहे) रथावर बसलेला सारथी आपल्या इच्छेप्रमाणें घोड्यांना त्या त्या स्थलीं नेतो. हे जनहो, जे मागें असलेले रश्मि (दोऱ्या) अश्वांचें चित्त आपल्या स्वाधीन करून घेतात त्या रश्मींच्या प्रभावाची तुम्ही स्तुति करा. ॥ ४३ ॥

तीव्रान्घोषान्कृण्वते वृषपाणयोऽश्वा रथेभिः सह वाजयन्तः । अवक्रामन्तः प्रपदैरमित्रान्क्षिणन्ति शत्रूं १॥ रनपव्ययन्तः ॥ ४४ ॥

अर्थ—(अश्वांची स्तुति) अश्वाच्या दोऱ्या हातांत धरणारे सारथी मोठे जयजयकार शब्द करितात व घोडेही रथासहवर्तमान गमन करून मोठ्यानें शब्द करितात व खुरांच्या टापांनीं शत्रूचें आक्रमण करून त्यांचा नाश करितात व स्वतः नष्ट होत नाहींत ॥ ४४ ॥

रथवाहणꣳ हविरस्य नाम यत्रायुधं निहितमस्य वर्म । तत्रा रथमुप शग्मꣳ सदेम विश्वाहा वयꣳ सुमनस्यमानाꣳ ॥ ४५ ॥

अर्थ--(रथ ज्यावर ठेवितात त्या गाड्याची स्तुति) या गाड्याला रथवाहण असें म्हणतात. कारण वाजपेय यज्ञांत गाड्यावर रथ ठेवावा लागतो. तसेंच यांचें हविर्धान हेंही नांव आहे. ज्या गाड्यावर योद्धयाचें कवच व आयुध स्थापन केलें आहे तो रथ आम्ही प्राप्त करितों. तो सुखकारक आहे व आम्ही सर्वदा प्रसन्न चित्ताचे आहोंत ॥ ४५ ॥

स्वादुषꣳ सदं÷ पितरो वयोधाꣳ कृच्छ्रेश्रितꣳ शक्तीवन्तो गभीराꣳ । चित्रसेनाऽइषुबलाऽअमृध्राꣳ सतोवीराऽउरवो व्रातसाहाꣳ ॥ ४६ ॥

अर्थ--(रथरक्षकांची स्तुति) आमचे रथरक्षक लोक सहज रथावर बसणारे, संरक्षक, आयुष्य धारण करणारे, कोणतेही कष्ट प्राप्त झाले असतां जे आश्रय करण्यास योग्य असे, सामर्थ्यवान्, मोठे बलवान् व बुद्धिवान्, नानाविध सेनांनीं युक्त, बाण धारण करण्यास समर्थ, उग्र शरीराचे व असेल तितकें बल खर्च करणारे विशाल व शूरसमुदाय अंगावर चालून आले तरी त्यांचा पराजय करणारे असे असोत ॥ ४६ ॥

ब्राह्मणासꣳ पितरꣳ सोम्यासꣳ शिवे नो द्यावापृथिवीऽअनेहसा । पूषा नः÷ पातु दुरितादृतावृधो रक्षा माकिर्नोऽअघशꣳसऽईशत ॥ ४७ ॥

अर्थ--ब्राह्मण, सोमपान करणारे पितर, कल्याणकारक व पापरहित द्यावापृथिवी व सूर्य आमचें पाप दूर करोत. हे यज्ञवर्धक देवांनो, आमचें रक्षण करा. कोणीही दुष्ट आम्हांला आपल्या स्वाधीन न करो. ॥ ४७ ॥

सुपर्णं वस्ते मृगोऽअस्यादन्तो गोभिꣳ संनद्धा पतति प्रसूता । यत्रा नरꣳ सं च वि च द्रवन्ति तत्रास्मभ्यमिषवꣳ शर्म यच्छ सन् ॥ ४८ ॥

अर्थ--(बाणाची स्तुति) बाण पक्ष्याच्या पिसाला आपल्या पुच्छाचे ठायीं धारण करितो. व वध करण्याकरितां शत्रूचा शोध करणारें त्याचें टोंक दंतासारखें आहे. व गाईच्या स्नायूंनीं तो बाण ठिकठिकाणीं बांधला गेला आहे. योद्धयाच्या प्रेरणेनें तो शत्रुसैन्यांत जातो. जेथें योद्धे धांवतात व इकडे तिकडे पसरतात अशा युद्धांत बाण आमचें कल्याण करो ॥ ४८ ॥

ऋजीते परिवृङ्ग्धि नोऽश्मा भवतु नस्तनूः । सोमोऽअधिब्रवीतु नोऽदितिः शर्म यच्छतु ॥ ४९ ॥

अर्थ--सरळ गमन करणाऱ्या हे बाणा, तूं आमच्यावर पडूं नकोस. आमचें शरीर पाषाणासारखें दृढ होवो. सोम आम्ही अधिक (मोठे) आहोंत असें म्हणो व देवमाता अदिति आम्हांला सुख देवो ॥ ४९ ॥

आजङ्घ्नन्ति सान्वेषां जघनाँ२॥ उपजिघ्नते । अश्वाजानि प्रचेतसोऽश्वान्त्समत्सु चोदय ॥ ५० ॥

अर्थ—(चाबकाची स्तुति) अश्वांची प्रेरणा करणाऱ्या हे चाबका, तूं युद्धामध्यें जय प्राप्त होण्याकरितां शूर स्वभावाच्या घोड्यांची प्रेरणा कर. घोडेस्वार तुझा प्रहार घोड्यांच्या उंच उंच मांसल भागावर व जघन भागावर करितात ॥ ५० ॥

अहिरिव भोगैः पर्येति बाहुं ज्याया हेतिं परिबाधमानः । हस्तघ्नो विश्वा वयुनानि विद्वान्पुमान्पुमांसं परि पातु विश्वतः ॥ ५१ ॥

अर्थ—(हस्तप्रावरणाची स्तुति) हस्तप्रावरण (हातावें आच्छादन) माझें सर्व बाजूनें रक्षण करो. त्या प्रावरणाला सर्व ज्ञान आहे व तें पुरुषासारखें शूर आहे. जें हस्तप्रावरण सर्पाप्रमाणें बाहूचें वेष्टन करितें व शत्रूनें धनुष्याच्या दोरींतून सोडलेला जो बाण त्याला निवृत्त करितें ॥ ५१ ॥

वनस्पते वीड्वङ्गो हि भूयाऽअस्मत्सखा प्रतरणः सुवीरः । गोभिः संनद्धोऽसि वीडयस्वास्थाता ते जयतु जेत्वानि ॥ ५२ ॥

अर्थ—हे काष्ठमय रथा, तूं दृढ अंगाचा हो. तूं आमचा मित्र व संग्रामांतून पार नेणारा असून तुझे ठायीं सारथि बसला आहे. हे रथा, ज्या अर्थी तूं गायीच्या चर्मांनीं (चामड्यांनीं) आवळून बांधला गेला आहेस त्या अर्थी आम्हाला घट्ट धर. तुझ्यावर आरोहण करणारा रथी (योद्धा) जिंकण्यास योग्य अशीं रिपुद्रव्यें जिंको ॥ ५२ ॥

दिवः पृथिव्याः पर्योज उद्भृतं वनस्पतिभ्यः पर्याभृतꣳ सहः । अपामोज्मानं परि गोभिरावृतमिन्द्रस्य वज्रꣳ हविषा रथं यज ॥ ५३ ॥

अर्थ—हे अध्वर्यो, तूं हविर्द्रव्यानें रथाचा याग कर. रथ हा द्युलोकावरून व

पृथ्वींतून काढलेलें तेज आहे व वृक्षांतून काढून बनविलेलें बल आहे. तो जलांचा सारभूत, बलप्रद व किरणांनीं वेष्टित अथवा गोचर्मांनीं वेष्टित असा आहे. तसेंच तो इंद्रवज्रापासून निर्माण झाला आहे ॥ ५३ ॥

इन्द्रस्य वज्रो मरुतामनीकꣳ मित्रस्य गर्भो वरुणस्य नाभिः। सेमां नो हव्यदातिं जुषाणो देव रथ प्रतिहव्या गृभाय ॥ ५४ ॥

अर्थ—हे रथा, हे देवा, तूं हविर्द्रव्याचें ग्रहण कर. तूं इंद्राच्या वज्रापासून उत्पन्न झालेला, देवांना जय देणारा म्हणून त्यांचें मुख, सूर्यानें स्तुत्य, वरुणाचें शत्रु-वधसाधन व आम्ही दिलेलें हविर्द्रव्य सेवन करणारा असा आहेस ॥ ५४ ॥

उपश्वासय पृथिवीमुत द्यां पुरुत्रा ते मनुतां विष्ठितं जगत्। स दुन्दुभे सजूरिन्द्रेण देवैर्दूराद्दवीयोऽअपसेध शत्रून् ॥ ५५ ॥

अर्थ—हे दुंदुभे, (नगाऱ्या) तूं आपल्या शब्दानें पृथ्वी व आकाश दणदणून टाक. नाना प्रकारें स्थित असलेल्या स्थावर जंगमात्मक विश्वाला पुष्कळ प्रकारेंकरून तुझी ओळख पटो. शत्रूंना अत्यंत दूर प्रदेशीं तूं घालव. इंद्र व देव यांच्याशीं तुझा स्नेह आहे ॥ ५५ ॥

आक्रन्दय बलमोजो नऽआधा निष्टनिहि दुरिता बाधमानः। अपप्रोथ दुन्दुभे दुच्छुनाऽइतऽइन्द्रस्य मुष्टिरसि वीडयस्व ॥ ५६ ॥

अर्थ—हे दुंदुभे, तूं शत्रुसैन्याला रडव, आम्हांला तेज दे, व आमच्या पापांचें निराकरण कर व शब्द कर. आमच्या सेनेंतून दुष्ट असे कुत्र्यासारखे शत्रू नष्ट कर, कारण कीं, तूं इंद्राच्या मुष्टीसारखा दृढ आहेस म्हणून आम्हांला दृढ कर ॥ ५६ ॥

आमूरज प्रत्यावर्तयेमाः केतुमद्दुन्दुभिर्वावदीति। समश्वपर्णाश्चरन्ति नो नरोऽस्माकमिन्द्र रथिनो जयन्तु ॥ ५७ ॥

अर्थ—हे इंद्रा, भोंवतालच्या शत्रुसेनांना तूं पळवून लाव. आपला ज्ञानयुक्त दुंदुभि मोठमोठ्यानें वाजतो तेव्हां आपला जय झाला असें समजवून आमच्या सेनांना परत आण (दुंदुभीचा मोठा शब्द झाला त्या अर्थी आपला जय आहे असें समजून आमच्या सेना परत येवोत.) अश्वाप्रमाणें उड्या मारणारे आमचे योद्धे संचार करोत व आमचे रथी युद्धांत जय मिळवोत. ॥ ५७ ॥

आग्नेयꣳ कृष्णग्रीवꣳ सरस्वती मेषी बभ्रुꣳ सौम्यꣳ पौष्णꣳ श्यामꣳ शितिपृष्ठो बार्हस्पत्यꣳ शितिपो वैश्वदेवऽऐन्द्रोऽरुणो मारुतꣳ कल्माषꣳ ऐन्द्राग्नꣳ सꣳहितोऽधोरामꣳ सावित्रो वारुणꣳ कृष्णऽएकशितिपात्पेत्वं÷ ॥ ५८ ॥

अर्थ—१ कृष्णग्रीव पशु व त्याची देवता अग्नि. २ मेषी. तिची देवता सरस्वती. ३ पिंगलवर्ण पशु, देवता सोम. ४ कृष्णवर्ण पशु, देवता पूषा. ५ कृष्णपृष्ठ पशु, देवता बृहस्पति. ६ विचित्रवर्ण पशु. देवता विश्वेदेव. ७ रक्तवर्ण पशु. देवता इंद्र. ८ काबऱ्या वर्णाचा पशु. देवता मरुत्. ९ दृढ शरीराचा पशु. देवता इंद्राग्नि. १० शरीराच्या खालचा भाग पांढरा आहे ज्याचा असा पशु. देवता सविता. ११ एक पाय पांढरा व एक काळा आणि वेगवान् असा पशु. देवता वरुण. एकंदर अकरा पशु ॥ ५८ ॥

अग्नयेऽनीकवते रोहिताञ्जिरनड्वानधोरामौ सावित्रौ पौष्णौ रजतनाभी वैश्वदेवौ पिशङ्गौ तूपरौ मारुतꣳ कल्माषऽआग्नेयꣳ कृष्णोऽजꣳ सारस्वती मेषी वारुणꣳ पेत्वं÷ ॥ ५९ ॥

अर्थ—१ लाल तीळ धारण करणारा बैल. पशु. देवता अनीकवान् (सैन्ययुक्त) अग्नि. २।३ ज्यांच्या शरीराच्या अधोभागीं पांढरा वर्ण आहे असे दोन पशु. देवता सविता. ४।५ चांदीसारखी ज्यांची बेंबी आहे असे दोन पशु. देवता पूषा. ६।७ पिवळे शृंगरहित दोन पशु. देवता विश्वेदेव. ८ काबरा पशु. देवता मरुत्. ९ कृष्ण अज पशु. देवता अग्नि. १० मेषी पशु. देवता सरस्वती. ११ वेगवान् पशु. देवता वरुण. असे अकरा पशु ॥ ५९ ॥

विनियोग—या मंत्रांत दहा पुरोडाश सांगितले आहेत त्यांचें वर्णन.

अग्नये गायत्राय त्रिवृते राथन्तरायाष्टाकपालऽइन्द्राय त्रैष्टुभाय पञ्चदशाय बार्हतायैकादशकपालो विश्वेभ्यो देवेभ्यो जागतेभ्यꣳ सप्तदशेभ्यो वैरूपेभ्यो द्वादशकपालो मित्रावरुणाभ्यामानुष्टुभाभ्यामेकविꣳशाभ्यां वैराजाभ्यां पयस्या बृहस्पतये पाङ्क्ताय त्रिणवाय शाक्कराय चरुꣳ सवित्रऽऔष्णिहाय त्रयस्त्रिꣳशाय रैवताय द्वादशकपालꣳ प्राजापत्यश्चरुरदित्यै विष्णुपत्न्यै चरुरग्नये वैश्वानराय द्वादशकपालोऽनुमत्याऽअष्टाकपालꣳ ॥ ६० ॥

अर्थ--१ गायत्री छंद, त्रिवृत्स्तोम व रथंतरसाम यांनीं स्तुत अग्नीला अष्टाकपाल पुरोडाश. २ त्रिष्टुप् छंद, पंचदशस्तोम व बृहत्साम यांनीं स्तुत जो इंद्र त्याला एकादश कपाल पुरोडाश. ३ जगति छंद, सप्तदशस्तोम वैरूपसाम यांनीं स्तुत अशा विश्वेदेवांना द्वादशकपाल पुरोडाश. ४ अनुष्टुप् छंद, एकविंशस्तोम, वैराजसाम यांनीं स्तुत अशा मित्रावरुणांना दुधांत शिजविलेला चरु. ५ पंक्तिच्छंद, त्रिणवस्तोम, शाक्वरसाम यांनीं स्तुत अशा बृहस्पतीला केवल चरु. ६ उष्णिक्छंद, त्रयस्त्रिंशस्तोम रैवतसाम यांनीं स्तुत अशा सवित्याला द्वादशकपाल पुरोडाश. ७ चरु व देवता प्रजापति. ८ चरु व देवता विष्णुपत्नी अदिति. ९ द्वादशकपाल पुरोडाश देवता वैश्वानर अग्नि. १० अष्टाकपाल पुरोडाश व देवता अनुमति. हे दहा हविर्भाग आहेत ॥ ६० ॥


इति श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते

वाजसनेयिमाध्यन्दिनीयसंहितानुवादे 'वेदप्रकाशाख्ये' एकोनत्रिंशोऽध्यायः ॥२९॥

इति एकोनत्रिंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ त्रिंशोऽध्यायः ॥ ३० ॥



देव सवितः प्रसुव यज्ञं प्रसुव यज्ञपतिं भगाय । दिव्यो गन्धर्वः केतपूः केतं नः पुनातु वाचस्पतिर्वाचं नः स्वदतु ॥ १ ॥

अर्थ—हे प्रकाशमान् सर्वप्रेरक सवित्या, या यजमानाकडून ऐश्वर्यप्राप्तीकरितां चयनयाग करून घे. तुझ्या प्रसादानें आकाशांत असलेला, दुसऱ्याच्या मनांतील हेतु ओळखणारा व वाणीचा पालक, सूर्यमंडलरूपी देव आमची वाणी शुद्ध करो. तसेंच तुझ्या कृपेनें तो आमची वाणी श्रवण करो ॥ १ ॥

तत्सवितुर्वरेण्यं मार्गो देवस्य धीमहि । धियो यो नः÷ प्रचोदयात् ॥२॥

अर्थ—त्या प्रकाशक व प्रेरक अशा आदित्यांतर्गत पुरुषरूपी ब्रह्माचें सर्वांनीं प्रार्थना करण्यास योग्य असें जें सर्वनाशक तेज आहे; त्याचें आम्ही ध्यान करितों. तो सविता आमच्या बुद्धीला सत्कर्मानुष्ठानाची प्रेरणा करो ॥ २ ॥

विश्वानि देव सवितर्दुरितानि परासुव । यद्भद्रं तन्नऽआसुव ॥ ३ ॥

अर्थ—हे सवितृदेवा, आमचीं सर्व पापें दूर कर. व जें कल्याणकारक असें तें आमच्याकडे आण ॥ ३ ॥

विभक्तारꣳ हवामहे वसोश्चित्रस्य राधसः । सवितारं नृचक्षसम् ॥४॥

अर्थ—आम्ही सवित्याला बोलावितों. तो वास करण्यास योग्य आहे व नाना प्रकारच्या द्रव्याला देणारा असून मनुष्यांना यथायोग्य रीतीनें पाहणारा आहे ॥ ४ ॥

विनियोग—यापुढें अध्याय समाप्तीपर्यंत पुरुषमेधाचे पशु आहेत. त्या पशूचा नियोग " ब्रह्मणे जुष्टं नियुनज्मि " असा करावा.

ब्रह्मणे ब्राह्मणं क्षत्राय राजन्यं मरुभ्यो वैश्यं तपसे शूद्रं तमसे तस्करं नारकाय वीरहणं पाप्मने क्लीबमाक्रयायाऽअयोगूं कामाय पुँश्चलूमतिक्रुष्टाय मागधम् ॥ ५ ॥

अर्थ—१ देवता ब्रह्म; पशु ब्राह्मण. २ देवता क्षत्र; पशु क्षत्रिय. ३ देवता मरुत्; पशु वैश्य. ४ देवता तपस्; पशु शूद्र. ५ देवता तमस्; पशु तस्कर. ६ देवता नारक; पशु वीरहन्. (शूर) ७ देवता पाप्मन्; पशु नपुंसक. ८ देवता आक्रया; पशु अयोगू (लोखंडाचें ज्ञान असलेला). ९ देवता काम; पशु पुंश्चलू (व्यभिचारिणी) १० देवता अतिकृष्ट; पशु मगध देशांतील मनुष्य अथवा वैश्यापासून क्षत्रिय स्त्रीचे ठायीं झालेला मुलगा ॥ ५ ॥

नृत्ताय सूतं गीताय शैलूषं धर्माय सभाचरं नरिष्ठायै भीमलं नर्माय रेभꣳ हसाय कारिमानन्दाय स्त्रीषखं प्रमदे कुमारीपुत्रं मेधायै रथकारं धैर्याय तक्षाणम् ॥ ६ ॥

अर्थ—११ देवता नृत्त; पशु सूत. (ब्राह्मण स्त्रीचे ठायीं क्षत्रियापासून झालेला मुलगा.) १२ देवता गीत; पशु नट. १३ देवता धर्म; पशु सभासद. १४ देवता नरिष्ठा; पशु भयंकर. १५ देवता नर्म; पशु वाचाट. १६ देवता हस; पशु कारि. १७ देवता आनंद; पशु स्त्रीचा मित्र. १८ देवता प्रमद; पशु कुमारीपुत्र (कन्यावस्थेंत झालेला मुलगा) १९ देवता मेधा; पशु रथकार. २० देवता धैर्य; पशु तक्षा (सुतार) ॥ ६ ॥

तपसे कौलालं मायायै कर्मारꣳ रूपाय मणिकारꣳ शुभे वपꣳ शरव्याया ऽइषुकारꣳ हेत्यै धनुष्कारं कर्मणे ज्याकारं विष्टाय रज्जुसर्जं मृत्यवे मृगयुमन्तकाय श्वनितम् ॥ ७ ॥

अर्थः—२१ देवता तपस्; पशु कुलालापत्य. २२ देवता माया; पशु लोहकार. २३ देवता रूप; पशु मणिकार. २४ देवता शुभ; पशु बीज पेरणारा. २५ देवता शरव्या; पशु बाणकर्ता २६ देवता हेति; पशु मनुष्यकारिन् २७ देवता कर्मन्; पशु धनुष्याची दोरी करणारा. २८ देवता दिष्ट; पशु दोऱ्या वळणारा. २९ देवता मृत्यु; पशु मृग पकडणारा. ३० देवता अंतक; पशु कुत्रें नेणारा. ॥ ७ ॥

नदीभ्यः÷ पौञ्जिष्टमृक्षीकाभ्यो नैषादं पुरुषव्याघ्राय दुर्मदं गन्धर्वाप्सरोभ्यो व्रात्यं प्रयुग्भ्यऽउन्मत्तꣳ सर्पदेवजनेभ्योऽप्रतिपदमर्येभ्यः कितवमीर्षतायाऽअकितवं पिशाचेभ्यो विदलकारीं यातुधानेभ्यः कट्टकारीम् ॥ ८ ॥

अर्थः—३१ देवता नदी; पशु अंत्यजापत्य. ३२ देवता ऋक्षीका; पशु निषाद-पुत्र. ३३ देवता पुरुषव्याघ्र; पशु उन्मत्त. ३४ देवता गंधर्वाप्सरस्; पशु सावित्री-पतित. ३५ देवता प्रायुज्; पशु उन्मत्त. ३६ देवता सर्पजन; पशु विकलांग. ३७ देवता अय; पशु द्यूतकार. ३८ देवता ईर्यता; पशु द्यूत न करणारा. ३९ देवता पिशाच; पशु बांबूंच्या पाट्या करणारी बाई. ४० देवता यातुधान; पशु काट्यांचें काम करणारी बाई ॥ ८ ॥

सन्धयें जारं गेहायोपपतिमार्त्यै परिवित्तं निर्ऋत्यै परिविविदानमराध्याऽएदिधिषुꣳ पतिं निष्कृत्यै पेशस्कारीꣳ संज्ञानाय स्मरकारीं प्रकामोद्यायोपसदं वर्णायानुरुधं बलायोपदाम् ॥ ९ ॥

अर्थ—४१ देवता संधि; पशु जार. ४२ देवता गेह; पशु व्यभिचारी. ४३ देवता आर्ति; पशु परिवित्त (धाकट्या भावाचें लग्न झालें असतां ज्याचें लग्न झालें नाहीं असा वडील भाऊ). ४४ देवता निर्ऋति; पशु परिविविदान (वडील भावाचे पूर्वी लग्न केलेला) ४५ देवता आराधि; पशु. एदिधिषुपति. (वडील बहिणीच्या पूर्वी जिचें लग्न झाले अशा स्त्रीचा पति). ४६ देवता निष्कृति; पशु रूप करणारी स्त्री. ४७ देवता संज्ञान; पशु कामदीप्तिकर स्त्री. ४८ देवता प्रकामोद्य. पशु समीपस्थित (हे अट्ठेचाळिस पशु अग्निष्ठ यूपाशीं बांधावे).

१ देवता वर्ण; पशु अनुरुध् (अनुसरण करणारा) २ देवता बल, पशु उपदा (नजरभेट देणारा) ॥ ९ ॥

उत्सादेभ्यः कुब्जं प्रमुदे वामनं द्वार्भ्यꣳ ह्रस्वं स्वप्नायान्धमधर्माय बधिरं पवित्राय भिषजं प्रज्ञानाय नक्षत्रदर्शमाशिक्षायै प्रश्निनमुपशिक्षायाऽअभिप्रश्निनं मर्यादायै प्रश्नविवाकम् ॥ १० ॥

अर्थ—३ देवता उत्साद; पशु वक्रांग. ४ देवता प्रमुत्; पशु ह्रस्वांग. ५ देवता द्वार; पशु नेहमीं पाणी येणाऱ्या डोळ्याचा. ६ देवता स्वप्न; पशु अन्ध. ७ देवता अधर्म; पशु बधिर. ८ देवता पवित्र; पशु वैद्य. ९ देवता प्रज्ञान; पशु ज्योतिषी. १० देवता आशिक्षा; पशु प्रश्न विचारणारा. ११ देवता उपशिक्षा; पशु सर्व तऱ्हेनें प्रश्न विचारणारा (हे अकरा पशु द्वितीययूपाशीं बांधावे.) १ देवता मर्यादा; पशु प्रश्नांचा विचार करून उत्तर देणारा ॥ १० ॥

अर्मेभ्यो हस्तिपं जवायाश्वपं पुष्ट्यै गोपालं वीर्यायाविपालं तेजसेऽजपालमिरायै कीनाशं कीलालाय सुराकारं भद्राय गृहपꣳ श्रेयसे वित्तधमाध्यक्ष्यायानुक्षत्तारम् ॥ ११ ॥

अर्थ—२ देवता अर्म; पशु गजपालक. ३ दे० जव; प० तुरंगपालक. ४ दे० पुष्टि; प० धेनुपालक. ५ दे० वीर्य; पशु अविपालक. ६ दे० तेजस्; प० अजपालक. ७ दे० इरा; प० शेतकरी. ८ दे० कीलाल; प० मद्यकर्ता. ९ दे० भद्र; प० गृहपालक. १० दे० श्रेयस्; प० धनकर्ता. ११ दे० आध्यक्ष्य; प० सारथ्याचें अनुसरण करणारा. (हे अकरा पशु तृतीय यूपाशीं बांधावे) ॥ ११ ॥

भायै दार्वाहारं प्रभायाऽअग्नेर्धं ब्रध्नस्य विष्टापायाभिषेक्तारं वर्षिष्ठाय नाकाय परिवेष्टारं देवलोकाय पेशितारं मनुष्यलोकाय प्रकरितारꣳ सर्वेभ्यो लोकेभ्यऽउपसेक्तारमवऽऋत्यै वधायोपमन्थितारं मेधाय वासꣳ पल्पूलीं प्रकामाय रजयित्रीम् ॥ १२ ॥

अर्थ—१ दे० भा; प० काष्टें हरण करणारा. २ दे० प्रभा प० अग्नि वाढविणारा ३ दे० सूर्यलोक; प० अभिषेक करणारा. ४ दे० उत्कृष्ट स्वर्ग; प० वाढणारा (वाढप्या). ५ दे० देवलोक; प० प्रतिमेचे अवयव बनविणारा. ६ दे० मनुष्यलोक; प० विक्षेप्ता (पसरणारा). ७ दे० सर्वलोक; प० सिञ्चन करणारा. ८ दे. अवऋति-वध; प० उपमन्थन करणारा. ९ दे० मेध; प० वस्त्रें धुणारा. १० दे० प्रकाम; प० रंगारीण बाई. ॥ १२ ॥

ऋतये स्तेनहृदयं वैरहत्याय पिशुनं विविक्त्यै क्षत्तारमौपद्रष्ट्रायानुक्षत्तारं बलायानुचरं भूम्ने परिष्कन्दं प्रियाय प्रियवादिनमरिष्ट्याऽअश्वसादꣳ स्वर्गाय लोकाय भागदुधं वर्षिष्ठायनकाय परिवेष्टारम् ॥ १३ ॥

अर्थ—११ दे० ऋति प० चोराच्या हृदयाचा (हे अकरा पशु चौथ्या यूपाशीं बांधावे). १ दे० वैरहत्य; प० चुगलखोर. २ दे० विविक्ति; प० प्रतीहार. ३ दे० औपद्रष्ट्य; प० प्रतिहार सेवक ४ दे० बल; प० सेवक ५ दे० भूमन्; प० इकडे तिकडे रेतसिञ्चन करणारा. ६ दे० प्रिय; प० मधुरभाषी. ७ दे० अरिष्टि; प० घोडेस्वार. ८ दे० स्वर्ग; प० विभाग देणारा. ९ दे० वर्षिष्ठाय नक; प० परिवेष्टा (वाढप्या). ॥ १३ ॥

मन्यवेऽयस्तापं क्रोधाय निसरं योगाय योक्तारꣳ शोकायाभिसर्तारं क्षेमाय विमोक्तारमुत्कूल निकूलेभ्यस्त्रिष्ठिनं वपुषे मानस्कृतꣳ शीलाया-ञ्जनीकारीं निर्ऋत्यै कोशकारीं यमायासूम् ॥ १४ ॥

अर्थ—१० दे० मन्यु; प० लोखंड तापविणारा. ११ दे० क्रोध; प० दूर पळून जाणारा. (हे अकरा पशु पांचव्या यूपाशीं बांधावें) १ दे० योग; प० योग-कर्ता. २ दे० शोक; प० सन्मुख येणारा. ३ दे० क्षेम; प० विमोचन करणारा. ४ दे० उत्कूलनिकूल; प० विद्यादि तीन स्थानांत राहणारा शीलवान्. ५ दे० वपु; प० अभिमान करणारा. ६ दे० शील; प० काजळाची विद्या धारण करणारी. ७ दे० निर्ऋति; प० तरवारीचें म्यान करणारी. ८ दे० यम; प० वन्ध्या. ॥ १४ ॥

यमाय यमसूमथर्वभ्योऽवतोकाꣳ संवत्सराय पर्यायिणीं परिवत्सरायाविजातामिदावत्सरायातीत्वरीमिद्वत्सरायातिष्कद्वरीं वत्सराय विजर्जराꣳ संवत्सराय पलिक्नीमृभुभ्योऽजिनसन्धꣳ साध्येभ्यश्चर्मघ्नम् ॥ १५ ॥

अर्थ—९ दे० यम; प० जुळें प्रसवणारी, १० दे० अथर्वन्; प० निरपत्य स्त्री. ११ दे० संवत्सर; प० अनुक्रमयुक्त बुद्धीची स्त्री. (हे अकरा पशु सहाव्या यूपाशीं बांधावे.) १ दे० परिवत्सर; प० अप्रसूत स्त्री. २ दे० इदावत्सर; प० अत्यंत कुलटा. ३ दे० इद्वत्सर; प० अत्यंत स्रवण पावणारी स्त्री. ४ दे० वत्सर; प० शिथिल शरीराची स्त्री. ५ दे० संवत्सर; प० पांढऱ्या केसांची स्त्री. ६ दे० ऋभु; प० चामडें जोडणारा. ७ दे० साध्य; प० चर्माचा अभ्यास करणारा. ॥ १५ ॥

सरोभ्यो धैवरमुपस्थावराभ्यो दाशं वैशन्ताभ्यो वैन्दं नड्वलाभ्यꣳ शौष्कलं पारायं मार्गारमवारायं कैवर्तं तीर्थेभ्यऽआन्दं विषमेभ्यो मैनालꣳ स्वनेभ्यꣳ पर्णकं गुहाभ्यꣳ किरातꣳ सानुभ्यो जम्भकं पर्वतेभ्यꣳ किं-पूरुषम् ॥ १६ ॥

अर्थ—८ दे० सस्नेवर; प० कैवर्तापत्य. ९ दे० उपस्थावरा; प० धीवर. १० दे० वैशन्ता; प० निषादाचें अपत्य. ११ दे० नडव्ला; प० मत्स्यजीवी (हे अकरा पशु सातव्या यूपाशीं बांधावे.) १ दे० पार प० मृगारीचें (सिंहाचें) अपत्य. २ दे० अवार; प० कैवर्त. ३ दे० तीर्थ; प० बंधनकर्ता ४ दे० विषम;

प० जाळें बांधणारावें अपत्य. ५ दे० स्वन; प० भिल्ल. ६ दे० गुहा; प० किरात. ७ दे० सानु; प० हिंसा करणारा. ८ दे० पर्वत; प० किंपुरुष (गंधर्व) ॥ १६ ॥

बीभत्सायै पौल्कसं वर्णाय हिरण्यकारं तुलायै वाणिजं पश्चादोषाय क्लाविनं विश्वेभ्यो भूतेभ्यः सिध्मलं भूत्यै जागरणमभूत्यै स्वपनमार्त्यै जनवादिनं व्युद्ध्याऽअपगल्भꣳ संꣳशरायं प्रच्छिदम् ॥ १७ ॥

अर्थ—९ दे० बीभत्सा; प० अंत्यजापत्य. १० दे० वर्ण; प० सोनार. ११ दे० तुला; प० वाणी (हे अकरा पशु आठव्या यूपाशीं बांधावे.) १ दे० पश्चादोष; प० क्षीण पुरुष. २ दे० विश्वभूत; प० सिद्धरोगी. ३ दे० भूति; प० जागणारा. ४ दे० अभूति; प० निजणारा. ५ दे० आर्ति; प० लोकांस दोष देणारा. ६ दे० वृद्धि; प० अप्रौढ. ७ दे० संशर; प० छेद करणारा. ॥ १७ ॥

अक्षराजाय कितवं कृतायादिनवदर्शं त्रेतायै कल्पिनं द्वापरायाधिकल्पिनमास्कन्दाय सभास्थाणुं मृत्यवे गोव्यच्छमन्तकाय गोघातं क्षुधे षो गां विकृन्तन्तं भिक्षमाणऽउपतिष्ठति दुष्कृताय चरकाचार्यं पाप्मने सैलगम् ॥ १८ ॥

अर्थ—८ दे० अक्षराज; प० धूर्त. ९ दे० कृत; प० दोषदर्शी १० दे० त्रेता; प० कल्पना करणारा. ११ दे० द्वापर; प० अधिक कल्पना करणारा (हे अकरा पशु; नवव्या यूपाशीं बांधावें) १ दे० आस्कंद; प० सभेंत स्थिर राहणारा. २ दे० मृत्यु; प० गायीकडे जाणारा. ३ दे० अंतक; प० गाई मारणारा. ४ दे० क्षुध; प० गाई मारणाराकडे भिक्षा मागणारा. ५ दे० दुष्कृत; प० चरकाचार्य. ६ दे० पाप्मन्; प० दुष्टापत्य. ॥ १८ ॥

प्रतिश्रुत्कायाऽअर्तनं घोषाय भषमन्ताय बहुवादिनमनन्ताय मूकꣳ शब्दायाडम्बराघातं महसे वीणावादं क्रोशाय तूणवध्मम्वरस्पराय शङ्कुध्मं वनाय वनपमन्यतोऽरण्याय दावपम् ॥ १९ ॥

अर्थ—७ दे० प्रतिश्रुत्का; प० दुःखी. ८ दे० घोष; प० बडबड्या. ९ दे० अंत; प० बहुभाषी. १० दे० अनंत; प० मुका. ११ दे० शब्द, प० कोलाहल करणारा (हे अकरा पशु दहाव्या यूपाशीं बांधावे). १ दे० महस्; प० वीणा वाज-

विणारा. २ दे० क्रोश; प० तूण वाद्य वाजविणारा. ३ दे० अवरस्पर; प० शंख वाजविणारा. ४ दे० वन; प० वनपालक. ५ दे० अन्यतोऽरण्य; प० वणव्यापासून रक्षण करणारा ॥ १९ ॥

नर्माय पुंश्चलूꣳ हसाय कारिं वादंसे शाबल्यां ग्रामण्युं गणकमभिक्रेशंकं तान्महंसे वीणावादं पाणिघ्नं तूणवध्मं तान्नृत्ताय नन्दायं तलवम् ॥ २० ॥

अर्थ—६ दे० नर्म; प. दुष्ट स्त्री. ७ दे० हास्य; प० कारि. ८ दे० यादस् प० काबऱ्या वर्णाच्या स्त्रीची मुलगी ९ दे० महस्; प० पाटील १० दे० महस् प० ग्रामनायक ११ दे० महस्; प० ज्योतिषी (हे अकरा पशु अकराव्या यूपाशीं बांधावे) (यानंतरचे २६ पशु द्वितीयायूपाशीं बांधावे) १।२।३ दे० नृत्त; प० क्रमेंकरून १ वीणावादक २ टाळ्या वाजविणारा ३ तूणव वाजविणारा ४ दे. आनन्द; प० हाताच्या तळव्यानें मृदंगादि वाद्यें वाजविणारा ॥ २० ॥

अग्नये पीवानं पृथिव्यै पींठसर्पिणं वायवे चाण्डालमन्तरिक्षाय वꣳशनर्तिनं दिवे खलतिꣳ सूर्याय हर्यक्षं नक्षत्रेभ्यः किर्मिरं चन्द्रमसे किलासमह्ने शुक्लं पिङ्गाक्षꣳ रात्र्यै कृष्णं पिङ्गाक्षम् ॥ २१ ॥

अर्थः—५ दे० अग्नि; प० पुष्ट पशु. ६ दे० पृथिवी. प० पांगळा. ७ दे० वायु; प० चांडाल. ८ दे० अंतरिक्ष; प० नाचणारा. ९ दे० द्युलोक; प० टक्कल पडलेला. १० दे० सूर्य; प० हिरव्या नेत्रांचा, ११ दे. नक्षत्रें प० काबऱ्या वर्णाचा १२ दे० चंद्रमा; प० सिध्मरोगी १३ दे० अहन्. प० घाऱ्या डोळ्याचा १४ दे० रात्रि; प० काळ्या रंगाचा व घाऱ्या डोळ्याचा ॥ २१ ॥

अथैतानष्टौ विरूपानालभतेऽतिदीर्घं चातिह्रस्वं चातिस्थूलं चातिकृशं चातिशुक्लं चातिकृष्णं चातिकुल्वं चातिलोमशं च । अशूद्राऽअब्राह्मणास्ते प्राजापत्याः । मागधः पुंश्चली कितवः क्लीबोऽशूद्राऽअब्राह्मणास्ते प्राजापत्याः ॥ २२ ॥

पुढील परस्पर विरुद्ध अशा वर्णनाच्या आठ पशूंची देवता प्रजापति आहे. १ अत्यंत उंच २ अत्यंत ठेंगणा ३ अति स्थूल ४ अति कृश ५ अति शुक्ल ६ अति


कृष्ण ७ मुळींच केश नसलेला ८ फारच केश असलेला वीणावादादि १४ व अति-दीर्घादि ८ मिळून बावीस. यानंतर १ मागध २ पुंश्चली ३ कितव ४ क्लीब हे चार शूद्र व ब्राह्मण जातीचे नसलेले जे चार पशु त्यांची देवताही प्रजापति आहे. ॥ २२ ॥

इति श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते
वाजसनेयिमाध्यन्दिनीयसंहितानुवादे वेदप्रकाशाख्ये त्रिंशोऽध्यायः ॥ ३० ॥

इति त्रिंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ एकत्रिंशोऽध्यायः ॥ ३१ ॥



विनियोग--('सहस्रशीर्षा' इत्यादि सोळा ऋचांच्या अनुवाकानें होत्या-प्रमाणें ब्रह्म्यानें पूर्वोक्त पशूंची स्तुति करावी. त्यापुढील सहा ऋचांनीं सूर्याची स्तुति करून वानप्रस्थाश्रमाकरितां यजमानानें अरण्यांत जावें पुनः गांवांत येऊं नये)

सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् । स भूमिं सर्वतः स्पृत्वा-त्यतिष्ठद्दशाङ्गुलम् ॥ १ ॥

अर्थ—अनंत मस्तके, नेत्र व पाय असलेला पुरुष भूमीला (जगाला) सर्व बाजूंनीं व्याप्त करून दहा अंगुळें उरला आहे म्हणजे परमात्मा सर्व व्यापून अतिरिक्त राहिला आहे ॥ १ ॥

पुरुषऽएवेदꣳ सर्वं यद्भूतं यच्च भाव्यम् । उतामृतत्वस्येशानो यदन्नेना-तिरोहति ॥ २ ॥

अर्थ—जें अन्नानें वाढतें व दुसरेही भूत, भविष्य व वर्तमानकाळीं असणारें जें स्थावरजंगमात्मक वस्तु व अमृत (मोक्ष) या सर्वांचा पुरुष (भगवान्) अधिपति आहे ॥ २ ॥

एतावानस्य महिमातो ज्यायाꣳश्च पूरुषः । पादोऽस्य विश्वा भूतानि त्रिपादस्यामृतं दिवि ॥ ३ ॥

अर्थ—हें सर्व या पुरुषाचें सामर्थ्य आहे. याच्या स्वरूपाची कल्पना यावरून होणार नाहीं कारण हा पुरुष या सर्वांहून मोठा आहे. सर्व भूतें या पुरुषाच्या चतुर्थांशांत मावतात. बाकीचे या पुरुषाचे अंश (भाग) अविनाशी स्वरूपांत राहतात ॥ ३ ॥

त्रिपादूर्ध्वऽउदैत्पुरुषः पादोऽस्येहाभवत्पुनः । ततो विष्वङ् व्यक्रा-मत्साशनानशनेऽअभि ॥ ४ ॥

अर्थ—तो हा त्रिपात् पुरुष ब्रह्मरूपानें संसारापेक्षां वर आहे. म्हणजे संसाराहून

निराळा आहे. मायेच्या योगानें त्याचा एक पाद जगद्रूपानें अवतीर्ण झाला. नंतर स्वर्गमोक्षाकडे जाणारे देवादि जीव ज्यांत आहेत अशा चेतन व अचेतनस्वरूपी जगद्रूपानें तो व्याप्त झाला ॥ ४ ॥

ततो विराडजायत विराजोऽअधि पूरुषः। स जातोऽअत्यरिच्यत पश्चाद्भूमिमथो पुरः ॥ ५ ॥

अर्थ--परमात्मा आपल्या मायेनें ब्रह्मांडरूपी विराट् देह निर्माण करून व त्यांत जीवरूपानें प्रवेश करून ब्रह्माण्डाभिमानी देवतात्मा जीव होता झाला. तसेंच तो उत्पन्न झालेला विराट पुरुष देव, मनुष्य व पशुपक्षिरूपी झाला. नंतर त्यानें पृथिवी व जीवशरीरें निर्माण केलीं ॥ ५ ॥

तस्माद्यज्ञात्सर्वहुतः संभृतं पृषदाज्यम्। पशूंस्ताँश्चक्रे वायव्यानारण्या ग्राम्याश्च ये ॥ ६ ॥

अर्थ--त्या पुरुषानें पुरुषमेधसंज्ञक यज्ञापासून दधिमिश्रित घृत उत्पन्न केलें; तसेंच त्या पुरुषानें वायु ज्यांची देवता आहे असे हरिण वगैरे रानटी पशु व गो, अश्व वगैरे ग्राम्य पशु निर्माण केले ॥ ६ ॥

तस्माद्यज्ञात्सर्वहुतऽऋचः सामानि जज्ञिरे। छन्दाँसि जज्ञिरे तस्माद्यजुस्तस्मादजायत ॥ ७ ॥

अर्थ--त्या सर्वहुत यज्ञापासून पद्यात्मक ऋग्वेद, सामवेद व गायत्र्यादि सर्व छन्द आणि यजुर्वेद हीं उत्पन्न झालीं ॥ ७ ॥

तस्मादश्वाऽअजायन्त ये के चोभयादतः। गावो ह जज्ञिरे तस्मात्तस्माज्जाताऽअजावयः ॥ ८ ॥

अर्थ--खालीं व वर दोन्हीकडे ज्यांना दांत आहेत असे अश्व, गर्दभ वगैरे त्या यज्ञपुरुषापासून उत्पन्न झाले. तसेंच त्यापासून गाई, मेंढ्या व बकऱ्या उत्पन्न झाल्या ॥ ८ ॥

तं यज्ञं बर्हिषि प्रौक्षन्पुरुषं जातमग्रतः। तेन देवाऽअयजन्त साध्याऽऋषयश्च ये ॥ ९ ॥

अर्थ--सृष्टीला योग्य प्रजापतिप्रभृति देव व ऋषि यांनीं त्या प्रथमोत्पन्न यज्ञ पुरुषाचा प्रोक्षण संस्कार केला. त्या पुरुषरूपी पशूनें त्या सृष्टिसाधन योग्य देवांनीं व मंत्रद्रष्टया ऋषींनीं यज्ञ केला ॥ ९ ॥

यत्पुरुषं व्यदधुः कतिधा व्यकल्पयन् । मुखं किमस्यासीत्किं बाहू किमूरू पादाऽउच्येते ॥ १० ॥

अर्थ--यापुढें ब्रह्मवादी लोकांची सृष्टिविषयक प्रश्नोत्तरें आहेत. प्रजापतीच्या प्राणरूपी देवांनीं ज्यावेळीं पुरुष निर्माण केला त्यावेळीं त्यांनीं त्याला किती प्रकारांनीं निर्माण केले ? या पुरुषाचें मुख, बाहु, मांड्या व पाय कोणते होते तें सांगा ॥१०॥

ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः । ऊरू तदस्य यद्वैश्यः पभ्यां शूद्रोऽअजायत ॥ ११ ॥

अर्थ--ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र कर्मेकरून पुरुषाचें मुख, बाहु, ऊरु व पाद यांपासून उत्पन्न झाले ॥ ११ ॥

चन्द्रमा मनसो जातश्चक्षोः सूर्योऽअजायत । श्रोत्राद्वायुश्च प्राणश्च मुखादग्निरजायत ॥ १२ ॥

अर्थ--त्या पुरुषाचे मनापासून चंद्र, चक्षूपासून सूर्य, कर्णापासून वायु व प्राण आणि मुखापासून अग्नि उत्पन्न झाला ॥ १२ ॥

नाभ्याऽआसीदन्तरिक्षं शीर्ष्णो द्यौः समवर्तत । पद्भ्यां भूमिर्दिशः श्रोत्रात्तथा लोकाँ२॥ अकल्पयन् ॥ १३ ॥

अर्थ--या पुरुषाचे नाभीपासूनं अन्तरिक्ष, मस्तकापासून स्वर्ग, पायांपासून भूमि व कानांपासून दिशा उत्पन्न झाल्या व याप्रमाणें भूरादि लोकही उत्पन्न झाले ॥ १३ ॥

यत्पुरुषेण हविषा देवा यज्ञमतन्वत । वसन्तोऽस्यासीदाज्यं ग्रीष्मऽइध्मः शरद्धविः ॥ १४ ॥

अर्थ--ज्यावेळीं देवांनीं पुरुषरूपी हविर्भागानें मानसयज्ञ केला त्यावेळीं वसंत या यज्ञाचें घृत होतें. ग्रीष्म हा इध्म व शरद्ऋतु हें हविर्द्रव्य होतें ॥ १४ ॥

सप्तास्यासन्परिधयस्त्रिः सप्त समिधः कृताः । देवा यद्यज्ञं तन्वानाऽ-अबध्नन्पुरुषं पशुम् ॥ १५ ॥

अर्थ—ज्यावेळीं देव यज्ञ करण्याकरितां पुरुष पशूला बांधते झाले अर्थात् पुरुषाचे ठायीं पशुत्वाची भावना करते झाले. त्यावेळीं त्या मानस यज्ञाचे परिधि सप्त छन्द होते व त्याच्या एकवीस समिधा छन्दोवर्गरूपी होत्या ॥ १५ ॥

यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ॥ १६ ॥

अर्थ—देवांनीं मानसयज्ञानें यज्ञरूपी विष्णूचें पूजन केलें. कारण पूर्वी तें धर्माचें स्वरूप होतें. ते भाग्यवान् लोक त्या स्वर्गाचें सेवन करितात. ज्यांत पूर्वीचे साध्य व देव निवास करितात ॥ १६ ॥

अद्भ्यः संभृतः पृथिव्यै रसाच्च विश्वकर्मणः समवर्तताग्रे । तस्य त्वष्टा विदधद्रूपमेति तन्मर्त्यस्य देवत्वमाजानमग्रे ॥ १७ ॥

अर्थ—पृथ्वी, जल वगैरे पंचमहाभूतांपासून व विश्वकर्मा जो काल त्याचे प्रीतीमुळें जो रस उत्पन्न झाला त्यावें रूप धारण करून जो आदित्य रोज उदय पावतो तो पूर्वी पुरुषमेधयामी मनुष्य होता. त्यानेंच हें सूर्यरूपी आजानदेवत्व (मुख्य देवत्व) मिळविलें ॥ १७ ॥

वेदाहमेतं पुरुषं महान्तमादित्यवर्णं तमसः परस्तात् । तमेव विदित्वाऽ तिमृत्युमेति नान्यः पन्था विद्यतेऽयनाय ॥ १८ ॥

अर्थ—हा सूर्यमण्डलस्थ पुरुष सर्वोत्कृष्ट आहे असें मी समजतों. तो आदित्य वर्णाचा आहे. व तमाच्या म्हणजे अविद्येच्या पैलीकडे आहे. त्या आदित्यमण्डलस्थ पुरुषाचें ज्ञान झाल्यानेंच मृत्यूचें अतिक्रमण होतें म्हणजे परब्रह्माची प्राप्ति होते. ज्ञानाशिवाय मोक्षाला दुसरा मार्ग नाहीं ॥ १८ ॥

प्रजापतिश्चरति गर्भेऽअन्तरजायमानो बहुधा विजायते । तस्य योनिं परिपश्यन्ति धीरास्तस्मिन्ह तस्थुर्भुवनानि विश्वा ॥ १९ ॥

अर्थ—जो प्रजापति हृदयाच्या आंत राहून गर्भांत प्रवेश करतो. स्वस्वरूपानें अज असा जो मायेनें नाना प्रकारचीं रूपें धारण करतो, त्या प्रजापतीचें स्वरूप ब्रह्म-

वेत्ते ' अहं ब्रह्मास्मि ' अशा तत्त्वेनें जाणतात. त्या कारणस्वरूपी प्रजापति ब्रह्मामध्यें सर्व भूतसमुदाय स्थित आहे. तात्पर्य सर्व जग ब्रह्ममय आहे ॥ १९ ॥

यो देवेभ्यऽआतपति यो देवानां पुरोहितऽ । पूर्वो यो देवेभ्यो जातो नमो रुचाय ब्राह्मये ॥ २० ॥

अर्थ—जो प्रजापति देवाकरितां प्रकाशतो. जो सर्व कार्यामध्ये देवांच्या पुढें ठेविला जातो व देवांच्या पूर्वी उत्पन्न झाला त्या ब्रह्मांश अशा आदित्याला नमस्कार असो ॥ २० ॥

रुचं ब्राह्मं जनयन्तो देवाऽअग्रे तदब्रुवन् । यस्त्वैवं ब्राह्मणो विद्यात्तस्य देवाऽअसन्वशे ॥ २१ ॥

अर्थ—दीप्यमान प्राण सुशोभित असें आदित्यरूपी अपत्य उत्पन्न करीत असतां पहिल्यानें असें म्हणाले की, हे आदित्या, जो ब्राह्मण तुझी पूर्वोक्त उत्पत्ति जाणतो त्याचें स्वाधीन सर्व देव होतात तात्पर्य आदित्याची उपासना करणारा जगत्पूज्य होतो. ॥ २१ ॥

श्रीश्चं ते लक्ष्मीश्च पत्न्यावहोरात्रे पार्श्वे नक्षत्राणि रूपमश्विनौ व्यात्तम् । इष्णन्निषाणामुं मऽइषाण सर्वलोकं मऽइषाण ॥ २२ ॥

अर्थ—हे आदित्या, श्री (संपत्ति) व लक्ष्मी (सौंदर्य) तुझ्या स्त्रिया आहेत. दिवस व रात्री तुझे पार्श्व (दोन बाजू) आहेत. नक्षत्रें तुझें रूप आहे कारण तीं तुझ्यामुळेंच प्रकाशतात. द्यावापृथिवी तुझें मुख आहे अशा तुझी मी प्रार्थना करितो कीं, माझा परलोक चांगला होवो व माझे सर्व लोक चांगले होवोत अशी तूं इच्छा कर ॥ २२ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**
वाजसनेयमाध्यन्दिनीयसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** एकत्रिंशोऽध्यायः ॥ ३१ ॥

इति एकत्रिंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ द्वात्रिंशोऽध्यायः ॥ ३२ ॥

विनियोग—हा संबंध अध्याय व पुढील अध्यायांतील पंचावन मंत्र सर्वमेध-संबंधी आहेत. पहिल्या दोन मंत्रांत विज्ञानात्मा परमात्म्याशीं युक्त होऊन अग्न्यादिकांमध्यें पूर्ण भरलेला असल्यानें तो उपासना करण्यास योग्य आहे असें प्रतिपादन केलें आहे.

तदेवाग्निस्तदादित्यस्तद्वायुस्तदु चन्द्रमाः । तदेव शुक्रं तद्ब्रह्म ताऽआपः स प्रजापतिः ॥ १ ॥

अर्थ—अग्नि, आदित्य, वायु; चंद्र व ऋग्, यजुः, साम हे तीन प्रसिद्ध वेद, जलें आणि तो प्रसिद्ध प्रजापति हीं सर्व ब्रह्मरूपीच आहेत ॥ १ ॥

सर्वे निमेषा जज्ञिरे विद्युतः पुरुषादधि । नैनमूर्ध्वं न तिर्यञ्चं न मध्ये परिजग्रभत् ॥ २ ॥

अर्थ—प्रकाशमान अशा पुरुषापासून सर्व कालाचें परिमाण, घटका, मुहूर्त वगैरे उत्पन्न झाले. कोणालाही या पुरुषाचें ऊर्ध्वदिशेकडे, चतुर्दिशेकडे व मध्यभागींही ग्रहण होत नाहीं म्हणजे हा प्रत्यक्षादि प्रमाणांचा विषय नाहीं ॥ २ ॥

न तस्य प्रतिमाऽअस्ति यस्य नाम महद्यशः । हिरण्यगर्भऽइत्येष मा मा हिꣳसीदित्येषा यस्मान्न जातऽइत्येषः ॥ ३ ॥

अर्थ—त्या पुरुषाला उपमा नाहीं म्हणून त्याचें मोठें यश प्रसिद्ध आहे. तात्पर्य त्याचें यश सर्वापेक्षां मोठें आहे. १ हिरण्यगर्भः २ यःप्राणतः ३ यस्येमे ४ य आत्मदा हीं चार प्रतीकें पंचविसाव्या अध्यायांतील दहा, अकरा, बारा व तेरा या मंत्रांचीं आहेत त्या चार मंत्रांच्या अनुवाकाचें हिरण्यगर्भः या येथील प्रतीकानें ग्रहण करावयाचें. *'मा मा हिंसीत् जनितव्या'* या बाराव्या अध्यायांतील एकशेंदोन मंत्रांचें या प्रतीकानें ग्रहण करावयाचें. *'यस्मान् न जातः इंद्रश्च सम्राट्'* हीं आठव्या अध्यायांतील छत्तिसाव्या व सदतिसाव्या मंत्रांचीं प्रतीकें आहेत. हे दोन मंत्र मिळून एक अनुवाक झाला. त्याचें प्रतीक 'यस्मान् न जातः' या शब्दांनीं

घेतलें. या ठिकाणीं वर दिलेले मंत्र संबंध आहेत असें समजून त्यांचा अर्थ ध्यानांत घ्यावा. (पूर्वोक्त ठिकाणीं अर्थ दिलेले असल्यामुळें आम्ही येथें पुनरुक्ति केली नाहीं. हे पूर्वी गेलेले व प्रतीकानें दाखविलेले मंत्र ब्रह्मयज्ञाचे वेळीं व जपाचे वेळीं तेथें दिलेल्या क्रमानें सगळे म्हणावे.) ॥ ३ ॥

एषो ह देवः प्रदिशोऽनु सर्वाः पूर्वो ह जातः स उ गर्भेऽअन्तः ।
स एव जातः स जनिष्यमाणः प्रत्यङ् जनास्तिष्ठति सर्वतोमुखः ॥ ४ ॥

अर्थ--हा देव सर्व पोटदिशांना व्यापून राहिला. हे लोकांनो, ही गोष्ट प्रसिद्ध आहे कीं, हा देव जगाचे पूर्वी उत्पन्न झाला, गर्भांतही तोच असतो, तोच जन्मतो व तोच पुढेंही जन्माला येणार आहे. तोच सर्व वस्तूंत राहिला आहे. व सर्वत्र त्याचे मुखादि अवयव आहेत. ॥ ४ ॥

यस्माज्जातं न पुरा किं च नैव यऽआबभूव भुवनानि विश्वा । प्रजापतिः प्रजया सꣳ रराणस्त्रीणि ज्योतींꣳषि सचते स षोडशी ॥ ५ ॥

अर्थ--ज्याच्यापूर्वी कांहींच जन्मलें नाहीं व ज्यानें हीं सर्व भूतें उत्पन्न केलीं तो सोळा अवयवांचा लिंगशरीरी प्रजापती प्रजेसह क्रीडा करणारा होत्साता रवि, चंद्र व अग्नि एतद्रूपी तेजांचें सेवन करितो. ॥ ५ ॥

येन द्यौरुग्रा पृथिवी च दृढा येन स्वः स्तभितं येन नाकः । योऽ-अन्तरिक्षे रजसो विमानः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ६ ॥

अर्थ—ज्या पुरुषानें द्युलोक वृष्टि करणारा बनविला व पृथ्वीला घट्ट केलें (ती घट्ट असल्यामुळें सर्व प्राण्यांचें धारण होतें तसेंच वृष्टीचें ग्रहण होतें व अन्नाची उत्पत्ति होते) ज्याचे सामर्थ्यानें आदित्यमंडळ व स्वर्ग अडवून धरिला जातो जो अंतरिक्षांत वृष्टिरूपी जलाचें निर्माण करितो त्याखेरीज कोणत्या देवाला आम्ही हविर्भाग देऊं ? ॥ ६ ॥

यं क्रन्दसी अवसा तस्तभानेऽअभ्यैक्षेतां मनसा रेजमाने । यत्राधि सूरऽउदितो विभाति कस्मै देवाय हविषा विधेम । आपो ह यद्बृहतीर्विश्वमायन् गर्भं दधाना जनयन्तीर्ग्निम् । ततो देवानां समवर्तताऽसुरेकः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ७ ॥

अर्थ--द्यावापृथिवी ज्या पुरुषाचें चांगलें केलें असें म्हणून अभिनंदन करितात

स्या पुरुषाखेरीज दुसऱ्या कोणाला आम्ही हविर्भाग देऊं? त्या द्यावापृथिवी वृष्टिजनक अन्नानें प्राण्यांना अडवून धरतात व ज्या सुशोभित आहेत आणि ज्या द्यावापृथिवीमध्यें सूर्य उदय पावून अधिक शोभतो. 'आपो हयद्बृहतीः' हें सत्ताविसाव्या अध्यायाच्या पंचविसाव्या मंत्राचें प्रतीक आहे 'यश्चिदापः' हे त्याच अध्यायांतील सव्विसाव्या मंत्राचे प्रतीक आहेत (ब्रह्मयज्ञांत व जपांत हे सबंध मंत्र म्हणावे) ॥ ७ ॥

वेनस्तत्पश्यन्निहितं गुहा सयत्र विश्वं भवत्येकनीडम्। तस्मिन्निदꣳ सं च वि चैति सर्वꣳ सऽओतꣳ प्रोतश्च विभूः प्रजासु ॥ ८ ॥

अर्थ--वेदान्तरहस्य जाणणारा वेन नांवाचा पंडित तें ब्रह्म जाणतो. तें बुद्धिगुहेंत ठेविलेलें आहे. तसेंच तें नित्य आहे व सगळ्या जगाचें तें एकच घरटें आहे. जें सर्व विश्वाचा आधार आहे त्या ब्रह्मामध्यें प्रलयाच्या वेळीं हीं सर्व भूतें लीन होतात व सृष्टीचे वेळीं त्यापासूनच बाहेर पडतात. उभ्या आडव्या तंतूंत भरून राहिलेल्या पटाप्रमाणें परमात्मा या सर्व प्रजांमध्यें परिपूर्ण भरला आहे. व तो कार्यकारण स्वरूपाला प्राप्त होतो ॥ ८ ॥

प्र तद्वोचेदमृतं नु विद्वान्गन्धर्वो धाम विभृतं गुहा सत्। त्रीणि पदानि निहिता गुहास्य यस्तानि वेद स पितुꣳ पितासत् ॥ ९ ॥

अर्थ—वेदान्तवेत्ता पंडित तें अविनाशी ब्रह्म झटकन सांगूं शकेल. तें ब्रह्म बुद्धिगुहेंत असून उत्पत्तिस्थितिप्रलयरूपानें वांटलें गेलें आहे. या अविनाशी ब्रह्माचीं तीन रूपें ब्रह्मा, अंतर्यामी व विज्ञानात्मा एतत्स्वरूपी आहेत. जो तीं रूपें जाणतो तो ब्रह्मदेवाचाही पिता होतो म्हणजे परमात्मा होतो ॥ ९ ॥

स नो बन्धुर्जनिता स विधाता धामानि वेद भुवनानि विश्वा। यत्र देवाऽअमृतमानशानास्तृतीये धामन्नध्यैरयन्त ॥ १० ॥

अर्थ—तो परमात्मा आम्हाला बंधूप्रमाणें मान्य, उत्पादक, धारण करणारा व सर्व स्थानांना जाणणारा असा आहे. ब्रह्मज्ञान ज्यांना प्राप्त झालें असे अग्न्यादिक देव तृतीय स्थान जो स्वर्ग त्यामध्यें स्वेच्छेनें राहतात. ॥ १० ॥

विनियोग—सर्वभूतांत मी आहे व माझे ठिकाणीं सर्व आहे असें ज्ञान झालें

त्या सर्वमेधयाजी पुरुषाला मुक्ति प्राप्त होते असें ११ व १२ या दोन मंत्रांनीं सांगितलें आहे.

परीत्यं भूतानिं परीत्यं लोकान्परीत्य सर्वा÷ प्रदिशो दिशश्च । उप स्थाय प्रथमजामृतस्यात्मनात्मानमभि संविवेश ॥ ११ ॥

अर्थ—अशा तऱ्हेनें ज्याला ब्रह्माचें ज्ञान झालें असा सर्व मेधयाजी यजमान सर्व भूतें, सर्व लोक, सर्व दिशाविदिशा (यांना ब्रह्मस्वरूपी समजून) पहिल्यानें उत्पन्न झालेल्ली वेदत्रयरूपी जी वाणी तींत सांगितलेलीं कर्में करून जीवरूपानें यज्ञाधिष्ठाता जो परमात्मा त्यांत प्रवेश करितो; म्हणजे ब्रह्मस्वरूपी होतो. ॥ ११ ॥

परि द्यावापृथिवी सद्यऽङ्त्वा परिं लोकान्परि दिशऽ परिस्वु÷ । ऋतस्य तन्तुं विततं विचृत्य तदपश्यत्तदभवत्तदासीत् ॥ १२ ॥

अर्थ—सर्वमेधयाजी द्यावापृथिवी, सर्व लोक, दिशा, आदित्य यांना ब्रह्मरूपानें तत्काल जाणून व यज्ञाची विस्तृत अशी इतिकर्तव्यता संपवून त्या ब्रह्माला सर्वत्र पाहतो. तेंच बनतो. व तें तो स्वरूपानें पूर्वीच आहे ॥ १२ ॥

विनियोग—या पुढील ३ मंत्रांत मेधेची याचना आहे.

सदसस्पतिमद्भुतं प्रियमिन्द्रस्य काम्यम् । सनिं मेधामयासिषꣳ स्वाहा ॥ १३ ॥

अर्थ—मी अग्नीजवळ द्रव्य व बुद्धि मागतों, तो यज्ञगृहाचा पालक अचिंत्य-शक्तिमान् व इंद्राला प्रिय अणि धन, बुद्धि यांची याचना करणाऱ्याला स्पृहणीय असा आहे ॥ १३ ॥

यां मेधां देवगणाऽ पितरश्चोपासते । तया मामद्य मेधयाग्ने मेधाविनं कुरु स्वाहा ॥ १४ ॥

अर्थ—हे अग्ने, देवसमुदाय व पितर ज्या बुद्धीचें पूजन करितात ती बुद्धि देऊन मला बुद्धिमान् कर. तुला हें हवि सुहुत असो ॥ १४ ॥

मेधां मे वरुणो ददातु मेधामग्निऽ प्रजापतिꣳ । मेधामिन्द्रश्च वायुश्च मेधां धाता ददातु मे स्वाहा ॥ १५ ॥

अर्थ—वरुण, अग्नि, प्रजापति, इंद्र, वायु, व धाता मला बुद्धि देवोत. हें हवि सुहुत असो ॥ १५ ॥

विनियोग—श्रीची इच्छा करणारा पुरुष या मंत्रानें श्रीची याचना करतो.

इदं मे ब्रह्म च क्षत्रं चोभे श्रियमश्नुताम् । मयि देवा दधतु श्रियमुत्तमां तस्यै ते स्वाहा ॥ १६ ॥

अर्थ—ब्राह्मण व क्षत्रिय या जाती माझ्या लक्ष्मीला प्राप्त होवोत. देव माझे ठायीं उत्तम लक्ष्मी स्थापन करोत. त्या लक्ष्मीला हें हवि सुहुत असो. लक्ष्मी व सरस्वतीशिवाय यज्ञ सिद्ध होत नाहीं म्हणून त्यांची प्रार्थना ॥ १६ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**
वाजसनेयमाध्यन्दिनीयसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** द्वात्रिंशोऽध्यायः समाप्तः ॥ ३२ ॥

इति द्वात्रिंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ त्रयस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३३ ॥



विनियोग—सर्व मेधांमध्ये अग्निष्टुतसंज्ञक पहिल्या दिवशीं 'अस्याजरासः' पासून सतरा मंत्र पुरोरुचा आहेत.

अस्याजरासो दमामरित्राऽअर्चध्दूमासोऽअग्नयः÷ पावकाः । श्वितीचयः÷ श्वात्रासो भुरण्यवो वनर्षदो वायवो न सोमाः ॥ १ ॥

अर्थ—या यजमानाचे अग्नि बाधेक्यरहित असोत. तसेच ते ज्याप्रमाणे दांडे नौकांचे रक्षण करितात त्याप्रमाणे घरांचे रक्षण करणारे असोत. तसेच ते राक्षसरूपी शत्रूपासून रक्षण करणारे, पूज्य, ज्वालायुक्त, पवित्र करणारे, यजमानाचे श्वेतत्त्व व उज्ज्वलत्त्व वाढविणारे, क्षिप्रकार्यकारी, पोषण करणारे, काष्ठांत असणारे, वायूप्रमाणे उद्दीपक व सोमाप्रमाणे यजमानाचे इच्छित पूर्ण करणारे असे असोत ॥ १ ॥

हरयो धूमकेतवो वातजूताऽउप यविं । यतन्ते पृथगग्नयः÷ ॥ २ ॥

अर्थ—अग्नि नानाप्रकारेकरून स्वर्गामध्ये जाण्याचा यज्ञ करितात ते हरित वर्णाचे धुरावरून ओळखले जाणारे व वायूने प्रसरण पावणारे असे आहेत ॥ २ ॥

यजा नो मित्रावरुणा यजा देवाँ२॥ ऋतं बृहत् । अग्ने यक्षि स्वं दमम् ॥ ३ ॥

अर्थ—हे अग्ने, आमच्या मित्रावरुणांचा याग कर. देवांचा याग कर. मोठ्या यज्ञाचा व आपल्या गृहाचा याग कर ॥ ३ ॥

युक्ष्वा हि देवहूतमाँ२॥ अश्वाँऽअग्ने रथीरिव । नि होता पूर्व्यः सदः ॥ ४ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं रथस्वामीप्रमाणें देवाचे अतिशयेंकरून अवधान करणारे घोडे रथाला जोड. तूं पूर्वीचा होता आहेस. ह्या यागांत होतृसदनावर बैस ॥ ४ ॥

द्वे विरूपे चरतः स्वर्थेऽअन्यायां वत्समुपधापयेते । हरिरन्यस्यां भवति स्वधावाञ्छुक्रोऽअन्यस्यां दृदृशे सुवर्चाः÷ ॥ ५ ॥ शतं १७००

अर्थ – रात्र व दिवस या दोघांचें गमन नेहमीं चालू असतें. त्यांचीं रूपें नाना प्रकारचीं आहेत. त्यांचें प्रयोजन कल्याणकारक आहे. प्रत्येक जण निरनिराळ्या वत्साला दूध पाजतो. रात्रीं अग्निरूपी वत्साला व दिवस सूर्यरूपी वत्साला दूध पाजतो. म्हणजे रात्रीच्या अग्निहोत्राची देवता अग्नि आहे व दिवसाच्या अग्निहोत्राची देवता सूर्य आहे. रात्री हरित वर्णाचा अग्नि अन्नयुक्त होतो. व दिवसां शुक्ल वर्णाचा आदित्य मोठा तेजस्वी दिसतो ॥ ५ ॥

अयमिह प्रथमो धायि धातृभिर्होता यजिष्ठोऽअध्वरेष्वीड्यः। यमप्नवानो भृगवो विरुरुचुर्वनेषु चित्रं विभ्वं विशेविशे ॥ ६ ॥

अर्थ—हा अग्नि ह्या स्थानामध्यें मुख्य आसून यजमानानें स्थापन केला आहे. हा अग्नि देवांचें आव्हान करणारा व सर्वोत्तम तऱ्हेनें याग करणारा आहे व यज्ञांत ऋत्विज त्याची स्तुति करितात. भृगुकुलोत्पन्न पुत्रवान् मुनि प्रत्येक यजमानाकरितां अरण्यामध्यें या अग्नीला प्रदीप्त करितात. हा अग्नि निरनिराळ्या कर्मांत उपयोगी पडणारा असल्यामुळें आश्चर्यकारक आहे व व्यापक आहे ॥ ६ ॥

त्रीणि शता त्री सहस्राण्यग्निं त्रिंऽशच्चं देवा नव चाऽसपर्यन्। औक्षन्घृतैरस्तृणन्बर्हिरस्माऽआदिद्धोतारं न्यसादयन्त ॥ ७ ॥

अर्थ—३३३९ वस्वादि देव अग्नीची सेवा करितात त्यांनीं अग्नींत घृत सिंचन केलें व त्या अग्नीकरितां दर्भ पसरले, लगेच होत्याला वरण देऊन (व्रत करून) त्यास त्यांनीं होत्रकर्मात नियुक्त केलें. (घृतसिंचन, बर्हिस्तरण व होतृवरण हीच अग्नीची सेवा आहे) ॥ ७ ॥

मूर्धानं दिवोऽअरतिं पृथिव्या वैश्वानरमृतऽआ जातमग्निम्। कविꣳ सम्राजमतिथिं जनानामासन्ना पात्रं जनयन्त देवाः ॥ ८ ॥

अर्थ—देवांनीं अग्नि उत्पन्न केला तो द्युलोकाच्या शिरोभागीं सूर्यरूपानें प्रकाशणारा, पृथ्वीवर केव्हांही शान्त न होतां सर्वदा राहणारा, सर्व प्राण्यांचें हित करणारा, यज्ञाचे निमित्तानें अरणींतून उत्पन्न झालेला, भूतकालीन सर्व जाणणारा, ऐश्वर्ययुक्त यजमानाकडून अतिथीप्रमाणें पूज्य व चमसूपात्राच्या मुखांत राहणारा असा आहे ॥ ८ ॥

अग्निर्वृत्राणि जङ्घनद्द्रविणस्युर्विपन्यया । समिद्धः शुक्र आहुतः ॥ ९ ॥

अर्थ—अग्नि निरनिराळ्या पूजेने पापाचा समूळ नाश करितो. तो धनाची व हविर्द्रव्याची इच्छा करणारा, प्रदीप्त, शुद्ध व निमंत्रित असा आहे ॥ ९ ॥

विश्वेभिः सोम्यं मध्वग्न इन्द्रेण वायुना । पिबा मित्रस्य धामभिः ॥१०॥

अर्थ—हे अग्ने, तूं विश्वेदेव, इंद्र व वायु यांसह सोमरूपी मधूचें पान कर. तूं मित्राच्या नांवांनीं स्तुत आहेस ॥ १० ॥

आ यदिषे नृपतिं तेज आनट् शुचि रेतो निषिक्तं यौरभीके । अग्निः शर्धमनवद्यं युवानꣳ स्वाध्यं जनयन्मूदयाति च ॥ ११ ॥

अर्थ—ज्यावेळी वृष्टीच्या निमित्तानें तेजाचें निमित्त असें हविर्द्रव्य अग्नींत होमलें जातें त्यावेळीं अग्नि जगद्बीजभूत जल द्युलोकाचे जवळ अंतरिक्षांत उत्पन्न करितो व वृष्टिद्वारां तो तें जल जमिनीवर सोडतो. तें जलरूपी बीज बलाला कारण आहे, निर्दोष आहे, व तरुणाप्रमाणे परिपक्व रसयुक्त आहे व सर्वांना चिंतनीय आहे ॥ ११ ॥

अग्ने शर्ध महते सौभगाय तव द्युम्नान्युत्तमानि सन्तु । सं जास्पत्यꣳ सुयममाकृणुष्व शत्रूयतामभितिष्ठा महाꣳसि ॥ १२ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं उत्तम लोकस्थिति चालावी म्हणून उत्साह धारण कर. तुझीं तेजें उत्तम असोत. पत्नीयजमानांना जितेंद्रिय व एकमेकांविषयीं प्रेम करणारे असें कर. व शत्रुत्व करूं पहाणारांचीं तेजें नष्ट कर ॥ १२ ॥

त्वाꣳ हि मन्द्रतममर्कशोकैर्ववृमहे महि नः श्रोष्यग्ने । इन्द्रं न त्वा शवसा देवता वायुं पृणन्ति राधसा नृतमाः ॥ १३ ॥

अर्थ—हे अग्ने, सूर्याप्रमाणें प्रदीप्त अशा मंत्रांनीं आम्ही अत्यंत गंभीर अशा तुझें वरण करितों. कारण तूं आमचें मोठें स्तुतिवाक्य ऐकतोस. व बलानें इंद्रासारखा आणि वायूसारखा असलेल्या देवतारूपी तुला श्रेष्ठ मनुष्यें हविरूपी अन्नानें पूर्ण करितात ॥ १३ ॥

त्वेऽअग्ने स्वाहुत प्रियासः सन्तु सूरयः। यन्तारो ये मघवानो जनानामूर्वान्दयन्त गोनाम् ॥ १४ ॥

अर्थ—उत्तम प्रकारानें बोलावल्या गेलेल्या हे अग्ने, तुला पंडितलोक प्रिय होवोत. ते इंद्रियनियमन करणारे, जनामध्ये धनवान् असे आहेत. केवळ धनवानच नाहींत तर ते गायीच्या दहिदुधांत बनविलेले पुरोडाशही तुला देतात ॥ १४ ॥

श्रुधि श्रुत्कर्ण वह्निभिर्देवैरग्ने सयावभिः। आसीदन्तु बर्हिषि मित्रोऽअर्यमा प्रातर्यावाणोऽअध्वरम् ॥ १५ ॥

अर्थ—याचकांची याचना श्रवण करणाऱ्या हे अग्ने, हवि धारण करणारे व तुझ्या नेहमीं बरोबर असणारे जे देव त्यांसह तूं यज्ञाचें श्रवण कर. व मित्र, अर्यमा प्रातः सवनांतील हवि घेणारे देव दर्भावर बसोत ॥ १५ ॥

विश्वेषामदितिर्यज्ञियानां विश्वेषामतिथिर्मानुषाणाम्। अग्निर्देवानामवऽआवृणानः सुमृडीको भवतु जातवेदाः ॥ १६ ॥

अर्थ—सर्व यज्ञार्ह देवांमध्यें दीनतारहित असा अग्नि सर्व मनुष्यांना पूज्य व देवांना हविर्द्रव्यरूपी अन्न समर्पण करणारा होत्साता सुखकर व चेतनावान् होवो ॥ १६ ॥

महोऽअग्नेः समिधानस्य शर्मण्यनागा मित्रे वरुणे स्वस्तये। श्रेष्ठे स्याम सवितुः सवीमनि तद्देवानामवोऽअद्या वृणीमहे ॥ १७ ॥

अर्थ—सर्वोत्कृष्ट अशी सूर्याची आज्ञा झाली असतां आम्ही देवांच्या अन्नाचा म्हणजे हविर्द्रव्याचा संस्कार करितों. ज्या अन्नाच्यायोगें आमचें कल्याण होईल. आम्ही पूज्य व प्रदीप्त अशा अग्नीच्या आश्रयभूत मित्र व वरुण यांचा अपराध न केलेले असे आहोंत. ॥ १७ ॥

विनियोग—यापुढे बारा ऋचा सर्व मेधाच्या इंद्रस्तुतसंज्ञक द्वितीय दिवसातील पुरोरुचा आहेत.

आपश्चित्पिप्युस्तर्यो न गावो नक्षन्नृतं जरितारस्तऽइन्द्र। याहि वायुर्न नियुतो नोऽअच्छा त्वꣳहि धीभिर्दयसे वि वाजान् ॥ १८ ॥

अर्थ—हे इंद्रा, स्तोते जे ऋत्विज ते तुझ्या यज्ञाला व्याप्त करितात, निग्राभ्य-संज्ञक जलें तुझा सोम वाढवितात. यास दृष्टान्त-ज्याप्रमाणें सोमाचा रस काढण्याच्या वेळीं उच्चारले गेलेले वेदमंत्र सोम वाढवितात त्याप्रमाणें जलेंही सोम वाढवितात म्हणून वायु आपल्या घोड्यांच्या सन्मुख येतो त्याप्रमाणे तूं आमच्या सन्मुख ये, कारण तूं या कर्मांनीं निरनिराळ्या अन्नांना देणारा आहेस ॥ १८ ॥

गावऽउपावतावतं मही यज्ञस्य रप्सुदा । उभा कर्णा हिरण्यया ॥ १९ ॥

अर्थ—हे गाईनो, तुम्ही या चात्वालरूपी कूपाजवळ या. कारण तुम्ही मोठ्या यज्ञाला रूप देणाऱ्या द्यावापृथिवीस्वरूपी आहां. तुमचे दोन्ही कर्ण सोन्याचे आहेत म्हणून दानाकरितां या ॥ १९ ॥

यदय सूरऽउदितेऽनागा मित्रोऽअर्यमा सुवाति सविता भगः ॥ २० ॥

अर्थ—आज सूर्य उदय झाल्यावर अपराधरहित असे मित्र, अर्यमा, सविता व भग हे ज्या कर्मांची प्रेरणा करितील तें करावे. ॥ २० ॥

आ सुते सिञ्चत श्रियꣳ रोदस्योरभिश्रियम् । रसा दधीत वृषभम् । तं प्रत्नथायं वेनः ॥ २१ ॥

अर्थ—नदी वृष्टि करणाऱ्या सोमाला वाढवितें. हे ऋत्विजांनो, सोमाचा रस काढला गेला. आतां तो चमसांत ओता. तो सोम द्यावापृथिवींना आश्रयभूत व सर्व बाजूंनीं सुशोभित असा आहे. 'तं प्रत्नथा' हें सातव्या अध्यायांतील बाराव्या मंत्राचें व 'अयंवेनः' हे त्याच अध्यायांतील सोळाव्या मंत्राचे प्रतीक आहे ॥ २१ ॥

आतिष्ठन्तं परि विश्वेऽअभूषञ्छ्रियो वसानश्चरति स्वरोचिषम् । महत्तद्वृष्णोऽअसुरस्य नामा विश्वरूपोऽअमृतानि तस्थौ ॥ २२ ॥

अर्थ—विश्वेदेव सर्वत्र असलेल्या इंद्राचें रक्षण करितात. स्वयंप्रकाश आणि देवांचे प्रकाश झांकून टाकणारा असा तो इंद्र सर्वत्र गमन करितो. विश्वदर्शी व सावधान इंद्र वृष्टीकरितां जलांत अधिष्ठान करिता झाला म्हणून त्याचें नांव प्रसिद्धीस आलें ॥ २२ ॥

प्र वो महे मन्दमानायान्धसोऽर्चा विश्वानराय विश्वाभुवे इन्द्रस्य यस्य सुमखꣳ सहो महि श्रवो नृम्णं च रोदसी सपर्यतः ॥ २३ ॥

अर्थ—हे ऋत्विजांनो, तुम्ही ज्याचे सर्व यजमान आहेत अशा मोठ्या इंद्राची पूजा करा. तो तुमच्या हविर्द्रव्यानें आनंदित होणारा व सर्वव्यापी आहे. द्यावापृथिवी या इंद्राच्या उत्तम यज्ञाची, बलाची, उत्तम कीर्तीची व धनाची पूजा करितात ॥२३॥

बृहन्निदिध्मऽएषां भूरि शस्तं पृथुꣳ स्वरुः। येषामिन्द्रो युवा सखा ॥ २४ ॥

अर्थ—समर्थ असा इंद्र ज्या यजमानांचा मित्र झाला त्यांचेकडे मोठा इध्मा पुष्कळ शस्त्रें व विशाल खड्ग होतात म्हणजे त्या यजमानांचे घरी पुष्कळ यज्ञ होतात ॥ २४ ॥

इन्द्रेहि मत्स्यन्धसो विश्वेभिꣳ सोमपर्वभिः। महाꣳ२ ॥ अभिष्टिरोजसा ॥ २५ ॥

अर्थ—हे इंद्रा, आमच्याकडे ये व हविर्द्रव्याने आणि सोमभागांनी संतुष्ट हो. तूं श्रेष्ठ व पूज्य आहेस ॥ २५ ॥

इन्द्रो वृत्रमवृणोच्छर्धनीतिꣳ प्र मायिनाममिनाद्वर्पणीतिꣳ। अहन्व्यꣳ समुशधग्वनेष्वाविर्धेनाऽअकृणोद्राम्याणाम् ॥ २६ ॥

अर्थ—इंद्रानें वृत्रासुराला युद्धाला बोलाविलें. तो मायावी, दुष्ट दैत्यांना अरण्यांत मारतो. व यज्ञ करणाऱ्या यजमानांची स्तुति देवांना कळवितो. तो इंद्र चतुरंग सैन्ययुक्त नानारूपधारी व परद्रव्य हरण करणाऱ्या चोरांचा नाशक आहे ॥ २६ ॥

कुतस्त्वमिन्द्र माहिनꣳ सन्नेको यासि सत्पते किं तऽइत्था। संपृच्छसे समराणꣳ शुभ्राणीवोचेस्तन्नो हरिवो यत्तेऽअस्मे। महाꣳ२ ॥ इन्द्रो यऽओजसा कुदा चुन स्तरीरसि कुदा चुन प्रयुच्छसि ॥ २७ ॥

अर्थ—हे साधुपालक इंद्रा, तूं एकटाच कोठें जातोस व तुझ्या जाण्याचा हेतु काय? तूं मोठा असून एकटा असल्यामुळें लोकांना गोड भाषेनें मार्ग विचारतोस. हे अश्ववान् इंद्रा, आम्हांला एकटें जाण्याचें कारण सांग. कारण आम्ही तुलाच

आहोंत " महों इंद्रः " हें सातव्या अध्यायांतील चालिसाव्या मंत्राचें प्रतीक आहे. " कदाचन स्तरीरसी " हें आठव्या अध्यायाच्या दुसऱ्या मंत्राचें व " कदाचन प्रयुच्छसि " हे त्याच्याच पुढील तिसऱ्या मंत्राचें प्रतीक आहे ॥ २७ ॥

आ तत्तऽइन्द्रायवः÷ पनन्ताभि यऽऊर्व गोमन्तं तितृत्सान् । सकृत्स्वुं षे पुरुपुत्रां महीꣳ सहस्रधारां बृहतीं दुदुक्षन् ॥ २८ ॥

अर्थ—हे इंद्रा, निग्राभ्यसंज्ञक जलांनीं विशिष्ट अशा सोमाचा रस काढण्याची इच्छा करणारे मनुष्य (ब्राह्मण यजमान) तुझ्या कर्मांची स्तुति करितात. तसेंच भूमींतून द्रव्य घेण्याची इच्छा करणारे (क्षत्रिय) यजमानही तुझी स्तुति करितात. ती पृथ्वी मोठी, खाणींतील रत्न वगैरे एकदाच देणारी, पुष्कळ पदार्थ असलेली सुवर्णादि बहु भोग देणारी अशी आहे ॥ २८ ॥

इमां ते धियं प्रभरे महो महीमस्य स्तोत्रे धिषणा यत्तऽआनजे । तमु त्मवे च प्रसवे च सासहिमिन्द्रं देवासः शवसामदन्ननु ॥ २९ ॥

अर्थ—हे इंद्रा, माझी मोठी बुद्धि मी पूज्य अशा तुझ्या स्वाधीन करतों. कारण स्तुतीचे वेळीं यजमानाची बुद्धि तुला प्रकट करिते. तसेंच देव गुरूच्या आज्ञेनें उत्सवाच्या वेळीं बलानें शत्रूंचा पराजय करणारा अशी तुझी (इंद्राची) स्तुति करितात ॥ २९ ॥

विनियोग—यापुढील चौदा ऋचा व प्रतीकांनीं सांगितलेल्या तीन ऋचा अशा सतरा सूर्यस्तुतिसंज्ञक तृतीय दिवसाच्या पुरोऋचा आहेत.

विभ्राड्बृहत्पिबतु सोम्यं मध्वायुर्दधद्यज्ञपतावविंहुतम् । वातजूतो योऽ अभिरक्षति त्मना प्रजाः पुपोष पुरुधा वि राजति ॥ ३० ॥

अर्थ—नानाप्रकारेकरून प्रकाशमान असा तो सूर्य पुष्कळ व मधुररसयुक्त हविर्द्रव्य भक्षण करो. जो सूर्य यजमानाला अखंडित आयुष्य देतो व जो वातानें प्रेरित आहे तो सूर्य आपल्या शरीरानें प्रजेचें पालन करितो व त्या वाढवितो. आणि स्वतः शोभतो ॥ ३० ॥

उदु त्यं जातवेदसं देवं वहन्ति केतवः÷ । दृशे विश्वाय सूर्यम् ॥ ३१ ॥

अर्थ--ज्ञानोत्पादक अशा प्रसिद्ध सूर्यदेवाला जगाचें अवलोकन करण्याकरितां किरणे वाहन नेतात ॥ ३१ ॥

येना पावक चक्षसा भुरण्यन्तं जनाँ२॥ अनु । त्वं वरुण पश्यसि ॥३२॥

अर्थ--हे सूर्या, सर्वमेधयाजी यजमान भुरण्यु पक्ष्याचें रूप घेऊन स्वर्गाला जातो. तेव्हां जसा तूं त्याचेकडे पाहतोस तसा आम्ही स्वर्गावर जात असतां आमच्याकडे पहा ॥ ३२ ॥

देव्यावध्वर्यूऽआगतꣳ रथेन सूर्यत्वचा । मध्वा यज्ञꣳ समञ्जाये । तं प्रत्नथायं वेनश्चित्रं देवानाम् ॥ ३३ ॥

अर्थ--देवांचे अध्वर्यू असलेल्या अश्विनीकुमारांनो, तुम्ही सूर्यासारख्या कांतिमान् रथानें या व आल्यावर सोमादि हविर्द्रव्यें वाढवा " तं प्रत्नथा " हें सातव्या अध्यायांतील वाराव्या मंत्राचें प्रतीक, " अयं वेनः " हें त्याच अध्यायांतील सोळाव्या मंत्राचें प्रतीक व " चित्रं देवानाम् " हें त्याच अध्यायांतील बेचाळिसाव्या मंत्राचें प्रतीक आहे ॥ ३३ ॥

आ नऽइडाभिर्विदथे सुशस्ति विश्वानरꣳ सविता देवऽएतु । अपि यथा युवानो मत्सथा नो विश्वं जगदभिपित्वे मनीषा ॥ ३४ ॥

अर्थ—सर्व नरांचें हित करणारा सूर्यदेव प्रशंसायुक्त अशा यज्ञगृहांत अशा प्रकारे येवो कीं, सर्वांनीं यथेच्छ इडाभक्षण करावें, स्तुति करावी आणि हे तरुण (जरारहित) देवांनो, तुम्ही आगमनाचे वेळीं जसें संतुष्ट होतां त्याप्रमाणें आमच्या सर्व पुत्र, गाई वगैरेंना बुद्धीनें निश्चयपूर्वक संतुष्ट करा ॥ ३४ ॥

यदद्य कच्च वृत्रहन्नुदगाऽअभि सूर्य । सर्वं तदिन्द्र ते वशे ॥ ३५ ॥

अर्थ—हे ऐश्वर्यवंत सूर्या, जे सर्व भूतसमुदाय उत्पन्न झाले ते तुझ्या स्वाधीन आहेत ॥ ३५ ॥

तरणिर्विश्वदर्शतो ज्योतिष्कृदसि सूर्य । विश्वमाभासि रोचनम् ॥ ३६ ॥

अर्थ--हे आकाशाचें आक्रमण करणाऱ्या सूर्या, तूं तेजाचा उत्पादक आहेस व अग्नि वगैरेंना प्रकाशित करणारें तुझें तेज प्रकाशित करितोस ॥ ३६ ॥

तत्सूर्यस्य देवत्वं तन्महित्वं मध्या कर्तोर्वितंतꣳ संजभार । यदेदयुक्त हरितः सधस्थादाद्रात्री वासस्तनुते सिमस्मै ॥ ३७ ॥

अर्थ—जगांत तेज उत्पन्न करणें व विस्तृत अशा त्या तेजाचा पुनः आपणांत लय करून घेणें यांतच सूर्याचा मोठेपणा व ऐश्वर्य आहे. त्याचेशिवाय दुसरा कोणी हें कार्य करूं शकणार नाहीं आणि ज्या वेळीं सूर्य हरित वर्णाचे किरण आपले ठिकाणीं आवरून धरतो त्या वेळींच आकाशांतून संध्याकाळचे पिवळ्या वर्णाचे किरणही आपल्या ठिकाणीं स्थापन करतो. नंतर लगेच रात्र वस्त्र पसरते म्हणजे अंधार पडतो ॥ ३७ ॥

तन्मित्रस्य वरुणस्याभिचक्षे सूर्यो रूपं कृणुते द्योरुपस्थे । अनन्तमन्यद्रुशदस्य पाजः कृष्णमन्यद्धरितꣳ संभरन्ति ॥ ३८ ॥

अर्थ—सूर्य आकाशांत मित्राचें व वरुणाचे रूप धारण करून जनांना पहातो. तो मित्ररूपानें पुण्यवान् लोकांवर कृपा करितो व वरुणरूपानें पाप्यांना दंड करतो. या सूर्याचे एक परब्रह्मरूपी प्रकाशमान व देशकालापरिच्छिन्न स्वरूप आहे. तसेंच दुसरे द्वैतरूपी स्वरूप इंद्रियवृत्तींना पूर्ण करितें म्हणजे नें द्वैतरूप इंद्रियवृत्तीना गोचर होतें (दिसतें) ॥ ३८ ॥

बण्महाँ२ ॥ असि सूर्य बडादित्य महाँ२ ॥ असि । महस्ते सतो महिमा पनस्यतेऽद्धा देव महाँ२ ॥ असि ॥ ३९ ॥

अर्थ—सर्व कार्यांत जगाची प्रेरणा करणाऱ्या सूर्या, तूं खरोखर मोठा आहेस. तसेच आदित्या, तूंही मोठा आहेस. सर्व लोक नित्य अशा तुझ्या ऐश्वर्याची स्तुति करितात. हे देवा, खरोखर तूं मोठा आहेस. येथें आदरार्थ पुनरुक्ति केली आहे. ॥ ३९ ॥

बट्सूर्य श्रवसा महाँ२ ॥ असि सत्रा देव महाँ२ ॥ असि । महा देवानाममुर्यः पुरोहितो विभु ज्योतिरदाभ्यम् ॥ ४० ॥

अर्थ—हे सूर्या, तुझी कीर्ति मोठी आहे व सर्व देवांपेक्षां तुझें ऐश्वर्य श्रेष्ठ आहे. सर्व प्राण्यांकडून सर्व कार्यात अर्घ्य देऊन पूजा केला जाणारा तूं व्यापक व अविनाश्य असा तेजोरूपी आहेस. ॥ ४० ॥

श्रायन्त इव सूर्यं विश्वेदिन्द्रस्य भक्षत। वसूनि जाते जनमानऽओजसा प्रति भागं न दीधिम ॥ ४१ ॥

अर्थ—किरणें सूर्याचा आश्रय करूनच इंद्रानें केलेली सृष्टि व धान्यें वगैरे प्राण्यांत वांटून देतात. आणि आम्ही तींच द्रव्यें उत्पन्न झालेल्या व पुढें होणाऱ्या पुत्रांना यथायोग्य त्यांचे विभागाप्रमाणें वांटून देऊं. ॥ ४१ ॥

अग्रा देवाऽउदिता सूर्यस्य निरꣳ हसꣳ पिपृता निरवद्यात्। तन्नोमित्रो वरुणो मामहन्तामदितिꣳ सिन्धुꣳ पृथिवीऽउत द्यौꣳ ॥ ४२ ॥

अर्थ—हे किरणरूपी देवांनो, आमचीं पापें दूर करा. व आमचीं अपकीर्ति करणाऱ्या कृत्यांचा नाश करा. व मित्र, वरुण, अदितिदेवमाता, समुद्र, पृथ्वी व स्वर्ग हीं आमच्या वचनाचा अंगिकार करोत ॥ ४२ ॥

आ कृष्णेन रजसा वर्तमानो निवेशयन्नमृतं मर्त्यं च। हिरण्ययेन सविता रथेना देवो याति भुवनानि पश्यन् ॥ ४३ ॥

अर्थ—रात्रिरूपी काळ्या रजाला (धुळीला) पुनर्भ्रमण करवून म्हणजे रात्री घालवून देव व मनुष्यांना आपापलीं कामें करावयास लावून आणि चांगलीं कर्मे कोण करितो व वाईट कर्मे कोण करितो अशा रीतीनें जगाचें निरीक्षण करीत सूर्य सोन्याचे रथांत बसून येतो ॥ ४३ ॥

विनियोग—यापुढें अकरा ऋचा व प्रतीकांत सांगितलेल्या सहा ऋचा मिळून सतरा वैश्वदेवस्तुत्संज्ञक सर्वमेधांतील चतुर्थ दिवसाच्या पुरोऋचा आहेत.

प्रवावृजे सुप्रया बर्हिरेषामा विश्पतीव बीरिटऽइयाते। विशामक्तोरुषसꣳ पूर्वहूतौ वायुꣳ पूषा स्वस्तये नियुत्वान् ॥ ४४ ॥

अर्थ—सकाळच्या अग्निहोत्राच्या वेळीं रवि व रात्रीच्या अग्निहोत्राच्या वेळीं नियुत्संज्ञक अश्वयुक्त वायु असे अंतरिक्षांत राहणारे दोघे, दोन राजे मनुष्यसमुदायामध्यें येतात त्याप्रमाणें यजमानांच्या कल्याणाकरितां येतात. ज्या यजमानांनीं उत्तम पसरले जाणारे असे दर्भ यज्ञांत पसरले आहेत ॥ ४४ ॥

इन्द्रवायू बृहस्पतिं मित्राग्निं पूषणं भगम्। आदित्यान्मारुतं गणम् ॥४५॥

अर्थ—मी इंद्र, वायु, बृहस्पति, मित्र, अग्नि, पूषा, भग, आदित्य, व मरुद्गण यांना बोलावितों ॥ ४५ ॥

वरुणꣳ प्राविता भुवन्मित्रो विश्वाभिरूतिभिः। करतां नꣳ सुराधसꣳ ॥ ४६ ॥

अर्थ—वरुण आणि मित्र सर्व प्रकारेंकरून आमचे रक्षण करोत. व मित्रावरुण आम्हांला उत्तम धन देवोत ॥ ४६ ॥

अधि नऽइंद्रैषां विष्णो सजात्यानाम्। इता मरुतोऽअश्विना। तं प्रत्नथायं वेनो वे देवासऽआ नऽइडाभिर्विश्वेभिꣳ सोम्यं मध्वोमासश्चर्षणीधृतꣳ ॥ ४७ ॥

अर्थ—हे इंद्रा, हे विष्णो, हे मरुद्गणा, हे अश्विनीकुमारांनो, आमच्या सजातीय ऋत्विजामध्ये तुम्ही या. 'तं प्रत्नथा' हें सातव्या अध्यायाच्या बाराव्या मंत्राचे प्रतीक. 'अयं वेनः' हें (त्याच अध्यायांतील) सोळाव्या मंत्राचें, व 'ये देवासः' हे एकोणिसाव्या मंत्राचे प्रतीक आहे. तसेच 'आन इडाभिः' हे तेहतीसाव्या अध्यायांतील चौतिसाव्या मंत्राचें व 'सोम्यं मधु' हे त्याच अध्यायांतील दहाव्या मंत्राचें आणि 'ओमासश्चर्षणी धृतः' हे सातव्या अध्यायांतील तेहातिसाव्या मंत्राचे प्रतीक आहे ॥ ४७ ॥

अग्रऽइन्द्र वरुण मित्र देवाꣳ शर्धꣳ प्रयन्त मारुतोत विष्णो। उभा नासत्या रुद्रोऽअध ग्राꣳ पूषा भगꣳ सरस्वती जुषन्त ॥ ४८ ॥

अर्थ—हे अग्ने, हे इंद्रा, हे वरुणा, हे मित्रा, हे देवांनो, हे मरुद्गणांनो व हे विष्णो तुम्ही आम्हांला बल द्या. दोघे अश्विनीकुमार, रुद्र, देवपत्नी, पूषा, भग आणि सरस्वती या देवता हविर्द्रव्याचें सेवन करोत. ॥ ४८ ॥

इंद्राग्नी मित्रावरुणादितिꣳ स्वः पृथिवीं द्यां मरुतꣳ पर्वताँ२॥ अपꣳ हुवे विष्णुं पूषणं ब्रह्मणस्पतिं भगं नु शꣳ सꣳ सवितारमूतये ॥ ४९ ॥

अर्थ—मी संरक्षणाकरितां इंद्राग्नि, मित्रावरुण, अदिति, आदित्य, पृथिवी, द्युलोक, मरुद्गण, पर्वत, अप्, विष्णु, पूषा, ब्रह्मणस्पति, भग व स्तुत्य असा सविता यांचें शीघ्र आवाहन करितों. ॥ ४९ ॥

अस्मे रुद्रा मेहना पर्वतासो वृत्रहत्ये भरहूतौ सजोषाः । यꣳ शꣳ संते स्तुवते धायि पज्रऽइन्द्रज्येष्ठाऽअस्माँ२ ॥ अवन्तु देवाः ॥ ५० ॥

अर्थ—जे शस्त्रांनीं स्तुति करितात व पुष्कळ द्रव्ये संपादन करून जे हविर्द्रव्यें देतात; देव त्या यजमानांचें रक्षण करोत. ते देव आम्हांला द्रव्य देणारे, शत्रूंना रडविणारे, वृत्रासुरवधाविषयीं उत्साह असलेले, संग्रामाचें आव्हान आलें असतां ज्यांना सारखाच संतोष होतो व ज्यांत इंद्र श्रेष्ठ आहे असे आहेत ॥ ५० ॥

अर्वाञ्चोऽअद्या भवता यजत्राऽआ वो हार्दि भयमानो व्ययेयम् । आध्वं नो देवा निजुरो वृकस्य त्राध्वं कर्तादवपदो यजत्राः ॥ ५१ ॥

अर्थ—यज्ञ करण्यास योग्य अशा देवांनो, आज तुम्ही माझ्या सन्मुख व्हा. भिणाऱ्या अशा मी तुमचें मन माझ्या सन्मुख केलें आहे. तसेंच हे यागाहे देवांनो, हिंसक अशा वृकापासून व उतरण्यास ज्यांत पायऱ्या नाहीत अशा कूपापासून आमचें रक्षण करा. ॥ ५१ ॥

विश्वेऽअद्य मरुतो विश्वऽऊती विश्वे भवन्त्वग्नयः समिद्धाः । विश्वे नो देवाऽअवसागमन्तु विश्वमस्तु द्रविणं वाजोऽअस्मे ॥ ५२ ॥

अर्थ—आज सर्व मरुद्गण येवोत व इतर वसु, रुद्र आणि आदित्यरूपी मरुद्गण अन्नरूपी हविर्भक्षणानें संतुष्ट होण्याकरितां येवोत व त्यांच्या येण्यानें सर्व गार्हपत्यादि अग्नि प्रदीप्त होवोत व देवांच्या संतोषानें सर्व गोभूहिरण्यादि द्रव्य व अन्न आम्हांला प्राप्त होवो ॥ ५२ ॥

विश्वेदेवाः शृणुतेम हवं मे येऽअन्तरिक्षे यऽउप द्यविष्ठ । येऽअग्निजिह्वाऽउत वा यजत्राऽआसद्यास्मिन्बर्हिषि मादयध्वम् ॥ ५३ ॥

अर्थ—हे विश्वेदेवांनो, स्वर्गाजवळ व अन्तरिक्षांत राहणारे, अग्निमुखाचे व पूज्य असे तुम्ही सर्वजण माझें आव्हान ऐका व या आसनावर बसून संतुष्ट व्हा ॥ ५३ ॥

देवेभ्यो हि प्रथमं यज्ञियेभ्योऽमृतत्वꣳ सुवसि भागमुत्तमम् । आदित्यासꣳ सवितर्व्यूर्णुषेऽनूचीना जीविता मानुषेभ्यः ॥ ५४ ॥

अर्थ—हे सवित्या, तूं उदयसमयीं अगोदर अविनाशी व उत्तम असा हविर्भाग यज्ञयोग्य देवांना देण्याची निश्चयेंकरून प्रेरणा करितोस. नंतर लगेच प्रकाशक किरणें पसरवितोस. तदनंतर जीवनहेतुभूत दिवसाचीं कर्में करण्याविषयीं माणसांना प्रेरणा करितोस. सार्वमेधिक कर्म संपलें. ॥ ५४ ॥

प्र वायुमच्छा बृहती मनीषा बृहद्रयिं विश्ववारꣳ रथमाम् । द्युतद्यामा नियुतꣳ पत्यमानꣳ कविꣳ कविर्मियक्षसि प्रयज्यो ॥ ५५ ॥

अर्थ—(यापुढें पंधरा ऋचांचे दोन व तेरा ऋचांचा एक असे तीन अनुवाक पुरोरुचा आहेत त्यांचा कोणत्याहि कर्मात विनियोग नाही.) हे उत्तम याग करणाऱ्या अध्वर्यो, ज्ञानी असा तूं मोठ्या बुद्धीनें सन्मुख होऊन वायूचा याग करण्याची अतिशय इच्छा करितोस. तो वायु मोठा धनवान्, सर्वांना स्पृहणीय, यजमानाचा रथ धनानें पूर्ण करणारा व ज्याचा निग्रह प्रकाशमान आहे, अश्वांनीं गमन करणारा व भूतकालदर्शी असा आहे. ॥ ५५ ॥

इन्द्रवायू इमे सुताऽउप प्रयोभिरागतम् । इन्दवो वामुशन्ति हि । (उपयामगृहीतोऽसि वायवऽइन्द्रवायुभ्यां त्वा । एष ते योनिः सजोषोभ्यां त्वा) ॥ ५६ ॥

अर्थ—हे इंद्रवायूंनो, तुमच्याकरितां आम्ही सोमरसांचे कंडण केले. सोमदेव तुमची इच्छा करितात म्हणून तुम्ही सोमरूपी अन्नासह या. हे सोमरसा, वायुदेवतेच्या संतोषाकरितां तुझें मी उपयामसंज्ञक पात्रानें ग्रहण केले आहे. हे सोमपात्रा, हे तुझें स्थान आहे म्हणून तेंही अशा इंद्रवायूंच्या संतोषाकरितां तुझें मी स्थापन करतों ॥ ५६ ॥

मित्रꣳ हुवे पूतदक्षं वरुणं च रिशादसम् । धियं घृताचीꣳ साधन्ता ॥ ५७ ॥

अर्थ—मी सदाचारी पुरुषांना वाढविणारा मित्र व दुष्टनाशक वरुण या दोघांना बोलावितों. ते दोघे घृतयुक्त यज्ञकर्माचे साधक आहेत ॥ ५७ ॥

दस्रा युवाकवः सुता नासत्या वृक्तबर्हिषः । आयातꣳ रुद्रवर्तनी । तं प्रत्नथायं वेनः ॥ ५८ ॥

अर्थ—हे दर्शनीय व सत्यवादिन् अशा अश्विनीकुमारांनो, रुद्राप्रमाणें गमन

करणारे असे तुम्ही या. सोमरस कांडलें गेलें. ते सोम तुमची इच्छा करितात. (तुम्ही पान करावें अशी त्यांची इच्छा आहे) व त्या सोमाच्या भोंवती दर्भ पसरले आहेत. ' तं प्रत्नथा ' हें सातव्या अध्यायांतील बाराव्या मंत्राचें व ' अयं वेनः ' हें त्याच अध्यायांतील सोळाव्या मंत्राचें प्रतीक आहे ॥ ५८ ॥

विदथ्यदीं सरना रुगणमंत्रेर्महि पाथ÷ पूर्व्यꣳ सध्र्यꣳक्कꣳ । अग्रं नयत्सुपयक्षराणामच्छा रवं प्रथमा जानती गात् ॥ ५९ ॥

अर्थ—देव जिच्यांत रममाण होतात अशी वेदत्रयरूपी वाणी यज्ञाचे सन्मुख येते. तिच्यांत उत्तम विभक्त्यन्त पदे आहेत व तिच्यांत अकारादि अक्षरांचा शब्द होतो. ती वेदवाणी जर अध्वर्यु जाणील तरच तो सोमरूपी अन्न तयार करील. तें सोमलक्षण अन्न दगडांनीं कुटलेलें, मोठें व पात्रांत स्थापन केलेलें व एकदम हवनाकडे जाणारे व यजमानाला श्रेष्ठता आणून देणारे असें आहे ॥ ५९ ॥

नहि स्पशमविदन्नन्यमस्माद्वैश्वानरात्पुरएतारमग्नेꣳ । एमेनमवृधन्नमृताऽअमर्त्यं वैश्वानरं क्षैत्रजित्याय देवाꣳ ॥ ६० ॥

अर्थ—देवांना विश्वाचा हितकारी जो अग्नि त्याहून वेगळा व सर्व कार्यात पुढें करण्यासारखा दूत मिळाला नाहीं. देव त्या ह्या वैश्वानर अग्निरूपी दूताला, यजमानाला शेत मिळावें म्हणून वाढविते झाले. तो अग्नि अविनाशी आहे ॥ ६० ॥

उग्रा विघनिना मृधऽइन्द्राग्नी हवामहे । ता नो मृडातऽईदृशे ॥ ६१ ॥

अर्थ—आम्ही उग्र व हिंसकांचा विशेषेंकरून नाश करणारे जे इंद्राग्नि त्यांना बोलाविनों. ते आम्हांला असल्या भयंकर संग्रामामध्यें सुख देतात ॥ ६१ ॥

उपास्मै गायता नरꣳ पवमानायेन्दवे । अभि देवाँ२॥ इयक्षते ॥ ६२ ॥

अर्थ—हे यज्ञ चालविणाऱ्या ऋत्विजांनो, द्रोणकलशांत असलेल्या व यागार्ह देवतांचा याग करण्याची इच्छा करणाऱ्या सोमाकरितां शस्त्ररूपी स्तोत्रांचें गायन करा ॥ ६२ ॥

ये त्वाहिहत्ये मघवन्नवर्धन्ये शाम्बरे हरिवो ये गविष्टौ । ये त्वा नूनमनु मदन्ति विप्राꣳ पिबेन्द्र सोमꣳ सगणो मरुद्भि÷ ॥ ६३ ॥

अर्थ—हे धनवान् इंद्रा, जे मरुद्गण वृत्रहननकर्मामध्यें तुला वाढविते झाले व हे हरिनामक अश्वयुक्त इंद्रा, शंबरासुराच्या युद्धाचे वेळीं ज्यांनीं तुला वाढविलें. व ज्यांनीं असुरांनीं नेलेल्या जलांना परत आणण्याचे वेळीं तुला वाढविलें व जे मेधावी मरुद्गण निश्चयेंकरून तुला संतुष्ट करितात, त्यांच्यासह व गणांसह सोमरसाचें पान कर ॥ ६३ ॥

जनिष्ठाऽउग्रः सहसे तुराय मन्द्रऽओजिष्ठो बहुलाभिमानः । अवर्धन्निन्द्रं मरुतश्चिदत्र माता यद्वीरं दधनद्धनिष्ठा ॥ ६४ ॥

अर्थ—हे इंद्रा, वेगवान् अशा बलाकरितां तूं जन्मला आहेस. तूं उत्कृष्ट, स्तुत्य, अत्यंत तेजस्वी, पुष्कळ अभिमान धारण करणारा असा आहेस. या वृत्रवधकर्मामध्यें मरुत्देवहि तुला वाढविते झाले. तूं जन्मापासूनच मोठा आहेस. कारण अत्यंत धनयुक्त अदितीनें तुला गर्भांत धारण केलें ॥ ६४ ॥

आ तू नऽइन्द्र वृत्रहन्नस्माकमर्धमा गहि । महान्महीभिरूतिभिः ॥६५॥

अर्थ—वृत्रासुराला मारणाऱ्या हे इंद्रा, तूं शीघ्र आमच्याकडे ये व आमच्या देवयजनस्थानाला प्राप्त हो. तूं अतिशयित रक्षणांनीं मोठा आहेस ॥ ६५ ॥

त्वमिन्द्र प्रतूर्तिष्वभि विश्वाऽअसि स्पृधः । अशस्तिहा जनिता विश्वतूरसि त्वं तूर्य तरुण्यतः ॥ ६६ ॥

अर्थ—हे इंद्रा, पुष्कळ हिंसायुक्त संग्रामामध्यें तूं स्पर्धा करणाऱ्या सर्व शत्रुसेनांचा पराजय करितोस. ज्या अर्थी तूं सर्व रिपूंचा विनाशक आहेस त्या अर्थी आम्हांला मारणाऱ्या शत्रूंचा नाश कर. तूं दुष्टनाशक व स्वपक्षाची प्रशंसा उत्पन्न करणारा आहेस ॥ ६६ ॥

अनु ते शुष्मं तुरयन्तमीयतुः क्षोणी शिशुं न मातरा । विश्वास्ते स्पृधः श्रथयन्त मन्यवे वृत्रं यदिन्द्र तूर्वसि ॥ ६७ ॥

अर्थ—आईबाप लहान मुलाच्या मागून जातात त्याप्रमाणें द्यावापृथिवी शत्रूविषयीं त्वरा करणाऱ्या तुझ्या सैन्याच्या मागून जातात. सगळ्या स्पर्धमान शत्रुसेना तुझ्या रागाला भितात, कारण हे इंद्रा, तूं युद्धांत वृत्रासुराला मारितोस. ॥ ६७ ॥

यज्ञो देवानां प्रत्येति सुम्नमादित्यासो भवता मृडयन्तः । आवोऽर्वाची सुमतिर्ववृत्यादꣳ होश्चिद्वधा वरिवोक्तरासत् । आदित्येभ्यस्त्वा ॥ ६८ ॥

अर्थ—यज्ञ आदित्यदेवांना सुख देण्याकरितां येतो म्हणून हे आदित्यांनो, तुम्ही आम्हांला सुख देण्याकरितां या. तुमची अनुग्रह करणारी बुद्धि आमच्याकडे वळो. व पापी पुरुषाची ही धन प्राप्त करणारी बुद्धि आमच्याकडे वळो. हे सोमा, आदित्य देवांकरितां मी तुझ्यांत दही मिसळतों. ॥ ६८ ॥

अदब्धेभिꣳ सवितꣳ पायुभिष्ट्वꣳ शिवेभिरद्य परिपाहि नो गयम् । हिरण्यजिह्वः सुविताय नव्यसे रक्षा माकिर्नोऽअघशꣳसऽईशत ॥ ६९ ॥

अर्थ—हे सर्वप्रेरक सवित्या, तूं आमच्या गृहाचें अविनाशी व सुखकर रीतीनें पालन कर. तूं सुवर्णजिह्व म्हणजे सत्यवाक् आहेस व अत्यंत नवीन असें उत्तम सुख मिळावें म्हणून आमचें रक्षण कर. वाईटाची इच्छा करणारा कोणीही शत्रु आमच्यावर सत्ता न चालवो. ॥ ६९ ॥

प्र वीरया शुचयो दद्रिरे वामध्वर्यूभिर्मधुमन्तꣳ सुतासः । वह वायो नियुतो याह्यच्छा पिबा सुतस्यान्धसो मदाय ॥ ७० ॥

अर्थ—हे पत्नीयजमानांनो, तुमचें सोम कुटले गेलें. कारण त्याचे कुटणारे (रस काढणारे) ज्ञानी ऋत्विज आहेत. ते सोम निर्मळ अध्वर्यूनी रस काढलेले निग्राभ्य जलांनीं युक्त असे आहेत. हे सर्वत्रगामी वायो, तुझ्या नियुत्संज्ञक घोड्यांना यज्ञीय देशास आण व तेथें येऊन तृप्त होण्याकरितां कांडलेल्या सोमाच्या रसाचा आपला अंश पी. ॥ ७० ॥

गावऽउपावतावतं मही यज्ञस्य रप्सुदा । उभा कर्णा हिरण्यया ॥ ७१ ॥

अर्थ—हे गाईनो, तुम्ही या चात्वालरूपी कूपाजवळ या. कारण तुम्ही मोठ्या यज्ञाला रूप देणाऱ्या द्यावापृथिवीस्वरूपी आहांत. तुमचे दोन्ही कर्ण सोन्याचे आहेत म्हणून दानाकरितां या ॥ ७१ ॥

काव्ययोराजानेषु क्रत्वा दक्षस्य दुरोणे । रिशादसा मधस्थऽआ ॥ ७२ ॥

अर्थ—हे शत्रुपक्षनाशक मित्रावरुणांनो, यजमानाच्या एकत्र सोमपानाच्या

जागीं तुम्ही या. तो यजमान शहाण्या लोकांचें कल्याण करणाऱ्या तुमच्या सर्व सोमपानभूमीविषयीं व यज्ञग्रहाविषयीं यज्ञकर्मानें दक्ष आहे. ॥ ७२ ॥

दैव्यावध्वर्यूऽआगतꣳ रथेन सूर्यत्वचा । मध्वा यज्ञꣳ समञ्जाये । तं प्रत्नथायं वेनꣳ ॥ ७३ ॥

अर्थ—देवांचे अध्वर्यु असलेल्या अश्विनीकुमारांनो, तुम्ही सूर्यासारख्या कांतिमान् रथानें या व आल्यावर सोमादि हविर्द्रव्यें वाढवा. 'तं प्रत्नथा' हें सातव्या अध्यायांतील बाराव्या मंत्राचे प्रतीक व 'अयं वेनः' हें त्याच अध्यायांतील सोळाव्या मंत्राचें प्रतीक आहे. ॥ ७३ ॥

तिरश्चीनो विततो रश्मिरेषामधः स्विदासी३ दुपरिस्विदासी३ त् । रेतोधाऽआसन्महिमानऽआसन्त्स्वधाऽअवस्तात्प्रयतिꣳ परस्तात् ॥ ७४ ॥

अर्थ—उद्गात्यांनीं या सोमांचा रश्मि वांकडाच विस्तृत केला. त्या दशापवित्र पात्रामध्यें ओतलेला सोम खालींवर असता झाला. व त्या वेळीं ग्रहचमसादि सर्व पात्रें जगदुत्पत्तिबीजभूत सोमाचे आधार बनले. (त्या पात्रांत सोमरस ओतला गेला) व उत्तम सोमरस त्या पात्रांचा आधेय बनला. व अन्नरूपी तो सोमरस होमाच्या पूर्वी व नंतर असतां झाला व होमानंतर प्रयत्नवान् असा तो सोमरस पलीकडेही गेला. ॥ ७४ ॥

आ रोदसीऽअपृणदा स्वर्महज्जातं यदेनमपसोऽअधारयन् । सो अध्वराय परिणीयते कविरत्यो न वाजसातये चनोहितꣳ ॥ ७५ ॥

अर्थ—ज्या वेळीं अरणींतून उत्पन्न झालेल्या या वैश्वानराला यजमानांनीं यज्ञकर्माकरितां स्थापन केलें, त्या वेळीं तो द्यावापृथिवींत पूर्ण भरला. एवढेंच नव्हे तर सूर्यरूपानें अंतरिक्षांतही भरून राहिला. ज्याप्रमाणें घोडा अन्नलाभाकरितां सर्वत्र नेला जातो, त्याप्रमाणें तो अग्नियागाकरितां अतिप्रणीता अग्नीध्रीयादि सर्व स्थानांवर नेला जातो. तो अग्नि सर्वज्ञ व सर्वभोगसंपादक असा आहे. ॥ ७५ ॥

उक्थेभिर्वृत्रहन्तमा वा मन्दाता चिदा गिरा । आङ्गूषैराविवासतꣳ ॥७६॥

अर्थ—जे इंद्राग्नि लौकिकवाणींनींसुद्धां स्तुति पावलेले आगमन करितात, ते

उक्थस्तोत्ररूपी वाणीनें स्तुति करून यजमानाकडून सेविले जातात. ते आच्छादन करणाऱ्या पापांचे नाशक व स्वभावतः आनंदी आहेत. ॥ ७६ ॥

उप नः सूनवो गिरः शृण्वन्त्वमृतस्य ये। सुमृडीका भवन्तु नः ॥७७॥

अर्थ—अविनाशी प्रजापतीचे पुत्र असे जे विश्वेदेव ते समीप येऊन आमची स्तुतिरूपी वाणी ऐकोत व आम्हाला सुखकर होवोत. ॥ ७७ ॥

ब्रह्माणि मे मतयः शꣳ सुतासः शुष्मꣳइयर्ति प्रभृतो मेऽअद्रिः। आशासते प्रतिहर्यन्त्युक्थेमा हरी वहतस्ता नोऽअच्छ ॥ ७८ ॥

अर्थ—(इंद्र मरुतांना म्हणतो) हे मरुतांनो, मंत्रवाक्यात्मक स्तुति माझ्याच संबंधी आहेत. व मननात्मक स्तुति मलाच सुख देणाऱ्या आहेत. मीं पाठविलेला वज्र निश्चयेंकरून वेधस्थानांना जातो. तो वज्र शत्रुनाशक आहे. स्तुतीच केवळ माझी नसून यजमान जे उक्थादि म्हणतात (उच्चारितात) तेंही माझीच इच्छा करिते. (मला लागूं पडते.) व आमचे हे दोन घोडे मला यज्ञाभिमुख नेतात. ॥७८॥

अनुत्तमा ते मघवन्नकिर्नु न त्वावाँ२ ॥ अस्ति देवता विदानꣳ। न जायमानो नशते न जातो यानि करिण्या कृणुहि प्रवृद्ध ॥ ७९ ॥

अर्थ—हे धनवान् इंद्रा, आम्हांला असें आठवतें कीं, तुझें भाग्य कोणीही नष्ट केलें नाहीं. तुझ्याहून कोणीही दुसरा भाग्यवान् नाहीं. तसेंच तुझें सर्वज्ञत्वही कोणीं नष्ट केलें नाहीं. कारण कीं, तुझ्यासारखा विद्वान् देव नाहीं. व हे पुराणपुरुषा, वृत्र-वधादिक जीं कृत्यें तूं केलींस तीं वर्तमानकाली असलेला, पूर्वी होऊन गेलेला व पुढें होणारा कोणीही देव अगर मनुष्य करणार नाहीं; म्हणून तूं यज्ञाचा स्वामी आहेस. ॥ ७९ ॥

तदिदास भुवनेषु ज्येष्ठं यतो जज्ञाऽउग्रस्त्वेषनृम्णꣳ। सद्यो जज्ञानो निरिणाति शत्रूननु यं विश्वे मदन्त्यूमाꣳ ॥ ८० ॥

अर्थ—सृष्टीच्या वेळीं तें श्रेष्ठ ब्रह्मच केवळ होतें. त्यापासून तेज हेंच ज्याचें धन आहे असा इंद्र जन्मला. तो इंद्र जन्मतांच सर्व शत्रूंना मारतो. व सर्वरक्षक विश्वेदेव त्या इंद्राच्या मागून संतुष्ट होतात. ॥ ८० ॥

इमाऽउ त्वा पुरूवसो गिरो वर्धन्तु या मम । पावकवर्णाꣳ शुचयो विपश्चितोऽभि स्तोमैरनूषत ॥ ८१ ॥

अर्थ—हे बहुधन आदित्या, माझ्या शस्त्ररूपी वाणी तुला वाढवोत. तुझ्या स्वरूपाचें ज्ञान असलेले विद्वान् उद्गाते तुझी स्तुति करिते झाले. ते अग्नीसारखे तेजस्वी व पवित्र आहेत ॥ ८१ ॥

यस्यायं विश्वऽआर्यो दासꣳ शेवधिपाऽअरिः । तिरश्चिद्वर्ये रुशमे पवीरवि तुभ्येत्सोऽअज्यते रयिः ॥ ८२ ॥

अर्थ—हे आदित्या, सगळे वर्णाश्रमविहित कर्म करणारे धर्मनिष्ठ लोक तुझे दास आहेत. (तूं दासासारखें त्यांचें रक्षण करावेंस.) निधीचा रक्षक रूपण पुरुष तुझा शत्रु आहे. अशा धनवान् कृपण वैश्याचा भूमींत सांठविलेला असाही द्रव्यनिधि तुझ्याकरितांच आहे. (रूपणाचें धन त्याच्या उपयोगी नसून तुझ्याच उपयोगी पडतें.) तो रूपण अतिथीला वगैरे द्रव्य न देण्यानें आपलीच हिंसा करून घेतो. तसेंच तो द्रव्यरक्षणाकरितां सर्वदा शस्त्र धारण करितो ॥ ८२ ॥

अयꣳ सहस्रमृषिभिः सहस्कृतः समुद्रऽइव पप्रथे । सत्यः सोऽअस्य महिमा गृणे शवो यज्ञेषु विप्रराज्ये ॥ ८३ ॥

अर्थ—हा आदित्यरूपी इंद्र समुद्राप्रमाणें विस्तीर्ण झाला व अतींद्रियदर्शी ऋषींनीं त्याला बल दिलें. (ऋषींनीं स्तुति केली असतां देवतांचें बल वाढतें.) या आदित्याचा महिमा व बल हीं सत्य आहेत. यज्ञांत विप्रांचें राज्य असतां मी त्या महिम्याची स्तुति करितों ॥ ८३ ॥

अदब्धेभिः सवितः पायुभिष्ट्वꣳ शिवेभिरद्य परिपाहि नो गयम् । हिरण्यजिह्वः सुविताय नव्यसे रक्षा माकिर्नोऽअघशꣳसऽईशत ॥ ८४ ॥

अर्थ—हे सर्वप्रेरक सवित्या, तूं आमच्या गृहाचें अविनाशी व सुखकर रीतीनें पालन कर. तूं सुवर्णजिह्व म्हणजे सत्यवाक् आहेस. अत्यंत नवीन असें उत्तम सुख मिळावें म्हणून आमचें रक्षण कर. वाईटाची इच्छा करणारा कोणीही शत्रु आमच्यावर सत्ता न चालवो. ॥ ८४ ॥

आ नो यज्ञं दिविस्पृशं वायो वाहि सुमन्मभिः । अन्तः पवित्रऽउपरि श्रीणानोऽयꣳ शुक्रोऽअयामि ते ॥ ८५ ॥

अर्थ—हे वायो, द्युलोकव्यापी अशा आमच्या यज्ञांत उत्तम बुद्धींनीं ये. कारण कीं, तेथें पात्रांतील व दशापवित्रपात्रांत असलेला होतृचमसानें ओतलेला शुद्ध सोमरस तुझा भाग म्हणून मी संस्कारपूर्वक तयार केला आहे. ॥ ८५ ॥

इन्द्रवायू सुसंदृशा सुहवेह हवामहे । यथा नऽ सर्वऽइज्जनोऽनमीवऽ सङ्गमे सुमनाऽअसत् ॥ ८६ ॥

अर्थ—आम्ही ह्या यज्ञामध्यें उत्तम निरीक्षण करणाऱ्या इंद्रवायूंचें आवाहन करितों. माझे सगळे पुत्रपौत्रादि समुदाय व्याधिरहित धनप्राप्तीच्या वेळीं उदार व पुष्कळ लोक जमले असतां वक्ते असे होवोत ॥ ८६ ॥

ऋधगित्था स मर्त्यऽ शशमे देवतातये । यो नूनं मित्रावरुणावभिष्टय ऽआचक्रे हव्यदातये ॥ ८७ ॥

अर्थ—जो मनुष्य इष्टप्राप्तीकरितां व हविर्भाग देण्याकरितां निश्चयेंकरून मित्रावरुणांची स्तुति करितो तो अशा सेवनानें खरोखर शांत होतो. तो देवकर्म अशा यज्ञाकरितां संपत्तिमान होतो ॥ ८७ ॥

आयातमुपभूषतं मध्वः पिबतमश्विना । दुग्धं पयो वृषणा जेन्यावसू मा नो मर्धिष्टमागतम् ॥ ८८ ॥

अर्थ—हे अश्विनीकुमारांनो, तुम्ही येथें येऊन यज्ञाला भूषित करा. व मधुर अशा सोमरसाचें पान करा. हे यज्ञफल देणाऱ्या व द्रव्यांचे स्वामी अशा अश्विनीकुमारांनो, तुम्ही आकाशांतून वृष्टिरूपी दुग्ध भूमीवर पाडा. आमची हिंसा करूं नका व यज्ञांत या ॥ ८८ ॥

प्रेतु ब्रह्मणस्पतिः प्र देव्येतु सूनृता । अच्छा वीरं मर्यं पङ्क्तिराधसं देवा यज्ञं नयन्तु नः ॥ ८९ ॥

अर्थ—हिरण्यगर्भ वेदपालक प्रजापति व त्याची प्रिय सत्य स्वरूपाची वेदत्रयरूपी वाणी या यज्ञांत येवोत. व यज्ञार्ह देव यज्ञाप्रत प्राप्त होवोत. तो यज्ञ शत्रुनाशक मनुष्यांना हितकारक असा आहे. व या यज्ञांत पुरोडाशादि हविःपङ्क्ति, नाराशंसपङ्क्ति व प्रातःसवनादि तीन सवन वगैरे सवनपङ्क्तिसिद्ध केल्या जातात ॥ ८९ ॥

चन्द्रमाऽअप्स्वन्तरा सुपर्णो धावते दिवि । रयिं पिशङ्गं बहुलं पुरुस्पृहꣳ हरिरेति कनिक्रदत् ॥ ९० ॥

अर्थ—देवांना आनंद देणारा हरित वर्णाचा व पर्जन्याचा शब्द करणारा सोम कांडला गेल्यानंतर निप्राभ्यादि जलांनीं रसरूपी होऊन तो गरुडाप्रमाणें उत्तम उडून स्वर्गांत धांवत जातो. तेथें पर्जन्यरूप धारण करून भूमीवर येऊन धान्यरूपाला प्राप्त होतो. तें धान्य व्रीहि, यव वगैरे रूपानें पिवळ्या वर्णाचे व बहुसंख्याक आणि पुष्कळांना स्पृहणीय असें आहे. (धान्य आपल्याला असावें असें पुष्कळांना वाटतें) ॥ ९० ॥

देवं देवं वोऽअवसे देवं देवमभिष्टये । देवं देवꣳ हुवेम वाजसातये गृणन्तो देव्या धिया ॥ ९१ ॥

अर्थ—आम्ही देवतांच्या योग्य स्वरूपाचें अनुसंधान करणाऱ्या बुद्धीनें स्तुति करून तुम्हां सर्व देवांना संरक्षण करण्याकरितां, इष्टप्राप्तीकरितां व अन्नलाभाकरितां आवाहन करितों ॥ ९१ ॥

दिवि पृष्टोऽअरोचताग्निर्वैश्वानरो बृहन् । क्ष्मया वृधानऽओजसा चनोहितो ज्योतिषा बाधते तमः ॥ ९२ ॥

अर्थ—जो अग्नि द्युलोकामध्यें आदित्यस्वरूपानें स्थित होऊन प्रकाशित होतो, तो सर्व मनुष्यांचें हित करणारा आणि मोठा आहे व तो अग्नि आपल्या प्रकाशानें रात्रीचा अंधकार नाहींसा करितो. तो पृथ्वीवरील यजमानांनीं हविर्द्रव्य देऊन वाढविला असल्यामुळें तेजानें (उष्णतेनें) अन्नाला हितकारक म्हणजे अन्नोत्पादक आहे. (ऊन पडलें असतां वाफ येऊन पीक येतें) ॥ ९२ ॥

इन्द्राग्नीऽअपादियं पूर्वागात्पद्वतीभ्यः । हित्वी शिरो जिह्वया वावदद्चरत्रिꣳ शत्पदान्यक्रमीत् ॥ ९३ ॥

अर्थ—हे इंद्राग्नींनो, पाय नसलेली अशी ही उषा ज्यांना पाय आहेत अशा प्रजा झोंपी गेल्या असतां त्यांच्या पूर्वीच येते व त्यांची झोंप घालवून त्यांना प्रेरणा करिते व प्राण्यांच्या वागिंद्रियानें पुष्कळ शब्द करणारी पसरते. (उषःकालीं पक्षी शब्द

करितात.) अशा तऱ्हेनें संचार करणारी उषा एका अहोरात्रांत तीस मुहूर्तांचें आक्रमण करिते ॥ ९३ ॥

देवासो हि ष्मा मनवे समन्यवो विश्वे साकꣳ सरातयः । ते नोऽअय तेऽअपरं तुचेतु नो भवन्तु वरिवोविदः ॥ ९४ ॥

अर्थ—ते प्रसिद्ध विश्वेदेव वर्तमानकालीं एकचित्ताचे होऊन आम्हाला द्रव्य देणारे होवोत. व भविष्यकालामध्यें आमच्या पुत्रपौत्रांना धन देणारे होवोत. ते विश्वेदेव मंत्रदर्शी जो मनु त्याच्यासारखे दीप्तिमान् व धनदाते आहेत ॥ ९४ ॥

अपाधमदभिशस्तीरशस्तिहाथेन्द्रो युम्नाभवत् । देवास्तऽइन्द्र सख्याय येमिरे बृहद्भानो मरुद्गण ॥ ९५ ॥

अर्थ—हे महादीप्ते, हे मरुद्गणा, हे इंद्रा, वसुरुद्रादित्य देव इंद्र आमचा मित्र कसा होईल, या अभिप्रायानें आत्म्याचें नियमन करितात; म्हणजे याकरितां तपश्चर्या करितात. हे इंद्रा, अशा रीतीचा तूं शत्रूकडून आलेल्या अपराधांना निवृत्त करितोस. नंतर तूं अन्नवान्, कीर्तिमान् व सर्वधनवान् होतोस. तूं निंद्य असुरांचा नाशक असून ऐश्वर्यवान् आहेस ॥ ९५ ॥

प्र वऽइन्द्राय बृहते मरुतो ब्रह्मार्चात वृत्रꣳ हनति वृत्रहा शतक्रतुर्वज्रेण शतपर्वणा ॥ ९६ ॥

अर्थ—हे मरुतांनो, तुम्ही आपला स्वामी जो मोठा इंद्र त्याकरितां सोमरूपी स्तोत्राचें गायन करा. तो पापनाशक व शतयज्ञ करणारा इंद्र शंभर धारांच्या वज्रानें वृत्रासुराला मारो ॥ ९६ ॥

अस्येदिन्द्रो वावृधे वृष्णयꣳ शवो मदे सुतस्य विष्णवि । अघा तमस्य महिमानमायवोऽनुष्टुवन्ति पूर्वथा । इमाऽउ त्वा यस्यायमयꣳ सहस्र-मूर्ध्वऽऊ षुणः ॥ ९७ ॥

अर्थ—इंद्र सर्व शरीरव्यापी अशा सोमरसाचा मद चढल्यावर याच यजमानाचें वीर्य व बल वाढवो. पूर्वी ऋषींनीं स्तुति केली त्याप्रमाणें आजही मनुष्य या इंद्राच्या,

यजमानाच्या वीर्य व बल वाढविणाऱ्या पराक्रमाची स्तुति करोत. १ 'इमा उत्वा' २ 'यस्यायम्' ३ 'अयं सहस्रं' हीं तीन प्रतीकें क्रमेंकरून तेहतिसाव्या अध्यायाच्या एक्यांयशी, ब्यांयशी व त्र्यांयशी या मंत्रांचीं आहेत. व 'ऊर्ध्वऊ षुणः' हें अकराव्या अध्यायाच्या बेचाळिसाव्या मंत्राचें प्रतीक आहे ॥ ९७ ॥

इति श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते

वाजसनेयमाध्यन्दिनीयसंहितानुवादे वेदप्रकाशाख्ये त्रयस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३३ ॥

इति त्रयस्त्रिंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ चतुस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३४ ॥



यज्जाग्रतो दूरमुदैति दैवं तदु सुप्तस्य तथैवैति। दूरंगमं ज्योतिषां ज्योतिरेकं तन्मे मनः÷ शिवसंकल्पमस्तु ॥ १ ॥

अर्थ—या अध्यायाचा विनियोग सांगितलेला नाहीं. जें मन पुरुष जागा असतां चक्षुरादि इंद्रियांपेक्षां दूर जातें, तसेंच जें परमात्म्याचा साक्षात्कार करून देणारें आहे व पुरुष निजला असतां जसें गेलें तसेंच परत येतें व जें दूर देशीं जाऊन तेथील पदार्थांचें ग्रहण करतें व जें विषयप्रकाशक अशा श्रोत्रादि इंद्रियांचें प्रवर्तक आहे अशा त्या माझ्या मनांत धर्मविषयक संकल्प असो म्हणजे सर्वदा माझ्या मनांत धर्मच राहो, पाप न राहो ॥ १ ॥

येन कर्माण्यपसो मनीषिणो यज्ञे कृण्वन्ति विदथेषु धीराः÷। यदपूर्वं यक्षमन्तः प्रजानां तन्मे मनः÷ शिवसंकल्पमस्तु ॥ २ ॥

अर्थ—यज्ञसंबंधी हवि वगैरे पदार्थांचें ज्ञान झाल्यावर कर्मठ, बुद्धिमान् व धारणाशक्ति असलेले पंडित ज्या मनाच्या साहाय्यानें यज्ञांतील कर्में करितात, जें सर्वेंद्रियांचे पूर्वी उत्पन्न झालें आहे, जें यज्ञ करण्यास समर्थ आहे व जें प्राणिमात्राच्या शरीरांत राहतें त्या माझ्या मनांत सर्वदा धर्मच राहो ॥ २ ॥

यत्प्रज्ञानमुत चेतो धृतिश्च यज्ज्योतिरन्तरमृतं प्रजासु। यस्मान्नऋते किंचन कर्म क्रियते तन्मे मनः÷। शिवसंकल्पमस्तु ॥ ३ ॥

अर्थ—जें मन सामान्य व विशेष अशा ज्ञानाचें जनक आहे व जें धैर्याचें कारण आहे तसेंच जें सर्वान्तर्यामी राहून सर्वेन्द्रियांना प्रकाशित करतें व जें अमृतस्वरूपी (अमरणधर्मी) आहे. तसेंच ज्याच्या साहाय्यावांचून लोकांना कोणतेंही कार्य करितां येत नाहीं त्या माझ्या मनांत सर्वदा धर्मच राहो ॥ ३ ॥

येनेदं भूतं भुवनं भविष्यत्परिगृहीतममृतेन सर्वम्। येन यज्ञस्तायते सप्तहोता तन्मे मनः÷ शिवसंकल्पमस्तु ॥ ४ ॥

अर्थ—शाश्वत अशा ज्या मनाच्या योगानें भूतकालांतील व वर्तमानकालांतील

वस्तूंचें ज्ञान होतें, ज्यांत होतृ, मैत्रावरुणादि सात होते आहेत अशा अग्निष्टोम यज्ञाचें अनुष्ठान ज्या मनाच्या साह्यानें होतें त्या माझे मनांत सर्वदा धर्मच राहो ॥४॥

यस्मिन्नृचः साम यजूꣳषि यस्मिन्प्रतिष्ठिता रथनाभाविवाराः ।
यस्मिꣳश्चित्तꣳ सर्वमोतं प्रजानां तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु ॥ ५ ॥

अर्थ—ज्याप्रमाणें चाकाचे अरे चाकाच्या तुंब्यांत स्थिर होतात त्याप्रमाणें ज्या मनाच्या स्फूर्तीनें ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद अध्ययनद्वारां प्रतिष्ठित होतात तसेंच वस्त्रांतील तन्तुसमुदायाप्रमाणें ज्या मनांत सर्व पदार्थविषयक ज्ञान ओतप्रोत भरलें आहे, त्या माझ्या मनांत सर्वदा धर्मच राहो ॥ ५ ॥

सुषारथिरश्वानिव यन्मनुष्यान्नेनीयतेऽभीशुभिर्वाजिनऽइव । हृत्प्रतिष्ठं यदजिरं जविष्ठं तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु ॥ ६ ॥

अर्थ—ज्याप्रमाणें चांगला सारथि घोडयांना सर्व बाजूंनीं पुनः पुनः नेतो तसेंच चांगला सारथि घोड्यांना लगामांनीं जसा नियमित करतो; या दोन दृष्टांतांप्रमाणें मन प्राण्यांना विविध विषयांत नेतें व तेथें त्याचें नियमन करतें. जें मन हृदयांत राहतें व बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य या सर्व अवस्थांमध्यें जें न थकतां राहतें व जें अत्यंत वेगयुक्त आहे त्या माझ्या मनामध्यें सर्वदा धर्मच राहो ॥ ६ ॥

पितुं न स्तोषं महो धर्माणं तविषीम् । यस्य त्रितो व्योजसा वृत्रं विपर्वमर्दयत् ॥ ७ ॥

अर्थ—जें अन्न मोठें बल धारण करतें व ज्याच्या सामर्थ्यानें इंद्रानें सर्व संधिबंधनें मोडून वृत्रासुराचा नाश केला त्या अन्नाची मी स्तुति करतों ॥ ७ ॥

अन्विदनुमते त्वं मन्यासै शं च नस्कृधि । क्रत्वे दक्षाय नो हिनु प्रणऽआयूꣳषि तारिषः ॥ ८ ॥ शतं १८००

अर्थ—हे अनुमते, तूं माझें ऐक; आमचें कल्याणच कर. आमच्या संकल्पाची सिद्धि कर व त्याची समृद्धि कर; व आमचें आयुष्य वाढव ॥ ८ ॥

अनु नोऽद्यानुमतिर्यज्ञं देवेषु मन्यताम् । अग्निश्च हव्यवाहनो भवतं दाशुषे मयः ॥ ९ ॥

अर्थ--अनुमति आम्ही यज्ञीय देवांचा जो यज्ञ करितों त्यास जाणो; व हविर्द्रव्यें घेणारा अग्निही तो यज्ञ जाणो. व हे दोघे हविर्भाग देणाऱ्या यजमानाला सुखकारक होवोत ॥ ९ ॥

सिनीवालि पृथुष्टुके या देवानामसि स्वसा । जुषस्व हव्यमाहुतं प्रजां देवि दिदिड्ढि नः ॥ १० ॥

अर्थ—हे सिनीवालि, हे विस्तृत केशभार धारण करणाऱ्या देवी, तूं देवांची बहीण आहेस; ती तूं आमच्या हविर्द्रव्याचें ग्रहण कर व हे देवी, आम्हांला संतति दे ॥ १० ॥

पञ्च नद्युः सरस्वतीमपियन्ति सस्रोतसः । सरस्वती तु पञ्चधा सो देशेऽभवत्सरित् ॥ ११ ॥

अर्थ—सारख्या वाहणाऱ्या दृषद्वती वगैरे पांच नद्या सरस्वतीला जाऊन मिळतात. ती सरस्वतीच पुढें त्या देशांत प्रसिद्ध झाली म्हणजे पांचही नद्यांचीं नांवें जाऊन केवळ सरस्वती हेंच नांव शिल्लक राहिलें ॥ ११ ॥

त्वमग्ने प्रथमोऽअङ्गिराऽऋषिर्देवो देवानामभवः शिवः सखा । तव व्रते कवयो विद्मनापसोऽजायन्त मरुतो भ्राजदृष्टयः ॥ १२ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं देवांचा पहिला मित्र आहेस. तूं यजमानांना सुख देणारा द्रष्टा, प्रकाशमान व कल्याणकारक असा आहेस. तुझें यज्ञकर्म चालू असतां मरुद्गण कर्मज्ञानवान् व ज्यांचीं आयुधें शोभणारीं आहेत असे असतात ॥ १२ ॥

त्वं नोऽअग्ने तव देव पायुभिर्मघोनो रक्ष तन्वश्च वन्द्य । त्राता तोकस्य तनये गवामस्यनिमेषꣳ रक्षमाणस्तव व्रते ॥ १३ ॥

अर्थ—हे प्रकाशमान व स्तुत्य अग्ने, तूं आपल्या संरक्षणसाधनांनीं धनवान् अशा यजमानांचें व आमच्या शरीरांचें रक्षण कर. कारण तुझें सावधान रीतीनें पालन केलें असतां तूं नातूंचा व गाईंचा रक्षण करणारा होतोस ॥ १३ ॥

उत्तानायामवभरा चिकित्वान्त्सयꣳ प्रवीता वृषणं जजान । अरुषस्तूपो रुशदस्य पाजऽइडायास्पुत्रो वयुनेऽजनिष्ट ॥ १४ ॥

अर्थ—ज्ञान संपादन करावयाच्या वेळीं जो पृथ्वीचा मुलगा अग्नि जन्माला आला तो हिंसा न करणाऱ्या ज्वालांनीं युक्त आहे. या अग्नीचें प्रकाशक बल अरणीचें सामर्थ्य जाणणारा होऊन उताण्या अरणीमध्यें भर. ती अरणी इच्छा केली असतां कामना पूर्ण करणाऱ्या अग्नीला शीघ्र उत्पन्न करिते ॥ १४ ॥

इडायास्त्वा पदे वयं नाभा पृथिव्याऽअधि । जातवेदो निधीमह्यग्ने हव्याय वोढवे ॥ १५ ॥

अर्थ—हे प्राज्ञ अग्ने, पृथ्वीच्या देवयजनस्थानावर उत्तरवेदीच्या मध्यें हविर्द्रव्यें घेण्याकरितां आम्ही तुझी स्थापना करितों ॥ १५ ॥

प्रमन्महे शवसानाय शूषमाङ्गूषं गिर्वणसेऽअङ्गिरस्वत् । सुवृक्तिभिः स्तुवतऽऋग्मियायार्चामार्के नरे विभुताय ॥ १६ ॥

अर्थ—आम्हीं आंगिरस ऋषीप्रमाणें इंद्राकरितां त्रिवृदादिक बलहेतुभूत स्तोम समजून घेतों व मंत्राचा उच्चार करतों. तो इंद्र बलाची इच्छा करणारा, स्तुति केली असतां स्तोत्यांची इच्छा पूर्ण करणारा, उत्तम स्तुतींनीं यजमानांची स्तुति करणारा वेदमय मनुष्यरूपी व शौर्यादिकांनीं प्रसिद्ध असा आहे ॥ १६ ॥

प्रवो महे महि नमो भरध्वमाङ्गूष्यꣳ शवसानाय साम । येना नः पूर्वे पितरः पदज्ञाऽअर्चन्तोऽअङ्गिरसो गाऽअविन्दन् ॥ १७ ॥

अर्थ—तुम्ही बलाची इच्छा करणाऱ्या मोठ्या इंद्राला पुष्कळ अन्न द्या. हे मुलांनो, त्रिवृदादि सामाचा उच्चार करा. आमचे पूर्वज आंगिरसगोत्रोत्पन्न पितर ज्या अन्नानें अर्चन करून व ज्या सामानें स्तुति करून सूर्यकिरणांना प्राप्त झाले ते साम तुम्ही उच्चारा. आमचे आंगिरसगोत्रोत्पन्न पूर्वज आत्मस्वरूप जाणणारे होते ॥ १७ ॥

इच्छन्ति त्वा सोम्यासः सखायः सुन्वन्ति सोमं दधति प्रयाꣳसि । तितिक्षन्तेऽअभिशस्तिं जनानामिन्द्र त्वदा कश्चन हि प्रकेतः ॥ १८ ॥

अर्थ—हे इंद्रा, तुझ्यापासून विशिष्ट प्रकारचें ज्ञान सर्वप्रकारेंकरून प्राप्त होतें, म्हणून सोम संपादन करणारे ब्राह्मण तुझी इच्छा करितात. म्हणूनच ते सोमाचा रस काढतात व हविर्द्रव्यें धारण करितात व लोकांची निंदा सहन करितात ॥ १८ ॥

न ते दूरे परमा चिद्रजाꣳस्या तु प्रयाहि हरिवो हरिभ्याम् । स्थिराय वृष्णे सवना कृतेमा युक्ता ग्रावाणꣳ समिधानेऽअग्नौ ॥ १९ ॥

अर्थ—हे अश्वयुक्त इंद्रा, अग्नि प्रदीप्त झाला असतां दृढ मैत्री धारण करणाऱ्या व कामवृष्टि करणाऱ्या अशा तुझ्या निमित्तानें प्रातःसवनादि कर्में केलीं गेलीं. व सोमकंडणाचे दगड योजले गेले म्हणून तूं दोन घोड्यांच्या रथावर बसून ये. तुला दूर असें कांहींच नाहीं ॥ १९ ॥

अषाढं युत्सु पृतनासु पप्रिꣳ स्वर्षामप्सां वृजनस्य गोपाम् । भरेषुजाꣳ सुक्षितिꣳ सुश्रवसं जयन्तं त्वामनुमदेम सोम ॥ २० ॥

अर्थ—हे सोमा, तुझा उत्कर्ष झाला असतां आम्ही संतुष्ट होतों. तूं युद्धांत पराजित न होणारा, सेनांचें पालन करणारा, स्वर्ग देणारा, जलप्रद बलांचा रक्षक व संग्रामामध्यें जिंकणारा, उत्तम तऱ्हेनें राहणारा व उत्तम कीर्तीचा असा आहेस ॥२०॥

सोमो धेनुꣳ सोमोऽअर्वन्तमाशुꣳ सोमो वीरं कर्मण्यं ददाति । सादन्यं विदथ्यꣳ सभेयं पितृश्रवणं यो ददाशदस्मै ॥ २१ ॥

अर्थ—जो यजमान सोमाला हविर्द्रव्य देतो त्याला सोम, धेनु, शीघ्रगामी अश्व, घरांत, यज्ञांत व सभेंत उत्तम प्रकारे वागणारा आणि बापाची आज्ञा ऐकणारा असा मुलगा देतो ॥ २१ ॥

त्वमिमाऽओषधीꣳ सोम विश्वास्त्वमपोऽअजनयस्त्वं गाꣳ । त्वमाततन्थोर्वन्तरिक्षं त्वं ज्योतिषा वितमो ववर्थ ॥ २२ ॥

अर्थ—हे सोमा, तूं या सर्व औषधी, जलें व गाई यांस उत्पन्न करिता झालास व तूंच विस्तीर्ण असें अंतरिक्ष पसरलेंस. तसेंच तूं आदित्यप्रकाशानें अंधकार दूर करितोस ॥ २२ ॥

देवेन नो मनसा देव सोम रायो भागꣳ सहसावन्नभि युध्य । मा त्वातनदीशिषे वीर्यस्योभयेभ्यꣳ प्रचिकित्सा गविष्टौ ॥ २३ ॥

अर्थ—हे बलवान् सोमदेवा, देवसंबंधी मन व द्रव्याचा अंश आम्हाला दे. अशा तऱ्हेनें तूं आम्हाला देत असतां तुला कोणीही प्रतिबंध न करो. कारण तूं

सामर्थ्याचा स्वामी आहेस व स्वर्गाची इच्छा झाली असतां तूं माझ्या उभयलोक-प्राप्तींची चिकित्सा कर. (उभयलोकप्राप्तींत येणारा प्रतिबंध दूर कर) ॥ २३ ॥

अष्टौ व्यख्यत्ककुभः पृथिव्यास्त्रीधन्व योजना सप्त सिन्धून् । हिरण्याक्षः सविता देवऽआगाद्दधद्रत्ना दाशुषे वार्याणि ॥ २४ ॥

अर्थ—तो सविता देव यजमानाला स्पृहणीय रत्नें देणारा असा होत्साता या यज्ञास येवो. तो अमृतदृष्टि आहे व त्यानें पृथ्वीच्या आठही दिशा, तीन लोक, योजनादि मार्गपरिमाणें व सप्तसमुद्र यांस प्रकाशित केलें. ॥ २४ ॥

हिरण्यपाणिः सविता विचर्षणिरुभे द्यावापृथिवीऽअन्तरीयते । अपामीवां बाधते वेति सूर्यमभि कृष्णेन रजसा द्यामृणोति ॥ २५ ॥

अर्थ—ज्यावेळीं प्रेरक असा सूर्य द्यावापृथिवींच्या मध्यें येतो (उदय पावतो) त्यावेळीं तो अंधकाररूपी रोगाचा नाश करतो व ज्यावेळीं तो अस्तास जातो त्यावेळीं अंधकारानें द्युलोकाला व्याप्त करतो तो सुवर्णपाणि व द्यावापृथिवी या दोन लोकांतील प्राण्यांचें शुभ व अशुभ कर्मे पहाणारा आहे ॥ २५ ॥

हिरण्यहस्तोऽअसुरः सुनीथः सुमृडीकः स्ववां यात्वर्वाङ् । अपसेधन्रक्षसो यातुधानानस्थाद्देवः प्रतिदोषं गृणानः ॥ २६ ॥

अर्थ—जो सूर्यदेव राक्षसांना व दुःखकर अशा दैत्यांचा नाश करून उदयास आला, तो सूर्य आमच्या सन्मुख येवो. तो सुवर्णहस्ताचा, प्राणप्रद, उत्तम स्तुतियुक्त सुख देणारा व प्रत्येक माणसाचे दोष सांगणारा असा आहे ॥ २६ ॥

ये ते पन्थाः सवितः पूर्व्यासोऽरेणवः सुकृताऽअन्तरिक्षे । तेभिर्नोऽअद्य पथिभिः सुगेभी रक्षा च नोऽधि च ब्रूहि देव ॥ २७ ॥

अर्थ—हे सवितृ देवा, ब्रह्मदेवानें अंतरिक्षांत पूर्वीच तुझे मार्ग धुळीनें रहित करून ठेविले आहेत त्या मार्गांनीं आज आम्हांला ने. व हे माझे आहेत असें आमच्याविषयीं सांग. ते मार्ग जाण्यास सुलभ व अन्न आणि जलांनीं युक्त आहेत ॥ २७ ॥

उभा पिबतमश्विनोभा नः शर्म यच्छतम् । अविद्रियाभिरूतिभिः ॥२८॥

अर्थ—हे अश्विनीकुमारांनो, तुम्ही दोघेही सोमपान करा. व अखंडित अशा संरक्षणसाधनांनीं आमचें कल्याण करा ॥ २८ ॥

अग्नेस्वतीमश्विना वाचमस्मे कृतं नो दस्रा वृषणा मनीषाम् । अद्यूत्येऽवसे निह्वये वां वृधे च नो भवतं वाजसातौ ॥ २९ ॥

अर्थ—दर्शनीय, इच्छा पूर्ण करणारे अशा अश्विनीकुमारांनो, तुम्ही आमच्या वाणीला व मनाच्या इच्छेला कर्मयुक्त करा (आम्ही वाणीनें व मनानें यज्ञकर्म करूं अशी आम्हाला प्रेरणा करा) म्हणून आम्ही सन्मार्गानें प्राप्त होणाऱ्या अन्नाच्या लाभाकरितां तुम्हांला बोलावितों. तसेंच अन्न देणाऱ्या यज्ञाकरितां आमची वृद्धि करा ॥ २९ ॥

द्युभिरक्तुभिः परिपातमस्मानरिष्टेभिरश्विना सौभगेभिः । तन्नो मित्रो वरुणो मामहन्तामदितिः सिन्धुः पृथिवी उत द्यौः ॥ ३० ॥

अर्थ—हे अश्विनीकुमारांनो, तुम्ही रात्रंदिवस चांगलें ऐश्वर्य व अखंडित द्रव्यें देऊन आमचें रक्षण करा. व मित्र, वरुण, अदिति, समुद्र आणि द्युलोक हे आमच्या रक्षणाचा आदर करोत. (चांगलें रक्षण झालें असें म्हणोत) ॥ ३० ॥

आ कृष्णेन रजसा वर्तमानो निवेशयन्नमृतं मर्त्यं च । हिरण्ययेन सविता रथेनादेवो याति भुवनानि पश्यन् ॥ ३१ ॥

अर्थ—रात्रिरूपी काळ्या रजाला (धुळीला) पुनर्भ्रमण करवून म्हणजे रात्री घालवून देव व मनुष्यांना आपापलीं कामें करावयास लावून आणि चांगलीं कर्मे कोण करितो व वाईट कर्मे कोण करितो अशा रीतीनें जगाचें निरीक्षण करीत सूर्य सोन्याचे रथांत बसून येतो ॥ ३१ ॥

आ रात्रि पार्थिवꣳ रजः पितुरप्रायि धामभिः । दिवः सदाꣳसि बृहती वितिष्ठस आ त्वेषं वर्तते तमः ॥ ३२ ॥

अर्थ—हे रात्री, ज्या तुझ्या योगानें पृथ्वीलोक, अंतरिक्ष लोकासह व्याप्त केला जातो व मोठी अशी जी तूं द्युलोकांतील स्थानांना व्याप्त करितेस, त्या तुझा प्रखर अंधकार सुरू झाला आहे ॥ ३२ ॥

उषस्तच्चित्रमाभरास्मभ्यं वाजिनीवति । येन तोकं च तनयं च धामहे ॥ ३३ ॥

अर्थ—हे अन्नवति उषे, तें प्रसिद्ध असें आश्चर्यकारक व पूज्य असें द्रव्य आम्हांला दे. ज्या द्रव्यानें आम्ही पुत्र, पौत्र, व सर्व संततीची वृद्धि करूं ॥ ३३ ॥

प्रातरग्निं प्रातरिन्द्रꣳ हवामहे प्रातर्मित्रावरुणा प्रातरश्विना । प्रातर्भगं पूषणं ब्रह्मणस्पतिं प्रातꣳ सोममुत रुद्रꣳ हुवेम ॥ ३४ ॥

अर्थ—आम्ही रोज सकाळीं अग्नि, इंद्र, मित्रावरुण, अश्विनीकुमार, भग, पूषा, ब्रह्मणस्पति, सोम व रुद्र यांचें आवाहन करितों ॥ ३४ ॥

प्रातर्जितं भगमुग्रꣳ हुवेम वयं पुत्रमदितेर्यो विधर्ता । आध्रश्चिद्यं मन्यमानस्तुरश्चिद्राजा चिद्यं भगं भक्षीत्याह ॥ ३५ ॥

अर्थ—आम्ही आदित्याचें आव्हान करितों. तो सकाळीं जय पावणारा, उत्कृष्ट अदितीचा मुलगा, जगाचा धारण करणारा असा आहे व दरिद्रीदेखील आपला स्वार्थ सिद्ध होईल या बुद्धीनें त्याच्या उदयाची अपेक्षा करितो. तसेंच रोगीही त्याच्या उदयाची अपेक्षा करितो. विशेष काय सांगावें, राजादेखील त्याच्या उदयाची अपेक्षा करितो ॥ ३५ ॥

भग प्रणेतर्भग सत्यराधो भगेमां धियमुदवा ददन्नः । भग प्र नो जनय गोभिरश्वैर्भग प्र नृभिर्नृवन्तः स्याम ॥ ३६ ॥

अर्थ—पुष्कळ व अविनाशी द्रव्य देणाऱ्या हे सूर्या, तूं आम्हांला द्रव्य देऊन कर्मविषयक सूक्ष्म बुद्धि दे. तसेंच आम्हांला पुष्कळ गाई व अश्व दे. आम्ही पुत्र-पौत्रांनीं बहुपुरुषयुक्त होऊं ॥ ३६ ॥

उतेदानीं भगवन्तꣳ स्यामोत प्रपित्वऽउत मध्येऽअह्नाम् । उतोदिता मघवन्त्सूर्यस्य वयं देवानाꣳ सुमतौ स्याम ॥ ३७ ॥

अर्थ—हे धनवान् रवे, आम्ही ज्ञानी होऊं व आम्ही सूर्याच्या अस्ताचे वेळीं, मध्यान्हाचे वेळीं व सूर्योदयसमयीं धनवान् होऊं. देवांची आमच्या विषयीं सद्बुद्धि असो ॥ ३७ ॥

भगऽएव भगवाँ२॥ अस्तु देवास्तेन वयं भगवन्तऽ स्याम। तं त्वा भग सर्वऽइज्जोहवीति स नो भग पुरऽएता भवेह ॥ ३८ ॥

अर्थ—हे देवांनो, आदित्यच धनवान् असो (इतर धनवान् होऊन काय उपयोग?) त्या सूर्यानें दिलेल्या द्रव्यानें आम्ही द्रव्ययुक्त होऊं. हे आदित्या, सर्वच लोक इष्टसिद्धीकरितां तुझें आवाहन करितात. हे आदित्या, तूं आमच्या या यज्ञकर्मामध्यें अग्रगामी हो ॥ ३८ ॥

समध्वरायोषसोऽनमन्त दधिक्रावेव शुचये पदाय। अर्वाचीनं वसुविदं भगं नो रथमिवाश्वा वाजिनऽआवहन्तु ॥ ३९ ॥

अर्थ—ज्याप्रमाणें घोडा रथाला जोडून घेण्याकरितां तसेंच अग्न्याधानाच्या निमित्तानें शुचिपदाकरितां नम्र होतो (घोड्याच्या ठराविक पावलाचे जागीं अग्निहोत्राचा अग्नि स्थापन करितात) त्याप्रमाणें प्रातःकालाचे अधिष्ठातृ देव द्रव्य देणाऱ्या आदित्याला आमच्या सन्मुख आणोत ॥ ३९ ॥

अश्वावतीर्गोमतीर्नऽउषासो वीरवतीऽ सदमुच्छन्तु भद्राऽ। घृतं दुहाना विश्वतऽ प्रपीता यूयं पात स्वस्तिभिऽ सदा नऽ ॥ ४० ॥

अर्थ—अश्व, गाई व पुत्र यांनीं युक्त, कल्याणकारक व दंवाचे पाण्याची वृष्टि करणाऱ्या, सर्व बाजूंनीं वृद्धिंगत झालेल्या अशा उषारूपी देवता सर्वदा आमचें अज्ञान दूर करोत. हे उषा देवतांनो, तुम्ही आमचें कल्याणकारक वस्तूंनीं रक्षण करा ॥ ४० ॥

पूषन् तव व्रते वयं न रिष्येम कदाचन। स्तोतारस्तऽइहऽस्मसि ॥४१॥

अर्थ—हे पूषन्, तुझ्या यज्ञकर्मामध्यें राहणाऱ्या आमचा केव्हांही नाश न होवो. या यज्ञकर्मात आम्ही तुझे स्तुतिकर्ते होऊं ॥ ४१ ॥

पथस्पथऽ परिपतिं वचस्या कामेन कृतोऽअभ्यानडर्कम्। स नो रासच्छुरुधश्चन्द्राग्रा धियं धियऽ सीषधाति प्र पूषा ॥ ४२ ॥

अर्थ—इष्ट अशा वेदवाणीनें सन्मुख केला गेलेला पूषा अर्काला व्याप्त करितो. तो अर्क सर्व मार्गांचा स्वामी आहे. तो पूषा आम्हाला आल्हादकारक सुखांची व शोकाचा नाश करणारीं साधनें देवो. तसेंच तो आमचीं सर्व कर्मे सिद्ध करो ॥ ४२ ॥

त्रीणि पदा विचक्रमे विष्णुर्गोपाऽअदाभ्यः । अतो धर्माणि धारयन् ॥ ४३ ॥

अर्थ—जगाचा रक्षक व हिंसा करण्यास अयोग्य असा तो यज्ञ अग्नि, वायु व आदित्यरूपी तीन स्थानांना व्याप्त करिता झाला व या तीन स्थानांवरूनच तो पुण्यकर्मे करितो ॥ ४३ ॥

तद्विप्रासो विपन्यवो जागृवाꣳसः समिन्धते । विष्णोर्यत्परमं पदम् ॥ ४४ ॥

अर्थ—संसाराविषयीं निष्काम व प्रमादरहित असे ब्राह्मण त्या यज्ञाच्या ब्रह्मरूपी परमपदाची उपासना करितात. ॥ ४४ ॥

घृतवती भुवनानामभिश्रियोर्वी पृथ्वी मधुदुघे सुपेशसा । द्यावापृथिवी वरुणस्य धर्मणा विष्कभितेऽअजरे भूरिरेतसा ॥ ४५ ॥

अर्थ—द्यावापृथिवी सूर्यानें आपल्या सामर्थ्यानें दृढ धरून ठेविल्या आहेत. त्या जलयुक्त आहेत व सर्व प्राण्यांना आश्रयभूत, विस्तीर्ण व अतिशय लांबरुंद मधुरूपी जल देणाऱ्या चांगल्या स्वरूपाच्या जरारहित व पुष्कळ वीर्यवान अशा आहेत ॥ ४५ ॥

ये नः सपत्नाऽअप ते भवन्त्विन्द्राग्निभ्यामवबाधामहे तान् । वसवो रुद्राऽआदित्याऽउपरिस्पृशं मोग्रं चेत्तारमधिराजमक्रन् ॥ ४६ ॥

अर्थ—आमचे शत्रु पराभूत व्हावेत म्हणून आम्ही इंद्राग्नींच्या सामर्थ्यानें त्यांचा नाश करतों. अष्ट वसु, एकादश रुद्र व द्वादश आदित्य हे मला उच्चस्थानस्थित, उत्कृष्ट, ज्ञेयवस्तूंचा जाणणारा व सर्वस्वामी असा करोत ॥ ४६ ॥

आ नासत्या त्रिभिरेकादशैरिह देवेभिर्यातं मधुपेयमश्विना । प्रायुस्तारिष्टं नी रपाꣳसि मृक्षतꣳ सेधतं द्वेषो भवतꣳ सचाभुवा ॥ ४७ ॥

अर्थ—हे अश्विनीकुमारांनो, तुम्ही तेहतीस देवांसह ह्या सोम पिण्याच्या जागीं या व आमचें आयुष्य वाढवून आमचीं सर्व पापें व दौर्भाग्य नष्ट करा; व आमच्या यज्ञकार्यात संयुक्त व्हा ॥ ४७ ॥

एष वः स्तोमो मरुतऽइयं गीर्मीन्द्रार्यस्य मान्यस्य कारोः। एषामा-सीष्ट तन्वे वयां वियामेषं वृजनं जीरदानुम् ॥ ४८ ॥

अर्थ—हे मरुद्गणांनो, वैराग्यसंपन्न व माननीय अशा या यजमानाचा हा स्तोम व सत्य आणि प्रिय अशी स्तुतिरूपी वाणी, तुमच्याकरितां चालू झाली आहे. हे मरुद्गणांनो, तुम्ही अन्नाच्या निमितानें व आमचें शरीर बाल्य, तारुण्य व वार्धक्य या तीनही अवस्थांत दृढ करण्याकरितां या. तसेंच आम्ही तुमच्या प्रसादानें जीवन-प्रद असें अन्न व बल प्राप्त करूं ॥ ४८ ॥

सहस्तोमाः सहच्छन्दसऽआवृतः सहप्रमाऽऋषयः सप्त दैव्याः। पूर्वेषां पन्थामनुदृश्य धीराऽअन्वालेभिरे रथ्यो न रश्मीन् ॥ ४९ ॥

अर्थ—प्रजापतिरूपी प्राणाचे अभिमानी असे भारद्वाजादि सप्त ऋषि पूर्व कल्पोत्पन्न ऋषींच्या मार्गाचें अनुसरण करून सारथी रथाच्या घोड्यांच्या दोऱ्या करतो, त्याप्रमाणें सृष्टिरूपी यज्ञ करते झाले (सप्तऋषींनीं सृष्टि निर्माण केली) ते ऋषि स्तोम व गायत्र्यादि छन्दसहित कर्में करणारे, शब्दप्रमाणाची परीक्षा करणारे व बुद्धिमान् आहेत ॥ ४९ ॥

आयुष्यं वर्चस्यꣳ रायस्पोषमोद्भिदम्। इदꣳ हिरण्यं वर्चस्व ऐत्वाया-विंशतादु मामु ॥ ५० ॥

अर्थ—(हिरण्याची स्तुति) आयुष्यप्रद, तेजाला हितकर, धनाची वृद्धि करणारें, स्वर्ग देणारें व अन्नयुक्त असें सुवर्ण जयप्राप्तीकरितां मला प्राप्त होवो ॥ ५० ॥

न तद्रक्षाꣳसि न पिशाचास्तरन्ति देवानामोजः प्रथमजꣳ ह्येतत्। यो बिभर्ति दाक्षायणꣳ हिरण्यꣳ स देवेषु कृणुते दीर्घमायुꣳ स मनुष्येषु कृणुते दीर्घमायुः ॥ ५१ ॥

अर्थ—राक्षस व पिशाच सुवर्णावर प्रभाव पाडूं शकत नाहींत (ते सुवर्णाचा नाश करूं शकत नाहींत) तें देवांचें प्रथम उत्पन्न झालेलें तेज असल्यामुळें जो पुरुष त्याचे (सुवर्णाचे) दागिने घालतो तो देवलोकांत पुष्कळ दिवस राहतो व मनुष्य-लोकांतही सर्वांपेक्षां अधिक वांचतो ॥ ५१ ॥

यदाबध्नन्दाक्षायणा हिरण्यꣳ शतानीकाय सुमनस्यमानाः। तन्मऽ आबध्नामि शतशारदायायुष्मान्जरदष्टिर्यथासम् ॥ ५२ ॥

अर्थ—हौसी अशा दक्षवंशोत्पन्न ब्राह्मणांनीं जें सुवर्ण बहुसैन्ययुक्त अशा शतानीकनामक राजाच्या शरीरावर बांधलें तें सुवर्ण मी शंभर वर्षे वांचण्याकरितां माझ्या शरीरावर बांधतों. त्यायोगें मी जरा (म्हातारपणा) येईपर्यंत पुष्कळ वर्षे वांचेन ॥ ५२ ॥

उत नोऽहिर्बुध्न्यः शृणोत्वजऽएकपात्पृथिवी समुद्रः। विश्वेदेवाऽऋताावृधो हुवाना स्तुता मन्त्राः कविशस्ताऽअवन्तु ॥ ५३ ॥

अर्थ—अहिर्बुध्न्यसंज्ञक व अज एकपात्संज्ञक रुद्र, पृथिवी, समुद्र व विश्वेदेव हे आमचीं स्तुतिवाक्यें ऐकोत व आमचें रक्षण करोत. ते सत्यानें वाढणारे, मंत्रांनीं बोलावले जाणारे व पंडितांनीं स्तुत असे आहेत ॥ ५३ ॥

इमा गिरऽआदित्येभ्यो घृतस्नूः सनाद्राजभ्यो जुह्वा जुहोमि। शृणोतु मित्रोऽअर्यमा भगो नस्तु विजातो वरुणो दक्षोऽअꣳ शः ॥ ५४ ॥

अर्थ—आम्ही ज्यांतून तूप गळतें अशा स्तुतिरूपी वाणींचा बुद्धिरूपी खुचेनें चिरकाल प्रकाशणाऱ्या आदित्य देवतांच्या निमित्तानें याग करतों. मित्र, अर्यमा, भग, पुष्कळ प्रकारें उत्पन्न होणारा त्वष्टा, वरुण, दक्ष व अंश हे देव आमच्या त्या स्तुतिवाणींना ऐकोत ॥ ५४ ॥

सप्तऽऋषयः प्रतिहिताः शरीरे सप्त रक्षन्ति सदमप्रमादम्। सप्तापः स्वपतो लोकमीयुस्तत्र जागृतोऽअस्वप्नजौ सत्रसदौ च देवौ ॥ ५५ ॥

अर्थ—शरीरांत असलेलीं १ त्वक् २ चक्षु ३ श्रवण ४ जिव्हा ५ घ्राण ६ मन ७ बुद्धि हीं सात इंद्रियें सर्वदा सावधानरीतीनें शरीराचें रक्षण करितात. ते झोपेच्यावेळीं मनुष्याच्या जीवात्म्यांत लीन होतात. तीं सात इंद्रियें देहव्यापक आहेत. तीं सात इंद्रियें लीन झालीं असतां प्रकाश असे प्राण व अपान जागृत असतात. ते झोप घेत नाहींत व प्राण्यांचें रक्षण करतात ॥ ५५ ॥

उत्तिष्ठ ब्रह्मणस्पते देवयन्तस्त्वेमहे। उप प्रयन्तु मरुतः सुदानव इन्द्र प्राशूर्भवा सचा ॥ ५६ ॥

अर्थ—हे ब्रह्मणाचें पालन करणाऱ्या देवा, ऊठ व कार्याला आरंभ कर. कारण देवांनीं आमच्याकडे यावें म्हणून आम्ही तुला येण्याची प्रार्थना करितों. उत्तमप्रकारें-

करून दान करणारे असे ते देव तुझ्याबरोबर येवोत. हे इंद्रा, तूंही त्यांच्याबरोबर येण्याची त्वरा कर ॥ ५६ ॥

प्र नूनं ब्रह्मणस्पतिर्मन्त्रं वदत्युक्थ्यम् । यस्मिन्निन्द्रो वरुणो मित्रोऽअर्यमा देवाऽओकांसि चक्रिरे ॥ ५७ ॥

अर्थ—ज्यांत इंद्र, वरुण, मित्र, अर्यमा व इतर देव निवास करतात, ब्रह्मणस्पति त्या शस्त्रयोग्य मंत्राचें उत्तमप्रकारें उच्चार करतो ॥ ५७ ॥

ब्रह्मणस्पते त्वमस्य यन्ता सूक्तस्य बोधि तनयं च जिन्व । विश्वं तद्भद्रं यदवन्ति देवा बृहद्वदेम विदथे सुवीराः ÷ । यऽइमा विश्वा विश्वकर्मा यो नः ÷ पिता ऋतेऽन्नस्य नो देहि ॥ ५८ ॥

अर्थ—हे ब्रह्मणस्पते, तूं या जगाचा नियामक आहेस म्हणून आम्हीं केलेली तुझी स्तुति तुला कळो. आमच्या अपत्यांना संतुष्ट कर. देव ज्या सुखाचें पालन करतात तें सर्व सुख आम्हांला असो. आम्ही कल्याणकारक पुत्रयुक्त होऊन यज्ञामध्यें 'अन्नाचें दान करा, अन्न भक्षण करा' अशा प्रकारें पुष्कळ बोलूं. 'य इमा विश्वा' हें सतराव्या अध्यायाच्या सतराव्या मंत्राचें, 'विश्वकर्मा किमन्तः' हें त्याच अध्यायांतील सव्विसाव्या मंत्राचें, 'यो' नः पिता हेंही त्याच अध्यायांतील सत्ताविसाव्या मंत्राचें आणि 'अन्नपतेऽन्नस्य नो देहि' हें अकराव्या अध्यायांतील त्र्यांयशी मंत्राचें प्रतीक आहे ॥ ५८ ॥

इति श्रीपाठकोपाभिधमहोमहापाध्यायश्रीधरशास्त्रिकृते
वाजसनेयिमाध्यन्दिनीयसंहितानुवादे वेदप्रकाशाख्ये चतुस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३४ ॥

इति चतुस्त्रिंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ पञ्चत्रिंशोऽध्यायः ॥ ३५ ॥

विनियोग—पसतिसाव्या अध्यायांत पितृमेधासंबंधीं मंत्र आहेत. मृत्यूचें वर्ष माहीत नसल्यास पितृमेधयज्ञ करावा. वर्ष माहीत असेल तर विषमवर्षी म्हणजे तिसऱ्या पांचव्या वगैरे वर्षी मृत दिवसाच्या नक्षत्रावर अगर चित्रा वगैरे नक्षत्राचे दिवशीं, अमावास्येला, ग्रीष्म अगर शरद्ऋतुंत अगर माघमासीं पितृमेध करावा.

अपेतो यन्तु पणयोऽसुम्ना देवपीयवः । अस्य लोकꣳ सुतावतꣳ । युभिरह्नोभिरक्तुभिर्व्युक्तꣳ समो ददात्ववसानमस्मै ॥ १ ॥

अर्थ—दुःखकारक, देवहिंसक व परद्रव्यापहारक असुर येथून दूर जावोत. सोमयज्ञ करणाऱ्या व अस्थिस्वरूपी झालेल्या या यजमानाचें हें स्थान आहे. यमानें यजमानांना दिवस व रात्रींनीं स्पष्ट केलेलें असें स्थान द्यावें. ॥ १ ॥

विनियोग—नंतर अध्वर्यूनें दक्षिणदिशेकडे पलाश-शाखा फेंकून द्यावी व त्या क्षेत्राच्या दक्षिणेकडे व उत्तरेकडे सहा बैलांचा नांगर जुंपावा. नंतर अध्वर्यूनें 'सविता ते ' या मंत्राचा जप करावा.

सविता ते शरीरेभ्यः पृथिव्यां लोकमिच्छतु । तस्मै युज्यन्तामुस्रियाः ॥ २ ॥

अर्थ—हे यजमाना, सूर्य तुझ्या शरिरांना पृथ्वीवरील स्थानाची इच्छा उत्पन्न करो. सूर्यानें दिलेल्या क्षेत्रावर संस्काराकरितां बैल जुंपले जावोत. ॥ २ ॥

विनियोग—नंतर अध्वर्यूनें ' वायुः पुनातु ' इत्यादि मंत्रानें चार नांगराच्या रेघा नांगराव्या.

वायुः पुनातु सविता पुनात्वग्नेर्भ्राजसा सूर्यस्य वर्चसा । विमुच्यन्तामुस्रियाः ॥ ३ ॥

अर्थ—हे पृथ्वी, वायु अग्नीच्या तेजानें, सूर्य आपल्या तेजानें, तुझें विदारण करो. (नंतर सर्व शेत नांगरून नांगराचे बैल सोडावे) नांगरापासून बैल सोडले जावोत. ॥ ३ ॥

विनियोग—नांगरलेल्या शेतांत सर्व औषधी पेराव्या.

अश्वत्थे वो निषदनं पर्णे वो वसतिष्कृता। गोभाज इत्किलासथ यत्सनवथ पूरुषम् ॥ ४ ॥

अर्थ—हे औषधींनो, आश्वत्थ सुचेमध्यें तुमचें स्थान आहे व तुम्हांला पळसाच्या जुहूमध्येंही जागा दिली आहे. हे हविर्भूत औषधींनो, अग्नींत होम केलेल्या तुम्ही आदित्याचें सेवन करणाऱ्या व्हा. तुम्ही यजमानाचें अन्नदानानें पोषण करितां म्हणून तुम्हांला वरील स्थानें दिलीं आहेत. ॥ ४ ॥

विनियोग—त्या शेताच्या मध्यभागीं मृताच्या अस्थींचा ढीग करावा.

सम्पिता ते शरीराणि मातुरुपस्थऽआवपतु। तस्मै पृथिवि शं भव ॥५॥

अर्थ—हे यजमाना, सूर्य तुझ्या अस्थि पृथ्वीच्या मांडीवर ठेवो. हे पृथ्वी, त्या अस्थिरूपी यजमानाला तूं सुखकारक हो. ॥ ५ ॥

प्रजापतौ त्वा देवतायामुपोदके लोके निदधाम्यसौ। अपं नः शोशुचदघम् ॥ ६ ॥

अर्थ—हे देवदत्ता, (येथें मृताच्या नांवाचा जप करावा.) उदकाच्या जवळील स्थानावर प्रजापतिदेवतेच्या निमित्तानें मी तुझें स्थापन करितों. तो प्रजापति आमचें पाप पूर्णतःहेनें दग्ध करून निःशेष करो ॥ ६ ॥

विनियोग—कुंभ टाकण्यास पाठविलेला ब्राह्मण परत आल्यावर अध्वर्यूनें 'परंमृत्यो' या मंत्राचा जप करावा.

परं मृत्योऽअनु परेहि पन्थां यस्तेऽअन्यऽइतरो देवयानात्। चक्षुष्मते शृण्वते ते ब्रवीमि मा नः प्रजाꣳ रीरिषो मोत वीरान् ॥ ७ ॥

अर्थ—हे मृत्यो, माझ्यापासून पराङ्मुख होऊन अन्य मार्गानें जा. तो तुझा पितृयाणरूपी मार्ग देवयानमार्गाहून भिन्न आहे. तुला सर्व दिसतें व ऐकूं येतें म्हणजे तूं ज्ञानी आहेस. तुला माझें सांगणें असें कीं, आमच्या प्रजा व पुत्रांची हिंसा करूं नकोस. ॥ ७ ॥

विनियोग--'शं वातः' इत्यादि दोन मंत्रांनीं जागचे जागीं हातें ठेवून पूर्वेकडे डोकें असलेली पुरुषाची आकृति रचावी.

शं वात॒ऽ शꣳ हि ते घृणि॒ऽ शं ते॑ भव॒न्त्विष्ट॑काऽ। शं ते॑ भवन्त्व॒ग्नय॒ऽ पार्थि॑वास॒ो मा त्वा॒ भिशू॑शुचन् ॥ ८ ॥

अर्थ--हे यजमाना, वायु व सूर्यकिरण तुला सुखकारक होवोत व प्रत्येक दिशेला ठेवलेल्या तीन तीन विटा तुझें कल्याण करोत. तसेंच अग्नि तुझें कल्याण करो. व पृथ्वीवरील अग्नि तुला ताप न देवोत. ॥ ८ ॥

कल्प॑न्तां ते दि॒शस्तुभ्य॒मापः॑ ÷ शि॒वत॑मास्तुभ्यं॑ भवन्तु सिन्ध॑व॒ऽ। अ॒न्तरि॑क्षꣳ शि॒वं तुभ्यं॒ कल्प॑न्तां ते दिश॒ऽ सर्वा॑ ÷ ॥ ९ ॥

अर्थ—दिशा तुझ्याकरितां क्लृप्त (तयार) होवोत. जल व समुद्र आणि आकाश तुझें कल्याण करो. सर्व दिशा तुझ्याकरितां तयार होवोत. ॥ ९ ॥

विनियोग--'अश्मन्वतीः' या मंत्रानें अध्वर्यु, यजमान व अमात्यांनीं खड्यांत तीन दगड टाकून त्या खड्यावरून जावें.

अश्म॑नवती रीयते स॒ꣳ रभ॒ध्वमुति॑ष्ठत॒ प्रत॑रता सखाय॑ ÷ । अत्रा॑ जहा॒मो शि॒वा ये॒ऽअस॑न्छि॒वान्व॒यमुत्त॑रेमा॒भि वाजा॑न् ॥ १० ॥

अर्थ—हे मित्रांनो, ही पाषाणयुक्त नदी वहाते म्हणून तुम्ही तरून जाण्याची खटपट करा. उठा. या नदीवरून तरून जा. या प्रदेशांत जे दुष्ट राक्षस वगैरे असतील त्यांना आम्ही टाकून देतों व नंतर सुखकर अशा विशिष्ट अन्नांना प्राप्त होतों. ॥ १० ॥

विनियोग—अमात्यांनीं यज्ञोपवीत धारण करावें व जलांत स्नान करावें व हातांत आघाडा घेऊन आपल्या शरीरावर पाणी उडवावें.

अपा॒घमप॑ किल्बि॒षमप॑ कृ॒त्यामप॒ो रप॑ः ÷ । अपा॑मार्ग॒ त्वम॒स्मदप॑ दु॒ष्वप्न्यꣳ॑ सुव ॥ ११ ॥

अर्थ—हे अपामार्गा, तूं आमचें मानसिक पाप व कीर्तिनाशक दैहिक पाप दूर कर. तसेंच दुसऱ्यानें केलेला अभिचार व वाचिक पाप व दुष्ट स्वप्नापासून उत्पन्न झालेलें अशुभ फल दूर कर. ॥ ११ ॥

विनियोग—' सुमित्रियानः ' या मंत्रानें ओंजळींत पाणी घेऊन ' दुर्मित्रियाः ' इत्यादि मंत्रानें तें पाणी आपला शत्रु ज्या दिशेकडे असेल तिकडे टाकावें.

सुमित्रिया नऽआपऽओषधयः सन्तु दुर्मित्रियास्तस्मै सन्तु योऽस्मान्द्वेष्टि यं चं वयं द्विष्मः ॥ १२ ॥

अर्थ—जलें व औषधी आमच्यावर स्नेह करोत. तींच जलें व औषधी आमचा जे द्वेष करितात व आम्ही ज्यांचा द्वेष करितों अशा दोन्ही प्रकारच्या शत्रूंचें शत्रुत्व करोत. ॥ १२ ॥

अनड्वाहमन्वारभामहे सौरभेयꣳ स्वस्तये । स नऽइन्द्रऽइव देवेभ्यो वहिर्÷ सेतारणो भव ॥ १३ ॥

अर्थ—आम्ही सुरभीचा मुलगा जो बैल त्याचा कल्याणाकरितां स्पर्श करितों. हे बैला, इंद्र देवांचें रक्षण करितो त्याप्रमाणें तूं आमचे दुःखांचा नाश कर व या देवांचें वहन (धारण) कर. ॥ १३ ॥

विनियोग—' उद्वयं ' या मंत्रानें गांवांत परत यावें.

उद्वयं तमसस्परि स्वः पश्यन्तऽउत्तरम् । देवं देवत्रा सूर्यमगन्म ज्योतिरुत्तमम् ॥ १४ ॥

अर्थ—आम्हीं उत्कृष्ट अशा स्वर्गाकडे पाहणारे होत्साते तमोबहुल अशा या लोकांतून बाहेर पडलों आणि देवलोकांत सूर्याकडे पहात पहात आम्ही ब्रह्मलोकास प्राप्त झालों. ॥ १४ ॥

विनियोग—गांव आणि स्मशान यांच्यामध्यें अध्वर्यूनें ' इमं जीवेभ्यः ' या मंत्रानें मातीचें मोठें ढेकूळ टाकावें.

इमं जीवेभ्यः÷ परिधिं दधामि मैषां नु गादपरोऽअर्थमेतम् । शतं जीवन्तु शरदः÷ पुरूचीरन्तर्मृत्युं दधतां पर्वतेन ॥ १५ ॥

अर्थ—येथें असलेल्या जंतूंची मी ही मर्यादा स्थापन करितों. कशाकरितां म्हणाल तर, जिवंत असलेल्या प्राण्यामध्यें कोणीही पितृलोकाकडे जाऊं नये. हे प्राणी दान, अध्ययन, याग यांना योग्य अशा तऱ्हेनें शंभर वर्षे वांचोत व हे जीव या ढेंकुळानें मृत्यूला अंतर्हित करोत. ॥ १५ ॥

विनियोग—'अग्न आयूंषि' इत्यादि दोन मंत्रांनीं स्रुच्यानें एक आहुति द्यावी.

अग्नऽआयूंꣳषि पवसऽआसुवोर्ज्जमिषं च नऽ। आरे बाधस्व दुच्छुनाम् ॥ १६ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं आयुष्यप्रापक कर्में करवितोस म्हणून आम्हांला व्रीह्यादि धान्यें, दही वगैरे रस दे व आमच्यापासून दूर असलेल्याही दुष्ट श्वानासारख्या दुर्जनांचा नाश कर. ॥ १६ ॥

आयुष्मानग्ने हविषा वृधानो घृतप्रतीको घृतयोनिरेधि। घृतं पीत्वा मधु चारु गव्यं पितेव पुत्रमभिरक्षतादिमान्स्वाहा ॥ १७ ॥

अर्थ—हे अग्ने, तूं चिरंजीव हविर्द्रव्यानें वाढलेला, मुखांत ज्याच्या घृत आहे असा व घृताचें उत्पत्तिस्थान असा हो. तूं मधुर व सुगंधि गोघृत पिऊन बाप मुलाचें रक्षण करितो त्याप्रमाणें या जीवांचें रक्षण कर. तुला हें हवि सुहुत असो. ॥ १७ ॥

विनियोग—अध्वर्यु, यजमान व अमात्यांचा रक्षण करणारा 'परी मे' हा मंत्र म्हणावा.

परी मे गामनेषत पर्य्यग्निमहृषत। देवेष्वक्रत श्रवऽ कऽइमाँ२॥ आदर्धर्षति ॥ १८ ॥

अर्थ—हे जीव या बैलाच्या पुच्छाला स्पर्श करिते झाले व हे जीव अग्नीला प्रदक्षिणा करिते झाले व हे देवासारखे प्रकाशणारे ऋत्विज त्या यजमानाजवळून दक्षिणारूपी धन प्राप्त करिते झाले म्हणून या कर्मांनीं कृतकृत्य झालेल्या जीवांचा कोण पराजय करूं शकेल? ॥ १८ ॥

विनियोग—'क्रव्यादं' या मंत्रानें औपासन अग्नीचा एक शेष दूर करावा. यजमानानें 'इहैवायं' या मंत्रभागाचा जप करावा.

क्रव्यादमग्निं प्रहिणोमि दूरं यमराज्यं गच्छतु रिप्रवाहऽ। इहैवायमितरो जातवेदा देवेभ्यो हव्यं वहतु प्रजानन् ॥ १९ ॥

अर्थ—प्रेत जाळणारा जो अग्नि त्याला क्रव्याद् असें म्हणतात. त्यानें पुनः येऊं नये म्हणून मी त्याला दूर पाठवितों. अशा रीतीनें दूर पाठविलेला पापनाशक क्रव्यात् अग्नि यमाच्या राज्यांत जावो. हा, क्रव्यात् अग्नीहून वेगळा ज्ञानयुक्त अग्नि, आपल्या अधिकाराची ओळख ठेवून याच घरांत देवाकरितां हविर्भाग धारण करो. ॥ १९ ॥

. **विनियोग**—या मंत्राचा विनियोग श्रौतकर्मांत नाहीं तथापि त्याचा विनियोग गृह्यसूत्रांत आहे.

वहं वपां जातवेदꣳ पितृभ्यो यत्रैनान्वेत्थ निहितान्पराके । मेदसꣳ कुल्याऽउप तान्त्सवन्तु सत्याऽएषामाशिषꣳ सन्नमन्ताꣳ स्वाहा ॥ २० ॥

अर्थ—हे वेदोत्पादक अग्ने, तूं धेनूची वपा पितरांकडे ने कारण कीं, दूरदेशस्थ पितरांनाही तूं जाणतोस. त्या वपेंतून निघालेले मेदाचे (चरबीचे) पाट पितरांकडे वहात जावोत. या दात्या अशा यजमानांचे मनोरथ पूर्ण होऊन त्यांचेकडे येवोत. हें हवि सुहुत असो. ॥ २० ॥

विनियोग—या मंत्राचाही विनियोग श्रौतांत नाहीं, गृह्यसूत्रांत आहे.

स्योना पृथिवि नो भवानृक्षरा निवेशनी । यच्छा नꣳ शर्म सप्रथा÷ । अप नꣳ शोशुचदघम् ॥ २१ ॥

अर्थ—हे पृथ्वी, तूं आम्हांला सुखकारक हो. तूं कंटकरहित असून लोकांच्या बसण्याचें उत्तम साधन व विस्तीर्ण अशी आहेस. तूं आमचें कल्याण कर. हें जल आमच्या पापांना जाळो. ॥ २१ ॥

विनियोग—साग्निकाला अग्नि देण्यापूर्वी 'अस्मात्त्वं' या मंत्रानें पुत्रादिकानें आज्याहुतीचा होम करावा.


अस्मात्त्वमधि जातोऽसि त्वदयं जायतां पुन÷ । असौ स्वर्गाय लोकाय स्वाहा ॥ २२ ॥

अर्थ—हे अग्ने, आधानाचे वेळीं तूं या यजमानापासून उत्पन्न झालास म्हणून हा यजमान तुझ्यापासून उत्पन्न होवो. (येथें मृताचें नांव घ्यावें) हा देवदत्तादि यजमान स्वर्गलोकांत जाण्याकरितां तुझ्यापासून उत्पन्न होवो. हें हवि सुहुत असो ॥ २२ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**
माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** पंचत्रिंशोऽध्यायः ॥ ३५ ॥

इति पञ्चत्रिंशोऽध्यायः समाप्तः ।

अथ षट्त्रिंशोऽध्यायः ॥ ३६ ॥



विनियोग—' ऋचं वाचम् ' हा अध्याय शान्तिकरणकर्मांत विनियुक्त आहे.

ऋचं वाचं प्रपद्ये मनो यजुः प्रपद्ये सामं प्राणं प्रपद्ये चक्षुः श्रोत्रं प्रपद्ये । वागोजः÷ सहौजो मयि प्राणापानौ ॥ १ ॥

अर्थ—ऋग्रूपी वाणी, यजूरूपी मन, प्राणरूपी साम, चक्षुरिंद्रिय व श्रोत्रेंद्रिय यांजप्रत मी प्राप्त करितों; तात्पर्य सप्तदशावयवात्मक असें जें प्रजापतीचें लिंगशरीर त्याप्रत मी प्राप्त होतों. तसेंच वागिंद्रिय, मानसबल, धाष्टर्य, शारीरबल व प्राणापान वायु, हे सर्व माझे ठिकाणीं आहेत. (म्हणून प्रवर्ग्य मला मारीत नाहीं) ॥ १ ॥

यन्मे छिद्रं चक्षुषो हृदयस्य मनसो वातितृण्णं बृहस्पतिर्मे तद्दधातु । शं नो भवतु भुवनस्य यस्पतिः÷ ॥ २ ॥

अर्थ—प्रवर्ग्याच्या आचरणानें माझ्या डोळ्याला, हृदयाला व मनाला जें छिद्र पडलें म्हणजे व्याकुलता प्राप्त झाली, ती माझी व्याकुलता बृहस्पति नष्ट करो. संपूर्ण प्राणिमात्राचा अधिपति जो प्रवर्ग्यरूपी यज्ञ तो आमचें कल्याण करो. ॥ २ ॥

भूर्भुवः स्वः तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः÷ प्रचोदयात् ॥ ३ ॥

अर्थ—त्या प्रकाशक व प्रेरक अशा आदित्यान्तर्गत पुरुषरूपी ब्रह्माचें सर्वांनीं प्रार्थना करण्यास योग्य असें जें सर्व संसारनाशक तेज आहे, त्याचें आम्ही ध्यान करितों. तो सविता आमच्या बुद्धीला सत्कर्मानुष्ठानाची प्रेरणा करो. ॥ ३ ॥

कया नश्चित्रऽआभुवदूती सदावृधः सखा । कया शचिष्ठया वृता ॥४॥

अर्थ—पूज्य व सर्वदा वर्धमान असा इंद्र संतोषजनक अशा कोणत्या तऱ्हेनें अथवा कोणत्या मोठ्या स्तुत्य अशा यागक्रियेनें आमचा मित्र होईल ? ॥ ४ ॥

कस्त्वा सत्यो मदानां मꣳ हिष्ठो मत्सदन्धसः । दृढा चिदारुजे वसु ॥ ५ ॥

अर्थ—हे इंद्रा, सर्व मदकारक वस्तूंमध्यें अत्यंत मादक असा सोमरूपी अन्नाचा

कोणता अंश तुला उन्मत्त करितो ? ज्यायोगें उन्मत्त होऊन तूं अत्यंत कठीण अशाही सुवर्णादि वस्तूंचे तुकडे करून आम्हांला देतोस. ॥ ५ ॥

अभी षु णः सखीनामविता जरितॄणाम् । शतं भवास्यूतिभिः ॥ ६ ॥

अर्थ—हे इंद्रा, आमचें पालन करण्याकरितां तूं शेकडों रूपें धारण करितोस. तूं स्तुति करणाऱ्या व मित्र असलेल्या अशा आम्हां ऋत्विजांचा पालक आहेस. ॥ ६ ॥

कया त्वं नऽऊत्याभिः प्रमन्दसे वृषन् । कया स्तोस्तृभ्यऽआभर ॥ ७ ॥

अर्थ—हे वृष्टि करणाऱ्या इंद्रा, कोणत्या हविर्दानानें तूं आम्हांला आनंदित करितोस व कोणत्या तृप्तीनें स्तुति करणाऱ्या यजमानाकडे धन (देण्याकरितां) आणतोस. ॥ ७ ॥

इन्द्रो विश्वस्य राजति । शं नोऽअस्तु द्विपदे शं चतुष्पदे ॥ ८ ॥

अर्थ—सर्व जगाचा स्वामी जो प्रकाशतो तो आमच्या पुत्रादि मनुष्यांना व धेनु वगैरे चतुष्पादांना सुखकारक होवो. ॥ ८ ॥

शं नो मित्रः शं वरुणः शं नो भवत्वर्यमा । शं नऽइन्द्रो बृहस्पतिः शं नो विष्णुरुरुक्रमः ॥ ९ ॥

अर्थ—मित्र, वरुण, अर्यमा, इंद्र, बृहस्पति व विस्तीर्ण पदन्यास करणारा विष्णु आमचें कल्याण करणारा होवो. ॥ ९ ॥

शं नो वातः पवताम् शं नस्तपतु सूर्यः । शं नः कनिक्रदद्देवः पर्जन्योऽअभिवर्षतु ॥ १० ॥

अर्थ—वायु आमच्याकरितां सुखकारक वाहो. सूर्य आमच्यावर सुखकारक किरण पसरो. अत्यंत शब्द करणारा पर्जन्यदेव आमच्यावर गोड पाण्याची वृष्टि करो. ॥ १० ॥

अहानि शं भवन्तु नः शꣳ रात्रीः प्रतिधीयताम् । शं नऽइन्द्राग्नी भवतामवोभिः शं नऽइन्द्रावरुणा रातहव्या । शं न इन्द्रापूषणा वाजसातौ शमिन्द्रासोमा सुविताय शं योः ॥ ११ ॥

अर्थ—दिवस व रात्री आम्हांला सुखकारक होवोत, व तो महावीर आमच्या-

कडे सुखकारक रात्री पाठवो. इंद्राग्नि, इंद्रवरुण, इंद्रपूषन्, ह्या तीन देवता; इंद्राग्नि पालन करून आम्हांला सुखकारक होवोत, व हविर्द्रव्यानें तृप्त झालेले इंद्र, वरुण आमचें कल्याण करोत, व अन्न देण्याकरितां इंद्र आणि पूषन् आम्हांला सुख देवो. तसेंच इंद्र व सोम उत्तम रीतीनें गमन करण्याकरितां, रोगांच्या नाशाकरितां व भय दूर करण्याकरितां आमच्याकडे येऊन आम्हांला सुख देवो ॥ ११ ॥

शं नो देवीरभिष्टयऽआपो भवन्तु पीतये । शं योरभिस्रवन्तु नऽ ॥१२॥

अर्थ—प्रकाशमान अशीं जलें स्नानाला व पानाला सुखकर अशीं होवोत, व तीं जलें रोगांच्या नाशाकरितां व भयांना दूर करण्याकरितां वाढोत. ॥ १२ ॥

स्योना पृथिवि नो भवानृक्षरा निवेशनी । यच्छा नः शर्म सप्रथाः ॥१३॥

अर्थ—हे पृथ्वी, तूं आम्हांला सुखकारक हो. तूं कंटकरहित असून लोकांच्या वसण्याचें उत्तम साधन व विस्तीर्ण अशी आहेस. तूं आमचें कल्याण कर. हें जल आमच्या पापांना जाळो. ॥ १३ ॥

आपो हि ष्ठा मयोभुवस्ता नऽऊर्जे दधातन । महे रणाय चक्षसे ॥१४॥

अर्थ—हे जलांनो, तुम्ही सुखकारक आहां म्हणून आम्हांला तुमचा रस उपभोगूं द्या व आम्हांला रमणीय ब्रह्माच्या साक्षात्काराला योग्य करा. ॥ १४ ॥

यो वः शिवतमो रसस्तस्य भाजयतेह नः । उशतीरिव मातरः ॥ १५ ॥

अर्थ—हे जलांनो, तुमचा जो अत्यंत कल्याणकारक रस आहे तो या लोकांत राहणाऱ्या आम्हांला प्रेमी आयांप्रमाणें मिळवून द्या. ॥ १५ ॥

तस्माऽअरं गमाम वो यस्य क्षयाय जिन्वथ । आपो जनयथा च नः ॥ १६ ॥

अर्थ—हे जलांनो, तुमच्या रसानें आमची तृप्ति होवो. तुम्ही त्या रसाचे अंशानें जगाला संतुष्ट करितां; आणखी हे जलांनो, आम्हांला त्या रसाचे भोक्ते करा. ॥ १६ ॥

द्यौः शान्तिरन्तरिक्षꣳ शान्तिः पृथिवी शान्तिरापः शान्तिरोषधयः शान्तिः । वनस्पतयः शान्तिर्विश्वे देवाः शान्तिर्ब्रह्म शान्तिः सर्वꣳ शान्तिः शान्तिरेव शान्तिः सा मा शान्तिरेधि ॥ १७ ॥

अर्थ—द्युलोकरूपी, अंतरिक्षरूपी, भूलोकरूपी, जलरूपी, औषधीरूपी, वृक्षरूपी, विश्वेदेवरूपी, वेदत्रयरूपी व सर्वजगद्रूपी, तसेंच मूळस्वरूपी, अशी जी शान्ति ती मला प्राप्त होवो. (सर्व जगांत असलेली शान्ति मला मिळो.) ॥ १७ ॥

दृते दृꣳ ह꣡ मा मि꣡त्रस्य꣡ मा꣡ चक्षुषा꣡ सर्वा꣡णि भू꣡तानि꣡ समी꣡क्षन्ताम् । मि꣡त्रस्या꣡हं चक्षुषा꣡ सर्वा꣡णि भू꣡तानि꣡ समी꣡क्षे । मि꣡त्रस्य꣡ चक्षुषा꣡ समी꣡क्षामहे ॥ १८ ॥

अर्थ—हे भगवन्, माझ्या जराजर्जरित अशा शरीराला दृढ कर. अशा रीतीनें कीं, सर्व प्राणी मला मित्राच्या दृष्टीनें पाहोत व मीही सर्व प्राण्यांना मित्रदृष्टीनें पाहीन. (मी त्यांचा मित्र होईन व ते माझे मित्र होतील.) अशा रीतीनें परस्परांकडे आम्ही मित्रदृष्टीनें पाहतों. ॥ १८ ॥

दृते दृꣳ ह꣡ मा ज्योक्ते꣡ सं꣡दृशि जीव्यासं꣡ ज्योक्ते꣡ सं꣡दृशि जीव्यासम् ॥ १९ ॥

अर्थ—हे भगवन्, मला दृढ कर. तुझ्या कृपादृष्टीनें मी पुष्कळ दिवसपर्यंत वांचेन. (आदर दाखविण्याकरितां ह्या मंत्रांत द्विरुक्ति केली आहे. ॥ १९ ॥

नमस्ते꣡ हरसे꣡ शो꣡चिषे꣡ नमस्तेऽअस्त्वर्चिषे꣡ । अ꣡न्याꣳस्तेऽअ꣡स्मत्तपन्तु हे꣡तयः꣡ पावकोऽअ꣡स्मभ्यꣳ शि꣡वो भव ॥ २० ॥

अर्थ—हे अग्ने, सर्व रसांना हरण करणाऱ्या व प्रकाशक अशा तुझ्या तेजाला नमस्कार असो. तसेंच पदार्थप्रकाशक अशा तुझ्या ज्वालेला नमस्कार असो. हे अग्ने, तुझ्या ज्वाला आमच्याहून इतर असे जे आमचे विरोधी त्यांना ताप देवोत. व तूं आम्हांला पवित्र करणारा आणि शान्त हो. ॥ २० ॥

नमस्तेऽअस्तु वि꣡द्युते नमस्ते स्तनयि꣡त्नवे । नमस्ते भगवन्नस्तु यतꣳ स्वः꣡ समी꣡हसे ॥ २१ ॥

अर्थ—हे भगवन्, विद्युद्रूपी, मेघगर्जनारूपी अशा तुला नमस्कार असो. तूं स्वर्गास जाण्याची इच्छा करितोस म्हणजे अमर्त्य देव आहेस म्हणून तुला मी नमस्कार करितों. ॥ २१ ॥

यतो꣡ यतꣳ समी꣡हसे꣡ ततो꣡ नोऽअभयं꣡ कुरु । शं꣡ नः꣡ कुरु प्र꣡जाभ्योऽभयं꣡ नꣳ पशु꣡भ्यः꣡ ॥ २२ ॥

अर्थ—हे भगवन्, ज्या ज्या पापापासून तूं आमचें रक्षण करण्याचा प्रयत्न करितोस त्या त्या पापापासून आमचें रक्षण कर व आमचें कल्याण कर. व आमच्या प्रजेचें कल्याण कर आणि आमच्या पशूंची भीति दूर कर. ॥ २२ ॥

सुमित्रिया न ऽआप ऽओषधयः सन्तु दुर्मित्रियास्तस्मै सन्तु योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मः ॥ २३ ॥

अर्थ—जलें व औषधी आमच्यावर स्नेह करोत. तींच जलें व औषधी आमचा जे द्वेष करितात व आम्ही ज्यांचा द्वेष करितों अशा दोन्ही प्रकारच्या शत्रूंचें शत्रुत्व करोत. ॥ २३ ॥

तच्चक्षुर्देवहितं पुरस्ताच्छुक्रमुच्चरत् । पश्येम शरदः शतं जीवेम शरदः शतꣳ शृणुयाम शरदः शतं प्रब्रवाम शरदः शतमदीनाः स्याम शरदः शतं भूयश्च शरदः शतात् ॥ २४ ॥

अर्थ—सर्व जगाचा नेत्र व देवास प्रिय असा सूर्य पूर्वेस उदय पावतो. त्याच्या प्रसादानें आम्हीं शंभर वर्षे वांचूं. त्याच्या प्रसादानेंच आमचे नेत्र, श्रोत्र व वाणी शंभर वर्षे अस्खलित होवोत. व अदीन स्थितींत आम्हीं शंभर वर्षांपेक्षां अधिक वांचूं. ॥ २४ ॥

इति श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते माध्यन्दिनीय-वाजसनेयिसंहितानुवादे वेदप्रकाशाख्ये षट्त्रिंशोऽध्यायः ॥ ३६ ॥

इति षट्त्रिंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ सप्तत्रिंशोऽध्यायः ॥ ३७ ॥

विनियोग—'देवस्य त्वा' या मंत्रानें अभ्रि (खड्ग) डाव्या हातांत घेऊन उजव्या हातानें त्याला स्पर्श करून 'युञ्जते मनः' या मंत्राचा जप करावा.

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम्। आददे नारिरसि ॥ १ ॥

अर्थ—हे अभ्रे, सवितृ देवाच्या आज्ञेनें अश्विनीकुमारांच्या बाहूंनीं व पूष्याच्या हातांनीं मी तुझें ग्रहण करितों. तूं स्त्री नांवाची आहेस ॥ १ ॥

युञ्जते मन उत युञ्जते धियो विप्रा विप्रस्य बृहतो विपश्चितः। वि होत्रा दधे वयुनाविदेक इन्मही देवस्य सवितुः परिष्टुतिः ॥ २ ॥

अर्थ—मोठ्या वेदवेत्त्या यजमानाचे होम करणारे ऋत्विज आपल्या मनाची व इंद्रियांची यज्ञकर्मांतच स्थापना करितात व लौकिक विषयांतून त्यांना काढून घेतात. हें ऋत्विजांचें मनोनियमन एका सर्वसाक्षी परमात्म्यानेंच केलें. कारण कीं, त्या अंतर्यामी ईश्वराची सर्वदा बोलली जाणारी ही मोठी स्तुति आहे. हें हवि सुहुत असो ॥ २ ॥

विनियोग—अध्वर्यूनें 'देवी' इत्यादि मंत्रानें मृत्तिकापिंड हातांत घ्यावा.

देवी द्यावापृथिवी मखस्य वामस्य शिरो राध्यासं देवयजने पृथिव्याः। मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे ॥ ३ ॥

अर्थ—हे प्रकाशमान द्यावापृथिवींनो, तुमचा अंश (द्युलोकाचा अंश पाणी व पृथ्वीचा अंश माती) घेऊन मी ह्या पृथ्वीच्या देवयजनस्थानावर यज्ञाचें मस्तक तयार करितों. हे मृत्तिके, यज्ञाकरितां व विशेषतः यज्ञाच्या शिरोभागाकरितां तुझें मी ग्रहण करितों. ॥ ३ ॥

विनियोग—वारुळाच्या मध्यभागांतील ढेंकूळ घेऊन तें कृष्णाजिनाच्या उत्तरेकडे ठेवावें.

देव्यो वस्यो भूतस्य प्रथमजा मखस्य वोऽद्य शिरो राध्यासं देवयजने पृथिव्याः। मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे ॥ ४ ॥

अर्थ—हे प्रकाशमान वारुळ करणाऱ्या कीटांनो, तुम्हांला घेऊन या पृथ्वीच्या देवयजनस्थानावर मी यज्ञाचें मस्तक संपादन करितों. मी सामान्यतः यज्ञाकरितां व विशेषतः यज्ञाच्या शिरोभागाकरितां तुमचें ग्रहण करितों. हे कीटांनो, तुम्ही प्राणिमात्राच्या पूर्वी उत्पन्न झालां आहां. (पृथ्वी प्राण्यांच्या पूर्वी उत्पन्न होते तिच्या संबंधामुळें या कीटांना प्राण्याच्या पूर्वी उत्पन्न झाले असें म्हटलें आहे.) ॥ ४ ॥

विनियोग—' यत्यग्रे ' या मंत्रानें वराहानें उकरलेली माती घेऊन कृष्णाजिनावर वारुळाच्या ढेंकळाच्या उत्तरेकडे ती ठेवावी.

इयत्यग्रेऽआसीन्मखस्य तेऽथ शिरो राध्यासं देवयजने पृथिव्याः । मखाय त्वा मखस्य त्वा शृष्णे ॥ ५ ॥

अर्थ—हे पृथ्वी, वराहानें तुला उकरलें त्यावेळीं तूं येवढी होतीस (येथें हातानें येवढी माती अशी खूण करावी.) तुला घेऊन मी पृथ्वीच्या देवयजनस्थानावर यज्ञाचें मस्तक संपादन करितों. मी सामान्यतः यज्ञाकरितां व विशेषतः यज्ञाच्या शिरोभागाकरितां तुझें ग्रहण करितों. ॥ ५ ॥

विनियोग—' इंद्रस्यौजस्थ ' या मंत्रानें पूतिकसंज्ञक गवत हातांत घेऊन तें कृष्णाजिनावर वराह मृत्तिकेच्या उत्तरेकडे ठेवावें. ' मखाय ' या मंत्रानें दुग्ध घेऊन तें पूतिकांच्या पलीकडे ठेवावें तसेंच ' मखाय ' या मंत्रानें सर्व संभारांना (सामग्रीला) स्पर्श करावा.

इन्द्रस्यौजः स्थ मखस्य वोऽथ शिरो राध्यासं देवयजने पृथिव्याः । मखाय त्वा मखस्य त्वा शृष्णे । मखाय त्वा मखस्य त्वा शृष्णे । मखाय त्वा मखस्य त्वा शृष्णे ॥ ६ ॥

अर्थ—हे पूतिक तृणांनो, तुम्ही इंद्राचें तेज आहां. तुम्हांला घेऊन मी पृथ्वीच्या देवयजनस्थानावर यज्ञाचें मस्तक संपादन करितों. मी सामान्यतः यज्ञाकरितां व विशेषतः यज्ञाच्या शिरोभागाकरितां तुमचें ग्रहण करितों. हे दुग्धा, मी सामान्यतः यज्ञाकरितां व विशेषतः यज्ञाच्या शिरोभागाकरितां तुझें ग्रहण करितों. हे संभारांनो, मी सामान्यतः यज्ञाकरितां व विशेषतः यज्ञशिरोभागाकरितां तुम्हांला स्पर्श करितों ॥ ६ ॥

विनियोग—पांच हाताच्या चौकोनी जमिनीवर वाळू पसरलेली असते तिला

परिवृत असें म्हणतात. ' प्रैतु ब्रह्मणस्पतिः ' हा मंत्र म्हणून अध्वर्यू वगैरे ऋत्विजांनीं परिवृताकडे जावें व अध्वर्यूनें परिवृतावर संभार ठेवावे व ' मखाय ' या मंत्रानें गवेधुका व अजा यांचें दूध वल्मीक वपा प्रभृति तीन संभारांत मिसळावें. ' मखाय ' या मंत्रानें पृथ्वीशीर्षरूपी महावीर तयार करावा.

' प्रैतु ब्रह्मणस्पतिꣳ प्र देव्येतु सुनृता । अच्छा वीरं नर्यं पङ्क्तिराधसं देवा यज्ञं नयन्तु नꣳ । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे ॥ ७ ॥

अर्थ--हिरण्यगर्भवेदपालक प्रजापति व त्याची प्रिय सत्य स्वरूपाची वेदत्रयरूपी वाणी या यज्ञांत येवो. व यज्ञार्ह देव या यज्ञाप्रत प्राप्त होवोत. तो यज्ञ शत्रुनाशक मनुष्यांना हितकारक असा आहे व या यज्ञांत पुरोडाशादि हविः पङ्क्ति, नाराशंस पङ्क्ति व प्रातःसवनादि तीन सवन वगैरे सवन पङ्क्तिसिद्ध केल्या जातात. हे संभारांनो, तुम्हाला मी मृत्तिकापिंडाशीं सामान्यतः यज्ञाकरितां व विशेषतः यज्ञाच्या शिरोभागाकरितां संयुक्त करितों. हे महावीरा, तुला मी सामान्यतः यज्ञाकरितां व विशेषतः यज्ञाच्या शिरोभागाकरितां तयार करितों ॥ ७ ॥

विनियोग—बनविलेल्या डाव्या हातावर असलेल्या महावीराचा उजव्या हातानें ' मखस्य शिरः ' या मंत्रानें स्पर्श करावा. तसेंच दुसऱ्या दोन महावीरांचाही स्पर्श करावा. ' मखाय ' या तीन मंत्रांनीं गवेधुकांनीं तीन महावीरांना चिकण करावें.

मखस्य शिरोऽसि । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे । मखस्य शिरोऽसि । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे । मखस्य शिरोऽसि । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे ॥ ८ ॥

अर्थ--हे महावीरा, तूं यज्ञाचें मस्तक आहेस. तुझा मी स्पर्श करितों. (असेंच तीनदां म्हणावें) हे महावीरा, तुला मी गवेधुका दुग्धांनीं मऊ करितों. (असें तीनदां म्हणावें) हे महावीरा, सामान्यतः यज्ञाकरितां व विशेषतः यज्ञशिरोभागाकरितां तुला मी मऊ करितों ॥ ८ ॥

विनियोग--' अश्वस्य ' या तीन मंत्रांनीं तीन महावीरांना जळणाऱ्या अश्वाच्या लिदीनें धूर द्यावा व ' मखाय ' या तीन मंत्रांनीं तीन महावीरांना दग्ध करावें.

अश्वस्य त्वा वृष्णः शक्रा धूपयामि देवयजने पृथिव्याः । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे । अश्वस्य त्वा वृष्णः शक्रा धूपयामि देवयजने पृथिव्याः । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे ॥ ९ ॥

अर्थ—हे महावीरा, या पृथ्वीच्या देवयजनस्थानाच्या मध्यभागीं सामान्यतः यज्ञाकरितां व विशेषतः यज्ञशिरोभागाकरितां वीर्यसिंचन करणाऱ्या लिंदीनें मी तुला धुपवितों. (हें तीनदां म्हणावें) हे महावीरा, सामान्यतः यज्ञाकरितां व विशेषतः यज्ञशिरोभागाकरितां मी तुला दग्ध करितों. (हें तीनदां म्हणावें) ॥ ९ ॥

विनियोग—'ऋजवे त्वा' या तीन मंत्रांनीं तीन पक्व महावीरांना अग्नींतून बाहेर काढून नंतर ' मखाय त्वा ' या तीन मंत्रांनीं अजादुग्ध तीन महावीरांवर ओतावें.

ऋजवे त्वा साधवे त्वा सुक्षित्यै त्वा । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे । मखाय त्वा मखस्य त्वा शीर्ष्णे ॥ १० ॥

अर्थ—हे महावीरा, सत्य अशा आदित्याच्या संतोषाकरितां तुला मी अग्नींतून बाहेर काढतों. हे द्वितीय महावीरा, साधु अशा वायूच्या संतोषाकरितां तुला मी अग्नींतून बाहेर काढतों. हे तृतीय महावीरा, सर्व भूतांचें निवासस्थान जें पृथ्वी तिच्या संतोषाकरितां तुला मी अग्नींतून बाहेर काढतों. हे महावीरा, तुझ्यावर मी सामान्यतः यज्ञाकरितां व विशेषतः यज्ञशिरोभागाकरितां अजादुग्ध ओततों (असें तीनदां म्हणावें) ॥ १० ॥

विनियोग—' यमाय त्वा ' इत्यादि मंत्रानें तीन वेळां तीन महावीरांचें प्रोक्षण करावें. ' देवस्त्वा ' या मंत्रानें संस्कारपूर्वक महावीराला तूप लावावें. नंतर 'पृथिव्याः संस्पृशः ' या मंत्रानें शंभर रतीभार चांदी त्या वाळूंत लपवून ठेवावी.

यमाय त्वा मखाय त्वा सूर्यस्य त्वा तपसे । देवस्त्वा सविता मध्वानक्तु पृथिव्याः सꣳ स्पृशस्पाहि । अर्चिरसि शोचिरसि तपोऽसि ॥ ११ ॥

अर्थ—हे महावीरा, सर्व नियमन करणाऱ्या आदित्याच्या संतोषाकरितां, हे द्वितीय महावीरा, सूर्यरूपी प्रवर्ग्याच्या संतोषाकरितां व हे तृतीय महावीरा, सूर्यतेजोरूपी प्रवर्ग्याच्या संतोषाकरितां तुझें मी प्रोक्षण करितों. हे महावीरा, सवितादेव

मधुर अशा आज्यानें तुला चोपडो (तुझ्या अंगाला तूप लावो). (असें तीनदां म्हणावें) हे रजता, पृथ्वीसंबंधीं राक्षसापासून या महावीराचें तूं रक्षण कर. हे महावीरा, तूं चंद्रकान्तिरूपी आहेस. हे द्वितीय महावीरा, तूं अग्नितेजोरूपी आहेस. हे तृतीय महावीरा, तूं सूर्यतापरूपी आहेस ॥ ११ ॥

विनियोग—महावीरावर आपल्या हाताची टीच (प्रादेश) यजमानानें ठेवावी. त्यावेळीं अध्वर्यूनें त्याच्याकडून 'अनाधृष्टा' हा मंत्र म्हणवावा. महावीराच्या दक्षिणेकडे जमिनीवर 'विश्वाभ्योमा' हा मंत्र म्हणून यजमानानें आपला हात ठेवावा. नंतर यजमानानें महावीराच्या उत्तरेकडील जमिनीला स्पर्श करून 'मनो रश्वासि' हा मंत्र जपावा.

अनाधृष्टा पुरस्ताद्वह्नेराधिपत्यऽआयुर्मे दाऽ। पुत्रवती दक्षिणतऽइन्द्रस्याधिपत्ये प्रजां मे दाऽ। सुषदा पश्चाद्देवस्य सवितुराधिपत्ये चक्षुर्मे दाऽआश्रुतिरुत्तरतो धातुराधिपत्ये रायस्पोषं मे दाऽ। विधृतिरुपरिष्टाद्बृहस्पतेराधिपत्यऽओजो मे दा विश्वाभ्यो मा नाष्ट्राभ्यस्पाहि मनोरश्वासि ॥१२॥

अर्थ—हे पृथ्वी, अग्नि स्वामी असतां तूं राक्षसांनीं अपराजित होऊन मला आयुष्य दे. इंद्र स्वामी असतां दक्षिणेकडे राक्षसांनीं पुत्रयुक्त अशी तूं मला संतति दे. तूं पश्चिम दिशेकडे सुख देणारी अशी, सविता देव स्वामी असतां मला नेत्रतेज दे. ब्रह्मा अधिपति असतां, तूं उत्तर दिशेकडे यज्ञदेशास्वरूपी अशी तूं, माझ्या द्रव्याची वृद्धि कर. बृहस्पति स्वामी असतां, ऊर्ध्वदेशामध्यें विशेषेंकरून धारण करणारी अशी तूं, मला बल दे. हे महावीराच्या दक्षिणेकडील पृथ्वी, सर्व नाशक अशा पिशाच्यादिकांपासून आमचें रक्षण कर. हे धर्मोत्तर भूमे, तूं मनुराजाच्या बसण्याची घोडी आहेस ॥ १२ ॥

विनियोग—अध्वर्यूनें महावीराच्या भोंवतीं भस्म व अंगार पसरावें व त्यावर शकलें टाकावीं. त्यांपैकीं दोन शकलें 'स्वाहामरुद्भिः' या मंत्रानें पूर्वेकडे टाकावीं. नंतर 'दिवः संस्पृशः' या मंत्रानें शंभर रतिभार सुवर्णानें महावीराचें आच्छादन करावें. नंतर 'मधु मधु' या मंत्रानें तीन पंख्यांनीं अग्नीला वारा घालावा.

स्वाहा मरुद्भिऽ परिश्रीयस्व दिवꣳ सꣳ स्पृशस्पाहि। मधु मधु मधु ॥ १३ ॥

अर्थ—हे घर्मा, तूं स्वाहाकार म्हणजे सूर्यस्वरूपी आहेस म्हणून मरुतांकडून सेविला गेलेला असा हो. (मरुत तुझा आश्रय करोत) हे शतप्रमाण सुवर्णा, द्युलोकांतील स्पर्श करणाऱ्या देवांचें संरक्षण कर. प्राण, उदान व व्यान हे तीन वायू मी महावीरांमध्यें स्थापन करितों ॥ १३ ॥

विनियोग—'गर्भो देवानाम्' या मंत्रानें यजमानासह ऋत्विजांनीं महावीरावें उपस्थान करावें.

गर्भो॑ दे॒वानां॑ पि॒ता म॑ती॒नां पति॑÷ प्र॒जाना॑म्। सं दे॒वो दे॒वेन॑ सवि॒त्रा भ॑त सꣳ सूर्ये॑ण रोचते ॥ १४ ॥

अर्थ—प्रकाशमान असा महावीर सवितृदेवाशीं संयुक्त होतो. जो घर्मरूपी महावीर सूर्याशीं एकत्र होऊन प्रकाश पावतो त्याची आम्ही स्तुति करितों. तो दृश्यमान सर्व रश्मींचा ग्रहण करणारा आहे, तसेंच बुद्धींचा प्रवर्तक व प्रजेचा पालक आहे ॥ १४ ॥

सम॒ग्निर॒ग्निना॑ गत॒ सं दैवे॑न सवि॒त्रा सꣳ सूर्ये॑णारोचिष्ट। स्वाहा॒ सम॒ग्निस्तप॑सा गत॒ सं दैव्ये॑न सवि॒त्रा सꣳ सूर्ये॑णारूरुचत ॥ १५ ॥

अर्थ—जो घर्म अग्नीशीं एकत्र होतो व सवितृदेवाशीं एकत्र होतो व सूर्याबरोबर प्रकाश पावतो तसेंच स्वाहाकारासहित जो घर्म सूर्यदेवाशीं व सवितृदेवाशीं युक्त होतो व सूर्यासह प्रकाशित होतो त्याची आम्ही स्तुति करितों ॥ १५ ॥

ध॒र्ता दि॒वो वि॑भा॒ति त॑प॒सस्पृ॑थि॒व्यां ध॒र्ता दे॒वो दे॒वाना॒ममर्त्यस्तपो॒जाः। वाच॑म॒स्मे नि य॑च्छ दे॒वायु॑वम् ॥ १६ ॥

अर्थ—तो घर्मदेव आमच्याकडून देवसमुदाययुक्त अशा यज्ञाची समाप्ति करवो. तो द्युलोकाचें, रश्मिसमुदायाचें व देवांचें धारण करणारा, अजरामर आणि सूर्योत्पन्न असा देव या पृथ्वीवर शोभतो ॥ १६ ॥

अप॑श्यं गो॒पामनि॑पद्यमान॒मा च॒ परा॑ च प॒थिभि॒श्चर॑न्तम्। स स॒ध्रीची॒ꣳ स वि॒षूची॒र्वसा॑न॒ऽआव॑रीवर्ति॒ भुव॑नेष्व॒न्तः ॥ १७ ॥

अर्थ—जो घर्मदेव तीनही लोकांत राहून पृथ्वीवर पुनः पुनः येतो तो आपल्याबरोबर असणाऱ्या व निरनिराळ्या दिशांकडे असणाऱ्या रश्मींना धारण करणारा

आहे, त्या आदित्यरूपी धर्माला मी पहाता झालों, तो आकाशांत संचार करीत असतां कधींच खालीं पडत नाहीं व देवमार्गांनीं येतो अशा रीतीनें त्यांचें जाणें व येणें नेहमीं सुरू आहे ॥ १७ ॥

विश्वासां भुवां पते विश्वस्य मनसस्पते विश्वस्य वचसस्पते सर्वस्य वचसस्पते । देव श्रुत्त्वं देव धर्म देवो देवान्पाह्यवत्र प्रावीरनु वां देववीतये । मधु माध्वीभ्यां मधु माधूचीभ्याम् ॥ १८ ॥

अर्थ—हे सर्व पृथ्वीच्या पालका, सर्वप्राण्यांच्या मनाच्या अधिपते, सर्वांच्या वागिन्द्रियाच्या व वेदत्रयाच्या पालका, व सर्व देव प्रसिद्ध प्रकाशमान धर्मदेवा तूं देवांचें रक्षण कर. हे अश्विनीकुमारांनो, देवांच्या संतोषाकरितां धर्मदेव तुम्हांला संतुष्ट करो. मधुब्राह्मणाला प्राप्त होणाऱ्या व त्या मधुब्राह्मणाची पूजा (आदर) करणाऱ्या तुमच्याकरितां दध्यङ्आथर्वण महर्षीनें मधुब्राह्मणाचें पठन केलें ॥ १८ ॥

हृदे त्वा मनसे त्वा दिवे त्वा सूर्याय त्वा । ऊर्ध्वोऽअध्वरं दिवि देवेषु धेहि ॥ १९ ॥

अर्थ—हे धर्मा, हृदयस्वास्थ्याकरितां, मनःशुद्धीकरितां, स्वर्गप्राप्तीकरितां व सूर्याच्या संतोषाकरितां आम्ही तुझी स्तुति करितों. तूं सावधान होऊन आमचा यज्ञ द्युलोकांतील देवांकडे ने ॥ १९ ॥

विनियोग—धर्माकडे पहाणाऱ्या यजमानपत्नीकडून अध्वर्यूनें ' त्वष्टृमन्तः ' हा मंत्र म्हणवावा.

पिता नोऽसि पिता नो बोधि नमस्तेऽअस्तु मा मा हिꣳसीः । त्वष्टृमन्तस्त्वा सपेम पुत्रान्पशून्मयि धेहि प्रजामस्मासु धेह्यरिष्टाहꣳ सह पत्न्या भूयासम् ॥ २० ॥

अर्थ—हे महावीरा, तूं आमचा पिता आहेस. तूं आम्हांला पित्याप्रमाणें ज्ञान दे. तुला नमस्कार असो. तूं आमची हिंसा करूं नकोस. हे धर्मा, त्वष्टयासह असलेली मी तुला स्पर्श करतें म्हणून मला पुत्र व पशु दे व उत्तरोत्तर आमच्या वंशाची वृद्धि कर. मी भर्त्यासह अहिंसित होईन म्हणजे पुष्कळ वर्षे वांचेन ॥ २० ॥

विनियोग—' अहः केतुना ' इत्यादि मंत्रानें रौहिण (अग्न्यादित्यसंबंधी) पुरोडाशांचें हवन करावें (' रात्रिः ' या मंत्रानें सायंकाळच्या प्रवर्ग्याचा होम करावा.)

अहः÷ केतुना जुषताꣳ सुज्योतिर्ज्योतिषा स्वाहा । रात्रि÷ केतुना जुषताꣳ सुज्योतिर्ज्योतिषा स्वाहा ॥ २१ ॥

अर्थ—स्वतेजानें प्रकाशित होणारी कर्मासहित अहर्देवता रौहिण पुरोडाश होमानें संतुष्ट होवो. हें हवि सुहुत असो. स्वतेजानें प्रकाशित होणारी कर्मासहित रात्रिदेवता रौहिणपुरोडाशानें संतुष्ट होवो. हें हवि सुहुत असो ॥ २१ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते**
वाजसनेयमाध्यन्दिनीयसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** सप्तत्रिंशोऽध्यायः ॥ ३७ ॥

इति सप्तत्रिंशोऽध्यायः समाप्तः ।



अथ अष्टत्रिंशोऽध्यायः ॥ ३८ ॥

विनियोग--अध्वर्यूनें 'देवस्यत्वा' या मंत्रानें रज्जु ग्रहण करून गार्हपत्याच्या मागें जाऊन 'इड एहि' या तीन वाक्यांनीं घर्मदुघा या गाईला बोलवावें व गाईचें लौकिक नांव घेऊन बोलवावें.

देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्याम्। आददेऽदित्यै रास्नासि ॥ १ ॥

अर्थ--हे रज्जु, सवितृ देवाच्या आज्ञेनें अश्विनीकुमारांच्या बाहूंनीं व पूष्याच्या हातांनीं मी तुझें ग्रहण करितों. तूं देवमाता जी अदिति तिची रशना (कमरपट्टा) आहेस. ॥ १ ॥

इडऽएहि मदितऽएहि सरस्वत्येहि। असावेहि असावेहि असावेहि ॥ २ ॥

अर्थ—हे मानवी, हे देवमाते, हे सरस्वती ये, हें अमुक नांवाच्या गाई ये. (असें तीनदां म्हणावें) ॥ २ ॥

विनियोग--'अदित्यै रास्ना' या मंत्रानें गाईला दोरी बांधून तिला खुंट्याशीं बांधावें व वत्साला सोडावें. गाईचे मागचे दोन पाय बांधून 'घर्माय दीष्व' हा मंत्र म्हणून वत्साला गाईपासून दूर करावें.

अदित्यै रास्नासीन्द्राण्याऽउष्णीषः। पूषासि घर्माय दीष्व ॥ ३ ॥

अर्थ--हे दोरी, तूं देवमातेची रशना आहेस व इंद्रपत्नीचें शिरोवेष्टन आहेस. हे वत्सा, तूं वायूप्रमाणें आहेस. तसेंच हे वत्सा, घर्माकरितां तूं दूध स्तनांत राखून ठेव सर्व पिऊन जाऊं नकोस ॥ ३ ॥

विनियोग--नंतर 'अश्विभ्यां पिन्वस्व' इत्यादि मंत्रानें गाईचें पिन्वन पात्रांत दोहन करावें. व त्या पात्रांत पडलेल्या दुग्धकणांना 'स्वाहेन्द्रवत्' या मंत्रानें अभिमंत्रित करावें.

अश्विभ्यां पिन्वस्व सरस्वत्यै पिन्वस्वेन्द्राय पिन्वस्व। स्वाहेन्द्रवत्स्वाहेन्द्रवत्स्वाहेन्द्रवत् ॥ ४ ॥

अर्थ--हे दुग्धा, तूं अश्विनीकुमाराकरितां, सरस्वतीकरितां व इंद्राकरितां या पात्रांत ये. दूध काढिलें जात असतां जें खालीं गळतें तें सुहुत असो व इंद्रसंयुक्त असो (असें तीनदां म्हणावें) ॥ ४ ॥

विनियोग--' यस्ते स्तनः ' या मंत्रानें गाईच्या स्तनांना स्पर्श करावा. ' उर्वन्तरिक्षम् ' हा मंत्र म्हणून अध्वर्यूनें गाईपासून गार्हपत्य अग्नीकडे जावें.

यस्ते स्तनः÷ शशयो यो मयोभूर्यो रत्नधा वसुविय÷ सुदत्रः÷ । येन विश्वा पुष्यसि वार्याणि सरस्वति तमिह धातवेऽक÷ । उर्वन्तरिक्षमन्वेमि ॥ ५ ॥

अर्थ—हे सरस्वति, जो तुझा स्तन स्वस्थ पडून राहिला आहे तो मला पान करण्याकरितां दे. तसेंच जो तुझा स्तन सुखकारक आहे, जो रत्न देणारा आहे, जो धन देणारा आहे व उत्तम तऱ्हेनें धनादिक देणारा आहे व ज्या स्तनानें तूं सर्व स्पृहणीय वस्तूंना देतेस, तो स्तन मला पानाकरितां दे. मी अंतरिक्षासारख्या विशाल अशा स्थानांतून गमन करितों ॥ ५ ॥

विनियोग--' गायत्रं ' इत्यादि दोन मंत्रांनीं दोन परिशास ग्रहण करावें. नंतर ' द्यावापृथिवीभ्याम् ' या मंत्रानें परिशासांनीं महावीराचें ग्रहण करावें. ' इंद्राश्विना ' या मंत्रानें महावीरावर गाईचें दूध ओतावें.

गायत्रं छन्दोऽसि त्रैष्टुभं छन्दोऽसि द्यावापृथिवीभ्यां त्वा परिगृह्णाम्यन्तरिक्षेणोपयच्छामि इन्द्राश्विना मधुनः÷ सारघस्य घर्मं पात वसवो यजत वाट् स्वाहा सूर्यस्य रश्मये वृष्टिवनये ॥ ६ ॥

अर्थ—हे परिशास, तूं गायत्रीछंदरूपी व त्रिष्टुप्छंदरूपी आहेस. हे महावीरा, द्यावापृथिवींच्या सामर्थ्यानें मी तुझें ग्रहण करितों. हे घर्मा, तुला आकाशासारख्या उदरानें मी धरून ठेवतों. हे इंद्रा, हे अश्विनीकुमारांनो व हे वसूंनो, तुम्ही मधुमक्षिकाप्रमाणें असलेले जे ऋत्विज त्यांनीं दिलेलें जें मधुर दुग्ध त्याचा रस प्या. हे इंद्रादिक देवांनो, वषट्कारानें उत्तम होमलेले; हें मधु सूर्यरश्मीना द्या. तो सूर्य रश्मि वृष्टि देणारा असा आहे ॥ ६ ॥

विनियोग--अध्वर्यूनें आहवनीयाकडे जात असतां ' समुद्राय त्वा ' या मंत्रांत सांगितलेलीं बारा नांवें जपावीं.

समुद्राय त्वा वाताय स्वाहा सरिराय त्वा वाताय स्वाहा। अनाधृष्यायै त्वा वाताय स्वाहा प्रतिधृष्यायै त्वा वाताय स्वाहा। अवस्यवे त्वा वाताय स्वाहाऽशिमिदायै त्वा वाताय स्वाहा ॥ ७ ॥

अर्थ--हे घर्मा, सर्व भूतोत्पादक, सर्व भूतांचे अर्थ सिद्ध करणारा, पराभव करण्यास अशक्य, समोर उभे राहून युद्ध करण्यास अशक्य, रक्षणाची इच्छा करणारा व क्लेश निवृत्त करणारा असा जो वात त्या कारणें या हविर्द्रव्याचा मी होम करितों ॥ ७ ॥

इन्द्राय त्वा वसुमते रुद्रवते स्वाहेन्द्राय त्वादित्यवते स्वाहेन्द्राय त्वाभिमातिघ्ने स्वाहा। सवित्रे त्वाऽऽभुमते विभुमते वाजवते स्वाहा बृहस्पतये त्वा विश्वदेव्यावते स्वाहा ॥ ८ ॥

अर्थ--तसेंच हे घर्मा, वसूंनीं सहित, रुद्रयुक्त, इंद्रस्वरूपी आदित्ययुक्त, शत्रुनाशक इंद्रस्वरूपी, प्रसविणारा, अंगिरसाचे पुत्र आंगिरस, सुधन्व्याचे रुभु, विभु व वाज नांवाचे तीन पुत्र आहेत. त्यांनीं युक्त व प्रेरणा करणारा व सर्व देवसमुदायांनीं युक्त, बृहस्पतिरूपी जो वात त्या वाताकारणें या हविर्द्रव्याचा मी होम करितों ॥ ८ ॥

विनियोग--' स्वाहा ' हा मंत्र जपून जलाचा स्पर्श करून घर्मस्य यज असें म्हणावें.

यमाय त्वाङ्गिरस्वते पितृमते स्वाहा। स्वाहा घर्माय स्वाहा घर्मं पित्रे ॥ ९ ॥

अर्थ--आंगिरस मुनींनीं युक्त असा यमरूपी व आंगिरः पितृयुक्त जो वात त्या कारणें हें हविर्द्रव्य सुहुत असो. घर्माकारणें हें घृत सुहुत असो व हा घर्म पितराकारणें सुहुत असो ॥ ९ ॥

विनियोग--' विश्वा आशा ' या मंत्रानें घर्माचा होम करावा.

विश्वाऽआशा दक्षिणसद्विश्वान्देवानयाडिह। स्वाहाकृतस्य घर्मस्य मधोः पिबतमश्विना ॥ १० ॥

अर्थ—या यज्ञांत दक्षिण दिशेकडे उभें राहून अध्वर्यूनें सर्व दिशांचा व सर्व देवांचा होम केला. म्हणून मी म्हणतों कीं हे अश्विनी कुमारांनो, मधुर अशा हविर्द्रव्याच्या होमानंतर तुम्ही या घर्माला पिऊन जा ॥ १० ॥

विनियोग—महावीराला तीन वेळां वर धरून हलवावें. पहिल्यानें हलवितांना 'दिविधा' हा मंत्र म्हणावा. मागून दोनदां मंत्र न म्हणतांच हलवावें. 'स्वाहाग्नये' या मंत्रानें घर्माचा होम करावा.

दिवि धाऽइमं यज्ञमिमं यज्ञं दिवि धा÷। स्वाहाग्नये याज्ञियाय शं यजुर्भ्यः ॥ ११ ॥

अर्थ—हे महावीरा, तूं माझा यज्ञ द्युलोकांत स्थापन कर (आदर दाखविण्याकरितां मंत्रांत द्विरुक्ति केली आहे.) यज्ञाला हितकर अशा अग्नीकारणें हें हवि सुहुत असो. व यजुर्वेदापासून आमचें कल्याण होवो ॥ ११ ॥

विनियोग—'अश्विना घर्मम्' या मंत्रानें ब्रह्मदेवानें घर्माचें अभिमंत्रण करावें.

अश्विना घर्मं पातꣳ हा दोन्नमहर्दिवाभिरूतिभिः÷। तन्त्रायिणे नमो द्यावापृथिवीभ्याम् ॥ १२ ॥

अर्थ—हे अश्विनीकुमारांनो, प्रातःकाळीं व सायंकाळीं रक्षण व्हावें या निमित्तानें तुम्ही घर्माचें पान करा. तो घर्म फार मनोहर आहे. कालचक्रामध्यें नेहमीं गमन करणाऱ्या आदित्याला व द्यावा पृथिवींना नमस्कार असो ॥ १२ ॥

विनियोग—'अपाताम्' हा मंत्र म्हणून यजमानानें घर्माचें अभिमंत्रण करावें.

अपातामश्विना घर्ममनु द्यावापृथिवीऽअमꣳ सातामू । इहैव रातय÷ सन्तु ॥ १३ ॥

अर्थ—अश्विनीकुमार घर्माचें पान करिते झाले. द्यावापृथिवींनीं त्यांना अनुमति दिली म्हणून त्यांच्या प्रसादानें आमच्या घरांतच आम्हांला द्रव्यें मिळोत ॥ १३ ॥

विनियोग--'इषे पिन्वस' या मंत्रानें अत्यंत तापलेल्या घर्माचें अभिमंत्रण करावें. 'धर्मासि' हा मंत्र म्हणून ईशान्य दिशेकडे जावें. 'अमेन्यस्मे' हा मंत्र म्हणून महावीराला वाळूवर ठेवावें.

इषे पिन्वस्वोर्जे पिन्वस्व ब्रह्मणे पिन्वस्व क्षत्राय पिन्वस्व द्यावापृथिवीभ्यां पिन्वस्व। धर्मासि सुधर्माऽमेन्यस्मे नृम्णानि धारय ब्रह्म धारय क्षत्रं धारय विशं धारय ॥ १४ ॥

अर्थ--हे वृद्धि पावणाऱ्या घर्मा, तूं वृष्टीकरितां पुष्ट हो. अन्न वाढीव व ब्राह्मण, क्षत्रिय आणि द्यावापृथिवी यांना संतुष्ट कर. हे उत्तम धारण करणाऱ्या, तूं सर्व जगाचा धारक आहेस. हे घर्मा, तूं क्रुद्ध न होऊन आम्हांला दव्यें दे. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांना आमच्या स्वाधीन कर ॥ १४ ॥

विनियोग—'स्वाहा पूष्णे' इत्यादि मंत्रांनीं, शकलांनीं घर्माज्याचा होम करावा. चौथ्या शकलाचा होम न करितां उत्तरेस पाहून अध्वर्यूनें वेदीच्या दक्षिण-भागीं त्या शकलाचा दर्भांत प्रवेश करावा.

स्वाहा पूष्णे शरसे स्वाहा ग्रावभ्यः स्वाहा प्रतिरवेभ्यः। स्वाहा पितृभ्यऽऊर्ध्वबर्हिभ्यो घर्मपावभ्यः स्वाहा द्यावापृथिवीभ्याꣳ स्वाहा विश्वेभ्यो देवेभ्यः ॥ १५ ॥

अर्थ—स्नेह करणारा जो प्राणरूपी पूषा त्याला हें हवि सुहुत असो. विषयग्रहण करणारे जे प्राण त्यांना हें हवि सुहुत असो. शब्द करणारे जे प्राण त्यांना हें हवि सुहुत असो. सोमपपितर घर्मपान करणारे पितर प्राणोदान व विश्वेदेव त्यांना हें हवि सुहुत असो ॥ १५ ॥

विनियोग--घर्मांतील घृतांत संपूर्ण भिजलेलें सातवें शकल दक्षिणेकडे पाहून अध्वर्यूनें प्रतिप्रस्थात्याला द्यावें. 'स्वाहा सज्योतिषा' या मंत्रानें घर्मघृत उपयमनींत ओतावें. नंतर रौहिणाचा होम करावा. तदनंतर उपयमनींतील घृताचा समंत्रक होम करून वाजिनाप्रमाणें होता अध्वर्यु वगैरेनीं त्याचें भक्षण करावें.

स्वाहा रुद्राय रुद्रहूतये स्वाहा सं ज्योतिषा ज्योतिः। अहः केतुना जुषताꣳ सुज्योतिर्ज्योतिषा स्वाहा। रात्रिः केतुना जुषताꣳ सुज्योतिः

ज्योतिषा स्वाहा। मधु हुतमिन्द्रतमेऽअग्नावश्याम ते देव घर्म नमस्तेऽ अस्तु मा मा हिꣳ सीः ॥ १६ ॥

अर्थ—स्तोत्यांनीं स्तुत अशा रुद्राला हें हवि सुहुत असो. घर्मस्थ घृत उपयमनीस्थ घृताशीं संयुक्त होवो. हें हवि सुहुत असो. स्वतेजानें प्रकाशित होणारी कर्मासहित अहर्देवता रौहिण पुरोडाश होमानें संतुष्ट होवो. हें हवि सुहुत असो. स्वतेजानें प्रकाशित होणारी कर्मासहित रात्रिदेवता रौहिण पुरोडाशानें संतुष्ट होवो. हें हवि सुहुत असो. आम्ही अत्यंत वीर्यवान् अशा अग्नीमध्यें मधुर घृताचा होम केला. हे घर्मदेवा, तुझा हुतशेष अंश आम्ही भक्षण करितों. तुला नमस्कार असो. आमची हिंसा करूं नकोस ॥ १६ ॥

विनियोग—' अभीमं ' या मंत्रानें महावीराला आसन्दीवर (घडवंचीवर) ठेवावें.

अभीमं महिमा दिवं विप्रो बभूव सप्रथाः। उत श्रवसा पृथिवीꣳ सꣳ सीदस्व महाँ२॥ असि रोचस्व देववीतमꣳ। विधूममग्नेऽअरुषं मियेध्य सृज प्रशस्त दर्शतम् ॥ १७ ॥

अर्थ—हे अग्ने, तुझे ऐश्वर्य द्युलोकाला पराजित करितें तें ऐश्वर्य सर्वव्यापी विस्तीर्ण असें आहे व तें धन आणि कीर्तीनें पृथ्वीलाही पराजित करितें. हे यज्ञार्ह व प्रशस्त अग्ने, तूं या कमलपत्रावर चांगला बैस. तूं मोठा आहेस याकरितां प्रकाशित हो. तसेंच तूं देवांना अतिशयेंकरून संतुष्ट करणारा आहेस. तूं दिसण्यांत उत्तम व प्रकाशमान असा धूर सोड ॥ १७ ॥

विनियोग—' याते घर्म ' इत्यादि मंत्रांनीं अध्वर्यूनें घृताचा होम करावा.

या ते घर्म दिव्या शुग्या गायत्र्याꣳ हविर्धाने। सा तऽआप्यायतां निष्ट्यायतां तस्यै ते स्वाहा। या ते घर्मान्तरिक्षे शुग्या त्रिष्टुब्भ्याग्नीध्रे। सा तऽआप्यायतां निष्ट्यायतां तस्यै ते स्वाहा। या ते धर्म पृथिव्याꣳ शुग्या जगत्याꣳ सदस्या। सा तऽआप्यायतां निष्ट्यायतां तस्यै ते स्वाहा ॥ १८ ॥

अर्थ—हे घर्मा, जी तुझी द्युलोकस्थ दीप्ति गायत्रीच्छंदांत व यज्ञगृहांत प्रवेश

करिती झाली ती वाढो व दृढ होवो. त्या दीक्षीला व तुला हें हवि सुहुत असो. हे धर्मा, जी तुझी अंतरिक्षस्थ दीक्षि त्रिष्टुप्छंदांत व अग्नीध्रगृहांत प्रवेश करिती झाली ती वाढो व सुदृढ होवो. त्या दीक्षीला व तुला हें हवि सुहुत असो. हे धर्मा, पृथ्वीस्थ अशी जी दीक्षी जगतीच्छंदांत व यज्ञगृहांत प्रवेश करिती झाली ती वाढो व सुदृढ होवो. त्या दीक्षीला व तुला हें हवि सुहुत असो ॥ १८ ॥

विनियोग--होमानंतर ' क्षत्राय त्वा ' हा मंत्र म्हणून अध्वर्यूनें पत्नीला पुढें करून शालागृहांतून बाहेर पडावें.

क्षत्रस्य त्वा परस्पाय ब्रह्मणस्तन्वं पाहि । विशस्त्वाधर्मेणा वयमनुक्रामाम सुविताय नव्यसे ॥ १९ ॥

अर्थ--हे धर्मा, आम्ही तुझें अनुगमन करितों (तुझ्या मागून जातों) तूं क्षत्रियाच्या व सूर्याच्या उत्तम अशा संरक्षणाकरितां ब्राह्मणाच्या शरीरावें रक्षण कर. व आम्ही नूतन अशा कर्मसिद्धीकरितां यज्ञाच्या धारणाच्या निमित्तानें तुझ्यामागून जाऊं ॥ १९ ॥

विनियोग—' चतुःस्रक्तिः ' या मंत्रानें प्रवृज्जनीय महावीराचें उत्तर वेदीवर स्थापन करावें.

चतुः÷ स्रक्तिर्नाभिर्ऋतस्य सप्रथाः स नो विश्वायुः÷ सप्रथाः स नः सर्वायुः÷ सप्रथाः÷ । अप द्वेषोऽअप ह्वरोऽन्यव्रतस्य साश्चिम ॥ २० ॥

अर्थ—तो धर्म, आम्हांला पूर्ण आयुष्य देवो. (येथें आदरार्थ पुनरुक्ति केली आहे) या धर्माला चारी दिशेला चार कान आहेत. तो यज्ञावें बंधनस्थान विस्तीर्ण जगाला आयुष्य देणारा व सर्वत्र प्रसिद्ध करणारा असा आहे. हे धर्मा, तुझ्या प्रसादानें आमचा द्वेष जावो व आमचा जन्ममरणात्मक संसार चुको. मनुष्यापेक्षां वेगळें कार्य अर्थात् जगत् रक्षणरूपी कार्य करणारा जो परमात्मा त्याची आम्ही सेवा करितों ॥ २० ॥

विनियोग—' धर्मैतत्ते ' या मंत्रानें पात्रामध्यें दूध ओतावें.

धर्मैतत्ते पुरीषं तेन वर्धस्व चा च प्यायस्व । वर्धिषीमहि च वयमा च प्यासिषीमहि ॥ २१ ॥

अर्थ—हे घर्मा, हें दुग्ध तुझें पूरक अन्न आहे. तूं दुग्धानें वाढ व संतुष्ट हो. आम्ही तुझ्या प्रसादानें वाढूं व आमच्या पशूंची सर्व बाजूनें वृद्धि करूं ॥ २१ ॥

विनियोग—' अचिक्रदत् ' या मंत्रानें उत्सादन स्थलीं सिञ्चन करावें.

अचिक्रदद्वृषा हरिर्महान्मित्रो न दर्शतः । सꣳ सूर्येण दिद्युतद्वुवधिर्निधिः ॥ २२ ॥

अर्थ—आहुतिद्वारानें वृष्टि करणारा घर्म त्यांत दूध ओतलें असतां शब्द करिता झाला. तो हरितवर्ण मोठा व मित्रासारखा सुंदर आहे म्हणून सूर्यासारखा प्रकाशतो. तो जलाचा धारक असून सुखांचा निधि आहे ॥ २२ ॥

विनियोग—' सुमित्रिया नः ' हा मंत्र म्हणून यजमानपत्नीसहित सर्व ऋत्विजांनीं मार्जन करावें.

सुमित्रिया नऽआपऽओषधयः सन्तु दुर्मित्रियास्तस्मै सन्तु योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मः ॥ २३ ॥

अर्थ—जलें व ओषधि आमच्याशीं चांगली मैत्री करोत. व जो आमचा द्वेष करितो व आम्ही ज्यांचा द्वेष करितों त्यांच्याशीं जलें व ओषधि शत्रुत्व करोत ॥२३॥

विनियोग—उद्वयं हा मंत्र म्हणून यजमानानें ईशान्य दिशेकडे जावें.

उद्वयं तमसस्परि स्वः पश्यन्तऽउत्तरम् । देवं देवत्रा सूर्यमगन्म ज्योतिरुत्तमम् ॥ २४ ॥

अर्थ—आम्ही उत्कृष्ट अशा स्वर्गाकडे पाहणारे होत्साते, तमोबहुल अशा या लोकांतून बाहेर पडलों. आणि देवलोकांत सूर्याकडे पहात पहात आम्ही ब्रह्मलोकास प्राप्त झालों ॥ २४ ॥

विनियोग—यजमानानें मागें न पाहतां ईशान्य दिशेकडून येऊन ' एधोसि ' या मंत्रानें आहवनीयांत एका समिधेचा होम करावा.

एधोऽस्येधिषीमहि । समिदसि तेजोऽसि तेजो मयि धेहि ॥ २५ ॥

अर्थ—हे समिधे, तूं प्रदीप्त करणारी आहेस म्हणून आम्ही धनादिकांची वृद्धि मिळवूं. हे समिधे, तूं तेजोरूपी आहेस म्हणून मजमध्यें तेज स्थापन कर ॥ २५ ॥

विनियोग—' यावती ' इत्यादि मंत्रानें सपवित्र अशा अग्निहोत्र हवणीमध्यें दधिघर्माचें ग्रहण करावें.

यावती द्यावापृथिवी यावच्च सप्त सिन्धवो वितस्थिरे । तावन्तमिन्द्र ते ग्रहमूर्जा गृह्णाम्यक्षितं मयि गृह्णाम्यक्षितम् ॥ २६ ॥

अर्थ--हे इंद्रा, तुझ्या अन्नसहित अहिंसित पात्राचें तितकेंच प्रमाण मी ग्रहण करितों कीं जें प्रमाण घेतलें असतां माझ्या यज्ञाचा क्षय होणार नाहीं. त्या प्रमाणामध्यें द्यावा पृथिवीचें परिमाण व सप्तसमुद्रांचें परिमाण विशेषेंकरून स्थित झालें. (द्यावा पृथिवी आणि सप्त समुद्र यांच्या इतका मोठा दधिघर्म मी ग्रहण करतों) ॥ २६ ॥

विनियोग--' मयि त्यत् ' या मंत्रानें यजमान व ऋत्विजांनीं हुतशेषाचें भक्षण करावें.

मयि त्यदिन्द्रियं बृहन्मयि दक्षो मयि क्रतुः । घर्मस्त्रिशुग्विराजति विराजा ज्योतिषा सह ब्रह्मणा तेजसा सह ॥ २७ ॥

अर्थ--मोठें असें तें वीर्य संकल्पसिद्धि आणि जगप्रसिद्ध सूर्याचें तेज व वेदत्रयात्मक तेज यांच्यासह तीन दीप्तींनीं युक्त असा घर्म माझे ठायीं विराजित होवो ॥ २७ ॥

विनियोग--' पयस ' इत्यादि मंत्राचा दधिघर्मभक्षणांतच विनियोग आहे. ' त्विषः संवृक् ' या मंत्रानें महाव्रतीय दिवशीं दधिघर्माचें भक्षण करावें.

पयसो रेतऽआर्धृतं तस्य दोहमशीमहि बृहत्तरामुत्तराꣳ समाम् । त्विषः संवृक् क्रत्वे दक्षस्य ते सुषुम्णस्पते सुषुम्णाग्निहुतꣳ । इन्द्रपीतस्य प्रजापतिमक्षितस्य मधुमतऽउपहूतऽउपहूतस्य भक्षयामि ॥ २८ ॥

अर्थ--दुग्धाचा सारभाग व जगदुत्पत्तीचें बीज असें जे दधिघर्म तें आम्ही दर वर्षी भक्षण करूं. (आम्ही सर्वदा यज्ञ करणारे होऊं.) हे कान्तीचा स्वीकार करणाऱ्या सुखदात्या दधिघर्मा, मला बोलाविल्यानंतर मी तुझा अंश भक्षण करीत आहें. तूं संकल्प सिद्ध करणारा सुखकारक अमींत हवन केला गेलेला इंद्रानें व प्रजापतीनें भक्षिलेला मधुरस्वादयुक्त व ज्याचें आव्हान केलें असा आहेस ॥ २८ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृते** माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** अष्टत्रिंशोऽध्यायः ॥ ३८ ॥

इति अष्टत्रिंशोऽध्यायः समाप्तः ।

अथ एकोनचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ३९ ॥



विनियोग--या अध्यायामध्यें सहाव्या मंत्रापर्यंत प्रायश्चित्ताच्या आहुति सांगितल्या आहेत.

स्वाहा प्राणेभ्यः साधिपतिकेभ्यः। पृथिव्यै स्वाहाग्नये स्वाहान्तरिक्षाय स्वाहा वायवे स्वाहा। दिवे स्वाहा सूर्यीय स्वाहा ॥ १ ॥

अर्थ--हिरण्यगर्भरूपी अधिपतीसह प्राणांना ही पूर्णाहुति सुहुत असो. पृथ्वी, अग्नि, अंतरिक्ष, वायु, द्युलोक, सूर्य यांना हें हवि सुहुत असो ॥ १ ॥

दिग्भ्यः स्वाहा चन्द्राय स्वाहा नक्षत्रेभ्यः स्वाहाद्भ्यः स्वाहा वरुणाय स्वाहा। नाभ्यै स्वाहा पूताय स्वाहा ॥ २ ॥

अर्थ—दिशा, चंद्र, नक्षत्र, अप, वरुण, नाभिदेवता व पवित्र करणारा देव यांना हें हवि सुहुत असो ॥ २ ॥

वाचे स्वाहा प्राणाय स्वाहा प्राणाय स्वाहा। चक्षुषे स्वाहा चक्षुषे स्वाहा श्रोत्राय स्वाहा श्रोत्राय स्वाहा ॥ ३ ॥

अर्थ--वाणी, प्राण, इंद्रिय, चक्षु, श्रोत्र यांच्या अधिष्ठातृ देवांना ही आहुति सुहुत असो ॥ ३ ॥

मनसः काममाकूतिं वाचः सत्यमशीय। पशूनाꣳ रूपमन्नस्य रसो यशः श्रीः श्रयतां मयि स्वाहा ॥ ४ ॥

अर्थ--मी मनाचा अभिलाष, प्रयत्न, वाणीचें सत्य यांना प्राप्त होवो म्हणजे मीं प्रयत्न करावा व खरें बोलावें. माझे ठायीं हें सर्व राहो. पशूंची शोभा, अन्नाचा रस, कीर्ति व लक्ष्मी यांच्या अधिष्ठातृ देवतांना हें हवि सुहुत असो ॥ ४ ॥

प्रजापतिः संभ्रियमाणः सम्राद् संभृतो वैश्वदेवः सꣳ सन्नो घर्मः प्रवृक्तस्तेजऽउद्यतऽआश्विनः पयस्यानीयमाने पौष्णो विष्पन्दमाने मारुतः क्लृप्तन्। मैत्रः शरसि संताय्यमाने वायव्यो म्रियमाणऽआग्नेयो हूयमानो वाग्घुतः ॥ ५ ॥

अर्थ--महावीर तयार होत असतां फुटला तर त्याबद्दल प्रायश्चित्त. होमाची देवता प्रजापति, तो पूर्ण बनवून झाल्यावर फुटला तर त्याची प्रायश्चित्त देवता सम्राट्, तो अधिश्रयणाचे (शिजविण्याच्या) पूर्वी फुटला तर त्याची प्रायश्चित्त देवता विश्वेदेव, शिजवून खालीं उतरण्यापूर्वी फुटल्यास प्रायश्चित्त देवता घर्म, अग्नीवरून काढून अजादुग्ध त्यावर ओतण्याच्यापूर्वी फुटल्यास प्रायश्चित्त देवता तेजस्, अजादुग्ध ओतीत असतां फुटल्यास प्रायश्चित्त देवता अश्विनीकुमार, ओतावयाचें दूध भांड्यांतून बाहेर पडत असतां घर्म फुटल्यावर त्याची देवता पूषा, तूप त्यावर घातलें जात असतां फुटल्यास त्याची प्रायश्चित्त देवता मरुत्, त्यावर दूध ओतलें जात असतां जो तरंग उत्पन्न होतो त्यावेळीं घर्म फुटला असतां त्याची प्रायश्चित्त देवता मित्र, होमाचेपूर्वी आहवनीयाकडे नेला जात असतां त्याची देवता वायु, होमाचे वेळीं फुटल्यास त्याची प्रायश्चित्त देवता अग्नि, होमानंतर फुटल्यास त्याची प्रायश्चित्त देवता वाग्देवी, (ह्या आहुति घृताच्या आहेत) ॥ ५ ॥

सविता प्रथमेऽहन्नग्निर्द्वितीये वायुस्तृतीयऽआदित्यश्चतुर्थे चन्द्रमा÷ पञ्चमऽऋतु÷ षष्ठे मरुत÷ सप्तमे बृहस्पतिरष्टमे मित्रो नवमे वरुणो दशमऽइन्द्रऽएकादशे विश्वेदेवा द्वादशे ॥ ६ ॥

अर्थ--पहिल्या दिवशीं घर्म फुटल्यास प्रायश्चित्त देवता सविता, दुसऱ्या दिवशीं अग्नि, तिसऱ्या दिवशीं वायु, चवथ्या दिवशीं आदित्य, पांचव्या दिवशीं चंद्रमा, सहाव्या दिवशीं ऋतु, सातव्या दिवशीं मरुत्, आठव्या दिवशीं बृहस्पति, नवव्या दिवशीं मित्र, दहाव्या दिवशीं वरुण, अकराव्या दिवशीं इंद्र, बाराव्या दिवशीं विश्वेदेव. (महावीर भेदसंबंधीं प्रायश्चित्तें संपलीं) ॥ ६ ॥

विनियोग--चयन यज्ञामध्यें मरुत्देवताक सहा पुरोडाश होमल्यावर अनूच्च नांवाचा सातवा पुरोडाश ' उग्रश्च ' या मंत्रानें होमावा.

उग्रश्च भीमश्च ध्वान्तश्च धुनिश्च । सासह्वाँश्चाभियुग्वा च विक्षिप÷ स्वाहा ॥ ७ ॥

अर्थ--१ उग्र २ भीम (भयंकर) ३ ध्वान्त (शब्द करणारा) ४ धुनि (शत्रूंना कापविणारा) ५ सासौहान (शत्रूंचा पराजय करणारा) ६ अभियुग्वा (आमच्या समोर येणारा) ७ विक्षिप शत्रूंना पळवून देणारा. या सात मरुत देवतांना हें हवि सुहुत असो ॥ ७ ॥

विनियोग—'अग्निꣳ हृदयेन' इत्यादि मंत्रांनीं आज्याच्या आहुति द्याव्या.

अग्निꣳ हृदयेनाशनिꣳ हृदयाग्रेण पशुपतिं कृत्स्नहृदयेन भवं यकृत। शर्वं मतस्नाभ्यामीशानं मन्युना महादेवमन्तꣳ पर्शव्येनोग्रं देवं वनिष्युना वसिष्ठहनुꣳ शिङ्गीनि कोश्याभ्याम्॥ ८॥

अर्थ—हृदयरूपी अंगांनीं मी अग्निदेवाला संतुष्ट करतों. तसेंच हृदयाग्र भागानें अशनिदेवाला, संपूर्ण हृदयानें पशुदेवाला, यकृतानें भवाला, हृदयांतील मतस्नसंज्ञक अस्थींनीं शर्वदेवाला, अश्वाच्या क्रोधानें ईशानदेवाला, पार्श्वाच्या अस्थींतील मांसानें महादेवाला, मोठ्या आतड्यानें उग्रदेवाला, गंडस्थलाच्या अधोभागानें व हृदयकोशस्थ पिंडीकोशांनीं शिंगिसंज्ञक देवांना संतुष्ट करितों॥ ८॥

उग्रं लोहितेन मित्रꣳ सौव्रत्येन रुद्रं दौव्रत्येनेन्द्रं प्रक्रीडेन मरुतो बलेन साध्यान्प्रमुदा। भवस्य कण्ठयꣳ रुद्रस्यान्तꣳ पार्श्व्यं महादेवस्य यकृच्छर्वस्य वनिष्युꣳ पशुपतेरꣳ पुरीतत्॥ ९॥

अर्थ—रक्तानें उग्र देवाला, उत्तम कर्मानें मित्रदेवाला, दुष्ट कर्मानें रुद्र देवाला, चांगल्या क्रीडेनें इंद्र देवाला, सामर्थ्यानें मरुत् देवांना, प्रमोदानें साध्य देवाला, कंठांतील मांसानें भवदेवाला, पार्श्वस्थ मांसानें रुद्र देवाला, यकृतानें महादेवाला, मोठ्या आंतड्यानें शर्वाला व हृदयाच्छादक आंतड्यानें पशुपति देवाला मी प्रसन्न करितों. ॥ ९॥

विनियोग—'लोमभ्यः स्वाहा' येथून बेचाळीस प्रायश्चित्ताच्या आहुति सांगितल्या आहेत.

लोमभ्यꣳ स्वाहा लोमभ्यꣳ स्वाहा त्वचे स्वाहा त्वचे स्वाहा लोहिताय स्वाहा लोहिताय स्वाहा मेदोभ्यꣳ स्वाहा मेदोभ्यꣳ स्वाहा। माꣳसेभ्यꣳ स्वाहा माꣳसेभ्यꣳ स्वाहा स्नावभ्यꣳ स्वाहा स्नावभ्यꣳ स्वाहास्थभ्यꣳ स्वाहास्थभ्यꣳ स्वाहा मज्जभ्यꣳ स्वाहा मज्जभ्यꣳ स्वाहा। रेतसे स्वाहा पायवे स्वाहा॥ १०॥

अर्थ—लोम, त्वक्, लोहित, मेद, मांस, स्नायु, अस्थि, मज्जा, वीर्य, गुद (हीं अंगें आहेत.)॥ १०॥

(यापुढें आयास वगैरे देवांचीं नावें आहेत.)

आयासाय स्वाहा प्रायासाय स्वाहा संयासाय स्वाहा वियासाय स्वाहोद्यासाय स्वाहा । शुचे स्वाहा शोचते स्वाहा शोचमानाय स्वाहा शोकाय स्वाहा ॥ ११ ॥

अर्थ—आयास, प्रायास, संयास, वियास, उद्यास, शुक, शोचत्, शोचमान, शोक ॥ ११ ॥

तपसे स्वाहा तप्यते स्वाहा तप्यमानाय स्वाहा तप्ताय स्वाहा घर्माय स्वाहा । निष्कृत्यै स्वाहा प्रायश्चित्यै स्वाहा भेषजाय स्वाहा ॥ १२ ॥

अर्थ—तपस्, तप्यत्, तप्यमान, तप्त, धर्म, निष्कृति, प्रायश्चित्ति, भेषज ॥ १२ ॥

यमाय स्वाहान्तकाय स्वाहा मृत्यवे स्वाहा ब्रह्मणे स्वाहा ब्रह्महत्यायै स्वाहा विश्वेभ्यो देवेभ्यः स्वाहा द्यावापृथिवीभ्याꣳ स्वाहा ॥ १३ ॥

अर्थ—यम, अन्तक, मृत्यु, ब्रह्मन्, ब्रह्महत्या, विश्वेदेव या देवांना हें हवि सुहुत असो. पूर्वोक्त हविर्द्रव्यें द्यावापृथिवीपर्यंत देवतांना सुहुत असोत. (येथें कर्मकांड संपलें) ॥ १३ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्याय श्रीधरशास्त्रिकृते** माध्यन्दिनीय वाजसनेयि संहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** एकोनचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ३९ ॥

इति एकोनचत्वारिंशत्तमोऽध्यायः समाप्तः ।



अथ चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४० ॥



विनियोग--आतांपावेतों (एकोणचाळिस अध्यायपावेतों) कर्मकाण्ड सांगितलें, या चाळिसाव्या अध्यायांत कर्मानें शुद्धचित्त झालेल्या मुमुक्षूकरितां ज्ञान व उपासना सांगतात. 'ईशावास्य' या अध्यायाचा कर्मांत विनियोग शक्य नाहीं कारण त्यांत शुद्ध अद्वैत ब्रह्माचें प्रतिपादन आहे.

ईशा वास्यमिदꣳ सर्वं यत्किंच जगत्यां जगत् । तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्यस्विद्धनम् ॥ १ ॥

अर्थ—या तीनही लोकांत असलेल्या सर्व स्थावरजंगम वस्तु त्या परमात्मस्वरूपानें व्याप्त करण्यास योग्य आहे. म्हणजे मी परमात्मस्वरूपी आहे व इतर कोणतीही वस्तु सत्य नाहीं, असा विचार करावा. त्या सर्व वस्तूंचा त्याग करून म्हणजे ही वस्तु माझी उपभोग्य आहे अशी आसक्ति सोडून त्या वस्तूचा स्वीकार करावा. कारण कोणतीही वस्तु कोणाच्याही मालकीची नाहीं ॥ १ ॥

विनियोग—वरील आत्मज्ञानाला असमर्थ जो पुरुष त्यास कर्मे सांगतात.

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतꣳ समाः । एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ॥ २ ॥

अर्थ—अग्निहोत्रादि निष्काम कर्मे करूनच शंभर वर्षे वांचावें (मनुष्याचें आयुष्य वेदांत शंभर वर्षेंच सांगितलें आहे.) हींच पद्धत पुरुषत्वाचा अभिमान कायम असतां अशुभ कर्माचा संसर्ग होणार नाहीं अशी आहे. त्याशिवाय दुसरी पद्धत कर्मलेप न होण्याची नाहीं. (इतर कोणत्याही तऱ्हेनें कर्म केलें असतां पुण्यपापांचा लेप होतो.) ॥ २ ॥

असुर्या नाम ते लोकाऽअन्धेन तमसावृताः । तांस्ते प्रेत्यापिगच्छन्ति ये के चात्महनो जनाः ॥ ३ ॥

अर्थ--(काम्य कर्म करणारांची या मंत्रांत निंदा केली आहे.) जे लोक आत्मघातकी असतात म्हणजे काम्य कर्मांत तत्पर होऊन आत्म्याला ओळखत नाहीं ते मेल्यानंतर असुर लोकांना प्राप्त होतात. ते असुर लोक अज्ञानानें आच्छादित झालेले आहेत ॥ ३ ॥

अनेजदेकं मनसो जवीयो नैनद्देवाऽआप्नुवन्पूर्वमर्शत् । तद्धावतोऽन्यानत्येति तिष्ठत्तस्मिन्नपो मातरिश्वा दधाति ॥ ४ ॥

अर्थ--(मुमुक्षूंना प्राप्य जें ब्रह्म त्याचें या मंत्रांत वर्णन आहे) ब्रह्म न हलणारें सर्वदा एक स्वरूपी अद्वितीय असें, मनापेक्षांही अधिक वेगवान् असें आहे. तें ब्रह्म चक्षुरादि इंद्रियांना प्राप्त होत नाहीं कारण तें त्यांच्या अगोदरच पलीकडे जातें. तें स्वतः अविकृत स्वरूपांत राहून धावणाऱ्या इंद्रियांना ओलांडून जातें. त्या नित्य चैतन्यरूपी आत्म्याची स्थिति आहे म्हणूनच वायु सर्व कर्मे धारण करितो ॥ ४ ॥

तदेजति तन्नैजति तद्दूरे तद्वन्तिके । तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यतः ॥ ५ ॥

अर्थ--(पूर्वीच्या मंत्रांतीलच अर्थ पुनः सांगतात कारण ब्रह्मतत्त्व दुर्ज्ञेय आहे) तें ब्रह्म हालचाल वगैरे क्रिया करणारें आहे व तशी क्रिया करणारेंही नाहीं. आदित्य रूपानें राहणारें असल्यामुळें तें ब्रह्म आपणांपासून दूर आहे व पृथ्वीरूपी असल्यामुळें तें आपल्या जवळ आहे. व विज्ञान स्वरूपानें सर्व प्राणिसमुदायाच्या आंत आहे व जडस्वरूपानें याच प्राणिसमुदायाच्या बाहेरही आहे ॥ ५ ॥

यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्नेवानुपश्यति । सर्वभूतेषु चात्मानं ततो न विचिकित्सति ॥ ६ ॥

अर्थ--(या मंत्रांत उपासनेचा प्रकार सांगतात) जो मुमुक्षु पुरुष सर्व भूतांना आत्मस्वरूपांतच पाहतो म्हणजे माझ्याहून भूतें व्यतिरिक्त नाहींत असें समजतो व आत्मा सर्व भूतांत व्याप्त झाला आहे असें समजतो त्याला (त्या मुमुक्षु पुरुषाला) कसलाही संशय राहत नाहीं ॥ ६ ॥

यस्मिन्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः । तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः ॥ ७ ॥

अर्थ—(हीच गोष्ट पुनः सांगतात) ज्या अद्वैत अवस्थेंत सर्व भूतें आत्मस्वरूपीच झालीं त्या अवस्थेंत मुमुक्षु आत्म्याचें एकत्व पाहतो. त्यावेळीं त्याला कसला मोह व कसला शोक होणार ? कारण त्याच्या संसाराचा पूर्ण उच्छेद झाला आहे ॥ ७ ॥

स पर्यगाच्छुक्रमकायमव्रणमस्नाविरꣳ शुद्धमपापविद्धम् । कविर्मनीषी परिभूः स्वयंभूर्याथातथ्यतोऽर्थान्व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः ॥ ८ ॥

अर्थ—(पूर्वोक्त रीतीनें आत्मोपासना केली असतां प्राप्त होणारें जें फल तें सांगतात) तो ब्रह्मोपासक ब्रह्माला प्राप्त होतो तें ब्रह्म विज्ञानस्वरूपी, शुद्ध देहरहित, व्रणरहित, स्नायुरहित, सत्वादिगुणांनीं भ्रष्ट न होणारें, पापाचा संसर्ग नसलेलें असें आहे. तो उपासक अनंत वर्षेपर्यंत आपलेपणा टाकून सर्व उपभोगांचें स्वरूप ओळखून त्यांचा स्वीकार करतो. तो भूतकालदर्शी, बुद्धिमान्, ज्ञानानें सर्व उपभोग्य वस्तूंचा पराजय करणारा व स्वयंभू ब्रह्मरूपी असा आहे ॥ ८ ॥

अन्धं तमः प्रविशन्ति येऽसंभूतिमुपासते । ततो भूय इव ते तमो य उ संभूत्याꣳ रताः ॥ ९ ॥

अर्थ—(या पुढें उपासनेसंबंधीं सहा मंत्र सांगातात) जे नास्तिक लोक पुनर्जन्म नाहीं असें समजतात ते तामस व अंधकारयुक्त नरकाला प्राप्त होतात. तसेंच जे पुनर्जन्म असल्यानें चांगला जन्म मिळण्याकरितां पुनः पुनः कर्में करीत राहतात व आत्मज्ञानास पराङ्मुख होतात ते त्यापेक्षांही अधिक भयंकर नरकाला जातात ॥ ९ ॥

अन्यदेवाहुः संभवादन्यदाहुरसंभवात् । इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ॥ १० ॥

अर्थ—कार्यब्रह्माच्या उपासनेचें अणिमा, महिमा वगैरे सिद्धिप्राप्ति हें फल आहे व अव्याकृतोपासनेचें त्याहून वेगळेंच फल आहे असें तत्त्व समजून सांगणाऱ्या बुद्धिवान् पुरुषांकडून आम्ही ऐकलें ॥ १० ॥

संभूतिं च विनाशं च यस्तद्वेदोभयꣳ सह । विनाशेन मृत्युं तीर्त्वा संभूत्यामृतमश्नुते ॥ ११ ॥

अर्थ—सर्व जगाच्या उत्पत्तीचें स्थान जें परब्रह्म आणि विनाशी शरीर हें जो एकत्र समजतो म्हणजे मी देहभिन्न असून प्रारब्धाच्या प्रेरणेनें ज्ञानोत्पत्तिसाधक निष्काम कर्में मी करितों असें समजतो, तो विनाशी शरीरानें मृत्यु तरून म्हणजे अंतःकरणशुद्धि प्राप्त करून आत्मज्ञानानें मोक्ष मिळवितो ॥ ११ ॥

अन्धं तमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते । ततो भूयऽइव ते तमो यऽउ विद्यायाꣳ रता ॥ १२ ॥

अर्थ—(जे कर्मनिष्ठ पुरुष जन्मभर कर्मच करीत राहतात त्यांच्याकरितां विद्या व अविद्या यांचा समुच्चय सांगण्याच्या हेतूनें केवळ विद्येची व केवळ अविद्येची निंदा सांगतात.) जे लोक केवल अग्निहोत्रादि स्वर्गफलक कर्में करतात. ते अंधकाररूपी नरकाला प्राप्त होतात म्हणजे पुनः पुनः संसारांत येतात व जे चित्ताच्या एकाग्रतेपूर्वी केवळ देवतोपासनाच करितात ते त्याहूनही अधिक भयंकर नरकाला प्राप्त होतात ॥ १२ ॥

अन्यदेवाहुर्विद्यायाऽअन्यदाहुरविद्यायाः । इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ॥ १३ ॥

अर्थ--देवतोपासनेचें फल वेगळें आहे व अग्निहोत्रादि सकाम कर्मांचें फल वेगळें आहे असें तत्त्व समजून सांगणाऱ्या बुद्धिमान् पुरुषाकडून आम्हीं ऐकलें ॥ १३ ॥

विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयꣳ सह । अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययामृतमश्नुते ॥ १४ ॥

अर्थ--(आतां कर्म व देवतोपासना यांचा समुच्चय सांगतात) जो मुमुक्ष पुरुष कर्म व देवतोपासना एकाच मनुष्यास समुच्चयानें करतां येतात असेंच समजतो तो अग्निहोत्रादि कर्मानें मृत्यु तरून जाऊन अंतःकर-

णाची एकाग्रता झाल्यावर देवतोपासनेनें देवतास्वरूपी अमृतत्वाला प्राप्त होतो ॥ १४ ॥

वायुरनिलममृतमथेदं भस्मान्तꣳ शरीरम् । ओ ३ म् क्रतो स्मर ॥ क्लिबे स्मर कृतꣳ स्मर ॥ १५ ॥

अर्थ—(ज्यानें उपासना केली असा योगी अंतकालीं प्रार्थना करितो.) मरणाऱ्या माझें सप्तदशावयवात्मक लिंग शरीर सूत्रात्मसंज्ञक अमृतस्वरूपी वायूला प्राप्त होवो. व हें स्थूल शरीर भस्म होऊन जावो. योग्याला उपास्य व ब्रह्माचें प्रतीक 'ओम्' हें आहे. हे संकल्पात्मक अग्ने, मी ब्रह्मचर्याश्रमांत व गृहस्थाश्रमांत तुझें आराधन केलें त्याचें स्मरण कर. व त्या आराधनाप्रमाणें मला देण्यास योग्य जो लोक तूं ठरविला आहेस त्याचें स्मरण कर. तसेंच मी लहानपणापासून आतांपर्यंत जें कर्म केलें त्याचें स्मरण कर. (माझा मृत्युकाल जवळ आला आहे म्हणून या सर्व वरील गोष्टींचें स्मरण कर.) ॥ १५ ॥

अग्ने नयꣳ सुपथा रायेऽअस्मान्विश्वानि देव वयुनानि विद्वान् । युयोध्यस्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठां ते नमऽउक्तिं विधेम ॥ १६ ॥

अर्थ—(या मंत्रांत योगी गमनमार्गाची प्रार्थना करितो) हे प्रकाशक अग्ने, आम्हांला उत्तम अशा देवमार्गानें (उत्तर मार्गानें) ने. व तेथें आम्हांला मुक्तिरूपी धन दे. तूं आमचीं सर्व कर्में जाणतोस म्हणून आमचें जें कुटिल पाप तें आमच्यापासून दूर कर. त्यायोगें शुद्ध झालेले आम्ही तुजकारणें पुष्कळ नमस्कार-वाक्यें बोलूं. म्हणजे नमस्कार करून आम्ही तुझी सेवा करूं ॥ १६ ॥

हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् । योऽसावादित्ये पुरुषः सोऽसावहम् ॥ १७ ॥

अर्थ—(या मंत्रांत आदित्याची उपासना सांगितली आहे) सुवर्णासारख्या प्रकाशक तेजोमंडलानें सूर्यमंडलस्थ अविनाशी ब्रह्मपुरुषाचें शरीर झांकलें गेलें आहे. तथापि या सूर्यमंडलांत असलेला जो ब्रह्मपुरुष तो मीच आहें. म्हणजे आदित्यस्थ पुरुष आणि या जगांत असलेला पुरुष हे व मी अभिन्न (एकच) आहोंत. 'ओम्'


हें ब्रह्माचें नांव आहे. त्या ब्रह्माचें आकाश स्वरूपानें म्हणजे व्यापक स्वरूपानें ध्यान करावें ॥ १७ ॥

इति **श्रीपाठकोपाभिधश्रीधरशास्त्रिकृते** माध्यन्दिनीय-
वाजसेनेयिसंहितानुवादे **वेदप्रकाशाख्ये** चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४० ॥

इति **श्रीपाठकोपाभिधमहामहोपाध्यायश्रीधरशास्त्रिकृतो**
माध्यन्दिनीयवाजसनेयिसंहितानुवादो **वेदप्रकाशाख्यः** समाप्तः । श्रीशिवार्पणमस्तु ॥

ओ ३ म् खं ब्रह्म ॥

इति चत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ।



मन्त्रसूची

शुक्लयजुर्वेदसंहितागतमन्त्रकोशः ।

मन्त्र	पृष्ठ
अ	
अक्रन्कर्म कर्मकृतः	४१
अक्रन्ददग्निः स्तनयन्निव	१८०
अक्रन्ददग्निः स्तनयन्निव	१८३
अक्रन्ददग्निः स्तनयन्निव	१८६
अक्षन्नमीमदन्त ह्यव	४२
अक्षराजाय कितवं रुता	४८४
अग्नऽआयूꣳषि पवस	३२४
अग्नऽआयूꣳषि पवस	५३७
अग्न इन्द्र वरुण मित्र देवा	५०७
अग्नये कव्यवाहनाय	२८
अग्नये कुटरूनालभते	४१५
अग्नये गायत्राय त्रिवृते	४७७
अग्नये गृहपतये स्वाहा	१५२
अग्नये त्वा महꣳ वरुणो	११०
अग्नयेऽनीकवते प्रथमजान्	४१३
अग्नयेऽनीकवते रोहितान्	४७७
अग्नये पीवनं पृथिव्यै पीठ	४८५
अग्नये स्वाहा सोमाय	३८०
अग्नये स्वाहा सोमाय	३८६
अग्ना ३ इ पत्नीवन्त्सजू	११५
अग्नावग्निश्चरति प्रविष्ट	६२
अग्निं तं मन्ये यो वसु	२४९
अग्निं दूतं पुरो दधे	३८३
अग्निः पशुरासीत्तेनाय	३९४
अग्निः पृथुर्धर्मणस्पति	१५५
अग्निः प्रियेषु धामसु	२०५
अग्निमद्य होतारमवृणीता	३७७
अग्निमद्य होतारमवृ	४५६
अग्निमद्य होतारमवृ	४६२
अग्निं युनज्मि शवसा	३०८
अग्निरस्मि जन्मना जात	३१२
अग्निरेकाक्षरेण प्राणमुद	१४१
अग्निर्ऋषिः पवमान	४३६
अग्निर्ज्योतिषा ज्योतिष्मान्	२१५
अग्निर्ज्योतिर्ज्योतिरग्निः	३२
अग्निर्देवता वातो देवता	२३०
अग्निर्मूर्धा दिवः ककुत्पतिः	३२
अग्निर्मूर्धा दिवः ककुत्	२०९
अग्निर्मूर्धा दिवः ककुत्	२४४
अग्निर्वृत्राणि जङ्घनत्	४९९
अग्निश्च पृथिवी च संनते	४३४
अग्निश्च मऽआपश्च मे	२९८
अग्निश्च मऽइन्द्रश्च मे	२९९

मन्त्र	पृष्ठ	मन्त्र	पृष्ठ
अग्निश्च मे घर्मश्च मे	३००	अग्ने पावक रोचिषा	२७३
अग्निष्वात्तानृ तुमतो हवा	३२९	अग्ने प्रेहि प्रथमो देव	२८७
अग्निष्वात्ताः पितरऽइह	३२८	अग्ने ब्रह्म गृभ्णीष्व	९
अग्निस्तिग्मेन शोचिषा	२७४	अग्नेऽभ्यावर्तिन्नभि मा	१८०
अग्निꣳस्तोमेन बोधय	३८२	अग्ने यत्ते दिवि वर्चः	१९०
अग्निꣳहृदयेनाशनिꣳ	५६३	अग्ने यत्ते शुक्रं यच्चन्द्रं	२०२
अग्निꣳहोतारं मन्ये	२५०	अग्ने युक्ष्वा हि ये तवाश्वासो	२१५
अग्नीषोमयोरुज्जितिमनूज्जेषं	२२	अग्नेरनीकमपऽआविवेशापां	११९
अग्नेऽअङ्गिरः शतं ते	१८०	अग्नेर्जनित्रमसि वृषणौ स्थ	६१
अग्नेऽअच्छा वदेह नः	१४०	अग्नेर्भागोऽसि दीक्षाया	२३२
अग्ने गृहपते सुगृहपति	२७	अग्नेर्वोऽपन्नगृहस्य सदसि	८९
अग्ने जातान्प्रणुदा नः	२३६	अग्ने वाजजिद्वाजं त्वा	१९
अग्ने तमद्याश्वं न स्तोमैः	२४९	अग्ने वाजस्य गोमत	२४७
अग्ने तमद्याश्वं न स्तोमैः	२८९	अग्ने वेहोत्रं वेर्दूत्यमपतां	२०
अग्ने तव श्रवो वयो	२०३	अग्ने व्रतपते व्रतं चरि	३
अग्ने त्वं नोऽअन्तमऽउत	३५	अग्ने व्रतपते व्रतमचारिषं	२७
अग्ने त्वं नोऽअन्तमऽउत	२५०	अग्ने व्रतपास्त्वे व्रतपा	६३
अग्ने त्वं नोऽअन्तमऽउत	४३२	अग्ने व्रतपास्त्वे व्रतपा	७७
अग्ने त्वं पुरीष्यो रयिमान्	१९३	अग्ने शर्ध महते सौभगाय	४९९
अग्ने त्वꣳ सुजागृहि	५२	अग्ने सहस्राक्ष शतमूर्धन्	२८७
अग्नेऽदब्धायोऽशीतम	२४	अग्ने सहस्व पृतना	१४३
अग्ने दिवोऽअर्णमच्छा	१९०	अग्नेस्तनूरसि वाचो	७
अग्ने नय सुपथा राये	७५	अग्नेस्तनूरसि विष्णवे त्वा	६१
अग्ने नय सुपथा राये	१०९	अग्ने स्वाहा कृणुहि जात	४४४
अग्ने नय सुपथा राये	५६९	अग्रा देवा उदिता सूर्यस्य	५०६
अग्ने पक्षतिर्वायोर्निपक्ष	४२१	अग्रेणीरसि स्वावेश	८०
अग्ने पत्नीरिहा वह	४३८	अग्ने बृहन्नुषसामूर्ध्वोऽअस्था	१८१
अग्ने पवस्व स्वपाऽअस्मे	१२३	अङ्गान्यात्मन्भिषजा	३३६

मन्त्र	पृष्ठ	मन्त्र	पृष्ठ
अङ्गिरसो नः पितरो नव	३२७	अद्या देवा उदिता सूर्यस्य	५०६
अचिक्रदद्वृषा हरिर्महान्	५५९	अधा यथा नः पितरः परा	३३०
अच्छयमेति शवसा घृत	४४२	अधा ह्यग्ने क्रतोर्भद्रस्य	२५०
अच्छिन्नस्य ते देवसोम	९८	अधि न इन्द्रैषां विष्णो सजा	५०७
अजस्रमिन्दुमरुषं भुर	२१६	अधिपत्न्यसि बृहती	२४१
अजारे पिशङ्गिला श्वा	४०४	अध्यवोचदधिवक्ता प्रथमो	२५६
अजीजनो हि पवमान	३८३	अध्वर्योऽअद्रिभिः सुत	३४६
अजो ह्यग्नेरजनिष्ट शोकात्	२१९	अनड्वान्वयः पङ्क्तिश्छन्दो	२२७
अति निहो अतिस्रिधो	४४१	अनड्वाहमन्वारभामहे	५३६
अति विश्वाः परिष्ठा	१९८	अनाधृष्टा पुरस्तात्	५४८
अत्यन्याँ२ऽअगां नान्याँ	७७	अनाधृष्यो जातवेदा	४४१
अत्र पितरो मादयध्वं	२८	अनु ते शुष्मं तुरयन्तमी	५११
अत्रा ते रूपमुत्तममपश्यं	४६७	अनुत्तमा ते मघवन्नकिर्नु	५१४
अथैतानष्टौ विरूपानाल	४८५	अनु त्वा माता मन्यतां	५४
अदब्धे भिः सवितः पायु	५१२	अनु त्वा रथो अनु मर्यो	४६८
अदब्धेभिः सवितः पायु	५१५	अनुनोद्यानुमतिर्यज्ञं	५२१
अदितिर्द्यौरदितिरन्तरिक्ष	४२७	अनु वीरैरनु पुष्यास्म	४३८
अदितिष्ट्वा देवी विश्व	१७२	अनेजदेकं मनसो जवीय	५६६
अदित्यास्त्वगस्यदित्यै	५८	अन्तरग्ने रुचा त्वमुखायाः	१८२
अदित्यास्त्वा पृष्ठे साद	२२४	अन्तरा मित्रावरुणा	४६५
अदित्यास्त्वा मूर्धन्नाजिघर्मि	५५	अन्तश्चरति रोचनास्य	३१
अदित्यै रास्नासि विष्णो	१५	अन्तस्ते द्यावापृथिवी	९५
अदित्यै रास्नास्यदितिष्टे	१७१	अन्धं तमः प्रविशन्ति	५६७
अदित्यै व्युन्दनमसि	१७	अन्धं तमः प्रविशन्ति	५६८
अदृश्रमस्य केतवो वि	१२३	अन्ध स्थान्धो वोभक्षीय	३४
अद्भ्यः क्षीरं व्यपिबत्	३३१	अन्नपतेऽन्नस्य नो देह्य	१७७
अद्भ्यः सम्भृतं पृथिव्यै	४५०	अन्नात्परिस्रुतो रसं	३३२
अद्भ्यः स्वाहा वार्भ्यः	३८६	अन्यदेवाहुर्विद्यायां	५६८

मन्त्र	पृष्ठ
अन्यदेवाहुः सम्भवात्	५६७
अन्यवापोऽर्धमासाना	४१८
अन्या वोऽअन्यामवत्वन्या	१९९
अन्वग्निरुषसामग्रमक्ष्यत्	१६०
अन्विदनुमते त्वं मन्या	५२१
अपश्यं गोपामनिपद्यमान	५४९
अपां गम्भन्त्सीद मा त्वा	२१३
अपाघमपकिल्बिषम	५३५
अपातामश्विना घर्मं	५५५
अपां त्वेमन्त्साधयाम्यपां	२९९
अपाधम दभिशस्तीर	५१८
अपां पृष्ठमसि योनिरग्नेः	१६४
अपां पृष्ठमसि योनि	२०६
अपां पेरुरस्यापो देवीः	८२
अपां फेनेन नमुचेः	३३१
अपामिदं न्ययनꣳ समुद्रस्य	२७२
अपाररुं पृथिव्यै देव	१३
अपार्ꣳरसमुद्व्यसꣳ सूर्ये	१३३
अपि तेषु त्रिषु पदेष्व	४०३
अपेत वीत विच सर्पतातो	१८९
अपेतो यन्तु पणयोसुम्न	५३२
अपो देवी मधुमती	१४५
अपो देवीरुपसृज मधु	१६६
अप्रस्वतीमश्विना वाच	५२६
अप्स्वग्ने सधिष्टव सौषधी	१८७
अप्स्वन्तरमृतमप्सु भेषजं	१३४
अबोध्यग्निः समिधा	२४५
अभि गोत्राणि सहसा गाह	२८०

मन्त्र	पृष्ठ
अभि त्यं देवꣳ सवितार	५६
अभि त्वा शूरनोनुमो	४४६
अभिधाऽअसि भुवनम	३७९
अभि प्रवन्त समनेव यो	२९३
अभिभूरस्येतास्ते पञ्च	१५४
अभि यज्ञं गृणीहि नः	४३८
अभीमं महिमा दिवं	५५७
अभी षु णः सखीनां	४४८
अभी षु णः सखीनां	५४०
अभ्यर्षत सुष्टुतिं गव्यमाजि	२९४
अभ्यादधामि समिधमग्ने	३४४
अभ्यावर्तस्व पृथिवि	२०२
अभ्रिरसि नार्यसि त्वया	१५९
अमीषां चित्तं प्रतिलोभ	२८१
अमुत्र भूयादध यद्य	४४१
अमेवं न सुहवा आ	४३९
अयं ते योनिर्ऋत्वियो	३३
अयं ते योनिर्ऋत्वियो	१९१
अयं ते योनिर्ऋत्वियो	२५२
अयं दक्षिणा विश्वकर्मा	२२०
अयं दक्षिणा विश्वकर्मा	२४२
अयं नोऽअग्निर्वरिव	७६
अयं नोऽअग्निर्वरिवस्कृणोतु	१०९
अयं पश्चाद्विश्वव्यचा	२२१
अयं पश्चाद्विश्वव्यचा	२४३
अयं पुरो भुवस्तस्य	२२०
अयं पुरो हरिकेशः सूर्य	२४१
अयमग्निर्गृहपतिर्गार्हपत्यः	३९

मन्त्र	पृष्ठ
अथमग्निः पुरीष्यो	३९
अयमग्निर्वीरतमो वयोधाः	२५१
अयमग्निः सहस्रिणो	२४४
अयमिह प्रथमोऽधायि	३३
अयमिह प्रथमोऽधायि	२४५
अयमिह प्रथमोऽधायि	४९८
अयमुत्तरात्संयद्वसुस्तस्य	२४३
अयमुपर्यर्वाग्वसुस्तस्य	२४३
अयं वां मित्रावरुणा	९६
अयं वेनश्चोदयत्पृश्निगर्भा	९९
अयꣳसहस्रमृषिभि	५१५
अयꣳसोऽअग्निर्यस्मिन्	१९०
अर्षत स्थ राष्ट्रदा राष्ट्रं	१४५
अर्धऽऋचैरुक्थानाꣳ	३२१
अर्धमासाः परूꣳषि	४०१
अर्धेभ्यो हस्तिपं जवाया	४८२
अर्षमणं बृहस्पतिमिन्द्रं	१४०
अर्वाञ्चो अद्या भवता यज	५०८
अवतत्य धनुष्ट्वꣳ सह	२५८
अवपतन्तीरवदन्दिव	२००
अवभृथ निचुम्पुण	४१
अवभृथ निचुम्पुण	११९
अव रुद्रमदीमह्यव	४४
अवसृष्टा परापत शरन्ये	२८१
अविर्न मेषोनसि	३३६
अवेष्टा दन्दशूकाः प्राची	१४९
अवोचाम कवये मेध्याय	२४५
अꣳशुना तेऽअꣳशुः	३४५
अꣳशुरꣳशुष्टे देव	६३
अꣳशुश्च मे रश्मिश्च मे	२९९
अश्मन्नूर्जं पर्वते शिश्रि	२७१
अश्मन्वतीरीयते स	५३५
अश्मा च मे मृत्तिका च मे	२९८
अश्याम तं काममग्ने	३१३
अश्वत्थेवो निषदनं	१९७
अश्वत्थे वो निषदनं	५३४
अश्वस्तूपरोगोमृगस्ते	४०८
अश्वस्य त्वा वृष्णः शः	५४७
अश्वावतीर्गोमतीर्न उषासो	५२८
अश्वावतीꣳसोमावतीं	१९८
अश्विनकृतस्य ते सर	३४७
अश्विना गोभिरिन्द्रिय	३५५
अश्विना घर्मं पातꣳ	५५५
अश्विना तेजसा चक्षुः	३५७
अश्विना नमुचेः सुतꣳ	३५२
अश्विना पिबतां मधु	३५९
अश्विना भेषजं मधु	३५३
अश्विना हविरिन्द्रियं	३५४
अश्विभ्यां चक्षुरमृतं	३३६
अश्विभ्यां पच्यस्व सरस्वत्यै	१५५
अश्विभ्यां पिन्वस्य सरस्वत्यै	५५२
अश्विभ्यां प्रातःसवन	३२१
अश्वो घृतेन त्मन्या सम	४६६
अषाढं युत्सु पृतनासु पप्रिं	५२४
अषाढासि सहमाना	२१२
अष्टौ व्यख्यत्ककुभः पृथि	५२५

मन्त्र	पृष्ठ
असंख्याता सहस्राणि	२६७
असवे स्वाहा वसवे स्वाहा	३८७
असि यमो अस्यादित्यो	४६७
असुन्वन्तमयजमानमिच्छ	१९३
असुर्या नाम ते लोका	५६५
असौ यस्ताम्रोऽअरुण	२५७
असौ या सेना मरुतः	२८२
असौ योऽवसर्पति	२५७
अस्कन्नमद्य देवेभ्य	२०
अस्ताव्यꣳशुर्नराꣳसुशेवो	१८५
अस्माकमिन्द्रः समृतेषु	२८१
अस्मात्त्वमधिजातोऽसि	५३८
अस्मिन्महत्यर्णवेऽन्तरि	२६७
अस्मे रुद्रा मेहना पर्वतासो	५०८
अस्मे वोऽआस्त्विन्द्रिय	१३९
अस्य प्रत्नामनु द्युतꣳ	३३
अस्याजरासो दमामरित्रा	४९७
अस्येदिन्द्रो वावृध वृष्ण्यं	५१८
अहःकेतुना जुषता सु	५५९
अहरहरप्रयावं भरन्तो	१७६
अहानि शं भवन्तु नः	५४०
अहाव्यग्ने हविरास्ये ते	३५७
अहिरिव भोगै पर्येति बाहुं	४७५
अहुतमसि हविर्धानं	४
अह्ने पारावतानालभते	४१५

आ

आकूतिमग्निं प्रयुजꣳ	१७४
आकूत्यै प्रयुजेऽग्नये	४९
आकृष्णेन रजसा वर्तमानो	५२६
आ कृष्णेन रजसा वर्त	५०६
आक्रम्य वाजिन्पृथिवी	१६१
आक्रन्दय बलमोजो न आ	४७६
आगत्य वाज्यध्वानꣳ	१६१
आगन्म विश्ववेदसम	३८
आग्नेयः कृष्णग्रीवः सार	४७७
आग्रयणश्च मे वैश्वदेव	३००
आ घा ये अग्निमिन्धते	१०५
आच्या जानु दक्षिणतो	३२९
आच्छच्छन्दः प्रच्छच्छन्दः	२३७
आजङ्घन्ति सान्वेषां जघनाँ	४७५
आजिघ्र कलशं मह्या	१२४
आजुह्वाना ईड्यो वन्द्यश्चा	४७०
आजुह्वाना सरस्वती	३५२
आजुह्वानः सुप्रतीकः	२८८
आ तं भज सौश्रवसे	१८५
आ तत्त इन्द्रायवः पनन्त	५०३
आतिथ्यरूपं मासरं	३१९
आतिष्ठन्तं परि विश्वे अभू	५०१
आतिष्ठ वृत्रहन्रथं	१२१
आ तू न इन्द्र वृत्रहन्नस्मा	५११
आते वत्सो मनोयमत्	२०५
आत्मने मे वर्चोदा वर्चसे	१०४
आत्मन्नुपस्थे न वृकस्य	३३६
आत्मानं ते मनसारादजाना	४६७
आत्वा जिघर्मि	१६२
आ त्वाहार्षमन्तरभूत्	१८१
आदित्यं गर्भं पयसा	२१६

मन्त्र	पृष्ठ
आदित्यैर्नो भारती वष्टु	४६५
आदित्यै रास्नासीन्द्राण्या	५५२
आधत्त पितरो गर्भं	२९
आ नऽइडाभिर्विदथे सुशस्ति	५०४
आ नऽइन्द्रो दूरादा न	३५०
आ नऽइन्द्रो हरिभिर्या	३५०
आ नऽएतु मनः पुनः	४३
आ नासत्या त्रिभिरेका	५२९
आ नो नियुद्भिः शतिनी	४४५
आ नो मित्रावरुणा घृतै	३६१
आ नो यज्ञं दिविस्पृशं	५१५
आ नो यज्ञं भारती तूय	४७१
आन्त्राणि स्थालीर्मधु	३३५
आपतये त्वा परिपतये	६२
आपये स्वाहा स्वापये	१३८
आपवस्व हिरण्यव	१३१
आपश्चित्पिप्युस्तर्यो न	५००
आपोऽअद्यान्वचारिषꣳ	३४३
आपोऽअस्मान्मातरः शुन्ध	४७
आपो देवीः प्रतिगृभ्णीत	१८७
आपो हयद्बृहतीर्विश्व	४४४
आपो हि ष्ठा मयोभुवस्ता	१६९
आपो हि ष्ठा मयोभुवस्ता	५४१
आप्यायस्व समेतु ते	२०४
आप्यायस्व मदिन्तम	२०५
आ ब्रह्मन्ब्राह्मणो ब्रह्म	३८५
आ मन्द्रैरिन्द्र हरिभिर्याहि	३५१
आ मा वाजस्य प्रसवो	१३७

मन्त्र	पृष्ठ
आमूरज प्रत्यावर्तयेमाः	४७६
आयं गौः पृश्निरक्रमी	३१
आ यदिषे नृपतिं तेज	४९९
आयन्तु नः पितरः सोम्या	३२८
आयातमुप भूषत	५१६
आयात्विन्द्रोऽवसऽउप नः	३५०
आयासाय स्वाहा प्राया	५६४
आयुर्मे पाहि प्राणं मे	२३०
आयुर्यज्ञेन कल्पतां प्राणो	१३८
आयुर्यज्ञेन कल्पतां प्राणो	३०३
आयुर्यज्ञेन कल्पताꣳ	३८८
आयुष्मानमे हविषा वृ	५३७
आयुष्यं वर्चस्य राय	५३०
आयोष्टा सदने सादया	२५४
आरात्रि पार्थिवꣳरजः	५२६
आरोदसी अपृणदास्वर्महं	५१३
आ वायो मध्यमरुहद्ध्रुर	२५१
आवायो भूष शुचिपा	९६
आविर्मर्याऽआवित्तो	१४८
आ विश्वतः प्रत्यञ्चं	१६२
आ वो देवास ईमहे	४९
आशुः शिशानो वृषभो	२७९
आशुश्चिद्यृद्धान्तः पञ्च	२३१
आश्रावयेति स्तोत्रियाः	३२१
आसन्दी रूपꣳ राजा	३१९
आसीनासो अरुणीना	३२९
आ सुते सिञ्चत श्रियꣳ	५०१
आसुष्वयन्ती यजते	४७०

मन्त्र	पृष्ठ
आहं पितॄन्त्सुविदत्राँ२ ॥	३२८
इ	
इच्छन्ति त्वा सोम्यासः	५२३
इड एह्यदित एहि 'काम्या	३६
इड एह्यदित एहि सर	५५२
इडाभिरभिरीड्यः सोमो	३६३
इडाभिर्भक्षानाप्नोति	३२२
इडामग्ने पुरुद८ स८ सनिं	१९१
इडायास्त्वा पदे वयं	५२३
इडे रन्ते हव्ये काम्ये	१२४
इदमापः प्रवहतावद्यं च	८६
इदमुत्तरात्स्वस्तस्य श्रोत्र८	२२१
इदं पितृभ्यो नमोऽस्त्व	३३०
इदं मे ब्रह्म च क्षत्रं चोभे	४९६
इदं विष्णुर्विचक्रमे	६७
इदं८ हविः प्रजननं मेऽअस्तु	३२६
इन्दुर्दक्षः श्येनऽऋतावा	३०९
इन्द्रऽआसां नेता बृहस्पतिः	२८०
इन्द्र गोमन्निहायाहि पिबा	४३५
इन्द्र घोषस्त्वा वसुभिः	६५
इन्द्रं दुरः कवष्यो धाव	३४८
इन्द्रं दैवीर्विशो मरुतोऽनु	२९१
इन्द्र मरुत्वऽइह पाहि सोमं	१०६
इन्द्रमिद्धरी वहतो प्रति	१२२
इन्द्रवायू बृहस्पति मित्राग्निं	५०६
इन्द्रवायूऽइमे सुता	९६
इन्द्रवायू इमे सुता उप	५०९
इन्द्रवायू सुसंदृशा	५१६
इन्द्रं विश्वाऽअवीवृधम्	१९२
इन्द्रं विश्वाऽअवीवृधन्	२५४
इन्द्रं विश्वाऽअवीवृधन्	२८५
इन्द्रश्च मरुतश्च कयायो	१२८
इन्द्रश्च सम्राड वरुणश्च	१२२
इन्द्रस्य क्रोडोऽदित्यै पाजस्यं	४२३
इन्द्रस्य रूपमृषभो	३३६
इन्द्रस्य वज्रोऽसि मित्रा	१५२
इन्द्रस्य वज्रोऽसि वाजसा	१३३
इन्द्रस्य वज्रो मरुतामनीकं	४७६
इन्द्रस्य वृष्णो वरुणस्य	२८०
इन्द्रः सुत्रामा हृदयेन	३३५
इन्द्रः सुत्रामा स्ववाँ २॥ अ	३५०
इन्द्रस्य स्यूरसीन्द्रस्य	७३
इन्द्रस्यौजस्थ मखस्य वो	५४५
इन्द्राग्नी अपादियं पूर्वा	५१७
इन्द्राग्नीऽअव्यथमाना	२२७
इन्द्राग्नीऽआगत८सुतं	१०५
इन्द्राग्नी मित्रावरुणादिति	५०७
इन्द्राग्न्योः पक्षतिः सरस्वत्यै	४२२
इन्द्राय त्वा वसुमते रुद्रवत	९१
इन्द्राय त्वा वसुमते रुद्रव	५५४
इन्द्रायाहि चित्रभानो	३५८
इन्द्रायाहि तुतुजान	३५८
इन्द्रायाहि धियेषितो	३५८
इन्द्रायाहि वृत्रहन्पिबासो	४३५
इन्द्रायेन्दु८सरस्वती	३५२
इन्द्रेमं प्रतरां नय राजा	२८३

मन्त्र	पृष्ठ
इन्द्रेहि मत्स्यन्धसो विश्वे	५०२
इन्द्रो विश्वस्य राजति	५४०
इन्द्रो वृत्रमवृणोच्छर्धनीति	५०२
इन्धानास्त्वा शत$हिमा	३४
इमं जीवेभ्यः परिधिं द	५३६
इमं नो देव सवितर्यज्ञं	१५८
इमं देवाऽअसपत्न$	१४४
इमं देषाऽअसपत्न$	१५०
इमं मा हि$सीर्द्विपादं	२१७
इमं मा हि$सीरेकशफं	२१८
इममूर्णायुं वरुणस्य नाभिं	२१८
इमꣳस्तनमूर्जस्वन्तं धया	२९१
इमं मे वरुण श्रुधी हव	३६०
इम$साहस्र$शतधार	२१८
इमा गिर आदित्येभ्यो	५३१
इमा मे अग्न इष्टका	२७१
इमां तेधियं प्रभरे महो	५०३
इमा नु कं भुवना सीष	४३२
इमा रुद्राय तवसे कपर्दिने	२६६
इमामगृभ्णन्रशनामृतस्य	३७९
इमा ते वाजिन्नवमार्ज	४६७
इमा उ त्वा पुरुवसो गिरो	५१५
इमौ ते पक्षावजरौ	३०९
इयत्यग्र आसीन्मखस्य	५४५
इयदस्यायुरस्यायुर्मयि	१५३
इयमुपरि मतिस्तस्यै	२२२
इयं वेदिः परो अन्तः पृथि	४०६
इरज्यन्नग्ने प्रथयस्व	२०४

मन्त्र	पृष्ठ
इरावती धेनुमती हि भूतꣳ	६७
इहरतिरिह रमध्व	१२७
इहैवाग्ने अधिधारया	४४०
इयं ते यज्ञिया तनूः	५२
इषमूर्जमहमित आद	२०३
इषश्चोर्जश्च शारदावृतू	२२९
इषिरो विश्वव्यचा वातो	३०६
इषे रायो रमस्व सहसे	२१४
इषे पिन्वस्वोर्जे पिन्वस्व	५५६
इषे त्वोर्जे त्वा वायवस्थ	१
इष्टा अग्निराहुतः पिपर्तु	३१०
इष्कृतिर्नाम वो माताथो	१९८
इष्कर्तारमध्वरस्य प्रचे	२०४
इष्टो यज्ञो भृगुभिराशी	३१०

ई

ईडितो देवैर्हरिवॉ२॥ अ	३४७
ईदृक्षास एतादृक्षास	२९०
ईदृङ्चान्यादृङ् च सदृङ्	२९०
ईड्यश्चासि वन्द्यश्च	४६४
ईर्मान्तासः सिलिकमध्य	४६८
ईशानाय परस्वत आल	४१६
ईशावास्यमिदꣳसर्वं	५६५

उ

उक्ताः संचरा एता ऐन्द्रा	४१३
उक्ताः संचरा एता ऐन्द्रा	४१३
उक्ताः संचरा एता शुना	४१४
उक्थेभिर्वृत्रहन्तमा याम	५१३

मन्त्र	पृष्ठ	मन्त्र	पृष्ठ
उक्षा समुद्रो अरुणः	२८५	उदेनमुत्तरां नयाग्ने	२८२
उखां कृणोतु शक्त्या	१७०	उदेषां बाहू अतिरमुद्व	१७७
उग्रं लोहितेन मित्रꣳ	५६३	उद्ग्राभं च निग्राभं च	२८६
उग्रश्च भीमश्च ध्वान्तश्च	५६२	उद्दिवꣳ स्तभानान्तरिक्षं	७२
उग्रा विघनिना मृथ इन्द्रा	५१०	उद्धर्षय मघवन्नायुधान्यु	२८१
उच्चा ते जातमन्धसो	४३७	उन्नत ऋषभो वामनः	४११
उच्छुष्मा ओषधीनां	१९८	उद्बुध्यस्वाग्ने प्रतिजागृहि	३११
उत नो हिर्बुध्न्यः शृणोतु	५३१	उद्बुध्यस्वाग्ने प्रतिजागृहि	२५२
उत स्मास्य द्रवतस्तुर	१३७	उद्वयं तमसस्परि स्वः	३४३
उतेदानीं भगवन्तः स्याम	५२७	उद्वयं तमसस्परि स्वः	४४२
उत्क्राम महते सौभगाय	१६२	उद्वयं तमसस्परि स्वः	५३६
उत्तानायामवभरा चि	५२२	उद्वयं तमसस्परि स्वः	५५९
उत्तिष्ठन्नोजसा सह	१२३	उप ज्मन्नुप वेतसेव	२७२
उत्तिष्ठ ब्रह्मणस्पते देव	५३१	उप त्वाग्ने हविष्मतीर्घृता	३०
उत्थाय बृहती भवोदु	१७३	उप नः सूनवो गिरः शृण्व	५१४
उत्सक्थ्या अवगुदं धेहि	३९६	उपप्रयन्तो अध्वरं मन्त्रं	३२
उत्सादेभ्यः कुब्जं प्रमुदे	४८१	उप प्रागात्परमं यत्सध	४६९
उदक्रमीद्बृविणोदा वाज्यर्वा	१६२	उप प्रागात्सुमन्मेऽधायि	४२८
उदग्ने तिष्ठ प्रत्यातनुष्व	२०८	उपयामगृहीतोऽस्यन्तर्यच्छ	९५
उदीचीमारोहानुष्टुप्त्वा	१४९	उपयामगृहीतोऽस्याग्रयणो	१०१
उदीरतामवर उत्परास	३२६	उपयामगृहीतोसीन्द्राय त्वा	१०२
उदु तिष्ठ स्वध्वरावानो	१६७	उपयामगृहीतोसि ध्रुवोसि	१०३
उदुत्तमं वरुणपाशमस्मत्	१८१	उपयामगृहीतोऽसि मधवे	१०४
उदु त्यं जातवेदसं देवं	१०८	उपयामगृहीतोऽस्यादित्ये	११२
उदु त्यं जातवेदसं देवं	१२४	उपयामगृहीतोऽसि सावि	११४
उदु त्यं जातवेदसं देवं	५०३	उपयामगृहीतोऽसि सुश	११४
उदु त्वा विश्वेदेवा	१८६	उपयामगृहीतोऽसि बृह	११४
उदु त्वा विश्वेदेवा अग्ने	२८३	उपयामगृहीतोऽसि हरि	११५

मन्त्र	पृष्ठ
उपयामगृहीतोऽस्यग्नये	१२६
उपयामगृहीतोऽस्याश्वि	३१७
उपयामगृहीतोऽस्यश्वि	३४६
उपयामगृहीतोऽसि प्रजा	३८९
उपयामगृहीतोऽसि प्रजा	३९०
उप प्रागाच्छसनं वाज्यर्वा	४६९
उपश्वासय पृथिवीमुत द्यां	४७६
उपहूता इह गाव उप	३९
उपहूताः पितरः सोम्यासो	३२८
उपहूतो द्यौष्पितोप मां	२१
उपह्वरे गिरीणाꣳसंगमे	४३७
उपावसृज त्मन्या समञ्ज	४७१
उपावीरस्युप देवान्दैवी	८१
उपास्मै गायता नरः पव	५१०
उभा पिबतमश्विनोभा	५२५
उभाभ्यां देव सवितः	३२५
उभा वामिन्द्राग्नी आहु	३३
उभे सुश्चन्द्र सर्पिषो	२४९
उरु विष्णो विक्रमस्वोरु	७६
उरु विष्णो विक्रमस्वोरु	७७
उशन्तस्त्वा निधीमह्युश	३३१
उशिक्त्वं देव सोमाग्ने	१२६
उशिक्पावको रतिः	१८४
उशिगसि कविरङ्घारिरसि	७४
उषस्तच्चित्रमाभरास्मभ्यं	५२७
उषासानक्तमश्विना	३५३
उषासानक्ता बृहती बृह	३४८
उषे यन्ही सुपेशसा	३६३

मन्त्र	पृष्ठ
उस्रावेतं धूर्षाहौ युज्येथा	५९
ऊ	
ऊर्क् च मे सूनृता च मे	२९७
ऊर्गस्याङ्गिरस्यूर्णम्रदा	५०
ऊर्जं वहन्तीरमृतं घृतं	२९
ऊर्जो नपाज्जातवेदः	२०३
ऊर्जो नपातꣳ स हिनाय	४४८
ऊर्ध्व ऊ षु ण ऊतये	१६७
ऊर्ध्वमेनमुच्छ्रयतादिरौ	३९७
ऊर्ध्वा अस्य समिधो	४४२
ऊर्ध्वामारोह पङ्क्तिस्त्वा	१४९
ऊर्ध्वामेनामुच्छ्रापय	३९७
ऊर्ध्वो भव प्रतिविध्या	२०९
ऋ	
ऋक्सामयोः शिल्पे स्थ	५०
ऋचं वाचं प्रपद्ये मनो	५३९
ऋचे त्वा रुचे त्वा भासे	२१५
ऋचो नामास्मि यजूꣳषि	३१२
ऋजवे त्वा साधवे त्वा	५४७
ऋजीते परिवृङ्धि नोऽश्मा	४७५
ऋतं च मे मृतं च मे	२९६
ऋतजिच्च सत्यजिच्च सेन	२९०
ऋतये स्तेनहृदयं वैरह	४८२
ऋतवस्त ऋतुथा पर्व	४०१
ऋतवस्ते यज्ञं वितन्वन्तु	४३७
ऋतवः स्थ ऋतावृधः	२७२
ऋतश्च सत्यश्च ध्रुवश्च	२९०

मन्त्र	पृष्ठ
ऋतꣳ सत्यमृतꣳ सत्यं	१६८
ऋतावानं महिषं विश्व	२०४
ऋतावानं वैश्वानरमृतस्य	४३५
ऋताषाडृतधामाग्निर्गन्धर्वः	३०५
ऋतुथेन्द्रो वनस्पतिः	३५३
ऋधगित्था स मर्त्यः	५१६
ए	
एकया च दशभिश्च	४४६
एकया स्तुवत प्रजा	२३३
एकस्त्वष्टुरश्वस्या विशस्ता	४३१
एकस्मै स्वाहा द्वाभ्याꣳ	३८८
एका च मे तिस्तश्च मे	३०१
एजतु दशमास्यो गर्भो	१२०
एण्यह्यो मण्डूको मूषिका	४१८
एतं जातीथ परमे	३११
एतं ते देव सवितर्यज्ञं	२१
एतत्ते रुद्रावसं तेन	४५
एत सधस्थं परि ते	३१०
एता अर्षन्ति हृद्यात्समुद्रात्	२९३
एता उ वः सुभगा विश्व	४६५
एता ऐन्द्राग्ना द्विरूपा	४११
एतादृपं यज्ञस्य	३२२
एतावानस्य महिमातो	४८७
एदमगन्म देवयजनं	४७
एधोस्येधिषीमहि समिदसि	३४४
एधोस्येधिषीमहि समि	५५९
एना विश्वान्यर्य आ	४३८
एना वो अग्नि नमसो	२४७
एभिर्नो अर्कैर्भवानो	२५०
एवश्छन्दो वरिवश्छन्दः	२३७
एवेदिन्द्रं वृषणं वज्रबाहुं	३५१
एष छागः पुरो अश्वेन	४२७
एष ते गायत्रो भाग इति	५५
एष ते निर्ऋते भागस्तं	१४२
एष ते रुद्र भागः	४४
एष वः स्तोमो मरुत्	५३०
एषस्य वाजी क्षिपणिं	१३६
एषा ते अग्ने समित्तया	२२
एषा ते शुक्र तनूः	५३
एषा वः सा सत्या संवा	१३६
एषो ह देवः प्रदिशो नु	४९३
एह्यूषु ब्रवाणि तेऽग्न	४३७
ऐ	
ऐन्द्र प्राणो अङ्गे अङ्गे	८७
ओ	
ओजश्च मे सहश्च म	२९५
ओमासश्चर्षणीधृतो	१०५
ओषधयः प्रतिगृभ्णीत	१६८
ओषधयः समवदन्त	२०१
ओषधीः प्रतिमोदध्वं	१९७
ओषधीरिति मातरः	१९७
क	
ककुभꣳ रूपं वृषभस्य	१२६

मन्त्र	पृष्ठ
कत्यस्य विष्टाः कत्यक्षरा	४०५
कदाचन प्रयुच्छस्युभे	११२
कदाचन स्तरीरसि	३७
कदाचन स्तरिरसि नेन्द्र	११२
कन्या इव वहतुमेतवा उ	२९४
कयानश्चित्र आभुवदूती	४४७
कया नश्चित्र आभुव	५३९
कया त्वं न ऊत्याभिप्र	५४०
कल्पन्तां ते दिशस्तुभ्य	५३५
कवण्यो न व्यचस्वतीर	३५२
कस्त्वा युनक्ति स त्वा	३
कस्त्वाऽऽच्छ्यति कस्त्वा	४००
कस्त्वा सत्यो मदानां	४४७
कस्त्वा सत्यो मदानां	५३९
कस्त्वा विमुञ्चति स त्वा	२५
का ईमरे पिशंगिला का	४०४
काण्डात्काण्डात्प्ररोहन्ती	२१०
कामं कामदुघे धुक्ष्व	१९२
काय स्वाहा कस्मै स्वाहा	३८४
कार्षिरसि समुद्रस्य त्वा	९०
काव्ययोराजानेषु	५१२
का स्विदासीत्पूर्वचित्तिः	३९२
का स्विदासीत्पूर्वचित्तिः	४०४
किꣳ स्विदासीदधिष्ठान	२७५
किꣳ स्विद्वनं क ऊ स	२७५
किꣳ स्वित्सूर्यसमं ज्योतिः	४०२
कुक्कुटोऽसि मधुजिह्व	७
कुतस्त्वमिन्द्र माहिनः	५०२
कुम्भो वनिष्टुर्जनिता	३३५
कुर्वन्नेवेह कर्माणि जि	५६५
कुलायिनी घृतवति	२२३
कुविदङ्ग यवमन्तो यवं	३१६
कुविदङ्ग यवमन्तो यवं	१५६
कुविदङ्ग यवमन्तो यवं	४००
कृणुष्व पाजः प्रसितिं न	२०८
कृष्णग्रीवा आग्नेयाः	४१०
कृष्णग्रीवा आग्नेया बभ्रवः	४११
कृष्णग्रीवा आग्नेया बभ्र	४१२
कृष्णा भौमा धूम्रा आ	४११
कृष्णो स्याखरेष्ठोऽग्नये	१७
केतुं कृण्वन्न केतवे पेशो	४७२
केष्वन्तः पुरुष आविवेश	४०३
को अस्य वेद भुवनस्य	४०५
कोऽदात्कस्मा अदात्कामो	१११
कोऽसि कतमोऽसि कस्यासि	१०४
कोऽसि कतमोऽसि कस्मै	३३९
कः स्विदेकाकी चरति	३९२
कः स्विदेकाकी चरति	४०२
क्रमध्वमग्निना नाक	२८६
क्रव्यादमग्निं प्रहिणोमि	५३७
क्षत्रस्य त्वा परस्याय	५५८
क्षत्रस्य योनिरसि क्षत्र	३३८
क्षत्रस्योल्बमसि क्षत्रस्य	१४८
क्षत्रेणाग्ने स्वायुः स	४४१
क्षपो राजन्नुत त्मनाग्ने	२४८

मन्त्र	पृष्ठ
ख	
खड्गो वैश्वदेवः श्वा कृष्णः	४१९
ग	
गणानां त्वा गणपति	३९५
गन्धर्वस्त्वा विश्वावसुः	१७
गर्भो अस्योषधीनां गर्भो	१८७
गर्भो देवानां पिता म	५४९
गायत्रं छन्दोऽसि त्रैष्टुभ	५५३
गायत्री त्रिष्टुब् जगत्यनु	३९९
गायत्रेण त्वा छन्दसा	१३
गाव उपावतावतं मही	५०१
गाव उपावतावतं मही	५१२
गृहा मा बिभीत मा	३९
गोत्रभिदं गोविदं वज्रबाहुं	२८०
गोभिर्न सोममश्विना	३५४
गोमदूषणासत्याश्वा	३५७
ग्रहा ऊर्जाहुतयो व्यन्तो	१३३
ग्रीष्मेण ऋतुना देवा	३६५
घ	
घर्मैतत्ते पुरीषं तेन	५५८
घृतं घृतपावानः पिबत	८७
घृतं मिमिक्षे घृतमस्य	२९१
घृतवती भुवनानामभि	५२९
घृताची स्थो धुर्यो पात	२४
घृताच्यसि जुह्वन्नाम्ना	१९
घृतेन सीता मधुना सम	१९५
घृतेनाक्षौ पशूꣳ स्त्रायेथां	८३

मन्त्र	पृष्ठ
घृतेनाञ्जन्सं पथो देव	४०
च	
चक्षुषः पिता मनसा हि	२७७
चतस्रश्च मेऽष्टौ च मे	३०१
चतुस्त्रिꣳ शत्तन्तवो ये	१३०
चतुस्त्रिꣳ शद्वाजिनो देव	४३१
चतुःस्रक्तिर्नाभिर्ऋत	५५८
चत्वारि शृङ्गा त्रयो अस्य	२९२
चन्द्रमा अप्स्वन्तरासु	५१७
चन्द्रमा मनसो जातश्च	४८९
चित्तिं जुहोमि मनसा	२८९
चित्रं देवानामुदगादनीकं	१०८
चित्रं देवानामुदगादनीकं	२१३
चित्पतिर्मा पुनातु वाक्पति	४८
चिदसि तया देवतया	१९१
चिदसि मनोसि धीरसि	५३
चोदयित्री सूनृतानां	३५८
ज	
जनयत्यै त्वा संयौमीद	११
जनस्य गोपा अजनिष्ट	२४६
जनिष्ठा उग्रः सहसे तुराय	५११
जवो यस्ते वाजिन्निहितो	१३४
जिह्वा मे भद्रं वाङ्महो	३३९
जीमूतस्येव भवति प्रतीकं	४७२
जुषाणो बर्हिर्हरिवान्न इन्द्रः	३४८
ज्यैष्ठ्यं च म आधिपत्यं	२१५
ज्योतिरसि विश्वरूपं	७५

मन्त्र	पृष्ठ
त	
त आयजन्त द्रविणꣳस	२७७
तच्चक्षुर्देवहितं पुरस्तात्	५४३
ततो विराडजायत विराजो	४८८
तत्त्वा यामि ब्रह्मणा वन्द	३०८
तत्त्वा यामि ब्रह्मणा वन्द	३६०
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो	३७
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देव	३८२
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो	४७९
तत्सूर्यस्य देवत्वं तन्महित्वं	५०५
तदश्विना भिषजा रुद्रवर्त	३३४
तदस्य रूपममृतꣳ शची	३३४
तदिदास भुवनेषु ज्येष्ठं	५१४
तदेवाग्नि स्तदादित्यस्त	४९२
तदेजति तन्नैजति त	५६६
तद्विप्रासो विपन्यवो जा	५२९
तद्विष्णोः परमं पदꣳ	८१
तनूनपाच्छुचिव्रतस्तनूपा	३६३
तनूनपादसुरो विश्ववेदा	४४२
तनूनपात्पथ ऋतस्य याना	४६९
तनूपा भिषजा सुते	३५२
तनूपा अग्नेऽसि तन्वं मे	३३
तन्तुना रायस्पोषेण	२३८
तन्नस्तुरीपमद्भुतं पुरुक्षु	४४३
तन्नो वातो मयोभु वातु	४२५
तन्मित्रस्य वरुणस्याभिचक्षे	५०५
तपश्च तपस्यश्च शैशि	२५२
तपसे कौलालं मायायै कर्मार	४८०
तपसे स्वाहा तप्यते	५६४
तप्तायनी मेऽसि वित्तायनी	६४
तमिद्गर्भं प्रथमं दध्र	२७८
तमिन्द्रं पशवः सचा	३५४
तमीशानं जगतस्तस्थुषस्पतिं	४२५
तमु त्वा दध्यङ्ङृषिः	१६५
तमु त्वा पाथ्यो वृषा	१६५
तरणिर्विश्वदर्शतो ज्योति	४०४
तव भ्रमास आशुया	२०८
तव वायवृतस्पते त्वष्टु	४४६
तव शरीरं पतयिष्ण्वर्वन्	४६९
तवाय सोमस्त्वेमेह्य	४३८
तस्मा अरं गमाम वो	३७५
तस्मा अरं गमाम वो	५४१
तस्मादश्वा अजायन्त	४८८
तस्माद्यज्ञात्सर्वहुतः संभृ	४८८
तस्माद्यज्ञात्सर्वहुत	४८८
तस्य वयꣳ सुमतौ यज्ञिय	३५१
तस्यास्ते सत्यसवसः	५३
ता अस्य सूददोहसः	१९२
ता अस्य सूददोहसः	२५४
ता उभौ चतुरः पदः संप्र	३९६
ता न आवोढमश्विना	३५७
ता नासत्या सुपेशसा	३५५
तान्पूर्वया निविदा हूमहे	४२५
ता भिषजा सुकर्मणा	३५६
ताꣳसवितुर्वरेण्यस्य	२८८
तिरश्चीनो विततो रश्मिरेषां	५१३

मन्त्र	पृष्ठ	मन्त्र	पृष्ठ
तिस्र इडा सरस्वती भार	३६४	त्रीन्समुद्रान्त्समसृपत्	२१३
तिस्रस्त्रेधा सरस्वत्य	३५३	त्र्यम्बकं यजामहे	४४
तिस्रो देवीर्हविषा वर्ध	३४९	त्र्यवयो गायत्र्यै पञ्चा	४१२
तिस्रो देवीर्बर्हिरेदꣳ	४४३	त्र्यविश्च मे त्र्यवी च मे	३०१
तीव्रान्घोषान्कृण्वते वृष	४७३	त्र्यायुषं जमदग्नेः	४५
तुभ्यं ता अङ्गिरस्तम	२०५	त्वं नो अग्ने तव देव	५२२
तृन्दसि तृन्दते त्वा	२३८	त्वं नो अग्ने वरुणस्य	३६०
ते अस्य योषणे दिव्ये	४४३	त्वमग्न ईडितः कव्यवाहन	३३०
ते आचरन्ती समनेव	४७३	त्वमग्ने प्रथमो अङ्गिरा	५२२
तेजोऽसि तेजो मयि धेहि	३१७	त्वमग्ने व्रतपा असि	५३
तेनोऽसि शुक्रममृतमा	३७९	त्वमग्ने द्युभिस्त्वमाशुशु	१६३
तेजः पशूना ꣳहविरिन्द्र	३३७	त्वमङ्ग प्रशꣳसिषो देवः	९३
ते नो अर्वन्तो हवन	१३७	त्वमिन्द्र प्रतूर्तिष्वभिविश्वा	५११
ते हि पुत्रासो अदितेः	३७	त्वमिमा ओषधीः सोम	५२४
तं त्वा शोचिष्ठ दीदिवः	३६	त्वमुत्तमास्योषधे तव	२०२
तं त्वा समिद्भिरङ्गिरो	३०	त्वं यविष्ठ दाशुषो नॄँः	२१९
तं पत्नीभिरनुगच्छेम देवा	२५१	त्वं यविष्ठ दाशुषो नॄँः	३१४
तं प्रत्यधा पूर्वथा विश्वथे	९७	त्वया हि नः पितरः सोम	३२७
तं यज्ञं बर्हिषि प्रौक्षन्	४८८	त्वष्टा तुरीपे अद्भुत इन्द्रा	३६४
तं वो दस्ममृतीषहं वसो	४३६	त्वष्टा दधच्छुष्ममिन्द्राय	३४९
त्रयो देवा एकादश	३४०	त्वष्टा वीरं देवकामं जजान	४६५
त्रातारमिन्द्रमवितारमिन्द्रं	३५०	त्वꣳसोम प्रचिकितो मनीषा	३२७
त्रिधा हितं पाणीभिर्गुह्य	२९३	त्वꣳसोम पितृभिः सं	३२७
त्रिꣳशद्धाम विराजति	३१	त्वां गन्धर्वा अखनन्	२०१
त्रीणि त आहुर्दिवि बन्ध	४६७	त्वां चित्रश्रवस्तम	२४६
त्रीणि पदा विचक्रमे विष्णु	५२९	त्वाममे पुष्करादधि	२४४
त्रीणि शता त्री सहस्राण्य	४९८	त्वाममे वृणते ब्राह्मणा	४४०
त्रिपादूर्ध्व उदैत्पुरुषः पादो	४८७	त्वाममे आङ्गिरसो गुहा	२४६

मन्त्र	पृष्ठ
त्वामग्ने यजमाना अनु	१८५
त्वामद्य ऋष आर्षेय	३७८
त्वाꣳहि मन्दतममर्कशोकैः	४९९
त्वामिद्धि हवामहे सातौ	४४७
त्वे अग्ने स्वाहुत प्रियासः	५००

द

मन्त्र	पृष्ठ
दक्षिणामारोह त्रिष्टुप्त्वा	१४९
दधिक्राव्णो अकारिषं	३९९
दꣳष्ट्राभ्यां मलिम्लून	१७६
दक्षा युवाकवः सुता ना	५०९
दिग्भ्यः स्वाहा चन्द्राय	५६१
दिवस्परि प्रथमं जज्ञे	१८३
दिवः पृथिव्याः पर्योज उद्भृ	४७५
दिविधा इमं यज्ञमिमं	५५५
दिवि पृष्टो अरोचता	५१७
दिवि विष्णुर्व्यक्रꣳस्त	२६
दिवो मूर्धासि पृथिव्या	३०९
दिवो वा विष्ण उत वा	६८
दीक्षायै रूपꣳ शष्पाणि	३१९
दुरो देवीर्दिशो महीर्ब्रह्मा	३६३
दृते दृꣳ हमा ज्योक्ते	५४२
दृते दृꣳ हमा मित्रस्य	५४२
दृशानो रुक्म उर्व्या व्य	१७८
दृशानो रुक्म उर्व्या व्य	१८४
दृष्ट्वा परिस्रुतो रसꣳ	३३३
दृष्ट्वा रूपे व्याकरोत्	३३३
दृꣳ हस्व देवि पृथिवि	१७४

मन्त्र	पृष्ठ
देव इन्द्रो नराशꣳ सः	३७६
देव इन्द्रो नराशꣳ सप्सि	४५५
देवकृतस्यैनसोऽवयजन	११६
देवं देवं वोवसे देवं	५१७
देवं बर्हिरिन्द्रꣳ सुदेवं	४५२
देवं बर्हिर्वयोधसं देव	४६०
देवं बर्हिर्वारितीनां	४६२
देवं बर्हिर्वारितीनां देव	४५५
देवं बर्हिर्वारितीनामध्वरे	३७६
देवं बर्हिः सरस्वती	३७४
देवश्रुतौ देवेष्वाघोषतं	६७
देवा यज्ञमतन्वत भेषजं	३१८
देव सवितरेष ते सोम	७६
देव सवितः प्रसुव यज्ञं	१३२
देव सवितः प्रसुव यज्ञं	१५८
देव सवितः प्रसुव यज्ञं	४७९
देवस्य चेततो महीं प्र	३८२
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	५
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	१०
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	१२
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	६९
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	७१
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	७९
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	८२
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	९१
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	१४०
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	१४३
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	१५९

मन्त्र	पृष्ठ
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	१६३
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	३०५
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	३३८
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	५४४
देवस्य त्वा सवितुः प्रसवे	५५२
देवस्य सवितुर्मतिमासव	३८२
देवस्याहꣳसवितुः सवे	१३५
देवस्याहꣳसवितुः सवे	१३६
देवस्त्वा सवितोद्वपतु	१७३
देवद्रूर्यज्ञ आ च वक्षत्	२८५
देवा गातुविदो गातुं वित्त्वा	११८
देवा देवानां भिषजा	३७५
देवा दैव्या होतारा देव	४५४
देवा दैव्या होतारा देव	४६१
देवानां भद्रा सुमतीर्ऋजु	४२५
देवा यज्ञमतन्वत भेषजं	३१८
देवान् दिवमगन्यज्ञस्ततो	१३०
देवासो हि ष्मा मनवे	५१८
देवी उषासावश्विना	३७४
देवी उषासानक्ता देव	४६०
देवी उषासानक्तेन्द्रं यजे	४५३
देवी ऊर्जाहुती दुघे	३७५
देवी ऊर्जाहुती दुघे	४५४
देवी ऊर्जाहुती दुघे	४६१
देवी द्यावापृथिवी मख	५४४
देवी जोष्ट्री वसुधिती	४५३
देवी जोष्ट्री वसुधिती	४६०
देवी जोष्ट्री सरस्वत्य	३७५
देवीर्द्वार इन्द्रꣳसंघाते	४५३

मन्त्र	पृष्ठ
देवीर्द्वारो वयोधसꣳ	४६०
देवीर्द्वारो आश्विना भिष	३७४
देवीरापः शुद्धा वोदꣳ	८४
देवीराप एष वो गर्भः	११९
देवीरापो अपांनपाद्यो व	९०
देवीस्तिस्रस्तिस्रो देवीः	३७५
देवीस्तिस्रस्तिस्रो देवीः	४५४
देवीस्तिस्रस्तिस्रो देवीः	४६१
देवेन नो मनसा देवसोम	५२४
देवेभ्यो हि प्रथमं यज्ञिये	५०८
देवो अग्निः स्विष्टकृद्देवा	३७७
देवो अग्निः स्विष्टकृद्देवा	४५६
देवो अग्निः स्विष्टकृद्देवा	४६२
देवो देवैर्वनस्पतिर्हि	३७६
देवो देवैर्वनस्पतिर्हि	४५५
देवो नराशꣳसो देव	४६१
देवो वनस्पतिर्देवमिन्द्रं	४६२
देव्यो वप्रयो भूतस्य प्रथ	५४४
देहि मे ददामि ते	४२
दैव्या अध्वर्यवस्ता	४०१
दैव्या मिमाना मनुषः	३४८
दैव्याय धर्त्रे जोष्ट्रे	२८४
दैव्यावध्वर्यू आगतꣳरथेन	५१३
दैव्यावध्वर्यू आगतꣳ	५०४
दैव्या होतारा ऊर्ध्वमध्वरं	४४३
दैव्या होतारा भिषजेन्द्रेण	३६३
दैव्या होतारा प्रथमा सुवाचा	४७१
द्यां मालेखीरन्तरिक्षं	७८

मन्त्र	पृष्ठ
द्युभिरक्तुभिः परिपात	५२६
द्यौरासीत्पूर्वचित्तिः	३९३
द्यौरासीत्पूर्वचित्तिरश्व	४०४
द्यौः शान्तिरन्तरिक्ष	५४१
द्यौस्ते पृथिव्यन्तरिक्षं	४०१
द्यौस्ते पृष्ठं पृथिवी सध	१६१
द्रप्सश्चस्कन्द पृथिवीमनु	२०७
द्रप्सः सर्पिरासुतिः प्रत्नो	१७५
द्राविणोदाः पिपीषति	४३८
द्रापे अन्धसस्पते दरि	२६५
द्रुपदादिव मुमुचानः	३४३
द्वारो देवीरन्वस्य विश्वे	४४३
द्विपदायाश्चतुष्पदा	३९९
द्वे विरूपे चरतः स्वर्थे	४९७
द्वे सृती अशृणवं पितॄणां	३२६
ध	
धन्वना गा धन्वनाजिं जये	४७२
धर्ता दिवो विभाति त	५४९
धाता रातिः सवितेदं	११७
धानाः करम्भः सक्तवः	३२०
धानानाꣳरूपं कुवलं	३२१
धान्नावन्तं करम्भिणं	३४५
धान्यमसि धिनुहि	१०
धामच्छदमिरिन्द्रो ब्रह्मा	३१४
धामं ते विश्वं भुवनमधि	२९४
धूम्रा बभ्रुनीकाशाः पि	४१४
धूम्रान्वसन्तायालभते	४१२
धूरसि धूर्व धूर्वन्तं	४

मन्त्र	पृष्ठ
धृष्टिरस्यपाग्ने अग्निमा	८
ध्रुवक्षितिर्ध्रुवयोनिः	२२३
ध्रुवसदं त्वा नृषदं मनः	१३२
ध्रुवासि धरुणास्तृता	२०९
ध्रुवासि धरुणेतो जज्ञे	२१४
ध्रुवासि ध्रुवोयं यजमानो	७२
ध्रुवोऽसि पृथिवीं दृꣳह	६६
न	
नक्तोषासा समनसा	१७८
नक्तोषासा समनसा	२८७
नक्षत्रेभ्यः स्वाहा नक्ष	३८७
न तद्रक्षाꣳ सि न पिशाचा	५३०
न तस्य प्रतिमा अस्ति	४९२
न तं विदाथ य इमा	२७८
न ते दूरे परमा चिद्र	५२४
न त्वावाँ अन्यो दिव्यो	४४७
नदीभ्यः पौञ्जिष्ठमृक्षीकाभ्यो	४८०
नभश्च नभस्यश्च वार्षि	२२९
नम आशवे चाजिराय	२६२
नम उष्णीषिणे गिरिच	२६०
नमः कपर्दिने च व्युप्त	२६२
नमः कूप्याय चावट्याय	२६४
नमः कृत्स्नायतया	२६०
नमः पर्णाय च पर्णशदाय	२६५
नमः पार्याय चावार्याय	२६४
नमः शङ्गवे च पशुपतये	२६४
नमः शंभवाय च मयो	२६४
नमः श्वभ्यः श्वपतिभ्यः	२६२

मन्त्र	पृष्ठ
नमः शुष्क्याय च हरित्या	२६५
नमः सभाभ्यः सभा	२६१
नमः सिकत्याय च प्रवा	२६५
नमः सुते निर्ऋते तिग्म	१९४
नमः सेनाभ्यः सेनानि	२६१
नमः सोभ्याय च प्रति	२६३
नमस्त आयुधायाना	२५८
नमस्तक्षभ्यो रथकारे	२६१
नमस्ते अस्तु विद्युते	५४२
नमस्ते रुद्र मन्यव उतो	२५६
नमस्ते हरसे शोचिषे	२७३
नमस्ते हरसे शोचिषे	५४२
नमः स्रुत्याय च पथ्याय	२६३
नमो गणेभ्यो गणपति	२६१
नमो ज्येष्ठाय च कनिष्ठाय	२६२
नमो धृष्णवे च प्रमृशाय	२६३
नमो बभ्लुशाय व्याधि	२५९
नमो बिल्मिने च कवचिने	२६३
नमो मित्रस्य वरुणस्य	५९
नमो रोहिताय स्थपतये	२५९
नमो वञ्चते परिवञ्चते	२६०
नमो वन्याय च कक्ष्याय	२६३
नमो वः पितरो रसाय	२९
नमो वात्याय च रेष्म्याय	२६४
नमो विसृजद्भ्यो विध्य	२६०
नमो व्रज्याय च गोष्ठ्या	२६५
नमोऽस्तु नीलग्रीवाय	२५७
नमोऽस्तु रुद्रेभ्यो ये दिवि	२६९
नमोऽस्तु रुद्रेभ्यो पृथि	२६९
नमोऽस्तु रुद्रेभ्यो येऽन्तरि	२६९
नमोऽस्तु सर्पेभ्यो ये केच	२०७
नमो हिरण्यबाहवे	२५९
नमो ह्रस्वाय च वामना	२६२
न यत्परो नान्तर आद	३५७
नराशꣳ सः प्रतिशूरो	३४७
नराशꣳ सस्य महिमान	४७०
नर्माय पुंश्चलꣳ हसाय	४८५
नवदशभिरस्तुवत पितरो	२३४
नवदशभिरस्तुवत	२३४
नवविꣳ शत्या स्तुवत	२३५
नवा उ एतन्म्रियसे	३९४
न वा उ एतन्म्रियसे न	४३२
नहि तेषाममा चन	३७
नहि स्पशमविदन्नन्यम	५१०
नाना हि वां देवहितꣳ	३१७
नाभा पृथिव्याः समिधाने	१७६
नाभिर्मे चित्तं विज्ञानं	३४०
नाभ्या आसीदन्तरिक्ष	४८९
नार्यस्ते पत्न्यो लोम	४००
नाशयित्री बलासस्या	२०१
निष्क्रमणं निषदनं विव	४३०
नियुत्वान्वायवागह्यꣳ	४४५
निवेशनः संगमनो वसूनां	१९५
निषसाद धृतव्रतो वरुणः	१५४
निषसाद धृतव्रतो	३३८
निहोता होतृषदने	१६५

मन्त्र	पृष्ठ
नीलग्रीवाः शितिकण्ठा	२६७
नीलग्रीवाः शितिकण्ठाः	२६७
नृत्ताय सूतं गीताय शैलूषं	४८०
नृषदे वेडप्सुषदे वेड्	२७४
प	
पञ्च दिशो दैवीर्यज्ञ	२८३
पञ्च नद्यः सरस्वती	५२२
पञ्चस्वन्तः पुरुष आवि	४०३
पथस्पथः परिपतिं पथ	५२८
पयः पृथिव्यां पय ओषधी	३०५
पयसा शुक्रममृतं जनित्र	३३४
पयसो रूपं यद्यवा	३२१
पयसो रेत आभृतं	५६०
परमस्याः परावतो	१७५
परं मृत्यो अनु परेहि	५३४
परमेष्ठी त्वा सादयतु	२५३
परमेष्ठी त्वा सादयतु	२५३
परमेष्ठ्यभिधीतः प्रजा	१२८
परस्या अधि संवतोऽवराँ	१७५
परि ते दूडभो रथो	३८
परि ते धन्वनो हेति	२५८
परि त्वा गिर्वणो गिर इमा	७३
परि त्वाग्ने पुरं वयं	१६३
परि द्यावापृथिवी सघ	४९५
परि नो रुद्रस्य हेति	२६६
परि माग्ने दुश्चरिताद्बाधस्व	५७
परि वाजपतिः कविः	१६३
परिवीरसि परि त्वा दैवी	८१
परीतो षिञ्चता सुत	३१५
परीत्य भूतानि परीत्य	४९५
परीमे गामनेषत पर्य	५३७
परो दिवा पर एना पृ	२७८
पवमानः सो अद्य नः	३२५
पवित्रेण पुनीहि मा	३२४
पवित्रे स्थो वैष्णव्यौ	५
पवित्रे स्थो वैष्णव्यौ	१४७
पशुभिः पशूनाप्नोति	३२०
पष्ठवाट् च मे पष्ठौही च मे	३०२
पष्ठवाहो विराज उक्षाणो	४१२
पातं नो अश्विना दिवा	३५३
पावकया यश्चिन्तयन्त्या	२७३
पावकवर्चाः शुक्रवर्चा	२०३
पावका नः सरस्वती	३५८
पाहि नो अग्न एकया	४४८
पिता नोसि पिता नो बोधि	५५०
पितुं न स्तोषं महो ध	५२१
पितृभ्यः स्वधायिभ्यः	३२४
पीवो अन्ना रयिवृधः	४४४
पुत्रमिव पितरावश्विनो	१५६
पुत्रमिव पितरावश्विनो	३५६
पुनन्तु मा देवजनाः	३२४
पुनन्तु मा पितरः सोम्यासः	३२४
पुनर्नः पितरो मनो	४३
पुनरासद्य सदनमपश्च	१८८
पुनरूर्जा निवर्तस्व	१८१
पुनरूर्जा निवर्तस्व पुन	१८८

मन्त्र	पृष्ठ
पुनर्मनः पुनरायुर्न आगन्	५२
पुनस्त्वा रुद्रा वसवः समिं	१८९
पुनाति ते परिस्रुतꣳ	३१६
पुरा क्रूरस्य विसृपो	१४
पुरीष्यासो अग्नयः पांव	१९१
पुरीष्योसि विश्वभरा	१६४
पुरुदस्मो विषुरूपः	१२०
पुरुषमृगश्चन्द्रमसो गोधा	४१८
पुरुष एवेदꣳ सर्वं यद्भूतं	४८७
पूर्णा दर्वि परापत	४१
पूषणं वनिष्ठुनान्धाहीन्स्थू	४२२
पूषन्तव व्रते वयं न रिष्ये	५२८
पूषा पञ्चाक्षरेण पञ्च	१४१
पृच्छामि त्वा चितये देव	४०३
पृच्छामि त्वा परमन्तं पृथि	४०६
पृथिवि देवयजन्योषध्या	१२
पृथिवी च म इन्द्रश्च मे	२९९
पृथिवी छन्दोऽन्तरिक्षं	२३०
पृथिव्या अहमुदन्त	२८६
पृथिव्याः पुरीषमस्य	४१०
पृथिव्याः सधस्थादग्निं	१६०
पृथिव्यै स्वाहान्तरिक्षाय	३८७
पृश्निस्तिरश्चीनपृश्नि	४१०
पृषदश्वा मरुतः पृश्निमातरः	४२६
पृष्टीर्मे राष्ट्रमदरमꣳ सौ	३४०
पृष्टो दिवि पृष्टो अग्निः	३१३
प्रघासिनो हवामहे	४०
प्रजापतये च वायवे च गोमृ	४१६
प्रजापतये त्वा जुष्टं प्रोक्षामि	३८०
प्रजापतये पुरुषान्हस्तिन	४१६
प्रजापतिः संभ्रियमाणः	५६१
प्रजापतिर्विश्वकर्मा मनो	३०६
प्रजापतिश्चरति गर्भे अन्तः	४९०
प्रजापतिष्ट्वा सादयत्वपां	२१०
प्रजापते न त्वदेतान्यन्यो	१५१
प्रजापते न त्वदेतान्यन्यो	४०७
प्रजापतेस्तपसा वावृधानः	४६६
प्रजापतौ त्वा देवता	५३४
प्र तद्विष्णुः स्तवते वीर्येण	६९
प्रतद्वोचेदमृतं नु विद्वा	४९४
प्रति क्षत्रे प्रतितिष्ठामि	३४०
प्रतिपदसि प्रतिपदे	२३८
प्रति पन्थामपद्महि	५८
प्रतिश्रुत्का वा अर्तनं घोषा	४८४
प्रतिस्पशो विसृज	२०८
प्रतीचीमारोह जगती	१४९
प्रतूर्तं वाजिन्नाद्रव	१५९
प्रतूर्वन्नेष्यवक्रामन्नशी	१६०
प्रत्युष्टꣳरक्षः प्रत्युष्टा	४
प्रत्युष्टꣳरक्षः प्रत्युष्टा	१४
प्रथमा द्वितीयैर्द्वितीया	३४१
प्रथमा वा सरथिना	४६५
प्रनूनं ब्रह्मणस्पतिर्मन्त्रं	५३२
प्रनो यच्छत्वर्यमा प्र पूषा	१४०
प्रपर्वतस्य वृषभस्य	१५१
प्र प्रायमग्निर्भरतस्य	१८७

मन्त्र	पृष्ठ
प्रबाहवा सिसृतं जीवसे	३६२
प्रमन्महे शवसानाय	५२३
प्रमुञ्च धन्वन स्त्वमुभ	२५७
प्र याभिर्यासि दाश्वाꣳस	४४५
प्र व इन्द्राय बृहते मरुतो	५१८
प्रवायुमच्छा बृहती मनीषा	५०९
प्रवाजे सुप्रया बर्हिरेषा	५०६
प्रवीरया शुचयो दधिरे	५१२
प्रवो महे मन्दमानाया	५२३
प्रवो महे महि नमो	५०२
प्रसद्य भस्मना योनिमप	१८८
प्रस्तरेण परिधिना	३११
प्रागपागुदगधराक्सर्वतस्त्वा	९२
प्राचीनं बर्हिः प्रदिशा पृ	४७०
प्राचीमनु प्रदिशं प्रेहि	२८६
प्राच्यै दिशे स्वाहार्वाच्यै	३८६
प्राणदा अपानदा व्यान	२७४
प्राणपा मे अपानपाः	३४६
प्राणश्च मेऽपानश्च मे	२९५
प्राणं मे पाह्यपानं मे	२२६
प्राणाय मे वर्चोदा वर्चसे	१०३
प्राणाय स्वाहा अपानाय	३९५
प्राणाय स्वाहापानाय	३८५
प्रातरग्निं प्रातरिन्द्रꣳहव	५२७
प्रातर्जितं भगमुग्रꣳहुव	५२७
प्रेता जयता नर इन्द्रो	२८१
प्रेदमे ज्योतिष्मान्याहि	१८६
प्रेद्धो अग्ने दीदिहि पुरो	२८९

मन्त्र	पृष्ठ
प्रेतु ब्रह्मणस्पतिः प्र देव्ये	५१६
प्रेतु ब्रह्मणस्पतिः प्रदेव्ये	५४६
प्रेतु वाजीकनिक्रदत्	१६८
प्रेषेभिः प्रैषानाप्नोति	३२०
प्रोथदश्वो न यवसे	२५४
प्रोह्यमाणः सोम आगतो	१२८

ब

बट्सूर्य श्रवसा महाँ २॥ अ	५०५
बण्महाँ २॥ असि सूर्य बडा	५०५
बर्हिषदः पितर ऊत्यर्वा	३२८
बलविज्ञाय स्थविरः प्रवीरः	२७९
बह्वीनां पिता बहुरस्य पुत्रः	४७३
बाहू मे बलमिन्द्रियꣳ	३३९
बिभ्राड् बृहत्पिबतु सोम्यं	५०३
बीभत्सायै पौल्कसं वर्णाय	४८४
बृहदिन्द्राय गायत	३४५
बृहन्निदिध्म एषां भूरि	५०२
बृहस्पते अति यदर्यो अर्हा	४३४
बृहस्पते परिदीया रथेन	२७९
बृहस्पते वाजं जय बृह	१३५
बृहस्पते सवितर्बोध	४४१
बोधामे अस्य वचसो	१८८
ब्रह्म क्षत्रं पवते तेज	३१६
ब्रह्म जज्ञानं प्रथमं पुर	२०६
ब्रह्मणस्पते त्वमस्य यन्ता	५३२
ब्रह्मणे ब्राह्मणं क्षत्राय	४७९
ब्रह्म सूर्यसमं ज्योतिः	४०२
ब्रह्माणि मे मतयः श	५१४

मन्त्र	पृष्ठ
ब्राह्मणमद्य विदेयं	११०
ब्राह्मणा सः पितरः	४७४
ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्	४८९
भ	
भग एव भगवाँ२॥ अस्तु	५२८
भग प्रणेतर्भग सत्यराधो	५२७
भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा	४२६
भद्रा उत प्रशस्तयो	२४८
भद्रो नो अग्निराहुतो	२४८
भद्रो मेऽसि प्रच्यवस्व	५९
भवतं नः समनसौ	६२
भवतं नः समनसौ	१९३
भायै दार्वाहारं प्रभाया	४८२
भुज्युः सुपर्णो यज्ञो गन्ध	३०६
भुवो यज्ञस्य रजसश्च	२०९
भुवो यज्ञस्य रजसश्च	२४५
भूताय त्वा नारातये	५
भूम्या आखूनालभते	४१६
भूरसि भूमिरस्यदिति	२१०
भूर्भुवः स्वः तत्सवितुः	५३९
भूर्भुवः स्वर्द्यौरिव भूम्ना	३०
भूर्भुवः स्वः सुप्रजाः	३८
भेषजमसि भेषजं	४४
म	
मखस्य शिरोसि मखाय	५४६
मधवे स्वाहा माधवाय	३८७
मधुनक्त मुतोषसो	२१३
मधुमतीर्न इषस्कृधि	९४
मधु वाता ऋतायते	२१३
मधुश्च माधवश्च वास	२१२
मधुमान्नो वनस्पति	२१३
मध्वा यज्ञं नक्षसे प्रीणानो	४४२
मनस्त आप्यायतां वाक्त	८४
मनो जूतिर्जुषतामाज्यस्य	२२
मनसः काममाकूतिं	५६१
मनो न येषु हवनेषु	१००
मनो न्वाह्वामहे नारा	४३
मनो मे तर्पयत वाचं मे	९१
मन्यवेऽयस्तापं क्रोधाय	४८३
मयि गृह्णाम्यग्रे अग्निꣳ	२०६
मयि त्यदिन्द्रियं बृहत्	५६७
मयीदमिन्द्र इन्द्रियं	२१
मयुः प्राजापत्य उलोहलि	४१७
मरुताꣳ स्कन्धा विश्वेषां	४२२
मरुतो यस्य हि क्षये	१२१
मरुत्वन्तं वृषभं वावृधानं	१०६
मरुत्वाँ२॥ इन्द्र वृषभो रणाय	१०७
मर्माणि ते मर्मणा छाद	२८२
मशकान्केशैरिन्द्रꣳ स्वपसा	४२१
महाँ२॥ इन्द्रो नृवदाचर्षणिप्रा	१०८
महाँ२॥ इन्दो य ओजसा	१०८
महाँ२॥ इन्द्रो वज्रहस्तः षोड	४३६
महानाम्न्यो रेवत्यो	४००
महि त्रीणामवोऽस्तु द्युक्षं	३७
मही द्यौः पृथिवी चन	१२३

मन्त्र	पृष्ठ
मही द्यौः पृथिवी चन	२१४
महीनां पयोऽसि वर्चोदा	४८
महीमूषु मातरꣳ सुव्र	३६१
महो अग्नेः समिधानस्य	५००
महो अर्णः सरस्वती	३५८
मा छन्दः प्रमा छन्दः	२३०
मा त इन्द्र ते वयं तुरा	१५२
माता च ते पिता च ते	३९७
माता च ते पिता च ते	३९७
मातेव पुत्रं पृथिवी पुरी	१९३
मा त्वाग्निर्ध्वनयीद्धूम	४३०
मा त्वा तपत्प्रिय आत्मा	४३१
मा नः शꣳ सो अररुषो	३७
मा नस्तोके तनये मा	२५८
मा नो महान्तमुत मा नो	२५८
मा नो मित्रो वरुणो अर्यमा	४२७
मापो मौषधीर्हिꣳसीर्धाम्नो	८८
मा भेर्मा संविक्था ऊर्जे	११
मा भेर्मा संविक्था ऊर्जे	११
मा मा हिꣳसीज्जनिता	२०२
मा वो रिषत्खनिता	२०१
मा सु भित्था मा सु रिषो	१७४
माहिर्भूर्मा पृदाकुर्नमस्त	८३
माहिर्भूर्मा पृदाकुः	११८
मित्रश्च म इद्रश्च मे	२९९
मित्रस्य मा चक्षुषेक्षध्व	७५
मित्रस्य चर्षणीधृतो वो	१७३
मित्रꣳ हुवे पूतदक्षं वरुणं	५०९

मन्त्र	पृष्ठ
मित्रः सꣳसृज्य पृथिवी	१६९
मित्रावरुणाभ्यां त्वा देवा	१०२
मित्रो न एहि सुमित्रध	५७
मित्रो नवाक्षरेण त्रिवृत	१४१
मीढुष्टम शिवतम शिवो	२६६
मुखꣳ सदस्य शिर	३३५
मुञ्चन्तु मा शपथ्या	२००
मूर्धानं दिवो अरतिं पृथि	१०२
मूर्धानं दिवो अरतिं	४९८
मूर्धा वयः प्रजापतिः	२२६
मूर्धासि राड् ध्रुवासि	२३१
मृगो न भीमः कुचरो	३१३
मेधां मे वरुणो ददातु मेधां	४९५
मो षू ण इन्द्रात्र पृत्सु	४०

य

य आत्मदा बलदा यस्य	४२४
य इन्द्र इन्द्रियं दधुः	३५४
य इमा विश्वा भुवनानि	२७५
य इमे द्यावापृथिवी	४७१
य एतावन्तश्च भूयाꣳसश्च	२६९
यकाऽसकौ शकुन्तिका	३९६
यकोऽसकौ शकुन्तकः	३९६
यं क्रन्दसी अवसा तस्त	४९३
यजा नो मित्रावरुणा यजा	४९७
यजुर्भिराप्यन्ते ग्रहा ग्रहैः	३२२
यज्जाग्रतो दूरमुदैति दैवं	५२०
यज्ञ यज्ञं गच्छ यज्ञपतिं	११८
यज्ञस्य दोहो विततः	१३०

मन्त्र	पृष्ठ
यज्ञायज्ञावो अग्नये	४४८
यज्ञेन यज्ञमयजन्त देवाः	४९०
यज्ञो देवानां प्रत्येति सुम्नं	११३
यज्ञो देवानां प्रत्येति सुम्नं	५१२
यं ते देवी निर्ऋतिं राव	१९४
यते स्वाहा धावते स्वाहो	३८१
यतो यतः समीहसे ततो	५४३
यत्र धारा अनपेता	३११
यत्र बाणाः संपतन्ति	२८२
यत्र ब्रह्म च क्षत्रं च स	३४४
यत्ते सादे महसा शूकृत	४३१
यत्ते सोम दिवि ज्योतिर्यत्	९२
यत्पुरुषं व्यदधुः कतिधा	४८९
यत्पुरुषेण हविषा देवा	४८९
यत्प्रज्ञानमुत चेतो	५२०
यत्ते गात्रादग्निना पच्य	४२९
यत्ते पवित्रमर्चिष्यग्ने	३२५
यत्रेन्द्रश्च वायुश्च सम्य	३४४
यत्रौषधीः समग्मत	१९८
यथेमां वाचं कल्याणीं	४३४
यदक्रन्दः प्रथमं जायमान	४६६
यदग्ने कानि कानि चिदा	१७५
यदस्युपजिह्वीका यद्व	१७५
यदत्र रिप्तꣳ रसिनः	३२३
यदद्य कच्च वृत्रहन्नुदगा	५०४
यदद्य सूर उदितेऽनागा	५०१
यदश्वस्य क्रविषो मक्षि	४२९
यदश्वाय वास उपस्तृण	४३०
यदस्या अꣳहुभेद्याः	३९८
यदाबध्नन्दाक्षायणा हि	५३०
यदाकूतात्समसुस्रोत्	३१०
यदा पिपेष मातरं पुत्रः	३१८
यदापो अघ्न्या इति	३४२
यदि जाग्रद्यदि स्वप्न	३४२
यदि दिवा यदि नक्तं	३४२
यदिमा वाजयन्नहं	१९९
यदूवध्यमुदरस्यापवाति	४२९
यद्ग्रामे यदरण्ये	४०
यद्ग्रामे यदरण्ये यत्स	३४२
यद्दत्तं यत्परादानं	३११
यद्देवा देवहेडनं	३४१
यद्देवासो ललामगुं	३९८
यद्धरिणो यवमत्ति	३९८
यद्धरिणो यवमत्ति	३९८
यद्धविष्य मृतुशो देवयान	४२८
यद्वाजितो दाम संदान	४२९
यद्वातो अपो अगनीगन्	३९१
यद्वाहिष्ठं तदग्नये बृह	४३७
यन्ता च मे धर्ता च मे	२९६
यन्निर्णिजा रेक्णसा प्रावृ	४२७
यन्नीक्षणं मांस्पचन्या	४३०
यन्त्री राड्यन्त्र्यसि यम	२३१
यन्मे छिद्रं चक्षुषो	५३९
यं परिधिं पर्यधत्था	२३
यः प्राणतो निमिषतो	३९०
यः प्राणतो निमिषतो महि	४२४

मन्त्र	पृष्ठ
यमग्ने कव्यवाहन त्वं	३२९
यमग्ने पृत्सु मर्त्यमवा	९०
यमश्विना नमुचेरासुरा	३२३
यमश्विना सरस्वती हवि	३५४
यमाय यमसूमथर्वभ्यो	४८३
यमाय स्वाहान्तकाय	५६४
यमाय त्वा मखाय त्वा	५४७
यमाय त्वाङ्गिरस्वते पि	५५४
यमेन दत्तं त्रित एनमायु	४६६
यस्तु सर्वाणि भूतान्या	५६६
यस्ते अद्य कृणवद्भद्र	१८५
यस्ते अश्वसनिर्भक्षो यो	११५
यस्ते द्रप्सः स्कन्दति यस्ते	१०३
यस्ते रसः संभृत ओष	३२३
यस्ते स्तनः शशयो यो म	५५३
यस्माज्जातं न पुरा किंच	४९३
यस्मान्न जातः परो मन्यो	१२२
यस्मिन्नश्वास ऋषभास	३५६
यस्मिन्सर्वाणि भूता	५६७
यस्मिन्नृचः साम यजूꣳषि	५२१
यस्य कुर्मो गृहे हविः	२८३
यस्य प्रयाणमन्वन्य	१५८
यस्यायं विश्व आर्यो	५१५
यस्यास्ते घोर आसन्	१९४
यस्यैमे हिमवन्तो महित्वा	४२४
यस्यै ते यज्ञियो गर्भो	१२०
यस्यौषधीः प्रसर्पथा	१९९
यश्चिदापो महिना पर्य	४४५
यवानां भागोस्ययवानां	२३३
या इषवो यातुधानानां	२०७
या ओषधीः पूर्वा जाता	१९७
या ओषधीः सोमराज्ञीः	२००
या ओषधीः सोमराज्ञीः	२००
या ते अग्नेऽयःशया तनूः	६४
या ते घर्म दिव्या शुग्या	५५७
या ते धामानि परमाणि या	२७६
या ते धामानि हविषा	६०
या ते धामान्युश्मसि	८०
या ते रुद्र शिवा तनूः	२५६
या ते रुद्र शिवा तनूः	२६६
या ते हेतिर्मीष्टुम	२५८
याँ२ऽआवह उशतो देव	११७
याः फलिनीर्या अफला	१९९
यामिषुं गिरिशन्त हस्ते	२५६
यां मेधां देवगणाः पितर	४९५
यावती द्यावापृथिवी	५६०
यावां कशा मधुमत्य	९७
या वो देवाः सूर्ये रुचो	२११
या वो देवाः सूर्ये रुचो	३०७
या व्याघ्रं विषूचिकोभौ	३१८
या शतेन प्रतनोषि	२११
याश्चेदमुपशृण्वन्ति	२००
याः सेना अभीत्वरीरा	१७६
यास्ते अग्ने सूर्ये रुचो	२११
यास्ते अग्ने सूर्ये रुचो	३०७
युक्तेन मनसा वयं	१५७

मन्त्र	पृष्ठ
युक्तेन मनसा वयं	१५७
युक्त्वाय सविता देवान्	१५७
युक्ष्वा हि केशिना हरी	१२१
युक्ष्वा हि देव हूतमाँ	२१५
युक्ष्वा हि देव हूतमाँ२॥ अ	४९७
युजे वां ब्रह्म पूर्व्यं नमो	१५७
युञ्जते मन उत युञ्जते	६६
युञ्जते मन उत युञ्जते	१५७
युञ्जते मन उत युञ्जते	५४४
युञ्जन्ति ब्रध्नमरुषं	३९०
युञ्जन्त्वस्य काम्या हरी	३९०
युञ्जाथाꣳ रासभं युव	१५९
युञ्जानः प्रथमं मनः	१५७
युनक्त सीरा वियुगा तनुध्वं	१९५
यूपव्रस्का उत ये यूपवाहा	४२८
युवं तमिन्द्रापर्वता पुरो	१२७
युवꣳ सुराममश्विना	१५६
युवꣳ सुराममश्विना	३५६
युष्मा इन्द्रो वृणीत वृत्र	६
ये अग्निष्वात्ता ये अन	३२९
ये चेह पितरो येच नेह	३३०
ये जनेषु मलिम्लवः	१७६
ये तीर्थानि प्रचरन्ति	२६८
ये ते पन्थाः सवितः पूर्व्या	५२५
ये त्वाहिहत्ये मघवन्नव	५१०
ये देवा अग्निनेत्राः पुरः	१४२
ये देवा देवानां यज्ञिया	२७४
ये देवा देवेष्वधि देवत्व	२७४
ये देवासो दिव्येकादशस्थ	१००
येन ऋषयस्तपसा सत्र	२५१
येन कर्माण्यपसो मनी	५२०
येन द्यौरुग्रा पृथिवी च	४९३
ये नः पूर्वे पितरः सोम्पासो	३२७
येन वहसि सहस्रं	३११
येन वहसि सहस्रं येना	२५२
ये नः सपत्ना अप ते	५२९
येना पावक चक्षसा भुर	५०४
येना समत्सु सासहो	२४८
येनेदं भूतं भुवनं भवि	५२०
येऽग्नेषु विविध्यन्ति	२६८
ये पथां पथिरक्षय	२६८
ये भूतानामधिपतयो	२६८
ये रूपाणि प्रतिमुञ्चमाना	२८
ये वाजिनं परिपश्यन्ति	४३०
ये वामी रोचने दिवो	२०८
ये वृक्षेषु शष्पिञ्जरा	२६८
येषामध्येति प्रवसन्	३९
ये समानाः समनसः पि	३२५
ये समानाः समनसो जी	३२६
यो अग्निः कव्यवाहनः	३३०
यो अग्निरग्नेरध्यजायत	२१७
यो अस्मभ्यमरातीयात्	१७७
यो देवेभ्य आतपति	४९१
योगे योगे तवस्तरं	१६०
यो नः पिता जनिता यो	२७७

मन्त्र	पृष्ठ
यो भूतानामधिपति	३४६
यो रेवान्यो अमीवहा	३६
यो वः शिवतमो रसस्त	१६९
यो वः शिवतमो रसः	५४१
यं क्रन्दसी अवसा	४९३
र	
रक्षसां भागोसि निरस्त	८५
रक्षोहणो वलगहनं वैष्णवी	७०
रक्षोहणो वो वलगहनः	७१
रक्षोहा विश्वचर्षणि	४३९
रजता हरिणीः सीसा	४००
रथवाहण हविरस्य नाम	४७४
रथे तिष्ठन्नयति वाजिनः	४७३
रयिश्च मे रायश्च मे	२९७
रश्मिनासत्याय सत्यं	२३७
राजन्तमध्वराणां गोपामृत	३५
राश्यसि प्राची दिव्य	२३९
राश्यसि प्राची दिग्विरा	२२८
रातिꣳसत्पतिं महे सवि	३८२
राये नु यं जज्ञनू रोदसी	४४४
राया वयꣳसखायꣳसो	९७
रुचं ब्राह्मं जनयन्तो देवा	४९१
रुचं नो धेहि ब्राह्मणेषु	३०८
रुद्राः सꣳसृज्य पृथिवीं	१७०
रूपेण वो रूपमभ्यागां	१०९
रेतो मूत्रं विजहाति	३३२
रेवती रमध्वमस्मिन्योना	३५
रेवती रमध्वं बृहस्पते	३५
रोहितो धूम्ररोहितः	४०९
ल	
लाङ्गलं पवीरवत्सुशेवं	१९६
लोकं पृण छिद्रं पृणाथो	१९२
लोकं पृण छिद्रं पृणाथो	२५३
लोमभ्यः स्वाहा लोमभ्यः	५६३
लोमानि प्रयतिर्मम	३४१
व	
वक्ष्यन्ती वेदागनीगन्ति	४७२
वनस्पतिरवसृष्टो न पाशैः	३४९
वनस्पतेऽवसृजा रराण	४४४
वनस्पते वीड्वङ्गो हि भूया	४७५
वनेषु व्यन्तरिक्षं ततान	५८
वयं ते अद्य ररिमा हि	३१४
वयं नाम प्रब्रवामा घृत	२९२
वयꣳसोम व्रते तव	४३
वयꣳहि त्वा प्रयति यज्ञे	११७
वरुणः क्षत्रमिन्द्रियं	३५५
वरुणः प्राविताभुवन्मित्रो	५०७
वरुणस्योत्तम्भनमसि	६०
वरूत्रीं त्वष्टुर्वरुणस्य	२१६
वर्षाभिर्ऋतुनादित्याः स्तोमो	३६५
वर्षाहेमन्तूना माखुः कशो	४१८
वसन्ताय कपिञ्जलाना	४१४
वसन्तेन ऋतुना देवा	३६४
वसवस्त्रयो दशाक्षरेण	१४१

मन्त्र	पृष्ठ	मन्त्र	पृष्ठ
वसवस्त्वा कृण्वन्तु	१७१	वाजो नः सप्त प्रदिश	३०४
वसवस्त्वाच्छृन्दन्तु गाय	१७३	वाजो नो अद्य प्रसुवाति	३०४
वसवस्त्वाजन्तु गायत्रेण	३९१	वातं प्राणेनापानेन नासिके	४२०
वसवस्त्वा धूपयन्तु	१७२	वातरꣳहा भव वाजिन्	१३४
वसु च मे वसतिश्च मे	२९८	वातस्य जूतिं वरुणस्य	२१६
वसुभ्य ऋश्यानालभते	४१६	वाताक स्वाहा धूमाय	३८६
वसुभ्यस्त्वा रुद्रेभ्यस्त्वा	२३	वातो वा मनो वा गन्धर्वाः	१३४
वसूनां भागोसि रुद्राणा	२३२	वाममद्य सवितर्वामनु	११३
वसोः पवित्रमसि द्यौर	२	वायव्यैर्वायव्यानाप्नोति	३२१
वसोः पवित्रमसि शतं	२	वायुः पुनातु सविता पुना	५३३
वस्व्यस्यदितिरस्यादित्या	५४	वायुख्येना यज्ञप्रीः साकं	४४६
वह वपां जातवेदः	५३८	वायुरनिलममृत	५६९
वाचं ते शुन्धामि प्राणं	८४	वायुष्ट्वा पचतैरवत्वसि	३९३
वाचस्पतये पवस्व वृष्णो	९४	वायोः पूतः पवित्रेण	३१५
वाचस्पतिं विश्वकर्माणं	१२५	वायो येते सहस्रिणो	४४६
वाचस्पतिं विश्वकर्माणं	२७६	वायो शक्रो अयामि ते	४४६
वाचे स्वाहा प्राणाय	५६१	वार्त्रहत्याय शवसे	३१२
वाजः पुरस्तादुत मध्यतो	३०४	विकिरिद्र विलोहित	२६६
वाजश्च मे प्रसवश्च मे प्रय	२९५	विद्यां चाविद्यां च	५६८
वाजस्य नु प्रसव स्वाब	१३९	विज्यं धनुः कपर्दिनो	२५७
वाजस्य नु प्रसवे मातरं	३०३	वित्तं च मे वेद्यं च मे	२९७
वाजस्य मा प्रसव उद्वात	२८५	विदद्यदी सरमा रुग्ण	५१०
वाजस्येमां प्रसवः	१३९	विमा ते अग्ने त्रेधा	१८३
वाजस्येमं प्रसवः सुषुवे	१३९	विधृतिं नाभ्या घृतꣳरसे	४२३
वाजाय स्वाहा प्रसवाय	३०२	विधेमं ते परमे जन्म	२८८
वाजाय स्वाहा प्रसवाय	३८८	विन इन्द्र मृधो जहि	१२४
वाजे वाजेऽवत वाजिनो नो	३६२	विन इन्द्र मृधो जहि	३१३
वाजे वाजेऽवत वाजिनो	१३७	वि पाजसा पृथुना शोशु	१६९

मन्त्र	पृष्ठ
विभक्तारꣳहवामहे वसो	४७९
विभूर्मात्रा प्रभूः पित्रा	३८३
विभूरसि प्रवाहणो	७३
विमान एष दिवो मध्य	२८५
विमुच्यध्वमध्न्या देवयाना	१९६
विराडसि दक्षिणा दिग्रु	२३९
विराड्ज्योतिरधारयत्	२११
विवस्वन्नादित्यैष ते सोम	११३
विश्वकर्मन्हविषा वर्धनेन	१२५
विश्वकर्मन्हविषा वर्धनेन	२७६
विश्वकर्मन्हविषा वावृधानः	२७६
विश्वकर्मा व्यजनिष्ट देव	२७८
विश्वकर्मा विमना आद्रि	२७७
विश्वकर्मा त्वा सादय	२२७
विश्वकर्मा त्वा सादय	२२८
विश्वतश्चक्षुरुत विश्वतो	२७५
विश्वस्मै प्राणायापानाय	२१०
विश्वस्य केतुर्भुवनस्य	१८४
विश्वस्य दूतममृतं	२४७
विश्वस्य मूर्धन्नधितिष्ठ	३०९
विश्वा आशा दक्षिणस	५५४
विश्वानि देव सवितर्दुः	४७९
विश्वा रूपाणि प्रतिमुञ्चते	१७८
विश्वासां भुवां पते	५५०
विश्वे अद्य मरुतो विश्व	३०४
विश्वे अद्य मरुतो	५०८
विश्वेदेवास आगत शृणुता	१०६
विश्वेदेवा अꣳशुषु	१२९
विश्वेदेवाश्चमसे धूम्रीतो	१२९
विश्वेदेवाः शृणुतेमꣳ हवं	५०८
विश्वेभिः सोम्यं मध्वग्न	४९९
विश्वेषामदितीर्यज्ञियानां	५००
विश्वो देवस्य नेतुर्मर्तो	५०
विश्वो देवस्य नेतुः	१७४
विश्वो देवस्य नेतुः	३८५
विष्णोः कर्माणि पश्यत	८०
विष्णोः कर्माणि पश्यत	२१४
विष्णोः क्रमोऽसि सपत्नहा	१७९
विष्णोर्नुकं वीर्याणि प्रवोचं	६८
विष्णो रराटमसि विष्णो	६९
वीतꣳ हविः शमितꣳ	२८४
वीतिहोत्रं त्वा कवे	१८
वृष्ण ऊर्मिरसि राष्ट्रदा	१४५
वेदाहमस्य भुवनस्य नाभिं	४०५
वेदाहमेतं पुरुषं महान्त	४९०
वेदेन रूपे व्यपिषत्	३३३
वेदोऽसि येन त्वं देव	२५
वेद्या वेदिः समाप्यते	३२०
वेनस्तत्पश्यन्निहितं गुहा	४९४
वैश्वदेवी पुनती देव्या	३२५
वैश्वानरस्य सुमतौ स्याम	४३५
वैश्वानरो न ऊतय	३१३
वैश्वानरो न ऊतय आप्र	४३६
व्यचस्वतीरुर्विया विश्र	४७०
व्रतं कृणुताग्निर्ब्रह्माग्नि	५१
व्रतं च म ऋतवश्च मे	३००

मन्त्र	पृष्ठ
व्रतेन दीक्षामाप्नोति	३२२
व्रीहयश्च मे यवाश्च मे	२९८
व्रेशीनां त्वा पत्मन्नाधूनोमि	१२६
श	
शं च मे मयश्च मे प्रियं	२९७
शतमिन्नु शरदो अन्ति देवा	४२६
शतं वो अम्ब धामानि	१९७
शं ते परेभ्यो गात्रेभ्यः	४०१
शं नो देवीरभिष्टय	५४१
शं नो भवन्तु वाजिनो	१३७
शं नो भवन्तु वाजिनो	३६२
शं नो वातः पवताꣳ	५४०
शं नो मित्रः शं वरुणः	५४०
शमिता नो वनस्पतिः	३६४
शं वातः शꣳ हि ते	५३५
शर्म च स्थो वर्म च स्थो	३६४
शर्मास्यवधूतꣳ रक्षो	६
शर्मास्यवधूतꣳ रक्षोव	९
शार्दं दद्भिरवकां दन्तमूलै	४२०
शारदेन ऋतुना देवा	३६५
शिरो मे श्रीर्यशो मुखं	३३९
शिल्पा वैश्वदेव्यो राहि	४१०
शिवेन वचसा त्वा	२५६
शिवो नामासि स्वधितिस्ते	४६
शिवो भव प्रजाभ्यो	१६७
शिवो भूत्वा मह्यमग्ने	१८२
शुक्रज्योतिश्च चित्रज्यो	२९०
शुक्रं त्वा शुक्रेण क्रीणामि	५६
शुक्रश्च शुचिश्च ग्रैष्मा	२२४
शुद्धवालः सर्वशुद्धवालो	४०९
शुनꣳ सुफाला विमृषन्तु	१९५
शैशिरेण ऋतुना देवा	३६५
श्रायन्त इव सूर्यं विश्वे	५०६
श्रीणामुदारो धरुणो रयि	१८४
श्रीश्चते लक्ष्मीश्च पत्न्या	४९१
श्रुधि श्रुत्कर्ण वह्निभिर्देवै	५००
श्वात्राः स्थ वृत्रतुरो राधो	९२
श्वात्राः पिता भवत यूय	५१
श्वित्र आदित्यानामुष्ट्रो	४१९
ष	
षडस्य विष्ठाः शतमक्षरा	४०५
षोडशी स्तोम ओजो	२३६
स	
स इधानो वसुष्कवि	२४८
स इषुहस्तैः स निषङ्गि	२७९
सखायः संवः सम्यञ्चं	२४६
स जातो गर्भो असि	१६७
सजूरब्दो अयवोभिः	१९६
सजूर्ऋतुभिः सजूर्विधा	२३५
सजूर्देवेन सवित्रा सजू	३२
सजोषा इन्द्र सगणो मरुद्भिः	१०७
सत्यं च मे श्रद्धा च मे	२९६
सत्रस्य ऋद्धिरस्यगन्म	१२७
स त्वं नश्चित्र वज्रहस्त	४४७
स त्वं नो अग्ने वमोभ	३६०
सदसस्पतिमद्भुतं प्रिय	४९५

मन्त्र	पृष्ठ	मन्त्र	पृष्ठ
स दुद्रवत्स्वाहुतः	२४७	समिधाग्निं दुवस्यत	१८६
सद्यो जातो व्यमिमीत यज्ञ	४७१	समुद्रं गच्छ स्वाहान्तरिक्षं	८७
सधमादो द्युम्निराप	१४७	समुद्रस्य त्वावकयाग्ने	२७२
स न इन्द्राय यज्यवे	४३८	समुद्रादूर्मिमधुमाँ२॥ उ	२९२
स नः पावक दीदिवो	२७३	समुद्राय त्वा वाताय	५५४
स नः पितेव सूनवेऽअग्ने	३५	समुद्राय शिशुमारानाल	४१५
स नो बन्धुर्जनिता स	४९४	समुद्रे ते हृदयमप्स्वन्तः	११९
स नो भुवनस्य पते	३०७	समुद्रे ते हृदयमप्स्वन्तः	३४३
सन्नः सिन्धुरवभृथायो	१२९	समुद्रे त्वा नृमणा अप्सु	१८३
सपर्यगाच्छुक्रमकाय	५६७	समुद्रोऽसि नभस्यानार्द्र	३०७
सप्त ऋषयः प्रतिहिता	५३१	समुद्रोऽसि विश्वव्यचा	७४
सप्त ते अग्ने समिधः	२८९	सम्यक्स्रवन्ति सरितो न	२१५
सप्तास्यासन्परिधयः	४९०	सम्यक्स्रवन्ति सरितो न	२९३
स प्रथमो बृहस्पतिः	९९	सम्राडसि प्रतीचीः दि	२४०
स बोधि सूरिर्मघवा	१८९	स यक्षदस्य महिमान म	४४२
समख्ये देव्या धिया संद	५५	सरस्वती योन्या गर्भ	३३७
समग्निरग्निनागत सं	५४९	सरस्वती मनसा पेशलं	३३४
समध्वरायोषसो नमन्त	५२८	सरोभ्यो धैवरमुपस्थाव	४८३
समास्त्वाग्न ऋतवो व	४४०	सर्वे निमेषा जज्ञिरे विद्युतः	४९२
समितꣳ संकल्पेथाꣳ	१९२	सविता ते शरीराणि	५३४
समिदसि सूर्यस्त्वा पुर	१८	सविता ते शरीरेभ्यः	५३३
समिद्ध इन्द्र उषसामनीके	३४०	सविता त्वा सवाताꣳ	१४३
समिद्धे अग्नावधि माम	२८४	सविता प्रथमेहन्नग्नि	५६२
समिद्धे अग्निः समिधा	३६२	सविता वरुणो दधत्य	३५५
समिद्धो अग्निरश्विना	३५१	सवितुस्त्वा प्रसव उत्पु	१५
समिद्धो अञ्जनकृदरं	४६४	सवित्रा प्रसवित्रा सर	१५५
समिद्धो अद्य मनुषो दुरो	४६९	सꣳशितं मे ब्रह्म सꣳशितं	१७७
समिधाग्निं दुवस्यत	३०	सꣳशितो रश्मिना रथः	३९३

मन्त्र	पृष्ठ	मन्त्र	पृष्ठ
सꣳसमिद्युवसे वृषन्	२४६	सं मा सृजामि पयसा	३०४
सꣳसीदस्व महाँऽअसि	१६५	सं वर्चसा पयसा सं तनू	२६
सꣳसृष्टा वसुभी रुद्रै	१७०	सं वर्चसा पयसा सं तनू	३१६
सꣳस्रवभागा स्थेषा	२४	सं वर्चसा पयसा सं तनू	३१६
सह दातुं पुरुहूत क्षियं	३१२	संवत्सरोऽसि परिवत्सरो	४४८
सह रय्या निवर्तस्वाग्ने	१८१	संवसाथाꣳस्वर्विदा	१६४
सह रय्या निवर्तस्वाग्ने	१८८	सं वां मनाꣳसि संव्रता	१९२
सह स्तोमाः सह छन्दस	५३०	सार्कं यक्ष्म प्रयत चाषेण	१९९
सहस्व मे अरातीः	२०१	सा विश्वायुः सा विश्व	३
स हव्यवाडमर्त्य उशिग्	३८३	सिञ्चन्ति परिषिञ्चन्त्यु	३४५
सहश्च सहस्यश्च हैमं	२३३	सिनीवाली सुकपर्दा	१७०
सहसा जातान्प्रणुदा नः	२३६	सिनीवालि पृथुष्टुके	५२२
सहस्र प्रमासि सहस्र	२५५	सिन्धोरिव प्राध्वने शू	२९३
सहस्रशीर्षा पुरुषः सह	४८७	सिꣳह्यासि स्वाहा सिꣳह्य	६६
सहस्राणि सहस्रशो	३६७	सिꣳह्यसि सपत्नसाही	६५
सꣳहितासि विश्वरूप्यूर्जा	३५	सीद त्वं मातुरस्या उप	१८२
सꣳहितो विश्वसामा	३०५	सीद होतः स्व उ लोके	१६५
संक्रन्दनेनाऽनिमिषेण	२७९	सीरा युञ्जन्तिकवयो—युगा	१९५
सं चेद्धयस्वाग्ने प्र च	४४०	सीसेन तन्त्रं मनसा	३३३
संज्ञानमसि कामधरणं	१८९	सुगव्यं नो वाजी स्वश्व्यं	४३२
सं ते पयाꣳसि समु	२०४	सुगावो देवाः सदना	११७
सं ते मनो मनसा सं प्राणः	८६	सुचश्च मे चमसाश्च मे	३००
सं ते वायुर्मातरिश्वा	१६६	सुजातोज्योतिषा सह	१६६
सं त्वमग्ने सूर्यस्य वर्चसा	३४	सुत्रामाणं पृथिवीं द्याम	३६१
संधये जारं गह्यायोपपति	४८१	सुनावमारुहे यमस्रवन्ती	३६१
संप्रच्यध्वमुप संप्रयाता	२५२	सुꣳपर्ण वस्ते मृगो अस्यादन्तो	४७४
संबर्हिरङ्क्ताꣳहविषा	२५	सुपर्ण पार्जन्य आतिर्वाहसो	४१७
संभूतिं च विनाशं च	५६८	सुपर्णोऽसि गरुत्मान्	२८८

मन्त्र	पृष्ठ
सुपर्णोऽसि गरुत्मांस्त्रि	१७९
सुप्रजाः प्रजाः प्रजनयन्	१००
सुबर्हिरग्निः पूषण्वान्स्ती	३६३
सुभूः स्वयंभूः प्रथमो	४०६
सुमित्रिया न आप ओष	५३६
सुमित्रिया न आप ओष	५४३
सुमित्रिया न आप ओष	५५९
सुसमिद्धाय शोचिषे	३०
सुरावन्तं बर्हिषदꣳ	३२२
सुवीरो वीरान्प्रजनयन्	९८
सुषारथिरश्वानिवय	५२१
सुष्टुतिꣳसुमतीवृधो रातिꣳ	३८२
सुषुम्नः सूर्यरश्मिश्चन्द्र	३०६
सुसंदृशं त्वा वयं	४२
सूपस्था अद्य देवो वन	३७७
सूर्य एकाकी चरति	३९२
सूर्य एकाकी चरति	४०२
सूर्यत्वचसः स्थ राष्ट्रदा	१४६
सूर्य रश्मिर्हरिकेशः पुर	२८४
सूर्यस्य चक्षुरारोहाग्नेः	५८
सो अग्निर्यो वसुर्गृणे	२४९
सोमः पवते सोमः पवते	१०१
सोमꣳ राजानमवसेग्निं	१४०
सोम राजन्विश्वास्त्वं प्रजा	८९
सोममद्भ्यो व्यपिबत्	३३२
सोमस्य त्विषिरसि तवेव	१४७
सोमस्य त्वा द्युम्नेना	१५०
सोमस्य रूपं क्रीतस्य	३१९
सोमस्य त्विषिरसि	१५०
सोमानꣳ स्वर णंरुणुहि	३६
सोमाय कुलुङ्गः आरण्यो	४१७
सोमाय लवानालभते	४१५
सोमाय हꣳ सानालभते	४१५
सोमो धेनुꣳ सोमो अर्वन्त	५२४
सोमो राजामृतꣳ सुत	३३१
सौरी बलाका शार्ङ्गः सृजयः	४१७
स्तोकानामिन्दुं प्रतिशूर	३४९
स्तीर्णं बर्हिः सुष्टरीमा	४६४
स्थिरो भव वीड्वङ्ग	१६७
स्योना पृथिवि नो भवा	५४१
स्योनासि सुषदासि	१५४
स्वगा त्वा देवेभ्यः प्रजापत	३८०
स्वर्णघर्मः स्वाहा स्वर्णा	३०८
स्वतवांश्च प्रघासी च	२९१
स्वर्यन्तो नापेक्षन्त आ	२८७
स्वयंभूरसि श्रेष्ठो रश्मिः	२७
स्वयं वाजिंस्तन्वं कल्पय	३९३
स्वराडसि सपत्नहा	७०
स्वराडस्युदीची दिग्ध्म	२४०
स्वांकृतोसि विश्वेभ्यः	९४
स्वांकृतोसि विश्वेभ्य इन्द्रि	९५
स्वादिष्ठया मदिष्ठया	४३९
स्वादुषꣳ सदः पितरो वयो	४७४
स्वाद्वीं त्वा स्वादुना तीव्रां	३१५
स्वाहा पूष्णे शरसे स्वाहा	५५६
स्वाहा प्राणेभ्यः साधि	५६१

मन्त्र	पृष्ठ
स्वाहा मरुद्भिः परिश्रीय	५४८
स्वाहा यज्ञं मनसः स्वाहो	४९
स्वाहा यज्ञं वरुणः सुक्ष	३६४
स्वाहा रुद्राय रुद्रहूतये	५५६
स्वैर्दक्षैर्दक्षपितेह सीद	२२३
ह	
हꣳसः शुचिषद्वसुरन्त	१५३
हꣳसः शुचिषद्वसुरन्त	१८२
हरयो धूमकेतवो वात	४९७
हविर्धानं यदश्विना	३२०
हविष्मतीरिमा आपो हवि	८८
हस्त आधाय सविता	१५९
हिङ्काराय स्वाहा हिङ्कृताय	३८१
हिमस्य त्वा जरायुणा	२७२
हिरण्मयेन पात्रेण	५६९
हिरण्यगर्भः समवर्तता	२०७
हिरण्यगर्भः समवर्तत	३८९
हिरण्यगर्भः समवर्तताग्रे	४२४
हिरण्यपाणिमूतये सवि	३८२
हिरण्यपाणिः सवितावि	५२५
हिरण्यरूपा उषसो	१५०
हिरण्यशृङ्गोऽयो अस्य	४६८
हिरण्यहस्तो असुरः सु	५२५
हृदे त्वा मनसे त्वा दिवे	८९
हृदे त्वा मनसे त्वा दिवे	५५०
हेमन्तेन ऋतुना देवा	३६५
होताध्वर्युरावया अग्निमि	४२८
होता यक्षत्तनूनपातं	४५०
होता यक्षत्तनूनपात्सर	३६६
होता यक्षत्तनूनपातभूति	४५०
होता यक्षत्तिस्रो देवीः	४५१
होता यक्षत्तिस्रो देवीर्न	३६८
होता यक्षत्पेशस्वती	४५८
होता यक्षत्प्रचेतसा	४५८
होता यक्षत्प्रजापतिꣳ	४०७
होता यक्षत्त्वष्टारमिन्द्रं	४५२
होता यक्षत्समिधानं	४५६
होता यक्षत्समिधाग्निमिड	३६६
होता यक्षत्समिधेन्द्रमिड	४५०
होता यक्षत्सरस्वतीं मेष	३७२
होता यक्षत्सुपेशसा	४५७
होता यक्षत्सुपेशसोषे	३६८
होता यक्षत्सुबर्हिषं	४५७
होता यक्षत्सुरेतसमृषभं	३६९
होता यक्षत्सुरेतसं	४५९
होता यक्षत्स्वाहाकृती	४५९
होता यक्षदग्निमꣳस्वाहा	३६९
होता यक्षदग्निमꣳस्विष्टकृ	३७३
होता यक्षदश्विनो छागस्य	३७०
होता यक्षदश्विनो छागस्य	३७१
होता यक्षदश्विनौ सरस्वती	३७०
होता यक्षदिडाभिरिन्द्र	४५०
होता यक्षदिडेडित आ	३६७
होता यक्षदिडेन्यमीडि	४५७
होता यक्षदिन्द्रꣳस्वाहा	४५२
होता यक्षदिन्द्रमृषभस्य	३७२

मन्त्र	पृष्ठ	मन्त्र	पृष्ठ
होता यक्षदुषेऽइन्द्रस्य	४५१	होता यक्षद्वनस्पतिꣳ	४५२
होता यक्षदोजो न वीर्यꣳ	४५१	होता यक्षद्वनस्पतिꣳ	४५९
होता यक्षदुरो दिशः कव	३६७	होता यक्षद्वनस्पतिमभि	३७३
होता यक्षद्दैव्या होतारा	३६८	होता यक्षद्वनस्पतिꣳश	३६९
होता यक्षद्दैव्या होतारा	४५१	होता यक्षद्व्यचस्वतीः	४५७
होता यक्षद्बर्हिरूर्णम्रदा	३६७	होता यक्षन्नराशꣳ सं	३६६
होता यक्षद्बर्हिषीन्द्रंमी	४५०		

महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठककृत ग्रंथ व लेख



संस्कृत ग्रंथ

(१) **मूलसहित बालबोधिनी** (संस्कृत टीका)–वल्लभाचार्यकृत ब्रह्मसूत्राणु-भाष्यावरील विस्तृत प्रस्तावनेसह (in two parts) (Bhandarkar Oriental Research Institute, Poona).

(२) **बालबोधिनी** (संस्कृत टीका)–ईशावास्योपनिषत्–रामानुजमतीय रामचंद्रिका (Oriental Book Supplying Agency, Poona).

(३) **बालबोधिनी** (संस्कृत टीका)–केनोपनिषत्–शांकर व रंगरामानुजभाष्य विस्तृत प्रस्तावनेसह (Oriental Book Supplying Agency, Poona).

(४) **बालबोधिनी** (संस्कृत टीका)–काठकोपनिषत्–शांकर व रंगरामानुज-भाष्य विस्तृत प्रस्तावनेसह (Oriental Book Supplying Agency, Poona).

(५) **बालबोधिनी** (संस्कृत टीका)–मुंडकोपनिषत्–शांकरभाष्य (Oriental Book Supplying Agency, Poona).

(६) **Index to पातञ्जल महाभाष्य**
(७) **Index to कात्यायनवार्तिक & पाणिनि अष्टाध्यायी** with the aid of Pandit Chitrav Shastri, Poona.
} Bhandarkar Oriental Research Institute Poona.

(८) **शिवस्मृति**–धर्मशास्त्रग्रंथ (अमुद्रित)

आमचें प्रकाशन

१ **तिरंगी नवमतवाद**—न. चि. केळकर, किं. १० आ.
२ **विस्तवाशीं खेळ** (नाटक)—प्रा. वा. म. जोशी, किं. १ रु.
३ **फ्रेंच राज्यक्रान्ति**—न. चिं. केळकर, किं. २ रु.
४ **हास्य-विनोद-मीमांसा**—न. चिं. केळकर, किं. ४ रु
५ **सहारा**—श्रीधर देशपांडे, किं. १ रु
६ **बलिदान**—न. चिं. केळकर, किं. २ रु.
७ **समग्र केळकर-वाङ्मय**—किं. ५० रु.
८ **चंद्रगुप्त** (नाटक)—न चिं. केळकर, किं. १ रु
९ **राका** (काव्य)—सौ. संजीवनी मराठे, किं. १ रु
१० **प्रतारणा**—प्रा. वि. पां. दांडेकर, किं. १॥। रु
११ **संसार-सोपान**—सौ. गिरजाबाई केळकर, किं. १ रु
१२ **न्याहारी**—वि. म. कुळकर्णी, किं. १ रु.
१३ **वादळी वारे**—प्रा. द. के. केळकर, कि २ रु.
१४ **इव्सेन**—गं. भा. निरंतर, किं. १० आ.
१५ **उन्माद**—प्रो. ना. सी. फडके, किं. २॥ रु.
१६ **बीजांकुर** (काव्य)—श्री. शांताराम आठवले, किं. १। रु.
१७ **दुसरी सावली**—श्री. वि. वि. बोकील किं. १। रु
१८ **कागदी विमानें**—श्री. र. गो. सरदेसाई. किं. १। रु
१९ **बोकीलांच्या गोष्टी**—किं. १ रु.
२० **गुप्त प्रायश्चित्त**—प्रो. ना. सी. फडके, किं. २॥ रु.
२१ **प्रदक्षिणा**—किं. २ रु.
२२ **संस्कृति-संगम**—प्रा. द. के. केळकर, किं. ४ रु.
२३ **चंपी आणि मोत्या**—किं. १॥ रु.
२४ **सायंतारा**—श्रीधर देशपांडे, किं. २॥ रु.
वेदप्रकाश—म. म. श्रीधरशास्त्री पाठक किं. १० रु.

ग्रंथ व मालेचीं इतर पुस्तकें **मनोहर ग्रंथमाला, टिळक रस्ता पुणें २**; आणि **परचुरे पुराणिक व तु. पुं. शेटे माधव-बाग मुंबई ४** या पत्त्यावर इतरांनाहि मिळतील.